
# लोकमान्य टिळक लेखसंग्रह

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



REFBK-0017305

संपादक : तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

साहित्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

26 NOV 1975

10 DEC 1975

[क्र. मा. प.]

# लोकमान्य टिळक — लेखसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम.
अनुक्रम ७५७७५ वि: निबंध
क्रमांक २११८ नों: दि: २७।३।७०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१७३०५

REFBK-0017305

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

# लोकमान्य टिळक
# लेखसंग्रह

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

यांचा

केसरीतील निवडक लेखसंग्रह

संपादक

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी

साहित्य अकादेमी नवी दिल्ली

*Lokamanya Tilak–Lekha–Sangraha* ( Selections from the writings of Bal Gangadhar Tilak published in the Kesari ) Edited by Tarkateerth Shri Laxman Shastri Joshi; Sahitya Akademi, New Delhi ( 1969 ) Price Rs. 12/–

साहित्य अकादेमी, नवी दिल्ली

* श्री. जयंतराव टिळक, केसरी-मराठा ट्रस्ट,
नारायणपेठ, पुणे– २ यांच्या सौजन्याने साभार प्रसिद्ध.

* मुखपृष्ठाचे चित्र : श्री. जे. डी. गोंधळेकर.

मुद्रक :

दी प्राज्ञ प्रेस, वाई

किंमत : बारा रुपये

# लेखसूची

खंड पहिला– आधी सामाजिक कीं राजकीय — पृ. १ ते ४१

१ आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ? . . . . १
२–३ सामाजिक सुधारणेचे मार्ग . . . . . ९
४ आशिया खंडांतील कारस्थानें . . . . १८
५ हिंदुत्व आणि सुधारणा . . . . . २२
६ ब्राह्मण व ब्राह्मणेतर . . . . . . २८
७ स्वराज्य, ब्राह्मण व ब्राह्मणेतर . . . . ३६

खंड दुसरा– स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क

राजकीय पारतंत्र्य, राजकीय सुधारणा व स्वराज्य — पृ. ४२ ते १९८

१ नेटिव कामदारांची नीतिमत्ता . . . . ४२
२ राजद्रोह . . . . . . . . ४५
३ इंग्रजी राज्यांत आम्हांस फायदा काय झाला ? . . ५०
४ आमच्यावर जुलूम कसा होतो ? . . . . ५३
५ राजधर्माचे नवे उपदेशक यांतील बीज काय ? . . ५९
६ लॅन्सडौन साहेबांची शेवटची सलामी . . . . ६४
७ चीन व जपान . . . . . . . ६९
८ मि. दादाभाई नौरोजी यांची रॉयल कमिशनपुढील साक्ष ७२
९ मि. दिनशा ए. वाच्छा यांची रॉयलकमिशनपुढें झालेली साक्ष ७५
१० रॉयल कमिशनपुढें प्रो. गोखले यांची झालेली साक्ष . ७७
११ राणीसरकारचा जयजयकार . . . . . ८०
१२ राजद्रोह कशाला म्हणतात ? . . . . . ८७
१३ पुनश्च हरिः ॐ ! . . . . . ९३
१४ पाच्छाहीपणा का गुलामगिरी ? . . . . १०५

१५ पूर्वेकडील लोकांचे विचारैक्य . . . . . ११२
१६ खोटे कोण ? . . . . . . . ११६
१७ परवश झालेल्या नेटिव अंमलदाराचें मानसिक दौर्बल्य . १२४
१८ आणीबाणीची वेळ !! ( वंगभंगाच्या चळवळीवरील विचार ) १३२
१९ लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द . . . . . १३८
२० तत्त्ववेत्ता आणि मुत्सद्दी . . . . . . . १४७
२१ सनदशीर व कायदेशीर . . . . . . . १५२
२२ स्वराज्य आणि सुराज्य . . . . . . . १६१
२३ मिल्ल आणि मोर्ले . . . . . . . १६७
२४ निकरानें एकमुखी मागणी करा . . . . . १७२
२५ नवी विटी, नवें राज्य ! . . . . . १७९
२६ कॉंग्रेसमधील लोकशाहीपक्षाचें धोरण . . . . १८५

## खंड तिसरा– कॉंग्रेस अर्थात् राष्ट्रीय सभा पृ. १८९ ते २३७

१ मे. ह्यूमसाहेब यांची शेवटची भेट . . . . १८९
२ राष्ट्रीय सभा . . . . . . . . . . १९४
३–४ अकरावी राष्ट्रीय सभा . . . . . १९९
५ गेल्या राष्ट्रीय सभेंत विशेष काय झालें ? . . . २०२
६ राजकीय पक्षोपन्यास . . . . . . . २१०
७ समेट कसा होईल ? . . . . . . . २१७
८ खरी अडचण कोठें आहे ? . . . . . . २२३
९ अडचणीचा निर्वाह . . . . . . . २२९

## खंड चवथा– हिंदुमुसलमान संबंध पृ.२३८ ते २५३

१ हिंदु मुसलमानांचा दंगा . . . . . . . २३८
२ स्वतंत्र चौकशी झालीच पाहिजे . . . . . २४४
३ मुंबईतील दंगा आणि सरकारचें कर्तव्य . . . २४६
४. मुसलमानांच्या उद्धारार्थ नवा अवतार ! . . . २५०

## खंड पाचवा– परतंत्र भारताच्या आर्थिक समस्या


शेती, स्वदेशी व बहिष्कार — पृ. २५४ ते ३१५

१ शेतकऱ्यांचा कायदा . . . . . . . २५४
२ हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें लागेल काय ? . . . . . २५९
३ शेतकऱ्यांच्या कमिशनानें काय केलें ? . . . २६३
४ शेतकऱ्यांच्या कमिशनानें सुचविलेले उपाय . . . २६७
५ औद्योगिक पारतंत्र्य . . . . . . २६८
६ यापेक्षा जास्त अन्याय तो कोणता ? . . . . २७१
७ देशी कपडा वापरण्याबद्दल मि. वाच्छा यांचे विचार . २७५
८ दोन चांगलीं पुस्तकें–
(भरभराटलेलें हिंदुस्थान, हिंदुस्थानचें दारिद्र्य) . २७९
९ आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले ? . . . . २९१
१० राष्ट्रीय बहिष्कार . . . . . . . २९९
११ बहिष्कारयोग . . . . . . . ३०५
१२ स्वदेशीवरील आक्षेप . . . . . . ३११

खंड सहावा– शैक्षणिक प्रश्न व राष्ट्रीय शिक्षण — पृ. ३१६ ते ३७७

१ लष्करी शिक्षणाची शाळा . . . . . ३१६
२ खरें विद्यापीठ कोणतें ? . . . . . . ३१९
३ युनिव्हर्सिट्या ऊर्फ सरकारी हमालखाने . . . ३२२
४ जपान आणि हिंदुस्थान . . . . . . ३२८
५ हे आमचे गुरूच नव्हेत ! . . . . . ३३३
६ राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी . . ३५४
७ चतकोर भाकरीची गुलामगिरी ! . . . . ३७१

खंड सातवा– संकीर्ण — पृ. ३७८ ते ४५९

(अ) शिवाजी उत्सव गणेशोत्सव व राष्ट्रीय उत्सवाची आवश्यकता
(ब) धर्म व तत्त्वज्ञान

(क) कै. महादेव गोविंद रानडे, स्वामी विवेकानंद, आगरकर व गोखले.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री शिवाजी महाराज यांच्या स्मारकाबद्दल सूचना | ३७८ |
| २ | यंदाचा गणपत्युत्सव | ३७९ |
| ३ | शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव | ३८१ |
| ४ | हा विघ्नसंतोषीपणा नव्हे काय ? | ३८३ |
| ५ | आपला धर्म | ३८७ |
| ६ | अज्ञेयवाद | ३९० |
| ७ | ज्ञेयाज्ञेयमीमांसा | ३९४ |
| ८ | हर्बर्ट स्पेन्सर | ४०३ |
| ९ | डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील पांचवा मृत्यु !— प्रि. गोपाळ गणेश आगरकर | ४१५ |
| १० | प्रो. मॅक्सम्यूलर यांचा मृत्यु | ४२१ |
| ११ | कै. न्या. महादेव गोविंद रानडे | ४२९ |
| १२ | श्रीस्वामी विवेकानंद हे समाधिस्थ झाले ! | ४३७ |
| १३ | कै. गोपाळराव गोखले | ४४२ |
| १४ | आगरकरांची श्राद्धतिथि | ४४७ |
| १५ | महात्मा गांधींच्या चरित्राची लो. टिळककृत प्रस्तावना | ४५३ |

...वाचनालय. ठाणे.
अनुक्रमांक ७५८३५ वि: निबंध
२-११८ नों. दि. २९।३।६२

# प्रस्तावना

"लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा केसरीतील निवडक लेखसंग्रह" असे या ग्रंथास नाव दिले आहे याचे कारण टिळकांनी बहुतेक मराठी स्फुटलेखन केसरीतच केले आहे; अन्यत्र केले नाही. केसरी व्यतिरिक्त लेखन टिळकांनी इंग्लिशमध्ये "मराठा" या इंग्रजी वृत्तपत्रात केलें. त्यातील मजकूर व केसरीतील मजकूर बहुतेक समानार्थकच असल्यामुळे या लेखसंग्रहात समावेश करण्याचे प्रयोजन नाही. राहता राहिले "केसरी" व "मराठा" या साप्ताहिकांच्या बाहेर टिळकांनी केलेले स्फुटलेखन होय. ते फार अल्प आहे. उदाहरणार्थ लिमये-कृत "भारतीय युद्ध" या ग्रंथाची टिळकलिखित प्रस्तावना आणि अवंतिकाबाई गोखलेकृत गांधीचरित्र प्रस्तावना होय. मराठीत त्यांनी सलग असा एकच ग्रंथ लिहिला, तो म्हणजे "गीतारहस्य" होय. बाकीचे ग्रंथ त्यांनी इंग्लिशमध्ये लिहिले आहेत. इंग्लिशमध्ये त्यांचे दोनच ग्रंथ प्रसिद्ध आहेत. एक "ओरायन" व दुसरा "आर्क्टिक् होम इन् दि वेदाज्." गीतारहस्य व वरील दोन इंग्लिशमध्ये लिहिलेले ग्रंथ यातील मजकूर आम्ही येथे दिला नाही कारण ते ग्रंथ वाचकांना पुस्तकांच्या बाजारात स्वतंत्रपणे उपलब्ध आहेत.

लोकमान्य टिळकांचे केसरीतील समग्र लेखांचे प्रकाशन केसरी-मराठा संस्थेने चार भागात अनुक्रमे सन १९२२, १९२३, १९२४ आणि १९३० साली प्रकाशित केले. त्यांची एकूण पृष्ठसंख्या २४४७ इतकी मोठी आहे. ते चारही भाग आता पुस्तकांच्या बाजारात उपलब्ध नाहीत. या सर्व भागांना कै. न. चिं. केळकर यांच्या छोटया प्रस्तावना आहेत. पहिले तीन भाग राजकीय खंड म्हणून निर्दिष्ट केले असून भाग ४ था संकीर्ण लेखसंग्रह (सामाजिक, धार्मिक, वाङ्मय-विषयक) म्हणून निर्दिष्ट केला आहे.

आम्ही निवडलेल्या लेखांचे सात खंडांमध्ये वर्गीकरण केले असून त्यांस अनुक्रमे खंड १– आधी सामाजिक की राजकीय, खंड २– स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क, खंड ३– काँग्रेस अर्थात् राष्ट्रीय सभा, खंड ४– हिंदु-मुसलमान संबंध, खंड ५– परतंत्र भारताच्या आर्थिक समस्या, खंड ६– शैक्षणिक प्रश्न व राष्ट्रीय शिक्षण व खंड ७– संकीर्ण (शिवाजी उत्सव, गणेश उत्सव व राष्ट्रीय उत्सवाची आवश्यकता; धर्म व तत्त्वज्ञान आणि प्रसिद्ध व्यक्ति) अशी शीर्षके दिली आहेत. टिळकांचे संपादकत्वाखाली केसरी साप्ताहिक जाहीरपणे सन १८८७ साली प्रसिद्ध होऊ लागले.

त्यापूर्वीही आगरकरांच्या संपादकत्वाखाली चाललेल्या केसरी साप्ताहिकात टिळक थोडेसे लिहीत व त्यातल्या त्यात ते प्रायः सामाजिक किंवा धार्मिक विषयांवर लिहीत, असे पहिल्या भागाच्या प्रस्तावनेत कै. न. चिं. केळकर म्हणतात. केसरी-मराठा संस्थेने प्रसिद्ध केलेल्या चार खंडातील सर्व लेख टिळकांचे लेख म्हणून न. चिं. केळकर यांनी निवडलेले असले तरी त्यात सर्वच लेख स्वतः टिळकांनी लिहिले आहेत असा निर्वाळा केळकरही देत नाहीत. पुष्कळ वेळा संपादकीय लेख दुसऱ्या सह-संपादकांनी किंवा उपसंपादकांनीही अडीअडचणीच्या वेळी लिहिलेले असू शकतात. आम्ही निवडलेल्या लेखांच्या बाबतीत केळकरांपेक्षा अधिक निर्णायक अनुकूलता लाभली ती अशी की टिळकांच्या वेळचा व नंतरचा केळकरांचा सर्व लेखसंग्रह आणि टिळकांच्या वेळचा व नंतरचा कै. कृ. प्र. खाडिलकर यांचा सर्व लेखसंग्रह अगोदरच प्रसिद्ध झाला असल्यामुळे वरील चारही भागातील लेखांतील खास टिळकांचे लेख कोणते याचा निर्णय करणे अधिक सुलभ झाले. आम्ही हा निवडक लेखसंग्रह तयार केल्यानंतर आमचे मित्र प्रा. न. र. फाटक यांना दाखविला व त्यांच्याही सूचना आम्हास यासंबंधात उपयोगी पडल्या हे निर्दिष्ट करणे आमचे कर्तव्य आहे.

हे लेख निवडत असतांना राजकीय किंवा सामाजिक दृष्टीने केवळ तात्कालिक उपयुक्तता असलेले परंतु टिळकांच्या वा भारताच्या सार्वजनिक जीवनात व वैचारिक विकासात फारसे स्थान नसलेले लेख वगळण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे ज्या लेखात विचारांची वारंवार पुनरुक्ति कमी महत्त्वाच्या संदर्भात झालेली आहे तेही लेख आम्ही यातून वगळलेले आहेत. लेख निवडतांना कमी महत्त्व कशास आहे व अधिक महत्त्व कशास आहे याचा विवेक करणे मोठे दुर्घट असते. या गोष्टीचे अवधान राखून आम्ही लेखांची निवड केली आहे. त्याचप्रमाणे लेख निवडतांना टिळकांच्या सामाजिक, राजकीय व तात्त्विक विचारांच्या विकासाचे टप्पेही ध्यानात घेऊन ही निवड केली आहे. केवळ विकासांचेच टप्पे नव्हे तर त्यांच्या लेखनामध्ये एक प्रकारची तालबद्धता आढळून येते, तीही ध्यानात घ्यावी लागते. ही तालबद्धता भारतीयांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील आणि जगाच्या ऐतिहासिक जीवनातील अर्थपूर्ण घट-नांच्या संदर्भात निर्माण झालेली आहे. त्यात विचारांचा व भावनांचा आरोह व अवरोह, तीव्रता व मृदुता, कठोरता व शालीनता, चढाई व माघार, स्वैरता व संयम, गर्व व विनय, एकदा आशा व दुसऱ्यांदा निराशा, वैचारिक तर्क-शुद्धता व भावनांचा प्रक्षोभ यांचे अंतर्विरोधी प्रत्यंतर मिळते.

टिळकांचे चरित्र म्हणजे विशाल द्रष्टेपणा व अदम्य कर्तेपणा यांचा भव्य संगम होय. टिळकचरित्र म्हणजे १८८५ ते १९२० पर्यंतच्या आधुनिक भारताच्या

इतिहासाचा गाभा होय. ते एक प्रत्यक्षांत घडलेले महाकाव्य आहे. हे महाकाव्य साहित्यरूपात प्रकट करणारा प्रतिभासंपन्न चरित्रकार मात्र अजून झाला नाही. व त्यांचे दीर्घ जीवन प्रत्यक्ष पाहिलेले कोणी उरलेले नाही म्हणून पुढे कधी काळी तसा कोणी चरित्रकार होईल असेही वाटत नाही. परंपरागत आध्यात्मिक भारतीय संस्कृतीच्या कुशीत जन्मलेला व आधुनिक संस्कृतीच्या सिंहिणीच्या स्तनातील सकस दुग्ध प्राशन केलेला हा " बाळ " आहे. या दुधाची त्यांनी आपल्या लेखनात अनेकदा विशेष प्रशंसा केली आहे. पहिल्या विद्यार्थी दशेतील विचारांच्या उषःकालातच त्यांना भारतीय भावी स्वराज्याचे दिव्य स्वप्न दिसले. ते स्वप्न प्रत्यक्ष सृष्टीत पाहण्याचा जो ध्यास लागला त्या ध्यासाने सर्व टिळकजीवन अखेरपर्यंत भारले गेले. लोकशाही स्वातंत्र्याच्या आंदोलनाचे भारतव्यापी अधिष्ठान निर्माण करणारे अग्रणी आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कर्तृत्वाला सफल करणाऱ्या लोकशाही शक्तींना गांधीच्यापूर्वी जागृत करणारा दिव्य दिनमणी म्हणजे लोकमान्य टिळक होय. विद्यार्थीदिशा संपल्यापासून अखेरपर्यंत सतत ४५ वर्षे एकाच ध्येयाच्या दिशेने सर्व प्रकारे वैचारिक वा सांसारिक मोह टाळून सतत संग्रामस्थ राहणे हाच टिळकांच्या द्रष्टृत्वाचा अस्सल निकष आहे. टिळकांच्या प्रस्तुत लेखसंग्रहाच्या रूपाने हाच निकष आम्ही वाचकांच्या हाती देत आहो.

वस्तुतः केसरी-मराठासंस्थेने पूर्वी प्रसिद्ध केलेले चार भाग पुनः अधिक विस्तृत टिप्पण्या देऊन प्रसिद्ध झाले तर त्यांची गरज विशेषच आहे. ही गरज कधी संपणारी नाही. भारतीय लोकशाही स्वातंत्र्याचे पहिले तळपणारे कोवळे वैचारिक किरण त्या संग्रहात पृष्ठागणिक दिसतात. देशाच्या राजकीय व सामाजिक इतिहासाच्या प्रक्षुब्ध गंगाप्रवाहाचे तपशीलवार दर्शन घडते. अशा तपशीलवार दर्शनाची अपेक्षा या आम्ही तयार केलेल्या निवडक लेखसंग्रहाकडून वाचकांनी करू नये.

## टिळककालीन चार विचारधारा

टिळकांनी सार्वजनिक जीवनात सर्वस्व अर्पण करण्याची मानसिक तयारी महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच केली होती. अव्वल इंग्रजी सत्तेचा अम्मल संपून थोडी वर्षे लोटली होती. पश्चिमी आधुनिक विद्येचा व संस्कृतीचा प्रभाव पडलेल्या नवशिक्षितांच्या दोन पिढ्या चमकून गेल्या होत्या. पांढरपेशा भारतीयांमध्ये वैचारिक द्वंद्व दोन पिढ्या चालले होते. ब्रिटिशांच्या शिस्तबद्ध, कायदेशीर राज्यसत्तेखाली भारतातील सर्व धर्मांचे व सर्व जातींचे लोक एकवटले होते. आधुनिक वैज्ञानिक शोधांवर आधारलेली यांत्रिक सुधारणा आणि विज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे व पश्चिमी आधुनिक

तत्त्वज्ञान ही डोळे दिपवीत होती. थोडेफार अपवाद सोडल्यास सर्वत्र सामान्य जनतेत भयाण राजकीय शांतता नांदत होती. सर्वांचे डोळे दिपविणारा पश्चिमी सत्तेचा प्रकाश सुशिक्षितातील काही अपवादादाखल असलेल्या मोजक्या मूठभर लोकांना प्रथमपासूनच दिपवीत नव्हता. राजकीय शांततेच्या साम्राज्याखाली निमूटपणे दारिद्रय व दुःख सहन करीत कण्हणाऱ्या व अज्ञानांधकारात झोपलेल्या सामान्य जनतेची केविलवाणी दशा पाहून मूठभर सुशिक्षितांचा गट उद्विग्न मनस्क होऊन विचार करू लागला की या परिस्थितीस जबाबदार कोण ? या गटात भव्य भूतकाळाबद्दल अभिमान बाळगणारे काही होते ते परकीय राज्यसत्तेसच या परिस्थितीस सर्वस्वी जबाबदार मानू लागले. त्यांच्यातून भारतातील सशस्त्र स्वातंत्र्यवाद्यांची परंपरा निर्माण झाली. त्याच शंभर वर्षांच्या परंपरेतील अखेरचे सशस्त्र क्रांतिवादी नेताजी सुभाषचंद्र बोस होत. ही पहिली विचारधारा होय. त्या गटातील दुसरे काही भारताच्या अवनतीची व पारतंत्र्याची मीमांसा आधुनिक पश्चिमी संस्कृतीच्या बुद्धिवादी दृष्टिकोणाच्या आधारे करू लागले व अशा निष्कर्षास पोचले की, भारताची परंपरागत धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक रचनाच या अवनतीस जबाबदार आहे. धर्माच्या अंध रूढी, जन्मसिद्ध उच्चनीच मानणारा जातिभेद व त्यांना कारणीभूत असलेली अंधश्रद्धाच समूळ नष्ट झाल्याशिवाय भारत नव्या लोकमतास, जबाबदार राज्यपद्धतीस पात्र होणार नाही. ब्रिटिश राज्यकर्त्यांना केवळ जबाबदार धरण्यात काही हाशील नाही; ब्रिटिश संस्कृतीत उदारमतवादी मूल्ये ओतप्रोत भरलेली असली तरी ब्रिटिश राज्यकर्ते, आमची सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय, सहानुभूतीने लोकमतास जबाबदार राज्य-पद्धतीची तत्त्वे कार्यवाहीत आणू शकणार नाहीत; त्याकरिता आत्मसंशोधन व आत्मपरिवर्तन करण्याची आवश्यकता आहे. या प्रकारच्या मंडळीत राजा राम-मोहन रॉय, जोतिराव फुले, लोकहितवादी, ईश्वरचंद्र विद्यासागर, डॉ. रा. गो. भांडारकर, रँग्लर परांजपे इत्यादिकांची गणना होते. ही दुसरी विचारधारा होय. तिसरे, काही सुशिक्षित तत्कालीन सद्यःपरिस्थितीच्या दोन्ही घटकांना म्हणजे परंपरागत समाजरचना व परकीय जुलमी व बेजबाबदार सत्ता यांना जबाबदार धरून सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा या दोन्ही एक-समयावच्छेदे करून व्हावयास पाहिजेत असा सव्यसाची पवित्रा घेऊन जीवन-संग्रामात उतरले. हे लोक अत्यंत थोडे बोटांवरच मोजण्याइतके होते, त्यांच्यातील अद्वितीय अग्रणी गोपाळ गणेश आगरकर होते. न्यायमूर्ती म. गो. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादि थोर नेमस्त राजकीय नेते याच तिसऱ्या प्रकारात मोडतात. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारच्या लोकांमध्ये अनेक प्रकारच्या जहाल, मध्यम व सौम्य

छटा असलेल्या व्यक्ती होत्या. मोठ्या खेदाची गोष्ट अशी, की राजकीय दृष्ट्या मवाळ अशा समाजसुधारकांच्या मध्ये केवळ बोलके, आंगचुकार, संधिसाधू, व ब्रिटिशसत्तेस धार्जिण्या अट्टल स्वार्थी लोकांचा भरणाच मोठा होता; लहान मोठ्या, ब्रिटिश सत्ताधीशांना खूप करू पाहणारे खुपमस्करे त्यांत थोडे थोडके नव्हते; ह्याचें वर्णन टिळकांच्या लेखांत अनेक ठिकाणी वाचावयास मिळते. याच कचखाऊ सुधारकांच्या मुळे सामाजिक सुधारणेचे आंदोलन मागे पडले. अखेरचा चवथा विचारधारेचा प्रकार म्हणजे परंपरागत सामाजिक परंपरा व परकीय राजसत्ता या दोन्ही गोष्टी भारतीय अधोगतीस कारण असल्या तरी परकीय राजसत्ता अधोगतीस मुख्यत: जबाबदार धरून राजकीय सुधारणेस प्राधान्य देणे अधिक न्याय्य, अधिक इष्ट व अधिक शक्य आहे, असे म्हणणारांचा. यांचे सर्वश्रेष्ठ नेते म्हणजे लो. टिळक होत. या चवथ्या प्रकारात पहिल्या सशस्त्र क्रांतिवाद्यांचाही मोठ्या प्रमाणात उत्तरोत्तर भरणा होत गेला. त्यातील काही तर सामाजिक क्रांति व राजक्रांति दोन्ही हातात हात घालून चालल्या पाहिजेत अशा मतांचे होते. उदाहरणार्थ, स्वातंत्र्यवीर सावरकर हे हिंदुधर्म व समाजपद्धति यांच्यात मौलिक सुधारणा व्हावी याकरिता परंपरेवरील अंधश्रद्धेवर सतत हल्ला करीत राहिले. भगतसिंग हे समाजवादी क्रांतीचे पुरस्कर्ते होते. योगी अरविंद हे क्रांतिकार्याबरोबरच हिंदुधर्माच्या नव्या मानवतावादी तत्त्वज्ञानाची बैठक रचित होते; परंतु थोड्याच अवधीत त्यांनी राजकीय क्रांतीच्या आंदोलनातून आंग काढून व निवृत्त होऊन शांत आश्रमवासी जीवनपद्धती स्वीकारली.

## आधी सामाजिक की आधी राजकीय

अर्जुनाप्रमाणे एकाच राजकीय लक्ष्याच्या वेधात टिळक तन्मय झाले आणि सार्वजनिक जीवनक्रमाच्या प्रारंभीच "आधी सामाजिक का राजकीय" या प्रश्नाचे उत्तर त्यांनी मनाशी ठरविले. या संबंधात डॉ. रा. गो. भांडारकर आगरकरांसारख्या ध्येयनिष्ठ अनेक सुधारकाग्रणींशी त्यांना वैचारिक सामना द्यावा लागला. सामाजिक सुधारणेचा दृष्टिकोण एका विशिष्ट अर्थाने तत्त्वत: मान्य होता ही गोष्ट ' हिंदुत्व व सुधारणा " या लेखात त्यांनी स्पष्टपणे मान्य केली आहे. एवढेच नव्हे तर धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याचे दोन पैलू आहेत म्हणून सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याकरिता वैचारिक संघर्ष चाललाच पाहिजे, असे त्यांनी "औद्योगिक पारतंत्र्य" ( पृ. २६८ ) या लेखात स्पष्ट म्हटले आहे. सुधारकांशी वैचारिक संग्राम सुरू असता त्यांना दोन प्रकारच्या सुधारकांशी लढत द्यावी लागली. एक म्हणजे सामाजिक अगोदर नंतर राजकीय, असे प्रतिपादन करणाऱ्यांशी. आधीसामाजिकवाले म्हणतात की, घरात स्त्रीदास्य व समाजात

जन्मसिद्ध विषमता जे राखतात त्यांना स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वांवर अधिष्ठित असे राजकीय हक्क इंग्रजांकडे मागण्याचा काय अधिकार आहे? हे हक्क कोणच्या तोंडाने मागता? इंग्रजांकडून राजकीय हक्क मिळविण्यास सामाजिक सुधारणा अगोदर केल्या पाहिजेत, असे म्हणणाऱ्या सुधारकांना टिळकांनी असे उत्तर दिले की, सामाजिक सुधारणेच्या बाबतीत इंग्लिशांच्या बरोबरीने सामाजिक सुधारणेत पुढे असलेल्या व इंग्लिशांशी रक्तसंबंधाचे नाते असलेल्या ऐरिश राष्ट्राला इंग्लिश राज्यकर्ते बरोबरीचे राजकीय स्वातंत्र्य देत नाहीत हे उघड आहे; असे असताना, आधी सामाजिक सुधारणा केली तर नंतर राजकीय हक्कप्राप्ती होईल, असा कार्यकारणभाव सिद्ध होत नाही. दुसरे असे की, सामाजिक सुधारणेला सामान्य लोकमत अनुकूल नाही. सामाजिक सुधारणा इष्ट असली तरी त्यास सुशिक्षित मध्यमवर्गाचा बहुमताने पाठिंबा नाही तर अशिक्षित बहुजनांची काय कथा? सामाजिक सुधारणेचा प्रयत्न करीत असता समाजातील प्रत्येक वर्गात, जातीत व जमातीत अन्तर्विग्रह उसळतो, राजकीय सुधारणेच्या बाबतीत तसे होण्याचे कारण नाही. सर्वच सुशिक्षित व अशिक्षित जनतेचा म्हणजे बहुसंख्य समाजाचा स्वराज्याच्या हक्काच्या मागणीला सहज पाठिंबा मिळतो. एवढेच नव्हे तर राजकीय हक्कांच्या योगाने अनेक आर्थिक अडचणी व आपत्तीतून बाहेर पडता येते, याची जाणीव जनतेला चटकन होऊन त्यांच्यात एकजूट तयार होऊन एकमुखी मागणी होऊ शकते. दोन्ही प्रश्न एकदम हाती घेतल्यास राजकीय हक्काच्या मागणीकरिता आवश्यक असलेल्या एकजुटीस तडे जाऊ लागतील. हिंदु, मुसलमान इत्यादी सर्व जमातींना एकत्र आणून एकजूट करण्याचा मार्ग राजकीय प्रश्नांचा उठाव हाच होय. तिसरे असे की "स्वातंत्र्यतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो जोम आहे तो जोपर्यंत जागृत असतो तोपर्यंत समाजरचना कशीहि असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहीत. पण एकदा का तो जोम नाहीसा झाला म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणे छातीवर बसून जगात या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात. जुन्या संस्थांबद्दल खरोखर योग्य अभिमान वाटावयास पाहिजे. "योग्य" म्हणण्याचे कारण एवढेच की हल्लींच्या काळात सर्वांशी व सर्वतोपरी जुन्या संस्था चालणे दुर्घट आहे, हे आम्हासही मान्य आहे. पाश्चात्य राष्ट्राची व आमची कर्मधर्मसंयोगामुळे जी सांगड पडली आहे तिचा साखळीच्या दोन्ही दुव्यांवर परिणाम झाल्याखेरीज रहावयाचा नाही. तथापि तेवढ्यामुळेच आमच्या समाजरचनेचा पाया खणून काढून पुनः नवा पाया घातल्याखेरीज चालावयाचे नाही असे मात्र आम्हांस वाटत नाही" असे

टिळक सांगतात (सामाजिक सुधारणेचे मार्ग). चवथे असे कीं, सामाजिक सुधारणाही परिस्थितीच्या कचाटयात सापडल्याशिवाय होत नसते. टिळक यासंबंधी दाखले देत असता असे म्हणतात की, हिंदुधर्मात वेळोवेळी सुधारणा व परिवर्तने बदललेल्या देशकाल परिस्थितीप्रमाणे होत आली आहेत, असे हिंदुधर्माचा इतिहास सांगतो. ब्रिटिशपूर्वकाल पेशवाईत सैन्यामध्ये अन्नपाण्याचा विटाळ मानीत नसत. राजकीय हक्क मिळाल्यावर हिंदी लोक जसजशी आवश्यकता उत्पन्न होईल तसतसे बदलत जातील.

## सामाजिक सुधारणांचे अधिष्ठान अध्यात्मवाद

केवळ बुद्धिवादाच्या आधारे धर्मनिरपेक्ष सुधारणेचा पुरस्कार करताना परंपरागत हिंदुधर्मशास्त्र ग्रंथावर आधारलेल्या अनेक धर्म कल्पनांचा मूर्खपणा सुधारक शाबीत करीत. त्यावर टिळकांनी असे उत्तर दिले की सर्वच पवित्र ग्रंथांवर आधारलेल्या धर्मांच्या मध्ये अशा बुद्धिवादास न पटलेल्या कल्पना आहेत त्याबाबतीत एका हिंदुधर्माच्याच उणिवांवर बोट ठेवण्यात परधार्जिणेपणाच सिद्ध होतो. त्यामुळे लोक आत्मविश्वास व स्वत्व गमावून बसतात व अधिक नेभळे बनतात. हिंदुधर्मावरील श्रद्धा ढळली तर एवढया मोठया संख्येच्या हिंदूंना एकत्र श्रद्धेने बांधणारा दुवाच नष्ट होऊन ते राष्ट्रदृष्टया विस्कळीत व दुर्बळ होतील. टिळकांच्या मते जातिभेद, व्रतवैकल्ये, पूजाअर्चा इत्यादि आचारधर्म हे हिंदुधर्माचे बाह्यांग होय, त्याचे अंतरंग अध्यात्मवाद होय, हे अंतरंगच हिंदुधर्माचे रहस्य होय; नैतिकतत्त्वे व वेदान्त तत्त्वज्ञान या स्वरूपाचा शाश्वत हिंदुधर्म अबाधितपणे शिल्लक राहतो. हिंदुधर्म हा जगातील सर्व धर्मांना परमार्थ प्राप्तीचे विविध मार्ग म्हणून मान्यता देतो; या दृष्टीने हिंदुधर्म हा जगातील सर्व धर्मांपेक्षा व्यापक व श्रेष्ठ ठरतो; या धर्मतत्त्वाच्या अधिष्ठानावरच सामाजिक सुधारणा आधारलेल्या पाहिजेत. आमच्या सामाजिक रचनेचा हा आध्यात्मिक पाया होय. टिळक म्हणतात की, गुणकर्मानुसारे वर्णव्यवस्था हेच प्राचीन भारतीयांच्या समाजरचनेचे तत्त्व आहे. कर्माने जो ब्राह्मण तो मग जातीने कोणीही असो तो ब्राह्मणच मानला पाहिजे. जो ब्राह्मण कर्माने शूद्र आहे तो शूद्रच मानला पाहिजे हे तर्कशुद्ध गृहीत कृत्य आमच्या समाजरचनेत आहे. म्हणून "आमच्या समाजरचनेचा पाया खणून काढून पुनः नवा पाया घातल्याखेरीज चालावयाचे नाही, असे मात्र आम्हांस वाटत नाही."

यावर असे म्हणता येते की वरील गूढ आध्यात्मिक पायावरील भारतीय हिंदूंची वर्णविषमताप्रधान समाजरचना विकृत होऊन शिलावत अशा जातिभेदाच्या

रूपाने युगानुयुगे टिकली. भारताच्या आधुनिक जीवनपद्धतीशी व लोकमतास जबाबदार अशा राज्यसंस्थेशी ती सुसंगत नाही.. लोकशाहीशी सुसंगत अशी समाज-रचना निर्माण करावयाची तर ती मूलभूत मानवी हक्कांच्या पायावरच करावी लागेल. लोकशाही राज्यव्यवस्थेशी सुसंगत अशा सामाजिक सुधारणेशिवाय लोकशाही चिरकाल स्थिरावणार नाही; टिळकांनी हा मुद्दा टाळला आहे. तो टाळला याचे कारण उघड आहे; राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये सबंध भारत राष्ट्राला ओढावयाचे हा त्यांचा अत्यंतिक जीवनोद्देश होता व त्यात टिळक यशस्वी झाले याची साक्ष टिळकोत्तर घडलेला भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास देत आहे यात शंका नाही. हे खरे की, ऐहिक मानवी हक्कांच्या बुद्धिसिद्ध आधारावर भारताचा सामाजिक क्रांति व राजकीय क्रांति यांचा समतोल इतिहास घडला असता तर भारतीय लोकशाही अधिक भक्कम पायावर उभारली गेली असती व आज ज्या सामाजिक व राजकीय समस्यांना भारतीय लोकशाहीला तोंड द्यावे लागते आहे, ज्या संकट कालातून जावे लागत आहे त्या समस्या व संकटे इतकी भयानक ठरली नसती. परंतु एका अर्थी हेही खरे आहे की, जे घडले ते अपरिहार्य अशा ऐतिहासिक नियतीमुळेच घडले आहे.

## सामाजिक प्रश्न राजकीय प्रश्नातच गुंतलेले व अटळ

सामाजिक प्रश्न व राजकीय प्रश्न मूलतः एकाच प्रश्नाच्या दोन कक्षा असतात. सामाजिक प्रश्न दृष्टीआड करण्याचा प्रयत्न करून त्याना चुकविता येत नसते; ते टाळून टळत नसतात. त्यांच्याकडे पाठ केली तरी ते पुढे येऊन दत्त म्हणून उभे राहतात; टिळकांच्या हयातीतच हिंदुमुसलमान व ब्राह्मण-ब्राह्मणेतर यांच्या धर्ममूलक व सामाजिक वैमनस्यातून राजकीय समस्यांनी डोके वर काढले. राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाने त्यांच्यात अपेक्षित असलेली अभेद्य एकजूट निर्माण होऊ शकली नाही. त्याकरिता मुसलमान नेत्यांशी हिंदु नेत्यांना वारंवार लखनौ करारासारखे तडजोड करण्याचे प्रयत्न करावे लागले. ते सर्व प्रयत्न अखेरीस व्यर्थ गेले. याचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही. टिळक वारंवार बजावीत की, हिंदू व मुसलमान यांचे राजकीय ध्येय एकच आहे; परंतु, मुसलमान हे हिंदूंच्या मानाने मागासलेले असल्यामुळे ब्रिटिश सत्ताधारी "फोडा व झोडा" या नीतीचा यशस्वीरीतीने अवलंब करू शकतात. "फोडा व झोडा" या कुटिल नीतीने ब्रिटिशांनी ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यातही फूट पाडण्याचा प्रयत्न केला. तो प्रारंभी

एक दोन दशके सफळही होऊ लागला; याचे थोडे वहुत प्रत्यंतर महाराष्ट्रातील व मद्रासेतील ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या पहिल्या महायुद्धाच्या व मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणेच्या कालखंडात आले. मद्रासच्या जस्टिसपार्टीच्या नेत्यांनी पहिल्या महायुद्धांत १९१७–१८ साली टिळक राजकीय हक्कांच्या मागणीची अट ब्रिटिशांना घालतात म्हणून त्यांना वंदिवासात टाकावे अशीही मागणी केली होती. परंतु कालांतराने १९३० च्या सत्याग्रह आंदोलनाच्या लाटेमध्ये दक्षिण भारतातील व विशेषत: महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ विलीन झाली. १९२० सालीच टिळकांनी असेच भविष्य वर्तविले व ते महाराष्ट्राच्या बावतीत खरे ठरले. हिंदु मुसलमानांचा प्रश्न सोडवित असता टिळकांनी सन १९१७ साली लखनौ येथील भाषणात असेही एकदा ब्रिटिश राज्यकर्त्यांना बजावले की, हिंदूना वगळून मुसलमानांच्या हाती स्वराज्याचे हक्क सोपविले तरी चालतील; परंतु तुमच्या हातातील सत्ता सोडा. सन १९२० साली महाराष्ट्रातील काही ब्राह्मणेतर नेते स्वराज्याच्या मागणीला विरोध करू लागले तेव्हां टिळकांनी असे लिहिले की,

"मि. मॉंटेग्यु हे स्वराज्यविषयक चर्चा करण्याकरिता हिंदुस्थानांत येणार असे जाहीर झाल्यापासून स्वराज्याच्या चळवळीस विरोध करणाऱ्या आमच्या कांहीं ब्राह्मणेतर बंधूंनीं वरीच उचल खाल्ली आहे, व ब्राह्मणजातीसंबंधानें आपल्या मनांत उचंवळत असलेली खळमळ ओकण्यास अवेळी सुरुवात केली आहे. तथापि त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट इतकीच कीं, स्वतः ब्राह्मणेतर असून स्वराज्याच्या चळवळीस विरुद्ध नसणारे असेहि पुष्कळ प्रतिष्ठित लोक वेळींच पुढे येऊन वरील आत्मघातकी प्रकारास आळा घालूं लागले आहेत. यामुळें या अनिष्ट वादास भलतेंच स्वरूप न येतां, अखेर समुद्रांतील मोठ्या माशानें लहान मासा खाऊन टाकावा त्याप्रमाणें ब्राह्मणेतरांतला स्वराज्यास अनुकून असणारा मोठा पक्ष स्वराज्यास विरोध करणाऱ्या लहान पक्षास खाऊन टाकील अशी आशा वाटूं लागली आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर हा विरोध मद्रास इलाख्यात जितका दृढमूल आहे तितका तो इतर प्रांतांत नाहीं."

"प्रस्तुतच्या वादाचे प्रथमतःच दोन भाग आपोआपच पडतात. पहिला असा की, ब्राह्मणेतरांस खरोखरच स्वराज्य नको की काय? व दुसरा असा कीं, त्यांनाहि जर स्वराज्य हवे तर ते हरकत तरी कोणत्या गोष्टीला घेतात? ब्राह्मणेतरांच्या तर्फे म्हणून जे गृहस्थ आज वादास प्रवृत्त झाले आहेत ते स्वतः सुशिक्षितच असल्यामुळें हिंदुस्थानांतील हल्लींची एकतंत्री राज्यपद्धति त्यांना झाली तरी मनापासून आवडणें शक्यच नाहीं. इंग्रज लोकांनीं दिलेल्या

शिक्षणाचा गुणच स्वातंत्र्यप्रियता हा असल्यामुळे सुशिक्षित लोक ब्राह्मणेतर असले तरी त्यांनाहि आपण आपल्याच देशांत नादान व खुरटलेले राहावे आणि आपला सर्व कारभार परक्यांनीं आपली संमति न घेतां करावा ही गोष्ट कशी आवडणार ? ब्राह्मणवर्गाच्या मानीव सामाजिक जुलमापासून कां होईना पण स्वतंत्र होण्याच्या वुद्धींत जे स्वाभिमानाचें वीज आहे तें राजकीय विचाराच्या भूमींतहि फलद्रूप झालेंच पाहिजे."

टिळक पुढे जाऊन लिहितात की, "ब्राह्मणेतरांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची कोणतीहि सूचना पुढे आल्यास ब्राह्मण लोक तिचा विचार नुसत्या सहानुभूतीनेच नव्हे तर थोडयावहुत दिलदारीनेंहि करण्यास तयार आहेत. कै. ना. गोखले यांनीं आपल्या भापणांतून व लेखांतून आणि मृत्युसमयीं करून ठेविलेल्या स्वराज्ययोजनेंतून ब्राह्मणेतरवर्गाच्या हक्कांचे संरक्षण करणें योग्य आहे असें ठिकठिकाणीं प्रतिपादिलें असल्याचें प्रसिद्धच आहे, आणि लो. टिळकांनींहि लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं मुसलमानवंधूंच्या महत्त्वाकांक्षेसंवंधानें जे उद्‌गार काढले ते लक्षांत घेतले म्हणजे स्वराज्याच्या वावतींत ब्राह्मणेतरांना किती प्रेमळपणानें वागविण्यास ते तयार आहेत हें दिसून येते. कायदेकौन्सिलांत उद्यां एक वेळ सगळेच ब्राह्मणेतर आले तरी चालतील. पण तेथे लोकनियुक्त हिंदुलोकांचे प्रावल्य असलें पाहिजें. परक्यांचे किंवा सरकारनियुक्तांचे प्रावल्य नसलें पाहिजें हें त्यांचे शब्द कोणाहि ब्राह्मणेतरानें विसरूं नये. हे शब्द अगदीं शब्दशः कोणी घेणार नाहीं. ते तात्पर्यार्थानेंच घेतले पाहिजेत हें कोणाहि समंजस मनुष्यास सांगण्याचे कारण नाहीं. पण या अतिशयोक्तीच्या मुळाशीं खऱ्या राष्ट्रीय भावनेचें वीज आहे हें कोणासहि नाकवूल करतां यावयाचे नाहीं. हिंदुस्थानांत ब्राह्मणेतरांतील सर्वांत मोठा वर्ग म्हटला म्हणजे तो मुसलमानांचा. पण या वर्गासंवंधानें सर्वसंमत अशी तडजोड लखनौस होऊन ती राष्ट्रीय सभेच्या स्वराज्ययोजनेंत नमूदहि झाली आहे, हें ज्यास माहीत आहे तो हिंदूंचे मुसलमानांच्या हक्कसंरक्षणाविषयी खरे धोरण काय आहे याविषयीं साशंक राहूं शकणार नाहीं, व मुसलमानासंवंधानें सर्व हिंदूंचे जें धोरण तेंच तत्त्वतः ब्राह्मणांचें ब्राह्मणेतरांविषयींहि असणार हें उघड आहे. त्यांत वदल होण्याचे काय कारण ?"

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून हिंदु-मुसलमानांचे द्वैत पेटावयास लागले. हिंदु-मुसलमानांमधील द्वैत म्हणजे धर्माच्या अधिष्ठानावर उभारलेल्या दोन धार्मिक समाजांमधील द्वैत होय. गेली सहाशे वर्षे हे दोन समाज एकाच देशाचे दोन भाग म्हणून नांदले. मुसलमानी राजवटीत मुसलमान राज्यकर्ते मुसलमानांच्या वावतीत पक्षपाताने वागत होते तरी दोन धार्मिक समाजातील

धर्मभेदमूलक दंगा कधीच पेटला नाही. इंग्रजी राजवटीतहि १८८५ पर्यंत म्हणजे जवळजवळ एक शतक हे दोन्ही समाज एकाच गावात, एकाच शहरात, एकाच प्रांतात एकमेकांच्या सामाजिक सहकार्याने शांततेने जगले. या शांततेस महत्त्वाचे एक कारण हिंदुधर्माचा परधर्मसहिष्णुतेचा मूलगामी दृष्टिकोण हे होय. दुसरे कारण म्हणजे राजकीयदृष्टचा भारतातील सगळ्याच जमाती राजकारणविमुख होत्या. जनमानसात राजकीय सत्ता कोणाची असावी याबद्दल अभिमान भावना नव्हती. किंबहुना समाज ही राजकीय संघटना असून समाजाचा घटक असलेल्या जाती वा व्यक्ती यांचे राजकीय हिताहितसंबंध म्हणून काही असतात व त्यांचा राज्यसत्तेशी अविभाज्य संबंध असतो, आणि राज्य कोणाचे व कशाप्रकारचे असले म्हणजे आपले हिताहिताचे संबंध कसे ठरतात वा बदलतात याचीहि जाणीव नव्हती.

ब्रिटिशांनी भारतात राजकीय जागृति होऊ लागली आहे हे पाहिल्यावर हिंदु–मुसलमान, ब्राह्मण–ब्राह्मणेतर इत्यादि भेदांना राजकीय वितुष्टांचे कारण बनविले. साम्राज्यशाही दृढमूल करण्याकरता हा एकप्रकारचा शासित प्रजांमध्ये एकजूट होऊ नये म्हणून रचलेला कटच होता. यालाच टिळकांनी "फोडा व झोडा" ची राजनीति असे समर्पक रीतीने म्हटले.

ब्रिटिश राज्यकर्ते मुसलमानास सांगू लागले की, हिंदु लोक राजकीय हक्क मागत आहेत, या राजकीय हक्कांच्या प्राप्तीने हिंदु समाज बलवान होऊन अल्पसंख्याक जमातींना डोईजड व खाऊन टाकील. वस्तुत: मुसलमान लोकांना हे समजावयास पाहिजे होते की, आधुनिक राजकीय हक्क हे जाती–जमातींचे सवतासुभा निर्माण करणारे हक्क नसतात, ते हक्क सर्वांचे समान हक्क असतात, त्यात प्रत्येक धर्माचे धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्य शाबूत राहते आणि त्या हक्कांनी समाजातील सर्व वर्गांचे व व्यक्तीचे सामर्थ्य वाढीस लागते, कारण त्यात स्वातंत्र्याचा विकास अभिप्रेत असतो. मुसलमान समाजात त्या काळी आधुनिक शिक्षणाचा हिंदूंच्या मानाने अत्यंत अल्प प्रसार झाला असल्यामुळे वरील प्रकारची राजकीय जाणीव देणाऱ्या सुशिक्षित वर्गाची त्यांच्यात वाण होती. त्यामुळे इंग्रज सत्ताधीशांना त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन दुही माजविण्याचे कार्यात यश आले.

त्या वेळच्या हिंदु–मुसलमानांमधील दुहीच्या कारणांचा विचार करू गेले असता दंगे कसे उद्भवतात याचे कोणतेहि एक कारण सापडत नाही. एखाद्या वेळेस गोरक्षण, एखाद्या वेळेस ताबूत आणि दुसऱ्या एखाद्या वेळेस हिंदू अगर मुसलमानांची यात्रा, असली काही तरी फालतू निमित्ते सापडतात. दंगे सुरू

होण्याच्या पूर्वी शंभर वर्षे गोवधबंदी नव्हती. मुसलमान, इंग्रज, ख्रिश्चन हे गोमांस खात असत. ताबूतही शेकडो वर्षे निघत, ऊरूस व यात्रा भरत. परंतु केव्हांहि दंगा झालेला नाही. इंग्रजांनी मुसलमानांच्या मनात राजकीय स्वार्थबुद्धिस्तव पाप भरले. त्यामुळेच गोरक्षण, ताबूत, यात्रा इत्यादि थोड्याशा निमित्तांनी ते पाप पेटू लागले. हायकोर्टातील इंग्रज न्यायाधीश सुद्धा हे पाप भरविण्याच्या कामी हातभार लावू लागले. उदाहरणार्थ कोणत्याहि मुसलमानास हवी तेथे गाय मारण्याचा अधिकार आहे, भर रस्त्यात मुसलमानाने गाय मारली तरी हिंदु लोकांची मने धर्मदृष्ट्या दुखवण्याचा त्यांच्यावर गुन्हा लागू होत नाही, असे निर्णय हायकोर्टातील न्यायाधीशसुद्धा सांगू लागले, एकप्रकारे मुसलमानास फूस देण्याचाच गुन्हा ते करीत होते. ख्रिश्चन लोक गोमांस खातात म्हणून हिंदु लोक चिडल्याचे एकही उदाहरण सापडत नाही. धारवाडी काट्यात घातल्याप्रमाणे समतोल एका मापाने हिंदु–मुसलमानांस न्याय देण्याचे धोरण ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी सोडून दिले.

टिळकांनी यासंबंधी महत्त्वाचे उपाय सुचविले आणि मुसलमानांनाहि समजावून सांगितले की, या देशात दोनच विरोधी बाजू आहेत. एक बाजू इंग्रजी राज्यकर्त्यांची आणि दुसरी बाजू शासित प्रजेची; हिंदु, मुसलमान, पारशी, शीख, ख्रिश्चन इत्यादि प्रजांचे राजकीय हितसंबंध समान आहेत. राजकीय हक्क मिळाले तर त्यात सर्वांचाच उद्धार व उत्कर्ष आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीचे श्रेष्ठ साधन कॉंग्रेस असून ती हिंदु वा मुसलमान असले भेद गृहीत धरीत नाही. टिळकांनी राज्यकर्त्यांना सुचविले की, हिंदु लोक गाईस पूज्य मानतात म्हणून जर ते मुसलमान मोहल्ल्यात जाऊन बलात्काराने गाय सोडवून आणतील तर त्यांचाहि इंग्रज सरकारच्या कायद्याने बंदोबस्त झाला पाहिजे. हिंदु लोकास ज्याप्रमाणे आपले सणवार करण्याचा अधिकार आहे त्याचप्रमाणे मुसलमान लोकासहि आहे व जाणूनबुजून जोपर्यंत एकजण दुसऱ्याच्या वाटेस जात नाही अगर मन दुखविण्याचा प्रयत्न करीत नाही तोपर्यंत सरकारने निःपक्षपाताने दोघांचेही सारखेच संरक्षण केले पाहिजे. महादजी शिंद्यांप्रमाणे इंग्रज लोकांनी हिंदू लोकांसाठी गायी न मारण्याची सनद मुसलमान लोकांपासून घ्यावी असे आम्ही म्हणत नाही व म्हटले असता इंग्रज सरकार ऐकावयाचे नाही. परंतु ज्या ठिकाणी गायी मारण्याची दुकाने नव्हती त्या ठिकाणी हिंदूंच्या भर वस्तीत मुसलमानांना सदर दुकाने घालण्याची परवानगी देणे म्हणजे हिंदू लोकास विनाकारण चिथविण्यासारखे आहे. कोणत्याहि धर्माचा अभिमान न ठेवता दोघासही आपापल्या धर्माने वागण्याची सवलत द्यावी व विनाकारण एका

जातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांस हरकत करू लागल्यास त्यांचे राजांनें शासन करावें हेंच शहाणपणाचें तत्त्व आहे. टिळकांनी दुसरा उपाय असा सुचविला कीं, " हिंदू–मुसलमानांमध्यें जो कांहीं स्वभावतःच द्वैतभाव आहे तो शिक्षणाचा अधिक प्रसार झाल्याखेरीज व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदान्ताची अधिक मिसळ झाल्याखेरीज कधीहि पूर्णपणें नाहीसा व्हावयाचा नाहीं. यापैकीं शिक्षण प्रसाराचें काम सरकारनेंच अंगावर घेतलें पाहिजे. दुसरें काम मौलवींच्या हातून होईल. परंतु या दोन्ही गोष्टी घडून येण्यास दिनावधि लागेल." ( " हिंदु–मुसलमान संबंध " पृ. २३८–२५३ ).

सामाजिक रचनेतून निर्माण होणारे प्रश्न व राजकीय प्रश्न यांची गुंतागुंत कशी असते याचे स्वरूप वरील विवेचनावरून लक्षात येते.

हिंदुमुसलमानसंबंधांची समस्या टिळक व गांधी यांना अखेरपर्यंत नडली. दोघांनी शर्थीने प्रयत्न केला तरी यश येऊ शकले नाही. पाक व भारत अशी एका राष्ट्राची शकले पडली. ब्राह्मणब्राह्मणेतर प्रश्नाचा निकाल मात्र स्वराज्याच्या आंदोलनाच्या अखेरच्या पर्वात म्हणजे गांधी युगाच्या दुसऱ्या कालखंडात अनुकूल लागला. गांधी युगाचे असहकारिताकाल, सविनय कायदेभंग काल व "भारत छोडो" काल असे तीन कालखंड पडतात. त्यापैकी हे दुसरे व तिसरे कालखंड होत.

## ब्रिटिश सत्ता व भारताची एकराष्ट्रीयता यांचा संबंध

भारताची एकात्मक संस्कृति सामान्यपणे गेल्या तीन सहस्र वर्षांनी घडविलेली असली तरी हिंदुमुसलमान, ख्रिस्ति, पारशी, इत्यादिकांचे एक राष्ट्र बनण्याचा पाया ब्रिटिश राज्यसत्तेखाली घातला गेला; याची दखल हिंदु-मुसलमानादिकांचे राजधर्मबंधुत्व या शब्दाने टिळकांनी अनेक ठिकाणी घेतली आहे. " राजधर्माचे नवे उपदेशक यांतील बीज काय ? " ( सन १८९३ ) या लेखात दादाभाई नौरोजींच्या थोर विचारांचे सारग्रहण करीत असता विस्ताराने याच मुद्याचा ऊहापोह टिळकांनी केला आहे, ते म्हणतात, " महाराणीच्या सार्वभौम सत्तेखालीं सर्व हिंदुस्थानभर शांतता होऊन हिंदु, मुसलमान, पार्शी वगैरे सर्व जातींच्या व धंद्यांच्या लोकांस त्यांनी एकाच वर्गांत ओढून त्यांच्या हिताहिताचा एकसंबंध करून टाकिला आहे. इंग्रजी राज्यापूर्वी कोठें मराठे, कोठें मुसलमान, कोठें शीख व कोठें रजपूत आपआपल्या सामर्थ्याप्रमाणें राजवैभवाचा उपभोग घेत अगर दुसऱ्याचे अंकित होऊन राहात. आमच्या दुर्दैवानें अगर सुदैवानें तसा प्रकार आता राहिला नाहीं. राज्यवैभव सर्व इंग्रज लोकांनी आपल्या हातांत

राखून ठेवलें आहे, व हिंदु, मुसलमान, व पार्शी वगैरे निरनिराळ्या जातींतील लोकांच्या गुणदोषांत कितीहि अंतर असलें तरी ह्या सर्वांस "नेटिव्ह" या एकाच वर्गांत घालून त्यांस जे काय अधिकार अथवा हक्क द्यावयाचे तेहि सारखेच दिले आहेत; सारांश राज्यकर्ते व प्रजा असे राजकीय दृष्ट्या दोनच वर्ग हल्लीं हिंदुस्थानांत आहेत असें म्हटलें तरी चालेल. निरनिराळ्या जातींतील लोकांस आपली खरी स्थिति कळू लागेपर्यंत जातीजातींतील पूर्वापार चालत आलेली वैमनस्यें नष्ट व्हावयाची नाहींत हें खरें आहे; तथापि तसा दिवस येण्यास फार अवकाश लागेल असे हल्लींच्या चिन्हांवरून दिसत नाहीं. सर्व जातींतील सुशिक्षित लोक एक-दिलाचे आहेत हे कॉंग्रेससारख्या संस्थांवरून व मुंबईतील दंग्याच्या हकीकतीवरून व्यक्त होत आहे; व इंग्रज सरकारचे राज्य कांहीं दिवस राहिल्यास हें आमचे राज-धर्मबंधुत्व उत्तरोत्तर वाढत जाऊन अखेरीस आम्ही व राज्यकर्ते असे दोनच लौकिक दृष्ट्या वर्ग होतील अशी आमच्या राज्यकर्त्यांची व आमची उमेद व आशा आहे. परंतु जे दोन वर्ग सांगितले त्यांची व्यावहारिक स्थिति एकमेकांहून फार भिन्न आहे. हिमालयापासून केपकुमारीपर्यंत सर्वत्र शांततेची ध्वजा फडकत आहे हें खरें, पण ही शांतता राखण्यास आमच्या भाकरीपैकी निम्मी भाकर राज्यकर्ते व त्यांचे व्यापारी बंधू यांस दरवर्षी द्यावी लागत असल्यामुळें आम्ही उत्तरोत्तर कंगाल होत चाललो आहो, व स्थिति कायम राहिल्यास "आमचे पुढे होणार तरी काय ?" याची विचारी मनुष्यास धास्ती वाटूं लागली आहे. पूर्वींच्या काळीं हिंदु, मुसलमान, शीख ह्यांपैकी कोणाच्याहि मनांत असले विचार आले असतां जो तो आपआपल्या जातीपुरते पहात असे. परंतु तसा विचार आपणांस आता करता येत नाहीं, इतकेच नव्हे तर कोणी करूहि देणार नाहीं. आमच्या राज्यकर्त्यांचे सामर्थ्य इतकें जबर आहे कीं, वर सांगितलेल्या जातींपैकीं कोणाचाहि निरर्थक शिरजोरपणा ते चालूं देणार नाहीत. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस जें काय करणें असेल ते त्यांनी एकदिलानें केलें पाहिजे मग कोणाचें सामर्थ्य कमी असो किंवा जास्त असो, ते भेद लक्षांत घ्यावयाचे नाहीत, इंग्रजी राज्याने हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांची एक मोळी केली आहे व त्या मोळीचा बंध तुटून पुनः त्यांतील लाकडें निरनिराळी होऊं नयेत अशी व्यवस्था करण्याचें सामर्थ्यहि त्यांच्यांत आहे. "ब्रिटिश राज्यामुळें आम्ही एकत्र आलो, ब्रिटिश लोकांनीच आम्हास एकत्र होण्यास शिकविले," असे जे ऑनरे. मि. दादाभाई वरचेवर उद्‌गार काढितात त्यांतील रहस्यहि हेंच होय, हे कोणीहि विसरता कामा नये. किंबहुना जो विसरेल तो घसरेल, किंबहुना तो पडेलच. या राजकीय स्थितीचे खरें स्वरूप व महत्त्व मि. दादाभाई यांनी जितक्या

चांगल्या रीतीनें ओळखलें तितकें तें दुसऱ्या कोणत्याहि हिंदुस्थानच्या मुत्सद्याच्या मनांत विंवलें असेल कीं नाही याची वानवा आहे. आमच्या भोंवतीं इंग्रजी राज्याची जी मिठी पडली आहे ती अभेद्य आहे. इतकेच नव्हे तर तिनेच आपणास एकत्र केलें आहे. तिचें बंधन कायम असलें तरच आमचा सांधा बेमालूम जडेल अशी ह्या महापुरुषाची दृढ खातरी झाली आहे."

## हिंदु, मुसलमान इत्यादिकांचे एकराष्ट्रीयत्व

दादाभाईंची ही भारताच्या राष्ट्रीय ऐक्याची ऐतिहासिक उपपत्ति टिळकांनी सर्वस्वी स्वीकारून आपला राजकीय ध्येयवाद उभारला. हिंदुमुसलमान इत्यादिकांचे भारत हे एक राष्ट्र म्हणून निर्माण होत आहे, या एक राष्ट्रीयत्वाच्या शक्तीनेच भारत स्वतंत्र व स्वराज्यसंपन्न होईल असा पक्का कयास बांधला. हिंदुमुसलमान इत्यादि समानहित संबंधांचे नात्याने बांधलेल्या नागरिकांचे एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याच्या उद्योगास टिळक लागले. गांधी, हेच वैचारिक सूत्र गृहीत धरून अखेरपर्यंत लढले. टिळकांनी लोकशाही स्वराज्य पक्षाचा जाहीरनामा १९२० साली काढला त्यातही ह्याच हिंदु–मुसलमान ऐक्याच्या सूत्रानुसार "हिंदुमुसलमान ऐक्य" हा कार्यक्रमाचा भाग म्हणून समाविष्ट केला. या ठिकाणी ही गोष्ट विशेषपणे ध्यानात धरली पाहिजे की टिळक हिंदुमुसलमान बेबनावाच्या चर्चेच्या संदर्भात हिंदु, मुसलमान व ब्रिटिशराज्यकर्ते असे तीन पक्ष निर्दिष्ट करतात, तो निर्देश पक्ष म्हणजे राजकीय पक्ष या अलीकडे रूढ झालेल्या अर्थाने नव्हे तर भांडणातील तीन बाजू या अर्थाने. कित्येक ठिकाणी "हिंदुराष्ट्र" "महाराष्ट्र हे राष्ट्र" अशीहि शब्दावली वापरतात. त्यात "राष्ट्र" शब्द राज्यशास्त्रातील प्रसिद्ध अर्थाने वापरलेला नसून सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी बांधलेला किंवा भाषिक ऐक्याने बांधलेला प्रादेशिक लोकसमूह एवढ्याच अर्थी वापरलेला आहे असे मानले पाहिजे, राजकीय अर्थाने नव्हे. तसाच "हिंदु राष्ट्र" म्हणजेच सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी बांधलेला एक लोकसमूह व महाराष्ट्र म्हणजे भाषिक व प्रादेशिक ऐक्याने एकवटलेला लोकांचा समूह, राजकीय अर्थाने नव्हे. भाषिक व प्रादेशिक वैशिष्ट्ये राहूनच सांस्कृतिक समानता कायम होते व त्याप्रमाणे सांस्कृतिक वैशिष्ट्ये कायम राहूनही भिन्न सांस्कृतिक लोकसमूहाच्या राजकीय व राष्ट्रीय एकात्मतेला बाधा येऊ नये अशी टिळकांची धारणा होती व ती खऱ्या अर्थाने आधुनिक अमेरिका, ब्रिटन इत्यादि राष्ट्रांनाही लागू होते. परंपरागत हिंदुत्व किंवा एकभाषिक प्रादेशिकता यांनी भारताचे एकराष्ट्रीयत्व मर्यादित होऊ शकत नाही. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन,

पारशी, शीख, आदिवासी इत्यादी भारतात राहणारे एकराष्ट्रीयच होत. जातिभेद वा धर्मभेद यांच्या अतीत अशा नूतन ऐहिक राजधर्माने भारतास एकराष्ट्रीयत्व देणे आवश्यक आहे अशी टिळकांची धारणा होती व अशी धारणा सतत व्यक्त केली जाई. ते म्हणतात– "हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता, हिंदुस्थानवासी हेच आमचे बांधव आणि वस्तुस्थिती; हे लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी एकनिष्ठपणानें व स्वार्थाकडे लक्ष न देतां सतत परिश्रम करणें हाच आमचा राजधर्म आहे. भारताबाहेरच्या क्षेत्रातहि हेंच धोरण पूर्णपणें व्यक्त होत आहे; व त्यांस (दादाभाईस) हल्ली जो संमान मिळत आहे त्यावरून या राजधर्माचा हिंदुस्तानभर लवकरच प्रसार होईल अशी आमची खात्री आहे" ("राजधर्माचे नवे उपदेशक.")

## इंग्रजी राज्याचे श्रेय आधुनिक जीवनदृष्टी

इंग्रजी राज्यामध्येच भारताला आधुनिक एकराष्ट्रीयत्व प्राप्त होण्याची मोठी सुवर्णसंधि मिळाली आहे. हे इंग्रजी राज्याचे श्रेय टिळक वारंवार निर्दिष्ट केल्यावांचून राहत नाहीत. इंग्रजी राज्याचे एवढेच श्रेय नव्हे तर इतर पुष्कळशा गोष्टीत जे श्रेय मिळाले आहे त्याची तपशीलवार दखल "इंग्रजी राज्यामध्ये आमचा फायदा काय झाला" या लेखात (पृ. ५०) त्यांनी घेतली आहे. आधुनिक जीवनदृष्टी, लेखनस्वातंत्र्य, कायद्याचे राज्य, आधुनिक विज्ञानावर आधारलेला आर्थिक व औद्योगिक विकासाचा पाया, सार्वजनिक आरोग्य व आधुनिक शिक्षणामुळे प्राप्त झालेली लोकशाही स्वराज्याची कल्पना इत्यादी गोष्टी होत. उदारमतवादी ब्रिटिश संस्कृतीशी संबंध आल्यामुळे एकप्रकारची क्रांति घडून आली आहे व त्या क्रांतीच्या योगाने भारत ह्या नव्या युगात प्रवेश करून स्वातंत्र्याकरिता झगडत राहील व स्वराज्य प्राप्त करून घेईल असा आत्मविश्वास टिळकांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात: पाश्चात्य शिक्षणाच्या योगाने तद्वारा परिचित झालेल्या अनेक प्रकारामुळे आम्ही राजकीय हक्कांची मागणी केली व त्यासाठी राजकीय व्यवस्थेचाहि विचार करू लागलो. आम्हाला राज्यकारभारात घ्या व आमच्या सल्लामसलती घ्या, तुमच्यातला हा दोष काढा, अमुक संग्रह करा, अमुक कर नको आणि तमुक नको, येथे तुम्ही चुकता, तिकडे तुमचे लक्ष पोचत नाही इत्यादी गोष्टी नीटपणे सरकारला सांगण्याचा आमचा हक्क आहे. हे तत्त्व आमच्या हल्लीच्या राज्यकर्त्यांनी कबूल केले आहे व त्याप्रमाणे प्रजेचे म्हणणे ऐकावयास मिळण्यास त्यांनी आपण होऊन

साधन तयार केले. वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य आणि उच्च शिक्षणाची सोय यांचा मुख्य हेतू हाच आहे.

टिळकांच्या पुढील एक मुख्य प्रश्न– "की इंग्रजी राज्यांत शांतता असली तरी आमची स्थिती अत्यंत खराब आहे, दारिद्र्याची आमच्यावर अत्यंत पकड बसत चालली आहे. शौर्य, नीति, अभिमान, साहस वगैरे राजतेजांचा लोप शोचनीय रीतीनें कसा होत चालला आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. अशा वेळी ही स्थिती सुधारावयास आता आम्हास काही मार्ग आहे काय असा प्रश्न उत्पन्न होतो." टिळकांनी राजकारणात प्रत्यक्ष प्रवेश केल्यानंतर, त्यांच्या राजकीय जीवनाच्या पहिल्या कालखंडात त्यांच्या मनाला छळणाऱ्या वरील प्रश्नांचे प्रथम उत्तर कसे मिळाले ? त्यांची ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदार धोरणावर श्रद्धा होती; कारण, भारताला खऱ्या अर्थांने जबाबदार राज्यपद्धतीचा हक्क देणे आवश्यक आहे ही गोष्ट अनेक ब्रिटिश तत्त्ववेत्त्यांनी व ब्रिटिश राजकीय नेत्यांनी वारंवार बोलून दाखविली होती. त्यांना असे वाटत होते की "आमच्या दुःस्थितीबद्दल विलायतच्या लोकांना समजावून दिले पाहिजे. ३० कोटी प्रजेस न्याय द्या अशी त्यांच्या कानीकपाळी ओरड केली व ब्रिटिश पार्लमेंटमध्ये दादाभाईसारखे भारताचे मुखत्यार म्हणून निवडून आले आणि राजकीय सुधारणा क्रमाक्रमाने प्राप्त होऊ लागली. आमच्या मागण्यापैकी सर्वच नाही तर बऱ्याच मंजूर करून ते परतले. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानात होऊ शकली व स्थानिक स्वराज्याचा अधिकार देऊन आमच्या देशातील राज्यकारभारात आमची मतेही घेण्यात येऊ लागली. ह्या सर्व गोष्टी न्याय्य आहेत व केव्हा ना केव्हा तरी आम्हाला न्यायच प्राप्त होईल हे खरे आहे. विलायतच्या लोकांच्या न्यायबुद्धीचे आम्हास आश्चर्यही वाटते."

## ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध असंतोष, टीका व कॉंग्रेसची स्थापना

जसजसा काळ पुढे लोटत गेला तसतसे ब्रिटिश सत्तेचे दुष्परिणाम वाढत गेले व येथील राजकीय दृष्टीने जागृत झालेले सुशिक्षित नवे नेते गोखले, रानडे, फेरोजशहा मेहता, विपीनचंद्र पाल, लाला लजपत राय इत्यादी मंडळी भारताच्या राजकीय आकाशांत तेजाने तळपू लागली. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही की भारताकडे राजकर्मचारी म्हणून आलेले वेडरबर्न, ह्यूम इत्यादी उदारमतवादी व भारतीय जनतेबद्दल सहानुभूति बाळगणारे ब्रिटिश गृहस्थ भारतीय नेत्यांच्या सहवासात आले व ब्रिटिश राजवटीच्या बळकट

व जुलमी पद्धतीचे दोषान्वेषण अधिक जिद्दीने, मोठ्या कळकळीने व अभ्यासपूर्ण रीतीने करू लागले. सर ह्यूम व वेडरबर्न यांनी पुढाकार घेऊन देशातील लोकांच्या साहाय्याने इंडियन नॅशनल कॉंग्रेस या महान संस्थेची स्थापना केली. ही संस्था भारताच्या राजकीय जागृतीचे सर्वश्रेष्ठ लक्षण ठरली. या संस्थेच्या शाखा देशभर पसरू लागल्या. त्यात वारंवार ब्रिटिश राजनीतीच्या दोषांचे आविष्कार होऊ लागले. त्यांचे पडसाद उठू लागले. ब्रिटिश राज्यकर्ते याची दखल घेऊ लागले, एवढेच नव्हे तर खुशीने वा नाखुशीने देशाच्या राजकीय परिस्थितीचे संपूर्ण मूल्यमापन करण्याकरिता अखेर रॉयल कमिशन नेमण्यात आले. या कमिशनपुढे १८९७ साली महत्त्वाच्या साक्षी झाल्या. त्यात गोपाळ कृष्ण गोखले यांची साक्ष फार प्रभावी ठरली. टिळकांनी केसरीत यासंबंधात एक विस्तृत लेख लिहिला. त्यात ते म्हणतात– "इंग्रजी राज्याचा आमच्या लोकांवर काय परिणाम होत आहे यावर प्रा. गोखले यांची टीका कळकळीची आणि जोरदार आहे. ते म्हणतात कीं इंग्रजी राज्याचे जे परिणाम झाले ते हे कीं आमच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा विरून जाऊन उंवरांतल्या किड्यांप्रमाणें आमची स्थिती झाली आहे. इंग्रजी राज्य म्हणजे एक रूळ असून तो आमच्या डोक्यावरून फिरवला जात आहे, व सर्वांची योग्यता एकसारखी परंतु क्षुद्र अशी होणार आहे: तरी स्वराज्याचे स्वत्व जें असतें, तेजःपुंज जें असतें, पाणी जें असतें, ते आजच्या या स्थितींत नाहींसें झालें आहे."

या परिस्थितीमुळे नैसर्गिक रीतीने जे विचार प्रकट व्हावयाचे ते देशाच्या वृत्तपत्रांमधून ब्रिटिश राजवटीविरुद्ध प्रकट होऊ लागले. याकरिता राजद्रोहाचा कायदा बदलल्याशिवाय गत्यंतर नाही असे राज्यकर्त्यांनी ठरविले. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण घालण्याचा राजकर्त्यांचा विचार स्पष्ट होऊ लागला. इंग्रजांच्या राज्यात लोकांच्या गाऱ्हाण्यांची दाद लागेल असे वाटेनासे झाले. अज्ञान, दारिद्र्य, विपत्ती, जुलमी कायदे व आर्थिक अवनती यांच्या योगाने जनता निःसत्व होऊन अवनतीच्या तळाला कशी पोचली याची मीमांसा सुरू झाली.

## साम्राज्यशाहीची मीमांसा

टिळक १८९९ मध्ये दोन वर्षांच्या कारावासातून सुटले व पुनश्च हरिः ॐ (४ जुलै १८९९, पृ. ९३) म्हणून राष्ट्राचे म्हणजे भारतीय जनतेचे ऋण आपणावर आहे अशा कृतज्ञतेच्या व कर्तव्यनिष्ठेच्या धारणेने स्वराज्यप्राप्तीच्या यत्नास लागले. ते 'पुनश्च हरि ॐ' या लेखात म्हणतात की, कांग्रेससारख्या

संस्थेने आमच्या मनात ज्या आशा उत्पन्न केल्या आहेत त्या सफल करण्याच्या उद्योगास हरएक प्रकारे लागले पाहिजे. त्यांनी कारावासात असतांना पश्चिमी साम्राज्यशाहीचे स्वरूप व कार्य यांचे आमूलाग्र चिंतन केले, व बाहेर पडले तेव्हा मनाशी निर्णय केला की, गेल्या दोन शतकांत आधुनिक युरोपियन साम्राज्यशाह्यांचा पृथ्वीच्या सर्व खंडांवर विस्तार झालेला आहे व अजूनही ब्रिटिश साम्राज्यशाही, विस्तारवादी आसुरी महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन आशियाई जग संपूर्ण पादाक्रांत करण्यास सरसावली आहे; ( "खोटे कोण," "आणीबाणीची वेळ," "लॉर्ड कर्झनची कारकीर्द" "तत्त्ववेत्ता व मुत्सद्दी" इ. लेख पहा. ) व ती भारताच्याच नव्हे तर आशियाई जनतेच्या किंबहुना सर्व मानवजातीच्या नैतिक व सांस्कृतिक अध:पाताचे कारण बनली आहे. टिळकांच्या साम्राज्यशाही मीमांसेत कार्ल मार्क्स व लेनिन यांच्या साम्राज्यशाही मीमांसेचेही निष्कर्ष अंतर्भूत होतात. परंतु या संदर्भात हे लक्षात ठेवले पाहिजे की कार्ल मार्क्सचे विचार त्यांच्या अध्ययनात आले होते, असे म्हणता येत नाही. लेनिनची माहिती तेव्हा रशियाबाहेर नव्हती. ही त्यांची मीमांसा भारतीय परिस्थितीच्या व नेत्रांसमोर प्रत्यक्ष घडत असलेल्या साम्रज्यशाहीच्या इतिहासाच्या अनुभवातून निघाली आहे. त्यामुळेच आधुनिक साम्राज्यशाहीच्या विरोधी क्रांतीचा पहिला नेता. ही पदवी टिळकांना प्राप्त होते, असे आधुनिक मानवेतिहासाला सांगावे लागेल. मार्क्स व लेनिन यांच्या मीमांसेत टिळकांनी भरही घातली आहे. थोर आध्यात्मिक तत्त्वचिंतक ते होते. त्यांनी असा सिद्धांत मांडला आहे की, मानवी स्वातंत्र्याचा अपहार करणाराही स्वतः स्वातंत्र्य गमावतो; म्हणून जी राष्ट्रे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने साम्राज्यवादी बनली तीही मानवी स्वातंत्र्य गमावून बसत आहेत.

"पाच्छाहीपणा का गुलामगिरी" ( पृ. १०५ ते १११; १६ डिसें. १९०२ ) या लेखांत ते म्हणतात :– "हल्ली पाश्चिमात्य राष्ट्रांमध्यें इंपीरिॲलिझम्‌ची अथवा पाच्छाहीपणाची जी एक भयंकर लाट उसळली आहे व जिनें मोठमोठ्या मुत्सद्दी, धीर व विचारी लोकांसही घेरून टाकले आहे, तिचे थोडक्यांत स्वरूप सांगावयाचे म्हणजे आमच्या आंगांत तुमच्यापेक्षां अधिक बळ आहे म्हणून तुम्ही आमचे वर्चस्व सर्वस्वी कबूल करून आमचे गुलाम म्हणून राहिले पाहिजे अशा प्रकारची स्वत:च्या बलिष्ठपणाविषयीची आसुरी कल्पना होय... इंग्रज लोक हे जगाचे स्वामी, त्यांच्या सुखाकरिता उपभोग्य वस्तूंचा संग्रह म्हणून इतर देश परमेश्वराने निर्माण केले आहेत, व यामुळें या परमेश्वराच्या लाडक्या लेकरांच्या बरोबरीचे हक्क इतर देशांतील लोकांस देणें हे आमच्या

आकाशांतील बापाच्या इच्छेविरुद्ध आहे; अशाप्रकारच्या कल्पना हळूहळू इंग्रजी समाजात पसरत चालल्या आहेत... यावर कोणी आम्हास असा प्रश्न करतील कीं, इंग्रजी राष्ट्रांत संचार करीत असलेल्या या पाच्छाहीपणामुळें इतर देशांची हानि होऊन ते देश गुलामगिरीच्या चिखलांत जरी अधिकाधिक रुतत गेले तरी त्यामुळें इंग्रजी राष्ट्राची तर उन्नती होईल ना ? व होत असेल तर इंग्रजी मुत्सद्यांस दुसऱ्या राष्ट्रांच्या हिताहिताकडे पाहण्याची जरूर नाहीं; खरें आहे; पण सर्वांनीं नेहमी एवढेंच लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, अधिकार व गुलामगिरी या कांहीं नित्य परस्परविरोधी गोष्टी नाहींत, ... व जें राष्ट्र अधिकाधिक अधिकार मिळवीत चाललें आहे त्यास तें त्याचप्रमाणें गुलाम बनत चाललें आहे असें म्हणणें असंभवनीय नाहीं. ... इंग्रजी राष्ट्र अथवा समाज व्यक्तींचा समुदाय आहे व यांतील प्रत्येक व्यक्तीस ज्यामानानें अधिकाधिक स्वातंत्र्य भोगता येईल त्यामानानें तो समाज गुलामगिरीपासून अलिप्त राहील. यादृष्टीनें जर हल्लींच्या पाच्छाहीपणाच्या कल्पनेनें इंग्रजी समाजांतील व्यक्तिस्वातंत्र्य कमी होत चालले आहे असें दाखविता येईल तर ही कल्पना जसजशी अधिकाधिक बळावत जाईल तसतसें व्यक्तिस्वातंत्र्य कमी कमी होत जाणार हें उघड आहे. आणि पाच्छाहीपणा म्हणजे गुलामगिरीच होय, हें त्यावरून सहज सिद्ध होण्यासारखें आहे. ... मालक आणि चाकर हे शब्द जरी अन्योन्य प्रतियोगी असले तरी ... या दोघांपैकी चाकर तेवढाच मात्र गुलाम असे नसून, मालक आणि चाकर हे दोघेही गुलाम आहेत. जो मनुष्य दुसऱ्याला आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करतो तो स्वतःच त्याच्या ताब्यात असणाऱ्या मनुष्याइतका आपण बांधला गेलेला असतो."

असा शुद्ध तर्कशास्त्र पद्धतीने सिद्धान्त मांडून टिळक दृष्टान्ताने तो स्पष्ट करतातः– "दूरवरच्या अंतरावरून पकडलेल्या वहिमी गुन्हेगारांस कैद करून नेणाऱ्या व दंडाधिकाऱ्याच्या स्थानाकडे नेणाऱ्या प्रवासी पोलीस लोकांची रात्रीं अपरात्रीं काय स्थिती होते ? रेल्वेचा प्रवास करीत असता पोलिसांना सतत जागृत रहावे लागते. कैद्यावर लक्ष ठेवावे लागते, त्यांच्या नैसर्गिक क्रियांच्यावेळी मदत करावी लागते वगैरे वगैरे. जिकलेले राष्ट्र किंवा जिकणारे राष्ट्र हे कैदी व पोलीस यांच्यासारखेच असतात." असे विस्ताराने सांगून त्याकरिता ब्रिटनमधील संसदीय निवडणुकींची व इतर उदाहरणें देतात; ते म्हणतातः– "साम्राज्यवादी सत्ता व दडपण व पैसा याचा वापर करून आपल्या कच्छपि असलेल्या बगलबच्चांची संसदेमध्यें भरती करून बहुमत मिळवितात. त्यामुळें तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर म्हणतो त्याप्रमाणें लोकशाहीचा नुसता देखावा मात्र शिल्लक राहतो. पैसेवाल्यांचे प्राबल्य

तर वाढत चाललेच आहे. परंतु या सधन लोकांपेक्षांही लष्करी लोकांचे महत्त्व अधिकाधिक होत चालले आहे. लष्करी लोकांचे प्रस्थ इंग्लंडमध्यें माजल्यामुळें गोरगरिबांवरील कराचा भारहि सतत वाढत आहे. बुद्धीचा व उच्च शिक्षणाचा मान कमी होऊन लष्करी शिपाई बनण्याची इंग्रजी पोरांना हाव सुटली आहे. मानसिक शक्तीपेक्षां शारीरिक शक्तीचाच विशेष गौरव करण्यात येत आहे. विद्यापीठीय पंडित व बुद्धिमान विद्यार्थी यांच्यापेक्षा क्रीडापटूंची वाहवा वृत्तपत्रांतून व सचित्र नियतकालिकातून अधिक होत असते. धर्मसंस्थेचाही अधःपात झाला आहे; धर्मोपदेशक गुरू प्रार्थनामंदिरांतून युद्धाच्या प्रवचनांवर भर देऊ लागले आहेत व ख्रिश्चन धर्माचे आचार्य आपणास सेनापति, कर्नल, कप्तान अशा पदव्या घेऊन लष्करी मानाबद्दलचा अभिलाप पुरा करून घेत आहेत. साम्राज्यवाद्यांना नित्य युद्धार्थ सज्ज राहावें लागतें त्यामुळें स्पेन्सरनें म्हटल्याप्रमाणें पार्लमेंट हे लष्करी खात्यास सर्व सामग्रीचा पुरवठा करणारें एक कमिसरिएटच बनल्यामुळें सभासदांचे व्यक्तिशः हक्क कमीतकमी होत आहेत. आणि पार्लमेंटच्या हातांतील सत्ता दुबळी होऊन सालीसबरीच्या कुटुंबांतील मुत्सद्दी सर्व सूत्रें हालवीत आहेत; यावरून इंग्रजी राष्ट्र अधिकाधिक गुलाम बनत चाललें आहे ही गोष्ट सिद्ध होत नाहीं काय ? इंग्रज लोक सुधारणेच्या मार्गावरून पुनः रानटीपणाच्या मार्गास लागत चालले आहेत ही गोष्ट कबूल करणें भाग नाहीं काय ? राज्यलोभामुळें व पाच्छाहीपणामुळें इतर देशांचेच नव्हे तर स्वतः इग्लंडचें नुकसान होत आहे व त्यापासून दूर राहणें हें इंग्रजी राष्ट्राचें कर्तव्य आहे. स्वतःचा व दुसऱ्याचा असे दोघांचेहि गळे दोरीनें एकत्र बांधले जात असतां ती दोरी आवळण्याचा प्रयत्न करणें हें उभयतांसहि श्रेयस्कर नव्हे. एवढ्यासाठीच इंग्लंडनें जिकलेल्या देशांना स्वातंत्र्याची जोड मिळवून देण्यास झटावें हेच हिताचें व नीतिदृष्ट्या भूषणास्पद आहे."

" जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति " अशी तुकारामाची बैठक धरून टिळक साम्राज्यवाद्यांना श्रेयाचा मार्ग दाखवित आहेत :– " आधुनिक साम्राज्यशाही नष्ट होणें हा केवळ भारतापुरताच प्रश्न नसून तो अखिल मानवजातीच्या हिताचा प्रश्न आहे; असा मानवतावादी विचार हा द्रष्टा एका ठिकाणी ( निकरानें एकमुखी मागणी करा - दि. ९ ऑक्टोबर १९१७, लेखांक पृ. १७२ ते १७८ ) मांडतो. तो म्हणतो :– महायुद्धानें युरोपातील राजकीय विचारांत क्रांति घडवून आणली आहे व स्वातंत्र्य, समता, लोकमत इत्यादि प्रश्नांना महत्त्व आलें आहे. भारताचें स्वराज्य हा कांहीं विशिष्ट जातींपुरता किंवा भारतापुरताच प्रश्न नसून " पृथ्वीच्या पांचही खंडांत पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या किंबहुना मानव

जातीच्या हिताचा प्रश्न आहे. हिंदुस्थानास त्यापूर्वीच स्वराज्याचे हक्क दिले गेले असते, तर त्याचें स्वरूप वेगळें दिसलें असतें. असा विचार मनांत आला म्हणजे हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणीत मानवजातीचा हितसंबंध कसा कसा ग्रथित झालेला आहे तें दिसून येईल." (पृ. १७८)

साम्राज्यशाहीच्या पाशातून मुक्त होणे ही भारताप्रमाणे आशियाचीहि गरज आहे व आशियाच्या मुक्ततेत सर्व मानवजातीच्या आध्यात्मिक विकासाचा प्रश्न गुंतला आहे. अशा पारमार्थिक व राजकीय दृष्टिकोणातून प्रा. ओकाकुरा यांच्या एका उत्कृष्ट ग्रंथाच्या समीक्षेच्या संदर्भात ते आपले विचार मांडतात– ("पूर्वेकडील लोकांचे विचारैक्य" – दि. २८ एप्रिल १९०३ ; पृ. ११२ ते ११५) "आशियाखंडांतील लोकांचे विचारैक्य म्हणजे काय याचेच आधी पुष्कळांस गूढ पडले. परंतु जगाच्या नकाशाकडे दृष्टि दिली असतां आशियांतील देशांस युरोपखंडांतील राष्ट्रें कशीं ग्राशीत चाललीं आहेत हें लक्षांत येईल व तें लक्षांत आलें म्हणजे या ग्रासारा पात्र झालेल्या देशांना असें कांहीं सामर्थ्य आहे कीं नाहीं कीं जेणेंकरून ही आपत्ति त्यांना टाळता येईल, असा कोणासहि सहज विचार सुचणार आहे. फार प्राचीन काळापासून युफ्रेटिस्, सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा, व हो–हांग–हो या नद्यांचे कांठीं आशियांतील राष्ट्रांच्या सुधारणेचा ध्वज फडकलेला आहे. अशोक राजाचे वेळीं हिंदुस्थानांत व सिरिया पॅलेस्ताईन पर्यंत एकीकडे व दुसरीकडे चीन जपानपर्यंत हिंदुधर्माच्या छायेखालीं वाढलेल्या बौद्ध भिक्षूंनी व उपदेशकांनी दोन्ही समुद्रांचा मानदंड असल्याप्रमाणें बौद्धधर्माचा दंड पसरून दिला. केव्हांना केव्हां तरी चीन, ब्रह्मदेश, हिंदुस्थान आणि जपान या राष्ट्रातील "आपण लोक एक आहोत" ही कल्पना कोणाहि स्वतंत्र विचाराच्या पुरुषाचे डोक्यांत आल्यावाचून राहिली नसती व तीच कल्पना प्रा. ओकाकुरा यांनीं आपल्या ग्रंथांत मांडली आहे. चीन व तिबेट या राष्ट्रांना हिमालयपर्वत हिंदुस्थानापासून वेगळे करतो, हें खरें आहे पण या अत्युच्च पर्वतासहि या दोन राष्ट्रांतील विचारैक्य मोडवलें नाहीं, हिंदुस्थान चीन व जपान हे एकाच पंख्याचे भाग आहेत असे पंख्याचे रूपक प्रा. ओकाकुरा यांनीं मांडले आहे."

"पाश्चिमात्य राष्ट्रांची धाव ज्याप्रमाणें सुखोपभोगांकडे आहे त्याप्रमाणें पूर्वेकडील लोकांची नाहीं व आयुष्य सुखांत घालविण्याच्या साधनांपेक्षा आयुष्याचें परिणामी साफल्य कसें होईल हाच विचार त्यांच्या डोळ्यापुढें नेहमी उभा असतो. आज जगांत प्रचलित असलेले सर्व धर्म पूर्वेकडे म्हणजे आशिया खंडांतील राष्ट्रांमध्यें प्रथमतः कां निपजले याचें बीजहि वरील भेदांत आहे हे प्रा. ओकाकुरांचे म्हणणें बरोबर आहे. पूर्वेकडील राष्ट्रांतील लोकांमध्यें पाश्चिमात्य राष्ट्रा-

तील लोकांपेक्षा विलक्षण असे जर एखादें विचारैक्य असेल तर तें वर निर्दिष्ट केलेलेंच होय. जपानसारख्या स्वतंत्र राष्ट्रांतील एका मर्मज्ञ विद्वानांस पूर्वेकडील राष्ट्रांमध्यें असलेल्या ऐक्याची अशा रीतीनें एकदा प्रचीति आल्यावर लवकरच त्यास "सर्व ब्रह्ममयं जगत्" असें वाटू लागल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं."

टिळक अशा तऱ्हेने अध्यात्मवादी विचार सांगत असताना त्यांना पश्चिमी ऐहिक भौतिक सुखवादी संस्कृतीची छाप जपानसारख्या अध्यात्मवादी परंपरेच्या देशावरहि पडत आहे याची दुःखद जाणीव होऊन ते त्याची दखल घेतात* व नंतर म्हणतात :– "पाश्चिमात्य राष्ट्रांनीं पूर्वेकडील राष्ट्रांतील हें विचारैक्य मोडून टाकून त्यांस साम्राज्यशाही बंधनांत कायम जखडून ठेवणें जरूर व शक्य आहे व असाच ईश्वरी संकेत आहे असें म्हणण्यापर्यंत कांहीं पाश्चिमात्य ग्रंथकारांची मजल येऊन ठेपली आहे. परंतु ज्या विचारैक्याला हिमालयपर्वत आड येऊनहि बाधा झाली नाही तें विचारैक्य बुडविलेल्या भोपळ्याप्रमाणें केव्हांना केव्हां तरी पाण्याच्या सपाटीवर तरंगून दृक्प्रत्ययास येईल हें निश्चित आहे. भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें भेदांतहि साम्य पाहणारी अशा प्रकारची दृष्टि कालांतरानें प्रसार पावेल, फारशी पंचाईत पडणार नाहीं, असा ऐतिहासिक अनुभव आहे." टिळक पाश्चात्यांना इषारा देताना दुसरीकडे लिहितात :– (खोटें कोण, २१ फेब्रु. १९०५, पृ. ११७) "युरोपियन राष्ट्रांत जर सत्याचा अभिमान वाढला असेल तर तो एशियांत उत्पन्न झालेल्या ख्रिस्ती धर्मामुळेंच वाढलेला आहे. किंबहुना ख्रिस्त, महंमद, श्रीकृष्ण, बुद्ध व कन्फ्यूशस् वगैरे जे धर्मप्रवतक झाले. ते सर्व एशियांतच उत्पन्न झाले असून एकहि युरोपांत जन्मला नव्हता हें युरोपियन राष्ट्रांनी लक्षात ठेवलें पाहिजे."

भारतीय पारतंत्र्याचे सर्वांगीण स्वरूप टिळकांनीं थोडक्यात मांडून औद्योगिक पारतंत्र्य हे ब्रिटिश साम्राज्यशाहीखाली भारतास कसे प्राप्त झाले आहे याची सविस्तर मीमांसा "औद्योगिक पारतंत्र्य" (पृ. २६८ ते २७०), "यापेक्षां जास्त अन्याय तो कोणता ?" (पृ. २७१ ते २७४), "दोन चांगलीं पुस्तकें" (पृ. २७९ – २९०), "आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले" (पृ. २९१ ते २९८) या केसरीतील लेखांमध्ये केली आहे. त्याप्रमाणे भारतीय शेतकीच्या धंद्याचा, शेतकरी समाजाचा व ग्रामीण अर्थव्यस्थेचा ऱ्हास व अवनति होऊन शेतकरी

---

* दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेले भारत इत्यादि पूर्वेकडील देशहि पाश्चात्य देशांप्रमाणे भौतिक सुखवादी बनत आहेत व वैराग्यप्रधान अध्यात्मवाद लुप्त होत आहे. (लक्ष्मणशास्त्री जोशी.)

कर्जबाजारी व भुकेकंगाल कसा झाला व या शोकांतिकेस ब्रिटिश राजकीय अर्थनीति कशी सर्वथा कारण झाली याचे हृदयविदारक चित्र "शेतकऱ्यांचा कायदा," "हिंदुस्थानातील शेतकरी लोकांस खरोखर बंड करावे लागेल काय ?," "शेतकऱ्यांच्या कमिशनानें काय केलें ?," "शेतकऱ्यांच्या कमिशनानें सुचविलेले उपाय" या लेखांमध्ये (पृ. २५४–२६७) रेखाटले आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक अवनतीची संपूर्ण जबाबदारी ब्रिटिश अर्थनीतीवर कशी आहे याचे अर्थशास्त्रोक्त पद्धतीने हृदयाला खेचणारे व बुद्धीला वेधणारे विवरण टिळकांनी तर्कशुद्ध व प्रसन्न साहित्यिक शैलीने या लेखांमध्ये केले आहे.

सर्वांगीण पारतंत्र्याची सूत्रमय मांडणी करतांना ते म्हणतात–

"ह्या आपल्या संसारांत पारतंत्र्य अनेक प्रकारचें आहे. राजकीय पारतंत्र्य, धार्मिक पारतंत्र्य, औद्योगिक पारतंत्र्य आणि सामाजिक पारतंत्र्य, असे स्थूल-मानानें या पारतंत्र्याचे भेद करितां येतील. आतां हल्लींची परिस्थिति पाहिली असतां आपण राजकीय पारतंत्र्याचा विचार राष्ट्रीय परिषदेमध्यें, वर्तमान-पत्रांमध्यें, व सभांतून बराच करीत आहों असें दिसेल. धार्मिक पारतंत्र्य, विचारपारतंत्र्य व सामाजिक पारतंत्र्य यांचाहि खल इंग्लिश लोकांचें राज्य स्थापन झाल्यापासून सुरू झाला आहे व सुधारक आणि नवविद्वेषी असे समाजा-मध्यें दोन पक्ष उत्पन्न होऊन उभयतांमध्येंहि मोठा संग्राम माजून राहिला आहे. ह्या गोष्टी अर्थातच अत्यंत इष्ट होत. म्हणजे पूर्वोक्त पारतंत्र्याविषयीं कडाक्याचीं भांडणें होत आहेत हा प्रकार आम्हांस फारच चांगला वाटतो. कारण उघडच आहे कीं, एकदां वाद उभा राहिला म्हणजे जुन्या गोष्टींत चांगला अंश किती, त्याज्य भाग किती, अथवा नव्यामध्यें घेण्यासारख्या गोष्टी कोणत्या व अनादर करण्यासारख्या गोष्टी किती यांचा वादामध्यें निकाल होऊन सामान्य जनांस अथवा आग्रहशून्य लोकांस "वादे वादे जायते तत्त्वबोधः" या न्यायानें कोणतें घ्यावयाचें, कोणतें टाकावयाचें या गोष्टींचा तत्त्वबोध होऊन उत्तरोत्तर त्यांचें वर्तन सुधारत जातें, आणि वादाच्या सवयीनें बुद्धीस कुशाग्रत्व येऊन विचार करण्याचा सराव राहतो. या विवेचनावरून वाद होणें हें इष्ट आहे, असें सहजच कळून येईल. आतां राहल्यांपैकीं औद्योगिक पारतंत्र्य अथवा उद्योगा-साठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे बघत बसणें या अनिष्ट अवदसेबद्दल आपल्या लोकांत जितकी चर्चा होऊं लागावी, तितकी अजून झाली नाहीं हें आपणां सर्वांसच अहितकर होय."

श्री. दादाभाई नौरोजींचे 'Poverty and Unbritish Rule in India' म्हणजे हिंदुस्थानातील दारिद्र्य आणि इंग्रज लोकांचे शीलास न

अनुक्रम ...... दि: ......
(२५) ...... ओ: ......

शोभणारी राज्यपद्धति हे पुस्तक व विल्यम डिग्वी यांचे ‘Prosperous India’ म्हणजे भरभराटलेले हिंदुस्थान असे व्याजोक्तीने नाव दिलेले पुस्तक अशी दोन पुस्तके १९०१ साली प्रसिद्ध केली. या पुस्तकांचे सारग्रहणात्मक दोन लेख टिळकांनी लिहिले. भारताचे भयंकर आर्थिक शोषण ब्रिटिश राज्यतंत्रामुळे होत आहे व ते थांबविण्याकरिता आवश्यक एकच उपाय म्हणजे स्वराज्य होय. या दोन मुद्यांची मांडणी सुसंगत रीतीने करून त्याकरिता जीवनभर लढा दादाभाईंनी भारताच्या इतिहासात प्रथम दिला याची दखल टिळकांनी अनेक ठिकाणी वारंवार घेतलेली आहे. या लेखांमध्येही प्रारंभीच त्यांनी नितान्त आदरपूर्वक दादाभाईंचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात– “दादाभाई नौरोजी यांनीं आपला देह हिंदुस्थानच्या कल्याणाकरिता अर्पिलेला असून इंग्रजांसारख्या वलाढ्य व सुशिक्षित सार्वभौम राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं हिंदुस्थान देश इतका दरिद्री कां झाला याची अर्थशास्त्रदृष्टया सोपपत्तिक खरीं कारणें विलायतेंतील इंग्रज लोकांस समजून देऊन त्यांच्या हातून हिंदुस्थानचें कांहीं कल्याण झाल्यास पाहावें या सद्हेतूनें ते आयुष्याची शेवटची पंधरा वीस वर्षें स्वदेशाचा व स्वकीयांचा त्याग करून परदेशात एकनिष्ठपणें काढीत आहेत हें सर्वांस श्रुत आहेच. किंबहुना राजकीय बावतींत खटपट करणाऱ्या हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाचे पुढारीच नव्हे तर त्यांतील महर्षि ही संज्ञा दादाभाई नौरोजी यांसच लागू पडते.” दादाभाई नौरोजी यांच्यासंबंधी टिळकांनी जेव्हा जेव्हा लिहिले तेव्हा तेव्हा मनोभावाने असाच स्तुतिसुमनांचा “महापुरुष” “अनन्य देशभक्त,” “स्वराज्याचा देवदूत” इत्यादि विशेषणांनी गहिवरून वर्षाव करून अपरंपार कृतज्ञता व्यक्त केली आहे.

विल्यम डिग्वि, टिळकांनी उद्धृत केल्याप्रमाणे, साम्राज्यशाही पिळवणुकीचे वर्णन असे थोडक्यात करतात की, या देशात (१) गावोगाव पूर्वीपासून धान्यपुरवठा करणारी भरलेली पेवे नाहीशी होत चालली आहेत; (२) सोन्यारुप्याचे दागिने किंवा त्या रूपाने आलेली शिल्लक बहुतेक नष्ट झाली आहे; (३) लोकांचे निरनिराळ्या प्रकारचे समुद्रावरील किंवा जमिनीवरील उद्योगधंदे नाहीसे होऊन सर्वजण शेतकीवर येऊन पडले आहेत; (४) ज्या गलबतांच्या योगाने देशातील धान्य किंवा उत्पन्न परदेशात जाते ती गलबते देखील परकीयांनी बांधलेली व परकीयांनी चालविलेली आहेत व त्यांचा फायदा परकीयांकडेच जात आहे; (५) नीळ, चहा, कॉफी वगैरे ज्या नव्या उत्पन्नाच्या बाबी आहेत. त्या सर्व परकीय भांडवलाने परकीय लोकांच्या फायद्याकरिता चाललेल्या आहेत; (६) व्यापार किंवा मोठमोठे उद्योगधंदे हे सर्व किंबहुना किफायतीचा सर्व

रोजगार या देशात परकीयांच्या हातात आहे आणि ( ७ ) राज्यकारभारातील मोठमोठ्या पगाराच्या वा हुद्याच्या नोकऱ्या सर्व परदेशातील लोकांच्या ताब्यात आहेत; या सर्व गोष्टी ध्यानात घेतल्यास या देशास भीक लागून एक वर्ष पाऊस न पडताच लोक अन्नान्न दशेस लागले तर यात नवल काय ?

या संदर्भात टिळक म्हणतात, – "इंग्रजी राज्यामुळें हिंदुस्थान देशास दारिद्र्य व दुर्बलता ही कशी प्राप्त झाली, देशाचे राष्ट्रीयत्व नाहींसें होऊन त्यांत मुत्सद्दी योद्धे, विद्वान आणि साहसी पुरूष निपजण्याची अजिबात कशी बंदी झाली, राष्ट्राच्या मानसिक व आधिभौतिक संपत्तीचा कसा ऱ्हास होत गेला आणि चोहों बाजूनें आम्हीं हिंदुस्थानवासी लोक हतवीर्य आणि उत्साहहीन होऊन अक्काबाईच्या फेऱ्यात कसें सांपडलों हें विलायतेतील लोकांस व आमच्या राज्यकर्त्यास स्पष्टपणें कळविणें जरूर होते; तें काम या दोन पुस्तकांनीं केलें आहे."

ही साम्राज्यशाही शोषणाची व त्यामुळे होणाऱ्या देशाच्या मानसिक व आर्थिक अधोगतीची उपपत्ति टिळकांना तत्पूर्वी पुष्कळ वर्षे माहीत होती. परंतु त्याचे सप्रमाण संपूर्ण विवरण वरील दोन पुस्तकात मांडले तसे पूर्वी एकत्रित कोणी मांडले नव्हते. टिळकांनी तत्पूर्वी त्याच प्रकारचा विचार भिन्न भिन्न संदर्भात वेळोवेळी मांडलेला आढळतो. "राणीसरकारचा जयजयकार ( दि. २२ जून १८९७, पृ. ८०–८६ ) हा लेख उदाहरणार्थ वाचकांनी पाहावा. हा लेख त्यांनी महाराणी व्हिक्टोरिया हिच्या राज्यारोहणाच्या साठाव्या वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने लिहिला आहे. या लेखाच्या प्रारंभी ते म्हणतात –

"ज्या राष्ट्राच्या (म्ह. ब्रिटनच्या) राज्याचा विस्तार गेल्या साठ वर्षांत पाऊणपटीनें वाढला आहे, त्यांतील लोकसंख्या तितक्याच अवधींत दुप्पट जास्त झाली आहे व ज्याची संपत्ति तिप्पट व व्यापार साठ वर्षांपूर्वी होता त्याच्या नऊपट जास्त झाला आहे, त्या वैभवाच्या शिखरांस चढलेल्या राष्ट्रांतील लोक आपल्या (व्हिक्टोरिया) राणीच्या जुबिलीच्या निमित्तानें आपल्या उत्कर्षाबद्दल प्रचंड उत्सव करीत आहेत. आतां इतक्या अवधींत हिंदुस्थानच्या स्थितींत काय अंतर झालें आहे तें पाहूं. आमच्या अलंकारशास्त्रांत असा एक नियम आहे कीं, रावणाचें बरेचसें वर्णन केलें म्हणजे रामचंद्राचें फारसें वर्णन करावें लागत नाहीं. फक्त अशा अशा शत्रूस त्यानें जिंकलें असें म्हटलें म्हणजे त्याच्या पराक्रमाचें सहजच वर्णन होतें. हाच न्याय प्रकृत स्थलींहि लागू पडतो. इंग्लंडचा अफाट राज्यविस्तार, व्यापार व वैभव वर्णन केल्यावर तेथील लोकांच्या अंकित देशांपैकीं हिंदुस्थान हा एक गरीब देश आहे असें म्हटलें

म्हणजे मार्मिक वाचकांस आमच्या स्थितीचें आणखी वर्णन करण्याची जरूरी नाहीं. आमचे राज्यकर्ते मोठे हुषार, दक्ष, बुद्धिमान आणि नऊकोटी नव्हे तर नऊशें नऊ कोटीहूनहि अधिक नारायण आहेत एवढीच काय ती आम्हांस आनंद मानण्या-सारखी गोष्ट आहे. बाकी हिंदुस्थानच्या स्थितिकडे पाहिले म्हणजे आमच्या वैभवाचा नव्हे तर— ऱ्हासाचा हा साठावा उत्सव आहे असेंच म्हणणें भाग पडतें."

टिळक केसरीचे संपादक म्हणून देशाच्या आर्थिक अवनतीवर लिहू लागले तेव्हा प्रथम त्यांनी ग्रामी जीवनाच्या दुर्दशेवर क्ष किरण टाकून साम्राज्यशाही शोषणाचे भयानक स्वरूप दाखविण्यास प्रारंभ केला. कारण भारताचा सामान्य माणूस बहुसंख्येने ग्रामीण भागांत भरलेला आणि त्याची दुर्दशा म्हणजेच राष्ट्राची दुर्दशा असे समीकरण त्यांनी आपल्या मनापुढे मांडले होते. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या स्वदेशी व बहिष्कार या कार्यक्रमावरील लेखांमध्ये पुन: पुनः मिळते. सामान्य जनांचे जीवनमान उन्नत झाल्याशिवाय कोणत्याही राष्ट्राची उन्नति झाली असे ते मानीत नाहीत. वर्गहीन सामाजिक समतेचा जरी ते पुरस्कार करीत नसले वा समाजवादी परिभाषेमध्ये बोलत नसले तरी त्यांच्या कल्पनेतील संपन्न राष्ट्र म्हणजे मानसिक व भौतिक संपन्नतेचा उपभोग घेणारा सामान्यजनांचा समाज आहे. ते चातुर्वर्ण्याच्या तत्त्वाचा पुरस्कार करतात हे खरे आहे. परंतु त्या चातुर्वर्ण्यात जातीभेद वा आर्थिक दु:स्थितीतला शूद्र येत नाही. बोलशेविक क्रांतीनंतर चातुर्वर्ण्य तत्त्वाचा पुन: विचार केला पाहिजे असेही ते एकठिकाणी म्हण-तात. यावरून बोलशेविक क्रांतीनंतर दोनच वर्षामध्ये ते आपल्या तात्त्विक विचारांचे पुनः संशोधन करण्यास तयार होतात हे अष्टावधानी व मानवतावादी चित्ताचे गमक आहे.

शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे वर्णन करतांना त्यांच्या अंगावर काटा उभा राहतो; ते म्हणतात — —

"हिंदुस्थानांतील एकुणीस-वीसांश लोकांचा उदरनिर्वाह परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें जमिनीवर चालतो; पण त्या जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरी वर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे ह्याचा विचार केला म्हणजे आंगावर कांटा उभा राहतो. घरांत अठरा विश्वे दारिद्रय ! कर्जाचा बोजा डोईवर इतका कीं, घरदार गुरेंढोरें गहाण पडलीं तरी सालअखेर कशी मजल पोंचेल ह्याची पंचाईत ! सरकारदस्त तर दरवर्षास तारखेच्या तारखेस भरला पाहिजे, नाहींतर जमिनीचा लिलांव होण्याची पाळी यावयाची. त्यांत अवर्षण, टोळधाड वगैरे अवांतर अरिष्टें अलीकडे वरचेवर कृपादृष्टि करूं लागल्यामुळें दोनचार वर्षांनीं यमस्वरूपीं दुष्काळ दत्त म्हणून उभा आहेच !

वर्षांतून आठ महिने उपासमार सोसून केवळ पुढच्या हंगामाच्या आशेवर कसें तरी जीवित कंठावें, व शेवटीं ऐन वेळीं पावसानें टाळा दिला म्हणजे सावकाराचें घर पहावें अशी बिचाऱ्या शेतकऱ्यांची स्थिति पाहून कोणास बरें कींव येणार नाहीं ? पूर्वीं अशा प्रसंगीं सावकार लोक उदारपणानें शेतकऱ्यांस मदत करीत, व वेळीं राजेलोकहि सूट देत; पण अलीकडे तेहि मार्ग बंद झाले. शेतकऱ्यांचा कायदा झाल्यापासून सावकार कर्ज देईनातसे झाले, कारण आपले पैसे परत मिळतील असा त्यांना मुळींच भरंवसा नाहीं. सरकार तर बोलून चालून व्यापारी, तेव्हां सुटीची गोष्टच नको. पाऊस असो वा नसो, पीक येवो अगर न येवो, शेतकरी व त्यांचीं मुलें-माणसें उपाशीं मरोत किंवा तुरुंगांत जावोत, सरकारदस्त नेमलेल्या तारखेच्या आंत कचेरींत भरलाच पाहिजे. यंदा सोलापूर जिल्ह्यांत दुष्काळ इतका आहे कीं, सव्यांच लोक दोन पैशाला गाई-बैल विकूं लागले, तरी सरकार देणें थकलें काय तें तेवीस रुपयेच ! आणि ही स्थिति येण्याला कारण सावकार लोकांचा जुलूम अशी सरकारची पक्की समजूत झाली ! तेव्हां सावकारांच्या त्रासापासून शेतकऱ्यांचे रक्षण करण्याकरितां म्हणून सरकारानें शेतकऱ्यांचा कायदा केला; पण त्यापासून उपयोग कांहीं एक न होतां ज्यांच्या हिताकरितां तो करण्यांत आला त्यांचे हाल वाढतच चालले. सावकारांचा जाच कमी व्हावा म्हणून सरकारनें पतपेढ्या काढल्या, व स्वतःच सावकारी करण्यास सुरुवात केली; तरी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत्या दिशेलाच आहे. इतकेंच नाहीं तर शेतकऱ्यांचें दारिद्र्य कमी करण्याकरिता जो कायदा केला तोच उलटा त्यांना घातक होतो अशी लोकांची ओरड आहे.

..... शेतकरी, सावकार व सरकार. कोणत्याहि व्यवस्थेनें ह्या तिघांचें हित होईल तर ती उत्तम; पण हल्लीं तिघांचेंहि नुकसान होत आहे. रयतेच्या पाठीस तर हाल लागलेच आहेत. ह्या सर्व अरिष्टाला कारण सावकार अशी पुष्कळांची समजूत असल्यामुळें त्याची कोणाला कींव येत नाहीं; पण ही चूक आहे. वस्तुतः सावकारावांचून रयतेचें चालावयाचेंच नाहीं. शेतकीस लागणारें भांडवल तो पुरवितो; पण कर्जदार बुडाला कीं तो बुडालाच; इतकेंच नाहीं तर तें भांडवलहि पुष्कळदां त्याचें नसून त्यानें दुसऱ्या मोठ्या पेढीवरून आणलेलें असतें. शेतकरी एखादेवेळेस सुटून जातो, पण तो मात्र मध्येंच बुडतो. म्हणूनच सर रेमंड वेस्टसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें दिवाणी तुरुंगांत ह्या सावकारांचाच विशेष भरणा आढळतो. बरें सरकारचाहि फायदा होतो असें नाहीं. सार्वजनिक कामें पुष्कळ करावयाचीं असतात, पण वसुलीची रक्कम कायम. तेणेंकरून दुष्काळाच्या वर्षीं

सूट मदत म्हणून तोटा येतो. व सुकाळीं मात्र कांहीं फायदा होत नाहीं. वसूल रुपयांनीं आल्यामुळें वट्टा पडतो तो निराळाच. एकंदरींत हल्लींच्या रीतीनें सर्वांचेंच नुकसान होतें. रयतेची नेहमीं हातातोंडाशींच गांठ असल्यामुळें जमिनींत सुधारणा करण्यास त्याला सामर्थ्य नाहीं व उत्तेजनहि मिळत नाहीं.

......इंग्रजसरकारच्या अमलांतील शांतता अगदीं तारीफ करण्यासारखी अवर्णनीय खरी; परंतु ती शांतता विकत घेण्याकरितां आम्हांस आपल्या भाकरीपैकीं अर्धी भाकर मोठमोठ्या इंग्रजी कामगारांच्या अगर गोऱ्या शिपायांच्या भरीस घालून अर्काटच्या वेढ्यांत ज्याप्रमाणें तांदूळ सोल्जरांस आणि पेज नेटिवशिपायांस खाऊन रहाण्याचा प्रसंग आला होता तसा अर्धपोटीं अगर एका जेवणानें दिवस काढण्याचा हिंदुस्थानच्या कोट्यवधि प्रजेवर प्रसंग येऊन ठेपला आहे! सन १८९१ सालीं जी खानेसुमारी झाली त्यावरून असें आढळून येतें कीं, लोकसंख्येचें मान सरासरीनें दर चौरस मैलास २० या प्रमाणानें सर्व हिंदुस्थानभर १८८१ पासून १८९१ पर्यंतच्या दहा सालात वाढलें आहे; परंतु लागवडीची जमीन त्या मानानें वाढली नाहीं. तिकडे राज्याचा खर्च उत्तरोत्तर एकसारखा वाढत चालला आहे. अर्थात् त्याच मानानें रयतेवरचें कराचें ओझेंहि वाढत चाललें आहे हें सरकारी रिपोर्टावरून प्रत्यक्ष होत आहे. वाढती लोकसंख्या, बुडता व्यापार, सरकारचा अवाढव्य होत असलेला खर्च, आणि उत्तरोत्तर निःसत्त्व होत चाललेली जमीन, यामुळें हिंदुस्थानची इंग्रजी राज्याखालीं काय स्थिति होईल याची कोणाहि विचारी मनुष्यास सहज भीति पडेल.

......शेतकीची निष्कृष्टावस्था म्हणजे आमच्यासारख्यास साऱ्या राष्ट्राचीच निकृष्टावस्था होय. आम्ही इंग्रज सरकारच्या चातुर्यास, वैभवास आणि कर्तबगारीस, दुवा देऊन त्यांचे गुण गाऊं व त्यांचेंच राज्य चिरकाल हिंदुस्थानावर राहो अशी इच्छा बाळगूं, पण दुपारची वेळ कठीण आहे. राष्ट्रांतील लोकांस पुरें इतकें धान्य देशांतल्या देशांत उत्पन्न होण्याची पंचाईत पडूं लागली व इतर उद्योगधंदे करून त्यांत उत्पन्न झालेला माल परदेशीं नेऊन त्याचा मोबदला त्या देशांतून इकडे धान्य आणण्याची सोयहि नाहीशी झाली म्हणजे वेळ कठीण आहे. राष्ट्रांतील हजारों अथवा कोट्यवधि शेतकरी केवळ इंग्रज सरकारचें राज्य सुखशांततेचें आहे म्हणून दुष्काळ आल्याबरोबरच सुखानें मरण्यास तयार होतील असें नाहीं. अथवा निरुपयोगी झालेल्या घोड्याप्रमाणें सरकारचें हातूनहि त्यांस गोळी घालून संसारयातनेंतून मुक्त करण्याचें धारिष्ट व्हावयाचें नाहीं. मग हे लोक करणार काय? एकदां हें भिकार देशावर अनावर सुटलें म्हणजे मग लक्षावधि बागनेटांनींहि त्यांचा प्रतिकार होणें अशक्य आहे. जिकडे तिकडे

एकच कल्होळ होईल आणि या झंझावातापुढें लहान मोठीं सर्व झाडें ह्यूमसाहेबांनीं आपल्या सरक्युलरांत लिहिल्याप्रमाणें जमीनदोस्त होतील !

......बंगाल्यांतील शेतकरी दोनदां जेवावयास मिळालें म्हणजे आपणांस कृतकृत्य समजतात व बहारप्रांतातील ( शेकडा ४० टक्के ) शेतकऱ्यांस अन्नहि पुरें पोटभर मिळत नाहीं असें या ठरावांत लिहिलें आहे. मुंबई इलाख्यासंबंधानें लिहितांना दक्षिणेंतील एक-तृतीयांश मुलूखभर दुष्काळाची भीति असते व रत्नागिरीकडे घांटाजवळील शेकडा नव्वद लोकांस आंबे, फणस अगर भाजीपाला याखेरीज कांहीं महिने दुसरें कांहीं खावयास मिळत नाहीं असें म्हटलें आहे. मद्रासेंत कांहीं कांहीं जिल्ह्यांतून अशीच उपासमार चालते असें तेथील कलेक्टरांनीं कळविलें आहे. व इलाख्यांतील इतर जिल्ह्यांतूनहि दरवर्षाचें उत्पन्न त्या वर्षास जेमतेम पुरतें असें त्या त्या जिल्ह्यांतील कामगारांचें म्हणणें आहे. सारांश, सर्व हिंदुस्थानभर शेतकऱ्यांचे खाण्यापिण्याचे हालच आहेत असें म्हटलें तरी चालेल. सुबत्ता असली म्हणजे सरासरी मोठ्या माराकुटीनें या वर्षाचें पीक त्या वर्षास पुरेसें होतें. एखादे वर्षी पावसानें डोळे वटारले म्हणजे लागलीच निम्मे किंवा तृतीयांश लोक दुष्काळाच्या सपाट्यांत सांपडून त्यांपैकीं बरेच परलोकाच्या मार्गास लागतात.........”

## स्वदेशी व बहिष्कार :–

साम्राज्यशाही विरोधी प्रतिकारात्मक आंदोलनाची सुरुवात स्वदेशी व बहिष्कार या कार्यक्रमापासून झाली. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही टिळकांची चतु:सूत्री भारताच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या कार्यक्रमाची सूचक आहे; त्यात पाचवें सूत्र सत्याग्रह हे गांधींनी नंतर भरीस घातले. भारताच्या स्वातंत्र्य-आंदोलनातील आर्थिक दृष्टिकोण हा एक मूलभूत दृष्टिकोण आहे हे विसरता कामा नये, स्वराज्याच्या आंदोलनाच्या प्रवर्तक विचारांपैकी तो एक विचार आहे. त्यासंबंधात टिळक “औद्योगिक पारतंत्र्य” ( पृ. २६८–७० ) या लेखात म्हणतात की, “ हे औद्योगिक पारतंत्र्य व ह्या पारतंत्र्याचें पूर्ण स्वरूप यांची ओळख आपण करून घेत नाही या कारणानें ही पारतंत्र्याची बेडी आपल्यास विशेषच जखडीत आहे ही गोष्ट मात्र दु:सहतर होय. त्याच्या योगानें आपल्या कर्तृत्वाचे सर्व अवयव लंगडे पडले आहेत. हें खरें आहे कीं, आपल्यास भांडवल नाहीं, औद्योगिक चातुर्य नाहीं, यंत्रशिक्षण नाहीं, यामुळें फारच रेंगाळावें लागत आहे. पण भांडवल नाहीं किंवा इतर गोष्टी नाहीत म्हणून रडून काय उपयोग ? .... उद्योग काढल्याशिवाय भांडवल जमा होणार नाही किंवा

यंत्रज्ञानहि मिळणार नाहीं. तेव्हा तारतम्यानें लहान प्रमाणावरच कां होईना पण निरनिराळे उद्योग निघाले पाहिजेत म्हणजे भांडवल उभें राहील, परदेशचे लोक आपणास रकमा देतील, परदेशस्थ लोकांचे यंत्रचातुर्यहि चाकरीस ठेवूं किंवा आपले लोक तयार करवून आणू. पण या सर्वांस मुख्यतः पहिल्या दोन गोष्टीस एक दोन तारणे पाहिजेत. एक उद्योग करण्याची निष्ठा व प्रेम आणि दुसरें प्रामाणिकपणा, या दोहोंना धूर्तपणा व सन्मार्गगामी साहसप्रियता यांची जर संगति झाली तर वरती डोकें काढण्यास फारशी शतकें लागणार नाहींत." टिळकांची ही स्वदेशीची प्रस्तावना आहे. स्वदेशीसंबंधी ते म्हणतात की, औद्योगिक राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक यांपैकी एक व अनेक किंवा सर्व दिशेने विचार केला तरीहि स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोग ही पूर्णपणे सिद्ध होतात, ही गोष्ट आता सर्वांच्या प्रत्ययास आली आहे. इतकेंच नव्हे तर सुधारलेल्या राष्ट्रांच्या पूर्वेतिहासावरूनही या इतिहासास पुष्टि मिळत आहे.

समर्थनार्थ राजकोटचे बॅरिस्टिर श्री. पंडित यांचे मत प्रमाण म्हणून त्यांनी उद्धृत केले आहे. पंडितांनी म्हटले की, स्वदेशी चळवळ ही एक दुष्काळनिवारकच मात्रा होय. कारण या चळवळीमुळें खेडेगांवातील उद्योगधंद्यास उत्तेजन येऊन शेतकीवर उदरनिर्वाह करणाऱ्यांची संख्या कमी होईल. आणि तसे झाले म्हणजे वारंवार दुष्काळ पडण्याचा संभवहि कमी होईल. स्वदेशी चळवळीवरील एक दोन भ्रामक आक्षेपांचे निरसन करण्याच्या संदर्भात टिळक म्हणतात कीं, "अर्थशास्त्रदृष्टया पाहिलें असतां स्वस्त परकीय मालापेक्षा महाग स्वकीय माल घेतल्यानें राष्ट्राचें सांपत्तिक नुकसान होतें हा जुन्या अर्थशास्त्राचा सिद्धांत निराधार ठरला आहे. कारण असें कीं, महाग स्वकीय माल घेतल्यास गिऱ्हाईकांस जो अधिक पैसा द्यावा लागतो तो देशांतल्या देशांत राहून त्याचा अखेर विनियोग भांडवलाच्या रूपानें नवीन कारखाने काढण्यात होऊ शकतो. त्याच्या जोडीला देशांतील धंद्यांना उत्तेजन येण्याकरितां परदेशी मालावर बहिष्कार टाकावा आणि देशांतील उद्योगधंद्यास उत्तेजन येण्याकरिता परदेशी मालावर जकात बसवून तो महाग करावा. परदेशी मालावर जकात बसवण्याचें तत्त्व बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांना आतां मान्य झालें आहे. जकात वाढवून स्वदेशी माल घेण्याचा लोकांनी निग्रह करावा. आलेल्या नफ्याला भांडवलाच्या रूपानें कारखान्यांचें स्वरूपांत रूपांतर करावें. सप्रतिबंध अथवा संरक्षित व्यापार, स्वदेशी चळवळ व परदेशी मालाचा बहिष्कार यांच्या योगानें भांडवल वाढत गेल्यानें नवीन नवीन कारखाने निघतात. ते भरपूर प्रमाणात वाढत गेल्यानें स्वदेशी मालाच्या किमती उतरत उतरत अखेर परदेशी मालाच्या किमतीबरोबर होतील. अर्थशास्त्रात मागणी आणि पुरवठा यांच्या

समीकरणाची जी प्रक्रिया सांगितली आहे ती अशाच प्रकारची होय. यांत अडचणी पुष्कळ आहेत, परकीय सरकार आहे, सुशिक्षितांच्या चैनीच्या सवयी आहेत, कांहीं सुशिक्षितांचा विरोधी प्रचार आहे. ज्यांच्यांत सुप्त कर्तृत्व-शक्ति आहे त्यांच्यांत निराशा आहे, नुकसानीची भीति आहे, या सर्व अडचणींतून निश्चयानें उद्योग केल्यास निःसंशय पार पडता येईल. आरंभ स्वल्प झाला तरी भावनेच्या व श्रद्धेच्या बळावर औद्योगिक पारतंत्र्याच्या महाभयातून खात्रीनें उत्तीर्ण होऊ. "स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्" (भगवद्गीता.)"

कॉंग्रेसने बहिष्काराचा कार्यक्रम स्वदेशी चळवळीचा म्हणजे आंदोलनाचा एक भाग म्हणून स्वीकारला तरी त्याचे मुख्य स्वरूप राजकीय उपाय हे होते. टिळक म्हणतात:– "राज्यकर्ते बेपर्वा व बेफाम होऊन गेले आहेत. अशा स्थितींत त्यांना ताळ्यावर आणण्यास आमच्याजवळ भिकेखेरीज राजकीय उपाय शिल्लक राहिला नाहीं. अशा स्थितींत आमच्या म्हणण्याचा राज्यकर्त्यांच्या मनांत प्रकाश पाडण्यास हें एकच साधन आहे. सर्व प्रकारचा माल देशात तयार होत नसल्यानें आज तारखेस कांहीं परका माल वापरावा लागेल हें निर्विवाद आहे. पण परकीय माल वापरायचा असला तरी आशिया खंडांतील किंवा इंग्लंडाखेरीज इतर देशांतील माल वापरावा." ते राज्यकर्त्यांना बजावतात की, तुम्ही बेपर्वाई चालविली आहे. तुमच्यासारख्या बेमुर्वत लोकांस ताळ्यावर आणण्याकरितां सध्या तरी दुसरे राजकीय रीत्या प्रतिकार करण्याचे सामर्थ्य आमच्या अंगी नसले तरी बहिष्काराने आम्ही तुमचे अर्ध्या पाव पैचे तरी नुकसान करू शकतो. तरुण पिढीच्या उत्साहावर पाणी ओतण्याचा आमच्यातील काही लोकांचा जो उद्योग चालू आहे तो भित्रेपणाचा, गैरमुत्सद्दीपणाचा आणि मूर्खपणाचा आहे: आमची बहिष्काराची चळवळ राजकीय आहे, निव्वळ औद्योगिक नाही. विनवणी व बहिष्कार ही जोडगोळीची बंदूक आम्ही राज्यकर्त्यांवर रोखलीच पाहिजे.

## स्वराज्याच्या आंदोलनाचे जनतेचे साधन म्हणजे कॉंग्रेस ऊर्फ राष्ट्रीय सभा

कॉंग्रेसची स्थापना प्रथम ह्यूम, वेडरबर्न इत्यादी वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अनेक भारतीय सुशिक्षितांच्या साहाय्याने झाली. स्वजातीयांचा छळ सोसून, पिशवीस खार लावून आणि झीज सोसून स्वजातीयांच्या कडून होणाऱ्या निंदेची व शिव्याशापांची पर्वा न करतां दहा बारा वर्षे उमेदीने व कर्तव्यबुद्धीने कॉंग्रेसला वाढीस वरील ब्रिटिशांनी लावले. इ. स. १८८९ पर्यंत ह्यूम कॉंग्रेसचे

जनरल सेक्रेटरी होते. भारत सोडण्यापूर्वी ह्यूमनीं आपल्या जागी काम करण्याकरिता मॉर्गन ब्राऊन यांना विलायतेहून आणले. १८९३ च्या अखेरीस ह्यूम स्वदेशी निघाले तेव्हा त्यांना हिंदुस्थानभर ठिकठिकाणच्या लोकांनी सभा भरवून मानाचा मुजरा केला. पुण्याच्या सभेत पुणेकरांना त्यांनी सांगितले की, जिवात जीव आहे तोपर्यंत तुम्ही या संस्थेचे पितृवत् परिपालन करा. टिळकांनी "मे० ह्यूम साहेबांची शेवटची भेट" (पृ. १८९ ते १९३) या लेखात ह्यूमसाहेबांबद्दल असे म्हटले की, "परमेश्वरी कृपेनें ज्या महात्म्यानें एकंदर इंग्रजी राज्यांतील प्रजेची राजकीय उन्नति करणाऱ्या साधनांची किल्ली दाखवून दिली त्यांची पुन: भेट होण्याचा योग येऊन आजपर्यंत त्यांच्या भेटीनें जसें आम्हास वारंवार उत्तेजन मिळालें तसेंच पुढेहि मिळत जावो अशी आम्ही मनापासून ईश्वराची प्रार्थना करतो," आणि त्यांनी अशी भीती व्यक्त केली की, "असल्या संस्था चालविण्याची कुवत हिंदुस्थानच्या लोकांत येण्यापूर्वीच ह्यूमसाहेबांनी राष्ट्रीय सभेस सुरवात केल्यामुळें ती आपोआप लयास जाण्याचा संभव आहे."

टिळकांची ही भीती थोडा वेळच टिकली. राष्ट्रीय सभेला दहावे वर्ष संपून अकरावे वर्ष लागले तेव्हा त्यांनी म्हटले की, आता हिची कौमार्यदशा संपून हिला यौवनावस्थेची छाक आली आहे. हिचे आंतर्बाह्य स्वरूप हळहळू बदलत चालले असून गांभीर्य, विचारशीलता व उद्दिष्ट हेतू साध्य करून घेण्याविषयी निश्चयबुद्धि अधिक दिसू लागली आहे. उत्साह व भावी विजयाची आशा वृद्धिंगतच होत आहे. हिंदुस्थानच्या भावी इतिहासकारास राष्ट्रीय सभेची स्थापना व वाढ हा एक अतिशय मनोरंजक भाग होईल... तिची वाढ कशी होत गेली हे वर्णन करण्याला खचित गिबनसारख्या इतिहासकाराची लेखणी लागेल.

राष्ट्रीय सभा ही सर्व राष्ट्राचे मुख असल्याने त्या संस्थेच्या द्वारेच आपली एकमुखी मागणी अधिकाऱ्यांपुढे जाणे इष्ट आहे असे म्हणून टिळक सांगतात की, "राष्ट्रीय सभेच्या विस्तीर्ण मंडपात बंगाली, मद्रासी, सिंधी, पारशी, मुसलमान आदिकरून सर्व जातीचे लोक एक दिलानें राजकीय व राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करतांना ज्यांनी पाहिले असेल त्यांची हिंदुस्थानच्या भावी उदयाचा व ऐक्याचा राष्ट्रीय सभा हा एक मजबूत पायाच होय अशी खात्री होऊन त्यांची मनें आनंदानें भरून गेली असतील यांत शंका नाहीं. आमच्या हिंदुस्थानांत पूर्वी ५६ देश होते असा इतिहास आहे. पण इंग्रज सरकारच्या सार्वभौम सत्तेखालीं हे ५६ देश मोडून त्यांचा एकजीव किंवा एक राष्ट्र होण्याचा समय आला आहे हें राष्ट्रीय सभेवरून जितकें पूर्णपणे व्यक्त होते तितकें दुसरे कशावरूनहि होत नाहीं. सर्व ठिकाणच्या प्रमुख लोकांचे जें आज राष्ट्रीय प्रश्नासंबंधी ऐकमत्य अथवा समप्रवृत्ति दिसून येते

ती राष्ट्रीय सभेच्या उद्योगाचेच फळ होय. आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांनी रेल्वे, तारायंत्रे वगैरे बाह्य साधनांनी आणि राज्य करण्याची एकसारखी पद्धत, एकसारखे कायदे आणि राज्यव्यवहारांत उपयोगी पडणारी एक भाषा यामुळें सर्व हिंदुस्थान जणो काय एकत्र करून बांधून टाकला आहे. पण अशा रीतीनें बाह्य साधनांनी बांधून टाकलेल्या लोकांची एकदिलेकरून त्यांस खरोखर एकराष्ट्रीयत्व आणणें हें काम करण्यास राष्ट्रीय सभा हेंच काय तें उत्तम साधन आहे... हिंदुस्थानातील सर्व जातींच्या, सर्व धर्माच्या आणि सर्व प्रांतांतल्या लोकांस एक दिलाचे आणि एक विचारांचे करणें हें राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य होय." ("अकरावी राष्ट्रीय सभा," पृ. १९९ ते २००.)

१९०६ सालाच्या अखेरीस श्री. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली कॉंग्रेसचे अधिवेशन भरले. भारताच्या इतिहासातील महत्त्वाची घटना या अधिवेशनात घडली. दादाभाई नौरोजींनी स्वराज्य हेच भारताचे ध्येय होय आणि ते मिळविणे हेच कॉंग्रेसचे कर्तव्य आहे अशी घोषणा केली. या अधिवेशनावर लिहितांना टिळकांनी म्हटले की, "स्वराज्य, लोकांनी आपणहून चालविलेलें स्वराज्य, आपणांस प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा मार्ग नाहीं असें नेटानें स्पष्टपणें सोप्या भाषेनें गहिवरून दादाभाई यांनी जेव्हा कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून अखेरीस सांगितलें तेव्हा कोणी वृद्ध देवदूत आपल्या तरुण पिढीस शेवटचा उपदेश करण्याकरताच अवतरला आहे कीं काय असा क्षणभर भास झाला. ... राष्ट्रीय सभा आणि स्वराज्याचा हक्क यांचा सभा वयात आल्यानंतर राजकीय चळवळीचे सन्माननीय व वृद्ध–महर्षि उपाध्याय दादाभाई यांच्या हातून गेल्या डिसेंबर महिन्यांत सशास्त्र विवाह लावण्यात आला आहे. हा विवाहसंबंध राष्ट्रीय सभेशी पितृत्वाचें नातें जोडणाऱ्या कित्येक गृहस्थांस जरी पूर्ण पसंत नसला तरी तो तोडणें किंवा त्यांत यत्किंचितहि व्यत्यय आणणें आता अशक्य आहे. स्वराज्य आम्हास साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कार–योग आणि राष्ट्रीय शिक्षण ही स्वावलंबनाची सदर हेतू सिद्धीस नेण्यास तीन मोठीं साधनें आहेत असा कायमचा सिद्धान्त राष्ट्रीय सभेच्या बावीसाव्या बैठकींत झालेला आहे. उद्योग केल्यास इष्टसिद्धी लवकरच झाल्याखेरीज राहणार नाहीं अशी आम्हास पूर्ण उमेद आहे" ("गेल्या राष्ट्रीय सभेंत विशेष काय झालें?" पृ. २०२–२०९).

जहाल व मवाळ किंवा गरम व नरम पक्षांचा जोरात झगडा १९०६ पर्यंत कॉंग्रेसमध्ये चालू होता व तो पुढेहि चालू राहिला. फिरोजशहा मेथा, कृष्णस्वामी अय्यर, गो. कृ. गोखले, पंडित मालवीय व अनेक रावबहाद्दूर

रावसाहेब सर्व ग्रह उपग्रहांसह या अधिवेशनात उपस्थित होते. अटीतटीचा विरोध असूनहि दादाभाईच्या महनीय विभूतिमत्त्वामुळेच हा विरोध उसळून वर येऊ शकला नाही. कॉंग्रेसमध्ये अध्यक्षांनी स्वराज्याची घोषणा केलेली ऐकून त्यावेळच्या अँग्लो–इंडियन पत्रांनी आक्रोश केला की, कॉंग्रेसमधून मवाळ हाकलले गेले. लंडन टाईम्सने रागावून लिहिले की, नरम पक्षाची हकालपट्टी झालेली नसली तरी कॉंग्रेसची इभ्रत व वजन आता कमी झाली आहे; हिंदुस्थान देश तलवारीने आम्ही जिंकला आहे आणि स्वराज्याचे हक्क मागणाऱ्या दादाभाई नौरोजीसारख्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवावी की, त्यांच्या व त्यांना विरोध करणाऱ्या हिंदुस्थानच्या इतर प्रजेच्या दरम्यान ही तलवार ठाणे देऊन राहिली आहे व तेच त्यांस हितावह आहे. आम्ही हिंदुस्थानांत आलो ते काही परत जाण्यासाठी नाही.

जहाल काय किंवा मवाळ काय या दोन्ही पक्षांना स्वराज्य किंवा स्वातंत्र्य प्राप्त व्हावे असे प्रामाणिकपणे वाटत होते. अडत कोठे होते ते मार्गासंबंधी. मवाळ म्हणत की, इंग्रज सरकारची विशेषशी गैरमर्जी न होता जे करता येईल ते करा. इंग्रज सरकार बलिष्ठ व आम्ही क्षुद्र. सिंह धिमा खरा पण रागावला तर त्याची तब्येत सांभाळणे कठीण आहे. इंग्रज कायदेशीर, सनदशीर, उदार व स्वातंत्र्यप्रिय असून बलिष्ठ आहेत. त्याकरिता गोंजारून व चुचकारूनच कार्यभाग साधला पाहिजे. ताडण करावयाचे तर ते केवळ शब्दाने करावे. याविरुद्ध जहाल पक्ष असे म्हणत होता की, 'शेतकऱ्यांची जाणून बुजून दैन्यावस्था करणारी, शंभर वर्षात देशातील उद्योग-धंदे बुडवून सर्व बाजूंनी पिळवणूक करून देशाला नागविणारी, बंगालची फाळणी करणारी व हिंदु-मुसलमानांचे दंगे पेटविणारी ब्रिटिश साम्राज्यशाही असल्या भिक्षांदेहीच्या मवाळ मार्गाने लोकाभिमुख कधी होणार नाही. स्वावलंबनाचा व प्रतिकाराचाच मार्ग अधिक यशस्वी होऊ शकतो. भीक मागून राजकीय हक्क मिळत नसतात. प्रजेस हक्क पाहिजे असल्यास तिने स्वपराक्रमाने मिळविले पाहिजेत. नाक धरल्याशिवाय तोंड उघडत नाही. जिंकलेल्या लोकांना आपखुशीने स्वातंत्र्य दिल्याचे उदाहरण इतिहासात नाही. हा स्वार्थाचा प्रश्न आहे. धर्माचा किंवा औदार्याचा नाही. राजनीति आहे, धर्मनीति नव्हे. स्वातंत्र्य हेच प्रत्येक राष्ट्राचे अंतिम साध्य आहे. तुमच्यामधील भेद हेच सरकारचे कवच; तुमची दुर्बलता ते त्यांचे बल; तुमचे स्वतःबद्दलचे अज्ञान ते त्यांचे सामर्थ्य; तुम्ही ओळखाल तर सर्व तुमचेच आहे. असे या जहाल म्हणजे राष्ट्रीय पक्षाचे धोरण व कृति असून शरीरद्वारा किंवा द्रव्यद्वारा झीज सोसण्यास हा पक्ष तयार आहे.' अशी मवाळ व जहाल पक्षाची दोन भिन्न धोरणे टिळकांनी अनेक ठिकाणी विशद करून

सांगितली. ( " राजकीय पक्षोपन्यास," " समेट कसा होईल, ' " " खरी अडचण कोठें आहे, " " अडचणीचा निर्वाह, " पृ. २१०–२३७ ).

१९०६ च्या अखेरीस झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनात दादाभाईंनी स्वराज्याच्या ध्येयाची घोषणा केल्यानंतर त्या अधिवेशनात मवाळ पक्षाने जरी फारशी गडबड केली नाही तरी धुमसत असलेला त्यांचा असंतोष त्यानंतरच्या सुरतेस भरलेल्या वार्षिक अधिवेशनात उफाळून वर आला. हे अधिवेशन जहाल-मवाळांचे समरांगण ठरले. दोन विरोधी बाजूचे घोडेस्वार एकमेकांवर चालून गेले असता त्यांच्या घोडयांच्या टापांबरोवर धुरळाहि सहज उधळला जातो तद्वत् तेथील वादविवादात खोटया गोष्टींचीहि पुष्कळ धुळ उधळली व त्यामुळे काही काळपर्यंत कित्येकांची नजर बंद झाली. हा धुरळा खाली बसू लागल्यावर वादाचा मुख्य मुद्दा काय याचा खल होऊ लागला. टिळकांचे मत होते की, जहाल व मवाळ असा पक्षभेद असला तरी ह्या पक्षभेदामुळे कोणत्याहि एका पक्षाने कॉंग्रेसमधून फुटून बाहेर जाऊन स्वतंत्र पक्षसंघटना करू नये. कारण दोघांचेहि अंतिम उद्दिष्ट स्वराज्यच आहे, हे इंग्रजसरकारला, त्यांच्या नोकरशाहीस आणि इंग्रज लोकांनी चालविलेल्या वृत्तपत्रांनाहि मान्य आहे. मवाळ हे प्रच्छन्न जहाल आणि जहाल हे स्पष्टवक्ते मवाळ असेच ते म्हणतात. लंडन टाईम्सने तर स्वराज्याचा चांदोवा न मागण्याबद्दल मवाळांस शिफारस केली. जहाल मवाळांची अंतर्गत मने जाणणारे सर्वसाक्षीभूत सरकार आमच्या दोघांच्याहि बारशाला जेवलेले आहे. वाघ म्हटले तरी खातो, वाघोबा म्हटले तरी खातो. शहाणपणाच्या स्वार्थाने इंग्रज सरकारचे अंत:करण भरलेले आहे.

या संदर्भात टिळकांनी अधिक खोलात जाऊन भारताच्या त्यावेळच्या राजकीय मन:स्थितीचे सूक्ष्म पृथक्करण केले आहे. ते म्हणतात– " स्वातंत्र्याची इच्छा मनांत धरणें हा मनुष्यस्वभावाचाच एक धर्म आहे. आपले व्यवहार आपल्या संमतीखेरीज नेहमी परक्यांनी चालवावेत ही स्थिति कोणासहि इष्ट वाटणार नाहीं. त्यांतून पाश्चिमात्य शिक्षणानें ज्यांची मनें संस्कृत झालीं आहेत त्यांस तर ही गोष्ट असह्य होईल यात शंका नाहीं. स्वातंत्र्याच्या बुद्धीची वाढ सुशिक्षित हिंदी लोकांमध्ये झाली असता गोऱ्या लोकांच्या हातांतील सत्ता केव्हाना केव्हा तरी कमी होणार हेहि त्यांस माहीत नाहीं असें नाहीं. पण कोणी झाले तरी आजचें मरण उद्यावर ढकलीत असतो; आणि अशा दृष्टीनें गोऱ्या अधिकारी वर्गानें हल्ली दंडुकेशाही चालविली आहे. राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें प्रजेपैकीं खराखुरा राजनिष्ठ पक्ष अल्प आणि मर्यादित स्वरूपांतच या देशांत आहे. अशा प्रकारचा एखादा वर्ग कोणत्याहि देशावर परकीय अंमल सुव्यवस्थित चालू असतां नेहमी

असायचा. हा वर्ग राजकीय चळवळींत पडू शकत नसतो व यदाकदाचित् पडलाच तर आपणांस जडलेलें संसर्गजन्य पातक प्रभुचरणीं अर्पण करून तो आपल्या मनाची खवखव काढून टाकतो. मनुष्य जात्याच स्वातंत्र्यप्रिय असतो. अशा प्रकारची मंडळी कोणत्याहि देशांत केव्हा तरी कां उत्पन्न व्हावी हा एक मोठा प्रश्नच आहे. राजकीय बाबतींत विचार करता हा वर्ग परकीय सरकारचा गुणग्राहक वर्ग होय असे म्हणावें लागतें. परकीय सरकारमुळें आपल्या राष्ट्राचा कसकसा फायदा झाला याचें तपशीलवार विवेचन देऊन परकीय सरकारचें अन्याय व जुलमी वर्तन यावर पांघरूण घालायचा प्रयत्न हा करतो. हा लहानसा वर्ग सोडल्यास बाकीचे वर्ग स्वराज्यवादीच आहेत असें म्हटलें पाहिजे. दुसरा वर्ग म्हटला म्हणजे राज्यकर्त्यांच्या उणीवा त्यांच्या नजरेस आणून त्यांच्याकडून त्या काढून टाकण्यासाठी जितक्या निःस्पृहतेनें बोलणें जरूर आहे तितक्या निःस्पृहतेनें बोलतो. यांना इंग्रजी राज्याचे टीकाकार म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. हे स्वराज्याची मागणी उघडपणें करीत नाहीत. तिसरा वर्ग स्वराज्य हाच काय तो आपला परमपुरुषार्थ आहे असे मानतो. परंतु राज्यकर्त्यांची प्रसन्नता राखून स्वराज्य मिळूं शकेल असें या वर्गास वाटतें. हल्लीच्या राज्यपद्धतींतील दोष तिच्या वास्तविक स्वभावांतील दोष आहेत. ते दोष समूळ नाहींसे होण्यास स्वराज्याखेरीज दुसरा मार्ग नाही असेंहि हा वर्ग प्रतिपादन करतो. राज्यकर्ते न्यायप्रिय असल्यामुळें कालांतरानें त्यांच्या परोपकार बुद्धीचा विकास होऊन हिंदी लोकांच्या पदरांत स्वराज्याचें माप टाकून ते मोकळे होतील असे यांना वाटते. यांच्या पलीकडचा आमचा वर्ग म्हणतो की स्वावलंबनानेच स्वराज्य मिळेल, राज्यकर्त्यांच्या सद्बुद्धीनें नव्हे; कारण त्यांना स्वार्थबुद्धि कधीहि सोडावयाची नाही. हें स्वराज्य इंग्रजी साम्राज्यांतर्गत स्वराज्य होय, हें स्वराज्य पूर्ण स्वातंत्र्यापेक्षां कमी दर्जाचे आहे हें सांगावयास नकोच; हा कांहीं अंतिम हेतु नाहीं. तथापि हे स्वराज्याचे हक्क प्राप्त झाल्यानें राजकीय प्रगतीची मजल अंतिम हेतूच्या पुष्कळच जवळ जाईल. मनुष्यमात्राच्या मनांत असणारी स्वतंत्र्यप्रियतेची वृद्धि हा आमचा पक्ष लपवून ठेवूं इच्छित नाहीं. याहि पलीकडचा वर्ग म्हटला म्हणजे लवकरच स्वातंत्र्य म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्त व्हावें असें म्हणणारांचा होय. या लोकांची संख्या सध्यांच्या स्थितींत थोडी आहे. या पांच वर्गांपैकीं पहिला वर्ग सोडला तर गोऱ्या राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें बाकी सर्व कमी अधिक प्रमाणानें राजद्रोहीच होत.

राष्ट्रीय सभेंत स्वराज्यवादी आणि स्वातंत्र्यवादी, विनंतीवादी किंवा स्वावलंबनवादी या सर्वांनी एकमतानेंच काम केलें पाहिजे. हिंदुधर्म ज्याप्रमाणें केवळ

शैवांचा नाहीं आणि वैष्णवांचाहि नाहीं तद्वत राष्ट्रीय सभा केवळ जहालांचीहि नाहीं किंवा मवाळांचीहि नाहीं. कोणाचे अंतिम हेतु कसेहि असोत. त्याबद्दल एक-मेकांनी राष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घालण्याच्या प्रयत्नात सामील झाले पाहिजे. राष्ट्राचें अंतिम हित कशांत आहे याबद्दल सप्रमाण विचार करण्याचा मक्ता परमेश्वरानें जहालांनाहि दिला नाहीं किंवा मवाळांनाहि दिला नाहीं. हे दोघां-नीहि लक्षात ठेवलें पाहिजे. या कामीं जातिभेद ज्याप्रमाणें विसरून जावयाचा त्याप्रमाणें अंतिम हेतूमधील भेदहि विसरला पाहिजे. जो तो पक्ष आपापलीं मतें अधिकाधिक लोकप्रिय व्हावी यासाठी मांडण्यास मोकळा आहे. राष्ट्रीय सभेंत जें बहुमतानें ठरेल तें नव्या जहाल पक्षासहि मान्य असले पाहिजे. राष्ट्रीय सभेंतील बहुमताविरुद्ध आपण बंड करणार असेहि त्यांनी म्हणू नये. पाहिजे तर सभेच्या बाहेर प्रत्येक पक्षानें लोकमत जागृत करण्याकरितां आपापलें मत मांडावे. पार्लमेंट सभेतील लेबर किंवा रॅडिकल पक्ष बहुमतांतील जुन्या पक्षाच्या विरुद्ध लोकमत पुनः जागृत करण्यास मोकळा असतो. त्याप्रमाणें जुन्या नव्या पक्षांना लोकमत जागृत करण्याकरिता आपापलें मत लोकांपुढे मांडण्याचा हक्क कायम असला पाहिजे. दोन पक्षांची जी नेहमी झटापट चालू असते तीच राष्ट्राच्या प्रगतीचें साधन होय. ही झटापट कायम ठेवूनच दोन्ही पक्षांनी विशिष्ट कार्यांपुरते विशिष्ट नियमांनी पार्लमेंटांतील भिन्न भिन्न पक्षांप्रमाणें एकत्र झाले पाहिजे आणि वागले पाहिजे. हिंदुस्थानसारख्या अवाढव्य राष्ट्रांस एकाच पक्षाचे विचार सर्वदा रुचतील किंवा ग्राह्य होतील असें नाही. पदार्थविज्ञान शास्त्रांत असा नियम आहे कीं, घर्षणाखेरीज गति उत्पन्न होत नाहीं, राष्ट्राच्या प्रगतीसहि हाच नियम लागू आहे. गति आहे तेथें घर्षण आहे व तें असलेच पाहिजे. पण हें घर्षण कमी करण्यास ज्याप्रमाणें वंगण घालावें लागतें त्याप्रमाणें राजकीय बाबतींत दोन्ही पक्षांचे घर्षण कमी करण्यास दोन्ही पक्षांस विचार-स्वातंत्र्याची व भाषणस्वातंत्र्याची मोकळीक ठेवून पार्लमेंट सभेच्या धर्तीवर काम चालविण्याचे नियम ठरवावे व पाळावे. राष्ट्रीय सभेचें राष्ट्रीयत्व कायम राहण्यास तींत दोन्ही पक्षांचा समावेश व्हावयास पाहिजे." ("राजकीय पक्षोपन्यास," "समेट कसा होईल," "अडचणीचा निर्वाह" पृ. २१०–२३७)

टिळकांनी राजकीय विचारांच्या व ध्येयवादाच्या उच्च पातळीवर उभे राहून देशातील भिन्नभिन्न राजकीय प्रवाहांमध्ये अभेद शोधण्याचा प्रयत्न करून यश मिळविले. ही अभेद शोधण्याची तात्त्विक दृष्टि त्यांना प्राचीन भारताच्या धार्मिक तत्वज्ञानाच्या संस्कारामुळे व चिंतनामुळे लाभली होती. आधुनिक युगापूर्वीच्या मानव जातीच्या इतिहासात भिन्न समाजसंस्थांचे भिन्नत्व धर्माधिष्ठित होते. धर्म

ह्या तोपर्यंत समाजसंघटनेचे व समाजसंस्थांमध्ये भेद उत्पन्न करण्याचे तत्त्व होते. धर्मैक्य जेथे, तेथे समाजैक्य व धर्मभेद जेथे, तेथे समाजभेद, असे स्वरूप सामाजिक प्राचीन इतिहासाचे दिसते. हिंदुधर्म आणि बौद्ध धर्म हेच तत्त्वतः व व्यवहारतः या भेदांमध्ये ऐक्य शोधणारे ऐतिहासिक धर्म ठरले. हिंदुस्थानच्या पश्चिमेस निर्माण झालेल्या प्रबल प्रेषितनिष्ठ धर्मसंस्थांनी धर्मभेदाला महत्त्व देऊन भिन्न धार्मिक समाजांमध्ये शाश्वत शीतयुद्धाचा पाया घातला. हे शीतयुद्ध अलीकडे काही प्रमाणात पश्चिमी ख्रिश्चन संस्कृतीमध्ये शमन पावत असले तरी काही इस्लामी राष्ट्रांमध्ये अजून ते उघड वा दडलेल्या स्वरूपात अस्वस्थता उत्पन्न करीत आहे. टिळकांनी व गांधींनी जे प्रयत्न केले त्यात भेदांमध्ये अभेद दृष्टीला मौलिक महत्त्व दिले व त्या दृष्टीचा राजकारणाच्या पातळीवर मोठ्या प्रमाणात प्रयोग केला. पुरे यश आले नाही परंतु स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या क्षणापर्यंत या अभेद-दृष्टीने मोठे यश मिळविले. टिळकांनी स्वराज्याचा पाया रचला. गांधींनी इमारत उभारून स्वातंत्र्याचा देदीप्यमान सोन्याचा कळस चढविला.

मवाळांना चतुःसूत्रीपैकी बहिष्कारसूत्र अमान्य झाले. गांधींनाहि ते बहिष्कार-सूत्र ब्रिटिश द्वेषाचा वास आल्यामुळे काहीसे अमान्य होते परंतु त्यांनी ते प्रत्यक्षात आचरणात आणण्यास हरकत घेतली नाही हे असहकारिता युगातील परदेशी कापडाच्या होळ्यांवरून शाबीत होते. चतुःसूत्रीतील राष्ट्रीयशिक्षण हे सूत्रहि सर्व राजकीय पक्षांना मान्य झाले.

## इंग्रजांचे इंग्रजी शिक्षण व कॉंग्रेसचे राष्ट्रीय शिक्षण

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आगरकर व टिळक यांच्या सहकार्याने राष्ट्रीय तेजस्वी शिक्षण देण्याकरिता खाजगी माध्यमिक शाळा स्थापण्याचा उपक्रम केला. डेक्कन एज्युकेशन सोसायटी याच उद्देशाने स्थापन झाली. भारतामध्ये अन्यत्रहि अशी खाजगी माध्यमिक विद्यालये व महाविद्यालये शिक्षणसंस्थांच्या द्वारे स्थापन झाली. परंतु त्यांचे रूपांतर होऊन त्या सरकारी शिक्षणसंस्थांप्रमाणे हुबेहूब बनल्या. चिपळूणकरांची प्रतिज्ञा होती की, गोरा पाय माझ्या संस्थेत शिरणार नाही. परंतु गोऱ्याच्या पायी शरण जाऊन नोकऱ्या मागणाऱ्या शिक्षितांची निर्मिती करणाऱ्याच त्यांच्या शिक्षणसंस्थेसह इतर खाजगी शिक्षण संस्था बनल्या.

टिळकांनी शिक्षणविषयक प्रश्नावर केसरीत लिहित असतांना लष्करी शिक्षण सरकारने द्यावे अशी सरकारपाशी इ. स. १८९० मध्ये प्रथम मागणी केली ( "लष्करी शिक्षणाची शाळा" पृ. ३१६ ). विनंती व मागण्या यांचे महत्त्व

टिळकांनी कधीच अमान्य केले नाही. निस्पृह टीका व स्वावलंबनी प्रयत्न यांची जोड मागण्यांना द्यावी एवढेच त्यांचे म्हणणे होते. शिक्षणाच्या बावतीत मागणी-पलीकडे गेले पाहिजे असा विचार त्यांनी "पुनश्च हरि: ॐ" मध्ये केल्यानंतर मांडण्यास सुरवात केली. त्याच्या अगोदर सरकारी विद्यापीठे व शिक्षणसंस्था यांच्या-तील उणीवा दोप दाखविण्याचा सपाटा चालविलाच होता. परंतु त्यावरोवरच पाश्चिमात्य शिक्षणाचे आधुनिक भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने अनन्य साधारण महत्त्व आहे ही गोष्ट त्यांनी वारंवार प्रतिपादिली आहे. ते म्हणतात—

"ज्या वेळीं हिंदुस्थानांतील लोकांस कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें या प्रश्नाची वाटाघाट होऊन पाश्चिमात्य पद्धतीनें इंग्रजी भाषेंत त्यांस शिक्षण द्यावें असा ठराव झाला, तेव्हां सदर ठराव करणारांची बुद्धि हल्लींच्या लॉर्ड कर्झनसारख्या अधि-काऱ्याप्रमाणें कोती व संकुचित नव्हती ही गोष्ट त्यांच्या तत्कालीन लेखांवरून सिद्ध होत आहे. इंग्रजी इतिहास, इंग्रजी वाङमय, इंग्रजी शास्त्रें, इंग्रजी हुन्नर वगैरे विद्या कोणाहि विद्यार्थ्यांचें मन विकसित करून त्याच्या आंगांत व मनांत हुरूप, देशा-भिमान वगैरे सद्‌गुण उत्पन्न करण्यास लायक आहेत यावद्दलहि वाद नाही. बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास हिंदुस्थानांतील न्यायव्याकरणादि प्राचीन शास्त्रें किती जरी उपयोगी असलीं तरी देशाभिमान, राज्यव्यवस्था, राजनीति, देशाची नैतिक आणि सांपत्तिक अभिवृद्धी, राष्ट्राराष्ट्रांचा परस्पर संबंध वगैरे देशाचा उत्कर्ष होण्यास ज्या विषयांचें ज्ञान लागतें त्या विपयांचें शिक्षण या **आमच्या जुन्या शाब्दिक शास्त्रांपासून मिळत नाहीं, आणि मिळणेंहि शक्य नाहीं.** पाश्चिमात्य राष्ट्रांनीं देशाभिवृद्धीस उपयोगी पडणारीं हीं शास्त्रें व हे विपय नवीन सिद्ध केलेले आहेत, आणि या पाश्चिमात्य राष्ट्रांचा एकंदर इतिहास पाहिला तर त्यांच्या वाङमयांत किंवा शिक्षणक्रमांत याच विपयांत प्राधान्य दिलेलें आढळून येतें; अर्थात् जो जो मनुष्य पाश्चिमात्य किंवा इंग्रजी विद्या अगर शास्त्रें सांगोपांग शिकतो त्याचें मन पाश्चिमात्य देशांत स्वदेशाभिमानाच्या किंवा स्वदेशाभिवृद्धीच्या ज्या कल्पना आहेत त्यांनीं भरून गेलेंच पाहिजे. किंवहुना अशा कल्पनांनीं त्यांचें डोकें जर वेडावून गेलें नाहीं तर पाश्चिमात्य शिक्षणाचा एक तर त्याच्या मनावर संस्कार झाला नाहीं किंवा त्यांस तें पचनीं पडण्याइतकी त्याची योग्यता नाहीं असें म्हणावें लागेल. वाघिणीचें दूध खरें, पण तें पचलें पाहिजे, आणि असे कांहीं लोक असूं शकतील कीं, या दुधानें त्यांस पुष्टी न येतां रेचच होऊं लागतील. परंतु अशा प्रकारचे दुर्बल लोक फार कमी असणार. हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गानें आज हजारों वर्षे अनेक शास्त्रांच्या गूढ तत्त्वांशीं व प्रमेयांशीं आपलीं डोकीं घांसून आपल्या वुद्धीस तीव्रतेचा इतका दृढ संस्कार दिलेला आहे कीं, हा एक

त्यांच्या आंगचा आनुवंशिक गुणच बनलेला आहे. अशा लोकांस पाश्चिमात्य शिक्षण पचनीं पडणार नाहीं हें म्हणणें असंभवनीय होय. वर सांगितल्याप्रमाणें एखादा दुसरा लेचापेचा निपजेल; पण एकंदर हिंदुस्थानांतील लोक पाश्चिमात्य शिक्षणांतील सार व विचार आपल्या आंगीं मुरूं देऊन त्याप्रमाणें आचरण करण्यास समर्थ होणार नाहींत असें मानणें किंवा समजणें हें असमंजसपणाचें लक्षण होय. जपानी लोक आमच्यापेक्षां कांही अधिक बुद्धिवान नाहींत, आणि त्यांस जर पाश्चिमात्य विद्या पचनीं पडली तर ती हिंदुस्थानांतील लोकांस पचनीं पडणार नाहीं असें म्हणण्यास आधार कोणता? ज्या सद्गृहस्थांनीं हिंदुस्थानांतील लोकांस पाश्चिमात्य शिक्षण देण्याचा प्रथम ठराव केला त्यांच्या डोक्यांत या कल्पना आल्या नव्हत्या असें नाहीं. हिंदुस्थानांतील बुद्धिमान लोकांस न्याय–व्याकरण–वेदान्तांच्या खटपटींतच ठेवून इंग्रजांनीं राज्य चालवावें, किंवा इंग्रजांना ज्या नवीन विद्या येत आहेत त्या शिकवून प्रजेस हुषार करावें हा त्या वेळच्या मुत्सद्यापुढें एक मोठा प्रश्न होता. कित्येकांनीं तेव्हां असे आक्षेप घेतले होते कीं, इंग्रजी इतिहास, इंग्रजी शास्त्रें, इंग्रजी राज्यपद्धत, इंग्रजी वाङ्मय यांची हिंदुस्थानांतील लोकांस एकदां ओळख झाली म्हणजे माणसाच्या रक्तास चटावलेल्या वाघाप्रमाणें हिंदी लोक स्वातंत्र्याचे, स्वतंत्र संस्थांचे, आणि सांपत्तिक वैभवाचे भोक्ते बनतील, व असें झालें म्हणजे स्वार्थाकरितां हिंदुस्थानांत आलेल्या इंग्रज लोकांच्या साम्राज्यास धक्का बसेल. ही शंका कांहीं खोटी नव्हती. कारण विद्या आणि शिक्षण ह्या दोन शक्तीच अशा आहेत कीं, बुद्धिवान् माणसांस त्यांच्यायोगें वाटेल तें सामर्थ्य येऊ शकतें. स्वतंत्रतेकरतां लढणाऱ्या लोकांचा इतिहास वाचून आपणहि स्वतंत्रतेकरतां धडपड करावी असें ज्यास वाटणार नाहीं तो विद्यार्थी नव्हे, पशू होय. विद्यादेवीची श्रद्धेनें आणि विश्वासानें जो उपासना करील त्यास ती देवी प्रसन्न झालीच पाहिजे, आणि अशा रीतीनें सदर देवीची प्रसन्नता करून घेणें हें प्रत्येक विद्यार्थ्याचें काम आहे. कळणें, आणि उमजणें, पोटांत जाणें आणि मुरणें यांमध्यें जो भेद आहे तो हाच होय. अर्थात् ज्या इंग्रजी मुत्सद्यांनीं पाश्चिमात्य शिक्षण प्रथमतः या देशांत सुरूं केलें त्यांना ही भीति होतीच कीं, हें वाघिणीचें दूध पिऊन हिंदुस्थानांतील लोक केव्हांना केव्हां तरी तय्यार होऊन स्वराज्याचे हक्क मागूं लागतील. परंतु या भीतीला न जुमानतां त्या वेळच्या मुत्सद्यांनीं ह्या प्रश्नाचें असें उत्तर दिलें कीं, ' इंग्रजी शिक्षणानें हिंदी लोक स्वातंत्र्याकरितां खटपट करणारे झाले तरी बेहत्तर आहे; पण त्यांना अज्ञानांत ठेऊन राज्य करणें बरोबर नाहीं. यदाकदाचित् यांच्या स्वातंत्र्यप्रियतेनें हिंदुस्थानांतून इंग्रजी राज्य समग्र नष्ट झालें, तरी आपसांत

फाटाफूट होऊन मागसलेल्या एका मोठ्या देशास स्वतंत्र देशाच्या योग्यतेस आणल्याचें श्रेय तरी इंग्लंड देशास व इंग्रजी राज्यास मिळेल !' हे विचार खरोखरच उदात्त आणि श्रेष्ठ होते. आरंभीं आरंभी तर कित्येक मुत्सद्यांनीं असेंहि म्हटलें होतें कीं, 'तुम्हांस आम्ही जें इंग्रजी शिक्षण देत आहोंत तें तुमच्या अंगीं राज्य करण्याची योग्यता यावी म्हणून देत आहों आणि ती आली म्हणजे आम्ही येथील आपले चंबूगवाळें आटपून स्वदेशास परत जाऊं.' ज्या लोकांनीं अशा हेतूनें व बुद्धीनें हिंदुस्थानांतील लोकांस पाश्चिमात्य शिक्षण देण्याची सुरवात केली त्यांच्या सद्धेतूची आम्हीं मोठ्या आनंदानें तारीफ करतों. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, हा सद्धेतु, ही सद्बुद्धि किंवा वासना शेवटपर्यंत टिकली नाही."

पाश्चात्य शिक्षण अत्यंत मोलाचे आहे, आमच्या परंपरागत प्राचीन विद्यांचा भावी प्रगत हिंदुस्थानाला विशेषसा उपयोग नाही, हा विचार टिळकांपूर्वी लोकहितवादी, जोतिबा फुले इत्यादी धर्मसुधारक व समाजसुधारक यांनी पाऊणशे वर्षेपर्यंत जोराने मांडला. टिळकांना नक्की माहीत होते की, अशा जोरदार नव्या शिक्षणात परंपरागत भारतीय समाजसंस्थेचा व संस्कृतीचा कायापालट होईल. तो त्यांना अत्यंत इष्ट वाटत होता. आधुनिक पश्चिमी संस्कृतीचे मानवी व्यक्ति-स्वातंत्र्य हे मूलभूत मूल्य आहे व त्या मूल्याच्या अधिष्ठानावरच सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य विकास पावेल व ते तसे पावावे हेहि त्यांना इष्ट व उत्कृष्ट ध्येय म्हणून मान्य होते.

परंतु पाश्चिमात्य शिक्षणाची इंग्रज सरकारनी भारतात केलेली स्थापना होऊन पन्नास वर्षे ("खरें विद्यापीठ कोणतें" दि. २५ फेब्रु. १८९६, पृ. ३२०) झाली तरी ते इष्ट दिशेने फलद्रुप होत नाहीत हे पाहून त्यांची फार निराशा झाली. ते म्हणतात की, "नेमकें जें घडायला पाहिजे तेंच घडत नाहीं असें दिसून आलें. दुधानें ज्याप्रमाणें ताकाचें अनुकरण करावें त्याप्रमाणें युरोपियन विद्यापीठांचें आमच्या देशातील विद्यापीठें हें अनुकरण होय. या संस्था जशा असाव्यात तशा नसल्यामुळें कोणत्याहि शास्त्राचा शोधक बुद्धीनें आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ अलीकडे पैदा होत नाहीत. नवीन शोध करण्याइतकी बुद्धि अथवा योग्यता आमच्या अंगांत नाहीं असें नाहीं. ज्या देशांत पाणिनि, कणाद, शंकराचार्य, भास्कराचार्य, वगैरे विद्वान पूर्वकालीं होऊन गेले, त्यांत सध्यां पास्चूर, एडिसन, मिल्ल वगैरे गृहस्थांप्रमाणें विद्वान कां निपजू नयेत याचें खरें कारण शोधून काढून त्याचा प्रतिकार करणें हें प्रत्येक विद्यावृद्धि इच्छिणारांचें कर्तव्य आहे. सुधारलेल्या देशांत विद्यापीठांची व्यवस्था गुरूंकडे असते. आयुष्य अध्ययन व अध्यापन यांत ते घालवितात त्यामुळें विद्यार्थ्यांचे खरे गुण दोष अथवा अडचणी त्यांना

समजून येतात. गुरूंच्या विद्याभ्यासाचा आणि सद्वर्तनाचा परिणाम शिष्यांच्या मनावर होण्यास गुरुजी खरोखर विद्याव्यसनी असून छात्रवासी वर्गाशी प्रेमभावानें वागणारे असले पाहिजेत, तसला प्रकार आमच्याकडे नाही. मुंबई विद्यापीठ १८५७ सालीं स्थापन झालें. पण तेव्हापासून या संस्थेंतून एकहि जगप्रसिद्ध विद्वान निघू नये हें आश्चर्य नव्हे काय ? तेलंग, रानडे, भांडारकर वगैरे कांहीं विद्वान् यापूर्वी निघाले आहेत. पण त्यांपैकी कांहीं इतर धंद्यांत शिरल्यामुळें शास्त्राभ्यासाच्या कामीं त्यांचा जसा उपयोग व्हावा तसा झालेला नाही. बरेचसे कायद्याच्या अभ्यासांत गढून गेले आहेत. पण त्याचा उपयोग काय ? ज्यानें समरांगणीं अश्वारूढ होऊन दोन हात करावयाचे त्यानें आपलें कौशल्य घरांत वायकोच्या नथेंतून तीर मारण्यांत खर्च करावें तसा प्रस्तुतचा प्रकार आहे. आमच्या विद्यापीठांत खरे विद्याव्यासंगी गुरू व उपगुरू नाहीत. पदव्यांचे शिक्के ठोकण्यापलीकडे कांहीं काम चालत नाहीं. विद्यापीठें परीक्षा घेणारी रजिस्टर्ड कंपनी झाली आहे असें म्हटलें तरी चालेल.

इंग्रजी शिक्षण एकांगी आहे व तें फक्त सरकारी नोकरीस लागणारे अवश्य गुणच लोकांच्या अंगांत आणण्याकरिता योजले आहे. या शिक्षणक्रमांत तयार झालेल्या लोकांना धर्म, नीति, शास्त्रीय शोध, धंदेशिक्षण वगैरे राष्ट्राच्या उत्कर्षास अवश्य लागणाऱ्या ज्ञानाची व कलांची बिलकुल माहिती नसते. ज्यास खरें शिक्षण म्हणतात, अशा प्रकारचें शिक्षण हल्लींच्या संस्थांतून आम्हास बिलकुल मिळत नाहीं. हिंदुस्थानांतील लोक पाश्चात्य विद्येंत, शास्त्रांत किंवा कलात निपुण होऊन त्यांनी सुधारलेल्या राष्ट्रातील विद्वानांबरोबर, धंदेवाल्यांबरोबर किंवा व्यापाऱ्यांबरोबर आपल्या बुद्धिवैभवाने, करामतीने, कौशल्याने किंवा हिंमतीनें टक्कर देण्यास तयार व्हावे अशी आमच्या सरकारची इच्छा नाहीं. सरकारास खालच्या जागा भरण्याकरिता जशा प्रकारचे नोकर लागतात तशा प्रकारचे नोकर तयार करण्याकरिता उच्च प्रतीचेहि शिक्षण द्यावयाचें हें तत्त्व आता बहुतेक गृहीत धरल्यासारखेंच आहे. सरकारी नोकऱ्यांकरिता लागणारे उमेदवार तयार करणाऱ्या टाकसाळी किंवा हमालखाने म्हणजे विद्यापीठें होत असें शब्दानें नाही तरी कृतीनें तरी सरकार स्पष्ट दर्शवीत आहे. सरकार प्रजेस लष्करी शिक्षण स्वतंत्र देशातील राज्यकर्त्यांप्रमाणें देत नाहीं ही बाब सोडली तरी रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, उद्योगधंदे किंवा नानाप्रकारच्या कला शिकविण्याकरिता विद्यार्थी जपान पाठविते त्याप्रमाणे सरकार पाठवीत नाही. अत्यंत थोड्या विद्यार्थ्यांना पाठविण्याचे वरपांगी प्रयत्न करीत असले तरी त्यांची बेताबेतानेच वाढ होण्याबद्दल पहिल्यापासून खबरदारी घेण्यात येते. घरामध्यें शोभेसाठी किंवा चैनीकरिता

कुंड्यांतून लावलेल्या झाडांमध्यें आणि मोठ्या बागेंत वाढणाऱ्या झाडांमध्य ज अंतर आहे तेंच हिंदी व जपानी विद्यार्थ्यांत दिसून येतें.

जपान ४० वर्षांत पुढें येऊन पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पंक्तीस बसतें आणि आम्ही दरवर्षी अधिकाधिक हताश, हतवीर्य आणि परकीयांची ओझी वाहणारे बनत चालली याचा योग्य खुलासा जर कोणांस पाहिजे असेल तर तो "स्वतंत्रता" या एकाच शब्दानें होईल. ("खरें विद्यापीठ कोणतें," "युनिव्हर्सिटया ऊर्फ सरकारी हमालखाने" "जपान आणि हिंदुस्थान," "हें आमचे गुरूच नव्हेत" पृ. ३१९ ते ३५३).

सरकारी शाळांतून व महाविद्यालयातून मिळणारे शिक्षण अपुरे, नेभळे व परावलंबी बनविणारे आहे. हे जाणून खाजगी शिक्षणसंस्था या देशांत निरनिराळ्या प्रांतात लोकांनी स्थापन केल्या होत्या. त्याही शिक्षणसंस्था सरकारी मदत घेतल्याशिवाय नीट चालू शकत नाहीत व भरभराटीस येत नाहीत म्हणून ते लोक सरकारी अनुदान भरपूर घेऊ लागले. त्याचा परिणाम असा झाला की, त्यांच्यावर सरकारने अनेक अटी लादल्या होत्या व त्यामुळे सरकारी शिक्षण व खाजगी शिक्षण यांच्यातील अंतर नाहीसे होऊन खाजगी शिक्षणसंस्थांचा सकस राष्ट्रीय वृत्तीचे व स्वावलंबनाचे शिक्षण देण्याचा हेतूहि विफल झाला होता. म्हणून राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ टिळकांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू झाली. प्रत्येक पुढारलेल्या स्वतंत्र देशातील सरकार आपल्या नागरिकास ज्याप्रकारचे शिक्षण देऊन समर्थ नागरिक निर्माण करते तशाप्रकारचे शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणसंस्था निर्माण करणे हा या चळवळीचा हेतू होता. समर्थ विद्यालयासारख्या संस्था याच उद्देशाने निर्माण झाल्या. ब्रिटिशांच्या कारकीर्दीत नवीन शिक्षण देण्यास प्रारंभ होऊन शंभर वर्षे झाली तरी लोकांना आगकाड्या कशा कराव्या हे सुद्धा शिकविले नाही, आगगाड्या तर दूरच राहिल्या; देशांत भरपूर ऊस पिकूनहि स्वदेशी साखरेचे धंदे बुडले व परदेशी कोट्यावधि रुपयांची साखर या देशांत येऊ लागली. कापड, तेल व चामड्याचा धंदा सुद्धा बुडाला; टाचणी, सुई व शिवण्याचे यंत्रसुद्धा परदेशीच लोकांना घ्यावे लागे. अनेक विज्ञाने, शास्त्रे, उद्योगधंदे, व्यापार व कला यामध्ये निष्णात व पारंगत होऊन स्वपराक्रमाने व बुद्धिवैभवाने पुढे येणारी व नोकऱ्यांचा शोध न करणारी माणसे ज्या शिक्षणाने तयार होतील, देशाचे राजकीय, औद्योगिक, सामाजिक व बौद्धिक वैभव राखण्यास व वाढविण्यास समर्थ तरुण पिढी ज्या शिक्षणाने तयार होईल त्यासच राष्ट्रीय शिक्षण म्हणता येईल असे टिळकांनी प्रतिपादिले. स्वावलंबनाने स्वतःच्या पायावर उभी राहणारी

औद्योगिक प्रगतीची धुरा वाहणारी, व देशाभिमानी तरूण पिढी तयार करणे असा राष्ट्रीय शिक्षणाचा स्पष्ट उद्देश राष्ट्रीय शिक्षणाच्या नेत्यांनी देशापुढे मांडला. ही चळवळ वाढीस लागली. टिळक अंतर्धान पावल्यानंतर गांधीयुग सुरू झाले. ही चळवळ त्या युगात अधिक जोमाने वाढली. राष्ट्रीय शिक्षणाची विद्यापीठेहि निर्माण झाली. इ. स. १९२० च्या असहकारितेच्या चळवळीत सरकारी, माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सरकारी विद्यालयांचा बहिष्कारहि सुरू झाला. त्याप्रसंगीं शेंकडो सरकारी व निम सरकारी किंवा तथाकंथित खाजगी विद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थीहि राष्ट्रीय शिक्षणसंस्थांना येऊन मिळाले. १० वर्षांत याच राष्ट्रीय शिक्षणसंस्था १९३० च्या सुमारास सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाची केंद्रस्थानें बनली.

## निःशस्त्रक्रांतिवादी लो. टिळक व सत्याग्रही महात्मा गांधी

लो. टिळकांच्या राजकीय जीवनाचे व विचारांचे राजकीय सुधारणावाद व निःशस्त्रक्रांतिवाद असे दोन कालखंड पडतात. पहिला, वरिष्ठ ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या उदारमतवादी विचारांवरील बिश्वासाचा व दुसरा अविश्वासाचा म्हणजे ब्रिटिशसाम्राज्यशाहीच्या दडपशाही व पिळवणुकीच्या धोरणाचा प्रतिकारच केला पाहिजे या निश्चित जाणिवेचा. पहिल्या कालखंडात टिळकांची अशी धारणा होती की वरिष्ठ ब्रिटिश राज्यकर्त्यांना जनतेच्या अडचणींची, दुःखांची व यातनांची जाणीव सतत देत राहिल्याने हळू हळू राज्यकारभार लोकमतानुवर्ती होऊ लागेल. कारण मूळ शासनशक्तीचे अधिष्ठान ब्रिटिशांची संसद आहे व ती संसद उदारमतवादावर आधारलेली आहे. त्यांच्या पहिल्या धारणेतील बदल १९०२ पासून स्पष्ट झाला. त्यांनी साम्राज्यशाहीची मीमांसा (१६–१०–१९०२) तेव्हा मांडली. त्यावरून त्यांचा ब्रिटिश राजनीतीवरचा विश्वास पार उडाला, हे स्पष्ट झाले. स्वगृही उदारमतवाद व उलट साम्राज्यांत दडपशाही व निर्घृण पिळवणूक, हेच ब्रिटिशांचे साम्राज्यशाही राजकारण होय; सर्व साम्राज्यशाह्यांचे हेच राजकारण होय, हे निश्चित झाले. त्याकरिता काँग्रेसच्या द्वारे राष्ट्रीय ऐक्य निर्माण करणे, जनतेचा निःशस्त्र प्रतिकाराकरिता उठाव करणे, जुलमी कायद्याचा प्रतिकार करणे व स्वराज्याचे देशव्यापी आंदोलन उभारणे याशिवाय अन्य उपाय नाही, अशी त्यांची खात्री झाली. हीच भारतीय स्वातंत्र्याच्या जनताप्रणीत आंदोलनाची नांदी होय. वंगभंगाच्या चळवळीच्या निमित्ताने ह्या आंदोलनास प्रारंभ झाला. ब्रिटिश साम्राज्यशाहीने आपले आसन स्थिर करण्याकरिता व हिंदु-मुसलमानात वैमनस्य निर्माण करण्याकरिता "फोडा व झोडा" हे तत्त्व अमलात आणले व बंगालची

फाळणी केली. त्यातून वंगभंगाची चळवळ फोफावली. ती चळवळ दडपण्याकरिता ब्रिटिश राज्यकर्त्यांनी दडपशाहीचे नवे नवे कायदे केले व त्याविरुद्ध असंतोषाची लाट निर्माण करणाऱ्या टिळकांसारख्या नेत्यांवर अधिक बंधने घालण्यात आली. त्यामुळे कायद्याचे अतिक्रमण टाळणे अशक्य होत गेले. राज्यकर्त्यांकडे दाद लागत नाही म्हणून जनजागृतीच्या दबावाने राज्यकर्त्यांना वठणीवर आणण्याचे धोरण हाच एक मार्ग टिळकांसारख्या काही नेत्यांना दिसू लागला.

## सनदशीर व कायदेशीर यांतील भेद

या संदर्भात भारताच्या राजकीय नेत्यांमध्ये एक अत्यंत महत्त्वाचा वाद उत्पन्न झाला. सनदशीर ( Constitutional ) उपायांनीच आपण राजकीय सुधारणा घडवून आणू शकू, याशिवाय दुसरा मार्ग उपलब्ध होऊ शकत नाही; कारण ब्रिटिश साम्राज्याची शक्ती अपरंपार आहे, कायद्याच्या बाहेर पाऊल टाकणे अयोग्य आहे, या मताचा पुरस्कार गोखले व त्यांचे नेमस्त अनुयायी करू लागले. टिळकांनी अधिक खोलात जाऊन राज्यशास्त्रदृष्टचा या मताचे खंडन पद्धतशीर रीतीने केले. त्यांनी पहिला सवाल असा केला की सनदशीर ( Constitutional ) याचा अर्थ काय ? सनदशीर म्हणजे कायदेशीर, असा गोखले करतात. सनदशीर व कायदेशीर (legal) यांच्यात फार महत्त्वाचा फरक आहे, तो गोखले लक्षात घेत नाहीत. कोणत्याहि जनतेच्या मूलभूत हक्कांची सनद अस्तित्वात नसताना राज्यकर्ते आपल्या सोयीप्रमाणे कायदे करतात तेव्हा तेथील कायदा अनियंत्रित राज्यसत्तेचे लक्षण ठरते. त्या कायद्याचा भंग लोकांनी केला तर लोकांचे हे वर्तन असनदशीर म्हणता येणार नाही. कायद्याचे धोरण ठरविण्याकरिता सनद ज्या राज्यपद्धतीत लोकांना मिळालेली असते तेथीलच कायदा हा पालनीय ठरतो. भारतीय जनतेला अशी सनद मिळालेली नाही. सनदशीरपणाचे हे तत्त्व किंवा हा अर्थ जॉन स्टुअर्ट मिल यांच्या "ऑन् लिबर्टी" या ग्रंथावरून टिळकांनी घेतला. जॉन स्टुअर्ट मिल यांनी सनदशीर याचा अर्थ या पुस्तकाच्या प्रस्तावनेत विशद करून सांगितला आहे. या चर्चेत गोखलेपेक्षा टिळक हे अधिक सरस व मूलगामी राज्यशास्त्रज्ञ ठरले. या चर्चेच्या संदर्भात "सनदशीर" व "कायदेशीर" ( केसरी : ५ मार्च १९०७ ) या लेखात मौलिक रीतीने या मुद्याचे विवेचन करतांना टिळक म्हणतात– "आजमितीस हिंदुस्थानातील इंग्रजी साम्राज्याची घटना जरी व्यवस्थेशीर असली तरी इतिहासांतील रूढ अर्थाप्रमाणें ती "सनदशीर" नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. गव्हर्नर जनरल यांचे अधिकार पार्लमेंटच्या कायद्यांनी नियमित आहेत पण या बाबतींत प्रजेच्या हातांत

कोणताहि अधिकार नसल्यानें "सनदशीर" किंवा "कॉन्स्टिटयूशनल" हा अर्थ आपल्या राज्यव्यवस्थेला लावता येत नाही. आम्ही जे भांडत आहो किंवा धडपड करीत आहो, ती राज्यकर्त्यांकडून सनदशीर पद्धत प्राप्त करून घेण्याकरता होय आणि हा हक्क राज्यकर्त्यांकडून मिळवावयाचा आहे. तो मिळविण्यासाठीच हा प्रयत्न आहे. त्याला सनदशीर चळवळ असे नाव देणें चुकीचे होईल. सनदशीर शब्द सोडून दिला तर आमचे प्रयत्न कायदेशीर आहेत कीं बेकायदेशीर आहेत एवढाच प्रश्न शिल्लक राहतो. हल्लींच्या स्थितींत कायदा करणें आमच्या हातचे नाही. तेव्हा आमचे प्रयत्न इतिहासास, मामुली वहिवाटीस, प्रजेच्या नैसर्गिक हक्कांस धरून नीतिदृष्टचा जरी योग्य असले तरी ते कायदेशीर किंवा बेकायदेशीर ठरविणें ही केवळ सरकारच्या इच्छेची गोष्ट आहे. आमचे योग्य प्रयत्नहि एकवेळ यांच्या कायद्यानें बेकायदेशीर होऊ शकतील, अशा वेळीं आमचे प्रयत्न बेकायदेशीर आहेत असें म्हणणें भाग पडेल. न्याय, नीति आणि ऐतिहासिक परंपरा किंवा प्रगती यांचा आधार आपणांस आहे कीं नाही एवढेंच नीट पाहिलें पाहिजे आणि लोकांचा आम्हास पाठिंबा असला म्हणजे मग आमचे प्रयत्न कायद्याच्या मर्यादेंत येतात कीं बाहेर पडतात याची आम्ही पर्वा करणे उपयोगी नाहीं, कारण कायदा सरकारच्या हातांत आहे. आता एवढेंच खरें कीं कायदा मोडला गेला तर शिक्षा ही होणार. परंतु कायदा जर जुलमी असेल तर ही शिक्षा सोसूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे; एरवी इलाज नाही. नीति आणि कायदा यांची जेव्हा फारकत होते तेव्हा असेच प्रकार घडावयाचे."

अनेक राजकीय विचारवंतांकडून भारताच्या स्वातंत्र्यआंदोलनाची मीमांसा करताना अनेक वेळा असे विधान केले जाते की भारताचा स्वराज्याच्या मागणीचा अर्थ परकीय राज्य नको, परकीय राज्य खराब व जुलमी आहे, ते नष्ट झाले पाहिजे एवढाच नकारात्मक होता. निषेधात्मक भावनेवर आधारलेली स्वराज्याची कल्पना होती. परंतु ही मीमांसा चुकीची आहे. टिळक म्हणतात की, स्वराज्य म्हणजे देशी लोकांचे राज्य एवढाच अर्थ नव्हे. 'स्व' म्हणजे 'आपला' हा मोघम अर्थ आहे. "जेव्हा प्रजा आणि राजा दोघेहि एकाच धर्मातले, एकाच देशातले, एकाच जातीचे आणि एक प्रकारच्या हिताहितसंबंधाचे असणारे असून राजा प्रजेच्या हिताबद्दल नेहमी तत्पर व दक्ष असतो असे जेव्हा घडते, तेव्हा प्रजेस आपल्यावरील राज्य स्वराज्यच आहे असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे 'रामराज्य' अशाच प्रकारचें स्वराज्य होतें. पण राजे लोक अहंकारानें किंवा अन्य कारणांनी अंध होऊन प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करू लागले किंवा जुलमी

झाले म्हणजे तें राज्य लोकांना नकोसें होते, स्वधर्मातील किंवा स्वदेशांतील राजा असताहि त्याचे राज्य लोकांस नकोसे होते. पेशवाईच्या अखेरीस शेवटच्या बाजीरावाचें राज्य अव्यवस्थित व दुःखकारक होतें. म्हणून खरें स्वराज्य स्वतःच्या राजाचें राज्य नव्हे तर स्वराज्य म्हणजे प्रजेच्या तंत्रानें चाललेलें राज्य होय." अशा अर्थाचे विचार टिळकांनी मांडले. ते वारंवार असे स्पष्ट प्रतिपादन करतात की "ज्या राज्याचा कारभार प्रजेच्या किंवा प्रजापक्षाच्या तंत्रानें चालतो तेंच खरें स्वराज्य होय... नुसता स्वदेशी राजा असला म्हणजे कांहीं सर्व कार्यभाग होत नाहीं... राजा स्वदेशस्थ की परदेशस्थ या प्रश्नापेक्षा प्रजेच्या हातांत सत्ता किती हाच प्रश्न महत्त्वाचा होऊन बसला आहे." (स्वराज्य आणि सुराज्य ९–४–१९०७)

"इंग्रजी सरकारची राज्यव्यवस्था केवळ राज्यकर्त्या व थोड्या अधिकारी वर्गाच्या तंत्रानें चालत असल्यामुळें आम्हास सुखकर किंवा फायदेशीर होणार नाही आणि स्वावलंबनाची पद्धती कायम रहावी तर तसें होणें अशक्य नाही. राज्यांत शिस्त ज्याप्रमाणें अपेक्षित असते ती त्याप्रमाणें इंग्रजी राज्यांत नाहीं व त्यामुळें इंग्रजी राज्याच्या बेशिस्तीनें व कायद्यानें प्रजा चोहोकडून अडून गेली आहे. राज्यपद्धती नसती शिस्तवान असल्यानें कोणतेंहि राज्य लोकांना सुखकारक होते, व लोकांच्या तंत्राने चालले म्हणजे तें त्यांना हितकर होते, या दृष्टीने विचार केला म्हणजे प्रजेच्या तंत्रानें चालावें असें म्हटलें पाहिजे. जेथें सल्लामसलतीनें राज्यकारभार चालत असतो तेथें राजा किंवा अधिकारी परदेशस्थ असले तरी, स्वराज्य आणि सुराज्य ह्या दोहोंचे सुख लोकांना प्राप्त होण्यास अडचण पडणार नाहीं, सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे जें आपल्यास हितकारक वाटतें त्या दृष्टीने राज्यकारभार चालविण्याकरिता आपणांस सर्वांना अधिकार असावा ही होय आणि खरें स्वराज्य हेंच होय. 'स्व' म्हणजे ज्याचा तो, किंवा लोक अथवा एकंदर प्रजा; आणि त्यांचे म्हणजे त्यांच्या सल्ल्यानें चालणारें जें राज्य तें स्वराज्य. अशा स्थितींत राजा स्वदेशी असला तर चांगलेच, परदेशस्थ असला तरी फारशी हानी होत नाही. असले राज्य व्यवस्थित व शिस्तवार...., सुराज्यच असावयाचे, सुराज्यानें स्वराज्याची वाण भरून येत नाही." परकीय राज्य जुलमी आहे व बेजबाबदार आहे. स्वराज्याशिवाय आधुनिक जगाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता उन्नती करू शकणार नाही; या विचारावर टिळक येऊन ठेपले. हा त्यांचा वैचारिक ध्येयाचा दुसरा टप्पा होय व तोच भारताच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा प्रथम कालखंड होय.

या कालखंडात प्रवेश केल्यानंतर भारताच्या मानवी जीवनाचा आधुनिक रीतीने सर्वांगीण विकास करावयाचा आहे आणि त्यासाठी पाश्चात्य परचक्राच्या

शृंखला तोडल्या पाहिजेत अशा निर्धारावर टिळक येऊन ठेपले. त्यांचे लेखन अधिक धारदार होऊ लागले व लेख तळपू लागले. स्वराज्याचा प्रथमपासून अखेरपर्यन्तचा मार्ग त्यांच्या क्रांतदर्शी दृष्टीच्या समोर होता.

## टिळक गांधीमार्गाचे पहिले उपदेशक

गांधीजी हे स्वतःस गोखल्यांचे शिष्य म्हणत असले, व वैयक्तिक संबंधामुळे हे शिष्यत्वाचे नाते जरी निर्माण झाले असले तरी राष्ट्रीय आंदोलनाच्या संदर्भात असेच म्हणावे लागते की गांधी हे एका अर्थी टिळकांचे अनुयायी होते. कारण गांधी–मार्ग हा टिळकांना दिसला होता. यावर कोणी असे म्हणेल की टिळक हे सशस्त्र क्रांतीच्या पाठीशी उभे होते हे जर सत्य असेल तर गांधी त्यांचे अनुयायी होते असे कसे म्हणता येईल ? सशस्त्र क्रांतीचा मार्ग हा अव्यवहार्य मार्ग आहे असे टिळकांनी वारंवार म्हटले आहे. सशस्त्र क्रांतीचा मार्ग आक्रमणाऱ्या देशभक्तांबद्दल टिळकांना नितांत सहानुभूति वाटत होती हे स्पष्ट असले तरी टिळक हे आपले विचार प्रामाणिकपणे मांडीत होते असे जे मानतात त्यांना टिळक हे सशस्त्र क्रांतीच्या मागे नव्हते याबद्दल संशय बाळगण्यास कारण नाही. टिळक हे एका-अर्थी गांधी-मार्गाचे पहिले उपदेशक होते असेहि म्हणता येते. टिळकांची सनदशीर व कायदेशीर या संबंधांतील मौलिक मीमांसा लक्षात घेतली असता याबद्दल शंका रहात नाही. १९०७ साली जानेवारी २ या दिवशी कलकत्त्याच्या कॉलेज स्क्वेअरमध्ये टिळकांनी जे व्याख्यान दिले त्यात जहाल व नेमस्त ह्या दोन्ही पक्षांचा निर्देश करून दोन्ही मधला फरक स्पष्ट करून दाखविला. जहाल हे स्वावलंबनपूर्वक स्वराज्यासाठी लढावे असे म्हणतात तर नेमस्त हे ब्रिटिशांच्या भल्यासाठी स्वराज्याची भिक्षा मागणारे आहेत, असा दोन्हीतला फरक त्यांनी स्पष्ट केला. ध्येय एक परंतु कार्यक्रम व मार्ग मात्र निरनिराळे.

या संदर्भात ते कलकत्त्याच्या भाषणात म्हणतात की, "तुमच्यात सशस्त्र प्रतिकाराची शक्ती नाही. हे जरी खरे असले तरी तुमच्यात बहिष्कार आणि असहकार याची शक्ती खासच आहे. इंग्रजी राज्याच्या विरुद्ध तुम्ही ही शक्ती वापरावयास नको काय ? आपण बहिष्कार घालू शकतो. आपल्या राज्याच्या सरहद्दीबाहेर रक्त आणि पैसा वापरला जाणार नाही अशी तजवीज करू शकतो. आपले न्यायासन योग्य वेळी निर्माण करू शकतो आणि अखेरीस करबंदीहि करू शकतो. स्वदेशी आंदोलनाबरोबर बहिष्कार हा मात्र परदेशी माल विकणाऱ्या व घेणाऱ्या लोकांवर जबरदस्ती करण्याचा आहे. राजद्रोहाचा कायदा आपण सविनय कायदेभंगाने मोडू शकतो. याचे परिणाम काय होतील याची पर्वा करू नये.

तीन–चार हजार लोकांना कारागृहामध्ये राहाण्यास प्रवृत्त करून नोकरशाहीची स्थिती केविलवाणी करू शकतो. ही क्रांतीची सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. ही क्रांती **रक्तहीन क्रांती** होय. या क्रांतीमध्ये रक्त सांडले जाणार नाही असे नाही. जनतेला यातना होणार नाही असे नाही. यातना सहन करण्याची तयारी करावी. या यातना भयंकर असतील याची खूणगाठ बांधा ! !" हे गंभीर विचार त्यांनी मोठया हिंमतीने आणि भीष्म प्रतिज्ञेने आमच्या समोर मांडले, असे एका राजकीय विचारवंताने लिहून ठेवले आहे. याशिवाय दुसरे प्रमाण असे की, टिळकांनी गांधीशिष्या सौ. अवंतिकाबाई यांनी लिहिलेल्या गांधीचरित्राच्या प्रस्तावनेत म. गांधींच्या सत्याग्रहाचे तात्त्विक रहस्य मांडून सत्याग्रहमार्गाचे समर्थन केले आहे.

टिळकांचे टीकाकार यासंबंधी असा आक्षेप घेतात की त्यावेळी टिळक हे जर अशा निर्वाणीच्या लढयाचे उद्गाते होते तर मग त्यांनी १९०८ सालच्या राजद्रोहाच्या खटल्यामध्ये मी राजद्रोह केला नाही, तो सिद्ध होऊ शकत नाही, अशा तऱ्हेचा पवित्रा का घेतला ? त्याचप्रमाणे 'मी जे लिहीन ते कायद्याच्या सीमेत राहूनच लिहीन' असे वारंवार का लिहितात ? टिळक मुत्सद्दी होते. त्यांना जनतेला पाठीशी ओढावयाचे होते. याकरिता त्यांना कायद्याच्या मर्यादेत लेखनस्वातंत्र्याचा उपयोग करावयाचा होता व तो उपयोग उत्तम रीतीने त्यांनी करून घेतला, ह्याचे प्रत्यंतर त्यांच्या दोन्ही कारागृहवासाच्या शिक्षेनंतर मिळाले. टिळक हे त्यावेळच्या कालखंडाच्या महान् जनशक्तीचे प्रतिनिधी होते. त्यांच्या विचाराच्या प्रभावाने लोक कारागृहाच्या दरवाजापर्यंत येऊन ठेपले, परंतु कारागृहाच्या दरवाजाला धक्का मारण्याइतके आत्मबल तोपर्यंत त्यांना प्राप्त झाले नव्हते. टिळकांसारखे फार थोडेच कारागृहाच्या भिंतीआड विजनवासी होऊन यातना सहन करीत होते. एका अर्थाने असे म्हणता येईल की आम्ही तुमच्या मागून येण्यास तयार आहो असे आश्वासन जनतेकडून टिळकांना न मिळाल्यामुळे टिळक कायद्याच्या मर्यादेत राहूनच जनजागृतीचे कार्य करीत राहिले. हे आश्वासन गांधीजींना मिळाले म्हणून ते पुढे गेले. तात्पर्य, टिळकयुगातूनच गांधीयुगाचा प्रारंभ झाला.

## टिळकांच्या साहित्याची वाङ्मयीन महात्मता

कै. बा. सी. मर्ढेकर हे महाराष्ट्रातील नवकाव्य प्रणालीचे मुख्य प्रवर्तक, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सौंदर्यतत्त्वज्ञ व समीक्षक होत. यांनी काव्यसमीक्षेच्या निकषांमध्ये वाङ्मयीन महात्मता हा काव्याचा एक मुख्य निकष सांगितला आहे.

अनुक्रम ७५७३५ वि: निबंध (५१)
क्रमांक २११८ नों: दि: २१।३।७१

हा निकष म्हणजे अनुभूतीची शुद्ध निष्ठा होय. वैचारिक साहित्यालासुद्धा कलात्मकता किंवा सौंदर्य असते हे मर्ढेकरांना मान्य असो वा नसो परंतु थोर प्रतिभावंत इंग्लिश नवकवि टी. एस्. इलियट व अनेक पश्चिमी काव्यसमीक्षक हे वैचारिक साहित्यालाहि कलात्मकता व अप्रतिम सौंदर्य असू शकते असे मानतात. बायबल, स्पिनोझाचे नीतिशास्त्र किंवा तत्त्वज्ञ ब्रॅडले याचे ग्रंथ अशा वैचारिक कलात्मक साहित्याचे उत्तम नमुने म्हणून ते उद्धृत करतात. टिळकांच्याहि केसरीतील लेखसंभाराला व गीतारहस्याला कलात्मक साहित्याची पदवी प्राप्त झाली आहे. हे नाकारणे म्हणजे प्रज्ञेचे सौंदर्य नाकारणे होय. बायबलप्रमाणेच कुराणाला, ऋग्वेदातील उषासूक्तांना किंवा हिरण्यगर्भ, त्वष्टा, नासदासीय इत्यादि सूक्तांना व प्राचीन उपनिषदांना प्रज्ञेचे सौंदर्य आले. विशेष म्हणजे कुराणाला संगीताची सुस्वरताहि लाभली आहे. या सर्व वर उद्धृत केलेल्या साहित्यामध्ये जे क्रांतदर्शी प्रज्ञेचे किरण पसरलेले आहेत त्यांच्या योगाने सात्त्विक व श्रद्धाशील मानवी हृदयातील अनंत काळ साठलेले तम क्षणात विरून त्या हृदयाला विलक्षण दिव्य प्रकाशाचा अनुभव येतो व "तमसो मा ज्योतिर्गमय" ही उत्कंठित मानवी हृदयाची अनादि काळची प्रार्थना सफल होते, अमरत्वाचा लाभ होऊन मृत्यूचे भय लुप्त होते, अमृतमय जीवनाचा आविष्कार होतो, सत्याचा अनंत मार्ग आक्रमिण्याचे अदम्य धैर्य निपजते. उपनिषदे, भगवद्गीता, बायबल, कुराण यांच्यायोगाने अनेक प्राचीन जमातीतील व अनेक राष्ट्रांतील लोकांना दिव्य जीवनाचा साक्षात्कार घडून आला; याचे कारण त्यातील वाङ्मयीन महात्मता होय.

टिळक व गांधी यांच्या लेखनांतहि ही वाङ्मयीन महात्मता प्रतिबिंबित झाली आहे. गांधींच्या लेखनात जी निष्ठा व आत्मप्रत्यय दिसतो तोच टिळकांच्याहि लेखनात दिसतो. आत्मप्रत्यय व प्रतिभा यांच्या संगमात साहित्यसौंदर्य निर्माण होते. हा संगम टिळकांच्या लेखनशैलीचे मूळ रहस्य आहे. गांधींच्या लेखनात स्वभावोक्ति व प्रसाद आहे तर टिळकांच्या लेखनात स्वभावोक्ति, प्रसाद व ओज आहे. तत्त्वज्ञान व गणित यावरील प्रभुत्वामुळे टिळकांच्या लेखनास युक्तिवाद, विश्लेषण, चिंतनशीलता, विवेक हे गुण लाभले आहेत. गांधींप्रमाणेच टिळक नैतिक सत्याच्या म्हणजे स्वातंत्र्याच्या शोधात आहेत व वाचकालाहि त्या शोधात सामील करून घेत आहेत असा पदोपदी अनुभव येतो. सत्याच्या उच्च पदाकडे होणारी ही यात्रा सत्याकडे जात असता उत्कंठा व उत्साह निर्माण करते. पश्चिमी लोकशाही जीवनमूल्यांचा चमकदार गाभा या सत्याच्या शोधात प्रकट होतो, त्याचे निरनिराळे पैलू दृष्टोत्पत्तीस येतात; स्वातंत्र्याचा अगाध महिमा हिमालयातील यात्रेकरूचे भान हरपून टाकणाऱ्या हिमालयाच्या महिम्याप्रमाणे प्रत्ययास येतो.

स्वातंत्र्याची उंचनीच शिखरे जिंकण्याचे धैर्य या महिम्याच्या दर्शनाने प्राप्त होते. संस्कृत ललित साहित्याचे व महाभारताचे अवगाहन केलेली टिळकांची प्रज्ञा व्यास, कालिदास, वाल्मीकी व भवभूति यांच्यातील उपमा, रूपक, व्याजोक्ति इत्यादि सुंदर अलंकाररत्नांना उचितच स्थळी उद्‌धृत करते. मात्र कोठेहि भाषेचा फुलोरा किंवा वक्तृत्वाचा कृत्रिम हव्यास दिसायचा नाही. एखाद्या लेखात हे साहित्य गुण किंवा हे तर्कयुक्त विश्लेषण लुप्त झालेले दिसले तर असे समजावे की ते टिळकांचे नव्हे. कोणी तरी ( Ghost writer ) भूत संपादकाने लिहिले असावे किंवा टिळकांनी घाईघाईने लिहिलेले असावे; खरोखर टिळकांना उथळ लेखन करता येणे शक्य होते काय? उदाहरणार्थ त्यांनी घाईघाईने लिहिलेला महात्मा गांधींच्या चरित्राच्या प्रस्तावनेचा लेख पाहावा, तेथेहि त्यांची चिंतनशीलता दगा देत नाही. होमरहि डुलक्या घेतो असे म्हणतात. तसेहि क्वचित् असेल, नाही असे नाही.

केसरीचे इतर संपादक व टिळक यांच्या लेखनातला मुख्य फरक म्हणजे तर्कशुद्धता अबाधित राखणे हे टिळकांचे वैशिष्ट होय. इतरांच्या लेखनांत ती बाधित झालेली अनेक वेळेला दिसते, टिळकांच्या निष्ठेला अपवाद नाही. इतरांच्या लेखनात हे अपवाद मधून मधून आढळतात. टिळकांच्या लेखात लोकशाही स्वातंत्र्याचे मूल्य केव्हाहि खाली जात नाही, परकीय पारतंत्र्याच्या विरुद्ध लढण्याचा बाणा कोठेहि वाकत नाही, अंतिम स्वार्थत्यागाची प्रतिज्ञा कोठेहि सुटत नाही वा मर्यादित होत नाही. याच्या उलट इतरांच्या लेखनात असे क्वचित् क्वचित् घडलेले दिसते. टिळकांची स्वराज्याची प्रतिज्ञा ही भीष्मप्रतिज्ञा आहे, या प्रतिज्ञेने स्वतःचे मरण डोळ्यांने पाहिले आहे. त्यामुळे टिळकांचे लेखन हे भारताच्या उद्योगपर्वापर्यंतच्या स्वातंत्र्ययुद्धाचे गद्य महाकाव्य बनले आहे.

वाई
१ ऑगस्ट १९६९

लक्ष्मणशास्त्री जोशी

ग्रंथांक ७५७७५ दि: ...
क्रमांक ...२९१... नों. दि: २।३।६२

# खंड पहिला

## आधीं सामाजिक कीं राजकीय

### * १. आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?

[ सन १८८६ ]

गेल्या सोमवारीं मुंबई येथील ' स्टूडंट्स लिटररी अ‍ॅण्ड सायन्टिफिक सोसायटी ' पुढें ऑनरेबल का. त्रि. तेलंग यांनीं " राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक सुधारणा आधीं " या विषयावर व्याख्यान दिलें. हा विषय आमच्या कानांत दुमदुमूं लागल्यास बरेच दिवस झाले. ज्या इंग्रज लोकांस आमचीं राजकीय धडपड रुचत नाहीं, त्यांचा आम्हांस नेहमीं उपदेश चाललेला असतो कीं, " आर्यलोकाग्रणींनो, राजकीय प्रकरणांत इतक्यांत तुम्ही पडूं नका, अगोदर आपली गृहस्थिति सुधारा, आमच्यापाशीं राजकीय हक्कांसाठीं मागणें घालण्यापूर्वीं आपल्या वायकांस, आपल्या मुलींस, आपल्या वहिणींस गृहदास्यांतून सोडवा, ब्राह्मणक्षत्रियादि जातिभेद लयास न्या, स्त्रीशिक्षणाचा परिपाठ घाला, गतभर्तृकांच्या पुर्नविवाहास यथेच्छ संमति द्या, एकवीस बावीस वर्षेपर्यंत मुली अविवाहित ठेवून त्यांच्याकडून पितृगृहीं असतां विद्याभ्यास करावा, इ० इ० हें जोंपर्यंत तुमच्यानें झालें नाहीं तोंपर्यंत राजकीय स्वातंत्र्य भोगण्यास तुम्हीं पात्र झालां असें होणार नाहीं. दाराच्या आंत तुम्हाला बादशाही अम्मल गाजवायला पाहिजे व दाराच्या बाहेर जिकडे तिकडे लोकसत्ता झळकली पाहिजे, ही असंभवनीय गोष्ट कधींहि होणार नाहीं. तर तुमच्या हिंमतीचा ओघ प्रथम गृहसुधारणेकडे लागूं द्या. " क्षुद्रदृष्टि इंग्रजांनीं आम्हांस असा उपदेश करावा हें त्यांना योग्यच आहे. आम्ही मात्र तो कितपत अनुसरावा हें विचारणीय आहे. मि. मलबारी यांनीं शिशुपरिणय व असंमत वैधव्य या दोन विषयांवर आपल्या टांकानें आणि ओंठानें हुल्लड करून देण्यास आरंभ

* हा लेख जेव्हां लिहिला तेव्हां टिळक केसरीचे जाहीर संपादक नव्हते. १८८७ सालीं टिळक जाहीर रीतीनें संपादक झाले. लेखातील विचारसरणी टिळकांची दिसते म्हणून हा लेख टिळकांचा म्हणून उद्धृत केला आहे. मुळांत लेखकाचा निर्देश नाहीं.

केल्यापासून या विषयाकडे बऱ्याच लोकांचें चित्त वेधलें आहे. वर दिलेला मायावी उपदेश आमचे नाना फडणीस सर आक्लंड काल्व्हिन् यांनीं मि. मलबारी यांच्या टिप्पणांस उत्तर देतांना केला. काल्व्हिनसाहेब जाड बुडाचे ढेल पडल्यामुळें त्यांच्या लेखांवर नेटिव्ह प्रेसांकडून बरीच टीका झाली. पण या पंधरवड्यांत या वादानें पुनः उचल खाण्यास मि० वर्डस्वर्थ यांनीं मि. मलबारीस धाडिलेलें पत्र कारणीभूत झालें! त्यांनीं त्या पत्रांत आम्हांस वरील प्रकारचा उपदेश करणाऱ्या इंग्रजांची खाशी खरड काढून टाकिली आहे, व विशेषतः पाद्री लोकांवर चांगलाच चावूक ओढिला आहे! त्यांच्या पत्रांतील मुख्य आशय असा आहे कीं, सामाजिक सुधारणेसाठीं अगदीं जीव सोडण्याची गरज नाहीं; राजकीय सुधारणा होत चालली म्हणजे तिच्या कधीं बरोबर, कधीं किंचित् पाठीमागून, सामाजिक सुधारणा होत जाते. हाच सिद्धांत काशिनाथपंतांनीं आपल्या व्याख्यानांत विशेष खुलाशानें सिद्ध करून दाखविला आहे. काशिनाथपंतांची वाक्शैली, विचारसरणी, कोटिक्रम, वाचनव्याप्ति व विनय याविषयीं येथें पुनरुक्ति केली पाहिजे असें नाहीं. त्यांच्या आंगचे हे गुण सर्वत्र प्रसिद्ध झाले आहेत. यांचें भाषण जिभेला जसें द्राक्ष तसें कानाला लागतें! तें ऐकतांना मंजुळ शब्द करीत वाहणाऱ्या स्वच्छ जलप्रवाहाची आठवण होते! त्यांच्या प्रतिपक्ष्यांना सुद्धां त्यांचें बोलणें लक्ष देऊन ऐकावेंसें वाटतें. सोमवारच्या व्याख्यानांत हे गुण विशेष प्रतिबिंबित झाले होते असें ज्यांनीं खुद्द ऐकिलें आहे त्यांचें मत आहे. हें समग्र व्याख्यान टाइम्स पत्रांत प्रसिद्ध झालें आहे. त्यानें त्यांतील अगदीं बारीक खिळ्यांचें तीन कॉलम भरून गेले आहेत. त्यांतील रस मराठी वाचकांस उतरून द्यावयाचा म्हटलें तर साऱ्याचें यथास्थित भाषांतर केलें पाहिजे. तें करीत बसलों तर दोनचार आठवडे दुसऱ्या मजकुरास निरोप द्यावा लागणार! बरें इतकें करूनहि त्यांच्या श्रोत्यांस जें समाधान व जो आनंद तें ऐकल्यापासून वाटला असेल त्याच्या निम्मा भाषांतर वाचण्यानें आमच्या वाचकांस होईल किंवा नाहीं याचा संशय आहे. शिवाय त्या व्याख्यानांत इंग्लंडच्या इतिहासातील कित्येक महत्त्वाच्या गोष्टींचा व कायद्यांचा जो उल्लेख केला आहे तो आमच्या इंग्रजी न जाणणाऱ्या वाचकांस सुबोध होण्याची पंचाईत आहे. सबब त्या व्याख्यानाचें नीरस तात्पर्य देण्याशिवाय दुसरा इलाज नाहीं. आज येवढें करून पुढल्या खेपेस आम्हांस जें त्यांच्या संबंधानें म्हणावयाच आहे तें म्हणू. मि. तेलंग म्हणाले :–

"ज्यांची गृहस्थिति सुधारली नाहीं त्यांची राजकीय स्थिति सुधारावयाची नाहीं असें ज्यांचें म्हणणें आहे त्यांचा असा भाव आहे काय कीं, अमुक प्रकारची

देशांतील लोकांची गृहस्थिति असली म्हणजे अमुक प्रकारची संतोष मानण्यासारखी राजकीय सुधारणा व्हावयाचीच नाहीं, किंवा अमुक प्रकारच्या गृहस्थितींत लोकांचें पाऊल राजकीय कामांत पुढें पडावयाचेंच नाहीं, असा जर त्यांचा भाव असेल तर तो मोठ्या चुकीचा आहे. कारण एक तर गृहसुधारणा आणि राजकीय सुधारणा यांची फारकत कोठें होतें हें दाखविणें अत्यंत दुरापास्त आहे. कोळचाच्या जाळ्याप्रमाणें यांच्या पदरांची एकांतएक इतकी गुंतागुंत होऊन गेलेली आहे कीं, दिसण्यांत जरी ते दोन प्रकारचे धागे दिसतात तरी उलगडायालाच बसलें तर त्यांच्यातील भेद दाखविण्याची मुष्कील पडेल. लोकशिक्षण, समुद्रपर्यटन, शिशुपरिणय, यांपैकीं कोणत्याहि विषयाला शुद्ध सामाजिक किंवा शुद्ध राजकीय म्हणतां येणार नाहीं, तथापि वादासाठीं सामाजिक आणि राजकीय हा समंजस भेद आहे असें मानिलें तरीं तेवढ्यानें सामाजिक अथवा गृहसंबंधीं सुधारणा झाल्याखेरीज राजकीय सुधारणा व्हावयाची नाहीं, व ती करण्याचा प्रयत्न करूं नये, असें कशावरून सिद्ध होतें? बरें, हाही सिद्धांत खरा आहे असें घेऊन चाललें तरी हिंदु लोकांचीं कुटुंबें गुलामवाडे आहेत असें सिद्ध करण्यास काय आधार आहे? जुलूम करणारे जाणून बुजून जुलूम करीत असले, व ज्यांच्यावर तो होत असला, व ज्यांच्यावर तो असेल त्यांना तो आपणावर होत आहे असें वाटत असलें, तर एकाला जुलमी व दुसऱ्याला गुलाम अशा संज्ञा देणें न्याय्य आहे. पण आमच्या घरीं अगदीं उलट स्थिति आहे. साहेब लोक ज्यांना गुलाम म्हणतात त्या स्वामिनी आहेत व ज्यांना ते स्वामी म्हणतात ते त्यांचे बंदे गुलाम आहेत! वायकांच्या पायांत आम्हीं बिडी घातली आहे असें नाहीं, तर त्या आम्हांस सव्वा मणाच्या जड बिडीसारख्या होऊन गेल्यामुळें आमचे पाय हालेनातसे झाले आहेत. अथवा आम्ही वायकांचे किंवा बायका आमच्या गुलाम हाच वाद बरोबर नाहीं. आम्हीं —आमच्या बायका— आमच्या वहिणी, मुली-मुलें — आम्हीं सारे केस पिकलेल्या अनादिसिद्ध पुराण लोकरूढीरूप जगदंबेचे अतिलीन गुलाम आहोंत! तिचें उग्र स्वरूप डोळे उघडून न्याहाळण्याचें धैर्य आम्हांस होत नाहीं! ही महिषासुरमथनी भारलेल्या जंतूंप्रमाणें आम्हांस वागवीत आहे व आम्ही वागत आहों! तेव्हां आम्हीं आपल्या बायकांस गुलामांप्रमाणें वागवितों, हा साहेबलोकांकडून आम्हांवर होत असलेला आरोप माझ्यामतें अगदीं निराधार आहे! आतां दुसरा प्रश्न असा आहे कीं, अमुक प्रकारची गृहस्थिति असली तरच अमुक प्रकारची राजकीय स्थिति प्राप्त होईल, नाहींतर व्हावयाची नाहीं,— हें जें कित्यकांचे म्हणणें आहे तें इतिहासावरून सिद्ध होत नाहीं. शिवाजीनें

मराठयांच्या राज्याची स्थापना केली, पेशव्यांनी गंगेंत व सिंधूंत दक्षणीं तट्टे नाहवून अटकेस भगवा झेंडा फडकविला, तो काय हायस्कुलांत जाऊन चवथी इयत्ता शिकणाऱ्या मुलींच्या जोरावर? शिवाजी, महादाजी शिंदा, थोरला बाजीराव, हे काय पंचविसावें वर्षी लग्न केलेल्या मुलींच्या पोटी झाले होते? त्यावेळेस शूद्र ब्राह्मणांचीं ताटें काय एके ठिकाणीं होतीं? कां त्या वेळेस सती हा शब्द कोणास ऐकूनसुद्धा ठाऊक नव्हता? कांहीं नाहीं. आतांपेक्षां त्यावेळची गृहस्थिति विशेष चांगली होती असें मानण्यास कांहीं आधार नाहीं. शिवाजीच्या पूर्वीचा काळ घेतला तरी तेंच दिसून येईल. सातव्या शतकांतील हर्षवर्धन आणि पुलकेशी राजांच्या कारकीर्दीविषयीं जी माहिती उपलब्ध आहे तीवरून त्या वेळेस या देशाची राजकीय स्थिती जरी समाधान मानण्यासारखी होती तरी त्या वेळच्या लोकांची गृहस्थिति आतांपेक्षां विशेष बरी होती, असें म्हणण्यास कांहीं आधार नाहीं. आतां कोणी असें म्हणतील कीं, हें हिंदुस्थानचें उदाहरण कांहीं कामाचे नाहीं. येथला खरा इतिहास सांपडण्याचें साधन नाहीं; सबब ज्या देशाचा खरा इतिहास उपलब्ध आहे त्याचें उदाहरण घेतलें पाहिजे. कबूल आहे. अशा प्रकारचा इतिहास इंग्लंडच्या इतिहासाहून दुसरा कोणता आहे? पण त्या इतिहासावरून सुद्धा देशांतील लोकांची अमुक प्रकारची गृहस्थिति असेल तरच अमुक प्रकारची राजकीय स्थिति असूं शकते, हें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें सिद्ध होत नाहीं. सतराव्या शतकांत राजकीय संबंधानें इंग्लिश लोकांचे पाऊल पुष्कळच पुढें पडलें. टयूडर घराण्यांतील राजेराण्यांचा जारी अंमल संपल्याबरोबर हक्क मागण्याची जी टीका लोकांनीं एकदां हातीं धरली ती शंभर वर्षेपर्यंत खालीं टेविली नाहीं. राजांचें वर्चस्व कमी करून लोकांचे हक्क निश्चित करण्यासाठीं एका राजाला कंठस्नान घालावें लागलें, व एकाला पदच्युत करून त्याच्या जागीं परदेशचा इसम आणून बसवावा लागला! राजकीय संबंधानें इंग्लिश लोकांनी सतराव्या शतकांत इतका झपाटा मारिला तरी त्याला साजणारी त्यावेळेस किंवा आतां त्यांची गृहस्थिति नाहीं हें ज्यांनीं मेकॉले, मिल्ल, वगैरेंचे ग्रंथ पाहिले आहेत, इंग्लंडची सफर केली आहे, किंवा दुसऱ्या कोणत्याहि रीतीनें इंग्लिश समाजाचें ज्ञान करून घेतलें आहे त्यांना दिसून येईल. आतां आमच्या बायका जशा अक्षरशत्रु आहेत तशा इंग्लंडच्या सतराव्या शतकांत होत्या. आतां आम्हांत जशीं कांहीं सामाजिक लफडीं आहेत, तशीं इंग्लंडांतही आहेत. इंग्लंडची गृहस्थिति आमच्याहून फार चांगली आहे हें अगदीं मान्य आहे, पण ती असावी तशी नाहीं हे निर्विवाद आहे. सारांश काय कीं, गृहस्थितीचा राजकीय स्थितीशीं सार्वत्रिक व सार्व-

कालिक समवायसंबंध लावणें नीट नाहीं. येथें व्याख्यानाचा पूर्वार्ध झाला.

## उत्तरार्ध -

मागल्या निबंधांत शिरोलेखांत नमूद केलेल्या विषयाच्या संबंधानें आ. काशिनाथपंत तेलंग यांच्या व्याख्यानाच्या पूर्वार्धाचा सारांश दिला. यांत उत्तरार्धाचा देऊन अवकाश राहिल्यास विषयासंबंधानें आमचा अभिप्राय द्यावयाचा.

[अमुक देशांत अमुक प्रकारची सामाजिक स्थिति असली म्हणजे त्या देशांत अमुक प्रकारची राजकीय स्थिति असलीच पाहिजे, असें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें चुकीचें आहे हें दाखविण्यासाठीं आतांपर्यंत कांहीं ठळक ठळक अशीं समप्रमाणें दाखविलीं. आतां वरील माझें मत व्यस्त प्रमाणांनीं सिद्ध करून दाखवितों. तारतम्यदृष्टीनें पाहिलें असतां ज्या मार्गानें कार्यशकटाच्या चक्रास कमींत कमीं घर्षण होईल अशानें तो नेण्यांत मनुष्याचा फायदा आहे, हें कोणीही कबूल करील. ज्या रस्त्यांवर खाचखळगे नाहींत, ज्यावरील मुरुम दाबून बसविलेला आहे, ज्यानें प्रवास केला असतां भामटयांची भीति नाहीं व जो नेहमीच्या रहदारीचा आहे, अशानें जाणें अत्यंत श्रेयस्कर आहे. हिंदुस्थानासारख्या महाद्वीपतुल्य देशांत सामाजिक सुधारणा लवकर घडून आणणें अत्यंत दुरापास्त आहे; व पूर्वीची स्थिति आज असती तर राजकीय सुधारणाही सामाजिक सुधारणेपेक्षा अधिक सुलभ झाली नसती. देशाच्या निरनिराळ्या भागांवर जर स्वतंत्र राजे राज्य करीत असते तर सर्वांचे राजकीय विचार एकसारखे होऊन सर्वांनीं एकमेकांशीं सलोख्यानें वागण्यास आरंभ होऊं लागण्यापूर्वी पुष्कळ वर्षें लोटलीं असतीं. परंतु ईश्वरेच्छेनें या विस्तीर्ण भरतभूमीवर इंग्रजांसारख्या अत्यंत सुधारलेल्या व उद्योगी लोकांचें दृढ साम्राज्य झालें असल्यामुळें राष्ट्राराष्ट्रांतील चुरस नाहींशीं झाल्यासारखी होऊन सगळे प्रांत एका दावणींत गोंवले गेले आहेत, यामुळें राजकीय प्रकरणांत तरी त्यांचा एकमेकांशीं फारसा बेबनाव होण्याचा संभव राहिला नाहीं. राजकीय दृष्ट्या सर्वांच्या कपाळीं सारखें दास्य आलें आहे, व त्यांतून पार पडण्याची सगळ्यांची सारखी इच्छा आहे; या संबंधानें फारसा मतभेद नाहीं, यासंबंधानें एकी होण्याचा बराच संभव आहे, हें थोड्या दिवसांपूर्वी येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेवरून स्पष्ट दिसून आलें. राजकीय विषयाच्या संबंधानें आमचा एकोपा होऊन आमचें पाऊल लवकर पुढें पडेल असें मानण्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं मुख्य कारण असें आहे कीं, या कामीं आम्हांस जिंकणाऱ्या आमच्या राजकर्त्यांकडूनच पुष्कळ साहाय्य होण्याची आशा आहे. इंग्लंड देश

स्वातंत्र्याचें माहेरघर होऊन बसले असल्यामुळें इंग्लिश लोकांना आपल्या प्रजेस स्वातंत्र्यदानाची जशी इच्छा आहे तशीं युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास नाहीं, हें निर्विवाद आहे! [आमच्या देशांतील सुधारकांस दोन अवघड किल्ले सर करावयाचे आहेत, एक राजकीय स्वातंत्र्याचा व दुसरा सामाजिक स्वातंत्र्याचा. दिसण्यांत सध्या दोनही अभेद्य दिसत आहेत. पण सुधारक चमूच्या कुशल अग्रणींनीं सूक्ष्म विचाराच्या दूरदर्शक यंत्रानें जी टेहेळणी केली आहे, तीवरून त्यांना असें दिसून आलें आहे कीं, पहिला हल्ला राजकीय स्वातंत्र्यगडावर केला असतां तर तो विशेष फायदेशीर होणार आहे. कारण या दुर्गाच्या तटावर रक्षणासाठीं ठेविलेल्या शिपायांत सुधारकांना अनुकूल अशी कांहीं मित्रमंडळी आहेत. या घरभेद्या मंडळींच्या साहाय्यानें आमचे थोडक्या वर्षांत बरेंच हित होण्याची आशा आहे! आम्ही निकराची चाल केली असतां त्यांच्या-कडून योग्यप्रसंगीं तटाचे दरवाजे उघडले जाऊन ते आम्हांस आंत घेतील असें मानण्यास बराच आधार आहे. या राजकीय दुर्गाच्या उलट असलेल्या दुर्गाच्या संबंधानें अशा प्रकारची आंतून मदत होण्याची मुळीच आशा नाहीं. या दुर्गाच्या कोटांत आम्हास अनुकूल असा एकही इसम नाहीं, त्यामुळें तो सर करण्यास आम्हास बरींच वर्षे खटपट केली पाहिजे. पांच पन्नास वर्षे त्याला वेढा घालून जेव्हा बसावे, व आंत अन्नपाणी जाण्याच्या साऱ्या वाटा मजबूत रीतीनें अडवाव्या, व आंतील वीरांस भुकेनें तान्हेनें जेरीस आणावें, तेव्हा कोठें त्यांच्या-कडून तहाचें निशाण लागलें तर लागेल. तसें होईपर्यंत आमची सर्व धामधूम फुकट जाणार आहे. पहिला किल्ला घेणें सुसाध्य आहे, दुसरा घेणें तर असाध्य नाहींच पण कष्टसाध्य किंवा दुःसाध्य आहे. पहिला सर करण्यांत केलेलें श्रम फारसे व्यर्थ जाण्याचा संभव नाहीं; दुसरा घेण्यासाठीं केलेल्या श्रमांचे फळ लवकर येण्याची आशा नाहीं. पहिल्यावर स्वारी करण्याविषयीं साऱ्यांना सारखी उत्सुकता आहें; दुसऱ्याच्या तटावर गोळ्या सोडण्यास साऱ्यांचा हात सारखा वहात नाहीं, शिवाय जर सुदैवानें सुधारक सेनेस पहिला घेतां आला तर त्यांच्या उंच तटावर उभें राहून दुसरा सर करण्यास तिला बिलकुल श्रम पडणार नाहींत. कारण कोणत्याही कारणासाठीं मनुष्यांना एकदां एकदिलानें वागण्याची, श्रम सोसण्याची, दुसऱ्यासाठीं स्वहिताचा त्याग करण्याची, व स्वातंत्र्य व मोठेपणा संपादण्याची चटक लागली म्हणजे ती चटक त्यांना प्रथम जीं कामें अशक्यशीं वाटलेलीं असतात तींसुद्धा सहज करून टाकण्यास समर्थ करते. थोरला बाजीराव व थोरला माधवराव यांच्या कारकीर्दींत मराठ्यांच्या तरवारीचा पराक्रम बराच दूरपर्यंत जाऊन थडकल्यावर गृहस्थिति

सुधारण्याकडे त्यांचे लक्ष सहजपणें लागलें, व ती होण्यास आरंभही झाला होता. प्रसिद्ध ब्राह्मणवीर परशुरामभाऊ पटवर्धन यांची कन्या तरुणपणीं गत-भर्तृका झाली होती. तिचा पुनर्विवाह करून तिला पुनः सनाथ करावें असा त्यांचा वेत होता व त्या कामास अनुकूल अशीं त्यांनीं वऱ्याच शास्त्रीलोकांची मतें गोळा केलीं होतीं हें सर्वांस ऐकून तरी ठाऊक असेलच. परशुरामभाऊंच्या विचारास जे प्रतिकूल होते त्यांनीं मोठ्या नम्रतेनें त्यांचें मन वळवून त्यांच्या-कडून तो विवाह होऊं दिला नाहीं ही गोष्ट निराळी. पण भाऊंच्या मनांत तो करण्याचा एकदां संकल्प झाला, व त्यांच्या म्हणण्यास पुष्कळ शास्त्र्यांचा रुकारही पडला. यावरून राजकीय स्थिति सुधारली असतां गृहस्थितीहि सुधा-रण्यास कसा आरंभ होतो, हें सर्वांच्या लक्षांत येणार आहे. तसेंच जिववा-दादाशीं पेशवे ज्या रीतीनें वर्तन करीत ती रीत, सवाई माधवरावांचा विवाह झाला तेव्हा मराठ्यांना आणि मुसलमानांना एके ठिकाणी झालेली मेजवानी, वाळाजी वाजीराव यांनी देशस्थ कन्येशीं केलेला विवाह, या व दुसऱ्या असल्या अनेक गोष्टींवरून माझा फार दिवसांपूर्वी झालेला — जो समज — कीं पेशव्यांचें राज्य आणखी कांहीं वर्षें चालतें तर ज्या सामाजिक सुधारणांसाठीं प्रस्तुत आम्हांस व आमच्या राजकर्त्यांस इतका त्रास पडत आहे त्या राज्यांत तेव्हांच घडून येत्या — तो अलीकडे दृढ झाला आहे. दुसरी आणखी एक लक्षांत ठेवण्या-जोगीं गोष्ट अशी आहे कीं, राजकीय प्रकरणीं वादांत तर्काचें वरेंच प्रावल्य चालतें, सामाजिक किंवा धार्मिक वादात तो अगदीं कुंठित होतो. पहिल्या वादांत बुद्धीवर प्रहार होत असतात, दुसऱ्या वादांत मनोविकार दुखविले जातात. बुद्धि अथवा विचारशक्ति मनोविकारांहून अधिक शांत व कमी दुराग्रही असल्यामुळें तिला तत्त्वाचा वोध लवकर होतो व तो एकदां झाला म्हणजे तदनुसार वर्तन करण्यास मनुष्य मात्र फारसा कचरत नाहीं. मनोविकारांची तशी गोष्ट नाहीं. वादानें ते अधिकच चेकळतात व अगदीं अंध होऊन जातात. यासाठीं होतां होईल तों त्यांना कोणीही डिवचूं नये. त्यांना जागचे जागीं थंडे होऊं द्यावे, त्यांच्यातील गर्मी नाहींशी झाली कीं, ते निःशक्त होऊन कापरासारखे उडून जातात. त्यांचा नाश लवकर करावयाचा असेल तर त्यांना सुशिक्षणाचा किडा लावावा. म्हणजे थोड्या दिवसात (वर्षांत) त्यांचे पीठ होऊन त्यांचा इमला ढांसळतो. वर्तमानपत्रें लोकशिक्षणाचीं वलवत्तर साधनें आहेत हें मी प्रांजलपणें कबूल करतों. राजकीय वादास त्यांच्याप्रमाणें दुसऱ्या कोणाकडूनही साहाय्य होत नाहीं. तथापि त्यांनीं होतां होईल तों सामाजिक विषयांच्या वाटाघाटींत किंवा धर्मवादांत पडूं नये, असें माझें

मत आहे. वर्तमानपत्रांत असल्या विषयांची चर्चा होऊं लागल्यानें लोकांचे दुराग्रह अधिकाधिक बळकट होत जातात व त्या मानानें सामाजिक सुधारणेचें काम दुष्कर होत जातें. राजकीय विषयांची तशी गोष्ट नाहीं. त्यांत फारसा मतभेद नाहीं; निदान इंग्रजांच्या अंमलाखाली सर्वांस एकच स्थिति प्राप्त झालेल्या आम्हां हिंदुस्थानांतील लोकांत तो होण्याचा संभव नसल्यामुळें पारशी, मुसलमान, मराठे, गुजराथी, सिंधी, बंगाली, मद्राशी वगैरेंची राजकीय मतें सारखी पडतात. कित्येकदां अशा संबंधानें आम्हांत जें मतसाम्य दिसतें त्याविषयीं आमच्या राजकर्त्यांस मोठा अचंबा वाटून ते त्याबद्दल नाना तऱ्हेचे कुतर्क करतात. पण ते त्या विषयीं जर नीट विचार करतील तर तसें साम्य दिसणें हच स्वाभाविक आहे, असें त्यांच्यापैकीं जे विचारी असतील अशांच्या तरी लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. सामाजिक सुधारणेकडे मुळींच लक्ष देऊं नये असें माझें म्हणणें नाहीं. कांहींनीं तिकडेही लक्ष दिलें पाहिजे, व तें त्यांच्याकडून दिलें जात आहे हें स्त्रीशिक्षणास, पुनर्विवाहास, बालविवाहनिषेधास, जातिभेदाभेदास व यासारख्या इतर गोष्टींस उत्तेजन येण्यासाठीं जे प्रयत्न चालले आहेत, व त्यांना जें थोडें थोडें फळ येऊं लागलें आहे त्यावरून दिसून येईल. तथापि सर्वांनीच या मार्गाकडे वळण्याची कांही गरज नाहीं. आनरेबल रावबहादूर महादेव गोविंद रानडे यांच्यासारखी वुद्धिमत्ता फारच थोड्यांच्या आंगीं असते, यामुळें सर्व कामें सारख्या रीतीनें उठविणारा त्यांच्यासारखा पुरुष फारच विरळा असतो. बहुतेक लोकांचे बुद्धिसामर्थ्य फार माफक असतें, यामुळें त्याचा व्यय फार जपून केला पाहिजे. सध्यांच्या आमच्या देशस्थितींत विद्वान् लोकांच्या वुद्धिसामर्थ्याचा बराच भाग राजकीय सुधारणेकडे व कांहीं मात्र सामाजिक सुधारणेकडे लागला पाहिजे, असा माझा एकंदरींत ग्रह झाला आहे.

---

## २. सामाजिक सुधारणेचे मार्ग

[२१ जानेवारी १८९६]

महाराष्ट्रांत गेले पांच सहा महिनें जो तंटा चालू होता; व ज्यामुळें अखेरीस सामाजिक परिषदेस राष्ट्रीय सभेच्या मंडपातून बाहेर पडावें लागलें; त्यासंबंधानें अखेरचे दोन शब्द लिहिण्याचें आमच्या मनांत आलें होतें. पण आतांपर्यंत कांहीं कारणामुळें तसें करतां आलें नाहीं. डॉ. भांडारकर व न्या. रानडे यांची सामाजिक परिषदेसंबंधाचीं जीं भाषणें झालीं त्यांतहीं या प्रश्नाचा बराच विचार केलेला आहे; व आमच्या सुधारकवर्गाचे असें म्हणणें आहे कीं, महाराष्ट्रांतील वादानें सामाजिक परिषदेस एक प्रकारचें व्यवस्थित स्वरूप मिळून तिचा फायदाच झाला आहे. खरोखरच अशी गोष्ट झाली असल्यास लाख रुपयाची गोष्ट झाली असें आम्हीं म्हणतों. आम्हांस तरी सुधारणा कोठें नको आहे? पण ती ज्या त्या ठिकाणीं 'बीचमे मेरा चांदभाई' या न्यायानें मात्र नको. रा. व. रानडे म्हणतात त्याप्रमाणें हा प्रश्न व्यक्ति-विषयक नाहीं. सुधारणा दोघांसही हवी असली तरी तिचें स्वरूप आणि मार्गही दोघांच्या मतें निरनिराळे आहेत. केसरीकारांस रावबहादुरांचा मत्सर झाला आहे इत्यादी कांही कुत्सित कल्पना रा. ब. च्या कल्याणशिष्यांनीं काढिल्या आहेत. जणों काय केसरीकारांस न्या. रानडे यांची हायकोर्ट जज्जाची जागाच पटकावयाची आहे. ह्या सर्व मूर्ख कल्पना रा. ब. रानडे यांनी झुगारून देऊन वादाचें खरें स्वरूप बऱ्याच अंशानें लोकांपुढें मांडिलें याबद्दल आम्हीं त्यांचे आभार मानितो. आमची अशी समजूत झालेली आहे कीं, इंग्रजी विद्येच्या अव्वल कैफांत आमच्या कांहीं विद्वानांनी सुधारणेच्या ज्या दिशा अथवा मार्ग शोधून काढिले त्यांपैकीं बहुतेक पंचवीस तीस वर्षांच्या अनुभवानें आणि सदरील मुदतींत झालेल्या ज्ञानप्रसारानें निरुपयोगी अथवा अप्रयोजक ठरले आहेत अथवा ठरत चालले आहेत. खुद्द रा. ब. रानडे यांचेच जर आपण उदाहरण घेतलें तर तेवढ्यावरूनही ही गोष्ट शाबीत होईल. प्रार्थनासमाजाच्या एका अध्वर्यूनें ज्ञानेश्वराचें चरित्र अथवा भक्तिविजयांतील संत–चरित्रें मोठ्या प्रेमळ अंतः-करणानें गाऊं लागावींत, अथवा दुसऱ्या एका गृहस्थानें अद्वैतमतांचा महिमा गावा हा कांहीं कालाचा लहानसहान प्रवाह नव्हे. हिंदुधर्म कसा आहे, त्यांत किती गोष्टी इतर धर्मांपेक्षां चांगल्या आहेत, हिंदू लोकांच्या रितीभातींपैकीं सकारण अतएव ग्राह्य व निष्कारण अतएव त्याज्य कोणत्या इत्यादी गोष्टींचा

खुलासा होण्यास आज जीं साधनें उपलब्ध आहेत तीं पंचवीस तीस वर्षांपूर्वी नव्हतीं. त्यावेळीं असें वाटत होतें कीं, आम्ही आमच्या राजकर्त्यांच्या मानानें पाहिलें तर किती वेडगळ आणि किती अडाणी! काय त्या आमच्यांतील जातीं आणि काय आमचें अज्ञान; आमच्या बायका तरी काय ही अडाण्या-तल्या अडाणी; अशा रीतीनें अर्धांगवायू झालेला हा देश आपलें डोकें वर कसें काढणार? करितां आतां कांहीं विलंब करून उपयोग नाहीं. स्त्रियांच्या शाळा काढा, विधवांचीं लग्नें लावा, जातिभेद मोडून टाकून सवगोलंकार करा आणि एका निराकार परमेश्वराची दर रविवारी गुडघे टेंकून डोळे मिटून प्रार्थना करीत जा म्हणजे तो सच्चिदानंद परमात्मा तुमची मनकामना एका क्षणांत पूर्ण करील! पंचविसाच्या ठिकाणीं तीस वर्षे झालीं, आमचे वेडे लोक या उपदेशांस तावडतोब भुलून जाऊन देशोन्नतीचा नवा पाया घालतील, अशी या पूर्व-सुधारकांची समजूत झाली होती ती हळुहळू नाहींशी होत चालली आणि निराकार परमेश्वराच्या पंथाचा प्रसार करण्यास भक्त मिळावयाचे तेही निराकारच मिळाल्यामुळें त्या पंथास अजूनपर्यंतही कांहीं आकार आला नाहीं. विधवा विवाहाची ज्या लोकांनीं प्रवृत्ति पाडण्याचा उद्योग केला तेच स्वत: त्यापासून पराङमुख झाले आणि इंग्रजी शिक्षणाचा परिणाम मनुष्याच्या मनावर विपरीत होतो असें इंग्रजी शिकलेल्या विद्वान् लोकांच्या स्वैच्छ आचार-विचार आहारविहारादि वर्तनावरून लोकांस पक्के कळून आलें. रा. ब. रानडे यांनीं आपल्या दुसऱ्या व्याख्यानांत अशी प्रौढी गायिली आहे कीं, आम्हां सुधारकांस बहुजन समाजाचें पाठबळ नाहीं, ही गोष्ट खरीं आहे. पण हें पाठबळ नसलें म्हणून काय झालें? आमचा आधार याहून विशेष मजबूत आहे. तो कोणता म्हणाल तर सत्य व एकनिष्ठा हा होय. सत्य जोंपर्यंत आमचे बाजूस आहे व जोंपर्यंत आपण सत्याकरितां व न्यायाकरितां भांडत आहोंत तोंपर्यंत आपलाच विजय होईल याबद्दल शंका नाहीं. रा. ब. रानड्यांचे हें शब्द खरोखरच सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहेत. सत्य व एकनिष्ठा नको आहे तरी कोणास? दोन्ही पक्ष सत्याच करितां भांडत असतात, पण एका प्रसिद्ध कवीनें म्हटल्याप्रमाणें सत्य मात्र दोघांचा अव्हेर करीत असते. रा. ब. रानडे यांनीं मोठ्या मार्मिक रीतीनें आपल्या सुधारक मंडळीस ख्रिस्ती संतांची उपमा दिल्यासारखे केलेलें आहे, व डॉ. भांडारकर यांनीही सर्वज्ञ बुद्धाच्या वचनानें आपल्या भाषणाचा उपसंहार केला आहे. कोठें बुद्ध, कोठें ल्यूथर आणि कोठें आमचे सुधारक. ज्या राजबिंड्या पुरुषानें आपल्या प्रिय पत्नीचा व राज्याचा त्याग करून लोकांस सन्मार्गाचा उपदेश करण्यात आपलें आयुष्य घालविलें त्याची

योग्यता कोणीकडे आणि आमच्या सरकारी नोकरीमागें धावणाऱ्या आणि जिव्हालौल्याकरितां आपल्या तर्कांत न झालेल्या गोष्टी करूं इच्छिणाऱ्या सुधारकांची योग्यता कोणीकडे ? आमचे बंधू अमृतबझार पत्रिकाकार म्हणतात त्याप्रमाणें सामाजिक सुधारणा म्हणजे सरकारी नोकरीतील काही इसमास पुढे येण्याचा हा एक मार्ग झालेला आहे. बाकी रामदास तुकारामांच्या गोष्टी त्यांनी सांगाव्या आणि आम्हीं ऐकाव्या इतकेंच. या भावी धर्मसंस्थापकांपैकीं एकानेंही पदरास झीज लावून घेतली नाहीं. अथवा रामदास तुकारामाप्रमाणें संसारत्याग केला नाहीं. असल्या लोकांनी आरंभिलेल्या कृत्यांस यश न येतां त्यांची व त्यांच्या कृत्यांची उपहास्यता होऊं लागली तर त्यांत अपराध तरी कोणाचा ? सामाजिक सुधारणा करण्याचें हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रदेशांतून निरनिराळे मार्ग आहेत, ही गोष्ट जर रा. ब. रानडे यांस मान्य आहे तर मग सदर सुधारणेबद्दल महाराष्ट्रातच त्यांच्या पक्षानें एवढा बखेडा माजविण्याचें कारण नव्हतें. आमच्यातील वेदांती लोकांनी निरनिराळ्या धर्मपंथांची ज्याप्रमाणें निरभिमानबुद्धीनें एकवाक्यता करून घेतली आहे त्याचप्रमाणे सामाजिक सुधारकांनीं करून घ्यावयास नको आहे काय ? जुनें सोडून सुधारणा व्हावयाची नाहीं. जातिभेद मोडावयाचा असल्यास तो हळुहळू मोडला पाहिजे. सोन्याची सुरी म्हणून उरांत भोसकून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं इत्यादि विचार डॉ. भांडारकर यांच्या भाषणांत मधून मधून आलेले आहेत. पण त्याचबरोबर आमच्या जातिबांधवांस जर आपण आपले हक्क देण्यांस तयार नाहीं, तर इंग्रज सरकारनें तरी आम्हांस राजकीय हक्क कां द्यावे ? असे अव्वल इंग्रजीतील कांहीं अपरिपक्व विचार प्रदर्शित केलेले आहेत. विचारसरणीमधील या भेदावरून डॉ. भांडारकर यांच्या विचारपद्धतींत हल्लीं जो थोडाबहुत फरक पडला आहे तो कांहीं तरी बाह्य कारणामुळें पडला असावा असें अनुमान होतें. आम्ही आपल्या बायकांस शिक्षण दिलें नाहीं तर इंग्रजसरकार आपणांस राजकीय हक्क देणार नाहीं इत्यादि विधानें आतां सर्वांस अगदीं पोरकट वाटूं लागलीं आहेत. आमचे सुधारक ज्या कांहीं सुधारणा हल्ली करूं इच्छित आहेत त्या सर्व आयर्लंडात झालेल्या आहेत. विधवाविवाह आहे, प्रौढविवाह आहे, जातिभेद नाहीं, मांसमद्यसेवन यथेच्छ सुरू आहे, पण बिचारें आयर्लंड सातआठशें वर्षें धडपडत असतांही अद्याप परवशतेच्या निरयस्थितीतून बाहेर पडत नाहीं. यामुळें सामाजिक सुधारणा नको असें आम्हीं म्हणतों, असें कोणीही समजूं नये. आमचे एवढेंच म्हणणें आहे कीं, डॉ. भांडारकर यांनीं सामाजिक सुधारणेचा व राजकीय हक्कांचा जो हा संबंध जोडला आहे तो अगदीं भ्रांतिमूलक व

निराधार आहे. मुंबईच्या एका इंग्रजी वर्तमानपत्रानें डॉ. साहेबांच्या या वाक्याचें अवतरण घेऊन स्पष्टोक्तिबद्दल त्यांचें मोठें अभिनंदन केलेलें आहे; पण हें अभिनंदन इसापनीतींतील झाडांवर मासांचा तुकडा चोंचींत घेऊन बसलेल्या कावळ्याचें कोल्ह्यानें जें अभिनंदन केलें त्यासारखें आहे. जातिभेद सर्वांशीं मोडल्याखेरीज एकराष्ट्रीयता व्हावयाची नाहीं, व वरच्या जातींनीं खालच्या जातींस आणि पुरुषांनीं स्त्रियांस आपआपल्या प्रमाणेंच सर्व हक्क दिल्याशिवाय ते राजकीय हक्कास पात्र होत नाहींत हे डॉ. साहेबांचे बोल गॅझेट टाइम्सकर्त्यांस कां प्रिय होऊं नयेत? पण ह्या पत्रकारांस आमचें एवढेंच विचारणें आहे कीं तुमच्या देशाजवळच आयर्लंड देशांत या सर्व सुधारणा कधींच झालेल्या असतां व इंग्रजांचा व ऐरिश लोकांचा शरीरसंबंधही होत असतां त्यांस हे हक्क अजून कां मिळत नाहींत? सारांश, राजकीय हक्क मिळण्याचे अगर मिळविण्याचे मार्ग दुसरे आहेत. हिंदुस्थानांतील दोन चार विधवांचीं लग्नें या सालांत जास्त लागली, किंवा दहागांच विधवांनी केशवपन केलें नाहीं तर त्यांनीं या राजकीय प्रश्नाचा उलगडा होण्यास यत्किंचितही मदत होण्याचा संभव नाहीं. हें तंत्र निराळें आहे व त्याकरितां उद्योगही निराळ्याच प्रकारचे व्हावयास पाहिजेत. महाराष्ट्रांत ज्यावेळेस स्वतंत्रता वास करीत होती, व ज्यावेळेस तेथील पुरुषांचे अंगांत कर्तबगारी आणि शौर्य ही खेळत होतीं त्यावेळेस त्यांनीं त्यांस योग्य वाटल्या त्या सामाजिक सुधारणा विनदिक्कत अंमलात आणल्या आहेत. त्या इतक्या कीं, बंगाल, मद्रास, अगर हिंदुस्थानांतील दुसरे प्रांत यापेक्षांही महाराष्ट्रांतील स्त्रियांस पुष्कळ अधिक स्वतंत्रता व मान आहे, असें त्या त्या प्रांतांतील लोकही कबूल करितात. अशा स्थितींत आम्हीं पुन्हां इंग्रजी ग्रंथकारांचे, अधिकाऱ्यांचे किंवा वर्तमानपत्रकारांचे म्हणणें झेलून त्याप्रमाणें आपणही बोलण्यास लागावें हें मोठें लांच्छनास्पद आहे. आधीं सामाजिक सुधारणा करून आणि मग देशोन्नतीस लागलेले किती दाखले डॉ. भांडारकर यांच्यापाशीं आहेत हे आम्हांस माहीत नाहीं. आमच्या दृष्टीस जी एकदोन उदाहरणें पडतात तीं त्याच्या उलट आहेत. त्यावरून डॉ. भांडारकर यांचा सिद्धांत समर्थनीय होत नाहीं इतकेंच नव्हें, तर त्यांचें विरुद्ध अगदीं अनुमान निष्पन्न होतें. राजकीय हक्क संपादनाचें हें तत्त्व डॉ. भांडारकर यांनीं पूर्णपणें लक्षांत घ्यावयास पाहिजे होतें पण तसें न करितां त्यांनी आपल्या भाषणांत जातां जातां राजकीय चळवळीस दूषणें देण्याचा जो प्रयत्न केला आहे तो अगदी असमंजसपणाचा आहे. स्थलसंकोचास्तव या विषयांवर जें अधिक लिहिणें आहे तें पुढील खेपेस लिहूं.

---

## ३. सामाजिक सुधारणेचे मार्ग

[२८ जानेवारी १८९६]

सुधारणेचे निरनिराळे मार्ग असल्यामुळें मतभेद कसा होतो याबद्दल रा. ब. रानडे यांनीं सामाजिक परिषदेच्या वेळीं जें भाषण केलें होतें,- त्यावर आणि डॉ. भांडारकर यांनीं अध्यक्ष या नात्यानें जें भाषण केलें होतें त्याबद्दल आमचे जे कांहीं विचार होते त्यांपैकीं कांहीं विचार गेल्या अंकीं दिले आहेत. आमचे सुधारक म्हणतात त्याप्रमाणें सामाजिक सुधारणा झाल्याखेरीज राजकीय हक्कांस आम्ही पात्र होत नाहीं, वगैरे डॉ. भांडारकर यांच्या भाषणांत जीं कांहीं वाक्यें आहेत तीं समंजसपणाची आहेत असें आम्हीं लिहिलेंच आहे. यावरून एवढें मात्र सिद्ध होतें कीं, ही सुधारक मंडळी प्रसंग पडल्यास आपल्या हट्टाकरितां राजकीय चळवळींत व्यत्यय आणण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत. हिंदुस्थानचें राज्य आमच्या हवालीं करा, असें इंग्रज सरकारास सांगण्याचा कोणत्याही राजकीय चळवळीच्या पुरस्कर्त्यांचा हेतू नाहीं, आम्हांस प्रस्तुतच्या राज्यपद्धतींत जे फेरफार पाहिजे आहेत, ते अशा प्रकारचे आहेत कीं, त्यांच्याशी जातिभेदाचा किंवा दुसऱ्या कोणत्याही सामाजिक प्रश्नाचा म्हणण्यासारखा संबंध पोंचत नाहीं. असें असतां अमुक एक सामाजिक सुधारणा आम्ही करूं तरच आम्ही राजकीय हक्क मिळण्यास पात्र होऊं, अशा रीतीनें आपलें मत प्रदर्शित करणें म्हणजे आधींच नाखुष असलेल्या सरकारास लोकांच्या मागण्या नाकबूल करण्यास उत्तेजन देण्यासारखें नव्हें काय? आणि तें कशा-करितां तर आपलीं समाजसुधारणेचीं मतें लोकांनीं कबूल करावी म्हणून. म्हणजे समाज सुधारणेकरतां राजकीय सुधारणा अडकून राहिली तर बेहेत्तर आहे, असेंच म्हणण्यासारखें आहे. आम्हांस हें म्हणणें अगदीं नापसंत आहे; व रा. ब. रानडे अथवा डॉ. भांडारकर यांसारखे विद्वान् गृहस्थ जरी त्या मताचे असले तरी जोंपर्यंत तें मत आम्हांस सयुक्तिक अथवा हितकारक वाटत नाहीं तोंपर्यंत आमची प्रत्यक्ष किंवा परोक्ष त्या मतांस संमती देणें म्हणजे आम्हीं आपल्या कर्तव्यास विसरण्यासारखेंच आहे. न्या. रानडे अथवा डॉ. भांडारकर यांच्या विद्वत्तेबद्दल आम्हांसही त्यांच्या अनुयायांप्रमाणेंच अभिमान वाटत आहे. पण यांच्यासारख्या विद्वानांनीं २५-३० वर्षांपूर्वी ज्या गोष्टींचा उपक्रम केला, त्याचा पाया चांगल्या तत्त्वांवर रचला गेला आहे, अशी आमची

समजूत नसल्यामुळें आम्हांस त्यांच्या कृतींचे वास्तविक स्वरूप लोकांपुढें मांडावें लागतें त्यांस आमचा नाइलाज आहे. [इंग्रजी राज्याच्या आरंभीं पाश्चात्य शिक्षणामुळें एकदम जे मनोविकार जागृत झाले त्यांपैकीं कांहीकांचा जोर गेल्या २५-३० वर्षांत बराच कमी झालेला आहे. आमचा धर्म अगदीं टाकाऊ आहे, आमची समाजरचना अगदीं चुकीची आहे, वर्णव्यवस्था सर्वांशीं गैरफायद्याची व द्वैधीभाव वाढविणारी आहे, आणि ती मोडल्याखेरीज देशाच्या भावीं उत्कर्षाचा आरंभही व्हावयाचा नाहीं इत्यादी अपरिपक्व विचार आतां सर्वांशीं फारच थोड्या लोकांस ग्राह्य वाटतात अशी स्थिती झाली आहे. ही स्थिति येण्यास इंग्रजी विद्येचा अतिपरिचय हें एक तर कारण खरेंच, पण त्याखेरीज आमच्या देशाच्या प्राचीन विद्येचें युरोपिअन लोकांनीं केलेलें पुनरुज्जीवनही बऱ्याच अंशीं हा परिणाम घडवून आणण्यास कारणीभूत झालेलें आहे. एका प्रसिद्ध इंग्रजी इतिहासज्ञ कायदेपंडिताचें असें मत आहे कीं, युरोपांतील राष्ट्रांची सुधारणा होण्यास त्यांतील वर्णव्यवस्था मोडून समाजाची रचना परस्परांच्या सोयी व करार यांवर उभारली गेली, हें मुख्य कारण होय. वर्णव्यवस्थेंत प्रत्येक मनुष्याचा धंदा अथवा उद्योग त्याच्या इच्छेंतून भिन्नकारणांनीं नियंत्रित झालेला असतो. परंतु युरोपांतील स्वतंत्र देशांत हवा तो धंदा हवा त्यास करण्यास मोकळीक असते, त्यामुळें परस्परांची चढाओढ लागून चांगलें तेवढेंच लोक पुढें येतात व बाकीच्यास अन्नाचीही भ्रांत पडते असें आतां पूर्णपणें आढळण्यांत आलें आहे. सारांश, कोणतीही समाजरचना घ्या, ती सर्वांशीं निर्दोष म्हणून कधींही असावयाची नाहीं, हें तत्त्व आतां बऱ्याच लोकांच्या लक्षांत येऊन चुकलें आहे.—["चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः' हा हिंदुसमाजाचा पाया आहे; व इच्छेस येईल तसें करण्यास प्रत्येकास, तो करारानें बांधला नसल्यास, मोकळीक आहे; हें पाश्चात्य राष्ट्रांतील समाजरचनेचें तत्त्व आहे. आतां रा. ब. रानडे वगैरे कांहीं गृहस्थांचें असें म्हणणें आहे कीं, आमच्या समाजाची इमारत या पूर्वींच्या पायावरून ओढून या दुसऱ्या पायावर ठेविली पाहिजे. नाहींपेक्षां एकोणिसाव्या शतकाच्या राष्ट्रीय झगड्यांत आपला निभाव लागणार नाहीं! आमच्या मतें हें सयुक्तिक नाहीं. युरोपांतील राष्ट्रांच्या समाजाची घटना जरी निराळ्या तत्त्वांवर झाली असली तरी त्या राष्ट्रांतील समाजपद्धतीपासून वाईट परिणाम होत नाहींत असें नाहीं. 'गांव आहे तेथें महारवाडा आहेच', या म्हणीप्रमाणें युरोपांतील राष्ट्रांतही समाजसुधारणा होण्यास अद्याप पुष्कळ जागा आहे. चढाओढीच्या तत्त्वावर रचलेल्या समाजांत संपत्तीची सारखी वाटणी न होतां कांहीं अतिशय

श्रीमंत व कांहीं अतिशय दरिद्रि अशी स्थिती प्राप्त होते. आणि विवाह संस्कारासही कराराचें स्वरूप आल्यामुळें विधवांच्या ऐवजीं कुमारिकांची संख्या वाढून गृहस्थाश्रमाच्या सुखास पुष्कळ स्त्रिया अंतरतात. या दोन उदाहरणांवरून अमुकच तत्त्वावर समाजाची रचना झाली असल्यास तें राष्ट्र सुखी होतें, हें म्हणणें किती अविचाराचें आहे हें लक्षात येईल. [स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांहीं जोम आहे, तो जोंपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत समाजरचना कशीही असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहींत. पण एकदां कां तो जोम नाहींसा झाला म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणें छातीवर बसून जगांत त्या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात !] सारांश, समाजरचनेपेक्षां लोकांमध्यें एक प्रकारचा आपल्या संस्थांबद्दल व देशाबद्दल अभिमान जागृत ठेवण्याची प्रत्येक देशकल्याणाकरितां झटणाऱ्या माणसानें आधीं तजवीज ठेविली पाहिजे. जुन्यास सोडून जातां कामां नये, असे नुसते शब्द वापरल्यानें हा कार्यभाग होत नाहीं. तो होण्याबद्दल जुन्या संस्थांबद्दल खरोखरच योग्य अभिमान वाटावयास पाहिजे. " योग्य " म्हणण्याचे कारण एवढेंच कीं, हल्लींच्या काळांत सर्वांशीं अगर सर्वतोपरी जुन्या संस्था चालणें दुर्घट आहे, हें आम्हासहीं मान्य आहे. पाश्चात्य राष्ट्राची व आमची कर्मधर्मसंयोगामुळें जी सांगड पडली आहे तिचा साखळीच्या दोन्हीं दुव्यांवर परिणाम झाल्याखेरीज रहावयाचा नाहीं. तथापि तेवढ्यामुळेंच आमच्या समाजरचनेचा पाया खणून काढून पुन: नवा पाया घातल्याखेरीज चालावयाचे नाहीं, असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. रा. ब. रानडे व रा. ब. डॉ. भांडारकर यांची दिशा याहून भिन्न आहे. जातिभेद मोडून स्त्रियांस करारशास्त्रांतील सिद्धांताप्रमाणें मोकळीक मिळाल्याखेरीज देशाचें पुढें पाऊल पडावयाचें नाहीं, असें त्यांच्या मुखांतून अनेक वेळां उद्गार निघालेले आहेत, व या उद्गारांस अनुरूप अशीच गेल्या २५-३० वर्षांतली त्यांची वर्तणूक आहे. अलीकडे अलीकडे या विद्वानांचे कांहीं उद्गार निराळ्या तऱ्हेचे येऊ लागले आहेत, पण हा फेरफार अद्याप वराच वरकरणी आहे असें आम्हांस वाटतें. मिसेस ॲनी बिझांट यांची ज्याप्रमाणें युरोपांतील समाजरचनेचीं तत्त्वें चुकीचीं आहेत अशी खात्री झालेली आहे व तशी खात्री झाल्यामुळें हिंदुसमाजाच्या समाजरचनेचीच मूळतत्त्वें इह व परलोकीं प्रत्येकास अधिक हितावह आहेत असें त्या सांगत फिरत आहेत., त्याप्रमाणें आमच्या सुधारक वर्गाची अद्याप पुरी समजूत झालेली नाहीं; व त्यामुळेंच बूथ साहेब अगर पंडिता रमाबाई यांच्यासारख्यांच्या ते सहज नादीं लागतात. हिंदुसमाजाच्या स्वरूपांत अगर रचनेंत फेरफार व्हावयास नको अगर

तो व्हावयाचा नाहीं, असें आम्हीं म्हणत नाहीं. प्राच्य व पाश्चात्य, आध्यात्मिक व आधिभौतिक अथवा वर्णव्यवस्थांकित व यदृच्छाचारप्रवर्तक अशा नव्या जुन्या सुधारणांचा संयोग झाल्यानें जुन्या समाजरचनेच्या तत्त्वांत कांहीं तरी फेरफार झाला पाहिजे, व होईल, हें म्हणणें कोणासही मान्य करावें लागेल, [त्याबद्दल वाद नाही. वाद काय तो एवढाच कीं, वर ज्या दोन तऱ्हेच्या सुधारणा सांगितल्या त्यांपैकी एकीचा लोप करून दुसरी स्थापन करावयाची अथवा जुन्या संस्थेंतच योग्य असे कांहीं फेरफार करून तिचें पुनरुज्जीवन करावयाचें. रा. ब. रानडे म्हणतात तो मतभेद हाच होय; व याचकरितां प्रसंगविशेषीं मोठालीं रणें माजतात. हिंदुस्थान देशांत अनेक जातींचे, पंथांचे व धर्मांचे लोक आहेत. या सर्वांची एकवाक्यता करण्यास एक भाषा, एक धर्म, सर्वांचे एकमेकांशीं अप्रतिबंध रोटीबेटी व्यवहार यांखेरीज दुसरा मार्ग आहे कीं नाहीं व असल्यास तो कोणता हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. आमच्या देशांत जातही एक नाहीं व धर्मही एक नाहीं, तर सर्वांची तोंडमिळवणी कशी होणार, असे विचार मनांत येणें अगदीं साहजिक आहे, व अव्वल इंग्रजींत या प्रश्नास जें उत्तर मिळालें त्याचेंहीं आम्हांस फारसें नवल वाटत नाहीं. पण या पंचवीस तीस वर्षांत हे विचार पालटण्यास बरींच कारणें झालीं आहेत. "वेदांतासारख्या व्यापक धर्मांत सर्व धर्मांचा अंतर्भाव करून ' स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मोभयावह: ' या किंवा ' येऽन्य देवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विता:। तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ' आणि . . . . .

> मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्यु: पापयोनय:।
> स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेपि यान्ति परां गतिम् ' ॥

या भगवद्वचनांत सांगितल्याप्रमाणें सर्व धर्मांच्या व पंथांच्या लोकांचें ऐक्य होणें वर्णसंकर करून एकधर्म करण्यापेक्षां अधिक सुखकर व शक्य आहे असें पुष्कळांचें अलीकडे मत होऊं लागलें आहें; व बंगाल्यांतील सामाजिक सुधारणेच्या इतिहासावरून या मतास जास्त बळकटी येऊं पहात आहे. " हिंदुस्थान देशास हल्लीं जी स्थिति प्राप्त झाली आहे तशी स्थिति पूर्वी कोणत्याही राष्ट्रास प्राप्त झाली नव्हती, तेव्हां कोणत्याही राष्ट्राचा दाखला आमच्या सर्वांशीं उपयोगी पडावयाचा नाहीं. युरोपांतील समाजरचनेचें तत्त्व आम्हीं सर्वांशीं घेऊं म्हटलें तर आमच्या प्रयत्नांस यश येण्याची फारशी आशा बाळगावयास नको. [वर्णव्यवस्थेमुळेंच हजारों वर्षें आम्हीं आपला आपलेपणा कायम राखून एकसारखे स्वतंत्र नाहीं तरीं जिवंत तरी राहिलों आहों. हा आपलेपणा एकदां सोडून द्या, म्हणजे आमचेजवळ आहे तें आम्हीं गमावून बसूं; इतकेंच नाहीं तर ' इदंचनास्ति ' आणि 'परं च न लभ्यते ' अशी आमची स्थिति

होऊन इसापनीतींतील भाकरीचा तुकडा तोंडात धरून जाणाऱ्या कुत्र्याप्रमाणें आम्हीं अन्नासही मोताद होऊन जाऊं. सुधारणा कोणास नको आहे असें नाहीं, पण तिचे मार्ग अगदीं भिन्न आहेत, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. आतां याचा हल्लींच्या वादाशीं कसा संबंध पोचतो हे पुढें एखादे वेळेस सांगूं.

---

# ४. आशिया खंडांतील कारस्थानें

२६ मे १९०३

हिंदुस्थानदेश इंग्रजी अमलाखालीं गेल्यापासून देशसंरक्षणाचा सर्व मक्ता राजकर्त्यांनींच आपलेकडे घेतला. राणीसरकारचे राज्यांत इंग्रजी बंदुकांच्या आवाजानें जिकडे तिकडें शांतता खेळूं लागली. सरकारचा कर, सावकारांचें देणें व भुरट्या चोरांची लुटालूट यांतून जेवढें वांचेल त्याचा सुखेनैव उपभोग घेण्याला लोकांना पूर्णपणें सवड मिळाली. जें मिळेल तें खावें, संतानवृद्धि आणि संतानपोषण यांतच सर्व आयुष्य खर्चावें, व राहील तो वेळ आणि बुद्धि आपापसांत कलह माजविण्याकडे लावावी, या पलीकडे हिंदुस्थानांतील इंग्रजी शांततेनें सुखावलेल्या प्रजेस दुसरें कर्तव्यच नाहीसें झालें. शरीराला बाह्यसुख व स्वास्थ्य मिळूं लागलें कीं, अंतर्गत रोग उत्पन्न होतात, असा वैद्यशास्त्राचा अनुभव आहे. त्याचप्रमाणें कोणत्याहि राष्ट्राला बाह्य शत्रूपासून स्वसंरक्षण करण्याची काळजी नाहींशी झाली म्हणजे त्यांतहि अंतर्गत कलह, घरभेदेपणा आणि सार्वत्रिक शैथिल्य इत्यादि रोग उत्पन्न होऊन तें राष्ट्र उत्तरोत्तर खालावत जातें, असें इतिहासावरून आपणांस दिसून येतें. प्रत्येक देशांत धर्मभेद, ज्ञातिभेद व मतभेद कमीअधिक प्रमाणानें असतात; परंतु जोंपर्यंत एका सामान्य परकीय शत्रूशीं टक्कर देण्याची जरूर त्या देशांतील लोकांना भासत असते तोंपर्यंत ते आपले सर्व अंतर्गत भेद विसरून सामान्य राष्ट्रीय कार्याकरितां एकवट होऊं शकतात; व त्यामुळें एकंदर राष्ट्रांत एक प्रकारचें बंधुप्रेम व राष्ट्रीय अभिमान जागृत राहतो. इंग्लंडांत आठवें शतकांत तीनचार भिन्न जातींचे लोक असून एकमेकांशीं भांडत होते परंतु तेच परकीय डेन्स लोकांची स्वारी झाल्याबरोबर एकवटून अँग्लो-सॅक्सन राष्ट्र बनलें. पुढें सॅक्सन व नॉर्मन लोकांचें वैमनस्य कांहीं दिवस चालून दोन्ही जाती देशकार्याकरितां एकवट झाल्या व आजचें इंग्रजी राष्ट्र बनलें. फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे देशांतहि तोच प्रकार आढळून येतो. अगदीं अलीकडे जपान देशांतहि दोन प्रबळ पक्ष कित्येक शतकें एकमेकांशीं झुंजत असतां परकीय अमेरिकन व इंग्रजी लढाऊ जहाजें किनाऱ्यावर येऊन थडकतांच ते एकवटून जाऊन जपानी राष्ट्राचा उदय झाला. परंतु हिंदुस्थानसारख्या परकी अमलाखालीं गेलेल्या देशांत मात्र ही गोष्ट अशक्य होते. परचक्रापासून देशाचें रक्षण करण्याचा सर्व मक्ता जिकणाऱ्या राष्ट्रांनीं

घेतल्यामुळें लोकांना मुख्य व महत्त्वाचें असें राष्ट्रीय कर्तव्यच नाहींसें झाल्यासारखें होतें. आपसांतील क्षुद्र भेद विसरून जाण्याला मुख्य कारण जे परशत्रूची भीति त्याचा येथें अभाव असल्यामुळें ह्या अंतर्गत भेदांना फाजील महत्त्व येते व देशांतील चांगल्या लोकांची बुद्धीहि त्यांतच सुख मानूं लागते. ज्या बुद्धीचा व कर्तृत्वशक्तीचा रोंख जगांत आपल्या राष्ट्राची महती वाढविण्याकडे असावयाचा, त्यांचाच विनियोग ज्ञातिद्वेष, परस्परवैमनस्य आणि आत्ममहत्त्व वाढविण्याकडेच होऊं लागतो; आणि तेणेंकरून राष्ट्रामध्यें उत्तरोत्तर अधिक फाटाफूट व विस्खलितपणा उत्पन्न होऊन तें राष्ट्र लवकर विलयास जातें. हिंदुस्थानचा गेल्या ४०-५० वर्षांतील इतिहास पाहिला तर या गोष्टींचे प्रत्यंतर आल्यावांचून राहणार नाहीं. शिवाजीचे वेळींहि ब्राह्मण, मराठे, परभू, शेणवी इत्यादि जाति होत्या, नाहीं असे नाहीं; किंवहुना हल्लींपेक्षांही अधिक कडक जातिनिर्बंध त्यावेळीं पाळले जात होते. तथापि हल्लींच वेदोक्तासारखीं प्रकरणें माजावीं व शिवाजीचे वेळचे लोकांस त्याचा विचारहि सुचूं नये यांतील वीज हेंच होय. ज्या वेळेस निधर्मी लोकांचे जुलमापासून स्वधर्माचें रक्षण करण्याची आवश्यकता प्रत्येक मराठ्याचे, ब्राह्मणाचे व शेणव्याचे अंतःकरणांत पूर्णपणें जागृत होती त्या वेळी अमुक मनुष्य संध्या वेदोक्तानें करतो कीं, पुराणोक्तानें करतो, हा विचारच मनांत येण्याचा संभव नाहीं. वेदहि आपलेच व पुराणेंहि आपलींच, व दोन्हीं नाहींशीं होण्याची वेळ आली असतां कोणतें बरें हा वादच लोकांचें मनांत येत नाहीं. परमेश्वर एकच आहे व कोणत्याहि मार्गानें त्याची उपासना केली असतां त्यांस पोचतें, ही बुद्धि जेव्हां लोकांचे मनांत दृढपणें बिंबलेली असते त्या वेळेस असले वादच उत्पन्न होत नाहींत. परंतु जेव्हां खरी धर्मवासना नसते व स्वधर्मसंरक्षण किंवा राष्ट्रसंरक्षण करण्याकरितां परस्परभेद विसरून एकवट होण्याची आवश्यकता उत्कटतेनें भासत नाहीं, त्यावेळीं अर्थातच असले बुद्धिभेद उत्पन्न करणारे वाद उपस्थित होऊन आपसांत दुही माजते. पेशव्यांचें, कारकीर्दींत जातिभेदाचे प्रश्न अनेक वेळां उपस्थित झाले ; व नाना आणि महादजी यांचे मधील प्रतिस्पर्धा तर सर्वविश्रुत आहे. तथापि ज्या ज्या वेळीं परकीयांशी तोंड देण्याचा प्रसंग आला त्यावेळीं हे सर्व भेद विसरून 'मराठा तितुका एक' हा सर्वसामान्य विचारच मराठ्यांचे सैन्यास जयश्री मिळण्यास कारण झाला हे पेशव्यांचे इतिहासांत ठिकठिकाणीं नमूद आहे. तात्पर्य, [ज्ञातिभेद व अंतस्थ कलह नाहींसे करण्याला साधारण संकट व तन्निवारणार्थ संहत प्रयत्न करण्याची आवश्यकता हाच खरा उपाय आहे. प्रीतिभोजनें, मिश्रविवाह किंवा सामाजिक परिपदें असल्या शुष्क उपायांनी

हे समाजरोग बरे होत नाहींत. राष्ट्रीय अभिमान प्रदीप्त करण्याला एक परकी शत्रू जशी मदत करतो तशी शेकडों व्याख्यानें व हजारों पुस्तकें यांनी होत नाहीं. असे प्रत्येक जिवंत राष्ट्राचे इतिहासावरून आपणांस आढळते. दुर्दैवानें किंवा सुदैवानें म्हणा, आपणा हिंदुस्थानवासी लोकांस हा मार्ग आतां बहुतेक खुंटला आहे. आपलें परचक्रापासून रक्षण करण्याचा सर्व जिम्मा इंग्रज लोकांनीं घेतल्यामुळें आपणांस आतां पाळीव जनावराप्रमाणें टाकलेली भाकरी खाऊनच पुष्ट झालें पाहिजे. तथापि हल्लींच्या स्थितींतहि अगदीं निराश होण्याचें कारण नाहीं; इतकेंच नाहीं, तर एकप्रकारें थोडाबहुत फायदाहि आहे. परराष्ट्रीय कारभाराचीं सर्व सूत्रें राजकर्त्यांच्या हातीं असल्यामुळें आपली कर्तृत्वशक्ति जरी तेवढ्या अंशानें संकुचित झाली आहे, तरी इंग्रजी अंमलांत मिळालेलें पूर्ण विचारस्वातंत्र्य व इंग्रजी शिक्षणानें प्राप्त झालेली प्रगल्भ विचारशक्ति यांचा उपयोग करून हल्लीं चालू असलेल्या राष्ट्रांच्या हालचालींत आपल्या देशाचा हितसंबंध किती व कसा काय आहे, हें त्रयस्थ या नात्यानें पाहण्यास चांगली सवड आहे. त्रयस्थ म्हणण्याचें कारण या अनेकराष्ट्रीय नाटकांत हिंदुस्थानच्या लोकांस प्रत्यक्ष भूमिका मुळींच नाहीं व त्यामुळें त्यांत उत्पन्न होणाऱ्या रागद्वेषादि मनोविकारांपासून अलिप्त राहून केवळ प्रेक्षक या नात्यानें या राष्ट्रीय घडामोडींपासून आपल्या लोकांचें कितपत नफानुकसान होणार आहे, हें आपल्या राजकर्त्यांपेक्षांही कांहीं अंशानें अधिक चांगलें आपणांस कळण्यासारखें आहे. शिवाय असल्या विषयांचा विचार करण्याची आपणांस जों जों अधिक संवय लागेल तों तों हिंदुस्थानांतील सर्व लोक एका राष्ट्राचे घटकावयव आहेत, आपलें सर्वांचें कांहीं तरी एक सामान्य हित आहे, व त्या हितप्राप्तीकरतां आपण सर्वांनीं अवांतर सर्व भेद विसरून जाऊन एक मनानें विचार व प्रयत्न करण्यास शिकलें पाहिजे ; ही भावना हिंदुस्थानांतील सर्व जातींचे, वर्णांचे व धर्मांचे लोकांमध्ये, अधिक वळावत जाईल व तेणेंकरून परस्परांतील प्रेमबंधन व एकराष्ट्रीयत्वाची कल्पना कालांतरानें दृढतर होईल यांत शंका नाहीं. व या दृष्टीनेंच आम्हीं आज आशियाखंडांत हल्ली चालू असलेल्या कित्येक घडामोडींचें दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे. आशियाखंडांतील निरनिराळ्या भागांत युरोपियन राष्ट्रांच्या ज्या अनेक हालचाली सध्यां चालू आहेत त्यांचा हिंदुस्थानचे हिताशीं निकट संबंध आहे, इतकेंच नाहीं तर आमची भवितव्यता पुष्कळ अंशानें त्यांजवर अवलंबून आहे असें म्हटलें तरी चालेल. या चळवळींचा आपले इंग्रज राज्यकर्ते स्वतःच्या फायद्याच्या दृष्टीनें विचार करीत आहेतच; व वेळोवेळीं त्या धोरणानें त्यांची क्रियाहि घडत आहे. पण राजकर्त्यांचें हित

तेंच सर्वांशीं हिंदुस्थानवासी लोकांचेंहि हित असेंच केवळ नाहीं, व मानवी स्वभावाला अनुसरून आपल्या राजकर्त्यांची दृष्टि अर्थातच स्वहिताकडे विशेष असावयाची ; व त्यामुळें क्वचित हिंदुस्थानांतील लोकांचे हिताकडे त्यांचे दुर्लक्ष होण्याचा पुष्कळ संभव आहे. सबब आपण स्वतंत्रपणें या राष्ट्रीय घडामोडींचा आपल्या दृष्टीनें विचार करून आपले विचार वेळोवेळीं राजकर्त्यांस कळविणें अत्यंत आवश्यक आहे.

## ५. हिंदुत्व आणि सुधारणा

१२ जानेवारी १९०४

गेल्या खेपेस मद्रासेस नव्या स्थापन झालेल्या 'हिंदु असोसिएशन' चा उल्लेख करतांना समाजसुधारणेचा पाया हिंदुधर्म असल्याखेरीज आमच्या देशांत खरी सामाजिक सुधारणा होणें नाहीं, असें आम्ही म्हटलें होतें. याजवर एक दोघांकडून असे आक्षेप आले आहेत कीं, " कायहो, तुम्हीं हिंदुत्व कायम राखून जी सुधारणा करणार तींत आणि हल्लींच्या सामाजिक परिषदेंत होत असलेल्या सुधारणेंत अंतर काय ? स्त्रीशिक्षण, बालविवाह, पोटशाखेतील अंतर्विवाह, समुद्रयात्रा, इत्यादि विषयांसंबंधानें तुमच्या आणि हल्लींच्या सामाजिक सुधारकांच्या मतांत विशेषसा फरक दिसत नाहीं. आणि असा फरक जर नाहीं तर हल्लींच्या सामाजिक सुधारकांच्या विरुद्ध लिहून लोकांमध्यें त्यांच्याविषयीं अनादर तुम्हीं कां उत्पन्न करतां ? हा प्रश्न ज्या गृहस्थांनीं विचारला आहे त्यांनी तो चांगल्या हेतूनेंच विचारला आहे असें आम्हीं गृहीत धरून चालतों. परंतु एवढें म्हणणें भाग आहे कीं, त्यांचा हेतु जरी चांगला असला तरी आमच्या आजपर्यंतच्या म्हणण्याचा त्यांनी नीट विचार केलेला दिसत नाहीं. समाज-सुधारणा नको असें म्हणणारे आम्ही नाहीं, ही गोष्ट अनेक प्रसंगीं कंठरवानें आम्हीं सांगितलेली आहे. परंतु हल्लींच्या सुधारकांचे आणि आमचे मार्ग निराळे आहेत आणि हे मार्ग ज्या कारणांनी उपस्थित झालेले आहेत, तीहि भिन्न आहेत. या भेदामुळें हल्लींच्या सुधारकांत आणि आमच्यांत जो विरोध उत्पन्न झालेला आहे तो बहुतेक अपरिहार्य आहे, असें आजपर्यंतच्या आमच्या लेखांवरून वाचकांस कळून आलें असेल. सामाजिक परिषदेला अभिप्रेत असलेल्या गोष्टी केवळ सुधारणा म्हणून ग्राह्य करण्यास आम्हीं तयार नाहीं, असें आम्हीं अनेकदां म्हटलें आहे. या वाक्याचा अर्थ उघड आहे, तथापि तो आणखी स्पष्टपणें समजावयास पाहिजे असल्यास आपण एक उदाहरण घेऊं. मूर्तिपूजा असावी किंवा नसावी हा वाद स्वतंत्र आहे. त्याचा आज विचार कर्तव्य नाहीं. तथापि मूर्तिपूजा नको म्हणणारे जे लोक आहेत, त्यांत आर्यसमाजाचे लोक ज्याप्रमाणें येतात त्याचप्रमाणें मुसलमान किंवा ख्रिस्ती लोकही येतात. अर्थात् मूर्तिपूजानिषेध ही सुधारणा आर्यसमाजवाले, मुसलमान व ख्रिस्ती या तिघांसही इष्ट आहे. पण या तिघांपैकीं पहिल्याची म्हणजे आर्यसमाजवाल्यांची

सुधारणा हिंदुत्वाच्या पायावर आहे ; आणि ख्रिस्ती व मुसलमान यांची हिंदुधर्माविरुद्ध अथवा हिंदुत्वाविरुद्ध आहे असें कोणीही कबूल करील. दुसरें उदाहरण पाहिजे असल्यास बौद्ध आणि वेदांत मतांचें घ्या. यज्ञामध्यें पशूची हिंसा केल्यानें स्वर्गप्राप्ती होत नाहीं, असें बौद्धांचे मत आहे; आणि तेंच मत बहुतेक उपनिषदांतही ग्रथित केलेलें आहे. किंबहुना पशुयज्ञाऐवजी ज्ञान-यज्ञाचा प्रचार जो हिंदुस्थानांत सुरू झाला तो उपनिषद्धर्म किंवा वेदांतमत प्रचारांत आल्यानें झाला, असें उघड दिसतें. यासंबंधानें वेदांतमतांचें प्राबल्य इतकें झालें आहे कीं, आतां पशुयज्ञ बहुतेक लुप्तप्राय झाला आहे, असें म्हटलें तरी चालेल. पशुयज्ञ बंद होण्याची ही सुधारणा सुचविणारे बौद्ध आणि वेदान्ती असे दोन प्रकारचे लोक होते. दोघांचाहि हेतु एकच ; पण बौद्धांची सुधारणा हिंदुत्वाला सोडून झाली; आणि वेदांत्यांची सुधारणा हिंदुत्वाला धरून झाली. तिसरें उदाहरण जातिभेदासंबंधानें घ्या. बौद्धधर्मांत जातिभेद मानलेला नाहीं, आणि भागवतधर्मांतहि जातिभेदाचें महत्त्व कमी आहे. तथापि भागवतधर्माची सुधारणा हिंदुत्वाला धरून आहे आणि बौद्धांची हिंदुत्वाला धरून नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. या तीन उदाहरणांवरून एवढें लक्षांत येईल कीं, सुधारणेची बाब जरी एक असली तरी ती हिंदुत्व कायम ठवून अंमलांत आणतां येते, आणि ते बुडवूनहि अमलांत आणतां येते, शंकराचार्यांस कित्येकांनीं 'प्रच्छन्न बौद्ध' म्हटलेलें आहे ; म्हणजे बौद्धांच्याच कांहीं मतांचें हिंदुत्वाच्या दृष्टीनें समर्थन करून आचार्यांनीं त्यांचा स्वीकार केला आहे, असें कित्येकांचें म्हणणें आहे, आणि तें एका दृष्टीनें खरेंहि आहे. तथापि शंकराचार्य हे वैदिक मार्ग-प्रवर्तक व बुद्ध वैदिकमार्ग-ध्वंसक होता असें सर्वांचें मत आहे. सारांश, साध्य गोष्ट जरी एकच असली तरी ती साधण्याचें जें भिन्न भिन्न मार्ग आहेत त्यांचें ज्याप्रमाणें एखादा मनुष्य अवलंबन करील त्याप्रमाणें तो मनुष्य निरनिराळ्या पंथांचा बनतो, एवढें निर्विवाद आहे. वर लिहिलेल्या उदाहरणांपेक्षाहि जास्त व्यापक उदाहरण घेणें असल्यास ते परमेश्वरप्राप्तीचें घ्या. परमेश्वरप्राप्ति हा हेतु सर्वांचा सारखाच आहे; तथापि ख्रिस्ती लोक बायबलांत सांगितलेल्या पंथानें, मुसलमान लोक कुराणांतील पंथानें, हिंदु लोक वैदिक मार्गानें, आणि बुद्ध लोक बुद्धप्रणीत मार्गानेंहि प्राप्ति करून घेतात. इष्ट हेतु किंवा साध्य गोष्टी एकच असूनहि मार्गांच्या भेदानें भिन्न भिन्न पंथ कसे होतात हें एवढ्या-वरून कळून येईल.

मद्रासेस हिंदुसभा स्थापन करण्याचे प्रो. रंगाचार्य यांनीं जे हेतु लिहिले आहेत, आणि सभेच्या दिवशीं ॲनी बिझांट यांचें जें व्याख्यान झालें त्यांत

आम्हीं वर सांगितलेल्या गोष्टींचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. आमच्या मुलां-मुलींस धर्म आणि नीति यांचें चांगलें शिक्षण मिळालें पाहिजे; बालविवाहाचा प्रघात मोडून सुश्रूतानें सांगितल्याप्रमाणें पुढील संतति सदृढ निपजली पाहिजे; निरनिराळ्या देशांत आमचे लोक जाऊन तेथून निरनिराळ्या विद्या त्यांनीं संपादन करून आणिल्या पाहिजेत; जातिद्वेष मोडून खालच्या जातींच्या लोकांस वरच्या जातींतील लोकांप्रमाणेंच भगवत्प्राप्तीचे मार्ग खुले होऊन दोघांमधील सलोखा वाढविला पाहिजे; पोटजातींतील लोकांमध्यें बेटी व रोटीव्यवहार सुरू होऊन त्यांमधील भेद उत्तरोत्तर कमी होत चालले पाहिजेत; आणि देशांतील एकंदर सर्व जातींचा मेळ किंवा त्यांमधील सलोखा जितका अधिक वाढेल तितका आम्हांस पाहिजे आहे, असे प्रो. रंगाचार्य व ॲनी बिझांट या दोघांनीही सांगितलें आहे. एकाच बाबतींत काय तो थोडासा फरक आहे. तो हा कीं, उच्च प्रतीच्या हिंदु विधवांनीं पुनर्विवाह करण्यापेक्षां व्रतस्थ राहून समाजाची सामाजिक उन्नति करण्याचा प्रयत्न करावा, असें बिझांटबाई म्हणतात; आणि सुधारकवर्ग त्यांनी पुनर्विवाह करावा, असें म्हणतात. परंतु सामाजिक सुधारक आणि प्रो. रंगाचार्य यांच्यामध्यें जो विरोध आहे तो एवढ्या भेदा-करितांच आहे असें नाहीं; वर सांगितल्याप्रमाणें या दोघांच्याहि मार्गांत अंतर आहे. सामाजिक सुधारणेचा प्रश्न हल्लीं ज्या लोकांनी पुढें आणिलेला आहे, त्यांस हिंदुधर्माचा अभिमान नाहीं, हिंदुत्व म्हणून कांहीं विशिष्टपणा पाहिजे असें त्यांचें म्हणणें नाहीं व हिंदुधर्मांतील तत्त्वें समजून घेण्याचा त्यांनी कधीं प्रयत्न केलेला नाहीं, असें प्रो. रंगाचार्य यांचें म्हणणें आहे व तें खरेंहि आहे. हा परिणाम इंग्रजी शाळांतून मिळत असलेल्या शिक्षणाचा आहे, ही गोष्ट प्रो. रंगाचार्य व ॲनी बिझांट यांस कबूल आहे. पण त्यांचें असें म्हणणें आहे कीं, केवळ समाजाच्या चालीरितींत अमुक अमुक फरक झाले म्हणजे सुधारणा होते असें नाहीं. कोणत्याहि सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट राष्ट्रीयत्वाचा अभिमान जागृत करणें हा होय. तो अभिमान आम्हीं कोणता धरावयाचा? अर्थात् हिंदुत्वाचा होय. आम्हांला धर्माची कांहीं एक परंपरा आहे, त्या परंपरेंत जें ज्ञान आहे तें इतर धर्मांतील ज्ञानाच्या बरोबरीनें किंबहुना त्याहूनही श्रेष्ठ आहे, आणि जर ही परंपरा आम्ही सोडून दिली तर आमचें असें म्हणण्यासारखें आम्हांस सामान्य बंधन कांहींच नाहीं; या गोष्टीं नेहमीं लक्षांत बाळगल्या पाहिजेत. सामाजिक परिषदेचे पुरस्कर्ते आणि प्रो. रंगाचार्य व बिझांटबाई यांच्यामधील खरा मतभेद जो आहे तो हाच आहे. कोणतीहि सुधारणा अंमलात आणतांना समाजांतील रूढ संप्रदायास अनुसर-

धुळें ग्रंथ संग्रहालय. ठाणे. रत्नाकर
अनुक्रम ७५५७५ वि: ...
अंक ... नों दि: ...


णाऱ्या लोकांचा अडथळा यावयाचाच. तो हिंदुत्व राखून सुधारणा करणाऱ्या लोकांस यावयाचा नाहीं, असें प्रो. रंगाचार्य म्हणत नाहींत. कोणतीहि नवी गोष्ट समाजांत प्रचलित करावयाची झाली म्हणजे तीस अडथळा हा येणारच. पण तो अडथळा काढून टाकण्याचेहि दोघांचे मार्ग निरनिराळे आहेत. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती व पारशी या सर्वांची एक सामाजिक परिषद भरून तींत सर्वानुमतें कांहीं ठराव मंजूर करणें व ते हव्या त्या रीतीनें अंमलांत आणण्याचा प्रयत्न करणें हा हल्लींच्या सामाजिक सुधारकांचा मार्ग होय. प्रोफेसर रंगाचार्य यांचें म्हणणें असें आहे कीं, हा मार्ग अयोग्य आहे. राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें सर्व अधिकार राजाच्या किंवा एखाद्या विशिष्ट संस्थेच्या ताब्यांत असतो तसा हिंदु समाजांतील सामाजिक बाबतींतील अधिकारहि कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या व संस्थांच्या ताब्यांत आहे; आणि या संस्था व व्यक्ति हिंदुशास्त्रांत सांगितलेल्या कांहीं नियमांनी चाललेल्या आहेत. या व्यक्ति, संस्था किंवा शास्त्र यांच्याविरुद्ध उघड बडबड केल्यानें कांहीं फायदा नाहीं. तर ज्याप्रमाणें राजकीय बाबतींत आम्हीं कॉंस्टिटयूशनल किंवा कायदेशीर चळवळ करतो, तशी सामाजिक बाबतींतही शास्त्रोक्त चळवळ झाली पाहिजे. लूथरनें युरोपांत धर्मक्रांति केली म्हणून सुधारक आपल्या तर्फेचें एक मोठें उदाहरण देत असतात. परंतु जरा विचार केला असतां असें लक्षांत येईल कीं, लूथर हा बायबलवर पूर्ण विश्वास ठेवणारा श्रद्धावान् ख्रिस्ती होता. आमच्या सुधारकांची अशी स्थिती नाहीं. हे केवळ उपयुक्ततावादी आहेत, धर्मशील उपयुक्तता-वादी नाहींत. याचा परिणाम असा झाला आहे कीं, यांनीं प्रचलित केलेल्या सुधारणेस समाजांतील लोक विधर्मी समजतात. हल्लींच्या सुधारकांच्या वर्गांत नाहीं म्हणावयास दिवाण बहादूर रघुनाथराव हे बहुधा एकटेच या दोषास पात्र नाहींत. पण त्यांचा व इतर सुधारकांचा लवकरच बेबनाव होऊन मद्रास येथें भरलेल्या सामाजिक परिषदेच्या बैठकीसहि ते जवळ कुंभकोणास राहात असतां गेले नाहींत. कै. न्या. रानडे हेहि अखेरीस सामाजिक सुधारणेंत हिंदुत्व कायम राहिलें पाहिजे, या मताकडे वळले होते, पण न्यायमूर्ति चंदावरकर यांची स्थिती व मतें याहून फार भिन्न आहेत. मद्रासेस यंदाच्या सालीं जो विशेष घोटाळा झाला तो यामुळेंच झाला. प्रो. रंगाचार्य यांचें असें म्हणणें आहे कीं, जुने शास्त्री व जुने पंडित हे ज्याप्रमाणें एकदेशीय असतात तसेंच नवीन इंग्रजी शिकलेले सुधारकहि एकदेशीय असतात. शास्त्री व पंडित यांस नवीन परिस्थिती माहीत नसते, तर हल्लींच्या सुधारकांस हिंदुधर्माचीं तत्वें माहीत नसतात. तेव्हां खरी सुधारणा घडवून आणण्यास शास्त्री व पंडित यांस नव्या परिस्थितीचें

आणि नव्या सुशिक्षित वर्गास हिंदुधर्मांतील तत्त्वांचे व परंपरेचें ज्ञान करून दिलें पाहिजे. असें झाल्याखेरीज दोघांचा मिलाफ व्हावयाचा नाहीं. दोघांतहि एकेक प्रकारच्या शिक्षणाची उणीव असते, व ती उणीव भरून काढणें हें खऱ्या सुधारकांचें कर्तव्य आहे. हिंदुधर्मांतील तत्त्वें सुधारणेस प्रतिकूल आहेत असें नाहीं; तसें असतें तर आजपर्यंत हिंदु धर्मानें टिकावच धरला नसतां व हिंदु राष्ट्रहि कायम राहिलें नसतें. यासाठीं प्रो. रंगाचार्य, व ॲनी बिझांटबाई वगैरे विचारी लोकांचें असें म्हणणें आहे कीं, समाजसुधारणा होणें ती हिंदुत्वाच्या पायावरच झाली पाहिजे; व ती अंमलांत आणण्यास जुन्या व नव्या मिळून दोन्हीहि वर्गांतील लोकांस त्या त्या वर्गाच्या मानानें जें जें अपुरतें आहे तें शिक्षण देऊन तयार केलें पाहिजे. धर्माच्या पायावर सुधारणा रचल्याखेरीज सुधारकांच्या आंगीं खरी कळकळ कधींहि उत्पन्न व्हावयाची नाहीं. करितां ॲनी बिझांट यांनी आपल्या व्याख्यानांत सरतेशेवटीं असें सांगितलें आहे कीं, एखाद्याच्या व्याख्यानास तुम्ही केवळ टाळ्या वाजविण्याकरिता जाऊं नका. तुमचा धर्म ही तुम्हांस वंशपरंपरेनें प्राप्त झालेली एक अमोलिक देणगी आहे. या देणगीचे महत्त्व पाश्चिमात्य राष्ट्रांसहि अमोलिक वाटत आहे. करितां पाश्चिमात्य शिक्षणानें भुलून जाऊन अनास्थेनें किंवा हयगयीनें तुम्हीं या देणगीकडे दुर्लक्ष करूं नका. आपल्या मुलामुलींस हिंदुधर्माचें शिक्षण द्या व त्या धर्माचा अभिमान त्यांच्यात जागृत करा, तो धर्म तुमच्या सामाजिक उन्नतीच्या आड येईल अशी जर तुमची समजूत असेल तर ती चुकीची आहे. तुमच्या सामाजिक स्थितींत हल्लींच्या परिस्थितीप्रमाणें सुधारणा झाली पाहिजे, ही गोष्ट खरी आहे. पण ती जर धर्माच्या पायावर झाली नाहीं तर तुमची उन्नति न होतां उलट अवनति मात्र होईल. आमच्या सामाजिक सुधारकांनीं हीं तत्त्वें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. परिषदेंत जी मंडळीं जमतात त्यापैकीं हिंदुधर्मावर कितीकांची श्रद्धा असते याचा आपल्या मनांशी त्यांनी विचार केला असतां बिझांटबाईच्या वरील उपदेशाचें रहस्य त्यांस समजून येईल. आपणांस पुढें जी ऊर्जितावस्था प्राप्त व्हावयाची आहे तीं हिंदुराष्ट्र या नात्यानें झालीं पाहिजे. इतकें लक्षांत ठेविलें व त्याप्रमाणें वर्तन राखलें म्हणजे सुधारकी पंथांत आणि नवीन झालेल्या हिंदु सभेच्या पंथांत दुसरें कांहीं अंतर नाहीं. मुख्य फरक काय तो हाच होय, आणि तो इतका महत्त्वाचा आहे कीं, बाकीच्या गोष्टी जरी एक असल्या तरी या संबंधानें दोन निरनिराळें पंथ होणें अगदी स्वाभाविक आहे. मुसलमानी परिषदेत ना. आगाखान यांनी हेंच तत्त्व लक्षांत आणून सुशिक्षित मुसलमान लोकांना इंग्रजांची केवळ नक्कल न

व्हावी एवढ्याकरितां मुसलमान युनिव्हर्सिटी पाहिजे, असें प्रतिपादन केलें आहे. तसेंच लाहोरचें अँग्लोवैदिक कॉलेज व बनारसचें हिंदु कॉलेजहि याच तत्त्वावर निघालें आहे, आणि उत्तरोत्तर हीच दिशा वाढत जाईल असा रंग दिसत आहे. सुधारणेच्या विचारांत झालेला हा फरक सुधारकांनी लक्षांत ठेवून त्याप्रमाणें आपल्या प्रयत्नांत फरक करावा अशी गेल्या ' मद्रास रिव्ह्यूच्या ' ज्या अंकांत सुधारकांपैकींच एका गृहस्थानें त्यांस सूचना केली आहे; आणि तिचा ते नीट विचार करतील अशी आम्हांस आशा आहे.

## ६. ब्राह्मण व ब्राह्मणेतर

१६ मार्च १९२०

मद्रास इलाख्याप्रमाणें अलीकडे आमच्या इलाख्यांतहि कित्येकांनीं ब्राह्मण-ब्राह्मणेतर, पुढारलेले व मागासलेले, मराठे व तत्सदृश, शिक्षित आणि अशिक्षित, अस्पृश्य आणि स्पृश्य, वगैरे अनेक भेद काढून स्वराज्या विषयींच्या पात्रतेचें हिंदु लोकांचें हक्क नोकरशाहीकडून कबूल होण्याची वेळ आली असतां समाजांत विनाकारण दुफळी करण्याचा प्रयत्न चालविला आहे; आणि त्यांतहि विशेष मौज ही कीं, हिंदी प्रजाजन स्वराज्यास पात्र असून त्यांना स्वराज्य मिळावे यासाठीं काँग्रेसनें किंवा होमरुल संस्थांनीं उपस्थित केलेल्या चळवळींत ज्यांनीं विशेषसा भाग घेतला नाहीं, किंवा घेतला असल्यास अंगचोरपणानें घेतला व केव्हां केव्हां तर उघड विरोधहि केला, अशा लोकांनीं हे बंड उभारण्यास आतां सुरुवात केली आहे. ही प्रेरणा त्यांच्या स्वतःची आहे किंवा दुसऱ्या कोणीकडून त्यांस मिळालेली आहे याचा सध्यां विचार करण्याचे कारण नाहीं. ती अप्रयोजक, अविचाराची व असमंजसपणाची असून त्यामुळें समाजाच्या सर्वसामान्य हितास धक्का कसा व किती पोंचणार एवढेंच आम्हांस विशद करून दाखवावयाचें आहे. आमच्या मतें हा प्रयत्न कोणाच्याहि बुद्धीनें प्रेरित झाला असला तरी तो आत्मघातकीपणाचा आहे ; लोकहिताची गोष्ट तर राहूं द्याच, पण त्यांत न्याय्यहि नाहीं, इतकेंच नव्हे तर हिंदी समाजाच्या घटनेसहि हा भेद विरुद्ध आहे ; या घटनेंत सुधारणा काय केली पाहिजे याबद्दल वरील वादाच्या पुरस्कर्त्यांचे विचार एककल्ली, अशास्त्रीय आणि गैरमुत्सद्दीपणाचे आहेत असें आम्हांस वाटतें. म्हणून त्याबद्दल आजच्या लेखांत आम्हीं विचार करण्याचें योजिलें आहे.

ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हा भेद कसा व कोणत्या शहाण्यानें काढला हें आम्हांस कळत नाहीं. केवळ तर्कशास्त्रदृष्ट्या पाहिलें तर असा भेद करितां येईल, नाहीं असें नाहीं. या मतभेदास किंवा वर्गीकरणास "डिव्हिजन बाय डायकॉटमी" म्हणजे अस्तिनास्तिरूपी किंवा तत्तदितररूपी विभाग असें म्हणतात. जगांतील कांहींतरी एकादी विवक्षित वस्तु मुख्य कल्पून तिचा एक वर्ग करावयाचा आणि तदितर सर्व वस्तु दुसऱ्या वर्गांत ढकलून द्यावयाच्या हें यांतील तत्त्व आहे. 'झाडें' आणि 'बिनझाडें' असें सर्व सृष्टीचे याप्रमाणें

दोन विभाग करतां येतील; किंवा 'दगड' आणि 'विनदगड' अशा प्रकारेंहि जगांतील सर्व वस्तूंचा विभाग कल्पितां येईल, 'ब्राह्मण' आणि 'ब्राह्मणेतर' हाहि विभाग अशाच प्रकारचा आहे; व केवळ तर्कशास्त्रदृष्टीनें जरी तो संभवनीय असला तरी तो व्यवहारदृष्टचा जर कांही त्यांत राम नसेल तर तो निरुपयोगी किंवा तर्कटपणाचा समजला जाईल. ब्राह्मणेतर शब्दांत मुसलमान, पार्शी, खिरस्ती, अगर इंग्रज लोकहि येऊं शकतील, आणि मग तर हा भेद उपहासास्पदच होईल. पण इतकें पुढें न जातां ज्यांनीं ज्यांनीं हा भेद कल्पिलेला आहे त्यांच्या मनांतील हिंदुस्थानांतील हिंदू प्रजेचाच अशा रीतीनें विभाग करावयाचा आहे असें आपण समजूं. पण प्रतिपक्षास याप्रमाणें सवलत देऊनहि विचार केला तरी 'ब्राह्मण' आणि 'ब्राह्मणेतर' हा विभाग निरर्थक अतएव असमंजसपणाचा ठरतो.

## हा विभाग कशाकरितां करावयाचा ?

ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांस बुडवून नुसत्या ब्राह्मण वर्गाची थोरवी स्थापन केली आहे एवढें दाखविण्याकरितांच ना? स्पष्ट भाषेत बोलावयाचें म्हणजे ब्राह्मण लुच्चे, ब्राह्मण लबाड, त्यांनीं ब्राह्मणेतरांना बुडवून त्यांस खालच्या दर्जाचें किंवा पायरीचें ठरविलें आणि त्यांस अज्ञानांधःकारांत लोटून आपमतलबीपणानें आपली थोरवी स्थापन केली! ब्राह्मणेतरांच्या वतीनें म्हणून कित्येकांनीं सध्यां जी ओरड चालूं केली आहे त्यांतील इंगित हेंच होय. कदाचित् हेंच इंगित भिन्न भिन्न शब्दांनीं व्यक्त केलें जात असेल, पण मुद्यांत कांहीं अंतर नाहीं. म्हणून त्या मुद्याचाच आपण आतां विचार करूं. ब्राह्मणेतर म्हणजे ब्राह्मणभिन्न वर्गांतील सर्व लोक. यांत सयाजीराव गायकवाड येतात, महाराज शिंदे सरकार येतात, रजपूत राजेरजवाडे येतात, भाटे व मारवाडी व्यापारी लोक येतात, शेतकरी येतात, माळी येतात, कुंभार येतात, कोष्टी येतात, अस्पृश्य येतात, अंत्यज येतात, तेली येतात, तांबोळी येतात; जैन येतात, लिंगायत येतात, जातिवंत क्षत्रिय मराठे येतात, कुणबी येतात, ठाकूर येतात, कोळी येतात, कातकरी येतात, रामोशी येतात, बेरड येतात, सरदार येतात, मोठमोठे इनामदारहि येतात. सारांश, यांत शिवाजीमहाराजांचे वंशज किंवा रजपूत घराण्याचे वंशज यापासून तों तहत बेरड, महार, मांग, वगैरे अंत्यजांपर्यंत सर्व जातींचा एकसमयावच्छेदेकरून समावेश होतो. 'ब्राह्मणेतर' म्हणून एक विशिष्ट जात आहे काय? ब्राह्मणेतर हा शब्द सापेक्ष आहे, म्हणजे समाजाच्या अठरा पगड जातींतून ब्राह्मण जात ते निराळी

काढून त्या ब्राह्मण जातींचें दोषाविष्करण करण्यासाठीं तदितर इतर सर्व जातींशीं ब्राह्मण जातीचा विरोध कल्पिला आहे. पण हा भेद कृत्रिम आहे, नैसर्गिक नाहीं. आणि तर्कशास्त्र दृष्टचा संभवनीय असला तरी केवळ तर्कटीपणाचा आहे असें थोडया विचारांतीं कोणासहि सहज कळून येईल.

**ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांना बुडविलें**

म्हणजे काय ? मुक्तीचें द्वार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र यांसच नव्हे तर अंत्यजासहि भगवद्गीतेनें खुलें करून ठेवलेलें असून त्यांतील तत्कालीन शक्य तेवढी व्यावहारिक अंमलबजावणी भागवतधर्मांत, वैष्णव धर्मांत, किंवा वारकरी सांप्रदायांत झालेली आहे हे कांहीं कोणास नव्यानें सांगावयास नको. तसेंच इतिहासदृष्टचा विचार केला तरीहि हिंदुस्थानांतील हिंदी राज्यकर्ते बहुतेक सर्व ब्राह्मणेतर आणि त्यांतले त्यांत बरेचसे क्षत्रियच होते. ब्राह्मणांनीं कांहीं धार्मिक हक्क आपल्या हातीं ठेविले होते खरे, पण गीतेंत गुणकर्मविभागानें जी वर्णव्यवस्था दिली आहे त्यांत 'ईश्वरभाव' म्हणजे राजसत्ता क्षत्रिय धर्मात सांगितलेली असून कृषि म्हणजे शेती आणि वाणिज्य म्हणजे व्यापार हीं वैश्यांचीं कर्मे म्हटलीं आहेत. ब्राह्मणेतरांत क्षत्रिय आणि वैश्य येतात काय? तर्कशास्त्रदृष्टचा जर हा विभाग केलेला असेल तर आलेच पाहिजेत, आणि जर आले पाहिजेत तर ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांस बुडविलें या वाक्याचा असा अर्थ होतो कीं, क्षत्रिय व वैश्य या कोणासहि डोकें वर काढूं न देतां ब्राह्मणांनीं राजसत्ता बळकाविली, व्यापार बळकावला, शेती बळकावली व सर्वांना आपले दास करून सोडले. पण जरा विचार केला तर हें म्हणणें सर्वस्वी चुकीचें किंवा अत्यंत निराधार आहे असें कोणासहि कळून येईल. पूर्वीं क्वचित् प्रसंगीं ब्राह्मण दिवाणांनीं खालावत चाललेल्या राजकुलाचा हक्क आपल्या ताब्यांत घेतला असेल. पण हिंदुस्थानच्या ५-६ हजार वर्षांच्या इतिहासांत अशी दोन चारच उदाहरणें सांपडतील. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' हा क्षत्रियधर्म आहे; ब्राह्मणधर्म नव्हे. आणि याच धर्मानें प्रेरित होऊन क्षत्रियांनीं राजवैभव व राजसत्ता पूर्वीं उपभोगिली आहे; आणि सध्याहि कांहीं थोडया फार कमी अंशानें ते उपभोगीत आहेत. क्षत्रियांचे हें वैभव सध्यांचे काळीं जर कमी झालें असलें तर तें ब्राह्मणांनीं कमी केलेलें नसून बलिष्ट इंग्रज सरकारच्या साम्राज्याचा तो प्रश्न आहे हें प्रत्येकानें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे. उदेपूरचें घराणें आज सार्वभौम कां नाहीं, शिखांचे राज्य आज कां नष्ट झालें किंवा शिवछत्रपतींच्या वंशजांकडे छत्रपतित्व न राहातां कोल्हापूरच्या राजाच्या नांवापुढें केवळ आडनांवाप्रमाणे 'छत्रपति' हें कोरडें उपपद कां

जोडण्यांत येतें याचा विचार केला तर हा परिणाम कालाचा आहे, ब्राह्मणांच्या कृत्याचा नव्हे असें सहज कळून येईल. पेशव्यांनीं शाहुमहाराजांकडून महाराष्ट्रातील सत्ता काढून आपल्या हातांत घेतली असा कित्येकांचा ब्राह्मणांवर आक्षेप आहे. पण दिल्ली-दरबाराकडून इंग्रजांनीं अशाच प्रकारें बंगाल्यांतील दिवाणी अमलाची सनद मिळविली होती ही गोष्ट ते कां विसरतात हें आम्हांस समजत नाहीं. शिवाय पेशव्यांना दोष देतांना दुसरें असेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, शिंदे, होळकर, इत्यादिकांच्या शूर व कर्त्या पूर्वजांना पुढे आणण्यास पहिला बाजीराव पेशवाच कारण झाला. पण अखेर पेशवाईवर जेव्हां धाड आली तेव्हां – " तदितर खग भेणें वेगळाले पळाले " ? या नलोपाख्यानांतील वचनाप्रमाणें स्थिति होऊन मोठमोठे मराठे आणि ब्राह्मण सरदारहि पेशव्यांकडे दुर्लक्ष करून आपापला बचाव करते झाले, अशी साक्ष इतिहास देत आहे. पण या ऐतिहासिक उखाळचापाखाळचा काढण्यांत आज अर्थ काय ? आज असा कठिण समय आला आहे कीं, सर्वांनीं एकदिल होऊन पंचतंत्रातील पक्ष्याप्रमाणें स्वराज्यरूप जाळ्याला प्रतिबंधक होणाऱ्या खुंट्या उपटून वर काढल्या पाहिजेत. ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांनीं बुडविलें पण सम्राट इंग्रजांच्या मुठींतून सुटून जी कांहीं राजसत्ता आमच्या लोकांच्या हातांत अवशिष्ट राहिलेली आहे, ती बहुतेक सर्व ब्राह्मणेतर घराण्याच्याच हातांत आहे हें कोणी लक्षांत आणिलें आहे काय ? हिंदुस्थानांत आज सुमारें ७०० एतद्देशीय संस्थानें आहेत. पैकीं १०-१२ लहानसहान किरकोळ संस्थानें खेरीजकरून बाकीच्यांचें अधिपति ब्राह्मणेतर असून संपत्तीनें, वैभवानें, मानानें, आणि राजसत्ताबलानें हिंदुस्थानांतील कोणत्याहि ब्राह्मणापेक्षां ते कितीतरी पट अधिक श्रेष्ठ आहेत हें आम्हीं सांगावयास नको. उलट ब्राह्मणच त्यांच्यापदरीं श्ववृत्ति पत्करून राहिलेले असून राजपुताना आणि बंगाल वगैरे प्रांतांतून ब्राह्मण स्वयंपाकयाचीं हलकीं कामें करण्याच्या स्थितीस पोंचलेलें आहेत असें जें ब्राह्मणेतर लॉर्ड सिंह यांनीं पार्लमेंट सभेंत बोलून दाखविलें आहे ते अक्षरशः खरें आहे, असें निःपक्षपातबुद्धीनें विचार करणाऱ्या कोणाहि गृहस्थास दिसून येईल. ब्राह्मणेतरांपैकीं क्षत्रियांचें पूर्वकालीं असलेलें वैभव आतां कमी झालें आहे ही गोष्ट आम्हाला मान्य आहे. पण याचें कारण ब्राह्मण नसून कालगतीनें साम्राज्यसत्तेंत झालेल्या फेरबदलामुळें हा परिणाम घडून आलेला आहे, एवढेंच सध्यांच्या स्थितींत आमच्या प्रतिपक्षास आमचें सांगणें आहे. सारांश, राजसत्ता, राजवैभव, आणि तदनुषंगानें प्राप्त होणारा मानमरातब अथवा सामाजिक अगर राजकीय वर्चस्व सर्व ब्राह्मणेतरांकडे आहे, ब्राह्मणांकडे नाहीं हें निर्विवाद आहे. आतां

## व्यापाराकडे पहा

पार्शी आणि मुसलमान व्यापारी सोडून दिले म्हणजे हिंदुस्थानांतील बाकी जो व्यापार शिल्लक राहतो तो सर्व भाटे, वाणी, मारवाडी, जैन, लिंगायत इत्यादिकांच्या म्हणजे ब्राह्मणेतरांच्याच हातांत आहे, ही गोष्टहि निर्विवाद आहे. कांहीं ठिकाणीं क्वचित् एखादा ब्राह्मण नोकरीनें किंवा वकिलीनें लक्षाधीश झाला असेल; पण असले ब्राह्मण हाताच्या बोटावर मोजण्याइतके देखील सापडणार नाहींत. व्यापार हें द्रव्यार्जनाचें मुख्य साधन होय. इंग्रज लोक एवढे धनाढ्य कां तर व्यापारी म्हणून. राजसत्तेमागून व्यापार अशी पूर्वी आमची समजूत होती. पण आर्वाचीन इतिहास अशी साक्ष देत आहे कीं, व्यापार मुख्य असून त्याचे मागोमाग राजसत्ता धांवत येत असते. हिंदुस्थानदेश सध्यांचें कालीं आर्थिक स्वातंत्र्यासच नव्हे तर व्यापारी स्वातंत्र्यासहि पारखा झालेला आहे हें मोठ्या दुःखानें कबूल करणें भाग आहे. पण हा स्वातंत्र्य-संकोच ब्राह्मणांनीं केला नसून इंग्रजी व्यापाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षेचा हा एक बडा दुष्परिणाम आहे हें ब्राह्मणेतरांनीं नित्य जागरुकतेनें लक्षांत ठेविलें पाहिजे. हिंदुस्थानचे उद्योगधंदे बुडून कोटयवधि रुपयांचा खंडोगणती माल इंग्रजी व्यापाऱ्यांकडून इंग्रजी आगबोटींनीं हिंदुस्थानांत ओतला जात आहे त्याचे कारण ब्राह्मण नसून इंग्रजी लोकांची व्यापारबुद्धीची महत्त्वाकांक्षा होय, आणि ही महत्त्वाकांक्षा इंग्रजी साम्राज्यसत्तेचें पाठबळ मिळाल्यामुळें द्विगुणित झालेली आहे, हें आतां कांहीं कोणास सांगावयास नको. ब्राह्मणांनीं जर कांहीं केलें असेल तर या आपत्तीवरील जें एक स्वदेशीरूपी रामबाण औषध तें शोधून काढण्याच्या कामीं व त्याचा प्रसार करण्याचें कामीं मदत केलेली आहे. मग या बाबतींतहि ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांस बुडविलेलें नाहीं तर तारण्याचा प्रयत्न केला असें स्पष्ट होत नाहीं काय? आम्ही हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीचाच विचार करीत आहों; आणि तो विचार वर सांगितलेल्या दृष्टीनें केला तर असें सिद्ध होतें कीं, सध्यांच्या स्थितींत जीं काहीं राजसत्ता, राजवैभव आणि व्यापारबल देशांत अवशिष्ट आहेत तीं बहुतेक सर्व ब्राह्मणेतरांच्या ताब्यांत आहेत. अर्थशास्त्रदृष्ट्या देशांतील संपत्तीचें याखेरीज दुसरें साधन म्हटलें म्हणजे

## कृषि किंवा शेती

होय. ही खेती म्हणजे शेतकी कोणाच्या ताब्यांत आहे? ब्राह्मणांच्या कां ब्राह्मणेतरांच्या? कोणी म्हणेल कीं, शेतकरी वर्ग जरीं ब्राह्मणेतरांचा असला तरी सावकारी आणि जमिनदारी ब्राह्मणांकडे असल्यामुळें ब्राह्मणेतरांवर त्यांच्या-

कडून नेहमीं जुलूमच होत असतो. पण हेंहि म्हणणें खरें नाहीं. सावकारवर्गांत ब्राह्मणेतर मारवाड्यांचा व गुजराथ्यांचाच विशेष भरणा असतो. आणि बंगाल्यांतील आणि इतर ठिकाणच्या जमीनदारांत कांहीं थोडे जरी ब्राह्मण असले तरी एकंदर हिंदुस्थानांतील जमीनदारांत, इनामदारांत व तालुकदारांत ब्राह्मणेतरांचाच भरणा अधिक आहे असें आकड्यानेंहि सिद्ध करून दाखवितां येईल. शेतींतच नव्हे तर व्यापारांत आणि राजवैभवांत जर याप्रमाणें वांटणी झालेली आहे तर हिंदुस्थानदेश ब्राह्मणांच्या पायीं बुडाला, ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांस फसविलें इत्यादि फुकट ओरड करून अगदीं आयत्यावेळीं आपआपसांतील द्वेष वाढविण्याचा उद्योग सुरू करणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा टाकणें होय, हें कोणीहि कबूल करील. हिंदुसमाजाची रचना वर्णव्यवस्थेच्या पायावर झालेली आहे व त्यांत आर्वाचीन इतिहासदृष्टचा दुसरें कांहीं दोष असले तरी आपापल्या गुणकर्मांपुरता प्रत्येक वर्ण स्वतंत्र असून त्यामुळें प्रत्येक वर्णाची भरभराट त्या त्या वर्णांतील लोकांच्या हिंमतीवर आणि उद्योगावरच अवलंबून असते. दुसरा वर्ण त्यांत हात घालू शकत नाहीं. हा त्यांतील एक विशिष्ट गुण आहे हे विसरतां कामा नये. कालांतरानें अशी स्थिति येऊं शकेल कीं, हीं

**वर्णव्यवस्था**

मोडून सर्व समाज पाश्चिमात्य समाजाप्रमाणें कराराच्या पायावर उभारला जाईल. ही स्थिति सर्वांशीं इष्ट आहे कीं नाहीं याबद्दल बोल्शेव्हिकांच्या उदयामुळें आतां थोडी शंका येऊं लागलेली आहे. पण कसेंहि असलें तरी ते आपला सध्यांचा प्रश्न नव्हे. क्षत्रियांचा ईश्वरीभाव व लष्करीपेशा, ब्राह्मणांची ज्ञानयोगसंपत्ति, वैश्यांचें वाणिज्य आणि कृषि किंवा शेती ही सर्व कालाच्या एका मोठ्या प्रवाहांत सांपडून चोहोंकडून संपुष्टांत येत चाललेली आहेत. हा संकर पूर्ण होऊन सब-गोलंकार झाल्याखेरीज हिंदुस्थानच्या उन्नतीची आशा धरावयास नको, अशी कोणाची समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे, असें आम्हीं निश्चयानें म्हणू शकतों. कारण जेथें वर्णभेद नाहीं तीं राष्ट्रेंहि आमच्याप्रमाणेंच आपत्तींत गुरफटलेलीं आहेत असें नजरेस येतें. शिवाजी महाराजांनीं जी स्वराज्यस्थापना केली ती वर्णसंकर करून केलेली नव्हती, आणि सध्यांच्या काळीं इंग्रजी साम्राज्यांतर्गत ज्या स्वराज्याची स्थापना करावयाची आहे तें स्वराज्य मिळविण्यासहि वर्णसंकराची वाट पाहण्याचें कारण नाहीं. किंबहुना सर्व जातींत रोटीबेटीव्यवहार आधीं सुरू झाला पाहिजे, मग स्वराज्याची गोष्ट बोला असें जर कोणीं म्हणेल तर राजकारणांत तो गैर-

वाकबगार असून या कामीं त्याचीं योग्यता जवळजवळ वेड्याइतकींच गणली जाईल. ब्राह्मण चांभाराशीं लग्न लावील, अस्सल मराठा मांगाशीं विवाह लावील किंवा लिंगायत जैनाशीं शरीरसंबंध करील तेव्हाच खरें स्वराज्य होईल असे कोणी प्रतिपादन केल्यास तें ब्राह्मणांची गोष्ट सोडून द्या – ब्राह्मणेतरांपैकीं कोणत्या व किती जातींस –व्यक्तींस नव्हे– मान्य होईल याचा विचार करा. पाश्चिमात्यदृष्टचा न्याय्य असल्या तरी ज्याला हजारों वर्षांचीं परंपरा आहे अशा पौर्वात्य समाजांत या गोष्टी रूढ होण्यास निदानपक्षीं पुष्कळ काळ लोटला पाहिजे हे निर्विवाद आहे. आणि त्याचबरोबर दुसरी हीहि गोष्ट निर्विवाद आहे कीं, आमच्यांतील सर्वच वर्णांच्या गुणांचा व हक्कांचा हल्लीं जो संकोच झाला आहे तो दूर करण्यास आम्हीं पाश्चिमात्यदृष्टचा श्रेयस्कर अशा वर्णविरहित समाजाची जर अपेक्षा ठेऊन बसलों, तर नदीचें पाणी वाहत वाहत संपल्यावर मग कोरड्या पायानें मीं नदीपार होईन अशी अपेक्षा ठेऊन नदीच्या कांठीं वाट पहात बसणाऱ्या धनगराच्या पोराप्रमाणेंच आमची स्थिति होईल. सर्वांची एकजात पाहिजे, वर्णव्यवस्था नको, वर्णव्यवस्था मोडली पाहिजे, असें एकीकडे म्हणावयाचें आणि दुसरीकडे केवळ अस्सल मराठ्यांचें ब्राह्मणेतरांचे सुद्धां नव्हे– जातवार प्रतिनिधी पाहिजेत असा आग्रह धरावयाचा यांत कितपत सुसंगतता आहे हें ज्यांचे तेच जाणोत! हल्लींचीं समाजांतील स्थिति अशी आहे कीं, त्यांतील प्रत्येक जात आपणांस यथाकाल प्राप्त झालेल्या धंद्यांत स्वतंत्र असून त्यांपैकीं कोणतीहि जात दुसऱ्या जातींत सामाजिक रीत्या विरघळून जाण्यास तयार नाहीं. पुढें मागें तसा योग येईल ; पण तो सध्यांचा प्रश्न नव्हे. पण जातिभेद जरी मोडला नाहीं तरी जातिद्वेष मोडणें सर्वांसच इष्ट वाटत आहे. म्हणून सर्व जातींच्या उद्योग-धंद्यांस किंवा भरभराटीस ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या घडवून आणण्यास देशांतील कर्त्या पुरुषांस सर्वांनी एकसारखीच मदत केली पाहिजे, अशा कर्त्या पुरुषांचीं जी सभा तीच राष्ट्रीय सभा होय. त्यांत ब्राह्मण आहेत, क्षत्रिय आहेत, वैश्य आहेत, शूद्र आहेत, सर्व वर्णांचे व धर्मांचे लोक आहेत. लाला लजपतराय कांहीं ब्राह्मण नाहींत, बॅ. दास अगर बॅप्टिस्ता कांहीं ब्राह्मण नाहींत, आणि महात्मा गांधीहि पण ब्राह्मण नाहींत, आणि ते सर्व ब्राह्मणांबरोबर एकदिलानें काम करणारे आहेत. मग ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर हें खूळ माजविण्यांत अर्थ काय ? कोणाच्याहि कच्छपीं स्वेच्छेनें वा निरूपायानें न लागतां किंवा दुसऱ्याच्या दगडाखालीं हात सांपडलेला न ठेवतां प्रसंगीं स्वार्थत्याग पत्करूनहि सर्व देशाचे व जातींचें हक्क नोकरशाहीपासून शक्य

तितक्या निर्भयपणें व निर्लोभपणें संपादन करून घेणाऱ्या पुरुषांचीं आज अपेक्षा आहे; मग ते कोणत्याहि जातीचे असोत अगर धर्माचे असोत. ते सर्व देशाचे सारखेच हितकर्ते होत, व त्यांस सर्व जातींनीं सारखाच मान दिला पाहिजे. तुकारामबुवा म्हणतात त्याप्रमाणें —

**हें काम येरा गबाळाचें नव्हें**

म्हणून ब्राह्मण-ब्राह्मणेतर इत्यादि कृत्रिम व आत्मविघातक भेद न करितां सर्वांनीं शक्य तेवढें आपापलें वैशिष्ट्य कायम राखून अमक्यानें तमक्यास बुडविलें अशी भावना न ठेवतां प्रस्तुतच्या देशकार्यांत तें कार्य करण्यास क्षम असें पुरुष निवडून काढून त्यांना पूर्ण साहाय्य केलें पाहिजे, विनाकारण जातिद्वेष वाढविणें योग्य नव्हें अशी त्यांस आमची प्रार्थना आहे. हें म्हणणें कांहीं थोड्या लोकांस रुचणार नाहीं, हें आम्हीं जाणून आहों, व जरूर पडल्यास पुढें मागें याच विषयावर अधिक लिहिण्याचा आमचा मानस आहे. हल्लींच्या कालांत देशहिताचे व्यापारदृष्टचा, शेतकीदृष्टचा, धंदेदृष्टचा आणि लष्करीदृष्टचा, राजकीयदृष्टचा अगर आर्थिकदृष्टचा असे निरनिराळे प्रकार होऊं शकतात हें खरें. पण हें भिन्न भिन्न देशहिताचे प्रकार सिद्धीस नेण्यास भिन्न भिन्न जातवारच लोक पाहिजेत असें मात्र त्यानें सिद्ध होत नाहीं. अधिकारारूढ पक्ष त्याच त्याच विषयांत निष्णांत असला म्हणजे झालें, मग तो जातीचा ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, जैन असो वा लिंगायत असो, तिकडे पाहण्याचें कारण नाहीं. हल्लीं उदयास येऊं घातलेल्या लोकशाहींत जें काय शिकावयाचें आहे तें हेंच होय. मग नोकरशाही किंवा तिचें अनुयायी त्याकरितां आमची स्तुति करोत वा निंदा करोत. रणांगणांत तरवार गाजवणारा कोणी असला तरी ज्याप्रमाणें तो क्षत्रिय अगर मराठा समजावयाचा तद्वतच हल्लींच्या कठीण प्रसंगीं कामास आलेला किंवा येणारा पुरुष ब्राह्मणेतर असला तरी तो ब्राह्मणच समजला पाहिजे. जातिभेद जन्मसिद्ध न मानतां गुण कर्मसिद्ध मानण्यांस येथेंच सुरुवात होते व झाली पाहिजे.

आमचें ग्रंथांतच नव्हे तर सुत्तनिपातांतहि असें म्हटलें आहे कीं, "नजच्चा वसलो होति नजच्चा होति ब्राह्मणो। कम्मणा वसलो होति कम्मणा होति ब्राह्मणो।" म्हणून आघाडीचें काम कोणतें हें पाहून तत्सिद्ध्यर्थ सर्वांनींच ब्राह्मण किंवा ब्राह्मणेतर झालें पाहिजे.

---

# ७. स्वराज्य, ब्राह्मण व ब्राह्मणेतर

१८ सप्टेंबर १९१७

मि. मॉंटेग्यु हे स्वराज्यविषयक चर्चा करण्याकरितां हिंदुस्थानांत येणार असें जाहीर झाल्यापासून स्वराज्याच्या चळवळीस विरोध करणाऱ्या आमच्या कांहीं ब्राह्मणेतर बंधूंनीं बरीच उचल खाल्ली आहे, व ब्राह्मणजातीसंबंधानें आपल्या मनांत उचंबळत असलेली खळखळ ओकण्यास अवेळीं सुरुवात केली आहे. तथापि त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट इतकीच कीं, स्वतः ब्राह्मणेतर असून स्वराज्याच्या चळवळीस विरुद्ध नसणारे असेही पुष्कळ प्रतिष्ठित लोक वेळींच पुढें येऊन वरील आत्मघातकी प्रकारास आळा घालूं लागले आहेत. यामुळें या अनिष्ट वादास भलतेंच स्वरूप न येतां, अखेर समुद्रांतील मोठ्या माशानें लहान मासा खाऊन टाकावा त्याप्रमाणें ब्राह्मणेतरांतला स्वराज्यास अनुकूल असणारा मोठा पक्ष स्वराज्यास विरोध करणाऱ्या लहान पक्षास खाऊन टाकील अशी आशा वाटूं लागली आहे. ब्राह्मण व ब्राह्मणेतर हा विरोध मद्रास इलाख्यात जितका दृढमूल आहे तितका तो इतर प्रांतांत नाही. मुंबई इलाख्यांत तो अगदींच नाहीं असें म्हणवत नाहीं, व स्वतःचीं शिंगें मोडून वासरांत शिरणारे कित्येक सुशिक्षित ब्राह्मणेतर गृहस्थ या नसत्या भांडणावर फुंकर घालघालून त्याची उष्णता कृत्रिम रीतीनें वाढवूं पाहात आहेत. तथापि एका हातानें कितीहि प्रयत्न केला तरी त्याला टाळी वाजवितां येणें शक्य नाहीं, व या आगंतुक वादांत आपल्या मनाची समता बिलकुल ढळूं न देण्याचा ब्राह्मणवर्गाचा पुरा निश्चय आहे. यामुळें हा कलहाग्नि प्रदीप्त होईल अशी आम्हांस बिलकूल भीति नाहीं. तथापि हा वाद निघालाच आहे म्हणून या बाबतींत ब्राह्मण वर्गासंबंधानें कोणाचा गैरसमज राहूं नये येवढ्याकरितांच या विषयावर सामान्यतः दोन शब्द लिहिण्याचें आम्हीं आज योजिलें आहे.

प्रस्तुतच्या वादाचे प्रथमःच दोन भाग आपोआप पडतात. पहिला असा कीं, ब्राह्मणेतरांस खरोखरच स्वराज्य नको कीं काय ? व दुसरा असा कीं, त्यांनाहि जर स्वराज्य हवें तर ते हरकत तरी कोणत्या गोष्टीला घेतात ? पैकीं, मद्रासकडे काय किंवा इकडे काय, ब्राह्मणेतरांकडून आजवर प्रकट झालेल्या विचारामध्यें मुळांत स्वराज्याच्या मागणीलाच पूर्ण विरोध असा थोडाच दिसून येतो, व त्याचें कारणहि उघडच आहे. ब्राह्मणेतरांच्यातर्फे म्हणून जे गृहस्थ आज वादास प्रवृत्त झाले आहेत ते स्वतः सुशिक्षितच असल्यामुळें हिंदुस्थानांतील एकतंत्री राज्यपद्धति त्यांना

झाली तरी मनापासून आवडणें शक्यच नाहीं. इंग्रज लोकांनीं दिलेल्या शिक्षणाचा गुणच स्वातंत्र्यप्रियता हा असल्यामुळें सुशिक्षित लोक ब्राह्मणेतर असले तरी त्यांनाहि आपण आपल्याच देशांत नादान व खुरटलेलें राहावें आणि आपला सर्व कारभार परक्यांनीं आपली संमति न घेतां करावा ही गोष्ट कशी आवडणार? ब्राह्मणवर्गाच्या मानीव सामाजिक जुलमापासून कां होईना पण स्वतंत्र होण्याच्या बुद्धींत जें स्वाभिमानाचे बीज आहे तें राजकीय विचाराच्या भूमींतहि फलद्रूप झालेंच पाहिजे. आपणांस मोठ्या हुद्याच्या जागा मिळाव्या व ब्रिटिश ब्युरॉक्रसीनें चालविलेल्या राज्यकारभारावर आपल्यांतील लोकमताचें दडपण असावें अशी महत्वाकांक्षा ब्राह्मणेतर झाला म्हणून त्याच्या मनांत उद्भवल्या-खेरीज कशी राहणार? ब्राह्मणवर्गाचा पाडाव व्हावा अशी ब्राह्मणेतरांना इच्छा होणें स्वाभाविक आहे असें घेऊन चाललें, तरी केवळ ब्राह्मणांना अपशकून करण्या-करितां आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेचें नाक कापून घेण्यासही ब्राह्मणेतर कबूल होतील इतका अधमपणा आमच्या ब्राह्मणेतर बंधूंमध्यें वसत असेल, त्यांच्या मनुष्यत्वाची इतकी हानि झाली असेल, असें मानण्यास आमचें मनच घेत नाही. अर्थात ब्राह्मणवर्ग क्षणभर विचारांतून अजिबात वगळला आणि केवळ ब्राह्मणेतर व ब्रिटिश ब्युरॉक्रसी यांच्या पुरतेंच पाहिलें तर स्वराज्य हवें असेंच ब्राह्मणेतरांना वाटलें पाहिजे, व तसें त्यांना आज वाटत आहेहि. हल्लींच्या मुख्य वादांत ब्राह्मण विरुद्ध ब्राह्मणेतर या विशिष्ट उपवादाचीं जीं जाळीं दुर्दैवानें पसरलीं आहेत, तीं या एकंदर प्रश्नाचा खोल विचार करणाऱ्या वाचकानें बाजूस सारून या खऱ्या मुद्याचा लक्षवेध मार्मिकपणानें करण्यास त्यानें शिकलें पाहिजे.

अशा रीतीनें पहिल्या प्रश्नाचे नास्तिपक्षीं उत्तर दिल्यास वादाचें क्षेत्र आपोआप बरेंच कमी होतें. आम्हास स्वराज्य हवें पण त्याची कोणतीहि योजना निश्चित होतांना "ब्राह्मणेतरांच्या हक्कांचें योग्य संरक्षण झालें पाहिजे" असा या वादांतील दुसरा मुद्दा आहे. या मुद्यासंबंधानें आम्ही एकदमच असें सांगून मोकळे होतों कीं, ब्राह्मणेतरांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची कोणतीहि सूचना पुढें आल्यास ब्राह्मण लोक तिचा विचार नुसत्या सहानुभूतीनेंच नव्हे तर थोडयाबहुत दिलदारीनेंहि करण्यास तयार आहेत. कै. ना. गोखले यांनीं आपल्या भाषणांतून व लेखांतून आणि मृत्युसमयीं करून ठेविलेल्या स्वराज्ययोजनेंतून ब्राह्मणेतरवर्गांच्या हक्कांचे संरक्षण करणें योग्य आहे असें ठिकठिकाणीं प्रतिपा-दिलें असल्याचें प्रसिद्धच आहे. आणि लो. टिळकांनींहि लखनौ येथील राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं मुसलमानबंधूंच्या महत्त्वाकांक्षेसंबंधानें जे उद्गार काढले ते लक्षांत घेतले म्हणजे स्वराज्याच्या बाबतींत ब्राह्मणेतरांना किती प्रेमळपणानें

वागविण्यास ते तयार आहेत हें दिसून येते. " कायदेकौन्सिलांत उद्या एक वेळ सगळेच ब्राह्मणेतर आले तरी मला चालतील, पण तेथें लोकनियुक्त हिंदुलोकांचे प्रावल्य असलें पाहिजे, परक्यांचें किंवा सरकारनियुक्तांचे प्रावल्य नसलें पाहिजें हे त्यांचे शब्द कोणाहि ब्राह्मणेतरानें विसरूं नये. हे शब्द अगदीं शब्दशः कोणी घेणार नाहीं. ते तात्पर्यार्थानेंच घेतले पाहिजेत हें कोणाहि समंजस मनुष्यास सांगण्याचें कारण नाहीं. पण या अतिशयोक्तीच्या मुळाशीं खऱ्या राष्ट्रीय भावनेचें बीज आहे हें कोणासहि नाकबूल करितां यावयाचें नाहीं. हिंदुस्थानांत ब्राह्मणेतरांतील सर्वांत मोठा वर्ग म्हटला म्हणजे तो मुसलमानांचा. पण या वर्गासंबंधानें सर्वसंमत अशी तडजोड लखनौस होऊन ती राष्ट्रीय सभेच्या स्वराज्ययोजनेंत नमूदहि झाली आहे, हें ज्यास माहीत आहे तो हिंदूंचे मुसलमानांच्या हक्कसंरक्षणाविषयीं खरें धोरण काय आहे याविषयीं साशंक राहूं शकणार नाहीं, व मुसलमानांसंबंधानें सर्व हिंदूंचे जें धोरण तेंच तत्त्वतः ब्राह्मणांचे ब्राह्मणेतरांविषयींहि असणारच हें उघड आहे. त्यांत बदल होण्याचें काय कारण ? पण या बाबतींत आम्ही मुख्य हरकत घेतो ती येवढयापुरतीच कीं, प्रत्येक जातीनें आपापले हित दक्षतेनें पाहणें व त्याकरितां योग्य ती चळवळ करणें जरूर असलें तरी अखिल हिंदी जनतेचा ' ब्राह्मण व ब्राह्मणेतर ' असा स्थूल विभाग करून जें केवळ ब्राह्मणद्वेशाचें अवास्तविक स्वरूप या वादास देण्यात येत आहे तें दुष्ट बुद्धीचे आहे. कायदेकौन्सिलांतील सर्व जागा किंवा बहुतेक जागा आपणांसच असाव्या असा हक्क ब्राह्मणांनी पूर्वी केव्हांहि सांगितलेला नाहीं व पुढेंहि सांगू इच्छित नाहींत. त्यांच्या वांटयाला प्रत्यक्ष व्यवहारांत लोकसंख्येच्या प्रमाणाबाहेर जागा पडत असल्या तर तें त्यांच्या जातिमूलक आग्रहाचें फळ नसून त्यांच्या शिक्षणाचे फळ आहे ही गोष्ट नाकबूल करणें म्हणजे निवळ आडरानांत शिरणें होय. ब्राह्मणांनीं पूर्वीं इतर जातींना शिक्षणाच्या बाबवींत मुद्दाम मागें टाकलें किंवा दडपून ठेवलें हा आरोप सर्वस्वीं खोटा आहे. चातुर्वर्ण्याची तात्त्विक पद्धति सर्वस्वी प्रत्यक्ष अंमलात पूर्वी केव्हां तरी होती किंवा नाहीं याविषयीं शंकाच आहे, व ती असली आणि अध्यापन, याजन व प्रतिग्रह हे अधिकार ब्राह्मणाप्रमाणेंच इतर वर्णांना नसले तरी त्यांची व्याप्ति फारच संकुचित होती. व्यावहारिक शिक्षण व त्याला लागणारी साक्षरता हीं क्षत्रिय व वैश्य यांनाच काय पण शूद्रांनाहि खुली होती. पुराण, इतिहास वगैरे वाचण्याचा त्यांचा अधिकार कोणी कधींहि काढून घेतला नव्हता. तात्पर्य, वेदाध्यापनाचा तेवढा अधिकार ब्राह्मणांसच असला तरी ज्याला हल्लीं आम्ही शिक्षण म्हणतों तें कोणत्याहि वर्णाला सुलभ होतें. म्हणून ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांना शिक्षणरहित ठेवलें या म्हणण्यास कांहीच

आधार नाहीं. असें असतां शिक्षणाकडे इतर वर्णांनीं द्यावें तितकें लक्ष दिलें नाहीं. याचें खरें कारण त्यांनीं आपापल्या धंद्याकडे विशेष लक्ष दिलें व शिक्षणाकडे दुर्लक्ष केलें. कारण नुसत्या पुस्तकी व कारकुनी शिक्षणाला त्या वेळीं मान मुळींच नव्हता हेंच होय. आपापल्या धंद्याकडे लक्ष देण्यापासून इतर वर्णांचा आर्थिकदृष्ट्या फार फायदा झाला व ब्राह्मण म्हटले कीं ते निर्धन व ब्राह्मणेतर म्हटले कीं ते सधन असा जो सामान्य भेद दिसतो तो त्यामुळेंच उत्पन्न झाला आहे. पण या स्थितीस अनुलक्षून "आम्हांस द्रव्योत्पादक धंदा इतर वर्णांनीं करूं दिला नाहीं" असें जर ब्राह्मण म्हणतील तर ती जशी त्यांची चूक होईल तशीच "आम्हांला ब्राह्मणांनी सुशिक्षित होऊं दिलें नाहीं" असें ब्राह्मणेतरांनीं म्हणणें हीहि चूकच आहे. एकानें द्रव्योत्पादक शिक्षण व द्रव्य पसंत केलें, दुसऱ्यानें पुस्तकी विद्या व निर्धनत्व पसंत केलें, अशी केवळ आपखुषीनें पूर्वी वांटणी झाली. याबद्दल परस्पर दोष कोणासच लावतां येणार नाहीं वरें, पूर्वी काय झालें असेल तें असो, पण आधुनिक काळांत तरी ही स्थिति पालटूं लागलीच आहे कीं नाहीं ? महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वरादि ब्राह्मण साधु-संतांनीं संस्कृत विद्येचें स्तोम कमी करून केवळ जनतेविषयींच्या प्रीतीमुळें मराठीमध्यें वेदविद्या आणण्याचा प्रयत्न केला, हें विसरतां काम नये. आणि आतां गेल्या शंभर वर्षांत इंग्रजी अम्मल झाल्यापासून तर विद्या व शिक्षण हें वाटेल त्याला घेण्यास सुलभ झालें असून ब्राह्मणलोक ब्राह्मणेतरांना तीं मिळण्यास हरकत करीत नाहींत, इतकेंच नव्हे, तर ब्राह्मणेतरांना सुशिक्षित करण्यास ब्राह्मण पुढारीपणानें प्रयत्न करीत आहेत. पण अजूनहि पुस्तकी विद्या मिळविण्याचे कामीं ब्राह्मणेतर उदासीन असून त्यांच्यावर विद्या मिळविण्याच्या कामीं सक्ति व्हावी असें म्हणण्यांत ब्राह्मणच पुढारी आहेत. तात्पर्य, तुलनात्मकदृष्ट्या ब्राह्मणेतर अशिक्षित असल्यास त्याबद्दल ब्राह्मणांच्या नावानें कोणीहि खडे फोडण्याचे खरे कारण नाहीं, व आज सरकार-दरबारांत लोकसंख्येच्या मानानें ब्राह्मण अधिक असले तर त्याबद्दल त्यांना दोष लावण्याचेंहि कारण नाहीं. राज्यकारभाराला सुशिक्षण अवश्य असतें व तें शिक्षण संपादन केल्यामुळें, स्वतः सरकार मनांतून ब्राह्मणांवर रूष्ट असतांहि, सार्वजनिक कामकाजांत केवळ ब्राह्मणांना लोकसंख्येच्या प्रमाणाबाहेर जागा त्यांना द्याव्या लागल्या; या गोष्टीला सरकारचा जसा नाइलाज झाला तसाच ब्राह्मणांचाहि नाइलाज आहे. कौन्सिलच्या निवडणुकींत ब्राह्मण येतात ते काय ब्राह्मणच एकजात मतदार आहेत म्हणून ? कायदे कौन्सिलांत गतवर्षी सरकारतर्फे हिंदी लोकांच्या नेमणूका झाल्या त्यांत ना. कामत, ना. साठे, ना. नाईक, ना. लल्लूभाई सामळदास इत्यादि ब्राह्मणांच्या नेमणुका सरकारनेंच केल्या,

इतकेंच नव्हे तर पूर्वी तीन वर्षे त्यांनी काम केलें असतांनाहि त्यांनाच फिरून तीन वर्षें नेमलें, हे काय सरकार ब्राह्मण लोकांचे पक्षपाती होते म्हणून ? इतर जातींचे पुढारी नेमण्यास त्यांचे हात कोणी धरले होते ? याचा अर्थच हा कीं, सरकार हे ब्राह्मणेतरांचे कट्टे कैवारी असतांहि त्यांना कामकाजाचे महत्त्व लक्षांत घेऊन सुशिक्षितांना नाइलाजानें हातीं धरावें लागतें. ब्राह्मणेतरांत सुशिक्षित मिळतील तर सरकार त्यांनाच आधीं नेमील. पण शिक्षणविषयक सर्व सवलती समान असतांहि केवळ धंद्याच्या आवडीनें ब्राह्मणेतर हे अद्यापि पुस्तकी शिक्षणाकडे वळावे तितके वळत नाहीत. त्याला कोणीं काय करावें ?

ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यातील शिक्षणविषयक असमता कालांतरानें निघून जाईलच. पण तोंपर्यंतहि समाजांत ब्राह्मण व ब्राह्मणेतर असा द्वेषमूलक भेद कोणी न करतां सुशिक्षित व अशिक्षित असाच भेद केला पाहिजे. "आम्हीं अशिक्षित असलों तरी केवळ लोकसंख्येच्या प्रमाणानेंच आम्हांला सर्व अधिकारांच्या जागा मिळाल्या पाहिजेत" हें ब्राह्मणेतरांचें जात्यभिमानाला शोभणारे असले तरी व्यवहारबुद्धीला शोभणारें नाहीं. आतां केवळ मुसलमान लोकांना ठराविक प्रमाणानें जागा ठेवण्यास हिंदूंनीं संमति दिली त्याचीच पुढची पायरी म्हणून हिंदूंतील पोटजातींनाहि यथाप्रमाण जागा राखून ठेवण्याविषयीं ब्राह्मणेतरांचा आग्रहच असेल तर त्यालाहि आम्ही हरकत घेणार नाहीं. मात्र सर्वच जातींचे सारखेंच समाधान होईल अशी योजना कोणास सुचवितां आल्यास त्यानें ती सुचवावी. कारण शिक्षण व द्रव्यसंपन्नता म्हणजे सरकारदेणें देण्याची पात्रता हीं दोन लक्षणें अमुक एक इयत्तेपर्यंत अंगीं असणारास, मग तो कोणत्याहि जातीचा असो, निवडणुकींत मत असलेंच पाहिजे हे म्हणणें वेगळें, आणि फक्त जातवार लोकसंख्येच्या प्रमाणानें प्रत्येक जातीस अमुक जागा दिल्या जाव्या, मग त्यांचे शिक्षण किंवा सरकारदेणें देण्याची पात्रता कितीहि कमी असली तरी चालेल, हें म्हणणें वेगळें. मतदार होणें हें शिक्षण व द्रव्यसंपन्नता यांजवर अवलंबून ठेविल्यास जातीचा प्रश्न सहजच सुटतो, पण केवळ जातीकरितां म्हणून जातीला अमुक इतक्या जागा मिळाल्या पाहिजेत असें म्हणूं लागल्यास अमुक एक जातींत शिक्षण कमी आहे किंवा ती जात रानटी आहे असल्या सबबीवर तिला वगळतां येणार नाहीं. सुशिक्षित हे जर अर्धशिक्षितांचें हित रक्षण्यास नालायक तर अर्धशिक्षित हे तरी अशिक्षितांचे हित रक्षण्यास लायक कसे ? ही विचारसरणी मान्य ठरल्यास खानेसुमारीच्या आंकड्यांच्या आधारें अनेक गमतीचें चमत्कार कागदावर मांडतां येतील. पण तसें करण्यास आज आम्हांस स्थलावकाश नाहीं व हा वाद हास्यास्पदतेच्या थरावर नेण्याची आमची इच्छा नाहीं. आम्हांस आज इतकेंच सांगावयाचें

आहे कीं, जातवार निवडणुकींचें तत्त्व राष्ट्रीयदृष्टचा आम्हांस संमत नसलें, तरी ज्या कोणास ही हौस पुरवून घ्यावयाची असेल त्यानें ती खुशाल पुरवून घ्यावी, आम्ही त्याच्या आड येऊं इच्छित नाहीं. मि. मॉंटेग्यूसाहेब हिंदुस्थानांत स्वतः येत आहेत व नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या तारेवरून इकडे खुला दरबार ठेवण्याचा त्यांचा इरादा आहे. तेव्हां प्रत्येक जातीनें आपापले हक्क त्यांच्यापुढें आपापल्या खास प्रतिनिधींच्या द्वारें ठेवून आपला स्वतःचा मतदारसंघ बनवून घ्यावा. ब्राह्मण लोकांना मात्र या तत्त्वाचा अंगिकार करण्याची इच्छा नाहीं. आम्ही ब्राह्मण म्हणून आम्हाला इतके प्रतिनिधि द्या असें ते कधींहि मागणार नाहींत, व तसे दिले तरी ते घेणार नाहींत. मग सर्व कायदेकौन्सिलांत एकहि ब्राह्मण न आला तरी चालेल. आहेत -आमचे इतर जातवाले आहेत- ते आम्हां ब्राह्मणांच्या हक्कांचें रक्षण करतील अशी आमची पक्की खात्री आहे ! सरकार ब्राह्मणांवर हल्लीं रुष्ट आहे हें प्रसिद्धच आहे, तेव्हां विचाऱ्या ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांच्या पाठीशीं न पडावें तर काय करावें ? 'नावेवर गाडा, गाड्यावर नाव' अशी जगाची राहाटीच आहे ! ब्राह्मणेतर सर्व जातींनीं तरी संतुष्ट राहावें म्हणजे झालें.

तात्पर्य, ब्राह्मणेतर जातीच्या बांधवांना आम्हांस एवढीच विनंती करावयाची आहे कीं, स्वराज्याच्या मागणीला त्यांनीं कोणत्याहि सबबीवर आज हरकत करूं नये, स्वराज्याचे अधिकार आपणास कोणते व कसे व कां पाहिजेत हें निर्भयपणें सांगावें, ब्राह्मणांना क्षणभर बाजूस वगळून, किंबहुना ते आज अस्तित्वांत नाहींत असेंहि वाटेल तर घटकाभर समजून, सर्व ब्राह्मणेतर जाति वरिष्ठ व कनिष्ठसुद्धां एकत्र होऊन त्यांनीं आपापसांत पोक्त विचार करून आपणांस स्वतंत्र प्रतिनिधि किती पाहिजेत व आपापले स्वतंत्र मतदारसंघ कसे बनवावे हें ठरवून स्टेट सेक्रेटरीस कळवावें. स्वराज्ययोजनेच्या या बाबीपुरतें ब्राह्मणवर्ग आनंदानें मौन स्वीकारील व ब्राह्मणेतरांच्या मागणीस बिलकूल विरोध करणार नाहीं. या बाबतींत आपलें खरें मत बोलावयास जाऊन स्वतःस स्वार्थी म्हणवून घेण्याची त्यांना इच्छा नाहीं. स्टेट सेक्रेटरीपुढें स्वराज्य योजनेच्या इतर बाबी राष्ट्रहिताच्या दृष्टीनें त्यांना मांडतां येतील व त्याच ते मांडतील.

---

# खंड दुसरा

## स्वराज्य हा जन्मसिद्ध हक्क–
## राजकीय पारतंत्र्य, राजकीय सुधारणा व स्वराज्य

### * १. नेटिव कामदारांची नीतिमत्ता
[ ७ मे १८८९ ]

......आमचें असें मत आहे कीं तरवारीच्या जोरावर राज्य करणाऱ्या परकीय प्रभूंच्या अमलाखालीं व्यक्तीच्या स्वभाववैचित्र्यास्तव स्वातंत्र्यास आतां पूर्वीप्रमाणें अवकाश राहिला नाहीं. उत्साह, ओज, साहस, योजना वगैरे गुणांची जेथें जेथें जरूर आहे त्या सर्व जागा राज्यकर्त्यांनीं आपल्या हातीं ठेवून आम्हांस त्यांच्या हुकमतीखालीं केवळ मानवी यंत्रें बनविलीं आहेत. अशा स्थितींत कोणत्या तरी राष्ट्रांतील लोक धैर्यादिगुणसंपन्न राहतील काय ? मुलकी किंवा लष्करी कोणतेंहि खातें घ्या. त्यांतील वरिष्ठ प्रतीच्या म्हणजे हुकमतीच्या जागेवर आमच्या नेटिवांपैकीं कितीसे लोक आहेत ? एकाद दुसरा आणि तोहि आर्जव व खुशामतीच्या जोरानें वर चढलेला; आणि तीच इकडे इंग्रजी अम्मलदारांची स्थिति पहा. वारंट निघून पळून गेला असतांहि तो पुनः कमिशनर होतो ! सारांश, हल्लींच्या राज्यव्यवस्थेंत नेटिव लोकांचा अधिकार मर्यादितच ठेविल्यामुळें त्यांत आमच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा इतका चुराडा होतो कीं, खालच्या प्रतींतील पहिल्या नंबरच्या जागेस रावसाहेब लायख होईपर्यंत त्यांची अगदीं गुळपापडी होऊन जाते. हीं माणसें हुषार व लायख नसतात किंवा सरकारास हुषार माणसें नको असतात असें नाहीं. पण ज्याअर्थी वरच्या प्रतीच्या म्हणजे युरोपियन नोकरांना खालच्या म्हणजे नेटिव नोकरांच्या बुद्धीचा किंवा हुषारीचा किंवा धैर्याचा शिरजोरपणा कधींहि खपत नाहीं त्या अर्थी हुषार असून जीहुकूम म्हणणारेच नेटिव सरकारी

---

* क्रॉफर्ड नामक गोरा सरकारी वरिष्ठ कर्मचारी पैसे खाऊन देशी (नेटिव) कर्मचाऱ्यांची तहसीलदारीपदावर नेमणूक करीत असे हें उघडकीस आल्यावर बरीच चर्चा गोऱ्या व देशी वृत्तपत्रांमध्यें झाली. गोऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना लांच देऊन तहसीलदारी मिळविणाऱ्या देशी शिक्षितांवर ताशेरे झाडले. या संदर्भात लो. टिळकांनीं आपले विचार या लेखांत प्रकट केले आहेत.

नोकरींत प्रायः उदयास येतात. युरोपियन कामदारांपुढें आम्हांस एकतर आपले स्वातंत्र्य व हुषारी गुंडाळून ठेवावी लागते नाहींतर भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें :–

मौनान्मूकः प्रवचनपटुर्वातुलो जल्पको वा
क्षांत्या भीरुर्यदि न सहते प्रायशो नाभिजातः।
धृष्टः पार्श्वे वसति नियतं दूरतश्चाप्रगल्भः
सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ॥

असें म्हणण्याची पाळी येते. आमच्यावर कोणाचाहि कधीं पूर्ण विश्वास नसतो तेव्हां अर्थातच क्रॉफर्डसाहेब लांच खातात असें आपणच प्रथम सांगण्याचीहि चोरी; व अभयवचन दिलें तरी मागाहून सर्व खरा प्रकार साफ सांगण्याचीहि चोरीच! अशी स्थिति असल्यावर जो वरिष्ठ येईल त्याप्रमाणेंच आम्ही बनल्यास त्यांत आमचा तरी काय दोष? हल्लींची राज्यव्यवस्था अशी आहे कीं त्यांत व्यक्तिस्वातंत्र्य गुंडाळून ठेवणारींच माणसें पुढें यावयाचीं. मनुष्य सालस असल्यास यापलीकडे तो फारसा जातच नाहीं, पण त्यांतहि जर मग शारीरिक तरतरी असली तर मग वाममार्गांतील (मद्य, मांस, मत्स्य, मैथुन व मुद्रा या) "पंच प्रकारा" पैकीं यथाशक्ति दोहोंचें, तिहींचें किंवा चोहोंचें सेवन सुरू होतें! तात्पर्य व्यक्तिस्वातंत्र्याचा फारसा अभिमान नसून जे हुषार किंवा तरतरीत आहेत त्यांचीच हल्लींच्या राज्यव्यवस्थेत विशेष चहा आहे. याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि गुणांकडे किंवा अवगुणांकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष नसतें व म्हणूनच दोन तीन "म" कारवालेहि त्यांचे स्नेही असूं शकतात. असल्या हुषार हुकूम बजावणाऱ्यांत धैर्यसाहसादि गुण कोठून यावें बरें? वेस्टसाहेब म्हणतात त्याप्रमाणेंच चांगल्या व्यवस्थेखालीं हे गुण नजरेस येतील, पण ती व्यवस्था करणें म्हणजे आज केवढीं उलाढाल करावी लागणार? ती करावी कोणी व करण्याची इच्छा तरी कोणाची आहे?

असो. हा थोरला प्रश्न जरी एकीकडे ठेविला तरी नेटिव मामलेदार जात्या निरपराधी असून धैर्य व साहस इत्यादि गुणांच्या अभावामुळें त्यांच्या हातून ही कृती घडली ही गोष्ट जशी सरकारास तशी आम्हांसहि मान्य आहे. आतां त्यांतहि जो निवडानिवडीचा प्रकार चालविला आहे तो कशाला? वेस्ट साहेब स्वतःच कबूल करतात कीं खुषीनें व नाखुषीनें पैसे देणाऱ्यांत विशेषसा भेद नाहीं व त्या सगळ्यांस दिलेलें अभिवचन सरकारास सारखेंच पाळलें पाहिजे. शिवाय दुसरी हीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं प्रत्येक खटल्याची या दृष्टीनें तपासणी करण्यापुरता सरकाराजवळ पुरावाहि नाहीं व तो मिळेल कीं नाहीं याचीहि शंकाच आहे. तेव्हां अगदी उघड वाईट खटले असतील तेवढे सोडून बाकी या निवडानिवडीच्या

भानगडींत न पडतां वेस्ट साहेब म्हणतात त्याप्रमाणें नेटिव लोकांच्या अंगी जे गुण नाहींत, किंवा सध्या दृष्टीस येत नाहींत ते उदयास आणण्यासारखी राज्यव्यवस्था प्रचारांत आणण्यास सरकारानें झटावें हेंच त्यास योग्य आहे. नेटिव लोक जात्या कांहीं अनीतिमान नाहींत. परंतु त्यांच्या अंगचे गुण उदयास येण्यास त्यांस आहे याहून वरची पदवी आली पाहिजे.

---

## २. *राजद्रोह

५ एप्रिल १८९२

...... राजद्रोह या शब्दाची व्याख्या करणें जरा कठीण आहे व विशेषतः परकीय राजाच्या सत्तेखालीं या गुन्ह्याचें लक्षण वरेंच कडक होण्याचा संभव असल्यास विशेष पंचाईत पडते. कोणत्याहि देशांतील राज्यव्यवस्था सर्वांशीं निर्दोष नसावयाचीच व जर ती निर्दोष नसावयाची तर त्यांतील व्यंगें बाहेर काढून ती सुधारण्याचाहि उद्योग कांहीं देशहितेच्छु लोक नेहमी करीत राहणारच. हे लोक राज्यकर्त्यांच्याच जातींचे असल्यास त्यांच्या हेतूसंबंधानें राजकर्त्यांचा गैरसमज होण्याचा संभव नसतो. ह्यूमसाहेबास आमच्यापेक्षां जो विशेष फायदा आहे तो हाच.... ....

ह्यूमसाहेबांनीं काढलेलें सर्क्यूलर फक्त राष्ट्रीय सभेच्या सभासदांकरतांच असून ते खाजगी समजून तें कोणीहि छापू नयें असें स्पष्ट लिहिलें होतें; परंतु..........

.........हें सरक्युलर व त्यावरील पत्रव्यवहार अलाहाबादच्या एका मॉर्निंगपोष्ट नामक इंग्रजी पत्रकर्त्यास दिलें व त्यानें ते सर्व छापून प्रसिद्ध केलें. या पत्रकारास हा पत्रव्यवहार ह्यूमसाहेब येथें असत तोंपर्यंत चोरून प्रसिद्ध करण्याची संधी सापडली नाहीं म्हणून त्याचा दोष ह्यूमसाहेबांवर लादण्याचा हा इंग्रजी न्याय आमच्या इंग्रजी बंधूसच शोभतो ! .........

...... ज्या लोकांनीं हा पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे त्यासच जर तो १०-१५ दिवस अगोदर सापडतां तर तो ह्यूमसाहेव येथें असतांच त्या लोकांनीं प्रसिद्ध केला असता; परंतु तसें करण्यास सवड मिळाली नाहीं; म्हणून ह्यूम-

---

* भारतीय कॉंग्रेसच्या स्थापनेच्या प्रयत्नांत ए. ओ. ह्यूम यांचा फार मोठा वाटा होता. ते कॉंग्रेसचे सरचिटणीस असतांना ब्रिटिश राजसत्तेच्या जुलमाखाली भारतीय जनतेचे जीवन खालावत जाऊन प्रगती खुंटली असून त्यांना हक्क मिळाल्याशिवाय प्रगती होणार नाहीं अशा अभिप्रायाचे विचार त्यांनी प्रसिद्ध केलें. तें पत्र प्रसिद्ध करून वाटावयास नको होते कारण त्यांत राजद्रोहात्मक मजकूर आहे, असे मत कांही कॉंग्रेसवाले म्हणू लागलें. त्यासंबंधी आपले विचार या लेखांत टिळकांनी प्रगट केले आहेत.

साहेबांच्या पाठीमागें प्रसिद्ध करून पुनः ह्यूमसाहेबांचाच इरादा ह्याप्रमाणें होता अशी ओरड करण्यासहि मंडळी तयार आहेच. याचें नांव इंग्रजी कावा व शहाण-पण !

ह्यूमसाहेबांनीं जे सरक्युलर काढलें आहे तें राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी या नात्यानें नसून त्यांनीं आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर म्हणजे फक्त ए. ओ. ह्यूम अशी सही घालूनच काढलें आहे. कॉंग्रेसची संस्था आज ७-८ वर्षें कशी काय चालली आहे हें सर्वांसच माहीत आहे. ह्यूमसाहेब परकीय असूनहि आज आपला सर्व वेळ, बुद्धि व पैसा या कामीं खर्च करीत आहेत. इतकेंच नव्हें, तर त्यांच्या जातींतील लोक त्यांस 'वेडेपीर' इत्यादि विशेषणें देत असतांहि केवळ नेटिवांच्या कल्याणाकरतांच ह्यूम-साहेबांनीं या कामाचा विडा उचलला आहे; परंतु आम्हाला त्यांचें काय होय ? आज हिमालयाच्या पायथ्यापासून तों केपकॉमोरिनच्या टोंकापर्यंत विद्येनें, धनानें व अनुभवानें ह्यूमसाहेबांच्या तोडीचें आमच्यामध्यें किती तरी लोक निघतील ! पण ह्यूमसाहेबाप्रमाणें राष्ट्रहिताच्या कामीं झटून मेहनत करणारा आर्यमातेचा पूत तिन्ही इलाख्यांत सांपडूं नये काय ? बायका, पोरें, सगेसोयरे, सर्वांसच असतात; पण विलायतसारख्या स्वतंत्र व उर्जित दशेंत असलेल्या राष्ट्रांतून ज्याप्रमाणें ब्राडलासारखे महात्मे निघतात तसा इकडे एकहि निघूं नये हें आश्चर्य नव्हें काय ? प्रजा उत्तरोत्तर भिकारी होत चालली ही गोष्ट अनुभवानें प्रत्येकास ठाऊक आहे. कित्येकांस तर एक वेळची पोटभर भाकर देखील मिळत नाहीं; परंतु प्रजेची ही दरिद्रावस्था प्रत्यक्ष आमच्या डोळ्यापुढें असताहि आपण हातपाय हालवीत नाहीं, आपणांस त्यांचीं कींव येत नाहीं व त्यांची स्थिती सुधारण्याकरतां स्वतःच्या पदरांस चट्टा लावून घेण्याची आमची बुद्धि होत नाहीं ही शोचनीय गोष्ट आहे. ह्यूमसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं, " हा जो तुम्हीं निष्काळजीपणा चालविला आहे, याचे भयंकर परिणाम तुम्हांस केव्हां ना केव्हां तरी सोसावे लागतील. तुम्ही आपल्या डोळ्यांवर कातडें ओढवून घ्याल, पण एकंदर प्रजा दारिद्र्याच्या व भुकेच्या भट्टींत पडून, तावून निघाली म्हणजे त्यांस तुमच्या डोळ्यांवरील कातडें दूर करण्यास एक क्षणभरहि वेळ लागणार नाहीं. तुम्हास असें वाटेल कीं, या गरीब प्रजेच्या हातून काय होणार ? परंतु हा तुमचा समज अगदीं चुकीचा आहे. क्षुधा व दारिद्र्य मनुष्यास काय करावयास लावेल याचा नेम नाहीं. फ्रान्स देशांत राज्यक्रांति होण्यापूर्वीं अशीच शांतता दृष्टीस पडत होती; पण प्रसंग आला तेव्हां ती सर्व एका क्षणांत नाहींशी होऊन जिकडे तिकडे एकच कल्लोळ होऊन गेला. सरकार अशा वेळीं तुमचें संरक्षण करील असें जर तुम्हास वाटत असेल तर तीहि चूक आहे. दारिद्र्यानें व क्षुधेनें गांजलेल्या लोकांपुढें सरकार व तुम्ही या दोघांचाही टिकाव

लागणार नाहीं. गरीब लोकांस पुढारी मिळणार नाहींत असें तुम्हांस वाटत असेल; पण वेळ आली म्हणजे पुढारीहि निपजतात हें तत्त्व लक्षांत ठेवा. ज्यांत सरकारचें हित आहे त्यांत तुमचेंहि आहे. इंग्रज सरकारचें राज्य आहे तोंपर्यंतच तुमची वढती व मान्यता आहे. हें राज्य गेलें कीं, तुम्हास कोणीहि विचारणार नाहीं. व तुमची संपत्तीहि कोणी टिकूं देणार नाहीं; करतां वेळींच जागे व्हा व सरकार झोंप घेत असले तर त्यांसहि जागें करा. हिंदुस्थानांतील प्रजेची स्थिति सुधारल्याखेरीज तुमची अगर सरकाराचीहि शाश्वती नाहीं. आज सर्व शांत दिसतें आहे एवढयावर जाऊं नका. तुम्हीं ज्या ठिकाणीं घोरत पडला आहात त्याच्या खालीच भयंकर कडा आहे व कडयाकडे पाहावत नाहीं म्हणून जर तुम्ही भीतीनें अधिकाअधिकच डोळयांवरून पांथरुण घ्याल तर त्यानें तुमचा तरणोपाय लागणार नाहीं. आपण मेल्यानें जग बुडालें असें होत नाहीं, म्हणून ही जी हिंदुस्थानच्या प्रजेस भयंकर स्थिती येत चालली आहे ती पूर्ण लक्षांत ठेवून तिचा प्रतिकार करण्यास तुम्हांस झटलें पाहिजे व त्यासाठीं द्रव्याची जी मदत लागेल ती तुम्ही उत्सुकतेनें व हौसेनें दिली पाहिजे. हिंदुस्थानांतील सरकारी अंमलदार इतके गाढ झोपी गेले आहेत कीं, येथें आमची कोणी दाद घेत नाहीं, तथापि तेवढयानें निराश होऊन उपयोगी नाहीं. प्रजेची हीच स्थिती कायम राहिली तर कठीण प्रसंग आहे व तो टाळण्याचा येथे नाहीं तर विलायतेस जाऊन तुमच्या हातून होईल तितका प्रयत्न करणें तुमचें कर्तव्य आहे."

ह्यूमसाहेबांचे हे विचार किती स्पष्ट व कळकळीचे आहेत हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल, हिंदुस्थानची प्रजा दिवसानुदिवस अन्नास मोताद होत आहे ही गोष्ट खुद्द सरकारच्या रिपोर्टांतूनहि कबूल केली आहे; व शेतकऱ्यांसाठी म्हणून जें हल्ली कमिशन बसलें आहे त्याचा उद्देश लक्षांत आणला म्हणजे स्थिति फार भयंकर होत चालली आहे याबद्दल दुसरा पुरावा देण्याची जरूर रहात नाहीं; आतां ही स्थिति इतकी भयंकर झाली आहे कीं, जेणेंकरून शेतकरी लोक बंड करण्यास प्रवृत्त होतील, हा ह्यूमसाहेबांच्या लेखांतील मुख्य मुद्दा आहे, ह्यूमसाहेबांच्या मतें हा काळ जवळ आला आहे व राज्यव्यस्थेंत सुधारणा करून प्रजेस अन्न मिळण्याची जर आपण कांहीं तजवीज केली नाहीं तर आम्ही आपल्या कर्तव्यास मुकलों असें होईल. आतां कित्येकांच्या मतें ह्यूमसाहेबांस वाटत असलेली ही भीति सर्वथैव निराधार असेल अगर कित्येकांच्या मतें ही वेळ ह्यूमसाहेब म्हणतात तितकी सन्निध येऊन ठेपली नसेल; परंतु यापैकीं कोणताहि पक्ष घेतला तरी ह्यूमसाहेबांवर राजद्रोहाचा जो आरोप आमच्या इंग्रजी बंधूंनी आणला आहे तो कसा सिद्ध

होतो हें आम्हांस समजत नाहीं. शेतकरी लोक अन्नास मोताद होऊन कर्जांत बुडाले म्हणजे दंगे करून मारवाड्यांचीं नाकें कापण्यासहि प्रवृत्त होतात याचें छोटेखानीं उदाहरण सुमारें बारा वर्षांपूर्वीं याच जिल्ह्यांत घडून आलें होतें, व मारवाड्यांचीं घरें लुटलीं गेल्यानंतर सरकारानें रिलीफ अॅक्ट काढून सावकाराचा नफा बुडवून शेतकऱ्यांची समजूत काढली, हें सर्वांसच माहीत आहे. इंग्रजी राज्याच्या अवाढव्य खर्चाखालीं व व्यवस्थेखालीं उत्तरोत्तर प्रजा अगदीं भिकारी होऊन असले प्रसंग सार्वत्रिक होणार नाहींत कशावरून? आणि जर ते सार्वत्रिक होण्याचा संभव आहे तर तिकडे लोकांचे लक्ष फिरवून तो प्रसंग टाळण्याची संपन्न लोकांस जर कोणी विनंति केली तर तो राजद्रोह झाला काय? ह्यूमसाहेबांचें सरक्युलर सामान्य लोकांस उद्देशून लिहलें नाहीं. इंग्रजी राज्यांत अगर इंग्रजांच्या मेहरबानीनें ज्यांनी द्रव्याचा संचय केला आहे त्यांस उद्देशून हें सरक्युलर काढलें आहे. या लोकांची विद्या, धन, हुषारी, अधिकार आणि पदव्या सर्व कांहीं इंग्रजी राज्याच्या शाश्वतीवर अवलंबून आहे. करतां इंग्रजी राज्याच्या शाश्वतीसाठीं सामान्य प्रजेपेक्षां यांसच झटून उद्योग व मेहनत केली पाहिजे; मेहनत दोन प्रकारची. शरीरद्वारां अगर द्रव्यद्वारां. पण या दोन्हीं प्रकारची मेहनत या लोकांच्या हातून होत नाहीं ही मोठया आश्चर्याची गोष्ट आहे. ही हेळसांड फार दिवस चालावयाची नाहीं. याबद्दल या लोकांची कोणी तरी चांगली कानउघाडणी करावयास पाहिजे होती; व भीतीनें या लोकांनीं डोळ्यांवरून जे गुरगटून पांघरूण घेतलें आहे तें काढून त्यांस त्यांच्यापुढें असलेल्या भयंकर स्थितीचें कोणीं तरी दर्शन करून देणें जरूर होतें. वरील सरक्युलर काढण्यांत ह्यूमसाहेबांचा मुख्य उद्देश हाच होता; व यासाठीं तें सरक्युलर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध न करतां राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक सभासदास खाजगी रीतीनें पाठविण्याचें योजिलें होतें. यांत ज्या लोकांस उद्देशून हें सरक्युलर लिहिलें आहे त्यांची भीति मोडण्यासाठीं अगर मत मोडण्यासाठीं अलंकारादि रीतीनें क्वचित् स्थळीं दहशतीचा, क्वचित् अतिशयोक्तीचा आणि क्वचित् मनधरणीचा उपाय योजावा लागला असेल. पण त्यामुळें हें सरक्युलर राजद्रोही ठरेल तर आपल्या कट्टया स्नेह्यासहि आमचें सरकार बंदींत टाकण्यास तयार आहे, असें समजावें लागेल. असला परिणाम घडून यावा यापेक्षां हिंदुस्थानांतील राजद्रोहाचे स्वरूप खरोखर जर इतके उग्र असेल तर तेंच बदललें पाहिजे असे आम्हांस वाटतें. ह्यूमसाहेब कांहीं कोणास बंड करण्यास सांगत नाहींत अगर चिथावूनहि देत नाहींत. प्रजा दरिद्री होत चालली आहे त्याचा आम्हीं योग्यवेळीं प्रतिकार न केल्यास काय परिणाम होईल एवढेंच काय तें त्यांनीं स्पष्टरीतीनें सरकारास व संपन्न लोकांस कळविलें

आहे; व ज्या लोकांस ही गोष्ट कळविली ते लोक स्वतः बंड करणारे नसून उलट इंग्रजी राज्य चिरस्थायी व्हावें, हेंच त्यांच्या हिताचें आहे. अशा लोकांस जर आपल्या कर्तव्याचा कोणीं खणखणीत उपदेश केला तर तो मनुष्य पिनलकोडांतील राजद्रोहाच्या व्याख्येप्रमाणें "लोकांत सरकारबद्दल अप्रीति उत्पन्न करतो" असें म्हणणें कधींहि वाजवी होणार नाहीं.

परंतु आमच्या लोकांची राजद्रोहाबद्दलची समजूत इतकी नाजूक झाली आहे कीं, ह्यूमसाहेबांच्या सरक्युलरावर एखाद्या इंग्रजी पत्रकारानें खरमरीत टीका केली नाहीं तोंच आम्हीं "मी नाहीं, मी नाहीं," असें म्हणण्यास तयार झालों आहों; अथवा इंग्रजी पत्रकारांनीं टीका करण्याची सुद्धां आम्ही जरूर ठेवली नाहीं; ह्यूमसाहेबांचें सरक्युलर नजरेस पडल्याबरोबर हें प्रसिद्ध करणें मोठ्या धोक्याचें आहे असें अलाहाबादच्या कॉंग्रेस कमिटीनें ह्यूमसाहेबांस कळविलें व मुंबईच्या कमिटीनेंहि बहुतेक तोच मार्ग स्वीकारला; परंतु अखेरीस अलाहाबाद कमिटीनें ह्यूमसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणें या सरक्युलराच्या प्रती कॉंग्रेसच्या सभासदांस वांटल्या व मुंबईच्या कमिटीनें तेंहि करण्याचें नाकारलें. कित्येक शहाण्या लोकांनीं असा तर्क काढला कीं, ह्यूमसाहेबांचें आपणांस कांहीं वाटत नाहीं, परंतु निदान कॉंग्रेसच्या कामास धक्का येऊं नये एवढ्यासाठीं तरी हें सरक्युलर प्रसिद्ध होणें इष्ट नाहीं. केवढी ही राष्ट्रीयसभेची जबरदस्त काळजी ! जणूं काय तीस आज जें स्वरूप आलें आहे तें दूरदर्शी विचारांचें फल होय. आपला भित्रेपणा कसा झांकावा हें आम्ही फार चांगलें शिकलों आहों एवढेंच काय तें यावरून व्यक्त होतें. बाकी राष्ट्रहिताच्या कामीं झटून, कळकळीनें व स्वार्थाकडे लक्ष न देतां मेहनत करण्याचा मक्ता मात्र आम्हीं ह्यूमसाहेबांवर सोंपविला आहे. त्यानें खुशाल मेहनत करावी व एखाद्या वेळेस कडक सरक्युलर काढलें तर आम्हीं त्याचा भिऊन निषेध करावा असा त्यांचा आमचा श्रमविभाग झाला आहे ! अशानें कॉंग्रेस ह्यूमसाहेबांच्या मागें कशी चालेल याची आम्हांलाहि मोठी काळजीच वाटते.

---

## ३. इंग्रजी राज्यांत आम्हांस फायदा काय झाला ?

[९ ऑगस्ट १८९२]

आपण वर्षभर केलेल्या कारभारांत किंवा उद्योगांत फायदा किती झाला, आपल्या कोणत्या श्रमाचें कसें चीज होत आहे आणि कोठें, कसें व किती लक्ष पोंचविल्यानें आहे याजपेक्षां जास्त किफायत होण्याचा संभव आहे, हें वारकाईनें पाहण्याची जी व्यापाऱ्यांची रीत आहे, तीच सर्वत्र आवश्यक आहे. आदा, खर्च, नफा तोटा, बरेंवाईट इत्यादिकांची नीट चौकशी न केली तर त्यापासून कधींहि कल्याण व्हावयाचें नाहीं व आजवर झालेंहि नाहीं. ओढघस्ताचा प्रपंच, दिवाळखोराचा व्यापार आणि फसगत झाली म्हणून पस्तावणाऱ्याचें आयुष्य इत्यादिकांचा आपण नीट विचार करूं लागलों म्हणजे आपल्या ध्यानांत पहिली गोष्ट अशी येते कीं, त्यांनीं आपल्या व्यवहाराचा मुळींच विचार केला नाहीं ! व्यापारी बुडतात ते केवळ फायदानुकसानीचा वेळेवार विचार नसतो आणि जमाखर्चाची नीटशी व्यवस्था नाहीं यामुळेंच. राजकीय बाबतींतील प्रकारहि असाच आहे. [म्हणजे आपल्याला मिळालें आहे काय, मिळालें त्यांत नको असें कोणतें आणि आवश्यक असून अद्याप मिळावयाचें कोणतें उरलें आहे याचा वारंवार विचार झाला पाहिजे] आणि विचार झाल्यावर तें मिळविण्याबद्दल रास्त व न्याय्य प्रयत्न झाला पाहिजे. असें होईल तरच राजकीय बाबतींत दिवसेंदिवस आमचें पाऊल पुढें पडत जाण्याचा संभव आहे. आमच्या देशाला सध्यां नवा मनु मिळाला यामुळें सर्व प्रकार नव्या वळणाचे सुरू झाले आहेत व नव्या वळणाचे प्रकार सुरू झाले म्हणून हक्काच्या नव्या नव्या बाबी आणि ते संपादण्याचें नवे नवे प्रकारहि अमलांत आणावे लागत आहेत. त्याजबद्दल जर कोणी मागील कालच्या वर्तणुकीचा किंवा स्थितीचा दाखला देऊन आमच्या प्रयत्नाचा प्रतिकार करील तर आमच्या मतें तो खचित दोषी होईल. असो; साधारण मनुष्यालासुद्धां जर खुद्द सरकारला बरोबरीच्या माणसाप्रमाणें आपल्या मनातली शंका किंवा आपणास वाटत असलेल्या रास्त गोष्टीबद्दलची मागणी करितां येते व प्रसंगविशेषीं जाबहि घेतां येतो, तर पाश्चिमात्य शिक्षणाच्या योगानें व तद्द्वारां परिचित झालेल्या अनेक इतर प्रकारांमुळें आम्ही राजकीय हक्कांची मागणी केली, राजकीय व्यवस्थेचा विचार करूं लागलों व राजकीय सुखाभिलाषाकडे आमच्या मनाची साहजिक प्रवृत्ति होऊं लागली तर त्यांत विशेषसें नवल नाहीं. सारांश

सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येकाच्या डोक्यांत राजकीय विचार घोळूं लागतील व राजकीय सुधारणेप्रीत्यर्थ प्रयत्न करण्याची त्याला हांव सुटेल तर त्यांत कांहींच गैर नाहीं. आम्हांला राज्यकारभारांत घ्या, आमची सल्लामसलत ऐका, तुमच्यांतले हे दोष काढा, अमुकांचा संग्रह करा, अमका कर हवा आणि तमका नको, येथें तुम्ही चुकतां, तिकडे तुमचें लक्ष पोंचत नाहीं इत्यादि गोष्टी उघडपणें सरकारास सांगण्याचा आमचा हक्क आहे. हें तत्त्व आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांस कबूल आहे व त्याप्रमाणें प्रजेचें म्हणणें ऐकावयास मिळण्याचीं त्यांनीं आपण होऊन प्रजेस साधनें दिलीं आहेत. वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य आणि उच्च शिक्षणाच्या सोयी यांचा मुख्य हेतु हाच आहे. "आमचें राज्य सुरक्षित व सुयंत्रित चालावें म्हणून हिंदुस्थानच्या लोकांस अज्ञानी ठेवणें आमचें शील नव्हे" असें ते उघड आणि भरदरबारांत बोलून दाखवितात. "अगदीं लहानपणापासून इंग्रजी स्वातंत्र्याचा खुराक आम्ही चारतों; प्रजेच्या अनुमतीशिवाय कर बसवितां येत नाहीं असें नित्यशः पढवितों; राजाचे अधिकार संपुष्टांत आणून ठेवलेल्या आम्हां लोकांच्या इतिहासाची त्यांजकडून पारायणें करवितो; तर आपल्या देशाच्या राज्यकारभारांत आमची मदत घ्या, आमच्या सल्यानें आमच्यावर राज्यकारभार चालवा, असें प्रजेनें म्हटलें तर त्यांत गैर काय ?" असा ध्वनि सरकारी अधिकाऱ्यांच्याहि तोंडून निघतो ! म्हणूनच राज्यकारभाराकडे लक्षपूर्वक पाहणें, त्यांतील दोषांची चर्चा करणें, त्यासंबंधाचे जास्त हक्क संपादणें, संपादण्याचा प्रयत्न करणें, यांत आमच्या राज्यकर्त्यांस कांहीं गैर वाटत नाहीं एवढेंच नव्हें, तर त्यापासून त्यांना उलटा जास्त आनंद होण्याचा संभव आहे. कारण आमच्या बऱ्याकरितांच ते राज्यकारभार करीत आहेत व आम्हांला आमचा राज्यकारभार चालवितां आला कीं, आम्हांवर तो सोपवून या दगदगींतून आपण मोकळें होऊं असेंहि ते वारंवार म्हणून दाखवीत आहेत. असो; आज हा इतका पाल्हाळ लावण्याचें कारण असें कीं, राजकीय विषयाची चर्चा, राजकीय दोषांचें आविष्करण किंवा राजकीय हक्कांची संपादणी इत्यादि बाबतींत प्रजेनें जी चळवळ चालविली आहे ती सरकारास आवडावयाची नाहीं, व त्यामुळें आपणांवर ते डोळे वटारतील इत्यादि प्रकारच्या शंका जर अद्याप कोणाच्या मनांत असल्या तर त्या दूर व्हाव्या.

आतां पहिल्यानें इंग्रजी राज्यापासून आम्हास फायदा कोणता झाला त्याचें विवेचन करूं. इंग्रजी राज्यांत हिंदुस्थानास जे अनंत फायदे झाले आहेत, ते व तसे, इंग्रजांखेरीज इतरांच्या हातून कालत्रयींहि झालें नसतें. झालेल्या फायद्यावर दृष्टि देऊनच तृप्त असणें हें कृतज्ञतेचें लक्षण आहे, जास्तीची हांव उपयोगाची

नाहीं वगैरे प्रकारचें ब्रह्मज्ञान पढविण्यांत अगदीं पटाईत असे पुष्कळ लोक आहेत. परंतु नीट विचार केला म्हणजे फायद्यावरोबरच माणुसकीला अवश्य असे अनेक गुण राज्यांत आम्हीं गमावून घेतों, असें आढळून येईल, असें कित्येकांचें म्हणणें आहे. फार तर काय, पण या इंग्रजी राज्यांत आमचें अस्तित्व कायम राहील कीं नाहीं अशीहि कैकांस धास्ती पडली आहे. जो तो आपल्या पक्षाचें समर्थन करण्यासाठीं लेखन व वाक्चातुर्य एकसारखें खर्चीत सुटतो. अशा स्थितींत साधारण नवख्या होतकरूला इंग्रजी राज्यांत खरोखरीच आमचा फायदा होत आहे कीं नुकसान चाललें आहे, अशी शंका उत्पन्न होऊन तो भांवावण्याचा संभव आहे. यास्तव या प्रश्नाचें थोडेंसें विस्तारपूर्वक विवेचन आणि तेंहि अशा वेळीं कीं, जेव्हां राजकीय चळवळीला नियंत्रित व्यवस्थापूर्वकचीं साधनें अनुकूल होत चाललीं आहेत तेव्हां करणें अत्यावश्यक आहे. इंग्रजी राज्यांत आम्हास झालेले फायदे म्हटले म्हणजे :–

१) शांतता. २) कायद्याची सर्वत्र व्यवस्था. ३) अपराधांचा वंदोवस्त. ४) सार्वजनिक आरोग्य. ५) व्यापारसंमृद्धि. ६) शेतकीसुधारणा. ७) खनिज व उद्भिज संपत्तीची अभिवृद्धि. ८) विद्यादानाच्या अनुपम सोयी. ९) स्वराज्य कारभाऱ्यांची प्राप्ति. १०) लेखनस्वातंत्र्य. ११) यंत्रादि सुखसामुग्रीचा परिचय आणि १२) स्वातंत्र्याची अभिरुची हे होत.

–या इतक्या फायद्याच्या बाबी पाहिल्या म्हणजे याच्यापुढें नुकसानीच्या गोष्टी कितीहि असल्या तरी त्या तुच्छच असें वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्याप्रमाणें पदार्थमात्र शुद्धावस्थेंत क्वचित् सांपडावयाचे त्याचप्रमाणें या फायद्याच्या गोष्टींविषयींहि झालें आहे तें कसें हें * पुढील विवेचनावरून ध्यानांत येईल.

---

* 'रॉयल कमिशनपुढील साक्ष' 'राणी सरकारचा जयजयकार' इत्यादी पुढील लेख आणि 'भारताच्या आर्थिक समस्या' खण्ड ५ पहा.

# ४. आमच्यावर जुलूम कसा होतो ?

[२४ जानेवारी १८९३]

या देशाचीं राज्यसूत्रें जेव्हां प्रथम इंग्रजसरकारचे हातांत पडलीं, तेव्हां टोपीवाल्याची टापटीप, हुशारी आणि चातुर्य पाहून बहुतेक सर्व लोक चकित झाले. यांचें लष्कर, यांची जमावंदीची पद्धत, आगबोट, आगगाडी, तारायंत्र, सडका, रस्ते, पूल, शाळा इत्यादि प्रकारांनीं कांहीं दिवसपर्यंत लोकांस अगदीं गांगरून टाकलें होतें. दंगेधोपे नाहींसे होऊन ज्यास त्यास सुखशांततेचा पूर्ण अनुभव मिळूं लागला. पोरावाळांस मुलुखगिरी करून पैसा मिळविण्याचे श्रम पडतनासे झाले. काशीचें पत्र पुण्यास दोन पैशांत पांच सहा दिवसांनीं येऊन निर्विघ्नपणें पोंचूं लागलें, पेंढारांचा बंदोबस्त झाला; ठगी निर्मूल झाली आणि पेशवाईंत नानाफडणवीसांसहि जेथें सालीना तीनशें रुपये मिळण्याची मारामार, त्याच ठिकाणीं आता दरमहा दोनशेंचारशें रुपये मामलेदार, मुनसफांस मिळूं लागले. अर्थातच कांहीं कालपर्यंत ईश्वरानें दयाळू होऊन आमच्यावर राज्य करण्याकरितां हे कोणी तरी दैवशाली पुरुष पाठविले आहेत, असा सर्वांचा समज झाला. गरीबगुरिबांस तर कुंपणीसरकारचें यंत्र कोणाकडे आहे त्याचा थांगच लागेना. जें कांहीं पहावें तें सर्व कांहीं विलक्षण ! तेव्हां हें आहे तरी काय ? हाच भ्रम कित्येक दिवस लोकांस पडला होता. व इंग्रजांच्या राज्यांत आंधळ्यानें काठीस सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत जावें असें लोक म्हणूं लागले. परंतु दारूचा अम्मल ज्याप्रमाणें फार वेळ टिकत नाहीं, त्याप्रमाणें राज्यक्रांतीपासून उत्पन्न झालेला हा भ्रमहि उत्तरोत्तर दूर होत चालला. आंधळ्यानें काठीस सोनें बांधून जावें खरें; पण सोनेंच उत्तरोत्तर दुर्मिळ होत चाललें ही गोष्ट दिवसांनुदिवस लोकांच्या जास्त लक्षांत येऊं लागली. सुखशांतता झाल्यामुळें लोकसंख्या वाढली, उद्योगधंदे परकीयांच्या हातांत पडले, आणि ज्या राज्यपद्धतीचें आम्ही कौतुक करीत होतों, त्या पद्धतीनें आम्हांस काल-सर्पाप्रमाणें चोहोंकडून ग्रासून टाकलें आहे असें वाटूं लागलें. डोळ्यावरील धूर जरासा कमी झाला व हें गौडबंगाल आहे तरी काय ? अशी चौकशी सुरू झाली. कोणाच्या मतें परकीयांनीं मोठमोठ्या जागा आपल्या हातांत ठेऊन हिंदुस्थानची संपत्ती लुटण्यास सुरुवात केली आहे, व कित्येक आमचे व्यापारधंदे परकीयांच्या हातांत पडल्यामुळें आपणांस ही स्थिति आली आहे असें म्हणूं लागले आहेत; कित्येकांच्या मतें आमच्या नाशास आमची सामाजिक

स्थिति हीच सर्वांशीं कारण आहे. सारांश, इंग्रजी अमलानें आमची दृष्टी जी अगदीं दिपून गेली होती, ती आतां सुधारत जाऊन आमच्यावर जुलूम कसा होतो व आमचे नुकसान कशानें होतें हें शोधण्यास आम्ही लागलों आहों. अशा वेळीं सर वुईल्यम वेडरवर्नसारख्या आनुभविक गृहस्थानें इंग्रजी राज्यापासून आमच्यावर कोणकोणते परिणाम झाले याची जी थोडीशी हकीगत दिली आहे ती सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखी असल्यामुळें, त्याचा थोडासा सारांश येथें देण्याचा आमचा विचार आहे. आनरे. मि. दादाभाई नवरोजी यांनीं पार्लमेंटसभेचे मेंवर झाल्या दिवसापासून हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितीबद्दल विलायतेंत एक दोन ठिकाणीं भाषणें केलीं व एक दोन लेख लिहिले आहेत. आनरे. दादाभाई यांची राजनिष्ठा विलायतेस कसास लागून खुद्द विलायतच्याच लोकांनीं त्यास आपले प्रतिनिधी निवडून दिले असल्यानें ते मुद्दाम जाणूनवुजून हिंदुस्थानसरकारास विनाकारण नांवे ठेवतील ही शंकाहि घ्यावयास नको. यामुळे आनरे. दादाभाई यांचे लेख व भाषणें यांचा विलायतच्या लोकांच्या मनावर लवकरच कांहींतरी चांगला परिणाम होईल अशी उमेद आहे. त्यांतून सर वेडरवर्नसारख्या उदार गृहस्थांनीं दादाभाई यांस मदत केल्यावर मग तर विचारावयासच नको. सर वेडरवर्न यांनीं हल्ली जो निवंध लिहिला आहे तो याच कामाकरितां होय. इंग्रजी अम्मल कितीहि सुधारलेला असला तरी हल्लींच्या व्यवस्थेनें हिंदुस्थानच्या लोकांचें अतिशय नुकसान होत आहे, असें मि. दादाभाई यांनीं एका लेखांत प्रतिपादन केलें होतें. सर वेडरवर्न यांनीं तोच लेख हातीं धरून इंग्रजी राज्यव्यवस्थेनें लोकांचे किती व कसें नुकसान होत आहे हें स्वानुभवावरून फार चांगल्या रीतीनें व्यक्त केलें आहे. वेडरवर्नसाहेबांचे वडील हिंदुस्थानांत सनदी नोकर होते व त्यांचे वंधूहि हिंदुस्थानसरकारच्या नोकरींतच सन १८५७ सालीं प्राणास मुकले. तेव्हां हिंदुस्थानसरकारच्या नोकरीचा पहिल्यानें आपणास पुष्कळ अभिमान होता असें त्यांनीं म्हटलें आहे. पण उत्तरोत्तर खरी स्थिति डोळ्यानें पाहिल्यावर हा समज दूर होत चालला व इंग्रजी राज्यव्यवस्थेनें प्रजेचें पुष्कळ अनहित होत आहे अशी ब-याच वर्षांनीं आपली खात्री झाली असें त्यांनीं स्पष्ट म्हटलें आहे. सर वेडरवर्न यांचा आमचेकडील लोकांस चांगलाच अनुभव आहे, तेव्हां ते म्हणतात तें खरें कीं खोटें याचा निर्णय करण्यासाठीं वर दिलेल्या गोष्टीहि आमचेकडील लोकांस सांगण्याची आवश्यकता नाहीं. सर वेडरवर्न यांनीं आमच्याकडे असिस्टंट कलेक्टरच्या जागेपासून तों कौन्सिलरच्या जागेपर्यंत सर्व मोठमोठीं कामें केलीं आहेत व लोकांच्या हिताकडे त्यांचें इतकें लक्ष असें कीं, इकडील लोकांत त्यांची साधारण शेतकऱ्यासहि चांगली माहिती झाली आहे. मुंवईच्या राष्ट्रीयसभेचे

तर ते अध्यक्षच होते. तेव्हां राजा व प्रजा या दोघांचीहि सारखी माहिती असणारा यांच्यासारखा दुसरा साक्षीदार आम्हांस मिळणें कठीण आहे.

आतां हल्लींच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें हे काय म्हणतात तें पाहूं. यांनीं आपल्या निबंधांत प्रथमतः इंग्रजांच्या पूर्वीं चालू असलेल्या राज्यपद्धतींचें थोडें वर्णन दिलें आहे. मोंगलाईंत अगर पेशवाईंत हल्लींप्रमाणें चोहोंकडून रयतेस त्रास सोसावा लागत नव्हता. प्रत्येक गांवांतील लोक आपआपलीं शेतेंभातें, गायरानें, तळीं, नद्या, रस्ते वगैरेंची व्यवस्था ठेवीत. गांवच्या एकंदर उत्पन्नापैकीं कांहीं नियमित भाग राजास कर म्हणून द्यावा लागत असे. पण हा भाग एकदा दिला म्हणजे बाकी सर्व व्यवस्था गांवकरी लोकांच्याच हातांत रहात असे. प्रत्येक गांवांत तेथील गांवकऱ्यांच्या मगदुराप्रमाणें सोनार, सुतार, कोष्टी, लोहार, यांचे धंदेही चालत असत. सरकारी कामगार परगण्यांतील अगर इलाख्यांतील मुख्य गांवींच कायते आसावयाचे, पण इंग्रजी राज्यांत ही सर्व व्यवस्था बदलून जाऊन या 'ग्रामसंस्था' त्यांचें स्वातंत्र्य व त्यांपासून लोकांस होणारें सुख हीं उत्तरोत्तर लयास चाललीं आहेत. सर वुइल्यम वेडरबर्न यांचें मुख्यत्वेंकरून असें म्हणणें आहे कीं, इंग्रजी राज्यकर्त्यांनीं या ग्रामसंस्था मोडून टाकून सर्व कारभार अधिकाऱ्यांच्या हातांत दिले हीच मोठी चूक केली, व यापासूनच लोकांवर जुलूम होत आहे. हल्लींच्या सुधारलेल्या सरकारास पाहिजे तशी व्यवस्था ग्रामसंस्थांकडून पहिल्यानेंच झाली नसती. पण सरकारच्चें मनांत असतें तर सदर संस्था सुधारून त्यांचेच हातून हें काम हळूहळू सरकारास घेतां आलें असतें. तसें सरकारनें न करितां सर्व अधिकार चालविण्यासाठीं निरनिराळीं खातीं करून ते त्यांच्या हातांत दिले. ही गोष्ट राज्यकर्त्यांस व रयतेस अत्यंत अहितकारक आहे. उदाहरणार्थ, पहिल्यानें जमाबंदीचें खातें घेऊं. इंग्रजी राज्याच्या अमदानींत या खात्याची व्यवस्था कलेक्टराकडेसच असे; त्यामुळें प्रत्येक प्रांतास योग्य अशी व्यवस्थाच त्याचे हातून होत असे. धारवाड जिल्ह्यांतील काळी जमीन, रत्नागिरी जिल्ह्यांतील खडकावरील शेतें, आणि सिंधु नदीच्या कांठी नदीच्या पुरानें पिकणारीं मळीचीं शेतें या सर्वांस जमाबंदीचे कोणतेहि नियम सारखे लागू पडावयाचे नाहींत. प्रत्येक जिल्ह्यांतील लोकांची व जमिनीची स्थिति लक्षांत आणूनच त्या त्या जिल्ह्याकरितां निरनिराळे नियम करावयास पाहिजेत. अव्वल इंग्रजींत अशी व्यवस्था होती, पण पुढें मोजणीखातें निराळें निघाल्यापासून तो सर्व प्रकार नाहींसा झाला. आणि जमिनीची प्रतबंदी आणि सारा ठरून तीस तीस वर्षांनीं सारे वाढविण्याची पद्धत सुरू झाली. एकदां कोणतेंहि खातें उत्पन्न झालें म्हणजे मग अर्थातच त्या खात्यातील अधिकाऱ्यांस आपापल्या खात्याचा अभिमान चढतो

व लोकांच्या नफानुकसानाकडे न पाहतां ते आपलें खातें कसें भरभराटींत येईल ह्यांच्या उद्योगास लागतात. सर्व्हे खात्याची हीच दशा झाली. पहिल्यानें निरनिराळ्या जिल्ह्यांतील लोकांस ज्या सवलती मिळत असत त्या सर्व नाहींशा झाल्या. पीक वरें येवो, वाईट येवो, प्रतवंदी होऊन ठरलेला कायमचा धारा प्रतिवर्षी सक्तीनें वसूल करण्यांत येऊं लागला आणि लवकरच शेतकरी लोक पूर्वी सुखी होते ते दरिद्रावस्थेस येऊन पोंचले. पुणे प्रांतांत तर विचाऱ्या लोकांनीं वंडच केलें. हा एवढा अनर्थ सर्व्हे खात्याचा होय. जमिनीची मोजणी करून नकाशे काढण्यापुरताच या खात्याचा अधिकार असता तर त्यापासून चांगला फायदा होता; पण सरासरीनें ठरविलेले धारे आणि प्रति तीस तीस वर्षी दुपटीनें, तिपटीनें अगर सातपटीनें ते वाढविण्याची धास्ती, यानें शेतकीचा अगदीं चुराडा होऊन गेला आहे.

लोकांवर जुलूम होण्यास हेंच एक खातें आहे असें नाहीं. जंगल, मीठ, अवकारी, कालवा, देवी, रेजिस्ट्रेशन, शाळा, पोलीस आणि गांवसफाई यांनीं चोहोंकडून रयतेस भंडावून सोडलें आहे. तोळाभर मीठ अगर खारी माती काढीन म्हटलें तर सरकारचा शिपाई उभा आहेच. शेतावाहेर जरा गुरूं गेलेंच कीं जंगलचे अधिकाऱ्यांकडे खेपा घालून दंड भरून त्याची सुटका करून घ्यावी लागते. दारूचीं दुकानें त्यांच्या घरांत व वाजारांत वसविलीं जातात. इंग्रजसरकारच्या सर्व सत्तेचा मूर्तिमंत अवतार जो पोलिसचा शिपाई तो यमदूतासारखा त्यांच्या डोळ्यासमोर नेहमीं नाचत असतो. अशा स्थितींत कोणत्याहि राज्याच्या रयतेस कधीं तरी सुख होईल कीं काय याचा लोकांनींच अजमास करावा, अशी सर वेडरवर्न यांची विलायतच्या लोकांस सूचना आहे. पूर्वीच्या राज्यांतून हे सर्व अधिकार रयतेकडे असत. जंगलांची, ताडामाडांची, गायरानांची, रामोशांची (पोलिसांची), मिठाची व आरोग्यसंरक्षणाची सर्व व्यवस्था जेथल्या तेथें आपआपल्या सवडीप्रमाणें व गरजेप्रमाणें जे ते लोक ठेवीत असत; पण आतां ती सर्व व्यवस्था इंग्रज सरकारनें वदलून टाकून लोकांस मीठ देण्याचा, झाडें राखण्याचा, व दारू पाजण्याचा आपणाकडे मक्ता घेतला आहे! आणि हा मक्ता चालवितेवेळीं सरकार आपल्या तिजोरीकडे कायतें लक्ष पुरवितें. यामुळें चोहोंकडून लोकांवर मोठा जुलूम होत आहे. व त्यांस हें सरकार नको व त्याचीं हीं खातींहि नकोत असें वाटूं लागलें आहे. गरीव विचारा कुणबी, ज्यास पूर्वी आपल्या गावांत हवें तें करण्याची मोकळीक होती, त्यांसच आतां घरावाहेर पाऊल पडलें म्हणजे मी कोणत्या खात्याच्या तडाक्यांत सापडतों अशी धास्ती वाटूं लागली आहे. ही स्थिति फार दिवस कधींहि टिकावयाची नाहीं. निरनिराळ्या खात्याचे मुख्य अधिकारी व त्यांच्या हाताखालील

छोट्या अधिकाऱ्यांच्या पलटणी यांस आपले विचार रुचावयाचे नाहींत असें सर वेडरवर्नसाहेब यांनीं स्पष्ट लिहिलें आहे, पण सदर अधिकाऱ्यांच्या हितापेक्षां रयतेचें हित ज्या पद्धतीनें होईल तीच पद्धत सरकारास स्वीकारली पाहिजे. हल्लीं सुशिक्षित नेटिव लोकांच्या इंग्रजी राज्यपद्धतीबद्दल ज्या कांहीं तक्रारी आहेत, त्यांतील मूळ बीज हेंच होय. एखाद्या आधाशी राजाप्रमाणें लोकांचें सर्व स्वातंत्र्य व अधिकार सरकारची निरनिराळीं खातीं पूर्णपणें बळकावून बसलीं आहेत. या राक्षसी खात्यांच्या जुलुमांतून रयतेची सुटका होईल अशी योजना करणें हें विलायतेंतील लोकांचें पहिलें कर्तव्य आहे. रयतेच्या पैशावर ज्यांचा सुखानें चरितार्थ चालतो असे सदर खात्यांतील अम्मलदार आपआपल्या खात्यांचा जुलूम कबूल करणार नाहींत इतकेंच नव्हे, तर उलट आपलें खातें व आपल्या जागा रयतेच्या सुखासाठींच निर्माण झाल्या आहेत असें भासविण्याचा प्रयत्न करतील, पण तिकडे लक्ष न देता ऑनरे० दादाभाईसारखे रयतेचे खरे कार्यकर्ते व मुखत्यार काय म्हणतात याचा विचार करून त्याप्रमाणें विलायतच्या लोकांनीं वर्तन ठेवावें अशी वेडरबर्नसाहेबांची त्यांस शिफारस आहे. सर वेडरबर्न यांचें म्हणणें अतिशयोक्तीचें व भ्रमिष्टासारखें आहे, असा आमच्याकडील इंग्रज पत्रकारांनीं त्यांजवर आक्षेप केला आहे, परंतु शेतकी ॲक्टाच्या कमिशनानें मुंबई इलाख्यांतील साऱ्याच्या पद्धतीविषयीं दिलेलें मत, आणि गुदस्तां प्रसिद्ध झालेला जंगलखात्याबद्दलचा मुंबईसरकारचा ठराव पुनः एकवार वाचला असतां त्या खात्याबद्दल सर वेडरबर्न यांनीं जें म्हटलें आहे तें अक्षरशः यथार्थ आहे अशी कोणाचीहि खात्री होईल.

सरकारी खात्यांचा हा असह्य जुलूम टाळण्याकरितां सर वेडरबर्न यांनीं तीन उपाय सुचविले आहेत. पहिला, कायदेकौन्सिलाची सुधारणा करणें हा होय. सर वेडरबर्न यांचें असें म्हणणें आहे कीं, सरकारच्या खात्यांचा जुलूम अगर अम्मल यथास्थित चालावा म्हणून कायदेकौन्सिलाकडून दरवर्षीं पुष्कळ कायदे पास करून घेण्यांत येतात. कोणत्यातरी खात्यांतील ऑफिसरांस जास्त अधिकार देण्याकरितां सदर खात्याची अम्मलबजावणी जास्त व्हावी म्हणून, अगर त्या खात्याचें उत्पन्न वाढावें म्हणून सरकारास पुष्कळ नवे नवे कायदे करावे लागतात. आजपर्यंत पास झालेल्या कायद्यांपैकीं निम्मेपेक्षां जास्त किंबहुना पाऊण हिस्सा कायदे अशा प्रकारचे आहेत. मिठाचा कायदा, जंगलाचा कायदा, मोहाच्या फुलांचा कायदा, गांवआरोग्यरक्षणाचा कायदा, पोलीसचा कायदा, देवी काढण्याचा कायदा, व या सर्व कायद्यांची दुरुस्ती करण्यासाठीं वेळोवेळीं पसार झालेले कांहीं इतर कायदे हे पाहिले म्हणजे सर वेडरबर्न यांच्या म्हणण्याची सत्यता प्रत्ययास

येते. कायदेकौन्सिलांत लोकांचे खरेखुरे प्रतिनिधी असतील तर लोकांचे हक्क व स्वातंत्र्य बुडविण्यासाठीं निरनिराळ्या खात्यांस अधिकार देण्याकरतां असले कायदे, कायदेकौन्सिलांतून पास व्हावयाचे नाहींत, व मग सदर खात्यांचा जुलूम अर्थातच कमी होईल. ग्रामसंस्थेची रचना सुधारून सदर संस्था पुनः उदयास आणाव्या, हा दुसरा उपाय होय. स्थानिक स्वराज्याच्या व्यवस्थेंत म्युनिसिपालटचा व वोर्डें यांजकडे किरकोळ अधिकार देण्यांत आले होते. तीच व्यवस्था जंगल, अवकारी वगैरे खात्यासंबंधानें करून लोकांवर होणारा जुलूम कमी केला पाहिजे. जंगलासंबंधीं जी कांहीं व्यवस्था करणें इष्ट असेल, तीच ग्रामसंस्थेच्या मार्फत झाली म्हणजे लोकांस सोईवार पडून ते खुषी राहतील. तिसरा उपाय, कलेक्टरांस अव्वल इंग्रजींत जसें स्वातंत्र्य होतें, त्याप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यापुरतें त्यांस आतांहि स्वातंत्र्य देऊन लोकनियुक्त ग्रामसंस्था, कमिटया, वोर्डें व कायदेकौन्सिलें यांच्या अनुमतानें व सल्ल्यानें काम करण्यास त्यास मोकळीक व समजूत दिली पाहिजे. या तिन्ही गोष्टी अमलांत आल्यावर हिंदुस्थानचे लोक इंग्रजी राज्यावर सदैव खुषी राहून इंग्रजी राज्याचें नेहमी अभीष्ट चिंतन करतील असें सर वेडरवर्नसाहेबांचें म्हणणें आहे. कोणत्याहि सुशिक्षित हिंदूस विचारा, कीं तो रशियापेक्षां इंग्रजराज्यकर्तेच वरे असें साफ सांगेल, आतां इंग्रजीराज्यकर्त्यांनीं आपण होऊन जर रयतेवर होत असलेला जुलूम दूर करण्याचे उपाय योजले नाहींत तर हा दोष सर्वांशीं त्यांच्याकडेसच आहे. रयतेस सुखानें नांदवा म्हणजे रशियावरोवर भांडण्यास तुम्हांस ते मनोभावें करून मदत करतील व इंग्रजीराज्यास कोणाहि परकीय राजाची भीति वाळगण्याचें कारण रहाणार नाहीं. सर वेडरवर्न यांनीं केलेला हा उपदेश विलायतच्या लोकांनीं नीट मनन करावा अशी आमची त्यास विनंति आहे.

## ५. राजधर्माचे नवे उपदेशक यांतील बीज काय ?*

[ १९ डिसेंबर १८९३ ]

आजच्या अंकांत गेल्या रविवारीं येथें जो अभूतपूर्व समारंभ झाला त्याची व त्याच्यापूर्वीच एक दिवस मुंबईंत झालेल्या सभेची जी हकीगत दिली आहे त्यावरून ऑनरे. मि. दादाभाई नवरोजी यांचा ठिकठिकाणीं कसा सन्मान होत आहे हें वाचकांस कळून येईलच. पार्लमेंटसभेंत अडुसष्टाव्या वर्षी शिरलेल्या या "काळया गृहस्थाचा" आम्हीं जो एवढा सन्मान करीत आहों, व त्याबद्दल जी पुज्यबुद्धि, कृतज्ञता व प्रेम दाखवीत आहो यांतील इंगित काय व अशाप्रकारें सन्मान करण्यांत आम्हांस कांहींतरी भुरळ पडली नाहींना अशी कदाचित् कित्येकांच्या मनांत शंका उत्पन्न होण्याचा संभव आहे. ऑनरे. मि. फेरोजशहा, ऑनरे. मि. जव्हेरीलाल व स्वतः मि. दादाभाई हे असल्या गोष्टीस आपली संमति देतात तेव्हां असली शंका निर्मूल असावी असें प्रथमदर्शनीं प्रत्येकास वाटेलच. परंतु तेवढयानें मनाचें पूर्ण समाधान होत नाहीं. दादाभाईसारखे या देशांत विद्वान् नाहींत काय ? पार्लमेंटसभेचा सभासद होणें इतकें मोठे दुर्घट आहे काय ? असेंहि, दुसरे कित्येक प्रश्न विचारतील. करितां या सर्व शंकांस आज जबाब देण्याचा आम्हीं विचार केला आहे. मि. दादाभाई हे जर नुसत्या पार्लमेंटसभेचे दुसऱ्या केव्हां तरी सभासद झाले असते, अगर हल्लीपेक्षांहि देशसेवेंत एकनिष्ठपणें त्यांनीं अधिक वर्षे घातलीं असतीं तरी त्यांस जो मान मिळत आहे तसा मिळाला नसता. तेव्हां हजारों हिंदु, पार्शी आणि मुसलमान लोक या राजर्षीच्या दर्शनास इतके आतुर झालेले जे आज दृष्टीस पडतात यांतील बीज कांहीं निराळेंच असावें हें उघड आहे. हें बीज नीट लक्षांत येण्यास प्रस्तुतची देशस्थिति व इतिहास याचा थोडासा विचार केला पाहिजे.

हल्लीं आपली स्थिति कोणत्या प्रकारची झाली आहे आहे याचा विस्तारेंकरून आज उल्लेख करण्याची जरूरी नाहीं. महाराणीच्या सार्वभौम सत्तेखालीं सर्व हिंदुस्थानभर शांतता होऊन हिंदु-मुसलमान, पार्शी, शीख वगैरे सर्व जातींच्या व धंद्यांच्या लोकांस त्यांनीं एकाच वर्गांत ओढून त्यांच्या

---

* भारताचे १९ व्या शतकातील राजकीय नेते आधुनिक भारताचे पितामह दादाभाई नौरोजी ब्रिटिश पार्लमेंटात निवडून आले त्यावेळी मुंबईत त्यांचें आगमन झालें असतां त्यांचा मोठा सत्कार झाला. त्या संदर्भांतला हा लेख.

हिताहिताचा एक संबंध करून टाकिला आहे. इंग्रजी राज्यापूर्वी कोठें मराठे, कोठें मुसलमान, कोठें शीख व कोठें रजपूत आपापल्या सामर्थ्याप्रमाणें राज्यवैभवाचा उपभोग घेत अगर दुसऱ्याचे अंकित होऊन राहात. आमच्या दुर्दैवानें अगर सुदैवानें तसा प्रकार आतां राहिला नाहीं. राज्यवैभव सर्व इंग्रज लोकांनीं आपल्या हातांत राखलें आहे; व हिंदु, मुसलमान व पार्शी वगैरे निरनिराळ्या जातींतील लोकांच्या गुणदोषांत कितीहि अंतर असलें तरी त्या सर्वांस "नेटिव्ह" या एकाच वर्गांत घालून जे त्यांस काय अधिकार अथवा हक्क द्यावयाचे तेहि सारखेच दिले आहेत; सारांश, राज्यकर्ते व प्रजा असे राजकीय दृष्ट्या दोनच वर्ग हल्लीं हिंदुस्थानांत आहेत असें म्हटलें तरी चालेल. निरनिराळ्या जातींतील लोकांस आपली खरी स्थिति कळूं लागेपर्यंत जातीजातींतील पूर्वापार चालत आलेलीं वैमनस्यें नष्ट व्हावयाचीं नाहींत हें खरें आहे; तथापि तसा दिवस येण्यास फार अवकाश लागेल असें हल्लींच्या चिन्हांवरून दिसत नाहीं. सर्व जातींतील सुशिक्षित लोक एकदिलाचे आहेत हे कॉंग्रेससारख्या संस्थांवरून व मुंबईंतील दंग्याच्या हकीकतीवरूनहि व्यक्त होत आहे; व इंग्रज सरकारचें राज्य आणखी कांहीं दिवस राहिल्यास हें आमचें राजधर्मबंधुत्व उत्तरोत्तर वाढत जाऊन अखेरीस आम्ही व राज्यकर्ते असे दोनच लौकिक दृष्ट्या वर्ग होतील अशी आमच्या राजकर्त्यांची आणि आमची उमेद व आशा आहे. परंतु वर जे दोन वर्ग सांगितले त्यांची व्यावहारिक स्थिति एकमेकांहून फार भिन्न आहे. राणीसरकारच्या राज्याखालीं हिमालयापासून केपकुमारीपर्यंत सर्वत्र शांततेची ध्वजा फडकत आहे हें खरें; पण ही शांतता राखण्यास आमच्या भाकरीपैकीं निम्मी भाकर राज्यकर्ते व त्यांचे व्यापारी बंधू यांस दरवर्षी द्यावी लागत असल्यामुळें आम्ही उत्तरोत्तर कंगाल होत चाललों आहों, व ही स्थिति कायम राहिल्यास "आमचें पुढें होणार तरी काय"? याची विचारी मनुष्यास धास्ती वाटूं लागली आहे. पूर्वीच्या काळीं हिंदु, मुसलमान, शीख ह्यांपैकीं कोणाच्याहि मनांत असले विचार आले असतां जो तो आपापल्या जातीपुरतें पाहत असे. परंतु तसा विचार हल्ली आपणांस करतां येत नाहीं, इतकेंच नव्हे तर कोणी करूंहि देणार नाहीं. आमच्या राज्यकर्त्यांचें सामर्थ्य इतकें जबर आहे कीं, वर सांगितलेल्या जातींपैकीं कोणाचाहि निरर्थक शिरजोरपणा ते चालूं देणार नाहींत. सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस जें काय करणें असेल तें त्यांनीं एकदिलानेंच केलें पाहिजे. मग कोणाचें सामर्थ्य कमी असो किंवा कोणाचें जास्त असो, तो भेद लक्षांत घ्यावयाचा नाहीं. इंग्रजी राज्यानें हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांची एक मोळी केली आहे व त्या मोळीचा बंध तुटून

पुन: त्यांतील लांकडें निरनिराळीं होऊं नयेत अशी व्यवस्था करण्याचें सामर्थ्यहि त्यांच्यांत आहे. " ब्रिटिश राज्यामुळें आम्हीं एकत्र झालों, ब्रिटिश लोकांनींच आम्हांस एकत्र होण्यास शिकविलें," असे जे ऑनरे० मि. दादाभाई वरचेवर उद्‌गार काढितात त्यांतील रहस्यहि हेंच होय. आमची राजकीय स्थिति अशा प्रकारची आहे हें कोणाहि स्वदेशहितचिंतकानें विसरतां कामा नये. किंबहुना विसरेल तो घसरेल आणि घसरेल तो पडेलच. या राजकीय स्थितीचें खरें स्वरूप आणि महत्त्व मि. दादाभाई यांनीं जितक्या चांगल्या रीतीनें ओळखिलें आहे तितकें तें दुसऱ्या कोणत्याहि हिंदुस्थानांतील मुत्सद्याच्या मनांत विवलें असेल कीं नाहीं याची वानवाच आहे. आमच्या भोंवतीं इंग्रजी राज्याची जी मिठी पडली आहे ती अभेद्य आहे इतकेंच नव्हे, तर तिनेंच आपणांस एकत्र केलें आहे; व तिचें बंधन कायम असलें तरच आमचा सांधा बेमालूम जडेल अशी ह्या महापुरुषाची इतकी दृढ खातरी झाली आहे कीं, आपल्या मताप्रमाणें मुखावाटे उद्‌गार काढून त्याकरितां इंग्रजी राज्याची स्तुति केल्यानें इंग्लंडांतील कांहीं सोशालिस्टिक मंडळी नाखुष होईल याची देखील तो परवा करीत नाहीं. इंग्लंडांत ऑ. दादाभाई यांच्या बोलण्यास जो मान मिळतो त्याचें एक मुख्य कारण वर सांगितलेली खात्री हेंच होय.

इंग्रजी राज्यानें आम्हीं एकत्र झालों आहों, आमच्यामधील दुजाभाव नाहींसा होण्यास त्या राज्याचें बंधन असणें जरूर आहे व हल्लींच्या राज्यांत जर आमची निकृष्टावस्था असेल तर ती सुधारण्यास हें बंधन कायम ठेऊनच आपणांस कांहीं उद्योग करणें असल्यास तो केला पाहिजे असें ह्यावरून उघड होतें. इंग्रजी राज्यांत शांतता असली तरी आमची स्थिति अगदी निकृष्ट आहे, दारिद्र्याचा आमच्यावर उत्तरोत्तर जास्त पगडा बसत चालला आहे, आणि शौर्य, नीति, अभिमान, साहस, वगैरे राजतेजाचे गुण आमच्यामधून शोचनीय रीतीनें नाहींसे होत चालले आहेत ही गोष्ट निर्विवाद आहे. अशावेळीं ही स्थिति सुधारण्यास आतां आम्हांस कांहीं मार्ग आहे काय? असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. हा प्रश्न पुष्कळांच्या लक्षांत आला असेल व इतिहासाच्या पुस्तकांचीं पारायणें केलेल्या बऱ्याच गृहस्थांनीं "असें करावें, तसें करावें; हा एक मार्ग आहे, तो एक मार्ग आहे," अशीं तोंडी अगर लेखी पांडित्यानें भरलेलीं उत्तरेंहि दिलीं असतील. परंतु तो मार्ग कोणता, व त्या मार्गानें गेलें असतां आपणांस कितपत यश येईल हें अनुभवानें सिद्ध करून देणारा दादाभाईखेरीज दुसरा कोणीहि आजपर्यंत निघाला नाहीं.

हिंदुस्थानांतील इंग्रज राज्यकर्ते यांच्याजवळ ओरड करून कांहीं एक मिळावयाचें नाहीं, यांच्याजवळ भांडत बसणें म्हणजे दगडावर डोकें आपटून घेण्यासारखेंच आहे, हें तत्त्व अनुभवानें आम्हांस कळून चुकलें आहे; व त्यावरोबरच आमची कांहीं दाद लागली तर विलायतेस लागेल अशी इतिहासावरून आम्हांस थोडी आशा लागली आहे. परंतु विलायतेस आपली डाळ कितपत शिजते, तेथील लोक आपल्या जातिवांधवांच्या म्हणण्यापेक्षां आमच्या म्हणण्याकडे विशेष लक्ष देतील किंवा नाहीं याचा आम्हांस कोणत्याहि तऱ्हेचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता तो आज दादाभाई यांनीं आणून दिला. ते विलायतेस गेले; तेथें सर्व अडचणी सोसून, स्वार्थाकडे दृष्टी न देतां दहापांच वर्षें राहिले. लोकांची समजूत काढली, तीस कोटी प्रजेस न्याय द्या अशी त्यांच्या कानीं कपाळीं ओरड केली आणि पार्लमेंटसभेंत हिंदुस्थानच्या लोकांचे मुखत्यार म्हणून आपला प्रवेश करून घेतला ! कालांतरानें विलायतच्या लोकांची खात्री झाल्यावर आमच्या मागण्यांपैकीं सर्व नाहींत तरी बऱ्याच मागण्या ते पुरवतील; सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांत होऊं लागेल व स्थानिक स्वराज्याचा अधिकार वाढून आमच्या देशच्या राज्यकारभारांत आमचीं मतेंहि घेऊं लागतील. ह्या सर्व गोष्टी अगदीं न्याय्य आहेत, व केव्हांना केव्हां तरी त्या आपणांस न्यायानेंच प्राप्त होतील हें खरें आहे, आणि प्राप्त झाल्या म्हणजे विलायतेंतील लोकांच्या न्यायबुद्धीचें आम्हांस आश्चर्यहि वाटूं लागेल; परंतु ह्या सर्वांपेक्षां आमच्या मतें विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, आपला प्रतिनिधि म्हणून त्या लोकांनीं ऑ. दादाभाई यांस पार्लमेंट सभेचा सभासद निवडून दिलें. काळ्या मनुष्यास अशा रीतीनें आपला प्रतिनिधि निवडून देणें यापेक्षां त्यांच्या न्यायबुद्धीचा आणखी जास्त दाखला तो कोणता व हा दाखला ज्यानें आम्हांस आणून दिला, त्यास राजकीय नावाड्या अगर नूतन राजधर्मोपदेशक म्हणण्यास कोणती हरकत आहे ? देशास विपन्न काल आला असतां त्यातून सुटका होण्याचे मार्ग दाखविणारे जे महापुरुष निर्माण होतात त्यांतच दादाभाईंची गणना केली पाहिजे.

सरतेशेवटीं कोणी अशी शंका घेतील कीं, ऐर्लंडाचे ऐंशी सभासद पार्लमेंटांत असतांहि जर शेकडों वर्षांचीं त्यांचीं गाऱ्हाणीं ऐकून घेण्यास इंग्लंड तयार नाहीं तर एकटे दादाभाई पार्लमेंट सभेंत गेल्यानें आमचें काय होणार ? परंतु ही शंका घेणारे लोक हिंदुस्थान व ऐर्लंड यामधील भेद लक्षांत ठेवीत नाहींत असें वाटतें. शरीराचे हातपाय वगैरे जसे अवयव असतात तसाच ऐर्लंड हा ग्रेटब्रिटन व ऐर्लंड या संयुक्त राज्याचा एक अवयव बनून गेलेला आहे; व ऐर्लंडास स्थानिक स्वराज्याचे हक्क दिल्यानें ह्या संयुक्त राज्यपुरुषाचा एक अवयव तोडल्यासारखा

होतो अशी, खरी म्हणा अगर खोटी म्हणा, इंग्लंडांतील पुष्कळ लोकांची समजूत झाली आहे. मि. ग्लाडस्टन यांचे मार्गांत जे अडथळे येतात ते याच समजुतीचे परिणाम होत. हिंदुस्थानाबद्दल कोणत्याहि प्रकारचा असा ग्रह विलायतेंतल्या लोकांचा झाला नाहीं. उलट हिंदुस्थानांतील लोकांचें आम्हीं स्वातंत्र्य नष्ट केलें आहे तेव्हां त्यांचा संतोष हीच आपल्या राज्याची मजबुती व तो संतोष कायम ठेवणें हेंच आपलें कर्तव्य असें पुष्कळांचें मत आहे. ह्याच मताचा फायदा घेऊन हिंदुस्थानाचीं वास्तविक गाऱ्हाणीं व दुःखें जर आम्हीं यांस कळविलीं तर ग्रीस, इटली, हंगेरी, वगैरे देशांतील लोकांस ज्याप्रमाणें इंग्लंडांतील लोकांनीं मदत केली त्याचप्रमाणें ते आम्हासहि करतील अशी उमेद आहे. ही उमेद बाळगूनच ग्रीस, इटली, वगैरे देशांतल्या स्वदेश भक्तमंडळीप्रमाणें ऑ. दादाभाई यांनीं उद्योग सुरू केला, व निश्चयानें, एकनिष्ठपणानें आणि दीर्घ परिश्रमानें तो सिद्धीस जाईल अशी आम्हां सर्वांची खातरी करून देऊन इंग्लंडच्या व हिंदुस्थानच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर केलें ! हल्लींच्या काळांत व स्थितींत यापेक्षां एकट्या माणसानें स्वदेशहितासाठीं जास्त करावयाचें तरी काय ? दादाभाईकडे हजारों लोकांचा जो जीव ओढतो तो ह्याचसाठीं होय. हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता, हिंदुस्थानवासी हेंच आम्हां सर्वांचें बंधुत्वाचें नातें, आणि वस्तुस्थिति लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक स्थिति सुधारण्याचा एकनिष्ठपणानें व स्वार्थाकडे लक्ष न देतां सतत परिश्रम करणें हाच आमचा धर्म हें दादाभाईंच्या चरित्रावरून पूर्णपणें व्यक्त होत आहे; व त्यांस हल्लीं जो सन्मान मिळत आहे त्यावरून ह्या नूतन राजधर्माचा हिंदुस्थानभर लवकरच प्रसार होईल अशी आमची खात्री आहे.

# ६. लॅन्सडौन साहेबांची शेवटची सलामी

[ ३० जानेवारी १८९४ ]

माजी राणी-प्रतिनिधि लॉर्ड लॅन्सडौन यांची कारकीर्द गेल्या शनवारीं संपून लॉर्ड एल्गिनच्या रियासतीस प्रारंभ झाला. ते दिवशीं सकाळीं लॅन्सडौन-साहेबांनीं आपला भाला खालीं ठेऊन लगेच हेस्टिंग्स आगवोटीनें लंकेच्या मार्गानें निजधामास प्रयाण केलें. साहेवमहसुफांची पंचवार्षिक कारकीर्द कोणत्या प्रकारची झाली व त्यांचें बादशाहिणीच्या एतद्देशीय प्रजेविषयीं वारंवार दिसून येणारें विलक्षण प्रेम एकंदरीनें आम्हांस कसें भोंवलें याचें मागें दिग्दर्शन केलेंच आहे. तेव्हां त्यासंबंधानें आतां पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. गेलीं पांच वर्षे हिंदुस्थानांत फार धामधुमीची गेलीं खरीं, व त्या अवधींत सरकारचें वर्तन जितकें हरएक बाबतींत लोकांना प्रतिकूल होतें तितकें लोकांचेंहि पाऊल पुढें पडत गेलें हेंहि खरें; तथापि या थोडयाबहुत अंशानें अनिवार्य व सामान्य गोष्टी माजी व्हाइसरायांच्या कारकीर्दीला महत्त्व आणण्यास पुरेशा नाहींत. लोकांत शिक्षण, व्यापार व दारिद्रय जशीं वाढतील तसतशी चळवळहि वाढणारच व सरकारी अधिकारी कालानुसार पुढें पाऊल टाकण्यास तयार नसल्यामुळें सरकार व लोक यांज-मधील विरोध वळावत जाऊन तंटेहि वाढावयाचेच. तेव्हां या कालौघप्राप्त गोष्टींचें श्रेय एकटया व्हाइसरायांस देणें म्हणजे गलबताच्या डोलकाठीवर बस-लेल्या कावळयाकडे तारवाचें चालकत्व देण्यासारखेंच आहे. लॅन्सडौनच्या जागीं दुसरा कोणी अधिकारीमंडळीचा अधिपति असता तरी व्हावयाची ती सुधारणा झालीच असती. फार झालें तर तिचा वेग कमी जास्ती झाला असता इतकेंच. हिंदुस्थानचा व्यापार वाढला, आगगाडया वाढल्या, सरहद्दीचा कडेकोट बंदोवस्त झाला, देशांत शांतता राहिली वगैरे गोष्टींबद्दल आंग्लो-इंडियन पत्रकार लॅन्सडौनसाहेबांची फार तारीफ करीत आहेत ते ठीकच. सरकारच्या ठरीव भाटांनीं व्हाईसरायापासून तों पोलीस कॉन्स्टेबलपर्यंत प्रत्येक गोऱ्या कामदाराची नेहमी स्तुति करीत असणेंच स्वाभाविक आहे. परंतु हिंदुस्थानच्या राज्यकारभारा-सारखा जबरदस्त बोजा पांच वर्षे शिरावर वाहिल्यानंतर शेवटीं आपल्या निस्सीम भक्तांकडूनहि वरच्यासारख्या पाणचट प्रशंसेपेक्षां अधिक कांहीं सर्टिफिकीट मिळूं नये हें पाहून लॅन्सडौनसाहेबांस खरोखरच वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. आपण हिंदुस्थानांतून गेलों तरी ज्यांचे खिसे भरले त्यांनीं प्रत्युपकारार्थ जमविलेल्या

साठ सत्तर हजारांच्या योगानें आपला दगडी पुतळा आपल्या कलकत्त्याच्या मैदानावर 'थंडीवारा खात उभा राहील,' एवढी एक लॅन्सडौनसाहेबांस समाधान मानण्यास जागा आहे खरी, पण वस्तुत: त्याचा काय उपयोग ? साहेबमहसुफांचा पुतळा दृष्टीसमोर असल्यानें त्यांच्या एक एक कृत्याविषयीं लोकांची आठवण सदोदित जागृत राहील; पण खुद्द लॉर्ड लॅन्सडौन यांस त्यापासून किमपिहि शांति मिळावयाची नाहीं. ज्या लोकांच्या पैशांवर आपण पांच वर्षे चैन मारली त्या लोकांचें आपण कांहींएक हित केलें नाहीं, तर उलट अतोनात नुकसान केलें, ही लॉर्डसाहेबांच्या मनांतील खुरखुर आमच्या मतें स्वार्थपरायण वंदीजनांनीं दिलेल्या शेकडों पुतळ्यांनीं किंवा मानपत्रांच्या भेंडोळ्यांनीं नाहींशीं व्हावयाची नाहीं ही गोष्ट त्यांसहि माहीत असलीच पाहिजे. पण गेली घडी ती पुन: येत नाहीं. अठ्ठावीस कोटी लोकांचें कल्याण करून आशीर्वाद संपादन करण्याची दुर्मिळ संधी मिळाली असून ती घरीं आलेल्या कामधेनूला हांकून देणाऱ्या अभाग्याप्रमाणें लॉर्ड लॅन्सडौन यांनीं दवडली याबद्दल त्यांना आतां पश्चात्ताप होत असला तरी त्याचा आतां काय उपयोग ? कोठें तरी आपल्या नांवाचा दगड बसवून घेण्यापेक्षा "रिपन, रे प्रमाणें सदैव लोकांच्या जिव्हाग्रीं वास करीत राहणें श्रेयस्कर आहे; पण लॅन्सडौनसाहेबांच्या आणि हिंदुस्थानवासी प्रजेच्या दुर्दैवानें मानसिक औदार्य, उदात्त विचार, दूरदृष्टि, कर्तृत्वशक्ति, इत्यादि खऱ्या राज्यधुरीणाला अवश्य लागणाऱ्या, गुणांचा त्यांच्या ठायीं अभाव असल्यामुळें त्यांना ती गोष्ट साध्य झाली नाहीं यांत त्यांचा अपराध म्हणण्यापेक्षां त्यांना नेमणारांचाच दोष म्हटला पाहिजे. तात्पर्य, बऱ्या किंवा वाईट कामाची कसोटी लावली असतां लॅन्सडौनसाहेबांची कारकीर्द संस्मरणीय होण्यास मुळींच कारण नाहीं; तथापि त्यांच्यामध्यें एक विशेष असल्यानें त्यांचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत चिरकालिक होईल यांत शंका नाहीं.

गेल्या तीस पसतीस वर्षांत या देशावर जेवढे अधिपति येऊन गेले त्यांत मेयो, नार्थब्रुक व रिपनसारखे कित्येक उदारधी होते व त्यांनीं येथें सत्कीर्ति मिळविली. लिटनसारखे उलट प्रकारचेहि कांहीं होते व त्यांनीं आपल्या परीनें नांव मिळविलें. पण लॉर्ड लॅन्सडौन यांस कोणत्या वर्गांत घालावें याची भावी इतिहासकारांस फार पंचाईत पडेल असें आम्हांस वाटतें. लिटनशाहीशीं लॅन्सडौनशाहीचें पुष्कळ साम्य आहे व कित्येक बाबतींत तर आमच्या माजी व्हाइसरायांनीं लॉर्ड लिटनासहि खालीं पहावयास लावलें यांत शंका नाहीं; पण त्या दोघांना एका वर्गांत घालणें म्हणजे लॉर्ड लॅन्सडौनांस फाजील बहुमान देण्यासारखें आहे. लॉर्ड लिटन कितीहि कुत्सित, हेकेखोर, अदूरदृष्टि असले तरी त्यांच्या

अंगीं स्वाभाविक तरतरी असल्यामुळें तिजपासून एखादे वेळेस चांगलें कार्यहि घडून येई. अनुकूल काळ व स्थळ मिळालें असतें तर लिटनसारख्या अकांडतांडवी पुरुषापासून आमचें कल्याणहि घडून येण्याचा संभव होता. परंतु लॉर्ड लॅन्सडौन-सारख्या निरुपद्रवी, निरुत्साही, व कर्तृत्वशून्य गृहस्थांच्या हातून चांगलें किंवा वाईट कोणत्याच प्रकारचें काम होण्याची आशा नाहीं. वाईट कृत्य करण्यालाहि जें थोडेंबहुत सामर्थ्य लागतें तेवढें तरी लॅन्सडौनसाहेबांच्या अंगीं होतें कीं नाहीं यांची आम्हांला बळकट शंका असल्यामुळें त्यांना कोणतें विशेषण द्यावें हें सांगवत नाहीं. मग त्यांच्या हातून इतकीं वाईट कृत्यें कशीं घडलीं असा प्रश्न येतो, पण त्याला उत्तर सोपें आहे. रिपन चांगले व्हाइसराय होते तसे लिटन वाईट होते; पण लॅन्सडौन दोन्ही नव्हते, म्हणजे ते केवळ नामधारी अधिपति असून सर्व अधिकार त्यांच्या दुय्यमांच्या हातीं होता. लॅन्सडौन हरएक बाबतींत आपल्या हाताखालील गोऱ्या कामदारांच्या तंत्रानें वागणारें असल्यामुळें गेल्या पांच वर्षांत घडून आलेल्या बऱ्यांवाईट गोष्टींचें केवळ सही करण्यापलीकडे त्यांस श्रेय कां द्यावें हें कोणालाहि सांगतां येणार नाहीं. लिटन कितीहि वाईट असले तरी स्वतः विचार करीत असत व आरंभिलेलें कार्य नेटानें तडीस नेत; पण हाताखालच्या अधिकाऱ्यांना यथेच्छ वागूं देऊन मागाहून त्यांच्या कृत्यांचें कसेंबसें समर्थन करणें एवढीच काय ती लॅन्सडौनसाहेबांनीं गेल्या पांच वर्षांत कामगिरी बजावलेली दिसते. कर्णधार कमजोर असला कीं, तारू डळमळूं लागतें तशा-सारखी हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची स्थिति झाली होती तिला कारण लॉर्ड लॅन्सडौनच असें कोण म्हणणार नाहीं ? मूठभर गोऱ्या कामदारांनीं कोल्हेकुई करतांच हिंदुस्थानच्या दरिद्री प्रजेवर कोटी दीड कोटीचा बोजा येऊन पडावा ही गोष्ट दुसऱ्या कोणत्याहि व्हाइसरायाच्या कारकीर्दीत शक्य झाली नसती. एक वेळ लिटनसारखे अधिपति पुरवतील; कारण त्यांच्या एकट्याच्याच स्वेच्छ-वृत्तीनें लोकांवर जुलूम होईल तेवढाच सोसावा लागतो पण लॉर्ड लॅन्सडौन-सारखे शून्याकृति व्हाइसराय आले कीं एकाऐवजीं पांच पन्नास निरर्गल यजमान आमच्या डोक्यावर बसतात आणि त्यांचा प्रभाव मात्र लोकांना दुःसह होतो. एवढ्याचकरितां आम्ही लॅन्सडौनसाहेबांस लिटनपेक्षा निराळ्या वर्गांत घातलें.

लॉर्ड लॅन्सडौन हे एक अत्यंत निरुपद्रवी प्राणी आहेत अशीच आमची आजपर्यंत समजूत होती. पण आपल्या कारकीर्दीचा शेवट आला असें पाहून गेल्या आठवड्यांत जातां जातां त्यांनीं आपल्या वरिष्ठांवर, व इतके दिवस ज्यांची भाकरी खाल्ली त्या हिंदुस्थानच्या लोकांवर ज्या लाथा झाडल्या आहेत त्यावरून दीर्घद्वेष, हेकटपणा व क्षुद्रबुद्धि यांचा बराच वांटा

परमेश्वरानें साहेबमजकुरांच्या अंगीं ठेवला आहे असें स्पष्ट दिसून येतें. आतां प्रकट झालेले हे गुण पांच वर्षेपर्यंत कसे झांकून राहिले हें आश्चर्य आहे खरें; पण कर्तृत्वशक्तीचा पूर्ण अभाव हेंच बहुधा नैसर्गिक वृत्तीप्रमाणें लॅन्सडौन-साहेबांच्या हातून आचरण न घडण्यास कारण झालें असावें. कसेंहि असो, जातां जातां तरी साहेबमहसुफांनी लोकांस निजरूप दाखविलें व आजपर्यंत त्यांजविषयीं जो थोडास आदर वाटत होता तोहि घालविला हा एकाअर्थी आमच्यावर त्यांचा उपकारच आहे.

लॅन्सडौन साहेबांस मानपत्र देण्यासंबंधानें कलकत्ता म्युनिसिपालिटींत झालेली वाचावाची आमच्या वाचकांस माहीत असेलच. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी, यांनीं त्याप्रसंगीं दाखविलेलें धैर्य वर्णनीय होतें. त्याचप्रमाणें महामेडन असोशिएशन किंवा चेंबर ऑफ कॉमर्स खेरीजकरून कोणत्याहि जुन्या व सार्वजनिक सभांनीं त्यांस मानपत्र देण्याचा फार्स केला नाहीं हेंहि चांगलें झालें. खुद्द लॅन्सडौनसाहेबांनीं मुंबईकडे येण्याची तसदी न घेतां परस्पर प्रयाण केलें ह्यांत पुष्कळच दूरदर्शीपणा दाखविला. पण सर्व बारीक-सारीक गोष्टींना महत्त्व येण्याला कारण त्यांनीं गेल्या आठवड्यांत चेंबर ऑफ कॉमर्सच्या भोजनप्रसंगीं केलेलें अजब वाक्पांडित्य होय, यांत बिलकुल शंका नाहीं. सदरहू भाषणाचें वर्णन करावें तितकें थोडेंच. तें मुळांतच साद्यंत वाचल्याशिवाय त्याचें पूर्ण स्वारस्य कळावयाचें नाहीं, व मराठींत त्याचें भाषांतर व गोषवारा देऊन आम्ही आपल्या पत्राची जागा विटाळवूं इच्छित नाहीं. राज्यकारभाराचें ओझें कमी झाल्यानें एकदम मिळालेलें स्वातंत्र्य, स्वजातीय व समानशील मित्रगणाच्या अहोरूपमहोध्वनि: प्रकारानें उचंबळूं लागलेल्या मनोवृत्ति आणि नेहमींच भोजनोत्तर वाढणारें जिव्हालौल्य इत्यादि अनेक कारणें एकत्र झाल्यानें, सदरहू प्रसंगीं लॅन्सडौन साहेबांचा वाक्प्रवाह अबाधित चालूं लागला यांत फारसें नवल नाहीं. काबूलच्या अमिराशीं अलौकिक शिष्टाईबद्दल साहेबांनीं आपली पाठ थोपटून घेतली, किंवा नवीन कायदेकौन्सिलाच्या कायद्याचें सर्व श्रेय आपणच बळकावलें या गोष्टी स्वाभाविक होत्या. तसेंच राष्ट्रीय सभा, दादाभाई नवरोजी, सिव्हिल सर्व्हिसचा ठराव पार्लमेंटांत पास करविणारे मि. पाल वगैरे तमाम नेटिव्हांच्या हितचिंतकांवर त्यांनीं यथेच्छ तोंडसुख घेतलें, याचें फारसें आश्चर्य मानावयास नको. कारण असले प्रकार पूर्वीच्या व्हाइसरायांनीं व इतर गोऱ्या अधिकाऱ्यांनींहि पुष्कळदां केले आहेत; पण आपल्या वरिष्ठावर आणि जिची आज्ञा सर्व ब्रिटिश राज्यांत प्रमाणभूत मानली जाते त्या पार्लमेंटसभेवरहि प्रसिद्धपणें तोंड टाकण्याचें लॅन्सडौन साहेबांच्या पूर्वी कोणत्याहि व्हाइसरायानें धाडस केलें नव्हतें! आम्ही कायते

शहाणे व आमच्या कारभारांत पार्लमेंटानेंहि हात घालतां कामा नये, ही आंग्लो-इंडियन कामदारांची नेहमींचीच कुरकुर आहे. पण व्हाइसरायसारख्या जवाबदार अधिकाऱ्यानें असले प्रलाप करणें म्हणजे आपल्या अधिकाराला, ब्रिटिश सरकारच्या इभ्रतीस आणि ज्या पार्लमेंटानें आपणांस नेमलें तिच्या योग्यतेस बट्टा लावण्यासारखें किंवहुना इंग्रजी राज्यसत्तेविरुद्ध बंड करण्यासारखें आहे. लॉर्ड लॅन्सडौन आतां अधिकारवियुक्त झाल्यामुळें आपल्या निरर्गल प्रलापांबद्दल जवाब देण्याची त्यांना पाळी येणार नाहीं हें खरें; तथापि त्यांचें हें वाक्पांडित्य विलायतेपर्यंत पोंचून तेथील लोकांस आपण नेमलेल्या राज्ञी–प्रतिनिधीच्या शहाणपणाची पूर्ण ओळख पटेल यांत संशय नाहीं. वस्तुतः पाहतां पार्लमेंट सभेस शिव्या दिल्यानें हिंदुस्थानसरकारास 'जास्त स्वातंत्र्य मिळेल हें मुळींच संभवत नाहीं. कंपनी सरकारचा अधिकार काढून पार्लमेंटसभेनें राणीकडे १८५८ सालीं दिला. तेव्हांहि सभेविरुद्ध अशीच कोल्हेकुई चालविली होती. पण अशा कोल्हेकुईनें पार्लमेंटसभेची सत्ता कमी होण्यापेक्षां उलट ती वळावत जाण्याचाच जास्त संभव आहे. हिंदुस्थानचें राज्य जर सनदी नोकरांच्या सल्ल्यानेंच चालवावयाचें तर मग सेक्रेटरी ऑफ स्टेट व पार्लमेंट हवीं तरी कशाला? लॉर्ड– लॅन्सडौन यांचा कटाक्ष सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दोन ठिकाणीं घेण्याचें सभेनें ठरविलें यावरच होता. पण त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें कीं, अशानें पार्लमेंट सभा भ्यावयाची नाहीं. राज्यकारभार कोणत्या धोरणानें चालवावयाचा हें ठरविणें पार्लमेंटसभेचें काम आहे; व त्या धोरणावर ज्यास कारभार चालवावयाचा नसेल त्यान मग–तो व्हाइसराय असो किंवा कारकून असो– आपल्या जागेचा राजीनामा देऊन मग काय बोलणें असेल तें खुशाल वडवडत बसावें. सभेची त्यास कोणतीहि हरकत नाहीं. सभेंत लॉर्ड लॅन्स-डौन यांच्या योग्यतेचे किंवहुना त्यांच्याहून हुषार असे शेंकडों मुत्सुद्दी आहेत. व आपल्या मनाप्रमाणें त्यांनीं आपणांस वागूं दिलें नाहीं म्हणून त्यांच्यावर तोंड सोडणें हें आमच्या मतें असभ्यतेचें व अराजनिष्ठपणाचें लक्षण होय; व खुद्द व्हाइसराय साहेबांनींच या दोन गोष्टींचा धडा लोकांस घालून द्यावा हें आमचें मोठेंच दुर्दैव समजलें पाहिजे. असो. लॉर्ड लॅन्सडौनसाहेबांचा हा शेवटचा निरोप आहे. तेव्हां त्यांना निरर्थक दोष न देतां त्यांची आमच्याविषयीं अतोनात कळकळ व अनुभव इतःपर आम्हांस वाधक न होवो एवढीच आशा करून आज आम्हीही त्यांची रजा घेतों.

---

## ७. चीन व जपान

[ १४ मे १८९५ ]

या दोन देशांत युद्धसंग्राम होऊन नुकताच तहनामा झालेला वाचकांस माहीत आहेच. या तहनाम्याच्या शर्तींविषयीं पूर्वीं या पत्रांत उल्लेख झालेला आहे. या संग्रामाचीं कारणें, जपानचा वेळोवेळीं झालेला विजय, वगैरे गोष्टींचा आज आम्हीं उल्लेख करावयास नको; परंतु या संग्रामासंबंधानें अनेकदृष्ट्या जे विचार सुचतात व आपणांस जो निरनिराळा बोध होतो तो वाचकांस सादर करण्याचें आजचे निबंधांत योजिलें आहे. ज्या युरोपियन राष्ट्रांशीं आपला परिचय झालेला आहे, तीं राष्ट्रें विद्येनें, बलानें, साहसानें संपत्तीनें व कर्तृत्वानें एशियांतील राष्ट्रांहून श्रेष्ठ आहेत. ह्या राष्ट्रांनीं जगाच्या निरनिराळ्या भागांवर आपली सत्ता स्थापन केली आहे, व ज्या राष्ट्रांवर अद्यापपर्यंत त्यांची सत्ता कायम झाली नाहीं त्यांस सदर राष्ट्रें सर्व प्रकारें बलहीन मानीत आलीं आहेत. चीन व जपान हीं एशियांतील स्वतंत्र राष्ट्रें आहेत खरीं पण त्याजविषयींहि युरोपियन राष्ट्रांचा समज वर निर्दिष्ट केल्याप्रमाणेंच आजपर्यंत होता. परंतु जपाननें हा समज सर्वथैव जरी नाहीं, तरी अंशत: गैर आहे असें करणी करून त्यांस दाखविलें आहे. एशिया खंडांतील लोक सर्व गोष्टी अनुकूल झाल्यास पराक्रम करून दाखवितील असें जपाननें सर्व जगताच्या प्रत्ययास आणून दिलें आहे. चिनी लोक हुशार, बुद्धिमान व चतुर आहेत खरे; परंतु चीन देशांत पूर्वापार चालत आलेल्या सामाजिक व राज्यपद्धतीचा त्याग न करण्याचा जणूं काय कृतसंकल्पच असल्यामुळें त्या देशाचा ह्या काळीं जसा उत्कर्ष व्हावा तसा झाला नाहीं. आपल्या सभोंवतीं काय चाललें आहे, हल्लीचा काळ कसा फिरला आहे, व ह्या काळांत झालेल्या फेरबदलाप्रमाणें आपणांस काय सुधारणा केली पाहिजे हा विचार चिनी लोकांनीं आजपर्यंत केला नाहीं; म्हणून परराष्ट्रांचा हात त्या देशांत हळू हळू शिरून कालांतरानें त्याची काय दुर्दशा होईल अशी त्यांच्या हितचिंतकांस काळजी पडली आहे, थोड्या वर्षांपूर्वीं जपान देशहि चीन देशाच्याच तोडीचा होता. परंतु त्या देशांतील लोक वेळेवरच उमजले. गेल्या साठ पाऊणशें वर्षांत जपानी लोकांनीं आपल्या आचारविचारांत, राहणींत, सामाजिक व राजकीय पद्धतींत इष्ट फेरबदल करून आपणांस उर्जित काळ आणिला व नुकताच झालेला युद्धप्रसंग त्या उर्जित

काळाचें एक दर्शक होय. चिनी वादशाहीचें क्षेत्रफळ, लोकवस्ती व साधनें जपान देशाचें क्षेत्रफळापेक्षां, वस्तीपेक्षां, व साधनांपेक्षां, अत्यंत लहान असतांहि जपाननें चीन देशांस रणांत जर्जर केलें. ही जगाचे इतिहासांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. नुकत्याच झालेल्या संग्रामाच्या प्रत्यक्ष व परंपरेनें सर्व लोकांवर होणाऱ्या परिणामापासून जगाचे इतिहासास नवीनच वळण लागणार आहे असा रंग दिसत आहे. रशिया, इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांस आपणांस आपल्याच तोडीचा पूर्वेस एक शत्रु अगर मित्र निर्माण झाला आहे असें वाटूं लागलें आहे. जमिनीवर व समुद्रावर जपाननें मोठमोठ्या लढाया मारून विजय मिळविला हें पाहून युरोपियन राष्ट्रांत जपान देशाविषयीं हेवा उत्पन्न झाला आहे. येवढा थोरला पराक्रम करण्यासारखें ऐश्वर्य जपान देशाचें ठिकाणीं कसें आलें हा येथें साहजिक प्रश्न उत्पन्न होतो.

वरील प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत देतां येतें. जपान देश वेळेवर उमजला अथवा जागा झाला हेंच या प्रश्नाचें उत्तर होय. जसा चीन देशानें आजपर्यंत निद्रेंतच काळ काढला तसा जपाननें काढला नाहीं; म्हणूनच त्या देशांत ऐश्वर्य येऊन त्याचा इतर देशांस दरारा वसला आहे. जपानचा उर्जितकाळ पाहून व सदर देशानें आपणांस जो धडा घालून दिला आहे त्याचें मनन करून चिनीलोक आतां तरी सावध होतील व आपणास जेणेंकरून उर्जितदशा प्राप्त होईल अशा खटपटीस मनोभावानें लागतील असें वाटण्यास सबळ कारण आहे. असें झालें तर एशियाखंडाचा परिणाम अनुमानानें जो दिसत आहे तसा होणार नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे जपाननें चिनी लोकांवरच उपकार केला असें नाहीं; तर सर्व एशियांतील लोकांवर त्यांनीं महत् उपकार केला आहे असेंच म्हणावें लागतें. हिंदुस्थान देशांतील लोकांस जपाननें जो धडा घालून दिला आहे त्यांचें महत्त्व लहानसहान नाहीं. चिनी लोकांसारखेच हिंदुस्थानांतील लोकहि हुषार व समजूतदार आहेत. पण त्यांसहि चिनीलोकांसारखी निद्रेची फार आवड आहे ! हिंदुस्थानांतील लोकांचाहि आळस इतका आहे कीं, तोंडावर पडलेलें जांभूळ दुसऱ्यानें आंत ढकलावें लागतें ! चिनी लोकांस जपाननें जसें हल्लीं हालवून जागें केलें आहे, तसेंच आम्हांसहि एका शतकापूर्वी दुसऱ्यांनीं हालवून जागें केलें आहे; परंतु आम्हीं अद्यापपर्यंत पूर्ण जागे झालों किंवा नाहीं याची शंकाच आहे. आम्हांस हल्ली लढाया मारण्याचें काम करावयाचें नाहीं; कारण त्या कामावर आम्ही दुसऱ्यांचीच योजना केली आहे, म्हणून आम्हांस अन्य कांहीं कर्तव्यच उरलें नाहीं, असें नाहीं. सामाजिक, राजकीय व औद्योगिक अशा पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत, त्या

जपानचा कित्ता वळविल्यास आमचे हातून होतील; अन्य उपायांनीं होणार नाहींत, ह्या काळांत जीवनकलह मोठ्या निकरानें चालला आहे. त्या कलहांत सावध रीतीनें आम्हीं गुंतलों नाहीं व सभोंवतालच्या वस्तुस्थितीस अनुसरून वागलों नाहीं तर आमचा शेवटीं ऱ्हासच होणार आहे. धर्मसंबंधीं अथवा सामाजिक दुराग्रहांस आम्हीं वळकट धरून बसलों व आम्हांस हितकर असणाऱ्या ज्ञानाचा आमच्या मनामध्यें आग्रहानें प्रवेश करून दिला नाहीं तर आम्हांस उन्नतावस्था कधींहि येणार नाहीं. जपानीलोकांसारखा आम्ही दुराग्रह सोडला, सावधपणानें वागलों व जेथें सांपडेल तेथें ज्ञानामृतपान केलें तर आमचे सर्व दोष नष्ट होऊन एका जुटीनें वागण्याची, अधिकारांस मानण्याची, मनास इष्ट आळा घालण्याची, साहस व उद्योग करण्याची पात्रता आमचे अंगीं सहजच येणार आहे. युरोपियन राष्ट्रें ज्या मार्गानें आजपर्यंत चालत आलेलीं आहेत, त्या मार्गाचें इष्ट असेल तेथें अवलंबन केल्यास आमचा तरणोपाय आहे, असे प्रत्यक्ष नाहीं तरी परंपरेनें जपानी लोकांनीं आम्हांस दाखविलें आहे. तेव्हां चिनी लोकांचें आम्ही अनुकरण केलें तर आमच्यावर एखादा दुर्धर प्रसंग येऊन आम्हांसहि प्रखर तडाखा खावयाची पाळी येणारी आहे.

...... सृष्टिक्रमांत एखादी अवाढव्य अदलाबदल किंवा क्रांति जेव्हां व्हावयाची असते तेव्हां तिचें दिग्दर्शन अल्प गोष्टीनें पूर्वीच होऊन चुकतें. तद्वत् एशियाखंडांत किंवहुना सर्व पृथ्वीवर होणाऱ्या भावी क्रांतीचें जपानी लोकांची सद्यस्थिति हें एक लक्षण होय. या लक्षणावरून एशियाखंडांतील लोकांस एक प्रकारची उमेद येणारी आहे. ज्या उदार लोकांचे ठिकाणीं सर्व लोक स्वतंत्र, बलाढ्य, ज्ञानसंपन्न व कर्तृत्ववान असावेत अशी बुद्धि आहे त्यांस तर उत्तर पासिफिक महासागरांत जपाननें जो पराक्रम करून दाखविला आहे त्यांत ईश्वरी सत्तेचा भास होतो. चिनी लोक असें कडक शासन झाल्यावरहि डोळे मिटून वागतील असें मुदलींच वाटत नाहीं व त्या उदार गृहस्थांस असेंहि वाटतें कीं, जपानदेशासारखाच चीन वगैरे देशांचा उत्कर्ष होऊन ते यापुढें युरोपियन राष्ट्रांस एशियाखंडाचा ग्रास करूं देणार नाहींत व एशियाखंडातील हिंदुस्थानसारखे देश पूर्ववत् ज्ञानाचें आदिपीठ बनतील. आमचा तर्क इतक्या पल्यावर जात नाहीं तत्रापि असें आम्ही मनापासून इच्छितों.

## ८. मि. दादाभाई नौरोजी यांची रॉयल कमिशनपुढील साक्ष*

[ २० एप्रिल १८९७ ]

आजपर्यंत या कमिशनपुढें ज्या साक्षी झाल्या त्या बहुतेक मोठमोठ्या युरोपियन कामगारांच्या झाल्या. लॉर्ड रिपन, डफरिन, नॉर्थब्रूक, लॅन्सडाऊन, वगैरे व्हॉइसराय; कोलव्हिन, वार्बर वगैरे फडणीस आणि लॉर्ड रॉबर्टस, ब्रॅकनवरी यांसारखे लष्करी अंमलदारांच्या साक्षी होऊन गेल्या आहेत व त्यांच्या साक्षींत कित्येक ठिकाणीं आम्हांस फायदेशीर असा मजकुरहि आलेला आहे. पण हिंदुस्थान देशाची खरी स्थिति कमिशनच्या नजरेस अद्याप कोणीच आणली नव्हती; इंग्रजी राज्यांत आगगाड्या, तारायंत्रें व सडका पुष्कळ झाल्या असून सर्वत्र शांतता आहे आणि या देशाचा परदेशीं व्यापार वाढत आहे अशा नेहमींच्या ठळक ठळक गोष्टी मात्र कमिशनपुढें आलेल्या होत्या पण इंग्रजी राज्यामुळें आमच्या अंगचें तेज नाहींसें होत चाललें आहे, राष्ट्र राखण्यास किंवा बनण्यास जे गुण असावे लागतात त्यांचा आमच्यामध्यें उत्तरोत्तर ऱ्हास होत चालला आहे, आणि एकंदरींत आम्हांस मेंढ्यासारखे गरीब करून मग आमच्यावर लांडग्याप्रमाणें राज्य करण्याचा कांहीं इंग्रजी मुत्सद्यांचा हेतु नसला, तरी हल्लीं सुरूं असलेल्या राज्यपद्धतींचा तसा परिणाम घडत आहे ही गोष्ट उघडपणें कमिशनच्या नजरेस कोणीहि आणली नव्हती. मि. दादाभाई नौरोजी यांनीं आपल्या साक्षींत हा एकच मुद्दा घातला आहे व आकड्यांनीं, युक्तीनें आणि अन्य प्रमाणांनी असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, इंग्रजी राज्यपद्धत म्हणजे आम्हांस निःसत्त्व करून सोडण्याचा एकच चरक आहे. उदाहरणार्थ इंग्रजी व्यापारच घ्या. हा सर्व व्यापार इंग्रजी व्यापाऱ्यांच्या हातांत आहे व याचा फायदाहि तेच घेतात; पण याहिपेक्षां पेन्शनें व पगार म्हणून युरोपियन लोकांस ओझ्यांच्या ओझीं जे रुपये द्यावे लागतात त्यानें आमचें दुहेरी नुकसान होत आहे. जें काम एखाद्या चांगल्या नेटिव्हाकडून घेतल्यानें पहिल्यानें जे पगाराचे पैसे आमच्या देशांत राहिले असते ते युरोपियनांच्या घरांत जातात, आणि फिरून ते भांडवलाच्या रूपानें हिंदुस्थानांत येऊन व्यापारांत किंवा रेल्वेंत गुंतत असल्यामुळें त्यांचें व्याजहि सालोंसाल आम्हांस भरावें लागतें. मारवाडी

---

* या रॉयल कमिशनला वेल्बी कमिशन असेंहि म्हणतात. वेल्बी हे इंग्लिश गृहस्थ या कमिशनचे अध्यक्ष होते.

एखाद्यास कर्ज देऊं लागला म्हणजे पन्नास रुपये देऊन शंभराचा रोखा लिहून घेतो आणि पुन्हां एक वर्षाचे व्याज आधींच कापून घेतो अशी आख्यायिका आहे. पण इंग्रज लोकांची जी प्रत्यक्ष राज्यपद्धत आमच्या डोळ्यांपुढें आहे, ती याहूनहि भयंकर आहे. दरवर्षी हिंदुस्थानांतून वीस पंचवीस कोट रुपये आम्हांस त्याचा कांहीं मोबदला न मिळतां विलायतेस जातात. आणि तेच रुपये भांडवलाच्या रूपानें पुन्हां हिंदुस्थानांत परत येऊन पहिल्यावर्षी पंचवीस कोट तर दुसऱ्या वर्षी नवे पंचवीस कोट आणि पहिल्यावर्षी दिलेल्या पंचवीस कोट रुपयांपैकीं जी रक्कम देशांत भांडवल म्हणून परत आली असेल तिचें व्याज, अशा रीतीनें आमच्या संपत्तीचा ऱ्हास होत चालला आहे, इतके पैसे दरवर्षी देशाबाहेर जात असतां कोणची सुवर्णभूमि कंगाल होणार नाहीं ? इंग्लंडदेश एवढा श्रीमंत आहे, पण तोदेखील अशा व्यवस्थेनें पांचपंचवीस वर्षांत भिकेस लागेल. बरें; पैसे गेले ते गेले पण त्याबरोबर आमच्या अकलेचा, हिमतीचा आणि शौर्याचाहि ऱ्हास व्हावा अशी सरकारनें व्यवस्था ठेविली आहे. तरवारीचें पाणी ज्याप्रमाणें तरवार म्यान्यांत ठेवल्यानें नाहीसें होतें, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या आंगच्या पाण्याची स्थिति होते. सर्व हिमतीचीं आणि कर्तबगारीचीं कामें इंग्रज लोकांनीं आपल्या हातांत ठेवलीं आहेत. ब्रह्मदेशावर चाल करून जावयाचें असलें किंवा चित्रळवर स्वारी करावयाची असली, किंवा प्लेग हटविण्याचें काम करावयाचें असलें, तर तें देखील सरकार आम्हास सांगत नाहीं. मुसलमानी राज्यांत अशा तऱ्हेचा जुलूम होत नव्हता. खुद्द काबूलच्या सुभेदाराचें काम देखील एका नेटिवाकडे होतें; पण आतां एखाद्या रामोशाचें देखील बंड मोडण्यास साहेबाची योजना होतें, आणि ती कां, आमच्या आंगीं शौर्य नाहीं म्हणून नव्हें, तर आमच्या अंगच्या गुणांचा विकास होऊं देण्याची सरकारची इच्छा नाहीं म्हणून. या राज्यव्यवस्थेचा असा परिणाम झाला आहे कीं, हिंदुस्थानांत आम्ही तीस कोटीं माणसें असून बंदिवानाप्रमाणें जखडलेलीं व निरुत्साह झालेलीं आ ों. सारांश, इंग्रजी राज्यव्यवस्था उत्तम तर खरीच, पण तिचें सर्व धोरण आमच्या सर्व लोकांस नामर्द करण्याकडे आहे व हा दोष नेटिव लोकांस राज्यकारभारांतील जोखमीचीं कामें सांगून युरोपियनांप्रमाणेंच त्यांस मोठ्या पगाराच्या जागा दिल्या-खेरीज नाहीसा व्हावयाचा नाहीं, असें मि. दादाभाई नौरोजी यांनी निर्भीडपणें व शांतपणें सांगितलें. राज्यकारभाराच्या कोणत्या खात्यांत किती खर्च कमी करितां येण्यासारखा आहे याबद्दल आपले काय विचार आहेत ते सांगा, असा कमिशनच्या अध्यक्षांनी मि. दादाभाई यांस प्रश्न केला आणि असें सांगितलें कीं, पै पैची काळजी आपण घेतली म्हणजे रुपयांची निराळी काळजी घ्यावयास नको.

अध्यक्षांचें हें म्हणणें ठीक आहे; पण हिंदुस्थानसरकार जेव्हां पैशाची काळजी किंवा खर्चाची काटकसर करितें आणि दोन हजारांचा एक युरोपियन ऑफीसर नेमितें हें वेल्बीसाहेबांस काय ठाऊक ? असो; मि. दादाभाई यांनीं वेल्बीसाहेबांस लागलीच असा जबाब दिला कीं, अमक्या खात्यांत अमुक एक काटकसर करा हें सांगावयास मीं आलों नाहीं, मला एकंदर राज्यव्यवस्थेंत जो दोष दिसतो तो कमिशनपुढें मांडावयाचा आहे व तो मी आकड्यांनीं सिद्ध करून दाखविला आहे.........कमिशनपुढें इंग्रजी राज्यपद्धतीची खरी स्थिति कोणी तरी मांडावयास पाहिजे होती व ती मि. दादाभाईसारख्या वृद्ध, अनुभविक व निस्सीम देशभक्तांकडून मांडली गेली हें फारच चांगलें झालें.........

# ९. मि. दिनशा ए. वाच्छा यांची रॉयल कमिशनपुढें झालेली साक्ष

[ ४ मे १८९७ ]

गेल्या महिन्याचें पहिले आठवडयांत मि. दिनशा एदलजी वाच्छा यांची रॉयल कमिशनपुढें साक्ष झाली. ...... मि. वाच्छा हे धीट, निर्भीड व हिशेबी कामांत फार वाकवगार आहेत अशी त्यांची ख्याति आहे; व मुंबई प्रेसिडेन्सि असोसिएशनच्या तर्फें म्हणजे जवळ जवळ सर्व मुंबई इलाख्याच्या तर्फें जनमत बोलून दाखविण्यास ते गेले आहेत, आधींच पंडिताला पंडित भेटला कीं वादाची हौस उत्पन्न होतेच. तशांतून विशेषत: सरकारच्या बाजूस स्वभावत: अनुकूल असे अधिकारी न्यायस्थानापन्न झालेले असल्यामुळें कमिशनर व साक्षीदार यांचा वाद कडाक्याचा झाला यांत कांहींच आश्चर्य नाहीं......

हिंदुस्थानसरकार आपल्या पैशाचा व्यय कसा करितें हा मुख्य प्रश्न काय तो कमिशनपुढें मांडलेला आहे याचा विचार, निरनिराळीं खर्च खातीं घेऊन, त्यांत खर्च कसकसा वाढला आहे व तो सर्व खर्च आवश्यक आहे कीं काय, यावर पुरावा घेऊन होणारा आहे. परंतु असंबद्ध किंवा क्षुल्लक असे वादांत केवळ शब्दसंदर्भानें उत्पन्न झालेले उपप्रश्न घेऊन त्यावर कमिशननें खूप झोड दिली आहे असें पुष्कळ साक्षीदारांच्या पुराव्यावरून दिसून येईल. इंग्रज सरकारच्या राज्याचें धोरण कसें आहे या प्रश्नावर निकाल घेण्याचें कमिशनचें काम नाहीं, असें असतां नेटिव्ह साक्षीदारांस त्या बाबतींत प्रश्न विचारून त्यांना उगीच खवळविण्यांत काय अर्थ आहे हें आम्हांस कळत नाहीं. इंग्रजी राज्याचें खरें धोरण काय आहे तें दादाभाई नौरोजींनीं स्पष्ट शब्दांनीं सांगितलेंच आहे. त्याची आम्हालांचसें काय, पण इतर साक्षीदारांसहि पुनरावृत्ति करण्याचें कारण नाहीं. इंग्रजी अंमलाखालीं देश कंगाल व लोक नामर्द होत चालले आहेत याबद्दल भिन्न मत असण्याचा संभवच नाहीं. करितां आपण मि. वाच्छा यांनीं दिलेल्या इतर पुराव्याकडे वळूं. सरकारी खर्चासंबंधानें मि. वाच्छा यांनीं, हुंडणावळ, आगगाडया, वगैरे सरकारी कारखाने, कालवे, सरकारी नोकरांचे पगार व ऑफीसांचें खर्च, विशेषत: लष्करी खर्च इत्यादि ठोकळ मुद्दे घेऊन त्यांचे अनुसंधानानें पुरावा दिला. हुंडणावळीचा भाव वरचेवर बदलतो ही वाईट गोष्ट तर खरीच, तरी पण तिचा फायदा घेऊन सगळा वाढता भंभाळा खर्च हुंडणावळीमुळेंच होतो, असें सांगून सरकार प्रजेला फसवितें ही त्याहून वाईट गोष्ट आहे. हुंडणावळीच्या चलबिचलीनें आपण न चकण्याला युक्ति अशी आहे कीं, भाव

कायम होईपर्यंत कांहीं दिवस बजेटचा अंदाज करतेवेळीं आपल्या अटकळीनें कांहीं भाव ठरवावा म्हणजे कमीजास्ती भावाचा परिणाम तिजोरीवर फारसा व्हावयाचा नाहीं. लष्करी खर्चासंबंधानें पाहतां गेल्या दहा वर्षांत सरहद्दीवरची बंचावाची कामें व लढाया यांनीं तिजोरीवर फार ओझें टाकलें आहे. हा खर्च युरोपियनांचे जागीं नेटिव्ह शिपाई नेमून वांचेल. तो तसा न वाचवितां उलट दहा हजार युरोपियन शिपाई वाढविण्यांत आले आहेत. आगगाड्या, कालवे इत्यादि परदेशी भांडवलानें चालविलेलीं अजस्र कामें हिंदुस्थानांस खरोखर फायदेशीर होत नसून त्यापासून देशांतून पैसा फायद्याचे रूपानें परदेशास मनस्वी जात आहे. दहा वर्षांत आगगाड्यांमुळें सरकारास चवदा कोट रुपयाचा चट्टा बसला आहे, व इतके असूनहि राली ब्रदर्ससारखे व्यापारी देशाचे आंतड्यांत प्रवेश करून बसले असल्यामुळें त्या कारखान्यांचा खरा उपयोग रयतेस होत नाहीं. सिव्हिल खात्याचा खर्च दहा वर्षांत दीड कोट वाढला आहे. हा खर्च सर्वच आवश्यक नसून, पर्वत-यात्रेसारख्या अपवादास्पद गोष्टीमुळें हा खर्च निरर्थक होत आहे. हुंडणावळीचे बाबतींत तर सरकारनें आपल्या विलायती नोकरांस अव्वाच्या सव्वा पैसे देऊन फुकट खर्च वाढविला आहे. अशा रीतीनें खर्च वाढत असतां त्यावर चांगलीच नजर राहावयास पाहिजे. हिंदुस्थानसरकारचे फडणीस आधीं काटकसर करणारे नसतात. त्यांतून सर जेम्स वेस्टलंडसारखे प्रजेचे खाऊन प्रजेवर तोंड टाकून भुंकणारे कृतघ्न "कुत्रे" मिळाल्यावर मग बोलायलाच नको. फडणिसांचे मनात काटकसर करण्याचें आलें, तरी स्टेट सेक्रेटरी किंवा गव्हर्नर-जनरल यांच्या मनाप्रमाणें बहुधा खर्चाचीं सूत्रें चालणार. फडणिसाचे जागीं विलायतेंतून नवा तरतरीत व स्वतंत्र विचाराचा एखादा हिशेबनीस आणिला तर कांहीं तरी खर्चावर दाब राहण्याचा संभव आहे. वास्तविक सर्वांत सोईचा व न्यायाचा उपाय म्हटला म्हणजे हिंदुस्थानवासी लोकांचे तर्फे मतदार कौन्सिलांत देऊन त्यांना बजेटावर वादविवाद करून मतनिर्णय करितां यावा असा अधिकार पाहिजे. प्रजा जर पैसे देणार तर खर्चावर तिचा दाब असलाच पाहिजे. प्रजापक्षाला अनुकूल असें बहुमत होणें हल्लीच्या स्थितींत शक्य नाहीं. प्रजेनें आपला पैसा कसा खर्चायचा हें आपलें आपण ठरविलें तर त्यांत वावगें तें काय झालें? इत्यादि पोक्त विचार मि. वाच्छा यांच्या साक्षींत सर्व आले आहेत. . . . . . . .

# १०. रॉयल कमिशनपुढें प्रो. गोखले यांची झालेली साक्ष

[ ११ मे १८९७ ]

...... ... प्रो. गोखले हे हिंदुस्थानच्या तर्फे गेलेल्या साक्षीदारांपैकी दुसरे होत. एकंदरीनें पाहतां यांची साक्ष चांगली झाली. मि. दादाभाई किंवा मि. वाच्छा यांच्याप्रमाणें प्रो. गोखले यांस जळजळीत उलटतपासणीचें दिव्य करावें लागलें नाहीं हें खरें; तथापि उलटतपासणीच्या कित्येक उत्तरांस त्यांनीं दिलेलें जवाब पाहून त्यांच्या शांततेनें त्यांचा बचाव केला असें दिसून येतें. प्रो. गोखल्यांचे प्रमाणें इतर दोघांचीहि तयारी जय्यत होतीच; परंतु मि. दादाभाई यांनीं व विशेषतः मि. वाच्छा यांनीं सणसणीत प्रत्युत्तरें देण्याचा प्रयत्न केल्यामुळें कळकळीनें जात्याच क्षुब्ध असलेली त्यांची मनोवृत्ति जागृत होऊन त्यांनीं आपलें म्हणणें संथपणें कमिशनपुढें मांडलें नसावें असें इकडे आलेल्या हकीगतीवरून दिसतें. प्रो. गोखले यांनीं न्यायमूर्ति रानडे यांच्या पोक्त व विचारी सल्यानें चांगली अगाऊ तयारी केली होती व वेळीं त्यांनीं राखलेल्या मनःसमतेमुळें त्यांना तिची यथायोग्य मांडणी करितां आली............

... ... ... साक्षींतील मुख्य मुद्दा म्हटला म्हणजे असा होता कीं हिंदुस्थानसरकार जो खर्च करितें त्याची पद्धति मितव्ययाची आहे किंवा उधळेपणाची आहे व ती दुरुस्त करण्यास काय योजना केली पाहिजे ? यासंबंधानें प्रो. गोखले यांनीं असें सांगितलें कीं, राज्यकर्त्यांचा परकीपणा, परकीयांनीं नोकऱ्यांचा घेतलेला मक्ता व पूर्वेकडील देशांत असलेले ब्रिटिश राज्याचे राजकीय हितसंबंध इत्यादि गोष्टींमुळें प्रजेच्या पैशाची फार नासाडी होते व ती बंद करण्याचे मुख्य उपाय म्हणजे असे कीं प्रथमतः प्रजेच्या पैशाची विल्हेवाट एकटा स्टेट सेक्रेटरी अगदीं अनियंत्रितपणानें लावतो व त्याला स्वतंत्र मताचे असे सल्लागार कोणी असत नाहींत. याकरितां त्याच्या कौन्सिलांतील मेंबर विलायतेंतील प्रधानांनी कांहीं नियमित वर्षांचे नेमणुकीवर नेमून द्यावे; दुसरें असें कीं, हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत लोकपक्षीय अशा कायदेकौन्सिलच्या सभासदांस बजेटावर मत देण्याचा अधिकार असावा; व सरकारशीं मतभेद झाला असतां त्यांचें म्हणणें ऐकून घेणारी व सरकारावर अंमल करणारी अशी एखादी विलायतेंत लहानशी सभा असावी. तसेंच कायद्यांत दुरुस्ती करून, हिंदुस्थानचा ज्यांत बिलकुल हितसंबंध नाहीं अशा गोष्टींत हिंदुस्थानचा पैसा प्रजेच्या मताविरुद्ध कधींहि खर्चेला जाऊं नये अशी खबरदारी करून टाकावी.

हिंदुस्थानावर राज्यकर्ता नेमणें तो चांगला हिशेवनीस असावा व हिंदुस्थानांतील संस्थानिक वगैरे लोकांशीं व्यवहार ठेवण्याच्या त्या कपटपटु राजनीतीच्या ब्रह्म-घोंटाळ्यांत त्यानें आपलें मन न गुंतवितां आपली आपण फडनिशी करावी; व हिंदुस्थान व प्रांतिक सरकारचे वतीनें बोलण्यास पार्लमेंटामध्यें एकेक मुखत्यार निवडून द्यावा; दुसरा प्रश्न व्यापारासंबंधाचा होता. याच प्रश्नावर राजा व प्रजा यांचा विशेष मतभेद आहे. लॉर्ड वेल्बीसारख्या गृहस्थांसहि हल्लीचें आगगाड्या वगैरे कारखाने व इंग्लडांत प्रचलित असलेली अप्रतिबद्ध व्यापाराची पद्धत याचे योगानें हिंदुस्थानचा नफा न होतां नुकसान कसें होतें हें नीट उमजत नाहीं. परंतु त्यांचीं परिस्थिती अगदीं निराळी व त्यामुळें दृष्टीचें वळण एका धोरणाचें बनून गेलेलें असतें, यामुळें त्यांना आमची खरी स्थिति जाणतां येत नाहीं असें दिसतें. आगगाड्यांनीं प्रवास सुखकर केला खरा, परंतु आज त्यामुळें वाहकांचे धंदे बसून ते उघडे पडले व आधींच जमिनीचीं आतडीं शोषणाऱ्या शेतकऱ्यांत त्यांची अधिक भर पडली. या आगगाड्यांस तरी पैसा दुसऱ्याचा व त्यामुळें नफा खाऊनचा–खाऊन परकीय व्यापारी व्याजाचा बोजा आमच्या शिरावर दरवर्षी लादतातच आहेत. आम्हाला आगगाड्या हव्यात, परंतु आमच्या शिलकी भांडवलांतून झाल्या तर हव्यात. पौष्टिक अन्न खरें, परंतु अशक्त मनुष्यांस एकदम चारलें असतां जसें तें अपाय करितें तीच स्थिति ह्या कारखान्यांमुळें हल्ली आमची झाली आहे. दुसरें असें कीं, चहा वगैरेची लागवड हिंदुस्थानांत होऊं लागली खरी, परंतु तिचा सर्व फायदा जातो विलायतेत, व अवघ्या व्यापारांत पुढें आम्हाला उपयोगी पडेल तें जमिनीचें सत्व आजच खर्चून जातें हा काय तो आम्हाला फायदा. या विषयासंबंधानें प्रोफेसर गोखले यांनीं समर्पक उत्तर दिलें आहे. ते म्हणतात, माझी अमुक एक वस्तु आहे खरी परंतु तिचा उपयोग केला असतां नफा दुसऱ्यासच जाणार असेल तर ती वस्तु अशीच निरुपयोगी पडलेली पुरवली. पीक देणारी जमीन ही कांहीं लोखंडी घड्याळासारखी नव्हे कीं, जी उपयोगांत नसली तर लागलीच गंजून निरुपयोगी होईल. आमच्या जमिनीचा कस आज नाहीं तर शंभर वर्षांनीं आम्हांला अनुकूल स्थिति येईल तेव्हां उपयोगी पडणारच. अशा दृष्टीनें पाहिलें असतां आगगाड्या काय किंवा इतर कारखाने काय हे केवळ इंग्रजी व्यापाराच्या फायद्याचे आहेत व म्हणूनच त्यांचा इकडे प्रसार करण्यांत येतो की काय असा संशय घेणें केवळ अगदींच कुत्सित होणार नाहीं. दुसरा वादग्रस्त मुद्दा म्हटला म्हणजे इंग्रजी राज्याचा आमच्या लोकांवर एकंदरीनें काय परिणाम होतो हा आहे. यावर प्रो. गोखले यांची टीका कळकळीची आणि जोरदार आहे. ते म्हणतात कीं, इंग्रजी राज्याचा परिणाम आज एक दिसून येत आहे खरा,

तो हा कीं, आमच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा विरून जाऊन उंबरांतल्या किडयाप्रमाणें आमची स्थिति होणार. मानाच्या व अधिकाराच्या लष्करी किंवा इतर जागा हल्लीच्या पद्धतीप्रमाणें आम्हास कधींहि मिळण्याची आशा नसून आमच्या मनाची धाव व दृष्टीची फेंक अकुंचित होऊन जाणार. आणि हे खरें आहे. इंग्रजी राज्य म्हणजे एक मोठा रूळ असून तो आमच्या डोक्यावरून फिरविला जात आहे, व सर्वांची योग्यता एकसारखीच परंतु क्षुद्र अशी होणार आहे असें कांहीं प्रसंगानें मागें एका अंकांत आम्हीं म्हटलेंच आहे. इंग्रजी राज्याचे मित्र आम्हास असें सांगतात कीं, ' इंग्रजी राजछत्राचे छायेखालीं ' तुमच्यामधील उच्चनीच भेदभाव नाहीसा होऊन तुम्ही सर्व एकसारखे एक झाला आहात. परंतु याचा थोडासा खुलासा केला म्हणजे या समस्वरूपतेचें खरें मर्म कळून येईल. एखाद्या फुलबागेंत भिंगाचें घर उभारून व हातानें पाणी घालून वाढविलेल्या नाजूक झाडाप्रमाणें आमची खरी स्थिति आहे. आम्ही सर्व दिसावयास गोंडस व एकाएवढे एक, परंतु भिंगाच्या एवढ्या फटीतून थंड किंवा ऊन वारा आला तर आम्ही तेव्हांच कोमेजून जाणार. उलट उदाहरण दक्षिण अमेरिकेंतील अरण्यांचें घ्या. त्या ठिकाणीं उच्चनीचता हें वैषम्य किंवा उन्हातान्हानें आलेला राकटपणा दिसून येईल, परंतु तेथें कांहीं तरी वृक्ष इतके पोसलेले मिळतील कीं जे आपल्या अंगानें सगळी पृथ्वीच व्यापून टाकणार कीं काय किंवा आभाळाला हात घालून हा अवघा निळा मंडप उमळून पडणार की काय ! असा क्षणभर भास होतो ! तात्पर्य खरी स्वतंत्रता व खरें सत्त्व यांचें जें राकट परंतु तेजःपुंज असें पाणी असतें तें आमच्या या नाजूकसाजूक स्थितींत नाहीं. आम्ही केवळ दिखाऊ बाहुली फुंकारानें उभी राहणार व फुंकारानें पडणार. असो. प्रो. गोखले यांनीं दुष्काळ वगैरे इतर गोष्टींबद्दल चांगला पुरावा दिला. परंतु स्थलसंकोचास्तव त्याचा उल्लेख करितां येत नाहीं. शेवटीं इतकेंच सांगून पुरें करितों कीं, प्रो. गोखले यांनीं येवढी लांबची सफर केल्याचें व आपल्या अनुभवी व विद्वान् गुरूच्या शिकवणीचें चीज केलें.

## ११. राणीसरकारचा जयजयकार

[ २२ जून १८९७ ]

### हिंदुस्थानची स्थिति

ज्या राष्ट्राच्या (म्ह. ब्रिटनच्या) राज्याचा विस्तार गेल्या साठ वर्षांत पाऊणपटीनें वाढला आहे, त्यांतील लोकसंख्या तितक्याच अवधींत दुप्पट जास्त झाली आहे व ज्याची संपत्ति तिप्पट व व्यापार साठ वर्षांपूर्वी होता त्याच्या नऊपट जास्त झाला आहे, त्या वैभवाच्या शिखरांस चढलेल्या राष्ट्रांतील लोक आपल्या ( व्हिक्टोरिया ) राणीच्या जुबिलीच्या निमित्तानें आपल्या उत्कर्षाबद्दल प्रचंड उत्सव करीत आहेत. आतां इतक्या अवधींत हिंदुस्थानच्या स्थितींत काय अंतर झालें आहे तें पाहूं. आमच्या अलंकारशास्त्रांत असा एक नियम आहे कीं, रावणाचें बरेचसें वर्णन केलें म्हणजे रामचंद्राचें फारसें वर्णन करावें लागत नाहीं. फक्त अशा अशा शत्रूस त्यानें जिंकलें असें म्हटलें म्हणजे त्याच्या पराक्रमाचें सहजच वर्णन होतें. हाच न्याय प्रकृत स्थलींहि लागू पडतो. इंग्लंडचा अफाट राज्यविस्तार, व्यांपार व वैभव वर्णन केल्यावर तेथील लोकांच्या अंकित देशांपैकीं हिंदुस्थान हा एक गरीब देश आहे असें म्हटलें म्हणजे मार्मिक वाचकांस आमच्या स्थितीचें आणखी वर्णन करण्याची जरूरी नाहीं. आमचे राज्यकर्ते मोठे हुषार, दक्ष, बुद्धिमान आणि नऊकोटी नव्हे तर नऊशें नऊ कोटीहूनहि अधिक नारायण आहेत एवढीच काय ती आम्हांस आनंद मानण्या-सारखी गोष्ट आहे. बाकी हिंदुस्थानच्या स्थितिकडे पाहिलें म्हणजे आमच्या वैभवाचा नव्हे तर– ऱ्हासाचा हा साठावा उत्सव आहे असेंच म्हणणें भाग पडतें. असो; यासंबंधें जे दोन पक्ष आहेत त्यांचा प्रसंगानुसार आज थोडासा खुलासा व विचार करूं.

महाराणीसाहेबांचें जन्म इसवी सन १८१९ सालीं झालें. यावेळीं पेशवाई नुकतीच लयास गेलेली होती. तेव्हांपासून म्हणजे १८३७ म्हणजे महाराणी गादीवर बसेंपर्यंत बहुतेक हिंदुस्थान इंग्रजांच्या ताब्यांत आलें होतें. महा-राणीसरकारच्या राज्याभिषेकानंतर हिंदुस्थानांत राज्य संपादण्याकरितां झालेल्या लढाया म्हटल्या म्हणजे पंजाबांतील शीख लोक व ब्रह्मदेशांतील ब्रह्मी लोक यांजवर केलेल्या स्वाऱ्या ह्याच होत. यामुळें राज्याची पूर्वपश्चिम मर्यादा

वाढली, आणि सरहद्दीवरील लहानमोठ्या रानटी किंवा अर्धवट सुधारलेल्या जमातींबरोबर ज्या लढाया झाल्या त्यामुळेंहि उत्तरेस व वायव्येस राज्याची मर्यादा विस्तृत झाली आहे. याखेरीज हिंदुस्थानांत लॉर्ड डलहौसीच्या कारकीर्दींत जीं मोठमोठीं संस्थानें खालसा करण्यांत आलीं त्यामुळें किंवा वऱ्हाडसारखे प्रांत कंटिजंटच्या खर्चाकरिता लावून घेतल्यामुळें खुद्द देशांतल्या देशांतहि इंग्रजी राज्याच्या तांबड्या रेघेची मर्यादा बरीच वाढली गेली आहे. याचा परिणाम म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं गोष्टींचा परिणाम म्हणा सन १८५७ सालीं राणीसरकारच्या हिंदुस्थानांतील राज्यावर बरेंच मोठें काहूर आलें होतें. पण त्याचाहि मोड होऊन आजमितीस इंग्रज सरकारचें राज्य हिमालयापासून केप कामोरीनपर्यंत व खैबरपासून तों ब्रह्मदेशच्या पूर्व सरहद्दीपर्यंत पूर्णपणें स्थापित झालें आहे. सन १८५७ च्या बंडामुळें राज्यरीतींत व नीतींत काय फरक झाला हें सर्वांस माहीत आहेच. या सालानंतर महाराणी सरकारांनीं हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें स्वतः आपल्या हातांत घेतलीं व १८५८ सालीं एक मोठा जाहीरनामा प्रसिद्ध करून हिंदुस्थानच्या राजनीतीचा पाया घातला हेंहि इतिहासांत प्रसिद्ध आहे. या जाहीरनाम्याचा पहिल्यानें तयार केलेला मसुदा अगदीं गचाळ होता असें म्हणतात. महाराणीसरकारास अर्थातच तो पसंत पडला नाहीं, व हल्लींच्या जाहीरनाम्यांत जो कांहीं भारदस्तपणा, दूरदर्शीपणा अथवा प्रजेच्या कल्याणाबद्दल कळकळ दिसून येते ती सर्व राणीसाहेबांच्या सांगण्यावरून पूर्वीचा मसुदा फिरविल्यामुळें दृष्टीस येत आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. महाराणीसाहेबांची ही सद्बुद्धी जर त्यांच्या आज्ञेप्रमाणें अंमलांत आली असती, तर आजचा जुबिलीचा उत्सव हिंदुस्थानवासी लोकांस इंग्लंडच्या लोकांइतकाच आनंदाचा व अभिमानाचा वाटला असता. परंतु आमच्या दुर्दैवानें तसा प्रकार घडून आला नाहीं. १८५७ पासून तों १८९७ पर्यंत राज्यपद्धतींत ज्या कांहीं सुधारणा झाल्या त्यांपैकीं कांहीं गोष्टी खेरीजकरून सर्वांचें धोरण अधिकारीवर्गाचे हातांत अधिकाधिक सत्ता देऊन लोकांस अगदीं निःशस्त्र व निःसत्त्व करून टाकण्याकडे आहे असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. या राजनीतीचा कळस १८७७ सालीं ज्यावेळीं महाराणीसरकारांस हिंदुस्थानची बादशाहीण केलें तेव्हांच झाला आहे. ज्या संस्थानिकांस इंग्रजसरकार पूर्वी दोस्त समजत होतें तेंच आतां ताबेदार दोस्त झाले, व इंग्रज सरकारच्या इतर प्रजेबरोबर या संस्थानिकांचीहि स्थिति खालावली जाऊन आम्ही सर्वच आतां एकसारखे शक्तिहीन व उत्साहहीन होऊन राहिलों आहों. सारांश, एकाचा उत्कर्ष म्हणजे दुसऱ्याचा अपकर्ष असें जें म्हणणें आहे तें ह्या स्थलीं पूर्ण लागू पडतें. सूर्य मध्यान्हीं आला म्हणजे चंद्र त्याजबरोबर असल्यास काळोखींत असतो,

आणि आपल्या पूर्ण वैभवानें युक्त असला तरी पाताळांत असतो, असा जो ज्योतिःशास्त्राचा अनुभव आहे तोच राजनीतिशास्त्रांतहि प्रत्ययास येतो हें थोडया विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल. परप्रकाश चंद्राची अशा वेळीं मोठी महति म्हटली म्हणजे पाताळांतील लोकांस आनंद देण्याची; परंतु हें वैभव मध्यान्हीच्या सूर्याच्या तेजापुढें किती अल्प आहे हें तोच चंद्र सूर्याच्या जवळ असतां त्याच्या तेजानें कसा लोपून जातो यावरून दिसून येतें. आमच्या हिंदुस्थानची स्थिति आज अशीच झाली आहे. या देशाच्या ऱ्हासाचीं कारणें कांहीं असोत, पण येवढी गोष्ट कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं कीं, शंभर वर्षापूर्वी या देशांत चांगले योद्धे, मुत्सद्दी व राजकारणी पुरुष निपजत होते व कोणाच्या अंगीं तेज, विद्या अगर हुषारी असल्यास त्याचा विकास होण्यास त्यावेळीं त्यास चांगलीं साधनें मिळत असत. परंतु आतां इंग्रजी राज्यसत्तेच्या तेजामुळें हें सर्व गुण निरुपयोगी झाले आहेत, इतकेंच नव्हे तर, अनुपयोगामुळें त्यांचा ऱ्हास होऊन आम्हां सर्वांवर कोणीहि अंमल अथवा जुलूम करावा इतके आम्ही सत्वहीन किंवा बलहीन होत चाललों आहों, अथवा झालों आहों असें म्हटलें तरी चालेल. परवशतेचा वरवंटा सारखा डोक्यावर फिरत असतां कोणत्याहि देशांतील लोक कसे खच्ची होतात हें आमच्या दुर्दैवानें प्रत्यही अनुभवास येत आहे; व परमेश्वराची प्रार्थना करीत असतां तो सर्वसाक्षी व सर्वज्ञ आणि आम्हीं अल्पज्ञ, व तो सर्वन्यायी व आम्ही केवळ अणुरेणुसारखे असें म्हणण्याचा जसा परिपाठ आहे तसा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन देशांसंबंधानें विचार केला असतां आम्हांस म्हणावें लागत आहे. आयर्लंडास हिंदुस्थानापेक्षां जास्त हक्क मिळाले असतांहि आयरिश लोक जे असल्या प्रसंगीं उदासीन राहिले आहेत त्यांतील बीज हेंच होय. हिंदुलोकांचें शील जात्याच निराळें असल्यामुळें ते यथाशक्तीनें हा उत्सव साजरा करीत आहेत; पण तेवढ्यानें त्यांची स्थिति आयर्लंडपेक्षां बरी आहे असा मात्र गैरसमज होऊं नये म्हणजे झालें.

कित्येक इंग्रज कामगारांचें व ग्रंथकारांचें असें म्हणणें आहे कीं, गेल्या साठ वर्षांत हिंदुस्थानची स्थिति पुष्कळच सुधारली आहे. आजमित्तीस हिंदुस्थानचा व्यापार जवळ जवळ सालीना जो दोनशें कोट रुपयांपर्यंत वाढला आहे तो साठ वर्षांपूर्वी अवघा एकवीस कोट रुपये होता. रेलवे मुळींच नव्हती ती आतां वीस हजार मैलपर्यंत झाली आहे. कर्ज एकंदर सुमारें तीनशें कोट रुपयांचें आहे, व याखेरीज सुमारें तितकेच रुपये इंग्रजी सावकारांनीं हिंदुस्थानच्या व्यापारांत घातले आहेत. दोनशें कोट व्यापार सांगितला त्यांपैकीं सुमारें एकशें सतरा कोटीचा माल देशांतून बाहेर जातो. ब्यायशीं कोटीचा माल देशांत येतो; म्हणजे अर्थात

चवतीस कोट रुपये परराज्याकरितां आम्हांस खंडणी भरावी लागते. याखेरीज हिंदुस्थानांत तागाच्या व सुताच्या गिरण्या झाल्या आहेत. सडका व आगगाडी यांनीं व्यापारास उत्तेजन आलें आहे. देशांत सर्वत्र शांतता असल्यामुळें लोकसंख्या दुप्पट झाली आहे. पाटबंधारे, व पूल वगैरेंचीं मोठमोठीं कामें नेहमीं चालू असून त्यामुळें दुष्काळाची भीति कमी होत चालली आहे. स्थानिक स्वराज्याची स्थापना होऊन कायदे कौन्सिलांतहि लोकांचा प्रवेश झालेला आहे. पाश्चात्य शिक्षणानें लोकांच्या समजुतींत व रिवाजांत पुष्कळ फरक पडत चालला आहे; व वर्तमानपत्राचें स्वातंत्र्य व सभेंतून आपले विचार प्रदर्शित करण्याची मोकळीक मिळाल्यामुळें मतस्वातंत्र्याचा ते पूर्ण अनुभव घेत आहेत. सन १८३७ सालीं हिंदुस्थानसरकारचें उत्पन्न एकवीस कोट रुपये होतें, तें आतां जवळ जवळ सत्याण्णव कोट रुपये झालेलें आहे, व इंग्रजी भाषेच्यां द्वारें सर्व हिंदुस्थानांतील लोकांस एकमेकांचे विचार एकमेकांस कळविण्यास मोठें साधन झालें आहे. सारांश, थोडक्यांत सांगणें झाल्यास हिंदुस्थानांतील इंग्रजसरकारच्या राज्यास गेल्या साठ वर्षांत दोन चार मोठ्या प्रांतांची भर पडली आहे, लोकसंख्या दुप्पट झाली आहे, व्यापार नऊ पट आणि सरकारचें उत्पन्न जवळजवळ पांच पट वाढलें आहे. आणि याखेरीज रेलवे, तारायंत्र वगैरे पाश्चात्य देशांतील सुधारणेच्या साधनांचा व विशेषेंकरून शांततेचा हिंदुस्थान एकसारखा उपभोग घेत आहे, यापेक्षां साठ वर्षांत हिंदुस्थानसारख्या देशाची वाढ ती काय व्हावी ?

गोष्ट खरी आहे; पण जरा सूक्ष्म रीतीनें विचार केला असतां या आकड्यांवरून हिंदुस्थानची स्थिति सुधारली नाहीं असें कोणासहि दिसून येईल. इंडियन नॅशनल कॉंग्रेस आज बारा वर्षें जी खटपट करीत आहे ती वरील आंकड्यांपासून उत्पन्न होणारा भ्रम दूर करण्याकरितां होय. व वेल्बी कमिशनपुढें कॉंग्रेसतर्फे ज्या साक्षीं झाल्या व विशेषेंकरून मि. दादाभाई नौरोजी यांची जी साक्ष झाली तींत इंग्रजी अमलाखालीं हिंदुस्थान उत्तरोत्तर कसें दरिद्री व निःसत्त्व होत चालले आहे हें फार चांगल्या रीतीनें दाखविलें आहे. आमच्या स्वराज्यांत कांहीं दंगेधोपे होत असत, पण त्यामुळें जें एक प्रकारचें धैर्य व हिम्मत माणसाच्या अंगीं राहत असे ती आतां अगदीं नाहींशी झाली आहे. हिंदुस्थानचा व्यापार पूर्वी फार थोडा होता हें खरें आहे; पण त्याचा अर्थ असा कीं, आम्हांस लागणाऱ्या सर्व जिनसा आम्हीं तयार करीत होतो व येथील कारागिरांच्या उत्तम जिनसा परदेशीं जात असत. गेल्या साठ वर्षांत तें सर्व पारडें फिरून गेलें आहे व आम्हीं शेतीचा माल विलायतेस पाठवावा व विलायतची कारागिरी घरांत घ्यावी अशी स्थिति झाली आहे. व्यापार वाढला हा नुसता

भ्रम आहे. आपण असें समजूं कीं, एखाद्यास पूर्वी शंभर रुपयाची प्राप्ती व पन्नासांचा खर्च मिळून त्यांचा दीडशें रुपयांचा जमाखर्च होत असे. परंतु त्यांसच, आतां पांचशे रुपये मिळकत व आठशें रुपये खर्च मिळून तेराशेंचा जमाखर्च ठेवण्याची पाळी आली, यांत त्याची संपत्ती वाढली कां कमी झाली ? अर्थात् कमी झाली असेंच म्हटले पाहिजे. हिंदुस्थानचीहि तशींच स्थिति झाली आहे. हिंदुस्थानचा व्यापार कितीहि वाढला असला तरी आम्ही त्यांत दरसाल ३४ कोट रुपये गमावतो हे विसरतां कामा नये. रेल्वे, तारायंत्रे, वगैरे साधनें वाढलीं, पण हे सर्व प्रकार दुसऱ्याच्या वायकोस नटविण्यासारखे झाले आहेत. हीं साधनें आमच्या मालकीचीं नाहींत; इतकेंच नव्हें; तर त्याकरतां दरसाल व्याजमनोतीच्या रूपानें आम्हांस बराच चट्टा बसत आहे. आगगाडी, तारायंत्रे, यांनीं देश सधन होतो खरा, पण कोणता ? तर जो स्वतः आपली आगगाडी करितो तो. उदाहरणार्थ जपानच घ्या. या देशांत तीस वर्षांत जो उत्कर्ष झाला तो राणीसरकारच्या साठ वर्षांच्या कारकीर्दीतहि हिंदुस्थानचा झाला नाहीं याचें कारण काय ? जपानचे राजे आमच्या राजकर्त्यांपेक्षां अधिक शहाणे नाहींत व जपानचे लोकहि आम्हापेक्षां अधिक बुद्धिमान् अगर कंटक नाहींत. फक्त जपान स्वतंत्र आहे, त्यामुळें त्या देशांत जी सुधारणा करण्यांत येते ती फक्त तेथील लोकांच्या हिताकरितांच व सुखाकरितांच करितात; आणि आमच्याकडे कोणतीहि गोष्ट निघाली कीं, लोणी युरोपियन लोकांस व ताक आम्हांस मिळत असते. अशानें हिंदुस्थान देश कधींहि भरभराटीस यावयाचा नाहीं. तो किती कंगाल झाला आहे यांची कल्पना एक वर्षी पाऊस न पडल्यानें लाखों लोक कसें अन्नान्न दशेस लागतात हें पाहून आतां कोणासहि सहज होण्यासारखी आहे. सर्व प्रकारच्या लष्करी व मुलकी खात्यांत सत्तेच्या व कर्तबगारीच्या जागा युरोपियन लोकांनीं आपल्या हातांत ठेविल्या असल्यामुळें आमच्या हुशारीचा व कर्तृत्वशक्तीचा लोप होत चालला आहे; शांततेमुळें लोकसंख्या वाढत चालली; निःशस्त्र केल्यामुळें प्रजेस आत्मसंरक्षणाचीहि ताकद राहिली नाहीं; पूर्वींचे धंदे व कारागिऱ्या बहुतेक बुडाल्या आहेत; शिक्षण जें कांहीं मिळतें तें अगदीं पोंचट व एकांगी आहे; लष्करी व धंदेशिक्षणाच्या नांवानें भोपळ्याएवढें पूज्य आहे; राज्यकारभाचा खर्च अवाढव्य वाढत जाऊन त्याचें ओझें लोकांस असह्य होत चालले आहे; पूर्वी सावकारच रयतेस पिळीत असत, हल्लीं सावकार व सरकार दोघेहि शेतकऱ्यांस सारखेंच गांजतात व शेतकीखेरीज तर दुसरा धंदाच राहिला नाहीं. नेटिव संस्थानिकांकडे पाहिलें तर पदोपदीं त्यांचीहि मानखंडणा चालली असून इंग्रजसरकारचे दोस्त या पदवीपासून त्यांनीं पादाक्रांत केलेल्या लोकांच्या

पायरीस ते आलेले आहेत; आणि कोणाच्याहि अंगांत कोणत्याहि प्रकारचा हुरूप अथवा तेज दिसत नाहीं. सारांश; जो देश शंभर वर्षांपूर्वी हातपाय हालविणाऱ्या स्थितींत होता तो आतां अगदीं निःसत्त्व होऊन दीन दशेस आलेला आहे. त्यांतून यंदाचें सालीं तर दुष्काळ, मरकी आणि धरणीकंप यांनी अगदीं लोकांस त्राहि त्राहि करून सोडलें आहे. वास्तविक म्हटलें म्हणजे ही वेळ हिंदुस्थानांत तरी ज्युबिली करण्याची नव्हें असें कोणासहि खास वाटल्यावांचून राहणार नाहीं. आम्ही दीनप्रजेनें देखील आमच्या महाराणी-सरकारचा गौरव केला पाहिजे खरा; पण तो केव्हां ? कांहीं तरी सुबत्ता असतांना. हिंदुस्थानसरकारचे हुकूमहि थोडेबहुत अशा प्रकारचे आहेत, परंतु खालील अधिकाऱ्यांच्या फाजील इर्षेनें लोकांवर कांहीं ठिकाणीं निरर्थक खर्चाचा बोजा बसत आहे हें कांहीं चांगलें नाहीं. प्रजेचें राजकर्त्यासंबंधें जें कर्तव्य आहे त्यामुळें प्रजेनें राजाचें नेहमीं अभीष्ट चिंतन करीत असावें हें आम्हांस कोणी शिकवावयास नको; पण उलटपक्षीं प्रजेप्रमाणेंच राजकर्त्यांचेंहि प्रजेसंबंधानें जें एक कर्तव्य आहे तें घडून न आल्यामुळें आमच्याजवळील जपानांत तीस वर्षांत जी सुधारणा झाली ती आमच्या दुर्दैवानें आमच्या शहाण्या राजकर्त्यांच्या साठ वर्षांच्या अमदानींतहि आम्हास मिळाली नाहीं. करितां चक्रवर्तिनी श्रीमहाराणी व्हिक्टोरिया, यांस आमची हिंदुस्थानांतील लोकांच्यातर्फे अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं या महोत्सवाचे प्रसंगीं आपल्या या हिंदुस्थानवासी प्रजेस कांहींतरी अधिक हक्क देऊन उत्कर्षाच्या मार्गास लावावें. इंग्रजी राज्याचा विस्तार मोठा आहे व त्याच्या राज्यछत्राखालीं मोठ्या आनंदानें आम्हीं राहण्यास तयार आहों; पण मग अर्थातच राणीसरकारच्या इतर प्रजेप्रमाणेंच राज्यांत कोठें गेलें तरी अम्हांसहि हक्क असले पाहिजेत. महाराणीसरकारचीं जर आम्हीं सर्व लेकरें आहोंत तर एका भागांतील लेकरें दुर्दैवी व दीन आणि दुसऱ्या भागांतील श्रीमंत व उर्मट कां असावीं हें आम्हांस कळत नाही. इंग्रज लोकांच्या ज्या वसाहती आहेत तेथेंहि आम्हांस येण्याचा लोक प्रतिबंध करूं लागले आहेत. हा भेदाभेद जोंपर्यंत राहील तोंपर्यंत इंग्रजी सार्वभौम राज्याची घडी कधींहि नीट बसावयाची नाहीं. महाराणीसरकारांस हें तत्त्व मान्य आहे हें त्यांच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यावरूनच सिद्ध होत आहे. तरी चाळीस वर्षांत त्या जाहिरनाम्यांतील तत्त्वांची किती अंमलबजावणी झाली हें पाहून या महोत्सवाचे प्रसंगीं महाराणीसरकार दयाळू होऊन जर त्यांची पुरी अंमलबजावणी करण्यास सांगतील तर तीस कोट लोकांच्या उत्कर्षाचा पाया घातल्याचें श्रेय त्यांस मिळेल, इतकेंच नव्हें, तर इंग्रजी सार्वभौम राज्यास त्यामुळें अधिक बळकटी येऊन तें अधिक चिरस्थायी होईल. ईश्वर करो आणि या मोठ्या

उत्सवाच्या प्रसंगीं महाराणी श्री. व्हिक्टोरिया यांस अशा प्रकारची वुद्धि होऊन त्यांची अंमलबजावणी त्यांच्याच हातून घडून येवो अशी आम्हां सर्वांचीं प्रार्थना आहे. हिंदुस्थानांस जर कांहीं आशा असली तर हीच आहे, व ती श्री. व्हिक्टोरिया राणीसरकार दीर्घायु होऊन त्यांच्या हातें सफल व्हावी असें आमचें ईश्वराजवळ मागणें आहे.

# १२. राजद्रोह कशाला म्हणतात ?

[ २० जुलै १८९७ ]

ले. आयर्स्ट व मि. रँड यांच्या खुनानें डोकीं फिरून जाऊन अँग्लो–इंडियन वर्तमानपत्रकर्त्यांनीं एतद्देशीय लोकांसंबंधानें व त्यांतून पुण्याच्या ब्राह्मणासंबंधानें जी निष्कारण द्वेषवुद्धि प्रगट केली आहे, ती आता सर्व लोकांस चांगली कळून चुकली आहे. काडीइतका देखील पुरावा नसतां पुण्याच्या ब्राह्मणांनीच राजकीय हेतूनेंच खलवत करून हे खून केले आहेत अस तोंडातून रागानें देखील उद्‌गार काढणें अत्यंत असमंजसपणाचे आहे. पुण्यांतील ब्राह्मणांचा खरोखरच बंड करण्याचा इरादा असेल तर तो शोधून काढून त्यांस शिक्षा करण्यास हल्लींचें पिनलकोड बस्स आहे, व तो शोधून काढण्याइतकी सरकारजवळ सामुग्रीहि आहे. परंतु डोकें फिरून गेल्यावर ह्या साध्या गोष्टीहि माणसास कळेनाशा होतात. पिंपळांच्या मुळ्यांनीं शतधा विदीर्ण झालेल्या जुन्या पाराप्रमाणें पुण्याच्या ब्राह्मणांची सध्या स्थिति झाली आहे, व त्या पाराचे सर्व दगड जणू काय एकमेकांवर कोसळण्याच्या बेतांत आहेत, ही गोष्ट आमच्या सरकारास माहित नसेल असें नाहीं; पण “ अथवाऽभिनिविष्टवुद्धिषु व्रजति व्यर्थकतां सुभाषितम् ” या माघ कवीच्या वचनाप्रमाणें सध्या कोणचीच गोष्ट सरकारास सुचविण्याची अथवा त्यांच्या ध्यानात येण्याची आशा फारच कमी आहे. तथापि आमचें कर्तव्य आम्हांस केलें पाहिजे येवढ्याच हेतूनें आज शिरोभागीं नमूद केलेल्या विषयावर आमचे विचार व मत आम्हीं प्रदर्शित करणार आहोंत. पुण्यातील ब्राह्मणांच्या राजद्रोहीपणावरोरच पुण्यांतील वर्तमानपत्रांवरही राजद्रोही लेख लिहीत असल्याचा आरोप अँग्लो–इंडियन पत्रकारांनीं केला होता, व त्याबरोबरच सरकारास अशी सूचना केली होती कीं, वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य कमी करण्याबद्दल ज्याप्रमाणें लिटनशाहींत एक कायदा केला होता तसा आताहि करून सरकारनें या नेटिव राजद्रोही पत्रकारांची खोड मोडावी. टाइम्स आदिकरून वर्तमापत्रांची ही सूचना इकडे प्रसिद्ध झाल्यावर पार्लमेंट सभेच्या एका सभासदानें सेक्रेटरी ऑफ स्टेट यांस असा एक प्रश्न विचारला कीं, “ मि० टिळक यांचीं भाषणें व लेख राजद्रोही आहेत की काय ? ” या प्रश्नाचा रोख काय होता हें सांगावयास नकोच. सेक्रेटरी ऑफ स्टेट यांनीं असें उत्तर दिलें कीं, “ हा कायद्याचा प्रश्न आहे व या संबंधानें मुंबईसरकारचें अद्याप कायमचें मत ठरलें नाहीं. ” या उत्तरावरून येवढें सिद्ध आहें कीं, केसरींतील लेख राजद्रोही

आहेत की नाहींत याबद्दल सरकारांत विचार होत असून हिंदुस्थानसरकार आणि मुंबई सरकार यांच्या दरम्यान याबद्दल कांहीं तरी प्रकरण चालू आहे. अशा वेळीं आमची राजद्रोहाची काय कल्पना आहे ती उघडपणें सरकारांस कळवावी हा आजचा लेख लिहिण्याचा आमचा मुख्य हेतु आहे. केसरींत जे लेख लिहिले आहेत ते सर्व प्रसिद्ध झाले असून त्याच्याबद्दल पूर्ण जबाबदारी केसरीकार घेण्यास तयार आहेत. प्रश्न काय तो येवढाच कीं, जें धोरण लक्षांत आणून ते लेख लिहिलेले आहेत तें धोरण खरोखरच बेकायदेशीर व राजद्रोहीपणाचे आहे कीं काय ? सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणतात त्याप्रमाणें हा प्रश्न खरोखरीच कायद्याचा आहे व त्याचा एकदां निकाल झाला म्हणजे दोन्ही पक्षास बरें वाटेल असें आम्हांस वाटतें. कारण सरकारीं अधिकारी व ॲंग्लो–इंडियन पत्रकार यांच्या मनांत नेटिव वर्तमानपत्रांबद्दल जो द्वेष आहे तो वर लिहिलेल्या कायद्याच्या प्रश्नाचा निकाल झाला असतां पुढें कायम राहावयाचा नाहीं. निकाल वर्तमानपत्रांविरूद्ध झाला तर कायद्याची जी नवी मर्यादा ठरेल त्या मर्यादेंत येतील असेंच लेख आम्ही लिहूं; आणि आमच्या बतीनें निकाल झाल्यास अशा प्रकारचे कायदेशीर लेख आपल्यास ऐकून घेतले पाहिजेत अशी अधिकाऱ्यांची व ॲंग्लो–इंडियन पत्रकारांची समजूत होऊन ते स्वस्थ बसतील. सारांश, कोणत्याहि तऱ्हेनें निकाल झाला तरी तो दोघांसहि सारखा हितावह होणार आहे; पण कोणीहि त्यांत द्वेषबुद्धीनें वागतां कामां नये. एकमेकांचा सूड घेण्याकरितां या प्रश्नाचा निकाल करवयाचा नाहीं. आमच्या राजकर्त्यांनीं आम्हांस जें शिक्षण दिलें त्याच्या फलाचा अनुभव आम्हीं कोठपर्यंत घ्यावा हा या प्रकरणांत एक मोठा मुद्दा आहे. व त्याचा विचार ज्या दूरदर्शीपणानें पाश्चात्य शिक्षणास सुरवात केली त्याच दूरदर्शीपणानें झाला पाहिजे, व तसा झाल्यास त्यास आमची कोणत्याहि प्रकारची हरकत नाहीं इतकेंच नव्हें तर, उलट त्यांत आम्हांस संतोष आहे. सरकारची सत्ता अमर्याद आहे हें आम्हांस पूर्णपणें माहीत आहे. परंतु सरकारची सत्ता जितकी अमर्याद आहे तितके त्यांचे हेतु दुष्ट नसल्यामुळें त्यांनीं जाणून बुजून आम्हास कायद्यानें एक प्रकारची मोकळीक दिली आहे व ती कायम ठेवण्याचा त्यांचा इरादा आहे. या मोकळिकेच्या इयत्तेबद्दल जर मतभेद असला तर त्याचा चार शहाण्यांच्या मतानें निकाल लावावा हाच उत्तम मार्ग होय.

असो; आतां हल्लीं अंमलांत असलेल्या कायद्याप्रमाणें राजद्रोहाचें काय लक्षण होतें तें पाहूं. इंडियन पिनल कोड कलम १२४ (अ) यांत राजद्रोही भाषण करणारास किंवा लेख लिहिणारास शिक्षा सांगितली आहे. सरकारचेबद्दल लोकांचे

मनांत 'अप्रीती' किंवा द्वेष उत्पन्न करणें यास राजद्रोह म्हणतात; पण या कलमांत 'अप्रीती' आणि सरकारच्या कृत्याबद्दल "नापसंती" या दोहोंमध्यें भेद केलेला आहे; व त्याचा खुलासा असा केला आहे कीं, सरकारच्या कोणत्याहि कृत्याबद्दल कोणीहि आपली नापसंती कितीहि कडक रीतीनें व्यक्त करण्यास हरकत नाहीं; मात्र अशी नापसंती अथवा अमान्यता प्रदर्शित करतांना जेणेंकरून सरकारच्या कायदेशीर अधिकाराचें अतिक्रमण करण्याची किंवा सरकारची सत्ता नष्ट करण्याची लोकांमध्यें वुद्धि जागृत होणार नाहीं असे शब्द वापरले पाहिजेत; या खुलाशावरून राजद्रोहाचा काय अर्थ करावयाचा हें वहुतेक स्पष्ट होतें. इंग्रजांचे राज्य व राज्यसत्ता यांच्या विरुद्ध म्हणून जे गुन्हे सांगितले आहेत त्यांत हा एक गुन्हा आहे, म्हणजे अर्थात् ज्या लेखानें राज्याची उलथापालथ किंवा वंडें होण्याचा संभव आहे त्या लेखांचा या कलमांत समावेश होतो. परंतु या कलमांत जो खुलासा दिला आहे त्यामुळें आमच्या सरकारच्या हातून ज्या चुका व अन्याय होत आहेत तें स्पष्टपणें सरकारास कळविण्यास अथवा लोकांस समजून देण्यास अथवा त्यावर कडक टीका करण्यास आम्हांस कोणच्याहि प्रकारची हरकत दिसत नाहीं. अशी कडक टीका केल्यानें इंग्रजसरकार परेमश्वराप्रमाणें निर्दोषी नाहीं असें लोकांस कळेल; व ब्रिटिश साम्राज्यांतील इतर प्रजेप्रमाणें आपणांसहि हक्क मिळण्याचा ते कायदेशीर रीतीनें प्रयत्न करण्यास लागतील हें निर्विवाद आहे. पण पिनलकोडांतील कलम हल्लीं आहे त्यापेक्षां संकुचित केल्याखेरीज वरील प्रकार राजद्रोही आहेत असें कोणासहि म्हणतां यावयाचे नाहीं. केसरींत आजपर्यंत जे लेख आले आहेत ते याच धोरणावर आलेले आहेत. पुराणातील चक्रवर्ती राजांच्या किंवा इतिहासांतील अशोक, अकबर, वगैरे राजांच्या राज्यपद्धतींत व सार्वभौम इग्रजसरकारच्या राज्यपद्धतींत एक जो मोठा भेद आहे तो हा कीं, हल्लीचें सार्वभौम राज्य कोणत्याहि व्यक्तीच्या अस्तित्वावर अवलंबून नाहीं. गव्हर्नर व गव्हर्नर जनरल हे मोठे अधिकारी खरे, किंबहुना त्यांस राजे म्हटलें तरीहि चालेल परंतु त्यांच्या चुका किंवा वाईट कृत्यें यांचें आविष्करण केल्यानें इंग्रजी राज्यसत्तेचा कोणत्याहि तऱ्हेनें उपमर्द होऊं शकत नाहीं. फार लांब कशाला ? हल्लींच्या कायद्याप्रमाणें आमची तर अशी समजूत आहे कीं, जर एखादा वाईट गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल येथें राज्य करण्यास आला तर त्याच्या दुष्कृत्यांचें चांगले आविष्करण करून "आम्हांस हा गव्हर्नर नको, दुसरा गव्हर्नर पाठवा" असा स्टेट सेक्रेटरीकडे किंवा पार्लमेंटकडे अर्ज करण्याचाहि आम्हांस अधिकार आहे. रिपनशाहींत इलवर्ट विलावर टीका करतांना लॉर्ड रिपन यांचा अँग्लो-इंडियन पत्रकारांनीं कसा समाचार घेतला होता हें लक्षांत

आणिलें म्हणजे आमच्या म्हणण्याचा अर्थ त्यांस सहज कळून येईल. लोकांच्या तक्रारी अगर दुःखें सरकारच्या नजरेस आणणें व सरकारच्या चुका लोकांस समजावून देऊन त्यांस कायदेशीर रीतीनें दाद मागावयास सांगणें यांत कोणत्याहि प्रकारचा राजद्रोह नाहीं, मग त्या गोष्टी अधिकारी वर्गास रुचोत वा न रुचोत. कलकत्त्यांतील 'बंगवासी' पत्रावर सन १८९१ सालीं जी फिर्याद झाली होती त्यावेळीं कलकत्ता हायकोर्टाचे चीफ जस्टिस यांनीं १२४ (अ) या कलमाचा जो अर्थ केला आहे तो अशाच प्रकारचा आहे. व त्या वेळीं तो अर्थ आपणांस मान्य असल्याबद्दल हिंदुस्थानसरकारनें आपल्या ठरावांतहि लिहलें आहे. परवां आ० न्या० मि० बद्रुद्दीन तय्यबजी यांनींहि आणखी असें सांगितलें कीं, जे लेख खरोखर राजद्रोही आहेत ते १२४ (अ) या कलमांतून सुटणार नाहींत. सारांश हल्लीं आहे तो कायदा खरे राजद्रोही लेख बंद करण्यास बस्स आहे असें चांगल्या कायदेपंडितांचें मत आहे, इतकेंच नव्हें तर, खुद्द हिंदुस्थानसरकारासहि हेंच मत मान्य आहे. हें कलम पिनल कोडाच्या मसुद्यांत होतें. पण पिनलकोड पास झाला तेव्हां कांहीं चुकीनें तें गळून राहिलें. करितां पुढें ती चूक सन १८७० सालीं दुरुस्त करण्यांत आली. ह्यावेळीं किंवा पिनलकोडाचा मसुदा ठरविला त्यावेळीं ह्या विषयाची जी चर्चा झाली आहे तीहि वर दर्शविल्याप्रमाणेंच आहे. [जेणेंकरून राज्याची उलथापालथ किंवा राज्याला धोका होऊं शकेल, अगर सरकारची कायदेशीर सत्ता न जुमानण्यास लोकांस उत्तेजन मिळेल त्यास राजद्रोह म्हणावयाचें; पण त्यामुळें सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावर कडक टीका करण्यास, त्यांच्या चुका दाखविण्यास व त्या संबंधानें लोकांनीं कायदेशीर रीतीनें काय केलें पाहिजे हें लोकांस समजून सांगण्यास कोणतीच हरकत येत नाहीं. टाइम्सादिकरून पत्रकारांस कायद्याचा ह्या अर्थ रुचणार नाहीं हें आम्हांस माहीत आहे. पण जोंपर्यंत या पत्रकारांची इच्छा म्हणजे कायदा असें ठरलें नाहीं तोंपर्यंत आम्हांस पिनलकोडावरच आपला निर्वाह करून घेतला पाहिजे. सरकार किंवा सरकारी अधिकारी यांच्या वर्तनाबद्दल नाखुषी प्रदर्शित करणें हा हल्लींच्या कायद्याप्रमाणें राजद्रोह होत नाहीं. आमच्या राजकर्त्यांनीं कांहीं शहाणपणाचा मक्ता घेतलेला नाहीं. त्यांचें बळ व सामर्थ्य कितीहि असलें तरी पुष्कळ वेळां एखाद्या इतराप्रमाणें त्यांचे हातून चुका घडून त्यामुळें रयतेस त्रास सोसावा लागतो हें उघड आहे; व असा त्रास जोंपर्यंत होत आहे तोंपर्यंत त्यांचें चांगलें निरूपण करून लोकांस त्याबद्दल सरकारांत दाद मागण्यास सांगणें यांत कोणत्याहि प्रकारचें बेकायदेशीर काम होत नाहीं. पुष्कळ वेळां असें घडतें कीं, वरिष्ठ सरकारचें हुकूम चांगले असून त्यांची अंमलबजावणी खालील अधिकाऱ्यांच्या हातून चांगल्या रीतीनें होत नाहीं, अशावेळीं

सदर अधिकाऱ्यांवर कडक टीका करणें भाग येतें. उदाहरणार्थ, यंदाचें साली साऱ्याच्या तहकुबीबद्दल जो ठराव झालेला आहे तोंच घेऊं. चार आण्यांच्या खालीं जेथें पीक आहे तेथें विन ऐपतदार शेतकऱ्यांस साऱ्याची तहकुबी मिळेल असा सरकारी ठराव आहे. पण त्यांची अंमलबजावणी कशी झाली आहे हें पाहूं गेल्यास ऐपतदार आणि विन ऐपतदार या दोघांकडून बहुतेक ठिकाणीं खालील अधिकाऱ्यांनीं सक्तीनें सारा वसूल केला आहे असें आढळून येईल. अशा वेळीं सरकारी ठराव लोकांस समजून देऊन त्या ठरावाप्रमाणें त्यांस दाद मागण्यांस सांगितल्यानें जुलमी अधिकाऱ्यांस त्रास होतो, व सरकारचे अंशभूत आपण असतांहि लोक आपला उपमर्द करतात असें त्यास वाटूं लागतें हें खरें आहे; पण हा राजद्रोह होत नाहीं, येवढें त्यांस कळावयास पाहिजे. एखाद्या कलेक्टरावर कितीहि टीका झाली तरी जोंपर्यंत राज्याचें अस्तित्व त्यांवर अवलंबून नाहीं तोंपर्यंत फार झालें तर असली टीका व्यक्तिविषयक गुन्ह्यात येईल, राजद्रोहांत येणार नाहीं. लोकांमध्यें आपल्या हक्काचें ज्ञान जसजसें जास्त पसरेल त्या त्या मानानें अधिकारी वर्गास पहिल्याप्रमाणें शिरजोरपणा करतां येणार नाहीं हें उघड आहे. पण त्याचा दोष इंग्रजी शिक्षणाकडे आहे, लोकांकडे नाहीं. युरोपियन गुन्हेगार असला म्हणजे त्यास योग्य शिक्षा होत नाहीं; दुष्काळाकरितां आमचेवर स्वतंत्र कर बसवून फंड गोळा केला असतां पुन्हा दुष्काळाचे वेळीं लोकांस जितकी मदत मिळावी तितकी मिळत नाहीं. आमच्या राजेरजवाड्यांस चौकशी न करितां एकदम काशीयात्रेस पाठवून देतात; आमच्या चालीरीतींची व धर्मसमजुतींची कित्येक वेळां विना-कारण पायमल्ली होते. आमचें लष्कर हिंदुस्थानाबाहेर नेलें तरी त्याचा खर्च आम्हांसच द्यावा लागतो; इत्यादि ज्या कांहीं अन्यायाच्या गोष्टी आहेत त्या लोकांस नीट समजावून देऊन त्याबद्दल लोकमत जागृत करणें व त्यांस कायदेशीर दाद मागण्यास सांगणें हें प्रत्येक वर्तमानपत्रकाराचें कर्तव्य आहे. यांत राज्यास अपाय होण्यासारखें कांहीं एक नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट हे अन्याय दूर झाल्यानें लोक अधिक संतुष्ट राहून राज्यास बळकटी येण्याचा संभव आहे. असे लेख लिहिणारास राजद्रोही म्हणणें म्हणजे अमुक घरांत अमुक एक दुरुस्ती केली पाहिजे असें म्हणणारावर घरास आग लावण्याचा यत्न करण्याचा आरोप करण्यासारखेंच आहे. कोणतेंहि देशी वर्तमानपत्र घ्या, त्याचा मालक, चालक किंवा प्रकाशक इंग्रजी राज्य आपणांस नको, लोकांनीं तें झुगारून द्यावें अथवा त्यांची सत्ता चालूं देऊं नये असें म्हणेल किंवा असें त्यांचे मत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. हिंदुस्थानची सध्यां तरी अशी स्थिति आहे कीं, इंग्रजसरकाराखेरीज आम्हांस

गत्यंतरच नाहीं. पण ही गोष्ट डॉ. केनी यांनीं सांगितल्याप्रमाणें दर वेळेला सांगत बसण्याची कांहीं जरूरी नाहीं. आमचे मुख्य काम येवढें आहे कीं, इंग्रजी शिक्षणानें आम्हांस जें ज्ञान प्राप्त झालें आहे, त्याचा उपयोग करून व इंग्रजी कायद्यानें आम्हांस जी सवलत दिली आहे तिचें अतिक्रमण न करितां आमच्या देशबांधवांस जीं दुःखें भोगावी लागत आहेत त्याबद्दल त्यांच्या मनांत जागृति उत्पन्न करून कायदेशीर दाद मागण्याचे मार्ग त्यांस दाखवून द्यावे; केसरीकारांनीं हें काम आपल्या हातून होईल तितक्या आस्थेनें व कळकळीनें बजावलें आहे. इंग्रजी राज्य नष्ट व्हावें अथवा इंग्रजी राज्यसत्तेचा अपमान व्हावा असा त्यांचा हेतु नाहीं व इच्छाहि नाहीं. परंतु त्याजबरोबर इंग्रजी राज्यछत्राखालीं आमच्या लोकांना अधिक हक्क मिळावेत, त्यांजवर जुलूम होऊं नयेत, आणि त्यांचा उत्कर्ष व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे; ही इच्छा कांहीं अरेरावी अधिकाऱ्यांस पसंत न पडली तरी इंग्रजी राज्यपद्धतीचीं तत्त्वें ज्यांनीं घालून दिलीं त्यांच्या मतें हिंदुस्थानांतील प्रजेस इतकी मोकळीक देणें अवश्य आहे, इतकेंच नव्हें, तर अशी मोकळीक न दिल्यानें हल्लीपेक्षां असंतोष वाढून तो केव्हां तरी न कळत भडकण्याचा संभव आहे असें त्यांचें म्हणणें आहे. या सर्व म्हणण्याचा विचार करूनच लिटनशाहींत झालेला कायदा लॉर्ड रिपन यांच्या कारकीर्दींत रद्द करण्यांत आला, व आमची अशी खात्री आहे कीं, हल्लीं इंग्रजी वर्तमानपत्रकारांनीं किती जरी उचल खाल्ली तरी सरकार पूर्ण विचारांतीं ठरलेली गोष्ट पुनः बदलून आपल्या राज्यपद्धतीस विनाकारण काळिमा आणणार नाहीं. नेटिव लोकांचे मनांत कोणत्या प्रकारचे विचार घोळत असतात हें समजण्यास देशी वर्तमानपत्रासारखें दुसरें साधन सांपडणें कठीण आहे. एखाद्या वर्तमानपत्रांत एखाददुसरा लेख कदाचित् पिनलकोडाच्या मर्यादेचें अतिक्रमण करणारा सांपडेल पण असल्या लेखानें इंग्रजी राज्याला यत्किंचतहि अपाय होणार नाहीं इतकें तें मजबूत आहे. करितां त्यांची उपेक्षा करून पूर्ण विचारांतीं जीं कायमचीं तत्त्वें ठरलेलीं आहेत तीं तशींच ठेवावीं. ह्यांतच सरकारचें व प्रजेचें हित आहे. आतां असें केल्यानें अधिकारी वर्गास थोडेसें वर्तन बदलावें लागेल खरें. पण याचा विचार पाश्चात्य शिक्षण हिंदुलोकांस द्यावयाचा ठराव झाला त्यावेळीं करावयास पाहिजे होता. हें शिक्षण आणि अधिकाऱ्यांचें अरेरावी वर्तन हीं परस्परविरुद्ध आहेत. हे सदर ठराव करणाऱ्या मुत्सद्यांस माहीत होतें, व असें असूनहि जर त्यांनीं पाश्चात्य शिक्षण हिंदुलोकांस द्यावें म्हणून ठरविलें, तर पुढील मार्गहि त्याजबरोबर आखल्यासारखा होऊन गेला आहे. आतां सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्यायी वर्तनावर कडक टीका करणारास राजद्रोही म्हणण्याची आमच्या मतें वेळ राहिली नाहीं, मग कायदाच बदलावयाचा असल्यास सरकार समर्थ आहे.

---

## * १३. पुनश्च हरिः ॐ!

[ ४ जुलै १८९९ ]

जवळ जवळ दोन वर्षांच्या कर्मलोपानंतर पुनः स्वाध्यायास सुरुवात करण्यापूर्वी ज्या जगच्चालकाच्या कृपेनें आजचा दिवस प्राप्त झाला त्याचें अंतःकरणपूर्वक स्मरण करणें हें आमचें पहिलें कर्तव्य आहे. मनुष्य कितीहि कर्मवादी असला व मृत्पिंडाप्रमाणें आपल्या आयुष्याचा क्रम वाटेल तसा बनवितां येईल अशी जरी त्याची उमेद असली तरी जगांतील पुष्कळ गोष्टी आपल्या हातच्या नसून कोणत्याहि कामांत यश अगर अपयश येणें हें बऱ्याच प्रसंगीं आपल्या हातीं नसलेल्या गोष्टीवर अवलंबून असतें हें कोणासहि कबूल करावें लागेल. अशा स्थितींत ह्या बाह्य साधनांची सर्वांशीं किंवा त्याहून कांहीं कमी प्रमाणानें अनुकूलता असणें हें ईश्वरी कृपेचेंच फळ मानलें पाहिजे. प्रस्तुतच्या लेखकावर अशा तऱ्हेचा प्रसंग पहिल्यानेंच आला होता असें नाहीं. परंतु त्यांतून पार पडून पुनः आज आपलें पूर्वकर्तव्य करण्यास जें सामर्थ्य आलें आहे तें त्याच्या दृष्टीनें तरी कांहीं अमानवी कारणामुळें आलेलें आहे; व त्याबद्दल ज्याच्या कृपेनें ह्या गोष्टी घडून येतात त्याचें पुनः एकवार स्मरण केल्याखेरीज, अथवा व्यावहारिक भाषेनें बोलणें असल्यास आभार मानल्याखेरीज त्याच्यानें राहवत नाहीं.

मनुष्य जन्मतःच तीन ऋणें पाठीवर घेऊन जन्मलेला आहे, अशी आमच्या लोकांची पूर्वापार समजूत आहे, '**जायमानो वै ब्राह्मणस्त्रिभिर्ऋणवा जायते**' अशी श्रुति आहे, व आधुनिक विचारपद्धतीनें विचार केला असतां ती अगदीं यथायोग्य आहे असें दिसून येईल. कोणाहि मनुष्याचा जन्म झाला म्हणजे लागलीच त्याच्या पाठीमागें वर सांगितलेल्या तीन जबाबदाऱ्या अथवा ऋणें लागतात; व तीं फेडण्याकरतां आमरणांत आपल्या बुद्धि वगैरेंचा उपयोग केला पाहिजे असें वरील श्रुतींत सांगितलेलें आहे. हीं जन्मतः प्राप्त झालेलीं ऋणें आमच्या पाठीमागें आहेतच. पण तीं फेडण्याचा प्रयत्न करीत असतां मध्यंतरी पूर्वीच्या ऋषींनीं वरील श्रुतींत अनुक्त असें जे एक नवीन

---

* लो. टिळक दोन वर्षांच्या कारावासातून सुटल्यानंतर लिहिलेला हा पहिला लेख.

लौकिक ऋण

उपस्थित झालेलें आहे, त्याचाहि उल्लेख आजच्या प्रसंगीं करणें अवश्य आहे. हें ऋण म्हटलें म्हणजे, केसरीवरील गेल्या संकटाचे वेळीं महाराष्ट्रांतील अगर मुंबई इलाख्यांतीलच नव्हे तर, इतर इलाख्यांतीलहि ठिकठिकाणच्या लोकांनीं आपपरभाव अगर दुसरे भेद मनांत न आणतां अंतःकरणपूर्वक कळकळीनें द्रव्यद्वारां किंवा अन्य तऱ्हेनें जी केसरीकारास मदत केली, त्यापासून उद्भवलेलें होय. ज्या वेळीं प्रस्तुतच्या लेखकाची तुरुंगातून सुटका झाली, तेव्हां ठिकठिकाणीं लहानमोठ्या लोकांनीं जो उत्सव केला तोहि अशाच प्रकारचा होय. हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं अशा रीतीनें केलेल्या मदतीबद्दल आणि अभिनंदनाबद्दल त्यांचे ऋणांतून मुक्त होण्याचा शास्त्रीय मार्ग आम्हांस जर कोणी दाखवील तर त्याचें आम्हीं आभारी होऊं. वर सांगितलेल्या ऋणत्रयींतून सुटण्याचें मार्ग सदर श्रुतींतच सांगितलेले आहेत. पण सध्यां लौकिक ऋणाचें जें जबरदस्त ओझें आमच्यावर पडलेलें आहे त्यांतून सुटण्याची आमरणांत यथाशक्ति लोकसेवा करूनहि आशा आहे की नाहीं, याचा आम्हांस वानवाच आहे. पुष्कळ ठिकाणांहून याबद्दल आमचेकडे जीं अभिनंदनपर पत्रें अगर लेख आलेले आहेत त्या सर्वांस व्यक्तिशः जबाब देणें कठीण आहे. तथापि आजच्या प्रसंगीं येवढें सांगणें जरूर आहे कीं १८९७–९८ सालीं लोकांमध्यें जी चळवळ झाली तीस जरी केसरीकार एका प्रकारें निमित्तभूत झालेले होते तरी त्याचें श्रेय सर्वांशीं सरकारास दिलें पाहिजे. प्रस्तुतच्या लेखकाच्या हातून त्यांत स्वकर्तव्यापेक्षा जास्त कांहीं घडून आलें अशी त्याची कधींहि समजूत नव्हती, व अद्यापहि नाहीं. कर्तव्याचा मार्ग कित्येक प्रसंगीं कठीण असतो खरा; पण तो मार्ग कोणता याबद्दल कधींच शंका नसते; व त्या मार्गाचें आक्रमण करीत असतां प्रसंग विशेषीं चांगल्या ठिकाणींहि ठेंच लागण्याचा संभव असतो. गेल्याच्या पूर्व सालीं घडून आलेला प्रकारहि अशाच प्रकारचा होता, असा आमचा ग्रह आहे. तथापि तेवढ्यानें लोकांनीं आम्हांवर उपकाराचें ओझें करून ठेवलें आहे त्यांत कांहीं कमीपणा येत नाहीं; इतकेंच नव्हें तर उलट त्याचें महत्त्व अधिक प्रत्ययास येतें. ज्यांस केसरीचें किंवा केसरीकारांचे नांवहि पूर्वी माहीत नव्हते, अशा गृहस्थांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनें किती खटपट केली अथवा अगदीं अनोळखी गृहस्थहि केसरीकारांकरितां पन्नास हजारांची रक्कम कोर्टांत ठेवण्यास किती उत्सुकतेनें तयार झाले, या गोष्टीचें स्मरण झाल्याबरोबर त्यांच्या उपकृतीचा डोंगर डोळ्या-पुढें उभा राहतो. ह्या सर्व गृहस्थांचे उपकार आमच्या हातून फिटणें तर कठीणच आहे. परंतु आम्हीं जो आयुष्यक्रम आजपर्यंत अंगिकारिलेला आहे त्यांतच

आम्हांस पूर्णपणें बद्ध करुन टाकण्यास ते मुख्यत्वेंकरुन कारणीभूत झालेले आहेत एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें होईल. दुसरी गोष्ट

## केसरी–पत्र

चालविण्यासंबंधीची होय. केसरीवर किंबहुना पुणें शहरावर जें एक काहूर उसळलें होतें त्यांत केसरीकारच नव्हें तर केसरीहि लयास जातो की काय अशी धास्ती पुष्कळांस त्यावेळीं पडलेली असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. '**राजद्रोह**' हा शब्द जरी लहान असला तरी त्याचा महिमा मोठा आहे; व गणेशचतुर्थीच्या चंद्रनिरीक्षणानें जरी ह्या गुन्ह्याचा आरोप कोणावर आलेला असला तरी देखील त्याचे परिणाम पुष्कळ अनिष्टकारक होण्याचा संभव असतो. हे सर्व परिणाम जर केसरीस भोगावे लागले असते तर "**हरेरद्य द्वारे शिव शिव शिवानां कलकलः**" अशी स्थिति यापूर्वी केव्हांच येऊन ठेपली असती. ही स्थिति न येण्यास जे गृहस्थ कारणीभूत झाले त्यांत मुख्यत्वेंकरुन आमचे मित्र रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर व आमचे मुंबईचे बातमीदार "**अनंत**" हे होत. या गृहस्थांनीं आमच्या गैर हजिरींत केसरीची व तद्वारां महाराष्ट्राची जी सेवा केली, किंबहुना त्यास जीवितसंशयापासून बचावलें, त्याजबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. ही सेवा कोणच्या प्रकारें घडली हें वाचकांस पूर्णपणें माहीत आहेच. सांधा जितका बेमालूम जडेल, किंबहुना सांधा केला आहे कीं नाहीं याचीच परीक्षकांस भ्रांती पडेल तेव्हांच त्यांत सांधा लावणाराचें कसब दृष्टीस येतें. तशा प्रकारचा बेमालूम सांधा वरील गृहस्थांनीं जडविला होता हें केसरीच्या वाचकांस कळून आलेलेंच असेल. रा. रा. खाडीलकर यांचें नांव जबाबदार प्रकाशकांत जरी दाखल केलेलें नव्हतें तरी केसरींतील बहुतेक एडिटोरियल लेख त्यांच्याच हातचे होते हें येथें सांगणें जरुर आहे. धैर्यानें पुढें होऊन अशा रीतीनें मदत करणारी 'अनंत' मित्र मंडळी तयार असतां, व लोकांचें वर सांगितल्या प्रकारें पूर्णपणें सहाय्य असतां केसरीस कशाचीहि भिती न वाटतां तो सदैव आपल्या कर्तव्यास जागृत राहिल्यास त्यांत कांही नवल नाहीं; किंबहुना अशा रीतीनें वर्तन ठेवणें हेंच त्याचें कर्तव्य आहे असें म्हटलें तरी चालेल. आमच्या व्यवसायबंधूंपैकीं बहुतेक सर्वांनीं व विशेषतः पर–इलाख्यांत असूनहि अमृतबझार आणि हिंदू यांनीं अथवा मुंबईतील– चँपियन वगैरे पत्रकारांनी जो आमच्या-बद्दल प्रेमभाव व कळकळ दाखविली त्याबद्दलहि फिरुन येथें मनःपूर्वक त्यांचे आभार मानले पाहिजेत. कलकत्त्यांतील व मद्रासेंतील चळवळीचेंचसें काय पण एकंदर त्यावेळीं झालेल्या चळवळीपैकीं बऱ्याच भागाचें श्रेय पत्रिकाकार व हिंदुकर्ते यांस दिलें पाहिजे. मुदतीपूर्वी अटकेंतून मुक्तता करण्यास प्रथमतः

कोण प्रवर्तक झाले याचाहि पहिल्यानें जरा संशय होता. पण आतां ही गोष्ट मुख्यत्वेकरून प्रो. मॅक्समुल्लरसारख्यांच्या निरपेक्ष प्रयत्नानें घडून आली हेंहि येथें नमूद करणें अवश्य आहे. थोर पुरुषांचा स्नेह निमित्तसव्यपेक्ष असत नाहीं, असें जें भवभूतीनें म्हटलें आहे तें वरील उदाहरणांवरून चांगलें व्यक्त होतें.

असो. वर सांगितल्याप्रमाणें स्वाध्यायास सुरुवात करण्यापूर्वीं दुसरेंहि एक काम करणें अवश्य आहे. गेल्या दोन सालांत ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्यांचा वेळोवेळीं केसरीत उल्लेख केलेलाच आहे तथापि त्यांचा आम्हीं अंगिकारिलेल्या क्रमावर कितपत परिणाम होणार आहे हें पाहण्याकरतां थोडेसें

## सिंहावलोकन

करून मग पुढील मार्ग क्रमण्यास लागावें हें चांगलें. तशांत अशा रीतीनें सिंहावलोकन करण्यास सध्यांची स्थितीहि अनुकूल आहे. पुण्याचें वातावरण हल्लीं वरेंच स्वच्छ झालेलें आहे. ज्युबिलीच्या रात्रीं जें भयंकर कृत्य झालें त्यावद्दल सदर कृत्य करणारांस स्वकर्मानुरूप गति मिळून सरकारचा आमच्या शहरांतील सर्व रहिवाशांवर आलेला वहीम आमच्या मतें सर्वांशी दूर झाला असला पाहिजे. प्युनिटीव्ह पोलीसची आमच्या डोक्यावर आलेली गदाहि सुदैवानें परत फिरली आहे. आणि प्लेगानें जरी आम्हांस अद्याप सोडलें नाहीं, तरी एकंदरींत १८९७ सालापेक्षां हल्लींचे वातावरण पुष्कळ निवळलेलें आहे, असें म्हटलें पाहिजे. अशा वड्या वादांतून आपली सुटका झाली त्यावद्दल परमेश्वराचे आभार मानून आपल्या गलवताची डोलकाठी, शीड, नाळ, वगैरे सामान धड आहे कीं, नाहीं याची चांगल्या नावाड्यानें चौकशी करून मग आपला पुढील क्रम अंगिकारिला पाहिजे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे वर्तमानपत्रकाराच्या स्वातंत्र्याची गेल्या दोन वर्षांत बरींच हानी झालेली आहे असें दिसून येईल. शाळाखात्यांतील मास्तरांवर जाईल्ससाहेबांनीं पाखडलेली आग, सरकारची ग्रँटस् इन एड घेऊन शाळा चालविणाऱ्यांस राजकीय चळवळींत पडण्याची मनाई व पिनलकोड व क्रीमिनल प्रोसीजर यांत केलेली सुधारणा व ती अंमलांत आणण्याकरितां पोलीस अधिकारी व मॅजिस्ट्रेट यांनीं स्वीकारलेली काकदृष्टी वगैरे गोष्टी मनांत आणल्या म्हणजे आमच्या गलबतावरील अथवा एकंदर वर्तमानपत्रकर्त्यांच्या गलवतावरील डोलकाठी वगैरे सामानासच कांही इजा झाली, इतकेंच नव्हे तर आमचे कांहीं खलाशीहि आम्हांस पुनः न मिळेसे झाले आहेत असें दृष्टीस येईल. याखेरीज पिनल कोडांतील दुरुस्तीनें आमच्या मानेभोंवतालची दोरी जास्त आवळली गेली आहे ती आहेच. अशा स्थितींत वर्तमानपत्रांच्या कर्णधारकत्वाचें काम पूर्वीपेक्षां जास्त जबाबदारीचें

व जोखमीचें झालें आहे हें सांगावयास नकोच. यांतून आमचें गलवत सुरक्षितपणें कसें नेतां येईल याबद्दल आम्हांसहि बरीच चिंता आहे. तथापि होतां होईल तोंपर्यंत कायदेशीर रीतीनें आपलें काम बजावण्याचा जो आमचा पूर्वीचा संकल्प आहे तो कायम असल्यामुळें याहि प्रसंगांतून पार पडण्याचें धैर्य परमेश्वराच्या कृपेनें आमच्या अंगीं येईल अशी आम्हांस उमेद आहे. केसरीकारांनीं कायद्याचें अतिक्रमण जाणून बुजून कधींच केलेलें नाहीं व करण्याची त्यांची इच्छाहि नाहीं. केसरीकार कांहीं जहागिरदार नव्हत किंवा संस्थानिक नव्हत. करितां इंग्रजी राज्य उलथून पाडण्यास जीं साधनें अवश्य पाहिजेत, उदाहरणार्थ, हत्यारें, माणसें, वगैरे तीं त्यांस कधींहि उपलब्ध होणें शक्य नाहीं. आमच्या सरकारास ही स्थिति समजत नव्हती किंवा समजली नसेल असें नाहीं. पण बुद्धींत कोणत्याहि प्रकारच्या अभिनिवेशाचा एकदां संचार झालेला असला, म्हणजे मग साध्या गोष्टींचाहि अन्यथा विपर्यास होऊन त्या अन्यरूपानेंच दिसूं लागतात. सन १८९७ च्या पूर्वींचा राजद्रोहाचा कायदा काय होता हें इतरांस जितकें अवगत होतें तितकेंच केसरीकारांसहि होतें; व आमची अद्याप अशी समजूत आहे कीं आम्हीं त्यावेळीं जे लेख लिहिलेले आहेत ते सदर कायद्यानें घातलेल्या मर्यादेच्या आंतलेच आहेत. "**जेणेंकरून राज्याला धोका येईल, अथवा राज्याची उलथापालथ होऊं शकेल, अगर सरकारची कायदेशीर सत्ता न जुमानण्यास लोकांस उत्तेजन मिळेल त्यास राजद्रोह म्हणावयाचें.**" असा पूर्वींच्या कायद्याप्रमाणें राजद्रोहाचा अर्थ होता असें आम्हींच नव्हे तर सर्व कायदेपंडित त्यावेळीं समजत होते. किंबहुना ज्या इंग्रजी विद्वान कायदेपंडितानें पीनल कोडांतील १२४ अ हें कलम पहिल्यानें घातलें त्यानेंहि सदर कायदा पास होते वेळीं कायदे कौन्सिलांत अशाच रीतीनें सदर कलमाचा अर्थ आहे, असें स्पष्टपणें बोलून दाखविलें होतें. एवढी जबरदस्त हमी मिळाल्यावर मग केसरीकाराच्या मनांत या कायद्याच्या अर्थाबद्दल कधींहि संशय येण्याचें कांहीं कारण नव्हतें; व त्यानें आपले लेख सदर कायद्याच्या सदर दृष्टीनें राजद्रोही होऊं नयेत अशा बेतानेंच लिहिलेले होते. पण राजद्रोहाचें हें माप सरकारास पसंत नसल्यामुळें तें संकुचित करण्याचा त्यांचा बरेच दिवस संकल्प झालेला होता म्हणून म्हणा, किंवा अन्य कारणानें म्हणा, त्यांस आमचे लेख भयंकर वाटूं लागले. इतकें झालें तरी आमची अशी समजूत होती कीं, कायद्यांत असलेलें राजद्रोहाचें माप जर बदलावयाचें असेल तर तें नवा कायदा करून बदलतील, आणि त्यानंतर आमच्या विचारांस कोणतें स्वरूप द्यावयाचें याचा आपणांस विचार करितां येईल. परंतु ही आमची आशा व्यर्थ झाली. इंग्रजी राज्यपद्धतीप्रमाणें कायदा बदलण्याच्या दोन तऱ्हा आहेत, एक

कायदे कौन्सिलांत नवें बिल आणून पूर्वीचा कायदा रद्द करून नवा कायदा करावयाचा; आणि दुसरी प्रमुख न्यायाधीशाकडून प्रचलित असलेल्या कायद्याचाच निराळा अर्थ करून घ्यावयाचा. या दोन तऱ्हांपैकीं पहिल्या रीतीनें कायद्यांत फेरफार झाला असता तो फेरफार जेव्हां होईल त्या दिवसापासून पुढें अंमलात येत असतो. परंतु दुसऱ्या रीतीनें फेरफार झाला असतां फेरफार करणाऱ्या जज्जापुढें जो खटला असतो त्यासच तो पहिल्यानें लागू होऊन निदान–

## एक तरी कायद्याचा बळी

अशा वेळीं न्यायदेवतेस द्यावा लागत असतो, हें तत्त्व कायद्याचा अभ्यास करणाऱ्या सर्व लोकांस माहीत आहेच. प्रकृत स्थलीं असाच प्रकार घडून आला हें विशेष तऱ्हेनें सांगण्याची फारशी जरूर नाहीं. सरकारानें कायदेकौन्सिलांत नवें बिल आणून राजद्रोहाचा कायदा जर पहिल्यानेंच बदलला असता तर केसरीकाराचा बळी घेण्याची कांहीं अवश्यकता उरली नसती. कारण ज्यावेळीं जसा कायदा असेल त्याप्रमाणें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे हें केसरीकारास पूर्णपणें अवगत आहे. पण सरकारची मनोवृत्तीच तऱ्हेवाईक झालेली असल्यामुळें त्या वेळीं प्रचलित असलेल्या कायद्याचा कोर्टामार्फत निराळा अर्थ करून घेऊन नंतर मग तो अर्थ दुसरा कोणी न्यायाधीश कबूल करणार नाहीं, अशा समजुतीनें स्ट्रॅची साहेबांनीं केलेल्या अर्थास पुनः नवा कायदा करून कायदेशीर स्वरूप देऊन घेतलें. तात्पर्य, कायदा बदलण्याच्या या दोन पद्धती वर सांगितल्या आहेत त्या दोन्हींचाहि एका काळींच अंमल झाल्यानें केसरीकारांस व त्याबरोबरच दुसऱ्या कांहीं वर्तमानपत्रकारांस वर सांगितल्याप्रमाणें कायद्याचे बळी व्हावें लागलें. सरकार कायदे फिरविण्यास पूर्ण समर्थ आहे, व प्रजेस ज्या ज्या वेळीं जे जे कायदे असतील ते ते मानले पाहिजेत, हें तत्त्व आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. आम्हांस बेकायदेशीर कोणतीच गोष्ट करावयाची नाहीं. आजपर्यंत किंवा १८९७ सालापूर्वीं आम्हीं जे लेख लिहिले ते त्यावेळच्या कायद्यानें जी मोकळीक दिली होती तिचा पूर्ण फायदा घेऊन लिहिलेले होते. ती मोकळीक सरकारास जर फाजील वाटत होती तर त्यांनीं तो कायदा रीतीप्रमाणें बदलून मग आम्हीं नव्या कायद्याप्रमाणें चालतों कीं नाहीं हें बघावयाचें होतें. पण तसें न करितां आम्ही मोकळीक दिली व तिचा अर्थ जरी अमुक होतो असें स्पष्टपणें कायदेकौन्सिलांत सांगितलें तरी आमच्या मनांतील अर्थ निराळा होता, अशा सबबीवर पूर्वींच्या कायद्याप्रमाणें चालणाऱ्या माणसास एकदम खड्यांत घालण्याचा अपूर्व मार्ग सरकारनें स्वीकारला. आमचे हातांत शस्त्रें नाहींत व तीं घेण्याचेंहि आमचे मनांत नाहीं; परंतु सरकारनें जी मोकळीक दिली

असेल तिचाच पूर्ण उपयोग करून आमचें सार्वजनिक कर्तव्य बजावण्याचा आमचा इरादा आहे. सरकार आम्हांस किती मोकळीक देतें तें सरकारनें एकदां इमानें-इतबारें आम्हांस सांगावें; म्हणजे आम्ही त्याप्रमाणें वागूं. आम्हास ज्या कांहीं गोष्टी कर्तव्य आहेत त्या राजद्रोहाच्या नाहींत. त्या शब्दानें कशा व्यक्त करावयाच्या एवढ्याचबद्दल काय तो वाद आहे. करितां ही मर्यादा जर सरकार एकदां कायमची ठरवील तर त्यांत आमचें हितच आहे. मर्यादा कितीहि संकुचित असली तरी त्याची आम्हीं काळजी करीत नाहीं. उलट आमची अशी समजूत आहे कीं, संकुचित मर्यादेवरच आपले सर्व विचार व्यक्त करणें यांतच जास्त कसब आहे. मैदानावर कसरत करण्यापेक्षां वाटल्यांवर टेबल ठेवून त्यावर कसरत करणाराची करामत जास्त हें सर्वत्रांस माहीत आहेच व तोच न्याय प्रकृतस्थलींहि लागू आहे. सरकारनें मात्र आपली मर्यादा काय ती निश्चित ठरवावी, व तींत पुन्हां फेरबदल करणें असल्यास कायद्यानें करावा, वळी घेऊन करूं नये, एवढीच काय ती आमची सरकारास विनंति आहे. कायदेशीर मोकळिकीची एकदां इयत्ता ठरली म्हणजे त्या इयत्तेंत वागण्यास आम्हीं तयार आहोंत. त्या इयत्तेचा जितका फायदा घेतां येईल तितका घेण्यास मात्र आम्ही कधींहि कचरणार नाहीं. किंबहुना तसा फायदा घेणें हें आमचें एक प्रकारें कर्तव्यच आहे असें आम्ही समजतों.

हल्लींच्या कायद्यासंबंधानें जे दोन विचार येथें सुचले ते येथें दाखल केले आहेत. परंतु तेवढ्यानेंच सध्यांच्या वस्तुस्थितीचें व साधनसामुग्रीचें परीक्षण पूर्ण झालें नाहीं. मागें सांगितलेल्या दृष्टांताप्रमाणें नौकेच्या कर्णधारास वायूची गति ज्याप्रमाणें लक्षांत धरावी लागते त्याचप्रमाणें नौकेची स्थितीहि लक्षांत धरली पाहिजे. सन १८९७ सालीं ज्युबिलीच्या दिवशीं झालेल्या खुनामुळें सरकारचें डोकें ठिकाणावर नव्हतें हें तर खरेंच; पण बुजऱ्या बैलास किंवा माजलेल्या हत्तीस छू म्हणणारा कोणी तरी एखादा गृहस्थ असल्याखेरीज त्याची मुसंडी एखाद्या विशिष्ट व्यक्तीकडे किंवा पदार्थाकडे वळत नाहीं, असा सामान्य सिद्धांत आहे. याप्रमाणें पाहिलें म्हणजे सरकारची वक्रदृष्टि १८९७ सालीं कांहीं वर्तमानपत्रकर्त्यांकडेसच लागण्यास कोणी तरी मध्यंतरी

**आगींत तेल ओतणारे गृहस्थ** ( २५।५।१९०८ )

कारणीभूत झाले असावेत असें वाटणें स्वाभाविक आहे, व त्याप्रमाणें स्थितीहि आहे असें आम्हांस मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. पुण्यांत ज्यावेळीं मॉडरेशनचें नवीन पोलिटिकल स्कूल निघालें त्यावेळींच याचें पर्यवसान अशा प्रकारें होईल अशी आम्हांस वाटलेली धास्ती आम्ही प्रदर्शित केलेली होती. व त्या वेळच्या

आमच्या लेखाबद्दल कित्येकांनी आम्हांस नांवेंहि ठेविलीं असतील, परंतु होणारी गोष्ट कांहीं चुकत नाहीं, असें जे म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे. एका हिंदूनें किंवा नेटिव्हानें त्याचा आणि दुसऱ्याचा कांहीं बाबतींत मतभेद असला म्हणून आपल्या प्रतिपक्षाच्या लेखाचा विपर्यास करून त्यास राजद्रोही ठरविण्याचा प्रयत्न करणें व तो खड्डयांत पडला म्हणजे आनंद मानणें यासारखें अश्लाघ्यपणाचें दुसरें कृत्य नाहीं असें आम्हीं समजतों. असली मंडळी फारच थोडी किंबहुना हाताच्या बोटांवर मोजतां येण्याइतकी थोडी आहेत हें एक सुदैवच आहे. पण तशी मंडळी आहेत, व ती या धंद्यास प्रवृत्त झालेली आहेत, याबद्दल आम्हांस बिलकुल शंका राहिलेली नाहीं, व म्हणूनच आजच्या प्रसंगीं मुद्दाम त्यांचा उल्लेख केलेला आहे. सरकारापेक्षां याच मंडळीची आम्हास जास्त काळजी घेतली पाहिजे. कारण आम्ही ज्या भाषेंत लिहितों त्या भाषेचें मर्म अथवा लिहिणाराचें हृद्गत सरकारास कधींहि पूर्णपणें अवगत होण्याचें साधन नसल्यामुळें या चहाडबुचके मंडळीस अथवा वलवास आपले घरबुडवेपणाचे व्यापार सुरू ठेवण्यास चांगली सवलत मिळालेली आहे. या मंडळींनीं लोकांचे आजपर्यंत बरेंच नुकसान केलेलें आहे व पुढेंहि तोंच क्रम चालू ठेवण्याचा त्यांचा इरादा दिसतो. करितां वेळींच सावध राहून त्यांचा होईल तितका प्रतिकार करावा, अशी आमची सर्वत्रांस सूचना आहे. उघड शत्रु पुरवेल, पण अशा रीतीचे लोक त्याच्यापेक्षांहि भयंकर आहेत हें आम्हीं सांगावयास नकोच. पुण्यांत खून झाल्याबरोबर त्याचा कोणत्या तरी विशिष्ट वर्तमानपत्रांतील लेखांशीं संबंध जोडण्याची कल्पना केवळ सरकारच्याच डोक्यांतून निघालेली असेल असें आम्ही समजत नाहीं. कसेंहि असो; एवढी गोष्ट मोठी समाधानकारक आहे कीं, खटला चालते वेळीं किंवा त्यानंतर कित्येक महिनेपर्यंत केसरीकार अटकेंत असतांना होईल तितकी बारीक चौकशी करूनहि सदर खुनांचा केसरींतील लेखांशीं प्रत्यक्ष किंवा परोक्ष संबंध जोडतां आला नाहीं. या अनुभवावरून तरी आमचें सरकार शहाणें होऊन वर सांगितलेल्या आगींत तेल ओतणाऱ्या गृहस्थांची खरी योग्यता त्यास कळून येईल अशी आम्हांस आशा आहे. उगीच राजद्रोह येथें आहे, तेथें आहे, अमुक शाळेंत आहे, पुण्यांतील पोरांत आहे अथवा शिवाजी उत्सवांत आहे अशा रीतीनें वेड्यासारखें धुंडाळीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. इंग्रजी राज्य उलथण्याचें आम्हीं मनांत आणलें तरी तें उलथावयाचें नाहीं, अशी आमचीचशी काय पण ज्यास हल्लींच्या वस्तुस्थितीचें थोडेंबहुत शिक्षण मिळालेलें आहे त्याची पूर्ण खात्री झालेली आहे; व या शशविषाणप्राप्त्यर्थ कोणीहि उद्योग करण्यास प्रवृत्त व्हावयाचें नाहीं. सरकारचा जर यासंबंधानें निराळा समज झालेला असला तर तो चुकीचा

अनुक्रम ७५७७५ दि: ...
क्रमांक ...२१९८... नोंद दि:२१।३।६२



आहे. प्लेगच्या अनिवार जुलमामुळें कांहीं लोक घोर कृत्यें करण्यास प्रवृत्त झाले, हा दोष हल्लींच्या शिक्षणाचा किंवा विशिष्ट शहरांतील चळवळींचा नाहीं, हें पुण्याखेरीज इतर ठिकाणीं जे प्लेगमुळें दंगेधोपे व खून झाले त्यांवरुन स्पष्ट सिद्ध झालेलें आहे. एका साहेबाचा खून झाल्यानें इंग्रजी राज्याचें केसाइतकेंहि वांकडें होत नाहीं, हें न समजण्याइतके मूर्ख लोक पुण्यांत आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. प्लेगसारख्या विशिष्ट कालीं कांहीं पुंडाई होणें हें समाजाची एकंदर स्थिति लक्षांत आणतां कांहीं विलक्षण नाहीं, ही गोष्ट प्लेगच्या पूर्वींही सरकारच्या लक्षांत होती; परंतु प्रसंगाच्या वेळीं ती जितकी त्यांच्या ध्यानीं राहावी तितकी राहिली नाहीं, हें आमचें दुर्दैव होय. असो, झालेल्या गोष्टी पुन्हां परत घेतां येत नाहींत, करितां त्याबद्दल विशेष चर्चा करण्याऐवजीं पुढच्या क्रमाकडेच आपणांस लक्ष दिलें पाहिजे.

१७३०५

## सध्यां पुण्याची स्थिति

काय आहे याचें थोडक्यांत वर निदर्शन केलेलेंच आहे. सरकारनें धारण केलेल्या उग्र स्वरूपामुळें आणि प्लेगच्या धुमधुमीनें आमच्या शहरांतील बहुतेक चळवळी स्तिमित झालेल्या आहेत. या थंडावलेल्या संस्थांस पुन्हां उबारा आणून आपलें काम अव्याहत चालू ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म आहे; परंतु हें काम हल्लीं जी दुही आहे ती मोडल्याखेरीज कधीहि तडीस जावयाचें नाहीं. सुधारक गैर-सुधारक या सामाजिक भेदापासून मॉडरेशन ऊर्फ नेमस्त-पणा आणि एक्स्ट्रॉम अथवा जहाल जाणारे, हा जो भेद करण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला होता त्याची गेल्या दोन वर्षांत काय वाट झाली हें दोन्हीं पक्षांनीं लक्षांत आणावें. आम्हीं आपापसांत एकमेकांस मोर आणि डोमकावळ्याची उपमा देऊन एकमेकांचा कितीहि उपहास केला तरी गरुडपक्षी जरूर लागेल तेव्हां दोघांसहि एकसारखीच थप्पड देण्यास तयार असतो हें गेल्या दोन वर्षांच्या अनुभवावरून जर अद्याप आपल्या लक्षांत आलें नाहीं, तर आमच्या बुद्धीच्या तीव्रतेची कमाल झाली असें म्हटलें पाहिजे. खटला होणें हेंच काय तें एक जहालपणाचें लक्षण असें जर कोणी म्हणेल तर त्यास उत्तर एवढेंच आहे कीं, त्यावेळीं आपणांस नेमस्त म्हणविणाऱ्या कित्येक व्यक्तींवर व पत्रांवर केसरीकर्त्यांप्रमाणेंच खटले झाले असते, पण ते न होण्याचें कारण मात्र वेगळें होतें. आम्हीं आपल्याला मॉडरेशनिस्ट्स म्हटल्यानें सरकारच्या दृष्टीनें मॉडरेशनिस्ट्स होत नसतों, हें जाईल्स साहेबांनीं काढलेल्या सरक्युलरावरून उघड होत आहे. इंग्रजी राज्यांत सरकाराकडून प्रजेस जे हक्क मिळाले पाहिजेत त्याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. हे हक्क कोणते हें लोकांस समजावून देण्याची व त्याप्रमाणें त्यांस सरकारास मागणी

करण्यास सांगण्याचीहि अवश्यकता आहे, याबद्दलहि मतभेद नाहीं. इतकें झाल्या-वर नेमस्तपणा आणि जहालपणा तो कशांत राहणार ? बोलण्याची आणि लिहि-ण्याची जी इयत्ता कायद्यानें ठरली जाईल ती दोघांसहि मान्य केली पाहिजे. आतां भेद राहिला तो एवढाच कीं, लोकांस कोणचे हक्क मिळाले पाहिजेत याबद्दल त्यांची व सरकारची समजूत घालण्यांत जो एकनिष्ठपणा दाखविला पाहिजे तो ठेवावयाचा किंवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याची गैरमर्जी झाली किंवा होईल म्हणून भीतीनें आम्हांस जी गोष्ट खरी वाटत आहे ती कायदेशीर रीतीनें बोलल्याबद्दलहि '**क्षमस्व परमेश्वर**' म्हणून प्रार्थना करून मोकळें व्हावयाचें. सरकारानें आम्हांस बोलण्याची व लिहिण्याची जी मोकळीक दिली आहे ती त्यास जास्त वाटल्यास तें केव्हांहि कमी करण्यास समर्थ आहे. परंतु ज्या कालीं कायद्याप्रमाणें जितकी मोकळीक दिलेली असेल तिचा पूर्ण फायदा घेऊन लोकमत जागृत करण्याचें व सरकारापाशीं आम्ही मागत असलेल्या हक्कांचें समर्थन करण्याचें जें काम आम्हीं पतकरलें आहे तें काम निर्भयपणें चालवणें आम्हास जरूर आहे. आम्हांस दिलेली मोकळीक आधींच कमी झालेली आहे; आणि त्यांत नेमस्त आणि जहाल असे भेद करणें म्हणजे आज जी पेज पिण्यास आपणांस मिळत आहे तींतहि आणखी पाणी ओतून '**वा: ही काय गुळचट झाली आहे**' असें म्हणून मिटक्या मारीत बसण्यासारखें आहे. केसरीकारांचें मन जात्याच अशा मार्गांकडे प्रवृत्त झालें नसल्यामुळें त्यांस हा मार्ग पसंत नाहीं हें सांगावयास नकोच; पण विचारदृष्ट्या तरी हा ग्राह्य ठरतो कीं काय ह्यांचा लोकांनीं संथपणें विचार करून आज दोन वर्षें उच्छिन्न झालेल्या संस्था हल्लींच्याच कायद्याप्रमाणें कां होईना पण होईल तितक्या नेटानें चालवाव्या अशी त्यांस आमची प्रार्थना आहे; पुण्याचें जें कांहीं गेल्या दोन वर्षांत नुकसान झालें आहे त्यांस आपसांतील दुही बऱ्याच अंशीं कारण झालेली आहे. वर सांगितलेल्या आगींत तेल ओतणाऱ्या मंडळीचा उद्भ-वहि परंपरेनें ह्या दुहीपासूनच झालेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही मंडळी फार थोडी आहेत व तीं कोठेंहि असली तरी त्याबद्दल सर्वांनीं एक-सारखीच तिरस्कारबुद्धी दाखविली पाहिजे. अमुक लोक आमच्यापेक्षां जरा नेटानें काम करणारे आहेत म्हणून अथवा त्यांच्या मागण्या सरकारास आवडण्या-सारख्या नाहींत म्हणून ते राजद्रोही आहेत, अशा प्रकारचा आपल्या मनाचा खोटाच समज करून घेऊन एकमेकांपासून अलिप्त राहण्याची जी तऱ्हा निघालेली आहे, ती मोडून टाकून निदान ज्या प्रकरणीं मतैक्य आहे त्या प्रकरणीं तरी एकत्र जमून सर्वांनीं एकत्र मिळून एक दिशेनें उद्योग करणें हें हलींच्या स्थितींत पुणे-करांचें पहिलें कर्तव्य होय. अमक्यानें अमक्याचें अभिनंदन केलें नाहीं, कीं घे

टाइम्सकडे धांव, अशा तऱ्हेचा मूर्खपणाचा बाजार माजवण्यांत धन्यता मानून घेण्याचें आम्हीं सोडून दिलें पाहिजे. कोणीहि सुशिक्षित मनुष्य इंग्रजी राज्य उलथण्याच्या किंवा रक्तस्राव करण्याच्या बेतांत सामील असूं शकणार नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेवून कोणाबद्दल जर आपला तसा समज होत असला तर तें आपल्या अज्ञानाचें फल आहे, अशी मनाची प्रवृत्ति ठेवून तो गैरसमज दूर करून घेतला पाहिजे. मतभेद पुष्कळ बाबतींत असूं शकेल व खुळचट लोकहि सर्व पक्षांत व सर्व ठिकाणीं आढळण्यांत येतील. एका हाताचींच बोटें घेतलीं तर तीं सारखीं नसतात; पण खाणेंपिणें वगैरे सर्व व्यवहार करण्याचे वेळीं त्या सर्व बोटांचें साहाय्य लागतें. हाच न्याय हल्लींच्या प्रसंगीहि सर्वांनीं लक्षांत ठेवला पाहिजे. सामाजिक सुधारणा वगैरे गोष्टी करतांना तुम्ही कांहीं लिहिलें किंवा बोललेत तर त्याबद्दल सरकारास कांहीं फारशी पर्वा नाहीं, परंतु राजकीय बाबतींत कोणी कांहीं बोललें कीं सरकारचें मन तेव्हांच संशयग्रस्त होऊन दृष्टीहि कावरी-बावरी होऊं लागते. अशावेळीं सर्वांनीं एकनिष्ठपणानें व एकदिलानें वागून आम्ही आमच्यापैकीं कोणीहि कोणतीहि योग्य मागणी केलेली असल्यास ती बरोबर आहे असेंच सरकारास भासविण्यास झटलें पाहिजे. त्यावेळीं इतर मतभेद मनांत आणून ती अमक्यानें केली म्हणून वाईट, अशा प्रकारें ती हाणून पाडणें कोणासहि श्रेयस्कर नाहीं. राजकीय हक्कच आम्हास नकोत अशी ज्यांची समजूत असेल अथवा सगळ्या सामाजिक सुधारणा झाल्यावर मग राजकीय हक्कांकडे वळावें असें ज्याचें मत असेल त्यांस कदाचित् अशा प्रकारची कृति योग्य वाटण्याचा संभव आहे. पण हें मत जोंपर्यंत ग्राह्य ठरलेलें नाहीं, व ठरण्याचाहि विशेषसा संभव नाहीं, तोंपर्यंत सर्वांनीं मिळून कॉंग्रेससारख्या संस्थेनें आमच्या मनांत ज्या आशा उत्पन्न केलेल्या आहेत त्या सफल करण्याच्या उद्योगास हरएक प्रकारें लागलें पाहिजे. केसरीकारांनीं आजपर्यंत हें मत अंगिकारलेंच आहे; व तें हल्लींच्या कायद्याच्या दृष्टीनें त्यांत जितका फेरफार करणें त्यास अवश्य आहे तितका करून पुढें चालू ठेवण्याचा त्यांचा इरादा आहे. आपलें अंतःकरण जोंपर्यंत शुद्ध आहे, तोंपर्यंत कशाचीहि भीति बाळगण्याची जरूर नाहीं. उंदीर घुशींचा कधीं कधीं उपद्रव होतो म्हणून घर बांधण्याचें सोडून देतां कामा नये, असें जें पंतांचें म्हणणें आहे तेंच यथार्थ होय. आणि आमची अशी उमेद आहे कीं, हें काम करण्यास ज्या ऐक्याची अवश्यकता आहे तें पुनः पुणेकरांस प्राप्त होऊन त्यांच्या नैसर्गिक बुद्धीचें व हुशारीचें योग्य फल निदान महाराष्ट्रां-तील तरी लोकांस पुनः घ्यावयास सांपडेल.

असो; वाढतां वाढतां हा लेख बराच लांबला. परंतु संपण्यापूर्वी ज्या आश्रयदात्यांच्या मदतीनें केसरीस आजची स्थिति आलेली आहे, व ज्यांनीं खडतर प्रसंगींहि त्यांस आश्रय देण्याचें सोडून दिलें नाहीं इतकेंच नव्हे तर उलट जास्त मदत केली त्यांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. केसरीचा प्रसार पूर्वीपेक्षांहि आतां बराच जास्त होत आहे, याचें कारण आमच्या आश्रयदात्यांचीच मेहेरबानी होय; व आमची अशी आशा आहे कीं, त्यांनीं दिलेला हा आश्रय उत्तरोत्तर वाढत जाण्यासारखी लोकसेवा आमच्या हातून घडून येवो, "**आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानं**" अशी जी कविकुलगुरूची उक्ती आहे ती सर्वत्र सारखीच लागू पडते, आणि तशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आम्हीं केलेली सेवा लोकांनीं मानून घेतली हेंच काय तें आम्हांस मुख्य समाधान आहे; व त्यांनीं दिलेल्या आश्रयाबद्दल आम्हीं त्यांचे फार आभारी आहों. ईश्वर करो आणि त्यांच्या आमच्यामधील संबंध असाच कायम राहो, एवढीच शेवटीं प्रार्थना करून हा बराच लांबलेला लेख पुरा करितों.

## १४. पाच्छाहीपणा का गुलामगिरी ?

[ १६ डिसेंबर १९०२ ]

हल्लीं पाश्चिमात्य राष्ट्रांमध्यें 'इंपीरियालिझमची' अथवा पाच्छाहीपणाची जी एक भयंकर लाट उसळली आहे व जिनें मोठमोठ्या, मुत्सद्दी, धीर व विचारी लोकांसहि घेरून टाकिलें आहे तिचें थोडक्यांत स्वरूप सांगावयाचें म्हणजे 'आमच्या आंगांत तुमच्यापेक्षां अधिक बळ आहे म्हणून तुम्ही आमचें वर्चस्व सर्वस्वीं कबूल करून आमचे गुलाम बनून राहिलें पाहिजे' अशा प्रकारची स्वतःच्या बलिष्ठपणाविषयींची आसुरी कल्पना होय. या कल्पनेची वाढ आज सतत १८७७ सालापासून आहेच असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८७७ सालीं परलोकवासी महाराणीसाहेबांनीं केसर-इ-हिंद म्हणजे हिंदुस्थानच्या महाराणी असा किताब जेव्हां धारण केला तेव्हांच हल्लींच्या-साम्राज्याभिमानाचा पाया घातला गेला, हें उघड आहे. १८७७ पासून पुढें एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीचीं पांच सहा वर्षे सोडून बाकीच्या अवधींत जरी हें पाच्छाहीपणाचें भूत विशेषसें खेळ करीत नव्हतें, तथापि तें आपल्या खोडास सोडून न जातां आंत तसेंच दडून राहिलें होतें, व बोअर लढाईसारखीं अमावास्येची पर्वणी मिळाल्यावरोबर यानें आपले सर्व चाळे सुरू केले. बोअर युद्धाच्या वेळीं इंग्लिश लोकांच्या स्वातंत्र्याविषयींच्या ज्या कल्पना असत त्या या युद्धानें पुष्कळशा बदलून टाकल्या आहेत. पंचवीस वर्षांच्या मागील स्थितीशीं इंग्लंडची आजची स्थिती ताडून पाहतां इंग्लंडच्या राष्ट्रास इंपिरियालिझमच्या भुतानें झपाटल्यामुळें त्यांत किती विलक्षण फेरफार घडून आले आहेत याची सहज कल्पना येण्यासारखी आहे. इतर देशांतील लोकांस सुशिक्षण द्यावें, त्यांना प्रत्येक तऱ्हेच्या गुलामगिरींतून सोडवून पाश्चात्य लोक ज्या स्वतंत्रतेचा अनुभव घेत आहेत तिचा थोडाबहुत तरी आस्वाद त्या लोकांस मिळावा, किंबहुना एका देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस जिंकण्याचें जर कांही नैतिक कारण असेल तर तें जिंकलेल्या लोकांस पुढें मागें स्वातंत्र्य मिळवून देण्यास मदत करणें हेंच होय, अशी पादशाहीपणाची स्तुत्य कल्पना पूर्वीचे इंग्रज लोक नेहमीं आपल्या भाषणांत व कांहीं अंशीं आचरणांतहि स्वतःपुढें व लोकांपुढें मांडीत असत. निदान मागच्या काळासंबंधानें एवढें तरी स्पष्ट दिसून येतें कीं, त्या वेळचे मुत्सद्दी स्वतःच्या राष्ट्राच्या कल्याणासाठीं झटत आणि केवळ आपणांस

वडे म्हणावें एवढयासाठीं लक्षावधि प्राण्यांचीं हाडें एखाद्या दूरच्या मैदानावर पसरण्यास धजत नसत. परंतु हा काळ पालटून जाऊन सांप्रत निराळ्या प्रकारची व परिणामीं अपायकारक अशी परिस्थिति इंग्रजी राष्ट्रांत दिसून येत आहे. इंग्रज लोक हे जगाचे स्वामी, त्यांच्या सुखाकरितां उपभोग्य वस्तूंचा संग्रह म्हणून इतर देश परमेश्वरानें निर्माण केले आहेत, व यामुळें या परमेश्वराच्या या लाडक्या लेकरांच्या वरोबरीचे हक्क इतर देशांतील लोकांस देणें हें आमच्या आकाशांतील वापाच्या इच्छेविरुद्ध आहे, अशा प्रकारच्या कल्पना हल्लीं हळू हळू इंग्रजी समाजांत पसरत चालल्या आहेत. किंवहुना भगवद्गीतेतील "इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथं ।। इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ।। असौ मया हतः शत्रुः हनिष्ये चापरानपि ।। ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं वलवान् सुखी ।। आढ्योऽभिजनवानस्मि कोन्योऽस्ति सदृशो मया ।। " या श्लोकांत वर्णन केल्याप्रमाणें इंग्रज लोकांची सध्यां स्थिति झाली आहे. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या स्थितीकडे जराशी नजर पोचविली असतां आम्हीं जें म्हणतों त्याचा सहज प्रत्यय येण्यासारखा आहे. तसेंच, ज्या हिंदुस्थानांतील लोकांस या पाच्छाहीपणाच्या काळाच्या पूर्वीं महाराणीसाहेवांनीं आपल्या इंग्रज प्रजेच्या बरोबरीचे हक्क देण्याचें वचन दिलें होतें त्याच देशाविषयीं आज वोलूं लागलें असतां राणीसाहेवांचें वचन कपटाचें आहे व इंग्रज लोकांच्या बरोवरीचे हक्क मिळण्याची अथवा देण्याची कल्पनाच मुळीं असंभाव्य आहे, असें इंग्लंडातील लॉर्ड सालसबरीसारखे प्रमुख मुत्सद्दी स्पष्ट म्हणत आहेत. इतकेंच नव्हे तर ज्या आयरिश लोकांनीं आज कित्येक शतकें पावेतों इंग्रजी राष्ट्राची इभ्रत व मोठेपणा वाढविण्यासाठीं आपल्या अनेक वुद्धिमान व शूर लोकांचे वळी अर्पण केले त्यांसहि स्वातंत्र्य देणें योग्य नाहीं, असें स्पष्ट सांगण्यांत येत आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां पाच्छाहीपणाच्या भुतानें इंग्रजी राज्य किती झपाटलें गेलें आहे व त्याच्या पूर्वीच्या व हल्लींच्या कल्पनांत किती विलक्षण फरक पडला आहे ही गोष्ट सहज ध्यानांत येण्यासारखी आहे. अशाप्रकारें इंग्रजी राष्ट्रांत हें गर्वाचें वारें भरलें आहे त्यामुळें इतर जिंकलेल्या राष्ट्रांचें किती नुकसान होणार आहे व त्यांना अधिकाधिक गुलामगिरीची स्थिति कशी येणार आहे, हें आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल. परंतु यावर कोणी आम्हांस असा प्रश्न करतील कीं, इंग्रजी राष्ट्रांत संचार करीत असलेल्या या पाच्छाहीपणामुळें इतर देशांची हानी होऊन ते देश गुलामगिरीच्या चिखलांत जरी अधिकाधिक रुतत गेले तरी त्यामुळें इंग्रजी राष्ट्राची तर उन्नति होईल ना ? व होत असेल तर इंग्रजी मुत्सद्यांस दुसऱ्या राष्ट्रांच्या हिता-

हिताकडे पाहण्याची जरूर नाहीं, खरें आहे; पण सर्वांनीं नेहमीं एवढेंच लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, अधिकार व गुलामगिरी या कांहीं नित्य परस्पर-विरोधी गोष्टी नाहींत, व जें राष्ट्र अधिकाधिक अधिकार मिळवीत चाललें आहे, त्यास तें त्याच प्रमाणानें गुलाम बनत चाललें आहे, असें म्हणणें म्हणजे सूर्याचा प्रकाश व काळोख यांचें साहचर्य प्रस्थापित करण्यासारखें असंभवनीय नाहीं, सारांश पाच्छाहीपणा व गुलामगिरी यांत अशा प्रकारचा विरोध जरी प्रथम दर्शनीं भासत असला तथापि तो खरा नसून विरोधाचा केवळ आभास आहे, ही गोष्ट थोडासा विचार केला असतां पुर्तेपणीं ध्यानांत येण्यासारखी आहे. प्रथम आपण ही गोष्ट लक्षांत आणली पाहिजे कीं, इंग्रजी राष्ट्र अथवा समाज असें आपण ज्यांस म्हणतों तो एक व्यक्ति नसून पुष्कळ व्यक्तींचा समुदाय आहे व यांतील प्रत्येक व्यक्तीस ज्या मानानें अधिकाधिक स्वातंत्र्य भोगतां येईल त्या मानानें तो समाज गुलामगिरीपासून अलिप्त राहील. परंतु कोणत्याहि कारणानें कां असेना जर व्यक्तींचें स्वातंत्र्य कमी कमी होत चाललें असेल तर या व्यक्तींनी बनलेला समाज गुलामगिरींत अधिकाधिक लपेटला जात आहे, असें म्हणणें भाग आहे. आणि या दृष्टीनें जर हल्लींच्या पाच्छाहीपणाच्या कल्पनेनें इंग्रजी समाजातील व्यक्तीस्वातंत्र्य कमी होत चाललें आहे, असें दाखवितां येईल तर ही कल्पना जसजशी अधिकाधिक बळावत जाईल, तसतसें हें स्वातंत्र्य कमी कमी होत जाणार हें उघड आहे; आणि पाच्छाहीपणा म्हणजे गुलामगिरीच होय. हें त्यावरून सहज सिद्ध होण्यासारखें आहे.

मालक आणि चाकर हे शब्द जरी अन्योन्य प्रतियोगी असले तरी या दोघांमध्यें कोण कोणाचा मालक किंवा कोण कोणाचा गुलाम अथवा दोघेहि एकमेकांचे पर्यायानें गुलाम व मालक. या प्रश्नांचा जरासा बारकाईनें विचार करूं लागलें असतां आपणांस असें आढळून येईल कीं, या दोघांपैकीं चाकर तेवढाच मात्र गुलाम असें नसून मालक आणि चाकर हे दोघेहि गुलाम आहेत. जो मनुष्य दुसऱ्याला आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न करितो तो स्वतःच त्याच्या ताब्यांत असणाऱ्या मनुष्याइतका आपण बांधला गेलेला असतो. उदाहरणार्थ, जर एखादा मनुष्य दुसऱ्यास कैद करून त्याचे दंडास दोरी बांधून त्याच्या बरोबर जात असेल तर तो कैद केलेला मनुष्य पळून जाऊं नये म्हणून कैद करणाऱ्या मनुष्यासहि आपली स्वैर फिरण्याची इच्छा आंवरून धरून, कैद केलेल्या माणसाच्या मागें गुलामाप्रमाणें हिंडलें पाहिजे. तहान लागली असतां ती भागविण्यासाठीं जर एखाद्या झऱ्यावर या कैद करणाऱ्या मनुष्यास जावयाचें असेल तर

बद्ध केलेल्या माणसाची विशेप खबरदारीनें व्यवस्था केल्याशिवाय त्यांस जातां येत नाहीं. म्हणजे कैद केलेल्या मनुष्यावरोवरच कैद करणाऱ्या मनुष्याचेंहि स्वातंत्र्य नष्ट होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. आपलेकडे पोलीस लोक कैद्या-वरोबर आगगाडींतून जेव्हां जेव्हां रात्रीचा प्रवास करितात तेव्हां तेव्हां कैद्यानें आपली सुटका करून घेऊं नये एवढ्यासाठीं त्यांना रात्रीच्या रात्री जागून काढाव्या लागतात व झोंप घ्यावयाची असल्यास त्या कैद्याच्या हातांतील एक हातबेडी आपल्या हातांत घालून घ्यावी लागते, असा अनुभव या पोलिसां-पैकीं एकजणानें आम्हांस सांगितला आहे. या उदाहरणावरून कैद्यानेंच आपली स्वतंत्रता गमावली कीं त्याच्यावरोवर त्याच्या रक्षकाचीहि नाहींशी झाली, हें सहज कळून येणार आहे; आणि व्यक्तीस जो न्याय लागू आहे तोच बहुतेक अंशीं जिकलेल्या व जिकणाऱ्या या दोन्हीं राष्ट्रासहि लागू पडतो. जो देश आपण जिकला आहे तो आपल्या ताब्यांतून जाऊं नये अशीच जिकणाऱ्या राष्ट्राची इच्छा असते व एवढ्यामुळें पोलीस शिपायासारखीच त्याला आपण कैद केलेल्या राष्ट्रासंबंधानें खबरदारी घ्यावी लागते. स्वातंत्र्य सर्वासच आवडतें, व प्रत्येक राष्ट्र आपलें स्वातंत्र्य गमावण्यास फार नाखुष असतें हें खरें आहे; पण या सर्व सामान्य सिद्धांतास वरील तत्त्व लागू केलें असतां परराष्ट्र जिक-णाऱ्या राष्ट्राच्या मानसिक अवस्थेची कल्पना होणार आहे. ज्या ज्या राष्ट्रांनीं परकी देश कावीज करून तेथें आपलें वर्चस्व स्थापण्याचा प्रयत्न केला त्यांनीं त्यांनीं आपापल्या राज्यतृष्णेच्या मानानें स्वतःचें स्वातंत्र्य संकुचित करीत आणलें, ही गोष्ट ऐतिहासिक उदाहरणांवरून सिद्ध झालेली आहे. व अशा दृष्टीनें पाहिलें असतां इंग्रजी लोकांच्या वाढत्या राज्यलोभामुळें इंग्रजी राष्ट्रांचें स्वातंत्र्य अधिकाधिक नष्ट होत असावें, असें सहज अनुमान निघतें, व प्रत्यक्ष स्थितीचा विचार केला असतां तेंच अनुमान दृढ होतें. इंग्रज लोकांची राज्य-तृष्णा ज्यावेळीं आजच्या इतकी वाढलेली नव्हती त्यावेळीं इंग्रज समाजाची जी स्थिति होती ती आजच्या स्थितीशीं ताडून पाहिली असतां या दोहींमध्यें पुष्कळच तफावत दृष्टीस पडणार आहे. सुमारें ५० वर्षांपूर्वीं पार्लमेंटांत सभासद निवडून देण्यासंबंधानें जो वादविवाद होई, त्यांत प्रत्येक मनुष्याच्या मतास मान दिला जाई. परंतु हल्लीं ही स्थिति पालटून जाऊन स्पेन्सरसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें "इलेक्टोरल ऑलिगार्कीज" अथवा सभासदांची निवडणूक करण्यासाठीं शेलक्या मंडळींच्या सभा स्थापन झाल्या आहेत. हिंदुस्थान इत्यादि जिकलेल्या देशांतील पैशानें आपली तिजोरी भरून जे श्रीमंत बनलेले आहेत असे लोकच बहुधा सभासद निवडण्याच्या कामीं प्रमुख असतात व त्यांनीं सुचविण्याच्या

मिशानें कोणातरी त्यांच्या एखाद्या बगलबच्च्यास निवडावें आणि इतरांनीं निमूटपणें आपली संमति प्रदर्शित करावी, असा प्रकार चालू आहे. इंग्रज लोकांची राज्यतृष्णा अनिवार झाली असल्याकारणानें पैसेवाल्या लोकांचें प्राबल्य तर वाढत चाललेंच आहे; परंतु या सधन लोकांपेक्षांहि लष्करी लोकांचें महत्त्व अधिकाधिक होत चाललें आहे, ही फार दुःखाची गोष्ट होय. आणि अशा प्रकारें लोकांच्या मर्जीविरुद्ध त्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याची इच्छा जेथपर्यंत प्रबळ आहे तेथपर्यंत ही स्थिति कायम राहणार. लष्करी लोकांचें प्रस्थ इंग्लंड-मध्यें किती माजलें आहे, व त्यामुळें गोरगरिबांस आपल्या मिळकतीचा किती भाग कराच्या रूपानें सरकारास भरावा लागतो, याचा एक दोन गोष्टींवरून खुलासा होण्यासारखा आहे. इंग्रज लोकांतील पोराटोरांस सुद्धां आपण शिपाई बनावें अशी इच्छा होऊं लागली आहे व शाळा आणि कॉलेजें यांतून लष्करी शिक्षण देण्यांत यावें, अशा प्रकारच्या सूचना मोठमोठे लोक करूं लागले आहेत. तसेंच पूर्वीं बुद्धीस जितका मान मिळत असे त्याच्या दशांशानेंहि हल्लीं देण्यांत येत नसून मानसिक शक्तीपेक्षां शारीरिक शक्तीचाच विशेष गौरव करण्यांत येत आहे. क्रिकेट, फुटबॉल, वगैरे खेळामध्यें जो आपलें प्राविण्य दाखवितो त्याचा जितका जयजयकार होतो तितका मोठमोठ्या पंडितांचा किंवा युनिव्हर्सिटीतून निघालेल्या उत्कृष्ट विद्यार्थ्यांचाहि होत नाहीं, ही गोष्ट इंग्रजी वर्तमानपत्रें व सचित्र मासिक पुस्तकें यांवरून चांगली लक्षांत येण्यासारखी आहे. इंग्रजी समाजांतील धर्मशिक्षण देणारे पाद्रीभट देखील आपल्या धर्मविषयक व्याख्यानांत युद्धविषयक गोष्टींचा उपदेश करूं लागले आहेत व केवळ ख्रिस्ती धर्म पसर-ण्यासाठीं अस्तित्वांत आलेल्या एका पंथांतील लोकांना आपणांस मुक्ती फौज असें लष्करी नांव धारण करण्यांत भूषण वाटत आहे. या पंथाचे आचार्य आपणांस सेनापति, कर्नल, कप्तान अशा पदव्या लावून घेऊन आपला लष्करी मानाबद्दलचा अभिलाष धर्माच्या कामांतहि पुरा करून घेत आहेत. अशा रीतीनें हें जें स्थित्यंतर घडून आलें आहे त्याचा विचार केला असतां इंग्रज लोकांस लष्करी कल्पनांनीं किती भुरळ पाडली आहे याचा सहज अजमास करतां येण्यासारखा आहे. याप्रमाणें परिस्थिति असल्यामुळें स्पेन्सरसाहेबांनीं म्हटल्याप्रमाणें पार्लमेंट हें लष्करी खात्यास सर्व सामुग्रीचा पुरवठा करणारें एक कमिसरिएटच बनत चाललें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. युद्धाच्या संबंधानेंच विचार करावयाचा प्रसंग पुष्कळ वेळा येत असल्यामुळें पार्लमेंटच्या सभासदांचे व्यक्तिशः हक्क कमी कमी होत जाणें व कांहीं निवडक मंडळींच्या हातीं सर्व सत्ता राहणें हें वरील परिस्थितीस अनुसरूनच होय; आणि त्याच-

प्रमाणें इंग्लंडाची राज्यव्यवस्था बदलत चालली आहे. जेथें पूर्वी पार्लमेंटच्या हातांत सर्व सत्ता होती तेथें एका सालिसबरीच्या कुटुंबांतील मुत्सद्दी हल्लीं सर्व सूत्रें हालवीत आहेत. अशा रीतीनें थोड्या लोकांच्या हातीं सत्ता देऊन त्यांच्या हुकुमाप्रमाणें वागण्याचा प्रसंग आज इंग्रजी समाजास आला असला, व तो आला आहे हें वर दाखविलेंच आहे, तर इंग्रजी राष्ट्र अधिकाधिक गुलाम बनत चाललें आहे, ही गोष्ट सिद्ध होत नाहीं काय? तसेंच बुद्धीस जो मान मिळत असे तो मिळण्याचें नष्ट होऊन आज शारीरिक बळासच जर इंग्रजी समाज अधिक मान देत आहे, तर इंग्रज लोक सुधारणेच्या मार्गावरून पुनः रानटीपणाच्या मार्गास लागत चालले आहेत, ही गोष्टही कबूल करणें भाग नाहीं काय? इंग्रजी राष्ट्राच्या वाढत्या गुलामगिरीचें आणखी एक दुसरें प्रमाण आहे. प्राचीन काळीं जेव्हां गुलामगिरीची संस्था उघडपणें अस्तित्वांत होती त्यावेळीं गुलामास मालकाच्या शेतांत खपावें लागत असे व त्या गुलामांच्या दर्जांत कमी अधिकपणाच्या मानानें नंबरवारी होती. कित्येक गुलामांस मालकासाठीं आठवड्याचा आठवडा खपावें लागे व कित्येकांस या आठवड्यांतून कांहीं दिवसपावेतों सुट्टी असून कांही दिवस पावेतोंच मालकासाठीं कष्ट करावे लागत. पुढें या स्थितींत जरासा फेरफार होऊन श्रमाच्या मोबदल्यांत पैसे देण्यांत येऊं लागले. या प्राचीन स्थितीचा जरासा विचार केला असतां असें दिसून येईल कीं, दुसऱ्याच्या फायद्यासाठीं म्हणून जितके दिवस पावेतों कोणाहि मनुष्यास कष्ट करावे लागतात तितके दिवसपर्यंत तो त्याचा गुलाम होय. अशा दृष्टीनें प्रत्येक सरकारास प्रजाजन जे कर देतात त्या कराचे पैसे मिळविण्यासाठीं त्यांस जितके दिवस खपावें लागतें तितके दिवसपर्यंत ते सरकारचे गुलाम होतात, असें मानलें पाहिजे. स्वतःच्या जीविताचें व वित्ताचें संरक्षण होण्यासाठीं सरकार म्हणून एक संस्था प्रत्येक समाजांत असणें जरूर आहे व ही संस्था चांगल्या रीतीनें चालविण्यासाठीं कराच्या रूपानें लोकांनीं तीस पैसे देणें हें त्यांच्याच हिताचें व फायद्याचें आहे. परंतु ह्यांत ही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, स्वतःच्या संरक्षणासाठीं पैसे भरणें व इतर कोणत्याहि कामासाठीं पैसे देणें यांत मोठा फरक आहे. इंग्रजी समाजास जर स्वतःच्या संरक्षणासाठीं कर भरावे लागत असले तर तो गुलाम नसून पूर्णपणें स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहे, असेंच म्हणणें योग्य आहे; परंतु कांहीं प्रमुख व्यक्तींच्या अनावर राज्यतृष्णेमुळें इंग्रज लोकांस जर अधिकाधिक कर द्यावे लागत असतील तर त्या मानानें ते उत्तरोत्तर व अधिकाधिक गुलाम बनत चालले आहेत, असेंच म्हणणें भाग आहे, स्पेन्सरसाहेबांनीं आपल्या अखेरच्या ग्रंथांत या

विषयाचा ऊहापोह करतांना असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, दक्षिण आफ्रिकेंतील ट्रान्सवाल वगैरे संस्थानासारखे स्वातंत्र्यप्रिय देश केवळ आपलें पोकळ महत्त्व वाढविण्यासाठीं जिकण्यास इंग्लंडचे कांहीं मुत्सद्दी हपापले असल्यामुळें पूर्वीच्या मानानें इंग्रज लोकांस अधिक कर भरावे लागत आहेत व यामुळें इंग्लंडचे लोक अधिकाधिक गुलाम बनत चालले आहेत. एवंच, पाच्छाईपणा हें दुःखाचें मूळ आहे. गर्वानें व अतिलोभानें कधींच कोणाचें कल्याण झालेलें नाहीं, व 'लोभमूलानि पापानि' हा सिद्धांत हजारों वर्षांपूर्वींच शहाण्या लोकांस कळलेला आहे. तेव्हां साम्राज्याभिमानाचे इंग्रजी समाजावर अनेक दुष्परिणाम घडत आहेत, हें अधिक स्पष्ट करण्याची जरूर नाहीं. लोकांस निरुद्योगीपणाची आवड जडत चालली आहे, पोशाखीपणा व मिजास सारखी वाढत आहे व शेतकी खालावत चालली आहे. तसेंच इंग्रज लोकांमध्यें पूर्वी जी स्वातंत्र्यप्रीति आढळत असे ती नष्ट होत चालली असून जिकलेल्या राष्ट्रांतील लोकांचे तर राहोच परंतु स्वतःच्या जातभाईचें देखील व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वास अनुसरून केलेलें वर्तन इंग्रज लोकांस खपेनासें झालें आहे. बोअर लोकांविषयीं कळकळ वाटून कांहीं लोकांनीं एक सभा भरविण्याचा प्रयत्न केला होता. या सभेंत दांडगे लोकांच्या दांडगाईपासून स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं पोलीसांची मदत मागितली असतांहि मिळाली नाहीं, एवढेंच नव्हे परंतु ही मदत न देणेंच वाजवी होतें, असें कित्येक प्रमुख पत्रकारांनी प्रतिपादन केलें होतें. ही सर्व स्थिति स्वातंत्र्याच्या वाढीची साक्ष देत नसून स्पेन्सरसाहेबांच्या मताप्रमाणें इंग्रजी समाजाच्या अवनतीचें व वाढत्या गुलामगिरीचें निदर्शक होय. या राज्यलोभामुळें व पाच्छाहीपणामुळें इतर देशांचेच नव्हे, तर स्वतः इंग्लंडचें नुकसान होत आहे व त्यापासून दूर राहणें, हें इंग्रजी राष्ट्राचें कर्तव्य आहे. करिता सरतेशेवटीं आम्हांस एवढेंच सांगणें आहे कीं, स्वतःचा व दुसऱ्याचा असे दोघांचेहि गळे दोरीनें एकत्र बांधले जात असतां ती दोरी आंवळण्याचा प्रयत्न करणें, हें उभयतांसहि श्रेयस्कर नाहीं व एवढ्यासाठींच इंग्लंडनें इतर देशांस गुलाम बनवून "कोऽन्योऽस्ति सदृशो मया" असा डौल मारण्यापेक्षां योग्य तितकें वर्चस्व आपणाकडे ठेवून जिकलेल्या देशांना स्वातंत्र्याची जोड मिळवून देण्यास झटावें, हेंच त्यांच्या हिताचें असून नीतिदृष्ट्या भूषणास्पद व फायद्याचें आहे.

## १५. पूर्वेकडील लोकांचें विचारैक्य

[ २८ एप्रिल १९०३ ]

या विषयावर जपानांतील ललितकलांचे प्रोफेसर मि. ओकाकुरा या जपानी गृहस्थांनीं इंग्रजींत लिहिलेले पुस्तकाची एक प्रत आमचेकडे नुकतीच आलेली आहे. या पुस्तकाचें नांव वाचून आंतील मजकुराबद्दल चांगलीशी कल्पना येणारी नसल्यामुळें त्याबद्दल प्रथम थोडा खुलासा करून, नंतर पुस्तकांतील विषयाचा थोडासा-गोपवारा आमचे वाचकांस सादर करण्याचा आमचा विचार आहे. आशिया खंडांतील लोकांचें विचारैक्य म्हणजे काय याचेंच आधीं पुष्कळांस गूढ पडेल. परंतु जगाच्या नकाशाकडे दृष्टि दिली असतां आशियाखंडांतील देशांस युरोप-खंडांतील राष्ट्रें कशीं ग्रासीत चाललीं आहेत, हें लक्षांत येईल, व तें लक्षांत आलें म्हणजे या ग्रासास पात्र झालेल्या देशांस असें कांहीं सामर्थ्य आहे कीं नाहीं, कीं जेणेंकरून ही आपत्ति त्यांस टाळतां येईल, असा कोणासहि सहज विचार सुचणार आहे. फार प्राचीन काळापासून युफ्रेटिस, सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा व हो-हांग-हो या नद्यांचे काठीं आशियांतील राष्ट्रांच्या सुधारणेचा ध्वज फडकलेला आहे. मध्य एशियांत कांहीं दिवस या लोकांची वस्ती होती, पण दक्षिणेकडील सुपीक प्रदेश सापडल्यानंतर मध्य एशियांतील वस्ती मोडली, आणि हूण, तार्तर वगैरे रानटी लोक कांहीं चिनांत, कांहीं हिंदुस्थानांत व कांहीं इराणांत जाऊन राहिले. बटिवलोन, निनवे, वगैरे आशियाखंडांतील अगदीं पश्चिमेकडील राष्ट्रांची सुधारणा आतां बहुतेक नामशेष होऊन राहिलेली आहे, व इराणच्या लोकांस मुसलमानी धर्म स्वीकारावा लागल्यामुळें चीन, हिंदुस्थान व तिबेट या देशांतून इराणास एक प्रकारचा वेगळेपणा प्राप्त झालेला आहे. हा वेगळेपणा सकृद्दर्शनीं जितका भासतो, तितका वस्तुतः नाहीं हें खरें, तथापि अशोकराजाचे वेळीं हिंदुस्थानांत व हिंदुधर्माच्या छायेखालीं जमलेल्या व वाढलेल्या बौद्ध भिक्षूंनीं व उपदेशकांनीं ज्याप्रमाणें एकीकडे सिरियापालेस्ताईन दुसरीकडे चीन, जपानपर्यंत 'पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदंडः' याप्रमाणें आपल्या धर्माचा दंड पसरून दिला तसा प्रकार आतां होईल कीं नाहीं, याबद्दल शंका आहे. तथापि तिबेट, चीन, जपान, सयाम, ब्रह्मदेश, हिंदुस्थान व सिलोन आदिकरून इराणच्या पूर्वेस जे देश आहेत त्यांचा विचार केला, तर त्यांस जोडण्यास केवळ कोणच्याही प्रकारचें साधन नाहीं, असें

कोणीहि म्हणणार नाहीं. व आशिया खंडांतील राष्ट्रांमध्यें प्रमुख राष्ट्रें हींच आहेत. आतां एवढें खरें कीं, एक जपान खेरीज करून इतर राष्ट्रें लंगडीं झालेलीं आहेत. सेंटपीटर्सवर्गमधून थेट मांचुरियापर्यंत रशियन रेल्वे होऊन हिमालयाच्या उत्तरेकडील वहुतेक भाग ग्रासून चीनांत रशियानें प्रवेश केलेला आहे. आणि दक्षिण महासागरांतून इकडे येऊन हिंदुस्थान व ब्रह्मदेशावर आपला पूर्ण अंमल बसविला आहे, व समुद्राच्या वाजूनें इराण व चीन यांस शह दिलेला आहे. एक जपान काय तें मोकळें सुटलेलें आहे; व जपानी लोकांनीं पाश्चिमात्यांचें जें अनुकरण केलें आहे व त्यांजपासून ज्या विद्या संपादिल्या आहेत, त्यामुळें त्यांचें स्वातंत्र्य पुढेंहि असेंच कायम राहील अशी आशा आहे. अशा स्थितींत एका जपानी प्रोफेसरास एशिया खंडांतील लोकांच्या ऐक्याचे विचार सुचावे हें अगदीं स्वाभाविक आहे. जपानानें चीनवर स्वारी करून त्या देशाचें व्यंग पाश्चिमात्य राष्ट्रांचे नजरेस आणण्यास मदत केली हें उघड आहे. पण केव्हांना केव्हां तरी आपण म्हणजे चीन, ब्रह्मदेश, हिंदुस्थान आणि जपान या राष्ट्रांतील लोक एक आहों ही कल्पना कोणाहि स्वतंत्र विचाराच्या पुरुषाचे डोक्यांत आल्यावाचून राहिली नसती; व तीच कल्पना मि. ओकाकुरा यांनीं आपल्या पुस्तकांत ग्रथित केली आहे. हिमालयपर्वत चीन व तिवेट या राष्ट्रांस हिंदुस्थानापासून वेगळें करतो हें खरें आहे, पण पूर्वीचा इतिहास मनांत आणला असतां जगांतील ह्या अत्युच्च पर्वतासहि या दोन राष्ट्रांतील विचारैक्य मोडवलें नाहीं, असें पुस्तकाच्या आरंभींच प्रो. ओकाकुरा यांनीं म्हटलें आहे. तिबेटांतून प्रवास करणें आतां कित्येकांस कष्टास्पद किंवहुना अशक्य वाटत असेल, पण बौद्धधर्माचा ध्वज जेव्हां सारखा फडकत होता तेव्हां जपानांतील शेंकडों प्रवासी हिंदुस्थानांत येत व हिंदुस्थानचे धर्मोपदेशक त्याच वाटेनें चिनांतून जपानांत जात असत. किंबहुना तिबेट हा या लोकांचा रहदारीचा रस्ताच होता असें म्हटलें तरी चालेल. चीनच्या सरहद्दीवर प्राचीन काळीं एकदां एक हिंदु, एक चिनी व जपानी, प्रवाशी यांची गांठ पडली होती. त्यावेळीं आपण तिघे एकच आहों, हें दाखविण्यास त्यापैकीं एकानें असें रूपक रचलें कीं, आपण तिघेहि एकाच पंख्याचे अवयव आहों. हिंदु हा या पंख्याच्या काड्या आहेत. त्यावरून पसरलेला कागद चिनी हा आहे आणि जपानी हा त्या पंख्याच्या काड्या सांधणारा खिळा आहे. चीन, जपान व हिंदुस्थान यांचें ऐक्य या प्रवाशांनीं केलेल्या रूपकापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें व्यक्त करणें अशक्य आहे; व प्रो. ओकाकुरा यांनीं हेंच रूपक आपल्या ग्रंथांत घेतलेलें आहे. बौद्धधर्माचा हिंदुधर्माशीं पुष्कळ विरोध आहे; पण स्वामी विवेकानंद म्हणत असत त्याप्रमाणें बौद्धधर्म म्हणजे हिंदुधर्माचा बच्चा—पण बंडखोर बच्चा—आहे

किंवा होता हे लक्षांत ठेवलें पाहिजे. पाश्चिमात्य राष्ट्रांची धांव ज्याप्रमाणें सुखोपभोगांकडे आहे, तशी पूर्वेकडील लोकांची नाहीं, व आयुष्य सुखांत घालविण्याच्या साधनांपेक्षां आयुष्याचें परिणामी साफल्य कसें होईल हाच विचार त्यांच्या डोळ्यापुढें नेहमीं उभा असतो. आज जगांत प्रचलित असलेले सर्व धर्म पूर्वेकडील म्हणजे आशियाखंडातील राष्ट्रांतच प्रथमत: कां निपजलें याचें बीजहि वरील भेदांत आहे असें प्रो. ओकाकुरा यांचें म्हणणें आहे. सारांश, पूर्वेकडील राष्ट्रांतील लोकांमध्यें पाश्चिमात्य राष्ट्रांतील लोकांपेक्षां विलक्षण असें जर एखादें विचारैक्य असेल, तर तें वर निर्दिष्ट केलेलेंच होय व त्यामुळें हिंदुस्थान, चीन व जपान ह्या राष्ट्रांतून देवांच्या मूर्ति, धर्मोपदेशांकरितां केलेलीं लेणीं किंवा देवालयें यांच्या रचनेंत व कारागिरींतहि एक प्रकारचें मर्मज्ञ प्रेक्षकांस साम्य दिसून येतें असें मि. ओकाकुरा यांचें म्हणणें आहे. अजिंठा येथील लेणीं मि. ओकाकुरा हे पहावयास गेले तेव्हां तेथील कोरीव चित्रें अपूर्ण आहेत हें त्यांच्या तावडतोब लक्षांत आलें, म्हणजे दगडाच्या कोरीव मूर्ति आहेत त्यांवर सनल्याचा किंवा दुसऱ्या कसल्यातरी लुकणाचा थर देऊन त्यांवर पुढें मनुष्याचें हावभाव व मनोविकार रंगानीं दाखवावयाचें होतें, परंतु तें काम झालें नाहीं किंवा होऊन त्यांचा नाश झाला, असें मि. ओकाकुरा यांचें म्हणणें आहे. कसेंहि असो, स्वतंत्र राष्ट्रांतील एका मर्मज्ञ विद्वानांस पूर्वेकडील राष्ट्रांमध्यें असलेल्या ऐक्याची अशा रीतीनें एकदां प्रचीति आल्यावर लवकरच त्यांस 'सर्वं ब्रह्ममयं जगत्' असें वाटूं लागल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. जपानांत हल्लीं दोन तऱ्हेचे पक्ष झालेले आहेत. एक जपानी लोकांनीं सर्वस्वी पाश्चिमात्यांचें अनुकरण करून त्यांची रीतभात व सुधारणा उचलावी, असें म्हणणारा, व दुसरा योग्य ती पाश्चिमात्य सुधारणा घेऊन जपानच्या लोकांनीं आपला स्वाभिमान व आपलेपणा कायम ठेवावा असें प्रतिपादन करणारा. मि. ओकाकुरा हे या दुसऱ्या पक्षाचे आहेत; व जपानांतील चित्रकला किंवा मूर्तिकला याच धोरणावर सुधाराव्या असें त्यांचें मत आहे. चित्रें, जुन्या मूर्ति, किंवा जुन्या कला यांचा त्यांनीं पुष्कळ वर्षें अभ्यास केलेला असून या विषयांत त्यांचें प्राविण्य जपानांतील सर्व लोकांस मान्य व संमत आहे; इतकेंच नव्हे, तर हे विषय जेथें शिकवितात त्या संस्थेमध्यें हे प्रधान गुरु होते. पण पुढें या संस्थेचें काम इताली देशांतील कारागीर आणून या पाश्चिमात्य धर्तीवर चालवावें असें ठरल्यामुळें त्यांस संस्था सोडून द्यावी लागली. तथापि त्यांच्या लौकिकामुळें त्यांचेभोंवतीं नवीन शिष्यमंडळ तयार झालें; व त्यांच्या मतांचा अधिकाधिक प्रसार होऊं लागला. त्यांनीं हिंदुस्थान, चीन वगैरे पूर्व देशच पाहिले असें नाहीं; तर त्यांनीं युरोपांतहि प्रवास केलेला आहे, व त्यांचा असा दृढ समज झालेला आहे कीं,

आशियाखंडांतील लोकांचें विचारैक्य केवळ चित्रें किंवा देवादिकांच्या मूर्ति यांमध्येंच नव्हे, तर धर्माच्या इतर बाबतींतहि अद्यापहि चांगलें प्रत्ययास येतें. व हें विचारैक्य युरोपियन राष्ट्रांतील लोकांच्या विचारापेक्षां भिन्न असल्यामुळें पूर्वेकडील विचारांचा व पश्चिमेकडील विचारांचा असे हे दोन भिन्न ओघच आहेत असें म्हणावें लागतें. या ओघांची भिन्नता कोणत्याहि कारणानें एकदां लक्षात आल्यानंतर हे दोन ओघ असेच भिन्न राहावयाचे किंवा एका ओघाच्या झपाट्याखालीं दुसरा ओघ गुरफटून जावयाचा किंवा नाहींसा व्हावयाचा कीं काय, असा सहजच प्रश्न निघतो व त्यास जपानी मनुष्याकडून जें उत्तर मिळावयाचें तेंच ओकाकुरा यांनीं दिलेलें आहे. आशिया खंडांतील राष्ट्रांची उन्नति होणें जरूर आहे इतकेंच नव्हे, तर ती होण्यास पूर्वीच्या विचारैक्याचे जे मार्ग पडलेले आहेत तेच पुनः सुधारून आपण नीट केले पाहिजेत, असें ओकाकुरा यांचें म्हणणें आहे व तें पुष्कळ अंशीं खरें आहे यांत शंका नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांनीं पूर्वेकडील राष्ट्रांतील हें विचारैक्य मोडून टाकून नेहमीं त्यांस पादाक्रांत करून ठेवलेल्या स्थितींतच ठेवणें जरूर व शक्य आहे, असें प्रतिपादन करणारे कांहीं पाश्चिमात्य ग्रंथकार आहेत; किंवहुना युरोपांतील राष्ट्रांनीं आशिया खंडांतील राष्ट्रांस नेहमीं कह्यांत ठेवून त्यांचेपासून आपला होईल तेवढा फायदा करून घ्यावा असाच ईश्वरी संकेत आहे, असें म्हणण्यापर्यंतहि कित्येकांची मजल येऊन ठेपलेली आहे. याची उलट बाजू म्हटली म्हणजे ओकाकुरा यांनीं दाखविली आहे तीच होय. आशियाखंडांतील लोकांमध्यें एक प्रकारचें विलक्षण प्राचीन काळापासून चालत आलेलें विचारैक्य आहे, व हिमालय पर्वत आड आल्यानेंहि जर तें नाहींसें झालेलें नाहीं, तर अन्य कारणानें तें नाहींसें होणें शक्य नाहीं, बुडविलेल्या भोपळ्याप्रमाणें केव्हांना केव्हां तरी पाण्याच्या सपाटीवर तरंगून दृक्प्रत्ययास येईल, हें निश्चित आहे अशी यांच्या मनाची खात्री झालेली आहे व तीच खात्री हल्लींच्या पुस्तकांत त्यांनीं लोकांपुढें मांडलेली आहे. अशा प्रकारचें पुस्तक एशिया खंडांतील विद्वान पुरुषानें लिहिलेलें हें पहिलेंच होय. व भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें भेदांतहि साम्य पाहणारी अशा प्रकारची दृष्टि फारच थोड्या लोकांत आढळून येते. तथापि एकदां ही कल्पना प्रचलित केली म्हणजे तिचा प्रसार होण्यास फारशी पंचाईत पडत नाहीं, असा ऐतिहासिक अनुभव आहे. हा अनुभव हल्लींच्या कल्पनेस लागू पडेल कीं नाहीं, पडला तर कोणत्या मानानें पडेल, आणि त्याचा शेवट कसा काय होईल इत्यादि बरेच महत्त्वाचे प्रश्न मि. ओकाकुरा यांच्या पुस्तकाचे वाचनानें मनांत उद्भवतात, व त्यासंबंधानें आजच आणखी दोन शब्द लिहिणार होतों, परंतु स्थलसंकोचास्तव तो बेत सध्यां रहित करणें भाग आहे.

---

## १६. खोटें कोण ?

[ २१ फेब्रुआरी १९०५ ]

येशूख्रिस्त ( एशियाटिक ) :– जो सत्याचा आहे तो माझें म्हणणें जाणतो.

पायलेट (युरोपियन) :– कसलें सत्य ?

नवा करार सें. जॉन, १९, ३६–७.

"English falsehood is incomparably superior to it (French) as an exercise of mental sharpness and is always worth studying as an inexhaustible subject for the most watchful and interesting analysis .... the intelligent Englishman knows that truth is the most important ingredient in a wellconcocted falsehood." ...

... Philip. Gilbert Hamerton.

वर जो येशूख्रिस्त आणि हल्लीं, हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें इंग्रजी राज्यकर्ते म्याजिस्ट्रेट असतात त्याप्रमाणें येशूचे वेळीं पॅलेस्टाइनमध्यें असलेला रोमन म्याजिस्ट्रेट यांमधील संवाद दिला आहे तो १९०० वर्षांचा जुना आहे. येशूख्रिस्तास रोमन म्याजिस्ट्रेटा ( पायलेट) पुढें ज्यू लोकांनीं नेलें असतां पायलेटनें त्यांस 'तूं ज्यू लोकांचा राजा आहेस काय ?' असें विचारलें. तेव्हां ख्रिस्तानें आपलें राज्य या लोकांचें नाहीं असें सांगून, सत्य हें ज्यांचें ब्रीद आहे त्यास मी काय म्हणतों तें समजेल, असा जवाव दिला आहे. परंतु अधिकाराच्या मदानें चढलेल्या पायलेटास सत्य कोठून कळणार ? त्यानें उपहासानें 'कोठलें सत्य ? सत्य तें काय ?' असा उलट येशूख्रिस्तास प्रश्न केला आहे. लॉर्ड बेकन याच्या सत्यावरील निबंधांत आरंभीं हेंच अवतरण घेतलें आहे, व लॉर्ड कर्झन यांचें कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदानाचे वेळीं झालेलें भाषण वाचून वरील संवादाचीच आम्हांस आठवण होते. मनगटाच्या जोरावर साम्राज्य संपादन करणाऱ्या रोमन लोकांचा म्याजिस्ट्रेट यानें सत्याची पर्वा न धरितां दोन हजार वर्षांपूर्वीं चोरास (वाराव्बास) सोडून संन्याशाला सुळी देण्याचें ज्याप्रमाणें काम केलें तसेंच विसाव्या शतकांत इंग्रजी बादशाहाचे मुखत्यार लॉर्ड कर्झन यांनीं करण्यास सुरवात केली आहे हें पाहून आम्हांस अत्यंत खेद होतो. दोन हजार

वर्षांपूर्वीं युरोपियन लोकांस सत्य समजत नव्हतें असें बायबलांतील वरील विचारावरून उघड होत आहे. लॉर्ड कर्झन यांचा बायबलावर विश्वास आहे किंवा नाहीं हें आम्हीं सांगूं शकत नाहीं; व त्याची आम्हांस जरूरहि नाहीं. कारण चान्सेलर या नात्यानें त्यांनीं जीं कांहीं विधानें केलीं आहेत तीं इतकीं पोरकट व चुकीचीं आहेत कीं, तीं खोटीं आहेत असें दाखविण्यास आमचेजवळ बायबलापेक्षां दुसरीं अनेक साधनें आहेत. परंतु ख्रिस्ती धर्माच्या पाश्चिमात्य राष्ट्रांचा सत्याबद्दलचा बाणा एशियाटिक लोकांपेक्षा अधिक प्रखर आहे असें प्रतिपादन करणारास बायबलांतील वाक्याची प्रथमतः आठवण देणें जरूर आहे. युरोपियन राष्ट्रांत जर सत्याचा अभिमान वाढला असेल तर तो एशियांत उत्पन्न झालेल्या ख्रिस्ती धर्मामुळेंच वाढलेला आहे किंबहुना, ख्रिस्त, महंमद, श्रीकृष्ण, बुद्ध व कन्फ्यूशस वगैरे जे धर्मप्रवर्तक झाले ते सर्व एशियांतच उत्पन्न झाले असून एकहि युरोपांत जन्मला नव्हता, हें त्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

लॉर्ड कर्झन हे ज्याप्रमाणें व्हाइसरॉय आहेत त्याप्रमाणें कलकत्ता युनिव्हर्सिटीचे चान्सेलरहि आहेत; व चान्सेलर या नात्यानें विद्याभ्यास पूर्ण होऊन पदवी घेण्यास आलेल्या विद्यार्थ्यांस थोडाबहुत उपदेश करणें हें त्यांचें कर्तव्य आहे, ही गोष्ट आम्हांस कबूल आहे. परंतु हें कर्तव्य इतकें पवित्र आहे कीं, यावेळीं व्हाइसरॉयांनीं धर्माचार्याप्रमाणें आपल्या मनोवृत्ती अगदीं सात्त्विक ठेवून अक्रोध, शांती, क्षमा, नातिमानिता या दैवी संपत्तीचेंच आविष्करण करावयास पाहिजे. आणि त्यांनीं तसें केलें असतें तर सर्वांनीं त्यांची प्रशंसाच केली असती. 'सत्यं वद, धर्मं चर' अशा प्रकारें कोणीहि विद्यार्थ्यांस उपदेश केला तर तो ग्राह्यच आहे. परंतु या अशा पवित्र समयीं आचार्यांच्या आसनावर आरूढ झालेला मनुष्य जेव्हां दुसरीकडे उच्छृंखल झालेल्या आपल्या मनोवृत्तींस स्वैर संचार करण्यास परवानगी देतो आणि अभिमान, क्रोध, तारुण्य व अज्ञान हे राजस व तामस भाव प्रगट करून आसुरी संपत्तीचा योग दाखवितो, तेव्हां या अनुचित कर्मानें विचारी लोकांच्या अनुकंपेस मात्र तो आपणांस पात्र करून घेतो यांत शंका नाहीं. लॉर्ड कर्झन हे जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांस अशी घमेंड होती कीं आपल्या वक्तृत्वानें हिंदु लोकांच्या पुढाऱ्यांस आपण मोह पाडूं आणि गोडीगुलाबीनें त्यांच्या गळ्याभोंवतीं दोरी घट्ट करून त्यांस हसत्या मुखानें कायमच्या दास्यत्वांत गोंवून टाकूं. पण ही त्यांची कल्पना त्यांच्या मनोदयाप्रमाणें सिद्धीस गेली नाहीं. लॉर्ड कर्झन यांच्या जिव्हेप्रमाणें त्यांचे अंतःकरण प्रेमळ नाहीं असें हिंदुस्थानांतील लोकांस लवकरच कळून आलें; आणि तेव्हांपासून युनिव्हर्सिटीचें बेकायदेशीर काम कायदेशीर करण्याकरितां

जो परवां वाद झाला तेथपर्यंत लाटसाहेबांच्या बोलण्यावर कोणत्याहि विचारी हिंदूनें कधींहि विश्वास ठेवला नाहीं. अशा रीतीनें झालेलें स्वरूपाविष्करण लॉर्ड कर्झन साहेबांस असह्य झालें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. व त्याकरतां हिंदुस्थानावरील लोकांवर वाग्बाण सोडून त्यांनीं आपल्या मनांतील क्रोधाची शांति करून घेतल्यास त्यांत कांहीं मानवी स्वभावाविरुद्ध झालें असें म्हणतां यावयाचें नाहीं. स्वतःची लबाडी उघडकीस आली असतां कोणीहि मनुष्य 'चोराच्या उलटचा बोंबा' या न्यायानें असेंच अकांडतांडव करणार हें उघड आहे. आम्हांस वाईट वाटतें तें एवढेंच कीं, लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या अंतःकरणांतील क्रोध ओकून टाकून सरस्वतीचें पवित्र आणि शुचिर्भूत मंदिर अशुची केलें ! सरस्वतीच्या पवित्र मंदिरापेक्षां अंतःकरणांतील ही घाण काढून टाकण्यास लॉर्ड साहेबांस एखाद्या डिनरपार्टीनंतर मदिरेच्या आवेशांत भाषण करण्याचा उचित प्रसंग केव्हां तरी आला नसता असें नाहीं. त्याकरितां चान्सेलरच्या अधिकाराचा दुरुपयोग करण्याचें कांहीं एक कारण नव्हतें.

विद्यार्थी-आश्रमांतून गृहस्थाश्रमांत जाणाऱ्या तरुण लोकांस सत्याच्या मार्गानें चला, कोणाचें आर्जव करूं नका, आपापलीं मतें प्रमाणें पाहून स्वतः बनवा, शब्दापेक्षां कृतीकडे अधिक लक्ष द्या आणि आपल्या देशाचें व राज्याचें जेणेंकरून हित होईल अशी वर्तणूक ठेवा, असा उपदेश करणें अत्यंत हितकारक आहे. परंतु असा उपदेश करण्याचा प्रसंग साधून त्यांत जेव्हां एखादा उपदेशक आपल्या खोटया मनोवृत्तीची शांती करण्याचा प्रयत्न करतो तेव्हां तो अर्थातच आपणास लोकांच्या निंदेस व अभिशापास पात्र करून घेतो. लॉर्ड कर्झन यांची स्थिति अशाच प्रकारची झाली आहे. यांच्या कारकीर्दीच्या धोरणावर जी चोहोंकडून कडक टीका होत आहे त्यामुळें त्यांचें डोकें फिरून जाऊन ते सरस्वतीच्या पवित्र मंदिरांतहि घाण करण्यास तयार झाले आहेत. एरवीं 'सत्यं वद' असा विद्यार्थ्यांस उपदेश करण्याच्या वेळीं सत्याचा बाणा युरोपियन लोकांत अधिक असतो, असें असत्य विधान करून त्यांनीं आम्हां एशियाटिक लोकांचा उपमर्द व मानहानि केली नसती. लॉर्ड कर्झन यांच्या भाषणांतील मुख्य विषारी भाग म्हटला म्हणजे हाच होय. यांतून इंग्रजी मुत्सद्यांच्या लबाडींत अग्रगण्य झालेल्या लॉर्ड कर्झन साहेबांनीं असे उद्गार काढावे म्हणजे सैतानानें बायबलांतील वाक्यें म्हटल्यासारखेंच आश्चर्यकारक व उद्वेगजनक आहे. त्यांतून लॉर्ड कर्झन यांचा आक्षेप हिंदुस्थानांतील लोकांवरच नव्हे तर सर्व एशियाखंडांतील लोकांवर आहे, हें लक्षांत आणलें म्हणजे पायाची तिडीक मस्तकास गेल्याखेरीज राहात नाहीं. आज एशियाखंडांतील जपानी राष्ट्र आपल्या शौर्यानें आणि तेजानें युरोपांतील युद्धकलेंत अग्रगण्य मानलेल्या

राष्ट्रास एकसारखें पराभूत करीत आहे अशा वेळीं एशियाटिक लोक खोटे आणि युरोपियन लोक खरे असें कलकत्ता युनिव्हर्सिटींतील विद्यार्थ्यांपुढें उद्गार काढणें धाडसाचें आणि मूर्खपणाचें नव्हे काय ? लॉर्ड कर्झन म्हणतात कीं, महाभारतांत सत्याचा महिमा गाईला आहे, पण त्यास कांहीं अपवाद दिले आहेत; आणि एवढ्यावरून त्यांनीं असें विधान केलें आहे कीं, सत्याची किंमत एशियांतील लोकांपेक्षां युरोपिअन लोकच जास्त ओळखतात. लॉर्ड कर्झन यांस महाभारत कितपत कळत असेल याची वानवाच आहे. आणि कळलें असलें तरी भारतांतील मधुर वचनांचा त्यांच्या अंतःकरणांत कटु परिपाक झाला आहे. सर्पांप्रमाणें दूध पिऊन ते गरळ ओकीत आहेत असें त्यांच्या हल्लींच्या उक्तीवरून उघड होतें. यास पुरावा पाहिजे असल्यास फार लांब जावयास नको. संस्कृत वाङ्मयाचा ज्यांनीं आजन्म अभ्यास केला होता अशा मॅक्समूलरसाहेबांनीं या विषयावर...... 'India— What can it teach us ? ' या ग्रंथांत दुसरें व्याख्यान दिलें आहे तें वाचून पाहिलें असतां कोणाचीहि खात्री होईल कीं, हिंदुलोक युरोपियन लोकांइतकेच सत्यप्रिय आहेत. या व्याख्यानाच्या शेवटीं मॅक्समूलर-साहेब असें म्हणतात कीं, ' हिंदुस्थानांतील लोक लबाड आहेत, असा मनाचा ग्रह करून घेऊन जे तरुण इंग्रजी अधिकारी ( सिव्हिल सर्व्हंट ) हिंदुस्थानांत जातात त्यांच्यापेक्षां हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या अस्तित्वास अधिक धोका आणणारी अपायकारक किंवा हानीकारक दुसरी कोणतीहि गोष्ट मला दिसत नाहीं.' * मॅक्स मूलरसाहेबांचे हे उद्गार अक्षरशः खरे आहेत; व सिव्हिल सर्व्हंटांच्या ऐवजीं व्हाइसरायहि जेव्हां असेच वरळूं लागतात तेव्हां त्यांनीं इंग्रजी राज्याच्या चिरस्थायीपणाबद्दलचे काढलेले उद्गार विशेष जोरानें लागूं पडतात हें लॉर्ड कर्झनसारख्या मुत्सद्यास आम्ही कळविलें पाहिजे असें नाहीं. सुदैवानें

---

* Certainly I can imagine nothing more mischievous, more dangerous, more fatal to the permanence of English rule in India, than for the Young Civil Servants to go to the country with the idea that it is a sink of moral depravity, an ant's nest of lies; for no one is so sure to go wrong, whether in public or in private life, as he who says in his haste : " All men are liars. "

Max Muller– India:– What can it teach us ? P. 75. Ed. 1892.

ॲलेक्झांडर बरोबर आलेल्या ग्रीक लोकांपासून तों मनरो मालकम वगैरे अलीकडील इंग्रजी अधिकाऱ्यांपर्यंत शेकडों मुत्सद्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांच्या सत्यनिष्ठते-बद्दल अनेक वेळां साक्ष दिलेली आहे; व मॅक्समूलरसारख्या संस्कृतज्ञ पंडितांनीं श्रुति, स्मृति व पुराणें यांचे पुरावे देऊन राष्ट्रीय वाङ्मयाच्या साहाय्यानेंहि हीच गोष्ट बेमालूम सिद्ध केलेली आहे. करितां लॉर्ड कर्झन यांचें अशा रीतीनें खंडन करण्याची आज आम्हांस कांहीं आवश्यकता दिसत नाहीं. लॉर्ड कर्झन जें कांहीं बोलले तें संस्कृत वाङ्मयाचा आधार घेऊन बोलले असें नाहीं, तर क्रोधाच्या आवेशानें त्यांनीं आपल्या अंतःकरणांतले विचार व एशियाटिक लोकांबद्दल तिरस्कारबुद्धि जगांत व्यक्त केलेली आहे. त्यांनीं आपल्या भाषणांत एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, 'सर्वच युरोपियन लोक नेहमीं खरें बोलतात किंवा एशियाटिक लोक जाणूनबुजून खोटे बोलतात असें मी म्हणत नाहीं; पहिला सिद्धांत वेडेपणाचा आणि दुसरा उपमर्दकारक होईल.' आमच्या मतें हें वाक्य तर अतिशयच मूर्खपणाचें आहे 'सर्वच युरोपियन लोक नेहमीं खरें बोलतात असें नाहीं' याच्या जोडीस 'सर्वच एशियाटिक लोक नेहमीं खोटें बोलतात असें नाहीं.' असें वाक्य पाहिजे; पण तसें न घालतां 'सर्वच एशियाटिक लोक जाणूनबुजून खोटें बोलतात असें नाहीं,' असें वाक्य घातलें आहे. म्हणजे एशियाटिक लोकांत जर कांही अपवाद असला तर तो खरें बोलणारांचा नव्हे तर न कळत खोटें बोलणारांचा आहे, असें यांत ध्वनित केलें आहे! सारांश एशियाटिक लोक कोणत्या तरी रूपानें नेहमीं खोटें बोलतात असें लॉर्ड कर्झन यांचें म्हणणें आहे; आणि ही त्यांची संवय जावी म्हणून लाटसाहेबांनीं विद्यार्थ्यांपुढें सत्याचा महिमा गाइला आहे. लाटसाहेबांचे हे उद्गार ऐकून इसापनीतींतील वैद्य होऊं पाहणाऱ्या वेडकाची आम्हांस आठवण होते. जगामध्यें दुसऱ्याचें स्वातंत्र्य, पैसा किंवा वैभव गोड बोलून कसें हिरावून घ्यावें, ही मायावी विद्या इंग्रज लोकांपेक्षां कोणासहि जास्त अवगत नाहीं, असें पुष्कळ इंग्रजी ग्रंथांतून आम्ही वाचलेलें आहे; व आमचे बंधु 'गुजराथी' वर्तमानपत्रकार यांनीं गेल्या अंकांत या अर्थाचा हॅमर्टनच्या ग्रंथांतील एक उताराहि दिलेला आहे. क्लाइव्ह, हेस्टिंग्ज वगैरे मुत्सद्यांचीं हिंदुस्थानच्या इतिहासांतील उदाहरणें तर सर्वप्रसिद्धच आहेत. पण याहिपेक्षां ताजीं उदाहरणें पाहिजे असल्यास लॉर्ड लिटन किंवा लॉर्ड कर्झन यांचींच होत. हिंदु प्रजेस महाराणीसाहेबांनीं दिलेलीं वचनें मोडून आम्ही फसवीत आहों, असें लॉर्ड लिटन यांनीं एके ठिकाणीं कबूल केलें आहे आणि राणीचा जाहीरनामा 'अशक्य सनद' म्हणून बाजूस ठेवण्यास खुद्द लॉर्ड कर्झन तयार आहेत. सारांश, हत्तीचे ज्याप्रमाणें दाखविण्याचे दांत

एक व खावयाचे एक तसा इंग्रजी राज्यपद्धतीचा मासला आहे. आणि या मायावी राज्यपद्धतींत लॉर्ड कर्झन हे अगदीं अग्रगण्य आहेत; इतकेंच नव्हें तर अगदीं क्षुल्लक कामाकरितां देखील विनदिक्कत खोटें बोलण्याची लॉर्ड कर्झन यांस संवय लागलेली आहे असें त्यांनीं आपल्या एशियाखंडांतील प्रवासासंबंधानें जें बुक लिहिलें आहे त्यांतील एका गोष्टीवरून दिसून येतें. या प्रसंगाचा त्यांच्या ग्रंथांतील उतारा आमचे बंधु 'अमृतबझारपत्रिका' कार यांनीं आपल्या पत्रांत दिला आहे. हिंदुस्थानांत व्हाइसराय होण्यापूर्वीं लॉर्ड कर्झन हे एशियाखंडांतून प्रवास करून गेले. या प्रवासांत कोरिया द्वीपकल्पाच्या राज्यांतील फॉरिन ऑफिसचे प्रेसिडेंट यांस भेटण्याकरितां लॉर्ड (त्यावेळीं नुसते मिस्टर) कर्झन यांची स्वारी गेली होती. भेटीस जाण्यापूर्वीं मि. कर्झन यांस असें समजलें होतें कीं, कोरिया देशांत तरुण मनुष्यास फारसा मान देत नाहीत; तेव्हां भेटीच्या वेळीं कर्झनसाहेबांनीं कोरियाच्या प्रधानास जीं उत्तरें दिलीं तीं खालीं लिहिल्याप्रमाणें :—

कोरियाचे प्रधान :— तुमचें वय काय ?

कर्झन:— ( विनदिक्कत ) चाळीस.

कोरियाचे प्रधान:— वयाच्या मानानें आपण फारच तरुण दिसतां, याचें कारण काय असावें ?

कर्झन:— कारण मी आपल्या राज्याच्या सुंदर हवेच्या मुलुखांत आज महिनाभर प्रवास करीत आहे.

लॉर्ड कर्झन यांचें वय यावेळीं फक्त ३३ वर्षांचे होतें, असें असून केवळ कोरियाच्या प्रधानास खूष करण्याकरितां व त्याचें आपल्याबद्दल चांगलें मत व्हावें म्हणून आपलें वय ४० वर्षांचें आहे असें त्यांनीं सांगितलें आणि तेंहि बिनदिक्कत ( unhesitatingly ) सांगितलें असें मोठ्या फुशारकीनें त्यांनीं आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे ! बरें हें जें चाळीत वर्षांच्या वयांत दिसणारें अपूर्व तारुण्य याचें कारण काय ? असा जेव्हां कोरियाच्या प्रधानानें प्रश्न केला तेव्हां लॉर्ड कर्झन यांनीं मोठ्या शिताफीनें कोरियाच्या राज्याच्या सुंदर हवेची स्तुति करून वेळ मारून नेली आहे. परंतु एवढ्यानेंच संपलें असें नाहीं. कोरियाच्या प्रधानानें पुढें आणखी असें विचारलें कीः—

को. प्रधान :— आपण इंग्लंडच्या राणीसाहेबांचे जवळचे आप्त आहां ?

कर्झन :— नाहीं. ( हें उत्तर कोरियाच्या प्रधानांस आवडलें नाहीं असें पाहून ) परंतु माझें लग्न अद्याप व्हावयाचें आहे.

लॉर्ड कर्झन साहेबांचें हें उत्तर त्यांसच लवाडीचें वाटलें, (unscrupulous) असें त्यांनीं आपल्या ग्रंथांतच म्हटलें आहे. परंतु अशा लवाडीच्या उत्तरानें कोरियाच्या वृद्ध प्रधानाची मर्जी संपादन केली असें लिहिलें आहे. मि. कर्झन हे हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन झाल्यानंतर काढलेल्या नव्या आवृत्तींत हें संभापण गाळलें आहे, ही छपवाछपवीहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. लॉर्ड कर्झन यांच्या बुकांतील हा उतारा अत्यंत मनन करण्यासारखा आहे. कोरियाचा प्रधान आणि प्रवासी मि. कर्झन यांच्या भेटीचा हा प्रसंग कोणत्याहि प्रकारें राजकीय महत्त्वाचा नव्हता कीं, जेणेंकरून पॉलिसी किंवा डिप्लोमसी ( राजनीति ) या महासववीवर असत्याचा विटाळ त्यांना काढून टाकतां येईल. इंग्लंड देशांतील एक श्रीमंत प्रवासी कोरिया देशांत गेला असतां तेथील प्रधानास तो भेटण्यास जातो आणि माझें लग्न होणार आहे, सबब आतांच मी राजशालक नाहीं असें मानूं नका, असें ध्वनित करतो आणि बिनदिक्कत आपलें वय ४० वर्षांचें आहे असें सांगून आणि कोरिया देशाच्या हवेची स्तुति करून ज्या गृहस्थाकडे भेटीस गेला त्याची मर्जी संपादन करतो, यापेक्षां आणखी जास्त खोटेपणा तो काय? असल्या क्षुल्लक कारणाकरितांहि ज्या देशांतील मोठे पुरुष खोटें बोलण्यास तयार होतात त्या देशांतील नांवाजलेले मुत्सद्दी गोडगोड थापा देऊन हिंदुस्थानच्या लोकांचें अहित करण्यास व आपल्या देशबांधवांचा स्वार्थ साधण्यास तयार झाल्यास त्यांत नवल तें कोणतें? परंतु कालाची गति अशी विचित्र आहे कीं, अशा प्रकारचे लोक व गृहस्थ पारतंत्र्यामुळें दीनावस्थेस पोंचलेल्या आम्हां हिंदू लोकांस किंबहुना एशियांतील सर्व लोकांस सरस्वतीच्या पवित्र मंदिरांत उभे राहून गंभीरपणानें "युरोपियन लोक जात्याच अधिक सत्यप्रिय आहेत करितां त्यांचें तुम्ही अनुकरण करा" असें सांगण्यास तयार झाले आहेत. अशा धाष्ट्र्याच्या व लवाडीच्या कृत्यास निर्लज्ज ही संज्ञा देणें म्हणजे सर्पाच्या व वृश्चिकाच्या विषाची तुलना करणें होय. लॉर्ड कर्झन यांस 'ओरिएंटल डिप्लोमसी' ही संज्ञा आठवली पण त्याचबरोबर 'मॅकव्हीलियन पॉलिसी' 'परफिडीयस आल्बियन' म्हणजे 'विश्वासघातकी इंग्रजी राष्ट्र' ह्या म्हणी आठवल्या नाहींत काय? आमचें असें म्हणणें नाहीं कीं, एशिया खंडांतील लोक मुळींच खोटें बोलणारे नाहींत. चोर, चहाड, लुच्चे, लवाड, युरोपाप्रमाणें एशियाखंडांतहि आहेतच, व जर कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, पारतंत्र्यावस्थेंत उद्दाम राज्यकर्त्यांची खुशामत करण्याकरितां हिंदुस्थानांतील लोकांस प्रत्यक्ष नाहीं तर अप्रत्यक्ष रीतीनें पूर्वीपेक्षां हल्लीं अधिक असत्याचा आश्रय करावा लागतो तर तेंही म्हणणें आम्ही

क्षणभर कबूल करूं. पण याचा दोष सर्वस्वी परकीय राज्यकर्त्यांकडे आहे. लॉर्ड कर्झन यांनीं हिंदुस्थानांतील लोकांस इंग्रजी राज्यांत आपले गुण दाखविण्यास पुष्कळ जागा आहे, असें आपल्या भाषणाच्या शेवटीं म्हटलें आहे. पण हें विधान निवळ लबाडीचें आहे असें उघड सिद्ध करून दाखवितां येईल. एखादी हायकोर्टांतील जज्जाची जागा हिंदी लोकांस दिली म्हणून तेवढ्यानें कांहीं होत नाहीं. इंग्रजी राज्यांत हिंदी लोकांच्या गुणांची पायमल्ली होत आहे, त्यांच्या मतांस कांहीं मान नाहीं, कर्तृत्व दाखविण्यास जागा नाहीं आणि राज्यकर्त्यांची खुशामत केल्याखेरीज बढती मिळत नाहीं अशीच मुख्यत्वेंकरून हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांची ओरड आहे. अशा स्थितींत तुम्ही वाचाळता सोडून क्रिया करा, स्वतंत्र मतें बनवा, खुशामत करूं नका, असा त्यांस उपदेश करणें म्हणजे दुःखावर डाग देण्यासारखें आहे. वर्तमानपत्रांतील लेख वाचून आपलें मत बनवूं नका, हा उपदेश विलायतेंत लॉर्ड कर्झन यांनीं केला असता काय ? वर्तमानपत्रांतील लेखांस जर महत्त्व द्यावयाचें नाहीं तर लॉर्ड कर्झन यांच्या बोलण्यास तरी काय म्हणून मान द्यावयाचा ? ते व्हाइसरॉय आहेत एवढ्याचकरितां काय ? त्यांचा सत्यवादीपणा किती किमतीचा आहे हें वर दिलेल्या त्यांच्या उताऱ्यावरूनच व्यक्त होत आहे. अशा प्रकारच्या असत्यवादी आणि कुटिल इंग्रजी राजनीतींतील पुरुषानें आम्हांस उपदेश करण्यास तयार व्हावें, हें आमचें मोठेंच दुर्भाग्य होय, व आम्हांस अत्यंत खेद होतो कीं, व्हाइसरायांसारख्या मोठ्या अधिकाऱ्याबद्दल आमच्यावर अशा रीतीनें लिहिण्याचा आज प्रसंग यावा. परंतु सत्याची योग्यता सर्वांत अधिक आहे व सत्य हें त्रिकाल अबाधित आहे, या सिद्धांताचें महत्त्व लक्षांत आणूनच आम्ही हा लेख लिहिण्याचें साहस केलें आहे व त्याबद्दल व्हाइसराय हे माफी करतील अशी आम्हांस उमेद आहे.

## १७. परवश झालेल्या नेटिव अंमलदारांचें मानसिक दौर्बल्य

[ २० जून १९०५ ]

" सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः । "

– भर्तृहरी

दुसऱ्याची नोकरी करणें म्हणजे केव्हांही झालें तरी स्वाभिमानास कमीपणा आणणारें आणि मोठ्या जोखमीचें काम होय. आपलें शरीरच नव्हे तर आपलें मन व विचार यांवरील आपली सत्ता काढून मानाकरितां व उदरपोषणाकरितां क्षणभर तरी दुसऱ्याच्या ताब्यांत देणें म्हणजे तितक्या कालपर्यंत आपलेपणा विसरणें होय. " **उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी** ' अशी जी आपल्यांत म्हण आहे त्यांतील बीज हेंच होय. आपला धनी आपल्या धर्मांतील, आपल्या देशांतील किंवहुना आपल्या आप्तांतील असला, तरी त्याची सेवा करणें म्हणजे निसर्गतः आपणांस प्राप्त झालेलें स्वातंत्र्य गुंडाळून ठेवून, आपली बुद्धि, चातुर्य, शहाणपण व धैर्य यांचा उदरपूरणाकरितां कांहीं कालपर्यंत तरी विक्रय करणेंच होय. त्यांतून ज्या प्रभूची आपण सेवा करतों तो प्रभू जर स्वदेशांतला असेल अथवा स्वदेशाचें किंवा त्यांतील लोकांचें हित करणारा असेल, तर क्षणभर स्वाभिमान एका बाजूस ठेवून आपण सेवावृत्ति स्वीकारल्याचा देशास कांहीं तरी उपयोग होण्याचा संभव असतो. पण तोच स्वामी जेव्हां परकीय असतो तेव्हां त्याची सेवा करण्यांत स्वातंत्र्याची व स्वाभिमानाची होळी होते इतकेंच नव्हे, तर त्याबरोबर देशाचें अहित होऊं शकतें. हाच हेतु मनांत धरून पंचतंत्रांत " **सेवया धनमिच्छद्भिः सेवकैः पश्य यत्कृतम् । स्वातंत्र्य यच्छरीरस्य मूढैस्तदपि हारितम्** " ॥ याप्रमाणें सेवकांची निर्भर्त्सना केलेली आहे. त्याचप्रमाणें व्यासांनींहि जिवंत असून मेलेले पांच प्रकारचे जें लोक सांगितलेले आहेत त्यांतहि ' नित्यसेवकः ' असा एक वर्ग सांगितला आहे. हा नित्यसेवकांचा वर्ग म्हटला म्हणजे आमच्याकडील पांढरपेशांचा वर्ग होय. हा वर्ग बुद्धीनें इतर वर्गांपेक्षां श्रेष्ठ असून विद्यार्जनाच्या कामींहि इतर लोकांपेक्षां अधिक दृढ उद्योग करणारा आहे, ही गोष्ट खरी पण वंशपरंपरागत आपापल्या कुलांत किंवा ज्ञातींत चालत असलेल्या सेवाधर्मामुळें त्याच्या स्वाभिमानादि मनोवृत्ति थोड्या बहुत तरी बोथटल्याच असतात. स्वराज्यांत या वर्गाचा हा बोथटपणा

प्रजेस किंवा राष्ट्रास घातुक होत नाहीं. पण स्वराज्य जाऊन परराज्य झालें म्हणजे हा सेवकवर्ग परकीय राजांस आपले मतलब साधण्यास चांगला उपयोगी पडतो, इतकेंच नव्हे तर सेवाधर्मांत होणारा स्वाभिमानाचा ऱ्हास अधिकाधिक वाढत जाऊन परकीय राजांच्या अमलाखालीं हा वर्ग स्वदेशाचा शत्रु बनण्याचा प्रसंग येतो. परराज्याखालीं देशांतील बुद्धिमान् लोकहि नैतिकदृष्ट्या निकृष्टावस्थेस पावतात असें मि. दादाभाई नौरोजी यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे त्याचा प्रत्यय हल्लींच्या कालीं सबॉर्डिनेट सर्विसमध्यें या देशांत डेप्युटी कलेक्टर, मामलेदार किंवा मॅजिस्ट्रेट वगैरे जे कांहीं नेटीव कामगार आहेत त्यांची स्थिति अवलोकन केली असतां सहज येणार आहे. अव्वल इंग्रजींत म्हणजे ज्यावेळीं परकीय अमलाचें जूं आमच्या मानेवर पूर्णपणें बसलें नव्हतें तेव्हां दप्तरदार किंवा मामलेदार अशा मोठ्या अंमलदारांस वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांकडून थोडा-बहुत तरी मान मिळत होता आणि त्यांची सल्ला सरकार जमेस धरत असे. पण तेहि दिवस आतां राहिले नाहींत. या अंमलदारांच्याच सहाय्यानें इंग्रजसरकारानें जिल्हानिहाय किंवा गांवोगांव जमिनीची, जंगलाची, किंवा अन्यतऱ्हेची खडान्खडा माहिती गोळा करून ती पुस्तकरूपानें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपयोगाकरितां प्रसिद्ध केलेली आहे. ही माहिती जेव्हां गोळा झाली तेव्हां ती गोळा करणारांच्या मनांत अशी कल्पनाहि आली नसेल कीं, या माहितीच्या जोरावर वरिष्ठ युरोपियन अधिकारी पुढें आपली अगदीं पायमल्ली करून टाकतील. कसेंहि असो, खालच्या प्रतीच्या किंवा वर दिलेल्या म्हणीप्रमाणें पहिल्या प्रकारच्या शेतकरी वगैरे वर्गांत "आम्हांस जर कोणी बुडविलें असेल तर तें सरकारापेक्षां पांढरपेशा वर्गानेंच बुडविलें" असा जो समज झालेला कधीं कधीं दृष्टोत्पत्तीस येतो तो अगदीं निष्कारण आहे असें नाहीं. लोकांचीं इनामें खालसा करण्यास काय युक्ति करावी, सनदांतील स्पष्ट शब्दांचा अर्थविपर्यास कसा करावा, पूर्वापार चालत आलेल्या वतनदार लोकांच्या हक्कांस हळु हळू पण पूर्ण आळा कसा घालावा, सारा कसा वाढवावा, लोकांचीं जंगलें कशीं घ्यावीं, अथवा मिठाचा आणि अबकारीचा बंदोबस्त करून उत्पन्न कसें वाढवावें याबद्दलच्या युक्त्या स्वराज्यांत तयार झालेल्या पांढरपेशा वर्गानेंच परकीय राज्यकर्त्यांस सांगून त्यांस हुषार केलें आहे. सारांश, आम्हीच आमच्या घरचा भेद या राज्यकर्त्यांस देऊन त्यांची शाबासकी किंवा सर्टिफिकीटें मिळविलीं आहेत. परंतु त्याचा पुढें काय परिणाम होईल इकडे त्यावेळीं कोणी लक्ष दिलें नाहीं. ही माहिती इंग्रज-सरकारास आतां आमच्याकडून मिळण्याची जरूर उरली नाहीं. सेवकवर्गाचा आतां मान बहुतेक नाहींसा झालेला आहे; आणि त्यांतील सर्व लोक वरिष्ठ युरोपियन

अधिकारी जे हुकूम करतील ते अंमलांत आणण्याचीं यंत्रें बनून राहिले आहेत. देशांतील बुद्धिमान लोकांचा सगळा वर्ग अशा रीतीनें उदरपोषणाकरितां परकीय राज्यकर्त्यांच्या अगदीं कह्यांत गेल्यावर देशाची उन्नति लवकर झाली नाहीं, तर त्यांत नवल तें कोणतें ? सेवाधर्म हा गुणच असा आहे कीं त्यांत स्वाभिमानादि इतर गुण लोपून जातात; आणि विशेषेंकरून ज्या वेळीं अशा प्रकारचे सेवक तयार करण्याकरितां शाळा व कॉलेजें स्थापून त्यांतून देशांतील तरुण पिढीस सदर धर्मास अनुकूल असें आरंभापासूनच शिक्षण देण्यांत येतें तेव्हां या वर्गाच्या आंगचे गुण सेवाधर्मांपुढें लोपतात इतकेंच नव्हें तर तरुण पिढींत सेवाधर्मास योग्य अधिकारी होण्यापूर्वीच ते गुण बहुतेक नामशेष होतात. अशाहि परिस्थितींत एखादा तरुण विद्यार्थी जरासा तेजस्वी निघाला तर तो नोकरींत पडल्याबरोबर लागलीच थप्पड खातो; आणि त्याहि थपडीनें ताळ्यावर न आल्यास लवकरच उदरपोषणाकरितां त्याला दुसरा कांहीं तरी मार्ग अंगिकारावा लागतो. ही स्थिति अत्यंत शोचनीय होय असें कोणीहि कबूल करील. पांढरपेशा वर्गाच्या पोषाखाकडे किंवा राहणीकडे दृष्टि दिली असतां हा वर्ग नैतिक दृष्टया इतक्या निकृष्ट दशेस पोचला असेल अशी सहसा कल्पना होत नाहीं. पण जरा खोल विचार केला तर खरी स्थिति काय आहे हें सहज कळून येतें. आम्हीं हा जो दोष दाखवीत आहों तो आमच्या लोकांचा असल्यामुळें आमच्यावर कदाचित् कांहीं शहाणी मंडळीं स्वजातिद्रोहाचाहि आरोप करण्यास मागेंपुढें पाहणार नाहीं. परंतु या परकीय राज्यांत आमच्या देशांतील प्रजेच्या हिताच्या आड ज्या कांहीं गोष्टी येताहेत–मग त्या राज्यकर्त्यांबद्दलच्या असोत किंवा स्वदेशी नोकरांबद्दलच्या असोत– त्यांचें निर्भयपणें विवेचन करणें हें आमचे कर्तव्य आहे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आमच्या देशांतील सेवकवर्गासंबंधानें वरच्याप्रमाणें उद्घाटण करणें अवश्य आहे. हे विचार आज सुचण्याचें कारण मद्रासइलाख्यांत गुंटूर जिल्ह्यांतील ओंगोल तेथील वकील एम् व्यंकट सुब्बाराव यांनीं "हिंदुस्थानांतील दुष्काळ आणि नेटिव मुलकी अंमलदार" यासंबंधानें नुकतेंच प्रसिद्ध केलेलें लहानसें पुस्तक होय. यंदाच्या सालचें प्रांतिक बजेट मद्रासच्या कायदेकौन्सिलापुढें मांडतांना मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड ॲम्प्टिल यांनीं असें बोलून दाखविलें होतें कीं, "दुष्काळच्या गैरव्यवस्थेबद्दल किंवा दुष्काळाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल सरकारास दोष देणें गैरवाजवी आहे. कारण सरकारास यासंबंधानें जी माहिती मिळते ती जिल्हयांतील डेप्युटी कलेक्टर, मामलेदार, भागकारकून, पोलीस आणि जंगल खात्याचे अंमलदार यांजकडून मिळत असते; आणि सरकारास खुष करण्याकरितां हे अंमलदार जाणूनबुजून खोटी माहिती देतात असें म्हणणें म्हणजे हुषार नेटिव

अंमलदारांची विनाकारण नालस्ती करणें होय. त्यांतून अशा तऱ्हेचे आक्षेप या अंमलदाराच्या देशबंधूंकडूनच यावेत हें मोठें आश्चर्य होय." लॉर्ड ॲम्प्टिल यांची ही कोटी खरोखरच मोठ्या चतुराईची आणि कावेबाजपणाची आहे. इंग्रजींत या कोटीस 'डायलेमा' म्हणत असतात. डायलेमा म्हणजे अन्यतरापत्तीचा दोष होय. उदाहरणार्थ, प्रस्तुत कोटींतच सरकारास नांव ठेवावें तर आपल्या जातींतील हुषार अंमलदारांस नांव ठेवावें लागतें. बरें देशी अंमलदार खरें बोलतात म्हणावें तर सरकारास दोष देण्यास प्रवृत्त झालेल्या लोकांचा इष्ट हेतु साधत नाहीं. कोणताहि पक्ष घेतला तरी तो सरकारास इष्टच आहे. अशा प्रकारच्या कोटीस उत्तर देण्याचे मार्ग आहेत, नाहींत असें नाहीं. तथापि लॉर्ड ॲम्प्टिल यांनीं ही कोटी करण्यांत जें बुद्धिकौशल्य दाखविलें त्याबद्दल आम्ही त्यांची तारीफ करतों. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, हें बुद्धिकौशल्य अस्थानीं म्हणजे खोटया पक्षाच्या समर्थनाकरितां खर्च झालेलें आहे. खरी स्थिति अशी आहे कीं, इंग्रजी राज्याची मगरमिठी जसजशी जास्त बसत चालली आहे त्या त्या मानानें सरकारी सेवेंत असलेल्या नेटिव अंमलदारांचें मानसिक धैर्य अधिकाधिक लुप्त होत चाललें आहे व वरिष्ठ अधिकाऱ्यांची मर्जी संपादन करण्याकरितां त्यांस पसंत पडतील असेच रिपोर्ट– मग ते खरे असोत वा खोटे असोत– हे अधिकारी निःशंकपणें करण्यास तयार झालेले आहेत. लॉर्ड ॲम्प्टिल यांच्या दृष्टीनें हा वर्ग मोठा हुषार असेल व आमच्या दृष्टीनेंहि तो कांहीं गैरहुषार नाहीं. – पण स्वाभिमान किंवा सत्यनिष्ठा हे गुण आमच्या दुर्दैवानें या वर्गाच्या आंगांत पूर्वीप्रमाणें आतां राहिले नाहींत, असें स्पष्टपणें म्हणण्यास आम्हांस कोणतीच हरकत दिसत नाहीं. तालुक्यांत यंदा किती पीक आलें आहे याचा रिपोर्ट जर मामलेदारांस करावयाचा असेल तर सदर रिपोर्ट केवळ वस्तुस्थिति पाहून तो करीत नाहीं; कलेक्टरसाहेबांचें मत काय आहे आणि त्यांस काय आवडेल या धोरणावरहि रिपोर्ट होत असतात, आणि एखादा वस्तुस्थिति पाहून रिपोर्ट करणारा भेटल्यास त्यांचें प्रायश्चित्त त्यांस लवकरच भोगावें लागतें! नेटिव अंमलदारांची अशा प्रकारें दुर्दशा होते आणि प्रजेच्या हितापेक्षां स्वार्थाकडे नजर देऊनच ते आपली नोकरी बजावीत असतात, याचा आम्हांस अनुभव आहे; इतकेंच नव्हे तर या वर्गांतील लोकांची मनोमय देवताही अशीच साक्ष देईल. लॉर्ड ॲम्प्टिल कदाचित् म्हणतील कीं, तुमचेच लोक जर असे भितरे आणि असत्यवादी आहेत तर आम्हीं काय करावें ? प्रश्न ठीक आहे; पण त्यास आमचें असें उत्तर आहे कीं, ॲम्प्टिल महाराज, हा जो नेटिव अंमलदारांच्या आंगांत दोष जडला आहे याचें खरें कारण आपल्यासारखे वरिष्ठ इंग्रजी अंमलदारच होत. आमच्या

इलाख्यांत हा कार्यकारणसंबंध क्राफर्ड कमिशनच्या वेळीं लोकांच्या चांगला निदर्शनास आला होता. क्राफर्डसाहेब लांच मागूं लागल्यावरोबर ग्रॅज्युएट मंडळी-सहि त्यांच्या जाळयांत सांपडण्याखेरीज दुसरा कांहीं मार्ग राहिलेला नव्हता. लॉर्ड रे यांस चांगले गव्हर्नर आम्ही म्हणतों तें एवढयाचकरितां कीं, त्यांनीं या कामांत खरा दोष कोणाचा हें ओळखून क्राफर्डावर खटला केला आणि नेटिव अंमलदारांस माफी दिली. लॉर्ड ॲम्प्टिल जर मद्रास इलाख्यांतील कामगारांस अशा प्रकारची माफी देण्यास तयार असतील तर मद्रासेंतील शेंकडों तहशीलदार किंवा डेप्युटी कलेक्टर दुष्काळासंबंधानें आपण खोटे रिपोर्ट कां केले यांचीं कारणें लॉर्डसाहेबांस मोकळया मनानें सादर करतील. मि. व्यंकट सुब्बाराव यांनीं आपल्या पुस्तकांत लॉर्ड ॲम्प्टिल यांच्या कोटीचें अशाच प्रकारें निराकरण केलें आहे; आणि आमच्या दृष्टीनें तें खरें आहे. इतकेंच नव्हे तर, आमच्या इलाख्यांतील अनुभवावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते असें त्यांस आम्ही कळवितों. किंबहुना आमच्या इलाख्यांतील अनुभव याहीपेक्षां भयंकर आहे, असें म्हटलें तरी चालेल. इलाख्याच्या राज्यव्यवस्थेचीं सूत्रें गव्हर्नर आणि कौन्सिलर यांच्या हातांत इतकीं दृढ आलीं आहेत कीं, नेटिव अंमल-दारच काय, पण कलेक्टरासारखे युरोपियन अंमलदारहि कौंसिलदाराच्या किंवा सेक्रेटरीएटमधील मताच्या विरुद्ध एखादी गोष्ट नेटानें करूं लागल्यास त्यास त्याच्या मानानें पगाराची शिक्षा न झाली तरी बदलीची शिक्षा भोगावी लागते. सरकारची अशा प्रकारची कदर असल्यावर केवळ वस्तुस्थितीप्रमाणेंच सरकाराकडे रिपोर्ट करण्याचें धैर्य असणारा मायेचा पूत एकादाच सांपडल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. राज्यव्यवस्थेंत नोकरी करणाऱ्या आपल्या हाताखालील देशी अधिकाऱ्यांत अशा प्रकारचें मानसिक दौर्बल्य असावें हेंच सरकारास इष्ट आहे व सर्व राज्यव्यवस्था ज्या रीतीनें चालली आहे ती रीत देशी अंमलदारांत अशा प्रकारचें मानसिक दौर्बल्य प्रत्यहि उत्पन्न करीत आहे. लॉर्ड ॲम्प्टिल यांस जर ही स्थिति माहीत नसेल तर त्यांचा चौकसपणा कमी आहे, असें आम्ही समजूं. आणि माहीत असूनहि जर सरकारच्या कृत्याचें वरच्याप्रमाणें ते समर्थन करीत असतील तर हें शहाणपणाचें ढोंग आहे असें म्हणावें लागेल. मानसिक धैर्याच्या बाबतींत पाहिलें तर देशी अंमलदारांचा वर्ग हल्लींच्या कालांत अगदीं कवडीमोलाचा झाला आहे, असें मोठया दुःखानें कबूल करावें लागतें. कलेक्टरसाहेबांस कोणती गोष्ट प्रिय आहे याची हे अधिकारी त्यांच्या बटलराकडून बातमी आणीत असतात; इतकेंच नव्हे तर सरकारच्या धोरणाचा वारा कसा वाहत आहे हें सूक्ष्म रीतीनें मोजण्यास यांचीं मनें अशा रीतीनें तयार झालेलीं असतात कीं, तीं विसाव्या शतकांतील वेधशाळेंतील

सूक्ष्म वायुमापक यंत्रासहि मागें टाकतील! यांच्या मंडळींत क्षणभर वसलें तर जी कांहीं चर्चा ऐकूं येते तीहि याच मासल्याची होय. स्वतःचें मत किंवा खात्री कोणत्याहि प्रकारची असली तरी हा उदरपोषणाविषयीं आतुर झालेला अंमलदार आपलें मत क्षणभर बाजूस ठेवून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मताप्रमाणेंच मत देणें हें आपलें कर्तव्य समजत असतो. कालेजांतून दरवर्षी बाहेर पडणाऱ्या उमेदवारांपैकीं बहुतेक लोक पहिल्यानें नाहीं तरी पुढें मागें जेव्हां अशा प्रकारच्या मानसिक दौर्बल्यानें ग्रस्त झालेले असतात, तेव्हां त्यांच्या बुद्धीचा किंवा अधिकाराचा देशास बिलकुल फायदा न झाल्यास त्यांत नवल तें कोणतें? कलकत्त्यास प्रसिद्ध होणाऱ्या 'न्यू इंडिया' नामक पत्राच्या गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या अंकांत बंगाल इलाख्यांतील नेटिव अधिकाऱ्यांचीहि स्थिति अशीच शोचनीय आहे, असें लिहिलें आहे. म्हणजे मद्रास, मुंबई आणि बंगाल या तिन्ही इलाख्यांतील नेटिव अंमलदारांच्या स्थितीचा अनुभव एकसारखाच आहे व जिकडे तिकडे एक प्रकारचेंच मानसिक दौर्बल्य माजत चाललें आहे, असें दिसतें. हें दौर्बल्य निघणार कसें? हा एक मोठाच प्रश्न आहे. आमच्या कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांस जर आम्हीं सांगितलें कीं, "बाबांनो तुम्ही सरकारची नोकरी करा; आम्ही नाहीं म्हणत नाहीं. तुमचे वरिष्ठ अधिकारी जे हुकूम करतील त्यांची अंमलबजावणी तुम्हांस केली पाहिजे, पण अशी अंमलबजावणी करणें यांत अंमलदारांस खुष करण्याकरितां खोटें मत देणें याचा समावेश होत नाहीं. सारांश, राजाची नोकरी करण्यांत प्रजेशीं बेइमानीपणा केलाच पाहिजे असें नाहीं. आणि एवढें जर तुम्हीं लक्षांत ठेवाल तर पतिव्रता वधू ज्याप्रमाणें उभयकुलांस आनंददायक होते त्याप्रमाणें राजा व प्रजा या दोघांसहि तुम्ही मान्य व्हाल." तर या उपदेशाचा परिणाम स्वार्थाविरुद्ध होत असल्यामुळें लवकरच त्यांस हा मार्ग सोडून द्यावा लागतो. करितां हें दौर्बल्य काढण्यास खरा उपाय म्हटला म्हणजे सरकारानें आपल्या नेटिव अंमलदारांपैकीं हांजी हांजी करणारे कोण व खरें बोलणारे कोण, याची निवड करून खरें बोलणारांस उत्तेजन किंवा प्रमोशन देणें हाच होय. ही गोष्ट सरकाराकडून होत नाहीं. उलट अशीं उदाहरणें आहेत कीं, जो अंमलदार केवळ आपल्या वरिष्ठ अंमलदारांस खुष ठेवतो, इतकेंच नव्हे, तर आपल्या स्वारीचा मुक्काम किंवा तळ रेल्वेजवळ असल्यास सदर रेल्वेस्टेशनवरून रात्रीं बेरात्रीं जाणाऱ्या बड्या इंग्रजी अंमलदारांची किंवा त्यांच्या कुटुंबांची मोठ्या काळजीनें चहा वगैरे देऊन सरबराई किंवा आदरातिथ्य ठेवतो त्यासच— मग तो अंमलदार या नात्यानें कितीहि मूर्ख असो— नेटिवांकरितां ज्या दहा पांच मोठ्या जागा शिल्लक आहेत त्यांपैकीं एखादी मोठी

जागा मिळते अथवा नोकरी संपल्यावर पेन्शनाखेरीज दुसरें कांहीं तरी बक्षीस किंवा पदवी मिळते. रावसाहेब– रावबहादुरांबद्दल सामान्य लोकांच्या मनांत पूज्यबुद्धि नसते याचें हेंच कारण होय. सरकारानें यांना बंदेगुलाम बनविलेले असतात; व पंचवीस तीस वर्षांच्या अभ्यासानें आंगीं जडलेली ही संवय पेन्शन घेतल्या-बरोबर सोडून देणें बहुधा अशक्य होतें. हे विद्वान किंवा हुषार नसतात असें नाहीं. पण ती विद्वत्ता आणि हुषारी सरकारचरणीं अर्पण केली असल्यामुळें किंबहुना सरकारास विकली असल्यामुळें पेन्शनींतही तोच कित्ता गिरविणें त्यांस सुखावह व निर्भय वाटतें. इंग्रज सरकार परकी असल्यामुळें त्यांस ही गोष्ट इष्ट आहे. कारण देशांतील बुद्धिवान् लोक जितके सरकारच्या कह्यांत अधिक राहतील तितकें त्यास हवें आहे; पण आमची सरकारास एवढीच विनंती आहे कीं, ही स्थिति तुम्हांस इष्ट वाटत असली तर ठेवा. पण मग निदान 'तुमच्या देशांतील लोक मत देतात त्याप्रमाणेंच आम्ही अमुक गोष्ट करतों, अशी सबब सांगून दुःखित झालेल्या आमच्या अंतःकरणावर नवे डाग देऊं नका. हिंदुस्थानांतील नेटिव लोकांत दानत (Character) किंवा मानसिक धैर्य नाहीं अशी आमच्या नांवानें जगभर टिमकी वाजवावयाची आणि दुसरीकडे राज्यव्यवस्थेचा चरक असा चालवावयाचा कीं, त्याखालीं शहाण्या व तरुण देशी अंमलदारांचें मानसिक धैर्य किंवा स्वतंत्रता यांचा अगदीं चट चुराडा उडून जाईल, हें तत्त्व इंग्रजसरकारांस फार चांगलें साधलें आहे. आज हिंदुस्थानचें जें कांहीं नुकसान होत आहे त्यांपैकी हें मोठें नुकसान होय. आणि त्याचा प्रतिकार करणें असल्यास तो दादाभाई नौरोजी आजन्म कंठशोष करीत आले आहेत, त्याप्रमाणें नेटिवांस वरिष्ठ प्रतीच्या जागा देऊन मतस्वातंत्र्य व मानसिक धैर्य या गुणांचा त्यांच्या अंगीं जेणेंकरून विकास होईल, अशी व्यवस्था ठेविल्याखेरीज व्हावयाचा नाहीं. सारांश, या मानसिक दौर्बल्यास कारण सरकारच झालेलें आहे. बड्या सरकारी अंमल-दारांस खालील नेटिव अधिकाऱ्यांच्या तोंडपूजेचा हा प्रकार कळत नसेल असें नाहीं. पण सरकारचें त्यामुळें काम होतें अशी जर त्यांची समजूत आहे तर त्याचा निषेध त्यांनीं काय म्हणून करावा ? केवळ देशाच्या हिताची ज्यांस कळकळ आहे असा एकादा दुसरा देशी अंमलदार निघाल्यास त्याचें प्रायश्चित्त त्यास कसें मिळतें, हें वर सांगितलेंच आहे, अशीं उदाहरणें डोळ्यापुढें असतां नेटिव अंमलदारांनीं मानसिक दौर्बल्य सोडून राजा व प्रजा यांचा नोकरी करावी, म्हणजे बहुतेक पालथ्या घड्यावर पाणी ओतल्यासारखेंच आहे. तथापि, अशा प्रकारचा उपदेश किंवा विनंति केल्याखेरीज हा लेख संपविता येत नाहीं. मोरोपंतानीं म्हटल्याप्रमाणें '**परवशतेनें शतगुण जाच**' कसा होतो, हें या

विवेचनावरून दिसून येणार आहे तथापि, धीर धरून देशांतील बुद्धिवान् लोकांनीं याचा प्रतिकार करणें हें त्यांचें कर्तव्य होय, आणि तशा प्रकारच्या कर्तव्यास जागृत होऊन आपल्या मानसिक धैर्यानें सरकारासहि हे लोक ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करतील, अशी आम्हांस आशा आहे. निदान लॉर्ड ॲम्प्टिल यांनीं आतां जशा प्रकारची सबब पुढें आणली आहे तशा प्रकारची सबब आणण्यास तरी अशा वर्तनानें मार्ग राहणार नाहीं.

## १८. आणीबाणीची वेळ !!

### ( वंगभंगाच्या चळवळीवरील विचार )

[ १५ ऑगस्ट १९०५ ]

अभिनवमदलेखाश्यामगंडस्थलानाम् ।
न भवति बिसतंतुर्वारणं वारणानाम् ॥

– भर्तृहरि

परकीय राजसत्तेखालीं जिकलेल्या लोकांनीं आपल्या हक्कांच्या बचावाकरितां किंवा नवीन हक्क मिळविण्याकरितां काय तजवीज केली पाहिजे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्व लोकांचें दील एक झालें असतां, आणि एक दील होऊन त्यांनीं नेमस्तपणानें आणि नम्रपणानें आपलें मत सरकारापुढें मांडलें असतां हिंदुस्थानसरकार किंवा विलायतसरकार त्याचा योग्य विचार करून लोकमतास मान देईल, अशी आजपर्यंत आमच्या पुढाऱ्यांची समजूत होती. कायदेशीर चळवळ करण्यास आपण शिकलों नाहीं. इंग्रजसरकार कायदेशीर चळवळीस मान देणारें आहे, इत्यादि विधानें आमच्या कानांत आज बरेच दिवस पडूं लागलीं आहेत, आणि कांहीं किरकोळ बाबतींत त्याचा थोडाबहुत उपयोगहि झाला आहे. परंतु ज्यावेळीं सरकारच्या मनांतून एखादी गोष्ट आग्रहानें वा हट्टानें करावयाची असते त्यावेळीं सरकारच्या अरेरावीपणांस किंवा शिरजोरपणास आळा घालण्यास लोकमताची बारीक दोरी किंवा सुतळी अगदींच असमर्थ असते, असें आतां आमच्या पुढाऱ्यांच्या नजरेस येत चाललें आहे. इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांतील स्थिति अगदींच भिन्न आहे. इंग्लंड देश स्वतंत्र आहे व तेथील राज्यपद्धतीप्रमाणें लोकांचे निरनिराळे पक्ष पर्यायानें अधिकारारूढ होण्याचा संभव असतो. आज कॉन्झरवेटीव्ह लोकांच्या हातांत सत्ता असली तर ती उद्यां लिबरलपक्षाच्या हातांत असते; आणि पुढें-मागें रॅडिकल पक्षाचे हातांत येण्याचाहि संभव आहे. तात्पर्य, ज्याच्या बाजूचें बहुमत त्याच्या हातांत सत्ता येण्याचा इंग्लंडांतील राज्यपद्धतीमुळें तेथें संभव असल्यामुळें बहुमत आपल्या बाजूचें करून घेण्याचा प्रयत्न इंग्लडांतील पुढारी करीत असतात. हिंदुस्थानची तशी स्थिति नाहीं. हें राष्ट्र परकीयांनीं जिकलेलें आहे आणि लोकांस फारसें न दुखवतां येथील राज्य चालविण्याचा जरी त्यांचा संकल्प आहे, तरी लोकांच्या बहुमतास विलायतेंतील राज्यव्यवस्थेंत जो मान आहे,

तो, किंबहुना त्याच्या शतांश देखील मान, आमच्या राज्यपद्धतींत येथील लोकमतास मिळत नाहीं. शिरोभागीं निर्दिष्ट केलेल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें परकीय राजसत्तारूपी हत्ती ह्या देशांत जेव्हां मदोन्मत्त होऊन सर्वत्र संचार करूं लागतो तेव्हां लोकमताच्या बिसतंतूंचें त्यांच्यापुढें कांहींएक चालत नाहीं. संमतिवयाचे कायद्याचें उदाहरण ढळढळीत आमच्या डोळ्यांपुढें आहे. आणि गेल्या सोमवारीं कलकत्त्यास झालेल्या प्रचंड सभेमुळें तोच प्रश्न पुन्हा उद्‌भवला आहे, बंगाल प्रांताची वाटणी करून बंगाली भाषा बोलणारें राष्ट्र जरासंधाप्रमाणें विभागून टाकल्याचें श्रेय बलभीम कर्झन घेण्यास उद्युक्त झाले आहेत किंवा त्यांनीं घेतलें आहे असें म्हटलें तरी चालेल. एक भाषा बोलणारे एका आचारविचाराचे किंवा अनेक शतकें एकत्र राहिल्यानें एकमेकांशीं ज्याचें दळणवळण अधिक दृढ आहे, अशा प्रकारचे लोक एका लेफ्टेनंट गव्हरनरच्या किंवा गव्हरनरच्या सत्तेखालीं असल्यास त्यापासून राष्ट्राची अभिवृद्धि चांगली होते हे तत्त्व सर्वमान्य आहे. लॉर्ड कर्झन यांसही हें तत्त्व मान्य नाहीं असें नाहीं. उलट त्यांचें असें म्हणणें आहे कीं, याच तत्त्वाच्या जोरावर आम्ही बंगाल प्रांताचे दोन विभाग करीत आहों ! परंतु कर्झन साहेबांची ही कोटी चुकीची आणि मानभावीपणाची असून त्यांचा अंतस्थ हेतु किंवा कारणें याहून भिन्न असावीं ही गोष्ट आकाशांतील सूर्याप्रमाणें आतां सर्व लोकांच्या ढळढळीत नजरेस आलेली आहे. लपंडावाची वेळ आतां उरली नाहीं, किंवा त्यानें कोणी फसूनहि जाणार नाहीं. शंभरांपेक्षां अधिक वर्षांच्या इंग्रजी शिक्षणानें बंगाली लोक इंग्रजी रीतीची चळवळ करण्यास शिकले आहेत, व त्यांची संघशक्ति जर अशीच कायम ठेवली तर यांच्या चळवळीस जोर मिळून पुढें मागें कदाचित् तिचा पगडा सरकारावरही बसण्याचा संभव आहे. हा परिणाम लॉर्ड कर्झन यांस नको आहे, या बलभीम व्हाइसरायास सर्व हिंदुस्थानभर रावणाप्रमाणें एकटेंच अनियंत्रित नाचावयास पाहिजे आहे. आणि त्यांच्या राजकीय कारकीर्दीचें धोरण असें आहे कीं, आपणासच नव्हे तर आपल्यामागून येणाऱ्या अनेक व्हाइसरायांसहि पादाक्रांत केलेल्या या देशावर उच्छृंखल रीतीनें आपल्याप्रमाणेंच सदैव नाचतां यावें ! सारांश, हिंदुस्थानच्या लोकांनीं राष्ट्रीय अस्तित्व कधींच संपादूं नये, किंवा संपादल्यास तें इतकें नेभळें असावें कीं, सिव्हिल सर्व्हिस, गव्हरनर किंवा व्हाइसराय यांनीं लोकांच्या कल्याणाकरितां भरतभूमीवर ज्या तांडव नृत्यास सुरुवात केली आहे त्यास यत्किंचित्‌हि अडथळा न येतां हा कालभैरवाचा नाच हल्लींच्या प्रमाणेंच सदैव चालू राहावा ! या नाचांत पायाखालीं तुडविल्या जाणाऱ्या लोकांस ही स्थिति संमत नाहीं, हें सांगावयास नकोच. बंगाल्यांतील लाखों लोकांस जी गोष्ट पसंत नाहीं— आणि ही गोष्ट कोणती

तर बंगाली भाषा बोलणारे जिल्हे फोडावयाचे एवढीच–ती जुलुमानें, सक्तीनें, आणि आग्रहानें त्यांच्यावर लादून त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न करणें हें निर्दय-पणाचेंच नव्हे तर मुत्सद्याच्या दृष्टीनेंहि अत्यंत असमंजसपणाचें कृत्य होय. ज्या लोकांवर राज्य करावयाचें त्यांस असल्या सामान्य बावतींतहि असंतुष्ट ठेवणें म्हणजे विनाकारण साम्राज्याच्या चिरस्थायित्वास धक्का आणणें होय. बंगाली भाषा बोलणारे लोक एका प्रांतांत असल्यानें वस्तुतः पाहातां सरकारचें कांही एक नुकसान नाहीं. अशा स्थितींत त्यांच्यामध्यें एकराष्ट्रीयत्वाची कल्पना लौकर उत्पन्न होईल हें खरें; पण त्याजबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, राष्ट्र फोड-ल्यानें ही कल्पना मंदावेल असें समजणेंहि चुकीचें आहे. इंग्रजी राज्य हल्लीं चाललें आहे तितक्या सक्तीनें हिंदुस्थानावर 'यावच्चन्द्रदिवाकरौ' राहील हा सिद्धांतच ऐतिहासिकदृष्टचा खोटा आहे, पुराणांतील रावणादिकांच्या कथा सोडून दिल्या तरी इतिहासांत असें एकही उदाहरण नाहीं कीं, जेथें एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या गळ्याभोंवतीं घातलेली पारतंत्र्याची दोरी यत्किंचितहि सैल न करतां हजारों वर्षें तशीच कायम ठेवली ! लॉर्ड कर्झन यांस हें तत्त्व सहज कळावें इतके ते हुषार व बुद्धिमान आहेत; पण वैभव आणि अधिकार यांच्या मदानें त्यांच्या बुद्धीवर इतकें जबरदस्त आवरण पडलें आहे कीं, मदोन्मत्त हत्तीप्रमाणें बंगाली राष्ट्राच्या लोकमतास गवतासारखें ते तुडवून टाकीत आहेत. गेल्या सोमवारीं कलकत्ता येथें ज्या मोठ्या जंगी सभा झाल्या त्यामुळें जर एखादी गोष्ट चांगली प्रत्ययास आली असली तर ती हीच होय. वॉरन हेस्टिंगास ज्या बंगाली लोकांनीं मदत केली त्यांचे वंशज आणि दुसरे अनेक राजे, महाराजे, वकील, ब्यारिस्टर आणि मारवाडी व्यापारीहि या सभेस हजर होते; इतकेंच नव्हे तर सभेस आलेला जनसमूहाचा लोट इतका प्रचंड होता कीं, एकाच जागीं सभा भरविणें अशक्य झाल्यामुळें गंगेच्या प्रवाहाप्रमाणें ही सभा वर, खालीं आणि बाहेर अशा तीन ठिकाणीं भरवावी लागली. एवढी मोठी प्रचंड सभा बंगाल्यांत यापूर्वीं कधींहि झाली नव्हती, असें म्हटलें तरी चालेल; आणि तेथील लोकहि इतके कधीं खवळलेले किंवा असंतुष्ट झालेले नव्हते. परंतु लॉर्ड कर्झन आणि त्यांचे साथीदार मि. बॉडरिक यांनीं या क्षुब्ध झालेल्या लोकमतास न जुमानतां आपलाच हेका कायम ठेवण्याचा निश्चय केला आहे असें विलायतच्या तारेवरून समजतें. लॉर्ड कर्झनसाहेबांचा हा हेका पाहिला म्हणजे 'शेरास सवाशेर' या म्हणीप्रमाणें त्यांसही थप्पड देणारा लॉर्ड किचनेर भेटला याबद्दल कोणास समाधान वाटणार नाहीं ? बंगाल प्रांतांत लोकसंख्या अधिक असून तें काम एकट्या लेफ्टनंट गव्हर्नरच्या हातून होत नाहीं असें जें सरकारच्या बाजूचें

म्हणणें आहे तें कांहीं विनतोड नाहीं. एका लेफ्टेनंट गव्हर्नरच्या हातून काम होत नसेल तर एकाचे दोन लेफ्टेनंट गव्हर्नर करून एका प्रांताचे दोन प्रांत करण्यापेक्षां लेफ्टनंट गव्हर्नर काढून टाकून मुंबई आणि मद्रासप्रमाणें बंगाल्याचा एक स्वतंत्र इलाखा करून त्याची राज्यव्यवस्था गव्हर्नर आणि कौन्सिल यांच्या ताव्यांत द्यावी अशी सूचना राष्ट्रीय सभेच्या गेल्या बैठकींत केलेली होती. पण गव्हर्नर नेमिला म्हणजे हिंदुस्थान सरकारची सत्ता कमी होते, यामुळें ही सूचना बाजूस सारून लॉर्ड कर्झन यांनीं आपला हेका पुरा करून घेतला आहे आणि लॉर्ड किचनेरप्रमाणें बंगाली लोकांचा इंग्लंडमध्यें कोणी वाली नसल्यामुळें ब्रॉड्रिक आदिकरून प्रधानमंडळही लॉर्ड कर्झन यांस कोणत्याहि प्रकारचा आळा घालण्यास तयार नाहीं !

असो; दहा, पंधरा किंवा वीस हजार किंबहुना लाखों लोकांच्या सभेंत व्यक्त झालेल्या मतास सरकार काडीइतका देखील मान देत नाहीं हें हल्लींच्या उदाहरणावरून पूर्णपणें दृष्टीस येत आहे; आणि या गोष्टीचा प्रतिकार करण्याचा जर कांहीं मार्ग आम्ही काढला नाहीं तर असल्या चळवळींवरील लोकांचा विश्वास लौकरच उडून जाईल. लोकमत जागृत करणें हें लोकांच्या पुढाऱ्यांचें काम आहे; पण जागृत झालेलें लोकमत जर सरकारास वर सांगितल्याप्रमाणें पायाखालीं तुडवितां येईल, तर या जागृतीचा उपयोग काय ? समुद्रकांठच्या डोंगरावर समुद्राच्या लाटा आपटून ज्याप्रमाणें परावृत्त होतात त्याप्रमाणें आमच्याकडील लोकमताची स्थिती झालेली आहे, एका पक्षीं समुद्राच्या लाटा बऱ्या. कारण त्यांच्या अंगीं थोडाबहुत तरी खारटपणा असल्यामुळें तीरावरील डोंगराच्या बाजूस ह्या लाटा बऱ्याच खोल कपाऱ्या पाडतात. पण आमच्या लोकमतांत तितकाहि खारटपणा नसल्यामुळें या अळणी लोकमताच्या लाटांचा सरकारावर कांहीं परिणाम होत नाहीं, अशी स्थिति आली आहे ! लोकमताचा हा अळणीपणा कसा घालवावा हा आपल्यापुढें सध्यां मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. बंगालच्या सभेंत असा ठराव झाला आहे कीं, सरकार किंवा विलायतेंतील लोक आपलें म्हणणें ऐकत नाहींत तर आपण विलायती माल न वापरण्याची शपथ घेऊं. ही कल्पना आमच्या मतें कांहीं वावगी नाहीं. नाक धरल्याखेरीज तोंड उघडत नाहीं आणि सरकारास झोंबेल अशी जर गोष्ट आमच्या हातून घडणार नाहीं तर सरकारचा दर्प कधींहि उतरणार नाहीं ! लोकमताची बिसतंतूप्रमाणें किंवा तृणाप्रमाणें सरकार आज उपेक्षा करीत आहे खरी, पण या तृणाची जूट होऊन दोरी झाली म्हणजे एका कवीनें म्हटल्याप्रमाणें—

**तृणैरावेष्टयते रज्जुर्यया नागोऽपि बध्यते ।**

ह्याच तृणांनीं हत्तीदेखील बांधला जात असतो, हें आम्ही लक्षांत ठेविलें पाहिजे !

हजारों किंवा लाखों लोक समुद्रकांठच्या वाळूच्या कणांप्रमाणें नुसते एकत्र झाल्यानें किंवा जमवल्यानें कार्य होत नाहीं. पंढरीच्या यात्रेस लाखों वारकरी जमतात, पण तुकारामबुवांप्रमाणें मोक्ष संपादन करणाऱ्या व्यक्ति त्यांच्यामध्यें किती आहेत ? हाच न्याय सर्वत्र लागू आहे. दहा पंधरा हजार लोक कलकत्त्याच्या टाऊनहालांतच काय पण हिंदुस्थानच्या दुसऱ्या कोणत्याहि शहरांत केव्हांहि गोळा करतां येतील, पण एका पोलिस शिपायाच्या दरडावणीनें वाऱ्यापुढें भूस जसें चोहोंकडे उडून जातें तद्वत् हे लोक जर पांगून जातील तर ते जमले काय आणि न जमले काय सारखेच ! हजारों लाखों लोकांचा समुदाय निश्चयानें बांधला गेला पाहिजे. लोकमताचें बल निश्चयांत आहे, केवळ समुच्चयांत नाहीं. वर जो रज्जूचा दृष्टांत दिला आहे तोहि याच अर्थाचा आहे. गवताच्या काड्या एकावर एक ठेवून ढीग केल्यानें कांहीं काम होत नाहीं. त्याची दोरी वळावी लागते व त्या दोरीचा पीळ इतका वळकट असावा लागतो कीं, दोरी जळेल, पण पीळ जळणार नाहीं ! अशी दोरी वळली म्हणजे मग मदोन्मत्त हत्तीचें आकलन करण्याची शक्ति तिच्यांत येते. आपल्या देशांतील लोकमत म्हणजे वाऱ्याची मोट आहे, तृणाचें दोरखंड नव्हे. आणि यांत जर कांहीं सुधारणा झाली नाहीं तर 'त्याचा दोष लोकांपेक्षां पुढाऱ्यांकडे अधिक आहे असें आम्ही समजतों. या अग्रलेखाच्या आरंभीं म्हटल्याप्रमाणें ही मोठ्या आणीबाणीची वेळ आहे; आणि या वेळीं बंगालचे पुढारी काय करतात इकडे हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें लक्ष लागून राहिलें आहे. बंगालचे बडे जमीनदार किंवा सुरेंद्रनाथ बानर्जी, भूपेंद्रनाथ बसु यांच्यासारखे सुशिक्षित पुढारी यांनीं यावेळीं लोकांस कित्ताच घालून दिला पाहिजे; इतकेंच नव्हे तर विलायती माल बंद करावयाचा असल्यास बंगाल प्रांतांत चोहोंकडे फिरून ही गोष्ट घडवून आणली पाहिजे. फुकट व्याख्यानें झोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें तळहातावरील फोडाप्रमाणें आतां अगदीं स्पष्ट कळून चुकलें आहे. शब्द नकोत कृती पाहिजे; आणि तीहि निश्चयाची कृती पाहिजे, अशी वेळ आतां येऊन ठेपली आहे. अशा वेळीं आम्ही जर आपल्या कर्तव्यास चुकलों आणि युवराज इकडे आल्याबरोबर विलायती डायमंड लेदरचा बूट चढवून लोटांगण घालीत त्यांच्याकडे गेलों, तर आमच्या व आमच्या मताच्या पोंचटपणास पारावार नाहीं, असें राज्यकर्त्यांच्याच नव्हे तर सर्व जगाच्या निदर्शनास येऊन चुकणार आहे. सारांश, हिंदुस्थानांतील लोकमताच्या वाढीचे इतिहासांत आज असा दिवस येऊन ठेपला आहे कीं, आमच्या पुढाऱ्यांनीं निश्चयानें पुढें होऊन एक तर आपली कार्यसिद्धी करून घेतली पाहिजे, नाहींतर तोंडाच्या वाफाऱ्यानें दूषित झालेल्या वातावरणांत फुकट कुजून मेलें पाहिजे. यांपैकीं कोणता मार्ग स्वीकार-

ण्यास आमचे पुढारी तयार आहेत, इकडे सर्वांचे डोळे लागले आहेत व आमची या पुढाऱ्यांस अशी सूचना आहे कीं, यावेळीं जर तुमचें पाऊल नीट पडणार नाहीं किंवा कच्चें पडेल, तर तुमच्या विद्या, तुमचें वक्तृत्व आणि तुमचा देशाभिमान यांवरील लोकांचा विश्वास लवकरच सवंध उडून जाईल. सरकारची शेंडी हातांत येणें हें मोठ्या प्रयासाचें काम आहे, असें सांगितल्यानें लोकांचें समाधान व्हावयाचें नाहीं. आज जो कांहीं लोकमताचा प्रवाह थोडाबहुत सुरू झाला आहे तो या पुढाऱ्यांच्या प्रयत्नानेंच झाला आहे आणि यापुढें भगीरथाप्रमाणें जिवापाड प्रयत्न करून लोकमताचा प्रवाह समुद्रास मिळविण्याची खटपट आम्ही केली नाहीं तर आमचा देशाभिमान, शिक्षण किंवा वक्तृत्व हीं सर्व व्यर्थ होत. आजची वेळ अशी आहे कीं, एकतर हल्लींच्या तोंडाच्या चळवळीच्या पलीकडे आम्ही गेलें पाहिजे; नाहींतर निरंतर दास्यत्वांत राहण्यास तयार झालें पाहिजे ! ईश्वर करो आणि दुसऱ्या कोटींत न पडण्याची बुद्धि आमच्या लोकांस आणि पुढाऱ्यास होवो अशी प्रार्थना करून हा लेख संपवितों.

---

# १९. लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द

[ २९ ऑगस्ट १९०५ ]

उपप्लवाय लोकानां धूमकेतुरिवोत्थितः ॥

— कालिदास

ज्यांच्या वधाकरितां कार्तिकस्वामीचा अवतार झाला त्या तारकासुराच्या साम्राज्यांत सात्त्विक लोकांस व देवादिकांस कोणच्या प्रकारचा व किती जाच सोसावा लागत असे याचें शेषशायी भगवानास शरण जाऊन देवांनीं जें वर्णन केलें त्या प्रसंगांत वरील श्लोक कालिदासानें देवांच्या तोंडीं घातला आहे. शौर्य, साहस, पराक्रम, कर्तबगारी, शहाणपणा, दीर्घोद्योग, दक्षता वगैरे गुण पुराणांमधून ज्या दैत्यांचीं साम्राज्यें वर्णन केलीं आहेत त्यांच्या अंगांतहि पूर्णपणें असल्याचें आढळून येतें; परंतु या गुणांचा उपयोग गरीब प्रजेस जखडून ठेवण्याकडे किंवा त्यांच्या उरावर जबरदस्त दडपण ठेवून त्यांची वाढ खुंटविण्याकडे आणि आपली प्रौढि अधिकाधिक माजविण्याकडे जेव्हां होत असतो तेव्हां या गुणांस आसुरी संपत असें आमच्या शास्त्रकारांनीं म्हटलें आहे. वैभवाचें योग्य प्रदर्शन किंवा स्वतःच्या मताबद्दलचा योग्य अभिमान हे गुण आहेत खरे; पण अनिवार राज्यतृष्णेनें किंवा स्वतःच्या किंवा स्वराष्ट्राच्या उत्कर्षाची फाजील हाव धरल्यानें या गुणांचा जेव्हां अतिरेक होतो तेव्हां त्यांतूनच पोकळ डौल, वृथाभिमान किंवा ताठा हे दोष उद्‌भवतात; आणि दैवी संपद् नाहींशीं होऊन तीस आसुरी संपत्तीचें रूप येतें. नुसती तरतरी, उमेद, किंवा शहाणपण मनुष्याचे अंगीं असून उपयोग नाहीं; हे सर्व बाह्य, किंवा शारीरिक गुण आहेत. आणि केवळ या गुणांचाच जेथें अंमल घडतो तेथें वेडकांनीं प्रार्थिलेल्या राजाप्रमाणें या गुणांनीं मंडित झालेला पुरुष लांकडाच्या ओंडयापेक्षां अधिक अप्रिय आणि भयप्रद होऊन जातो. लॉर्ड कर्झन यांचा प्रकार अशांतलाच झालेला आहे. हे ज्यावेळीं व्हाइसरॉयची जागा पत्करून हिंदुस्थानांत आले तेव्हांच यांची इंग्रजी साम्राज्यासंबंधाचीं मतें व विचार इतके दृढ झाले होते कीं, त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांवरून यांच्या कारकीर्दीचें धोरण कोणच्या प्रकारचें राहील याचा आम्हीं अजमास बांधिला होता. आमची अटकळ चुकीची ठरल्यास त्यांत आम्हांस आनंद आहे असें आम्ही तेव्हां म्हटलें होतें, पण ती चुकीची कोठून ठरणार ? लॉर्ड कर्झन हे हिंदुस्थानांत

आले तत्पूर्वींच एशियाखंडांतील कारस्थानासंबंधानें आणि हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्थेसंबंधानें त्यांचीं मतें ठाम बनून गेलीं असल्यामुळें व आजपर्यंत आलेल्या व्हाइसरायांच्या रक्तापेक्षां अधिक जोरदार आणि तापट रक्त यांच्या शिरांतून वाहत असल्यामुळें इंग्रजी शिक्षणानें हिंदुस्थानांतील प्रजेच्या मनांत आपल्या भावी उत्कर्षाबद्दल ज्या कांहीं कल्पना येत चालल्या आहेत तिकडे यांचें लक्ष पोचलें नाहीं. इतकेंच नव्हे तर आपण पूर्वी निश्चित केलेलीं मतें व विचार हेच सत्य आहेत, आणि जरूर पडेल तेथें याच्याविरुद्ध जीं मतें असतील तीं छाटून काढून आपल्या मताप्रमाणेंच साम्राज्याचा पाया स्थिर केला पाहिजे, अशा समजुतीनें यांनीं पांच अधिक दोन वर्षें आपला राज्यकारभाराचा गाडा आपल्या 'धडाडी' स्वभावाप्रमाणेंच चोपून चालविला होता. लॉर्ड कर्झन हे करारी आहेत, उद्योगी आहेत, हुषार आहेत; आणि एकदां एखादी गोष्ट मनांत भरल्यावर कोणाचीहि भीड मुरवत न धरतां ती तडीस नेण्याचें धैर्य यांच्या अंगांत आहे; इत्यादि गुणांमुळें व विशेषतः करून त्यांच्या अघळपघळ व अलंकारिक भाषेस भुलून आमच्या राष्ट्रीय सभेनें आणि बंगाली वर्तमानपत्रांनीं लॉर्ड कर्झन यांची आरंभीं एकदोन वर्षें अतिशय स्तुति चालविली होती; कित्येकांस तर असें वाटलें होतें कीं, लॉर्ड कर्झनसारखा हुषार व्हाइसराय १८५७ च्या बंडानंतर हिंदुस्थानांत आलाच नव्हता; आणि याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानचा कांहीं तरी भाग्योदय खास होणार! परंतु आम्ही भाकीत केल्याप्रमाणें लोकांची या बाबतींत लवकरच निराशा झाली. लॉर्ड कर्झन हिंदुस्थानांत आले ते कांहीं येथील लोकस्थिति अवलोकन करून मग त्यास उदार अंतःकरणानें कोणचें वळण द्यावें हें ठरविण्याकरितां आले नव्हते; सर्व पृथ्वीवर इंग्रजी साम्राज्याचा डंका वाजला पाहिजे; आणि आशियाखंडांत इंग्रजसरकारनें जर आपलें काम नेटानें चालवून इराण, चीन, सयाम, ब्रह्मदेश, तिबेट किंवहुना जपान यांवर आपलें वर्चस्व स्थापित केलें, तर जगड्व्याळ इंग्रजी साम्राज्याची कल्पना मनच्यामनांत न राहतां प्रत्यक्ष क्रियेनें व वस्तुस्थितीनें जगाच्या नजरेस येईल. अशा प्रकारच्या विचारांनीं यांचें डोकें भणभणून जाऊन डोक्यांत उसळलेल्या विचारांच्या गर्दीस हातानें किती दृश्य स्वरूप देतां येईल हें पाहण्याकरितां हे तरुण व्हाइसराय हिंदुस्थानांत आले होते. अशा स्थितींत हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजांपेक्षां इराणी आखातांतील चाच्यांच्या राजांचें यास जास्त महत्त्व वाटून त्यांस खुष करण्याकरितां कलकत्त्याहून बंदरआबासचा यांनीं प्रवास केला, अथवा शांततेच्या मिषानें हिमालय उल्लंघून तिबेटांत हिंदुस्थानच्या सैन्याचा नाच केला अथवा जुना तह कायम करण्याच्या सबबीनें अफगाणिस्थानच्या अमिराशीं बाह्यतः बोलणें लावण्याकरितां परंतु आंतून कांहीं गुप्त हेतु किंवा मसलत

सिद्धीस नेण्याकरितां अफगाणिस्थानांत मिशन पाठविलें असल्यास त्यांत नवल तें कोणतें ? तारुण्याची तरतरी, वाचनानें आणि दीर्घ प्रवासानें मिळालेलें आशियाखंडाचें ज्ञान, नेहमीं एकसारखा उद्योग करण्याची हौस, आपल्या मतांचा अभिमान आणि आपल्या मताहून भिन्न असलेल्या मतांबद्दल बेगुमानपणा इत्यादि गुण लॉर्ड कर्झन यांच्या अंगांत पूर्णपणें वसत आहेत; व याच गुणामुळें त्यांस आपल्या जागेचा राजीनामा देणें भाग पडलें; स्वराज्यांत म्हणजे ज्या ठिकाणीं प्रजा आणि राज्यकर्ते एकाच जातीचे आहेत, तेथें अशा प्रकारचा गुणी पुरुष देशाभिमानी म्हणविला जाईल, पण साम्राज्यांत म्हणजे जेथें एका राष्ट्रानें दुसरीं राष्ट्रें आपल्या छायेखालीं ठेवावयाचीं आहेत तेथें हे गुण केवळ निरुपयोगी आहेत इतकेंच नव्हे, तर साम्राज्याच्या चिरस्थायीपणास परिणामीं अपायकारक आहेत. जिकलेल्या लोकांस योग्य शिक्षण देऊन व त्यांच्या अंगीं असलेल्या गुणांची वाढ करून योग्य कालीं त्यांस राज्यकर्त्यांच्या बरोबरीनें हक्क प्राप्त होतील अशी तजवीज करणें किंवा साम्राज्यांतील राज्यव्यवस्थेचें धोरणास अशा प्रकारचें वळण देणें यास अंतःकरणामध्यें जिकलेल्या लोकांबद्दल जी सहानुभूति किंवा त्यांच्याबद्दल औदार्यबुद्धि असावी लागते तिचा लेशहि लॉर्ड कर्झन यांच्या अंतःकरणांत वास करीत नाहीं. जें काय करूं तें आम्ही म्हणजे इंग्रजलोक करूं. हिंदुस्थानावर सदैव राज्य करण्याची सनद परमेश्वरानें त्यांसच दिली आहे, हिंदुस्थानांतीलच नव्हे तर आशियाखंडांतील लोकांनीं पाश्चिमात्य राष्ट्रांच्या चिरकालीन दास्यत्वांत राहणें यांतच त्यांचा तरणोपाय आहे; या मगरमिठींतून सुटण्याची त्यांनीं कधींहि आशा करूं नये. केल्यास ती सफळ होण्याचा बिलकूल संभव नाहीं; अशा तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षेनें घेरलेले किंवा पछाडलेले हे तरुण व्हाइसरॉय जेव्हां हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांच्या कारकीर्दींत आम्हांवर काय काय संकट ओढवतें याची आम्हांस बरीच काळजी पडली होती. पण आफ्रिकेंत अकल्पित सुरू झालेल्या बोअर लोकांच्या लढाईमुळें आणि जपानबद्दल लॉर्ड कर्झन यांनीं केलेलें भविष्य पॅसिफिक महासागरांतील छोटेखानी बेटांतल्या लोकांनीं पुढें लवकरच खोटें करून दाखविल्यामुळें, तिबेट, अफगाणिस्थान व इराण या सरहद्दीपलीकडील तीन देशांपेक्षां दुसरीकडे संचार करण्यास लॉर्ड कर्झन यांस फुरसत किंवा संधि मिळाली नाहीं. रोमनपुराणांतील विष्णूचा अवतार जो हरक्यूलीस त्याप्रमाणें बारा महत्कृत्यें करण्याचा संकल्प करूनच ही स्वारी हिंदुस्थानांत आली होती; आणि आमच्या पुराणांतील विष्णूचा अवतार जो वामन त्याप्रमाणें तिबेट, अफगाणिस्थान व इराण या तीन देशांत पावलें टाकण्याचा यांनीं प्रयत्नही केला. परंतु या तिन्ही ठिकाणीं या वामनरूपी कर्झनाची

डाळ नीटशी शिजली नाहीं, इतकेंच नव्हे तर, सात वर्षांपूर्वी आशिया खंडांतील देशांची जी दीनवाणी स्थिति होती ती जाऊन जपानच्या विजयानें आजमित्तीस सदर राष्ट्रांच्या मनांत आपल्या उत्कर्षाचा अंकुर उद्भवून तो वाढीस लागला आहे. सारांश, गेल्या सात-आठ वर्षांच्या आशिया खंडाच्या इतिहासाकडे लक्ष दिलें, तर लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या पुस्तकांतून जीं भविष्यें केलीं आहेत तीं बहुतेक खोटीं ठरल्यासारखीं झालीं आहेत व दिवसेंदिवस अधिकाधिक होत आहेत, अशा स्थितींत कोणाही विचारी पुरुषाच्या मनांत आपल्या मतांबद्दल शंका उत्पन्न झाली असती; पण लॉर्ड कर्झन यांचा स्वभावच निःशंक पडल्यामुळें त्यांनीं वर निर्दिष्ट केलेल्या ऐतिहासिक गोष्टीचा विचार न करतां आपल्या राज्यकारकीर्दीचें धोरण पूर्वी ठाम केलेल्या मतांप्रमाणेंच चालवून हिंदुस्थानच्या उन्नतीची गाडी आपल्या हातून होईल तितकी मागें सारण्याचा प्रयत्न केला. अशा कृत्रिम दाबादाबीनें राष्ट्राची पिछेहाट होण्यापेक्षां त्याचे अंगीं असलेल्या वाढीच्या शक्तीस अधिक उसळी येते असा ऐतिहासिक अनुभव आहे. या अनुभवाप्रमाणें लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीनें आमच्या लोकांच्या अंगांत अधिक स्फुरण चढल्यास यांचे अरेरावी अंमलापासून आमचें हितच झालें आहे असें आम्ही समजूं. सामान्य दृष्टीनें पाहिलें तर आजपर्यंत हिंदुस्थानांत जितके व्हाइसरॉय आले त्यांच्या कारकीर्दीपेक्षां लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द हिंदी प्रजेच्या दृष्टीनें अधिक जुलमी आणि साम्राज्यांतील प्रजेस अत्यंत अहितकारक झाली असें म्हणण्यास आम्हाला बिलकुल शंका वाटत नाहीं.

लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीच्या तोडीस जुना दाखला घ्यावयाचा असल्यास, तो पुष्कळ अंशीं औरंगजेबाचा घेतल्यास चालेल. साम्राज्य, अखंडित साम्राज्य, अप्रतिहत आणि चिरस्थायी साम्राज्य, अर्थात् साम्राज्यांतील प्रजेचें चिरकालीन दास्य हीं कर्झनसाहेबांच्या राजकीय धोरणाचीं प्रतिपदोक्त लक्षणें होत. हिंदुस्थानांतील किंवा आशियाखंडांतील लोकांबद्दल यांच्या अंगीं थोडीबहुत सहानुभूति आहे; पण ती सहानुभूति आईबाप आपल्या लहान मुलांबद्दल जी ममता दाखवितात अशा प्रकारची आहे. आम्ही म्हणजे इंग्रजी राज्यकर्ते हेच काय ते शारीरिक व मानसिक गुणांनीं मोठे असून तुम्ही म्हणजे हिंदुस्थानांतील प्रजाजनांनीं त्यांच्या हाताखालीं पोरांप्रमाणें वागावें, त्यांतच तुमचें कल्याण आहे, असा त्या सहानुभूतीचा अर्थ आहे. जोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोक अशा रीतीनें वागतील तोंपर्यंत त्यांस इतर बाबतींत त्रास होऊं नये अशी तजवीज इंग्रजाकडून मेहेरबानीनें करण्यांत येईल असें लॉर्ड कर्झन यांचें मत होतें; आणि या मतास अनुसरूनच इंग्रजी सोल्जरांचा सुळसुळाट किंवा खालील दर्जाच्या इंग्रजी अंमलदारांचा जुलूम बंद करण्याबद्दल त्यांनीं सक्तीनें

हुकूम सोडले होते. साम्राज्य टिकण्याकरितां, साम्राज्य चिरस्थायी होण्याकरितां अथवा साम्राज्याची वडेजावकी वाढण्याकरितां प्रजेचे हातपाय जितके तोडावयास पाहिजेत, किंवा त्यांचा जितका हिरमोड अथवा छाटाछाट करावयास पाहिजे, तितकी करण्यास लॉर्ड कर्झन यांस कधींहि दिक्कत वाटली नाहीं. परंतु याप्रमाणें जिंकलेल्या देशांची किंवा लोकांची छाटाछाट करून त्यांस कायमचें चीत केल्यावर मग त्यांचा विनाकारण कोणी छळ करूं नये याबद्दल लॉर्ड कर्झन यांची मोठी करडी नजर असे; किंबहुना साम्राज्य चालविण्यास अशा प्रकारची जाचणूक अहित-कारक आहे असें ते मानीत. आपण ज्याप्रमाणें घरच्या गुरांचीं शिंगें तोडून किंवा वळवून त्यास निरुपद्रवी बनवतों आणि अशा रीतीनें त्यांच्यापासून भीति नाहींशीं झाल्यावर त्यांच्या संगोपनाची, त्यांस योग्य वेळीं दाणावैरण देण्याची कोणी हयगय केल्यास अथवा विनाकारण त्यांस उपद्रव दिल्यास त्यावर रागें भरतों; तशाप्रकारचें लॉर्ड कर्झन यांचें हिंदुस्थानच्या प्रजेवर प्रेम होतें. शौर्यानें, विद्येनें, व्यापारानें किंवा संपत्तीनें हिंदुस्थान देशानें इंग्लंड देशाचें नेहमीं अंकित राहिलें पाहिजे, राज्यकर्त्यांशीं कधींहि स्पर्धा करून उपयोगी नाहीं अशी या राजश्रीची पक्की समजूत होती. त्यामुळें महाराणी सरकारच्या स्मारकाकरितां उभारलेल्या फंडांतून औद्योगिक कॉलेज काढण्याची लोकांनीं सुचविलेली कल्पना यांनीं अंमलांत आणली नाहीं; इतकेंच नव्हे तर पाश्चिमात्य शिक्षणानें सुशिक्षित झालेल्या लोकांच्या मनांत स्वातंत्र्याची इच्छा अधिकाधिक उद्भवते; हेंहि यांस सहन न होऊन वरिष्ठ प्रकारचें सर्व शिक्षण हिंदुस्थानसरकारच्या किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत आणून हें पाश्चि-मात्य बाळकडू जितकें कमी तीव्र होईल तितकें करण्याचा यांनीं आपल्या कार-कीर्दींत प्रयत्न केला. अंतस्थ सुधारणांपैकीं नाहीं म्हणावयास शेतकी आणि पाट-बंधारे या कामीं यांच्या कारकीर्दींत बरीच रक्कम खर्ची पडली; पण त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं या दोन्ही बाबतींत हिंदुस्थानचा उत्कर्ष झाल्यानें इंग्लंडदेशाचें कांहीं नुकसान नाहीं, उलट झाला तर फायदाच होईल. देशी धंद्यास उत्तेजन मिळावें अशी सदिच्छा लॉर्ड कर्झन यांच्या भाषणांतून वेळोवेळीं प्रदर्शित झालेली आहे. पण त्यांची सात वर्षांची कारकीर्द पाहिली तर 'पुराणातलीं वांगीं पुराणांतच' ह्याप्रमाणें ही सदिच्छा केवळ शब्दांतच राहून परलोकवासी मि. टाटा यांनीं दिलेल्या उदार देणगीचाहि उपयोग अद्याप त्यांच्या देशबांधवांस मिळूं लागला नाहीं. कमिशनांची कर्झनशाहींत अगदीं रेलचेल उडून गेली होती. परंतु यांचा परिणाम पाहिला तर त्यापासून हिंदुस्थानांतील प्रजेच्या हक्कांत कोणच्याहि प्रकारची भर पडली नाहीं, असेंच आढळून येईल.

लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींतलें कोणतेंही कृत्य घ्या, त्यांत वर सांगितलेल्या त्यांच्या राजकीय विचारांचें व धोरणाचें प्रतिबिंब स्पष्टपणें नजरेस येतें. हिंदुस्थानांतील लोकांस कांही मर्यादेच्या पुढें वाढूं देऊं नये, आणि त्या मर्यादेच्या आंत त्यांजवर विनाकारण जुलूम करूं नये. हीं ह्यांच्या राज्यपद्धतीचीं मुख्य तत्त्वें होतीं. तसेंच तारुण्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें म्हणा, यांस असें वाटत असे कीं, अलंकारिक शब्दजाल पसरून त्याच्या अवडंबरानें किंवा दिल्लीदरबारासारखे साम्राज्याच्या वैभवप्रदर्शनाचे अधिक प्रसंग आणून आपण प्राच्य देशांतील किंवा हिंदुस्थानांतील लोकांस मोठ्या शिताफीनें चकवून टाकूं. पण सात वर्षांच्या कारकीर्दींत हा समज चुकीचा आहे असा त्यांस अनुभव आला असावा; निदान हिंदुस्थानच्या लोकांस तरी, आपण या स्वारीस चांगलें ओळखलें असें पूर्णपणें वाटत आहे. शंभर वर्षांच्या इंग्रजी शिक्षणानें दिखाऊ विलायती मालास किंवा शब्दास भुलून न जाण्याइतकें शहाणपण आमच्या अंगांत आलें आहे. त्यामुळें दिल्लीदरबारामुळें आमच्यामध्यें समाधानापेक्षां असंतोष जास्त झाला असून, लॉर्ड कर्झन यांनीं राणीच्या जाहीरनाम्याचाहि जो उघड उपमर्द केला त्यांनें तर ही बुद्धि अधिकच दृढ झालेली आहे. वरिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकरींत नेटिव्हांचा प्रवेश अधिकाधिक करणें अशक्य आहे असें लॉर्ड कर्झनसाहेबांपूर्वी दुसऱ्या कोणत्याहि व्हाइसरॉयानें स्पष्टपणें सांगितलें नव्हतें. लॉर्ड लिटन यांनीं वर्तमानपत्रकारांचीं तोंडें बंद करण्याचा प्रयत्न केला होता. पण तो उघड होता; व त्यामुळें लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत त्याचा प्रतिकार करता आला. लॉर्ड कर्झन यांनीं तोच प्रयत्न पुनः अप्रत्यक्ष रीतीनें गौप्यगोपनाच्या कायद्यांत हळूच एक कलम घुसडून देऊन केला आहे. याची पुढें कशी काय वाट लागते ती पाहावी. स्थानिक स्वराज्याच्या बाबतींतहि हाच पिच्छेहाटीचा क्रम कर्झनशाहींत सुरू झाला आहे. किंबहुना यांची पहिल्यानें अतोनात स्तुति करणाऱ्या बंगाली लोकांस स्थानिक स्वराज्याच्या बाबतींतच यांच्या कारकीर्दीच्या धोरणाचा पहिला झटका अनुभवावा लागला ! हिंदुस्थानचें व्यापारी खातें, गुप्त चौकशीचें पोलीस खातें, आणि विद्याखातें यांवर हिंदुस्थान सरकारच्या नजरेखालीं देखरेख ठेवण्याकरितां तीन मोठ्या पगाराच्या स्वतंत्र जागा काढून लॉर्ड कर्झन यांनीं युरोपियन अधिकाऱ्यांकरितां राखून ठेवलेल्या कुरणाची मर्यादा वाढविली आहे; आणि युरोपियन व युरेजिअन लोकांस आश्रय देऊन व खालील दर्जाच्या नोकऱ्यांसाठीं अवश्य लागणारी परीक्षा काढून टाकून हिंदी प्रजेस सरकारी नोकरीपासून होणारा फायदाहि मर्यादित करून टाकला आहे. सारांश साम्राज्यांतील वैभवाचा आणि सुखाचा वांटा जेणेंकरून गोऱ्या

लोकांसच मिळेल अशा रीतीनें यांनीं सात वर्षें आपली कारकीर्द चालविली, आणि त्यांतहि दुःखाची गोष्ट ही कीं, पुढें पांच–पंचवीस वर्षेपर्यन्त हें धोरण टिकेल अशा प्रकारची कागदोपत्रीं तयारी करून आपल्या मागून येणाऱ्या व्हाइसरॉयाच्या सद्बुद्धीसहि अवकाश न मिळण्याची तरतूद यांनीं करून ठेविली आहे! अर्थात् यांचा उद्योग, यांचें शहाणपण व यांची तरतरी हिंदुस्थानांतील लोकांस आणखी एक पिढीतरी जाचल्याखेरीज राहणार नाहीं.

कर्झनशाहींतील सर्व अरेरावी व जुलमी गोष्टींचें वर्णन एकाच लेखांत करणें अशक्य आहे. वेळोवेळीं याबद्दल केसरींतून चर्चा झालेलीच आहे. तथापि आजच्या सिंहावलोकनाच्या प्रसंगीं आणखी एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे. निजामापासून वऱ्हाड कोणत्या युक्तीनें कायमचा गिळंकृत केला, पन्नाच्या राजास हद्दपार करून आणि होळकरांस खुषीनें राजीनामा द्यावयास लावून नेटिव्ह संस्थानांचे हक्क कसे कमी केले हें वाचकांस सांगण्यांची जरूर नाहीं. बंगालच्या फाळणीसंबंधानें तर ओरड चालूच आहे. या सर्व गोष्टी एकाच तत्त्वावर घडून आलेल्या आहेत. तें तत्त्व म्हटलें म्हणजे अग्रलेखाच्या आरंभीं सांगितलेली आसुरी संपत्ति होय. रुपया जसा वाजवून घेतात तशाप्रकारें आपल्या कारकीर्दीत हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्य लॉर्ड कर्झन यांनीं ठणठणून वाजवून घेतलें आहे. मिठावरची जकात सोडणें किंवा प्राप्तीवरील कर कमी करणें अशा प्रकारचीं कांहीं लोकोपयोगी कृत्यें यांच्या कारकीर्दीत झालीं आहेत. पण हीं लॉर्ड कर्झन यांच्या औदार्याचीं फलें नसून नाण्याच्या कायद्यानें तिजोरींत पडलेल्या आगंतुक भरीचे स्वाभाविक परिणाम होत. वर सांगितलेंच आहे कीं, साम्राज्याच्या भरभराटीकरितां लोकांचे हातपाय जितके मोडणें जरूर आहे तितके मोडल्यानंतर आणि ते तसेच चिरकाल मोडलेले राहतील अशी तजवीज झाल्यानंतर लॉर्ड कर्झन यांच्या आसुरी दयेस पाझर फुटत असतो. लॉर्ड कर्झन यांच्या हातून जीं कांहीं थोडींशीं चांगलीं कृत्यें झालीं आहेत त्यांतील बीज हेंच होय. कॉंग्रेस-सभेचा उत्कर्ष व्हावा, हिंदुस्थानांतील लोकांस कधींना कधीं तरी नागरिकत्वाचे हक्क मिळावेत आणि विलायतचा व्यापार थोडा कमी झाला तरी हरकत नाहीं, पण हिंदुस्थानचे उद्योगधंदे वाढून हिंदुस्थानचा व्यापार वाढावा असें यांचें मत अगर इच्छा कधींहि नव्हती; आणि त्या धोरणानेंच यांनीं पांच सात वर्षे राज्य करून आमच्या गळ्याभोंवतालची दास्यत्वाची दोरी अधिक घट्ट करून टाकली आहे! या त्यांच्या उद्दाम वृत्तीबद्दल अँग्लो–इंडियन पत्रें त्यांची तारीफ करताहेत व करतील; परंतु हिंदुस्थानाच्या प्रजेच्याच दृष्टीनें पाहिलें तर हिंदुस्थानचे नुकसान करणारा यांचेइतका बढाईखोर व्हाइसरॉय

आजपर्यंत हिंदुस्थानांत आला नव्हता असें म्हणणें भाग येतें. लॉर्ड कर्झन हे आपल्या मतानेंच चालणारे असल्यामुळें हाताखालील इंग्रजी अधिकाऱ्यांवरहि यांचा कधीं कधीं घुस्सा होत असे; परंतु हा त्यांच्या स्वभावाचा दोष होतां, त्यांत हिंदुस्थानचें खरें कल्याण करण्याचा हेतु नसे; किंबहुना या गुणानेंच किंवा अवगुणानेंच लॉर्ड कर्झन यांनीं आपल्या कारकीर्दीची समाप्ति करून घेतली आहे. हिंदुस्थानच्या तिजोरीची विल्हेवाट प्रजेच्या मताप्रमाणें जर लावावयाची नाहीं तर मग ती किचनेर साहेबांच्या मताप्रमाणें झाली काय किंवा कर्झनच्या मताप्रमाणें झाली काय, आम्हांस सारखीच ! तथापि टाइम्स ऑफ इंडिया या कामीं बाल्फोर व ब्राडरिक यांस जो दोष देत आहे तो आमच्या मतें चुकीचा आहे. एकदां हिंदुस्थानांत अमुक एक प्रकारची लष्करी व्यवस्था पाहिजे असें लष्करी लोकांच्या कमिटीनें ठरविल्यावर व त्यास प्रधानमंडळाची संमति मिळाल्यावर लॉर्ड कर्झन यांनीं आपलाच हेका धरून बसणें अगदीं अनुचित होतें. त्यांतून ज्यानें प्राच्य लोकांच्या खोटेपणाबद्दल युनिव्हर्सिटींत उभे राहून टिमकी वाजविली त्यानें आपला हेका पुरविण्याकरितां किचनेरसाहेबांच्या मताचा विपर्यास करावा ही लाजिरवाणी गोष्ट होय. लॉर्ड कर्झन हे आपल्या मतें किंवा येथील अँग्लो-इंडियन लोकांच्या मतें मोठे थोर असतील, सज्ञान असतील किंवा कर्ते असतील; पण बाल्फोर आणि ब्राडरिक यांच्या दृष्टीनें हे तरुणबांडच आहेत, आणि यांच्यामध्यें आणि किचनेर यांच्यामध्यें जेव्हां निवडानिवड करण्याचा प्रसंग आला, तेव्हां आपल्या हेक्याचें प्रायश्चित्त भोगण्याची पाळी कर्झन-साहेबांवरच येऊन ठेपली. अंगीं हुषारी असली तरी गर्व, ताठा किंवा दुरभिमान यांचा परिणाम अशाच प्रकारें व्हावयाचा. लॉर्ड कर्झन यांच्या अंगीं जे गुण आहेत त्यांचा यापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें प्रजेच्या हिताकडे आणि त्याबरोबरच साम्राज्याच्या खऱ्या हिताकडे त्यांस अधिक उपयोग करून घेतां आला असता; पण ईश्वराची इच्छा तशी नव्हती म्हणा, अगर आमच्या देशाचा भाग्योदय आला नव्हता म्हणा; कांहींहि असो, यांच्या हातून साम्राज्याचें अगर हिंदुस्थान देशाचें कल्याण न होतां आपल्याच एका हेकेखोर स्वभावानें आपल्या हातून आपल्या कारकीर्दीची समाप्ति करून हे हुषार परंतु आसुरी आवेशाचे आणि संपत्तीचे व्हाइसरॉय आपल्या देशास परत जात आहेत ! ईश्वर करो, आणि त्यांस तेथेंच कोठें तरी उद्योग मिळून आपल्या ताठ्यानें, अभिमानानें, बेगुमानपणानें अथवा बेपर्वाईनें साम्राज्याचें नुकसान करण्यास यांस हल्लींच्याप्रमाणें पुनः कोठें संधि न मिळो, अशी परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे. सूर्यमालेंत ज्याप्रमाणें कांहीं ग्रह व उपग्रह असून कांहीं धूमकेतु असतात त्याचप्रमाणें बादशहाच्या भोंवतीं

फिरणाऱ्या मुत्सद्दीमंडळांतहि कांहीं धूमकेतुसारखे गृहस्थ असतात. लॉर्ड कर्झन हे शिरोभागीं नमूद केल्याप्रमाणें अशांपैकींच एक गृहस्थ होत, आणि यांचा बहुत वर्षांनीं पुनः उदय झाल्यास तो जितका कमी होईल तितका करण्याची साम्राज्यांतील मुत्सद्यांनीं व्यवस्था ठेविली पाहिजे.

# २०. तत्त्ववेत्ता आणि मुत्सद्दी

[ १८ सप्टेंबर १९०६ ]

मि. मोर्लेसाहेब लिबरलपक्षाच्या तर्फे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाल्यापासून त्यांचे वेळोवेळीं जे उद्‌गार बाहेर पडले त्यासंबंधानें आमचे विचार त्या त्या वेळीं आम्ही प्रदर्शित केलेच आहेत. तत्त्वज्ञान आणि राजकारण या दोन गोष्टी अत्यंत भिन्न असतात हें तत्त्व आमच्या पुढाऱ्यांच्या मनांत जितकें बिंबावें तितकें अद्याप बिंबलें नाहीसें दिसतें. एखाद्या घरचा संसार करण्यास जर एखाद्या वेदांत्याची योजना केली तर त्याचे हातून सदर घरामधील भाऊबंदकीचे तंटे मिटण्याचा संभव जितका कमी आहे तितका तत्त्वज्ञाच्या हातून राजकारणाच्या धोरणांत फरक पडणें अशक्य आहे. सामान्य मनुष्यजातीच्या कल्याणास कोणच्या प्रकारची राज्यव्यवस्था असणें इष्ट किंवा आवश्यक आहे, देशाचा व्यवहार कोणच्या पद्धतीनें चालला असतां देशांतील लोक अधिक सुखी होतील अथवा प्रजाजनांस कोणत्या रीतीनें वागविलें असतां प्रजा संतुष्ट राहून राजास नेहमीं दुवा देईल, इत्यादि प्रश्नांचा एकांतांत सखोल विचार करून त्यासंबंधानें कांहीं सिद्धांत बांधणें हें खऱ्या तत्त्वज्ञाचें काम होय. हें काम करीत असतां जगामध्यें किंवा व्यवहारांत स्वार्थ, लोभ, मद, मत्सर वगैरे अनेक कारणांनीं मनुष्यामनुष्यामध्यें जो लढा पडत असतो त्याचा विचार तत्त्वज्ञास क्षणभर एका बाजूस ठेवावा लागतो अथवा विचार केलाच तर त्यांचा प्रतिकार कसा करतां येईल अगर या मनोवृत्तींचा निग्रह कसा करावा इकडे त्यांचें लक्ष जात असतें. षड्रिपूंचें दमन हा वेदान्ताचा जो एक भाग होऊन बसला आहे त्याचें कारण हेंच होय. वस्तुतः पाहातां आत्म्याचा परमेश्वराशीं संबंध काय आणि जीवाचा परमेश्वरात लय कसा होतो हें सांगितलें म्हणजे वेदान्त संपला; पण हा हेतु साध्य होण्याकरितां व्यवहारांत ज्या अडचणी येतात त्यांचाहि वेदांत्यास विचार करावा लागतो. राजकीय तत्त्वज्ञाची गोष्ट याच प्रकारची होय. उदात्त तत्त्वें किंवा उदात्त बुद्धीचे विचार हे साम्राज्यास किंवा राष्ट्रास श्रेयस्कर आहेत असें प्रतिपादन करून या तत्त्वाची जेथें चाड आहे तेथेंच लोक उन्नतावस्थेस प्राप्त झालेले असतात, असें तत्त्वज्ञ जगास सांगत असतो; पण हा धंदा आणि राजकीय बाबतींत स्वतः पडून हीं तत्त्वें अंमलांत आणण्याचा धंदा हे दोन्ही अगदीं भिन्न आहेत. प्रसिद्ध इंग्रजी तत्त्ववेत्ता स्पेन्सर यानें हल्लीं इंग्लंडांत ज्या बादशाही धोरणास ऊत आलेला आहे त्याचा

तात्त्विक दृष्ट्या पूर्ण निषेध केलेला होता; पण चेंबरलेनच्या कृतीस त्यामुळें यत्किंचित्हि आळा पडला नाहीं. ईस्ट इंडिया कंपनीस सल्ला देणाऱ्या दोघां मिल्लांची हीच अवस्था झाली. स्पेन्सरसाहेबांस आपण पार्लमेंटसभेंत कां जात नाहीं असा कोणी प्रश्न केला होता; तेव्हां त्यांनीं अशा अर्थाचें उत्तर दिलें कीं, " पार्लमेंटच्या सभासदांना उदार राजकीय तत्त्वें शिकविण्याचा आमचा जो अधिकार आहे तो सोडून देऊन खालच्या पायरीवर येण्यांत कांहीं अर्थ नाहीं." स्पेन्सरसाहेबांचें हें उत्तर अगदीं यथायोग्य होतें, हें सांगण्याची जरूरी नाहीं. मुत्सद्दीपणा किंवा राज्यकारभार हा कांहीं नेहमीं उदात्त तत्त्वांच्या जोरावर चालत नसतो. आपल्या राज्याचें किंवा साम्राज्याचें वैभव राखणें हें खऱ्या मुत्सद्याचें काम होय; त्याचे सर्व उद्योग, सर्व युक्त्या आणि मसलती या एका उद्देशास धरून असावयाच्या. जाणुन बुजून, विनाकारण किंवा केवळ धर्मबुद्धीनें आपल्या देशाच्या किंवा साम्राज्याच्या वैभवापैकीं किंवा अधिकारापैकीं कोणताहि भाग तो इतरांस देऊं शकत नाहीं; अगर आपल्या बुद्धिवैभवानें व्यवहारांतील इतर लोकांच्या मनांत उदार बुद्धीचा अधिक प्रसार करूं शकत नाहीं. वेदान्तांतील उदाहरण घ्यावयाचें असल्यास तुकारामबुवांचें घेतलें तरी चालेल. एवढा मोठा भगवद्भक्त कीं ज्यानें विठोबास देखील अडवून धरावें, पण त्याचे हातून त्याच्या बायकोच्या बुद्धींत कांहीं फरक पाडतां आला नाहीं. लोकव्यवहारांतील गोष्टी धर्मबुद्धीनें चालत नसतात. स्वार्थ हा एकटाच ह्या व्यवहाराचा नियमन करणारा राजा किंवा बादशाहा आहे असें म्हटलें तरी चालेल. एखाद्या उदार बुद्धीच्या माणसाची स्वार्थाची कल्पना कदाचित् अधिक व्यापक असेल, पण तिचा व्यापकपणा लोकांच्या अनुभवास आल्याखेरीज तिचा अम्मल होणें दुरापास्त आहे. खरा तत्त्ववेत्ता जो असतो तो यासाठींच व्यावहारिक गोष्टींत प्रायः पडत नाहीं, आणि पडलाच तर लवकरच त्याचें मन विटून जाऊन तो पुनः आपल्या मूळ पदावर येतो. मुत्सद्दी आणि योद्धा ह्यांमध्यें जसा एक प्रकारचा फरक आहे तसाच मुत्सद्दी आणि तत्त्ववेत्ता यांमधील भेद होय. मोर्लेसाहेब अधिकारारूढ झाले म्हणजे गरीब हिंदुस्थानाला कांहीं हक्क मिळतील अशी जी आम्ही आशा करीत होतों ती वरील भेद विसरल्यामुळें किंवा माहीत नसल्यामुळें करीत होतों. हा भेद इंग्रज लोकांस पक्का समजतो व म्हणूनच मोर्लेसाहेब स्टेट सेक्रेटरी झाल्यावर त्यांच्यापैकीं कित्येकांस हें मुत्सद्दी कसे काय होतात याची चिंता पडली होती. पण बंगालची फाळणी लोकमताविरुद्ध असली, तरी ती कायम ठेवली पाहिजे, असें जेव्हां त्यांनीं निक्षून उद्गार काढले, तेव्हां विलायतेंतील व येथील इंग्रजांस कळून चुकलें कीं, 'बेटा तत्त्ववेत्ता तर खराच, पण मुत्सद्दीहि आहे!' मोर्लेसाहेबांच्या पहिल्या पहिल्या

आपणांवर इंग्रजी वर्तमानपत्रांतून आलेली टीका जर कोणी लक्षपूर्वक वाचली असेल तर त्यास आम्ही वर केलेल्या विधानाची सत्यता कळून येईल, नाना फडणवीसांस वेदान्त येत असला तरी ज्याप्रमाणें त्याचा राजकारस्थानांत त्यांनीं कधीं उपयोग केला नाहीं तद्वतच मोर्ले यांची स्थिति होय. हातांत घेतलेल्या विषयाला मोहक स्वरूप कसें द्यावें आणि स्वार्थाला सजवून क्षणभर तरी परमार्थाचें रूप कसें आणावें या बाबतींत मात्र तत्त्वज्ञाच्या विद्वत्तेचा–तो खरा मुत्सद्दी असेल तर–चांगला उपयोग होतो. बाकी मुत्सद्दी म्हटला म्हणजे त्याला क्षणभर तात्त्विक विचार एका बाजूस ठेवून व्यवहारदृष्टचा साध्यासाध्यतेचा व शक्याशक्यतेचा विचार करावा लागतो. राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गांत जर एखादी अडचण आली असेल तर तिचें अनेक दिशांनीं परीक्षण करून ती खरी असल्यास तिचें तितक्या पुरतें निवारण करणें किंवा ती आपल्या राष्ट्राच्या एकंदर प्रगतीस आड येणार नाहीं अशी तजवीज करणें, हें मुत्सद्याचें खरें काम होय, आणि एखादा तत्त्ववेत्ता जर हें काम पत्करील तर त्याला तें मुत्सद्याच्या वृत्तीनेंच चालविलें पाहिजे. नाहींपेक्षां वेदान्ती वेदान्ततत्त्वांवर एखाद्याचा संसार चालविण्यास प्रवृत्त झाला असतां जशी त्याची फजिती होईल तशीच मुत्सद्दीपणाचें काम तात्त्विक विचारांच्या जोरावर करूं इच्छिणाऱ्या तत्त्ववेत्त्याची होईल यांत शंका नाहीं.

वरील विवेचनावरून मि. मोर्ले यांच्यावर आम्ही किती विसंबून राहावें याची वाचकांस चांगली कल्पना येईल. आमचें तर स्पष्ट असें मत आहे कीं, मि. मोर्ले हे आपणांस कांहीं महत्त्वाचे हक्क देतील अशी जी कित्येकांची आशा आहे ती अगदीं व्यर्थ होय. राजकीय व्यवहारांत तत्त्वविचारापेक्षां स्वार्थाचें प्राबल्य अधिक असतें हें तत्त्व महाभारतकालींहि पुरातन व सर्वसामान्य असें समजलें जात होतें; व त्यानंतरचा जगाचा इतिहास पाहिला तर तो या तत्त्वास ज्यास्तच बळकटी देत आहे. इंग्रजी राष्ट्र किंवा इंग्रजी लोक जगावर आज जो हुतुतु घालीत आहेत, एकाचा देशच प्रत्यक्ष आपल्या ताब्यांत घेत आहेत, तर दुसऱ्याचा व्यापार आपल्या कह्याखालीं आणीत आहेत– तो कांहीं परोपकाराकरितां नव्हे, होईल तितकें लोकांचें हरण करून स्वतःची भर करावयाची, हा त्यांतला मतलब आहे. फार लांब कशाला, बेंजामिन् किड् नामक ग्रंथकारानें असें प्रतिपादन केलें आहे कीं, युरोपांतील समशीतोष्ण कटिबंधांत राहाणाऱ्या राष्ट्रांनीं उष्ण कटिबंधांतील राष्ट्रें पादाक्रांत करून त्यांच्या संपत्तीनें आपापली भरभराट करून घ्यावी, असे दिवस किंवा काल आतां आलेला आहे. इंग्लंड हिंदुस्थानावर राज्य करतें तें याच कारणाकरितां होय. त्यांत कांहीं इंग्लंडाचा परमार्थ नाहीं. आतां एवढें मात्र खरें कीं, इंग्लंड देश हिंदुस्थानच्या संपत्तीचें अशा प्रकारें जें शोषण करणार, त्यास कांहीं मर्यादा आहे.

सोन्याचीं अंडीं घालणारी हंसी किंवा दुभती गाय मारणें ज्याप्रमाणें पातक आहे त्याप्रमाणेंच हिंदुस्थानासारखी सुवर्णभूमि हातांत सांपडली असतां आणि दरसाल चाळीस कोट रुपये सदर भूमीतून विनदिक्कत आपणांस मिळत असतां त्या भूमींतील लोकांस ताप देऊन नाखुष ठेवणें हें अत्यंत असमंजसपणाचें कृत्य होय. गाईचें दूध काढीत असतां वासरास जसा एखादा सड ठेवावा लागतो त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांस पुरेसें अन्न ठेवल्याखेरीज गत्यंतर नाहीं हें इंग्रजी मुत्सद्यांस पूर्णपणें माहीत आहे. परंतु आपण नेहमीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, ही गोष्ट घडून येते ती औदार्यानें नव्हे, स्वार्थबुद्धीनें होय. इंग्रजींत अशा मुत्सद्दीपणास enlightened despotism किंवा 'खऱ्या स्वार्थाचा जुलूम' असें नांव आहे. या मर्यादेपलीकडे जी स्वार्थबुद्धी जाईल ती आंधळी समजली पाहिजे. सर हेनरी कॉटन वगैरे जे कांहीं इंग्रजी गृहस्थ आज आमच्या वतीनें विलायतेंत भांडत आहेत ते या खऱ्या स्वार्थबुद्धीनें नव्हे, आणि मि. मोर्ले यांचे तत्त्वविचार या बुद्धीच्या पलीकडे–निदान राज्यव्यवस्थेंत तरी–जातील असे त्यांच्या आजपर्यंतच्या वर्तनावरून दिसून येत नाहीं. मुत्सद्दीपणांत किंवा राज्यकारस्थानांत उदार तत्त्वांची मजल येथपर्यंत चालावयाची, मग तें कारस्थान करणारे मोर्लेसाहेब असोत, कॉटन असोत किंवा रिपन असोत.

अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे मोर्लेसाहेबांच्या कारकीर्दींत किंवा लिबरल पक्षाच्या अमदानींत आपणांस काय मिळेल याचा कोणासहि सहज अंदाज करतां येईल. हिंदुस्थानच्या द्रव्याचें शोषण एकसारखें चालूं आहे, ही गोष्ट मोर्लेसाहेबांसारख्या पंडितास कांहीं माहीत नाहीं असें नाहीं; पण गाय जर मुकाट्यानें दूध देत आहे तर मग निघेल तितकें दूध कोण काढणार नाहीं ? लाथाच मारावयास लागली तर पाय बांधून ठेऊं आणि तितक्यानेंहि न निभावेल तर थोडेसें आंबोण पुढें ठेऊन दूध काढण्यास सुरुवात करूं, इतकेंहि करून दूध काढणें अशक्य झाल्यास पुढचा विचार पुढें पाहतां येईल. खरें राजकारस्थान याच तत्त्वावर चालत असतें. हिंदुस्थानांतील कांहीं गृहस्थांनीं विलायतच्या लोकांपुढें हिंदुस्थानच्या लोकांच्या दारिद्र्याचें वर्णन केल्यानें तिकडील कांहीं सात्त्विक लोकांच्या मनांस द्रव फुटेल; पण एकंदर राष्ट्रांतील लोक स्वार्थाचा व्यावहारिक मार्ग सोडून देतील अशी आशा बाळगणें मूर्खपणा होय. इंग्रजी राज्यकर्त्यांकडून जर आम्हांस कांहीं हक्क प्राप्त करून घ्यावयाचे असले तर सुशिक्षित आणि अशिक्षित या दोघांनींहि एक होऊन हल्लींच्या राज्यकारभाराचें गाडें अडून पडलें, असें राजकर्त्यांच्या अनुभवास आणून दिलें पाहिजे. कॉटन किंवा मोर्ले यांसारखा एखादा दुसरा पुरुष ही भावी अडचण लवकर लक्षांत घेईल; पण तेवढ्यानें आम्हांस कांहीं उपयोग

व्हावयाचा नाहीं. त्याच्या सर्व जातभाईंना ती अडचण खरी वाटली पाहिजे; आणि या जातभाईंच्या प्रत्ययास ती अडचण येण्यास चक्षुर्वैसत्यं हा एकच मार्ग आहे. या मार्गानें जातभाईंची जव्हां खातरी झालेली नसते तेव्हां ग्ल्याडस्टनसारख्यांचे प्रयत्नहि निष्फळ होतात, हें आयरिश प्रकरणावरून सिद्ध झालेलें आहे. सारांश, हिंदुस्थानांतील प्रजेस कांहीं विशेष महत्त्वाचे हक्क दिल्याखेरीज गत्यंतर नाहीं. हें केवळ मोर्लेसाहेबांसच नव्हे तर कर्झन साहेबांस देखील अपरिहार्य वाटूं लागेल तेव्हां हिंदुस्थानास कांहीं फायदा होण्याचा संभव आहे. नाहींपेक्षां एखाद्यानें यदाकदाचित् एखादी लहानशी देणगी दिली तर पुढल्या कांझरव्हेटिव अमदानींत ती परत घेतली जाईल. 'भिकेची हुंडी कधींही शिक्याला पोंचत नाहीं,' अशी जी आमच्यांत म्हण आहे त्यांतील बीज हेंच होय. जोंपर्यंत आम्ही आपल्या सामर्थ्यानें व एकजुटीनें अमुक प्रकारचे हक्क आम्हांस पाहिजेत असें आमच्या राज्यकर्त्यांच्या निदर्शनास आणून दिलें नाहीं तोंपर्यंत आमच्या अर्ज्या व रडगाणीं आधीं कोणी ऐकणार नाहीं, आणि यदाकदाचित् एखादा कोणी ऐकणारा भेटलाच तर त्यापासून खरा लाभ कधींहि प्राप्त व्हावयाचा नाहीं, हा सिद्धांत होय. आजपर्यंत या सिद्धांताकडे लक्ष न देतां आम्ही आपले उद्योग चालू ठेवले होते; पण ही आमची चूक आहे असें अनेक वर्षांच्या अनुभवानें स्पष्ट दिसून येत आहे. इतक्याउपर शाळेंतील पोरांप्रमाणें आम्ही जर उदात्त तत्त्वांच्या मनोराज्यांत गढून जाऊन तत्त्वज्ञानाच्या विश्वासावर अवलंबून राहिलों तर आमच्यासारखे हतभागी कोणी नाहींत असें समजलें पाहिजे. हें राजकारस्थान आहे, तत्त्वज्ञान नव्हे ही गोष्ट कधींहि विसरतां कामा नये; आणि ती न विसरतां जर आम्ही उद्योग केला तरच त्यांत आपणांस केव्हांना केव्हां तरी यश येईल. आमचे अँग्लोइंडियन प्रतिपक्षी आमची मजल तत्त्वविचारांच्या पलीकडे जाऊं नये असा कावेबाजपणाचा उपदेश आम्हास करतील; किंबहुना मोठ्या नेटानें आणि आवेशानें करतील; परंतु तिकडे दुर्लक्ष करून आणि त्यांतील मानभावीपणा ओळखून आमच्या उन्नतीचा खरा मार्ग आम्ही स्वीकारला पाहिजे. खरें राजकारण, खरें देशकार्य, यांतच आहे आणि हाच आपल्या खऱ्या उन्नतीचा मार्ग होय.

# २१. सनदशीर व कायदेशीर

[ ५ मार्च १९०७ ]

ना. गोखले यांच्या व्याख्यानावर टीका करतांना त्यांनीं हिंदुस्थानांतील जुन्या आणि नव्या पक्षाची सर्व राजकीय चळवळ यच्चयावत् म्हणजे अर्ज करण्यापासून तों तहत कर देण्याचे नाकबूल करण्यापर्यंत सनदशीर किंवा कॉंस्टिटयूशनल ( Constitutional) आहे असें जें विधान केलें होतें तें बरोबर नाहीं असें आम्हीं लिहिलें आहे. किंबहुना याबाबतींत कायदेशीर आणि सनदशीर हे दोन शब्द वापरतांना प्रो. गोखले यांचा घोंटाळा झाला असेंहि म्हटलें आहे. या आमच्या म्हणण्यास आधार काय व प्रो. गोखले यांनीं कायदा आणि सनद किंवा इंग्रजीमध्यें ज्यास लॉ (Law) आणि कॉन्स्टिटयूशन ( Constitution ) असें म्हणतात ते शब्द वापरतांना गैरसावधपणानें कसा घोंटाळा केला आहे हें थोडेसें खुलासेवार सांगण्याचा आज आमचा इरादा आहे. हा विषय मुद्दाम हातीं घेण्याचें दुसरें कारण असें कीं, सनदशीर किंवा कॉन्स्टिटयूशनल हा शब्द इंग्लंडच्या इतिहासांत बराच वेळ येत असल्यामुळें शाळांतून किंवा कॉलेजांतून शिकणाऱ्या किंवा कॉलेज सोडून गेलेल्या तरुण पिढीस या शब्दाच्या उपयोगानें एक प्रकारचा मोह उत्पन्न होणें साहजिक आहे; हा भ्रम दूर व्हावा, आणि इंग्लंडांत त्यास सनदशीर चळवळ म्हणतात व जी ब्राईट आणि कॉब्डेन यांनीं केली तशी चळवळ येथें केली तरी ती सनदशीर होत नाहीं, फार झालें तर कायदेशीर होईल, एवढें तरुण पिढीच्या स्पष्ट लक्षांत यावें. विषय थोडासा शास्त्रीय असल्यानें वाचकांनीं त्याचें नीट मनन करावें एवढी आरंभीं त्यांस सूचना आहे.

इंग्रजी इतिहासांत किंवा राजनीतिशास्त्रांत ज्यास कॉन्स्टिटयूशन असें म्हणतात त्याचें आम्हीं मराठींत 'सनद' या शब्दानें भाषांतर केलें आहे. 'कॉन्स्टिटयूशन' या इंग्रजी शब्दाचा मूळ अर्थ 'संघटना' किंवा 'रचना' असा आहे. राजसत्ता कधीं एक तर कधीं अनेक व्यक्तींच्या हातांत असते. ती एका व्यक्तीचे हातीं असली तर त्यास राजा, बादशाहा अशीं नांवें आहेत; आणि अनेकांच्या हातांत असली तर त्यांत कधीं सरदारांचा, कधीं अधिकारी वर्गाचा व कधीं लोकांच्या प्रतिनिधींचा समावेश होत असतो. प्रजासत्ताक राज्य ही राजसत्तेची शेवटची मर्यादा होय. परंतु सत्ता कोणाच्याहि हातांत असली तरी त्याबद्दल कांहीं मामुल वहिवाटीचे किंवा लेखी नियम असावे लागतात. हे नियम

किंवा रचना यांसच 'कॉन्स्टिटय़ूशन' असें म्हणतात; व हें प्रायः सनदेसारखे लेखांत गोंवलेले असल्यामुळें आम्ही त्याचें 'सनद' या अटपशीर शब्दानें भाषांतर केलें आहे. यापेक्षां विस्तृत वर्णन द्यावयाचें असल्यास कॉन्स्टिटय़ूशन म्हणजे "राजसत्ता–घटनेचे नियम" असें म्हणावें लागेल; आणि या नियमाला धरून किंवा अनुसरून जर एखादी गोष्ट असेल तर तीस "कॉन्स्टिटय़ूशनल" किंवा 'सनदशीर' हें विशेषण लावतां येईल. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे कोणत्याहि देशांत अगर राज्यांत राजसत्तेच्या शरीरघटनेचे जे नियम ती कॉन्स्टिटय़ूशन किंवा राजसत्तेची सनद, आणि त्याला अनुसरून अशी जी गोष्ट ती 'कॉन्स्टिटय़ूशनल' किंवा 'सनदशीर' असा अर्थ निष्पन्न होतो. पण हा धात्वर्थ किंवा यौगिक अर्थ झाला. 'कॉन्स्टिटय़ूशनल' किंवा 'सनदशीर' या शब्दाचा इतिहासांतील किंवा राजनीतिशास्त्रांतील रूढ अर्थ याहून थोडा भिन्न किंवा मर्यादित आहे. इंग्लंडांतील राजसत्ता 'कॉन्स्टिटय़ूशनल' किंवा 'सनदशीर' आहे असें जेव्हां म्हणतात तेव्हां त्याचा अर्थ असा असतो कीं, तेथील राजसत्ता अनियंत्रित नसून लोकांनीं संपादन केलेल्या हक्कांमुळें तिची मर्यादा किंवा व्याप्ती पुष्कळ संकुचित झालेली आहे. ज्या देशांतील राजा वाटेल तें करण्यास मुखत्यार असतो त्या देशांतील राजसत्तेची घटना 'सनदशीर' आहे असें म्हणण्याची वहिवाट नाहीं. कारण तेथील प्रजेस कांहींच हक्क नसतात. इंग्लंडांतील लोकांनीं आपल्या राजांकडून अशा हक्काच्या सनदा मिळविल्या आहेत; आणि राजाचा हक्क इतका संपुष्टांत आणला आहे कीं, एखादा राजा जुलमी निघाल्यास त्यास लोक पदच्युतहि करूं शकतात, अथवा प्रसंगविशेषीं त्याच्या शिरच्छेदापर्यन्तही पाळी येते! राजाच्या सत्तेवर प्रजेच्या सत्तेचा ज्या राज्यांत अशा प्रकारचा दाव असतो त्या देशांतील राजसत्तेची घटना खरोखर सनदशीर असते; बाकी केवळ कॉन्स्टिटय़ूशन किंवा घटना हा शब्द मूळ अर्थी अनियंत्रित राजसत्तेसहि लावतां येईल. उदाहरणार्थ, रशियांतील किंवा आमचेकडील मोंगलाईंतील राजसत्तेची घटना अथवा कॉन्स्टिटय़ूशन पाच्छाई धोरणाची, अनियंत्रित अगर जुलमी होती असें कॉन्स्टिटय़ूशनचें किंवा घटनेचें वर्णन करतां येईल. पण ही खरी राजसत्ता नव्हे. राजाची अनियंत्रित सत्ता नेहमींच वाईट असते असें आमचे म्हणणें नाहीं. राजा चांगला आणि दयाळु असला तर त्याची कारकीर्द लोकप्रिय असते, नाहींतर जुलमी झोटिंगपादशाही होते. परंतु चांगले राजे एकसारखे गादीवर येणें शक्य नसतें. करितां ही झोटिंगपादशाहीची भीति टळावी म्हणून युरोपांतील राष्ट्रांनीं आपापल्या राजांची सत्ता कांहीं नियम घालून देऊन मर्यादित

केली आहे. हे नियम राजांकडून मान्य करून घेण्यास तेथील प्रजेस पुष्कळ त्रास सोसावा लागून मारामाऱ्याहि कराव्या लागल्या आहेत. पण आतां ती गोष्ट सिद्ध झालेली आहे; आणि अशा रीतीनें सिद्ध झालेले राजसत्तेच्या मर्यादेचे जे नियम त्यांसच कॉन्स्टिटयूशन किंवा सनदशीर राजसत्तेची घटना असें म्हणतात. अशी राजसत्ता विलायतेंत आहे, हिंदुस्थानांत नाहीं, हें सांगावयास नकोच. सन १८५८ सालीं राणीसाहेबांनीं जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यास हिंदुस्थानची सनद असें आम्ही मोठ्या डौलानें म्हणत असतों खरें; पण हा निव्वळ अर्थवाद आहे. जाहीरनामा ही खरी सनद नव्हे व त्यामुळें हिंदुस्थानांतील राजसत्ता कोणत्याहि प्रकारें मर्यादित झालेली नाहीं. सन १८५७ च्या बंडानंतर लोक शांत व्हावे म्हणून राणीनें जो गोड आशीर्वाद दिला तो या जाहीरनाम्यांत आहे; आमच्या दृष्टीनें आम्हीं हें ' वचन ' समजतों; पण त्याची अंमलबजावणी करून घेण्याची शक्ती आमच्या अंगांत नाहीं किंवा हिंदुस्थानांतील राजसत्ताहि त्यामुळें मर्यादित झालेली नाहीं. अर्थात् शुक्तीच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें रुप्याचा आभास होतो तद्वत् या जाहीरनाम्याच्या ठिकाणीं सनदेचा आभास आहे; ही खरी सनद नव्हे. आम्हांस विलायतेंतील लोकांप्रमाणें राजसत्ता मर्यादित करणारे कोणतेच हक्क नसल्यामुळें आम्ही दूध म्हणून १८५८ च्या जाहीरनाम्याच्या पिठाचें पांढरें पाणी पीत आहों. पण खरें दूध म्हणजे कॉन्स्टिटयूशन किंवा सनद निराळी असते हें लोकांनीं कधींही विसरतां कामा नये. स्पष्ट बोलावयाचें असल्यास असें म्हटलें पाहिजे कीं, या पिठांच्या पाण्याचें दूध, या शिंपींचें रुपें किंवा या जाहीरनाम्याची सनद (राजसत्ता मर्यादित करणारी सनद) अजून आम्हांस संपादन करून घ्यावयाची आहे. आम्हांस गोड अभिवचनें– पाहिजे तर गोड थापा म्हणा– मिळालीं आहेत, सनद मिळालेलीं नाहीं, व त्यामुळें हिंदुस्थानांतील राजसत्ता विलायतेंतील राजसत्ते-प्रमाणें अद्याप सनदशीरहि झालेली नाहीं. इंग्लंडचा राजा आणि पार्लमेंट ही राजसत्तेची घटना इंग्लंडांतील लोकांपुरती सनदशीर आहे; पण हिंदुस्थान देशा-संबंधानें हा राजा आणि हें पार्लमेंट अनियंत्रित म्हणजे हिंदुस्थानांतील प्रजेच्या अगर त्यांच्या प्रतिनिधींच्या मताप्रमाणें अगर इच्छेप्रमाणें न चालणारीं आहेत. आतां कोणी असें म्हणतील कीं, इंग्लंडचा राजा आणि पार्लमेंट मिळून विलायतेंतील इंग्रजी प्रजेच्या मताप्रमाणें जर चालणारीं आहेत तर तीं अगदींच अनियंत्रित कशीं ? यास उत्तर एवढेंच आहे कीं, अनियंत्रित हा शब्द येथें सापेक्ष आहे. ज्या देशांतील राजा त्याच देशांतील प्रजा घ्यावयाची; आणि प्रजेचा अशा आपल्या राजाच्या सत्तेवर कांहीं पगडा आहे कीं नाहीं, एवढेंच नियंत्रित किंवा अनियंत्रित शब्दानें पाहावयाचें. हिंदुस्थानावर पूर्वी एका मोंगल बादशहाची राज-

सत्ता असे; व ती सत्ता अनियंत्रित असे. ही एका व्यक्तीची अनियंत्रित सत्ता जाऊन त्याऐवजीं इंग्लंडांतील राजा आणि पार्लमेंट यांची सत्ता आली; व आपापसांत इंग्लंड देशापुरती जरी ती नियंत्रित असली तरी ज्या अर्थी हिंदुस्थानांतील लोकांस जिंकून त्यांच्यावर इंग्रज लोक राज्य करीत आहेत त्या अर्थी हिंदी प्रजेच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील इंग्रजी राजसत्ता मोंगलाईप्रमाणेंच अनियंत्रित आहे असें म्हणावें लागतें; भेद एवढाच कीं, मोंगलाईत एका बादशहाची मनधरणी केली किंवा अकबरासारखा एखादा बादशहा चांगला आला तर प्रजेस सुख होई; आणि आतां तेंच सुख प्राप्त होण्यास इंग्लंडांतील सर्व लोकांची किंवा त्यांच्या सर्व प्रतिनिधींचीं मनें वळवावीं लागणार. अर्थात् हल्लींच्या राजसत्तेखालीं सुखप्राप्तीची आशा एक प्रकारें अधिक दुष्कर झाली आहे असें म्हटलें तरी चालेल ! पण आपल्यापुढें सध्यां तो प्रश्न नाहीं. हिंदुस्थानांतील राजसत्ता सनदशीर नाहीं, अनियंत्रित आहे, एवढेंच सांगावयाचें आहे; आणि तें वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानांत येईल. विलायतेंतील लोक ज्याप्रमाणें आपल्या प्रतिनिधींमार्फत राजाच्या सत्तेस आळा घालू शकतात तसा हिंदी प्रजेस अधिकार नाहीं. विलायतच्या लोकांचीं मनें वळवून घेण्याची आम्ही खटपट करावयाची हा कांहीं सनदशीर हक्कांचा किंवा इंग्रजींत ज्यास कॉंस्टिटयूशन म्हणतात त्यांतला प्रकार नव्हे. वर सांगितल्याप्रमाणें एक बादशहा असतां तर त्याचीं ज्याप्रमाणें आर्जवें करवयाचीं तशीं एकाच्या ऐवजीं अनेकांच्या हातीं सत्ता असल्यामुळें हल्लीं अनेकांचीं आर्जवें करावीं लागतात. आर्जव वाटेल त्यानें वाटेल त्याचें करावें; तें करण्याची सनद अगर हक्क कोणी कोणास द्यावा लागत नाहीं, अथवा त्यानें राजसत्ता मर्यादितहि होत नाहीं. राजा किंवा अनेकांच्या हातांत राजसत्ता असल्यास ते आमचें आर्जव ऐकतील किंवा ऐकणार नाहींत; त्यांचे ते मुकत्यार आहेत. परंतु तेवढ्यानें आम्हांस या बाबतींत राजसत्ता मर्यादित करण्याचा हक्क आला असें म्हणतां येत नाहीं. अर्थात् हिंदुस्थानावर राज्य करणारे विलायतेंतील राजा व पार्लमेंट हे जरी स्वत:पुरते परस्पर नियंत्रित असले तरी हिंदी प्रजेच्या दृष्टीनें यांची हिंदुस्थानांतील राजसत्ता अनियंत्रित किंवा बेसनदशीर अथवा 'नॉन कॉन्स्टिटयूशनल' आहे, असेंच म्हणावें लागतें. पार्लमेंट सभेनें हिंदुस्थानांतील गव्हर्नर, गव्हर्नर–जनरल वगैरे कामगारांच्या अधिकाराबद्दल कांहीं कायदे अगर नियम केलेले आहेत हें खरें, व मागें सांगितल्याप्रमाणें या नियमांस कॉन्स्टिटयूशन किंवा सनद हा शब्द मूळ धात्वर्थाप्रमाणें लावतां येईल, पण "सनदशीर" अगर "कॉन्स्टिटयूशनल" या शब्दांचा इतिहासांत रूढ झालेला अगर वहिवाटींतील जो अर्थ वर दिला आहे व ज्यांत राजसत्तेवर असणाऱ्या

प्रजेच्या पगड्याचा अंतर्भाव होतो त्या अर्थाप्रमाणें हिंदुस्थानांतील राजसत्ता सनदशीर अगर कॉंस्टिटयूशनल नाहीं, विलायतेंत तेथील लोकांपुरती व त्यांच्या दृष्टीनें आहे, असेंच म्हणणें भाग पडतें.

विलायतेंतील राजसत्ता तेथील लोकांपुरती सनदशीर आणि हिंदुस्थानांतील विलायती राजसत्ता हिंदी प्रजेस गैरसनदशीर अथवा बेसनदशीर आहे, एवढें सिद्ध झाल्यावर सनदशीर किंवा कॉन्स्टिटयूशनल हा शब्द हिंदी लोकांनीं चालविलेल्या राजकीय चळवळीस लागू पडत नाहीं हें सिद्ध करणें फार कठीण नाहीं. आम्ही म्हणजे हिंदुस्थानांतील लोक, आमच्या देशांतील राजसत्ता अद्याप सनदशीर नाहीं म्हणून ती सनदशीर होण्याची खटपट करीत आहों. म्हणजे हिंदुस्थानांतील राजसत्तेवर हिंदी प्रजेच्या मताचा पगडा नाहीं तो बसावा म्हणून आमचे सध्याचे प्रयत्न चालू आहेत. विलायतेंत हल्लीं ज्या राजकीय चळवळी चालतात किंवा ब्राइट आणि कॉब्डेन यांनीं पूर्वी जी चळवळ केली तिचा प्रकार याहून निराळा असतो. विलायतेंत राजाची सत्ता प्रजेच्या सत्तेनें मर्यादित झालेलीच आहे. लोकांचें मत बदललें म्हणजे लोक आपल्या इच्छेप्रमाणें राज्यकारभारांत वाटेल तो फरक करू शकतात; व तसें करण्याचा त्यास अधिकारहि आहे. हिंदुस्थानांतील लोकमतास तसा अधिकार नाहीं. पार्लमेंट सभेचे प्रतिनिधी निवडून देण्याचा ज्या लोकांस अधिकार आहे त्या मतदार मंडळींचें बहुमत जर कोणी बदलविलें तर त्यास आपला इष्ट हेतु तेथील राजसत्ता ज्यांच्या हातांत आहे त्यांच्याकडून सिद्ध करून घेतां येतो. आतां कदाचित् कोणी असें विचारील कीं, हिंदुस्थानांतील राजसत्ता ज्यांच्या हातांत आहे त्यांचीं मनें वळविलीं तर हेंच कार्य हिंदुस्थानांतहि घडवून आणणें शक्य नाहीं काय ? पण जरा विचार केला तर ही कोटी भ्रामक आहे असें कोणाच्याहि लक्षांत येईल. हिंदुस्थानांतील राज्यकर्ते हिंदी प्रजेनें नेमून दिलेले नाहींत; अर्थात् हिंदी प्रजेच्या मनांत जरी फरक पडला तरी तेवढ्यानेंच राज्यकर्त्यांच्या मतांत फरक पडून कार्यसिद्धि होत नाहीं. विलायतेंत जी राज्यघटना किंवा कॉन्स्टिटयूशन आहे त्याप्रमाणें विलायतेंत राज्यकारभारांत घडामोड करूं इच्छिणारानें लोकमतांत पालट केला म्हणजे बस्स होतें; आणि ज्या अर्थी लोकमतांत पालट करण्याचा त्याला विलायतच्या राजसत्ता घटनेच्या नियमाप्रमाणें म्हणजे कॉन्स्टिटयूशनप्रमाणें अधिकार आहे त्याअर्थी त्याचा हा उद्योग किंवा चळवळ सनदशीर अगर कॉन्स्टिटयूशनल होते. हिंदुस्थानांतील राजसत्तेच्या घटनेप्रमाणें लोकांस कांहीं हक्क अगर लोकमताचा कोणत्याहि प्रकारें राजसत्तेवर पगडा नाहीं. मग लोकमत बदलण्याकरितां आम्ही जी चळवळ करतों त्यास सनदशीर असें म्हणण्यांत काय फायदा ? आम्हास

दोन गोष्टी करावयाच्या आहेत :- ( १ ) लोकमत वदलणें, आणि ( २ ) सदर वदललेल्या लोकमताचा राजसत्तेस शह देणें. ही दुसरी गोष्ट विलायतेंत राजकीय चळवळ करणाऱ्या लोकांस प्राप्त करून घ्यावयाची नसते. त्यांच्या देशांतील राजसत्तेच्या घटनेप्रमाणें किंवा कॉन्स्टिटयूशन अगर सनदेप्रमाणें तो हक्क त्यांस मिळालेलाच असतो. आणि त्यामुळें तो हक्क बजावण्यास लोकमत वदलण्याचा ते जो प्रयत्न करतात तो त्यांच्या देशांतील राजसत्तेच्या घटनेला अनुसरून म्हणजे कॉंस्टिटयूशनल अगर सनदशीरच समजला जातो. थोडक्यांत सांगावयाचें असल्यास कॉंस्टिटयूशनप्रमाणें लोकमताचा पगडा राजसत्तेवर असतोच; व त्यामुळें लोकमत वदलणें हें त्या कॉंस्टिटयूशनला धरून किंवा सनदशीर होतें. आमची म्हणजे हिंदी प्रजेची गोष्ट तशी नाहीं. हिंदुस्थानांतील राजसत्ता अनियंत्रित आहे; लोकमताचा तिजवर कॉंस्टिटयूशनप्रमाणें पगडा नाहीं; किंवहुना हा पगडाच कसा संपादन करावयाचा हाच मुख्य प्रश्न आहे. अशा स्थितींत आम्ही जी कांहीं राजकीय चळवळ करतों ती हिंदुस्थानांतील राजसत्तेच्या नियमांना अनुसरून अथवा कॉन्स्टिटयूशनल अगर सनदशीर करतों असें म्हणणें चुकीचें होय. फौजदारी कायदा किंवा पिनल कोडाच्या प्रमाणें आमचें करणें अगर चळवळ कायदेशीर असेल वा नसेल, तो प्रश्न निराळा आणि 'सनदशीर' पणाचा प्रश्न निराळा. ज्याला राजदंड नको आहे त्यानें आपले सर्व प्रयत्न कायदेशीर रीतीनेंच केले पाहिजेत हें तत्त्व जुन्या आणि नव्या दोन्ही पक्षास मान्य आहे. आमच्या हिंदुस्थानांतील कायदा– विशेषत: राजद्रोहाचा कायदा–अगर त्याची अंमलवजावणी इतर देशांतील कायद्यांपेक्षां अगर अंमलवजावणीपेक्षां अधिक कडक असेल. परंतु प्रजेच्या अगर प्रजेच्या प्रतिनिधींच्या मताप्रमाणें जोंपर्यन्त या देशांत कायदे होत नाहींत तोंपर्यन्त 'कायदेशीर' आणि 'सनदशीर' या दोन्ही कल्पना वेगळ्या राहाणारच. हल्लीं सुरू असलेले उभय पक्षांचे सर्व प्रयत्न अगर चळवळी 'कायदेशीर' आहेत एवढेंच जर ना. गोखले यांचें म्हणणें असेल तर त्यावद्दल मतभेद नाहीं. परंतु त्या सर्व 'सनदशीर' आहेत असें जर त्यांचें म्हणणें असेल तर तें चुकीचें आहे. पहिली गोष्ट ही कीं, ब्राइट आणि कॉव्डेन यांनीं विलायतेंत केलेली चळवळ सनदशीर म्हणजे तेथील तत्कालीन राजसत्तेच्या घटनेस ज्याप्रमाणें अनुसरून होती तशी आमची कोणतीहि सध्यांची चळवळ नाहीं; व आम्हीं विलायतेंतील लोकांप्रमाणें सनदशीर चळवळ करतों असें मनचे मांडे खाण्यांत अगर आमच्याकडील अमुक चळवळ वेसनदशीर असें म्हणण्यांत कांहीं हंशील नाहीं. हिंदुस्थानांतील राजसत्तेच्या घटनेंत राजकीय चळवळीस स्थळ अगर अवकाशच नाहीं. विलायतेंत तसें स्थळ

आहे; कारण तिकडील कॉंस्टिटयूशनप्रमाणें चळवळीनें लोकमत, आणि लोकमतानें राज्यकर्त्यांचें मत वदलतां येतें; म्हणजे मतांतर झालेल्या लोकांच्या हातांत राजसत्ता येते. हिंदुस्थानांतील चळवळीचा असा परिणाम होऊं शकत नाहीं. ना. गोखले यांस हा भेद माहीत नाहीं असें नाहीं. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, कॉन्स्टिटयूशनल अगर सनदशीर या शब्दाचा अर्थ " कॉंस्टिटयूशनला " अगर सनदेला धरून अथवा अनुसरून असा न करतां "कॉंस्टिटयूटेड किंवा सनदी अधिकारी यांचे मार्फत ज्याचें फल मिळणार" असा करावा. हिंदुस्थानांत आम्हीं जी राजकीय चळवळ करतों ती हिंदुस्थानांतील हल्लींच्या अनियंत्रित राजसत्ता धारण करणाऱ्या लोकांकडून राजकीय बाबतींत नवीन हक्क संपादन करून घेण्यासाठीं करितों; म्हणजे आम्हांस जो प्रयत्न करावयाचा आहे त्याचें फल या सत्ताधारी किंवा कॉन्स्टिटयूटेड अधिकारी वर्गाकडून मिळावयाचें आहे; आणि ना. गोखले यांचें असें म्हणणें आहे कीं, एवढ्याचकरितां आमची चळवळ कॉन्स्टिटयूशनल किंवा सनदशीर समजली पाहिजे. नामदारांनीं 'कॉन्स्टिटयूशनल' किंवा 'सनदशीर' याची ही व्याख्या कोठून काढली न कळे! आमच्या मतें ही व्याख्याच चुकीची व निराधार आहे. सनदशीर किंवा कॉन्स्टिटयूशनल याचा खरा अर्थ सनद अगर कॉन्स्टिटयूशन यांस धरून किंवा अनुसरून असा आहे; ना. गोखले यांच्याप्रमाणें सनदी अधिकाऱ्यांकडून त्याचें फळ मिळणार असा नव्हे. या चुकीच्या अर्थाचा परिणाम असा झाला कीं, सर्व कायदेशीर चळवळी सनदशीर आहेत असें गोखले यांस म्हणणें भाग पडलें! आमच्या मताप्रमाणें जुन्या अगर नव्या पक्षाच्या सर्वच चळवळी कायदेशीर असल्या तरी कॉन्स्टिटयूशनच्या अगर सनदेच्या बाहेरच्या आहेत; कारण, आमच्याकडील राजसत्तेवर कोणत्याहि सनदेनें लोकमताचा पगडा बसलेला नाहीं किंवहुना अशा प्रकारची सनदच आम्हांस मिळालेली नाहीं. ती मिळविण्याकरितां आमची सर्व खटपट आहे. ही खटपट कायदेशीर होऊं शकेल किंवा कायदेशीर होईल; पण सनदशीर होऊं शकत नाहीं. कित्येकांस हा भेद निव्वळ शाब्दिक वाटेल; पण खरा प्रकार तसा नाहीं. कांहीं जाणत्या लोकांचीहि अद्याप अशी समजूत आहे कीं, कॉंग्रेसची आजपर्यंतची चळवळ सनदशीर होती, व नवा पक्ष ती बेसनदशीर करून लोकांस संकटांत घालीत आहे. आणि याच्या समर्थनार्थ विलायतेंत लोकमत वळविण्याची मागें कॉब्डेननें जी खटपट केली तिचा किंवा नुकतीच चेंबर्लेन साहेब जी खटपट करीत होते तिचा दाखला देण्यांत येत असतो. ही समजूत चुकीची असून हा दाखलाहि आम्हांस लागू पडत नाहीं. हें लक्षांत येण्यास सनदशीर या शब्दाचा खरा अर्थ समजला पाहिजे; व तो समजावा म्हणून आज त्याचें विवेचन केलें आहे; नुसता शाब्दिक वाद वाढविण्याकरितां नाहीं. इंग्रजी इतिहास

वाचून तिकडच्याप्रमाणेंच आम्हीहि इकडे कॉन्स्टिटयूशनल अगर सनदशीर चळवळ सुरू केली पाहिजे, असें कांहीं लोक वडबडत असतात; व कॉन्स्टिटयूशनल या शव्दांत त्यांच्या मतें एक प्रकारची जादू भरलेली असते. कित्येक रावबहादुरांस तर आपली चळवळ कॉन्स्टिटयूशनल म्हणवून घेण्यांत मोठी प्रौढी वाटत असते; व त्यांचें असें म्हणणें पडतें कीं, विलायतेंत ज्या सनदशीर चळवळी झाल्या त्यांत जर वहिष्काराचें तत्त्व नव्हतें तर आम्ही वहिष्काराचें तत्त्व स्वीकारणें वेसनदशीर होय, व असला वेसनदशीरपणा आम्ही कधींहि पत्करणार नाहीं. परंतु ही त्यांची घमेंड चुकीची व भ्रामक होय, असें वरील विवेचनावरून दिसून येईल. आपण वापरीत असलेल्या शव्दाचा अर्थ नीट न समजल्यामुळें कित्येकांच्या विचारसरणींत घोंटाळा उत्पन्न होत असतो; व तो घोटाळा निघण्यास वापरण्यांत येत असलेल्या शव्दाच्या अर्थाची शहानिशा किंवा फोड करणें याखेरीज दुसरा मार्ग नाहीं. आम्ही जें आज विवेचन केलें आहे, तें याच हेतूनें केलें आहे; व आम्हास अशी उमेद आहे कीं, आमच्यांपैकीं अमुक पक्षाची राजकीय चळवळ सनदशीर आणि अमक्याची वेसनदशीर असा वृथा भेद अगर घमेंड यापुढें कोणी करणार नाहीं. आम्ही सर्वच सनदेच्या दरवाज्याच्या वाहेरचे भिक्षुक आहोंत. खरी सनद आम्हांस मिळावयाची आहे; व जे जे म्हणून योग्य किंवा कायदेशीर प्रयत्न असतील, मग ते वहिष्काराचे असोत वा कर न देण्याचे असोत, ते सर्व करून आम्ही आपली कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे.

सारांश, आजमितीस हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्याची घटना जरी 'व्यवस्थेशीर' असली तरी इतिहासांतील रूढ अर्थाप्रमाणें ती 'सनदशीर' नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. गव्हर्नर किंवा गव्हर्नर जनरल यांचे अधिकार पार्लमेंटच्या कायद्यांनीं नियमित आहेत. पण या वावतींत प्रजेच्या हातांत कोणताच अधिकार नसल्यानें 'सनदशीर' किंवा 'कॉन्स्टिटयूशनल' हा शव्द आमच्या राज्यव्यवस्थेस लावतां येत नाहीं. आम्ही जे भांडत आहों, किंवा धडपड करीत आहों, ती राज्यकर्त्यांकडून सनदशीर पद्धत प्राप्त करून घेण्याकरितां होय. आणि हा हक्क राज्यकर्त्यांकडूनच मिळवावयाचा आहे. एवढ्यासाठींच या प्रयत्नास 'सनदशीर चळवळ' असें नांव देणें चुकीचें होय. 'सनदशीर' शव्द सोडून दिला म्हणजे आमचें प्रयत्न 'कायदेशीर' आहेत कीं, 'वेकायदेशीर' आहेत, एवढाच प्रश्न शिल्लक राहतो. हल्लींचे स्थितींत कायदा करणें आमच्या हातचें नाहीं तेव्हां आमचे प्रयत्न इतिहासास, मामूल वहिवाटीस, प्रजेच्या नैसर्गिक हक्कांस धरून नीतिदृष्ट्या जरी योग्य असले, तरी ते 'कायदेशीर' किंवा 'वेकायदेशीर' ठरविणें ही केवळ सरकारच्या इच्छेची गोष्ट आहे. आमचे योग्य प्रयत्नहि

एखादेवेळीं यांच्या कायद्यानें बेकायदेशीर होऊ शकतील. अशावेळीं आमचे प्रयत्न बेकायदेशीर, असें म्हणण्यापेक्षां कायदा जुलमी असें म्हणणें भाग पडेल. अशा स्थितींत 'कायदेशीर' आणि 'बेकायदेशीर' हे शब्द आमच्या चळवळीस किंवा प्रयत्नांस लागतात कीं नाहीं, याची आम्ही चिंता करीत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. न्याय, नीति, आणि ऐतिहासिक परंपरा किंवा प्रगति यांचा आधार आपणांस आहे कीं नाहीं, एवढेंच आम्हीं पाहिलें पाहिजे. आणि यांचा आम्हांस पाठिंबा असला म्हणजे मग आमचे प्रयत्न कायद्याचे मर्यादेंत येतात कीं बाहेर पडतात, याची आम्ही पर्वा करून उपयोगी नाहीं. कारण कायदा परवयांचे हातांत आहे. आतां एवढें खरें कीं, कायदा मोडला गेला तर शिक्षा होणार; परंतु कायदा जुलमी असेल तर ही शिक्षा सोसूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे; एरवीं इलाज नाहीं. नीति आणि कायदा यांची जेव्हां फारकत होते तेव्हां असेच प्रकार घडून यावयाचे.

---

# २२. स्वराज्य आणि सुराज्य

[ ९ एप्रिल १९०७ ]

मनांत उद्‌भवणारे विचार आणि मुखावाटे निघणारे उद्‌गार यांच्यामधील संबंध नित्य असो वा अनित्य असो, एवढी गोष्ट खरी आहे कीं, विचार अर्धवट किंवा अस्पष्ट असले म्हणजे त्या विचारांचें द्योतक जे शब्द तोंडांतून निघतात तेहि अस्पष्ट किंवा संदिग्ध असावयाचे; आणि उलट बाजूनें असेंहि अनुमान करतां येतें कीं, ज्याच्या भाषणांत किंवा शब्दांत गोंधळ आहे, त्याच्या विचारांतहि गोंधळ असावयाचाच. वाणी आणि अर्थ यांचा हा संबंध फार महत्त्वाचा आहे, व पुष्कळ प्रसंगीं शिकलेले लोकहि आपल्या विचारांमधली असंबद्धता किंवा अस्पष्टता शब्दावडंबरांत छपवून टाकण्याचा प्रयत्न करीत असतात. आपणांस काय पाहिजे याच्याबद्दल निश्चयात्मक कल्पना मनांत असली म्हणजे तोंडावाटे किंवा लेखणीवाटे निघणारे शब्दहि तसेंच निश्चयार्थक निघत असतात; कारण मनामध्यें विचार चालतो तोहि शब्दांनींच चालत असतो असा सामान्य अनुभव आहे. पुष्कळ वेळां असेंहि घडून येतें कीं, एखादा शब्द किंवा वाक्य एखाद्या ठिकाणीं आपण वाचलें असतां किंवा विशेष प्रसंगीं ऐकलें असतां तें कांहीं कारणामुळें तावडतोब मनांत भरतें. परंतु त्याच्या अर्थाची शहानिशा झाली नसल्यामुळें त्या शब्दाच्या रूढ अर्थाबरोबर इतर जे आनुषंगिक अर्थ असतात तेहि मनांत भरून सदर शब्दाच्या किंवा वाक्याच्या एकंदर अर्था-बद्दल एक प्रकारची भ्रामक बुद्धि मनांत उत्पन्न होते. अशा रीतीनें उत्पन्न झालेल्या अर्थाच्या संदिग्धतेमुळें त्याबद्दलच्या विचारसरणींतहि तोच दोष उत्पन्न होत असतो. याचें ताजें उदाहरण ‘ सनदशीर ’ आणि ‘ कायदेशीर ’ ह्या शब्दांची मागें जी आम्ही व्याख्या केली आहे त्यावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. आज तशाच प्रकारें ‘ स्वराज्य ’ आणि ‘ सुराज्य ’ या शब्दांची व्याख्या करावयाची आहे. गेल्या कॉंग्रेसमध्यें मि. दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत हे दोन्ही शब्द वापरले आहेत, आणि तेव्हांपासून स्वराज्याची प्राप्ति करून घेणें हा आमच्या राजकीय चळवळींचा अंतिम हेतु, असें सर्व लोक उघडपणें बोलूं लागले आहेत. मि. दादाभाई नवरोजी यांनीं ‘ स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं ’ अशा अर्थाचें एका प्रसिद्ध इंग्रजी मुत्सद्याचें वचनहि आपल्या भाषणाच्या आरंभीं घातलें होतें. व त्यांच्या बोलण्याचा आशय असा होता

कीं, नुसत्या 'सुराज्या'नें आमची राजकीय उत्कर्षाची इच्छा तृप्त होत नाहीं, तर आम्हांस 'स्वराज्य' पाहिजे. हें 'स्वराज्य' कसें मिळावयाचें हा एक स्वतंत्र प्रश्न आहे; पण त्यापूर्वी 'स्वराज्य' म्हणजे काय यासंबंधानें खुलासा झाला पाहिजे. बऱ्हाणपूर येथें नुकत्याच भरलेल्या बंगालच्या प्रांतिक सभेंत बाबू सुरेंद्रनाथ, बाबू विपिनचंद्र पाल वगैरे मोठमोठ्या मंडळींत ह्यासंबंधानें बराच मतभेद झाला होता. यावरून या शब्दाच्या अर्थाची फोड करणें व राष्ट्रीय सभेचा अंतिम हेतु सांगतांना कोणत्या अर्थानें आम्ही तो वापरीत आहों याचा थोडासा खुलासा करणें किती जरूर आहे हें वाचकांस दिसून येईल.

'स्वराज्य' म्हटलें म्हणजे अनेक तऱ्हेच्या कल्पना मनामध्यें उभ्या राहतात. 'स्वराज्य' व 'स्वाराज्य' हे शब्द वैदिक मंत्रांतहि उपयोग केलेले आढळतात; आणि 'स्वराज्य' शब्दांतील 'स्व' शब्दानें सकृद्दर्शनीं आपलेपणाचा बोध होतो. सामान्य मनुष्यास 'स्वराज्य' म्हणजे काय म्हणून जर विचारलें तर तो लागलीच असें उत्तर देईल कीं, "यांत काय आहे? स्वराज्य म्हणजे आपलें राज्य." परंतु एवढ्या उत्तरानें चौकस मनुष्याचें समाधान होणें शक्य नाहीं. आपलें राज्य म्हणजे काय, असा प्रश्न तो पुन्हां उलटून विचारील. आपलें म्हणजे आपल्या ज्ञातीचें, आपल्यांतील सरदारांचें, आपल्या धर्मीयांचें किंवा आपल्या सर्व प्रजेचें अथवा आपल्या देशांत अगर धर्मांत उत्पन्न झालेल्या राजाचें? असे अनेक प्रश्न 'आपला' या शब्दाच्या अर्थाचा विचार करतांना सहजगत्या उद्भवतात. ज्यावेळीं प्रजा आणि राजा दोन्हीहि एकाच धर्मातले, एकाच देशांतले, एकाच जातीचे आणि एकच प्रकारचा हिताहितसंबंध असणारे असून राजा प्रजेच्या हिताबद्दल नेहमीं तत्पर व दक्ष असतो तेव्हां प्रजेस आपल्यावरील राज्य स्वराज्यच आहे असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. 'रामराज्य' हें अशाच प्रकारचें स्वराज्य होतें. पण राजे लोक अधिकारमदानें किंवा अन्य कारणांनीं अंध होऊन प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करूं लागले किंवा जुलमी झाले म्हणजे स्वधर्मातील किंवा स्वदेशांतील राजा असतांहि त्याचें राज्य लोकांस नकोसें होतें. पेशवाईच्या अखेरची स्थिति अशा प्रकारची होती, व म्हणूनच तेव्हां बाजीरावाचें राज्य जाऊन इंग्रजांचें राज्य झालें याचें लोकांस फारसें वाईट वाटलें नाहीं. स्वदेशी राजाचें राज्य, या अर्थानें ते स्वराज्याचा त्यावेळीं उपभोग घेत होते. पण त्यांतील राज्यकारभार अव्यवस्थित असल्यामुळें तें राज्य सुखकारक नव्हते. 'स्वराज्य' ह्या शब्दाचा अर्थ दोन प्रकारें होऊं शकतो. एक 'सुव्यवस्थित राज्य' आणि दुसरा 'सुखकारक राज्य'. या दुसऱ्या अर्थानें पेशवाईचे अखेरीस स्वदेशी बाजीरावाचें राज्य 'स्वराज्य' नव्हतें असें म्हणतां येईल. आतां याच्या उलट

दुसरींहि उदाहरणें आहेत. राजा स्वदेशी असून आपल्या धर्माचा आहे, व त्याची राज्यव्यवस्थाहि शिस्तवार किंवा सुरळीतपणाची आहे. उदाहरणार्थ, हल्लीं रशियांतील राज्यपद्धती घेऊं. रशियाचे झार रशियन लोकांस धर्मानें किंवा जातीनें परके नाहींत; इतकेंच नव्हे तर त्यांच्या हाताखालील प्रजेची सांपत्तिक स्थिति सुधारून ती प्रजा भरभराटीस यावी आणि देशांत अधिकाधिक पैसा येऊन तो लोकांत कायमचा राहावा अशी त्यांची इच्छा आहे. तथापि झारसाहेब आपल्या प्रजेस जितकें स्वातंत्र्य द्यावयास पाहिजे तितकें देत नसल्यामुळें किंवा राज्य-कारभारांत त्यांची सल्लामसलत घेत नसल्यामुळें त्यांचें राज्य प्रजेस सुखकारक वाटत नाहीं. एका अर्थानें असेंहि म्हणतां येईल कीं, रशियांत ‘स्वराज्य’ म्हणजे स्वदेशी राजाचें राज्य आहे व तें शिस्तवारीच्या दृष्टीनें पाहिलें तर ‘सुराज्य’ ही आहे; पण लोकांस सुखकारक राज्य अशा अर्थानें पाहिलें असतां ‘सुराज्य’ नाहीं. स्वराज्य आणि सुराज्य या शब्दांचा उपयोग करतांना त्यांच्या अर्थाची छाननी करणें किती जरूर आहे हें यावरून ध्यानांत येईल. एका अर्थानें रशियांतील झारसाहेबाचें राज्य स्वराज्य आहे आणि सुराज्यहि आहे; म्हणजे तें स्वदेशी राजाचें राज्य आहे व तेथील राज्यकारभारहि सुरळीत चालतो. पण हें राज्य प्रजेच्या मताप्रमाणें चालत नाहीं; आणि स्वराज्य या शब्दाचा अर्थ ‘स्व’ म्हणजे प्रजा यांच्या मताप्रमाणें चालणारें राज्य असा जर केला तर रशियांतील राज्य सुराज्य असलें तरी स्वराज्य नाहीं असेंच म्हणावें लागेल. रशियांतील प्रजाजन हल्लीं जी चळवळ करीत आहेत ती या दुसऱ्या अर्थानें स्वराज्याची प्राप्ति व्हावी म्हणून होय. त्यांच्या देशांतील राजा कांहीं परकी नाहीं व त्याची राज्यपद्धत शिस्तवार नाहीं असेंहि म्हणणें नाहीं. परंतु त्याची राज्यपद्धत लोकतंत्रानें वागण्याची नसल्यामुळें त्याच्या प्रजेस आपण स्वराज्यांत आहों असें वाटत नाहीं. सारांश, स्वराज्य हा शब्द सनदशीर राज्यपद्धतीसच पुष्कळदां लावण्यांत येत असतो. ज्या राज्याचा कारभार प्रजेच्या किंवा प्रजापक्षाच्या तंत्रानें चालतो तेंच खरें स्वराज्य होय, असें म्हणणारे पुष्कळ लोक आहेत. त्यांच्या मतें ‘स्वराज्यां’तील ‘स्व’शब्दाचा अर्थ निव्वळ स्वदेशी राजाचें राज्य असा नव्हे, तर ‘स्व’ म्हणजे प्रजा ह्यांच्या तंत्रानें चाललेलें राज्य असा होय. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे रशियांतच काय पण हिंदुस्थानांतील नेटिव संस्थानचें राज्यहि खरें स्वराज्य नाहीं, असें म्हणावें लागेल. नुसता स्वदेशी राजा असला म्हणजे कांहीं सर्व कार्यभाग होत नाहीं. कदाचित् त्याची राज्यपद्धति शिस्तवार नसेल आणि यदाकदाचित् शिस्तवार असली तरी लोकांस सुखकारक नसेल. कारण शिस्त आणि सुख हीं दोन्ही नेहमीं एकत्र राहातातच असें

नाहीं. तुरुंगांतील व्यवस्था पुष्कळ शिस्तवार असते. पण त्यामुळें तुरुंगांतील कैद्यांस ती कधींहि सुखकारक वाटत नाहीं. प्रजेपैकीं बहुतेक सर्वांस, निदान जाणत्या लोकांस तरी, स्वातंत्र्यसुखाचें अत्यंत महत्त्व वाटत असतें; आणि ज्या राज्यांत या स्वातंत्र्यसुखाचा लोप होतो तें इतर दृष्टीनें कितीहि शिस्तवार असलें तरी लोकांस सुखकारक होत नाहीं. शिस्तवार या अर्थानें सुराज्य हा शब्द त्यास लावतां येईल, पण सुखाच्या दृष्टीनें पाहिलें तर तें राज्य सुराज्य आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. जर्मनींत सोशिआलिस्ट लोकांची जी हल्लीं चळवळ सुरू आहे तिचें समर्थन याच तत्त्वावर केलें पाहिजे. जर्मन बादशहा जर्मनींत कांहीं परके नाहींत; आणि जर्मन राष्ट्राचा व्यापार, संपत्ति व बोज वाढावा म्हणून ते नेहमीं प्रयत्न करीत असतात. तथापि त्यांच्या प्रजेपैकीं बऱ्याच जणांस ही व्यवस्था सुखकारक वाटत नाहीं, व त्यामुळें राज्यकारभार आपल्या तंत्रानें चालेल अशा प्रकारची राज्यव्यवस्था करून घेण्यास ते झटत आहेत. इतर पुष्कळ देशांतूनहीं हाच प्रकार सुरू आहे; आणि जगांत शिक्षणाचा जितका जितका अधिकाधिक फैलाव होईल त्या मानानें केवळ स्वदेशी राजा आणि सुव्यवस्थित राज्यकारभार एवढ्यानें लोकांची तृप्ति होणें अधिकाधिक दुर्घट होत जाईल. इतकेंच नव्हे तर ‘ प्रजासत्ताक राज्याखेरीज खरें स्वराज्यच नाहीं ’ असें म्हणण्यापर्यंतहि लोकांची मजल येऊन ठेपेल; आणि याखेरीच दुसरें राज्य सुराज्य होणें नाहीं असेंहि लोकांस वाटूं लागेल. स्वराज्य आणि सुराज्य यांची ही अंतिम एकवाक्यता होय. परंतु ती होण्यापूर्वी प्रत्येकाचे जे अनेक पोटभेद आहेत ते नेहमीं डोळ्यापुढें ठेवणें जरूर आहे. सुराज्य म्हणजे नुसते सुरळीत किंवा कायद्यानें, शिस्तीनें अगर नियमानें चाललेलें राज्य असा जर अर्थ घेतला तर इंग्रजसरकारचें हिंदुस्थानांत असलेलें हल्लींचें राज्य सुराज्य आहे असें कोणासहि कबूल करणें भाग पडेल. किंबहुना इंग्रजांच्या या टापटिपीमुळें आणि शिस्तीमुळेंच शेवटच्या बाजीरावाचें अव्यवस्थित स्वदेशी राज्य गेल्याचें कोणास त्या वेळीं वाईट वाटलें नाहीं हें वर सांगितलेंच आहे. परंतु इंग्रज सरकारचें राज्य व्यवस्थेच्या व शिस्तीच्या दृष्टीनें जरी सुराज्य असलें तरी तें केवळ राजकर्त्या गोऱ्या अधिकारी वर्गाच्या तंत्रानें चालत असल्यामुळें, आणि या अधिकारी वर्गास हिंदुस्थानच्या हितापेक्षां इंग्लंडचें किंवा गोऱ्या लोकांचें हित अधिक प्रिय असल्यामुळें इंग्रजी राज्य आम्हांस सुखकारक किंवा फायदेशीर झालेलें नाहीं आणि हल्लींचीच पद्धति कायम राहील तर होणें शक्यहि नाहीं. तुरुंगाची शिस्त ज्याप्रमाणें जाच देते त्याप्रमाणें इंग्रजी राज्यांतील शिस्तीनें, कायद्यानें आणि नियमानें प्रजा चोहोंकडून आटून गेली आहे. देशांतील व्यापारधंदे, इंग्रजी व्यापाऱ्यांच्या हिताकरितां खुल्या व्यापाराचें तत्त्व सुरू केल्यानें बुडून गेले; देशांतील मोठमोठ्या

पगाराच्या जागा नेहमींच गोऱ्या लोकांस देण्याचा नियम झाल्यानें आमच्या लोकांमधील तितका पैसा व अनुभव दरसाल कमी होत चालला; आणि लष्करी खात्याचा वगैरे अवाढव्य खर्च भागण्याकरितां जंगल, मीठ, अबकारी वगैरे अनेक खातीं काढून आणि जमिनीवरील सारे वाढवून कराच्या रूपानेंहि अधिक द्रव्य प्रजेकडून सरकारच्या तिजोरींत जाऊं लागलें. अशा स्थितींत कोणतेंहि राज्य कितीहि व्यवस्थित आणि शिस्तवार—म्हणजे एका अर्थी सुराज्य—असलें तरी तें लोकांस सुखकारक अशा अर्थानें सुराज्य होऊं शकत नाहीं, स्वराज्य हा शब्द तर यास लागतच नाहीं; कारण राजे किंवा राज्यकर्ते परधर्मी आणि परदेशांत राहाणारेच नेहमीं राहावयाचे, इतकेंच नव्हे, तर त्यांचा ओढाहि परदेशस्थ जातबांधवांच्या हिताकडेसच असावयाचा. अशा प्रकारचें राज्य लोकांस सुखकारक होण्यास त्याचा कारभार प्रजेच्या किंवा प्रजापक्षीय गृहस्थांच्या तंत्रानेंच चालला पाहिजे. हल्लीं जी व्यवस्था किंवा शिस्त आहे ती कोणी नको असें म्हणत नाहीं. परंतु राज्यपद्धत नुसती शिस्तवार असल्यानें कोणतेंहि राज्य लोकांस सुखकारक होत नाहीं. लोकांच्या तंत्रानें व त्यांच्या हिताकरितां तें राज्य चाललें पाहिजे किंबहुना लोकांच्या तंत्रानें चाललें म्हणजे तें त्यांच्या हिताकरितां असतेंच असें म्हटलें असतां चालेल. कारण एकदां प्रजापक्षाची सरशी होऊन राज्यकारभाराचें धोरण प्रजेच्या सल्लामसलतीनें चालूं लागलें म्हणजे मग राजा स्वदेशी नसला तरी त्यापासून फारसें नुकसान होत नाहीं. परकीय अंमलदार या नात्यानें त्यास काय पगार द्यावा लागेल तेवढाच देशाच्या बाहेर जावयाचा, व ही खंडणी नियमित मर्यादेच्या बाहेर कधींहि जाऊं शकत नाहीं. अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे प्रजेच्या तंत्रानें व सल्लामसलतीनें राज्यकारभार चालत असतां राजा किंवा कांहीं अधिकारी परदेशस्थ असले तरी 'स्वराज्य' आणि 'सुराज्य' या दोहोंचेंहि सुख लोकांस प्राप्त होण्यास अडचण पडत नाहीं. पूर्ण स्वराज्य होण्यास परकी किंवा परदेशी अधिकारी जितके कमी असतील तितके चांगले, व मुळींच नसले तर फारच उत्तम. पण हीच उत्तम स्थिती जरी एकदम प्राप्त झाली नाहीं तरी त्याच्या खालोखाल स्वराज्याचे म्हणजे प्रजेच्या सल्लामसलतीनें चालणाऱ्या राज्याचे हक्क मिळण्यास कांहीं हरकत नाहीं. आपण तसा उद्योग मात्र केला पाहिजे. राज्य नुसतें व्यवस्थेशीर किंवा एका दृष्टीनें सुराज्य आहे एवढ्यावर स्वस्थ बसून उपयोगी नाहीं. त्याचें धोरण कायम करण्यांत किंवा ठरविण्यांत प्रजेची सल्लामसलत कितपत घेतात ह्याचा विचार करावयास पाहिजे, आणि प्रजेच्या तशा प्रकारच्या राज्यकारभारावर दाब नसल्यास तो जेणेंकरून संपादन होईल अशी खटपट केली पाहिजे. स्वराज्याचे हक्क मिळवा असें मि. दादाभाई नवरोजी यांनीं जें सांगितलें त्याचा खरा अर्थ हा कीं, हा हक्क सध्यां आम्हांस मिळालेला

नाहीं, व यामुळेंच हल्लीचें राज्य सुखकारक नाहीं व स्वराज्यहि नाहीं, असें म्हणावें लागतें. अशा स्वराज्याकरतां केवळ खालसा मुलुखांतच खटपट झाली पाहिजे इतकेंच नव्हे, तर नेटिव संस्थानांतूनहि ही चळवळ होणें जरूर आहे. राजा स्वदेशस्थ किंवा परदेशस्थ या प्रश्नापेक्षां प्रजेच्या हातांत सत्ता किती हा प्रश्न हल्लीं अधिक महत्त्वाचा होऊन बसला आहे. कांहीं शतकांपूर्वीच्या राजनीतिशास्त्रांत आणि हल्लींच्या राजनीतिशास्त्रांत मोठा भेद आहे तो हाच होय. आमचें तर असें म्हणणें आहे कीं, वर सांगितल्याप्रमाणें खऱ्या स्वराज्याची म्हणजे ज्यांतील राज्यसत्ता प्रजेच्या हातांत आहे अशाची वाण केवळ व्यवस्थित राज्यानें अगर स्वदेशी राजा असल्यानेंहि भरून येत नाहीं; आणि अशा प्रकारचें खरें स्वराज्य जर नाहीं तर व्यवस्थित सुराज्य किंवा स्वदेशी राज्य यांपैकीं कशानेंहि लोकांस सुख होणार नाहीं. जर्मनी आणि रशिया या राष्ट्रांचीं उदाहरणें वर दिलींच आहेत. आशिया खंडांतील राष्ट्रांचीं उदाहरणें पाहिजे असल्यास चीन, जपान, इराण हीं डोळ्यांपुढें आहेतच. सर्वत्र जी चळवळ चालू आहे ती प्रजेचा पगडा राज्यकारभारावर असावा एवढ्याकरितांच होय. आणि त्याप्रमाणें ठिकठिकाणच्या लोकांस थोडेबहुत यशहि येत चाललें आहे. आम्हांसहि तीच गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची आहे व स्वराज्यप्राप्तीकरितां झटा, म्हणून जेव्हां आम्ही लोकांस सांगतो, तेव्हां याच अर्थानें 'स्वराज्य' शब्दाचा उपयोग करतो. 'स्व' म्हणजे ज्याचा तो, किंवा लोक अथवा एकंदर प्रजा; आणि त्यांचें म्हणजे त्यांच्या सल्लयानें चालणारें जें राज्य तें स्वराज्य. अशा स्थितींत राजा स्वदेशी असला तर चांगलेंच, पण परदेशस्थ असला तरी फारशी हानि होत नाहीं. असलें राज्य प्राय: व्यवस्थित आणि शिस्तवार किंवा एका दृष्टीनें सुराज्य असावयाचेंच. पण शिस्त थोडी कमी असली म्हणून तिची किंमत स्वातंत्र्यापेक्षां कांहीं अधिक धरितां येत नाहीं. सुराज्यानें स्वराज्याची वाण भरून येत नाहीं असें जें म्हणतात त्याचा अर्थ हाच होय. सर्वांत मुख्य गोष्ट आपल्या मताप्रमाणें जें आपल्यास आपलें हित वाटतें त्या धोरणानें राज्यव्यवस्था चालविण्याचा आपणां सर्वांस अधिकार असावा ही होय; खरें स्वराज्य हेंच होय; आणि याच अर्थानें हा शब्द आम्ही वापरीत असतों. हें प्राप्त झालें म्हणजे इतर गोष्टींची विशेष मातब्बरी नाहीं. त्या असल्या तर चांगलेंच, पण त्यांत थोडी उणीव असली तर त्यावांचून नडत नाहीं. स्वराज्य किंवा सुराज्य यांचा जेव्हां विचार करावयाचा तेव्हां ही त्यांच्या अर्थाची फोड नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे व त्याच हेतूनें आजचा लेख लिहिलेला आहे. रशिया व जर्मनी येथील कांहीं उदाहरणें घेऊन या विषयाचा जास्त खुलासा याच तत्त्वावर करावयाचा आहे, पण तो पुढें एखादे वेळेस करूं. सध्यां जे शब्द प्रचारांत येत चालले आहेत त्याचा खरा अर्थ लक्षांत येण्यास अर्थाची ही फोड पुरे आहे.

---

# २३. मिल्ल आणि मोर्ले

[ १० सप्टेंबर १९०७ ]

अडाणी मनुष्य व्यसनांत पडण्यापेक्षां विद्वान मनुष्य व्यसनांत पडल्यानें समाजाचें व देशाचें अधिक नुकसान होत असतें असा सर्वत्र अनुभव आहे. एक तर " यद्यदाचरति श्रेष्टस्तत्तदेवेतरो जन: " या न्यायानें विद्वानाची कृती अनुकरणीय समजून सामान्य जनहि त्याप्रमाणेंच आचरण करूं लागतात; आणि दुसरें कारण असें कीं, विद्वान एकदां व्यसनांत पडला म्हणजे तो आपली सर्व विद्वत्ता त्या व्यसनाचें होईल तितकें समर्थन करण्यांत खर्च करीत असल्यामुळें सामान्य लोकांस सदर व्यसन जितकें निंद्य वाटावें तितकें वाटत नाहीं ? हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत प्रस्तुत चालूं असलेलीं जुलमीं व अन्यायाचीं तत्त्वें बरोबर आहेत– निदान हल्लींच्या हिंदुस्थानच्या स्थितींत तरी तींच लागू केलीं पाहिजेत– असा आपल्या बजेटच्या भाषणाच्या वेळीं अभिप्राय देतांना पंडित मोर्ले यांनीं अशाच प्रकारची चूक केली आहे; आणि त्याचा परिणामहि असा झाला आहे कीं, श्ववृत्तींत जन्म घातलेले टाइम्स ऑफ इंडियांतील कित्येक लेखकहि मोर्ले साहेबांचेंच या बाबतींत अनुकरण करावयास लागले आहेत. मोर्ले साहेबांचा मुख्य आधार काय तो मिल्ल होय. त्यांनीं आपल्या भाषणांत असें म्हटलें आहे कीं, " आपल्या ऐन अमदानींत मिल्लसाहेबांचे ग्रंथ हीच एक ज्ञानाची जागती ज्योत होती, व या ज्योतीपासून आमच्यासारख्यांनीं आपल्या ज्ञानाच्या दिवट्या पेटवून घेतलेल्या आहेत. " असें सांगून हिंदुस्थानसारख्या–म्हणजे ज्यांत अनेक जातींचे आणि धर्माचे, कमजास्त सुधारलेले लोक आहेत, अशा–देशावर जें राज्य असावयाचें तें एकछत्री परकी सुधारलेल्या राष्ट्राचेंच असलें पाहिजे, असा 'प्रतिनिधीसत्ताक' राज्यपद्धती नांवाच्या ग्रंथांत मिल्ल साहेबांनींहि आपला अभिप्राय दिलेला आहे असेंहि मोर्लेसाहेब वक्तृत्वाच्या भरांत बोलून गेले. मोर्लेसाहेबांचें हें म्हणणें किंवा त्यांनीं दाखविलेला हा आधार बरोबर नाहीं, असें त्याचवेळीं आम्ही प्रतिपादन केलें होतें. श्रुतिस्मृतिसारख्या प्रमाण ग्रंथांतील वचनांची आमच्याकडील सुधारक लोक कशी काय ओढाताण करतात हें सर्वांस माहीत आहेच, आणि इंग्रजींत अशीहि एक म्हण आहे कीं सैतानास देखील आपल्या कृतीच्या समर्थनार्थ बायबलामधील वाक्यें आधार म्हणून दाखवितां येतात ! मि. मोर्ले यांचीहि स्थिति अशाच प्रकारची झाली आहे. मिल्ल साहेबांच्या ग्रंथांतलीं जीं

वचनें त्यांनीं आपल्या कृतीच्या मंडनाकरितां घेतलीं आहेत, तीं मागचा पुढचा संदर्भ सोडून घेतलेलीं असून अपुरीं आणि तुटकीं असल्यामुळें मिल्ल साहेबांचा खरा हेतु तेवढ्यानें व्यक्त होत नाहीं. तो समजण्यास मिल्ल साहेबांचा मूळ ग्रंथच वाचला पाहिजे व तो ज्यांनीं वाचला असेल त्यांस मोर्ले साहेबांची धूर्तता तावडतोब कळून येईल. गेल्या महिन्याच्या 'पॉझिटिव्हिस्ट रिव्ह्यू' च्या अंकांत मोर्ले साहेबांच्या भाषणावर मि. हेनरी एलिस यांनीं अशाच प्रकारची टीका करून अखेरीस मिल्लसाहेबांच्याच ग्रंथाधारें असें सिद्ध केलें आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांवर एकतंत्रीपणानें परकी लोकांनीं राज्य करून कधींहि चालावयाचें नाहीं; इतकेंच नव्हे, तर लोक असंतुष्ट होतील आणि तो असंतोष स्वराज्याचे हक्क दिल्याखेरीज कधींहि दूर होणार नाहीं. मिल्ल साहेबांचे ग्रंथ वांचतांना पहिली ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, एका देशांतील लोकांची स्वतंत्रता बलात्कारानें, भेदानें, किंवा युक्तीनें हरण करून घेण्याचा आणि त्यांजवर आपल्या स्वार्थाकरितां राज्य करण्याचा हक्क दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांतील अगर देशांतील लोकांस आहे हें तत्त्व– म्हणजे बळी तो कान पिळी हें तत्त्व– मिल्ल साहेब बिलकुल कबूल करीत नाहींत. ते म्हणतात कीं, "कोणत्याहि देशांतील लोकांनीं आपलें राज्य आपण चालविणें यात कांहीं अर्थ आहे आणि खरेपणा आहे; परंतु एका राष्ट्रांतील लोकांनीं दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांवर राज्य करणें म्हणजे निव्वळ भ्रम होय. एका देशांतील लोक दुसऱ्या देशांतील आपल्या फायद्याकरितां गुरांच्या गोठ्याप्रमाणें किंवा कुरणाप्रमाण उपयोग करूं शकतील. पण राज्यकर्त्यांचें खरें कर्तव्य प्रजेचें कल्याण आहे, अशा दृष्टीनें परकी लोक एखाद्या देशावर राज्य करतील हें सर्वथैव अशक्य होय." हें तत्त्व हृदयांत बिंबल्यावर मिल्ल साहेब कोणत्याहि देशावर परकीयांनीं राज्य चालविणें सशास्त्र किंवा न्याय्य आहे असें कधींहि प्रतिपादन करतील, असें मानणें म्हणजे त्यांच्या ग्रंथाच्या वाचकानें आपलें बुद्धिमांद्य प्रकट करणें होय– राजनीति स्वार्थावर रचलेली आहे, किंवा सशक्त मनुष्यास आपल्या फायद्याकरितां निर्बल मनुष्यावर जुलूम करण्याचा नैसर्गिक अधिकार आहे, हें तत्त्व मिल्लसाहेबांनीं आपल्या ग्रंथांत कोठेंच प्रतिपादन केलेलें नाहीं. सर्व मानवजातीचें सारखेंच कल्याण किंवा उन्नत्ती व्हावी आणि या उन्नतीच्या बाबतींत एकमेकांनीं एकमेकांच्या किंवा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राच्या आड येऊं नये, हें राजकीय किंवा सामाजिक बाबतींत या विद्वान् ग्रंथकाराचें प्रमुख धोरण होय; आणि असें ज्याचें धोरण आहे तो मोर्लेप्रमाणें "माझी नजर पोंचते तोंपर्यंत हिंदुस्थानास स्वराज्याचे हक्क देणें शक्य दिसत नाहीं," असें वेडगळपणाचें विधान करील हें कधींच संभवत नाहीं. मोर्लेसाहेबांनीं

आपली दिवटी मिल्लसाहेबांच्या मशालीपासून पेटवून घेतली असेल, पण मिल्ल साहेबांच्या अंतःकरणांत स्नेह आणि दया यांचा जो भक्कम पुरवठा होता त्याचा मोर्लेसाहेबांच्या दिवटींत अभाव असल्यामुळें सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या या दिवटींतून उजेडापेक्षां धूरच अधिक निघाला आहे! एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर चालविलेलें राज्य जिकलेल्या राष्ट्रांतील लोकांस एरंडाच्या गुऱ्हाळाप्रमाणें कधींहि सुखप्रद व्हावयाचें नाहीं, हा मिल्ल साहेबांचा ठाम सिद्धांत आहे. ते म्हणतात कीं, "अशा स्थितींत परकी राज्यकर्त्यांची जिकलेल्या लोकांबद्दल सहानुभूति राहात नाहीं. जिकलेल्या लोकांच्या सामाजिक रीतीभाती किंवा व्यवहार त्यांस कळत नाहीं. जिकलेल्या लोकांपैकीं कांहीं तोंडपुजे लोक त्यास भेटतात, पण त्यांजकडून खरें लोकमत कळत नाहीं व त्यांनीं दिलेली माहिती विश्वसनीय नसते; राज्यकर्ते हरेक बाबतींत आपलीं सामाजिक आणि धार्मिक मतें लोकांवर लादतात, व राज्यकर्ते या नात्यानें जिकलेल्या लोकांस पायाखालच्या धुळीप्रमाणें तुच्छ मानून त्यांच्याशीं उद्धटपणानें वर्तन करतात; आणि त्यांच्या हिताहिताची पर्वा न ठेवतां केवळ आपल्या व आपल्या देशाच्या फायद्याकरितां वाटेल तो धुमाकूळ माजवितात." एक देश दुसऱ्या देशावर राज्य करूं लागला म्हणजे काय अनर्थ होतात याचें हें वर्णन हिंदुस्थानांतील 'राजद्रोही' वर्तमानपत्रकर्त्यांनीं किंवा व्याख्यात्यांनीं केलेलें नसून मिल्लसारख्या पूर्ण अनुभविक आणि थोर तत्त्ववेत्त्यानें केलेलें आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे, असा यावर मि. एलिस यांनीं शेरा मारला आहे. आतां कोणी असें म्हणतील कीं, हिंदुस्थानांतील इंग्रजी अंमलदार बेजबाबदार नसून त्यांजवर इंग्रजी राष्ट्र किंवा पार्लमेंट यांची नजर असते. परंतु यांजवर मिल्ल साहेबांचें असें म्हणणें आहे कीं, राज्यकर्ते वास्तविक म्हटलें म्हणजे लोकांस जबाबदार पाहिजेत आणि ही जबाबदारी जेथें नाहीं तेथें एका देशांतील राज्यकर्ते दुसऱ्या देशांतील लोकांस किंवा पार्लमेंटास जबाबदार असल्यानें जिकलेल्या राष्ट्रांतील लोकांस कांहीं फायदा होत नाहीं. एका देशांतील राज्यकर्ते बेजबाबदार असले काय किंवा दुसऱ्या देशांतील लोकांस अगर पार्लमेंटांस जबाबदार असले काय सारखेंच. दोन्ही राज्यपद्धती प्रजेस किंवा जिकलेल्या लोकांस एकसारख्याच जुलुमाच्या आणि त्रासाच्या आहेत, असें मिल्ल साहेबांनीं आपलें स्पष्ट मत दिलें आहे. इतकेंच नव्हें तर कांहीं प्रसंगीं एका देशांतील राज्यकर्तें दुसऱ्या देशांतील लोकांस जबाबदार असणें जिकलेल्या लोकांच्या दृष्टीनें अधिक घातुक आहे असेंहि या तत्त्ववेत्त्यानें कबूल केलें आहे. हीं तत्त्वें वाचल्यानंतर मोर्ले साहेबांनीं मिल्लच्या ग्रंथावरून काढलेल्या आपमतलबी अनुमानास मिल्ल साहेबांची कधींतरी कबुली पडली असती असें कोणासहि वाटणार नाहीं. किंबहुना मिल्ल साहेबांच्या

ग्रंथांतील प्रमाणभूत आणि उदात्त तत्त्वांचा मोर्ले साहेब पक्षाभिमानानें किंवा हिंदुस्थानांतील अधिकारी वर्गाच्या स्वार्थबुद्धीचें समर्थन करण्याच्या हेतूनें मुद्दाम विपर्यास करीत आहेत असें म्हणणेंहि भाग पडतें; व मि. एलिस यांचा अभिप्रायहि असाच आहे. ज्या त्या देशांतील लोकांनीं आपलें राज्य आपण चालविणें हेंच राजकीय दृष्ट्या त्यांचें अंतिम साध्य व त्यांतच त्यांचें खरें कल्याण आहे, असा ज्याच्या मनाचा पूर्ण विचारांती पक्का ग्रह झालेला, तो मोर्लेसाहेबांप्रमाणें "माझी नजर पोंचतें तोंपर्यंत हिंदुस्थान देश स्वराज्याच्या हक्कांस कधींहि पात्र होणार नाहीं." असें कसें म्हणेल? आणि आमची अशीहि खात्री आहे कीं, मोर्ले साहेब मुत्सद्दीपणाच्या भोंवऱ्यांतून किंवा पाशांतून बाहेर पडले म्हणजे निव्वळ तत्त्ववेत्ते या न्यायाने तेहि असेंच मत देतील, आणि त्यांची दिवटी– लहान प्रमाणावरच कां होईना– मिल्ल साहेबांच्या जागतीज्योत मशालीप्रमाणें जिंकलेल्या राष्ट्रांतील लोकांस खरी मार्गदर्शक होईल. मिल्लसाहेब ईस्ट-इंडिया कंपनीचे नोकर असल्यामुळें त्यास हिंदुस्थानची पुरी माहिती होती; मोर्लेसाहेबांपेक्षां शतपट अधिक माहिती होती असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांत निरनिराळ्या जातींचे व धर्मांचे लोक असल्यामुळें एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेनें असावे तितके ते बद्ध झालेले नाहींत. जी गोष्ट एकास हितकर वाटते ती दुसऱ्यास वाटत नाहीं, आणि निरनिराळ्या प्रांतांतील समाजाचा एकमेकांवर असावा तितका विश्वास नाहीं, वगैरे गोष्टी मिल्लसाहेबांस पुऱ्या अवगत होत्या; व म्हणूनच 'प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धती'च्या शेवटच्या भागांत इंग्लंडसारख्या स्वतंत्र राष्ट्रानें हिंदुस्थानसारख्या जिंकलेल्या राष्ट्रावर कसें राज्य करावें, याचा विचार करीत असतां त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, "जिंकलेल्या राष्ट्रांतील लोकांस वरच्या प्रतीच्या सुधारणेच्या पायरीस पोंचवणें एवढेंच काय तें त्यांच्यावर परकीय राज्य कांहीं काल असावें असें म्हणण्यास सयुक्तिक कारण आहे." अर्थात् हें कारण जेथें दृष्टोत्पत्तीस येत नाहीं तेथें "एका राष्ट्रावर राज्य करण्याचा दुसऱ्या राष्ट्रास अधिकार नाहीं." असें जें मिल्ल साहेबांचें सामान्य राजकीय तत्त्व आहे तेंच लागू केलें पाहिजे व पडतें. हिंदुस्थान देश आज निदान शंभर वर्षे इंग्रज सरकारच्या ताब्यांत आहे. एवढ्या मुदतींत त्यांनीं लोकांस शिक्षण दिलें, रस्ते केले, आगगाड्या बांधल्या, पोस्ट ऑफिसें स्थापिलीं आणि शांतता राखिली, हें खरें आहे. पण या सर्व गोष्टी इंग्रजी राज्य अधिक चिरस्थायी होण्याकरितां केल्या कां लोकांच्या फायद्याकरितां केल्या हा एक मोठाच प्रश्न आहे. राज्यकर्त्यांनीं आपल्या फायद्याकरितां केलेल्या गोष्टींपासून "ग्रामं गच्छन् तृणं स्पृशति" या न्यायानें पर्यायानें लोकांचा फायदा झाला असेल. पण जपानी सरकारनें गेल्या ४० वर्षांत

आपल्या लोकांच्या अभ्युदयाकरितां जो उद्योग किंवा खटपट केली तशी खटपट किंवा उद्योग गेल्या शंभर वर्षांत हिंदुस्थानच्या कल्याणाकरतां इंग्रज सरकारांनीं केलेली जर नजरेस येत नाहीं, उलट हिंदुस्थान देशाचे उद्योगधंदे जाणुनबुजून बुडवून व चाळीस कोट रुपये दरसाल विनमोबदला विलायतेस नेऊन हा देश निःसत्त्व व दरिद्री केल्याचें आढळून येते, तर मिल्ल साहेबांनीं ज्या एका कारणाकरितां एका राष्ट्रावर दुसऱ्या राष्ट्राचें राज्य असणें सयुक्तिक आहे असें कबूल केलें, ते कारण हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यास लागू पडत नाहीं, असेंच म्हणणें भाग पडतें. आणि असें झालें म्हणजे ज्या पायावर मोर्ले साहेबांनीं आपली इमारत उभारली होती ती ढांसळून जाऊन स्वराज्याचे हक्क मिळाल्याखेरीज हिंदुस्थानच्या लोकांची कधींहि उन्नती होणार नाहीं, असें जें आमच्यांतील राष्ट्रीय पक्षाचें व राष्ट्रीय सभेचें म्हणणें आहे, तेंच अखेरीस शिल्लक राहतें. हिंदुस्थानांतील लोकांच्या कल्याणाकरितां इंग्रजांचे येथें राज्य असणें अवश्य आहे ही निवळ भुलथाप होय. अशा प्रकारच्या भूलथापी जिंकणारे लोक आपली सत्ता जिंकलेल्या लोकांवर सदैव राहावी एवढ्याकरितां लोकांस देत असतात, असा मोर्लेसाहेबांच्या स्तुतीस पात्र झालेल्या एका प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकाराचा सिद्धांत मि. एलिस यांनीं आपल्या लेखांत दाखल केला आहे; आणि तोच हिंदुस्थानास पूर्णपणें लागू आहे. मोर्लेसाहेबांनीं तिकडे दुर्लक्ष करून, नालायकांच्या कौन्सिलाचीं सोंगें उभारून, व सुशिक्षित वर्गावर शत्रुत्वाचा छाप मारून मिल्लसाहेबांच्या नांवावर आमच्या तोंडास पानें पुसण्याचा प्रयत्न चालविला आहे; पण त्यांनीं पूर्णपणें लक्षांत ठेवावें कीं, हा खोटा प्रयत्न फार दिवस टिकावयाचा नाहीं. परकी राज्य ज्या एका कारणाकरितां मिल्लसाहेबांच्या मताप्रमाणें जिंकलेल्या लोकांस सह्य किंवा फायदेशीर होऊं शकतें, तें कारण हिंदुस्थानांतील राज्यकारभारास आतां लागू पडत नाहीं; आणि असें झालें म्हणजे स्वजातीय वसाहतवाल्यांप्रमाणें जिंकलेल्या लोकांसहि स्वराज्याचे पूर्ण हक्क दिले पाहिजेत; कारण एका राष्ट्रावर राज्य करण्याचा दुसऱ्या राष्ट्रास नैसर्गिक हक्क नाहीं, हा मिल्ल साहेबांचा सिद्धांत कायम राहतो. आम्हींहि हेंच मागत आहों; आणि तें जोंपर्यंत आम्हांस प्राप्त झालें नाहीं तोंपर्यंत मिल्लसाहेबांच्या ग्रंथांतील मागचा पुढचा संदर्भ सोडून देऊन त्यांचीं मोडकीं तोडकीं वाक्यें आपमतलबीपणानें आमच्या तोंडावर टाकल्यानें आमचें कधींहि समाधान व्हावयाचें नाहीं.

## २४. निकरानें एकमुखी मागणी करा

[ ९ ऑक्टोबर १९१७ ]

स्वराज्य हेंच आपलें ध्येय ठरवून हिंदी पुढाऱ्यांनीं आपल्या चळवळीचें तारूं त्या ध्येयाकडे हांकारण्यास सुरुवात केल्यापासून तुफानी वारा वाहूं लागला, समुद्र खवळला आणि ही नौका लाटांच्या तडाक्यांत सांपडून कोठें खडकावर आपटते कां महासागराच्या उदरांत बेपत्ता होते, अशी सामान्य जनांस धास्ती वाटू लागली. परंतु सुदैवानें या नौकेवरील कर्णधार धीराचे व दूरदर्शी असल्यानें या सर्व संकट-प्रसंगांतून ही नाव बचावून स्वराज्यरूपी बंदराच्या नजीक येऊं लागली आहे. चळवळरूपी नौकेस डळमळावयास लावणारा तुफानी वारा वाहूं लागण्यास गेल्या नाताळांतील व्हाइसरॉयांच्या कलकत्ता येथील भाषणापासून सुरवात झाली आणि तें तुफान ता. ५ सप्टेंबरच्या व्हाइसरॉयांच्या कौन्सिलांतील भाषणानें बहुतेक शांत झालें. मध्यंतरी या तुफानाचा जोर वाढविण्यासाठीं अनेकांनीं आपली पुण्याई खर्च केली; तरी सुकर्णधारानें कुशलतेनें चालविलेली ही नौका दुभंगली नाहीं, डुबली नाहीं किंवा धारेला लागून भलतीकडे वाहत गेली नाहीं. एवढेंच नव्हे तर स्वराज्यरूपी बंदर आतां तिच्या दृष्टिपथांत आलें असून लवकरच ही नौका त्या बंदरांतील धक्क्याला सुरक्षितपणें जाऊन लागेल अशीहि आशा वाटूं लागली आहे.

अशा रीतीनें वरून जरी तुफान शांत होऊन सहानुभूतीचा वारा वाहूं लागला आहे तरी अद्यापि सर्व भीति नष्ट झाली नाहीं. कारण या नौकेच्या मार्गांत झांकलेले असे भयंकर खडक असून त्यांजपासून अडथळा होण्याचा संभव आहे. हा अडथळा करणारांचे तीन वर्ग करतां येतील. पहिला वर्ग विलायतेस परत गेलेल्या 'ब्युरोक्रॅटिक' अधिकाऱ्यांचा होय. हिंदुस्थानांत तीस तीस वर्षें अधिकार गाजवून देखील ज्यांची अधिकार लालसा तृप्त झाली नाहीं असे हे, हिंदी रयतेच्या पैशानेंच गवर झालेले, 'ब्युरोक्रॅटस्' विलायतेंत गेल्यावरदेखील संधि सांपडतांच खाल्ल्या घरचे वांसे मोजावयास तयार होतात आणि लॉर्ड कर्झन व सिडेनहॅमसारखे माजी गव्हर्नरहि त्यांस हातभार लावण्यास कमी करीत नाहींत ! परंतु ज्या मंत्रिमंडळांत लॉर्ड कर्झन यांचा समावेश आहे त्या मंत्रि-मंडळाकडूनच स्वराज्याच्या देणगीचा संकल्प सुटून तो पुरा करण्याकरितां भारत-

मंत्री इकडे येत असल्यानें विलायतेंतील अँग्लो-इंडियनांचीं तोंडें सध्यां बंद झालीं आहेत, पण मनांतला विरोध नाहींसा झाला असें नसून तो आंतल्या आंत धुमसत आहे आणि जेव्हां स्वराज्याचें बिल पार्लमेंटपुढें येईल तेव्हां या कंपूकडूनच निकराचा विरोध होईल व आपणास अखेरची लढाई यांच्याशींच लढावी लागेल.

स्वराज्याचें निशाण पाहून ज्यांचें पित्त भडकतें असा दुसरा वर्ग या देशांतील अँग्लोइंडियनांचा होय. हिंदी लोकांची स्वराज्याची मागणी सरकारनें मान्य करूं नये, होमरूलच्या चळवळीच्या पुरस्कर्त्या बेझंटबाईस सरकारनें सोडूं नये, एतदर्थ या अँग्लो-इंडियनी चमूनें जंग-जंग पछाडले, प्रत्यक्ष भारतमंत्र्यास धमकावणी दिली, सत्याग्रह करण्याचा अधिकाऱ्यांस उपदेशहि केला! पण त्यांची कोणतीच मात्रा चालेना तेव्हां अखेरीस सर ह्यू ब्रे यांस वरिष्ठ कौन्सिलांत असें म्हणणें प्राप्त झालें कीं, स्वराज्य देतच असाल तर निदान आमच्या हितसंबंधास तरी अगदींच विसरूं नका! आणि व्हाइसरॉयसाहेबांनींहि तेवढें मोघम आश्वासन देऊन त्यांची बोळवण केली. सारांश, ज्या वर्गावर ब्युरॉक्रसीची सगळी भिस्त त्या वर्गाच्या प्रतिनिधीला देखील हिंदी लोकांच्या मागणीप्रमाणें स्वराज्य देऊंच नका असा स्पष्ट निषेध करणें अशक्य झालें व तेंहि तडजोडीला तयार झाले.

तिसरा वर्ग ब्युरोक्रॅटिक अधिकाऱ्यांचा. हिंदी लोकांना स्वराज्य दिलें तर या ब्युरॉक्रसीच्या स्वार्थास खरा चट्टा बसतो, व तेवढ्यासाठी हे अधिकारी स्वराज्य-दानाला कसून विरोध करणार हें स्वाभाविक आहे. परंतु ते सरकारी नोकर पडल्यानें एक प्रकारच्या शिस्तीनें बांधले गेले आहेत. त्यामुळें ब्रिटिश मंत्रिमंडळा-कडून जें धोरण ठरून येईल तें अंमलांत आणणें यांस भाग आहे; यास्तव या वर्गाला भारतमंत्र्यांच्या हेतूविरुद्ध प्रत्यक्ष आचरण करतां येत नाहीं. अंतस्थ रीतीनें आपल्या गुप्त रिपोर्टांतून व अप्रत्यक्ष रीतीनें तिसऱ्याच्या तोंडून जें कांहीं करावयाचें तें ते करीत असतीलच; तथापि त्यांची उघड उघड कारवाई बंद पडली एवढें खास.

अशा रीतीनें स्वराज्याच्या या निसर्गशत्रूंच्या चढावाच्या धोरणास आळा पडून त्यांना बचावाचें धोरण स्वीकारून राहावें लागलें आहे आणि आमच्या चळ-वळीचा एवढा रस्ता खुला झाला आहे. आतां ज्या वर्गांकडून स्वराज्याच्या मागणीला पाठबळच मिळावयास हवें, परंतु अज्ञानामुळें व गैरसमजामुळें असो, अथवा लोकांच्या चिथावणीनें किंवा मत्सरामुळें असो, ज्यांच्याकडून स्वराज्याच्या मागणीला प्रारंभीं कांहींसा विरोध आजवर दृष्टीस पडत होता तो ब्राह्मणेतर वर्ग राहिला. परंतु या वर्गाच्या विरोधाचेंहि क्षेत्र आतां बरेंच संकुचित झालें आहे हें ठिकठिकाणीं त्यांच्या प्रतिनिधींकडून स्वराज्यास संमतिदर्शक जे ठराव मंजूर होत आहेत त्यांवरून दिसून येईल. कॉंग्रेसच्या एकंदर मागण्यांची व्याप्ति

किती आहे आणि त्यांत सुशिक्षित व अशिक्षित, पुढारलेले व मागसलेले, ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांतून कोणताहि भेदभावदर्शक विभाग घेतला तरी त्यांतील एका पोटविभागाचा दुसऱ्या पोटविभागाशीं विरोध येईल अशा मागण्या किती अल्प आहेत हें थोडासा विचार केला असतां सहज दिसून येणार आहे. साम्राज्यांत हिंदुस्थानचा दर्जा वाढून तो इतर स्वायत्त घटकांच्या बरोबरीचा मानला जावा, साम्राज्यांतील कोणत्याहि भागांतील रहिवाश्यांना जे ब्रिटिश नागरिकत्वाचे हक्क आहेत ते सगळे हिंदी लोकांस मिळावे, सैन्यांत व आरमारांत वरिष्ठ दर्जाच्या जागांवर देखील हिंदी लोकांच्या नेमणुका व्हाव्या, न्याय व वजावणी खातें हीं वेगळीं व्हावीं, हिंदी लोकांस स्वयंसैनिकत्वाचा हक्क मिळावा, वगैरे ज्या मागण्या आहेत त्यांत एकाच विशिष्ट वर्गाचें हित आहे, व दुसऱ्याचे नाहीं असें म्हणतां येईल काय? येऊन जाऊन कायदेकौन्सिलच्या सदस्यत्वाबद्दलच काय तो वाद राहातो. या वादांत देखील एका महत्त्वाच्या मुद्याकडे अगदींच दुर्लक्ष होतें. कौन्सिलच्या सभासदांची संख्या अगदींच थोडी असतांना त्यावेळीं जर एखाद्या विशिष्ट जातीचा प्रतिनिधी निवडून आला तर तेवढ्यावरून सभासदांची संख्या दसपट झाली तरी त्याच जातीचे दहा प्रतिनिधी निवडून येतील असें मानणें सयुक्तिक आहे काय? जोंपर्यंत मुंबई इलाख्यातर्फे वरिष्ठ कौन्सिलांत एकच प्रतिनिधि होता त्यावेळीं कधीं मेथा निवडून आले तर कधीं गोखले निवडून आले. परंतु यापुढें जर मुंबई इलाख्यातर्फे वरिष्ठ कौन्सिलांत १५ सभासद निवडण्याचा हक्क मिळाला तर त्यांत सगळ्या महत्त्वाच्या जातींच्या प्रतिनिधींचा समावेश आपोआपच होणार नाहीं असें मानणें हास्यास्पद नाहीं काय? प्रांतिक कौन्सिलांतील लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या १०० ते १२५ पर्यंत वाढावयाची असल्यानें स्वतंत्र मतदारसंघ न करितां देखील त्यांत सर्वांचा समावेश होणार नाहीं असें कसें म्हणतां येईल? तथापि प्रत्येक जातीला आपापले प्रतिनिधी हक्कानें आले पाहिजेत असें वाटणें साहजिक आहे व त्याची पूर्तता जातवार प्रतिनिधींची संख्या ठरवून करितां येईल. तरी पण त्यांची निवड होतां होईतों मिश्र मतदारसंघाकडून होणें इष्ट आहे व ती तशी झाली तरी हा हेतु साध्य होण्यासारखा आहे. त्याकरितां मतदारसंघच वेगळे पाहिजेत अशांतला कांहीं भाग नाहीं. मुंबई इलाख्यांत प्रतिनिधित्वाचा हक्क प्राप्त होण्याला एक लाखाहून अधिक जनसंख्या असणाऱ्या जाति किती आहेत, त्यांच्यांत साक्षरतेचें प्रमाण दहाहजारीं किती आहे. इंग्रजी जाणणारांचें प्रमाण काय आहे व सरकार देणें कोण किती देतो हे समजणें जरूर आहे. शिक्षण, व्यवसाय व ऐपत या त्रयीचा विचार करून व मेळ घालून

कोणाचे किती प्रतिनिधि घ्यावयाचे तें निश्चित झाल्यानंतर मग ते प्रतिनिधि मिश्र मतदारसंघाकडून निवडून आले तरी त्यांत विघडलें काय ?

जातवार निवडणुकी हा फक्त वांटणीचा प्रश्न आहे व ही वांटणी यथान्याय करावयाची म्हणजे ती एकदां करून कायम होते असें नाहीं, तर वरचेवर करावी लागते. खुद्द इंग्लंडांत शेंकडों वर्षेपर्यंत मध्यम व कनिष्ठ वर्ग यांना पार्लमेंटातील जागांचा योग्य हिस्सा मिळाला नव्हता तो १८३२ सालीं प्रथम मिळाला, व दरम्यान इंग्लंड-स्कॉटलंड-आयर्लंड ह्यांच्या दरम्यान फिरून फिरून वांटणी होऊन एकाचे प्रतिनिधी कमी केले, दुसऱ्याचे वाढविले असा प्रकार सुरू आहे. गेल्या आटवड्यांतच अशा तऱ्हेची आणखी एक वांटणी पार्लमेंटां-तील प्रतिनिधिसंख्येसंबंधानें झाल्याची वातमी आली आहे. तींत पार्लमेंटच्या एकंदर संख्येंत ३१ ची भर टाकली असून त्यांत स्काटलंडला १ व इंग्लंडला ३० अधिक प्रतिनिधी देण्यांत आले आहेत. सांगण्याचे तात्पर्य हेंच कीं, प्रति-निधींची वांटणी ही स्वराज्यमागणीच्या मानानें एका अर्थानें गौण वाव असून ब्राह्मणेतर किंवा मागसलेल्या वर्गांनी आपल्या हक्काविषयीं भांडणें जरी न्यायाचें आहे तरी तसें करतांना आपला उद्योग, आपला आवेश ह्यांचा मुख्य भाग स्वराज्यमागणीकडे खर्चावयास पाहिजे असें आम्हांस वाटतें.

असो. चालू विषयास या मुद्याची चर्चा अप्रस्तुत आहे, सांगावयाचा मुख्य मुद्दा हाच कीं, प्रतिनिधींची संख्या ठरविण्याचा प्रश्न स्वराज्याच्या प्रश्नानंतर उपस्थित होतो, निदान त्यांतला तो एक गौण भाग आहे, असें जें सोलापूरच्या सभेंत रा. ब. गौतमचंद शहा यांनीं सांगितलें तें अगदीं खरें आहे. मुख्य प्रश्न हा आहे कीं, वेजवावदार ब्युरॉक्रसीची राज्यपद्धतीच चालू राहावयाची का कालमानाप्रमाणें तींत फेरबदल करावयाचा ? याचें उत्तर सगळें जग आज एकमुखानें असेंच देत आहे कीं, ही ब्युरोक्रॅटिक राज्यपद्धति वदलून लोकांना जवावदार अशी राज्यपद्धति स्थापित होणें अत्यंत आवश्यक आहे. स्वतः भारतमंत्री मि. मॉंटेग्यु यांनीं हल्लींच्या राज्ययंत्राचें कोणत्या शब्दांनीं वर्णन केलें आहे तें वाचकांस माहीत झालेंच आहे, तेच भारतमंत्री आतां तुमच्या दाराशीं येऊन तुम्हांस सवाल करणार आहेत कीं, हें जुनेंपुराणें व गंजून गेल्यानें योग्य काम न देणारें लोखंडी–लांकडी राज्ययंत्र असेंच चालूं ठेवावयाचें कां त्याच्याऐवजीं ज्याची किल्ली तुमच्या हातांत राहील असें नवें सोयीस्कर जिवंत राज्ययंत्र तुम्हास पाहिजे ? या सवालाला आहे हीच स्थिति 'उत्तमोत्तम' आहे असा जबाब कोणी तरी देऊं शकेल काय ? सर्व राष्ट्राचें मुख मानल्या गेलेल्या राष्ट्रीय सभेनें सर्व राष्ट्रातर्फे याचें चोख उत्तर दिलें आहे. तेंच

उत्तर तुम्हासहि मान्य नाहीं काय ? हिंदुस्थानासारख्या अफाट देशांतल्या एका कोपऱ्यांतल्या एका प्रांतापुरती दृष्टि संकुचित करून ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्या अप्रस्तुत वादाचा गोंधळ माजविणारांनीं कॉंग्रेसच्या प्रतिनिधींची यादी चाळून पाहावी म्हणजे त्यांत ब्राह्मणांची संख्या किती थोडी आहे आणि त्यांतून त्यांच्या डोळ्यांत सलणाऱ्या पुणेरी ब्राह्मणांचें प्रमाण तर किती अत्यल्प आहे हें कळून येईल; आणि स्वराज्याची चळवळ म्हणजे कांहीं विशिष्ट ब्राह्मणांचा कट नव्हे हें लक्षांत येईल; स्वराज्य पाहिजे का नको या प्रश्नाच्या उत्तरावर ३१ कोटि लोकांचें कल्याण अवलंबून आहे आणि तें कल्याण साधण्यास सर्वांनीं एकमुखानें 'स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आणि तो आम्हांस मिळालाच पाहिजे' असेंच स्पष्ट उत्तर देणें जरूर आहे. यावर कोणी अशी शंका काढतील कीं, एकतीस कोटि लोकांतून एखाद्या विशिष्ट वर्गानें स्वराज्य नको म्हटलें तरी तेवढ्यानें काय बिघडणार? परंतु हा भ्रम आहे. या वादाचा निर्णय केवळ बहुमतानें लागावयाचा नसून तो एकमतानें झाला तरच आमच्या पदरीं पडणार आहे. हंडाभर दूध नासण्यास मिठाचा एक खडादेखील पुरतो, तसाच प्रकार येथें आहे. आमच्या मागणीला विरोध करणारे प्रारंभीं सांगितलेले त्रिवर्ग शत्रु आज जरी निरुपाय म्हणून गप्प बसले असले तरी पुढें राईएवढ्या मतभेदाचा पर्वत करून दाखवितील आणि पार्लमेंटांतील सभासदांच्या डोळ्यांत धूळ फेंकून तुमच्या हातीं पडावयाचें फळ आपणच मधल्यामध्येंच लांबवितील. याकरितां या वेळीं यत्किंचितहि अनमान न करितां सर्वांनीं एकमुखानें स्वराज्याची मागणी करणें नुसतें इष्टच नव्हे तर आवश्यकच आहे.

राष्ट्रीय सभा ही सर्व राष्ट्रांचें मुख असल्यानें त्या संस्थेच्या द्वारेंच आपली एकमुखी मागणी अधिकाऱ्यांपुढें जाणें इष्ट आहे असें म्हणण्याचें दुसरें कारण हें कीं, हेतु व उद्दिष्ट एकच असलें तरी योजना तयार करावयास बसल्यावर प्रत्येकाच्या दृष्टिभेदामुळें व अवांतर कारणांनीं प्रत्येक योजनेंत कांहीं तरी कमी जास्त अंतर पडतेंच आणि असें अंतर पडत गेल्यास काकदृष्टि ब्युरोक्रॅटिक अधिकारी प्रत्येक योजनेंतील प्रत्येक भागांतील किमानपक्षांची तेवढी मागणी नेमकी उचलतील आणि अशा रीतीनें बहुतेक मागण्याची बेरीज–वजाबाकी होऊन जें उत्तर येईल तें अति संक्षिप्त स्वरूपाचें येईल. यास्तव कॉंग्रेसच्या मुख्य मागणीला जेणें करून बाध येईल अशी कोणतीहि योजना करण्याच्या भानगडींत न पडतां, मुख्य मागणीस दुजोरा देऊन जर कांहीं विशिष्ट प्रांतिक प्रश्न असले तर तेवढ्यांपुरता त्या त्या ठिकाणच्या संस्थांनीं किंवा प्रतिनिधींनीं खुलासा करावा.

आपल्या योजनेनें कॉंग्रेसच्या मागणीस बाध न येईल एवढी मात्र दक्षता घेतली पाहिजे.

कॉंग्रेस-लीगनें केलेली योजना सर्वांगपूर्ण व सर्वस्वी निर्दोष आहे असें कोणीच म्हणत नाहीं. पण हल्लींच्या वेळीं ती सुधारण्याचा म्हणून जो तो आपल्या परीनें प्रयत्न करण्यास प्रवृत्त झाला तर ' विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ' असें होण्याचा संभव आहे. खुद्द राष्ट्रीय सभेंतच जर अनेक पक्ष आहेत तर प्रत्येक पक्षाच्या अगदीं अस्सल मताला सोळा आणे पसंत पडणारी अशी ही योजना असण्याचा संभव नाहीं हें उघड आहे. पण असल्या योजनांच्या बाबतींत किरकोळ मतभेद बाजूस ठेवून कोठेंतरी एका ठिकाणीं घट्ट गांठ मारणें अवश्य आहे, इतकेंच नाहीं तर तें राष्ट्रीय हितबुद्धीस भूषणावहहि आहे. लॉर्ड रोजबरी ह्यांना एकानें एकदां असा प्रश्न केला कीं, तुमच्या एका लिबरल पक्षांत इतकीं अनेक मतें असतां तुम्ही सर्व एक कसें म्हणवतां ? ह्या प्रश्नाला त्यांनीं दिलेलें उत्तर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ते म्हणाले, ' होय आमच्यांतील लॉर्ड हार्टिंग्डन हे युनिअनिस्ट आहेत, मि. चेंबरलेन हे रॅडिकल आहेत, मी स्वतः सौम्य लिबरल आहे तरीपण आम्ही सर्वजण एका ग्लॅडस्टनसाहेबांच्या छत्राखालीं उभे आहों, आणि आम्हां सर्वांना लिबरल हें एकच नांव देतां न आलें व कोणी आम्हाला ग्लॅडस्टनच्या छत्रींतले लोक, किंवा ' त्यांच्या धावळींतलीं खबुतरें ' म्हटलें तरी आम्हाला त्यांत समाधान आहे. ' हीच गोष्ट कॉंग्रेसमधील निरनिराळया पक्षांनीं लक्षांत ठेवावयास पाहिजे. जुने-नवे, कालचे-उद्यांचे, गरम-नरम, राजनिष्ठ-देशनिष्ठ, ब्युरोक्रॅट-होमरूल-लीगवाले, वगैरे राष्ट्रीय सभेंतहि अनेक पक्ष आहेत. पण ह्या वेळीं त्यांनींहि ' आम्ही कोण आहोंत ? तर एका कॉंग्रेसच्या पंखाखालचीं सर्व पांखरें आहोंत, ' तिच्या सामुदायिक शहाणपणापेक्षां आमच्या वैयक्तिक शहाणपणाला आम्ही अधिक मान देणें गैर आहे व कॉंग्रेस-लीगनें केलेली योजना तीच आमचीहि योजना असें म्हणण्यांत भूषण आहे, असेंच मॉंटेग्युसाहेबांच्या हळूच किंवा खुणेच्या हांकेनें झोंपेंतून जागें झालों तरी आम्ही म्हणत उठलें पाहिजे.

स्वराज्याची मागणी नुसती एकमुखी होऊनच भागत नाहीं; तर ती याच वेळीं निकरानेंहि केली पाहिजे, आणि त्या मागणींतला कांहींतरी अल्पस्वल्प भाग मिळाला तर तेवढयावर संतुष्ट होतां कामा नये. याचें कारण आजच्या अंकांत दुसरीकडे दिलेल्या बॅ. बॅप्टिस्टांच्या इषाऱ्यावरून कळून येईल, स्वराज्य-दानाची पर्वणी कांहीं हरघडी, हरवक्त येत नसते. हा योग कपिलाषष्ठीच्या योगाइतकाच विरळा प्राप्त होणारा आहे म्हटलें तरी चालेल. महायुद्धानें युरोपांतील राजकीय विचारांत क्रान्ति घडवून आणली आहे व स्वातंत्र्य, समता,

लोकमत इत्यादि प्रश्नांस महत्त्व आलें व त्याचेंच प्रतिबिंब अल्प प्रमाणानें हिंदुस्थानच्या राज्यधोरणावर पडूं लागलें आहे. परंतु हें महायुद्ध संपून गेलें म्हणजे दृष्टीचा हा व्यापकपणा जाऊन ती पुनरपि संकुचित होईल आणि मग या सुधारणेच्या व स्वराज्यदानाच्या गोष्टी मागें पडतील ! याकरितां या दानाचें निश्चित स्वरूप आजच ठरवून घेणें जरूर आहे. त्यांतून इंग्लंड देशाची पुराणप्रियता तर जगविख्यात आहे. आपल्या पार्लमेंटाची सुधारणा हप्त्याहप्त्यानें करतां करतां एक शतक होत आलें तरी अद्यापि शेवटचा हप्ता कांहीं ब्रिटिश मतदारांच्या पदरीं पडला नाहीं. स्वतःच्या प्रश्नासंबंधानें जेथें इतकी दिरंगाई तेथें हिंदुस्थानाविषयीं तर काय बोलावयासच नको ! आज शेंदीडशें वर्षांत किती प्रगति झाली तें दिसतच आहे ! यास्तव आपण ‘पुढच्यास ठेंच आणि मागचा शहाणा’ या न्यायानें सावध झालें पाहिजे. आज एवढाच भाग देतों म्हणतील, उद्यां आणखी थोडा देण्याचें आमिष दाखवितील; आज भलत्याच कांहीं अटी घालतील आणि उद्यां त्या अटी पूर्ण झाल्या नाहींत अशी तक्रार उपस्थित करतील; याकरितां आपण मागणी करतानांच कोणत्याहि प्रकारानें तींत संदिग्धपणा न राहील अशी खबरदारी घेतली पाहिजे; व अशी योजना एकमुखानें ठरल्यावर तिचीच पूर्ण मागणी निकरानें केली पाहिजे. अल्पसंतुष्टपणा किंवा भावी वायद्यावर विश्वास यांच्या योगानें कार्यहानि न होईल अशी दक्षता दाखविणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

शेवटीं पुनः पुनः हेंच सांगावयाचें कीं, हा कांहीं विशिष्ट जातींपुरता किंवा केवळ हिंदुस्थानापुरताच प्रश्न नसून पृथ्वीच्या पांचहि खंडांत पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्याच्या किंबहुना मानवी जातीच्या हिताचा हा प्रश्न आहे. हिंदुस्थानास यापूर्वींच स्वराज्याचे हक्क दिले गेले असते तर प्रस्तुतचें युद्ध झालेंच नसतें. किंवा उपस्थित झालें असतेंच तर त्याचें स्वरूप वेगळें दिसलें असतें. असा विचार मनांत आला म्हणजे हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या मागणींत मानवजातीचा हितसंबंध कसा ग्रथित झालेला आहे तें दिसून येईल. अशा महत्त्वाच्या प्रश्नांत यापुढें तरी दिरंगाई न करितां किंवा संकुचित स्वार्थामुळें आत्मघातकीपणा न करितां तो योग्य रीतीनें तडीस लावण्यांतच खरा मुत्सद्दीपणा आहे.

## २५. नवी विटी, नवें राज्य !

[ २० एप्रिल १९२० ]

कालानुरोधानें परिस्थितींत फरक झाल्यावर त्या परिस्थितीवरोवर इतर गोष्टीहि कशा बदलाव्या लागतात हें वरील म्हणींत मुद्देसूद रीतीनें व मार्मिकपणानें थोडक्यांत सांगितलें आहे. मनुष्याचाच नव्हे तर एकंदर प्राणिमात्राचा असा स्वभाव आहे कीं, एखाद्या गोष्टीची त्याला बरीच संवय झाली म्हणजे ती संवय नवीन स्थितीवरोबर पालटण्यास सहसा त्याची प्रवृत्ति होत नाहीं. एखादा बैल रहाटास किंवा घाण्यास पुष्कळ वर्षें जोडलेला असला तर त्याला वाटोळें फिरण्याचीच संवय झाल्यामुळें तो गाडीस जुंपण्यास नालायक होतो. कारण घाण्याची चाल वाटोळी तर गाडीची सरळ असते; आणि वाटोळ्या घिरट्या घालण्यास शिकलेला बैल गाडीहि सरळ न ओढतां वाटोळी वाटोळीच नेण्याचा नेहमीं प्रयत्न करीत असतो. निदानपक्षीं घाण्याचा बैल गाडीस जुंपल्यास गाडीवानास त्याची वेसण विशेष ताणून धरावी लागते, एवढें निर्विवाद आहे. तसेंच बैलगाडीला जो वेग आहे त्यापेक्षां आपणांस अधिक वेग पाहिजे असल्यास गाडीचा बैल काढून टाकून त्याला घोडा जुंपावा लागतो; आणि घोडा जुंपावयाची वेळ आली म्हणजे मग गाडींतहि फेरफार करणें अवश्य पडून बैलगाडीच्या ऐवजीं टांगा घ्यावा लागतो; आणि वेग याहीपेक्षां अधिक वाढविणें जरूर पडल्यास अखेर मोटारचीच योजना करावी लागते. हा सर्व अर्थ वरील लहानशा म्हणींत मोठ्या युक्तीनें सांठविला गेला आहे. खोखोचा डाव खेळणारे गडी आट्यापाट्यास चालत नाहींत आणि आट्यापाट्या खेळणारे गडी जशाच्या तसेच विटीदांडूच्या खेळास उपयोगी पडत नाहींत; आणि विटीदांडूच्या खेळांतहि पहिला विटीदांडू बदलला म्हणजे त्या मानानें गडीहि बदलावे लागतात; नाहींपेक्षां पूर्वीचेच विटीदांडू दिल्यानें प्रायः डाव हुकल्याखेरीज राहात नाहीं. 'नवी विटी, नवें राज्य' अशी जी म्हण निघाली आहे ती याजसाठींच होय. विटीदांडूचा कोणाचा डाव विस्कळावयाचा असल्यास त्यांना नवा विटीदांडू आणून द्यावा म्हणजे पहिल्या विटीदांडूनें खेळणारे गडी प्रायः आपण होऊनच माघार घेतात; आणि हाच प्रकार इतर सांसारिक किंवा इतर बाबतींतहि आढळून येतो. एकाद्या घराचा किंवा संस्थानचा पूर्वीचा यजमान जाऊन नवा यजमान त्या ठिकाणीं आला म्हणजे पूर्वीचे गुमास्ते, कारभारी किंवा मुनीम त्यास प्रायः लवकरच अप्रिय होतात आणि मग वरील म्हणीस नवे यजमान आणि नवे

कारभारी असें स्वरूप प्राप्त होतें. मुसलमानी अमदानींतील नोकर शिवाजीमहाराजास काढून टाकावे लागले, इतकेंच नव्हे तर मुसलमानी राज्यांत अठरा खात्यास किंवा त्यावरील कामगारास जीं यवनी नांवें होतीं तींहि वदलण्याचा महाराजांनीं प्रयत्न केला, असें राजव्यवहार कोशावरून दिसून येतें. तसेंच पेशवाईंतील नोकर इंग्रज सरकारच्या उपयोगी न पडतां नवीन 'यस् फ्यस्' करणारा गृहस्थ पेशवाईंतील नाना फडणविसापेक्षांहि अव्वल इंग्रजींत अधिक शहाणा मानला जाई, याचा आपणांस अनुभव आहे. सारांश, काल पालटला म्हणजे सर्व कांहीं पालटतें. नव्या विटीदांडूवरोवर नवे गडी, नवा डाव व नवा खेळ सुरू होतो.

ही प्रस्तावना करण्याचें कारण काय हें वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. मॉटेग्यूच्या नवीन सुधारणाकायद्याप्रमाणें आतां नव्या युगास किंवा नव्या मन्वंतरास लवकरच सुरवात होणार आहे. नोकरशाहीची सत्ता कमी होणार आणि लोकांच्या प्रतिनिधींची संख्या वाढत जातां जातां अखेर पूर्ण स्वराज्याचे हक्क हिंदुस्थानास देण्यांत येणार असें आमच्या दयाळू वादशहांनीं कंठरवानें जाहीर केलें आहे. म्हणून अशा वेळीं या लेखाच्या मथळयांत सांगितलेल्या म्हणीप्रमाणें

## नवें युग, नवीं माणसें

अशी योजना लोकांनीं करावी कीं नाहीं, असा प्रश्न साहजिक रीत्याच उत्पन्न झाला आहे. आजपर्यंत नोकरशाहीशीं आम्हास कोणत्या रीतीनें वागावें लागत असें हें सर्वांस माहीत आहे. सर्व अधिकार नोकरशाहीच्याच हातांत असल्यामुळें आम्हास त्यांस जर कांहीं सुचविणें असेल तर तें तोंडाला पदर लावून मोठ्या नम्रपणें सुचवावें लागे. कारण भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें अधिक वोलला तर वाचाळ, आणि कमी वोलला तर घुम्या असे दोन दोष नोकरशाही आम्हावर लादण्यास नेहमीं तयार असे. मोर्ले साहेवांच्या सुधारणा झाल्यापासून कायदेकौन्सिलांत आम्ही निवडून दिलेल्या प्रतिनिधीस जरा जास्त मोकळीक असे हें खरें. पण कांहीं झालें तरी सर्व सत्ता नोकरशाहीच्याच ताव्यांत असल्यामुळें आमच्या वहुतेक प्रतिनिधीस कायदेकौन्सिलांतहि वर सांगितलेल्या धोरणानेंच वागावें लागत असे. नोकरीची आशा नसली तरी दरवारी आपला मानमरातव किंवा वोज राहावा ही आशा स्वाभाविकरीत्याच वहुतेकांस असते; आणि त्यामुळें आपले म्हणणें खरें असलें तरी नोकरशाहीशीं फार हुज्जत घालूं नये, त्यांस आपलें म्हणणें पटवून देणें असल्यास तें दांडगाईनें न पटवतां गोड युक्तिवादानें पटवावें, असें कीं, जेणेंकरून त्यांच्या

समाजांत चहास किंवा जेवणाखाणास आपणांस बोलावण्यास त्यांस संकोच वाटूं नये. सारांश, एखाद्या मोठ्या वृक्षाच्या सावलींत वाढलेल्या झाडाप्रमाणें आमची नोकरशाहीशीं वागणूक असे. आपल्याला चूक कळत असल्यास नोकरशाहीस आपलें मत सांगण्यास हरकत नाहीं; पण तें कामहि मुर्वतीनें केलें पाहिजे, आणि नोकरशाहीनें थोडचाशा सवलती दिल्या त्या आपल्या रदबदलीचें फळ आहे–असें लोकांस जाहीर करून आपल्या कामगिरीची योग्यता पूर्वींच्या काळांत वाढवावी लागत असे. ' नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ' हें तत्त्व पूर्वींच्या लोकांनींच सांगून ठेवलें आहे. पण असलें विकट कामहि आमच्या शहाण्या पुरुषांनीं मोठ्या युक्तीनें पार पाडण्याचा आजपर्यंत प्रयत्न केला होता. त्यांचें म्हणणें असें कीं, नोकरशाहीशीं नम्रतेनें वागून तद्वाराच आपलें आपण हित साधून घेतलें पाहिजे किंवा–

## आवळा देऊन कोहळा

संपादन केला पाहिजे. पण मौज अशी होई कीं, हा कोहळा आवळ्याच्या भेटीस न येतां गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणें आवळा मात्र कोहळ्याकडे ओढला जाई. उघडच आहे कीं, ज्याच्या हातीं सत्ता त्याच्या हातीं शहाणपण. आमच्या आर्जवास, गोडवेपणास अथवा बुद्धिमत्तेस नोकरशाही कितींहि पाघळली तरी आपल्या हातच्या सत्तेचा अंश आमच्या हातांत देण्यास ती नेहमींच नाराजी असते; आणि आमचीं प्रमाणें, कारणें किंवा युक्तिवाद कितीहि बलवत्तर असला तरी ' यस्यास्ति सत्ता स जनः कुलीनः । स पंडितः स श्रुतिमान् गुणज्ञः ' या न्यायानें नोकरशाही अखेर प्रबळ ठरून तिच्या कृपेनें जें कांहीं मिळेल तेवढ्यांतच संतोष मानून त्यांतच कृतकृत्यता मानण्यास नोकरशाहीशीं संलग्न असणारे आमचे पुढारी सांगत असत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे नोकरशाहीच्या अरेरावी पद्धतीखालीं आमच्या लोकांचें धैर्य, स्वतंत्रता किंवा निस्पृहपणा वगैरे गुणांवर विरजण पडून आमच्या शहाण्यासुरत्या लोकांच्या तेजाचाहि त्यामुळें ऱ्हास होत असे; आणि १०–२० वर्षें याप्रमाणें गेल्यावर मग त्या पुरुषाचा स्वभावहि बदलून जाऊन नोकरशाहीशीं भांडणारे लोक त्यांस जहाल किंवा असंमजस वाटूं लागत असत. कारण मूळचा स्वभाव कसाहि असला तरी तो वरील प्रकारच्या परिस्थितींत इतका बदलला जाई कीं, "मी करतों तेंच चांगलें, तेंच लोकांनीं केलें पाहिजे, त्यांतच आमचें हित आहे " असें, पिंजऱ्यांतील पोपटाप्रमाणें अनेक वर्षांच्या संवयीनें त्यांस साहजिकपणेंच वाटत असें. तात्पर्य मनुष्याचा स्वभाव हा कांहीं जात्या स्थिर नसून मोठ्या झाडाचीं ज्याप्रमाणें कलमें बनवतां येतात त्याप्रमाणें तेजस्वी माणसेंहि परकीय राष्ट्राचे सत्तेखालीं वागल्यानें कालांतरानें निरुपद्रवी स्वभावाचीं बनतात किंवा बनवितां येतात असा राजनीतिशास्त्राचा सिद्धांत आहे.

"राजा कालस्य कारणम्" असें जें महाभारतात म्हटलें आहे तें याच हेतूनें म्हटलें आहे. आमच्या नोकरशाहीस हे तत्त्व पूर्णपणें अवगत आहे. आणि त्यांनीं जरी आम्हांस पाश्चात्य शिक्षण दिलें आहे तरी त्यावरोबरच या वाघिणीच्या दुधानें आमच्या अंगांत उन्मत्तता न येतां माणसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें आम्हीं त्यांच्या मागून जावें अशी तजवीज करण्याची त्यांनीं खबरदारी घेतलेली आहे. आणि इनामदार, जहागिरदार, वगैरे लोकांची तर पूर्ण मुस्कटदाबी केलेली आहे. पण आतां–

## हा मनू पालटला

किंवा पालटण्यास सुरुवात झाली असें स्पष्ट दिसूं लागलें आहे, आणि मनू जर पालटला किंवा पालटण्यास सुरुवात झाली तर त्यावरोबर पूर्व संवयीच्या किंवा पूर्व समजुतीच्या माणसांच्या हातून नव्या मनूतील कामगिरी योग्य रीतीनें किंवा बिनबोभाट तडीस जाईल असें मानणें म्हणजे मनुष्यस्वभाव आपण ओळखत नाहीं असें जगास सिद्ध करून दाखविण्यासारखें होय. एका ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, अनेक वर्षांच्या संवयीनें बनलेला मनुष्याचा स्वभाव त्यास पुढें प्रायः बदलतां येत नाहीं. मन संकुचित होतें. इतकेंच नव्हे तर, हस्तपादादि करणेंद्रियेंहि एकदां लागलेल्या संवयीप्रमाणेंच अखेर काम करीत असतात. यास दाखला म्हणून अशी एक गोष्ट सांगतात कीं, एक लष्करांत पुष्कळ वर्षें काम केलेला हुशार शिपाई पेनशन घेतल्यानंतर दूध विकत घेऊन तें घरीं नेत होता. इतक्यात एकानें 'अटेन्शन' म्हटल्यावरोबर नित्य संवयीप्रमाणें त्यानें आपले हात चटकन खालीं केले व त्याचें दुधाचें भांडें हें जमिनीवर पडून सर्व दूध फुकट गेलें. हाच अर्थ 'श्वा यदि क्रियते राजा स किं नाश्नात्युपानहम्' या संस्कृत श्लोकांत आमच्या एका जुन्या कवीनें व्यक्त केला असून कोल्हा पशूचा राजा झाल्याची इसापनीतींतील गोष्टहि याच तत्त्वावर रचलेली आहे. एका काळीं एका परिस्थितींत अनेक वर्षें रुळलेल्या व्यक्ति किंवा माणसें तद्भिन्न परिस्थितींत भिन्न काम करण्यास अपुरी, अयोग्य किंवा आंखुड पडतात, हे या सर्व विवेचनांतील बीज होय; आणि हें पूर्णपणें लक्षांत आलें म्हणजे आतां पुढें होणाऱ्या नव्या कौन्सिलांत

## मवाळांऐवजीं जहाल

लोकांनाच कां निवडून द्यावें याचें खरें कारण वाचकांच्या लक्षांत येईल. मवाळ लोक किंवा पुढारी विद्वान नाहींत असें आम्ही म्हणत नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच कीं, त्यांचा काल गेला आणि पूर्वींच्या कालांत त्यांना लागलेल्या संवयी अथवा तदनुरूप बनलेलीं त्यांचीं मतें या नव्या मन्वंतरांत आमच्या फायद्याचीं

नाहींत, इतकेंच नव्हे तर बहुतकरून आजच्या उद्दिष्ट हेतूस विघातकच होतील. डोळझांपणें लावून नोकरशाहीच्या किल्ल्याभोंवतीं हिंडण्यास शिकविलेल्या बैलांच्या हातून नोकरशाहीच्या तटबंदीचें भोंक फोडून फोडून मोठें करून किल्ल्यांत घुसण्याचा प्रयत्न होणें शक्य नाहीं. त्याला न बडवलेला नवीन बैलच पाहिला पाहिजे. खुद्द तटबंदीच्या दृष्टीनें विचार करतां असा फरक करणें इष्ट दिसणार नाहीं, किंबहुना नोकरशाहीचीहि तटबंदी असा प्रकार न घडून येण्या-बद्दलहि प्रयत्न करील. आणि एका सरकारी चिटोऱ्यांत प्रसिद्ध झाल्याप्रमाणें प्रजा-जनांसहि असें कळवील कीं, अशा प्रकारचा बलात्कार मजवर करूं नका, मी आपण होऊनच हळूहळू जास्त जास्त दुभंग होऊन तुम्हास किल्ल्यांत घेणार आहे ! पण नव्या डावास– ज्या डावांत पोरांच्या डावांत लागणाऱ्या विटीदांडूपेक्षां जरा जास्त लांब व दणकट विटीदांडूची अपेक्षा आहे त्यांत– पूर्वीचें विटीदांडूच आणा असें जर कोणी सांगूं लागले तर नव्या खेळांतले लोक त्यावर कितीसा विश्वास ठेवतील ? हल्लींच्या राजकीय डावांतील स्थिति तशीच झालेली आहे. या नव्या डावांत आपणांस काय काय गोष्टी सिद्ध करून घेऊन अखेर नोकरशाहीवर कशी कुरघोडी करावयाची आहे हें दुसरीकडे छापलेला कॉंग्रेस लोकशाही पक्षाचा

## जाहीरनामा

लक्षपूर्वक वाचला असतां वाचकांच्या पूर्ण ध्यानांत येईल; किंबहुना तो जाहीरनामा याचसाठींच प्रसिद्ध केला आहे. गोडीगुलाबीनें वागून नव्हे तर कायदेशीर रीतीनें भांडून शक्य तितक्या लवकर त्यांजवर आम्हांस कुरघोडी कर्तव्य आहे. आणि हें काम पदव्यांच्या, मानांच्या, पगाराच्या, इनामाच्या, जहागिरीच्या, बक्षिसाच्या अगर दुसऱ्या कांहीं स्वार्थाच्या बाबीमुळें नोकरशाहीशीं कित्येक वर्षें मवाळपानें वागण्यास सवकलेल्या लोकांच्या हातून होणें शक्य नाहीं असें आमचें मत लोकांस स्पष्टपणें कळविण्यास आम्हांस कांहीं दिक्कत वाटत नाहीं. हें मवाळ लोक– पूर्वीच्या अमदानींत एका विशिष्ट तऱ्हेनें वागण्यास शिकलेले हे मवाळ लोक– लोकांस असें सांगत सुटत आहेत कीं, " पाहा आम्ही नोकरशाहीची मर्जी राखून आजपर्यंत जसें काम केलें आहे तसेंच करून तुमचें हित करूं. " पण ही झुलकावाणी आतां कांही आमच्या उपयोगी पडणार नाहीं. लवकर प्राप्त होणाऱ्या या नव्या युगांत आमच्या वतीनें काम करण्यास जी मंडळी आम्हास पाहिजे आहेत ती निर्भय, जोरदार, स्वार्थास लुब्ध न झालेली, आणि कडव्या उमेदीची पाहिजे आहेत. अशी वृत्ति स्वीकारणें पूर्वीच्या अमदानींत धोक्याचें होतें हें आम्हास कबूल आहे, आणि त्यामुळेंच पूर्वीच्या युगांत हें काम धडाडीनें करण्यास फारसे लोक पुढें येत नसत. पण आतां म्हणजे नवीन

कायदा आणि बादशाही जाहीरनामा अमलांत आल्यानंतर सुरूं होणाऱ्या युगांत

## डर तो पीछे रही

अशी स्थिति आली आहे, म्हणून यावेळीं कोणत्याहि प्रकारची शंका मनांत न ठेवतां दुसरीकडे काँग्रेसमधील लोकशाही पक्षाचा जो जाहीरनामा प्रसिद्ध झाला आहे त्यांत लिहिलेलीं कामें मनोभावें करण्यास स्वभावत: योग्य व तयार असतील अशा लोकांसच नव्या निवडणुकींत मतदारांनीं निवडून द्यावें अशी त्यांस आमची आग्रहाची विनंति आहे. मनुष्य कोणत्याहि कामाकरितां जीं साधनें निवडीत असतो तीं सदर कार्यांच्या स्वरूपावर किंवा महत्त्वावर अवलंबून असतात. पूर्वींचा राजकीय डाव संकुचित क्षेत्रांत आकारानें नाहीं तरी मनानें लहान असलेल्या पोराकडून धन्याच्या मनोरंजनाकरितां खेळावयाचा होता; पण आतां तें क्षेत्र वाढलें आणि डाव खेळण्याचा हेतु मनोरंजन न राहातां मनोभंजन झाला आहे. म्हणून या नव्या डावांत यश प्राप्त करून घ्यावयाचें असल्यास पूर्वींचे आंखूड विटीदांडूचे गडी सोडून देऊन दणक्या विटीदांडूच्या गड्यांचाच आपण स्वीकार केला पाहिजे. राजनीतिशास्त्राच्या दृष्टीनें विचार करा किंवा खेळाडूंच्या शास्त्रांप्रमाणें विचार करा; ' नवी विटी नवें राज्य' हेंच तत्त्व हल्लींच्या काळास आम्हीं लागू केलें पाहिजे असें म्हणणें प्राप्त होतें, आणि तें पूर्णपणें लक्षांत ठेवूनच लोकांनीं वागावें अशी त्यांस आमची विनंति आहे. यांत कोणाचा अपमान करण्याची आमची इच्छा नाहीं, अगर कोणाबद्दल वृथा अभिमानहि आम्ही ठेवीत नाहीं. काळ पालटला, मनु पालटला, नोकरशाही दुभंगली, आतां पुढें ज्या तोफा व जे गोळे सोडून पुढील कार्यभाग साधून घ्यावयाचा आहे ते त्या कार्याला समर्थ असतील असेच घेतले पाहिजेत, हें निर्विवाद आहे. कोणी म्हणतील कीं, अशा रीतीनें तुम्ही वागल्यास हल्लींच्या कायद्याची धुळधाण करण्याचें पाप तुम्ही आपल्या कपाळीं घ्याल. पण या मूर्खांस असें कळत नाहीं कीं, या कायद्यांतून जर पूर्ण स्वराज्याचा पुढें कायदा उत्पन्न करावयाचा आहे तर याचें आयुष्य जितक्या लवकर संपेल तितकें आम्हास इष्टच आहे. ज्याला पतंग व्हावयाचें आहे तो फार दिवस सुरवंटाच्या स्थितींत कसा राहाणार ? म्हणून प्रस्तुत समयानुसार नवीं हत्यारें, नवीं माणसें निवडून लवकर पतंग होण्याच्या उद्योगास लागा आणि स्वराज्याच्या सुंदर उपवनांतील मधुर रसाचा लवकर आस्वाद घेण्याचा निश्चय करा. पूर्वींच्या सुरवंटाच्या शरीराच्या लोभानें फसून जाऊं नका एवढेंच लोकांस आमचें आग्रहाचे सांगणें आहे.

# २६. काँग्रेसमधील लोकशाहीपक्षाचें धोरण

[ २० एप्रिल १९२० ]

काँग्रेसच्या डेमोक्रॅटिक पक्षाचें धोरण त्यांच्या नांवावरूनच व्यक्त होत असून काँग्रेसविषयीं अढळ निष्ठा आणि डेमोक्रसी (लोकशाही) वर दृढ विश्वास हें त्यांतील बीज होय. हिंदी राष्ट्रांपुढील प्रश्नांचा निकाल लावण्याचें सामर्थ्य लोकशाहीच्या तत्त्वांत आहे व तें कार्य साधण्याला शिक्षणप्रसार आणि मतदारांच्या संख्येची वाढ हीं दोन अमोघ शस्त्रें आहेत असें या पक्षाचें मत आहे. जातिभेद अथवा रूढि यामुळें नागरिक, व्यावहारिक वा सामाजिक बाबतींत जी कोणाची नालायकी समजली जात असेल ती नालायकी दूर करण्यांत यावी असें हा पक्ष प्रतिपादन करील. धार्मिक बाबतींत सहिष्णुता असावी आणि स्वतःपुरता ज्याचा त्याचा धर्म ज्याला त्याला पवित्र असून इतरांनीं त्यांत विघाड करण्याचा प्रयत्न केल्यास त्यापासून त्या धर्माचें रक्षण करणें हें सरकारचें न्याय्य कर्तव्य आहे असें या पक्षाचें मत आहे. तसेंच मुसलमानांच्या धार्मिक भावना व कुराणांतील वचनें यांस अनुसरून खिलाफतीचा प्रश्न सोडविला जावा अशी जी मुसलमानांची मागणी आहे तिला या पक्षाचा पाठिंबा आहे.

सर्व मानवजातींत बंधुभाव वाढून एकंदर मनुष्यमात्राची उन्नति होण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्य मंडळांत हिंदुस्थान सामील असावा आणि तो त्याचा एक घटक असावा हें या पक्षास मान्य आहे; परंतु खुद्द ग्रेटब्रिटन धरून या साम्राज्याचे जे भागीदार आहेत त्यांच्या बरोबरीनें हिंदुस्थानचा दर्जा राहावा व त्यांचा कारभार पूर्णपणें त्यांच्या ताब्यांत असावा अशी या पक्षाची मागणी आहे. ब्रिटिश साम्राज्यांतल्या कोठल्याहि भागांत हिंदी लोकांस इतर नागरिकांच्या बरोबरीनें हक्क मिळाले पाहिजेत व जेथें तसे हक्क न मिळतील तेथें 'जशास तसें' या न्यायानें प्रतिकार करण्याचा हिंदुस्थानास अधिकार पाहिजे. जगांत शांतता प्रस्थापित करणें, आज अस्तित्वांत असलेल्या व येणाऱ्या राष्ट्रांचा कोणालाहि लचका तोडूं न देतां तीं अभंग राखणें, राष्ट्रांचें स्वातंत्र्य व अब्रु रक्षण करणें आणि एका देशाकडून दुसऱ्या देशाची होणारी व्यापारी लुबाडणुक बंद पाडणें, या गोष्टी घडवून आणण्यासाठीं निर्माण झालेल्या राष्ट्रसंघ संस्थेचें हा पक्ष आनंदानें अभिनंदन करीत आहे.

जबाबदार प्रातिनिधिक राज्यशासनपद्धतीनें राज्य चालविण्यास या देशांतील लोक पूर्णपणें लायक आहेत असें या पक्षाचें ठाम मत असून येथील राज्यपद्धति कशी असावी आणि कायदेकानू कसे असावे हें ठरविण्याचा हक्क स्वयं-निर्णयाच्या तत्त्वानें केवळ हिंदी लोकांसच असला पाहिजे अशी या पक्षाची मागणी आहे. मॉंटेग्युसाहेबांचा ' रिफॉर्म ॲक्ट ' हा अपुरा, असमाधानकारक व निराशाजनक आहे असें या पक्षाचें मत असून इंग्लंडांतील मजूर पक्ष व पार्लमेंटांतील सहानुभूति बाळगणारे इतर सभासद यांच्या साहाय्यानें या ' रिफॉर्म ॲक्टां'तील दोष काढून दुरुस्ती बिल शक्य तितकें लवकर पार्लमेंटांत आणण्याचा या पक्षाकडून प्रयत्न करण्यांत येणार आहे. या दुरुस्ती बिलांत हिंदुस्थानच्या लोकांस संपूर्ण स्वराज्याचे हक्क मिळावे, अर्थातच हिंदी लष्करावर त्यांचा पूर्ण ताबा चालावा, आर्थिक स्वातंत्र्य मिळावें, आणि प्रजेच्या संपूर्ण नैसर्गिक हक्कांची प्रजेस कायदेशीर हमी देण्यांत यावी अशी योजना करण्यांत येणार आहे. हा हेतु साध्य करण्याकरितां हिंदुस्थानांत व राष्ट्रसंघांतील बाहेरच्या इतर देशांत नेटानें व निश्चयानें चळवळ करण्याचा या पक्षाचा उद्देश असून त्या पक्षाची इतरांसहि तशी शिफारस आहे. थोडक्यांत म्हटलें म्हणजे या बाबतींत, ' शिक्षण, चळवळ व संघटना ' हेंच या पक्षाचें मंत्र्यवाक्य राहील.

मॉंटेग्युसाहेबांच्या रिफॉर्म ॲक्टानें जें कांहीं मिळेल तें पदरांत घेऊन त्याचा पूर्ण स्वराज्य आपल्या आटोक्यांत जलदीनें आणण्याच्या कामीं उपयोग करण्याचा या पक्षाचा इरादा असून त्यासाठीं लोकमतानुसार इष्ट दिसेल त्याप्रमाणें शक्य तेथें सहकारिता व जरूर तेथें सनदशीर विरोध करण्यांत येईल.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या मतांचें व हेतूंचें हें तात्त्विक विवेचन झालें. यास अनुसरून प्रत्यक्ष व्यवहारांत हा पक्ष पुढील सुधारणा घडवून आणण्याचें कार्य प्रथम हातीं घेईल. ही यादी पूर्ण असून त्यांत कांहीहि दाखल करण्याचें राहिलेलें नाहीं असें मात्र कोणीं समजूं नये.

## वरिष्ठ कारभारांत सुधारणा

१. रौलेट ॲक्ट, प्रेस ॲक्ट, आर्म्स ॲक्ट यांसारखे दडपशाहीचे कायदे रद्द करविणें; फौजदारी गुन्ह्यांत व विशेषत: राजकीय गुन्ह्यांत आरोपीच्या देश बांधवांच्याच ज्युरीपुढें चौकशी होणें; राजकीय गुन्हेगारांना सक्तमजुरीची शिक्षा देण्याची पद्धति रद्द करणें व ग्रेटब्रिटनमधील पद्धतीस अनुसरून निरनिराळ्या गुन्हेगारांना वागविण्यांत येईल अशी तुरुंगांतील वागणुकींत व शिस्तींत सुधारणा करणें; इ०

२. शेतकींतील व कारखान्यांतील मजुरांना त्यांच्या श्रमाचा न्याय्य मोबदला मिळेल असे मजुरीचे किमान दर ठरविणें, कामाचें तास रास्त दिसतील तितकेच ठरविणें, मजुरांकरितां चाळींची सोय करणें, न्याय व समवुद्धि यास अनुसरून कारखानदार व मजूर यांच्यामधील तंटे तोडण्याची व्यवस्था करणें आणि या गोष्टी घडून आणण्यास योग्य संख्या स्थापन करणें.

३. खाद्य–पेयें व इतर अवश्य पदार्थ यांची महागाई कमी करण्याकरितां व त्यांचा देशांत तुटवडा न पडेल अशी तरतूद करण्याकरितां त्यांच्या निर्गतीस जकात बसवून व अन्य उपायांनीं आळा घालणें.

४. प्रत्यक्ष पैशाची सरकारी मदत, संरक्षक जकाती अगर अन्य शिष्टसंमत उपाय योजून स्वदेशी चळवळीस व देशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन देणें.

५. रेल्वेची व्यवस्था कंपन्यांकडून काढून राष्ट्राच्या ताब्यांत घेणें, देशांत औद्योगिक पुनरुज्जीवन होईल अशा रीतीनें रेल्वेच्या भाड्याचे दर ठरविणें आणि हल्लींची पक्षपाताची व खास सवलतीची पद्धति रद्द करणें.

६. सर्व खात्यांत व विशेषतः लष्करी खात्यांत खर्चाची प्रथम काटकसर करणें, आणि जरूर व इष्ट असेल तरच नवीन कर बसविणें, हे कर बसवितांना व्यक्ति, कंपन्या किंवा संस्था, यांच्या मगदुराप्रमाणें ज्यांचा त्यांच्यावर बोजा पडेल असा चढता उतरता दर ठरविणें.

७. हिंदी अंमलदारांच्याच हुकमतीखालीं असलेलें असें राष्ट्रीय स्वयंसेवकांचें सैन्य उभारणें; लष्कर, आरमार, व आकाशयानविद्या यांच्या शिक्षणाची तजवीज करणें, आणि लष्करच्या सर्व खात्यांत वर्णभेद न मानतां हिंदी उमेदवारांची अम्मलदारीच्या जागांवर नेमणूक होईल असें करणें.

८. हिंदुस्थानसरकारच्या सर्व खात्यांतील जागांवर उघड चढाओढीच्या परीक्षा हिंदुस्थानांत घेऊन लायक उमेदवारांची निवड करणें.

९. राष्ट्रीय ऐक्य साधण्याकरितां सर्व प्रांतांच्या किंवा लोकांच्या सामान्य व्यवहारार्थ एकदेशी भाषेचा प्रचार करणें, भिन्न धर्मीयांमधील व्यवहारसंबंध अधिकाधिक सलोख्याचा करणें, विशेषतः हिंदुमुसलमानांचें ऐक्य दृढ करणें.

१०. भाषावार प्रांतरचना करणें.

**प्रांतिक सुधारणा–**

१. उशीर न लावतां प्रत्येक प्रांताला पूर्ण प्रांतिक स्वराज्य संपादन करणें.

२. शेतकीच्या रयतवार पद्धतीस अनुसरून शेतसारा न्याय्य व कायमचा ठरविणें.

३. गुरूचराई, सर्पण, शेतकऱ्यास लागणारा लांकूडफाटा व इतर किरकोळ जंगली वस्तु या संबंधांत रिझर्व व प्रोटेक्टेड फॉरेस्टवर ग्रामपंचायतीचा तावा ठेवणें.

४. वेठ, बिगार व सरवराई या गोष्टींना बिलकूल मनाई करणें.

५. शक्य तितक्या वरच्या पायरीपर्यंत देशभाषेंतून शिक्षण देणें.

६. मुलें व मुली या उभयतांसहि मोफत व सक्तीचें शिक्षण देणें व हें कार्य तावडतोब घडवून आणण्याकरितां प्रांतिक फंडांतून म्युनिसिपालट्या व लोकलबोर्ड यांना वाढती ग्रँट व जादा मदत देणें.

७. ग्रामपंचायतीचें पुनरुज्जीवन करून त्यांस त्यांच्यापुरते न्यायचौकशीचे व अंमलबजावणीचे अधिकार देणें.

८. मद्यपानास पूर्ण बंदी करणें.

९. स्त्री–पुरुष हा भेद न ठेवतां मतदारसंघाची संख्या वाढविणें.

१०. आरोग्यमंत्री नेमून त्यांच्या देखरेखीखालीं शास्त्रीय पद्धतीनें देशांतील आरोग्याची सुधारणा करणें.

११. आजपर्यंत लोकमतानें ज्या सुधारणा सुचविलेल्या आहेत व संमत ठरविल्या आहेत त्या घडवून आणणें; उदाहरणार्थ शेतकी सुधारणा, कालव्यांची वाढ, सहकारी चळवळ, देशाच्या परिस्थितीस अनुरूप असें औद्योगिक व यांत्रिक शिक्षण, औषधोपचाराची सोय व देशी वैद्यकास उत्तेजन, इ० इ०

काँग्रेसच्या लोकशाही पक्षाचे वर नमूद केल्याप्रमाणें धोरण ज्यांस मान्य आहे व यास जे चिकटून राहतील तेच उमेदवार काँग्रेस-डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार होत. अशा उमेदवारांनाच मतदारांनीं आपलीं मतें द्यावीं अशी या पक्षाची विनंति असून त्या विनंतीस सर्व मतदारांकडून प्रोत्साहनपर सहानुभूति मिळेल व येत्या निवडणुकींत हा पक्ष यशस्वी होऊन आपलें काँग्रेस-डेमोक्रॅटिक पक्षाचें धोरण व्यवहारांत आणूं शकेल असा या पक्षास पूर्ण भरंवसा वाटत आहे.

---

# खंड तिसरा

## काँग्रेस अर्थात् राष्ट्रीय सभा

### १. मे. ह्यूमसाहेब यांची शेवटची भेट

[ २८ नोव्हेंबर १८९३ ]

ह्यूमसाहेव ह्या वर्षीं हिंदुस्थानांत जे आले आहेत ते प्रायः सर्व ठिकाणच्या लोकांच्या शेवटच्या भेटी घ्याव्या या हेतूनें आले आहेत. अशा वेळीं ठिकठिकाणीं त्यांचा जो आदरसत्कार होत आहे तो त्यांनीं आम्हांवर व आमच्या देशावर जे आजपर्यन्त उपकार केले आहेत त्यांच्या मानानें अगदीं योग्य किंबहुना अगदीं कमीच म्हटला तरी चालेल. ह्यूमसाहेवांनीं आमच्याकरितां काय केलें आहे याचा आम्हीं वेळोवेळीं उल्लेख केलाच आहे; तथापि प्रसंगानुसार आज थोडक्यांत एवढें सांगणें जरूर आहे कीं, इंग्रजी राज्याखालीं हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न जाती एकवट करून त्यांस एकराष्ट्राचें स्वरूप आणण्यास ज्या कल्पनांची आणि साधनांची आवश्यकता आहे तीं सर्व ह्यूमसाहेवांच्या डोक्यांत जरी प्रथमतः आलीं नसलीं तरी तीं अमलांत आणण्याचें श्रेय सर्वस्वी या उदार व परोपकारी पुरुषासच दिलें पाहिजे. इंग्रजी राज्य होण्यापूर्वीं हिंदुस्थानची स्थिति काय होती व इंग्रज येथें आले नसते तर काय झालें असतें या गोष्टीचा सध्यां विचार करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. इंग्रज येण्यापूर्वीं कित्येक शतकें आम्ही परकीयांच्या अमलाखालीं गेलों होतों. दक्षिणेंत मराठेलोक आणि सरहद्दीवर शीखलोक यांनीं हें परकीय लोकांचें राज्य बरेंच निर्मूल करीत आणलें होतें; परंतु पूर्वापार इतिहासावरून पाहिलें असतां या सर्व लढाऊ लोकांस ऐक्य होऊन त्यांच्या अमलाखालीं आज जी आम्ही शांतता भोगीत आहों ती आम्हांस मिळाली असती कीं नाहीं याचा कांहीं अंशीं वानवाच दिसतो. मराठे, शीख आणि रजपूत यांस एकत्र होण्याची संधि आली नव्हती असें नाहीं व तिचा जर कोणीं त्या वेळीं उपयोग करून घेतला नाहीं तर पुढें तरी तसा योग आला असता असें खात्रीनें म्हणणें अशक्य आहे. कसेंहि असो. या जुन्या गोष्टीं सांगत बसण्यापेक्षां इतिहासाचा ओघ पुढें कसा गेला आहे तो पाहूं. हिंदुस्थानांत ज्या कांहीं लढाऊ जाती होत्या त्यांच्यामध्यें ऐक्य नसल्यामुळें अथवा दुसऱ्या कांहीं कांहीं कारणांनीं आज हिंदुस्थानांत एका मोठ्या शहाण्या व प्रबळ राष्ट्राची सत्ता स्थापन

झाली आहे. हें राज्य स्थापण्यास सुरवात झाल्यापासून कित्येक ठिकाणीं शंभर व कित्येक ठिकाणीं पाऊणशें वर्षें इंग्रजी मुत्सद्यांनीं त्याचें दृढीकरण करण्यांत घालविलीं. आज मितीस सर्व हिंदुस्थानावर इंग्रजांचीं जी सार्वभौम सत्ता चालू आहे ती या प्रयत्नाचें फल होय. मराठे, रजपूत, मुसलमान, शीख, बंगाली आणि मद्रासी इत्यादि जाती एका राज्यकर्त्याच्या अमलाखालीं आतां बहुतेक मोकळ्या मनानें व्यवहार करूं लागल्या आहेत. कित्येक ठिकाणीं यांमधील वैमनस्यें अथवा भेद अद्याप कायम असतील ; पण सामान्यतः त्या सर्व एके ठिकाणीं आणणें हें हल्लींच्या राज्यपद्धतीस अत्यंत आवश्यक असल्यामुळें त्यांच्यामधील भेद कालांतरानें तरी नाहींसे होतील अशी आशा आहे. सारांश, इंग्रजी राज्याखालीं शेळी आणि वाघ एके ठिकाणीं पाणी पिऊं लागलीं असें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें बऱ्याच अंशीं खरें आहे; परंतु अशा रीतीनें निरनिराळ्या जाती एकछत्राखालीं आणल्या म्हणजे राज्यकर्त्यांचें काम झालें व इंग्रजी राज्यवैभवाची कमाल झाली कीं काय असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. हिंदुस्थानचे अंडर-सेक्रेटरी लॉर्ड रसेल यांनीं यंदाच्या बजेटावर पार्लमेंटांत जें भाषण केलें त्यांत या प्रश्नाचें उत्तर देण्याचा त्यांनीं थोडासा प्रयत्न केला होता. ते म्हणाले कीं, "निरनिराळ्या जाती जिकल्यानें इंग्रज सरकारचें काम झालें असें कोणी समजूं नये. या सर्व जाती एकवटून त्यांस एकराष्ट्रीयत्व यावें असा इंग्रजी राज्यकर्त्यांचा अखेरचा हेतु आहे व ती गोष्ट हल्लींच्या राज्यांतच घडून येणें शक्य आहे ;" रसेल साहेबांचे हे उद्‍गार आम्हांस पूर्णपणें मान्य आहेत. रसेल साहेबांच्या पूर्वींहि पुष्कळांनीं असेच उद्‍गार आढले होते; पण ही कल्पना अमलांत आणावी कशी हें राष्ट्रीयसभा होण्यापूर्वी कोणाच्याहि चांगलें लक्षांत आलें नव्हतें. निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळ्या जातींचे शहाणे, विचारी व शिकलेले बरेच नेटिव गृहस्थ आहेत ; परंतु विलायतेंतून सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा देऊन आलेल्या लोकांस निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या हुद्यांचे अधिकार चालविण्याची जी सोय असते तशी नेटिव्हांस नसल्यामुळें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांचें एकीकरण करण्याचें काम या सनदी नोकरांपैकींच कोणी तरी उचलावयास पाहिजे होतें, आणि तें ह्यूमसाहेबांनीं केवळ परोपकार बुद्धीनें आम्हांसाठीं पत्करलें. ह्यूमसाहेबांस यांसाठीं किती झीज सोसावी लागली व स्वजातीयांकडून त्यांस किती पुष्पवृष्टि मिळाली यांचा आज पुनः निर्देश करण्यांत कांहीं हंशील नाहीं. इंग्रजी राज्याची स्थापना आणि विस्तार ज्या थोर इंग्रजी मुत्सद्यांनीं केला त्यांचेच हेतु व काम मि० ह्यूम हे स्वजातीयांचा छल सोसून आणि पिशवीस खार लावून शेवटास नेत असत. यांची कर्तव्यताबुद्धि, काम करण्याची उमेद, आपण केलेल्या श्रमांचा केव्हांना केव्हां तरी योग्य मोबदला मिळेल असा भरंवसा हीं इतकीं दृढ आहेत

कीं, ही उमेद, हा उत्साह आमच्याकडील तरुण मंडळींतहि सांपडणें अशक्य आहे, तेव्हां अशा पुरुषास, हिंदुस्थानभर ठिकठिकाणच्या लोकांनीं मान दिला तर त्यांत नवल कोणतें ?

परंतु हा मान देत असतांना व ह्यूम साहेबांचा शेवटचा निरोप घेत असतांना आपण ज्यांचा निरोप घेत आहों त्यांच्यामागें आपल्यावर कोणत्या प्रकारची जबाबदारी येत आहे याचाहि प्रत्येकानें थोडाबहुत विचार केला पाहिजे. इंग्रजी राज्याचा अखेर परिणाम जर वर सांगितल्याप्रमाणेंच व्हावयाचा असेल तर तो राष्ट्रीय सभेसारख्या संस्था हल्लीं चालल्या आहेत त्यापेक्षां शतपट अधिक जोरानें चालल्या पाहिजेत; इतकेंच नव्हे तर जागोजाग असल्या संस्थांच्या शाखा उत्पन्न होऊन ह्यूमसाहेबांनीं सुरतेस उपदेश केल्याप्रमाणें त्या शाखांचें कामहि निर्भीडपणें व जारीनें चाललें पाहिजे. राष्ट्रीय सभेविरुद्ध पुष्कळांनीं पुष्कळ आक्षेप काढिले आहेत. पण आम्हांस इतर सर्व आक्षेपांपेक्षां ज्याची विशेष भीति वाटते तो असा कीं, "असल्या संस्था चालविण्याची कुवत हिंदुस्थानच्या लोकांत येण्यापूर्वीच ह्यूमसाहेबांनीं राष्ट्रीय सभेस सुरुवात केल्यामुळें ती आपोआप लयास जाण्याचा संभव आहे." मि. ह्यूमसाहेबांनीं काल पुणेकरांस सांगितल्याप्रमाणें त्यांच्या जिवांत जीव आहे तोंपर्यन्त ते या संस्थेचें पितृव्रत परिपालन करतील इतकेंच नव्हे, तर कधीं सामोपचारानें तर कधीं रागावून आमच्या हातूनहीं योग्य काम करून घेतल्याखेरीज सोडणार नाहींत; पण हा प्रकार कोठपर्यन्त चालावयाचा ? ह्यूमसाहेबांच्या मागें हिंदुस्थानांत त्यांच्या जोडीचा नाहीं तर निदान त्यांच्या खालच्या प्रतीचा तरी राष्ट्रीय सभेसारख्या संस्था सतत परिश्रमानें चालविण्यास जर कोणी तयार झाला नाहीं तर त्यांनीं केलेले श्रम निरर्थक होतील आणि सर्व सुधारलेल्या जगभर आमचा उपहास होईल हें आम्हीं लक्षांत बाळगिलें पाहिजे. आजपर्यंत ह्यूम साहेबांनीं आमचे दोष पदरांत घेऊन हा मोठा गाडा कसा तरी हांकला होता; पण तसा प्रकार नेहमीं होणें शक्य नाहीं. आपली हल्लींची परिस्थिति सुधारणें आपल्याच हातांत आहे व ती सुधारण्याचें मार्गहि ह्यूम साहेबांच्या कामगिरीनें आतां आपणांस कळूं लागले आहेत. इतकें शिक्षण मिळाल्यावरहि जर आम्ही जागचे जागींच उभे राहूं, ह्यूम साहेबांनीं सफा केलेल्या रस्त्यावरहि पुनः रान वाढूं देऊं तर आमची धन्य झाली असेंच म्हटलें पाहिजे. मि. मार्गन ब्राऊन यांनीं ही गोष्ट आपल्या कालच्या भाषणांत चांगली व्यक्त करून दाखविली होती. तुमच्यावर हल्लीं इंग्रजांचें राज्य आहे व त्या राज्यांतील दोष काढून टाकणें असल्यास तें काम इंग्रजी इतिहासांतल्या पद्धतीप्रमाणेंच पार पाडल्याखेरीज

तुम्हांस दुसरा मार्ग नाहीं असें त्यांनीं साफ बोलून दाखविलें. हा मार्ग म्हणजे राष्ट्रीय सभेसारख्या संस्था अस्तित्वांत आणणें, त्या चालविण्यास दहा–पांच पुरुषांनीं कायावाचामनेंकरून खटपट करणें व त्यांच्या जागोजाग शाखा स्थापन करून त्यांस वळकटी आणणें हाच होय. विलायतेंतील कांहीं सद्‌गृहस्थांची आपणास मदत आहे ही गोष्ट खरी आहे; पण मार्गन साहेबांनीं सांगितल्याप्रमाणें दुसऱ्याच्या हातानें पाणी पिऊन आमचा कधींहि निभाव लागावयाचा नाहीं. अखेरीस या संस्था आमच्या आम्हींच चालविल्या पाहिजेत व त्या तशा चालविणें असल्यास एव्हांपासूनच त्याची कांही तरी तजवीज झाली पाहिजे. आपणांस जें काम करावयाचें आहे तें कांहीं लहानसहान नाहीं. हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं लहान लहान राजांचा जो अंमल होता तो सर्व काढून टाकून त्या ठिकाणीं हल्लीं सनदी लोकांचा एकछत्री अंमल सुरू झाला आहे; परंतु हाहि अंमल नाहींसा होऊन ह्याऐवजीं कालांतरानें कां होईना, पण लोकांचा अंमल चालू होण्याचा पूर्ण संभव आज आमच्या डोळ्यांपुढें आम्हांस दिसत आहे. आम्ही हातपाय हालवूं तर ही गोष्ट सिद्धीस जाईल, नाहींपेक्षां उलट अधिकाधिक विपत्तींत मात्र पडूं हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. सन १८८९ सालीं ह्यूम साहेब आपल्या जनरल सेक्रेटरीच्या जाग्याचा राजीनामा देण्यास जेव्हां तयार झाले तेव्हांपासून या प्रश्नाची थोडीबहुत चर्चा चालूच आहे. मध्यंतरी पंडित अयोध्यानाथ यांस ह्यूम साहेबांचे मदतनीस म्हणून नेमलें होतें, पण पंडिजींचा अशा रीतीनें आह्मांस उपयोग होण्याचें आमच्या नशिबीं नसल्यामुळें त्यांची जागा लवकरच रिकामी झाली. मि० ह्यूम यांनीं मि० ब्राऊन यांस आपल्याबरोबर जे हल्लीं आणिलें आहे तें पुढें त्यांस जनरल सेक्रेटरीची जागा देण्याकरितांच होय. मि० ब्राऊन हे त्यांच्या हल्लींच्या वर्तनावरून सदर जागेचें काम ह्यूम साहेबांप्रमाणेंच करतील अशी आशा आहे. दुःखाची गोष्ट एवढीच कीं, अशा रीतीनें काम करण्यास तिन्ही इलाख्यांत ह्यूम साहेबांस आमच्यापैकीं कोणी मनुष्य मिळूं नये. कोणच्या अंगी पैशानें, बुद्धीनें व मनानें योग्यता असल्यास इच्छा नाहीं आणि कोणाची इच्छा असल्यास बुद्धि, धन किंवा मान्यता यापैकीं कशाची तरी त्यास उणीव असते, असाच प्रकार प्रायः आढळण्यांत येतो. आमच्यामतें लाहोर येथील राष्ट्रीय सभेंत ज्या प्रश्नांचा विचार व्हावयाचा आहे त्यांपैकीं हा अत्यंत महत्त्वाचा होय. हुंडणावळ चढल्यामुळें युरोपियनचे वाढलेले पगार, पब्लिक सर्व्हिस, कौन्सिलचे नियम इत्यादि विषय दरवर्षीं चाललेच आहेत; पण राष्ट्रीय सभेसारख्या संस्था ह्यूम साहेबांच्या मागें कोणीं व कशा चालवाव्या याचा विचार दादाभाई व ह्यूम हे दोघेहि हजर असतां जितक्या पूर्णतेनें होईल

तितक्या दुसऱ्या कोणत्याहि वेळीं होणार नाहीं अशी आमची समजूत आहे व म्हणून, ह्यूम साहेबांचा शेवटचा निरोप घेतांना ठिकठिकाणच्या मंडळींनीं याचा विचार करून मग लाहोरास यावें अशी आमची त्यांस विनंति आहे. गेल्या सालीं प्रयागास भरलेली राष्ट्रीय सभा ह्यूम येथें नसतां भरली होती हें लक्षांत आणलें म्हणजे असल्या संस्था चालविण्याची बुद्धि अगर हिम्मत आमच्यांत नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं; परंतु इतकें असूनहि ह्यूम साहेबांप्रमाणें योग्यतेनें, अधिकारानें, बुद्धीनें आणि खऱ्या आस्थेनें काम करणारा एकहि गृहस्थ अद्याप आपणांस मिळाला नाहीं हेंहि खरें आहे. करितां या सर्व गोष्टींचा विचार होऊन लाहोरास यंदा कांहीं तरी त्याची तोड निघेल अशी आम्हांस उमेद आहे. ह्यूम साहेबांची हल्लींची भेट शेवटची तर खरीच व ती शेवटची असें समजूनच आम्हीं आपल्या व्यवस्थेस लागावें हा मार्ग उत्तम; तथापि परमेश्वरकृपेनें ज्या महात्म्यानें एकंदर इंग्रजी राज्यांतील प्रजेस राजकीय उन्नती होण्याच्या साधनांची किल्ली दाखवून दिली त्याची पुनः भेट होण्याचा योग येऊन आजपर्यंत त्यांच्या भेटीनें जसें आम्हांस वारंवार उत्तेजन मिळत गेलें तसेंच पुढेंहि मिळत जावो अशी आम्ही मनापासून प्रार्थना करतों.

---

## २. राष्ट्रीय सभा

[ ८ जानेवारी १८९५ ]

राष्ट्रीय सभेला दहाव सरून अकरावें वर्ष लागलें. कौमार्यदशा संपून यौवनावस्थेची झांक पडूं लागलेल्या स्त्रीच्या स्वभावांत जसा थोडथोडा फरक होऊं लागतो तसेंच राष्ट्रीय सभेचें अंतर्बाह्य स्वरूप हळू हळू बदलत चाललें आहे. पोरवयाला साहजिक असणारी अल्लड–वृत्ति जाऊन तिच्या ठिकाणीं गांभीर्य, विचारशीलता, व उद्दिष्ट हेतु साध्य करून घेण्याविषयीं निश्चयबुद्धि अधिक दिसूं लागली आहे. पूर्वीचा उत्साह व भावी विजयाची आशा हीं आहेत तशींच आहेत किंबहुना वृद्धिगतच होत आहेत म्हटलें तरी चालेल; फार तर अनुभवानें व ज्ञानानें चित्ताला जें एक प्रकारचें स्थैर्य येत असतें त्यामुळें तीं पूर्वी-प्रमाणें वेळीं अवेळीं व अमर्यादपणें व्यक्त होत नसतील इतकेंच. हिंदुस्थानच्या भावी इतिहासकारास राष्ट्रीयसभेची स्थापना व वाढ हा एक अतिशय मनोरंजक भाग होईल. प्रथम कांहीं अनुभवी व विद्वान पुढाऱ्यांच्या डोक्यांत ही कल्पना कशी आली, तिचा पहिला अंकूर मुंबईच्या एका साधारण बंगल्यांत कसा दिसला, तेथून कलकत्ता, कलकत्त्याहून मद्रास अशी उत्तर दक्षिण पंचवार्षिक यात्रा करून जन्म-स्थानीं येईपर्यन्त तिची कशी वाढ होत गेली हें वर्णन करण्याला खचित गिबन-सारख्या इतिहासकाराचीच लेखणी लागेल. १८८९ सालीं मुंबईस परत आल्यावर राष्ट्रीयसभेच्या स्वरूपांत महत्त्वाचा फरक झाला. तोंपर्यन्त ठिकठिकाणच्या मुखत्यारांचा सरकारच्या वर्तनावर नुसती टीका करणारा एक मोठा लोकसमुदाय इतकीच राष्ट्रीयसभेची योग्यता होती, पण पांचव्या सालीं प्रथम तिला व्यवस्थित राजकीय परिषदेचें रूप आलें. तें येण्यास दोन गोष्टी कारण झाल्या. परलोकवासी ब्राडलासाहेबांनीं या अनाथ मुलीचें उघडपणें पालकत्व स्वीकारलें. इतकेंच नाहीं, तर स्वत: हजर राहून तिचा निरोप पार्लमेंटास कळविण्याचें वचन दिलें. येणेंप्रमाणें, राष्ट्रीयसभेला इंग्लंडांत खंबीर कैवारी मिळाला; इतकेंच नाहीं, तर त्याला पाठबळ देण्याकरितां व सभेची मागणी विलायतेंतील लोकांपुढें सदोदित ठेवण्यास एक कायमची कमिटी व फंड स्थापन झाला. अर्थात् या व्यवस्थेमुळें राष्ट्रीय सभेलाहि कायमपणा आला. फौजेच्या आघाडीस टेहेळणी करण्याला व रस्ता मोकळा करण्याला सापर्स आणि मायनर्स टोळी पाठवितात; त्याप्रमाणें पार्लमेंटाच्या दाराशीं सतत वर्षभर

ओरड करणारी ब्रिटिश कमिटी व तिला साधारण दिशा दाखविणारी व पाठबळ देणारी येथील वार्षिक राष्ट्रीयसभा अशी आमच्या राजकीय चळवळीची जोडगोळी तेव्हांपासून सुरू झाली. दुर्दैवानें ब्राडलासाहेब लवकरच निवर्तल्यानें आमचें इंग्लंडांतील अंग लंगडें पडतें कीं काय अशी भीति वाटूं लागली होती; पण ब्राडलाच्या जागीं दादाभाई, वेडरवर्न हें आमचे नजीकचे आप्त पार्लमेंटांत शिरल्यामुळें ती काळजी दूर झाली. हिंदुस्थानांतील लोकांचीं गाऱ्हाणीं व मागण्या उघडपणें बोलून दाखविणारी येथील वार्षिक राष्ट्रीयसभा, त्या मागण्या व्यवस्थित रीतीनें इंग्लिश लोकांपुढें मांडणारी ब्रिटिश कमिटी व मागण्यांचीं खुद्द पार्लमेंटांत दाद लावणारे दादाभाई प्रभृति म्होरके, येणेंप्रमाणें कडेकोट तयारी झाल्याबरोबर हिंदुस्थानच्या हितशत्रूंचें धाबें दणाणलें यांत नवल तें कोणतें ? तोंपर्यन्त राष्ट्रीय सभेची थट्टा करण्यांत, शिव्या देण्यांत व फाटाफूट करून तिचा विध्वंस करण्यांत ही विघ्नसंतोषी मंडळी गुंतली होती; पण १८९० सालापासून तो प्रकार बदलला. सर ऑकलंड कॉलव्हिनचीं निनांवी चोपडीं जाऊन सर विल्यम हंटरचे गुळचट लेख येऊं लागले. धाकदपटशाला आमचे लोक ऐकत नाहींत असें पाहून थोडी थोडी लालूच दाखविण्याला सुरुवात झाली. तुमच्या मागण्या ठीक आहेत, पण त्या जरा बेतानें व धीराधीरानें मागा असा आम्हाला उपदेश होऊं लागला. तसेंच तुम्हांला राजकीय सुधारणा करा अशाहि मोठ्या मानभावी सूचना झाल्या. झालें. आमच्यांतहि कांहीं उथळबुडाची मंडळी आहे, ती येवढ्यानेंच फुशारली व पांच वर्षांतच आम्ही कृतकृत्य झालों असें समजून नाचावयास लागली. खुद्द ह्यूमसारख्या दूरदर्शी पुरुषालाहि क्षणभर मोह पडून राष्ट्रीयसभेचें तारूं समाजसुधारणेच्या खडकावर आदळून फुटतें कीं काय अशीहि भीति उत्पन्न झाली. पण सुदैवानें तें विघ्न लवकरच टळलें व प्रथम घालून दिलेल्या धोपटमार्गांतून कधींहि बाहेर जावयाचें नाहीं असा राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं निश्चय केला. १८८९ सालच्या मुंबईच्या राष्ट्रीय सभेंत दुसरी महत्त्वाची गोष्ट झाली, ती कायदेकौन्सिल सुधारणेविषयींचा ठराव होय. त्यावेळीं मद्रास व पुणें यांच्या तर्फेनें दोन निरनिराळ्या व्यवस्था सुचविण्यांत आल्या होत्या. मद्रासच्या मतें लोकसंख्येच्या मानानें ठिकठिकाणीं इलेक्टोरल कॉलेजें स्थापन करून त्यांनीं स्थानिक व वरिष्ठ कौन्सिलांत मुखत्यार पाठवावे. पुणेकरांच्या मतें इतकी भानगड करीत बसण्यापेक्षां हल्लींच्या म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांचा या कामीं उपयोग करून घेणें सुकर व श्रेयस्कर होईल व तें सरकारलाहि मान्य होईल. दोन्हीं सूचनांचा खल होऊन मद्रासची सूचना मुंबईच्या सभेंत बहुमतानें पसार झाली व तिला अनुसरून ब्राडलासाहेबांनीं आपलें बिल तयार केलें. पुढें अनेक

कारणांनीं झालेला ठराव बरोबर झाला नाहीं असें सर्वांस वाटून ती मद्रासची सूचना मागें पडून व पुणेकरांचीच सूचना अखेरीस सर्वसंमत झाली; व १८९२ सालीं लॉर्ड क्रॉसच्या कायद्यांतहि तिचाच समावेश झाला. ही हकीगत येथें सांगण्याचा मतलब इतकाच कीं, तिजवरून आम्हीं केवळ सरकारच्या वर्तनावर टीका करणारेच नसून हल्लींची व्यवस्था सुधारण्याला योग्य व शक्य उपाय सुचविण्याची अक्कल देखील आमच्यांत आहे हें वरील प्रकरणावरून सर्वांच्या नजरेस आलें. राज्यकर्तृत्वाचा सगळाच गड्डा इंग्रज घेऊन बसले आहेत असें नाहीं. पुणेकरांनींहि एकेवेळीं बहुतेक हिंदुस्थानावर राज्य केलें होतें, तेव्हां त्यांनाहि राज्यकारभारांतील अडचणी व त्या दूर करण्याचें उपाय थोडेबहुत समजतात हें इंग्लंडांतील लोकांना त्यावेळेस कळून आलें. राष्ट्रीय सभा ही केवळ सरकारला शिव्या देण्याकरतांच उत्पन्न झाली नसून हल्लींच्या राज्यव्यवस्थेंतील दोष दूर होऊन सरकारचें व लोकांचें कल्याण व्हावें अशी तिची खरोखर इच्छा आहे व तदनुरूप उपाय सुचविण्याचीहि तिची तयारी आहे असें सरकारच्या पक्केपणीं लक्षांत येऊन चुकलें. यामुळें अर्थात् राष्ट्रीय सभेच्या ठरावांना अधिक वजन आलें, व त्याचा परिणाम अखेर १८९२ सालीं लॉर्ड क्रॉस साहेबांनीं मोठ्या मेहेरबानीनें केलेला कौन्सिल-सुधारणेचा कायदा होय. हा कायदा निव्वळ फसवणूक असून फक्त आमच्या समजुतीखातर तोंडावर फेंकला होता हें तेव्हांच सर्वांच्या लक्षांत आलें, व आतां अनुभवहि तसाच आला आहे हें खरें; पण असलें सोंग तरी पुढें आणणें स्टेट सेक्रेटरीला भाग पाडलें हा राष्ट्रीय सभेचा लहानसहान कार्यभाग नाहीं. जन्मास आल्यापासून सात वर्षें झालीं नाहीं तोंच एवढें काम झालें. तेव्हां असाच नेट धरल्यास कालांतरानें राष्ट्रीय सभेपासून खचित मोठा फायदा होईल अशी सर्वांची खात्री झाली व त्यामुळें पुढेंहि चळवळ करण्यास लोकांना अधिक जोर आला. तात्पर्य, मुंबईच्या पांचव्या सभेनें जें नवीन वळण लावलें त्याचा तावडतोब परिणाम दिसूं लागला. सभेच्या मागण्यांना वजन आलें तसें सभेंत होणाऱ्या भाषणांत व कामकाजांतहि अधिक भारदस्तपणा दिसूं लागला. शुष्क प्रश्न बाजूला ठेवून अतिशय महत्त्वाचे व सर्व देशाला साधारण विषय हातीं घेण्याकडे प्रवृत्ति होऊं लागली, व निरनिराळ्या वक्त्यांच्या भाषणांतील पोकळ डौल, पाणचटपणा व शुष्क शब्दजाल कमी होऊन त्याऐवजीं माहितीनें भरलेलीं, खऱ्या देशाभिमानानें ओथंबलेलीं व आपली जबाबदारी पूर्णपणें ओळखून केलेलीं भाषणें होऊं लागलीं. राष्ट्रीय सभेचीं दिशा बहुतेक कायम झाली व त्यामुळें तिच्या मागण्या व सूचनाहि नियमित होऊं लागल्या. पहिल्या पंचवार्षिक यात्रेनें एवढा फेरफार

घडून आल्यावर राष्ट्रीय सभेचें दुसरें देशपर्यटन सुरू झालें. पुनः कलकत्ता, नागपूर, प्रयाग, लाहोर व मद्रास अशी आवृत्ति होऊन दरवर्षी थोडेंबहुत पाऊल पुढें पडत गेलें. ही राष्ट्रीय सभेची चढती कळा पाहून आमच्या अँग्लो–इंडियन हितशत्रूंस फारच धास्ती उत्पन्न झाली. तिकडे पार्लमेंटांतहि येथील गोऱ्या कामदारांचीं काळींबेरीं एकामागून एक बाहेर येऊं लागलीं. स्पर्शजन्यरोगाच्या कायद्यासंबंधानें लॉर्ड रॉबर्टस्सारख्या वीरासहि दोन बायांची माफी मागावी लागली. अफूवर कमिशन बसलें व शेवटीं सिव्हिल सर्व्हिस संबंधानें हाऊस ऑफ कॉमन्समध्यें आम्हांस अनुकूल असा ठराव झाला. इकडे तिजोरी रिकामी पडण्याची वेळ आली. मग काय विचारतां? आतां हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य ऊर्फ गोऱ्या कामदारांची चैनबाजी खास बुडणार असें त्यांस वाटूं लागलें. या अनर्थाला कारण राष्ट्रीय सभेनें सुरू केलेली राजकीय चळवळ असेंहि त्यांच्या मनानें घेतलें, व म्हणून मूले कुठार करण्याकरितां सामदामापैकीं चौथा उपाय योजण्याचा कित्येकांनीं उपक्रम केला. सर सय्यद अहमद प्रभृतींना बगलेंत मारून मुसलमानांस फितविण्यास प्रारंभ झाला. पण मुसलमानांस आपलेकडे घेण्यास कांहीं आमिष दाखविलें पाहिजे; पण गोऱ्या जावयांची चैन कमी केल्याशिवाय मुसलमानांस तरी काय देतां येणार? व कोरडया थापाथापीवर किती दिवस निभणार? तेव्हां कुंपिणी सरकारचा इतिहासप्रसिद्ध मार्ग बरा वाटूं लागला व देशांत ठिकठिकाणीं हिंदुमुसलमानांचे दंगे उपस्थित झाले. १८९३ च्या जूनचा सिव्हिल सर्व्हिससंबंधीचा पार्लमेंटाचा अनुकूल ठराव झाला नसता, तर आगस्टपासून हिंदुमुसलमानांचे तंटेहि कदाचित् सुरू झाले नसते असें पुष्कळांस वाटतें; व तें अगदींच निर्मूल असेल असें आमच्यानें म्हणवत नाहीं. गेल्या वर्षापासून राष्ट्रीयसभेला हें नवीनच अरिष्ट उत्पन्न झालें व एका प्रकारें मागच्यापेक्षां ते तरून जाणें कठीण होतें. परकीयांचें उघड शत्रुत्व पुरवलें, पण हा गृहकलह कोणत्या थरावर जाईल हें सांगवेना; व त्यामुळें राजकीय चळवळींचे तारूं या नूतन वादळांतून कसें पार पडतें याची आमच्या पुरस्कर्त्यांस मोठी काळजी उत्पन्न झाली; पण येथेंहि आमच्या देशाचें भाग्य उदयास पुन्हां आलें व दंग्यांच्या धामधुमींतूनहि गेलीं दोन वर्षें राष्ट्रीय सभा निर्विघ्नपणें पार पडली. आणखीहि कित्येक प्रकारें राष्ट्रीयसभेचा गेल्या वर्षांत विजय झाला; पार्लमेंटांत दीडशेंपर्यंत हितचिंतक मिळाले. येथील जमाखर्चाविषयीं चौकशी करण्याकरितां कमिटी नेमण्याला स्टेट सेक्रेटरी कबूल झाला. सर आ. काल्व्हिन जे येथें असतांना राष्ट्रीयसभेचे कट्टे शत्रु होते तेहि आमच्यासारखींच मतें प्रतिपादूं लागलें; व शेवटीं हिंदुस्थानसरकारहि कापसावरील कराच्या बाबतींत लोकांच्या

तर्फेनें स्टट सेक्रेटरीशीं भांडण्यास तयार झालें, हा सर्व परिणाम कशाचा ? राष्ट्रीयसभेनें सुरू केलेली चळवळ नेटानें चालू ठेवली नसती, तर तो खचित झाला नसता. दर नाताळांत भरणाऱ्या सभेप्रीत्यर्थ व ब्रिटिश कमिटीसाठीं पुष्कळ पैसा खर्च होतो खरा; पण वरील फायद्याच्या मानानें तो कांहींच नाहीं म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानचें लोक उत्तरोत्तर दरिद्री होत चालले आहेत व त्याला कारण हल्लींची उधळपट्टीची राज्यव्यवस्था ही गोष्ट विलायतेंतील व येथील समजुतदार लोकांच्या अंतःकरणांत चांगली बिंबूं लागली आहे. सर आ. कालव्हिन व सर डेव्हिड वार्बर यांना ती कबूल झाली आहे, व तिची पूर्णपणें शहानिशा होण्याचा प्रसंग लवकरच येईल असें वाटतें. दहा वर्षांपूर्वीं असें होईल असें कोणीहि खात्रीनें म्हणूं शकला नसता. यापेक्षां राष्ट्रीयसभेच्या, आवश्यकतेविषयीं आणखी सबळ पुरावा पाहिजे आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

## ३. अकरावी राष्ट्रीय सभा

[ ता. ६ ऑगस्ट १८९५ ]

### महाराष्ट्रीयांस विनंति

......आतां आज दहा वर्षें राष्ट्रीय सभा भरत आहे तिनें काय काम केलें ? असा पहिल्यानें सहज प्रश्न निघतो. परंतु त्यास उत्तर देणें फारसें कठीण आहे असें नाहीं. ज्यानें ज्यानें म्हणून एकवार तरी राष्ट्रीयसभेचा समारंभ पाहिला असेल त्यांस या सभेचें स्वरूप, महत्त्व आणि उद्देश कळून आले असतील हें कोणीहि सांगावयास नकोच; आणि जर कोणास राष्ट्रीय सभेच्या खऱ्या स्वरूपाची ओळख करून घेणें असेल, तर यंदा पुण्यास होणारा समारंभ तरी त्यांनी अवश्य पाहावा अशी त्यास आग्रहपूर्वक विनंती आहे. प्रत्यक्ष डोळ्यांनीं कोणतीहि एखादी गोष्ट पाहणें व ती कानानें ऐकणें यांजमध्यें पुष्कळ अंतर आहे. राष्ट्रीयसभेच्या विस्तीर्ण मंडपांत बंगाली, मद्रासी, सिंधी, पार्शी, मुसलमान आदिकरून सर्व जातींचे लोक एकदिलानें व एकचित्तानें राजकीय व राष्ट्रीय प्रश्नांचा विचार करतांना ज्यांनीं पाहिले असतील त्यांची हिंदुस्थानच्या भावी उदयाचा व ऐक्यतेचा राष्ट्रीयसभा हा एक मजबूत पायाच होय, अशी खात्री होऊन त्यांचीं मनें आनंदानें भरून गेलीं असतील यांत बिलकूल शंका नाहीं. आमच्या हिंदुस्थानांत पूर्वी छप्पन्न देश होते असा इतिहास आहे, पण इंग्रजसरकारच्या सार्वभौमसत्तेखालीं हे छप्पन देश मोडून त्यांचा एकजीव किंवा एकराष्ट्र होण्याचा समय आला आहे, हें राष्ट्रीय-सभेवरून जितकें पूर्णपणें व्यक्त होतें तितकें दुसरें कशावरूनहि होत नाहीं. राष्ट्रीयसभेस दर वर्षी खर्च फार लागतो अशी कित्येकांची कुरकुर आहे; पण ज्यांनीं ज्यांनीं म्हणून हा अपूर्व समारंभ पाहिला असेल त्यांस हा योग घडवून आणण्यास झालेला खर्च कांहींच नाहीं असें वाटेल. कोठें पंजाब आणि कोठें त्रावणकोर; कोठें डाका आणि कोठें धारवाड ? पण या सर्व ठिकाणच्या प्रमुख लोकांचें जें आज राष्ट्रीय प्रश्नासंबंधें ऐकमत्य अथवा समप्रवृत्ति दिसून येते ती राष्ट्रीयसभेच्या उद्योगाचेंच फल होय. आमच्या हल्लींच्या राज्यकर्त्यांनीं रेल्वे, तारायंत्रें वगैरे बाह्यसाधनांनीं, आणि राज्य करण्याची एकसारखी पद्धत, एकसारखे कायदे, आणि राज्यव्यवहारांत उपयोगी पडणारी एक भाषा, यामुळें सर्व हिंदुस्थानदेश जणो काय एकत्र करून बांधून टाकला

आहे. पण अशा रीतीनें बाह्य साधनांनीं बांधून टाकलेल्या लोकांचीं एकदिलें करून त्यांस खरोखर एकराष्ट्रीयत्व आणणें हें काम करण्यास राष्ट्रीय सभा हेंच काय तें उत्तम साधन आहे. आमच्या राज्यकर्त्यांनीं बाकीची सर्व तयारी केली आहे; लोखंडी रुळांनी व तारांनीं त्यांनीं सर्व देश आवळून टाकिला आहे. पण त्याचा एकजीव होण्यास लोकांचीं मनें एक झालीं पाहिजेत. ही उणीव भरून काढून राज्यकर्त्यांचें उद्देश तडीस न्यावे हा राष्ट्रीयसभेचा मूळ हेतु आहे; व मेहेरवान ह्यूम, वेडरबर्न, केन वगैरे युरोपियन सद्गृहस्थांची जी या कामास पूर्ण मदत आहे ती याच कारणांकरितां होय. राष्ट्रीयसभेंत एखादा ठराव किंवा तेथें झालेलें एखादें भाषण कदाचित् कोणास मान्य असेल किंवा नसेल; पण त्यामुळें सभेपासून होणारा वर सांगितलेला खरा फायदा कोणाच्याहि लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या आणि सर्व प्रांतांतल्या लोकांस एक दिलाचें आणि एक विचाराचें करणें हें राष्ट्रीयसभेचें मुख्य कर्तव्य होय; व आज १० वर्षें जो क्रम चालत आहे तो तसाच पुढें आणखी कांहीं वर्षें चालू राहिल्यास हा हेतू बऱ्याच अंशानें तडीस जाईल अशी राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांची पूर्ण उमेद आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलम.
अनुक्रम ७५७७५ वि: लिंबध
क्रमांक 2225 नों: दि: 2/3/62

# ४. अकरावी राष्ट्रीय सभा

[ ७ जानेवारी १८९६ ]

...... आपली, आपल्या कुटुंबाची व आपल्या देशाची उन्नती होणें हेंच जर सुधारणेचें बीज असेल तर तें नको आहे असें म्हणणारा कोणी सापडेल असें आम्हांस वाटत नाहीं. हल्लीं या बावतींत जो कांहीं मतभेद दृष्टीस पडतो तो मार्ग-भेदामुळें झालेला आहे हें सर्वांनीं पूर्णपणें लक्षांत ठेवलें पाहिजे. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरवूं नयें असें म्हणणारे लोक समाजसुधारणेचे द्वेष्टे आहेत असें म्हणणें जितकें खोटें आहे तितकेंच सदर मंडपांत सामाजिक परिषद भरलीच पाहिजे असें म्हणणारे लोक समाजसुधारणेचे खरे पुरस्कर्ते आहेत असें म्हणणें हें होय. समाजाची जी कांहीं सुधारणा होत असते ती आमच्या हल्लींच्या सुधारकांप्रमाणें आततार्इपणा करून होत नाहीं. ऑनरेबल बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं सांगितल्याप्रमाणें राष्ट्रीयसभा ही सर्व जातींच्या, धर्मांच्या, व मतांच्या लोकांची आहे. यांत आम्हांस सुधारकहि पाहिजेत आणि गैर सुधारकहि पाहिजेत; हिंदु पाहिजेत आणि मुसलमानहि पाहिजेत; बंगाली पाहिजेत व मद्रासीहि पाहिजेत. सारांश, राष्ट्रीयसभा हें सर्वांचें काम आहे, व तेथें कोणत्याहि विशिष्ट धर्माच्या, जातीच्या, अथवा वर्गाच्या मतांचा प्रसार इतरांस वाईट वाटेल अशा रीतीनें करण्याचा कोणास हक्क नाहीं अथवा परवानगी मिळावयाची नाहीं हें तत्त्व अकराव्या राष्ट्रीयसभेच्या वेळीं ऑनरेबल मि. बानर्जी यांनीं स्पष्ट रीतीनें लोकांस कळविलें, याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. ज्याला सुधारणा पाहिजे असेल त्यानें ती खुशाल करावीं, पण ती 'बीचमे मेरा चांदभाई' या न्यायानें राष्ट्रीयसभेच्या मंडपांत कशासाठीं? हा प्रश्न केव्हां ना केव्हां तरी उपस्थित व्हावयाचा होता. करितां तो यंदाच्या सालीं उपस्थित झाला यांत कांहीं बावगें झालें नाहीं व त्यापासून राष्ट्रीयसभेस यत्किंचितहि न्यूनता आली नाहीं. इतकेंच नव्हे, तर सामाजिक परिषदेसहि कमीपणा आला नाहीं असें खुद्द परिषदवालेहि कबूल करितात. तेव्हां आतां जी गोष्ट झाली ती योग्यच झाली असें म्हटलें पाहिजे. .........

## ५. गेल्या राष्ट्रीय सभेंत विशेष काय झालें ?

[ ८ जानेवारी १९०७ ]

नरम गरम पक्षाच्या झगड्यांत १९०६ सालाबरोबर राष्ट्रीय सभेचीहि समाप्ती होणार, निदान यांपैकीं एका पक्षास राष्ट्रीय सभा सोडून द्यावी लागणार किंवा हाकून दिलें जाणार, म्हणून दोन महिन्यांपूर्वी ज्या अँग्लो-इंडियन पत्रकारांनीं शिष्टाई करण्याच्या मिषानें भविष्य केलें होतें अगर सल्ला दिली होती, त्यांची आतां पूर्ण निराशा झाली आहे. १९०६ साल संपलें, साताची जानेवारी आली; तरी अद्याप काँग्रेस हयात आहे व पुढेंहि आणखी कांहीं वर्षें जगण्याचा तिचा इरादा आहे; इतकेंच नाहीं तर बावीस वर्षापर्यंत अज्ञानावस्थेंत तिची ही जी वाढ झाली यापेक्षां अधिक जोरानें इतोत्तर ती वाढीस लागणार असेंहि गेल्या बैठकींत झालेल्या ठरावांवरून स्पष्ट दिसत आहे. तेव्हां आमच्या हितशत्रूस आतां एवढाच मार्ग राहिला आहे कीं, एकानें गरम पक्षाचा जय झाला म्हणून नरम पक्षास चिडवावें, तर दुसऱ्यानें गरम पक्षास काँग्रेस मधून हांकून दिलें असें खोटेंच विधान करून लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकावी. कलकत्त्याचा 'इंग्लिशमन' आणि मुंबईचा 'टाइम्स' यांची याप्रमाणें लपंडावी सुरू असतां विलायतच्या 'टाइम्स'नें असें प्रसिद्ध केलें आहे कीं, 'नरम पक्षानें गरम पक्षाची बहुतेक मतें अंगिकारून काँग्रेसवरील प्रसंग कसाबसा तरी टाळला; परंतु त्यामुळें काँग्रेसची इभ्रत व वजन आतां पूर्वीप्रमाणें राहाणार नाहीं. हिंदुस्थान देश तरवारीनें जिंकला आहे व तरवारीनें राखला जात आहे; करितां स्वराज्याचे हक्क मागणाऱ्या दादाभाई नवरोजी सारख्यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, त्यांच्या आणि त्यांच्याशीं विरोध करणाऱ्या इतर हिंदुस्थानच्या प्रजेच्या दरम्यान ही तरवार कायमचें ठाणें देऊन राहिली आहे, तेंच त्यांस हितावह आहे !' लंडन 'टाइम्स'चा हा उपदेश आमच्या लोकांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे. अशाच मासल्याचा उपदेश पूर्वी मुंबईच्या 'टाइम्स'नें व हल्लीं कलकत्त्याच्या 'इंग्लिशमननें' केला आहे. ते म्हणतात कीं, 'आम्ही हिंदुस्थानांत आलों ते कांहीं परत जाण्याकरितां आलों नाहीं.' अर्थात् स्वराज्याच्या हक्काची मागणी करणारे लोक मूर्ख होत; व राष्ट्रीय सभा ह्या मागणीचा अंगिकार करील तर तिलाहि मूर्खांच्याच कोटींत जावें लागणार. भांड्यावर भांडें ठोकल्याखेरीज त्यांचा आवाज निघत नाहीं. जोंपर्यंत आमचे पुढारी लोक किरकोळ मागण्या करून स्तब्ध होते, तोंपर्यंत हे अँग्लो

इंडियन पत्रकारहि त्यांचे गोडवे गात असत; पण स्वराज्याचें नांव निघाल्याबरोबर यांच्या पायाची तिडीक यांच्या मस्तकास जाऊन पोंचली आहे, आणि आमचें विन्हाड हिंदुस्थानांत कायमचें राहणार म्हणून हे कंठरवानें प्रतिपादन करण्यास लागले आहेत! याच लोकांच्या हातून गोडीगुलाबीनें आम्हांस स्वराज्याचे हक्क मिळतील कीं नाहीं याचा विचार करण्याचें काम आम्हीं वाचकांवरच सोपवितों.

अँग्लो–इंडियन पत्रांची अशा रीतीनें तारांबळ कां उडाली आहे, हें समजण्याकरितां गेल्या राष्ट्रीय सभेंत काय झालें याकडे लक्ष देणें जरूर आहे. १९०६ सालच्या कॉंग्रेस संबंधानें पहिली महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे ही होय कीं, या सभेस नरम व गरम पक्षाचे सर्व पुढारी हजर होते. इतकेंच नव्हे तर एकंदर प्रतिनिधींची संख्याहि १८०० पर्यंत वाढली होती. कॉंग्रेस बुडणार या भीतीनेंच कीं काय दर एक प्रांतांतून शेंकडों प्रतिनिधी गोळा झाले होते. आणि निरनिराळ्या प्रांतांच्या प्रत्येक ठाण्यांत कॉंग्रेसपुढें येणाऱ्या विषयांची मोठ्या कळकळीनें आणि उत्साहानें चर्चा चालत असे. रा. टिळक पुण्याहून पांचशें पैलवान घेऊन जाणार म्हणून ज्या पक्षाच्या वतीनें खोटी बातमी पसरविण्यांत आली होती त्या पक्षाच्या पुढाऱ्यांनीं तर आपली जय्यत तयारी करून ठेविली होती. रा. टिळक पुण्याहून एकटेच गेले; पण मंबईच्या म्युनिसिपल सिंहानें आपला परिवार गाडींत घालून आपल्या बरोबर नेला होता. आणि त्यापूर्वीं ठिकठिकाणच्या आपल्या अनुयायांस इशारत देऊन लढाईची तयारी करून ठेवली होती. बंगालच्या कांहीं पुढाऱ्यांस अशी थाप देण्यांत आली कीं, "बाबानों, तुम्हीं या सालीं यजमान होऊन आपल्या घरीं कॉंग्रेस बोलावली आहे; करितां या सालीं जर तुमचीं बहिष्कार–योगासंबंधीचीं किंवा दुसरीं मतें तुम्हीं आपल्या पाहुण्या-प्रतिनिधींवर लादाल तर तें शिष्टाचारास शोभणार नाहीं." बंगालचे कांहीं पुढाऱ्यांस अशा रीतीनें स्वस्थ बसविल्यानंतर मद्रास आणि संयुक्त प्रांत यांच्या पुढारी-प्रतिनिधींस नरम पक्षानें आपल्या गोटांत घेतलें आणि आपल्या मतें कसलेल्या, अनुभविक व धीट अशा मुंबईच्या सेनानायकाच्या देखरेखीखालीं युद्धाची सर्व तयारी केली. या गोष्टी येथें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, गेल्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत जे कांहीं ठराव झाले अथवा जी कांहीं तडजोड निघाली ती जुन्या पक्षाची तयारी कमी होती म्हणून निघाली नाहीं, हें सर्वांच्या पूर्ण लक्षांत यावें. मुंबईचे मेथाजी, मद्रासचे कृष्णस्वामी आय्यर, अलाहाबादचे पंडित मालवीय, वऱ्हाड व नागपूरचे रावबहाद्दुर आणि आमच्या पुण्याचे नामदार साहेब, आपापल्या सर्व ग्रह, उपग्रहांसह गेल्या बैठकींत हजर

असल्यामुळें १९०६ च्या कॉंग्रेस सभेस जी शोभा आली होती तशी शोभा पुनः येणें कठीण आहे. सारांश, कॉंग्रेसच्या गेल्या बैठकींत जे ठराव मंजूर झाले ते उभयपक्षांच्या बलाबलाचा पूर्ण विचार होऊनच करण्यांत आले. गफलतीनें कोणताहि पक्ष फसला नाहीं हें आरंभी ध्यानांत ठेविलें पाहिजे. सुदैवाची गोष्ट एवढींच कीं, कोणत्याहि पक्षानें आपल्या बाजूनें तुटेपर्यंत ओढाताण चालविली नाहीं आणि त्याबद्दल आम्ही दोन्ही पक्षांचें मनःपूर्वक अभिनंदन करतो. सार्वजनिक कामांत जर आम्हांस कांहीं धडा शिकावयाचा असेल तर तो हाच होय; आणि इतर सर्व गोष्टी सोडून दिल्या तरी हा धडा आम्हास चांगला अवगत आहे, एवढेंच जर कॉंग्रेसच्या बाविसाव्या बैठकीमुळें आपल्या हितशत्रूंच्या नजरेस आलें, तर आमचा एक मोठाच कार्यभाग उरकला असें आम्हीं समजतों.

१९०६ साल संपलें, तरी अद्याप कॉंग्रेस जिवंत आहे हीच गोष्ट अशा दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची आहे, व म्हणून आम्ही तिचा प्रथमतः निर्देश केला आहे. आतां गेल्या बैठकींत काय निष्पन्न झालें याचा विचार करूं. आजपर्यंतच्या आमच्या लेखांवरून, नरम, गरम पक्षांचा वाद कोणत्या मुद्यासंबंधानें होता हें वाचकांस माहीत झालेलेंच आहे. कॉंग्रेसची जुनी पद्धत म्हटली म्हणजे अबकारी, जंगल, मीठ वगैरे खात्यांतील किरकोळ व्यंगें किंवा दोष काढून त्यांच्या निराकरणार्थ अगर कायदेकौन्सिलांतील सुधारणा करण्याकरितां, अगर लष्करी खर्च कमी करण्याकरितां सरकारास जोरानें पण नम्रपणाची विनंति करावयाची. हिंदुस्थानांतील प्रजेस, आपल्या डोळ्यापुढें कोणता हेतू ठेवून झटावे याबद्दल राष्ट्रीयसभा अगर तिचे अध्यक्ष नेटानें अगर स्पष्टपणानें कांहीं एक सांगत नसत. दादाभाई नवरोजी यांनीं हा क्रम सोडून देऊन बाविसाव्या कॉंग्रेस सभेस नवें वळण लावून दिलें आहे. "दादाभाई सांगणार तरी काय"? या मथळ्याखालीं गेल्या ता. १८ डिसेंबरच्या अंकांत आम्हीं केलेलें भाकीत अक्षरशः खरें आहे असें सदरील अग्रलेख व दादाभाई नवरोजी यांचें भाषण जो कोणी वाचील त्याच्या सहज लक्षांत येणार आहे. हिंदुस्थानास स्वराज्य पाहिजे आणि तें स्वराज्य मिळवणें हेंच कॉंग्रेस सभेचें कर्तव्य आहे, अशा रीतीचें जोरानें आणि वजनानें प्रतिपादन करणारा दादाभाई नवरोजीपेक्षां अधिक योग्य अध्यक्ष कॉंग्रेस सभेस खचित मिळाला नसता. किंबहुना दादाभाईपेक्षां वयाने, अनुभवानें, आणि सन्माननीयतेनें किंचित् कमी माणसानें जर हीच गोष्ट कॉंग्रेसभेच्या व्यासपीठावरून कंठरवानें सांगितली असती, तर नरम पक्षांतील लुंग्यासुंग्यानींच नव्हे, तर महावीरांनीं देखील तिचा हल्लींप्रमाणें मुकाट्यानें स्वीकार केला नसता.

दादाभाई स्वराज्याबद्दल अशाप्रकारें विधान करतील हें आम्हीं पूर्वीच ताडलें होतें; पण नरम पक्षाची तशा प्रकारची समजूत होती असें दिसत नाहीं. कसेंही असो, सोनारानें कान टोंचला असतां जशी कांहीं कुरकुर राहात नाहीं तद्वत् नरमपक्षाची सध्यां स्थिति झाली आहे. दादाभाई नवरोजी आपल्या भाषणांत 'सेल्फ गव्हर्मेंट' किंवा 'होमरूल' या इंग्रजी शब्दाचाच उपयोग करून राहिले आहेत असें नाहीं, तर सकल महाराष्ट्रीयांस परिचित झालेल्या स्वराज्य शब्दाचा त्यांनीं जाणुनबुजून आपल्या लेखांत व भाषणांत उपयोग केला आहे. राष्ट्रीय सभा आणि स्वराज्य यांची अशा रीतीनें या वृद्ध महापितामहानें घालून दिलेली गांठ किंवा सांगड आतां कोणाच्यानेंहि तोडली जाणार नाहीं. बाविसाव्या राष्ट्रीय सभेंत सदर सभेच्या कार्यक्रमासंबंधानें जो मोठा फेरफार झाला तो हाच होय. राष्ट्रीय सभा आणि स्वराज्याचा हक्क यांचा 'सभा वयांत आल्यानंतर' राजकीय चळवळीचे सन्माननीय व वृद्ध महर्षि उपाध्याय दादाभाई यांच्या हातून गेल्या डिसेंबर महिन्यांत सशास्त्र विवाह लावण्यांत आला आहे; व हा विवाहसंबंध राष्ट्रीय सभेशीं पितृत्वाचें नातें जोडणाऱ्या कित्येक गृहस्थांस जरी पूर्ण पसंत नसला तरी तो तोडणें किंवा त्यांत यत्किंचित् व्यत्यय आणणें आतां अशक्य आहे. दादाभाई नवरोजी यांच्याखेरीज इतर कोणत्याहि उपाध्यायाच्या हातून ती कामगिरी बठली नसती, आणि यदाकदाचित् बठली असती तर पचली नसती. या विवाहसंबंधाबद्दल आम्हीच अशा तऱ्हेचे उद्गार काढतों असें नाहीं. राष्ट्रीय सभेचें काम संपल्यानंतर उपसंहारादाखल दादाभाई नवरोजी यांनीं जें भाषण केलें त्यांत त्यांनींहि बाविसाव्या राष्ट्रीय सभेची मोठी कामगिरी म्हणून हीच गोष्ट पुनः निक्षून सांगितली आहे. ते म्हणाले कीं, "जुन्या पिढीनें पन्नास साठ वर्षें एकसारखे परिश्रम करून स्वराज्याखेरीज हिंदुस्थानच्या लोकांचीं दुःखें नाहींशीं होणार नाहींत हा सिद्धांत तुमच्या पुढें मांडलेला आहे. हा सिद्धांत करतांना नवीन पिढीकडून जुन्या पिढीस थोडीशी जागृति मिळाली ही गोष्ट खरी आहे. पण हा उद्देश जर स्पष्टपणें डोळ्यापुढें ठेवून तुम्ही नवीन पिढीचे लोक काम कराल तर जुन्या पिढीनें पन्नास वर्षें केलेल्या कामाचें सार्थक होईल." स्वराज्य– लोकांनीं आपण होऊन चालविलेलें स्वराज्य– आपणांस प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा-दुसरा मार्ग नाहीं असें नेटानें, स्पष्टपणें व सोप्या भाषेनें गर्हिवरून दादाभाई यांनीं जेव्हां कॉंग्रेससभेच्या व्यासपीठावरून अखेरीस सांगितलें तेव्हां कोणी वृद्ध देवदूत आपल्या तरुण पिढीस शेवटचा उपदेश करण्याकरितांच अवतरला आहे कीं काय असा क्षणभर भास झाला; व आम्हास असा भरंवसा आहे कीं, ह्या त्यांच्या शेवटच्या निरोपा-

मुळें तरी सर्व प्रकारची राजकीय चळवळ करण्यांत आमचा अंतिम उद्देश व हेतु काय असावा याबद्दलचा मतभेद इतोत्तर तरुण पिढीमध्यें बिलकुल राहाणार नाहीं.

हिंदुस्थानास स्वराज्य मिळालेंच पाहिजे, एरव्ही गत्यंतर नाहीं, हें आमच्या राजकीय चळवळीचें आतां कायमचें प्रधान तत्त्व बनलें आहे; आणि आजपर्यंत एकवीस वर्षांत राष्ट्रीयसभेच्या पूर्व अध्यक्षांनीं या बाबतींत जी कांहीं घरसोडीचीं विधानें केलीं आहेत तीं आतां सर्व रद्द झालीं आहेत. खुद्द दादाभाई यांनींच असें सांगितलें कीं, बाविसाव्या राष्ट्रीय सभेत नवें म्हणून जें काय झालें तें हेंच होय. स्वराज्य प्राप्त करून घेणें हेंच तुमचें कर्तव्य आहे असा सिद्धांत मी या सभेंत तुम्हांस सांगतों आणि तत्प्रीत्यर्थ तुम्ही काम करून हा हक्क संपादन करा म्हणजे मी आजपर्यन्त जें कांहीं केलें त्याचें मला बक्षीस मिळालें, असा त्यांचा आम्हां सर्वांस अखेरचा निरोप आहे. आणि हा निरोप एकजुटीनें अंमलांत आणणें हें आपलें कर्तव्य नाहीं असें म्हणणारा पुरुष इतोत्तर निघेल, असें आम्हांस तरी खास वाटत नाहीं. तात्पर्य, स्वराज्य प्राप्त करून घेणें हेंच राष्ट्रीय सभेचें मुख्य कर्तव्य किंवा उद्देश आहे, ही गोष्ट आतां निर्विवाद व बेमालून सिद्ध झाली आहे.

बाविसाव्या राष्ट्रीय सभेंत यापेक्षां जर कांहीं जास्त निष्पन्न झालें नसतें तरीहि ही बैठक चिरसंस्मरणीय झाली असती. परंतु सुदैवानें याहीपेक्षां राष्ट्रीय सभेचें पाऊल गेल्या बैठकीमध्यें पुढें पडलेलें आहे. स्वराज्याची कल्पना नरमगरम पक्षाच्या झगड्यानें पुढें आलेली नाहीं. वृद्ध व पूज्य अध्यक्षांनी आपल्या अनुभवाचा व ज्ञानाचा तरुण पिढीस फायदा देण्याच्या सद्धेतूनें राष्ट्रीयसभेचें स्वराज्याचे हक्काशीं याप्रमाणें लग्न लावून दिलें व तें कोणास बरें वाटो वा वाईट वाटो, सर्वांनीं "शुभ मंगल सावधान" म्हणून या विवाहासंबंधाचें अभिनंदनच केलें पाहिजे. स्वराज्याचा उद्देश अशा रीतीनें डोळ्यापुढें ठेवून तत्सिध्यर्थ कोणत्या मार्गानें काम करावयाचें हा गेल्या राष्ट्रीय सभेपुढें दुसरा मोठा महत्त्वाचा प्रश्न होता.

दादाभाई नवरोजी यांचा आजपर्यंतचा मार्ग म्हटला म्हणजे विलायतच्या लोकांपुढें आपलीं गाऱ्हाणीं मांडून त्यांचीं मनें वळवावीं व तद्द्वारा राजकीय हक्कांची प्राप्ति करून घ्यावी हा होय. परंतु दादाभाई यांनीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या आपल्या भाषणांत असें स्पष्ट कबूल केलें आहे कीं, "या उद्योगांत आपली तीव्र निराशा झाली आहे, इतकी तीव्र कीं, आपल्या जागीं जर दुसरा कोणी पुरुष असता तर तो बंड करण्यास खचित प्रवृत्त झाला असता." दादाभाई यांचे हे निराशेचे उद्गार ऐकून सहज-विश्वासनिष्ठ तरुणांखेरीज इतर लोकांचीं अंतःकरणें या मार्गाच्या निरुपयोगीपणाबद्दल संशयित राहतील असें आम्हांस वाटत नाहीं.

स्वत: दादाभाई नवरोजी यांस लिबरल पक्षाची अद्याप आशा आहे, ही गोष्ट खरी आहे; पण त्यांच्या आशेपेक्षां त्यांच्या अनुभवाकडे तरुण पिढीनें अधिक लक्ष दिलें पाहिजे. आपल्या वयाच्या ८२ व्या वर्षी साठ वर्षें अबाधित चालत आलेला क्रम 'प्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति' या न्यायानें कोणीही सत्पुरुष सोडन देणार नाहीं. दादाभाई नवरोजी ह्यांच्या मनाच्या सद्य:स्थितीची अशा रीतीनें उपपत्ति लागणे शक्य आहे. प्रश्न काय तो एवढाच कीं, या निराशेपासून तरुण पिढीनें काय बोध घ्यावयाचा ? नरमगरम पक्षांत तरी जो मतभेद आहे तो याच बाबतींत होय. स्वदेशी चळवळ, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण यांच्यासारख्या स्वावलंबनाच्या मार्गानें इष्टकार्यसिध्यर्थ इतउत्तर प्रयत्न करावयाचा किंवा भिक्षांदेहीचाच धडा पुन: पुन: गिरवावयाचा, हा बाविसाव्या राष्ट्रीय सभेपुढें दुसरा महत्त्वाचा प्रश्न होता, व याचाहि निर्णय समाधानकारक रीतीनें लागला ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. 'भिक्षांदेही'चा मार्ग राष्ट्रीयसभेनें सर्वस्वी सोडला नाहीं हें खरें आहे; पण त्याबरोबरच एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, स्वदेशी चळवळ, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या तीनहि स्वावलंबनाच्या मार्गाचा बाविसाव्या राष्ट्रीय सभेनें आतां पूर्णपणें अंगिकार केला आहे. बहिष्कारयोगासंबंधानें असा ठराव झाला आहे कीं, "ज्या अर्थी हिंदुस्थानच्या हल्लींच्या राजकीय कारभारांत लोकांचें म्हणणें ऐकलें जात नाहीं व लोकांनीं केलेल्या अर्जांचा योग्य विचार होत नाहीं त्याअर्थी बंगाल्यामध्यें प्रथमत: बंगभंगानिमित्त सुरू झालेला बहिष्कारयोग कायदेशीर होता व आहे असें कॉंग्रेसचें मत आहे" हा ठराव केवळ बंगाल्यापुरता किंवा बहिष्कारयोगाचा सामान्यरीत्या कायदेशीरपणा प्रतिपादन करणारा आहे याबद्दल सदर ठराव मंजूर होतांना सभेंत थोडीशी चर्चा झाली; आणि बाबू बिपिन-चंद्रपाल यांनीं त्याचा सामान्य सिद्धांत म्हणून जो अर्थ केला तो बरोबर नाहीं, असें प्रतिपादन करण्याकरितां नामदार मदनमोहन व गोखले पुढें आले होते. परंतु त्यांचा सभेवर कांहीं परिणाम झाला नाहीं. उलट सभेचाच थोडाबहुत पगडा त्यांच्यावर बसला असें म्हणावयास हरकत नाहीं. बहिष्काराचा ठराव जर सामान्य नव्हता तर त्याचें सामान्य स्वरूप काढून टाकण्यासारखे शब्द तो ठराव पास होण्यापूर्वी त्यांत घातले नसते काय ? "कायदेशीर" या शब्दापूर्वी "बंगाल्यापुरता" असे शब्द घालण्यास तेव्हां सवड होती. पण तसे शब्द न घालतां जर हा ठराव सर्वानुमतें मंजूर झालेला आहे, तर त्याचा अर्थ अमुकच पक्षाच्या मताप्रमाणें आहे असें सांगण्याचा खुद्द कॉंग्रेसच्या सेक्रेटरीस किंवा अध्यक्षासहि आतां हक्क राहिलेला नाहीं. हा ठराव ज्यांनीं लिहिला, वाचला, सभेपुढें आणला, मांडला, अनुमोदिला व मंजूर केला त्या सर्वांस इंग्रजी भाषा

सारखीच अवगत होती; व तडजोडीकरितां म्हणून ज्या गोष्टी उभयपक्षास ग्राह्य झाल्या त्याची मागाहून अशा रीतीनें चर्चा होणें इष्ट नाहीं. बहिष्कार-योगाचा इतर प्रांतांतील लोकांनीं स्वीकार केलाच पाहिजे असें कॉंग्रेसचें म्हणणें नाहीं एवढी गोष्ट खरी आहे; पण ज्या प्रकारच्या परिस्थितींत बहिष्कार-योग कायदेशीर असें कॉंग्रेसनें आपलें मत दिलें ती परिस्थिति ( म्हणजे लोकांचें म्हणणें सरकारनें न ऐकणें व त्यांच्या अर्जांचा विचार न होणें ) बंगाल्यासच नव्हे तर सर्व हिंदुस्थानास एकसारखी लागू आहे. अर्थात् बहिष्कार–योग कोणत्याहि प्रांतांत स्वीकारला गेला तरी कॉंग्रेसच्या मताप्रमाणें तो कायदेशीरच होय, येवढें बाविसाव्या राष्ट्रीय सभेंत सर्वानुमतें ठरलें आहे. अर्थात् या बाबतींत पूर्वीपेक्षां राष्ट्रीय सभेचें एक पाऊल पुढें आहे असेंच म्हटलें पाहिजे; व प्रगतीचा हाच ओघ कायम राहिल्यास बहिष्कारयोग नुसता कायदेशीरच आहे इतकेंच नव्हे तर तो सर्वांनीं अंगिकारावा असाहि ठराव लवकरच मंजूर होईल. दुसरा ठराव स्वदेशी-संबंधाचा होय. थोडीशी गैरसोय सोसून किंवा जास्त किंमत देऊन ( at some sacrifice ) स्वदेशी मालास उत्तेजन द्यावें कीं नाहीं, याबद्दल गेल्या सभेंत पुष्कळच वाद झाला. नामदार मेथा यांचें स्वदेशीबद्दलचें मत प्रसिद्ध झालेलेंच आहे. त्यांचें असें म्हणणें पडलें कीं, तोटा करून किंवा झीज सोसून स्वदेशी माल घेणें म्हणजे बहिष्कारच होय; स्वदेशीचा खरा अर्थ तसा नाहीं व मुसलमान लोकांस दुसरा अर्थ पसंत व्हावयाचा नाहीं. सारांश, याबाबतींत लॉर्ड मिंटो व मेथा यांची एकवाक्यता आहे. परंतु हें मत कॉंग्रेस–सभेस पसंत पडलें नाहीं, आणि बराच झगडा होऊन अखेरीस तोटा किंवा झीज सोसून ( at some sacrifice ) स्वदेशी मालास उत्तेजन द्यावें, असाच ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावाबद्दल सुदैवानें कोणाचाच मतभेद झाला नाहीं. यासंबंधानें पुढें आम्हांस लिहावयाचेंच आहे, तेव्हां जास्त खुलासा करूं, सध्यां एवढेंच सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं, राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता, महत्त्व व उपयुक्तता बाविसाव्या राष्ट्रीय सभेस पूर्णपणें मान्य झालेली आहे.

या सर्व गोष्टींचा विचार केला असतां राष्ट्रीयसभेला १९०६ सालीं नवें वळण लागलें असें कोणाच्याहि लक्षांत येईल. खुद्द दादाभाई नवरोजी यांनीं आपल्या शेवटच्या भाषणांत ही गोष्ट सांगितली इतकेंच नव्हे तर मि. दत्त यांनीं दादाभाई यांस कलकत्त्यास एके ठिकाणीं मेजवानी झाली तेव्हां स्वावलंबनाचा पहिला धडा बाविसाव्या बैठकींत राष्ट्रीय सभेस मिळाला असें उघड कबूल केलें आहे. कोणचेंहि कार्य सिद्धीस जाण्यास साध्य आणि साधन

या दोन्हींबद्दल कार्यकारी पुरुषाचे विचार निश्चित व स्थिर असावे लागतात. राष्ट्रीय सभेच्या पुरस्कर्त्यांची या दोन गोष्टींबद्दलची बुद्धि आजपर्यंत व्हावी तितकी स्थिर झालेली नव्हती. बाविसाव्या राष्ट्रीय सभेंत याबद्दल योग्य निकाल लागून आमच्यामधील वयोवृद्ध व तपोवृद्ध निस्सीम देशभक्ताच्या हातून तिला नवीन वळण मिळालें आहे. स्वराज्य आम्हांस साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कारयोग आणि राष्ट्रीय शिक्षण हीं स्वावलंबनाचीं सदर हेतु सिद्धीस नेण्यास तीन मोठीं साधनें आहेत, असा कायमचा सिद्धांत राष्ट्रीयसभेच्या बाविसाव्या बैठकींत झालेला आहे. या साधनांचा योग्य उपयोग करून नव्या पिढीनें दादाभाई नवरोजी यांनीं सांगितल्याप्रमाणें कार्यसिद्धि करून घेतली पाहिजे. नव्या जुन्या पक्षाचा तंटा आतां फारसा उरला नाहीं व उरण्याचें कारणहि नाहीं. दोघांनीं वर निर्दिष्ट केलेल्या साधनांचा उपयोग करून स्वराज्याचा हक्क मिळविण्यास झटलें पाहिजे, व अशा रीतीनें उद्योग केल्यास परमेश्वराच्या कृपेनें लवकरच इष्टसिद्धी झाल्याखेरीज राहाणार नाहीं अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे.

---

# ६. राजकीय पक्षोपन्यास

[ ११ फेब्रुवारी १९०८ ]

सुरतेच्या राष्ट्रीय सभेंत मवाळजहालांचा जो खटका उडाला त्याची हकीकत आतांपर्यंत प्रसिद्ध झाली आहे. कित्येकांच्या मतें या दुहीचा दोष सर्वस्वी जहालांकडे आहे; आणि कित्येकांच्या मतें खटका उडण्याचें सर्व अपयश मवाळांच्या दुराग्रहासच दिलें पाहिजे. समरांगणावर दोन घोडेस्वार एकमेकांवर चालून आले असतां त्यांच्या घोड्यांच्या टापांबरोबर धुरळाहि ज्याप्रमाणें सहज उधळला जातो, तद्वतच या वादविवादांत खोट्या गोष्टींची पुष्कळ धूळ उधळली असून तिनें कांहीं काळपर्यंत कित्येकांची नजर बंद झाली होती. हा धुरळा आतां खालीं बसूं लागला असून वादाचा मुख्य मुद्दा काय इकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें आहे. आणि त्यावरोबरच राजकीय कामांत सर्व पक्षांचें ऐक्य होणें शक्य आहे कीं नाहीं ? असा ते प्रश्न करूं लागले आहेत. त्यांतून सुरतेच्या वखेड्यासंबंधानें अँग्लो-इंडियन पत्रकारांनीं जी टीका केली आहे तीहि ऐक्याचे विचार मनांत येण्यास बरीच कारणीभूत झालेली आहे. मवाळांनीं जहालांशीं किंवा जहालांनीं मवाळांशीं तंटा करून फाटून निघण्यांत कोणत्या तरी पक्षाचा कांहीं तरी फायदा पाहिजे. कारणांवांचून मतिमंद मनुष्य देखील कोणत्याहि कार्यास प्रवृत्त होत नाहीं, असा न्याय आहे; आणि या न्यायानें पाहिलें तर जहालांशीं फाटुन निघण्यांत मवाळांच्या मनांत कांहीं तरी कार्यसिद्धीची अपेक्षा असली पाहिजे. उगाच मवाळ किंवा जहाल म्हणून घेण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं. पायोनियर पत्रानें तर असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, जहाल आणि मवाळ यांच्यामधील भेद आपणांस कळत नाहीं. दोघांनाहि स्वराज्य पाहिजे मग भेद काय ? एक विनंति-अर्जानें मागणार, किंवा पर्यायानें सांगावयाचें असल्यास आपले हेतु उघड न करतां कावेवाजपणानें मागणार; आणि दुसरा मनांत असेल तें स्पष्ट बोलून दाखवून हक्कानें आणि निर्भीडपणानें मागणार, एवढेंच कीं नाहीं ? अर्थात् मवाळ हे प्रच्छन्न-जहाल झाले आणि जहाल हे स्पष्टवक्ते मवाळ होत, असें उघड सिद्ध होतें. अशा स्थितींत मवाळांचें म्हणणें काय आणि जहालांचें म्हणणें काय, सरकारच्या दृष्टीनें दोन्ही सारखेच असा पायोनियरचा अभिप्राय आहे. विलायतेंतील कांहीं इंग्रजी वर्तमानपत्रकर्त्यांनींहि असेंच आपलें मत दिलें असून लंडन टाइम्सनें तर स्वराज्याचा चांदोवा न मागण्याबद्दल मवाळांस शिफारस

केली आहे. ज्यांचें चांगलें मत होण्याकरितां एवढा खटाटोप करावयाचा त्यांच्याकडूनच अशा रीतीचीं आशीर्वचनें किंवा इशारती मिळाल्यावर स्वजातीयांशीं तरी विरोध करण्यांत काय हांशील ? असे विचार मनांत येणें अगदीं साहजिक आहे. आम्ही आपआपसांत 'मी मवाळ, तूं जहाल' किंवा 'मी जहाल, तूं मवाळ' अशीं किती जरी भांडणें केलीं तरी या जहालमवाळांचीं अंतर्गत मनें जाणणारें सर्व साक्षीभूत सरकार आमच्या दोघांच्याहि वारशाला जेवलेलें असून गोरा अधिकारी वर्ग "तुला फें आणि तुझ्या बापालाहि फें" असें आम्हा दोघांसहि सांगण्यास तयार आहे ! सारांश, वाघ म्हटलें तरी खातो, आणि वाघोबा म्हटलें तरी खातो, अशा प्रकारची गोऱ्या अधिकारी वर्गाची हल्लींची स्थिति आहे. आपल्या हातांतील सत्ता काडीमात्र देखील कमी होऊं नये अशा हेतूनें व धैर्यानें हा अधिकारी वर्ग आपला अंमल गाजवीत आहे, व तो जाणतो आहे कीं, हिंदी पुढाऱ्यांच्या मनांत—मग ते पुढारी रडून मागोत का संतापानें मागोत— ही राजसत्ता आपल्या हातांत यावी अशी बळकट इच्छा आहे. सहा हजार कोसांवरून इकडे येऊन जे गोरे अधिकारी राज्य करीत आहेत ते कांहीं दुधखुळे म्हणून नव्हेत, आणि परोपकारी म्हणूनहि नव्हेत. शहाणपणाच्या स्वार्थानें त्यांचीं अंतःकरणें भरलेलीं आहेत; अर्थात् त्यांच्या स्वार्थाच्या आड जर कांही अडचण यावयाची असली तर ती शहाणपणाची होय; आणि शहाणपणाच्या म्हणजे तारतम्याच्या दृष्टीनें स्वार्थाच्या थोडया तरी भागाचा त्याग करणें जेव्हां त्यांस भाग पडेल तेव्हां आपल्या हातांतील थोडी तरी सत्ता कमी करण्यास ते तयार होतील. राजनीतींत परोपकारबुद्धीपेक्षां स्वार्थाचेंच अधिक प्राबल्य असतें, हें तत्त्व आतां सर्वमान्य झालेलें आहे, आणि आमचे राज्यकर्ते या नियमास अपवाद नाहींत; एवढें घ्यानांत ठेविलें म्हणजे अँग्लो–इंडियन पत्रकारांनीं सुरतेच्या बखेडयासंबंधानें जे अभिप्राय दिले आहेत त्यांची चांगली उपपत्ती लागते.

सरकार किंवा अधिकारी वर्ग याच्या दृष्टीनें हा विचार झाला. आतां प्रजेच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजकीय पक्षांची काय स्थिति आहे, व त्यांच्यांत कोणता मतभेद आहे याचा थोडासा विचार करूं. स्वातंत्र्याची इच्छा मनांत धरणें हा मनुष्यस्वभावाचाच एक धर्म आहे. "बायका उपजतच धूर्त असतात, मग त्या सुशिक्षित असोत वा अशिक्षित असोत, मानवकोटींतील असोत वा पशुकोटींतील असोत," असें कालिदासानें एके ठिकाणीं म्हटलेलें आहे. या ऐवजीं "सजीव प्राणी स्वभावतःच स्वातंत्र्यप्रिय असतो, मग इ०" असें जर या कवीनें म्हटलें असतें तर तें अधिक सयुक्तिक झालें असतें. आपले व्यवहार आपल्या संमतीखेरीज नेहमीं परक्यांनीं चालवावे ही स्थिति कोणासहि इष्ट

वाटणार नाहीं; त्यांतून पाश्चिमात्य शिक्षणानें ज्यांचीं मनें संस्कृत झालीं आहेत त्यांस तर ही गोष्ट असह्य होईल, यांत शंका नाहीं. किंबहुना इंग्रजी शिकण्याचा हिंदी लोकांच्या मनावर अशा प्रकारचा परिणाम होईल, झाला पाहिजे व होत आहे, ही गोष्ट ज्यांनीं पाश्चिमात्य शिक्षण आम्हांस दिलें ते आमचे राज्यकर्ते ओळखून आहेत. अशा प्रकारच्या स्वातंत्र्याच्या वृद्धीची वाढ सुशिक्षित हिंदी लोकांमध्यें झाली असतां गोऱ्या अधिकारी वर्गाच्या हातांतील सत्ता केव्हां ना केव्हां तरी कमी होणार, हेंहि त्यांस माहित नाहीं असें नाहीं. पण कोणी झालें तरी आजचें मरण उद्यांवर ढकलीत असतो, आणि अशा दृष्टीनें विचार केला तर गोऱ्या अधिकारी वर्गानें हल्लीं जी दंडुकेशाही चालविली आहे, ती म्हणजे अगदीं मनुष्य-स्वभावास सोडून आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. अशा स्थितींत आम्ही काय करावयाचें हा आमचा प्रश्न आहे; राज्यकर्त्यांचा नव्हे. राज्यकर्त्यांनीं जरी पाश्चिमात्य शिक्षण आम्हांस दिलें आहे तरी त्या शिक्षणानें उन्मत्त न होतां सदय अंतःकरणानें आमचे राज्यकर्ते आम्हांस जें कांहीं देतील– आणि तें देणें नेहमींच अल्प आणि मर्यादित असणार– तेवढ्यानेंच आम्ही संतुष्ट होऊन त्यांचे सदैव आभारी व्हावें असें त्यांस वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. किंबहुना आमच्यापैकींहि असे कांहीं लोक आहेत कीं, ज्यांस राज्यकर्त्यांची ही इच्छा श्रेयस्कर वाटते आणि या इच्छेपलीकडे हिंदी लोकांनीं जाऊं नये असें ते प्रतिपादन करीत असतात. राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें प्रजेपैकीं खराखरा राजनिष्ठ वर्ग म्हटला म्हणजे एवढाच होय. पायोनियर यांसच खरे मवाळ समजतो; आणि कोणत्याहि देशावर स्वराज्याव्यतिरिक्त कोणताहि अंमल जेव्हां सुव्यवस्थित असतो तेव्हां तेथें अशा प्रकारचा एखादा वर्ग नेहमीं अस्तित्वांत असावयाचा. रावसाहेब– राव-बहादुरादि पदव्या, मोठमोठ्या पगाराच्या कांहीं थोड्या जागा, राजदरबारी संभावना, वगैरे लालुच किंवा युक्त्या अशाच प्रकारच्या वर्गांतील लोकांची संख्या वाढविण्याकरितां किंवा त्यांची वृद्धी स्थिर करण्याकरितां राज्यकर्ते उपयोगांत आणीत असतात. हा वर्ग राष्ट्रीय सभेसारख्या राजकीय चळवळींत पडूं इच्छित नाहीं, व यदाकदाचित् पडलाच तर आपणांस जडलेलें संसर्गजन्य पातक लवकरच प्रभुचरणीं अर्पण करून तो आपल्या मनाची खवखव काढून टाकतो. मनुष्य जात्याच स्वातंत्र्यप्रिय असतां अशा प्रकारची कांहीं मंडळी कोणत्याहि देशांत केव्हां तरी कां उत्पन्न व्हावी, हा एक मोठा प्रश्नच आहे; पण त्याचें उत्तर देण्याची ही वेळ नव्हे. अशा मताचे लोक या देशांतहि कांहीं आहेत एवढें सध्यां लक्षांत ठेवलें म्हणजे पुरे आहे. राजकीय बाबतींत या पुढला वर्ग म्हटला म्हणजे राज्यकर्त्यांच्या उणीवा त्यांच्या नजरेस आणून त्यांच्याकडूनच

त्या ( राज्यपद्धतींत बदल न करतां ) काढून टाकण्यासाठीं जितक्या निस्पृहतेनें बोलणें जरूर आहे तितक्या निस्पृहतेनें बोलणारांचा होय. या वर्गास स्वराज्य पाहिजेच असतें असें नाहीं; आणि स्पष्टोक्तीखेरीज दुसऱ्या कोणत्याहि प्रकारें राज्यकर्त्यांचीं मनें दुखविण्यास किंवा त्यांनीं ताळ्यावर यावें म्हणून प्रयत्न करण्यास हा वर्ग तयार नसतो. पहिल्या वर्गास इंग्रजी राज्याचे पुरस्कर्ते असें म्हटलें तर दुसऱ्यास इंग्रजी राज्याचे टीकाकार म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पहिल्या वर्गाची दृष्टी हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या गुणांनींच अधिक दिपलेली असते, आणि दुसऱ्या वर्गाची दृष्टी दोषांकडे गेली तर तिची मजल सदर दोषांकडे कडक टीका करण्यापलीकडे जात नाहीं; किंबहुना या पलीकडे जाणें म्हणजे एकप्रकारचा राजद्रोहच आहे असेंहि या वर्गांतील लोकांस वाटत असतें. पहिल्या वर्गास गुणबोधक म्हटलें तर दुसऱ्यास दोषदर्शक अशी अन्वर्थ संज्ञा देतां येईल. पहिल्या वर्गांतील लोकांस दुसऱ्या वर्गांतील लोक मोठे धीट वाटत असतात, आणि त्याच न्यायानें दुसऱ्या वर्गांतील लोकांस पहिल्या वर्गांतील लोक देशाभिमानशून्य वाटतात. परंतु रावणाच्या मुखाची मर्यादा दहावरच न राहतां शतमुखी रावण, सहस्रमुखी रावण, अशी ज्याप्रमाणें परंपरा आहे तद्वतच देशाभिमानाची मर्यादा या दुसऱ्या वर्गाच्या बरोबरच खुंटून राहात नाहीं. हल्लींच्या राज्यपद्धतींत दोष कोणते याचें निस्पृहपणें विवेचन करून ते दोष समूळ नाहींसे होण्यास स्वराज्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं, असें प्रतिपादन करणारा तिसरा एक वर्ग आहे. तथापि स्वराज्य प्राप्त होण्यास राज्यकर्त्यांची प्रसन्नता हा एक मार्ग आहे, आणि हें स्वराज्य हाच काय तो आपला परम पुरुषार्थ असें यांचें मत आहे. अशा प्रकारची स्वराज्याची मागणी राज्यकर्त्यांच्या स्वार्थाविरुद्ध आहे ही गोष्ट या वर्गांतील लोकांच्या लक्षांत येत नाहीं असें नाहीं; पण निरुपायानें म्हणा अगर निर्बलतेनें म्हणा हा आपला अंतिम हेतु राज्यकर्त्यांच्या प्रसन्न बुद्धीखेरीज आपणास प्राप्त होणें शक्य नाहीं; राज्यकर्ते न्यायप्रिय आहेत, करितां केव्हांना केव्हां तरी त्यांच्या परोपकारबुद्धीचा विकास होऊन ते स्वतः होऊनच आम्हां हिंदी लोकांच्या पदरांत स्वराज्याचें माप टाकून मोकळे होतील, आपण उगीच धडपड करण्यांत कांहीं हांशील नाहीं, आणि केलीच तर ती विवक्षित मर्यादेच्या पलीकडे जाऊं देऊं नये, निदानपक्षी असें बोलू तरी नये, असें या वर्गांतील गृहस्थांचें मत आहे. पहिला वर्ग गुणबोधकांचा, दुसरा दोषदर्शकांचा तर हा तिसरा स्वराज्यवाद्यांचा असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वराज्यवादक हें यांस विशेषण देतांना "वादक" म्हणजे बोलणारा असा अर्थ विवक्षित आहे; हा संदिग्ध वाटल्यास 'स्वराज्य प्रार्थक' असेंहि यांस विशेषण

देतां येईल; कारण प्रार्थना हें या वर्गास अभिप्रेत असलेल्या साधनांपैकीं मुख्य साधन आहे. इंग्रजी राज्य हें परमेश्वराच्या कृपेनें आपल्या देशाच्या उन्नतीकरितां आमच्या देशांत स्थापन झालें आहे, त्याशीं विरोध करणें म्हणजे परमेश्वराशींच विरोध करणें होय, असेंहि या वर्गापैकीं कित्येक लोक म्हणत असतात ! याच्या पलीकडची पायरी म्हटली म्हणजे स्वराज्य हें स्वातंत्र्याचें पहिलें रूप आहे असें समजून तें मिळविणें असल्यास आपल्या उद्योगानें आणि मेहेनतीनें राज्यकर्त्यांस अडवूनच मिळविलें पाहिजे असें म्हणणारांची होय. वरील विवेचनांत स्वराज्य याचा अर्थ कलकत्ता हायकोर्टानें केल्याप्रमाणें इंग्रजी साम्राज्यांमधील स्वराज्य असा धरलेला आहे. हें स्वराज्य पूर्ण स्वातंत्र्यापेक्षां कमी दर्जाचें आहे हें सांगावयास नकोच. अशा प्रकारच्या स्वराज्याचे हक्क हाच कांहीं आपला अंतिमांतला अंतिम हेतु नाहीं. तथापि हे हक्क प्राप्त झाल्यानें राजकीय प्रगतीची मजल अंतिमांतल्या अंतिम हेतूच्या पुष्कळच जवळ जाईल; आणि पुढचा विचार करण्याची सध्यां जरूर नाहीं; किंवा केला असतां तो निव्वळ तात्त्विकदृष्ट्या करावयाचा आहे, व्यावहारिकदृष्ट्या नाहीं, असें यांचें म्हणणें आहे. मनुष्यमात्राच्या मनांत असणारी जी स्वातंत्र्यप्रियतेची बुद्धि ती हा पक्ष छपवून ठेऊं इच्छित नाहीं, किंबहुना स्वतंत्रतेच्या उदात्त तत्त्वांपासून जी प्रेरणा मनामध्यें उत्पन्न होते त्या प्रेरणांचा पूर्ण फायदा घेऊन तिच्या प्रोत्साहनानें हिंदुस्थानांतील लोकांनीं आपला राजकीय प्रगतीचा मार्ग आक्रमण्यास लागावें असें या पक्षाचें लोकांस सांगणें आहे. या चौथ्या वर्गास स्वातंत्र्यवादी पक्ष असें म्हणतां येईल. 'स्वातंत्र्यवादी' यांतील 'वादी' या उत्तरपदाचा अर्थ 'स्वराज्य वादी' यांतील उत्तर पदाच्या अर्थाप्रमाणेंच करावयाचा आहे. याहि पलीकडचा वर्ग म्हटला म्हणजे लवकरच आपल्या देशास खरें स्वातंत्र्य प्राप्त व्हावें, असें म्हणणारांचा होय. या लोकांचीं संख्या सध्यांच्या स्थितींत फारशी सांपडणें कठीण आहे; तथापि विवेचनाच्या परिपूर्तीसाठीं त्याची आम्ही शेवटीं परिगणना केली आहे. तथापि त्याला कोणतेंहि विशेष उपपद देण्याचें कांहीं कारण नाहीं. राष्ट्रांतील स्वातंत्र्यासंबंधीं विचारांची परंपरा कशी लावतां येईल एवढें दाखविण्याकरितांच सध्यां त्याचा उपयोग केलेला आहे. या पांच वर्गांपैकीं पहिला वर्ग सोडला म्हणजे गोऱ्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीनें बाकी सर्व कमीअधिक प्रमाणानें राजद्रोहीच होत. परंतु पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रारंभ या देशांत स्वत: राज्यकर्त्यांनींच केला असल्यामुळें सदर शिक्षणानें प्रज्वलित झालेली स्वराज्याची किंवा स्वातंत्र्याची इच्छा राजद्रोही आहे असें गोऱ्यांपैकीं कांहींकांची तरी जिव्हा वदूं धजत नाहीं. राजकीय कामांत पडणाऱ्या हिंदी प्रजेचे ज्याप्रमाणें वर्ग आहेत तसेच गोऱ्या

अधिकारी वर्गांचेहि निरनिराळे भेद आहेत. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यासंबंधानें कुरकुर न करतां जें आहे तें सर्व चांगलेंच आहे असें समजून हिंदुस्थानांतील लोकांनीं नेहमीं संतुष्ट राहावें असें म्हणणारांचा पहिला मोठा वर्ग होय. कोणी साम्राज्य संपादन करतो तें कांहीं परकी लोकांच्या सुखाकरतां नाहीं, आपल्या वडेजावीकरितां आणि फायद्याकरितां करतो; आणि साम्राज्य ही वस्तु जरी लयास जाणारी असली तरी साम्राज्य राखण्याकडेच आपल्या सर्व बुद्धीचा आपण उपयोग केला पाहिजे, असें यांच्या मनानें घेतलेलें असतें. याच्या पुढला वर्ग म्हटला म्हणजे वर सांगितलेल्या प्रजाजनांपैकीं दोषदर्शक वर्गाच्या जोडीस बसणारा दोषनिरासक वर्ग होय; साम्राज्य चोपून चालविलेंच पाहिजे, पण तसें करतांना साम्राज्याचें जूं प्रजेच्या मानेस–खांद्यास न लागेल असा बंदोबस्त ठेवणें जरूर आहे, असें या पक्षाचें मत आहे. राज्यकर्त्यांपैकीं तिसरा पक्ष स्वराज्यप्रतिपादकांचा होय. इंग्रजी साम्राज्याचे निरनिराळे अवयव जोमदार असून स्वराज्याचे हक्क उपभोगणारे असावे, एरवीं साम्राज्य टिकणार नाहीं असें या पक्षाचें म्हणणें आहे. परंतु यांची संख्या फारच थोडी आहे, आणि यांचें म्हणणें दुसरीं कांहीं तरी कारणें घडून आल्याखेरीज राजकर्त्यांच्या राष्ट्रांस पसंत पडणें सहसा शक्य नाहीं. राज्यकर्त्या लोकांपैकीं या पलीकडचा म्हणजे शेवटचा वर्ग म्हटला म्हणजे केवळ राजकीय तत्त्वज्ञाचा होय. सर्व राष्ट्रें स्वतंत्र असणें यातच मानवजातीचें सुख आहे; आणि एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर अंमल करणें कधींहि इष्ट नाहीं; केलाच तर तो जिंकलेल्या राष्ट्राच्या हिताकरितां त्याला दास्यांतून मोकळें करून स्वातंत्र्याची प्राप्ती करून देण्याकरितां केला पाहिजे, असें या पक्षांतील प्रमुख तत्त्वज्ञांचें मत आहे. सारांश, राजकीय प्रगती करूं इच्छिणाऱ्या आम्हा हिंदी प्रजेप्रमाणेंच आम्हांवर राज्य करणाऱ्या गोऱ्या लोकांतहि हिंदुस्थानाचें पुढें काय होणार किंवा व्हावें, याबद्दल पक्षभेद आणि मतभेद आहे; आणि दोन्ही बाजूच्या पक्षभेदांचा त्या त्या बाजूंतील लोकांवर नव्हे तर दुसऱ्या बाजूंतील लोकांवरहि कांहीं प्रकारचा विशिष्ट परिणाम घडत असतो. हा परिणाम, व्यावहारिक स्थिति, कायदा, आणि मनुष्याच्या मनांत सहज उद्भवणारी स्वातंत्र्याची इच्छा या सर्व गोष्टींनीं निरनिराळ्या पक्षांतील लोकांच्या मनांत निरनिराळ्या प्रकारचे अभिनिवेश उत्पन्न होत असतात. तथापि देशाचें हित किंवा अभ्युदय करण्याची बुद्धि जर सर्व पक्षांत कायम असेल तर हा अभिनिवेश ऐक्याचे आड येण्याचें कांहीं कारण नाहीं. किंबहुना राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यामधील द्विधाभावहि अशा दृष्टीनें नाहींसा होणें शक्य आहे. कारण कोणीहि राजा झाला तरी प्रजेचें हित आणि कल्याण जेणेंकरून होईल अशी व्यवस्था करणें हें त्याचें कर्तव्य

होय. प्रजासत्ताक राज्याची कल्पना अलीकडे निघाली. प्राचीन ग्रंथकारांची धांव राजसत्ताक राज्यापलीकडे गेली नव्हती तथापि राजधर्म सांगतांना प्रजेचें पुत्राप्रमाणें पालन करणें हेंच राजाचें मुख्य कर्तव्य, असें त्यांनीं सांगितलें आहे. परंतु हल्लींच्या कलियुगांत मनूनें सांगितलेली ही पद्धत अंमलांत येणें शक्य नसल्यामुळें राजधर्म प्रकरणाचा निराळ्या दृष्टीनें विचार करावा लागतो; आणि तशा दृष्टीनेंच या विषयाचा आम्ही विचार करणार आहों. निरनिराळ्या राजकीय पक्षांचा वर उपन्यास केला आहे; आतां याचें समीकरण कसें करावयाचें हें पुढें सांगूं.

## ७. समेट कसा होईल ?

[ १८ फेब्रुवारी १९०८ ]

राज्यकर्ते आणि प्रजा या दोघांमध्यें राजकीय बाबतींत कोणकोणते भिन्न भिन्न पक्ष आहेत, याचें गेल्या अंकीं विवेचन केलें आहे. आतां या पक्षांचा मेळ कसा घालावयाचा, विशेषत: करून प्रजेच्या पुढाऱ्यांमध्यें हिंदुस्थानाच्या राजकीय प्रगती-संबंधानें जी भिन्न भिन्न मतें आहेत त्यांचें एकीकरण कसें करावयाचें, याचा विचार करूं. राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां एकोप्यानें प्रयत्न करण्याची जरूरी आहे, हें तत्त्व पहिल्यानें लक्षांत ठेविलें पाहिजे. किंबहुना एकोप्यानें प्रयत्न करण्याची बुद्धी ज्यांच्या मनामध्यें दृढ झालेली नाहीं, किंवा पर्यायानें बोलावयाचें असल्यास मातृभूमीबद्दलच्या प्रेमाचा पगडा ज्यांच्या मनावर पूर्णपणें बसलेला नाहीं, त्यांनीं मतभेद क्षणभर विसरून जाऊन देशाकरितां एकोप्यानें काम करणें अशक्य आहे, असें म्हटलें तरी चालेल. हाताचीं पांचहि बोटें सारखीं लांब नसतांहि त्यांच्यावर मनुष्याच्या इच्छेचा ताबा बसून एखादी वस्तु ग्रहण करण्याच्या कामीं त्या सर्वांच्या संघशक्तीचा मनुष्यास ज्याप्रमाणें उपयोग करून घेतां येतो, तद्वत् मातृभूमीच्या प्रेमानें बद्ध झालेल्या निरनिराळ्या विचारांच्या लोकांच्या पुरस्कर्त्यांचाहि राष्ट्राच्या फायद्याकरितां एकजुटीनें उपयोग होत असतो, अशी जिवंत राष्ट्राचा इतिहास आपणांस साक्ष देत आहे. जितक्या व्यक्ती तितक्या प्रकृती; किंवा 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायानें निरनिराळ्या विचारी पुरुषांचे किंवा पुढाऱ्यांचे स्वभाववैचित्र्यानें किंवा अन्य कारणानें अंतिम हेतु किंवा विचार भिन्न भिन्न असणें अगदीं साहजिक आहे; किंबहुना असें म्हटलें तरीहि चालेल कीं, अंतिम हेतूमधील किंवा विचारांतील हा भेद विचारस्वातंत्र्याचींच फलें आहेत. परंतु अंतिम हेतु किंवा विचार यांच्यामधील वैलक्षण्य एखादें विवक्षित कार्य करणाच्या कामीं जें ऐक्य अपेक्षित आहे त्यास आड आलेंच पाहिजे, हा समज चुकीचा आहे. अनेक प्रकारच्या विचाराचे लोक एका कार्या-करितां एक कसे करावयाचे, हें राजनीतींतील एक प्रधान अंग आहे. सर्व लोकांची सर्व बाबतींत सर्व विचारांची एकवाक्यता होणें कधींहि शक्य नाहीं. असा प्रकार ज्या दिवशीं घडून येईल, त्या दिवशीं 'स वै मुक्तोऽथवा पशुः' यांपैकीं कोणत्या तरी कोटींत मनुष्यास घालावें लागेल. इंग्लंडासारख्या सुधारलेल्या राष्ट्रांतहि रॅडिकल, सोशियालिस्ट, डिमोक्रॅटिक, लिबरल वगैरे अनेक निरनिराळ्या अंतिम

हेतूसाठीं झटणारे पक्ष एकाच पार्लमेंट सभेंत राष्ट्राचें हित कसें साधितात याचें आमच्या डोळ्यांपुढें प्रत्यक्ष उदाहरण आहे. हें उदाहरण डोळ्यापुढें असतां राष्ट्रीय सभेंत अमुक पक्षाचे किंवा मतांचेच लोक असले पाहिजेत, बाकीच्यांनीं तेथें येण्याचें प्रयोजन नाहीं, असा आग्रह धरणें अनुदारपणाचें लक्षण नव्हे काय ? मतभेदांमध्यें मतैक्य, किंवा बेकीमध्यें एकी उत्पन्न करून राष्ट्रीय कार्य कसें साधावयाचें, या प्रश्नाचा पाश्चिमात्य राष्ट्रांनीं निकाल लाविलेला आहे. आमच्यामध्यें अशा प्रकारचें राजकीय शिक्षण कमी असल्यामुळें आम्हांस या गोष्टी अशक्य दिसतात; पण वास्तविक त्या तशा नाहींत. या जगांत सर्व स्त्रीपुरुष एकाच मताचे जर परमेश्वरानें निर्माण केले असते तर मग आजपर्यंत जगांत ज्या अनेक राज्यक्रांत्या व लढाया झाल्या त्या कधींच झाल्या नसत्या. मतभेद निर्मूळ करण्यापेक्षां मतभेद एककार्यवाही कसा करतां येईल, इकडे मुत्सद्यांनीं प्रथमतः लक्ष दिलें पाहिजे. धार्मिक बाबतींतहि हाच न्याय लागू आहे. शैव, वैष्णव, गाणपत्य, जैन, बौद्ध, वगैरे अनेक मतें असलीं तरी तीं सर्व एका प्रमुख धर्माचीं अंगें समजून त्यांची एकवाक्यता कशी करतां येईल याचा ज्याप्रमाणें विचार करावा लागतो. तद्वतच राजकीय बाबतींतील मतभेदांचीहि राष्ट्रांतील मुत्सद्यांस व्यवस्था लावावी लागते. मागील अंकीं सांगितलेंच आहे कीं, गुणग्राहक, दोषदर्शक, स्वराज्यवादी, स्वातंत्र्यवादी असे राजकीय बाबतींत आमच्या पुढाऱ्यांमध्यें अनेक भेद आहेत. हे सर्व गृहस्थ राष्ट्राचा अभ्युदय इच्छिणारे आहेत, हें परस्परांनीं प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे; आणि एवढी गोष्ट कबूल झाली कीं, सर्वांचा एकोपा होण्यास मग कांहीं अडचण पडणार नाहीं. स्वराज्य काय आणि स्वातंत्र्य काय, दोन्हींहि आमच्यापासून इतकीं दूर आहेत कीं, त्या दोहोंमधील अंतर सध्यां विचारांत घेण्यासारखें नाहीं. दोन तारे एकमेकांपासून लक्षावधी योजनांचे अंतरावर असतांहि पृथ्वीवरील मनुष्यास ज्याप्रमाणें ते सारख्याच आकाशांत सारख्याच अंतरावर आहेत असें वाटतें, तद्वत स्वराज्य आणि स्वातंत्र्य या दोन्हीं अंतिम हेतूसंबंधानें आकंठ परवशतेंत निमग्न झालेल्या आम्हां लोकांची स्थिति आहे. यावरून असें समजूं नये कीं, स्वराज्य आणि स्वातंत्र्य या दोन अंतिम हेतूंमध्यें कांहीं अंतर नाहीं. दुर्बिण आणि त्रिकोणमिती यांच्या साह्यानें आकाशपटलांत एकाच कक्षेंत दिसणाऱ्या दोन ताऱ्यांमधील अंतर फार मोठें आहे, असें ज्याप्रमाणें सिद्ध करतां येतें त्याप्रमाणें स्वराज्य आणि स्वातंत्र्य या दोन अंतिम हेतूंमधील अंतर फार मोठें आहे, असें तात्त्विक दृष्टीनें सहज सिद्ध करतां येईल. पण हा भेद कोणाला ? तत्त्वदृष्टच्या लोकांस किंवा या दोन ताऱ्यांमध्यें राहाणाऱ्या लोकांस ? पृथ्वीवरच्या लोकांनीं हे दोन तारे आपल्या डोक्यावर दिसणाऱ्या आकाशाच्या

पोकळींत एकाच कक्षेंत फिरत आहेत असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. मि. स्विनी यांनीं या मतभेदासंबंधानें असेंच मत दिलें आहे. ते म्हणतात कीं, "स्वराज्य आणि स्वातंत्र्य या दोन अंतिम हेतूसंबंधानें तंटा करणें म्हणजे ज्याच्याजवळ ट्राम्वेतून प्रवास करण्यास पैसे नाहींत त्यांनीं कोणची 'मोटारकार' विकत घ्यावी याबद्दल तंटा करण्यासारखें आहे." गेल्या गणेशोत्सवांत रा० टिळक यांनीं यासंबंधानें अशाच प्रकारचे उद्‌गार काढले होते. दाता पैहि देण्यास तयार नाहीं, अशावेळीं त्याजवळ लाख रुपये मागावे कीं, कोट रुपये मागावे, यासाठीं दोन भिक्षुकांनीं त्याच्या दाराबाहेर तंटा करणें जितकें गैरशिस्त आहे, तितकें स्वराज्य किंवा स्वातंत्र्य याबद्दल आग्रह धरणें सध्यां अप्रशस्त होय. हें तत्त्व इकडच्या पुढाऱ्यांस माहीत नाहीं असें नाहीं. मग सुरतेचा तंटा कां झाला; असा सहजच प्रश्न निघतो. राष्ट्राच्या अभ्युदयाची परमावधी स्वातंत्र्य– पूर्ण स्वातंत्र्य– अनियंत्रित स्वातंत्र्य होय, हें कोणता देशाभिमानी पुरुष कबूल करणार नाहीं ? पावना प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष रवींद्रनाथ टागोर यांनींहि असेंच प्रतिपादन केलें आहे. आत्म्याला सायुज्य मुक्ती आणि राष्ट्राला स्वातंत्र्य हीं दोन्ही आत्मा व राष्ट्र यांचीं अंतिम साध्यें आहेत. पण मुक्ती मिळण्यास ज्याप्रमाणें कामक्रोधादि शत्रूंचा संयम करून समबुद्धित्व संपादन करण्याचें कर्म करावें लागतें, तद्वतच राष्ट्रास आपला अंतिम हेतु साधण्याकरितां राष्ट्रीयकर्माची अपेक्षा आहे, हें विसरतां कामा नये. अंतिम हेतु अमुक असावा असा नियम करणें व्यर्थ होय. अंतिम तो अंतिम, तो उपांतिम होऊं शकत नाहीं, किंवा अंतिमाच्या खालच्या पायरीचाहि असणें शक्य नाहीं; हें तर्कशास्त्रांतील किंवा मानसशास्त्रांतील तत्त्व सर्वांनीं नेहेमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. आपण आंब्याचें झाड लावितो तें मोहोराकरितां नव्हे, आम्रफलाकरितां आहे, ही गोष्ट कोणास सांगावी लागत नाहीं. पण आंब्याचें झाड लावण्याचा उद्योग करतांना दोन गृहस्थ आपआपसांत एकजण "माझें अंतिम साध्य मोहोर आहे" आणि दुसरा "माझें अंतिम साध्य आम्रफल आहे" असा तंटा करून आंब्याची कोय जमिनींत लावण्याचें काम जर सोडून देऊं लागले तर त्यांस आपण काय म्हणूं ? स्वातंत्र्यवादी आणि स्वराज्यवादी यांच्यामधील तंटा अशाच प्रकारचा आहे. स्वराज्य ही स्वातंत्र्याची पायरी आहे व स्वातंत्र्यांत स्वराज्याचा अंतर्भाव आहे; आणि इंग्रज सरकार सध्यां आपल्याला कांहींच देऊं इच्छित नाहीं. मग स्वराज्यासंबंधीं किंवा स्वातंत्र्यासंबंधीं तंटा कशाला? 'स्वातंत्र्य' म्हटलें असतां इंग्रजी राज्यकर्ते अधिक बिचकतील किंवा बिथरतील आणि 'स्वराज्य' म्हटलें असतां कमी बिचकतील किंवा बिथरतील, असा एक कोटिक्रम करण्यांत

येत असतो, पण यांत कांहीं अर्थ नाहीं. ज्या राज्यकर्त्यांनीं स्वातंत्र्याचें वीं पाश्चिमात्य शिक्षणरूपानें या देशांत प्रथम रोविलें त्यांस बीजाचीं फलें काय येतील, किंवा त्या बीजाचा वृक्ष किती मोठा होईल, हें कळत नाहीं असें मानणें म्हणजे त्यांच्या पदरीं असंमजसपणाचा, आणि आपल्या ठायीं विशेष चाणाक्षपणाचा आरोप करणें होय. राज्यकर्त्यांपैकीं कांहीं लोक त्यांनीं रोंवलेल्या बीजाचा वृक्ष होऊन त्याच्या वाढीची मर्यादा मोहोरापलीकडे जाऊं नये असें जर म्हणणारे आहेत, तर कांहींजण सदर वृक्षास मधुर फलें येऊन तीं हिंदुस्थानांतील लोकांस स्वातंत्र्यानें चाखावयास मिळावीं असेंहि म्हणणारे आहेत, हें गेल्या अंकीं आम्ही सांगितलेंच आहे. राज्यकर्त्यांमध्यें जर अशा प्रकारचे दोन पक्ष आहेत तर प्रजेच्या पुढाऱ्यांत त्याच नमुन्याचे दोन पक्ष कां असूं नयेत ? वृक्षाचा दृष्टांत घ्यावयाचा असल्यास या दोन पक्षांस मोहोरवादी व फलवादी अशीं नांवें देतां येतील. सर्व गोष्टी क्रमाक्रमानें एकापासून एक उत्पन्न होत असतात. बीजाखेरीज वृक्ष नाहीं, वृक्षाखेरीज मोहोर नाहीं, आणि मोहोराखेरीज फल नाहीं ‘ उदेति पूर्वं कुसुमं ततः फलं ’ हा दृष्टान्त कालिदासानेंहि दिला आहे. मग पुष्पवादी आणि फलवादी यांनीं उगाच तंटा करण्यांत काय हांशील ? बीज जमिनींत पेरा किंवा रोंवा, त्यांस पाणी घाला, दोघेहि त्याचें रोप जतन करून वाढवा, म्हणजे मग पुढें दोघांचीहि कार्यसिद्धी आहे. धार्मिक बाबतींत मीमांसा आणि औपनिषद दर्शनांत अशाच प्रकारचा भेद आहे. यज्ञयागादि कर्में करून स्वर्गप्राप्ती करून घ्यावी किंवा त्यामुळें चित्तशुद्धी करून घेऊन पुढें ज्ञानानें मोक्ष मिळवावा, हा दोन्ही दर्शनांतील मतभेदाचा मुख्य प्रश्न आहे. तथापि दोन्ही दर्शनें हिंदू धर्मशास्त्रांत प्रमुख गणलीं असून वैदिक धर्मांचे ते दोन मुख्य आधारस्तंभ आहेत. स्वर्गप्राप्ती व मोक्ष, मोहोर व फल, स्वराज्य आणि स्वातंत्र्य या तीन जोड्या अशा दृष्टीनें विचार केला असतां एकसारख्याच आहेत असें म्हटलें तरी चालेल. यांमधील पहिली दुक्कल वेदांतांतील आहे, दुसरी व्यवहारांतील आहे आणि तिसरी राजकीय बाबतींतील आहे. या तिन्हीं प्रसंगीं अंतिम साध्यांत कोणाचा कसाहि भेद असला तरी बीज लावणें, यज्ञदानतपःक्रिया करणें, आणि राष्ट्रीय सभेचें काम चालूं ठेवणें यांमध्यें सर्वांचा एकोपाच असला पाहिजे. लग्न करण्याचा उद्देश, “ दारान् अपत्याय, ” “ रत्यर्थं, ” नव्हे, असें शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. पण शास्त्रकारांशीं हुज्जत खेळून कोणी जर लग्न करण्याचें कर्मच सोडून देईल तर त्याचें वर्तन सशास्त्र झालें, असें आम्ही म्हणूं काय ? राष्ट्रीयसभेंत जे स्वराज्यवादी आणि स्वातंत्र्यवादी असे दोन पक्ष आहेत त्यांची स्थिति याचप्रमाणें आहे. कोणचाहि नवीन पक्ष उपस्थित झाला असतां जुन्या

पक्षाचा व त्याचा विरोध उत्पन्न होत असतो खरा; पण हा विरोध फार वेळ कायम न ठेवतां नव्या पक्षाचें अभिनंदन करून पुढें काम सुरू ठेवणें हेंच शहाण्याचें काम आहे. जमिनींत वीं घातलें असतां त्याचा अंकुर वर येतांना तो जमीन फाडून वर येतो; एवढ्याकरितां जर एखादा बागवान त्याच्यावर रागावला तर त्यास ज्याप्रमाणें कोणी शहाणा म्हणणार नाहीं, त्याप्रमाणेंच मुत्सद्यांची अवस्था आहे. झाडाच्या अभिवृद्धीस जमीन आणि बीज या दोघांचा संयोग जसा अपेक्षित आहे तद्वतच राष्ट्राच्या अभ्युदयास निरनिराळ्या मतांचे एकांतून एक निघणारे किंवा परस्पर निरपेक्ष पक्षहि कांहीं कार्याकरितां एकत्र झाले पाहिजेत, एवढें निर्विवाद आहे. हे एकत्र ठेवण्याकरितां कांहीं नियमबद्ध रचनेची आवश्यकता लागते, पण त्याचा विचार पुढें करूं. सध्यां एवढेंच सांगावयाचें आहे कीं, राष्ट्रीयसभेंत स्वराज्यवादी आणि स्वातंत्र्यवादी, विनंतीवादी किंवा स्वावलंबनवादी, या सर्वांनीं एकमतानेंच काम केलें पाहिजे. हिंदुधर्म ज्याप्रमाणें केवळ शैवांचा नाहीं आणि वैष्णवांचाहि नाहीं, तद्वत राष्ट्रीयसभा केवळ जहालांची नाहीं व केवळ मवाळांचीहि नाहीं. कोणाचे अंतिम हेतु कसेहि असोत, त्यावद्दल एकमेकांनीं एकमेकांला नांवें न ठेवितां राष्ट्रीयसभेचें काम सर्वांनीं एकदिलानें केलें पाहिजे. सुरतेस जो तंटा झाला तो केवळ दोन पक्षाचे निरनिराळे अंतिम हेतु होते एवढ्यामुळेंच झाला नाहीं. राष्ट्रीयसभेचे सभासद अमकें एक विशिष्ट मत ( creed ) स्वीकारणारेच पाहिजेत, दुसऱ्यांनीं तेथें येण्याचें कारण नाहीं, हा आग्रह त्या तंट्याचें खरें कारण होय. जो वैष्णव तोच हिंदु असा जर वैष्णवांनीं उद्यां आग्रह धरला तर त्यांची हिंदुधर्मातील इतर पंथांकडून जी संभावना होईल तशीच मवाळांची सुरतेस झाली. अंतिम हेतूचा विचार न करतां, अथवा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा अंतिम हेतु असला तरी राष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घालण्यास जर तो तयार आहे तर त्याचा राष्ट्रीय सभेंत अवश्य समावेश झाला पाहिजे. पायावर उभारण्याची इमारत चार मजली व्हावयाची असो किंवा सहा मजली व्हावयाची असो, तिचा पाया एकच असतो; किंबहुना पायावर सहा मजली इमारत उभारणाऱ्यांस तो अधिक मजबूत भरावा लागतो, असें म्हटलें तरी चालेल. अशा वेळीं उभयपक्षांनीं "आपला पाया तूं घाल; माझा मी घालतों" असें म्हणणें शोभेल काय ? दोन निरनिराळ्या इमारती उभारण्याचा हा प्रश्न नाहीं. चार मजलेवाल्यांनीं व सहा मजलेवाल्यांनीं एकविचारें एकच पाया भक्कम घातला पाहिजे; या कामीं नव्या इंजिनियरिंग पद्धतीचें अवलंबन न करितां कोणत्याहि इमारतीचा पाणी लागेपर्यंत पाया घालण्याची जी पद्धत आहे तीच आपण स्वीकारली पाहिजे; आणि अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे "आम्हाला या पायावर चारच मजले उठवायचे आहेत. हलींच्याच नव्हे तर

पुढील पिढीनें केव्हांहि त्यावर पांचवा किंवा सहावा मजला उभारण्याचा प्रयत्न करूं नये, किंवा मनांतहि आणूं नये," असा चिरकालीन निर्बंध करणें देशाच्या प्रगतीस अत्यंत अपायकारक होय. अंतिम हेतु ठरविण्याकरितां राष्ट्रीय सभा निर्माण झालेली नाहीं; व्यक्तीप्रमाणें राष्ट्राचेंहि अंतिम साध्य दैविक प्रेरणेनेंच सिद्ध झालेलें आहे; याची इतिहास साक्ष देत आहे. राष्ट्रीयसभेचें काम या अंतिम हेतूकडे क्रमशः कसें जावें हें ठरविण्याचें किंवा पाया घालून त्यावर हळूं हळूं इमारत रचण्याचें आहे. झाड अमूकच उंच वाढलें पाहिजे, अशी बीजारोपण करणाऱ्या बागवानानें इच्छा धरून उपयोगी नाहीं. त्याची वाढ त्याच्या परिस्थितीवर अवलंबून राहील, ती खुंटवणार बागवान कोण ? आमच्या हिंदुस्थानांतच नव्हे, तर आयरिश लोकांच्या पुढाऱ्यांतहि अंतिम हेतूसंबंधानें याच प्रकारचे मतभेद आहेत, व कांहीं कालपर्यन्त त्यांच्यामध्यें तंटा माजून दुहीहि झाली होती. पण नुक्तीच या सर्व पक्षांतील लोकांनीं एकत्र जमून ठरवलें कीं, इंग्रजी राज्यकर्त्यांकडून कांहीं हक्क प्राप्त करून घेण्यास ज्याअर्थीं एकजुटीची आवश्यकता आहे, त्याअर्थीं आपआपसांतील ही दुही उपयोगी नाहीं. राष्ट्राच्या अभ्युदयाची अंतिमांतली अंतिम मर्यादा काय असावी, याबद्दल कोणीहि निर्बंध करणें शक्य नाहीं आणि योग्य नाहीं. देशकाल परिस्थितीप्रमाणें या अभ्युदयाचा पल्ला अंतिमांतल्या अंतिम मर्यादेपर्यंत कदाचित् जाणार नाहीं. कदाचित् जाईल; त्याबद्दल आपआपसांत भांडण करून त्याची मर्यादा कायमची ठरविण्याचा प्रयत्न करणें व्यर्थ होय, असें आयर्लंडांतील पुढाऱ्यांनीं ठरविलें असून त्याच तत्त्वावर ते एक झाले आहेत. राष्ट्रीयसभेंतील दोन्हीं पक्षांनीं हेंच तत्त्व स्वीकारलें पाहिजे. राष्ट्राच्या वाढीची मर्यादा न ठरवितां उभय पक्षांनीं एक मतानें काम केलें पाहिजे. तंटा कायमची मर्यादा ठरविण्यांत आहे, व तो आग्रह सुटला म्हणजे दोन्ही पक्ष एक होण्यास कांहीं हरकत नाहीं. राष्ट्राचें अंतिम हित कशांत आहे याबद्दल सप्रमाण विचार करण्याचा मक्ता परमेश्वरानें जहालांसहि दिला नाहीं व मवाळांसहि दिला नाहीं, हें दोघांनींहि लक्षांत ठेविलें पाहिजे. या कामीं जातिभेद ज्याप्रमाणें विसरून जावयाचा, त्याप्रमाणें अंतिम हेतूमधील भेदहि विसरला पाहिजे, किंवा बाजूला ठेवला पाहिजे. जो तो पक्ष आपआपलीं मतें अधिकाधिक लोकप्रिय व्हावीं यासाठीं प्रयत्न करण्यास मोकळा आहे; पण त्यामुळें देशकार्याकरितां दोघांनीं एकत्र काम करण्यास कांहीं अडचण येऊं नये. पाबना येथील प्रांतिक सभेंत सुरेंद्रनाथ, मोतीलाल घोस, अरविंद घोस, यांनीं याच तत्त्वाचा स्वीकार करून समेट केला आहे. व तेंच तत्त्व इतर प्रांतांतील लोकांनीं जर स्वीकारलें तर सर्व पक्षांचा समेट होऊन राष्ट्रीयसभेचें काम खऱ्या राष्ट्रीय पद्धतीवर चालण्यास कोणतीहि हरकत येणार नाहीं, असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे.

# ८. खरी अडचण कोठें आहे ?

[ २५ फेब्रुवारी १९०८ ]

मोहोर व आंबा, स्वर्गप्राप्ती व मोक्ष, किंवा स्वराज्य व स्वातंत्र्य अशा प्रकारचे अंतिम साध्यासंबंधानें जरी मतभेद असले तरी आंबा लावण्याचें, धर्माचरण करण्याचे किंवा राजकीय चळवळीस सुरुवात करण्याचें काम करण्यास सर्व लोकांची एकजुटीनें तयारी असली पाहिजे; एरवीं अखेरची कार्यसिद्धी कोणासहि प्राप्त होणें शक्य नाहीं, हें गेल्या अंकीं सांगितलेंच आहे. राष्ट्रीयसभेंत असणाऱ्या नव्याजुन्या पक्षांत ऐक्य होण्यास अंतिम साध्यांतील भेद अशा रीतीनें कारणीभूत होणार नाहीं हें खरें; परंतु आमच्या मतें अंतिम साध्यापेक्षां साधनांचाच भेद हा तंटा उद्भवण्यास अधिक कारण झालेला आहे. स्वराज्य असो वा स्वातंत्र्य असो, यांपैकीं कोणतीहि गोष्ट सध्यां प्राप्त होण्यासारखी नाहीं एवढें जर निश्चित आहे, तर सुशिक्षित लोकांमध्यें आज त्याबद्दल वादविवाद माजविणें गैरशिस्त नव्हे काय ? स्विनीसाहेब म्हणतात त्याप्रमाणें असें करणें म्हणजे ज्यांस ट्रॅाम्बेचेंहि भाडें देण्याचें सामर्थ्य नाहीं त्यांनीं आपण मोटार गाडींतून जावें कीं आगगाडींतून जावें, याबद्दल विनाकारण वाद माजविण्यासारखें होय. जहाल म्हणा का मवाळ म्हणा, दोघेहि अशा तऱ्हेचा वृथा वाद माजविण्याइतके मूर्ख नाहींत, अशी आमची खात्री आहे. मग हा तंटा कां झाला ? असा सहजच प्रश्न निघतो. भावाभावांमध्यें तंटा लागला असतां सदर तंटा कोर्टांत गेल्यावर वकील आपआपल्या बाजूनें "या दाव्यास मुदतीची हरकत आहे" किंवा "यांतील दस्तऐवज रजिस्टर झालेले नाहींत," अथवा "फिर्यादीस पुरा स्टँप नाहीं" अगर "वादीनें नोटीस दिलेली नाहीं आणि पक्षकारहि घातलेले नाहींत" वगैरे कांहीं कायद्याच्या तर कांहीं क्षुल्लक पुराव्याच्या हरकती काढून परस्परांस अडविण्याचा प्रयत्न करीत असतात, तद्वतच जहाल-मवाळांच्या तंट्याची स्थिति झाली आहे, सुरतेस अमक्याचें नाक वांकडें होतें, अमक्याची काठी तमक्याच्या डोक्यावर पडली किंवा तमका बोलावयास उठला तो कायदेशीर वेळीं उठला नाहीं, ठरावांत फेरफार केले ते शाब्दिक होते, वगैरे सबबी किंवा तक्रारी अशाच प्रकारच्या होत. भाऊबंदकीचें भांडण वर सांगितलेल्या क्षुल्लक कारणाकरितां नसून ज्याप्रमाणें वडिलार्जित इस्टेटीचा वांटा मिळण्याकरितां असतें, तद्वत जहाल-मवाळांतील भांडणाचें वास्तविक मूळहि वर सांगितलेल्या कारणांपेक्षां निराळेंच आहे. आणि तें मूळ कोणतें, व

दोघांचें खरोखर नडतें कोठें, याबद्दल आजच्या लेखांत आम्ही दोन शब्द लिहिणार आहों. तंटयाचें बाह्य स्वरूप कसेंहि असलें तरी खऱ्या अंतःस्वरूपाहून पुष्कळ वेळां तें भिन्न असतें हें वरील दृष्टान्तावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

जहाल काय किंवा मवाळ काय दोघांसहि आपआपल्या बुद्धीप्रमाणें किंवा मगदुराप्रमाणें देशाचें हितच साधावयाचें आहे, ही गोष्ट प्रथमतः कबूल केली पाहिजे. कोणीहि जाणूनबुजून देश बुडविण्याकरिता तयार झालेले नाहींत; मग त्यांच्या कृतीचे परिणाम कसेहि होवोत व असोत. दोघांचें जें कांहीं अडतें आहे तें कांहीं हेतूबद्दल नव्हे, कृतीबद्दल आहे; आणि एवढी गोष्ट प्रथमतः लक्षांत ठेविली म्हणजे दोघांच्याहि कृती भिन्न भिन्न असल्या तरी त्यांच्यामध्ये मिलाफ होण्यास कांहीं अडचण यावयाची नाहीं. हिंदुस्थान देश उदयास येऊन कालांतरानें त्याला स्वराज्य किंवा स्वातंत्र्य प्राप्त व्हावें, असें दोन्ही पक्षांस प्रामाणिकपणानें वाटत आहे. त्यांचें अडतें कोठें, ती जागा निराळीच आहे. गेलीं पंचवीस तीस वर्षे काम करणाऱ्या जुन्या पक्षास अद्याप असें वाटत आहे कीं, देशाच्या अभ्युन्नतीकरितां आपण जे उद्योग करावयाचे ते सरकारची विशेषशी गैरमर्जी न होतां केले पाहिजेत. इंग्रज सरकार कायदेशीर आहे, सनदशीर आहे, उदार आहे आणि जात्याच स्वातंत्र्यप्रिय असून बलिष्ठहि आहे. अशा सरकारापुढें आम्ही क्षुद्र लोकांनीं उर्मटपणानें वागून कांहीं उपयोग नाहीं. सिंह धिमा खरा, पण रागावला म्हणजे त्याची तब्वेत संभाळणें कठीण आहे; करितां त्यांस कधीं चुचकारून तर कधीं गोंजारून घेऊनच आम्ही आपला कार्यभाग साधून घेतला पाहिजे. तब्वेत गरम झाली कीं, बाजूला व्हावें, प्रसन्न दिसली कीं, पुढें व्हावें, गोंगाट करावयाचा तर झोंप मोडेइतका करूं नये, आणि ताडण करण्याचा प्रसंग आल्यास तें शब्दानें करावें, असें या पक्षाचें मत असून त्यांची कृतीहि याच मासल्याची आहे. हिंदुस्थानांत नाहीं तर पार्लमेंटांत, पार्लमेंटांत नाहीं तर विलायतच्या लोकांपुढें, कोठेंना कोठें तरी अखेरीस आपली दाद लागेल, आणि तीहि नम्रपणाच्या उपायानेंच लागेल अशा भरंवशावर या पक्षांतील पुढारी गेल्या पंचवीसतीस वर्षे काम करीत आलेले आहेत. इंग्रज सरकारापासून यांना कांहीं हक्क पाहिजे आहेत, पण त्यांस सरकारानें जर दरडावून असें विचारलें कीं, "कां हो ! तुम्ही हे हक्क आम्हांस अडवून घेणार काय ? बघूं कसे घेतां ते !" तर लागलींच हात जोडून ते असें सांगणार कीं; "खाविंद ! आमच्यासारख्या निर्बल प्राण्यांनीं अशी आशा धरणें व्यर्थ होय ! आम्हांस हक्क पाहिजेत खरे, पण आम्ही ते आपल्याच तंत्रानें घेणार !" हा पक्ष सरकाराजवळच याप्रमाणें सांगतो असें नाहीं, तर लोकांनाहि त्यांचें हेंच सांगणें आहे. आफ्रिकेंत म्हणजे ट्रान्सव्हालांत नुकताच हिंदु

रहिवाशांनीं जो हट्ट धरिला तसा जर आपल्या जबाबदारीवर कोणी हट्ट धरील, आणि नेटानें कांहीं दिवस काढील तर जुन्या पक्षांतील पुढारी सरकाराजवळ जाऊन "महाराज! नाइलाजास्तव गरीब लोकांनीं धरलेला हा हट्ट तुम्ही पुरा करावा," अशा प्रकारची विनंति करण्यास तयार आहेत; निदान त्यांच्या सनदशीर उपायांची मजल येथपर्यन्त येऊन पोहोंचली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. "तुम्ही हट्ट धरा, म्हणजे तुमचें कार्य होईल" असें उघडपणें लोकांस सांगण्यास ते तयार नाहींत; इतकेंच नव्हे तर हा मार्ग धोक्याचा आणि कदाचित् गैरकायदा नसला तर कायदेशीर तरी नसावा अशी त्यांची समजूत आहे. शिवाय बलिष्ठ सरकारास चिडवून तरी काय उपयोग? सोईसोईनें, धिमेपणानें, नवराबायकोच्या भांडणाप्रमाणें, हें भांडण आपण चालविलें पाहिजे; अति रागावून उपयोगी नाहीं; थोडा तरी लोभ ठेवला पाहिजे; मिळतें घ्यावें; फाटतें घेऊं नये; आग्रह धरावा, पण हट्ट करू नये; आणि केलाच तर विकोपास नेऊं नये; व या सर्व गोष्टी करतांना आपल्या बचावाकडे प्रथमत: लक्ष पुरवावें; लहान तोंडीं मोठा घास घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं; असें या पक्षाचें सामान्य धोरण आहे; व तें शहाणपणाचें, प्रसंगोपात्त आणि मुत्सद्दीपणाचें आहे, अशी त्यांची पुरी समजूत आहे. किंबहुना याच समजुतीवर ते पंचवीसतीस वर्षें काम करीत आले आहेत. आणि ही समजूत आपल्या हयातींत तरी कायम राहावी, म्हणजे आपल्या कृतींत विसंगतपणा दिसणार नाहीं, असें यांचें प्रामाणिकपणाचें मत झालेलें आहे.

प्रजापक्षीय पुढाऱ्यांची ही राजनीती जेव्हां प्रथमत: सुरू झाली तेव्हां सरकारास या पुढाऱ्यांचा आरंभीं मोठा बाऊ वाटला. दृष्टान्तानें बोलावयाचें असल्यास जुन्या धर्मभोळ्या बायकोऐवजीं ही हायस्कुलांत तयार झालेली बायको "नाकापेक्षां मोती जड" या न्यायानें त्रासदायक होते कीं काय, अशी कांहीं दिवस सरकारास भीति वाटूं लागली. पण पुढें त्यांनीं लवकरच असा सिद्धान्त बांधला कीं, 'शिकलेली झाली तरी बायकोच आहे,' तेव्हां 'त्राटिके'तील प्रतापरावाप्रमाणें आपण युक्तीनें थोडें उग्र स्वरूप धारण केलें असतां पुन: पहिल्यासारखीच घडी जमून येईल. 'सरकार बलिष्ठ आहे; त्यानें भाषणस्वातंत्र्य दिलें म्हणून अनावर भाषणानें तें भिऊन जाईल असें समजूं नका.' आणि यदाकदाचित् सरकाराची मूठ थोडीशी सैल झाली, तरी ती भीतीनें न होतां खुद्द सरकारच्या औदार्यानेंच होईल, अशा प्रकारचे बड्या बड्या सरकारी अधिकाऱ्यांचे कित्येकदां जे उद्गार निघाले आहेत, त्यांतील बीज हेंच होय. लोकांच्या जुन्या पुढाऱ्यांचें हें धोरण आणि तदनुसार सरकारानें धारण केलेली वृत्ती यांपासून व्हावा तसा फायदा होणार नाहीं, असें प्रतिपादन करणारा पहिल्यापासूनच एक पक्ष होता; पण वीस वर्षांपूर्वीं तो

बाल्यावस्थेंत होता. गेल्या वीस वर्षांत ज्या गोष्टी घडून आल्या त्यांनीं आणि शेवटीं शेवटीं बंगालची फाळणी, कर्झनची दंडुकेशाही, आणि जपानचा अभ्युदय यांनीं तर हा पक्ष अधिकच जोमांत आला. भीक मागून राजकीय हक्क मिळत नसतात; कोणतेंहि सरकार झालें तरी तें स्वार्थसाधूच असतें; एक राष्ट्र दुसऱ्यावर राज्य करतें तें आपल्या फायद्याकरितां राज्य करतें, जिकलेल्या लोकांच्या फायद्याकरितां नव्हे; राज्यकर्ते स्वजातीय असले तरीदेखील ते आपल्या हातांतील अधिकार गोडीगुलाबीनें सोडीत नाहींत; त्यांच्या हातून तसें घडून येण्यास त्यांचें कोठें तरी अडावें लागतें; "न हि दुर्योधनो राज्यं मधुरेण प्रदास्यति" प्रजेस हक्क पाहिजे असल्यास तिनें ते स्वपराक्रमानें व स्वावलंबनानें मिळविले पाहिजेत; "तुम्ही योग्य झाल्यावर आम्ही तुम्हांस सुखानें राज्य देऊन स्वदेशीं परत जाऊं" असें कोणी म्हणत असल्यास तो अर्थवाद आहे, 'भूतार्थ–व्याहृति' नाहीं, भूलथाप आहे, खरें नव्हे; यांस फसून जाऊं नये, उद्योग करावा–नेटानें करावा; होईल तितकें अडवावें; नाक धरल्याशिवाय तोंड उघडत नाहीं; हा स्वार्थाचा प्रश्न आहे, धर्माचा किंवा औदार्याचा नाहीं; राजनीती आहे; धर्मनीती नव्हे; जिकलेल्या लोकांस जेत्यांनीं अपखुषीनें स्वातंत्र्य दिल्याचें उदाहरण इतिहासांत नाहीं; जपानास जय मिळाल्यावरोबर रानटी होते ते सुधारलेले झाले; शहाणपण सत्तेंत आहे, दैन्यांत नाहीं; स्वातंत्र्य हेंच प्रत्येक राष्ट्राचें अंतिम साध्य आहे; ताकाकरितां भीक मागण्यास जावयाचें तर भांडें लपविण्यांत कांहीं अर्थ नाहीं; तुम्हांस काय पाहिजे आहे तें उघड सांगा; त्याकरितां इतर राष्ट्रांनीं प्रयत्न केले तसे उघड करा; भिऊं नका; 'भित्यापाठीं ब्रह्मराक्षस' हें ध्यानांत ठेवा; संकटें आलीं तरी डगमगूं नका; संकटांखेरीज स्वातंत्र्य नाहीं, आणि रात्रींखेरीज सकाळ नाहीं; तुम्हांस जर मिळावयाचें असेल तर तें तुमच्या निश्चयानें, उद्योगानें आणि धैर्यानें मिळेल; सरकार बलिष्ठ असलें तर तें तुमच्या मदतीनें बलिष्ठ झालेलें आहे; तुमच्यामधील भेद हेंच सरकाराचें कवच, तुमची दुर्बलता, तें त्याचें बल, तुमचें स्वतःबद्दलचें अज्ञान हें त्यांचें सामर्थ्य; तुम्ही ओळखाल तर सर्व तुमचेंच आहे; असें या नव्या म्हणजे राष्ट्रीय पक्षाचें धोरण व कृति असून शरीरद्वारा किंवा द्रव्यद्वारा झीज सोसण्यास हा पक्ष तयार आहे. या पक्षाचा जोम ओळखून सरकारानें कांहीं हक्क दिले तर ते या पक्षास नको आहेत असें नाहीं. पण जुन्या पक्षाप्रमाणें केवळ सरकाराच्या औदार्यावर भिस्त न ठेवतां प्रजेनें आपल्या हिंमतीवर अधिक भिस्त ठेवावी; त्यांत सरकाराशीं विरोध उत्पन्न झाल्यास त्याचा दोष प्रजेकडे नाहीं, सरकारच्या अनुदारतेकडे आहे, असें हा पक्ष लोकांस सांगत आहे; आणि लोकहि अनेक वर्षांच्या अनुभवापासून उत्पन्न झालेल्या ज्ञानानें किंवा निराशेनें या पक्षाकडे वळत चालले आहेत.

विशेषत: करून गेल्या दोनतीन वर्षांत या नव्या म्हणजे राष्ट्रीय पक्षाचीच छाप लोकांवर अधिक बसलेली आहे, असें म्हटलें तरी चालेल.

वरील विवेचनावरून नव्या जुन्या पक्षांतील किंवा नव्या जुन्या पुढाऱ्यांतील विरोध वास्तविक असून तो कां व कसा उत्पन्न झाला हें वाचकांच्या लक्षांत येईल. गेलीं पंचवीसतीस वर्षें काम केलेले सर फेरोजशहा मेथासारखे जुने पुढारी सरकारास उघड रीतीनें अडविण्याचा लोकांना उपदेश करण्यास कधींहि तयार नव्हते व नाहींत. त्यांचा मार्ग अडवणुकीचा नाहीं. स्वतंत्र पण गोडीगुलाबीचा आहे. गेल्या दोन तीन वर्षांत राष्ट्रीय पक्ष जेव्हां जोमानें पुढें आला तेव्हां या जुन्या पुढाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. सरकारी अधिकारी त्यांस विचारूं लागले कीं, "कां हो ! तुम्हांस सरकारास अडवावयाचें नाहीं, तर मग हें नव्या पक्षाचें ढोंग काय आहे ? आणि तुमचें आजपर्यंतचें बोलणें जर खरें आहे, तर मग तुम्हीं या नव्या पक्षाचा निषेध कां करीत नाहीं ? " लार्ड मिंटो आणि सर अॅडॅम्सन यांनीं हा प्रश्न उघड कौन्सिलांत विचारलेला आहे, व त्याचें उत्तर ना. गोखले यांनीं जें दिलें तें अधिकाऱ्यांस समाधानकारक वाटत नाहीं. अर्थात् जुन्या पक्षाची नव्या पक्षास थोडी तरी फूस असावी, निदान जुना आपल्या सहवासाचा आणि इभ्रतीचा फायदा तरी नव्या पक्षास देत आहे असें सरकारला वाटत आहे. ही सरकाराच्या मनांतील शंका कशी काढून टाकावी, हा जुन्या पुढाऱ्यांपुढें पहिला मोठा प्रश्न आहे. धरलें तर चावतें आणि सोडलें तर आंगावर येतें, अशी त्यांची स्थिति झालेली आहे. सरकारच्या बाजूनें हा पेंच झाला. आतां लोकांच्या बाजूनें पाहिलें तरी तीच अडचण. नव्या पक्षाचीं जोमदार मतें लोकांमध्यें उत्तरोत्तर अधिकाधिक प्रसृत होत चाललीं आहेत. आणि जुने पुढारी लोकांस जर आपला पूर्वीचा मुत्सद्दीपणाचा मार्ग सांगू लागले तर त्यांचें कोणी ऐकत नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट या जुन्या पुढाऱ्यांचा देशाभिमान तितका तीव्र अगर जाज्वल्य नाहीं, असेंहि त्यांच्यावर आरोप होऊं लागले आहेत. तिकडे पहावें तर सरकार खूष नाहीं, आणि इकडे पहावें तर लोकहि राजी नाहीं, असें त्यांच्यावर दुहेरी संकट येऊन पडलें आहे. दगडापेक्षां वीट मऊ, या न्यायानें "तुम्ही नव्या पक्षास सोडून आमच्याकडे या, पण आलेत तरी 'चांदोवा' मागूं नका," असा त्यांस मोठ्या मानभावीपणानें सरकार उपदेश करीत आहे. परंतु 'चांदोवा' सोडण्यास ते तयार नसल्यामुळें तिकडूनहि पण अडचणच; आणि 'चांदोवा' सोडावा तरीहि पंचाइतच; कारण मग म्हणण्यासारखें साध्य कांहींच राहात नाहीं. बरें, राष्ट्रीय पक्षास सर्वस्वी जाऊन मिळावें तर आज पंचवीस तीस वर्षांच्या धोरणावर पाणी पडून सरकारशीं असलेला थोडाबहुत संबंधहि तुटतो, अशी यांची मोठी विकट स्थिती झाली आहे. या कोंडींतून

सुटावयाचें कसें, हा जुन्या पुढाऱ्यांपुढें एक मोठाच प्रश्न होता; आणि आपल्या वुद्धीनें व सर्व गडयांच्या संमतीनें सुरतेस ही कोंडी फोडण्याचाहि त्यांनीं विचार केला होता. पण तो सिद्धीस गेला नाहीं. राष्ट्रीयसभा मोडणें हें कोणत्याहि पक्षास इष्ट आहे असें आम्हांस वाटत नाहीं. पण हा डाव दुसऱ्या पक्षाकडे जाऊं नये अशी जुन्या पक्षाची इच्छा आहे, आणि ती कां आहे हेंहि वर सांगितलें आहे. त्यांस जो पेंच पडला आहे तो कांहीं काल्पनिक नाहीं, वास्तविक आहे; पण त्यांचें वाह्यस्वरूप मात्र आरंभीं सांगितल्याप्रमाणें वरेंच विकृत झालेलें आहे. जहालांस हातीं धरावें तर सरकार रागावतें व आपल्या पूर्वीच्या म्हणण्यास वट्टा येतो; आणि सोडावें तर आपल्याच लोकांत दुही उत्पन्न होऊन लोकांमध्यें अप्रियता होते व इष्ट कार्याची सिद्धीहि लांवणीवर पडते. हा पेंच, ही अडचण, किंवा हें संकट टाळावें कसें, या मुद्याचा प्रश्न असून दोन पक्षांमधील तंटयाचें खरें मूळ हेंच होय. स्वराज्य किंवा स्वातंत्र्य या अंतिम साध्यावद्दलचा वाद लांवचा म्हणून क्षणभर वाजूला ठेवतां येईल; पण नेटाची गोडीगुलावी किंवा हट्टाची अडवणूक या साधनभेदामुळें पदोपदीं नेहमीं उत्पन्न होणारी विसंगतता किंवा विरोध कसा टाळावा, हेंच काय तें सांप्रत मोठें गूढ आहे. वंगाल्यांतील जुना पक्ष वंगालच्या फाळणीमुळें वराच पुढें गेला असल्यामुळें त्या प्रांतांतील दोन्ही पक्षांमधला विरोध मुंवई इतका तीव्र नाहीं, व म्हणूनच वंगाल्यांत हा तंटा उत्पन्न न होतां तो मुंवईस प्रथम उत्पन्न झाला आहे. दादाभाईंसारखे वृद्ध पुढारी तरुण पिढीकडून थोडे तरी पुढें ढकलले जाण्यास सिद्ध आहेत; पण मुंवईच्या इतर जुन्या पुढाऱ्यांस हें तत्त्व मान्य नसल्यामुळें सध्यांचा प्रसंग प्राप्त झाला आहे. शांतपणें विचार केला असतां यांतून पार पडण्यास मार्ग नाहीं असें नाहीं; व देशकल्याण करावें अशीच दोन्ही पक्षांची खरी इच्छा असेल तर तो सांपडणेंहि कठीण नाहीं. पण व्यक्तिविषयक किंवा अन्य तऱ्हेच्या अनेक कारणांनीं तंटयाच्या मुख्य प्रश्नावर आगांतुक वुरसा चढल्यामुळें त्याचें खरें स्वरूप पहिल्यानें नजरेस आलें नाहीं. सुरतेस झालेला प्रकार अनिष्ट खरा; पण त्यानें हा वुरसा नाहींसा झालेला आहे; व आम्हांस अशी बळकट आशा आहे कीं, वर सांगितलेल्या उभय पक्षांतील विरोधाचा अद्यापहि समेटानें परिहार करितां येईल. परंतु स्थल-संकोचास्तव या विरोधपरिहाराचें स्वरूप सांगण्याचें काम पुढील खेपेवर टाकणें भाग आहे.

---

## ९. अडचणीचा निर्वाह

[ ३ मार्च १९०८ ]

जहाल आणि मवाळ या दोन पक्षांचा समेट होण्यास खरी अडचण कोणती, हें मागील खेपेस सांगितलेंच आहे. दोन्ही पक्षांमधील अंतिम साध्यांतील भेदापेक्षां साधनांचा किंवा काम करण्याच्या पद्धतीचा भेद या बाबतींत अधिक महत्त्वाचा आहे. नव्या पक्षास, सरकारास अडवण्याचा मार्ग देशांतील लोकांस शिकवा-वयाचा आहे. किंवा अडवणुकीच्या मार्गानें जाण्यास लोकांस तयार करावयाचें आहे; आणि जुन्या पक्षास सध्यांच इतकें पुढें जाणें पसंत नसून सरकारास राग न येईल अशा बेतानें हल्लींच्या पद्धतींतील राजकीय दोष लोकांस समजावून देऊन त्यांस कांहीं हक्क मागण्याकरितां सरकाराकडे धांव घेण्यास सांगा-वयाचें आहे. अडवणुकीचा मार्ग सरकारी अधिकाऱ्यांस, निदान सध्यां तरी, गोड वाटणें अशक्य आहे. कारण थोडचाबहुत प्रमाणानें कां होईना, पण लोक सरकारास अडवण्यास शिकले म्हणजे हल्लींच्या प्रमाणें राज्यकारभार बिनबोभाट चालणें उत्तरोत्तर अधिक अधिक कठीण होणार. करितां हल्लीं जे राज्यकर्ते आहेत त्यांस अर्थात्च हा परिणाम इष्ट नाहीं; व म्हणूनच अडवणुकीचा मार्ग लोकांस शिकविणाऱ्या पुढाऱ्यांस त्यांच्याकडून कधींहि उत्तेजन मिळावयाचें नाहीं. अशा वेळीं जुन्या पक्षांस जवळ करण्याची सरकारी अधिकाऱ्यांनीं जी युक्ति काढली आहे, ती जुना पक्ष त्यांस प्रिय झाला आहे म्हणून नव्हे, तर नवा पक्ष त्यांस अधिक अप्रिय किंवा त्याज्य वाटतो म्हणून होय. दोघांपैकीं कोणीच त्यांस प्रिय नाहीं. पण शतमुखी रावणापेक्षां दशमुखी रावण बरा या न्यायानें मवाळांस सध्यां हाताशीं धरून त्यांचे मार्फत जहाल पक्षाचें प्राबल्य किंवा बंड मोडण्याचा सरकारचा विचार आहे. परंतु मवाळांनीं एवढें लक्षांत ठेवावें कीं, इसापनीतींतील गोष्टींत सांबराचा परा-भव करण्याकरितां घोडचावर मानवी स्वारानें जें एकदां खोगीर ठेवलें तें कायमचेंच ठेवलें. मवाळांच्या साहाय्यानें जहाल पक्षाचा बीमोड करण्याचें सरकारानें मनांत आणलें असल्यास त्यामुळें जुन्या पक्षास सरकार पुढें मागें कांहीं हक्क देईल असें त्यांनीं समजूं नये. नवा पक्ष अस्तित्वांत आल्यावर जुन्या पक्षास हाताशीं धरण्याचा विचार निघाला आहे, आणि नवा पक्ष जोंपर्यंत अस्तित्वांत आहे तोंपर्यंतच सरकाराचा हा विचार कायम राहील. सारांश, नव्या पक्षाच्या उद्भवा-मुळेंच जुन्या पक्षाचा सरकाराकडून थोडाबहुत गौरव होण्यास आतां प्रारंभ झाला

आहे. अशावेळीं जुन्या पक्षाच्या भिडेस्तव सरकारानें लोकांस जर कांहीं हक्क दिले तर ते नव्या पक्षास नको आहेत असें नाहीं. ते हक्क कोणत्या एखाद्या पक्षास न मिळतां सर्व देशासच मिळणार, आणि देशास स्वातंत्र्याचा कोणताहि हक्क मिळाला तरी नव्या पक्षास तो पाहिजे आहे. असें झाल्यानें "लढनेकु हं और खानेकु मेरा भाई" अशी नव्या-जुन्या पक्षाची अनुक्रमें स्थिति होईल खरी; पण त्याला कांहीं इलाज नाहीं. कांग्रेसच्या चळवळीनें सरकार कांहीं मोठ्या पगाराच्या जागा नेटिव्हांस देण्यात तयार झालें तर त्याचा फायदा राष्ट्रीय सभेस येऊं न शकणाऱ्या एतद्देशीय सरकारी नोकरांसच मिळणार हें उघड आहे. जहालांच्या उद्योगाचा परिणामहि असाच व्हावयाचा. झाड लावतो त्यानेंच फळ चाखण्याची इच्छा धरल्यास, किंवा मला फळ खावयास मिळेल तरच मी झाड लावीन असें प्रत्येक मनुष्य म्हणूं लागल्यास, बागाइतीची स्थिति कधींहि सुधारणार नाहीं. त्यांस कांहीं लोक झाडें लावणारे पाहिजेत, व त्यांची फळें पुढेंमागें खाण्यासहि कांहीं मंडळी तयार पाहिजेत. फळ कोणास खावयास मिळेल याचा झाड लावणाऱ्यांनीं विचार करून उपयोगी नाहीं; आणि फळ चाखूं इच्छिणारांनीं झाड लावणारे मूर्ख होते, त्यांच्याशीं संबंध तोडला पाहिजे होता, असेंहि म्हणून चालणार नाहीं. दोघांच्या कृतींत फरक असला तरी हेतु एकच असल्यामुळें दोघांनींहि सलोख्यानें वागलें पाहिजे; आणि हाच न्याय राजकीय बाबतींत सध्यां चळवळ करणाऱ्या जुन्यानव्या पक्षांस लागूं केला पाहिजे. जुन्या-नव्या पक्षांतील भेद अशाच प्रकारचा आहे, ही गोष्ट राज्यकर्त्यांस माहीत नाहीं. लंडन टाईम्स, पायोनियर वगैरे विलायती व अँग्लोइंडियन पत्रांनीं गेल्या राष्ट्रीय सभेसंबंधानें लिहितांना दोन्ही पक्षांतील भेद आपणांस कळत नाहींत, असे किंवा अशा अर्थाचे जे उद्‌गार काढले आहेत त्यांतील रहस्य हेंच होय. जुन्या किंवा नव्या पक्षांपैकीं कोणासहि स्वातंत्र्याचे हक्क नको आहेत असें नाहीं. जुना पक्ष म्हणतो कीं, सरकारशीं फटकून वागूं नका, आणि नव्या पक्षाचें म्हणणें असें कीं, फटकून वागल्यानेंच पुढेंमागें आपणास कांहीं मिळावयाचें असल्यास मिळेल, कारण कोणीहि मनुष्य– मग तो मोर्लेसारखा पंडित असो किंवा हिंदुस्थानांतील गोऱ्या अधिकाऱ्याप्रमाणें अरेराव असो– आपल्या हातांतील अधिकार नाइलाज झाल्याखेरीज सोडण्यास तयार नसतो. तत्त्वज्ञान संपादन केलेलीं माणसें उदार मताचीं असलीं तरी शाब्दिक वेदांत्याप्रमाणें त्यांच्या आचरणांत हें तत्त्वज्ञान केवळ आत्मप्रेरणेनें उतरत नाहीं, तसें होण्यास बाह्य उपाधींची नेहमीं जरूरी असते; आणि राजकीय बाबतींत अशा उपाधी म्हटल्या म्हणजे लोकांचा असंतोष, आग्रह आणि अडवण्याचा निश्चय, ह्याच होत. नव्या किंवा राष्ट्रीय पक्षाचा मार्ग धोक्याचा

आहे, हें आम्ही कबूल करतों. आमचें एवढेंच म्हणणें आहे कीं, देशाच्या हितासाठीं उद्योग करणाऱ्या लोकांपैकीं सर्वांनीं नाहीं तर बऱ्याच लोकांनीं तरी अशा प्रकारचा स्वावलंबनाचा व धोक्याचा मार्ग स्वीकारल्याखेरीज गत्यंतर नाहीं. ज्यांना या धोक्यांत पडावयाचें नसेल त्यांनी निदानपक्षीं धोक्यांत पडणाऱ्या लोकांचे पाय तरी मागें ओढूं नयेत, एवढी खबरदारी घेतली पाहिजे, विशेषेंकरून या दोन्ही पक्षांस तिसऱ्याशीं म्हणजे सरकाराशीं जोंपर्यंत लढावयाचें आहे तोंपर्यंत दोघांमधील मतभेद क्षणभर बाजूला ठेवूनच दोघांनीं एकजुटीनें काम केलें पाहिजे. राष्ट्राच्या अभ्युदयास दोघांचेहि उद्योग पाहिजे आहेत, किंवा दोघेहि हवे आहेत, हें दोघांनींहि लक्षांत ठेविलें पाहिजे. आयर्लँडांतील राजकीय पक्षांची स्थिति अशीच आहे. एक पक्ष आयर्लंडाची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न पार्लमेंटाच्या द्वारें करूं इच्छित आहे, आणि दुसरा पक्ष कांहीं अंशीं इकडच्या राष्ट्रीय पक्षा-प्रमाणें अन्य उपायांनीं तोच परिणाम घडवून आणण्यास पहात आहे. हे दोन्ही पक्ष कांहीं वेळ एकमेकांशीं भांडत होते, पण पुढें त्यांच्या लक्षांत असें आलें कीं, आपसांमधील या फुटीनें आयर्लंड देशाचें प्रतिपक्षी जें विलायत सरकार त्याचाच फायदा होतो, आयर्लंडाचा होत नाहीं, तेव्हां त्यांनीं असें ठरविलें कीं, आपआपलीं विशिष्ट मतें न सोडतां विलायत सरकाराशीं भांडण्यापुरते आपण एक होऊं आणि त्याप्रमाणें दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांचीं बोलणीं–चालणीं होऊन ते सध्यां एक झालेले आहेत. हिंदुस्थानांतील नव्या–जुन्या राजकीय पक्षानें या बाबतींत आयर्लंडाचा हा कित्ता घेण्यासारखा आहे. एका पक्षानें दुसऱ्या पक्षास आपलीं विशिष्ट मतें स्वीकारण्याचा आग्रह करणें अत्यंत चुकीचें होय. हें तत्त्व आयर्लँडांतील वर सांगितलेल्या दोन्ही पक्षांनीं कबूल करून आपसांतील तहाचें पहिलें कलम असें घातलें आहे कीं, " आयर्लंडाच्या भावी स्थितिसंबंधानें कोणाहि आयरिश पक्षाचे अंतिम विचार अमुक एक मर्यादे-पर्यन्तच गेले पाहिजेत अशी शर्त किंवा अट ठरविण्याचा कोणासहि अधिकार नाहीं. " देशासंबंधीं विचार करतांना मनुष्याच्या विचारांची धांव कुंपण घालून अडवणें हें देशास कधींहि हितकारक होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर कायद्याच्या मर्यादेंत होईल तितकें अत्युच्च अंतिम साध्य लोकांपुढें ठेवणें हेंच खऱ्या देशभक्ताचें कर्तव्य होय; आणि आम्ही मागें सांगितलेंच आहे कीं, अत्युच्च अंतिम साध्य किंवा हेतु पिनलकोडच्या टप्प्यांत येत नाहींत. पिनल कोड अंतिम हेतुकरितां नसून तो हेतु सिद्धीस नेण्यास ज्या साधनांचा उपयोग करावा लागतो त्याकरितां आहे. अर्थात् कायद्याप्रमाणें स्वराज्य अंतिम हेतु ठेवला काय आणि स्वातंत्र्य ठेवलें काय सारखेंच. यांपैकीं गोऱ्या अधिकाऱ्यांस किंवा मुत्सद्यांस कोणता पसंत

पडतो हें पहाण्याची मग जरूर नाहीं; कारण खरें म्हटलें म्हणजे दोन्हीहि त्यांस पसंत नाहींत. कांहीं इंग्रजी मुत्सद्दी यांस अपवाद आहेत खरे, पण तेवढ्याकरितां आमच्या राजकीय पुढाऱ्यांच्या अंतिम हेतूबद्दलच्या विचारांस आळा घालणें योग्य नाहीं. स्वराज्य ही स्वातंत्र्याचीच पायरी आहे हें त्यांस माहीत आहे; इतकेंच नव्हे तर मिल्लसारख्या लोकांनीं ही गोष्ट आपल्या ग्रंथांत स्पष्टपणें नमूद केली आहे. मग आम्ही आपआपसांत त्यावद्दल भांडण करण्यांत काय हंशील? " स्वातंत्र्यवादी पक्षावरोबर–त्यांचीं मतें तुम्हांस पसंत नसतां– तुम्ही कां संबंध ठेवता ? " असा प्रश्न गोरे अधिकारी मवाळ पुढाऱ्यांस विचारतात ही गोष्ट खरी आहे; पण अशा प्रसंगीं कचरून न जातां मवाळांनीं स्पष्ट असा जवाब दिला पाहिजे कीं, " नवीन पक्षाचे अंतिम हेतु जरी आम्हास पसंत नसले तरी राजकीय हक्कप्राप्तीकरितां राष्ट्रीय सभेंत बहुमतानें जे ठराव पसार होतील त्यांची अंमलबजावणी करण्यांत नव्या पक्षांतील लोक जोंपर्यंत तयार आहेत तोंपर्यंत आम्हांस त्यांस सोडतां येत नाहीं. आंब्याचें झाड मोहराकरितां लावावयाचें असो किंवा फळाकरितां असो, झाड लावण्याच्या कामीं आम्ही दोघे एकच आहों. " मवाळ पक्षाच्या पुढाऱ्यांचें हल्लीं जें कांहीं अडतें आहे तें येथेंच; आणि त्या अडचणीचा निर्वाह वर सांगितल्याप्रमाणें त्यांनीं आपलें मन तयार केल्याखेरीज व्हावयाचा नाहीं. नव्या पक्षांशीं मी संबंध कसा ठेवूं ? ते स्वातंत्र्य मागतात आणि गोऱ्या अधिकाऱ्यांस असलीं मागणी विशेष झोंवते, अशा प्रकारचे विचार जोंपर्यंत जुन्या पुढाऱ्यांच्या डोक्यांत खेळत आहेत तोंपर्यंत समेट होणें कठीण आहे; पण मनांतील ही भीति किंवा मळमळ एकदां उडाली म्हणजे मग पुढचा मार्ग कठीण नाहीं. खुद्द पार्लमेंटांतहि सोशियालिस्ट, रॅडिकल, कॉन्झर्व्हेटिव, आणि लिबरल हे भिन्न भिन्न मताचे भिन्न भिन्न पक्ष जर एकत्र काम करीत आहेत, तर मग हिंदुस्थानांतील दोन्ही पक्षांस तसें काम कां करतां येऊं नये ? याचें कारण एवढेंच कीं, कोणाचा अंतिम हेतु कसाहि असला तरी प्रस्तुतच्या कार्याकडे नजर देऊन एकजुटीनें तेवढें कार्य पार पाडून नेण्याची संवय अद्याप आम्हांस लागली नाहीं. हिंदुस्थानसारख्या मोठ्या देशांत राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक बाबतींत नेहमीं एकच पक्ष राहाणें कधींहि शक्य नाहीं. हिंदुधर्मांत ज्याप्रमाणें शैव, वीरशैव आदिकरून अनेक पंथांचा समावेश होतो, तद्वतच राजकीय बाबतींतहि कांहीं साधे स्वराज्यवादी तर कांहीं वीर स्वराज्यवादी आणि कांहीं पूर्ण स्वातंत्र्यवादी असे पक्ष असावयाचेच. पण हिंदुधर्माच्या रक्षणाकरितां सर्व धर्मपंथांतील लोकांनीं जसें एक व्हावयास पाहिजे, त्याचप्रमाणें राजकीय हक्कांच्या प्राप्तीकरितां सर्व राजकीय पंथांनींहि एक झाले पाहिजे. त्यावेळीं मी स्वराज्य-

वादी तर तूं वीरस्वराज्यवादी असे तंटे करून उपयोग नाहीं. हिंदुस्थानच्या भावी अभ्युदयाची अमुकच मर्यादा पाहिजे, असें ठरविण्याचा, व तो ठराव सर्वांनीं कबूल केला पाहिजे असा आग्रह धरण्याचा, कोणीहि पुढारी कितीहि शहाणा असला तरी त्यांस अधिकार नाहीं. हा विचारस्वातंत्र्याचा प्रश्न आहे, आणि विचाराचा ओघ अशा रीतीनें जो कुंठित करूं पाहतो तो विचारस्वातंत्र्याचा शत्रू समजला पाहिजे. ज्या राष्ट्रांत विचारस्वातंत्र्य अबाधित रहात नाहीं तें राष्ट्र पूर्ण नाहीं तर अर्धवट तरी मेलेलेंच समजलें पाहिजे. सारांश, विचारस्वातंत्र्य हा राष्ट्राचा आत्मा आहे. आणि या आत्म्याची उन्नति अमुक पायरीपर्यंतच झाली पाहिजे असा आग्रह धरणें आत्मविघातक होय. एखाद्या व्यक्तीस किंवा पक्षास दुसऱ्या व्यक्तीची किंवा पक्षाची आकाशांत उंच उडण्याची उमेद पसंत नसली किंवा अशक्य वाटत असली तरी सर्वांस ती तशीच वाटली पाहिजे असा त्यानें आग्रह धरून फायदा नाहीं, व या आग्रहाकरितां आपआपसांत फूट पाडणें तर अगदींच अप्रशस्त होय. हिंदी राष्ट्राची वृद्धि पाश्चिमात्य शिक्षणानें, जपानसारख्या देशाच्या उदाहरणानें, आणि पूर्वेतिहासाच्या अभ्यासानें प्रज्वलित होऊन अधिकाधिक स्फुरण पावत चालली आहे. या स्फूर्तीची ज्वाला अमुकच इयत्तेपर्यंत वाढली पाहिजे अशी मर्यादा घालणें म्हणजे प्रातःकाळीं उगवणाऱ्या सूर्यनारायणास तूं क्षितिजावरच नेहमीं राहा अशी प्रार्थना करण्यासारखें होय. एकदां वाढीस लागलेली राष्ट्राची महत्त्वाकांक्षा कोणत्याहि उपायानें खुंटून टाकणें अशक्य आहे. तशांत लोकांच्या पुढाऱ्यांनीं तर हें खच्ची करण्याचें काम कधींच हातीं घेऊं नये, किंवा मनांत आणूं नये. इंग्रज लोक स्वराज्यहि आम्हास द्यावयास बसले नाहींत, आणि स्वातंत्र्य तर त्याहीपेक्षां देऊं इच्छित नाहींत. मवाळ पुढाऱ्यांस असें वाटत आहे कीं, स्वातंत्र्यवादी पक्षाबरोबर संबंध ठेवल्यानें सरकाराशीं सलोख्यानें वागण्यास एकप्रकारें अडचण येते. कृष्णस्वामी आय्यर सारख्यांनीं तर असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, सरकाराशीं सलोख्याचा संबंध ठेवण्यास स्वातंत्र्यवादी पक्षाची जी ही आपणांस अडचण येते ती शरिराच्या सडक्या भागाप्रमाणें आपण तोडून टाकून मोकळें झालें पाहिजे. परंतु कृष्णस्वामी लक्षांत आणीत नाहींत कीं, जहाल पक्ष निघाला म्हणूनच कृष्णस्वामींसारख्या मवाळांस मोर्ले साहेब आतां जवळ बोलावूं लागले आहेत. सारांश, नव्या पक्षाशीं सहवास ठेवल्यानें जुन्या पक्षास सरकाराबरोबर सलोख्यानें वागण्यांत त्यांच्यामतें जरी थोडीशी अडचण असली तरी नव्या पक्षाच्या अस्तित्वामुळेंच जुन्या पक्षास हाताशीं धरण्याची सरकारास वृद्धि झाली आहे हें त्यांनीं लक्षांत आणून देशकार्याकरितां नव्या पक्षाशीं समेटानें वागलें पाहिजे. नवा पक्ष अस्तित्वांत आल्यामुळें जुन्या पक्षास

मिळालेला हा फायदा दोन्ही पक्ष निरनिराळे राहूनहि जुन्या पक्षास मिळेल अशी जर जुन्या पक्षाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. कारण दोन्ही पक्षांच्या मिलाफांत जी शक्ति आहे ती दोन्ही पक्ष निराळे राहून कोणत्याहि एका पक्षांत राहाणें शक्य नाहीं. नवा पक्ष सरकारांत असलेल्या आमच्या वजनाचा व मान्यतेचा फायदा घेऊन आपलीं मतें लोकांत प्रसृत करण्याचा प्रयत्न करतो असा जुन्या पक्षाचा नव्या पक्षावर जो एक आक्षेप आहे तोहि बरोबर नाहीं. कारण नव्या पक्षास जुन्याचा असा जर फायदा होत असला, तर जुन्या पक्षासहि वर सांगितल्याप्रमाणें नवा पक्ष निर्माण झाल्यापासून "सरकारनें जवळ बोलावण्याचा" फायदा झालेला आहे. दोन्ही पक्षांचा एकमेकांशीं सहवास राहिल्यानें एकमेकांस होणाऱ्या नफानुकसानीची अशी तोंडमिळवणी केली म्हणजे एकमेकांबद्दल एकमेकांची आदरबुद्धी राहून दोघांचाहि समेट होण्यास अडचण पडणार नाहीं. हिंदुस्थानच्या राजकीय उन्नतीचें जूं दोन्ही पक्षांच्या पुढाऱ्यांच्या मानेवर एकसारखेंच ठेवलेलें आहे आणि हा शकट ओढण्यास जी जोडी लावली आहे त्यांपैकीं एक नरम आणि एक गरम असण्यांतच राष्ट्रास फायदा आहे. गाडीचे दोन्हीहि बैल तापट असून उपयोगी नाहींत. आणि दोन्ही घिमेहि असून चालत नाहींत. तसेंच दोहोंपैकीं एका बैलानें मी जोखड तोडून निराळा होईन असेंहि मनांत आणून चालावयाचें नाहीं. गाडी ओढणें हें दोघांचेंहि काम आहे आणि तें दोघांनीं एकमतानेंच केलें पाहिजे.

अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे "मला तुझ्यापासून अमुक प्रकारची अडचण होते," किंवा 'माझा तुला विनाकारण अमुक फायदा होतो' अशी जुन्या पक्षाची जी तक्रार आहे ती त्यांनीं सोडून देऊन, राष्ट्रीय सभेचे अंतिम हेतु कायमचे ठरवून टाकण्याचा जो त्यांचा बेत आहे तोहि त्यांनी रहित केला पाहिजे, असें म्हणणें भाग पडतें. सरकाराशीं मवाळ सलोख्यानें वागतात ते अधिकारी वर्गाचा आणि त्यांचा अंतिम हेतु एक आहे म्हणून वागतात असें ते समजतात काय ? गोऱ्या अधिकारी वर्गाच्या मनांत आम्हांस स्वराज्यहि द्यावयाचें नाहीं आणि स्वातंत्र्यहि द्यावयाचें नाहीं हें वर सांगितलेंच आहे. अशा अधिकारी वर्गाशीं स्वराज्यवादी मवाळ जर सलोख्यानें वागण्यास तयार, तर देशबंधू म्हणून स्वातंत्र्यवादी पक्षाशीं तरी त्यांनीं मिळून मिसळून कां वागूं नये ? नवा किंवा राष्ट्रीय पक्ष हा कांहीं जुन्या पक्षाच्या गळ्यांत लोढणें बांधण्यासाठी निर्माण झालेला नाहीं; तो सरकारच्या गळ्यांत लोढणें बांधण्याकरितां निघाला आहे; आणि सरकारानें अनावर होऊं नये अशी जर जुन्या पक्षाची इच्छा असेल तर नव्या पक्षाच्या लोढण्याचा त्यांनीं अवश्य उपयोग करून घेतला पाहिजे; निदान सरकाराच्या गळ्यांत नवा पक्ष

लोढणें बांधीत असल्यास त्याच्या आड तरी येऊं नये. जुन्या पक्षाची इतकी तयारी झाल्यावर नव्या पक्षाचें व त्यांचें भांडण होण्याचा कधींहि संभव नाहीं. राष्ट्रीय सभेपुढें आपआपलीं मतें मांडण्याचा प्रत्येक पक्षास सारखाच अधिकार असला पाहिजे, हें तत्त्व कोणासहि अमान्य नाहीं. राष्ट्रीय सभेंत आजच आपली सरशी झाली पाहिजे असा नव्या पक्षाचा आग्रह नाहीं, लोकमत पालटण्याचा नवा पक्ष प्रयत्न करीत आहे व कांहीं दिवसांनीं राष्ट्रीयसभेंत नव्या पक्षाचेंच बहुमत होईल, अशी त्यांस उमेद आहे. आपलीं मतें राष्ट्रीय सभेंत मांडण्याची आपणास मोकळीक असली आणि जुन्या पक्षानें राष्ट्रीय सभेचे अंतिम हेतु किंवा ' क्रीड ' कायमचे ठरवून त्यांस प्रतिबंध केला नाहीं, म्हणजे नव्या पक्षाचें काम भागलें. राष्ट्रीय सभेंत जें बहुमतानें ठरेल तें नव्या पक्षास मान्य असलें पाहिजे. "बहुमत आपणास मान्य नाहीं," किंवा राष्ट्रीय सभेंतील बहुमताविरुद्ध आपण बंड करणार, असेंहि त्यांनीं म्हणूं नये, कोणच्याहि सभेंत "बहुमत" हें अखेरचें अपेलेट कोर्ट होय. त्याचा निकाल जर कोणास पसंत नसेल तर त्यानें सभा सोडली पाहिजे; दुसरा मार्ग नाहीं. परंतु सभेंतील बहुमत आपल्या विरुद्ध पडलें तर सभेच्या बाहेर ह्या बहुमताविरुद्ध कोणतेंहि मत कोणीहि प्रतिपादन करूं नये, असा जो कित्येकांचा आग्रह आहे तो मात्र अगदीं गैरशिस्त आहे. पार्लमेंट सभेंत लेबर किंवा रॅडिकल पक्षाच्या विरुद्ध एखादा ठराव झाला तर त्या ठरावानें सदर पक्ष त्या ठरावाच्या विरुद्ध लोकमत पुनः जागृत करण्यास ज्याप्रमाणें बांधला जात नाहीं, तद्वतच राष्ट्रीय सभेंत एखादी गोष्ट एखाद्या सालीं नव्या पक्षाविरुद्ध बहुमतानें ठरली तरी नव्या पक्षास आपलीं मतें देशांतील लोकांपुढें मांडून लोकांचीं मनें आपल्या पक्षाच्या वतीनें पुढें मागें वळविण्याच्या हक्क कायम असला पाहिजे. हा हक्क रद्द करण्याचा जर जुना पक्ष प्रयत्न करील तर तो राष्ट्राच्या प्रगतीस अपायकारक झाल्यावाचून कधींहि राहणार नाहीं. आपआपलीं मतें लोकांपुढें मांडून लोकांस आज नाहीं तर उद्यां आपल्या वतीचे करून घेण्याची दोन पक्षांची जी नेहमीं झटापट चालू असते, तीच राष्ट्राच्या प्रगतीचें खरें साधन होय. ही झटापट कायम ठेवूनच दोन्ही पक्षांनीं विशिष्ट कार्यापुरतें विशिष्ट नियमांनीं पार्लमेंटांतील भिन्न भिन्न पक्षांप्रमाणें एकत्र झालें पाहिजे, आणि वागलें पाहिजे. शेंकडों वर्षांच्या अनुभवानें हे नियम कोणते हें पार्लमेंट-सभेनें ठरविलें आहे; व त्याचा आधार घेऊन राष्ट्रीयसभेनें काम चालविण्याकरितां जर नियम केले तर त्यास नव्या पक्षानें कोणतीहि हरकत घेऊं नये. दोन्ही पक्षांस राष्ट्रीयसभेंत आपआपलीं मतें प्रतिपादन करण्याची पूर्ण मोकळीक मात्र कायम ठेवली पाहिजे. ही मोकळीक "क्रीड" ठरविल्यानें किंवा खुल्या वादविवादास

फाजील आळा घालण्याचा प्रयत्न केल्यानें नाहींशी होते; आणि वादविवादाचीहि मोकळीक नाहींशीं करणें म्हणजे एका पक्षानें दुसऱ्या पक्षावर जुलूम करण्यासारखें होय. नव्या पक्षावर अशा तऱ्हेचा जुलूम करण्याची वुद्धी जुन्या पक्षानें सोडून दिली आणि नव्या पक्षानें राष्ट्रीयसभेंत ठरेल त्याप्रमाणें सभेंतल्या कामापुरतें आपलें वर्तन ठेवण्याचें कवूल केलें म्हणजे समेट होण्यास कोणतीहि अडचण नाहीं. "राष्ट्रीय सभेंत एक वोलतात आणि वाहेर दुसरें वोलतात, हें वरोवर नाहीं," असा लंडन टाइम्सचा जो एक आक्षेप आहे तो अगदीं वेडेपणाचा आहे. असाच उपदेश जर लंडन टाइम्स विलायतच्या लोकांस करूं लागेल तर त्याचें कोणीहि ऐकणार नाहीं; असले उपदेश लंडन टाइम्सच्या ऑफीसांत किंवा भट्टींत केवळ हिंदुस्थानाकरतांच ओतले जातात; आणि दुर्दैव आमचें कीं, आमच्यापैकीं कांहीं लोक वेदवाक्या-प्रमाणें त्यांस मान देतात ! असले उपदेश खऱ्या राजकीय चळवळीस किंवा प्रगतीस कधींहि फायदेशीर नसतात; आणि म्हणूनच इंग्रजी वर्तमानपत्रकार किंवा अधिकारी सदर उपदेश आम्हास करीत असतात हें आम्ही विसरतां कामा नये. कांहीं विशिष्ट कार्याकरितां एक होऊन पुन्हां आपआपलीं विशिष्ट मतें लोकांपुढें मांडण्याची प्रत्येक पक्षास मुभा असणें यांतच राष्ट्राचें हित आहे; हाच मार्ग राजमार्ग आहे, आणि पाश्चिमात्य राष्ट्रांच्या इतिहासाचेंहि त्यास पाठवळ आहे. दोन्हीं पक्षांसहि अशा तऱ्हेची मोकळीक राहूं द्या; एकमेकापासून एकमेकांस थोडीशी अडचण होत असल्यास तिकडे दुर्लक्ष करा; परस्परांपासून परस्परांस होणाऱ्या फायद्याकडे लक्ष द्या; दोन्हीं पक्ष एकाच राजकार्यधुरेचे वाहक आहेत हें विसरूं नका; सरकारावरोवर भांडण्यासाठीं दोघांच्याहि संघशक्तीची अपेक्षा आहे हें ध्यानांत ठेवा; विचारस्वातंत्र्य कायम राखणें यांतच राष्ट्राचें हित आहे हा सिद्धान्त मनांत वाळगा; आणि या सर्व गोष्टींकडे लक्ष ठेवून काम करण्याची पद्धत एकमेकांच्या विचारें आणि पूर्वींचे दाखले पाहून ठरवून घ्या; म्हणजे दोन्ही पक्षांचा समेट होऊन राष्ट्रीय सभेंत एकत्र काम करण्यास दोघांसहि अडचण पडणार नाहीं. हल्लीं जी अडचण उपस्थित झालेली आहे ही कांहीं नुसत्या मतभेदामुळें नाहीं, तर एकानें दुसऱ्याचें ऐकलेंच पाहिजे अशा आग्रहामुळेंच झाली आहे. हा आग्रह सुटला, कोणचें मत केव्हां ग्राह्य व्हावयाचें याचा निकाल वहुमतावर टाकला आणि दोघांसहि विचारस्वातंत्र्याची व भाषणस्वातंत्र्याची पूर्ण मोकळीक ठेवून पार्लमेंट सभेच्या धर्तीवर काम चालविण्याचे नियम ठरले, म्हणजे मग दोघांचा सलोखा होण्यास कोणतीच हरकत राहात नाहीं. एवढ्या मोठ्या हिंदुस्थानासारख्या अवाढव्य राष्ट्रास एकाच पक्षाचे विचार सर्वदा रुचतील किंवा ग्राह्य होतील असें नाहीं. पदार्थविज्ञान शास्त्रांत असा नियम आहे

कीं, घर्षणाखेरीज गति उत्पन्न होत नाहीं; राष्ट्राच्या प्रगतीसहि हाच नियम लागू आहे. घर्षण असलें तरी त्यानें गति कायमची कुंठित होत नाहीं; किंबहुना गति आहे तेथें घर्षण आहे व असलेंहि पाहिजे. पण हें घर्षण कमी करण्यास ज्याप्रमाणें वंगण घालावें लागतें, त्याप्रमाणेंच राजकीय बाबतींत दोन्ही पक्षांचें घर्षण कमी करण्यास वर सांगितल्याप्रमाणें व्यवस्था झाल्यास दोन्ही पक्षांचें काम सलोख्यानें चालण्यास हरकत पडणार नाहीं. पवना येथें भरलेल्या बंगालच्या प्रांतिक सभेंत अशाच रीतीनें या प्रश्नाचा विचार झालेला आहे व आम्हांस अशी उमेद आहे कीं, इतर प्रांतांतहि त्याचप्रमाणें ठराव होऊन येत्या दिसेंबरांत पुनः दोन्ही पक्षांच्या मिलाफानें राष्ट्रीय सभेचें काम चालू होईल. राष्ट्रीय सभेचें राष्ट्रीयत्व कायम राहाण्यास तींत दोन्ही पक्षांचा समावेश झाला पाहिजे व वर सांगितल्याप्रमाणें वागण्याचें एकमेकांच्या विचारें दोघांनींहि कबूल केल्याखेरीज तसा समावेश होणें शक्य नाहीं. इतर राष्ट्रें आपआपले व्यवहार जर याच तत्त्वावर चालवितात, तर आम्हीहि तोच मार्ग स्वीकारण्यास हरकत कोणती ? किंबहुना याबाबतींत " एष पंथा, एतत् कर्म " हेंच वचन अक्षरशः लागू आहे असें आम्ही समजतों.

# खंड चवथा

## हिंदु-मुसलमानसंबंध

### १. हिंदु मुसलमानांचा दंगा

[१५ ऑगस्ट १८९३]

मुंवईच्या दंग्याची हकीगत दुसरीकडे दिली आहे ती वाचून व ऐकून मनांत नानातऱ्हेचे तर्क उत्पन्न होतात. मुंवई शहरांत बाहेर गांवांहून म्हणजे पुणें, ठाणें वगैरे ठिकाणांहून सुमारें तीन साडेतीन हजार लष्करी शिपाई मुंवईस गेला आहे. मुंवईच्या सरकारी आरमारावरील लोक व रेलवेमधील कांहीं व्हालंटीअर लोकहि मुंवई पोलीसास मदत करीत आहेत. परंतु या चार हजार लोकांकडून अद्याप व्हावा तसा बंदोवस्त होत नाहीं. मुसलमान हिंदूस व हिंदू मुसलमानांस साधेल तेथें व साधेल तसे लुटताहेत; दोन तीनशें लोक जखमी झाले; दोन तीनशें कैद केले; पन्नास साठ प्राणास मुकले; आणि सर्व लहानसहान गल्लयांतून व घरोघर लोक भीतीनें व काळजीनें व्याकूळ झाले आहेत; ही स्थिति पाहून इंग्रजसरकारचें प्रजेच्या रक्षणाबद्दलच्या तयारीचें कोणासहि आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. मुंवईवेट म्हणजे फार मोठें आहे असें नाहीं; तथापि व्यापाराचें व राज्याचें तें मुख्य ठिकाण असल्यामुळें तेथें वहुतेक सर्व जातीचे व धर्माचे लोक वाळूच्या कणाप्रमाणें एकत्र झालेले दृष्टीस पडतात. युरोपियन, खिस्ती, पार्शी, मुसलमान, अरब, शिद्दी, बाटे, खोजे, वाणी, मारवाडी, घाटी, दक्षिणी, कोंकणी वगैरे सर्व प्रकारचे लोक तेथें उद्योगाकरितां जाऊन येऊन नेहमीं राहत असतात. या लोकांमध्यें व्यापाराखेरीज सर्वांस सामान्य व सर्वांच्या सारखी हिताची अशी दुसरी कोणतीच गोष्ट नाहीं. हा व्यापाराकरितां एकत्र झालेला निरनिराळ्या जातींचा समूह केव्हां फाटेल व केव्हां एकत्र होईल हें सांगणें मोठें दुर्घट आहे. व हें लक्षांत ठेवून मुंवईच्या संरक्षणाची योग्य तजवीज सरकारानें ठेवावयास पाहिजे. नेपोलियन वोनापार्टचें असें म्हणणें असें कीं, फ्रेंच रेव्होल्युशन वेळेवरच तोफेचा गोळ्यांचा उपयोग केला असता तर तावडतोव वंद करतां आली असती; व हाच न्याय वहुतेक दंग्यांस थोडावहुत अंशानें लागू आहे. जुम्मामशिदींतून दीन दीन करीत रात्रीं जे लोक बाहेर पडले त्यांचा पहिल्यानेंच जर पोलिसांनीं नीट समाचार घेतला असता तर ही दंग्याची आग इतकी पसरली असती कीं नाहीं यांची आम्हांस शंकाच आहे. मुंवईचे

पोलिस बातमी मिळविण्यांत मोठें कुशल असेल, पण दंग्याचें बीज मोडण्या-इतकेंहि त्यांजवळ लष्करीसामर्थ्य असूं नये ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. मुंबईइलाख्यांत एका शहरीं दंगा झाला तर त्यास येथून लष्करी लोकांची कुमक पाठवावी लागली. तेव्हां हाच दंगा जर दोन चार ठिकाणीं झाला असता तर सरकारची काय तारांवळ उडून गेली असती ह्याची सहज कल्पना होते. सरकार दंगा मोडण्यास इतकें दुर्बल आहे अशी बदमाप लोकांची समजूत होणें इष्ट नाहीं, करितां हल्लींच्या दंग्यापासून सरकारनें बोध घेऊन आपल्या पोलिसाची व लष्कराच्या वांटणीची व्यवस्था सुधारावी अशी आमची सूचना आहे. इंग्रजी राज्यांत लोकांच्या मालमत्तेवर व जीवितावर अशा प्रकारचे हल्ले क्वचित् होतात हें खरें आहे; पण जेव्हां ते होतात तेव्हां सरकारी अधिकाऱ्यांची मोठी धांदल उडून जाते अशी सामान्य जनांची समजूत होऊन कधींहि निभाव लागणार नाहीं.

सरकारच्या तयारीविषयीं हा विचार झाला. पण ज्या लोकांमध्यें हा दंगा सुरू झाला आहे त्यांच्यामधील परस्परसंबंधाचा विचार केला म्हणजे दुसरेहि अनेक प्रश्न उत्पन्न होतात. मुंबईच्या दंग्याची जी हकीकत प्रसिद्ध झाली आहे त्यावरून हा दंगा अकस्मात् उत्पन्न होण्यास प्रभासपट्टण येथील दंग्याचें मुख्य कारण असावें असें उघड दिसतें. मुसलमान लोक चिरडीस जाण्यास हिंदु लोकांनीं पट्टण येथील लोकांस मदत करण्यासाठीं भरविलेल्या सभा मुख्यत्वेंकरून कारण झाल्या असें कित्येकांचें म्हणणें आहे; परंतु त्याचा अर्थ आम्हांस बरोबर समजत नाहीं. हिंदू लोकांनीं मोठमोठ्या सभा भरवून मुसलमानांवर स्वारी करण्याचें अगर त्यांजवर कोणत्याहि रीतीनें छापा घालण्याचें अगर हल्ला करण्याचें ठरविलें नव्हतें. दुःखितांस अगर निराश्रितांस मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे; व त्याच हेतूनें मुंबईतील गुजराथी मंडळीनें प्रभासपट्टण येथील लोकांस मदत करण्याकरितां मोठमोठ्या सभा भरविल्या होत्या. या सभांपासून मुसलमान लोकांस जर त्वेष आला असला तर त्याचा सर्व दोष मुसलमान लोकांकडेच आहे. सभा भरविण्यांत हिंदूंची कांहीं चूक नव्हती व जोंपर्यंत त्यांचा सर्व व्यवहार कायदेशीर होता तोंपर्यंत त्यांनीं केलेल्या कोणत्याहि कृत्याबद्दल मुसलमानांस वाईट वाटण्याचें कारण नाहीं. मुसलमान लोकांनींहि आपल्या जातभाईस मदत करण्याकरतां सभा भरविली होती व तेथेंहि बरीच वर्गणी गोळा झाली होती, अशा रीतीनें सभेस सभा झाल्यावर फिरून मुसलमान लोक जर हिंदूंवर हल्ला करूं लागले तर हा दोष सर्वांशीं मुसलमानांवर टाकणेंच न्याय्य आहे. अशा रीतीनें जाणूनबुजून व विनाकारण मुसलमानांनी हिंदूंवर हल्ला करण्यास प्रवृत्त व्हावें हें मोठेंच आश्चर्य

आहे; व अद्यापहि सरकाराकडून जर याचा नीट बंदोबस्त होणार नाहीं, तर मुसलमान लोकांचा शिरजोरपणा उत्तरोत्तर वाढत जाऊन तो अखेरीस सर्वांसच असमाधानकारक होईल यांत संशय नाहीं. मुंबईचें पोलिस कमिशनर व्हिन्सेंट साहेब यांच्या मतें गोरक्षणाबद्दल हल्लीं जी चळवळ सुरू आहे त्यामुळें हे दंगे झाले असावेत; परंतु हीहि सबब अगदीं निरर्थक व निष्प्रयोजक आहे. उत्तरहिंदुस्थान व दक्षिणहिंदुस्थान यांमधील मुसलमानांची स्थिति अगदीं भिन्न आहे. व हिंदुस्थानांत ज्या कांहीं गोष्टी असल्या दंग्यास कारणीभूत होतात त्या आमच्या इलाख्यांत होण्याचा संभव नाहीं. गोरक्षणाची चळवळ सुरू झाल्यापासून मुसलमान लोकांस पोटभर खावयास न मिळाल्याचें कोठेंहि ऐकिवांत नाहीं ! करिता टाइम्स ऑफ इंडियासारख्या पत्रकर्त्यानें गोरक्षणाचा व दंग्याचा संबंध जोडून देणें म्हणजे एक प्रकारें मुसलमान लोकांस अप्रत्यक्ष रीतीनें उत्तेजन देण्यासारखेंच आहे. मुसलमान लोकांची सर्वत्र अशी समजूत आहे कीं, सरकार आपणांस भितें व यामुळें केव्हाहि दंगा झाला असतां सरकार सहसा हिंदूंची बाजू घ्यावयाचें नाहीं. ही समजूत खरी असो वा खोटी असो त्याचा येथें विचार कर्तव्य नाहीं. मुसलमान लोकांची अशी समजूत आहे ही गोष्ट आमच्या मतें निर्विवाद आहे व लॉर्ड हॅरीस यांनीं परवां शेठ लखमीदास खिमजी यांची भेट घेण्याचें नाकारलें, ह्या व अशा प्रकारच्या दुसऱ्या उदाहरणांवरून थोडीबहुत तरी ती दृढ होत जाते. सरकार अशा रीतीनें एका धर्माच्या लोकांस वचकतें अगर त्यांचा फाजील सन्मान ठेवतें, अशी कोणाचीहि समजूत होणें प्रजेच्या स्वास्थ्यास अपायकारक आहे; व विशेषेंकरून आम्हां महाराष्ट्रीयांस तर ही सरकारची समजूत अत्यंत घातुक आहे. उत्तरहिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं मुसलमानांचें प्राबल्य असेल, परंतु आमच्या इलाख्यांत तसा प्रकार आजपर्यंत कधींहि नव्हता. इंग्रजी राज्य होण्यापूर्वीं महाराष्ट्राचा इतिहास पाहिला म्हणजे मराठेलोकांनीं खुद्द दिल्लीच्या बादशहापासून गोरक्षणाची सनद मिळवून आणल्याचें इतिहासांत नमूद आहे. मुसलमानांचें राज्य जारी असतां जर गोरक्षणाची अशा तऱ्हेनें आपआपसांत व्यवस्था लागली, तर आजच मुसलमानांनीं आमच्या प्रांतांत गोरक्षणानिमित्त हिंदूंवर हल्ला करण्यास प्रवृत्त कां व्हावें याचें कारण आम्हांस समजत नाहीं. हिंदु व मुसलमानांत अशा तऱ्हेचें वैमनस्य उत्पन्न होऊन त्यांनीं एकमेकांत मारामारी करावी हें कोणाहि समंजस मनुष्यास इष्ट वाटणार नाहीं. पण हल्लीं जो प्रकार होत आहे तो समंजस मनुष्याच्या सल्यानें अगर कानाडोळयानें होतो असें मानण्यास बिलकूल आधार नाहीं. मुसलमान लोक जर शेफारले असले तर आमच्या मतें त्याचें मुख्य

कारण सरकारची फूस हें होय. लॉर्ड हॅरीस ह्यांनीं परवां कौन्सिल हॉलांत हिंदु-मुसलमान लोकांच्या पुढाऱ्यांस हा दंगा मोडण्याबद्दल मोठ्या कळकळीनें उपदेश केला हें खरें आहे, पण हा उपदेश करितांना या मंडळींचा दंगेखोर लोकांशीं कोणत्या प्रकारचा संबंध आहे याचें लॉर्ड हॅरिस यांस चांगलेसें ज्ञान नाहीं अथवा ते घाईंत ती गोष्ट विसरले असें म्हणावें लागतें; कौन्सिलांत मुंबईंतील मुसलमान लोकांचा एकहि प्रतिनिधी नाहीं व हिंदु लोकांस शांत करण्यास मि० मेथा, मि० जव्हेरीलाल किंवा मि० सेटलवाड यांपैकीं कोणाचीहि जरूर नाहीं; मुंबईचे हिंदु लोक जे चवताळले आहेत ते मुसलमानांसारखे धर्मवेडानें अगर अविचारीपणानें नव्हे तर केवळ आत्मसंरक्षणार्थच होय; एक दिवसपर्यंत त्यांनी वाट पाहिली; पोलिसांच्या हातून त्यांचें संरक्षण होईना, तेव्हां आपल्या संरक्षणाकरितां त्यांना दंगेखोराचा प्रतिकार करणें भाग पडलें; हिंदु लोक प्रथमतः दंग्यास प्रवृत्त झाले नाहींत हें एकंदर हकीकतीवरून अगदीं स्पष्ट दिसत आहे, व सरकारची मदत योग्य वेळेस जर येऊन पोंचली असती तर प्रायः कोणीहि हिंदु मारामारी करण्यास धजला नसता. अद्यापहि सरकार जर हिंदूंचें संरक्षण करण्याचें व मुसलमानांनीं विनाकारण केलेल्या दंग्याबद्दल त्यांस शासन करण्याचें अभिवचन देईल तर हिंदु मोठ्या खुषीनें दंग्यांतून परत फिरतील अशी आमची समजूत आहे.

युरोपियन लोक हिंदु लोकांस नेहमीं असें हिणवीत असतात कीं, इंग्रजी राज्य आहे म्हणून हिंदु लोकांचे मुसलमानांपासून संरक्षण होत आहे. आज जर इंग्रज लोक हिंदुस्थानांतून गेले तर मुसलमान लोक हिंदु लोकांस खाऊन टाकतील! जणुं काय मुसलमान लोकांपासून आमचें संरक्षण करण्याकरितांच परमेश्वरानें यांस पाठविलें आहे! परंतु ही समजूत अगदीं चुकीची आहे, इतकेंच नव्हे तर असल्याच उद्गारांनीं मुसलमान लोकांस विनाकारण उत्तेजन मिळत गेलें आहे. इंग्रजलोक हिंदुस्थान सोडून गेले असतां आमचें काय होईल याची आम्हांस बिलकूल काळजी नाहीं, इंग्रजांनीं हिंदुस्थानांत पाऊल ठेवण्यापूर्वीच मुसलमानांची सत्ता मोडत चालली होती, व इंग्लिशांनीं हिंदुस्थानचें राज्य कमावलें तें मुसलमानांपासून नव्हे तर मराठे व शीख लोकांपासून होय.

टिपूचें राज्य खालसा केल्यानंतर ज्याप्रमाणें म्हैसूरच्या जुन्या राज्यघराण्याचें वंशज हुडकून आणून त्यांस गादीवर बसविलें त्याचप्रमाणें दिल्लीच्या वृद्ध बादशाहाचीहि इंग्रजांस व्यवस्था करावी लागली, हें सुप्रसिद्ध आहे; व इंग्रजसरकारचा जर या देशांत रिघाव झाला नसता तर आज जीं एकदोन मुसलमान

संस्थानें राहिलीं आहेत तींहि केव्हांच नामशेष होऊन गेलीं असतीं. असो. या जुन्या गोष्टी सांगत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. सध्यां सरकारास आमचें इतकेंच सुचविणें आहे कीं, मुसलमानांची नुसती प्रौढी गाऊन त्यास हरभऱ्याच्या झाडावर चढवावयाचा जो नेहमीं उद्योग सुरू आहे तो आम्हांसच काय पण एकंदर इंग्रजीराज्यास अपायकारक आहे. आमच्या महाराष्ट्रांत तरी मुसलमान वरचढ होण्यास कोणतेंहि ऐतिहासिक कारण घडलेलें नाहीं; व इंग्रजसरकार अथवा त्यांचे कामगार जर विनाकारण मुसलमानांस वचकून त्यांची प्रौढी गाणार नाहींत तर असले दंगे या इलाख्यांत तरी कोठेंहि होण्याचा संभव नाहीं. सरतेशेवटीं गव्हर्नरसाहेबांनीं जो निरनिराळ्या जातीच्या पुढारी लोकांस उपदेश केला, त्या संबंधानें थोडेंसें लिहून हा लेख आटपतों. लॉर्ड हॅरीस यांच्या भाषणावरून त्यांस अद्याप नेटिव लोकांच्या स्थितीचें खरें रहस्य कळलें आहे असें दिसत नाहीं. लॉर्ड हॅरीस ज्यांस लोकांचे पुढारी समजतात त्यांच्या हातून असले दंगे उत्पन्नहि व्हावयाचे नाहींत व मिटावयाचेहि नाहींत. या कामांतले पुढारी लोक निराळेच असतात, व जरी त्यांच्या हातून दंगा करण्यास थोडीबहुत मदत झाली तरी अखेरीस तो बंद करणें त्यांच्या इच्छेवर अवलंबून नसतें. मि. ह्यूमसाहेब ह्यांनीं मागें एका प्रसंगीं शेतकऱ्यांच्या दंग्याबद्दल जो उल्लेख केला आहे तो प्रस्तुतच्या दंग्यासहि पूर्णपणें लागू पडतो; व ह्यूमसाहेबांचाच या बाबतींतील अदमास गव्हर्नर साहेबांच्या अदमासापेक्षां अधिक बरोबर आहे. ह्यूमसाहेबांचें असें म्हणणें आहे कीं, शेतकऱ्यांचे दंगे जेव्हां उपस्थित होतील तेव्हां सरकार व सुशिक्षित पुढारी लोक या दोघांसहि त्यापासून सारखाच त्रास सोसावा लागेल. हिंदुमुसलमानांतील दंग्याचा प्रकार यांतलाच होय. मि. बद्रुद्दीन तय्यबजी, अगर मि. सयानी यांचें आरब व शिद्यांवर जितकें वजन आहे अथवा नाहीं, तितकेंच मि. जव्हेरीलाल अथवा मि. तेलंग यांचे मुंबईतील टोळीवाले लोक, घाटी अगर गिरण्यांतील मजूर ह्यांच्यावर आहे. दोघांच्याहि विद्वत्तेनें व उपदेशानें या प्रसंगीं कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. फार लांब कशाला, खुद्द लॉर्ड हॅरीस यांनींहि चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या तरी त्यांच्या युक्तीच्या गोष्टींनीं हें प्रकरण तडीस जाण्यासारखें नाहीं. हें एक खूळ आहे व त्याचा प्रतिकार करण्याचा खरा मार्ग म्हटला म्हणजे कडक रीतीनें त्याचा प्रथमतःच बंदोबस्त करणें हा होय. त्याप्रमाणें सरकारनें आतां तजवीज केलीच आहे व दंग्याचा बहुतेक बीमोड झाला आहे हें पाहून आम्हांस आनंद वाटतो. सरकार अशाच रीतीनें नेहमी वर्तन ठेवील व विनाकारण मुसलमानांस उत्तेजन देण्यासारखी कोणतीहि गोष्ट करणार नाहीं, तर पश्चिम हिंदुस्थानांत मुसलमान व हिंदु एकदिलानें एकत्र राहण्यास फारशी अडचण पडेल

असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्रजी राज्यामुळें निरनिराळ्या जाती एकत्र होण्यास हल्लीं अनेक हेतु व साधनें झालीं आहेत व होत आहेत व हींच साधनें उत्तरोत्तर वृद्धिंगत होऊन दोन्ही धर्मींच्या लोकांचा होईल तितका मिलाफ करून देण्यास झटावें हें सरकारचें व लोकांचें कर्तव्य आहे. कित्येक सरकारी अंमलदार बऱ्याच वेळीं ही गोष्ट विसरून जाऊन हिंदुमुसलमानांतील द्वेषभाव कायम राहिला तरच इंग्रजी राज्याचें हित आहे, अशा समजुतीनें मुसलमान लोकांस चिथविण्याचा हस्तें परहस्तें प्रयत्न करीत असतात, लॉर्ड हॅरीससारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं असले प्रकार जेणेंकरून बंद होतील अशी व्यवस्था व वर्तणूक ठेवली पाहिजे व इतकें करूनहि जर कोठें दंगा झाला तर दंगा करण्यास प्रथमतः प्रवृत्त झाले त्यांस कोणाचीहि भीड, मुर्वत न ठेवतां योग्य शासन करावें, म्हणजे असले प्रकार प्रायः कधींहि घडून येणार नाहींत.

## २. स्वतंत्र चौकशी झालीच पाहिजे

[ ३ आक्टोबर १८९३ ]

.....हिंदुमुसलमानांमधील दुहीच्या कारणांचा विचार करूं गेलें असतां हल्लीं ठिकठिकाणीं जे दंगे होतात ते सर्व एकाच कारणामुळें होत असतील असें मानणें अशक्य आहे. हिंदुमुसलमानांच्या चाली, रीतीभाती, सण आणि उत्साह इतके भिन्न आहेत कीं, दोन्ही लोकांचे सण जेव्हां एकाकालीं येतात तेव्हां थोडाबहुत तरी दंगा होण्याचा नेहमीं संभव असतो. गोरक्षणाची चळवळ अगदीं अलीकडची आहे. व पट्टणच्या दंग्याशीं त्याचा अर्थाअर्थी कांहींएक संबंध नव्हता हें सदर दंग्याच्या हकीकतीवरून स्पष्ट कळण्यासारखें आहे. गोरक्षणासंबंधानें कांहीं ठिकाणीं कित्येक गृहस्थांकडून फाजील व बेकायदेशीर प्रयत्न झाले नसतील असें आम्ही म्हणत नाहीं; पण सदर प्रयत्नांस वैमनस्याचीं कारणें म्हणण्यापेक्षां हल्लीं हिंदु–मुसलमानांमध्यें वाढत असलेल्या वैमनस्याचे परिणाम म्हणणें अधिक सयुक्तिक होईल असें आम्हांस वाटतें. दंगा होण्यापूर्वी जीं कांहीं कारणें घडून येतात त्यांपैकीं एखादे वेळेस गोरक्षण, एखादे वेळेस ताबुद, आणि दुसऱ्या एखाद्या वेळेस हिंदु अगर मुसलमानांची यात्रा हीं असण्याचा संभव आहे; परंतु हिंदु–मुसलमानांचें वैमनस्य ज्यास मोडावयाचें आहे त्यास या सर्व गोष्टींच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. मुसलमानी राज्याच्या भर अमदानींत जर असल्या प्रकारचे दंगे होत नव्हते तर इंग्रज लोकांस त्याचा प्रतिकार करतां येणार नाहीं असें नाहीं. बकरी–ईदच्या दिवशीं मुसलमान लोकांनीं शेळी, मेंढी अगर उंट मारावे असें कुराणांत लिहिलें आहे. गाय मारण्याचीच कांहीं जरूर नाहीं असें डॉ. लोनरसाहेबांनीं नुकतेंच विलायतेस प्रसिद्ध केल्याची तार आली आहे. हिंदुस्थानांतहि पुष्कळ लोकांचें असेंच म्हणणें आहे; करितां गोरक्षणासंबंधानेंहि कांहीं तडजोड निघणें अशक्य आहे असें नाहीं. मुसलमानी राज्यांत दिल्लीच्या बादशहांनीं गोवध बंद करण्याबद्दल सनदा दिल्याचीं उदाहरणें मागें आम्हीं सांगितलींच आहेत. इंग्रज राज्यकर्त्यांस हिंदु–मुसलमानांमध्यें जर कांहीं तोड काढावयाची असली तर ती याच धोरणावर काढली पाहिजे. कोणत्याहि मुसलमानास हवी तिथें गाय मारण्याचा अधिकार आहे व भररस्त्यांत त्यानें गाय मारली तरी हिंदुलोकांचीं मनें धर्मदृष्ट्या दुखविण्याचा त्यांच्यावर गुन्हा लागू होत नाहीं असले ठराव आणि तेहि हायकोर्टांतील न्यायाधीशाकडून होणें म्हणजे एक प्रकारें मुसलमानांस फूस

देण्यासारखेंच आहे. हिंदुलोक मुसलमानलोकांइतके जात्याच दंडेल नाहींत हें सरकारानें व सरकारी कामदारांनीं नेहमीं लक्षांत ठेवावयास पाहिजे. गोरक्षणाकरितां जर हिंदु लोक दंगा करतात असें मानलें तर मग युरोपियन अगर ख्रिश्चन लोकांविरुद्ध ते कां दंगा करीत नाहींत? ख्रिश्चन लोक गोमांस खातात ही गोष्ट हिंदुलोकांस माहित नाहीं असें नाहीं, परंतु हिंदु लोकांनीं ख्रिश्चनलोकांस मार दिल्याचें कोठें उदाहरण अद्याप घडून आलें नाहीं, यावरून असें उघड होतें कीं, हिंदुमुसलमानांतील वैमनस्य इतर कांहीं कारणामुळें हल्लीं जास्त वाढलें असून कधीं कधीं त्यांच्या मनानें पेट घेण्यास गोरक्षणादिकांची सबब पुरी होते. वास्तविक गोरक्षण हें त्याचें कारण नव्हे. हिंदुमुसलमानांमध्यें जो कांहीं स्वभावतःच थोडा द्वैतभाव आहे, तो शिक्षणाचा अधिक प्रसार झाल्याखेरीज व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदांताची अधिक मिसळ झाल्याखेरीज कधींहि पूर्णपणें नाहींसा व्हावयाचा नाहीं. यांपैकीं शिक्षणप्रसाराचें काम सरकारानेंच अंगावर घेतलें पाहिजे. दुसरें काम मुसलमान मौलवींच्या हातून होईल; परंतु ह्या दोन्ही गोष्टी घडून येण्यास दिनावधि लागेल; तोंपर्यंत गोवध, ताबूद, वगैरे बाबतींत कोणाचे कसकसे हक्क आहेत ते नीट मनांत आणून त्या बाबतींत सरकारनें केलेले नियम कोणाची भीड मुर्वत न धरतां पाळावे असा बंदोबस्त झाला पाहिजे. दोघांसहि सारख्या सवलती ठेवणें व शांततेचा पहिल्यानें जो भंग करील त्यास योग्य शासन करणें हे हल्लीच्या स्थितींत सलोखा ठेवण्याचे दोन उत्तम उपाय आहेत. ज्ञानाचा जास्त जास्त प्रसार होऊन लोकस्थिति ज्या मानानें सुधारेल त्या मानानें या उपायांची कमी कमी आवश्यकता होत जाईल हें उघड आहे. परंतु ती स्थिति येईपर्यंत वर लिहिलेल्या उपायांचीच योजना केली पाहिजे. सर वेडरबर्न स्वतंत्र कमिशन मागत आहेत ते या गोष्टीचा विचार करण्याकरितांच होय. सरकार आपण होऊन हीं कारणें व उपाय उघडपणें कधींहि कबूल करणार नाहीं; तेव्हां स्वतंत्र कमिशन नेमून चौकशी केल्याखेरीज दुसरें गत्यंतरच नाहीं असें म्हणणें भाग पडतें.

## ३. मुंबईंतील दंगा आणि सरकारचें कर्तव्य

[ २२ व २९ आगष्ट १८९३ ]

.....ज्या गिरणींतील मजुरांनीं शनिवारीं मुसलमान लोकांवर हल्ला केला त्यांनीं पोलिसास असें कळविलें होतें कीं, " आमचा सरकाराशीं किंवा पोलिसांशीं दांडगाई करण्याचा काडीइतका देखील हेतु नाहीं. सरकार आमचें मायबाप आहे, परंतु हे मुसलमान लोक उन्मत्त झाले आहेत यांनीं आमचीं देवळें बाटविलीं व आमच्या बायकांवर हात टाकला; करितां यांस तुम्हीं परवानगी दिल्यास बॅकबेमध्यें पिटून लावतों." गिरणीच्या मजुरांचे हे उद्‌गार वर लिहिल्याप्रमाणेंच अक्षरश: इंग्रजी पत्रांतून आले आहेत व ते वाचून त्यांचें नीट मनन केलें असतां ते अयथार्थ आहेत असें कोणासहि वाटणार नाहीं. हिंदु लोक मुसलमानांप्रमाणें हिरवट व रानटी नसल्यामुळें आपण होऊन दुसऱ्याच्या अंगावर चालून जाण्याचें साहस त्यांच्या हातून बहुधा होत नाहीं हें खरें आहे; पण हिंदु लोकांत, निदान मराठे लोकांत तरी 'दिधलें दुःख परानें उसनें फेडूं नयेच सोसावें" अशा तऱ्हेचा नामर्दपणा अद्याप उत्पन्न झाला नाहीं, ही मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे. मुंबईच्या दंग्यापासून सरकारानें जर कांहीं बोध घ्यावयासारखा असला तर तो हाच होय, व ही स्थिति लक्षांत आणून पुढील बंदोबस्त सरकारानें केला, तरच हिंदुमुसलमानांतील दंग्याचें खरें बीज नाहीसें होऊन राष्ट्रांत शांतता राहण्याचा संभव आहे, हल्लीं मुसलमानांबद्दल सरकारी अम्मलदार जो पक्षपात दाखवितात तो अन्याय्य आहे.

.....इंग्रजसरकारच्या राज्यांत सर्वांनीं सुखासंतोषानें राहून एकमेकांच्या हक्कास जपावें, एकमेकांस साह्य करावें, व्यापारधंद्यास उत्तेजन द्यावें, व हरएकप्रकारें आपल्या देशाची स्थिति सुधारून जेणेंकरून आपणांस सौख्य होईल तो मार्ग स्वीकारावा असें प्रत्येक सुशिक्षित हिंदूचें व मुसलमानाचें मत आहे. दोन्हीं धर्मांतील लोकांस परस्परविरुद्ध अशीं कांहीं तत्त्वें धर्मदृष्ट्या ग्राह्य आहेत. उदाहरणार्थ, गाय मारणें व गाय पूज्य मानणें, मूर्तीचा भंग करणें व मूर्तिपूजा करणें इत्यादि. परंतु मोंगलाईंत अगर पेशवाईंत ज्याप्रमाणें अनुक्रमें मुसलमानधर्माची व हिंदुधर्माची सरशी होण्यास मुसलमान अगर हिंदु लोक प्रयत्न करीत असत तसे दिवस आतां राहिले नाहींत; हें दोन्ही धर्मांतील लोकांस बहुतेकपणें पूर्णपणें समजलें आहे. शंभर वर्षांपूर्वीं महादजी

शिद्यानें दिल्लीच्या बादशहापासून मोंगलांच्या मुलुखांत गोवध बंद करण्याची सनद ज्याप्रमाणें घेतली तसा प्रकार हल्लींच्या काळांत होणें शक्य नाहीं अगर अवरंगजेबानें ज्याप्रमाणें हिंदूंचा छळ केला तसा आतां मुसलमानांसहि करतां येणार नाहीं, या दोन्हींहि गोष्टी त्या त्या धर्मांतील लोकांस माहीत आहेत. प्रस्तुतचे राज्यकर्ते हिंदुहि नाहींत व मुसलमानहि नाहींत. करितां त्यांस धर्मसंबंधानें औदासीन्य स्वीकारणें भाग पडलें आहे व हें औदासीन्य धरल्यामुळेंच त्यांच्या राज्याचा गाडा आज पाऊणशें ऐशीं वर्षे सुरळीत चालला आहे. हें औदासीन्य जोंपर्यंत कायम राहील, जोंपर्यंत इंग्रज सरकार आपण होऊन मुसलमानांस हातीं धरून हिंदूंचा अव्हेर करणार नाहीं अगर हिंदूंचा पक्षपात करून मुसलमानांस स्वधर्माप्रमाणें आचरण करण्यास प्रतिबंध करणार नाहीं, तोंपर्यंतच मोठमोठ्या इंग्रजी मुत्सद्यांनीं दूरदर्शीपणानें रचलेला इंग्रजी राज्याचा पाया कायम राहील. त्यांतूनहि ज्या दोन जातींचा तंटा सरकारास मिटवावयाचा आहे त्यांपैकीं एक अत्यंत दुर्बळ, गरीब व भित्री, आणि दुसरी त्याचमानानें बलवान, उद्धट व दांडगी असती तर गोष्ट निराळी; परंतु वर सांगितल्याप्रमाणें हिंदु मुसलमानांची स्थिति अशा प्रकारची नाहीं. निदान, महाराष्ट्रांत तरी मराठे लोक मुसलमानांनीं केलेला आपला अपमान सहन न करतां त्यांजवर तुटून पडून अब्रू राखतील हें निर्विवाद आहे. अशा स्थितींत प्रत्येक जातीस इतर लोकांचा उपसर्ग न होतां आपआपल्या धर्माप्रमाणें वागूं देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. हिंदु लोकांस ज्याप्रमाणें आपले सणवार करण्याचा हक्क आहे त्याचप्रमाणें मुसलमान लोकांसहि आहे, व जाणूनबुजून जोंपर्यंत यांपैकीं एकजण दुसऱ्याच्या वाटेस जात नाहीं अगर त्यांचें मन दुखविण्याचा प्रयत्न करीत नाहीं तोंपर्यंत सरकारनें निःपक्षपातानें दोघांचेंहि सारखेंच संरक्षण केलें पाहिजे. महादजी शिद्याप्रमाणें इंग्रजलोकांनीं हिंदु लोकांसाठीं गायी न मारण्याची सनद मुसलमान लोकांपासून घ्यावी असें आम्ही म्हणत नाहीं व म्हटलें असतां इंग्रज-सरकार ऐकावयाचेंहि नाहीं; परंतु ज्या ठिकाणीं गायी मारण्याचीं दुकानें नव्हतीं त्या ठिकाणीं भर हिंदूंच्या वस्तींत मुसलमानांस सदर दुकानें घालण्याची परवानगी देणें म्हणजे हिंदुलोकांस विनाकारण चिथविण्यासारखें आहे व केव्हांना केव्हां तरी त्याचा प्रतिकार करण्याचें हिंदु लोकांच्या मनांत राहील हें सरकारनें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

...... कोणत्याहि धर्माचा अभिमान न ठेवतां दोघांसहि आपआपल्या धर्मानें वागण्याची सवलत द्यावी व विनाकारण एका जातीचे लोक दुसऱ्या जातीच्या लोकांस हरकत करूं लागल्यास त्यांचें राजानें शासन करावें हेंच शहाण-

पणाचें तत्त्व आहे. हिंदु लोक गंध लावतात, सोवळ्यानें जेवतात, नागाची पूजा करतात, मूर्ति स्थापतात, गाईस भजतात, म्हणून जर मुसलमान लोकांस वाईट वाटून दंगा करण्यास प्रवृत्त झाले तर त्यांस इंग्रज सरकारानें शासन केलें पाहिजे व असें शासन न झाल्यास हिंदु लोकांच्या मनांतील रुखरुख कधींहि नाहींशी न होतां संधि सांपडेल तेव्हां ते मुसलमानांचा सूड घेण्यास प्रवृत्त होतील. उलट मुसलमानांचा प्रकारहि याचप्रमाणें आहे. हिंदूलोक गाईस पूज्य मानतात म्हणून जर ते मुसलमान मोहल्यांत जाऊन खाटकाच्या हातून बलात्कारानें गाय सोडवून आणतील तर त्यांचाहि इंग्रज सरकारच्या कायद्यानें बंदोवस्त झाला पाहिजे. सारांश, धारवाडी कांट्यांत घातल्याप्रमाणें समतोल एका मापानें हिंदुमुसलमानांस जेव्हां न्याय मिळूं लागेल तेव्हांच दोन्ही जातींतील वैमनस्य नाहींसें होऊन त्या सुखानें नांदूं लागतील. इंग्रजसरकारचे कांहीं कामगार हें तत्त्व विसरून जाऊन अनेक वेळां हिंदुस्थानांतील लोकांत कलह लागले तरच इंग्रजी राज्याचें हित आहे अशा समजुतीनें मुसलमान लोकांस फाजील उत्तेजन देत असतात. ......... हिंदु लोक धोतर नेसतात म्हणून जर उद्यां मुसलमान लोक चिडूं लागले तर त्यांत मूर्खपणा व दोष कोणाचा ! अशा वेळीं मुसलमान लोकांस सरकारानें चांगलीच जरब देऊन ताळ्यावर आणणें जरूर आहे. मुसलमान लोकास वचकून अथवा भिऊन आम्ही जर आमच्या नेहमींच्या गोष्टी करणें सोडून द्यावयाचें, तर मग इंग्रजसरकारचें राज्य असण्याची बिलकुल जरूर नाहीं. आम्हीं जाऊन मुसलमानांच्या पाया पडूं व ते देतील तें खाऊं, पण ही स्थिति जोंपर्यंत आली नाहीं, जोंपर्यंत हिंदु लोक इतके हताश अगर नामर्द झाले नाहींत, अगर मुसलमान-लोकांचा प्रतिकार करण्याची त्यांचे अंगांत धमक आहे, तोंपर्यंत सरकारास दोन्ही जातीस न्यायानें आणि निःपक्षपातानें वागविणें जरूर आहे....

### दंगे कशानें बंद होतील ?

....हिंदु, मुसलमान, आणि सरकार असे तीन पक्ष घेतल्याखेरीज दंग्याच्या कारणाची नीट उपपत्ति लागत नाहीं. मागील राज्यांतून जातींच्या पुढाऱ्यास अगर पंचांस जो अधिकार असे तो आतां राहिला नाहीं. सर्व गोष्टी कायद्यानें बांधून गेल्या आहेत व कायदा ज्यास त्यास समजूं लागला आहे. अशा स्थितींत फक्त हिंदु व मुसलमान पुढाऱ्यांच्या हातूनच दंग्याचीं कारणें निःशेष होतील असें आम्हांस वाटत नाहीं. गोडीगुलाबीनें जेवढा भाग व्हावयाचा असेल तेवढा भाग या पुढाऱ्यांच्या हातून पार पडेल; पण जेथें अमुक गोष्ट अमक्या लोकांनीं करावी कीं नाहीं अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात व त्यांचा निकाल कायदेशीर रीतीनेंच लागणें जरूर आहे. तेथें दंगा होणें अगर न होणें हें

सर्वस्वी सरकारी अधिकाऱ्यांच्याच वर्तनावर अवलंबून आहे. मुसलमान व हिंदु यांचे कांहीं कांहीं आचार व रीति परस्परांस अगदीं चीड येण्यासारख्या आहेत व त्या एकमेकांनीं किती पाळाव्या याबद्दल कांहीं तरी स्पष्ट नियम असणें व ते नियम सरकारी अधिकारी यांनीं निर्भीडपणें व निर्धास्तपणें अमलांत आणणें अगदीं अवश्य आहे. जोंपर्यंत असें नियम झाले नाहींत, जोंपर्यंत सरकारी अधिकाऱ्यां-कडून भीतीनें म्हणा अगर पक्षपातानें म्हणा मुसलमान लोकांसच फूस मिळत आहे व जोंपर्यंत सर चार्लस क्रास्थवेट सारखे अधिकारी विनाकारण हिंदुलोकांस नांवें ठेवण्यास व दूषणें देण्यास तयार आहेत तोंपर्यंत हिंदु अगर मुसलमान पुढाऱ्यांच्या हातून असल्या दंग्याचा सर्वस्वीं बींमोड होणें अगदीं अशक्य होय. पुढारी व समंजस लोक मग ते हिंदु असोत वा मुसलमान असोत, बहुधा कोठेहि असल्या दंग्यांत आपण होऊन पडत नाहींत हें आतां निर्विवाद सिद्ध झालें आहे. हिंदु—मुसलमानांचे तंटे होणें त्यांस इष्ट वाटत नाहीं इतकेंच नव्हे, तर आपल्याकडून ते असल्या गोष्टीपासून होईल तितके अलिप्त रहात असतात. दंगे होण्यास मुख्य कारण अडाणी लोकच होत व त्यांची समजूत सरकारनें आपलें वर्तन सुधारल्याखेरीज नुसत्या पुढारी लोकांकडून कधींहि व्हावयाची नाहीं. पुढारी लोकांस विनंती करून सरकार आपणावरील जबाबदारी कमी करूं पहात आहे, पण हा प्रयत्न सिद्धीस जाईल असें आमच्यानें म्हणवत नाहीं.

# ४. मुसलमानांच्या उद्धारार्थ नवा अवतार !

[ ६ फेब्रुवारी १८९४ ]

राष्ट्रीयसभा लाहोरास भरली त्यावेळीं अल्लीगड येथें मुसलमानांची जी विद्यापरिषद भरली होती त्याची थोडीशी हकीगत मागें आम्हीं दिलीच आहे. आज त्याच परिषदेच्या अंगभूत म्हणून जी दुसरी एक सभा स्थापन झाली आहे तिच्या प्राणप्रतिष्ठेच्या वेळीं अल्लीगड येथील सर सय्यद अहंमद यांनीं स्थापिलेल्या मुसलमानी कॉलेजाचे प्रिन्सिपॉल मि. वेक यांनीं जें भाषण केलें त्याचा सारांश देण्याचा आमचा विचार आहे. हिंदुलोक मुसलमानांशी नीट वागत नाहींत इत्यादि प्रकारचे त्यांजवर आरोप करणारे व वर्तमानपत्रकारांनीं अमक्या तऱ्हेनें लिहावें असा त्यांस उपदेश करणारे दिवाण बहादुर काजी शहाबुद्दीन मुसलमानांच्या उद्धारार्थ अवतीर्ण झालेल्या या युरोपियन गृहस्थाचे उद्गार ऐकण्यास अल्लीगड येथें हजर नव्हते हें एक आमचें मोठें दुर्दैवच समजलें पाहिजे. तथापि या दिवाणबहादुरांची उणीव सर सय्यद अहंमद, नवाब मेहदीअल्ली ऊर्फ मोशीन उल्मुलुख वगैरे बड्याबड्या मुसलमान अधिकाऱ्यांनीं भरून काढिली होती. तेव्हां बेकसाहेबांनीं केलेलें भाषण बऱ्याच मोठमोठ्या मुसलमानांस पसंत असावें, किंबहुना त्यांस पसंत होतें म्हणूनच असें घाणेरडें आणि उद्दाम व्याख्यान देण्यास बेकसाहेब धजावले असें म्हणण्यास आम्हांस कोणतीहि हरकत दिसत नाहीं. मुसलमान लोक विद्येंत मागसलेले आहेत म्हणून त्यांस विद्या देण्यासाठीं होईल तितकी खटपट करणें हें सरकारचें, मुसलमानांचें आणि इतर लोकांचेंहि कर्तव्य आहे; परंतु मुसलमानांस विद्या देण्याच्या मिषानें जर कोणी त्यांच्या मनांत हिंदूबद्दल द्वेषभाव उत्पन्न करून देईल तर तो इंग्रजी राज्याचा व हिंदुस्थानांतील लोकांचा पुरा शत्रु आहे असें म्हणण्यास आम्हांस बिलकुल शंका वाटत नाहीं. मि. बेक यांची गणना त्यांच्या व्याख्यानावरून याच वर्गांत करावी लागते. मुसलमानी कॉलेजाचे हे प्रिन्सिपॉल आहेत, व त्या नात्यानें भावी मुसलमान विद्वानांवर त्यांच्या बोलण्याचा वाईट परिणाम होण्याचा संभव आहे म्हणूनच आम्ही त्यांच्या भाषणास इतकें महत्त्व देतों. नाहींपेक्षां मि. बेक यांची वेड्यांत गणना करून आम्ही स्वस्थ राहिलों असतों.

राष्ट्रीयसभेस शिव्या द्याव्या, हिंदु लोकांशीं मिसळूं नये आणि इंग्रजांची कांस बळकट धरावी ही तीन मि. बेक यांनीं उपदेशिलेल्या धर्माचीं मुख्य तत्त्वें

होत. इंग्रज लोकांस हिंदुस्थानांतून हांकून देण्याकरितां राष्ट्रीयसभा स्थापन झाली आहे व मुसलमानांस चिडविण्याकरितां आणि इंग्रजलोकांचें व मुसलमान लोकांचें अन्न तोडण्याकरतां गोरक्षणाची चळवळ हिंदूंनीं चालविली आहे असेंहि या राजेश्रींनी सभेंत जमलेल्या लहानथोर मुसलमानांस स्पष्टपणें सांगितलें आहे. इतकेंच नव्हे तर मुंबईचा दंगा हिंदुलोक हल्लीं जी राजकीय हक्क मिळविण्याकरितां चळवळ करीत आहेत त्या चळवळीचा अप्रत्यक्षच परिणाम होय व राष्ट्रीयसभेच्या चळवळीनें पुढें मागें असेच दंगे होतील असेंहि ह्या साहेबांनीं भाकीत केलें आहे ! अल्लीगड येथें जमलेले मुसलमान गृहस्थ अशा प्रकारचें बेकसाहेबांचें भाषण स्तब्धपणें ऐकून घेण्याइतके वेडेपीर असतील असें आम्हांस आजपर्यंत वाटत नव्हतें. दंग्याचीं कारणें सांपडणें अशक्य आहे व तीं शोधून काढण्याचा प्रयत्न करणें निरर्थक होईल असा जो मुंबईसरकारानें आपल्या ठरावांत शेरा दिला आहे त्यापूर्वीं अल्लीगड येथील मुसलमानांच्या उद्धारार्थ निपजलेल्या या नव्या पिराचें भाकीत व सिद्धांत त्यांच्या कानीं पडले नसावे असें आम्हांस वाटतें. एरव्हीं व्हिन्सेंटसाहेबांच्याऐवजीं बेकसाहेबांची मुंबईच्या पोलिस कमिशनरच्या जागीं त्यांनीं खास योजना केली असती !

हिंदुलोकांनीं हल्लीं ज्या चळवळी चालविल्या आहेत त्यांमुळें सर्व राज्यसत्ता त्यांच्या हातांत जाईल आणि मुसलमानांस कोणीहि विचारणार नाहीं असा बेकसाहेबांच्या मनाचा ग्रह झाला आहे. निदान आपल्या मुसलमान श्रोत्यांचा तरी तसा ग्रह व्हावा अशी त्यांची इच्छा आहे असें त्यांच्या भाषणावरून दिसून येतें; व हें संकट टाळण्यासाठीं मुसलमान व इंग्रज यांनीं मिळून एक सभा स्थापन करावी व संयुक्त सभेनें मुसलमानांचे हक्क सुरक्षित ठेवून इंग्रजी राज्याचा पाया बळकट करण्यास झटावें अशी बेकसाहेबांची सूचना होती. हिंदुलोकांच्या चळवळीचा प्रतिकार हा केलाच पाहिजे; परंतु तो कसा करावा याबद्दल बेकसाहेबांनीं चार उपाय सुचवून अखेरीस मुसलमान--इंग्रजांची सभा स्थापावी हाच उपाय सर्वांशीं निर्दोष व हितकारक आहे असें आपल्या मतांनीं सिद्ध केलें. ते म्हणाले कीं, हिंदुलोक ज्या चळवळी करीत आहेत त्या सर्व राजद्रोही असल्यामुळें मुसलमानलोकांस त्यांत शिरतां येत नाहीं. हिंदुलोकांप्रमाणें मुसलमानांनीहि चळवळ करावी हा दुसरा उपाय होय. पण एकदां चळवळ सुरू झाली असतां तिचा मुख्यत्वेंकरून मुसलमानलोकांवर काय परिणाम होईल याचा साहेबबहादुरांस नीटसा अदमास लागत नसल्यामुळें त्यांनीं आपल्या श्रोत्यांस हा मार्ग सोडून देण्यास सांगितलें. न जाणो आपण करावयास जावें एक आणि होईल तिसरेंच. मुसलमानलोकांस चळवळ करावयास

शिकविली तर ते पुढेंमार्गें कदाचित् हिंदूंसहि जाऊन मिळतील व तसें झालें म्हणजे हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांची सत्ता नाहींशी होईल आणि त्याबरोबरच बेकसाहेबांस आपला गाशा गुंडाळून विलायतेस जावें लागेल अशी बेकसाहेबांस भीति पडली असावी. कसेंहि असो. राष्ट्रीयसभेसारख्या संस्थांस तुम्ही जाऊन मिळूं नका. इतकेंच नव्हे तर सदर सभेसारख्या मुसलमानी संस्थाहि काढूं नका असा त्यांनीं आपल्या भाविक शिष्यांस स्पष्ट उपदेश केला. राष्ट्रीयसभेस मिळूं नका आणि सदर सभेसारख्या सभाहि काढूं नका तर करा तरी काय असा सहजच एक प्रश्न उत्पन्न होतो. बेकसाहेबांनीं या प्रश्नास असें उत्तर दिलें आहे कीं, एक लहानशी सभा काढून युरोपियन लोकांच्या मदतीनें आणि सल्लयानें मुसलमान लोकांचे हक्क सरकारापुढें मांडा, व हिंदुविरुद्ध सरकारास लागेल तेवढी मदत करा म्हणजे झालें. या सभेची रचना व नियम कसे असावे याचा विचार बेकसाहेबांनीं आपल्या भाषणांत केला नाहीं. हें काम कमिटीकडे सोंपवावें अशी त्यांची सूचना होती व त्याप्रमाणें एक कमिटीहि नेमण्यांत आली आहे. मुसलमान–इंग्रजांची एक छोटीशी सभा करून सदर सभेनें हिंदुलोकांच्या चळवळी होईल तितक्या बंद करण्यास झटावें एवढाच बेकसाहेबांच्या बोलण्याचा आशय होता व एवढ्याच करितां विद्यापरिषदेच्या वेळीं त्यांनीं हें भाषण केलें असावें.

असो. बेकसाहेबांनीं असें कां भाषण केलें याची मीमांसा करीत बसण्यापेक्षां त्यांच्या भाषणांत सत्याचा, सौजन्याचा आणि राजनिष्ठतेचा किती भाग आहे एवढेंच आपण तूर्त पाहूं. राष्ट्रीय सभा इंग्रज लोकांस हांकून देण्यास आणि गोरक्षण सभा मुसलमान लोकांस उपाशीं मारण्यास स्थापन झाल्या आहेत असें म्हणण्याचें धाष्टर्य कोणीहि नेटिव्ह गृहस्थास झालें असतें कीं नाहीं याचा आम्हांस वानवाच आहे. बेकसाहेबांस हीं दोन तत्त्वें कोठें सापडलीं असतील तीं असोत. परंतु मोठमोठे मुसलमान लोकहि हीं तत्त्वें मुकाट्यानें ऐकून घेतात, तर इंग्रजी अधिकारी हिंदुस्थानांतील रहिवाशांत दुफळी माजवून आपलें राज्य चालवितात व ते स्वतःच गोभक्षक असल्यामुळें मुसलमान लोकांची ते तरफदारी करतात, असले आरोप कोणाहि हिंदूनें सरकाराविरुद्ध केल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. बेकसाहेबांचें मत मुसलमानांनीं विद्याभ्यास करावा असें आहे यांतच आम्हांस संतोष आहे. कारण इंग्रजी विद्येचें व इतिहासाचें ज्यानें परिशीलन केलें आहे त्यास इंग्रज लोक मुसलमानांस अगर हिंदूंस अखेरीस सारखेच गणून दोघांपैकीं कोणासहि भांडल्याखेरीज मुळींच हक्क देणार नाहींत असें आज नाहीं तर उद्यां उघड कळून येईल. राज्यकर्ते आणि प्रजा हा मुख्य भेद आहे, व

त्याच्यापुढें हिंदुमुसलमानादि सर्व भेद रद्द होत. आज मुसलमान लोकांवर कांहीं इंग्रज फिदा होत असतील पण इंग्रज लोकांचा हा अनुग्रह अगदीं कावेबाजी-पणाचा आहे हें धूर्त मुसलमानांच्या कधींहि लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. राष्ट्रीय सभेस हल्लीं जे कित्येक मुसलमान सद्‌गृहस्थ येतात त्यांनीं हा उद्देश लक्षांत आणूनच राष्ट्रीयसभेस मदत करण्याचें ब्रीद पतकरिलें आहे, व राज्यकर्त्यां-कडून जर कांहीं आपलें कल्याण करून घ्यावयाचें असलें तर तें हिंदुमुसलमानांच्या एकोप्याखेरीज कधींहि व्हावयाचें नाहीं, असा त्यांच्या मनाचा ग्रह झालेला आहे. बेक साहेबांनीं कितीहि ओरड केली तरी भावी सुशिक्षित मुसलमानांचा असा ग्रह झाल्यावांचून कदापिहि राहणार नाहीं. राष्ट्रीयसभा कोणत्याहि विशिष्ट जातीकरितां नसून ती ज्या हक्कांकरितां भांडत आहे ते मुसलमानांस व हिंदूंस सारखेच मिळावयाचे आहेत. राष्ट्रीयसभेस शिव्या देतांना सदर सभेच्या उद्योगा-मुळें प्राप्त झालेले हक्क मुसलमान लोकांनीं घेऊं नयेत असा जर बेकसाहेबांनीं आपल्या श्रोत्यांस उपदेश केला असता तर आपल्या समजुतीप्रमाणेंच कां होईना पण सद्‌बुद्धीनें तरी हे साहेब उपदेश करीत आहेत असें आम्हीं म्हटलें असतें, पण सध्यांच्या त्यांच्या भाषणांवरून हिंदुस्थानांत कज्जे लावण्यांत व राणीच्या प्रजेमध्यें असंतोष व वैमनस्य उत्पन्न करून राजद्रोह संपादन करण्यास बेकसाहेबांचा अवतार येथें झाला आहे असें आम्हांस म्हणावें लागतें; व साहेब बहादुरांच्या ह्या उपदेशाचें खरें स्वरूप आमचे मुसलमानबंधूहि लवकरच ओळखल्याखेरीज राहणार नाहींत अशी आमची उमेद आहे.

---

# खंड पाचवा

## परतंत्र भारताच्या आर्थिक समस्या– शेती, स्वदेशी व बहिष्कार

### १. शेतकऱ्यांचा कायदा

[ २ फेब्रुवारी १८९२ ]

हिंदुस्थानांतील एकुणीस-वीसांश लोकांचा उदरनिर्वाह परोक्ष किंवा अपरोक्ष रीतीनें जमिनीवर चालतो; पण त्या जमिनीची लागवड करणाऱ्या शेतकरी वर्गास कोण विपन्नावस्था प्राप्त झाली आहे ह्याचा विचार केला म्हणजे आंगावर कांटा उभा राहतो. घरांत अठरा विस्वे दारिद्र्य! कर्जाचा बोजा डोईवर इतका कीं, घरदार गुरेंढोरें गहाण पडलीं तरी सालअखेर कशी मजल पोंचेल ह्याची पंचाईत! सरकारदस्त तर दरवर्षास तारखेच्या तारखेस भरला पाहिजे, नाहींतर जमिनीचा लिलांव होण्याची पाळी यावयाची. त्यांत अवर्षण, टोळधाड वगैरे अवांतर अरिष्टें अलीकडे वरचेवर कृपादृष्टि करूं लागल्यामुळें दोनचार वर्षांनीं यमस्वरूपीं दुष्काळ दत्त म्हणून उभा आहेच! वर्षांतून आठ महिने उपासमार सोसून केवळ पुढच्या हंगामाच्या आशेवर कसें तरी जीवित कंठावें, व शेवटीं ऐन वेळीं पावसानें टाळा दिला म्हणजे सावकाराचें घर पहावें अशी बिचाऱ्या शेतकऱ्यांची स्थिति पाहून कोणास बरें कींव येणार नाहीं? पूर्वी अशा प्रसंगीं सावकार लोक उदारपणानें शेतकऱ्यांस मदत करीत, व वेळीं राजेलोकहि सूट देत; पण अलीकडे तेहि मार्ग बंद झाले. शेतकऱ्यांचा कायदा झाल्यापासून सावकार कर्ज देईनातसे झाले, कारण आपले पैसे परत मिळतील असा त्यांना मुळींच भरंवसा नाहीं. सरकार तर बोलून चालून व्यापारी, तेव्हां सुटीची गोष्टच नको. पाऊस असो वा नसो, पीक येवो अगर न येवो, शेतकरी व त्यांचीं मुलें-माणसें उपाशीं मरोत किंवा तुरुंगांत जावोत, सरकारदस्त नेमलेल्या तारखेच्या आंत कचेरींत भरलाच पाहिजे. यंदा सोलापूर जिल्ह्यांत दुष्काळ इतका आहे कीं, सध्यांच लोक दोन पैशाला गाई-बैल विकूं लागले, तरी सरकार देणें थकलें काय तें तेवीस रुपयेच! आणि ही स्थिति येण्याला

कारण सावकार लोकांचा जुलूम अशी सरकारची पक्की समजूत झाली! तेव्हां सावकारांच्या त्रासापासून शेतकऱ्यांचें रक्षण करण्याकरितां म्हणून सरकारानें शेतकऱ्यांचा कायदा केला; पण त्यापासून उपयोग कांहीं एक न होतां ज्यांच्या हिताकरितां तो करण्यांत आला त्यांचे हाल वाढतच चालले. सावकारांचा जाच कमी व्हावा म्हणून सरकारानें शेतपेढ्या काढल्या, व स्वतःच सावकारी करण्यास सुरवात केली; तरी शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत्या दिशेलाच आहे. इतकेंच नाहीं तर शेतकऱ्यांचें दारिद्र्य कमी करण्याकरिता जो कायदा केला तोच उलटा त्यांना घातक होतो अशी लोकांची ओरड आहे; तेव्हां एकंदर प्रकरणाची चौकशी करण्याकरितां सरकारनें कमिशन नेमलें. एखादी गोष्ट अगदीं नेटास लागली म्हणजे चौकशी करण्याकरितां कमिशन नेमून तूर्तातूर्त तरी लोकांचीं तोंडें बंद करणें हा एकुणिसाव्या शतकांत सर्वसंमत झालेला सुधारलेला उपाय आमच्या सरकारास चांगला अवगत आहेच. त्याप्रमाणें शेतकऱ्यांची खरी स्थिति समजून घेण्याकरितां म्हणून नुकतेंच नेमलेलें कमिशन गांवोगांव फिरून पुरावा गोळा करूं लागलें आहे हें ठीकच झालें. ह्या एवढ्या खटाटोपापासून अगदींच कांहीं निष्पन्न होणार नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. तरी पण आजपर्यंत होऊन गेलेल्या शेकडों कमिशनांचा इतिहास पाहिला म्हणजे ह्या विषयाचा एकदांचा शेवट होईल अशी आशा करण्यास फारसें सबळ कारण दिसत नाहीं. कमिशनाचें काम चालू आहे म्हणून सध्यांच ह्यासंबंधानें आम्ही कांहीं अभिप्राय देऊं इच्छित नाहीं, तथापि त्यापासून खरोखर फलप्राप्ति करून घेण्याची लोकांची इच्छा असेल – आणि तशी असलीच पाहिजे – तर आपल्याकडून होईल तितकें करून वस्तुस्थिति कमिशनरांच्या नजरेस आणणें प्रत्येक जिल्ह्यांतील, तालुक्यांतील व खेड्यांतील लोकांनीं आपलें कर्तव्य समजलें पाहिजे, एवढें येथें सांगणें जरूर आहे. शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचें मुख्य कारण सावकारांचा जुलूम नसून सरकाराचाच कडकपणा होय. पण ह्या गोष्टीकडे सरकारतर्फे नेमलेल्या कमिशनाचें दुर्लक्ष होण्याचा पुष्कळ संभव आहे, आणि सर्व दोषांचें खापर बिचाऱ्या सावकारांच्या डोक्यावर फोडून शेतकरी कायदारूपी रामबाण औषधाचा आणखी एकवार प्रयोग केल्यानें आपल्यावरची जबाबदारी टाळण्याची संधी सापडल्यास सरकारास आनंदच होईल हें उघड आहे. सबब ह्या प्रसंगीं लोकांनीं आपल्याकडून कोणत्याहि प्रकारची कसूर होऊं देणें रास्त होणार नाहीं; असो, या विषयावर कलकत्ता येथील स्टेट्स्मन पत्रांत फार विचारपूर्वक लेख आले आहेत ते कमिशनच्या नजरेखालीं जातीलच; पण लोकांनाहि त्यांची माहिती असणें अवश्य आहे.

सबब त्यांतील मुख्य मुद्दे मात्र सारांशरूपानें आज देतों. शेतकऱ्यांच्या कर्ज-बाजारीपणाबद्दल सावकार लोक जबाबदार नसून खरें कारण सरकाराचाच कडकपणा होय ; इतकेंच नाहीं, तर सावकार लोकांपासून शेतकऱ्यांस पूर्वी जी पुष्कळ प्रकारची मदत मिळत असे तीहि कायदा झाल्यापासून बंद झाल्यामुळें त्यांचे अतिशयच हाल होऊं लागले आहेत, वगैरे गोष्टी स्टेट्स्मनकर्त्यांनीं सुरेख रीतीनें सिद्ध केल्या आहेत, व हल्लींची स्थिति सुधारण्यास खरा उपाय एकच आहे तोहि त्यांनीं सुचविला आहे.

गेल्या नोव्हेंबर महिन्यांत सरकारानें एक वट हुकूम प्रसिद्ध केला, त्यांत म्हटलें आहे कीं, दक्षिण प्रांत इंग्रजसरकारच्या ताब्यांत आला त्यावेळेसच सर्व रयत कर्जानें बेजार होती व म्हणून प्रत्येक भावांत सावकाराची हमेषा जरूर पडत असे, परंतु हें विधान भ्रांतिमूलक आहे असें स्टेट्स्मनकर्त्याचें म्हणणें आहे. सर्व खेड्यांमध्यें दिसावयाला कर्जाची मोठी रक्कम दिसते खरी; पण तें कर्ज खेड्याचें समाईक असे, शेतकऱ्यांचें खाजगी नसे, व तें फेडण्याची जबाबदारीहि एकंदर गांवावर असे. प्रथमतः गांवच्या वसुलाच्या हमीवर सावकार लोक, पेशवे सरकारास म्हणून कर्ज देत ; आणि तें फेडण्याच्या वेळेस गांवचा पाटील तें उत्पन्नांतून चुकतें करी. कर्ज फार वाढलें तर एखाद्या वर्षी वसूल माफ करून फेड करून टाकीत ; व चाप्लिनसाहेब म्हणतात कीं नेहमीं अशीच वहिवाट असे. थोडें असेल तर गांवकरी आपणच तें चुकवीत. एकंदरींत रयतेच्या पूर्वीच्या स्थितींत व इंग्रजी सुधारणा अमलांत आल्यानंतरच्या स्थितींत कोणत्याहि प्रकारचें साम्य नाहीं. एल्फिन्स्टन, चाप्लिन, थाकरी, ग्रांटप्रभृतींनीं ह्या संबंधानें सविस्तर लिहून ठेवलेले रिपोर्ट मुंबई सेक्रेटारियटच्या दप्तरांत कसरीच्या भक्ष्यस्थानीं पडत आहेत पण तिकडे कोणाचेंहि लक्ष जात नाहीं. १८७५ सालीं सावकाराच्या जुलुमास त्रासून त्यांचा सूड घेण्याकरतां शेतकऱ्यांनीं दंगा केला होता. तेव्हां एक कमिशन नेमलें व त्या कमिशननें एक भला जंगी रिपोर्ट प्रसिद्ध केला. पण त्यांत मुख्य कारण एकीकडेंच ठेवून बारीकसारीक गोष्टींवरच जोर दिला होता; व नंतर सरकारानें शेतकऱ्यांचा कायदा केला त्यांतहि तोच प्रकार. हल्लींची इंग्रजी राज्यपद्धति ही स्थिति येण्यास किती अंशानें कारण झाली आहे ह्याचा कोणीच विचार केला नाहीं, आणि खरेंच, इंग्रजी कामदारांना हल्लींची व्यवस्था उत्तम वाटते, तेव्हां त्यांना तींत दोष दिसले नाहींत तर आश्चर्य नाहीं ! आणि म्हणूनच शेतकरी-कायद्यासारखा अर्धवट कायदा झाला. त्यानें मुख्य कारणाचा प्रतिकार मुळींच झाला नाहीं; व शेतकऱ्यांचें दारिद्र्यहि जसेंचें तसेंच राहिलें. फार तर सावकारांचा तात्कालिक जुलूम वांचला असेल. त्या

कायद्याप्रमाणें शेतकऱ्यांच्या स्थावर इस्टेटीवर सावकाराचा हक्क नाहीं पण गुरें आउतें वगैरे आवश्यक साधनें त्याला विकतां येतात. अर्थात तीं नवीन खरेदी करण्यास कुणव्यास पुन: सावकाराचें तोंड पाहिलेंच पाहिजे व त्याकरितां घरदार, जमीन गहाण ठेवावी लागते. येणेंप्रमाणें पहिल्या खेपेस नाहीं तरी दुसऱ्या खेपेस तो सर्वस्वी मुकतो. कायद्यांत दुसरींहि बारीक-सारीक व्यंगें आहेत पण त्यांचा विचार येथें नको. सरकारधाराच मुख्यत्वेंकरून लोकांच्या दैन्यास कारण आहे, व म्हणून तो कायमचा ठरवून न टाकतां रयतेच्या ऐपतीप्रमाणें घ्यावा अशी मागील कमिशनानें भीत भीत सूचना केली होती. परंतु मुंबई सरकारास अर्थातच ती न आवडून असें करणें म्हणजे आजपर्यंतच्या सुधारणा व्यर्थ दडवून पुन: पूर्वस्थिति आणणें होय, तेव्हां ती गोष्ट कदापि होणें नाहीं असें चोख उत्तर इकडून मिळालें ! असो. मुंबई सरकारानें डोळेझांक केली तरी हिंदुस्थान सरकारानें ह्या गोष्टीचा विचार करावा व एकाद-दुसऱ्या प्रांतांत तरी कमिशननें सुचविलेल्या उपायाचा अनुभव घेऊन पाहावा अशी स्टेट्स्मनकर्त्यांची शिफारस आहे. व ती वावगी आहे असें कोण म्हणेल ?

शेतकरी कायद्यानें दक्षिणेंतील कुणब्याची अवस्था सुधारत न जातां अधिक अधिकच खडतर होत आहे, अशी आतां सर्वांची खात्री झाली आहे व ही स्थिति राहूं दिली तर ती इतर प्रांतांतहि फैलावून कांहींतरी भयंकर अरिष्ट ओढवेल असें वाटतें; सबब तावडतोब उपाय योजणें शहाणपणाचें काम आहे. ह्या संबंधानें विचार करावयाचा तिघांचा. शेतकरी, सावकार व सरकार. कोणत्याहि व्यवस्थेनें ह्या तिघांचें हित होईल तर ती उत्तम; पण हल्लीं तिघांचेंहि नुकसान होत आहे. रयतेच्या पाठीस तर हाल लागलेच आहेत. ह्या सर्व अरिष्टाला कारण सावकार अशी पुष्कळांची समजूत असल्यामुळें त्याची कोणाला कींव येत नाहीं ; पण ही चूक आहे. वस्तुत: सावकारावांचून रयतेचें चालावयाचेंच नाहीं. शेतकीस लागणारें भांडवल तो पुरवितो ; पण कर्जदार बुडाला कीं तो बुडालाच; इतकेंच नाहीं तर तें भांडवलहि पुष्कळदां त्याचें नसून त्यानें दुसऱ्या मोठ्या पेढीवरून आणलेलें असतें. शेतकरी एखादे-वेळेस सुटून जातो, पण तो मात्र मध्येंच बुडतो. म्हणूनच सर रेमंड वेस्ट-साहेबांनीं म्हटल्याप्रमाणें दिवाणी तुरुंगांत ह्या सावकारांचाच विशेष भरणा आढळतो. बरें सरकारचाहि फायदा होतो असें नाहीं. सार्वजनिक कामें पुष्कळ करावयाचीं असतात, पण वसुलाची रक्कम कायम. तेणेंकरून दुष्काळच्या वर्षी सूट मदत म्हणून तोटा येतो. व सुकाळीं मात्र कांहीं फायदा होत नाहीं. वसूल रुपयांनीं आल्यामुळें बट्टा पडतो तो निराळाच. एकंदरींत हल्लींच्या

रीतीनें सर्वांचेच नुकसान होतें. रयतेची नेहमीं हातातोंडाशींच गांठ असल्यामुळें जमिनींत सुधारणा करण्यास त्याला सामर्थ्य नाहीं व उत्तेजनहि मिळत नाहीं. दक्षिण प्रांतांत पीक तर इतकें अनिश्चित आहे कीं, तीन वर्षांत एकदां चांगलें पीक आलें म्हणजे भाग्य असें चांगल्या माहितगारांचें म्हणणें आहे. आम्ही म्हणतों त्याप्रमाणें सरकारदस्त पैशाच्या रूपानें न घेतां वताई किंवा उत्पन्नाच्या रूपानें घेतला म्हणजे ह्या व दुसऱ्या सर्व अडचणी दूर होतील व तसें करणें फारसें कठीणहि नाहीं. हल्लीं सरकारच्या आचरणानें रयत व सावकार ह्यांच्या-मध्यें विनाकारण द्वैतभाव उत्पन्न झाला आहे. तसा तो राहण्याचें कारण नाहीं. सर विल्यम वेडरबर्न साहेबांसारखी ह्या विषयाची दुसऱ्या कोणासहि माहिती नाहीं. व त्यांनीं हीच पद्धति उत्तम ठरविली आहे. ह्या पद्धतीनें दुष्काळाच्या वर्षीं जेव्हां मुळींच पीक नसेल तेव्हां रयतेला कांहीं द्यावें लागणार नाहीं; व त्याचा वचर्पा अर्थात् सुवत्ता असेल त्यावर्षीं निघून सरकार व रयत दोघांसहि फायदा होईल. वताई वसूल करण्याची अडचण वाटेल तर प्रत्येक गांवांत सरकारनें जमीनदार म्हणून मनुष्य नेमावेत व त्यास मक्ता देऊन जबाबदार धरावें. ते कुलीन व ऐपतदार असले म्हणजे झालें. येणेंप्रमाणें सर्वांचाहि फायदा आहे.

असो. स्टेट्स्मन पत्रकर्त्याचे वरील विचार प्रत्येकानें मनन करण्यासारखे आहेत हें निराळें सांगावयास नको. कमिशनचें तिकडे लक्ष जाईल अशी आम्ही आशा करितो.

# २. हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावें लागेल काय ?

[ ६ व १३ डिसेंबर १८९२ ]

......अमेरिका आणि हिंदुस्थान या दोन देशांची स्थिति अगदीं भिन्न आहे. नव्या खंडांत जमीन मुबलक व माणसें थोडीं, अशी स्थिति असल्यामुळें कोणासहि लागेल तितकें अर्थार्जन करण्यास पूर्ण साधनें आहेत. जमिनींची म्हणून तूट नाहीं, मनुष्य करील तितकी मेहनत थोडी, असा तिकडे प्रकार आहे ; आणि जमीनहि अगदीं नव्या दमाची म्हणजे पूर्वी कधींहि न वाहिलेली असल्यामुळें अमेरिकेंतील लोक मोठ्या झपाटयानें द्रव्यार्जन करीत आहेत ; परंतु आमचेकडे म्हणजे ज्या देशांत आर्य लोकांची वसाहत होऊन आज कमींतकमी पांच सहा हजार वर्षें झालीं, तेथला प्रकार अमेरिकेहून अर्थातच अत्यंत भिन्न आहे, व विशेषें-करून इंग्रजी राज्यांतील सुखशांततेखालीं तर हा भेद अधिकाधिकच वळावत चालला आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक चांगली जमीन आज हजारों वर्षांच्या लागवडीनें निरस व निःसत्त्व होत चालली आहे. राव, कवळठा, शेण वगैरे खताचे पदार्थ उत्तरोत्तर जंगलांच्या त्रासानें आणि गायरानांच्या अभावानें दुर्मिळ होत चालले आहेत. देशांतील लोकांनीं परदेशगमन करावें तर तशी त्यांस सवय नाहीं, व सोयहि नाहीं, आणि इंग्रजसरकारच्या शांत अमलाखालीं लोकसंख्या उत्तरोत्तर झपाटयानें वाढत चालली आहे. व्यापारधंद्यांत कांहीं माणसें गुंतून राहिलीं असतीं, पण त्यांतील किफायतीचा बहुतेक भाग परदेशस्थ लोकांनीं उचलल्यामुळें तिकडूनहि कांहीं तरणोपाय राहिला नाहीं. जवळ सांचवलेली पुंजी होती नव्हती ती सर्व संपून गेली; आणि दुष्काळाचें साल आलें असतां महिना पंधरा दिवस तरी गेल्या सालाचे दाणे पुरतील असे शेतकरी शेंकडा पांच सांपडणें कठीण आहे. इंग्रजसरकारच्या अमलांतील शांतता अगदीं तारीफ करण्यासारखी अवर्णनीय खरी; परंतु ती शांतता विकत घेण्याकरितां आम्हांस आपल्या भाकरीपैकीं अर्धी भाकर मोठमोठ्या इंग्रजी कामगारांच्या अगर गोऱ्या शिपायांच्या भरीस घालून अर्काटच्या वेढयांत ज्याप्रमाणें तांदूळ सोल्जरांस आणि पेंज नेटिवशिपायांस खाऊन ऱ्हाण्याचा प्रसंग आला होता तसा अर्धपोटी अगर एका जेवणानें दिवस काढण्याचा हिंदुस्थानच्या कोटयवधि

प्रजेवर प्रसंग येऊन ठेपला आहे! सन १८९१ सालीं जी खानेसुमारी झाली त्यावरून असें आढळून येतें कीं, लोकसंख्येचें मान सरासरीनें दर चौरस मैलास २० या प्रमाणानें सर्व हिंदुस्थानभर १८८१ पासून १८९१ पर्यंतच्या दहा सालात वाढलें आहे; परंतु लागवडीची जमीन त्या मानानें वाढली नाहीं. तिकडे राज्याचा खर्च उत्तरोत्तर एकसारखा वाढत चालला आहे. अर्थात् त्याच मानानें रयतेवरचें कराचें ओझेंहि वाढत चाललें आहे हें सरकारी रिपोर्टावरून प्रत्यक्ष होत आहे. वाढती लोकसंख्या, बुडता व्यापार, सरकारचा अवाढव्य होत असलेला खर्च, आणि उत्तरोत्तर निःसत्त्व होत चाललेली जमीन, यामुळें हिंदुस्थानची इंग्रजी राज्याखालीं काय स्थिति होईल याची कोणाहि विचारी मनुष्यास सहज भीति पडेल. हिंदुस्थानांतून प्रतिवर्षी जास्त जास्त माल परदेशास जाऊं लागला तर त्यांत समाधान मानण्याचें कांहीं एक कारण नाहीं. या मालाच्या मोबदला माल आम्हांस येत असता तर गोष्ट निराळी, परंतु कोट्यवधि रुपयांच्या मालाबद्दल युरोपियन लोकांची व सोल्जरांची नोकरी, हाच जेथें आम्हांस मोबदला मिळतो, तेथें सदर नोकरीचा व त्यापासून निष्पन्न होणाऱ्या शांततेचा उपभोग घेण्यासाठीं आम्हीं आपल्या खुषीनें अगर जुलमानें आमच्या पुढील वाढलेल्या ताटांतील भाकरीचा जास्त जास्त भाग विलायतेस रवाना करतों, असेंच म्हटलें पाहिजे. हीं उपासमार आम्हीं आणखीं किती दिवस काढणार याचें भाकीत करणें मोठें कठीण आहे. शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचें उपाय सुचविण्यासाठीं जें कमिशन नेमलें होतें, त्या कमिशनानें शेतकऱ्यांच्या कायद्यांत कांहीं फेरफार करावे व सावकारांस फाजील व्याज मिळू देऊं नये अशा कांहीं सूचना केल्या आहेत ; परंतु हे वरकर्णी उपाय काय कामाचे. खुद्द कमिशनर लोकांनींहि या उपायांस तूर्तातूर्तचें उपाय असें म्हटलें आहे, व फार झालें तर आजचें मरण उद्यांवर टाकण्यापलीकडे त्यांचा कांहीं उपयोग होणार नाहीं. साऱ्या राष्ट्रास व विशेषेंकरून शेतकरी लोकांस जो किडा लागला आहे त्याचें निराकरण असल्या उपायांनीं कसें होणार? शेतकीची निष्कृष्टावस्था म्हणजे आमच्यासारख्यास साऱ्या राष्ट्राचीच निकृष्टावस्था होय. आम्हीं इंग्रज सरकारच्या चातुर्यास, वैभवास आणि कर्तबगारीस, दुवा देऊन त्यांचे गुण गाऊं व त्यांचेंच राज्य चिरकाल हिंदुस्थानावर राहो अशी इच्छा बाळगूं, पण दुपारची वेळ कठीण आहे. राष्ट्रांतील लोकांस पुरें इतकें धान्य देशांतल्या देशांत उत्पन्न होण्याची पंचाईत पडूं लागली व इतर उद्योगधंदे करून त्यांत उत्पन्न झालेला माल परदेशीं नेऊन त्याचा मोबदला त्या देशांतून इकडे धान्य आणण्याची सोयहि नाहींशी झाली म्हणजे वेळ कठीण आहे.

राष्ट्रांतील हजारों अथवा कोटयवधि शेतकरी केवळ इंग्रज सरकारचें राज्य सुखशांततेचें आहे म्हणून दुष्काळ आल्याबरोबरच सुखानें मरण्यास तयार होतील असें नाहीं. अथवा निरुपयोगी झालेल्या घोड्याप्रमाणें सरकारचें हातूनहि त्यांस गोळी घालून संसारयातनेंतून मुक्त करण्याचें धारिष्ट व्हावयाचें नाहीं. मग हे लोक करणार काय ? एकदां हें भिकार देशावर अनावर सुटलें म्हणजे मग लक्षावधि बागनेटांनींहि त्यांचा प्रतिकार होणें अशक्य आहे. जिकडे तिकडे एकच कल्होळ होईल आणि या झंझावातापुढें लहान मोठी सर्व झाडें ह्यूम-साहेबांनीं आपल्या सरक्युलरांत लिहिल्याप्रमाणें जमीनदोस्त होतील ! आमच्या सरकारास रशियाचें भय नसेल, नेटिव राजांपैकीं कोणीहि आपलें डोकें वर उचलण्याजोगा राहिला नाहीं व इंग्रजी शिक्षणानें जी नवी मंडळी तयार होत आहे तीहि इंग्रजी राज्याचें मनापासून चिरस्थायित्व इच्छिणारी आहे; परंतु या सर्व गोष्टी अनुकूल असल्या तरी प्रतिवर्षास वाढत जाणाऱ्या शेतकरी लोकांची पुढें काय स्थिति होणार या भयंकर प्रश्नाचा त्यानें कांहीं निकाल लागत नाहीं. हिंदुस्थानसरकारास किंवहुना इंग्रजी अमलास जीं कांहीं भारी संकटें आहेत त्यांपैकीं हें पहिल्या नंबरचें होय. वायव्य प्रांताच्या सरहद्दीवरील किल्ले कितीहि मजबूत केले, युरोपियन लष्कर कितीहि तयार ठेवलें, अगर लष्करी रेल्वे कितीहि वाढविल्या, तरी त्याचा हें संकट टाळण्यास यत्किंचितहि उपयोग होईल, असें आम्हांस वाटत नाहीं. राजा अगर राज्यव्यवस्था कितीहि सुरळीत असली तरी उपासानें मरणाऱ्या प्रजेस आपले संकटाचें सर्व कारण या सदर व्यवस्थेंतच आहे, असें वाटणें अगदीं स्वाभाविकच आहे; .......

........सर लुइस मॅलेट हे असें म्हणतात कीं, हिंदुस्थान देशास हा जो मोठा रोग जडला आहे तो वरकरणी उपायांनीं बरा व्हावयाचा नाहीं. यापासून राज्यास मोठा धोका बसण्याचा संभव आहे व रोगाचें कारण, शोधून काढून तो निर्मूल केल्याखेरीज ही भीति कधींहि नाहींशी होणार नाहीं. सन १८८८ सालच्या आक्टोबर महिन्याचे चोवीसावे तारखेस हिंदुस्थानसरकारचा जो ठराव प्रसिद्ध झाला आहे, त्यांतहि शेतकऱ्यांच्या स्थितीचें अशाच तऱ्हेचें वर्णन केलें आहे. बंगाल्यांतील शेतकरी दोनदां जेवावयास मिळालें म्हणजे आपणांस कृतकृत्य समजतात व बहारप्रांतातील (शेकडा ४० टक्के ) शेतकऱ्यांस अन्नहि पुरें पोटभर मिळत नाहीं असें या ठरावांत लिहिलें आहे. मुंबई इलाख्या-संबंधानें लिहितांना दक्षिणेंतील एक-तृतीयांश मुलूखभर दुष्काळाची भीति असते व रत्नागिरीकडे घांटाजवळील शेकडा नव्वद लोकांस आंबे, फणस अगर भाजी-पाला याखेरीज कांहीं महिने दुसरें कांहीं खावयास मिळत नाहीं असें म्हटलें

आहे. मद्रासेंत कांहीं कांहीं जिल्ह्यांतून अशीच उपासमार चालते असें तेथील कलेक्टरांनीं कळविलें आहे. व इलाख्यांतील इतर जिल्ह्यांतूनहि दरवर्षाचें उत्पन्न त्या वर्षास जेमतेम पुरतें असें त्या त्या जिल्ह्यांतील कामगारांचें म्हणणें आहे. सारांश, सर्व हिंदुस्थानभर शेतकऱ्यांचे खाण्यापिण्याचे हालच आहेत असें म्हटलें तरी चालेल. सुबत्ता असली म्हणजे सरासरी मोठ्या माराकुटीनें या वर्षाचें पीक त्या वर्षास पुरेसें होतें. एखादे वर्षी पावसानें डोळे वटारले म्हणजे लागलीच निम्मे किंवा तृतीयांश लोक दुष्काळच्या सपाट्यांत सांपडून त्यांपैकीं वरेच परलोकाच्या मार्गास लागतात. . . . . . . . . . . . .

---

## ३. शेतकऱ्यांच्या कमिशनानें काय केलें ?

[ २० डिसेंबर १८९२ ]

•••दक्षिणेंतील शेतकरी लोक अगदीं भुकेबंगाल होऊन सन १८७९ सालापूर्वी त्यांनीं सावकारांचीं व मारवाड्यांचीं कांहीं ठिकाणीं घरें लुटलीं, कांहीं ठिकाणीं दस्तऐवज जाळले, व कांहीं ठिकाणीं नाकें कापलीं हें वाचकांस स्मरत असेलच ! इतक्या निकरावर गोष्ट येऊन ठेपली तेव्हां सरकार जागें झालें, व शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे आतां मात्र खरोखरच कांहीं उपाय केले पाहिजेत असें त्यांच्या मनानें घेतलें. परंतु मनुष्यस्वभावाचा असा कांहीं दुर्गुण आहे कीं, ज्याला त्याला आपणाखेरीज इतर सर्व जग बिघडलें आहे असें वाटत असतें. पृथ्वीवर राहणाऱ्या मनुष्यास आपण पृथ्वीबरोबर फिरत आहों हें भान न राहून सूर्य व तारे – जे मनुष्यापेक्षांच काय पण पृथ्वीपेक्षांहि शेंकडोंपट मोठे आहेत ते आपल्या क्षुद्र पृथ्वीसभोंवतीं दररोज घिरट्या घालीत आहेत असा जो भ्रम होतो त्याचें कारणहि हेंच. त्यास मी स्थिर, मी शहाणा व लोक चंचल व गाढव असें वाटत असतें. आपलें सरकार हें पूर्वीच्या सरकार-प्रमाणें एका इसमानें अगर व्यक्तीनें निर्दाशत करितां येत नाहीं. तथापि व्यक्तिमात्रामध्यें जे दुर्गुण असावयाचे ते सर्व हल्लींच्या ' सरकार ' या संस्थेंत पूर्णपणें आढळून येतात. सरकारच्या राज्यपद्धतीमुळें, त्यांच्या सारा घेण्याच्या रीतीमुळें, अगर अप्रतिबंध व्यापार सुरू केल्यामुळें हिंदुस्थानांतील रयतेचें आपल्या हातून कांहीं नुकसान होत आहे, ही कल्पना देखील सरकारच्या डोक्यांत शिरत नाहीं. हिंदुस्थानचा राज्यकारभार हिंदुस्थानवासी रयतेच्या सुखाकरितां करण्याचा यांनीं केवळ परोपकार बुद्धीनें मक्ता घेतला आहे, असें लहानमोठे सरकारचे सर्व अधिकारी आपल्या कृतींत, लेखांत व भाषणांत व्यक्त करीत असतात. अशा रीतीनें केवळ परोपकारासाठीं अवतीर्ण झालेल्या राज्यकर्त्यांस शेतकऱ्यांच्या निकृष्ट स्थितीचें मूळ कारण सावकार होत असें वाटणें अगदीं स्वाभाविक आहे.

..... शेतकऱ्यांच्या स्थितिसंबंधानें मुख्यत्वेंकरून महत्त्वाचा मुद्दा म्हटला म्हणजे त्यांचा कर्जबाजारीपणा हा होय. सावकाराच्या त्रासानें गांजून ज्या लोकांनीं सन १८७८-७९ सालीं बंड केलें, ते लोक फिरून बंड करण्यास अद्याप प्रवृत्त झाले नाहींत ही गोष्ट खरी आहे. सावकार व शेतकरी यांच्यामध्यें जो बेबनाव झाला होता तो कांहीं अंशीं शेतकऱ्यांच्या कायद्यामुळें कमी झाला आहे.

कुळाची जमीन विकणें, त्यांचेपासून आवाचेसव्वा चक्रवाढ व्याज घेणें, त्यांचे बैल, हत्यारें, नांगर वगैरे जिनसांवर एकदम जप्ती नेणें, पन्नास रुपये देऊन शंभराचें खत करून घेणें इत्यादि कांहीं प्रकार शेतकऱ्याच्या कायद्यानें बंद झाले आहेत व ते बंद करणें केव्हांहि जरूर होतें. एवढ्याच कारणाकरितां सावकारांचीं नाकें कापण्यास जर शेतकरी तयार झाले असले तर ती कारणें आतां राहिलीं नाहींत, परंतु शेतकरी लोक खरोखर अन्नास मोताद झाल्यामुळें कोणावर तरी सूड उगवावा असें मनांत येऊन जर त्यांनीं सावकारांचा छळ केला असेल तर तसा प्रकार मात्र पुन: न घडून येण्याची या ॲक्टानें कांहीं तजवीज झाली आहे असें दिसत नाहीं. सावकारच आपल्या विपन्नावस्थेचें कारण आहे अशी समजूत झाल्यामुळें सन १८७८ सालीं शेतकऱ्यांनीं डोळ्यापुढें दिसणाऱ्या सावकारांचा छळ केला हें त्यांच्या दृष्टीनें अगदीं साहजिक झालें. शेतकऱ्यांच्या कायद्यानें सावकारावर जे लोक अपयश घालीत असत तें आतां दूर केलें आहे. यापुढें शेतकरी लोक जर पूर्वीप्रमाणेंच दरिद्री राहिले, तर त्यांस आपल्या दारिद्र्याचें कारण शोधण्यास सावकार सोडून दुसऱ्या दिशेकडे वघावें लागेल. आणि उपासमारीनें आणि दारिद्र्यानें गांजून गेलेले शेतकरी अशा रीतीनें आपल्या दारिद्र्याचें कारण शोधू लागले म्हणजे त्यांची धाड अमक्यावर पडेल आणि अमक्यावर पडणार नाहीं, असें कोणास कधींहि निश्चयात्मक सांगतां येणार नाहीं. सन १८७९ च्या कायद्यानें सावकारांचें वरेंच नुकसान झालें असलें तरी पुन्हां अशी कुणबाऊ धाड आली असतां तिच्या भक्ष्यस्थानीं तें पडणार नाहींत अशी या ॲक्टानें जी तरतूद झाली आहे, त्याबद्दल सरकाराचें त्यानें आभार मानले पाहिजेत. अशी वावटळ जर पुन: कधीं उद्भवली तर त्याचें कारण निदान दक्षिणेंत तरी सावकार लोक नाहींत इतकें या ॲक्टामुळें खात्रीनें म्हणतां येईल. आतां अशी वावटळ पुन: उद्‌भवण्याचा संभव आहे कीं, काय याचा थोडासा विचार करूं.

शेतकरी लोक दंगा करण्यास प्रवृत्त होण्याचें मुख्य कारण दारिद्र्य होय. कुटुंब वाढलें, दुसरा व्यापारधंदा नाहींसा झाला, जमिनींत कस नसल्यामुळें ती नीरस होत चालली, आणि पाऊसहि वेळच्यावेळीं पडत नाहींसा झाला! अशा स्थितींत कोणत्याहि राष्ट्रांतील शेतकरी दारिद्र्यांत आणि कर्जांत बुडालेले असावयाचे, करितां शेतकरी ॲक्टानें ही स्थिति सुधारली आहे काय ? गेल्या चवदा वर्षांत शेतकऱ्याच्या डोक्यावरील कर्जाचें ओझें कांहीं कमी झालें आहे काय ? हे प्रश्न या चवकशीच्या कामीं अत्यंत महत्त्वाचे आहेत. कमिशनर लोकांनींहि हेच प्रश्न पहिल्यानें काढले होते, परंतु त्याचें उत्तर जितक्या खुलासे-

वार द्यावयास पाहिजे होतें तितकें त्यांनीं दिलें नाहीं. आपल्या रिपोर्टाच्या दहाव्या पारिग्राफांत ते असें म्हणतात कीं, या प्रश्नाचें उत्तर देण्यास जशा तऱ्हेची माहिती पाहिजे तशा तऱ्हेची माहिती आम्हांस मिळाली नाहीं. परंतु नुसत्या अॅक्टामुळें शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचें कारण कधींहि समूळ नाहींसें होणार नाहीं हें उघड आहे. यावरून कमिशनाचें या बाबतींत काय मत आहे हें आम्ही आणखी स्पष्ट केलें पाहिजें असें नाहीं. कमिशनानें जी गोष्ट भीत भीत लिहिली आहे तीच मुंबईसरकारनें आपल्या एका ठरावांत मोकळ्या मनानें स्वच्छ कबूल केली आहे. त्या ठरावांत असें म्हटलें आहे कीं, सावकार लोक आतां आपलें कर्ज बहुतेक अॅक्टांतील कलमाप्रमाणेंच देऊं लागतील; आणि लवकरच चारहि जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या कर्जाचें मान पुनः पूर्वीप्रमाणें होईल. रावब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर हे आपल्या मिनिटांत ठरावांतील हें वाक्य घेऊन त्यावर असें लिहितात कीं, सरकारचें हें म्हणणें मी केलेल्या चवकशीवरून अक्षरशः खरें आहे असें माझें मत आहे; सावकाराचें कर्ज पूर्वीप्रमाणेंच राहील इतकेंच नव्हे, तर सदर कर्जासाठीं पूर्वीं शेतकऱ्याची जमीन गहाण पडत नव्हती तीहि आतां आणखी गहाण पडेल. सारांश, चवदा वर्षे अॅक्टाचा अंमल झाल्यामुळें शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचें ओझें कमी व्हावयाचें तें एकीकडेच राहून उलट कर्ज आहे तें आहे आणि जमिनीहि गहाण पडल्या अशी सध्यां स्थिति झाली आहे. ही स्थिति नजरेस आल्यावर अॅक्टाचे उपयुक्ततेबद्दल कमिशनरांस शंका यावी हें अगदीं साहजिक आहे. आपल्या रिपोर्टाच्या शेवटीं ते असें म्हणतात कीं, "असल्या कायद्यानें शेतकऱ्यांस कर्ज करण्याचे प्रसंग कमी येतील अगर त्यांच्या दारिद्र्याचीं कारणें दूर होतील हें संभवत नाहीं. हीं कारणें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारचीं असून तीं दूर करण्यास शेतकऱ्यांची सामाजिक, राजकीय व घरची स्थिति सुधारली पाहिजे. ती सुधारेल तेव्हांच या प्रश्नाचा अखेरचा निकाल लागेल." कमिशनानें हा कायदा इतर जिल्ह्यांतूनहि जरूर पडल्यास लागू करण्याची शिफारस केली आहे; परंतु नुसत्या अॅक्टानें कांहीं व्हावयाचें नाहीं, शेतकऱ्यांची स्थिति खरोखर सुधारण्यास अॅक्टाखेरीज दुसरे कांहीं उपाय योजिले पाहिजेत असा त्याजबरोबर शेरा दिला आहे. यावरून मोठ्या आग्रहानें, उमेदीनें आणि परोपकार बुद्धीनें सरकारानें सन १८७९ सालीं जो कायदा पास केला, त्याचा सरकारनें नेमलेल्या कमिशनच्या दृष्टीनेंच किती उपयोग झाला आहे हें कळून येईल. ह्या अॅक्टाचा अंमल करण्यासाठीं जे स्पेशल जज्ज वगैरे मुद्दाम नवे कामगार नेमले आहेत, त्यांचा दरसाल खर्च कमीत कमी ५७-५८ हजार रुपये

आहे. म्हणजे गेल्या चवदा वर्षांत सुमारें ८० लाख रुपये शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठीं दक्षिणेंतील चार जिल्ह्यांत सरकारानें खर्च केले; परंतु मारुतीच्या शेपटाप्रमाणें शेतकऱ्यांचें कर्ज पुनः आहे तितकेंच आहे. फायदा इतकाच कीं, जमीन पूर्वीं गहाण पडत नव्हती, ती आतां गहाण द्यावी लागते, आणि सावकार जलम करितो असें बोलण्याची सोय नाहीं !

## ४. शेतकऱ्यांच्या कमिशनानें सुचविलेले उपाय

[ २७ डिसेंबर १८९२ ]

... ... परंतु कायद्यामध्यें हे फेरफार केले तरी त्यामुळें शेतकऱ्यांची स्थिति कायमची सुधारेल असें कमिशनरांस वाटत नाहीं. अज्ञान, उधळेपणा अगर इस्टेटीची दरपिढीस होत असलेली वांटणी यांमुळें जर शेतकरी लोक उत्तरोत्तर दरिद्री होत चालले, तर त्यांची स्थिति कायद्यांत कितीहि फेरफार केले असतां सुधारावयाची नाहीं. हे दुर्गुण प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारानेंच नाहींसे होतील तेव्हां होतील. परंतु प्राथमिक शिक्षण देणें किंवा न देणें हें ज्याअर्थी सरकारचें कर्तव्य आहे, त्याअर्थीं आमच्या मतें सरकारास या बाबतींत केवळ निर्दोषी म्हणतां येईल असें दिसत नाहीं. शेतकऱ्यांस लिहितां वाचतां येऊन त्यांस आपल्या खऱ्या स्थितीचें ज्ञान व्हावें, त्यांजजवळ जे कांहीं पैसा दोन पैसे शिल्लक रहात असतील ते व्यवस्थेनें राखून ठेवण्याची त्यांस सोय असावी. आणि जमिनीचे हातहातभर तुकडे होऊन कोणासहि आपल्या हिश्शाची योग्य किंमत मिळं नये अशी स्थिति तरी निदान न येण्याबद्दल कायद्यांत कांहीं तरी तजवीज ठेवावी हें सरकारचें कर्तव्य आहे व हें जोंपर्यंत त्याच्या हातून पूर्णपणें होत नाहीं तोंपर्यंत शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेबद्दलची जबाबदारी थोडीबहुत तरी सरकारच्या अंगावर पडेल. दोन तीन पिढ्या झाल्या म्हणजे एका घराचीं दहा घरें होऊन ज्या जमिनीवर पूर्वीं एका कुटुंबाचा चांगल्या रीतीनें निर्वाह होत असे, ती जमीन दहा कुटुंबांस पुरेनाशी होईल हें उघड आहे; परंतु देशांत लोकसंख्या वाढल्यामुळें जमिनीचें उत्पन्न जर पुरेनासें होईल तर देशांत उद्योगधंद्याची वृद्धि करून अगर दाट वस्तींतील लोक कमी वस्ती असलेल्या प्रदेशांत नेऊन त्यांच्या पोटाची सोय लावून देणें हें शहाण्या व सुधारलेल्या सरकारच्या कामांपैकीच एक काम आहे. देशांतील सर्व लोक उपजीविकेचीं साधनें शोधून काढण्यास असमर्थ असतात. तीं कामें देशांतील पुढारी लोक अगर ज्ञाति आणि सरकार यांनींच केलीं पाहिजेत. इतर राष्ट्रांतून ज्याप्रमाणें हिंमतीचे पुढारी लोक असतात तसे आमच्याकडे नाहींसे होत चालले आहेत, यामुळें या प्रश्नाचा निकाल लावण्याचा सर्व बोजा बहुतेक सरकारावरच पडतो. म्हणून देशांतील लोकसंख्या वाढली तर त्यांस खावयास कसें मिळेल याचा विचार इंग्रज सरकारच्या मुत्सद्यांनीच केला पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराने शेतकरी लोक कितीहि सज्ञान झाले तरी त्यांस मार्ग दाखविण्याचें काम नेहमीं सरकारनेंच केलें पाहिजे. एकदा मार्ग दाखवून दिला म्हणजे मग फारशी अडचण नाहीं. असो.

## ५. औद्योगिक पारतंत्र्य

[ २५ सप्टेंबर १८९४ ]

ह्या आपल्या संसारांत पारतंत्र्य अनेक प्रकारचें आहे. राजकीय पारतंत्र्य, धार्मिक पारतंत्र्य, औद्योगिक पारतंत्र्य आणि सामाजिक पारतंत्र्य, असे स्थलमानानें या पारतंत्र्याचे भेद करितां येतील. आतां हल्लींची परिस्थिति पाहिली असतां आपण राजकीय पारतंत्र्याचा विचार राष्ट्रीय परिषदेमध्यें, वर्तमानपत्रांमध्यें व सभांतून वराच करीत आहों असें दिसेल. धार्मिक पारतंत्र्य, विचार पारतंत्र्य व सामाजिक पारतंत्र्य यांचाहि खल इंग्लिश लोकांचें राज्य स्थापन झाल्यापासून सुरू झाला आहे व सुधारक आणि नवविद्वेषी असे समाजामध्यें दोन पक्ष उत्पन्न होऊन उभयतांमध्येंहि मोठा संग्राम माजून राहिला आहे. ह्या गोष्टी अर्थातच अत्यंत इष्ट होत. म्हणजे पूर्वोक्त पारतंत्र्यांविषयी कडाक्याचीं भांडणें होत आहेत हा प्रकार आम्हांस फारच चांगला वाटतो. कारण उघडच आहे कीं, एकदां वाद उभा राहिला म्हणजे जुन्या गोष्टींत चांगला अंश किती, त्याज्य भाग किती, अथवा नव्यामध्यें घेण्यासारख्या गोष्टी कोणत्या व अनादर करण्यासारख्या गोष्टी किती यांचा वादामध्यें निकाल होऊन सामान्य जनांस अथवा आग्रहशून्य लोकांस ' वादे वादे जायते तत्त्वबोधः ' या न्यायानें कोणतें घ्यावयाचें, कोणतें टाकावयाचें या गोष्टींचा तत्त्वबोध होऊन उत्तरोत्तर त्यांचें वर्तन सुधारत जातें, आणि वादाच्या संवयीनें बुद्धीस कुशाग्रत्व येऊन विचार करण्याचा सराव राहतो. या विवेचनावरून वाद होणें हें इष्ट आहे, असें सहजच कळून येईल. आतां राहतांपैकीं औद्योगिक पारतंत्र्य अथवा उद्योगासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे बघत बसणें या अनिष्ट अवदसेबद्दल आपल्या लोकांत जितकी चर्चा होऊं लागावी, तितकी अजून झाली नाहीं हें आपणां सर्वांसच अहितकर होय. . . . . .

. . . . . पक्का माल सर्व पश्चिमेकडून येत आहे आणि यामुळें आम्हांस सर्वस्वी परकीयत्व प्राप्त झालें आहे. इंग्लिशांस अमुक हक्क आहेत ते आपल्यास नाहींत म्हणून आपण धडपडतों, आपल्यास वाटेल तसा व्यवहार करतां येत नाहीं म्हणून चरफडतों आणि त्याबद्दल आक्रोशहि करितों. पण आपण सर्वदा लंगडे होऊन ज्यांच्या योगानें आपल्या कर्तृत्वाचे सर्व अवयव लटके पडत चालले आहेत, व जे अनावर झाले असतां आपल्या नाड्या आंखडण्यास फारशी

दिवसगत लागावयाची नाहीं, तें औद्योगिक पारतंत्र्य व ह्या पारतंत्र्याचें पूर्ण स्वरूप यांची ओळख आपण करून घेत नाहीं आहों, या कारणानें ही पारतंत्र्यरूपी बेडी आपल्यास विशेपच जखडीत चालली आहे, ही गोष्ट मात्र दुःसहतर होय. तेव्हां आपण याहि पारतंत्र्याच्या चक्रामध्यें सांपडलों आहों हें जितकें लवकर समजेल तितकें जास्त चांगलें असें जें वर म्हटलें आहे तें एवढ्याचसाठीं.

... ... नैसर्गिक शक्तीचा शोध लागून तिकडे मानवी मनाचा ओघ वळण्यापूर्वी सर्व देशांत मनुष्यें हातानेंच काम करीत असत. पुढें हळूहळू सृष्टिगतशक्तीची ओळख होऊं लागून गतिशास्त्र, स्थितिशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, विद्युच्छास्त्र, इत्यादि हजारों शास्त्रें अवतीर्ण होऊन मानवी श्रमांचें मान दिवसानुदिवस कमी होत आहे. हा फायदा युरोप व अमेरिका खंडांस जसा मिळाला तसा आम्हाला मिळाला नाहीं. याचीं कारणें अनेक आहेत, त्यांत आमचा देश अति विस्तीर्ण व अति सुपीक हें एक, आमची पहिल्यापासून निवृत्तिमार्गाकडे प्रवृत्ति हें दुसरें, आणि गेल्या सात आठशें वर्षांपासून आम्हांस स्वतःचें स्वातंत्र्य ठेवण्यासाठीं लढावें लागलें आहे हें तिसरें. आमच्या देशाचें हवापाणी व आमची समाधानवृत्ति ह्यांचाहि निर्देश करणें अनिष्ट नाहीं. तात्पर्य काय कीं, थोड्याशा मानसिक श्रमानें लब्ध होणाऱ्या नैसर्गिक शक्तींना आम्हीं हा काळपर्यंत पारखे राहिलों व येणेंकरून युरोपीय राष्ट्रांनीं आमच्यापुढें आपल्या राष्ट्रीय गाड्या ढकलल्या. आतां फक्त आमची जमीन, आमचे हात, व आमचें डोकें हे आमचे सारथी आणि युरोपियन लोकांकडे पाहिल्यास त्यांच्या लगामीं ऊष्णता, विद्युत्, रसायन, वाफ्प, मरुत् इत्यादि महान् महान् दिव्य राक्षस लागले असून त्यांच्या साहाय्यानें युरोपियन लोकांचे हात, पाय, डोकें व डोळे इत्यादि अवयव फारच मोठाले झाले आहेत. तेव्हां आम्हांस उद्योगाच्या रणभूमीवर उभें ठाकावें लागत आहे तें नुसत्या मानवी शक्तीच्या जोरावर हें प्रथमतः लक्षांत आणलें पाहिजे. हस्तनिर्मित व यंत्रनिर्मित असे स्थूलमानानें पदार्थांचे भाग केल्यास हस्तनिर्मित पदार्थ आपल्याकडे व यंत्रनिर्मित पदार्थ युरोपियनांकडे असा प्रकार होतो म्हणजे नुसत्या हाताच्या साहाय्यानें उत्पन्न होणारे पदार्थ आपण उत्पन्न करितों व यंत्राच्या साहाय्यानें उत्पन्न झालेल्या पदार्थांशी टक्कर देण्यास आपण असमर्थ होतों. ही स्थिति इंग्लिश अंमलापासून वाढत गेली ती थेट १८७२ सालापर्यंत. औद्योगिक संबंधानें यावेळीं आपण रसातळांस जाऊन पोहोचलों होतों, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ७५ सालापासून मात्र कित्येक लोकांचें इकडे लक्ष जाऊन आतांहि

आपण बरीच मजल मारिली आहे. अजून पुष्कळच लांव जावयाचें आहे, तरी ज्या दिशेनें आपलें मार्गक्रमण आहे ती दिशा बरोबर आहे व सावकाशच कां होईना परंतु धीरे धीरे आपण चाललों आहों हेंहि अगदींच वाईट नाहीं. हें खरें आहे तरी आपल्यास भांडवल नाहीं, औद्योगिक चातुर्य नाहीं, यंत्रशिक्षण नाहीं, यामुळें फारच रेंगाळावें लागत आहे. पण भांडवल नाहीं किंवा इतर गोष्टीं नाहींत म्हणून रडून काय उपयोग? रडल्यानें त्या आपल्यास थोड्याच मिळणार आहेत. उद्योग काढल्याशिवाय भांडवल जमा होणार नाहीं किंवा यंत्रज्ञानहि मिळणार नाहीं. व हीं दोन्हीं असल्याव्यतिरिक्त उद्योगहि निघणार नाहींत. तेव्हां तारतम्यानें लहान प्रमाणावरच कां होईना पण निरनिराळे उद्योग निघाले पाहिजेत; म्हणजे भांडवल उभें राहील. परदेशचें लोक व्याजानें आपणांस रकमा देतील, परदेशस्थ लोकांचें यंत्रचातुर्यहि आपण चाकरीस ठेवूं, किंवा आपले लोक तयार करवून आणूं. पण या सर्वांस व मुख्यत: पहिल्या दोन गोष्टींस एकदोन तारणें पाहिजेत. एक उद्योग करण्याची निष्ठा व प्रेम आणि दुसरें प्रामाणिकपणा. या दोहोंला धूर्तपणा व सन्मार्गगामी साहसप्रियता यांची जर संगति झाली तर वरती डोकें काढण्यास फारशीं शतकें लागणार नाहींत. फक्त इमान आणि विश्वास यांची काय ती जरूरी आहे. आणि म्हणून अब्रूची चाड ज्या गृहस्थांस आहे व ज्यांचें मन शिक्षणानें सुसंस्कृत झालें आहे अशा लोकांनीं हें काम हातांत घेतलें पाहिजे. आपल्या इकडे एकदोन गिरण्या चालविणारे इसम नाहींत. म्हणून मंडळ्यांमार्फत अगर श्रमसंयोगानें हें देशसेवेचें व स्वार्थसाधनाचें काम सिद्धीस जाणार आणि श्रमसंयोगास तर इमानाची आणि इभ्रतीची चाड असणारे संभावित गृहस्थ अवश्य पाहिजेत, असो; ....

---

## ६. यापेक्षां जास्त अन्याय तो कोणता ?

[ ११ फेब्रुवारी १८९६ ]

......इंग्रज सरकार हिंदुस्थानचें जें राज्य करीत आहे तें कोणाकरितां ? राणीसरकारच्या जाहिरनाम्याकडे पाहिलें तर त्यावरून असें दिसतें कीं, हें राज्य हिंदु लोकांच्या हिताकरितां व्यापारी कुंपणीवाईकडून राणीसरकारनें आपल्या हातांत घेतलें, पण अनुभव पहावा तों त्याच्या अगदीं उलट आहे, व त्यांतले त्यांतहि जकातीचा जो कायदा नुकताच पास झाला त्यानें तर कळस करून सोडला आहे. हा अन्याय इतका ढळढळीत आहे कीं, हिंदुस्थानखेरीज दुसऱ्या कोणत्याहि देशांत अशा रीतीनें लोकमताची व युक्तिवादाची अवहेलना करण्यास सरकारास पंचाईत पडली असती. आपल्या देशांत तयार झालेल्या मालावर आमच्या सरकारनें जरूर लागेल तेव्हां तिजोरीची भर करण्याकरितां जकात अगर कर वसवूं नये असें आमचें म्हणणें नाहीं. पण इतर देशांतील व्यापाऱ्यांचा नफा होण्यासाठीं आमच्या देशांतील मालावर जेव्हां आमचें सरकार कर बसवितें, तेव्हां आमच्या तळपायाची आग मस्तकास गेल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. खुद्द इंग्रज लोकच असल्या कारणांनीं आपल्या मायभूमीस सोडून देऊन स्वतंत्र झाल्याचें उदाहरण आपल्या डोळ्यांपुढें आहे ; व हें उदाहरण डोळ्यांपुढें असताहि जर हल्लीं होत असलेल्या अन्यायाचा आम्हीं कोणत्याहि रीतीनें प्रतिकार करण्यास झटलों नाहीं, तर आमच्या गचाळपणाची कमाल झाली असें म्हटलें पाहिजे. ज्यांस असले अन्याय खपतात अथवा जे सदर अन्याय मुकाट्यानें सोसतात त्यांस कोणत्याहि तऱ्हेचे राजकीय हक्क न मिळाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. याकरितां आमच्या प्रांतांतील सर्व लोकांस आग्रहपूर्वक आमची अशी विनंती आहे कीं, त्यांनीं या प्रश्नाची चांगली माहिती करून घेऊन सरकारकडून झालेल्या उद्दामपणाचा व अन्यायाचा होईल तितका प्रतिकार करण्यास लागावें. आमचा हा प्रयत्न कित्येकांस पंचतंत्रातील टिट्टिभाच्या प्रयत्नाप्रमाणें कदाचित् उपहासास्पद वाटेल पण सदर पक्षास ज्याप्रमाणें अखेरीस यशप्राप्तीचा मार्ग मिळाला तसा, प्रयत्नाअंती परमेश्वर या न्यायानें आम्हांसहि तो खास प्राप्त होईल अशी आमची पूर्ण समजूत आहे .

....देशी गिरण्यांत निघणाऱ्या जाड कापडावर शेंकडा साडेतीन टक्के कर बसविण्यास कोणतेंहि योग्य कारण नव्हतें, केवळ मँचेस्टरवाल्यांच्या

आग्रहाखातर हा कर बसविला आहे, व तो अर्थशास्त्राप्रमाणेंहि गैरवाजवी आहे. अर्थशास्त्राचा असा सिद्धांत आहे कीं, कोणताहि कर होईल तितकें करून असा बसवावा कीं, ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें त्यावर कराचें ओझें पडावें. म्हणजे देशांतील श्रीमंत लोकांवर गरीब लोकांपेक्षां कराचें ओझें जास्त पडावें. पण हल्लीं हा कायदा या तत्त्वाच्या अगदीं विरुद्ध आहे. बारीक कापड वापरणाऱ्या सुखवस्तु लोकांस कापडाच्या किमतीवर शेंकडा पांच टक्के कर द्यावा लागत होता तो आतां साडेतीन टक्के द्यावा लागणार, आणि जाड कापड वापरणाऱ्या गरीब लोकांस मुळींच कर नव्हता तो शेंकडा साडेतीन टक्के होणार ! म्हणजे श्रीमंतांवरचें कराचें ओझें कमी करून गरीब लोकांवर लादण्याचें हिंदुस्थानसरकारनें ठरविलें आहे. ......

.....आमच्या लोकांच्या राजनिष्ठपणाच्या जुन्या समजुती आतां कांहीं एक उपयोगी नाहींत. खरी राजनिष्ठा आणि अन्याय सहन करण्याची बुद्धि हीं कधींच एकत्र होऊं शकत नाहींत. राजा करतो तो न्याय, अशी पूर्वी समजूत असे, पण न्याय करील तो राजा अशी आतां समजूत झालेली आहे. मुंबईस यासंबंधानें जी सभा भरली होती त्यांत मि. किट्रीज यांनीं उघड असें बोलून दाखविलें कीं, दुसऱ्या कोणत्याहि देशांतील लोक आपल्या सरकारानें केलेला असा अन्याय सहन करून घेणार नाहींत. आयर्लंड व अमेरिका यांच्याबरोबर जो इंग्लंडचा तंटा आहे व या दोन देशांत इंग्रजांबद्दल लोकांचा जो वाईट ग्रह आहे त्याचेंहि कारण अशाच प्रकारचें आहे. हा जकातीचा प्रश्न इतका चिरड येण्याजोगा आहे कीं, शंभर वर्षांपूर्वीं अमेरिकेतील लोकांच्या संमतीखेरीज त्यांच्या चहावर जेव्हां इंग्लंडच्या लोकांनीं जकात बसविली तेव्हां परदेशाहून आलेले चहाचे गठ्ठे त्यांनीं समुद्रांत फेंकून दिले, पण जकात भरली नाहीं; व याच कारणामुळें पुढें अमेरिका स्वतंत्र झाली, असें मि. गार्स्लिग यांनीं मुंबईस झालेल्या सभेंत बोलून दाखविलें. या व इतर उदाहरणांवरून आम्हीं काय केलें पाहिजे हें आमच्या लोकांनीं लक्षांत घेण्यासारखें आहे.

सर्व लोकांस आमची आग्रहपूर्वक अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आपल्या हातून या अन्यायाचा होईल तितकें करून प्रतिकार करण्यास झटलें पाहिजे. हिंदुस्थानचें नवें राज्य हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां चालवावयाचें आहे, मँचेस्टरचें कल्याणाकरितां नाहीं, ही गोष्ट प्रत्येकाच्या अंतःकरणांत बिंबून त्याप्रमाणें त्यानें आचरण करावयास पाहिजे. अन्याय ज्याच्या अंतःकरणास झोंबत नाहीं त्यास 'स वै मुक्तोऽथवा पशुः' या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका वर्गांत घातलें पाहिजे. अमेरिकन लोक इंग्रज लोकांचे सख्खे भाऊबंद असतांहि

जकातीच्या त्रासामुळें त्यांच्यापासून वेगळे झाले, आम्हास तसा प्रकार करावयाचा नाहीं. पण तेवढ्यानें सरकार करील तें मुकाट्यानें ऐकून घ्यावें असें मात्र होत नाहीं. कायदा कितीहि कडक असला तरी जर तो अन्यायाचा आहे तर त्याचा प्रतिकार करण्यास कडक उपायांचीच योजना केली पाहिजे.....
........अमेरिका, फ्रान्स वगैरे देशांत अर्थशास्त्रांत पारंगत असलेले आमच्या तरुण विद्वानांपेक्षां शेंकडों गृहस्थ आहेत ; पण त्यांस सुद्धा जर देशी मालास उत्तेजन देणें गैरशिस्त वाटत नाहीं तर आमच्या इकडील पांढरपेशे लोकांसच देशी कपडे टाकाऊ वाटावे हें आश्चर्य नव्हे काय ? गरीबगुरीब लोक विलायती कापड फार वापरत नाहींत. शिकलेले लोकच मँचेस्टरवाल्यांचें मोठें गिऱ्हाईक आहे ; व मँचेस्टरवाले जर आमचे हिताकडे लक्ष देत नाहींत तर आम्हीं तरी त्यांच्या हिताकडे कां लक्ष द्यावें असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. याकरितां सर्व लोकांस पुन्हां एकवार आमची अशी विनंती आहे कीं, तुमच्या अंगांत जर कांहीं माणुसकी असेल, सरकारनें व इतर लोकांनीं केलेला अन्याय जर तुम्हांस खपत नसेल, अथवा त्यामुळें तुमच्या अंतःकरणांस जर चटका बसला असेल तर तुम्ही देशी कपडा वापरण्याचा निश्चय करून मँचेस्टरवाल्यांचा त्यांनीं केलेल्या अन्यायाबद्दल सूड घेतल्याखेरीज राहूं नका.. ..

....अशा वेळीं कालक्षेप न करितां प्रत्येकानें सरकारचें हातून घडलेल्या अन्यायाबद्दल आपला असंतोष शब्दांनीं नाहीं तर कृतींनीं व्यक्त करून दाखविला पाहिजे. हें काम मुख्यत्वेंकरून सुशिक्षित लोकांनीच केलें पाहिजे. " जनावराच्या कोटींतल्या लोकांस इंग्रजी कपड्यांची कधींच जरूर पडत नाहीं. तेव्हां सर्व भार सुशिक्षित लोकांवरच येऊन पडत आहे; व सर्वांनीं मिळून जर निश्चय केला तर झालेल्या अन्यायाचें लौकर परिमार्जन होईल इतकेंच नाहीं, तर पुढेंहि असा अन्याय करण्यास सरकार सहसा धजणार नाहीं. देशी कापड वापरण्याचा संकल्प करण्यास उपाध्यायाची जरूर लागत नाहीं, अगर विशेष मुहूर्ताचीहि अपेक्षा नाहीं. सर्व प्रकारचें देशी कापड हल्लीं निघूं लागलें आहे व तें बहुतेक सर्व ठिकाणीं मिळण्याच्या सोई झाल्या आहेत. करितां सरते शेवटीं सर्व महाराष्ट्रांतील लोकांस आम्ही अशी प्रार्थना करितों कीं, जर तुमच्या देशाचें खरें कल्याण करणें असेल, जर तुम्हाला सरकारच्या कायद्याचा राग आला असेल, जर तुम्ही तुमच्या करारी व दृढनिश्चयी पूर्वजांचे वंशज असाल, मँचेस्टर व्यापाऱ्यांचा जर खरोखर तुम्हांस सूड घ्यावयाचा असेल, हिंदुस्थानचें राज्य हिंदुस्थानांतील लोकांच्या हितांकरितांच चालविलें पाहिजे असें तुम्हांस वाटत असेल, अर्थशास्त्रांचीं व राजनीतीचीं खरीं तत्त्वें जर तुम्हांस माहीत असतील, किंबहुना

अन्याय सहन न झाल्यामुळें तुमच्या जिवाची खरोखरच जर तळमळ होत असेल, व तुमच्या अंतःकरणांस चटका लागून राहिला असेल तर इतउत्तर कोणतीहि सबब न सांगतां देशी कापड वापरण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें वर्तन करण्यास लागा.

---

## ७. देशी कपडा वापरण्याबद्दल मि. वाच्छा यांचे विचार

[१७ मार्च १८९६]

हल्लीं देशी कपडे वापरण्यासंबंधानें चोहोंकडे जी चळवळ सुरू आहे तिचें खरें कारण व हेतु मनांत न आणितां अर्थशास्त्राची घमेंड बाळगणाऱ्या कित्येक तरुण विद्वानांकडून या चळवळीवर पाणी ओतण्याचा प्रयत्न चालू आहे. अर्थशास्त्रांतील इंग्रजी पुस्तकांत अप्रतिबंध व्यापाराचें जें महत्त्व गाइलें असतें त्यानें दिपून गेलेल्या गृहस्थांनीं देशी माल व देशी कपडा याविरुद्ध पाहिजे तसें बरळावें यांत कांहीं विचित्र नाहीं. फासेटच्या किंवा त्याहूनहि एखाद्या छोटयाशा ग्रंथाच्या पलीकडे ज्याचें अध्ययन नाहीं, व्यापाराच्या घडा-मोडीच्या कांहीं ठळक ठळक तत्त्वांची ज्यांस पहिल्यानें व तीहि पुस्तकद्वारांच ओळख झाली त्यानें विलायती मालाचा कैवार घेऊन विलायती माल देशी मालापेक्षां एक पैनें स्वस्त असला तरी विलायती माल घेऊनच आम्हीं आपली पै शिल्लक ठेवून दुसऱ्या कामास कां वापरूं नये अशा अर्थाचे पढतमूर्खासारखे उद्गार काढल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. आमच्या शाळांतून व कॉलेजांतून जीं पुस्तकें चालतात व जें शिक्षण मिळतें तें प्राय: इंग्लंडदेशांतील लोकांकरितां लिहिलेल्या पुस्तकांवरूनच मिळत असल्यामुळें हिंदुस्थान देशांतील लोकांस विलायती समाजशास्त्र, विलायती अर्थशास्त्र कितपत लागूं पडेल याचा विचारहि विद्या-र्थ्यांच्या मनांत आलेला नसतो. फ्रान्स, इटली, जर्मनी, अमेरिका वगैरे स्वतंत्र देशांतील अभ्यासाची पद्धत यापेक्षां फारच निराळी आहे हें सांगावयास नकोच. एकोणिसाव्या शतकांत सरस्वतीचा ओघ एकाच राष्ट्रांत, ज्ञातींत अगर प्रदेशांत कोंडून राहिला जात नाहीं हें खरें आहे; तथापि देशकालपरत्वें कांहीं कांहीं व्यावहारिक शास्त्रांचीं तत्त्वें बदलावीं लागतात ही गोष्ट प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांतील विद्वानांस पूर्णपणें माहित आहे. आमच्याकडे मात्र आम्ही परप्रत्ययनेयबुद्ध बनल्यामुळें तसा प्रकार आढळून येत नाहीं. इंग्रजी शिक्षणाचा विचार होऊन आजमितीस कोठें पाऊणशें तर कोठें शंभर वर्षे होऊन गेलीं आहेत. पण इतक्या मुदतींत एतद्देशीय विद्वानांनीं युरोपियन शास्त्रांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिल्याचें आमच्या आढळण्यांत येत नाही. हें वळण चुकीचें आहे असें अनेक वेळां आम्ही मागें सांगितलेंच आहे. आज त्याचा उल्लेख करण्याचें कारण एवढेंच कीं, अर्थशास्त्राच्या ' अप्रतिहत ' सिद्धांताच्या जोरावर देशी कपडा

वापरण्यावद्दलच्या चळवळीस दूषणें देण्यास जे प्रवृत्त होतात त्यांचे सिद्धांत कोठून व कसे आलेले आहेत याची वाचकांस थोडीशी ओळख द्यावी. इंग्लंड देशांत जे जे धंदे निघण्यासारखे होते ते वहुतेक सुरू होऊन तो देश भरभराटीस आल्यामुळें आतां अप्रतिवंधक व्यापाराखेरीज इंग्लंडचा तरणोपाय नाहीं. पण जर्मनी, अमेरिका वगैरे व्यापारांत आजपर्यंत मागसलेल्या पण इतउत्तर उमेदीनें पुढें जाऊं इच्छिणाऱ्या राष्ट्रांनीं इंग्लंड देशांतील अर्थशास्त्राचीं तत्त्वें सर्वथा मान्य न करितां आपापल्या देशांत जेवढे धंदे निघतील तेवढे काढण्याकडे लक्ष लाविलें आहे, व त्याकरितां तेथील सरकारनेंहि कांहीं परदेशी जिनसांवर जकात बसविली आहे हें आम्हीं विसरतां कामा नये. फार लांव कशाला, खुद्द इंग्लंडांतच अशा प्रकारचा कायदा एका वेळीं अमलांत होता. आतां इंग्लंड गवर झालेला आहे. तेव्हां 'परोपदेशे पांडित्यं' या न्यायानें गरीव विचाऱ्या हिंदू लोकांस उपदेश करण्यास त्यास कांहीं हरकत उरली नाहीं. उपदेश ऐकणारांनीं मात्र तो कितपत अमलांत आणावयाचा याचा पूर्ण विचार करावयास पाहिजे. परंतु आमच्या दुर्दैवानें येथें अशी कांहीं मंडळीं आहे कीं, आपलें घर जळलें तरीहि अर्थशास्त्राचा सिद्धांत उराशीं वांधून ते वाहेर पडतील; आणि विचार करीत वसतील कीं आतां नवें घर वांधणें चांगलें कां हॉटेलांत जाऊन राहणें चांगलें !!

अर्थशास्त्राच्या सामान्य सिद्धांताची ही गोष्ट झाली. आतां मि. वाच्छा यांनीं यासंवंधानें टाइम्सवर्तमानपत्रांत जें एक पत्र प्रसिद्ध केलें आहे त्यांतील मुद्यांचा विचार करूं.

........मि. वाच्छा असें लिहितात कीं, 'देशी कपडा वापरण्यावद्दल जारीनें उद्योग करावा हें खरें, पण हा उद्योग सिद्धीस कसा जाणार? हिंदुस्थानांतील प्रत्येक इसमानें देशी कपडा वापरण्याचा जर उद्यां निश्चय केला तर इतकें देशी कापड तरी कोठें आहे? आयात मालाच्या व्यापाराचे जे आंकडे उपलब्ध आहेत त्यांवरून त्यांनीं असें दाखविलें आहे कीं, विलायतेहून विनधुवट, धुवट आणि रंगाचे मिळून १९२ कोटी यार्ड लांव व सुमारें २४॥ कोटी रुपये किंमतीचें कापड दरवर्षी हिंदुस्थानांत येतें, व येवढें कापड येथें तयार करावयाचें म्हटलें तर देशांत पुष्कळ नव्या गिरण्या झाल्या पाहिजेत, व त्यांस सुमारें ३३ कोट रुपयांचें भांडवल लागेल. येवढें भांडवल एक दिवसांत उभें राहणार तरी कसें, आणि यदा कदाचित् उभें राहून यक्षिणीच्या कांडीनें नव्या गिरण्या तयार झाल्या तर वारीक धाग्याचें सूत निघण्यास लांव धाग्याचा कापूस पाहिजे तो कसा मिळावा? इजिप्त देशांतून अगर अमेरिकेंतून कापूस आणून माल स्वस्थ पडावयाचा नाहीं, तो देशांतल्या देशांतच उत्पन्न झाला

पाहिजे ; व तो जोंपर्यंत उत्पन्न होऊं लागला नाहीं तोंपर्यंत देशी कापड वापरण्याची चळवळ करणें व्यर्थ आहे; मग ती कितीहि देशाभिमानाची असो; कारण आकाशास गवसणी घालण्यांत कांहीं अर्थ नाहीं."

मि. वाच्छा यांचे हे विचार पाहून आम्हांस बरेंच आश्चर्य वाटलें व हसूं आलें. हिंदुस्थानांतील प्रत्येक इसम उद्यां देशी कपडा वापरूं लागल्यास तितका देशी कपडा मिळण्याजोगा नाहीं, ही गोष्ट सांगावयास मि. वाच्छा अगर त्यांच्या आंकड्यांची कांहीं जरूर नव्हती. ज्यास देशी व्यापाराची थोडीबहुतहि माहिती आहे त्यांस ही गोष्ट अवगत आहे, ज्यांनीं देशी कपड्या-बद्दल चळवळ आरंभिली आहे त्यांच्याहि लक्षांतून ही गोष्ट गेलेली नव्हती, व नाहीं असें आम्हीं मि. वाच्छा यांस खात्रीनें सांगूं शकतों. खुद्द आमच्या पत्रांतच दोन तीन आठवड्यांपूर्वीं याचा उल्लेख केलेला होता; परंतु मि. वाच्छा हे या गोष्टीस जितकें महत्त्व देतात तितकें आम्हीं देत नसल्यामुळें तिचा बाऊ करून आम्ही ती लोकांपुढें मांडिली नाहीं. मि. वाच्छा यांचें धोरण या बाबतींत कसें चुकलें तें आम्हांस समजत नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व लोकांस पुरे इतका कपडा देशी गिरण्यांत तयार होत नाहीं म्हणून देशी कपडा वापरण्याची चळवळ करूं नये हें म्हणणें असमंजसपणाचें आहे व हाच न्याय जर दुसरीकडे लागूं केला तर सर्व राजकीय, सामाजिक व औद्योगिक चळवळी बंद ठेवाव्या लागतील. कारण अशी कोणतीहि औद्योगिक सामाजिक अगर राजकीय सुधारणा नाहीं कीं ती उद्याचें उद्यां सिद्धीस जाईल. मि. वाच्छा यांस माहीत आहेच कीं, कॉंग्रेस सभेनें सुचविलेल्या राजकीय सुधारणा अमलांत येण्यास आणखी कित्येक वर्षें लोटलीं पाहिजेत ; पण याबद्दल चळवळ करण्याचें आम्हीं सोडून दिलें आहे काय ? नाहीं. मग तोच न्याय प्रकृतस्थलीं कां लागूं करूं नये ? मि. वाच्छा यांची दुसरी मोठी चूक अशी आहे कीं, उद्यांचे उद्यां सर्व लोक देशी कपडा वापरण्यास लागणार असें गृहीत धरून मग त्यावर त्यांनीं आपला व्यूह रचिला आहे. पण त्यांनीं गृहीत धरलेली गोष्टच असंभवनीय आहे. देशी कपड्याकरितां कितीहि चळवळ झाली, सभा झाल्या तरी हिमालया-पासून सेतुबंधापर्यंत हिंदु, मुसलमान, पार्शी वगैरे सर्व जातीचे व धंद्याचे लोक उद्यां देशी कापड वापरण्यास लागतात असें नाहीं. या गोष्टी घडून येण्यास कांहीं काळ गेला पाहिजे, आणि तेवढ्या काळांत देशी माल खपण्याची तजवीज झाल्यास हव्या तेवढ्या गिरण्या उभारण्यास अथवा लांब धाग्याच्या कापसाची लागवड करण्यास मुबलक वेळ सांपडेल. देशी कापड वापरण्याबद्दलची चळवळ अर्थशास्त्राच्या सिद्धांताविरुद्ध आहे असें ज्या शहाण्यांनीं प्रतिपादन केलें आहे

त्यांस आम्हीं येवढेंच विचारतों कीं, अर्थशास्त्रांत माल कसा उत्पन्न होतो याबद्दल जे नियम दिले आहेत त्या नियमांत कोणत्याहि मालाचा खप वाढला म्हणजे तो माल जास्त उत्पन्न होऊं लागतो असें लिहिलें नाहीं काय ? देशी कापड वापरण्याबद्दलची चळवळ जसजशी जास्त पसरेल त्या त्या मानानें देशी मालास जास्त मागणी येईल ; आणि तशी मागणी आली म्हणजे आज जो माल येथें होत नाहीं तो येथें तयार करण्याकडे व्यापारी लोकांचें लक्ष लागेल. मि. वाच्छा म्हणतात त्याप्रमाणें चांगला कापूस पिकविण्याची हिंदुस्थानांत तजवीज झाली पाहिजे, व गिरण्यांची संख्या वाढली पाहिजे ह्या गोष्टी आम्हांसहि मान्य आहेत, पण ह्या दोन्ही गोष्टी घडून येण्यास देशी कपड्याबद्दल हल्लीं चालू असलेल्या चळवळीपासून प्रतिबंध न होतां उलट साहाय्य होईल असें आमचें मत आहे; व म्हणूनच अर्थशास्त्रदृष्ट्याहि हल्लीची चळवळ सशास्त्र व आवश्यक आहे असें आमचें म्हणणें आहे.

---

# ८. दोन चांगलीं पुस्तकें

[ १० डिसेंबर १९०१ ]

गेल्या पंचवीस तीस वर्षांत हिंदुस्थानांत राजकीय बाबतींत जी चळवळ चालू आहे तिचा परिणाम काय आहे हें जर कोणास पहावयाचें असेल तर मि. दादाभाई नौरोजी आणि मि. विल्यम डिग्बी यांनीं प्रसिद्ध केलेलीं दोन पुस्तकें त्यानें अवश्य वाचावीत अशी त्यांस आमची सूचना आहे. दादाभाई नौरोजी यांनीं आपला देह हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां अर्पिलेला असून इंग्रजांसारख्या बलाढ्य व सुशिक्षित सार्वभौम राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं हिंदुस्थानदेश इतका दरिद्री कां झाला याची अर्थशास्त्रदृष्ट्या सोपपत्तिक खरीं कारणें विलायतेंतील इंग्रज लोकांस समजून देऊन त्यांच्या हातून हिंदुस्थानचें कांहीं कल्याण झाल्यास पहावें या सद्धेतूनें ते आयुष्याची शेवटची पंधरा वीस वर्षे स्वदेशाचा व स्वकीयांचा त्याग करून परदेशांत एकनिष्ठपणें काढीत आहेत हें सर्वांस श्रुत आहेच. किंबहुना राजकीय बाबतींत खटपट करणाऱ्या हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाचे पुढारीच नव्हे, तर त्यांतील महर्षी ही संज्ञा जर कोणास समजण्यासारखी असेल तर ती दादाभाई नौरोजी यांसच लागू पडते. कोणताहि देश विपन्न स्थितींत आला असतां त्याच्या रोगाचीं खरीं कारणें आपल्या बुद्धिबळानें शोधून काढून तीं दूर करण्याचा कायावाचामनेंकरून यथाशक्ति, अव्याहत, आमरणांत प्रयत्न करणें हें देशांतील पुढाऱ्यांचें कर्तव्य होय. असे पुढारी ज्या देशांत जन्मत नाहींत त्याची इतिहासज्ञ पुरुष मेलेल्या राष्ट्रांत गणना करीत असतात. शरीरास ज्याप्रमाणें प्राण त्याप्रमाणें असले पुढारी राष्ट्राचे जीव होत. राष्ट्र म्हणजे समुद्र आणि नद्या यांनीं मर्यादित पृथ्वीचा भाग अशी जर कोणी व्याख्या करीत असेल तर ती चुकीची आहे. पृथ्वीच्या कांहीं मैल चौरस तुकड्यास राष्ट्र म्हणावयाचें तर सहारा वाळवंटासहि राष्ट्र म्हटलें पाहिजे. किंवा उत्तर ध्रुवाजवळील बर्फाच्छादित प्रदेशासहि राष्ट्र म्हणतां येईल. परंतु राष्ट्र शब्दाचा तसा अर्थ होत नाहीं व त्याचप्रमाणें नुसता लोकसमुदाय म्हणजेहि राष्ट्र नव्हे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. ज्या लोकसमुदायांत एक प्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाहीं, ज्याचे घटकावयव सामान्य बंधनांनीं एकत्र बांधलेले नाहींत, अथवा ज्यांच्या अंगांत इतर समुदायांहून भिन्न अशा प्रकारचें वैशिष्ट्य वास

करीत नाहीं, ते लोक किंवा त्यांचा समुदाय कधींहि राष्ट्र या संज्ञेस पात्र होत नाहीं. तसेंच ज्या समुदायांत किंवा लोकसमूहांत वर सांगितलेल्या प्रकारचीं बंधनें किंवा वैशिष्टय नेहमीं जागृत ठेवण्याच्या उद्योगांस लागलेले पुढारी नाहींत. तो समाजहि केव्हां ना केव्हां तरी लयास जाणार हें निश्चित होय. राष्ट्रांत हजारों लोक असले तरी ते सर्व राष्ट्रीयत्वास अवश्य लागणाऱ्या गोष्टींचा विचार करीत नाहींत. हें काम देशांतील पुढाऱ्यांनींच केलें पाहिजे व अशा प्रकारचे पुढारी इंग्रजी राज्य पद्धतींत व इंग्रजी अमलाखालीं उत्तरोत्तर दुर्मिळ होत चाललेले आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. मुसलमान, मराठे, शीख वगैरे पूर्वींच्या राजांच्या सत्ता नाहीशा होऊन इंग्रजसरकारचें राज्य जेव्हां या देशांत स्थापित झालें तेव्हां अव्वल इंग्रजींत तयार झालेल्या मंडळींस इंग्रजी राज्याचे गोडवे किती व कोठवर गाऊं असें होऊन गेलें होतें. युरोपांतील राजनीति इतर देश आपल्या सत्तेखालीं आणून ते वागविण्याची पद्धति, एका देशानें दुसऱ्या देशांवर आपला अंमल चिरकाल कायम ठेवावयाचा असल्यास लोकांचीं मनें न मोडतां त्यासाठीं कोणकोणते उपाय केव्हां केव्हां कसे कसे अमलांत आणले पाहिजेत यासंबंधीं इतिहासावरून निघालेले सिद्धांत इ. गोष्टी आम्हांस अनगवत असल्यामुळें इंग्रजी राज्याचें धोरण पहिल्यानें बहुतेक कोणाच्याच लक्षांत आलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. शाळाखातें, तारायंत्र, आगगाड्या, आगबोटी, सडका, धर्मशाळा, दवाखाने, तुरुंग वगैरे राज्यव्यवस्थेच्या नवीन शिस्तीनें सर्वांचे डोळे दिपून गेले व कांहीं दिवस तरी सर्वांस असा भ्रम झाला कीं, या दयाळू इंग्रजसरकारच्या राज्यांत भरत-भूमीस इंद्रपद खचित प्राप्त होणार; पण हा भ्रम लवकरच नाहींसा झाला. परराष्ट्रीय व्यापाऱ्यांनीं व धंदेवाल्यांनीं आपला माल हिंदुस्थानच्या बाजारांत आणून अप्रतिबंध व्यापाराच्या तत्त्वावर आमच्या कारागिरांस, धंदेवाल्यांस व व्यापाऱ्यांस भिकेस लावलें. आगगाड्या, आगबोटी वगैरे जीं देशांतरी जाण्यायेण्याचीं शीघ्र साधनें अस्तित्वांत आलीं त्यांनीं या देशांतील धान्य व माल परदेशांत शीघ्र पाठविण्यास चांगली मदत केली, आणि ज्या ठिकाणीं पूर्वीं दहापांच युरोपियन लोक होते तेथें आतां शेकडों होऊन त्यांचे पगार, पेन्शनें, आणि व्यापाराच्या व व्याजाच्या रूपानें जात असलेला पैसा यानें सर्व हिंदु-स्थान देश निर्धन करून सोडला. एकीकडे अशा प्रकारची देशास कीड लागली असतां व दरवर्षीं त्याचीं गात्रें निर्जीव व शिथिल होत चाललीं असतां ज्या लोकांच्या हातांत ईश्वरकृपेनें या देशाचीं सूत्रें गेलीं आहेत त्यांनीं एकसारखी अशी ओरड चालू ठेवली होती कीं, " इंग्रजी राज्यछत्राखालीं शांतता आणि

सुरक्षितपणा यांच्या योगानें देशामध्यें सुवत्ता होऊन देश इंग्रजी अंमलाखालीं भरभराटीस येत चालला आहे." ही ओरड म्हणजे एक प्रकारें एखादी स्त्री सती चालली असतां मंगलवाद्यांचा ज्याप्रमाणें गजर चालू असतो त्याप्रमाणें होती असें म्हटलें तरी चालेल. विष्णूनें ज्याप्रमाणें तीन पावलानें सर्व जगाचें आक्रमण केलें अशी वेदांत व पुराणांत गोष्ट आहे त्याचप्रमाणें महाविष्णूचा हल्लींचा अवतार जें इंग्रजसरकार त्यानें मि. डिग्वी यांनीं म्हटल्याप्रमाणें व्यापार, राजसत्ता आणि अफूची गोळी या तीन साधनांनीं हिंदुस्थानदेशाचें आक्रमण करून त्यास पृथ्वीतील धनाढ्य देशाच्या उत्कृष्ट पायरीवरून दारिद्र्याच्या पाताळांत आणून सोडलें आहे. आमच्या डोळ्यापुढें गेल्या पन्नास पाऊणशें वर्षें हें जें गौडबंगाल चाललें आहे त्याचें खरें इंगित काय, व त्याचा पुढें परिणाम काय होणार हें पन्नास वर्षांपूर्वीं ज्यांनीं ताडिलें त्यांपैकीं मि. दादाभाई नौरोजी यांस अग्रेसरत्व दिलें पाहिजे. इंग्रजी राज्याची वरील चकाकी व भपका यांस भुलून न जातां शांत व सूक्ष्म रीतीनें अर्थशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणें नवीन राज्यपद्धतीचा विचार करून 'हें कांहीं ठीक नव्हे हे भिकेचे डोहाळे आहेत,' असें ज्यांच्या तोंडून पहिल्यानें उद्‌गार पडले व ज्या उद्‌गारांचा खरेपणा आज पावलोपावलीं आमच्या प्रत्ययास येत आहे त्या पुरुषास देशाच्या पुढाऱ्यांमध्यें आम्हीं अग्रस्थान दिल्यास त्यांत कांही नवल नाहीं. वातावरण चोहोंकडे शांत असतां भावी वावटळाची ज्यास अटकळ बांधता येते तोच देशाची नाव योग्य रीतीनें चालविण्यास लायख नावाडी होय. बाकी सटरफटर खलाशी पुष्कळ सांपडतात पण समुद्रकिनाऱ्यावरील शिपांपेक्षां त्यांची योग्यता अधिक नसते. असो; सार्वभौम इंग्रजी राजसत्तेखालीं हिंदुस्थानदेश भिकेस लागत चालला आहे व एक वर्ष पावसानें डोळे वटारल्यावरोबर लक्षावधि लोक रिलीफ कामावर उदरनिर्वाह करण्यास येतात अशी स्थिति येऊन ठेपली आहे, ही गोष्ट आतां पुष्कळ लोकांस मान्य झाल्यासारखी आहे. पण या विषयाचें सोपपत्तिक विवेचन थोडक्यांत एके ठिकाणीं ज्या पुस्तकांत केलेलें आहे अशा प्रकारचीं पुस्तकें आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं नव्हतीं. गेल्या पंचवीस तीस वर्षांत प्रांतिक सभा, राष्ट्रीय सभा, व इतर सार्वजनिक संस्था व वर्तमानपत्रें वगैरेमधून राज्यकर्त्यांच्या पक्षांचें व प्रजेच्या पक्षाचें वाग्युद्ध चालून दोन्ही पक्षांच्या कोटचा, प्रमाणें, व आंकडे हे सर्व हळु हळु प्रसिद्धीस आलेले आहेत. त्यांतून राष्ट्रीयसभेच्या सोळा बैठकींमध्यें प्रजापक्षाचे बहुतेक प्रश्न ज्या ज्या युक्तीनें सिद्ध करतां येतात त्या त्या युक्त्या व प्रमाणें आतां सर्व लोकांस विदित झालीं आहेत; व त्यांतलें त्यांतच गेल्या सालच्या दुष्काळानें आमचेंचसें काय पण आमच्या

राज्यकर्त्यांचेहि डोळे उघडून ह्या दारिद्र्यांचा प्रतिकार कसा करावा हा प्रश्न त्यांच्यापुढें उभा राहिला आहे. अशा वेळीं इंग्रजी राज्यामुळें हिंदुस्थान देशांस दारिद्र्य व दुर्बलता हीं कशीं प्राप्त झालीं, देशाचें राष्ट्रीयत्व नाहींसें होऊन त्यांत मुत्सद्दी, योद्धे, विद्वान आणि साहसी पुरुष निपजण्याची अजिबात कशी बंदी झाली, सुशिक्षित राज्यकर्त्यांची सुधारलेली राज्यपद्धती उत्कर्षास कारण न होतां तिच्यामुळें राष्ट्राच्या मानसिक व आधिभौतिक संपत्तीचा कसा ऱ्हास होत गेला आणि चोहोंबाजूनें आम्हीं हिंदुस्थानवासी लोक हतवीर्य आणि उत्साहहीन होऊन अक्काबाईच्या फेऱ्यांत कसे पडलों हें विलायतेंतील लोकांस व आमच्या राज्यकर्त्यांस स्पष्टपणें कळविणें जरूर होतें; आणि तें काम मि. दादाभाई नौरोजी आणि मि. डिग्बी यांनीं दोन चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध करून केलें आहे म्हणून त्यांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत. दादाभाई नौरोजी यांच्या पुस्तकाचें नांव Poverty and Unbritish Rule in India म्हणजे हिंदुस्थानांतील दारिद्र्य आणि इंग्रज लोकांचे शीलास न शोभणारी राज्यपद्धति असें आहे. व मि. डिग्बी यांनीं आपल्या पुस्तकांस Prosperous India म्हणजे "भरभराटलेलें हिंदुस्थान" असें व्याजोक्तीनें नांव दिलें आहे. दोन्हीं पुस्तकें हिंदुस्थानांतील लोकांच्या तर्फे त्यांच्या पुढाऱ्यांचें काय म्हणणें आहे हें ज्यांस समजून घ्यावयाचें आहे त्यांनीं अवश्य वाचण्यासारखीं आहेत. मि. डिग्बी यांनीं तर आपल्या पुस्तकाच्या आरंभींच लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांस लिहिलेलें पत्र छापलें आहे. व त्यांत हिंदुस्थानचें महानवाब लॉर्ड जॉर्ज हॅमिल्टन यांस अशी विनंति केली आहे कीं, "माझ्या पुस्तकांतील गोष्टी सर्व सरकारी रिपोर्टांतून घेतल्या आहेत, त्या खोटया तरी ठरवा, किंवा हिंदुस्थानास भिकेस लावणारी राज्यपद्धति तरी बदला." पुस्तकांत ठिकठिकाणीं निरनिराळ्या आकृति काढून हिंदुस्थानचें दारिद्र्य व दुर्दशा अगदीं वरवर पुस्तक वाचणारासहि उघड दिसून येईल अशी व्यवस्था केली आहे. पुस्तकाच्या अगदीं पुठ्यावरच हिंदुस्थानांतील प्रजेचें उत्पन्न दर माणशीं दररोज १८५० सालीं २ पेन्स, १८८० सालीं १॥ पेन्स, आणि १९०० सालीं ¾ पेन्स होतें असें सोनेरी अक्षरांनीं छापलें आहे. हिंदुस्थानांतील संपत्ती कोठें जाते आणि ज्या ठिकाणीं तिचा उगम होतो तो देश कोरडा राहून साता समुद्रापलिकडे एका बेटांत तो ओघ कसा सांठवला जातो याचेंहि या पुस्तकांत सप्रमाण विवेचन आहे. हीं दोन्हीं पुस्तकें मराठींत समग्र नाहीं तरी सारांश रूपानें व चटकदार भाषेंत जर कोणी तयार करील तर त्याचा आमच्या लोकांस पुष्कळ उपयोग होईल असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थान देश भिकारी होत चालला आहे व पन्नास

वर्षांनीं पुढें काय भयंकर स्थिति होणार आहे याची पुष्कळांस कल्पना देखील करतां येत नाहीं, असें झालें आहे. पण देश भिकेस लागला आहे अशी नुसती कल्पना होऊन किंवा खात्री पटून उपयोगी नाहीं, ज्यांच्या हातांत अशा स्थितीचा प्रतिकार करण्याचा अधिकार व सामर्थ्य आहे त्यांची आपण तशाप्रकारें खात्री करून दिली पाहिजे, व ही खात्री करून देण्याकरितांच मि. दादाभाई नौरोजी व मि. डिग्बी यांनीं हीं दोन पुस्तकें लिहिलीं आहेत. या दोन्हीं पुस्तकांचें सामान्य स्वरूप वर सांगितलें; त्यांतील कांहीं विशिष्ट मुद्यांचा विचार किंवा सारांश पुढें सवडीप्रमाणें देण्याचा विचार आहे.

## भरभराटलेलें इंग्रजी हिंदुस्थान

[ १७ डिसेंबर १९०१ ]

वरील नांवाचा ग्रंथ मि. डिग्बी यांनीं प्रसिद्ध केल्याचें नुकतेंच गेल्या अंकांत आम्हीं सांगितलें आहे. या पुस्तकाची डेमी अष्टपत्री सांच्याचीं सुमारें ७०० पृष्ठें असून त्याची किंमत ७॥ रुपये आहे. हिंदुस्थानास दारिद्र्य येण्यास कोणतीं कारणें झालीं याबद्दल गेल्या पांच पंचवीस वर्षांत मि. दादाभाई नौरोजी मि. ह्यूम, वगैरे सद्गृहस्थांनीं जीं निरनिराळीं कारणें सिद्ध करून दाखविलीं त्या सर्वांचा थोडक्यांत गोषवारा ज्यांस पहावयाचा असेल त्यानें हें पुस्तक अवश्य वाचावें अशी आमची शिफारस आहे; किंबहुना एकोणिसाव्या शतकांत हिंदुस्थान अतिशय सुधारलेल्या राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं असतांहि त्यांस अशी भिकारदशा कां प्राप्त झाली, याची विसाव्या शतकाच्या आरंभीं संक्षिप्त हकीकत सांगून पुढें ती स्थिति सुधारण्यास काय केलें पाहिजे याचें या ग्रंथांत विवेचन आहे; आणि यांत सांगितलेल्या गोष्टींचा किंवा रोगाचा प्रतिकार न झाल्यास विसाव्या शतकाचे अखेरीस हिंदुस्थान अतिशय भिकारी होऊन भरतभूमी म्हणजे एक भिकारी लोकांचा मोठा तुरुंग बनणार आहे. मि. डिग्बी हे आपल्या ग्रंथांत असें लिहितात कीं, आजपर्यंत हिंदुस्थानच्या द्रव्याची जी पावडेओढ चालली आहे तीमुळें "विसाव्या शतकाच्या आरंभीं हिंदुस्थान संपत्तीच्या मानानें आणि नैतिक गुणसंबंधानें इतका खालावला आहे आणि त्यांतील लोक निःसत्त्व होऊन इतके गुलाम बनले आहेत कीं, ही स्थिति अशीच राहिल्यास लवकरच तेवीस कोटींपैकीं २० कोट प्रजा अन्नास मोताद होईल!" ही भयंकर स्थिति टाळण्यास एकच उपाय आहे आणि तो हा कीं, देशांतील संपत्ती देशांत राहून तिचा उपयोग देशांतील धंद्यांची अभिवृद्धि करण्याकडे झाला पाहिजे. हिंदुस्थानची हल्लींची स्थिति मि. डिग्बी यांनीं

जी वर्णन केली आहे ती अशी आहे कीं, ती ऐकल्यानें कोणांसहि द्रव आल्याखेरीज राहणार नाहीं. ज्या देशांत,

(१) गांवोगाव असलेलीं धान्याचीं पेवें नाहीशीं होत चाललीं.

(२) सोन्यारुप्याचे दागिने किंवा त्या रूपानें आलेली शिल्लक वहुतेक नष्ट झाली,

(३) लोकांचे निरनिराळ्या प्रकारचे समुद्रावरील किंवा जमिनीवरील उद्योगधंदे नाहींसे होऊन सर्वजण शेतकीवर येऊन पडले,

(४) ज्या गलबताच्या योगानें देशांतील धान्य किंवा उत्पन्न परदेशांत जातें तीं गलबतें देखील परकीयांनीं वांधलेलीं व परकीयांनीं चालविलेलीं आहेत, व त्यांचा फायदा परकीयांकडे जात आहे,

(५) नीळ, चहा, कॉफी, वगैरे ज्या नव्या उत्पन्नाच्या वावी आहेत त्या सर्व परकीय भांडवलानें परकीय लोकांच्या फायद्याकरितां चाललेल्या आहेत.

(६) व्यापार किंवा मोठमोठे उद्योगधंदे हे सर्व किंवहुना किफायतीचा सर्व रोजगार जेथें परकीयांच्या हातांत आहे, आणि

(७) राज्यकारभारांतील मोठमोठ्या पगाराच्या वा हुद्याच्या नोकऱ्या सर्व परदेशांतील लोकांच्या ताव्यांत आहेत, त्या देशास भीक लागून एक वर्ष पाऊस न पडतांच लोक अन्नान्नदशेस लागल्यास नवल काय, असा मि. डिग्वी यांनीं प्रश्न केला आहे.

विसावें शतक लागलें तेव्हां विलायतेच्या पत्रांतून एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडाची कशी काय भरभराट झाली याविषयीं अनेक लेख आले होते. या लेखांवरून पाहतां एकोणिसाव्या शतकांतच इंग्लंडदेशाची अतिशय भरभराट झाली असें दिसून येतें. पण त्याच शतकांत हिंदुस्थानदेश इंग्लंडच्या ताव्यांत असतां तो मात्र भिकेस लागला. मि. डिग्वी यांनीं आपल्या ग्रंथांत ब्रुक्स ॲडाम्स यांच्या ग्रंथांतील एक उतारा देऊन असें सिद्ध केलें आहे कीं, १७५७ सालीं प्लासीची लढाई झाल्यानंतर तीन वर्षांनीच सुताच्या गिरणीची कल्पना इंग्लंडांत निघाली, व १७६८ सालीं वॉटसाहेवांनीं वाफेच्या इंजिनाची कल्पना काढली, पण नुसत्या कल्पनांनीं होणार काय ? आज मँचेस्टर व लँकेशायर येथें ज्या शेकडों वाफेच्या गिरण्या चालू आहेत त्यांस द्रव्यवल नसतें तर त्या कधींहि चालू झाल्या नसत्या हें उघड आहे. हें द्रव्यवल इंग्लंडास कोठून प्राप्त झालें याचा ब्रुक्स ॲडाम्स यांनीं जो निर्णय केला आहे तो असा आहे कीं, यापैकीं वहुतेक पैसा प्लासीच्या लढाईनंतर हिंदुस्थानांतून आला. सारांश, कंपनीच्या अंमलांत किंवा अव्वल इंग्रजींत, लूट, पगार, किंवा व्यापार यांच्या

मिपानें जो द्रव्याचा ओघ हिंदुस्थानांतून इंग्लंडास गेला त्यामुळेंच यांत्रिक कल्पना अंमलात व प्रचारात येण्यास ज्या साधनांची जरूरी आहे तीं म्हणजे द्रव्याचीं साधनें, इंग्लंड देशांस उपलब्ध होऊन तो भरभराटीच्या शिखरावर चढला, व आम्हीं दारिद्रयाच्या खड्यांत किंवा चिखलांत उत्तरोत्तर अधिकाधिक गढत चाललों, इतकेंच नव्हें, तर इंग्लंड देश जसजसा हिंदुस्थानांतून गेलेल्या संपत्तीनें अधिकाधिक भरभराटीस येत चालला तसतशी त्याची भरभराटच आमच्या ऱ्हासास अधिक कारणीभूत होत चालली. गाडीच्या चाकाप्रमाणें ही एका देशाची उन्नति व एका देशाची अवनति कशी झाली हें मि. डिग्बी यांनीं आपल्या पुस्तकांत सुरेख दाखविलें आहे. कापसाची किंवा रेशमी वस्त्रें तयार करण्यांत हिंदुस्थान देशाचा पूर्वीच्या काळीं पहिला नंबर असे, व एकोणिसाव्या शतकांत हिंदुस्थानांत जर स्वराज्य असतें तर जपान देशानें हल्लीं ज्या प्रमाणें युरोपियन कलाकौशल्यें उचललीं आहेत तद्वतच वाफेनें माग चालविण्याची कल्पनाहि आम्हीं घेऊन सदर कल्पनेपासून द्रव्यद्वारा होणारा सर्व फायदा या देशांतील लोकांच्याच पदरांत पडला असता. पण दैवगति अशी कांहीं विचित्र आहे कीं, शास्त्रीय किंवा यांत्रिक नवीन नवीन शोध निघण्यास आणि हिंदुस्थानांत परकीय राज्य होऊन या देशांतील संपत्ति विलायतेस जाण्यास एकच गांठ पडली! आणि एकदां याप्रमाणें संपत्तीचा ओघ पूर्वेकडून पश्चिमेकडे वळल्यानंतर राजसत्ता परकीयांच्याच हातांत असल्यामुळें या ओघास बंधारा घालण्याचें काम झालें नाहीं तें नाहींच. पण तो उलट अधिक जोरानें परदेशाकडे जेणेंकरून वाहत जाईल अशा सर्व तजविजी करण्यांत आल्या. मि. डिग्बी यांनीं मि. थॅकरे यांच्या रिपोर्टांतील एक उतारा पहिल्यानेंच घेतला आहे. मद्रास इलाख्यांत जमीनधाऱ्याची कोणती पद्धत सुरू ठेवावी याबद्दल १८१२ सालीं जो वाद झाला त्यांत मि. थॅकरे यांनीं जो अभिप्राय दिला आहे त्यापैकीं हा उतारा आहे. जमीनधाऱ्याच्या दोन पद्धती आहेत. एक देशमुख, देशपांडे वगैरे मधील अधिकारी नेमून त्यांच्यामार्फत सारा वसूल करणें, आणि दुसरी रयतवारी किंवा शेतकऱ्यांपासून प्रत्यक्ष सरकारानें सारा घेणें. पैकीं पहिल्या पद्धतीप्रमाणें देशमूख व देशपांडे वगैरे लोकांस जमिनीच्या साऱ्यापैकीं शेकडा कांहींतरी भाग वेतनाबद्दल मिळून राज्यामध्यें सुखवस्तु व समृद्ध लोकांचा एक वर्ग वाढतो, आणि ज्यावेळीं स्वराज्य होतें त्यावेळीं अशा प्रकारच्या लोकांचा वर्ग राज्यांत असल्यानें राज्यास एक प्रकारची बळकटी होती. परंतु परकीय राज्यांत अशा प्रकारचे मधल्या वर्गांतील संपन्न लोक असणें राज्यकर्त्यांस हितावह नाहीं, असा थॅकरेसाहेबांनीं आपला अभिप्राय दिला आहे. व याकरितां

जमीनधाऱ्याची जी पद्धत सुरू करावयाची ती देशमुख, देशपांडे, इनामदार वगैरे नाहींसे व्हावे अशा प्रकारची करावी असें त्यांचें म्हणणें नमूद आहे. ते म्हणतात कीं, इंग्लंडांत साऱ्यापैकीं बराच भाग ज्यांच्या पदरांत पडतो अशा प्रकारचे जमीनदार लोक असल्यानें त्या वर्गांतून चांगले मुत्सद्दी व कारस्थानी लोक निपजून राज्यास बळकटी येते. पण हिंदुस्थानांत अशा प्रकारचे जमीनदार लोक ठेऊन उपयोग काय ? संपत्ती पुष्कळ असल्यानें त्यांचे विचार सहजगत्या राजकीय विषयाकडे वळून ते आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याच्या उद्योगास लागणार. ज्या ठिकाणीं स्वराज्य आहे तेथें असले लोक पाहिजेत. पण हिंदुस्थानांत इंग्रज सरकारास त्यांची जरूर नाहीं. हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या संपत्तीनें उत्पन्न होणारे विचार, महत्त्वाकांक्षा, स्वातंत्र्यप्रियता आणि ताठरपणा ही जितकी बुडवितां येतील तितकी चांगलीं. " आम्हांस हिंदु लोकांमधून मोठे मुत्सद्दी, योद्धे किंवा राज्यकारस्थानीं पुरुष निपजण्यास नको आहेत. शेतकी करून गरीबीनें उद्योग करणारे लोक असले म्हणजे बस्स आहे ! " आतां ही गोष्ट खरी आहे कीं, पूर्वीच्या राज्यांतील इनामदार व वतनदार एकदम कमी करतां येत नाहींत पण वर सांगितल्याप्रमाणें राजकीय दृष्टया विचार केला तर अशा प्रकारचे संपन्न व स्वतंत्र विचाराचे नवीन लोक न निपजतील अशा प्रकारची तजवीज करणें जरूर आहे. अशा प्रकारचे नवीन लोक निपजणें बंद झालें म्हणजे जुन्यांचाच काय तो बीमोड करण्याचा प्रश्न राहिला, व तोहि कालांतरानें समाधानकारक रीतीनें सोडविण्यांत येईल. थॅकरेसाहेबांनीं हे विचार १८१२ सालीं प्रसिद्ध केलेले आहेत, व गेल्या ९० वर्षांत त्यांचा कसा काय अंमल झाला हें सर्वांस माहीत आहेच. इंग्रज सरकारच्या राज्यांत शांतता स्थापित होऊन लोकांस आगगाड्या, तारायंत्रें इत्यादिकांचें सौख्य प्राप्त झालें. असें प्रतिपादन करणारांनीं थॅकरेसाहेबांचे वरील विचार अवश्य वाचावेत, अशी त्यांस आमची सूचना आहे. पेशवाई संपल्यानंतर एलिफन्स्टन साहेबांनीं दक्षिणेंतील सरंजामदार व जहागिरदार मंडळींची जी व्यवस्था लाविली व त्यांपुढें दक्षिणेंत साऱ्याची जी रयतवारी पद्धत अमलांत आणली तिचें रहस्य काय आहे हें यावरून ध्यानांत येईल. जुनी सरदार घराणीं बुडवावयाचीं आणि सरकारशीं डोकें वर काढून कोणी भांडेल अशा प्रकारचा मनुष्य राज्यामध्यें ठेवावयाचा नाहीं हें इंग्रजी राज्याचें धोरण पहिल्यापासूनच ठरलेलें आहे. मोठमोठ्या पगाराचे साहेब लोक आणि अंमलदार यांखेरीज राज्यांत कोणीहि डोईजड मनुष्य असू नये आणि सर्व प्रजेनें गुलामाप्रमाणें खपून व पोटास अर्धी भाकर खाऊन अर्धी भाकर राज्यकर्त्यांस द्यावी, हें

इंग्रजी राज्यांचें मूळ धोरण किंवा अखेर परिणाम आहे. पहिल्यानें ही गोष्ट आमच्यांतील लोकांच्या चांगलीशी लक्षांत आली नव्हती व त्यामुळें कोणी सामाजिक तर कोणी धार्मिक सुधारणेच्या नादीं लागले होते. पण गेल्या पन्नास वर्षांच्या इतिहासावरून व लोकस्थितीवरुन एक गोष्ट आतां उघड सिद्ध झाली आहे व ती ही कीं, हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगचें तेज, वैभव, सामर्थ्य, हुषारी, किंवा वुद्धि यांचा विकास न होण्यास परकीय लोकांचें राज्य हेंच जवरदस्त कारण आहे, आणि या राज्यामध्यें कितीहि शांतता असली तरी ज्या गोष्टीवर स्वतंत्र देशाचा जीव का प्राण अवलंवून असतो त्या सर्व गोष्टीस आम्हीं पारखे झालों आहों. मि. डिग्वी यांच्या ग्रंथांत ही गोष्ट मुद्देसूद रीतीनें सिद्ध केलेली आहे व केसरीपत्रांतहि अनेक वेळां अशाच प्रकारचे लेख मागें आलेले आहेत. इंग्रजी राज्यपद्धतीचें खरें स्वरूप ज्यांस पहावयाचें असेल त्यानें या गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे.

## हिंदुस्थानचें दारिद्र्य

[ १४ जानेवारी १९०२ ]

गेल्या पंचवीस वर्षांच्या वादविवादांत जर हिंदुस्थानच्या लोकांच्या तर्फें कोणतीहि गोष्ट सिद्ध करण्यांत आली असेल तर ती त्यांच्या दारिद्र्या-संबंधीची होय. दोनशें वर्षांपूर्वीं ज्या वेळेस इंग्लिश, डच, फ्रेंच, पोर्तुगीज वगैरे पश्चिमेकडील लोकांनीं सुवर्णभूमीची आख्या ऐकून आमच्याकडे धांव घेतली तेव्हां हिंदुस्थानच्या संपत्तीवद्दल पश्चिमेकडील लोकांची जी समजूत झाली होती तींत व हल्लींच्या वस्तुस्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडलें आहे. आमच्या देशांस सुवर्णभूमि हें नांव राहिलेलें आहे, पण 'नांव सोनुवाई आणि हातीं कथलाचा वाळा' अशी आतां स्थिति येऊन ठेपली आहे. डिग्वी साहेवांनीं आपल्या वुकाच्या पाठीवर वुकाचें सोनेरी अक्षरानें जेथें नांव घातलें आहे त्याखालीच सोनेरी अक्षरांनी हिंदुस्थानचें भवितव्य १८५० सालीं दर माणशीं रोजचें उत्पन्न २ पेन्स किंवा हल्लींच्या हुंडीच्या भावाप्रमाणें दोन आणे, १८८० सालीं १॥ पेन्स किंवा १॥ आणा, आणि १९०० सालीं ¾ पेन्स किंवा ०॥। आणा होतें असें लिहिलें आहे. व त्याच्या पुष्टीकरणार्थ सरकारी रिपोर्टांतील उतारे घेऊन केवळ सरकारी कागदपत्रांवरूनच हें म्हणणें सिद्ध करुन दाखविलें आहे. इंग्रजी राजकर्त्यांस हिंदुस्थानची खरी स्थिति न समजल्यामुळें त्यांनीं केलेली व्यवस्था नीट होत नाहीं असें सभांतून व वर्तमानपत्रांतून म्हणण्याचा प्रघात आहे; व राजकीय चळवळींत पडलेल्या, नरम म्हणवून घेणाऱ्या कित्येक गृहस्थांस सरकारच्या

सदुद्देशाचीच आम्हीं वारंवार स्तुति करावी हें इष्ट वाटत असतें. पण हा सर्व भ्रम आहे आणि हिंदुस्थानची खरी स्थिति सरकारच्या कागदपत्रांत नमूद आहे व खुद्द सरकारी अधिकाऱ्यांस माहीत आहे हें मि. डिग्बी यांचें पुस्तक वाचल्यानें कोणासहि कळून येईल. सन १८८२ सालीं लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत तेव्हांचे फडणीस सर वेअरिंग यांनीं हिंदुस्थानच्या लोकांच्या प्राप्तीचें मान चौकशी करून दरसाल दर माणशीं सरासरीनें २७ रुपये ठरविलें होतें. त्यानंतर १८८८ सालीं लॉर्ड डफरिन गव्हर्नरजनरल असतां हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतिक सरकारांमार्फत गुप्त रीतीनें चौकशी होऊन हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांची व मजुरांची खरी स्थिति सरकारानें समजून घेतली. हे रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाले आहेत, पण ते गुप्त असल्यामुळें ते कोणासहि देण्यांत किंवा दाखविण्यांत येत नाहींत. सन १८९१ सालीं पार्लमेंट सभेच्या टेबलावर हें रिपोर्ट ठेवावे म्हणून ब्राडलासाहेबांनीं सूचना केली होती. पण पहिल्यानें ती नाकबूल झाली. अखेरीस हे रिपोर्ट अपुरेच कां होईनांत पार्लमेंटच्या टेबलावर ठेविले, आणि ब्राडलासाहेबांच्या उपयोगाकरितां एक प्रत देण्यांत आली. तीच प्रत हल्लीं डिग्बीसाहेबांजवळ आहे व त्याचाच आधार घेऊन प्रस्तुतच्या पुस्तकाचा बराच भाग त्यांनीं लिहिलेला आहे. बंगाल, मद्रास, मुंबई, वायव्य प्रांत, पंजाब, मध्यप्रांत, ब्रह्मदेश आणि आसाम इतक्या प्रांतांची या रिपोर्टांवरून व दुसऱ्या साधनांवरून हकीकत घेऊन मि. डिग्बी यांनीं असें सिद्ध केलें आहे कीं, हिंदुस्थानांत श्रीमंत लोक जो फाजील पैसा खर्च करतात त्या मानानें गरीबांची प्राप्ती कमी धरली म्हणजे कोटयवधि गरीब लोकांस दर माणशीं सालीना १३ शिलिंग म्हणजे हल्लींच्या भावानें सुमारें ९॥ किंवा फार झालें तर १० रु. पडतात. लॉर्ड कर्झन यांनीं दर माणशीं दरसाल प्राप्तीचें मान ४० शिलिंग धरलें आहे. पण तें बरोबर नसून खरें प्राप्तीचें मान सुमारें २२-२३ शिलिंग आहे असें मि. डिग्बी यांनीं दाखविलें आहे. या बावीस तेवीस शिलिंगांतून श्रीमंत लोकांची प्राप्ती कमी केली म्हणजे गरीबांस वर्षास अवघे १३ शिलिंग राहतात. कलकत्ता, मुंबईसारख्या राजधानीच्या शहरांतून व्यापाऱ्यांजवळ किंवा देशी संस्थानांतील राजांजवळ जी कांहीं हल्लीं थोडीबहुत संपत्ती दृष्टीस पडते तेवढ्यावर हिंदुस्थानच्या संपत्तीचें जर कोणी अनुमान बांधू लागला तर तें चुकीचें होईल. हिंदुस्थानसारख्या अफाट देशांत कांही थोड्या लोकांजवळ जर संपत्ती दिसली तर त्यावर सर्व देशाच्या संपत्तीचें अनुमान करणें चुकीचें आहे. ज्यास देशांतील लोकांची खरी स्थिति पहावयाची असेल त्यानें खेडेगांवांतील शेतकऱ्यांची किंवा मजुरांची स्थिति पाहिली पाहिजे. कोणत्याहि देशांतील

लोक समृद्ध आहेत कीं नाहींत हें पाहणें असल्यास त्या देशांतील अगदीं हलक्या प्रतीच्या लोकांस कोणतें अन्न, वस्त्र व राहण्याची जागा असते हें पाहिलें पाहिजे. दक्षिणेंतील गरीब कुणब्यास पोटास दरसाल निदान १८ शिलिंग म्हणजे निदान १४ रुपये लागतात, असा स्पेन्सरसाहेबांचा अदमास आहे; व प्रांताचें मान पाहिलें तर त्याहिपेक्षां कमी. तुरुंगांत कैद्यास पोटास दरसाल दरमाणशीं २० रुपये तरी लागतात. या मानानें पाहिलें तर हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस तुरुंगांतील कैद्याइतकेंहि अन्न मिळत नाहीं, असें उघड सिद्ध होतें, अशा स्थितींत लोकांनीं खावें काय, उमेद कोणती बाळगावी आणि वस्त्रप्रावरण तरी कोणतें घ्यावें? या लोकांची खरोखर स्थिति म्हटली म्हणजे एका कवीनें वर्णन केल्याप्रमाणें "रात्रौ जानुर्दिवा भानुः कृशानुः संध्ययोरपि। इत्थं शीतं मया नीतं जानुभानुकृशानुभिः॥" अशा प्रकारची आहे. शेत चांगलें पिकलें असतांहि ज्यांस फार झालें तर सालींना २० शिलिंगहि मिळत नाहींत, त्यानें पोटास काय खावें? कपडा कोठला घ्यावा, लग्नकार्यास काय खर्च करावा आणि सावकारास काय द्यावें हें एक परमेश्वरासच माहीत पडेल! सर्व देशांतील लोक अशा प्रकारें कंगाल झाले असल्यावर एक साल पर्जन्य न पडला असतां लाखों लोक दुष्काळाचे कामावर येऊं लागल्यास त्यांत नवल तें काय? त्यांतून हिंदुस्थानसरकारास ही स्थिति माहीत नसती तर गोष्ट निराळी. पण हिंदुस्थानसरकारच्या हुकुमावरून निरनिराळ्या प्रांतांतील सरकारच्या अंमलदारांनीं स्वतंत्र चौकशी करून प्रमाणसिद्ध रीतीनें ही माहिती सरकारपुढें मांडली असतां व ती छापूनहि प्रसिद्ध झाली असतां आज बारा वर्षें सरकार तिकडे डोळेझांक करीत आहे यांस म्हणावें तरी काय? याचें कोणी उत्तर देईल काय? इंग्रज सरकारच्या राज्यव्यवस्थेखालीं हिंदुस्थान उत्तरोत्तर कंगाल होत चाललें आहे याबद्दलचा भक्कम पुरावा सरकारी रिपोर्टांत भरलेला असतां व त्या रिपोर्टांच्या शेकडों प्रती सरकारी दप्तरांत कसर खात पडलेल्या असतां पुनः निलाजरेपणानें लॉर्ड जॉर्ज ह्यामिल्टनसारख्या बड्या अधिकाऱ्यांनीं पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानच्या भरभराटीचे पोवाडे गावे यापेक्षां अधिकारी वर्गाच्या आपमतलबी धाष्टर्याचें दुसरें उत्कृष्ट उदाहरण तें कोणतें? हिंदुस्थानदेश भिकारी होत चालला आहे ही गोष्ट इंग्रजी अधिकारीवर्गास पूर्णपणें माहीत आहे. इतकेंच नव्हे तर, ती विलायतेंतील लोकांस कळूं देऊं नये अशाबद्दल त्यांचे सक्त प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न निष्फळ होऊन हिंदुस्थानची खरी स्थिति विलायतेच्या लोकांस कळवावी एवढाच मि. दादाभाई आणि मि. डिग्बी यांच्या पुस्तकांचा हेतु आहे व तो आमच्या मतें हल्लीं प्रसिद्ध झालेल्या

पुस्तकानें चांगला सिद्धीस जाण्याजोगा आहे. हिंदुस्थान निःसत्व झालें, निर्बल झालें किंवा निर्धन आणि नाउमेद होऊन त्यांतील राष्ट्रीयत्वाचें बीज नाहीसें होत चाललें, अशी आमच्या राज्यकर्त्यांजवळ येथें ओरड करून कांहीं एक उपयोग नाहीं. आज तीस कोट प्रजेवर आसेतुहिमालयापर्यंत जे अबाधित राज्य चालवीत आहेत त्यांस ही गोष्ट पूर्णपणें माहीत आहे. पण माहीत असून उपयोग काय ? हिंदुस्थानांतील लोकांस त्यांस अशाच स्थितींत ठेवावयाचें आहे व याकरितां ते आपल्या देशबांधवांसहि हव्या त्या थापा देण्यास तयार आहेत. आतां आपणांस तरणोपाय काय तो एवढाच आहे कीं, विलायतेंतील सर्व लोकांस ही स्थिति कळवून त्यांच्याकडून हिंदुस्थानांत आलेल्या त्यांच्या देशबांधवांच्या करणीस आळा घालतां आल्यास पहावा. मि. दादाभाई नौरोजी आणि मि. डिग्वी यांचीं पुस्तकें याच हेतूनें लिहिलेलीं आहेत. हिंदुस्थानांतील लोकांच्या खऱ्या स्थितीबद्दल रिपोर्ट आपल्या दप्तरांत दाबून ठेवून विलायतेंतील लोकांस स्टेट सेक्रेटरीसारखे अधिकारी कसें फसवितात हें आतां चांगलें उघडकीस आलें आहे. याबद्दल आतां कांहीं शंका राहिली नाहीं. कारण मि. डिग्वी यांनीं आपलें पुस्तक प्रसिद्धपणें लॉर्ड जॉर्ज ह्यामिल्टन यांजकडे पाठविलें आहे. आतां विलायतेंतील लोक याचा प्रतिकार करण्याच्या कामीं आम्हांस कांहीं मदत करतील कीं काय एवढाच प्रश्न आहे. विलायतेंतील लोकांनीं या कामीं आम्हांस मदत करणें म्हणजे स्वजातीयांस कमी हावरेपणा करण्यास सांगण्यासारखें आहे. सामान्य मनुष्यस्वभावाप्रमाणें असा उपदेश आपल्या आप्तांस कोणीहि करावयाचा नाहीं. पण हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य बरेच दिवस राहिलें पाहिजे व तें राहण्यास नीति व सदयता हीं दोनच खरीं साधनें आहेत अशी खात्री झाल्यावर इंग्लंडांतील लोक आम्हांस कांहीं मदत करूं शकतील. परंतु इंग्लंडसारख्या पैसे मिळविण्यांत चूर झालेल्या राष्ट्रांची अशा प्रकारें खात्री करून देणें हें मोठ्या श्रमाचें, धीराचें आणि खर्चाचें काम आहे. मि. दादाभाई यांनीं आपलें आयुष्यच या कामीं खर्च केलें आहे असें म्हटलें तरी चालेल. पण त्यापासून व्हावा तितका उपयोग झाला नाहीं. यापुढें हा उद्योग किती व कसा चालवावा हा स्वतंत्र प्रश्न आहे. ज्या पुस्तकासंबंधानें आम्हीं प्रकृत लेख लिहिला आहे त्यावरून एवढी गोष्ट निर्विवाद सिद्ध आहे कीं, आमच्या दारिद्र्याची सरकारास पूर्ण कल्पना असूनहि सरकार हल्लींच्या क्रमांत कांहीं फेरफार करीत नाहींत. त्यांस हीच स्थिति पाहिजे आहे किंवा नको असल्यास तिचा प्रतिकार करण्याची त्यांची इच्छा नाहीं. गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या चळवळीनें जर कांहीं सिद्ध झालें असेल तर हेंच होय व यापुढें काय करावयाचें तें राष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं ठरविलें पाहिजे.

# ९. आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले ?

[ ११ नोव्हेंबर १९०२ ]

कोणत्याहि देशाची सांपत्तिक स्थिति निव्वळ शेतीवरच अवलंबून असल्यास ती सदासर्वकाळ चांगली राहणें संभवनीय नसतें. मानवी राजांच्याहि शिरावर असणाऱ्या मेघराजाच्या लहरी स्वभावावरच ज्यांचें भाग्य अवलंबून असतें, ते लोक नेहमीं सुखीच नांदतील असा नियम नाहीं. तथापि या त्यांच्या लहरी स्वभावाचे दुष्परिणाम टाळण्यास फक्त दोनच उपाय आहेत व हे दोन्ही सर्वांशींच केवळ नसले तरी पुष्कळ अंशीं त्या त्या देशांतील राजांचेच हातीं आहेत. यांपैकीं पहिला, लोकांस आपल्या प्रयत्नानेंच ज्यांत सिद्धी मिळवितां येईल अशा तऱ्हेच्या कलांची व उद्योगधंद्यांची अभिवृद्धि करणें हा; आणि दुसरा, या मानानें कमी दर्जाचा, परंतु महत्त्वाचा उपाय म्हणजे राजानें आपला भाग कायमचा ठरवून टाकणें, व तो देऊन टाकल्यानंतर शेतकऱ्याच्या कुटुंबाचें वर्षभर पोषण होऊन अवर्षणाच्या वर्षासाठीं त्यास संग्रह करून ठेवण्यास सवड सांपडेल, इतका तो भाग स्वल्प राखणें हा होय. पौराणिक कालापासून तों कंपनीसरकारच्या राज्याची स्थापना होईपावेतों या देशांत जरी बऱ्याच राज्यक्रांत्या व उलाढाली झाल्या तथापि वर दिलेल्या दोन तत्त्वांस कोणत्याहि देशी अथवा विदेशी राज्यकर्त्यानें झुगारून दिलें नाहीं, ही गोष्ट इतिहाससिद्ध आहे. मनूच्या आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या राजांचा, उत्पन्नाचा $\frac{१}{१२}$ पासून $\frac{१}{६}$ पावेतों जमिनीच्या मगदुराप्रमाणें असलेला कर जरी मुसलमान राजांनीं $\frac{१}{४}$ पावेतों वाढविला, तथापि हा कर वसूल करण्याचे बाबतींत विशेष सक्ती नसल्यामुळें व त्यापेक्षांहि अधिक महत्त्वाचें म्हणजे त्यांनीं उद्योगधंदे ठार करण्याचा यत्किंचितहि प्रयत्न न करितां, उलट ते वाढविण्याचाच सतत प्रयत्न केल्यामुळें, हिंदुस्थानचा ‘राष्ट्र’ या नात्यानें या परकी अमलापासून सांपत्तिक दृष्टीनें मुळींच तोटा झाला नाहीं. मुसलमानी अंमल सुरू होण्यापूर्वी कित्येक शतकें आमचा व्यापार व आमच्यामधील कलाकौशल्य यांनीं परकीयांस मोहून टाकिलें होतें. फार प्राचीन काळापासूनच या उद्योगधंद्यांचें महत्त्व इकडच्या लोकांच्या हृदयांत इतकें पक्कें बिंबलें होतें कीं, वाल्मीकी ऋषींनी सीतेस क्षौम वस्त्रें लेववून, तिच्या स्वयंवराचा प्रसंग घेऊन त्यांच्या वेळच्या निरनिराळ्या धंद्यांची संक्षेपानें यादी दिली आहे. परंतु व्यासांना येथेंच थांबणें बरें न वाटून

व्यापारधंद्यांच्या महत्त्वासंबंधानें भीष्माकरवीं धर्मराजास त्यांनीं उपदेश करविला आहे. अशा काळांतील कौशल्याचीं स्मारकें म्हणून लेणीं व स्तंभ अद्यापि कायम आहेत, व आम्हीं कलाकौशल्याचे कामीं इतर देशांच्या मानानें किती पुढें होतों यांचें स्मरण देऊन ते आज उद्वेग उत्पन्न करीत आहेत.

सहाव्या शतकाच्या पूर्वींपासूनच आमचा चीन व इराण देशांशीं व्यापार चांगल्या रीतीनें सुरू होता व दहाव्या शतकापासून भूमध्य समुद्रांतून रोमन राष्ट्रांशीं व्यापारास सुरुवात झाली, व रुमशामच्या पातशाहीचा दुसरा भाग जो कुस्तुंतुनीया येथें होता त्याच्याशींहि व्यापार जोरानें चालू लागला. मध्यंतरीं जरी अकरावे शतकांत आरब लोकांच्या उत्कर्षामुळें , व तेराव्या शतकांत बेबंदशाही माजून राहिल्यामुळें, व्यापाराची थोडीबहुत उदासीन स्थिति होती, तथापि सतराव्या शतकापावेतों, व्यापार कायमचा बसल्याची अथवा व्यापार बुडाल्यामुळें कलाकौशल्य नष्ट होत चालल्याचीं चिन्हें केव्हांहि नव्हतीं. याच शतकाच्या सुमारास पश्चिमेकडून डीलाव्हेल, रे, टार्मेर, डॉ. फ्रायर इत्यादि प्रवासी इकडे आले होते व त्यांनीं देखील या देशांतील उद्योगधंद्यांच्या भरभराटीसंबंधानें अत्यंत अनुकूल अभिप्राय दिला होता. एवढेंच नव्हे, तर कंपनीचें राज्य कायमचें स्थापिलें जाण्यापूर्वीं अथवा तें झाल्यानंतरहि कांहीं वर्षेपावेतों, जे कंपनीसरकारचे अनेक अधिकारी इकडे आले त्यांना देखील हिंदुस्थानचे लोक कलाकौशल्याच्या कामीं इतर राष्ट्रांच्या मानानें फारच पुढारलेले होते ही गोष्ट कबूल करावी लागली होती. परंतु लवकरच ही स्थिति पालटली. देशी उद्योगधंदे बुडत चालले. कलाकौशल्याचाहि ऱ्हास होऊं लागला. कंपनीसरकारच्या अमदानींत साऱ्याची वाढ कोणत्या तत्त्वावर व कसकशी होत गेली याचा इतिहास आम्हीं गेल्या दोन तीन लेखांत दिलेलाच आहे. आरंभींच वर नमूद केलेल्या दोन उपायांपैकी एकाची तर विल्हेवाट लागलीच आहे. आतां बाकी जो एक उपाय उरला त्या दिशेनें कंपनीसरकारनें कोणतें धोरण स्वीकारलें व त्याचे दुष्परिणाम आम्हांस कसकसे भोगावे लागले, याचा आज संक्षेपानें इतिहास देण्याचें योजिलें आहे.

कंपनी सरकारानें तराजू एका हातांत ठेवून दुसऱ्या हातांत राजदंड धारण केला, त्यावेळीं हिंदुस्थानचा माल परदेशीं पुष्कळच खपत असे. हिंदुस्थान तलम सुताच्या कापडाबद्दल, तसेंच रेशमी व लोंकरीच्या कापडाबद्दल फार प्रख्यात होतें. काश्मिरी शालीची प्रख्याति फार असे, व 'कालिको' शब्दाची उत्पत्ति 'कालिकत' या गांवापासून झाली एवढें सांगितलें म्हणजे सुती कापड इकडे किती उंच दर्जाचें निघत असे व यासंबंधानें परकी लोकांचें मत काय होतें

हें निराळें सांगण्याची अवश्यकताच नाहीं. प्रसिद्ध सर थॉमस मनरो यानें 'हाऊस ऑफ कामन्स कमिटी' पुढें दिलेल्या साक्षींत एका प्रश्नास उत्तर देतांना असें स्पष्ट सांगितलें कीं, 'मी काश्मिरी शालजोडी वापरतों व एकाद्यानें उत्तम विलायती शाल मला जरी नजर म्हणून दिली तरी मी ती वापरणार नाहीं.' अशा रीतीनें उत्तम प्रकारचा माल या देशीं निघत असल्या-बद्दल कंपनीसरकारच्या अधिकाऱ्याची खात्री होती. तथापि हें कंपनीसरकारच्या विलायती डायरेक्टरांस पसंत पडलें नाहीं, आणि त्यांनीं १७६९ सालीं कच्च्या मालांस उत्तेजन द्यावें व पक्का माल होतां होईल तों होऊं देऊं नये अशा अर्थाचा हुकूम फर्मांविला ! याच वेळीं त्यांनीं असेंहि कळविलें कीं, कोष्टयांस कंपनीच्याच कारखान्यांत काम करण्यास भाग पाडावें. व तें काम करण्यास तयार नसल्यास त्यांना अधिकाऱ्यांनीं शिक्षा द्याव्या ! कंपनी सरकारचे ठिक-ठिकाणीं व्यापारी 'रेसिडेंट' असत व कंपनीनें मागितलेला माल पुरविण्याचे कामीं हेच जवाबदार असत. यांचे व कोष्टयांचे करार होत. प्रथम काय काय माल पाहिजे या संबंधानें इंग्लंडांतील डायरेक्टर इकडे यादी पाठवीत, त्या या निरनिराळ्या ठिकाणीं राहणाऱ्या रेसिडेंटाकडे वांटणीनें येत, व ते जितका माल पाहिजे असेल तितका तयार करवून देत ; अशा रीतीनें कंपनी-सरकारचा व्यापार चालू होता. या व्यापारांत इतरांनीं आड येऊं नये अशी त्यांची इच्छा होती. व एवढ्यासाठीं वर नमूद केल्याप्रमाणें कंपनीसरकारच्या विलायती डायरेक्टरांनीं जे कोणी कंपनीचें काम करणार नाहींत, त्यांस शिक्षा देण्यास फर्मांविलें, आणि या रेसिडेंटांचें स्तोम वाढविण्यासाठीं व इकडील लोकांचे हातपाय बांधून टाकण्यासाठीं १७९३ सालीं तर या बाबतींत त्यांनीं एक ठराव केला. या ठरावाअन्वयें ज्या ज्या कोष्टयांना कंपनीचे पैसे अगाऊ मिळाले असतील त्यांना करार केलेल्या मालाची भरपाई होईतों दुसरीकडे कोठेंहि कामावर जाण्याची, अथवा आपण तयार केलेला माल दुसऱ्यास विकण्याची मनाई होती ! करारांत ठरलेल्या वेळेस जर माल आणून दिला नाहीं, तर कोष्टयाच्या दाराशीं धरणें बसविण्याचा 'व्यापारी रेसिडेंटास' अधिकार होता. तसेंच कोष्टयानें जर कंपनीची भरती होण्यापूर्वीं आपला माल दुसऱ्यास विकला, तर त्याच्यावर दिवाणी अदालतींत खटला करण्याचाहि सदर रेसिडेंटास अधिकार होता ! हे रेसिडेंट अथवा त्यांच्या हाताखालचे इतर अधिकारी यांना कोष्टयांशीं व्यवहार ठेवण्याच्या कामीं जमीनदार अथवा कुळें यांनीं कोणत्याहि रीतीनें अडथळा करितां कामा नये, व या रेसिडेंटाशीं उद्धट-पणानें कोणीहि वागतां उपयोगाचें नाहीं, असेंहि या ठरावांत स्पष्ट नमूद

केलें होतें! कोष्टयानें माल देण्यास उशीर केला असतां त्याच्या पैशांतून ३५ टक्के कापून घेण्याचाहि कायदेशीर अधिकार या रेसिडेंटास देण्यांत आला होता! कंपनी सरकारचे हे रेसिडेंट कोष्टयांशीं कोणत्या तऱ्हेचें वर्तन ठेवीत व त्यांना जमविण्यासाठी कशा प्रकारच्या युक्त्या योजीत असत, यांचें वर्णन यापूर्वी आलेलेंच आहे. त्याची आज पुनरुक्ति करण्याची जरूर नाहीं. त्यांनीं केलेले हे प्रकार कशाहि प्रकारचे असोत, त्यांच्या वर्णनापेक्षां त्यांच्या परिणामाकडेच आपणांस नजर दिली पाहिजे. आणि अशा रीतीनें या सर्व गोष्टींचा विचार करूं लागलें असतां, अशा प्रकारच्या जुलुमानें दिवसेंदिवस कला नष्ट होत जाणें किती स्वाभाविक आहे, हें कोणाच्याहि लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. कलाकौशल्याची अभिवृद्धि होण्यास व्यापार चांगला चालला पाहिजे, माल वाटेल त्या ठिकाणीं खपविण्याची माल तयार करणाऱ्यास परवानगी पाहिजे, म्हणजे तो उत्तम भाव येईल तेथें तो विकील, व त्याच्या कुशलतेच्या मानानें त्यांस कमी जास्ती किंमत मिळत जाईल, आणि अधिक चांगला माल तयार करण्यास त्यास हुरूप व उत्तेजन येईल. आतां कंपनीसरकारच्या अमदानींत याच्या अगदीं उलट प्रकार होता. कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं स्वतःच्या फायद्याकरितां, अथवा कंपनीच्या हितासाठीं म्हणून बहुतेक सर्व प्रकारचा व्यापार आपल्या मुठींत आणून ठेविला होता. हेच अधिकारी कोष्टयांच्याहि मागें लागले, तेव्हां शिक्षेच्या भीतीनें मात्र ते लोक काम करूं लागले. अर्थातच कौशल्य नाहीसें होत चाललें. परंतु अशा रीतीनें जबरीनें काम घेणें एवढाच काय तो त्या वेळच्या राज्यपद्धतींत दोष होता असें नाहीं. यापेक्षांहि शतपट अधिक वाईट अशी कृति कंपनीसरकारानें त्यावेळीं केली व तिचा दुष्परिणाम आमच्या सांपत्तिक स्थितीवर फारच घातक झाला. हिंदुस्थानच्या मालास उत्तेजन दिल्यानें इंग्लंड भिकार बनेल, अशी कंपनी सरकारच्या डायरेक्टरांस भीति पडल्यामुळें इकडून कच्चा माल मात्र अधिकाधिक येत जावा व त्यापासून इंग्लंडच्या कारखान्यांत तयार झालेला माल या देशीं यावा, अशी स्थिति आणण्यासाठीं ते सारखे प्रयत्न करूं लागले; व १७६९ मधील त्यांनीं हिंदुस्थानांतील आपल्या अधिकाऱ्यांस सोडलेला हुकूम हा प्रयत्नांचा पहिला हप्ता होय. कोष्टयांस आपणांस वाटेल त्या कामास वाटेल तेव्हां लावण्याचा कंपनी सरकारचे अधिकाऱ्यांस अधिकार असल्यामुळें, देशी लोकांचे कारखाने बुडत चाललेच होते. त्यांत आणखी या एका अन्यायाची भर पडल्यामुळें कारखाने साफ बुडाले. रेशमी माल विलायतेस पाठविण्याची बंदी झाली व सुती मालावरहि भयंकर जकात बसविण्यांत आली. कोणकोणत्या

प्रकारच्या मालावर किती किती जकात बसविली होती, हें पुढें दिलेल्या दोन कोष्टकांवरून वाचकांच्या लक्षांत येईल.

इकडे तयार झालेल्या मालावर अशा तऱ्हेनें भयंकर जकात बसविण्यांत आली, परंतु इंग्लंडमध्यें तयार झालेला माल मात्र फक्त २ १/२ टक्के जकातीवर इकडे येत असे. विलायती मालाचीं प्रदर्शनें करण्यांत येऊं लागलीं, व लॉर्ड वेल्सलीसारखे वडे लोक, रोहिलखंड, हरिद्वार वगैरे मध्यें निरनिराळ्या जत्रांत विलायती माल लोकांस भुलविण्यांसाठीं मांडून ठेवूं लागले. राज्यकर्त्यांच्या कोणत्याहि इच्छा प्रायः पूर्ण होतात व डायरेक्टरांच्या इच्छेप्रमाणें हिंदुस्थानांत चांगला माल निघण्याचें बंद होऊन विलायती माल दरवर्षी अधिकाधिक प्रमाणानें इकडे येऊं लागला. आमचा माल आम्हांस परदेशीं पाठवितां येऊं नये, इतकेंच करून हे अधिकारी थांबले नाहींत; त्यांनीं देशांतल्या देशांत पाठविल्या जाणाऱ्या देशी मालावर देखील जबर जकात बसविली. कच्च्या मालावर ५ टक्के जकात बसविण्यांत आली व पुढें त्याच्या वस्तू बनविल्यास, त्यांच्यावर १५ पासून १७ टक्केपावेतों जकात घेण्यांत येत असे ! फक्त एकच उदाहरण घेतलें तरी याची वाचकांस चांगली समजूत पडणार आहे. देशांतल्या देशांतच गुरांढोरांचीं कांतडीं पाठवावयाचीं असल्यास त्यांवर जकात ५ टक्के, कमावलेलें कातडें पाठविण्याचें असल्यास आणखी ५ टक्के, म्हणजे एकंदरीनें

## कोष्टक १

| | १८१२ | १८२४ | १८३२ |
|---|---|---|---|
| | किमतीवर शेंकडा जकात | किमतीवर शेंकडा जकात | किमतीवर शेंकडा जकात |
| नकशीचें वेताचें काम | ७१ | ५० | ३० |
| मझलिन ... ... ... | २७ १/३ | ३७ १/२ | १० |
| कॅलिको ... ... ... | ७१ २/३ | ६७ १/२ | १० |
| इतर सुती वस्त्रें ... ... | २७ १/३ | ५० | २० |
| बकऱ्याच्या लोंकरीच्या शाली | ७१ | ६७ १/२ | ३० |
| लाखेचे पदार्थ ... ... | ७१ | ६२ १/२ | ३० |
| चटया ... ... ... | ६८ १/३ | ५० | २० |

कोष्टक २

| | १८१२ | १८२४ | १८३२ |
| --- | --- | --- | --- |
| कच्चें रेशीम | किमतीवर शेंकडा २ पौं. १३ शि. ४ पे. खेरीज प्रत्येक वजनी पौंडास ४ शिलिंग | प्रत्येक पौंडास ४ शिलिंग | प्रत्येक पौंडास १ पेन्स |
| रेशीम पदार्थ, तापते किंवा इतर नकशी केलेले पदार्थ. रेशमी वस्त्रें | इंग्लडांत पाठविण्याची बंदी होती. | बंदी होती. | किमतीवर शें. २० किमतीवर शें. ३० किमतीवर शें. २० |
| साखर ( मूळ किमत ) एका हंड्रेडवेटास १ पौंड | जकात प्रत्येक हंड्रेडवेटास १ पौंड १३ शि. | प्रत्येक हंड्रेडवेटास ३ पौं. ३ शि. | प्रत्येक हंड्रेडवेटास १ पौं. १२ शि. |
| दारू (गुळापासून केलेली) | प्रत्येक ग्यालनास १ शि. ८ पे. खेरीज १९ शि. १$\frac{१}{२}$ पे. जकात | प्रत्येक ग्यालनास २ शि. १ पे. खेरीज १७ शिलींग १$\frac{३}{४}$ पेन्स जकात | दर ग्यालनास १५ शिलिंग |
| निमसुती कापड | दर १०० (वजनी) पौंडास १७ शि. ११ पे. | शेंकडा ६ | शेंकडा २० |

१० टक्के, व त्याच कांतड्याचे जोडे वगैरे तयार करून पाठविले असल्यास त्यावर जकात १५ टक्के!! ही जकात वसूल करण्यासाठीं ठिकठिकाणीं रस्त्यावर व गांवाबाहेर अशीं नाकीं वसविलेलीं होतीं व नाकेदार फार प्रामाणिक असल्यामुळें, त्यांना बक्षिसी देण्यांतच व्यापाऱ्यांचा जीव दमून जाई. अशी देशांतील अंतःस्थिती असल्यामुळें व्यापार बुडत चालला, व त्याबरोबरच

कलाकौशल्याचा ऱ्हास जारीनें होत चालला ! याचा अर्थात् परिणाम म्हणजे विलायती माल चोहोंकडे फडकूं लागला. तशांत इकडूनच जहाजें भरभरून नेलेले पैसे भांडवल म्हणून उपयोगी पडूं लागल्यामुळें व वाफेची अदृश्य शक्ति एकाएकीं गोचर झाल्यामुळें, विलायतेंत एक मोठें यांत्रिक स्थित्यंतर घडून आलें होतें. तसेंच भौतिक शास्त्रांचा उत्कर्ष सारखा होत चालला होता, व प्रत्येक धंद्यांत शास्त्रीय पद्धति अंमलांत येऊं लागली होती. या देशांतून परदेशीं पैसे नेण्यास कंपनीसरकारचे डायरेक्टर जितके उत्सुक होते, त्या मानानें तिकडील नवीन कला इकडे प्रचलीत करण्यांत जर एक सहस्रांश उत्सुकता दाखविली असती, तर हिंदुस्थान आज मेल्यासारखा निश्चेष्ट खचित पडला नसता. परंतु त्यांनीं इकडच्या कारखान्यांस उत्तेजन तर दिलेंच नाहीं, परंतु माल पाठविण्याची मनाई करून व इतिहासांत अश्रुतपूर्व असणाऱ्या राक्षसी जकाती बसवून ते कारखाने ठार करण्याची मात्र सारखी खटपट केली. त्यांची इच्छा पूर्णपणें सफल झाली. आमचा तयार झालेला माल परदेशीं जाईनासा झाला, व विलायती माल मात्र अधिकाधिक इकडे येऊं लागला. नीळ मात्र या देशांतून परदेशीं पुष्कळ जात असे. परंतु नीळीचा व्यापार विलायती व्यापाऱ्यांच्याच हातीं होता. व हल्लीं चहाची लागवड करणाऱ्या लोकांप्रमाणेंच त्यांस हक्क देण्यांत आले होते. याप्रमाणें व्यापाराची स्थिति होती. कोष्टयाचा धंदा कसा बसला हें वर दिलेंच आहे. आतां याशिवाय इतर किरकोळ कांहीं धंदे राहिले होते. गाडीवानांचा धंदा, नावाड्यांचा धंदा अशा प्रकारचेच लहानसहान धं राहिले होते; कारण कलाकौशल्याच्या कामाची काय व्यवस्था लागली, हें आतां वाचकांस माहीत झालेंच आहे. हे किरकोळ धंदे देखील बुडत चालले. आगगाड्या इकडील लोकांच्या फायद्यासाठीं, सोई-साठींच—परकी व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठीं अथवा लष्कराचे मदतीसाठीं नव्हे हो— जेव्हां इकडे अवतीर्ण झाल्या, त्या वेळेपासून या लोकांचेहि धंदे गेले. एकट्या गंगेच्या प्रवाहांतून मालाची ने-आण करणारे १७८० मध्यें ३०,००० नावाडी होते, एवढ्या एकाच गोष्टीचा जरी विचार केला तरी आगगाडीनें किती नावाड्यांच्या व किती गाडीवानांच्या तोंडचें अन्न काढून घेतलें असेल व आपल्या श्रीमंत मालकांस चारिलें असेल, याची चांगली कल्पना करतां येण्यासारखी आहे. शेतकरी लोकच गाडीवानांचा धंदा बहुश: करीत असतात. तेव्हां त्यांस जवर साऱ्यावरोवर दुसरी कोणती गोष्ट निर्धन करीत आहे, याची सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे. परंतु वर्तमानकाळाशीं आपला अद्यापि संबंध आला नसून फक्त भूतकाळाशींच आहे. म्हणून तेवढ्यापुरताच इतिहास जर पाहूं गेलों तरी उद्योगधंदे कसे बुडाले, याविषयीं किती उद्वेगजनक

व विलक्षण अशी माहिती याबाबतींत सांपडते, याची कल्पना वरील विवरणावरून वाचकांस येणार आहे. हिंदुस्थानचा व्यापार ठार झाला अथवा येथील लोकांचे उद्योगधंदे बुडाले, यांत नवल नाहीं. जर अशा तऱ्हेचे कायदे इंग्लंड देशास लागू केले असते, अथवा इतकी परतंत्र स्थिति, जर दहा-वीस वर्षेंच इंग्लंड देशांत राहिली असती, तर तें राष्ट्र केव्हांच रसातळास गेलें असतें, असें मानणें तर्कशास्त्रांस सोडून होणार नाहीं, एवढेंच सांगून आजचा हा लांवलेला लेख पुरा करितों.

---

## १०. राष्ट्रीय बहिष्कार

[२२ आगस्ट १९०५]

कलकत्ता येथें भरलेल्या बंगाली लोकांच्या प्रचंड जाहीरसभेंत विलायती मालाला बहिष्कार टाकण्याचा जो ठराव मंजूर झाला त्याचें खरें महत्त्व अद्याप आमचेकडील लोकांस नीट समजलें नाहींसें दिसतें. कित्येकांस बंगाली लोकांनीं त्वेषाच्या भरांत आपल्या हातून तडीस न जाणारा हा ठराव केला असें वाटत आहे ; आणि कित्येक बंगाली लोकांच्या अंगांत हा ठराव पार पाडण्याइतका करारीपणा नाहीं म्हणून त्यांस नांवें ठेवीत आहेत. आमच्या समजुतीप्रमाणें हीं दोन्हीं विधानें अत्यंत चुकीचीं आणि असमंजसपणाचीं आहेत. बंगाल प्रांताची फाळणी केल्यानें देशाचें किती नुकसान होत आहे याची कल्पनाच अशा प्रकारच्या लेखकांस नाहीं असें म्हणावें लागतें. कारण ती कल्पना असती तर या कामीं बंगाली लोकांचें म्हणणें सरकारानें ऐकलें नाहीं, म्हणून बंगाली लोकांस त्वेष येणें साहजिक आहे. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं योजलेला उपायहि योग्य आहे असें कोणासहि वाटल्यावांचून राहिलें नसतें. असो ; आम्ही गेल्याच खेपेस लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकमताच्या जागृतींत हल्लींचा प्रसंग अगदीं आणीबाणीचा आहे ; आणि आमच्या मतें बंगाली लोकांनीं सध्यांच्या स्थितींत योजलेला उपायहि अगदीं योग्य आणि जरूरीचा आहे. आज वीस वर्षें राष्ट्रीय सभेची ओरड एकसारखी चालू आहे; आणि त्यावरून नुसत्या ओरडीनें राजकीय बाबतींत तरी सत्ताधारी लोकांचीं मनें वळत नाहींत एवढें सिद्ध झालें आहे. शास्त्रीय बाबतींत वादविवाद, चर्चा, ऊहापोह इत्यादि सामोपचारांनीं किंवा नुसत्या वाङमय उपायांनीं विरुद्ध पक्षाची बहुतकरून खात्री करून देतां येते. परंतु शास्त्रीय बाबतींत लोकांचीं मतें फिरविणें आणि राजकीय बाबतींत सत्ताधारी लोकांचीं मतें फिरविणें या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. ज्या ठिकाणीं मनुष्याच्या मताचा स्वार्थाशीं संबंध असतो त्या ठिकाणीं स्वार्थास चट्टा बसल्याशिवाय नुसत्या वादविवादानें त्याचें मत फिरवितां येत नाहीं, याचा प्रत्यय सामान्य व्यवहारांतहि दिसून येतो. राजकीय बाबतींत – विशेषतः करून परकीय राज्यकर्ते आणि जिकलेली प्रजा यांच्या दरम्यानच्या लढ्यांत– हाच न्याय लागू पडतो. हिंदुस्थान देश इंग्रजी राज्यसत्तेखालीं शौर्यानें, संपत्तीनें आणि हिमतीनें खालावत जाऊन दुर्बळ होत चालला आहे, ही गोष्ट

आमच्या राज्यकर्त्यांस कळत नाहीं. परंतु ज्यांस हिंदुस्थानावर चरण्यास सांपडतें त्यांनीं या गोष्टीचा काय म्हणून विचार करावा ? हिंदुस्थान रसातळास गेलें किंवा हिंदी लोकांच्या आंगचा अभिमान आणि करारीपणा नाहींसा झाला तर राज्यकर्त्यांचें त्यापासून काय नुकसान होणार ? एकप्रकारें ही गोष्ट त्यांस इष्टच आहे असें म्हटलें तरी चालेल. कारण हिंदी लोकांच्या अंगांत करारीपणा वाढला किंवा एकराष्ट्रीयत्वाची कल्पना अधिक जागृत झाली तर सत्ताधारी इंग्रज लोक या देशावर जे आज स्वच्छंद रीतीनें चरत आहेत त्यांस कांहींतरी आळा पडणार. अशा स्थितींत आमचें सरकार आमच्या लोकांच्या उन्नतीकरितां झटत नसल्यास किंबहुना तशी उन्नति होण्याचीं साधनें होईल तितकें करून आमच्या हातीं पडूं न देण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. बंगालची वांटणी करणें हा अशाचपैकीं एक प्रयत्न होय. बंगाली बोलणारे आणि बंगाली आचाराविचारांचे लोक एकत्र राहिल्यानें त्यांच्यामधील संघशक्ति वाढत चालली आहे ही गोष्ट लॉर्ड कर्झनसारख्या धूर्त व्हाइसरायाच्या केव्हांच लक्षांत येऊन चुकली होती आणि म्हणूनच बंगालची फाळणी करून तिचा प्रतिकार करण्यास ते उद्युक्त झाले. वरवर पाहणारास एका प्रांताचे दोन विभाग झाले तर त्यांत कांहीं गवगवा करण्यासारखें आहे असें वाटत नाहीं व आमच्यापैकीं असे कांहीं गृहस्थ आहेत कीं, बंगालच्या विभागणीनें होणारा राष्ट्रीयतोटा अद्याप त्यांच्या डोक्यांत नीट भरत नाहीं. राष्ट्रीय विचाराची परंपरा अद्याप आमच्यांत पुरी जागृत झाली नाहीं त्याचें हें फल होय. एखाद्या कुटुंबांत मायलेकरांची कोणी ताटातूट केली असती तर कुटुंबाच्या आप्तांनीं जितका कल्लोळ केला असता त्यापेक्षां बंगालच्या फाळणीनें सर्व हिंदुस्थानभर अधिक कल्लोळ व्हावयास पाहिजे होता. पण सर्व हिंदुस्थानभर नाहीं तर बंगाल्यांत तरी आपल्या राष्ट्राच्या फाटाफुटीबद्दल अशी चळवळ झाली ही समाधानकारक गोष्ट होय; आणि याबद्दल बंगाली लोकांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतों. सरकारच्या हातून राष्ट्रीयत्वास धक्का आणणारी जेव्हां कोणतीहि गोष्ट घडेल तेव्हां अशाच प्रकारची चळवळ सर्वांनीं सर्वत्र केली पाहिजे.

परंतु या चळवळीपासून अत्यंत महत्त्वाची जी गोष्ट निष्पन्न झाली आहे ती निराळीच होय. हिंदुस्थानांतील प्रजेनें आपलें गाऱ्हाणें राज्यकर्त्यांपुढें कितीहि सयुक्तिक रीतीनें मांडलें अथवा लाखों लोकांची त्यांस संमति असली तरी सदर युक्तीकडे किंवा तक्रार करणाऱ्या लोकांच्या समुदायाकडे लक्ष न देतां केवळ अधिकाराच्या जोरावर लोकमताची पायमल्ली करून सरकार आपला हेका तडीस नेतें; याचा हल्लींच्या चळवळीवरून बंगाली लोकांसच नव्हे तर

अनुक्रम ५१७७५ दि: [illegible]
क्रमांक २११ नों: दि: [illegible]


हिंदुस्थानांतील सर्व लोकांस पूर्ण अनुभव आलेला आहे. अशा स्थितींत राज्यकर्त्यांकडून अधिकाधिक हक्क आम्हांस प्राप्त होण्यास दुसरें कांहीं साधन आहे कीं नाहीं हा प्रश्न सहज उद्भवतो. आणि बंगाली लोकांनीं या वेळीं त्याचा जो निकाल केला आहे तो आमच्या मतें सर्वांनीं मान्य करण्यासारखा आहे. राज्यकर्ते जेव्हां प्रजेचें ऐकत नाहींत, तेव्हां प्रजा क्षुब्ध होऊन राजास शासन करण्यास प्रवृत्त होते, याचें एक मोठें उदाहरण खुद्द इंग्लंडच्या इतिहासांत घडून आलेलें आहे. अनेक आचारविचारांनीं भिन्न झालेल्या आणि राज्यकर्त्यांनीं निःशस्त्र केलेल्या गरीब बिचाऱ्या हिंदुस्थानास हा उपाय शक्य नाहीं हें सांगावयास नकोच. पण उत्तम रामबाण औषध मिळत नाहीं म्हणून सामान्य औषधाची देखील आम्ही योजना करूं नये असें कोण म्हणेल ? आमचें म्हणणें अगदीं सयुक्तिक आहे, आमचीं गाऱ्हाणीं साधार आहेत आणि आमच्या मागण्या न्यायाच्या आहेत याबद्दल आतां कांहीं शंका उरली नाहीं. प्रश्न काय तो एवढाच आहे कीं, स्वार्थामुळें किंवा विकारवशतेनें आमच्या म्हणण्याचा प्रकाश ज्याच्या डोक्यांत पडत नाहीं त्यास ताळ्यावर आणण्यास कोणता उपाय योजावा ? विलायतेंतील लोकांपुढें आमची रड गाइली तर कांहीं उपयोग होईल असें वाटत होतें. पण ही समजूत खोटी आहे असें मि. हिंडमन यांनीं पंडित श्यामजी यांनीं स्थापिलेलें ‘ इंडिया हौस ’ उघडतेवेळीं जें भाषण केलें त्यांत स्पष्ट सांगितलें आहे. अधिकार आणि स्वार्थ यांनीं डोळ्यावर आलेलें पटल तोंडाच्या वाऱ्यानें फुंकून कधींहि नाहींसें होत नाहीं. त्यास यापेक्षां जालीम उपायाची योजना केली पाहिजे. आणि अशा प्रकारचा कांहीं उपाय आपणांजवळ आहे कीं नाहीं इकडे बंगाली लोकांचें लक्ष हल्लींच्या काळीं सहजच वेधलें गेलें. लॉर्ड कर्झन ऐकत नाहींत, मि. ब्रॉडरिक ऐकत नाहींत आणि पार्लमेंटहि ऐकत नाहीं, मग करावें काय ? या सर्वांचे डोळे उघडतील असा कांहीं तरी इलाज करणें अवश्य आहे. शस्त्रास्त्रांनीं या अरेरावीचा प्रतिकार करणें अशक्य होय हें वर सांगितलेंच आहे. शस्त्रास्त्रें गेलीं म्हणजे केवळ संघशक्तीच कायम राहाते. आणि या संघशक्तीचा उपयोग कायदेशीर रीतीनें राज्यकर्त्यांची धुंदी उतरण्याचे कामीं जर करतां येईल, तर धैर्यानें आणि हिंमतीनें अशा प्रकारचा उद्योग करणें हें हिंदुस्थानची कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य होय. हिंदुस्थानची जर कांहीं आपल्या हातून ‘ सेवा ’ किंवा ‘ नोकरी ’ घडणें शक्य असेल तर ती याच मार्गानें होईल. नेमस्तपणाचा उपदेश करण्यानें व्हावयाची नाहीं. मि. हिंडमन यांनीं हाच सिद्धांत ‘ इंडिया हौस ’ उघडण्याच्या वेळीं केलेल्या आपल्या भाषणांत सांगितला आहे. ते

म्हणतात कीं, हिंदुस्थानचें जर कल्याण व्हावयाचें असेल किंवा राज्यकर्त्यांकडून तुम्हांस अधिकाधिक हक्क प्राप्त करून घ्यावयाचे असतील तर ते विलायतेंतील लोकांची नेमस्तपणें विनंति करून प्राप्त व्हावयाचे नाहींत. याकरितां जो उद्योग करावयाचा तो तुमचा तुम्हीच करारीपणानें, निश्चयानें किंवा माथेफिरूपणानेंहि केला पाहिजे; एरव्हीं गत्यंतर नाहीं. मि. हिंडमन यांचा हा उपदेश किती सयुक्तिक आणि अनुभवसिद्ध आहे हें बंगाल्यांत लोकमताची हल्लीं जी पायमल्ली झाली त्यावरून स्पष्ट दिसत आहे. आणि अशा वेळीं मि. हिंडमन यांचा उपदेश प्रसिद्ध झाला ही मोठी समाधानाची गोष्ट होय.

अरेरावी किंवा शिरजोर अधिकाऱ्यांचे डोळे उघडण्यास त्यांची किंवा विलायतेंतील लोकांची विनवणी करण्यापेक्षां अधिक तीव्र उपाय योजला पाहिजे, एवढें सिद्ध झाल्यावर असा उपाय कोणता हा प्रश्न सहजच उद्भवतो. ऐतिहासिकदृष्टया विचार केला तर ' राष्ट्रीय बहिष्कार ' हा यापैकींच एक उपाय आहे असें आढळून येतें. सर डब्ल्यू. वेडरबर्न यांनीं विलायतेंत ' ग्रीनवुइच एथिकल सोसायटी ' पुढें राष्ट्रीयसभेवर जें नुकतेंच एक व्याख्यान दिलें त्यांत त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, इटली देश जेव्हां आस्ट्रिया देशाच्या ताब्यांत होता तेव्हां इटालियन लोकांनीं परकीय आस्ट्रियन अधिकाऱ्यांस बहिष्कार घालून राज्यव्यवस्थेचें काम दुष्कर करून टाकलें होतें. सर डब्ल्यू. वेडरबर्न म्हणाले कीं, हिंदुस्थानांतील लोकांनीं हीच रीत स्वीकारली तर हिंदुस्थानांत राज्यकारभार चालविणें राज्यकर्त्यांस कठीण जाईल. आज हिंदुस्थानांतील पुढारी लोक राज्यकर्त्यांस बहिष्कार टाकण्यास तयार नाहींत, उलट त्यांच्या मदतीनेंच सुधारणा घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत, करितां वेळींच विलायतेंतील लोकांनीं सावध होऊन त्यांच्या मागण्या कबूल कराव्या व दोघांनीं सुखी व्हावें; असें सर डब्ल्यू. वेडरबर्न यांनीं शेवटीं सुचविलें आहे. पंडित श्यामजी यांचें असें म्हणणें आहे कीं, सर डब्ल्यू. वेडरबर्न यांचे हे उद्गार हिंदुस्थानपेक्षां स्वदेशाचेंच अधिक कल्याण करण्याच्या हेतूनें निघालेले आहेत. असेल, आम्हीं नाहीं असें म्हणत नाहीं. पण हिंदुस्थान आणि इंग्लंड या दोघांचेंहि हित एकाच गोष्टींत आहे असें प्रतिपादन करणारे तरी इंग्रज लोक कोठें आहेत ? सर डब्ल्यू. वेडरबर्न यांस ज्या बहिष्काराबद्दलची धास्ती वाटत होती तोच प्रसंग आज येऊन ठेपला आहे. इंग्रजांना आमच्या देशावर राज्य करावयाचें असल्यास ते खुशाल करोत. राज्यकर्त्यांविरुद्ध शस्त्र चालविण्याची आमची ताकद नाहीं आणि इच्छाहि नाहीं. पण विलायतेंतील व्यापारास व मजुरास आम्ही विलायती माल घेऊन जे कोटयवधि रुपये दरसाल देतों तेवढे तरी

आमच्यानें बंद होऊं नयेत काय ? विलायती मालावांचून कांहीं काहीं ठिकाणीं अडेल इतकी आपल्या धंद्यांची स्थिति निकृष्ट झालेली आहे हें खरें आहे. पण जेव्हां देशी माल मिळणार नाहीं तेव्हां निदान विलायती तरी न घेतां दुसऱ्या कोणत्या तरी देशांतला घेऊन विलायतेंतील आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकांबद्दल आमच्या मनांत उत्पन्न झालेला त्वेष आम्ही कां व्यक्त करूं नये ? जे लोक आमचें ऐकत नाहींत अथवा आमच्या विनवणीकडे लक्ष देत नाहींत त्यांचें राज्य आमच्यावर असलें तरी निदान व्यापाराच्या कामीं त्यांस साहाय्य करण्याचें आम्हीं साफ नाकारलें पाहिजे. थोडे दिवसांपूर्वी चीनच्या लोकांनीं अशाच प्रकारचा निर्धार दाखविला आहे. अमेरिकन लोक आपणास नीट वागवीत नाहींत तर अमेरिकन माल चिनांत खपूं द्यावयाचा नाहीं असा चिनी लोकांनीं निर्धार केल्यावरोवर अमेरिकन लोकांचे डोळे उघडले हें आम्ही पाहात आहों. फार लांब कशाला ? अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें जेव्हां स्वतंत्र झालीं तेव्हां विलायती मालावर असाच त्यांनीं बहिष्कार टाकला होता. इटली, चीन व अमेरिका या देशांचीं अशा प्रकारचीं तीन उदाहरणें आमच्या डोळ्यांपुढें असतां, आम्ही जर त्यांचा उपयोग करून घेतला नाहीं तर आमच्यासारखे हतभाग्य व नादान कोणीच नाहींत असें म्हणावें लागेल. प्रजा कितीहि दुर्बळ असली तरी धैर्यानें, जुटीनें व निश्चयानें अरेरावी राज्यकर्त्यांस शस्त्राविणहि ती भारी होते ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. बंगाल्यावर किंवा आमच्या देशावर सध्यां आलेला प्रसंग असाच आहे. विलायती माल म्हणून घ्यावयाचा नाहीं, नाइलाज झाला तर जर्मनीचा घेऊं, जपानचा घेऊं किंवा अमेरिकेचा घेऊं, असा जर निर्धार केला, तर कायदेशीर रीतीनें या निश्चयापासून आम्हांस पराङ्मुख करण्यास कोण समर्थ आहे ? राज्यकर्त्यांविरुद्ध बंड करणें गैरकायदा आहे किंवहुना गुन्हा आहे; पण बहिष्काराचा तसा प्रकार नाहीं. राज्यकर्त्यांपुढें आपलीं गाऱ्हाणीं सयुक्तिक रीतीनें मांडण्याचें सोडून द्या असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु नुसत्या विनवणीनें कार्यसिद्धि होत नाहीं. असा जर अनुभव आहे तर सदर विनवणीस बहिष्काराची पुरवणी देऊन या जोडगोळीच्या बंदुकीनें आम्ही आपले इष्ट हेतु साध्य करून घेतले पाहिजेत. बंगाली लोकांच्या लक्षांत ही गोष्ट आतां पूर्णपणें येऊन चुकली आहे, व त्याप्रमाणेंच ते आज प्रयत्न करीत आहेत. अशा वेळीं हिंदुस्थानच्या इतर भागांतील लोकांनीं त्यांच्याबद्दल सहानुभूति दाखवून त्यांस मदत करावी हें त्यांचें कर्तव्य होय; व आम्हास अशी उमेद आहे कीं, हें कर्तव्य करण्यास ठिकठिकाणचे पुढारी माघार घेणार नाहींत; देशाच्या इतिहासांत हल्लींच्यासारखे आणीबाणीचे प्रसंग क्वचित् येत असतात.

आणि जेव्हां येतात तेव्हां आपण जर त्यांचा फायदा करून घेतला नाहीं तर आमच्या मूर्खपणाची आणि कर्तव्यशून्यतेची कमाल झाली असें म्हणावें लागेल.

विशेषतः करून महाराष्ट्रीयांनीं तर या प्रसंगीं बंगाली लोकांस अवश्य मदत केली पाहिजे. विलायती कापड न वापरतां देशी कपडा वापरावा, त्यांतच राष्ट्राचें हित आहे ही कल्पना प्रथमतः महाराष्ट्रांत निघाली, व पुण्यांत अद्याप असे पुष्कळ लोक आहेत कीं, ज्यांनीं सार्वजनिक काकांचें कंदी पागोटें आणि खादीचा अंगरखा पाहिलेला आहे. अर्थात् पुणेंकरांस किंवा महाराष्ट्रांतील लोकांस ही कल्पना नवी नाहीं. बंगाली लोकांनीं याच कल्पनेचा कांहीं निराळ्या तऱ्हेनें उपयोग करून घेण्याचें योजिलें आहे हें खरें आहे. पण विलायती मालास बहिष्कार घालण्याची युक्ति स्वरूपतः एकच असल्यामुळें बंगाली लोकांचें त्यांच्या निश्चयाबद्दल अभिनंदन करण्याकरितां आणि विलायती मालास त्यांनीं जो बहिष्कार घातला त्याचा सार्वत्रिक अंमल करण्याकरितां आम्ही ठिकठिकाणीं सभा भरवून आपलें मत त्यांस कळवून धीर दिला पाहिजे. मुंबई व उमरावती येथें अशा प्रकारच्या सभा लवकरच भरविणार आहेत म्हणून समजतें; व आम्हांस अशी उमेद आहे कीं, प्रत्येक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणीं अशा प्रकारची सभा होऊन या नव्या युक्तीचा उपयोग करण्यास लोक सुरवात करतील. सर्व लोकांची या कामीं सहानुभूति आहे हें निर्विवाद आहे. आतां कदाचित् कांहीं जुने पुढारी असे निघतील कीं, विलायती कपडे वापरण्याची फार दिवसांची संवय त्यांच्या हातून एकदम सुटावयाची नाहीं. पण अशा गृहस्थांचीं मतें किंवा आचार फिरण्याची वाट बघत बसण्यांत कांहीं हांशील नाहीं. तरुण पिढीनें हें काम हातीं घेऊन नेटानें तडीस नेलें पाहिजे. राष्ट्रीय बहिष्कार हा उपाय योग्य आहे खरा; पण त्याची योग्यता शब्दांत नाहीं. कृतींत आहे. आणि तरुण पिढीनें हें जर काम हातीं घेतलें तर देशहिताच्या चळवळीच्या कामीं त्यांनीं एक पाऊल पुढें टाकल्यासारखें होईल. विलायती मालाचा बहिष्कार पूर्णपणें अंमलांत येण्यास तो बंगाल्यांतच नव्हे तर प्रांतोप्रांतीं निघून त्याचें काम जारीनें चाललें पाहिजे. लोकमताची स्थिति पाहिली तर बंगाल, पंजाब, नागपूर, वऱ्हाड, महाराष्ट्र किंबहुना मद्रास या सर्व प्रांतांत विलायती माल न वापरण्याबद्दल सर्वांचें बहुतेक ऐकमत्य आहे. अशा लोकांस सार्वजनिक काकांचे वेळीं कंदी पागोटें वापरावें लागत असे, पण ती स्थिति पालटून आतां बहुतेक जिनसा देशी मिळूं लागल्या आहेत. अशा वेळीं सर्व प्रांतांतील लोक बंगालचें अनुकरण करून निश्चयानें व जुटीनें वागण्यास जर तयार झाले तर राष्ट्राची औद्योगिक व त्याबरोबरच राजकीय स्थितिहि सुधारेल, यांत आम्हांस बिलकुल शंका वाटत नाहीं.

---

# ११. बहिष्कार-योग

[ ५ सप्टेंबर १९०५ ]

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥

— भगवद्गीता.

वरील भगवद्गीतेंतील वचन गेल्या खेपेच्या एका स्फुट लेखांत आम्हीं घेतलेंच होतें ; परंतु स्थलसंकोचास्तव त्यावेळीं त्याचा जितका खुलासा करावयास पाहिजे होता तितका न झाल्यामुळें आज तोच विषय पुन्हां हातीं घेत आहों. ' बहिष्कार ' हा शब्द मूळ जरी धार्मिक शिक्षेचा वाचक असला तरी ' काळें पाणी ' या रूपानें त्याचा राजकीय शिक्षा-ग्रंथांत म्हणजे पिनलकोडांत समावेश झालेला आहे. या राजकीय रूपांतराप्रमाणेंच त्याचें व्यावहारिक रूपांतर व्हावयास पाहिजे असें केसरींत पहिल्या वर्षी म्हणजे सन १८८१ सालीं आयर्लंडांतील लँडलीगसंबंधानें लिहितांना आम्हीं लिहिलें होतें. " एकदां बहिष्कारास व्यावहारिक शिक्षेचें स्वरूप मिळाल्यास त्यापासून आपणांस पुष्कळ उपयोग करून घेतां येईल, व ज्या हजारों गोष्टी आपल्या नुकसानीस कारण होतात त्यांचा चांगला बंदोबस्त करतां येईल " असें त्यावेळीं आम्हीं म्हटलें होतें. पंधरा दिवसांपूर्वीं लिहिलेल्या राष्ट्रीय बहिष्कार या लेखांत हेंच मत प्रतिपादन केलें आहे ; आणि तेंच बरोबर आहे अशी आमची खात्री आहे. हिंदुस्थानासारख्या सर्वतोपरी पंगू झालेल्या देशास आपलें म्हणणें तडीस नेण्यास जर कांहीं साधन किंवा योग शिल्लक राहिला असेल तर तो ' राष्ट्रीय बहिष्कार ' हाच होय. अमेरिकेंत चिनी लोकांस नीट वागवीत नाहींत म्हणून चिनी लोकांनीं अमेरिकन माल न वापरण्याचा निश्चय केल्यावरोबर अमेरिकेंतील कौन्सल चिनांत आल्याचें मागें आम्हीं लिहिलेंच आहे. यासंबंधानें अँग्लो-इंडियन पत्रांचा अग्रेसर ' पायोनियर ' म्हणतो कीं, " चिनी बहिष्कारानें अमेरिकन लोकांच्या खिशास जर चांगला चट्टा बसला तर चिनी लोकांस मनापासून जी गोष्ट हवी आहे ती त्यांस लवकरच प्राप्त होईल ; आणि चिनी लोकांविरुद्ध जे कायदे अमेरिकेंत पास झाले आहेत ते रद्द करावे लागतील. " वरील वाक्यांत ' चिनी ' च्या ऐवजीं ' हिंदी आणि अमेरिकेच्या ठिकाणीं जर ' इंग्लंड ' हे शब्द घातले तर हल्लींच्या चळवळीचें स्वरूप कसें

असावें आणि त्याचा परिणाम काय होईल याचा 'पायोनियर' च्याच तोंडानें निकाल होतो असें म्हटलें तरी चालेल. दु:खाची गोष्ट कायती एवढीच कीं, विद्यार्थ्यांसारख्या तरुण पिढीनें किंवा कुणबी, माळी यांच्यासारख्या अडाणी लोकांनीं या कामीं जितकी उत्सुकता दाखविली आहे तितकी मध्यम किंवा श्रीमंत स्थितींतील पुढारी लोकांनीं दाखविली नाहीं. हे लोक अद्याप अशा विचारांत पडले आहेत कीं, आम्ही स्वदेशी माल वापरण्याचा निश्चय केला तर आज एवढा माल आहे तरी कोठें? देशांत गिरण्या तयार करा, चांगलें कापड होऊं द्या म्हणजे मग आपण देशी माल वापरण्याचा निश्चय करूं. वरील कोटिक्रम वाचून या लोकांच्या मूर्खपणाची कोणासहि कींव आल्याखेरीज राहणार नाहीं. योगानें इंद्रियनिग्रह होऊन पुढें परमेश्वरप्राप्ती होते असा जेव्हां श्रीकृष्णांनीं भगवद्‌गीतेंत अर्जुनास उपदेश केला, तेव्हां वरच्या सारख्याच अजागळ शंका अर्जुनानें भगवंतापुढें मांडल्या होत्या. तो म्हणाला, "वा कृष्णा, तूं म्हणतोस हें खरें आहे. पण माझ्या मनांत एक शंका येते ती अशी कीं, मन हें अतिशय चंचल असून वाऱ्याची मोट बांधल्याप्रमाणेंच त्याचा निग्रह करणें दुर्घट आहे. अशा स्थितींत एखाद्यानें योगाभ्यासास सुरुवात केली तर त्याच्या हातून तो तडीस जाणें कठीण. मग 'इतोभ्रष्टस्ततोभ्रष्ट:' अशी त्याची स्थिति होऊन त्यास कोठेंच थारा नाहींसा होणार व तो अखेरीस नाश पावणार. वा कृष्णा! या शंकेचें निराकरण करण्यास तूच एक समर्थ आहेस. तर खरें काय तें सांग." अर्जुनाची ही शंका आणि हल्लींच्या चळवळीसंबंधीं बृहन्नडेप्रमाणें नेमस्तपणाचें व्रत ज्यांनीं पतकरलें आहे त्यांच्या शंका या दोन्ही एकसारख्या आहेत व त्यांचें उत्तरहि एकच आहे. इंग्रजी अधिकाऱ्यांचा किंवा राज्यकर्त्यांचा हट्ट किंवा दुरभिमान उतरण्याकरितां राष्ट्रीय बहिष्काराचा जो 'योग' आम्ही सांगितला तो तावडतोब सिद्धीस जाणारा नसून 'अनेकजन्म-संसिद्धस्ततो याति परां गतिम्' ह्या कोटींतला आहे. पाण्यांत जाण्यापूर्वी पोहणें शिकून तयार होण्याची कल्पना जितकी वेडगळपणाची आहे तितकीच देशी माल तयार झाल्यावर तो वापरण्याचा निश्चय करण्याची कल्पना असमंजस होय. सर्व प्रकारचा देशी माल हिंदुस्थानांत तयार होऊ लागल्यावर मग तो वापरण्याचा निश्चय तरी लोकांनीं कशास करावयास पाहिजे हें आम्हांस समजत नाहीं. केवळ औद्योगिक दृष्टीनें पाहिलें तरी असें दिसून येईल कीं, सर्व प्रकारचा माल देशांत तयार होण्यास हल्लींच्या स्थितींत त्यांस लोकांकडून किंवा राजा-कडून उत्तेजन मिळालें पाहिजे. राजाकडून उत्तेजन मिळणें शक्य नाहीं. आणि लोक जर वर सांगितल्याप्रमाणें शंका काढून देशी माल वापरण्याचा निश्चय

कालांतरावर ढकलूं लागले तर देशी व्यापार व उद्योगधंदे अर्थात् जे कांहीं थोडेबहुत अवशिष्ट राहिले आहेत ते देखील बुडून जाऊन देश लवकरच भिकेस लागेल यांत बिलकुल शंका नाहीं. देशी माल वापरण्याचा निश्चय करणें म्हणजे आपल्या वापरण्यांत असलेली प्रत्येक वस्तु आजच्या आज देशी करून वापरण्यास लागणें असा अर्थ नव्हे, हें स्पष्टपणें असल्या अजागळ आक्षेपकांस सांगितलें पाहिजे. देशी माल वापरण्याचा निश्चय करा म्हणजे उबदार देशी कपडा न मिळाल्यास गोंडपाट वापरा किंवा पूर्वी पुण्याला गांवठीसाहेब या नांवाच्या एका थट्टेखोर व्यक्तीनें गळ्यांत घंगाळ आणि घटिकापात्र अडकवून ' स्वदेशी घड्याळ ' वापरण्याची लोकांस सूचना केली होती तसा फाजीलपणा करणेंहि नव्हे. कै. गणेश वासुदेव जोशी यांनीं स्वदेशी कपडे वापरण्याचा पंचवीस वर्षांपूर्वीं जो निश्चय केला त्यापेक्षां आतां पुष्कळ देशी कपडा व माल मिळूं लागला आहे. आणि लोकांनीं होईल तितकें करून देशी माल वापरण्याचा जर निश्चय केला तर पुढील पंचवीस वर्षांत या बाबतींत अधिक सुधारणा होऊन अनेक प्रकारच्या देशी वस्तु येथें तयार होतील यांबद्दल बिलकुल शंका नाहीं. देशी माल तयार होईपर्यंत तो वापरण्याचा निश्चय करणें लांबणीवर टाका असें म्हणणारे लोक आमच्या मतें हल्लींच्या चळवळींचा बुद्धिपुरस्सर विपर्यास करीत आहेत ; आणि लोकांच्या व आमच्या दृष्टीनें हें वर्तन अत्यंत गर्ह्य आहे. जी गोष्ट कित्येक वर्षांनीं सिद्ध व्हावयाची आहे तिचा उपक्रम ती सिद्ध झाल्याखेरीज करूं नये असें म्हणणें जितकें बालिशपणाचें आहे तितकेंच हल्लींच्या आक्षेपकांचें म्हणणें अज्ञानमूलक होय. इंग्रज सरकारास सरकारी नोकरींत ब्राह्मण नको आहेत ; पण त्यांच्याखेरीज नोकरीला लायक, हुषार व पुरेसे लोक दुसरे मिळत नाहींत. तेव्हां सरकारानें असा नियम केला आहे कीं, होईल तितकें करून ब्राह्मणेतरांस पहिल्यानें जागा द्याव्या ; त्यांतहि पहिल्यानें निमगोऱ्यांस किंवा आठ आणे युरेजिनांस, त्यांच्यामागून मुसलमानांस, त्यांच्यामागून पारशांस, त्यांच्यामागून दुसऱ्या कोणत्या तरी हिंदूस आणि नाहींच कोणी मिळाला, तर मग अखेर अखेर कोकणस्थ अगर पुण्याचा ब्राह्मण असा क्रम आहे. या क्रमानें आजच नोकरींतून सर्व ब्राह्मण नाहींसे होतील असें नाहीं. पण कालांतरानें सरकारचा हेतु आठबारा आण्यानें तरी तडीस जाण्याचा संभव आहे. देशी माल वापरण्याचा निश्चय करणारांनीं हाच क्रम स्वीकारला पाहिजे ; आणि हा क्रम अशा प्रकारचा आहे कीं, भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें त्याचा ' नाश ' हि होत नाहीं व त्यास ' अडथळा ' हि येत नाहीं. सर्व प्रकारचा देशी माल आज तयार नाहीं ही गोष्ट निर्विवाद

आहे. पण ही गोष्ट आमच्या डोळयांपुढें मांडून आमच्या निश्चयाचा भंग करूं पाहाणें अगदीं वेडेपणाचें काम होय. सर्व गोष्ट एकदम आपल्या हातून होत नाहीं म्हणून ती थोडी थोडी किंवा क्रमाक्रमानें करण्याच्या निश्चयास आपण लागूं नये काय? 'खाईन तर लाडू खाईन, नाहींतर उपाशी मरेन' असा निश्चय करणारांस शास्त्रांत पढतमूर्ख म्हटलेलें आहे. सर्व प्रकारचा माल जर देशांत तयार व्हावयास पाहिजे तर त्यास प्रथमपासूनच उत्तेजन दिलें पाहिजे. आज देशांत उत्पन्न होत आहे तो माल वापरण्यास लागा; हिंदुस्थानांत झालेला माल मिळत नसला तर निदान जपानासारख्या आशियाखंडांतील राष्ट्रांत तयार झालेला घ्या; तोहि मिळाला नाहीं तर जर्मनी, फ्रान्स किंवा अमेरिका या देशांतला घ्या, आणि तितकें झालें म्हणजे तुमची अडचण बहुधा राहणार नाहीं. कारण अमेरिका, जर्मनी, किंवा फ्रान्स वगैरे देशांत तयार होत नाहीं आणि विलायतेंतच तयार होते अशी वस्तु क्वचितच सांपडेल. हल्लींच्या चळवळींतील हें तत्त्व न ओळखतां किंवा बुद्धिपुरस्सर त्याचा विपर्यास करून तरुण पिढीच्या उत्साहावर पाणी ओतून 'तूं माझ्यासारखी केव्हां होशील' असें म्हणत बसणें भितरेपणाचें, गैरमुत्सद्दीपणाचें, किंवा मूर्खपणाचें लक्षण आहे. हल्लींची चळवळ कोणत्याहि प्रकारें राजकीय नाहीं, निव्वळ औद्योगिक आहे असेंहि कित्येक गृहस्थांनीं म्हटलें आहे. आमच्या मतें हा गैरसमज आहे. हल्लींची चळवळ प्रत्यक्ष रीतीनें राजकीय नाहीं, तरी अप्रत्यक्ष रीतीनें तिचा राज्यकर्त्यांवर परिणाम व्हावा असाच चळवळीच्या पुरस्कर्त्यांचा हेतु आहे, हें साफ कबूल केलें पाहिजे. इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत आतां इतकें निर्भय झालें आहे कीं, राज्यकर्त्यांस आमच्या मतांची बिलकुल पर्वा न राहतां ते अगदीं बेफाम होऊन गेले आहेत. अशा स्थितींत त्यांस ताळ्यावर आणण्यास आमच्याजवळ कोणताही — भिकेखेरीज — राजकीय उपाय शिल्लक राहिला नाहीं. आणि भीक तर कोणी घालीत नाहीं. अशा स्थितींत आमच्या म्हणण्याचा राज्यकर्त्यांच्या मनांत प्रकाश पाडण्यांस एकच साधन आहे. तें हें कीं, आमच्या राज्यकर्त्यांच्या अंगीं क्षत्रिय आणि वैश्य या दोन्हीं वृत्तींचा समावेश झाला असल्यामुळें त्यांपैकीं वैश्यवृत्तीचा तरी विरोध करून त्यांस ताळ्यावर आणावें. चिनी लोकांनीं अमेरिकन लोकांस ताळ्यावर आणण्यास हीच युक्ति योजिली आहे व हिंदुस्थानांतील लोकांस ती कां साधूं नये हें आम्हांस समजत नाहीं. सर्व प्रकारचा माल देशांत तयार होत नसल्यानें आज तारखेस कांहीं परका माल वापरावा लागेल हें निर्विवाद आहे. पण परकी माल जरी वापरावयाचा असला तरी तो बेफाम झालेल्या राज्यकर्त्यांच्या देशांतील नको, शक्य असेल तेथपर्यंत दुसऱ्याचा

वापरूं नये असा तरी आमचा निश्चय झाला पाहिजे, या निश्चयास अप्रत्यक्ष रीतीनें राजकीय स्वरूप येतें व तें यावें अशीच आमची इच्छा आहे. नाहीं म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आज मितीस सर्व देशी माल मिळणार नाहीं म्हणून हें काम दिरंगाईवर टाकून उपयोगी नाहीं. विलायती माल वापरण्याचें सोडून हिंदुस्थानांतील, आशिया खंडांतील किंवा इंग्लंडाखेरीज इतर देशांतील एक पैशाचा माल जर तुम्ही वापरला तर त्यांत अर्ध्या पाव पैचें तरी इंग्लंडचें नुकसान आहे हें खचित आहे . मग तो माल देशांत तयार होत असल्यास तो फायदा देशांत राहील, आणि तसें होण्याबद्दल होईल तितकी खटपट केलीच पाहिजे ; नाहींतर निदान इंग्लंडांत न जातां इतर देशांत जाईल. आमच्या राज्यकर्त्यांस आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, राज्यकर्ते या नात्यानें तुम्ही जी बेपर्वाई चालविली आहे तिचा राजकीयरीत्या प्रतिकार करण्याचें सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं हें खरें आहे ; पण व्यापाराच्या रूपानें आम्ही जे कोटचवधि रुपये दरसाल तुम्हांस देतों ते तरी तुमच्यासारख्या बेमुर्वत लोकांस कां द्यावे ? आम्ही पहिल्यानें हा माल देशांत तयार करूं, नाहींतर तो दुसऱ्याकडून विकत आणूं, पण तुमचा घेणार नाहीं ; सर्व हिंदुस्थानचा जर असा निश्चय झाला तर ' पायोनियर ' नें अमेरिकन लोकांसंबंधानें जें विधान केलें आहे तशाच प्रकारचें विधान इंग्रजी व्यापाऱ्यासंबंधानेंहि लवकरच करण्याची त्यास पाळी येईल. आज आमच्या देशांतील व्यापार सर्वस्वी बुडालेला आहे ; आणि तो इंग्रजांनीं जाणूनबुजून बुडविलेला आहे, हें जगप्रसिद्ध आहे. आपल्या देशांतील बुडालेला हा व्यापार किंवा उद्योगधंदे पुन्हां या देशांत सुरू करणें हें आपलें कर्तव्य आहे. परंतु ते पुन्हां सुरू होईपर्यंत इंग्रज लोकांवर रुसूं नका असें म्हणण्यांत मात्र आम्हांस कांहीं हांशील दिसत नाहीं. हल्लींची चळवळ एकपक्षीय नसून दुहेरी आहे हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे. कै. गणेश वासुदेव जोशी यांनीं जेव्हां ही कल्पना काढली तेव्हां ती केवळ व्यापारी दृष्टीनेंच काढली होती. हल्लीं त्याच कल्पनेस प्रत्यक्ष– राजकीय नाहीं पण अप्रत्यक्ष –राजकीय किंवा व्यावहारिक स्वरुप आलेलें आहे. आमचें म्हणणें असें आहे कीं, ' देशी माल प्रथम वापरा, तो मिळत नसल्यास निदान विलायती-पेक्षां निराळा वापरा ' ही कल्पना किंवा भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें ' योग ' आजच्या आज किंवा तत्क्षणींच साध्य होणार नाहीं. ' रात्रीं खा तुप आणि सकाळीं बघ रूप ' अशांतला हा योग नव्हे. अनेक जन्मांनीं सिद्धीस जाणाऱ्या योगाच्या कोटींतील हा असून धीरे धीरे पण निश्चयानें जर या मार्गानें आपण उद्योग करावयास लागलों तर उभयतः म्हणजे राजकीय आणि व्यापारी

दृष्टीनें कांहीं वर्षांनीं आपलें कल्याण झाल्याखेरीज राहणार नाहीं. देशी माल वापरण्याचा निश्चय केल्यानें हल्लींची हातांतली छत्री सोडून ताडपत्री छत्री- घेण्यास, किंवा रास्कोपचें घड्याळ टाकून देऊन घंगाळ आणि घटिकापात्र गळयांत बांधण्यास कोणी सांगत नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, हल्लीं आपल्या संसारोपयोगास ज्या वस्तु अवश्य लागतात, त्या प्रत्येकानें आज देशांत तयार होतात तितक्या घेण्याचा निश्चय करावा ; अधिकाधिक तयार होण्याची खटपट करावी; आणि इतकें होऊनहि जर देशी मिळत नसेल तर इतर देशांतील वापरावी; पण विलायती वापरूं नये. हा मार्ग किंवा उपदेश सर्वस्वी निरपवाद असून त्याप्रमाणें वागणूक केल्यास त्यांत कोणतीहि अडचण येण्याचा संभव नाहीं. निश्चय मात्र पाहिजे. आणि असा जर राष्ट्रांतील लोकांनीं निश्चय केला तर शिरोभागीं लिहिलेल्या भगवद्गीतेंतील वचनाप्रमाणें या धर्माचें जितकें जितकें अधिकाधिक आचरण होईल – मग दर वेळेस तें थोडें कां होईना – तितकें तें देशास कल्याणकारकच होऊन अखेरीस कालांतरानें आपले इष्ट हेतु पूर्णपणें तडीस जातील. हा योग श्रेयस्कर आहे, शक्य आहे, निरपवाद आहे ; आणि ' न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ' या भगवद्वचनाप्रमाणें या योगाचा अभ्यास करणारांस कधींहि दुर्गति प्राप्त व्हावयाची नाहीं. थोडें जरी याप्रमाणें त्यांच्या हातून आचरण घडलें तरी तें परमेश्वरकृपेनें कल्याणप्रदच होईल अशी आमची खात्री आहे.

# १२. स्वदेशीवरील आक्षेप

[ १२ डिसेंबर १९०५ ]

हल्लीं दर आठवड्यास स्वदेशी चळवळीस निरनिराळें स्वरूप प्राप्त होत चाललें आहे व या चळवळीबद्दलच्या चर्चेत निरनिराळे नवीन प्रश्न एकसारखे उद्भवत आहेत, ही गोष्ट अगदीं वर वर वर्तमानपत्रें वाचणारासहि माहीत झालेली आहे. सामान्यतः म्हटलें म्हणजे स्वदेशी चळवळीच्या किंवा राजकीय दृष्टया विचार केल्यास बहिष्कार-योगाच्या विरुद्ध असे लोक आतां फारच थोडे शिल्लक राहिले आहेत. होतां होईल तो देशांत झालेलीच वस्तु वापरावी, परकी वापरूं नये, याबद्दल बहुतेक अंशीं आतां पूर्ण एकवाक्यता झालेली आहे, व काशी येथील राष्ट्रीय सभेंत या एकवाक्यतेवर राष्ट्राचा छाप बसून चलनी नाण्याप्रमाणें स्वदेशी चळवळीसहि पूर्ण व राजरोस व्यवहारार्हता येईल अशी आम्हांस खात्री आहे. स्वदेशी चळवळीचें महत्त्व आणि उपयुक्तता अनेक दिशेनें स्थापित करण्याचे प्रयत्न चालू आहेत व निरनिराळ्या विचारी पुरुषांस ही चळवळ निरनिराळ्या दिशेनें इष्ट व आवश्यक वाटत आहे. उदाहरणार्थ, राजकोटचे बॅरिस्टर मि. पंडित यांनीं नुकतेंच असें म्हटलें आहे कीं, " स्वदेशी चळवळ ही एक दुष्काळनिवारक मात्राच होय, कारण या चळवळीमुळें खेडेगांवांतील उद्योगधंद्यास उत्तेजन येऊन शेतकीवर उदरनिर्वाह करणारांची संख्या कमी होईल, आणि तसें झालें म्हणजे फॅमिन कमिशननें म्हटल्याप्रमाणें वारंवार दुष्काळ पडण्याचा संभवहि कमी होईल." रा. रा. पंडित यांस स्वदेशी चळवळ ही दुसऱ्या रीतीनें म्हणजे नैतिक दृष्टीनेंहि प्रशस्त व ग्राह्य वाटत आहे. हा एक स्वावलंबनाचा मार्ग आहे व त्यापासून दुष्काळाचेंहि निवारण होण्यासारखें आहे, असें त्यांनीं म्हटलें आहे. सारांश, औद्योगिक, राजकीय, सामाजिक, नैतिक किंवा सांपत्तिक यांपैकीं एक व अनेक किंवा सर्व दिशेनें विचार केला तरीहि स्वदेशी चळवळीची आवश्यकता व उपयोग हीं पूर्णपणें सिद्ध होतात, ही गोष्ट आतां सर्वांच्या प्रत्ययास आली आहे. इतकेंच नव्हे तर सुधारलेल्या राष्ट्राच्या पूर्वेतिहासावरूनहि याच सिद्धान्तास पुष्टीकरण मिळत आहे असें आतां उघड झालें आहे. तथापि अद्याप मधून मधून " सर्वथा व्यवहर्तव्यं कुतोह्यवचनीयता " या न्यायानें स्वदेशी चळवळीवर किंवा बहिष्कार योगावर कांहीं आक्षेप प्रसिद्ध होत असतात. यापैकीं एक-दोन भ्रामक आक्षेपांचें

निरसन करण्याकरितां आज मुद्दाम हा विषय हातीं घेतलेला आहे. केसरीमध्यें आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या या विषयावरच्या लेखांत या आक्षेपांचें उत्तर अप्रत्यक्ष रीतीनें आलेलेंच आहे. तथापि त्याचा अधिक खुलासा होणें इष्ट वाटल्यावरून आजचा लेख लिहीत आहों.

अर्थशास्त्रदृष्टचा पाहिलें असतां स्वस्त परकीय मालापेक्षां महाग स्वकीय माल घेतल्यानें गिऱ्हाइकाचें व त्याबरोबर राष्ट्राचें सांपत्तिक नुकसान होतें, असा जो जुन्या अर्थशास्त्रज्ञांचा सिद्धांत पंचवीस तीस वर्षांपूर्वी सांगण्यांत येत असे तो अलीकडील अर्थशास्त्रज्ञांच्या मतानें निराधार ठरविण्यांत आला आहे हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. देशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन येण्याकरितां, परदेशी मालावर जकात बसविण्याचें तत्त्व बहुतेक सुधारलेल्या राष्ट्रांस आतां मान्य झालेलें आहे ; व राजकीय जकात बसवून जो हेतु सिद्धीस न्यावयाचा तोच हेतु लोकांनीं स्वदेशी माल वापरल्यानें तडीस जातो. अर्थात् सरकारानें जी गोष्ट करावयाची ती लोकांनीं करण्यास हरकत नाहीं, हेंहि तत्त्व आतां सर्वांस मान्य झालें आहे. परंतु अद्याप एखादा वेडापीर मध्येंच असें सांगत सुटतो कीं, स्वदेशी चळवळीमुळें गेल्या तीन चार महिन्यांत बंगाल प्रांताचें व त्याच मानानें इतरांचें मिळून दीड दोन कोटी रुपयांचें नुकसान झालें आहे. चार दोन महिन्यांत दीड दोन कोटींचें नुकसान तर वर्षानुवर्ष ही चळवळ राहिल्यास काय अनर्थ होईल, अशा प्रकारचा ध्वन्यर्थहि वरील सांगण्यांत भरलेला आहे. सकृद्दर्शनीं कित्येकांस या आक्षेपाचा कदाचित् मोठा बाऊ वाटेल. पण जरा विचार केला असतां यांतील पोंचटपणा कोणाच्याहि सहज नजरेस येणार आहे. पहिल्यानें क्षणभर आपण असें गृहीत घेऊं कीं, जो विलायती माल एक रुपयास मिळतो तोच स्वदेशी घेतल्यास त्यास चार आणे जास्त म्हणजे सव्वा रुपया द्यावा लागतो. म्हणजे पांच कोट रुपयांचा स्वदेशी माल घेतल्यास गिऱ्हाइकांस एक कोट रुपये अधिक पडले किंवा कांहीं आक्षेपकांच्या म्हणण्याप्रमाणें एक कोटींचें त्यांचें नुकसान झालें. परंतु अशा रीतीनें विचार करतांना दुसऱ्या एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें, हें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. ती ही कीं, चार कोटींचा विलायती माल घेतला तर चार कोटींच्या चार कोटी विलायतेस जातात आणि तितकाच देशी माल पांच कोट रुपयांस खरेदी केला तर सर्व पांच कोट रुपये स्वदेशांत राहतात ! अर्थात् पांच कोटींचा स्वदेशी माल घेण्यांत एक कोटींचें नुकसान होतें ही समजूत चुकीची आहे. गिऱ्हाइकांस एक कोट रुपये जास्त पडतात हें खरें, पण देशांतल्या देशांत राहून त्याचा अखेर विनियोग भांडवलाच्या रूपानें नवीन कारखाने काढण्यांतच होत असतो.

स्वदेशी चळवळीनें किंवा परदेशी मालावर अधिक जकात बसविल्यानें देशांतील उद्योगधंद्यांस जें उत्तेजन मिळावयाचें त्याचा मार्ग हाच होय. जकात वाढवून किंवा स्वदेशी माल घेण्याचा लोकांनीं निग्रह केल्यामुळें किमती वाढून कारखानदारांस आपल्या मालावर जो फायदा मिळतो तोच फायदा सदर कारखाने वाढविण्यांत किंवा दुसरे कारखाने घालण्यांत भांडवलाच्या रूपानें तो खर्च करीत असतो; आणि अशा रीतीनें नवीन कारखाने वाढून देशांतल्या देशांत जास्त माल निघूं लागला म्हणजे पुन्हां किमती कमी होऊन परकीय मालाच्या किमतीबरोबर देशांतील मालाची किमत होऊन व्यापाराचें समीकरण नीट बसतें. स्वदेशी चळवळीनें मालाच्या किमती चढून लोकांचें नुकसान होतें, असा जो कित्येक आक्षेप घेतात तो व्यापाराच्या समीकरणाची ही क्रिया नीट न समजल्यामुळें होय. सप्रतिबंध ऊर्फ संरक्षित व्यापार आणि स्वदेशी चळवळ हीं दोन्हीहि स्वदेशी व्यापार वाढविण्याचीं कृत्रिम साधनें आहेत, व त्या दोहोंचाहि अखेर परिणाम असा आहे कीं, परदेशी मालावर जकात बसविल्यामुळें किंवा त्यास बहिष्कार टाकल्यानें स्वदेशी वस्तूंची किमत वाढून त्यायोगें कारखानदाराच्या हातांतील भांडवल वाढतें; आणि हें भांडवल वाढलें म्हणजे नवीन कारखाने निघून स्वदेशी मालाच्या किमती उतरत उतरत अखेर परदेशी मालाच्या किमतीबरोबर होतात. अर्थशास्त्रांत मागणी आणि पुरवठा यांच्या समीकरणाची जी क्रिया सांगितली आहे ती अशाच प्रकारची होय. एखाद्या जिनसाची मागणी वाढली म्हणजे पहिल्यानें तो जिन्नस महाग होतो, जिन्नस महाग झाला म्हणजे त्याचा जास्त पुरवठा करण्याकडे भांडवलवाले लोक जास्त प्रयत्न करितात; आणि तसें त्यांनीं जास्त लक्ष पुरविलें म्हणजे पुन्हा वाढलेल्या मागणीइतका पुरवठा होऊन किमत मूळपदावर येते. हल्लीं म्हणजे स्वदेशी चळवळीच्या प्रारंभकालीं हीच क्रिया चालू आहे. एका आंकडेशास्त्र्यानें असें काढलें आहे कीं, हिंदुस्थानांत हल्लीं जें पंचवीस तीस कोटींचें विलायती कापड येतें तें अजिबात बंद पडण्यास या देशांत चौदा लक्ष वाफेच्या चात्या व एक लक्ष साठ हजार वाफेचे माग नवीन सुरूं झाले पाहिजेत; व त्यास सुमारें २५-३० कोट रुपयांचें भांडवल लागेल. म्हणजे दहा वर्षांत ही सुधारणा व्हावयाची असल्यास दरसाल २॥ किंवा ३ कोटी रुपये या धंद्यांत भांडवलाच्या रूपानें व्यापाऱ्यांनीं घातले पाहिजेत. इतके पैसे किंवा भांडवल हिंदुस्थानांतील लोक दरसाल कसे उभारणार, असाहि या आंकडेपंडितानें प्रश्न विचारला आहे; आणि स्वदेशी चळवळ अखेरीस व्यर्थ कशी होणार हें दाखविण्याचा त्याचा रोख आहे. पण वर आम्ही सांगितलेली व्यापाराच्या समीकरणाची क्रिया

लक्षांत आणली म्हणजे त्या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण नाहीं. स्वदेशी मालाचा पुरवठा जर कमी असेल तर सदर मालाच्या किंमती मागणीच्या मानानें पहिल्यानें थोडथोड्या चढल्याच पाहिजेत, आणि किंमती चढल्या म्हणजे कारखानदारांच्या हातांत भांडवल जमून पुन्हां नफ्याच्या आशेनें तें भांडवल याच धंद्यांत खर्च होऊन जास्त जास्त माल तयार होणार व अखेरीस पहिल्यासारखी किंमत होऊन पूर्वस्थिति येणार, हें निश्चित आहे. दरसाल तीन कोटी रुपयांचें भांडवल अशा रीतीनें उभारण्यास तीस कोट मनुष्यांस दर माणशीं दीड पावणेदोन आणे अधिक द्यावे लागतील. हिशेबाकरितां दर माणशीं चार आणे अधिक द्यावे लागतील असें आपण समजूं, कारण तीस कोट मनुष्यें सर्वच कांहीं समजूतदार असणें शक्य नाहीं, व त्यांतली निम्म्यापेक्षां अधिक गैरसमजूतदार धरलीं तरीहि माणशीं चार आण्यांपेक्षां सरासरीनें जास्त रक्कम बसत नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे समजुतदार माणसांनीं दरसाल दर माणशीं तीन किंवा चार आणे देशी मालाकरितां जास्त दिल्यानें दहा वर्षांत इष्ट हेतु साध्य होतील असें उघड होतें. तीस कोट प्रजेच्या हिंदुस्थान देशास तो कितीहि गरीब असला तरी अशा रीतीनें तीस कोट रुपये भांडवल जमविणें अशक्य नाहीं. याच तीस कोट लोकांपासून हिंदुस्थानसरकार दरसाल कराच्या रूपानें शंभर-सव्वाशें कोट रुपये उत्पन्न करीत आहे, व स्वदेशी उद्योगधंद्यांच्या संरक्षणार्थ परदेशी मालावर जर सरकारनें जास्त जकात बसविली असती तर लोकांवर या जकातीचें ओझें सारखें वांटून गेल्यानें तें त्यांच्या लक्षांतहि आलें नसतें. सरकारी कराच्या रूपानें हें ओझें जसें लोकांवर वाटलें गेलें असतें तसें स्वदेशी चळवळीमुळें वाढलेल्या किंमतीच्या रूपानें तें लोकांवर आतां वाटलें जात आहे. फरक एवढाच कीं, जी क्रिया सरकारच्या हुकमानें झाली असती तीच आतां बहिष्कारयोगानें किंवा लोकांच्या निश्चयानें होत आहे. देशांतील उद्योगधंदे वाढण्यास या क्रियेची सर्वत्र अपेक्षा आहे, इतकेंच नव्हे तर त्याखेरीज गत्यंतर नाहीं. अशा स्थितींत किंमती वाढल्यानें लोकांचें नुकसान झालें असें प्रतिपादन करणें साहसाचें व असमंजसपणाचें लक्षण होय. पैसा देशांतल्या देशांत राहतो ही गोष्ट प्राधान्येंकरून लक्षांत ठेविली पाहिजे. दहा कोट रुपये अजिबात या देशांतून जाण्यापेक्षां या देशांतील कांहीं लोकांच्या खिशांतील एक कोट रुपये या देशांतील पण दुसऱ्या लोकांच्या खिशांत पडून जर दहाच्या दहा कोट रुपये देशांत राहत असतील तर त्यांत एकंदर राष्ट्राचें हितच आहे. आतां एवढी गोष्ट खरी कीं, देशी मालाची किंमत विनाकारण चढणार नाहीं अशी या चळवळीच्या पुढाऱ्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे, व तशी तजवीज

म्हटली म्हणजे मुख्यत्वेंकरून स्वदेशी मालाचीं सार्वजनिक भांडवलानें ठिकठिकाणीं दुकानें काढणें हीच होय, व त्याप्रमाणें हल्लीं उद्योगहि चालू आहे. तसेंच स्वदेशी मालाचा जितका जितका जास्त व लवकर पुरवठा करतां येईल तितका करण्याविषयीं व्यापाऱ्यांनीं झटलें पाहिजे. पण ही गोष्ट होईपर्यंत कांहीं काल तरी स्वदेशी मालाची किंमत थोडीबहुत जास्त पडणारच, आणि ती गिऱ्हाइकांनीं सोसली पाहिजे. देशांतील उद्योगधंद्याच्या उत्तेजनार्थ लोकांनीं कांहीं दिवस जो स्वार्थत्याग करावयास पाहिजे तो हाच होय, आणि तो करण्याचा निश्चय करणें हेंच स्वदेशी चळवळीचें किंवा बहिष्कारयोगाचें रहस्य आहे. स्वदेशी चळवळ म्हणजे केवळ सुखाचा मार्ग नव्हे, त्यांत थोडी गैरसोय आहे व ती लोकांनीं सोसली पाहिजे. आतां कोणी असें म्हणतील कीं, किंमती जास्त चढल्यानें पूर्वींइतका माल घेण्यास जास्त खर्च करावा लागेल, व तसा खर्च करण्यास प्रत्येकास सामर्थ्य नाहीं. गोष्ट खरी आहे ; पण ज्यास अशा रीतीनें सामर्थ्य नाहीं त्यानें विलायती मालापेक्षां थोडा कमी स्वदेशी माल तितक्याच किंमतींत खरेदी करून त्यास त्यांत आपला निर्वाह करतां येण्यासारखा आहे. उदाहरणार्थ, कापडच घेऊं. दरसाल एका कुटुंबास वीस रुपयांचा विलायती कपडा लागतो तर ह्याच वीस रुपयांत जितका देशी कपडा येईल तितका घेऊन कांहीं वर्षें त्यांस जास्त खर्च न करितां निर्वाह करतां येणार नाहीं असें नाहीं. कारण देशी कपडा विलायतीपेक्षां थोडा अधिक टिकाऊ असतो, हें प्रसिद्ध आहे. अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे विशेष खर्च न होतां पण थोडीशी झीज सोसून स्वदेशी चळवळीस सर्वांना मदत करतां येणार आहे. यांत कोणाचेंहि नुकसान नाहीं व कांहीं अशक्यहि नाहीं. जी गोष्ट सरकार परकीय नसतें तर त्यानें केली असती तीच आपल्यास करावयाची आहे. यांत अडचणी पुष्कळ आहेत ; पण त्या सर्व निश्चयानें उद्योग केल्यास हळू हळू नाहींशा होण्यासारख्या आहेत. नुकसानीची भीति व्यर्थ आहे, इतकेंच नव्हे तर केव्हांहि झालें तरी यापासून हितच होणार आहे. सारांश " स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् " असें जें याबद्दल मागें आम्ही लिहिलें आहे तें अक्षरशः खरें आहे ; व आम्हांस अशी उमेद आहे कीं, लोक या योगाचें अवलंब करण्यांत कदापिहि मागें घेणार नाहींत. स्वार्थानें किंवा अन्य कारणानें मधून मधून कांहीं आक्षेपक लोकांस या मार्गापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतील. पण हे प्रयत्न मायावी आहेत असें समजून त्यांस भीक न घालतां आमच्या लोकांनीं अंगीकृत कार्य तडीस न्यावें, अशी त्यास आमची आग्रहपूर्वक विनंति आहे.

# खंड सहावा

## शैक्षणिक प्रश्न व राष्ट्रीय शिक्षण

### १. लष्करी शिक्षणाची शाळा

[ १८ मार्च १८९० ]

.....लष्करी शाळेसंबंधाचा विचार निघाला म्हणजे कांहीं लोकांचा पहिला प्रश्न असा निघतो कीं, परकीय प्रभूनें आपल्या प्रजेस लष्करी शिक्षण देणें म्हणजे आपल्या हातानें आपल्या अपकर्षाचा पाया घालणें होय, व म्हणूनच लोकांनींहि अशा तऱ्हेची मागणी सरकारपाशीं करणें अगदीं अयोग्य होय, त्यापासून कांहीं फायदा न होतां आपण उगाच सरकारास भीति मात्र घालतों. पुण्याच्या सभेंत रा. गंगारामभाऊ म्हसके व ऑ. काजीसाहेब यांनीं जीं भाषणें केलीं त्यांतील मुख्य मुद्दा हाच होता. परंतु रा. ब. रानडे यांनीं सांगितल्याप्रमाणें हा समज चुकीचा आहे असें थोडया विचारांतीं दिसून येईल. इंग्रजी राज्यांतील सर्व सेनेचें आधिपत्य व सर्व ऑफिसरांच्या जागा जर आम्हीं मागितल्या तर अशा आक्षेपास जागा होती. पण आमचें मागणें इतकें नेमस्त आहे कीं, त्यापासून इंग्रजी राज्यास कांहीं अपाय न होतां उलटी बळकटी येणार आहे, असा ड्यूक ऑफ कॅनाटसारख्या थोर कामगारांचाहि अभिप्राय आहे. इंग्रजी राज्य तरवारीच्या जोरावर चाललें आहे असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे. त्यामुळें या विषयाचा सूक्ष्म विचार करण्यास पुष्कळांची प्रवृत्ति होत नाहीं व तशी प्रवृत्ति न झाल्यामुळें जे अनेक गैरसमज होतात त्यांतलाच वरील एक होय. इंग्रजांचें राज्य तरवारीच्या जोरावर चाललें आहे, पण त्या तरवारी कोणाच्या व त्यांपासून राज्याच्या चिरस्थायीपणास होणारी मदत किती ? याचा जरा बारीक विचार केला पाहिजे. हिंदुस्थानच्या एकंदर सैन्यापैकीं $\frac{2}{3}$ नेटिव व $\frac{1}{3}$ युरोपियन सैन्य आहे व नेटिव सैन्यावरील मेजर-सुभेदारपर्यंत सर्व अधिकारीहि नेटिवच आहेत. यापेक्षां मोठ्या पगाराच्या अधिकारांच्या जागा युरोपियन लोकांच्या हातांत आहेत खऱ्या, पण हा प्रकार एकंदर सर्व खात्यांत सारखाच लागू आहे. आमचें गरीब विचारें शाळाखातें घ्या. तेथें देखील इन्स्पेक्टर, डायरेक्टर व आजपर्यंत हायस्कूलचे हेडमास्तर हे

युरोपियनच आहेत. मुलकी खातें, न्यायखातें, रानखातें, इंजिनियरिंग खातें वगैरे ठिकाणींहि हाच नियम लागू आहे. तेव्हां लष्करी खात्यासंबंधानेंच त्याबद्दल विशेप बरें-वाईट वाटण्याची कांहीं जरूर नाहीं. वरिष्ठ हुद्देदारांच्या जागांपैकीं किती जागा नेटिवांस द्याव्या हा प्रश्न अगदीं निराळा आहे. व त्याचा निकालहि निराळ्या गोष्टीवरूनच केला पाहिजे. सध्यां लोकांचें सरकारापाशीं जें मागणें आहे तें अगदीं नियमित असून त्याचा जाग्याच्या प्रश्नाशीं कांहीं संबंध नाहीं. ज्या जागा हल्लीं नेटिव सैन्यांत नेटिवांसच मिळतात त्या एका अशिक्षित शिपायास न देतां लष्करी कॉलेजांत शिक्षण मिळून तयार झालेल्या प्रतिष्ठित घराण्यांतील लोकांस द्याव्या एवढीच काय ती सरकारापाशीं आमची विनंति आहे; व ही विनंति अगदीं माफक असून त्यापासून राज्यास उलट अधिक मजबुती येईल हें थोड्या विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल....

.....आतां कदाचित् कोणी असा प्रश्न करतील कीं, हल्लीं असलेल्या मेजरसुभेदार किंवा रिसालदार यांचे जागीं सुशिक्षित लोक आल्यानें त्यांची हांव जास्त वाढून पुढें मागें ते वरिष्ठ अधिकाराच्या जागा मागणार नाहींत म्हणून कशावरून? यावर आमचें एवढेंच उत्तर आहे कीं, हा प्रश्न केवळ लष्करी खात्यासंबंधानेंच नसून इतर सर्व खात्यासंबंधानें सारखाच लागू आहे व त्याचा निकाल १८५४ सालीं हिंदू लोकांस पाश्चिमात्य शिक्षण द्यावें कीं नाहीं याची भवति न भवति होऊन जो अखेर ठराव झाला त्यावेळींच झाला आहे. शिवाय हल्लींच्या मेजरसुभेदारांच्या मनांत अशा तऱ्हेची इच्छा उद्भवणार नाहीं, अशी तरी खात्री आहे काय? विद्येच्या व शिक्षणाच्या प्रसारानें उद्भवणाऱ्या इच्छा व गरजा सरकारास हळू हळू भागविल्या पाहिजेत व त्यांतच इंग्रजी राज्याचें हित व चिरस्थायीपणा आहे हें तत्त्व इंग्लंड देशाचा परकीय देशाशीं जो व्यवहार आहे त्याचें बीज होय. ही गोष्ट मोठमोठ्या राजकार्यधुरंधर मुत्सद्यांनीं कबूल केली आहे. तोच न्याय या प्रकरणीं लाविला म्हणजे भित्र्या कुत्सित लोकांच्या कल्पना अगदीं निराधार आहेत असें कोणाच्याहि नजरेस येईल.

शिपायांस मेजर-सुभेदारीपर्यंत जी बढती मिळते ती काढून त्यांपैकीं कांहीं जागा खानदानीच्या घराण्यांतील लोकांस दिल्यानें शिपाई लोकांत थोडा-बहुत असंतोष उत्पन्न होईल असा एक दुसरा आक्षेप आहे; परंतु तोहि वरच्याप्रमाणेंच चुकीचा आहे, ज्या लोकांनीं पूर्वींच्या अमलांतून मोठमोठीं कामें करून आपल्या तरवारीच्या जोरावर स्वराज्यनिष्ठा गाजविली त्यांच्या वंशजांस असंतुष्ट ठेवून त्यांच्या वंशपरंपरागत आलेल्या दर्जाचा, अधिकाराचा, इतमामाचा

शौर्याचा व हुकमतीचा देशहिताच्या कामीं उपयोग न करून घेतल्यापासून देशाचें जें नुकसान होत आहे, तें लक्षांत आणलें म्हणजे तर वरील आक्षेपांत दाखविलेला असंतोष अगदीं क्षुल्लक आहे असें कोणाच्याहि लक्षांत येईल. ड्यूक ऑफ कॅनाट यांनीं सांगितल्याप्रमाणें खानदानीच्या घराण्यांतील लोकांचा लष्करांत जर प्रवेश होईल (आणि तो प्रवेश त्यांस ऑफिसरांच्या जागा दिल्याखेरीज कधींहि व्हावयाचा नाहीं ) तर राज्याच्या मजबुतीस हें एक अधिकच साधन होईल, व असल्याच तऱ्हेच्या दुसऱ्या कारणांमुळें मोंगलाच्या कारकीर्दींत अकबरासारख्या दूरदर्शी बादशहांनीं उदेपूर, जयपूर, जोधपूर वगैरे रजपूत घराण्यांतील सूर्य व चंद्रवंशी राजांस आपल्या सैन्यांत मोठमोठे अधिकार दिले होते व त्यांपासून त्यांचे राज्यास अपाय झाल्याचें कोठेंहि ऐकिवांत नाहीं. असेंच नव्हे तर अगदीं शेवटपर्यंत राजनिष्ठ राहून या घराण्यांच्या हातून मोंगल बादशहास पुष्कळ वेळीं अत्युत्तम मदत झाली आहे. विश्वासानें विश्वास उत्पन्न होतो व वाढतो. असा विश्वास इंग्रज सरकारानें जेथें टाकिला आहे त्या त्या ठिकाणीं नेटिव लोकांनीं तो पूर्णपणें राखिल्याचें आढळून येतें. तेव्हां अशाच तऱ्हेनें जुन्या कसास उतरलेल्या घराण्यांवर विश्वास टाकून त्यांस असंतुष्ट न ठेवितां सरकार त्यांच्या करामतीचा राज्याच्या संरक्षणाच्या कामीं जर उपयोग करून घेईल तर त्यापासून एकंदर देशाचें व राज्याचें अतिशय हित होणार आहे.

# २. खरें विद्यापीठ कोणतें ?

[ २५ फेब्रुवारी १८९६ ]

हिंदुस्थान देश प्राचीनकाळीं जेव्हां विद्या व कला यांविषयी प्रसिद्ध होता तेव्हां या देशांत विद्वानांचे मोठमोठे मठ असून तेथें रात्रंदिवस अनेक शास्त्रांचा व विद्यांचा अभ्यास नेहमीं सुरू असे. बहुतेक क्षेत्राच्या ठिकाणीं विद्वानांचा मोठा समुदाय असून त्यांचा सर्व काळ अध्ययन, अध्यापन व ग्रंथ-रचना यांत जाई. या गृहस्थांच्या तालमींत दुसरे पुष्कळ विद्वान् तयार होऊन देशभर जात, आणि इतर ठिकाणीं कोणीं कोणत्याहि शास्त्राचा अभ्यास केला असल्यास त्याच आपल्या विद्वत्तेची व गुणाची परीक्षा घेण्यास या नामांकित क्षेत्रांतून जावें लागत असे. तात्पर्य, अनेक शास्त्रांचा व विद्यांचा रात्रंदिवस जेथें खल चाललेला आहे असे आश्रम जुन्या काळीं या देशांत पुष्कळ ठिकाणीं आढळून येत असत. बुद्ध लोकांचा काळ हिंदुस्थानच्या इतिहासांत अर्वाचीन समजला होता. पण त्या कालींहि नालंदप्रमाणें मोठमोठीं विद्यामंदिरें बांधलीं होतीं, व तेथें शेंकडों विद्यार्थी आपला विद्याभ्यास पुरा करून देशभर जात असत. शास्त्रांचा अभ्यास सतत व मनन करणारे पुष्कळ विद्वान ज्या ठिकाणीं राहतात व त्यांची कीर्ति ऐकून दूरदूरचे शेंकडों विद्यार्थी विद्यार्जनाकरितां जेव्हां त्यांजपाशीं येतात तेव्हां एखाद्या स्थलास विद्यापीठ, विद्यामंदिर, अथवा विद्याश्रम ही संज्ञा प्राप्त होते. हल्लीं 'सुधारलेल्या राष्ट्रांतूनहि हाच प्रकार आढळून येतो. जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स अथवा अमेरिका या देशांत ज्या युनि-व्हर्सिटचा आहेत त्या वर सांगितल्याप्रमाणेंच विद्येचीं माहेर घरें आहेत असें म्हटलें तरी चालेल. लोकांनीं तयार केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन आपलें काम भागलें असें सुधारलेल्या राष्ट्रांतील युनिव्हर्सिटयांस वाटत नाहीं. शास्त्रांचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत जावा, व प्रत्येक शास्त्रांत कांहींना कांहीं तरी नवीन शोध व्हावा या हेतूनें त्या स्थापन झालेल्या असतात, व तो हेतू तडीस नेण्या-करितां चांगल्या रीतीनें निर्वाह चालेल, असें वेतन देऊन बरेच विद्वान गृहस्थ या युनिव्हर्सिटयांतून त्यांची योग्यता पाहून केवळ विद्यावृद्धि करण्याच्या इराद्यानें ठेविलेले असतात. अशा प्रकारचीं विश्वविद्यालयें असलीं म्हणजे शास्त्रांस उत्तेजन येऊन विद्येची अभिवृद्धि कायमची होत असते. अलीकडे पदार्थविज्ञान शास्त्राचा अभ्यास मानसिकशास्त्रापेक्षां विशेष जारीनें सुरू आहे, करितां

मोठमोठ्या विद्यालयांतून या शास्त्राभ्यासास लागणारी यंत्रसामुग्रीहि या विद्यालयांतून भरपूर ठेवावी लागते. अशा प्रकारचीं विश्वविद्यालयें अमेरिका, जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांत आहेत हें वर सांगितलेंच आहे. व त्याचेंच अनुकरण करून आमच्या देशांत आमच्या दयाळू सरकारनें युनिव्हर्सिटचा स्थापन केल्या आहेत. अशाकरितां कीं, पाश्चात्य विद्यांची व कलांची आम्हांस अभिरुचि लागून आमच्यापैकीं बुद्धिमान लोकांनीं ज्ञानसंपन्न होऊन इतरांस देशी भाषेच्या द्वारें आपल्या ज्ञानाचा फायदा करून द्यावा. हिंदु लोकांस प्राच्य-विद्या शिकवाव्या कीं, पाश्चात्य विद्या शिकवाव्या ह्याच्याबद्दल मेकॉलेसाहेबांच्या वेळीं मोठा कडाक्याचा वाद होऊन अखेरीस युरोपियन लोकांच्या शास्त्रांचें आम्हांस अवश्य ज्ञान करून दिलें पाहिजे, असा निर्णय ठरविण्यांत आला, व त्या ठरावाप्रमाणें प्रत्येक इलाख्यांत विश्वविद्यालयाची स्थापना होऊन त्यांत अनेक विषयांत विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याचें काम सुरू होऊन परीक्षेंत पास झालेल्या गृहस्थास विशिष्ट पदव्या मिळू लागल्या. येथपर्यंत सर्व ठीक झालें ; परंतु गेल्या ५० वर्षांच्या अनुभवावरून आतां असें दिसून येत आहे कीं, धुधानें ज्याप्रमाणें ताकाचें अनुकरण करावयाचें त्याप्रमाणें युरोपियन विद्यापीठाचें आमच्या देशांतील युनिव्हर्सिटचा हें अनुकरण होय. आमचीं पूर्वींचीं विद्यामंदिरें किंवा गुरूंचे आश्रम यांचा हळूहळू ऱ्हास होऊन ते आतां नामशेष झाले आहेत; व त्यांचे ऐवजी ज्या संस्था/ अस्तित्वांत आल्या आहेत त्या जशा असाव्यात तशा नसल्यामुळें कोणत्याहि शास्त्राचा अथवा विद्येचा शोधक बुद्धीनें आस्थापूर्वक अभ्यास करणारे गृहस्थ आमच्या देशांत अलीकडे पैदा होत नाहींत. नवीन शोध करण्याइतकी बुद्धि अथवा योग्यता आमच्या अंगांत नाहीं असें नाहीं. ज्या देशांत पाणिनी, कणाद, शंकराचार्य, भास्कराचार्य वगैरे विद्वान पूर्वकालीं होऊन गेले त्यांत सध्यांचें काळीं पास्चूर, एडिसन, स्पेन्सर, मिल्लल वगैरे गृहस्थांप्रमाणें विद्वान कां निपजूं नयेत याचें खरें कारण शोधून काढून याचा प्रतिकार करणें हे प्रत्येक विद्यावृद्धि इच्छिणारांचें कर्तव्य आहे.

. . . . . हल्लीं विश्वविद्यालयांत जी व्यवस्था आहे व ज्या पद्धतीनें त्यांचें काम चालत आहे, त्यामुळें पास्चूरसारखे विद्वान येथें निघत नाहींत. कोणत्याहि सुधारलेल्या देशांत युनिव्हर्सिटचांची व्यवस्था शाळा व कॉलेजें यांतील गुरूपगुरूंकडे असते; ती व तशी असणें अगदीं स्वाभाविक आहे. आपलें आयुष्य अध्ययन व अध्यापन यांत घालवितात त्यासच विद्यार्थ्यांचे खरे गुणदोष अथवा अडचणी समजून येणें शक्य असतें. युरोपांतील प्रसिद्ध युनिव्हर्सिटींतून

तेथील व्यवस्थेचें काम अशा प्रकारच्या विद्वानांकडेच असतें. परंतु आमच्याकडील प्रकार त्याहून अगदीं भिन्न आहे.

.....गुरूपगुरूंच्या विद्याभ्यासाचा आणि सद्वर्तनाचा परिणाम शिष्याच्या मनावर होण्यास गुरुजी खरोखर विद्याव्यसनी असून छात्रवासी वर्गाशीं प्रेमभावानें वागणारे असले पाहिजेत. दोहोंच्याहि नांवानें आमच्याकडे पूज्यच. तेव्हां परीक्षेंत पहिला नंबर येऊन पुढें आपल्या बुद्धिमत्तेचा कायदे शिकून द्रव्यार्जन करण्यांत उपयोग करणारे विद्यार्थी आमच्यांत निघाल्यास त्यांत नवल कोणतें ? मुंबई युनिव्हर्सिटी १८५७ सालांत स्थापन झाली. पण तेव्हांपासून आतांपर्यंत सुमारें चाळीस वर्षांत या संस्थेंतून एकहि जगप्रसिद्ध विद्वान निघूं नये हें आश्चर्य नव्हे काय ? तेलंग, रानडे, भांडारकर वगैरे कांहीं विद्वान् यापूर्वी युनिव्हर्सिटींतून निघालेले आहेत, पण त्यांपैकीं इतर धंद्यांत शिरल्यामुळें त्यांच्या बुद्धिमत्तेचा व विद्वत्तेचा शास्त्राभ्यासाच्या कामीं जसा उपयोग व्हावा तसा झालेला नाहीं. आतां यामुळें इकडे शास्त्राभ्यासांत जी हानी झाली ती दुसरीकडे म्हणजे कायद्याचे अभ्यासांत भरून आली असें जार्डिनचें म्हणणें आहे व तें एकअंशीं खरें आहे. पण त्याचा उपयोग काय ? ज्यानें समरांगणीं अश्वारूढ होऊन दोन हात करावयाचे त्यानें आपलें कौशल्य घरांत बायकोच्या नथेंतून तीर मारण्यांत जर खर्च केलें तर त्यांस ज्याप्रमाणें नांवें ठेवूं त्याचप्रमाणें प्रस्तुतचा प्रकार आहे. आमच्या युनिव्हर्सिटींत आधीं खरे विद्याव्यासंगी गुरु व उपगुरु नाहींत. त्यांतूनहि सदर युनिव्हर्सिटीची व्यवस्था अगदीं तिऱ्हाइताच्या म्हणजे कॉलेजांतील गुरूपगुरूंच्या खेरीज इतर धंद्याच्या ग्रहस्थितीचे हातांत आहे. युनिव्हर्सिटींत परीक्षा घेऊन बी. ए., एम्. ए. चे शिक्के ठोकण्यापलीकडे दुसरें कांहीं काम चालत नाहीं. चान्सेलरपासून सिंडकेटपर्यंत जो तो आपल्या धंद्यांत गुंतलेला. असल्या युनिव्हर्सिटीस विद्यामंदिर म्हणण्यापेक्षां परीक्षा घेण्याकरितां रजिस्टर्ड झालेली कंपनी म्हटलें तरी चालेल.

---

## ३. युनिव्हर्सिट्या ऊर्फ सरकारी हमालखाने

[ १९ आगस्ट १९०२ ]

हिंदुस्थान देशाचें राज्य हें इंग्रज सरकारचे हातीं आल्यानंतर सदर सरकारनें पूर्वीच्या राजांपेक्षां जी एक मोठी सुधारणा केली ती ' शिक्षण ' होय व याकरितां इंग्रजसरकारचे आम्ही जितके आभार मानावे तितके थोडेच, अशी कांहीं वर्षांपूर्वी सर्वांची व आजमित्तीस बहुतेकांची समजूत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या विद्येच्या जोरावर इंग्रज लोकांस आज सार्व-भौमत्व प्राप्त झालें आहे, तीच विद्या व त्याच कला, तींच शास्त्रें जिकलेल्या हिंदु लोकांस शिकवण्यास त्यांनीं तयार व्हावें यापेक्षां मनाचा आणखी उदारपणा तो कोणता ? अशा प्रकारचे उद्‌गार पुष्कळांच्या तोंडून निघालेले अद्याप आमच्या कानांत घोळत आहेत. आणि पहिल्या पहिल्यानें इंग्रजी शाळांतून पाश्चात्य विद्येचे कांहीं घुटके घेऊन जी मंडळी बाहेर पडली त्यांनीं तर वरील प्रकारचे उद्‌गारांस अधीकच पुष्टीकरण दिलें होतें. त्यांतून पहिल्यानें इंग्रजी विद्या शिकलेल्या लोकांस एकदम मोठ्या जागा मिळत असल्यामुळें अपरिचित असलेल्या त्यांच्या विद्येस यांच्या अधिकाराचा पाठिंबा मिळून लोकांमध्यें यांचें स्तोम पहिल्या पहिल्यानें तर ज्यास्तच वाढलें होतें. पण इतर गोष्टींप्रमाणेंच याहि गोष्टीचा बहार उत्तरोत्तर कमी होत चालला. इंग्रजी शिक्षण एकांगीं आहे व तें फक्त सरकारी नोकरीस लागणारे अवश्य गुणच एतद्देशीय लोकांच्या अंगांत आणण्या-करितां योजलेलें आहे, या शिक्षणक्रमांत तयार झालेल्या लोकांस धर्म, नीति, शास्त्रीय शोध, धंदेशिक्षण वगैरे राष्ट्राच्या उत्कर्षास अवश्य लागणाऱ्या ज्ञानाची व कलांची बिलकुल माहिती नसते. इत्यादि व्यंगें लोकांच्या हळुहळू नजरेस येऊं लागलीं ; आणि नोकरी मिळण्याचें प्रमाणहि उत्तरोत्तर कमी होत गेल्या-मुळें अधिकाराचा दुजोरा कमी होऊन इंग्रजी शिकलेल्यांच्या ज्ञानाचा अपुर्तेपणा आणि कच्चेपणा अधिकाधिक उघडकीस येत चालला. हा काल येण्यास तीस चाळीस वर्षांतील शिक्षणाचा अनुभव कारण तर झालाच, पण त्याखेरीज दुसऱ्याहि गोष्टीवरील विचार आमचे मनांत येण्यास कारणीभूत झाल्या आहेत. आमच्याकडे युनिव्हर्सिट्या स्थापन होऊन पन्नास वर्षे झालीं तरी विद्वान बहुतेक निपजलेच नाहींत असें म्हटलें तरी चालेल. परंतु जपानांत मात्र तीस वर्षांचे आंत याहून भिन्न स्थिति झालेली आमच्या नजरेस येत आहे ! अशी स्थिति

कां व्हावी याच्या कारणांचें विवेचन आम्ही केलेंच आहे; करितां ह्याचा पुन्हा उच्चार न करतां इतकेंच सांगतों कीं, ज्यास खरें शिक्षण म्हणतात तशा प्रकारचें शिक्षण हल्लींच्या संस्थांतून आम्हांस बिलकुल मिळत नाहीं. हिंदुस्थानचे विद्यार्थ्यांस केंब्रिजच्या परीक्षेंत पहिला नंबर मिळवितां येतो तर त्याच्या समवयस्क विद्यार्थ्यांची हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत अशी स्थिति कां व्हावी, यास अपुर्त्या शिक्षणाखेरीज आम्हांस तरी दुसरें कोणतेंहि कारण दिसत नाहीं. सारांश, आमच्या दृष्टीनें पाहिलें तर हल्लीं चालू असलेल्या युनिव्हर्सिटीच्या शिक्षणांत अनेक प्रकारचे फेरफार व्हावयास पाहिजेत, असे कीं, जेणेंकरून युनिव्हर्सिटया म्हणजे खरोखरींच विद्वत्तेचीं किंवा विद्वानांचीं माहेरघरें होतील. निरनिराळ्या विषयांत निष्णात असलेल्या प्रोफेसरांचा समुदाय, विद्यार्थ्यांच्या डोळ्यांदेखत सतत चालू असलेले विद्याव्यासंग, मोठमोठीं पुस्तकालयें किंवा यांत्रिक उपकरणें वगैरे ज्या संस्थेंत नेहमीं दृष्टीस पडतील अशा संस्था येथें निघावयास पाहिजेत असें आमचें म्हणणें आहे, व तें योग्य आहे कीं नाहीं हें युरोपांतील किंवा इंग्लंडांतील युनिव्हर्सिटयांची जास्त माहिती ज्यास आहे त्यास सहज कळून येण्यासारखें आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, युनिव्हर्सिटया स्थापन होऊन आज पन्नास साठ वर्षे झालीं तरीहि त्यांत अशा प्रकारची सुधारणा करण्याचें सरकारच्या मनांत येत नाहीं व हल्लीं युनिव्हर्सिटी कमिशनच्या ज्या सूचना बाहेर पडल्या आहेत त्यांत जरी या गोष्टींचा थोडाबहुत उल्लेख आहे, तरी त्यापासून वर लिहिलेल्या प्रकारचें फल प्राप्त होईल असें दिसत नाहीं.

सरकारची दृष्टि जरी आरंभीं निराळी असली तरी निदान सध्यां तरी आम्हांस अनुकूल किंवा फायदेशीर नाहीं, हें दुसरीकडे एका गृहस्थानें दिलेल्या एका ताज्या सरकारी खलित्यांतील उताऱ्यावरून स्पष्ट होणार आहे. युनिव्हर्सिटी कमिशन नेमलें तेव्हांच आम्हांस याबद्दल शंका आलेली होती, व कमिशननें ज्या सूचना केल्या आहेत त्या पाहून तर त्याबद्दल आतां बहुतेक खात्रीच झाली आहे असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांतील लोक पाश्चात्य विद्येंत, शास्त्रांत किंवा कलांत निपुण होऊन त्यांनीं सुधारलेल्या राष्ट्रांतील विद्वानांबरोबर, धंदेवाल्यांबरोबर किंवा व्यापाऱ्यांबरोबर, आपल्या बुद्धिवैभवानें, करामतीनें, कौशल्यानें किंवा हिमतीनें टक्कर देण्यास तयार व्हावें, अशी आमच्या सरकारची इच्छा नाहीं, किंवा इच्छा असल्यास कृती तरी नाहीं, असें मोठ्या दुःखानें आम्हांस म्हणावें लागतें. एरवीं जपानसारख्या राष्ट्रानें तीस वर्षांत ज्या सुधारणा केल्या त्या तिसाचे दुप्पट साठ वर्षांत हिंदुस्थान देशांत कां होऊं नयेत याचें

दुसरें कांहीं एक कारण आम्हांस दिसत नाहीं, राष्ट्राची उन्नति होण्यास नवीन धंदे, नवीन विद्या, नवीन शास्त्रें वगैरे जें जें कांहीं पाहिजे तें तें आमच्या शाळांतून शिकविलें जावें अशी लोकांची इच्छा असणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु आपल्या सरकारची इच्छा मात्र यापेक्षां अगदीं निराळी आहे. विद्या किंवा शास्त्रें यांमध्यें जे कांहीं शोध करावयाचे ते इंग्लंड देशांत होतच आहेत. तेव्हां राजकीयदृष्टया ते हिंदु लोकांनींच करावे अशी कांहीं आवश्यकता नाहीं. परंतु हिंदुस्थानचा राज्यकारभार सुधारलेल्या पद्धतीनें चालविण्यास खालच्या प्रतीच्या जाग्यांवरून तरी पाश्चात्य पद्धतीनें थोडेंबहुत शिकलेले लोक असणें जरूर आहे ; व ही जरूर भागविण्याकरितांच येथील लोकांस शिक्षण देण्याची सरकारनें सुरुवात केलेली होती. इंग्रजी मुत्सद्यांपैकीं कांहीं कांहीं मुत्सद्यांनीं शिक्षणाबद्दल आपले उदार विचार प्रगट करून हिंदुस्थानचे लोक विद्यासंपन्न झाल्यावर इंग्रजसरकार मोठ्या खुशीनें या देशांतील आपलें चंबूगवाळें आटोपून निजधामीं जाईल, असे उद्‌गार काढलेले आम्हांस माहीत आहेत. पण हे पुस्तकी उद्‌गार आणि राज्यकारभारांत चालू असलेले या बाबतींतील खरें धोरण यांच्यामध्यें जमीनअस्मानाचें अंतर आहे. इंग्लंडांत ज्याप्रमाणें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराकरितां इंजिनियर तयार करण्यासाठीं कूपरहिल कॉलेज काढलेलें आहे, तशाच प्रकारें हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत खालच्या प्रकारच्या जाग्यां-करितां हिंदु लोक तयार करण्यासाठीं युनिव्हर्सिटया व कॉलेजें मूळ स्थापण्यांत आलीं हें उघड आहे. या कॉलेजांतून किंवा युनिव्हर्सिटयांतून जे विद्यार्थी बाहेर पडले त्यांपैकीं कांहीं बुद्धिमान् विद्यार्थ्यांची दृष्टि अधिक दूरवर जाऊन इंग्रजी राज्यकारभारांतील व्यंगें व दोष हळू हळू त्यांच्या नजरेस येत चालले. पण ही भीति किंवा अडचण आजपर्यंत सरकारास फारशी नडली नव्हती. इंग्रजी विद्येच्या परिशीलनानें एक प्रकारचा चौकसपणा, धैर्य आणि तीव्र विचारशक्ति निदान, चांगल्या विद्यार्थ्यांच्या मनांत तरी उद्‌भवणें अपरिहार्य आहे हें सरकारांस माहीत होतें. पण अशा लोकांची संख्या पहिल्यापहिल्यानें कमी असल्यानें तिकडे सरकार फारसें लक्ष देत नसे. पण नोकऱ्यांपेक्षां ग्राज्युएटांची संख्या जेव्हां दुपटी तिपटीनें वाढली तेव्हां अर्थातच आपल्यास मिळालेल्या शिक्षणाचा अपुरेपणा आणि निरुपयोगिता विद्यार्थ्यांच्या मनांत येऊं लागली ; आणि त्याबरोबरच प्रचलित असलेल्या राज्यकारभाराच्या धोरणाकडेहि त्यांचें लक्ष जाऊं लागलें. ही स्थिति राजकीय दृष्टया अनिष्ट आहे व हिंदुस्थानांतील शिक्षणाचें जें धोरण ठेवावयाचें तें असें असावें कीं, त्यामुळें नोकऱ्या करण्यापेक्षां फाजील ग्रॅज्युएट युनिव्हर्सिटींतून बाहेरच पडू नयेत; अशा प्रकारचे विचार

राज्यकर्त्यांच्या मनांत येऊं लागले. १८८२ सालीं जें एज्युकेशन कमिशन बसलें होतें त्यांचें धोरण याहून वरेंच निराळें होतें पण गेल्या वीस वर्षांत तें धोरण पालटून हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें हल्लीं ज्यांच्या हातांत आहेत त्यांचे विचार वर सांगितल्याप्रमाणें झाले आहेत. उच्च प्रतीचें जें शिक्षण हिंदुस्थानांतील लोकांस द्यावयाचें तें त्यांस विद्वतेच्या शिखरावर पोंचविण्याकरितां नव्हे तर सरकारास खालच्या प्रतीच्या जागा भरण्याकरितां जशा प्रकारचे नोकर लागतात तशा प्रकारचे नोकर तयार करण्याकरितां होय, हें तत्त्व आतां वहुतेक गृहीत धरल्यासारखेंच झालें आहे. सारांश, युनिव्हर्सिटया म्हणजे कनिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकऱ्याकरितां लागणारे उमेदवार तयार करण्याच्या टांकसाळी किंवा हमालखाने होत असें शब्दांनीं नाहीं तरी कृतीनें तरी सरकार स्पष्ट दर्शवीत आहे. आणि नाण्याची किंमत जेव्हां कमी झाली तेव्हां नाण्याचा कायदा करून ज्याप्रमाणें नाणें पाडण्याचे नियम सरकारनें केले, तद्वत् युनिव्हर्सिटींतून बाहेर पडणाऱ्या फाजील ग्रॅज्युएटांची संख्या कमी करण्याचे उपाय युनिव्हर्सिटी कमिशननें आतां शोधून काढले आहेत! कॉलेजची फी वाढविणें, एम्. ए. पर्यंत शिकविणारीं कॉलिजें बंद करणें, इलाख्यांत एकच लॉ-क्लास ठेवणें वगैरे कमिशनच्या ज्या सूचना आहेत त्यांचा हेतु कांहींहि असो, परिणाम आम्हीं वर लिहिल्याप्रमाणेंच घडून येईल यांत शंका नाहीं. युनिव्हर्सिटींत हल्लीं जें शिक्षण दिलें जातें त्याची योग्यता वाढविण्याकरितां या सूचना आहेत असें कमिशननें म्हटलें आहे. पण ही गोष्ट जर खरी आहे, तरी हल्लीं सरकारी कॉलेजांतून तिसऱ्या चौथ्या प्रतीच्या प्रोफेसरांचें जें भरताड भरलें होतें तें कमीं करून त्याच्या ऐवजीं खरोखरच पहिल्या प्रतीचे विद्वान प्रोफेसर आणण्याची सूचना कमिशनानें करावयास पाहिजे होती, पण तशी किंवा त्याप्रकारची दुसरी कोणतीहि सूचना हल्लींच्या रिपोर्टांत आढळून येत नाहीं. चांगल्या लायब्ऱ्या किंवा लॅबोरेटऱ्या स्थापण्याबद्दल सूचना केलेली आहे, पण सरकार जोंपर्यंत या कामाकडे सढळ हातानें पैसा खर्च करण्यास तयार नाहीं तोंपर्यंत ही सूचना कशी अमलांत यावी हें आम्हांस समजत नाहीं. युनिव्हर्सिटीमध्यें आजपर्यंत नेटिव्ह लोकांचा थोडावहुत तरी हात असे, पण इतउत्तर सर्व व्यवस्था सरकारच्या तंत्रानें व धोरणानें चालावयाची असून नाणें पाडण्याच्या टांकसाळीप्रमाणें नोकर तयार करण्याच्या याहि टांकसाळी सरकार आपल्या पूर्ण कबजांत ठेऊन नोकरीच्या व्यवहारास जरूर लागतील त्यापेक्षां अधिक छापवाले ग्रॅज्युएट बाहेर न पडतील अशी तजवीज ठेवणार असें हल्लींच्या कमिशनच्या रिपोर्टावरून स्पष्ट दिसत आहे. सरकारचा हा हेतु सरकारच्या दृष्टीनें जरूरीचा किंवा उपयुक्त असेल, पण

पहिल्यानें सांगितलेल्या लोकांच्या दृष्टीनें पाहातां हें प्रगतीचें नव्हे तर दुर्गतीचें चिन्ह आहे असें म्हणणें भाग पडतें. कोणच्याहि देशांत किंवा राज्यांत नोकर तयार करण्याकरितांच विद्यादान करावयाचें हें मतच मुळीं चुकीचें होय; व लॉर्ड कर्झनसारख्या मुत्सद्यास ज्या अर्थी हें मत पसंत झालें आहे त्या अर्थी उच्च प्रतीच्या शिक्षणाची त्यांचे हातून योग्य व्यवस्था कधींहि लागणार नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. लॉर्ड कर्झन हे स्वतः हुषार व कर्ते आहेत हें निर्विवाद आहे. पण नुसती हुशारी किंवा कर्तृत्व आंगीं असल्यानें कोणाहि व्हाइसरायांकडून हिंदु लोकांचें कल्याण होईलच अशी खात्री देतां येत नाहीं. वरील गुणांखेरीज लोकांची सहानुभूती व त्यांच्या उत्कर्षाबद्दल खरी कळकळ हे गुणहि राज्यकर्त्यांच्या आंगीं असावे लागतात. हे गुण लॉर्ड कर्झन यांच्या अंगीं असलेले अद्याप दिसून आले नाहींत व पुढेंहि दिसून येतील असें वाटत नाहीं. याचा परिणाम असा झाला किंवा होईल कीं, युनिव्हर्सिटी कमिशन, पोलिस कमिशन, इरिगेशन कमिशन वगैरे जे जे विषय त्यांनीं हातीं घेतले आहेत त्या सर्वांचा अखेर निकाल प्रजेच्या तर्फेचा न होतां उलट लोकांच्या उत्कर्षाची आशा मात्र आणखी कांहीं वर्षें असल्या कमिशनांनीं कुंठित होऊन राहील. हिंदुस्थानांत इंग्रज लोकांचें राज्य चिरायु होण्यास देशांतील निरनिराळ्या खात्यांची व्यवस्था अशाच प्रकारची असली पाहिजे, असें ज्यांचें मत असेल ते लॉर्ड कर्झनसाहेबांच्या हुशारीचें कौतुक करतील. पण हिंदुस्थानांतील लोक उत्तरोत्तर अधिक ज्ञानसंपन्न होऊन विद्या, शास्त्रें, उद्योगधंदे, व्यापार वगैरे बाबतींत हळुहळू राज्यकर्त्यांच्या पंक्तीस बसण्यास योग्य व्हावे असें ज्यांस वाटत असेल त्यांस लॉर्ड कर्झन यांची ही कृति चुकीची वाटून ती हिंदुस्थानच्या उत्कर्षास घातुक आहे अशी खात्री होईल. युनिव्हर्सिटया सुधारावयाच्या होत्या तर त्याकरितां एवढा खटाटोप करण्याची कांहीं एक जरूरी नव्हती. दहापांच गरीब विद्यार्थी युनिव्हर्सिटींतून तयार होऊन बाहेर पडल्यानें शिक्षणाची इभ्रत कमी होतें हें मत आम्हांस बिलकुल मान्य नाहीं. उलट हिंदुस्थानची हल्लींच स्थिति अशी आहे कीं, गरीब परंतु बुद्धिमान् विद्यार्थ्यास अधिक उत्तेजन दिल्यानेंच देशांत विद्येची अभिवृद्धि ज्यास्त होण्याचा संभव आहे. पण कमिशनानें या गोष्टीचा नीटसा विचार केलेला दिसत नाहीं. युनिव्हर्सिटीच्या व्यवस्थेंत सरकारचा अधिक ताबा कसा रहावा, नोकरीसाठीं जरूर त्यापेक्षां अधिक ग्रॅज्युएट बाहेर न पडण्याची काय तजवीज करावी, कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंगीं बेताबाताचाच स्वाभिमान राहील अशा प्रकारची कोणती शिस्त कॉलेजांत ठेवावी, किंवा खाजगी शाळा

आणि कॉलेजें यांच्यावर कोणत्या प्रतीची देखरेख असल्यानें सरकारी शाळेंतील किंवा कॉलेजांतील विद्यार्थी तयार होतील, इत्यादि प्रश्नच कमिशनास महत्त्वाचे वाटले आहेत व त्यांचाच ऊहापोह त्याच्या रिपोर्टांत झाला आहे. अर्थात् हें सर्व विवेचन व खटपट सरकार के वास्ते झालेली आहे. लोकांच्या तर्फे या विषयाची चर्चा केव्हां होईल ती होवो. लॉर्ड कर्झन यांच्या कारकिर्दीत होईल अशी आशा आम्हांस तरी वाटत नाहीं.

# ४. जपान आणि हिंदुस्थान

[ ६ डिसेंबर १९०४ ]

रूसो-जपानी युद्धांत अलीकडे जपानची जी सरशी झाली आहे, किंबहुना प्रथमपासूनच जपानांस जें यश मिळत आहे, आणि एकंदर सर्व मोहिमेंत जपानच्या लोकांनीं जें शौर्य आणि युद्धकलेचें प्राविण्य दाखविलें आहे तें पाहून किंवा ऐकून पुष्कळ युरोपियनलोकांच्या मनांत एशिया खंडांतील लोकांच्या सामर्थ्याबद्दल अनेक नव्या कल्पना उद्‌भवत आहेत ; व त्यांपैकीं कांहीं कांहीं वेळोवेळीं आम्हीं ह्या पत्रांत दाखलहि केल्या आहेत. एशियांतील लोक शरिरानें कितीहि बळकट असले, अथवा ऊन, तहान सोसण्याची त्यांचें अंगांत कितीहि शक्ति असली, किंवा व्यक्तिशः ते कितीहि शूर असले, तथापि त्यांच्यामध्यें राष्ट्रीयत्वाची कल्पना नसल्यामुळें युरोपियन लोकांच्या साहाय्याखेरीज त्यांस कोणत्याहि युरोपियन राष्ट्राबरोबर टक्कर देतां यावयाची नाहीं, असा युरोपियन लोकांचा आजपर्यंत समज होता. किंबहुना एशिया, आफ्रिका आणि अमेरिका हीं तिन्हीं खंडें युरोपियन लोकांना चरण्याकरितांच ईश्वरानें निर्माण केलीं आहेत, व जेथें वसाहत करणें शक्य नाहीं तेथें जे काळे लोक असतील त्यांस जिकून त्यांच्या श्रमानें उत्पन्न झालेल्या पिकापैकीं जेमतेम पोटापुरता भाग त्याजला ठेवून बाकीचा सर्व युरोपियन लोकांनीं आपापल्या राष्ट्राच्या अभिवृद्धचर्थ घ्यावा, हेंच त्यांचें कर्तव्य आहे ; इतकेंच नव्हे तर युरोपियन लोक असें न करतील तर देवाच्या घरीं ते अपराधी ठरतील, अशी चांगल्या चांगल्या युरोपियन ग्रंथकारांची समजूत होती. रुसो-जपानी युद्धामुळें – मग या युद्धांत अखेर जय कोणासहि मिळो – ही समजूत बरीच पालटली आहे किंवा पालटत चालली आहे, हा एक ऐतिहासिक दृष्ट्या हल्लींच्या युद्धापासून होणारा मोठा फायदाच समजला पाहिजे. एशियांतील लोकांस केवळ शिपायाचें काम न सांगतां जर त्यांस आधुनिक युद्धकलेचें चांगलें शिक्षण दिलें आणि त्यांचपाशीं शस्त्रास्त्रांचा किंवा युद्धांत लागणाऱ्या इतर साधनांचा भरभक्कम पुरवठा असला तर एशियांतील लोकांचें सैन्य एशियांतीलच सेनानायकांच्या देखरेखी-खालीं उत्तम उत्तम युरोपियन सेनानायकांच्या युरोपियन सैन्याबरोबर टक्कर देण्यास तयार होतें, ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झाली आहे. सारांश युरोपियन आणि एशियाटिक यांच्यामध्यें याबाबतींत हल्लीं जो भेद दृष्टीस

पडतो तो नैसर्गिक नाहीं, कृत्रिम आहे, आणि एशियांतील लोकांस नवीन शस्त्रास्त्रें व सामग्री आणि शिक्षण जर पाश्चिमात्य देशांतील लोकांप्रमाणें मिळेल तर एशियांतील राष्ट्रें पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पंक्तीस बसण्यास कोणतीहि अडचण पडणार नाहीं, हें पुष्कळ लोक आतां कबूल करूं लागले आहेत. निरनिराळ्या राष्ट्रांच्या अंगीं निरनिराळे गुण कमी अधिक प्रमाणानें वास करीत असतात हें खरें; परंतु हा गुणावगुणांचा भेद जरी वास्तविक असला तथापि एशियांतील राष्ट्रांनीं सदैव युरोपियन राष्ट्रांच्या कह्यांत राहिलें पाहिजे असा कांहीं देवदत्त अवगुण एशियांतील लोकांच्या अंगीं नाहीं हें वाचेनें नव्हे, तर कृतीनें जपानी लोकांनीं सर्व जगाच्या प्रत्ययास आणून दिलें आहे.

असो. या विषयावर यापेक्षां पुष्कळ जास्त लिहिण्यासारखें आहे, व तें केव्हां तरी लिहिण्याचा आमचा विचारहि आहे, परंतु आजचा प्रश्न त्याहून थोडा निराळा आहे, व तो मद्रासचे लॉर्ड बिशप यांनीं जें नुकतेंच एक मद्रासेकडे भाषण केलें, त्यावरून सुचलेला आहे. जपानी राष्ट्र पाश्चिमात्य शिक्षणानें आणि पाश्चिमात्य शस्त्रें व युद्धकला यांच्या अभ्यासानें जर चाळीस-वर्षांत इतक्या उदयास आलें, तर हिंदुस्थानांतील लोकांस सदर शिक्षण गेल्या शंभर वर्षें मिळत असतां आणि युरोपांतील राष्ट्रांमध्यें पहिल्या प्रतींत गणलेल्या इंग्रजी राष्ट्राचा व हिंदुस्थानचा इतक्या वर्षें सतत सहवास असतां हिंदुस्थान देश असा कां मागें पडावा आणि जपाननेंच कां पुढें यावें, याचें या मद्रासी बिशपास मोठें गूढ पडलें आहे. हा प्रश्न लॉर्ड बिशप यांसच सुचला आणि इतरांस सुचला नाहीं असें नाहीं. जपानचें शौर्य, एकोपा आणि सरशी हीं पाहून हिंदु-स्थानांतील प्रत्येक मनुष्याच्या डोळ्यांपुढें वर सांगितलेला प्रश्न उभा राहिला आहे व राहत आहे. हिंदू लोक जपानी लोकांपेक्षां शरीरानें किंवा बुद्धीनें कोणत्याहि प्रकारें कमकुवत नाहींत. मग पाश्चिमात्य विद्या जपानी लोकांस अमृताप्रमाणें व्हावी आणि आमच्या लोकांस मात्र तिनें मदिरेप्रमाणें वेहोप करावें यांतील इंगित काय असें प्रत्येक विचारी मनुष्य विचारल्याखेरीज राहणार नाहीं. "विषमप्यमृतं क्वचिद्भवेद् अमृतं वा विषमीश्वरेच्छया" या कोटींतील हा दैवी चमत्कार आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं; आणि दैवी चमत्काराचें समाधान बाजूला ठेवलें म्हणजें मग वर निर्दिष्ट केलेल्या प्रश्नांचीं उत्तरें दोनच प्रकारचीं होऊं शकतात. पहिलें उत्तर असें कीं, जपानास जें पाश्चिमात्य शिक्षण मिळालें किंवा जपानी लोकांनीं आपण होऊन संपादन केलें तशा प्रकारचें शिक्षण हिंदुस्थानांतील लोकांस मिळत नाहीं. दोन्ही देशांतील, म्हणजे जपानांतील आणि हिंदुस्थानांतील शिक्षण पाश्चिमात्य खरें, पण एकास मिळालेलें पाश्चिमात्य

शिक्षण अमृत होय आणि दुसऱ्यास मिळालेली पाश्चिमात्य मदिरा होय. सारांश, शिक्षणाच्या दिशेंत, धोरणांत आणि स्वरूपांत भेद असल्यामुळें पाश्चिमात्य शिक्षणाचें हिंदुस्थानांत आणि जपानांत निरनिराळे परिणाम घडून आलेले आहेत, असें वरील प्रश्नांचें एक उत्तर आहे. दुसरें उत्तर असें कीं, शिक्षण एकाच प्रकारचें आहे. पण " वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे " या न्यायानें पाश्चिमात्य शिक्षणाचा जपानी लोकांवर जो परिणाम झाला तो हिंदु लोकांवर होऊं शकत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे जपान आणि हिंदुस्थान ह्या दोन्हीं देशांत पाश्चिमात्य शिक्षणाचा जो परिणाम लोकांवर घडला त्यांतील भेद शिक्षणाच्या स्वरूपामध्ये फरक असल्यामुळें झाला असें एक पक्षाचें म्हणणें आहे, आणि दोन्हीं देशांतील लोकसमाज भिन्न प्रकारचे असल्यामुळें हा भेद झाला, असें दुसऱ्या पक्षाचें मत आहे. एक पक्षीं घडलेल्या परिणामाची जबाबदारी हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांवर पडते आणि दुसऱ्या पक्षीं देशांतील लोकांवर पडते हें उघड होय. अशा स्थितींत जो तो आपल्यावरील जबाबदारी टाळून ती लोकांवर टाकण्यास तयार झाल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. मद्रासी बिशप हे याच वर्गांतले आहेत. यांच्या भाषणाचा इत्यर्थ असा आहे कीं, इंग्रजी राज्यकर्त्यांनीं जें पाश्चिमात्य शिक्षण हिंदुस्थानांतील लोकांस दिलें तें हिंदी लोकांच्या अवगुणामुळें त्यांच्या अंगीं जसें मुरावें तसें मुरलें नाहीं. त्यांतहि त्यांचा मुख्य अवगुण म्हटला म्हणजे जातिभेद होय. जपानी लोक पाश्चिमात्य शिक्षण मिळाल्याबरोबर जातिभेद मोडून ज्याप्रमाणें एक राष्ट्र होण्यास तयार झाले तसें हिंदी लोक होत नाहींत. खेरीज जपानी लोकांत पाश्चिमात्य विद्या आणि कला आपल्याशा करण्याची जी कळकळ दिसून येते तीहि हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाच्या अंगीं आढळून येत नाहीं. जुनें सोडावें कसें आणि नवें घ्यावें कसें, या विवंचनेंत त्यांचीं मनें काटयांवर घातल्याप्रमाणें दोन्हीं बाजूकडे झुकत आहेत, त्यांत ठामपणा म्हणून कांहीं नाहीं; आणि ठामपणा नाहीं म्हणून कार्यसिद्धीहि नाहीं. जपानी लोकांची अशी स्थिति नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांची उन्नति, वैभव, विद्या आणि कला, या नजरेस पडल्याबरोबर जपानी लोकांनीं त्यांचें पहिल्यानें यथेच्छ सेवन केलें, इतकेंच नव्हे तर तें आपलेंसें करून घेण्याबद्दल अतिशय कळकळ व आस्था दाखवून जुन्या पुराण्यांचा अभिमान सोडून दिला. आणि नखशिखांत पाश्चिमात्य बनले. हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोक धारवाडी कांटयाच्या दांडीवर न बसतां जर निर्धास्तपणें पाश्चिमात्य शिक्षणाचा स्वाद घेतील तर तेहि जपानी लोकांप्रमाणें उदयाला येतील, असा बिशपसाहेबांनीं अखेरीस आशीर्वाद दिला आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, बिशपसाहेबांचें हें मत राजकीय पक्षाचें आहे; आणि राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर याच मताचा हिंदी लोकांत अधिक प्रसार व्हावा, अर्थात् हिंदी लोकांस आपल्याच अंगीं कांहीं अवगुण आहेत असें वाटूं लागावें, हें इष्ट आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट हीच कीं, या मतास सत्याचें जसें पाठबळ असावें तसें नाहीं. जपानी लोकांनीं जें शिक्षण संपादन केलें तेंच हिंदुस्थानांतील लोकांस मिळत आहे असें मानणें हीच पहिली चूक होय. उदाहरणार्थ, लष्करी शिक्षणच घ्या. युरोपियन सेनानायकांनीं केलेले हुकूम समजून घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यास जितकें लष्करी ज्ञान अवश्य लागतें, तेवढेंच हिंदुस्थानच्या लष्करांतील काळ्या शिपायांस व अंमलदारास देण्यांत येतें. हत्यारें तयार करण्याचे किंवा सर्व प्रकारच्या नवीन शस्त्रास्त्रांचा उपयोग कसा करावा हें शिकविण्याचे कारखाने किंवा शाळा राज्यकर्त्यांनीं या देशांत आजपर्यंत काढलेल्या नाहींत. अशा परिस्थितींत आमच्या देशांत शरिरानें व बुद्धीनें मनुष्य कितीहि समर्थ असला तरी तो कुरोकी किंवा ओयामा यांच्या योग्यतेस कसा चढणार ? परकीय राज्यकर्त्यांना स्वतंत्र देशांतील राज्यकर्त्यांप्रमाणें आपल्या प्रजेस लष्करी शिक्षण देतां येत नाहीं, असा याजवर कदाचित् कोणी आक्षेप घेतील ; करितां ही बाब सोडून दुसऱ्या बाबीचा विचार केला तरीहि अशीच शोचनीय स्थिति आढळून येते. रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, उद्योगधंदे किंवा नानाप्रकारच्या कला, या शिकण्याकरितां दरवर्षीं शेंकडों विद्यार्थी जपाननें ज्याप्रमाणें गेल्या तीस चाळीस वर्षांत परदेशांत पाठविले तसे कधीं हिंदुस्थान-सरकारानें केलें आहे काय ? नाहीं म्हणायला आतां कोठें दर एक इलाख्याला दोन स्कॉलरशिपा ठेविल्या आहेत. पण देशाचें खरें हित जर करावयाचें होतें तर ह्यापूर्वी शेंकडों हिंदी विद्यार्थी परदेशांत पाठवावयास नको होते काय ? हिंदुस्थानचें राज्य मूठभर युरोपियन अधिकाऱ्यांनीं हांकणें अशक्य असल्यामुळें त्यांच्या मदतीस लागणारे " सबॉर्डिनेट सर्व्हिस " मधील नोकरमंडळ तयार करण्या-पलीकडे हिंदुस्थानांतील लोकांस विद्यादान देण्यांत सरकारचा जास्त कांहीं इरादा नाहीं, हें बिशपसाहेबांसहि कबूल आहे; अशा स्थितींत आमच्या युनिव्हर्सिटींतून शोधक विद्वान गेल्या पन्नास वर्षांत बाहेर पडले नाहींत किंवा कितासाटोप्रमाणें प्लेगचे जंतु येथें कोणी शोधून काढले नाहींत, अथवा कुरोकीप्रमाणें कोणी शूर पुरुष येथें निपजला नाहीं, तर त्यांत नवल तें कोणतें ? घरामध्यें शोभेसाठीं किंवा चैनी-करितां कुंड्यांतून लावलेल्या झाडांमध्यें आणि मोठ्या बागेंत वाढणाऱ्या झाडामध्यें जें अंतर आहे तेंच हिंदी आणि जपानी विद्यार्थ्यांत दिसून येतें. स्वतंत्रतेचें वारें मिळून गगनचुंबी वाढलेला मंदार वृक्ष कोणीकडे आणि मेघदूतांत सांगित-

त्याप्रमाणें यक्षाच्या बायकोनें आपल्या रत्नवापीजवळ कौतुकानें लावलेला 'हस्तग्राह्यस्तवकनमित' बालमंदार कोणीकडे ! हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिटींतून किंवा इतर नोकरखान्यांतून जे विद्वान बाहेर पडतात ते या बालमंदारवृक्षासारखे होत. ते गोंडस राहावे, त्यांचीं फलें-पुष्पें युरोपियन अधिकारी वर्गास फार प्रयास न पडतां लीलेनें खुडतां यावीं, अशा बेतावातानेंच त्यांची वाढ होण्याबद्दल पहिल्यापासून खबरदारी घेण्यांत येते. परंतु मौज ही कीं, त्यांची अशा प्रकारची वाढ झाल्यावर फिरून " शूरोऽसि कृतविद्योऽसि दर्शनीयोऽसि पुत्रक। यस्मिन् कुले समुत्पन्नः गजस्तत्र न हन्यते ॥" म्हणून त्यांसच उलट दोष देण्यांत येतो. बिशपसाहेबांच्या कोटिक्रमांत जी मोठी चूक आहे ती हीच होय. हिंदुस्थानांतील राज्यकर्ते मग ते परकीय आहेत म्हणून म्हणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणांमुळें म्हणा– आम्हांस स्वतंत्र देशांतील लोकांस योग्य असें शिक्षण देत नाहींत, किंवा देऊं इच्छित नाहींत, हीच काय ती मुख्य गोम आहे. आणि ती झांकून ठेवून जातिभेद वगैरे सबबीवर लोकांस दूषणें देणें म्हणजे " चोराच्या उलटचा बोंबा" या न्यायानें आमच्या दुःखावर डाग देण्यासारखें आहे. बिशपसाहेबांस ही गोष्ट कळत नसेल असें नाहीं. परंतु करतात काय ? पाश्चिमात्य शिक्षणानें जपानाइतका हिंदुस्थान सुधारला नाहीं हें तर निर्विवाद आहे. अर्थात् त्याचा दोष कोणावर तरी लादला पाहिजे. राज्यकर्त्यांवर लादावा तर ते पडले आपल्या जातीचे, तेव्हां हिंदी लोकांवर दोषाची गोणी लादून बिशपसाहेब मोकळे झाले आहेत. पण आम्हीं त्यास सविनय असें कळवितों कीं, ह्या त्यांच्या हातचलाखीनें किंवा 'अशुभवर्तमानानें' फसून जाण्याइतकें मूर्ख आतां आम्ही राहिलों नाहीं. जपान चाळीस वर्षांत पुढें येऊन पाश्चिमात्य राष्ट्रांच्या पंक्तीस बसलें आणि आम्ही दर वर्षी अधिकाधिक हताश, हतवीर्य आणि परकीयांचीं ओझीं वहाणारे बनत चाललों, याचा योग्य खुलासा जर कोणास पाहिजे असेल तर तो ' स्वतंत्रता ' या एकाच शब्दानें होईल. स्वतंत्रता म्हणजे हिंदुस्थानांवरील हल्लींचें राज्य जाऊन दुसरें राज्य झालें पाहिजे असें नाहीं, तर हिंदुस्थान देश इतर वसाहतींप्रमाणें आपापलें काम पाहाण्यास समर्थ व मोकळा असला पाहिजे. तसें जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत अमृत म्हणून पाश्चिमात्य शिक्षणाची मदिराच आमच्या वांट्यास येणार, आणि तिनें आम्हांस गुंगी आल्यास त्याचा दोष जातिभेदाकडे न जातां हल्लींच्या राज्यव्यवस्थेच्या कपाळींच बसणार हें उघड आहे मग राज्यकर्त्यांच्या जातींतील मद्रासी बिशपासारखे लोक कांहींहि म्हणोत.

---

# ५. हे आमचे गुरूच नव्हेत ! क्रमांक १

[ १७ आक्टोबर १९०५ ]

स्वदेशी चळवळीसंबंधानें जे लेख आम्ही लिहित आहों ते या आठवड्यांत पुढें न चालवितां त्यांस एक आठवडा विश्रांती देऊन त्याच्या अनुषंगानें उद्भवलेल्या दुसऱ्या एका प्रश्नाचा आज आम्ही विचार करणार आहों. तो प्रश्न म्हणजे स्वदेशी चळवळींत पडणारे विद्यार्थी आणि त्यांचे सरकारी किंवा खासगी शाळांतील गुरु यांच्यामधील परस्परसंबंध हा होय. हा प्रश्न आज सुचण्याचें कारण डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल मि. सेल्बी यांनीं आपल्या एका जुन्या विद्यार्थ्याच्या विनंतीस मान देऊन त्यास पाठविलेलें पत्र होय. हें पत्र ' इंदुप्रकाशांत ' प्रसिद्ध झालें आहे; व त्याचा इतिहास असा आहे कीं, कोणी एकानें या विषयावरील इंदुप्रकाशाचा लेख आपले गुरु प्रि. सेल्बी यांचकडे पाठवून या गुरुमहाराजांस त्यासंबंधानें आपलें मत निवेदन करण्यास विनंति केली, आणि शिष्याची कामना तृप्त करण्याकरितां हे गुरुमहाराज पत्ररूपानें अवतीर्ण झाले. एवढेंच नव्हे, तर हें पत्र प्रसिद्ध करण्यासाठीं त्यांनीं शिष्यास परवानगीहि दिली. या शिष्याचें असें म्हणणें आहे कीं, गुरुमहाराजांचे हे विचार फार महत्त्वाचे आहेत; व म्हणून सर्वजण ते वाचतील अशी याला आशा आहे. आमचेंहि म्हणणें या शिष्याप्रमाणेंच आहे. भेद इतकाच कीं, विचार महत्त्वाचे असले तरी एकतर्फी आहेत असें आम्ही समजतों; आणि लोकांनीं सदर विचारांनीं फसून जाऊं नये म्हणन सदर विचारावरोबरच आमचीहि खालील टीका वाचण्याविषयीं त्यांस शिफारस करतों.

गुरु कोणाला म्हणावें, हा एक मोठा प्रश्न आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत एकदां असा काल होता कीं, चातुर्वर्ण्यातील तरुण पिढीला नीति, ज्ञान, विनय, शौर्य वगैरे गुणांनीं संपन्न करून राष्ट्राचें काम अव्याहत जारीनें सुरू ठेवण्याची ज्या लोकांवर जबाबदारी होती ते व्यावहारिक लोभापासून अलिप्त शांत, ज्ञानसंपन्न, जितेंद्रिय, निस्पृह आणि सत्त्वशील असत. अरण्यांत वास करणाऱ्या अशा गुरूंच्या आश्रमांत जे शिष्य कांहीं वर्षे काढीत, त्यांच्यामध्यें अशा प्रकारच्या गुरूंबद्दल किंवा आचार्यांबद्दल स्वभावतःच पूज्यबुद्धि उत्पन्न होत असे. स्वधर्माची शक्ति कशांत आहे, निरनिराळ्या वर्णांतील लोकांनीं कोणतीं कामें करून सामाजिक व्यवस्था दृढ राखली पाहिजे, धर्म कोणता, अधर्म कोणता, नीति कोणती, अनीति कोणती, राजाचे धर्म काय, प्रजेचे

धर्म काय, राजा उच्छृंखल झाला असतां प्रजेनें काय करावें, आणि प्रजा कर्तव्य-पराङ्मुख झाली तर राजानें काय करावें, वगैरे सर्व प्रकारच्या गोष्टींचा असल्या गुरूंच्या आश्रमांत शांतपणें, समबुद्धीनें, निर्लोभीपणानें आणि स्वतंत्र रीतीनें विचार होत असे. अर्थात् अशा प्रकारच्या गुरूंच्या आश्रमांतून किंवा युनिव्हर्सिटयांतून जी मंडळी बाहेर पडत असे तीहि तेजस्वी व आपल्या कर्तव्यास जागणारी निपजत असे; आणि त्यांची पूर्ण खात्री असे कीं, आपल्या गुरूंपुढें जर आपण एकादा प्रश्न मांडला तर त्याचें उत्तर राजापासून रंकापर्यंत कोणाचीहि भीड न धरतां गुरुजी निस्पृहपणें सांगतील. पुराणांतून अशा पुष्कळ गोष्टी आहेत कीं, मोठमोठे राजेहि विकट प्रसंगीं आपल्या गुरूंकडे जाऊन आपल्या शंकेचें निवारण करून घेत किंवा कठिण समयीं कोणता उपाय योजावा, हें सदर गुरूंपासून त्यांस प्रसन्न करून समजून घेत. आमच्या धर्मशास्त्रांत पित्यापेक्षां गुरूस अधिक मान द्यावा असें जें सांगितलें आहे तें विधान वर सांगितल्याप्रमाणें जे गुरु ज्ञानसंपन्न, निस्पृह व निर्मल अंतःकरणाचे असत त्यांच्या संबंधाचें होय. ज्ञानासारखी जगांत दुसरी कोणतीहि पवित्र, वस्तु नाहीं; पण स्वार्थासाठीं किंवा पोटासाठीं ज्ञानाच्या पुंजीचा विक्रम करण्यास जेव्हां एखादा मनुष्य तयार होतो तेव्हां त्याच्या ज्ञानास शुद्ध व पवित्र ज्ञानाची किंमत देणें म्हणजे हिमालयांतून गोमुखाच्या द्वारें बाहेर पडणाऱ्या गंगोदकाची गटारांतील पाण्याशीं तुलना करणें होय! त्यांतून देशामध्यें जेव्हां परकीय लोकांचें राज्य असतें आणि सदर परकी राजे विद्यापीठें आपल्या ताब्यांत घेऊन सदर पीठांचा देशांतील प्रजेस दास्यत्वांत ठेवणाऱ्या राजकीय धोरणाकडे उपयोग करून घेतात, तेव्हां हीं विद्यापीठें जवळ जवळ दारूच्या पिठ्यासारखींच होत असतात हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका वगैरेसारख्या स्वतंत्र देशांतील विद्यापीठें आणि हिंदुस्थानांतील विद्यापीठें यांत जें अंतर आहे तें हेंच होय. देशांमध्यें जेव्हां कोणतीहि सार्वजनिक चळवळ उत्पन्न होते देशांमध्यें जेव्हां कोणतीही सार्वजनिक चळवळ उत्पन्न होते तेव्हां स्वतंत्र देशांतील युनिव्हर्सिटयांत असलेले विद्यागुरु प्रचलित विषयांवर आपलीं मतें उघडपणें प्रसिद्ध करतात आणि त्यांस जी बाजू राष्ट्राच्या हिताची दिसेल तीच विद्यार्थ्यांच्या मनांत ठसवून तदनुसार वर्तन करण्याकडेहि त्यांची प्रवृत्ति करतात. रशियांतील लोक ज्या हक्कांकरितां आजमितीस बादशहाशीं भांडत आहेत त्या चळवळींत युनिव्हर्सिटीचे कितीतरी विद्यार्थी आणि प्रोफेसर पडलेले आहेत. तरुण पिढीस राष्ट्रहिताच्या गोष्टी समजावून सांगणें आणि तरुणपणापासूनच तदनुकूल आचरण करण्याची त्यांच्या मनाची प्रवृत्ति करणें

हेंच खऱ्या विद्यागुरूचें कर्तव्य होय. राजाचा नोकर म्हणून- परकीय राजाचा नोकर म्हणून- लोभानें बांधला गेलेला अथवा त्या लोभाचा अनेक वर्षें मनावर परिणाम होऊन विचार व मन संकुचित झालेला शिक्षक खरा विद्यागुरूहि नव्हे, व हिंदुधर्मशास्त्रांत गुरूला जो मान द्यावा म्हणून सांगितलें आहे त्यासहि तो पात्र होत नाहीं. प्रोफेसर सेल्बी यांनीं आपल्या लेखांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, 'सरकारी कॉलेजांतील प्रिन्सिपालास बोलतांना कोणती मर्यादा पाळली पाहिजे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.' या वाक्याचा अर्थ प्रि. सेल्बी यांच्यापेक्षां आम्ही चांगला समजतों, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आमच्या देशांत सरकारानें जीं कॉलेजें व युनिव्हर्सिटया काढल्या आहेत त्यांत सरस्वतीदेवीस राजसत्तेची दासी बनविली आहे ! आणि लॉर्ड कर्झन साहेबांनीं तर हें दास्यत्व चिरकाल कायम ठेवण्याचा बंदोबस्त केला आहे ! पाश्चात्य देशांत ज्या युनिव्हर्सिटया किंवा कॉलेजें आहेत तेथें राष्ट्रीय विषयांची जशी चर्चा होते अथवा राष्ट्रास हिताच्या गोष्टी कोणत्या आणि अहिताच्या गोष्टी कोणत्या यांचा जसा निर्णय होतो तसा इंग्रज सरकारनें या देशांत काढलेल्या कॉलेजांतून किंवा युनिव्हर्सिटयांतून होणें अशक्य आहे. आमच्या युनिव्हर्सिटया व कॉलेजें म्हणजे सरकारच्या ताटाखालचीं मांजरें होत. किंबहुना प्रजेनें कोणत्या स्थितींत राहावें याबद्दल सरकारचे जे विचार असतील तेवढेंच विद्यार्थ्यांच्या मनांत बिंबावें, यापेक्षां जास्त उदात्त विचारांचा त्यांच्या मनास विटाळ लागूं नये अशा प्रकारची खबरदारी सरकारी शाळांतून, कॉलेजांतून किंवा युनिव्हर्सिटयांतून घेतली जावी, याबद्दल सरकारचा कटाक्ष आहे; लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींत या कटाक्षाचा अगदीं कळस झाला आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, हिंदी विद्यार्थ्यांस राष्ट्रीय हिताची किंवा उन्नतीचीं तत्त्वें शिकविण्यास सरकारी शाळा व कॉलेजें अत्यंत निरुपयोगी, किंबहुना एक प्रकारें विघातक झालीं आहेत. अव्वल इंग्रजींत उदात्त विचारांचे कांहीं इंग्रजी प्रोफेसर इकडे आले होते; पण ते दिवस आतां राहिले नाहींत. हल्लींची मंडळी पूर्वींच्या प्रोफेसरांइतकी कदाचित् विद्वान् असतील, पण आपल्या विद्यार्थ्यांस त्यांच्या विद्वत्तेप्रमाणें व हिमतीप्रमाणें राज्यकारभारांत भाग मिळाला पाहिजे अशा प्रकारें उघड मत देण्यास किंवा सरकारास लिहिण्यास या अलिकडच्या प्रोफेसरांची छाती नाहीं; मग ते सेल्बी असोत, म्याकमिलन असोत किंवा जाइल्स असोत ! हिंदुस्थानसरकारनें ठरविलेलें धोरण–सिमलापरिषदेंत ठरलेले नियम– अमलांत आणण्याकरितां सरकारनें नेमलेले हे गोरे अधिकारी आहेत. सरकारचे नोकर किंवा दास होण्यास जितकी हुषारी लागते तितकी विद्यार्थ्यांच्या अंगीं यांनीं आणिली म्हणजे यांचें काम झालें; इतकेंच नव्हे तर, यापलीकडे जास्त उदात्त

किंवा राष्ट्रीय विचार विद्यार्थ्यांच्या मनांत रुजूं न देण्याची यांनीं तजवीज केली पाहिजे अशी सरकारची इच्छा आहे. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांचे राजकीय किंवा राष्ट्रीय विचार किती मर्यादित राहावे हें त्यांस शिकविण्याकरितांच लिवार्नरचें बुक निघालें आहे ! आणि हायस्कूलचे किंवा कॉलेजचे प्रिन्सिपॉल कोणी असले तरी विद्यार्थ्यांच्या मतांस लिवार्नरच्या विचारांचाच आळा पडेल अशी त्यांस तजवीज ठेवावी लागते. हायस्कूलचे किंवा कॉलेजचे मुख्य अधिकारी गोरे लोकच असावे असा जो सरकारचा कटाक्ष आहे त्याचाहि हेतु हाच होय. सारांश, स्वतंत्र देशांतील कॉलेजें आणि युनिव्हर्सिटया, व परकीय अमलाखालीं असलेल्या राष्ट्रांत परकीय सरकारनें चालविलेलीं कॉलेजें आणि युनिव्हर्सिटया यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. स्वतंत्र देशांत या शिक्षणाच्या संस्था राष्ट्रीय विचाराचीं आदिस्थानें होऊन राष्ट्रहितास पोषक होतात; परंतु परकीय अमलाखालीं याच संस्था राष्ट्रास कायमच्या दास्यत्वांत लोटण्यास किंवा राष्ट्रांतील पुढारी लोकांचे विचार कमकुवत करून पंचतंत्रांत म्हटल्याप्रमाणें त्यांस ‘ प्रज्ञाहत ’ करण्यास म्हणजे विचारानें आणि बुद्धीनें नेभळे करण्यास उपयोगी पडतात. हिंदुस्थानांतील आमचीं कालेजें म्हटलीं म्हणजे मनास व बुद्धीस उदात्त स्वरूप देऊन उत्साह आणणाऱ्या संस्था नव्हत; आमचे विचार कोते करण्याकरितां, आमच्या मनाची व बुद्धीची वाढ परकीय राज्यकर्त्यांस जितकी पाहिजे तितकीच ठेवण्याकरितां हीं परकीय राज्यकर्त्यांनीं उत्पन्न केलेलीं मारक यंत्रें होत. या यंत्रांच्या रगडयांतून बाहेर पडलेल्या लोकांतहि कधीं कधीं स्वतंत्र विचाराचे व उत्साहाचे अंकुर दृष्टीस पडतात; पण हा अपवाद होय. जात्यांत जोंधळे घातले असतां पिठांमध्यें एकादा सबंध जोंधळा सांपडतो, तशांतला हा प्रकार आहे ! व हा परिणाम राज्यकर्त्यांस जरी अनिष्ट असला तरी अपरिहार्य म्हणून तो त्यांस सोसावा लागतो. लॉर्ड कर्झन यांची हुषारी काय ती हीच कीं, हा अपरिहार्य परिणाम जितका कमी होईल तितका करण्याची त्यांनीं तजवीज करून ठेविली.

असो; इतकी प्रस्तावना करण्याचें कारण एवढेंच कीं, हल्लींच्या कॉलेजांचें, शाळांचें स्वरूप वाचकांच्या लक्षांत यावें. तरुण पिढीस खऱ्या राष्ट्रीय विचारांचें जर वळण लावावयाचें असेल तर तें वळण सरकारी कॉलेजांतील शिक्षकांकडून कधींहि मिळावयाचें नाहीं, हें आम्ही नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. सेल्बी घ्या कीं वेन घ्या, किंवा त्यांचा भाऊ दुसरा कोणी स्टोन घ्या, हे सर्व विद्वान् ( त्यांची विद्वत्ता आम्हांस कबूल आहे) हिंदुस्थानचें हित करण्याकरितां येथें आलेले नाहींत. हिंदुस्थानावर ज्या परकीय लोकांचा अंमल आहे त्यांच्या जातीचे हे असून या

राज्यकर्त्यांचें राजकीय धोरण शिक्षणाच्या द्वारें नवीन पिढीच्या मनांत विवविण्याकरितां यांचा अवतार आहे ! शेक्सपीयरचीं नाटकें किंवा बेकनचे ग्रंथ शिकविण्यास किंवा त्यांच्यावर नोटस् लिहून तीं पुस्तकें विद्यार्थ्यांकरितां प्रसिद्ध करण्यास हे लायक आहेत; व तेवढ्यापुरती त्यांची योग्यता ओळखूनच आम्ही फीच्या रूपानें सरकारास त्याचा मोबदला देत असतों. पण अशी जर कोणी इच्छा करील किंवा उमेद बाळगील कीं, सरकारी कॉलेजांतील हे प्रोफेसर हिंदुस्थानाच्या वाढीचीं, उत्कर्षाचीं किंवा हिताचीं तत्त्वें आपल्या शिष्यवर्गांच्या मनांत निर्भिडपणें व समबुद्धीनें भरवून देतील तर ती मोठी चूक होईल. मिल्टन, शेक्सपीयर किंवा बेकन शिकविणारे हे गुरु आहेत खरे; पण राष्ट्राच्या वाढीचीं तत्त्वें अथवा राष्ट्रीय चळवळीचें बीज जर आमच्या तरुण पिढीस शिकावयाचें असेल तर तें या सरकारी कॉलेजांतील गुरूंपासून मिळावयाचें नाहीं. तें सुरेंद्रनाथ बानर्जीसारख्या राष्ट्रभक्तांकडूनच शिकलें पाहिजे. त्यास सेल्बी उपयोगी नाहीं, कलेक्टर साहेब चालावयाचे नाहींत, किंवा टाइम्स ऑफ इंडिया वर्तमानपत्राचे कर्तेहि कामाचे नाहींत. प्रि. सेल्बी यांनीं आपल्या पत्रांत असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानांतील राजकीय चळवळ म्हणजे ती बहुतेक इंग्रजसरकारच्या विरुद्ध असावयाचीच. प्रो. सेल्बी यांचें हें विधान बरोबर आहे. पण यापासून निघणारें अनुमान मात्र त्यांच्या गुरुत्वाचा अधिकार कमी करतें. राजकीय चळवळ म्हणजे सरकारच्या विरुद्ध असलेली चळवळ आणि कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणजे त्या सरकारचे नोकर, या दोन्ही गोष्टी उभयपक्षांस मान्य आहेत. प्रश्न काय तो एवढाच कीं, गुरु म्हणून सरकारी नोकराकडे राजकीय प्रश्नासंबंधानें मत विचारण्यास जाणारे आम्ही मूर्ख अथवा असल्या बाबतींत मत देण्याचें धाष्टर्य करणारे पोटभरू गुरु मूर्ख ? हा प्रश्न लक्षांत ठेवूनच या लेखास "हे आमचे गुरूच नव्हेत" हा मथळा आम्हीं घातला आहे. शिष्य ज्या राष्ट्राचा अवयव आहे तें राष्ट्र सुधारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीनें वाढावें आणि त्याकरितां या शिष्यानें उद्योग करावा; आणि अशा प्रकारचा तो उद्योग करील अशी आपल्या शिक्षणानें त्याच्या मनांत हिंमत यावी अशी या गुरूची इच्छा आहे काय ? नाहीं. मग यांचा भ्रामक कोटिक्रम आम्हीं काय म्हणून ऐकावा ? अथवा अशा प्रकारचा भ्रामक उपदेश आम्हांस करण्याचा यांना अधिकार तरी कोणता ? शेक्सपीयरच्या अथवा बेकनच्या ग्रंथांतील एखादी शंका यास विचारावयाची असेल तर विचारा; पण राष्ट्रभक्ति, राष्ट्रहित, राजकीय चळवळ, राजकीय उन्नतीचे प्रयत्न वगैरे बाबतींत यांचें मत घेणें म्हणजे उंदरांनीं बोक्याचें मत घेण्यासारखेंच आहे ! तें आमच्या उपयोगीं नाहीं; व तें आमच्या कधींहि हिताचें व्हावयाचें नाहीं. प्राचीन

कालीं आर्यभूमींत जो गुरूला मान मिळत असे त्या मानास पात्र होणारा गुरु निराळा आणि पैशाकरितां सरकारच्या धोरणानें शेक्सपीयर शिकविणारा हल्लींचा गुरु निराळा. सेल्बीसाहेब म्हणतात कीं, स्वदेशी चळवळ देशास हितकारक आहे; पण विद्यार्थ्यांनीं चळवळींत पडूं नये. ठीक आहे; चळवळींत पडूं नये तर नये. पण सेल्बीसाहेबांनीं स्वतः देशी कपडे वापरून (कारण ते आमच्या देशाचें अन्न खात आहेत) किंवा विद्यार्थ्यांस देशी कपडे कॉलेजांत वापरण्यास सांगून या चळवळीबद्दल सहानुभूति कधीं व्यक्त केली आहे काय ? काय म्हणे कीं, कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं चळवळींत पडू नये. चेंबर्लेनच्या चळवळींत ऑक्सफर्ड केंब्रीजमधील विद्यार्थी पडले नाहींत काय ? आमचें विद्याखातें जर स्वतंत्र असतें, व निसर्गतःच या देशाचे हितचिंतक विद्वान प्रोफेसर त्यांत असते तर ते सुरेंद्रनाथ बानर्जीप्रमाणें स्वदेशी चळवळीवर व्याख्यानें देण्यास गांवोगांव फिरले असते. पण परकीय राज्यसत्तेखालीं आमच्या कॉलेजांतील प्रोफेसरांचीच इतकी दुर्दशा झाली आहे असें नव्हे तर, विद्यार्थ्यांचीहि त्याचप्रमाणें दुर्दशा करण्यास ते प्रवृत्त झाले आहेत; आणि त्यांतल्या त्यांत विशेष शरमेची गोष्ट ही आहे कीं, ज्यांनीं उदात्त राष्ट्रीय शिक्षण लोकांस स्वस्त देण्याकरितां स्वार्थाचा त्याग करून खासगी कॉलेजें काढलीं तेहि कालगतीनें हाच अंधपरंपरेचा मार्ग स्वीकारून सरकारच्या तंत्रानें वागण्यास सिद्ध झाले आहेत व स्वदेशी चळवळीपासून पराङ्मुख होत आहेत. विद्यार्थ्यांनीं सार्वजनिक चळवळींत पडूं नये अशा सबबीवर स्वदेशी मालाच्या चळवळीपासूनहि त्यांस अलिप्त राखण्याचा जे प्रयत्न करतात त्यांस गुरु म्हणावें कीं पोटभरू म्हणावें याचा वाचकांनींच निकाल करावा. लॉर्ड कर्झनसारख्या मुत्सद्यानें विद्याखात्याची अशी दुर्दशा करून ठेवावी कीं, गुरुशिष्यांचा प्राचीन काळीं हिंदुस्थानांत जो संबंध होता त्या संबंधाचा फायदा घेऊन सरकारी कॉलेजांतील प्रोफेसरांनीं आपल्या शिष्यवर्गाची बुद्धि संकुचित करण्यास झटावें, हें प्रस्तुतच्या राजकीय धोरणास उचितच होय. पण लोकांच्या दृष्टीनें पाहिलें तर राज्यकर्त्यांनीं किंवा त्यांच्या सबंध किंवा अर्ध्या नोकरींत असलेल्या नोकरांनीं अशा रीतीनें प्राचीन पवित्र गुरुशिष्य-संबंधाचा दुरुपयोग करून घेणें हें महापातक होय. हे आमचे गुरु नव्हेत. ए. बी. सी. शिकविण्याकरितां, इंग्रजी भाषा शिकविण्याकरितां, ऑफिसांत खर्डेघाशी आम्हांस शिकविण्याकरतां हे सरकारानें नेमलेले, नोकर होत. यांना जुन्या धर्मशास्त्रांत सांगितलेल्या गुरूंप्रमाणें मान देणें म्हणजे नवसास पावणाऱ्या म्हसोबास परब्रह्मपदास चढविणें होय ! फी करितां, सरकारी पगाराकरितां, आम्हांस इंग्रजी भाषा बोलण्याची व लिहिण्याची कला शिकविणारे हे भाडोत्री कामगार आहेत. मि. सेल्बी यांनीं आपल्या पत्रांतच शेवटीं भीत

भीत असें म्हटलें आहे कीं, गुरुशिष्यांमधील उदात्त संबंध हल्लींच्या सरकारी कॉलेजांतील प्रोफेसर व त्यांचे शिष्य यांमध्यें जर राहिला नाहीं तर सरकारी कॉलेजांतील प्रोफेसर किंवा विद्यागुरु हे 'टास्क मास्तर' किंवा शिष्यांकडून काम घेणारे भाडोत्री अंमलदार बनतील. आम्ही सेल्बीसाहेबांना असें कळवितों कीं, ही त्यांची भीति बरोबर आहे. शिष्याचें राष्ट्रहित जो पाहत नाहीं तो त्याचा गुरु नव्हे असें आम्ही साफ विधान करतो; आणि अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे सरकारी कॉलेजांतील किंबहुना खाजगी कॉलेजांतीलहि प्रोफेसर आणि प्रिन्सिपॉल नवीन पिढीस राष्ट्रीय वळण लावण्याच्या कामीं गुरु होणें शक्य नाहीं; हल्लींच्या स्थितींत उपयोगी नाहींत; अर्थात् यांच्यावर या बाबतींत अवलंबून असणें चुकीचें व नुकसानीचें होईल असें आम्हीं सर्वांस कळवितों. अशा पोटभरू गुरूंचा व शिष्यांचा काय संबंध असावा, या गुरूंस किती मान द्यावा आणि त्यांची आज्ञा किती मानावी, अथवा त्यांनीं आपला अंमल शिष्यांवर किती चालवावा किंवा शिष्यांनीं त्यांचा अंमल किती चालवूं द्यावा हे यास लागूनच दुसरे प्रश्न आहेत. पण स्थलसंकोचास्तव यांच लेखांत त्याचा आज विचार करतां येत नाहीं.

## हे आमचे गुरूच नव्हेत! क्रमांक २

[ २४ ऑक्टो. १९०५ ]

आचार्या वै कारुणिकाः प्राज्ञाश्चोपायदर्शिनः ।
नैते महाभये प्राप्ते संप्रष्टव्या कथंचन ।।
पंडितान् पृष्ठतः कृत्वा परेषां गुणवादिनः ।
विधीयतां तथा नीतिर्यथा वध्येत वै परः ।।

महाभारत.

सरकारानें काढलेल्या कॉलेजांत सरकारी नोकर म्हणून येथील विद्यार्थ्यांस शिकविण्याकरितां आलेल्या युरोपियन प्रोफेसरांस किंवा प्रिन्सिपालास त्यांच्या हाताखालीं शिकणाऱ्या आमच्या तरुण पिढींतील लोकांनीं कशाप्रकारें गुरु समजावें याचें विवेचन गेल्या अंकीं केलेंच आहे. न्याय करणारे न्यायाधीश आणि विद्या शिकविणारे विद्यागुरु, हे ज्या देशांत राजसत्ताधिकाऱ्यांच्या तंत्रानें वागणारे असतात तेथें खरा न्याय किंवा खरी विद्या मिळणें दुर्घट होय, अशी आमची पक्की समजूत आहे. सरस्वती देवीचा महिमा किंवा रमणीयत्व कोठपर्यंत तर राजश्री-देवीच्या ती तडाख्यांत सांपडली नाहीं तोंपर्यंत. जिंकलेल्या लोकांना जेते

लोक अथवा त्यांनीं नेमलेले शिक्षक राष्ट्रधर्माचीं खरीं तत्त्वें सांगतील, ही गोष्ट मनुष्यस्वभावाच्याच विरुद्ध आहे; आणि ही गोष्ट लक्षात आणूनच सरकारी कॉलेजांतील प्रिन्सिपालास किंवा प्रोफेसरांस आम्ही राष्ट्रीय बाबतींत काय विचारावें आणि काय विचारूं नये याचा निर्णय केला पाहिजे. स्वतंत्र देशांतले स्वतंत्र गुरू आणि परकीय अमलाखालीं परकीय राज्यकर्त्यांनी जिंकलेल्या लोकांस मेहरबानीनें शिक्षण देण्याकरितां नेमलेले परकी गुरु, यांत जमीन-अस्मानाची तफावत आहे. विद्यार्थ्यांच्या मनांत राष्ट्रीय तत्त्वांची अभिवृद्धी करून विद्यार्थ्यांचें शील राष्ट्रीय बनविण्यास हे परकी गुरु निरुपयोगी होत; हें काम त्यांच्या हातून होणारें नव्हे, होत नाहीं आणि झालेंहि नाहीं; मग ते कितीहि विद्वान् असोत वा संभावित असोत. जपानच्या लोकांनीं विद्या शिकण्याकरितां परदेशांतील गुरु आणून त्यांच्यापासून विद्या शिकल्यावर त्यांस स्वदेशास रवाना केलें यांतील बीज हेंच होय. टोगो, इटो, वगैरे ज्या शूर पुरुषांनीं जपान वर आणलें ते विद्या शिकण्यारितां परदेशांत परगुरूंजवळ गेलेले होते. पण जपानबद्दलची भक्ति त्यांच्या अंगचीच असून त्यांच्याच देशांतील मुत्सद्यांनीं अनेक उपायांनीं तिची अभिवृद्धि केलेली होती. सारांश, शुक्राचार्य हे ज्याप्रमाणें कचास विशिष्ट विद्या शिकविण्यापुरते गुरु झाले तद्वतच बेकन, शेक्सपीयर शिकविण्याकरितां सेल्बी आदिकरून आमचे गुरू होत. पण हिंदुस्थानी राष्ट्रासंबंधानें आबालवृद्ध हिंदी लोकांनीं कसें वागावें, असा जेव्हां प्रश्न येतो तेव्हां कचाप्रमाणें आमचेहि गुरु निराळे असणें अगदीं स्वाभाविक आहे. हिरण्यकश्यपूनें आपला मुलगा प्रल्हाद यास आपल्या मताप्रमाणें शिक्षण देण्याकरितां अनेक गुरु नेमले होते. पण प्रल्हादाची भक्ति एका विष्णूवर असल्यामुळें त्यानें "वळी ( ओळी ) पोथ्यांच्या या तुम्हि असुररीती शिकवितां । शिकवितां व्यर्थ काव्यें अलवण हरीवीण कविता ॥" असा आपल्या गुरूस साफ जबाब दिला, आणि

**हे तों गुरू पापतरू म्हणावे । अंधाहुनी अंध असे गणावे ॥**
**दे प्रीति कृष्णीं गुरु तोच साच । श्रुत्यर्थ इत्यर्थ असे असाच ॥**

—असें म्हणूं लागला, असें वामन पंडितांनीं वर्णन केलें आहे. प्रल्हादास कृष्णभक्ति शिकविण्याच्या कामीं, हिरण्यकश्यपूनें नेमलेले गुरू जितके निरुपयोगी ठरले, तितकेच आमच्या नवीन पिढीस राष्ट्रभक्ति शिकविण्याच्या कामीं सरकारी कॉलेजांत सरकारानें नेमलेले गुरु अयोग्य होत. परकीय लोकांच्या हातानें मिळणाऱ्या शिक्षणांत व स्वकीयांच्या हातानें मिळणाऱ्या शिक्षणांत जो फरक असतो तो हाच होय. इंग्रजांनीं पाश्चिमात्य शिक्षण या देशांत सुरू करून आम्हांस ज्ञानी बनविण्याची जी तजवीज केली ती प्रथमतः कोण-

त्याहि हेतूनें केली असली तरी या ज्ञानानें विद्यार्थ्यांच्या मनांत राष्ट्रीयत्वाची जी कल्पना येणार, ती दुबळी ठेवण्याबद्दल पहिल्यापासूनच त्यांचा प्रयत्न आहे; आणि तो प्रयत्न नीट सफल झाला नाहीं असें जेव्हां लॉर्ड कर्झन यांच्या लक्षांत आलें तेव्हां या शिक्षणाच्या गळ्याभोंवतालची दोरी अधिक घट्ट करण्याचें श्रेय त्यांनीं संपादिलें. या कर्झननीतींतच ठिकठिकाणच्या विद्याखात्यांचे डायरेक्टर सध्यां प्रवीण झालेले आहेत आणि त्यांच्याच हाताखालीं प्रि. सेल्वीसारखे गुरु काम करीत आहेत. अशा गुरूंनीं सार्वजनिक किंवा राष्ट्रीय चळवळींत विद्यार्थ्यांनीं पडूं नये, त्यामुळें शाळेची शिस्त बिघडते अथवा गुरूचा मान रहात नाहीं, असा कोटिक्रम पुढें आणल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. हे गुरु या बाबतींतील आमचे कर्तव्य आम्हांस शिकविण्यास हिंदुस्थानांत आलेले नाहींत; त्यांचें तें कामहि नव्हे. जपानी लोकांचा अनुभवहि असाच आहे. जपानी राष्ट्रानें आपलें डोकें वर कसें काढावें याबद्दल स्वदेशाची किंवा स्वजातीयांची पर्वा न ठेवतां जपानास निस्पृह रीतीनें सल्ला देणारा असा गुरु एकच हर्बर्ट स्पेन्सरसाहेब निघाला आणि त्यानेंहि त्या उपदेशाबरोबरच असें सांगितलें आहे कीं, माझें हें उपदेशाचें पत्र मी मरेपर्यंत तुम्ही प्रसिद्ध करूं नका ! सारांश, धर्मराजास ज्याप्रमाणें शेवटीं 'नरो वा कुंजरो वा' एवढा तरी डाग लागला तसा स्पेन्सरसारख्या महाविद्वान्, शोधक आणि समबुद्धीच्या उदार महात्म्याचीहि जपानास निस्पृहपणें उपदेश देण्याच्या कामीं बुद्धी केसभर कचरलीच कचरली. कोठें स्पेन्सर आणि कोठें सेल्वी ! स्पेन्सरानें आपलें मत जिवंतपणीं प्रसिद्ध करूं नये अशी जरी शर्त केली होती तरी त्यानें आपलें मत खणखणीत आणि निरपेक्ष बुद्धीनें दिलेलें होतें. सेल्वी आदिकरून सरकारी कॉलेजांतील गुरु यांच्या अंगीं हीहि योग्यता नाहीं. हिंदुस्थानचे लॉर्ड कर्झनसारखे अधिपति ज्या वेळीं जसें सांगणार किंवा ठरविणार तसें हे सरकारी कॉलेजांतील प्रोफेसर नाचणार ! पुन्हां आम्ही सांगतों कीं, यांची विद्वत्ता अगर संभावितपणा यांबद्दल आम्ही कांहीं बोलत नाहीं. आमचा आक्षेप एवढाच आहे कीं, राष्ट्रीय चळवळींत नवीन पिढीनें किती पडावें हें विद्यार्थ्यांस शिकविण्यास असले गुरु निरुपयोगी आहेत, आणि कृष्णभक्तीस लागलेल्या प्रल्हादानें ज्याप्रमाणें आपल्या बापानें नेमलेल्या गुरूचा उपदेश सदर कामापुरता झुगारून दिला; तसाच राष्ट्रीय चळवळीच्या कामीं सरकारी कॉलेजांतील गुरूंनीं केलेला उपदेश क्षणभर आम्ही बाजूला ठेवला पाहिजे. नाहींपेक्षां हिंदुलोकांनीं दास्यत्वांत जन्मावें आणि दास्यत्वांतच मरावें, अशी स्थिति येणार आहे. मनूनें बायकांबद्दल लिहितांना एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "**पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने। पुत्रास्तु स्थाविरे भावे न**

स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।। " म्हणजे स्त्रियांनीं लहानपणीं पित्याच्या, तरुणपणीं पतीच्या आणि म्हातारपणीं पुत्राच्या शिक्षेंत राहून आयुष्य काढावें, त्यांस स्वातंत्र्य कधींहि नाहीं. लॉर्ड कर्झन व प्रि. सेल्वी हे जी आम्हास कदर लावून देत आहेत ती अशाच प्रकारची आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांनीं विद्यार्थी म्हणून राजकीय चळवळींत पडू नये; मोठयांनीं राजाचे नोकर म्हणून पडूं नये आणि म्हाताऱ्यांनीं पेन्शनर म्हणून पडूं नये; एतावता जन्मल्यापासून मरेपर्यंत चुकून एखादा मनुष्य गेल्यास जावा; बाकी सगळे,

बाल्ये राजगुरुर्यंता यौवने भृतिदो नृपः ।
तथा पेन्शनदाता च न हिंदुः प्रभुरात्मनः ।।

या राजनीतीच्या तत्त्वांत चिरडून जाऊन जन्मल्यापासून मरेपर्यंत एकसारखें दास्यत्वांत मुरले जावे, आणि एक पिढी अशी मुरली म्हणजे तिचे आनुवंशिक संस्कार दुसऱ्या पिढीस मिळून अशा रीतीनें राष्ट्रभक्तिशून्य पुरुषांची सरकारी नोकरी-करितां परंपरा तयार व्हावी ! शाळेंतील विद्यार्थ्यांस सरकारी नोकरी धरण्यास कोणी सक्ती करीत नाहीं ही गोष्ट खरी आहे; पण शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यां-पैकीं शेंकडा नव्वदांहून अधिक विद्यार्थी सरकारी नोकरी धरतात, ही गोष्ट आपण नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे शाळेंत असतां राजकीय चळवळींत पडू नये म्हणून कॉलेजांतील प्रिन्सिपॉल व प्रोफेसर विद्यार्थ्यांच्यामागें लागणार, तरुणपणीं सरकारचे अधिकारी त्यांस कह्यांत ठेवणार आणि बहुतेक निरुपयोगी झाले तरीहि पण वृद्धापकाळीं पेन्शन देणारांची त्यांजवर नजर राहणार. सारांश, एखादा मनुष्य जन्मल्यापासून मरेपर्यंत देवाचें स्मरण न करतां जसा मरावा तद्वत् आमच्या देशांतील सुशिक्षितवर्ग ( ? ) जन्मापासून अखेरपर्यंत राजकीय चळवळीचा विटाळ न होतां पिढयान् पिढया मरत जाणार, अशी इंग्रज सरकारची योजना आहे. ही गोष्ट अद्याप आमच्यांतील पुढारी लोकांनीं ओळखली नाहीं हें आमचे दुर्दैव होय. स्पेन्सरसारखा गुरु यांच्यांतून निघणें शक्यच नाहीं. पण पंडित श्यामजी कृष्णवर्मा यांनीं म्हटल्याप्रमाणें ह्यूम, कॉटन सारखे दुय्यम प्रतीचे लोक देखील सरकारी कॉलेजांतील प्रिन्सिपालांत किंवा प्रोफेसरांत आढळून येत नाहींत व म्हणूनच हे आमचे गुरु नव्हेत. महाभारतांत म्हटल्याप्रमाणें यास बाजूस सारूनच आपल्या राष्ट्राची उन्नति कशी होईल व त्यास आपण काय केलें पाहिजे, याचा आपण विचार केला पाहिजे. आम्ही जें हें विधान करतों तें प्रि. सेल्वी यांस विनाकारण दूषण देण्याकरितां नव्हे; त्यांची योग्यता आम्हास माहीत असून ती मान्य आहे; परंतु ज्यावेळीं राजकीय चळवळींत विद्यार्थ्यांनीं पडावें किंवा नाहीं, असा प्रश्न निघतो

तेव्हां त्या कामीं उपदेश करण्यास हे गुरु योग्य नाहींत, त्याकरितां दुसरेच गुरु पाहिजेत, असें वरील कारणाकरितां आम्ही स्पष्टपणें विधान करतों. आम्ही आपला मुलगा जर धोब्याचा धंदा शिकण्यास धोब्याकडे पाठविला तर धोब्याच्या कामांत गुरु म्हणून या गुरूचें मत वेदांताच्या चर्चेत घेत जा, असें ज्याप्रमाणें आम्ही आपल्या मुलांस सांगणार नाहीं तद्वत्च हल्लींचा प्रकार आहे. आणि प्रि. सेल्बी हे आमचे कितीहि जरी हितचिंतक असले तरी प्रस्तुत प्रकरणीं इंग्रज म्हणून, इंग्रजसरकारचे नोकर म्हणून, इंग्रजी राज्यकर्त्यांचे स्वजातीय म्हणून, या कामीं आम्हांस उपदेश करण्यास ते अपात्र आहेत. हा त्यांच्या अंगचा दोष वस्तुपरिस्थितीप्रमाणें त्यांच्यामध्यें सहज उत्पन्न झाला आहे; हा त्यांच्या कृतीचा नव्हे हें आम्ही जाणून आहों. पण करणार काय ? 'प्रमाणयति नो धर्मे कट्टिर्नीमुपदेशिनीम्' अशी त्यांची स्थिति झाली आहे त्यास इलाज नाहीं. हा प्रश्न अधिकाराचा, जातीचा, स्वार्थाचा, व मनोधर्माचा आहे; विद्येचा, वाचनाचा अगर बुद्धीचा नव्हे.

सरकारी शाळांतील गुरूच अशा प्रकारें उपदेश करण्यास नालायक झाले आहेत असें नाहीं, तर शिक्षणाच्या प्रसारार्थ ज्यांनीं स्वार्थत्याग केला त्यांचीहि नव्या ग्रँटस्-इन्-एड रूलप्रमाणें हीच स्थिति झाली आहे. बाल्य, यौवन, आणि वार्धक्य या तीन्ही स्थितींत दास्यत्वाचें दुट्टें एकसारखें सरकारी शाळामार्फतच लावून लॉर्ड कर्झन स्वस्थ बसले नाहींत; तर रिपनसाहेबांनीं खाजगी शाळांच्या प्रवर्तकांस जी कांहीं थोडी मोकळीक ठेविली होती तीहि या राजश्रीनें आपल्या कारकीर्दीत कमी करून टाकली आहे. त्यामुळें असा परिणाम झाला आहे कीं, फर्ग्युसन कॉलेजांतील एक विद्यार्थी स्वदेशी चळवळीसंबंधानें भरलेल्या विद्यार्थ्यांच्या सभेंत बोलला म्हणून सदर कॉलेजांतील प्रिन्सिपॉलांनीं त्यास दहा रुपये दंड करून सदर शाळेच्या बोर्डिंगांतून त्यास काढून टाकलें. फर्ग्युसन कॉलेजची ही ताण तर सरकारीं कॉलेजावर झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. स्वदेशी चळवळ म्हणजे विद्यार्थ्यांनीं स्वदेशी वस्तु वापरण्याचा निश्चय करण्याकरितां भरलेल्या सभा बेकायदेशीर, विद्यार्थ्यांची नीति किंवा शील बिघडविणाऱ्या अथवा त्यास अयोग्य वळण लावून देणाऱ्या आहेत, असें या कॉलेजांतील चालकांचें मत आहे काय ? असल्यास 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायानें प्रि. सेल्बींबरोबर या कॉलेजांतील अध्यापकांसहि या कामीं गुरुत्वाचा अधिकार घेण्यास अयोग्य ठरविणें भाग आहे. सरकारी कॉलेजापेक्षां जर कांहीं राष्ट्रभक्तीचें अधिक वळण किंवा शिक्षण खाजगी कॉलेजांत किंवा शाळांत देतां येत नाहीं तर केवळ सरकारी शाळांचें प्रतिबिंब म्हणून आम्ही शाळा किंवा कॉलेजें काढावीं कीं नाहीं व त्याकरितां

स्वार्थत्याग करावा किंवा नाहीं हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. स्वार्थत्याग करण्यासहि कोणी एखादा मनुष्य तयार होईल, कारण हा प्रश्न केवळ एका व्यक्तीच्या प्रेरणेचा आहे. पण असल्या प्रकारच्या केवळ सरकारी कॉलेजांच्या नकला होऊन राहिलेल्या कॉलेजांस लोकांनीं किती मदत करावी, ही गोष्ट त्यांतल्या त्यांत विशेष विचार करण्यासारखी आहे. सर्व हिंदुस्थानभर स्वदेशी मालाची चळवळ चालू असतां लोकांच्या मदतीनें निघालेल्या खाजगी कॉलेजांतील प्रिन्सिपॉलानें स्वदेशी चळवळींत सामील झाल्याबद्दल एका विद्यार्थ्यास दंड करावा हें पाहून कपाळास हात लावल्याखेरीज राहवत नाहीं! या कामी बंगाल्यांतील बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांचा तरी धडा इकडील लोकांनीं घ्यावयास पाहिजे होता. मि. बानर्जी हे तिकडील एका खासगी कॉलेजाचे प्रिन्सिपॉल आहेत; व आपल्या व्याख्यानानें आणि वर्तनानें ते स्वदेशी चळवळीचा विद्यार्थ्यांस धडा घालून देत आहेत. वास्तविक पाहतां आमच्याकडेहि तसाच प्रकार व्हावयास पाहिजे होता; पण प्रो. गोखले हे मँचेस्टरमध्यें बहिष्काराचें समर्थन करीत असले तरी इकडे त्यांच्याच कॉलेजांतील एका विद्यार्थ्यास स्वदेशी चळवळींत पडल्याबद्दल दंड होत आहे! सारांश, हेहि आमचे गुरू नव्हेत असेंच म्हणावें लागतें!

शाळेची शिस्त किंवा डिसिप्लिन बिघडते असा वरील कृत्याच्या समर्थनार्थ एक मुद्दा पुढें आणण्यांत येत असतो. पण डिसिप्लिन म्हणजे काय याची कोणी नीटशीं चर्चा केलेली आमचे पाहण्यांत नाहीं. उद्या एखाद्या घरांतील वडील माणसें आम्ही आपल्या मुलांस देवदर्शनास जाऊं देत नाहीं, म्हणून जर फुशारकी मारूं लागलीं अथवा देवदर्शनास गेल्याबद्दल मुलांस शिक्षा करूं लागलीं तर त्यास आम्ही डिसिप्लिन म्हणूं का मूर्खपणा म्हणूं? विद्यार्थ्यांनीं एकत्र जमून स्वदेशी माल वापरण्याचा निश्चय करणें यांत जर पाप असेल तर गोष्ट निराळी; व कॉलेजांतील बोर्डिंगांतून एखादा विद्यार्थी सभेस गेला तर त्यास दंड करा. पण हें कृत्य चांगलें असल्यास कॉलेजाच्या बोर्डिंगांतून एखादा विद्यार्थी तिकडे गेल्यास तो विचारून गेला नाहीं म्हणून आज्ञा–भंगाचा दोष लावून त्यास शिक्षा करणें म्हणजे निव्वळ वेडेपणा होय. विद्यार्थी कदाचित् विचारून गेला नसेल; पण त्यास जर या सत्कृत्या-साठींहि परवानगी मिळणार नाहीं, असें खात्रीनें ठाऊक आहे तर मग त्यानें विचारावें तरी कशाला? विद्यार्थ्यांस आज्ञा मोडण्यास जर कोण शिकवीत असेल तर तो या शिक्षकांचा आचरटपणा होय. गुरुशिष्यांमधील धर्म फार नाजूक आहे हें आम्ही जाणून आहों; व त्यांत कोणत्याहि रीतीचा विनाकारण बिघाड करण्याची आमची इच्छा नाहीं. गुरु सोळा आणे असला म्हणजे शिष्यानेंहि सोळा आणेंच असावें, असाच आम्ही उपदेश करूं. पण पराधीनतेनें, स्वार्थानें, लोभानें,

मोहानें किंवा बुद्धिभ्रंशानें गुरु जेव्हां कार्याकार्य न ओळखतां शिष्यास आज्ञा करतात अथवा आपली सदोष आज्ञा न पाळल्याबद्दल शिक्षा करण्यास प्रवृत्त होतात, तेव्हां—

"रौद्रः क्षत्रियधर्मोऽयं गुरुणा यद्युध्यत"

—असें म्हणण्याची शिष्यावर सहज पाळी येते. महाभारतांत अनेक ठिकाणीं या विषयाचा विचार झालेला आहे व त्यांपैकीं एका प्रकरणांतील श्लोक शिरोभागीं दिले आहेत. आम्हीं जीं आपलीं मुलें शाळा व कॉलेजें यांत पाठवितों तीं त्यांस राष्ट्रीय चळवळींचा बिलकुल गंध लागू नये म्हणून पाठवीत नाहीं. उलट त्यांस या बाबतींत शिक्षण मिळून त्यांच्या अंगीं होईल तितकी राष्ट्रभक्ती जागृत व्हावी असाच त्यांस शिक्षण देण्यांत आमचा हेतु असतो. स्वार्थानें किंवा वर सांगितलेल्या अन्य कारणांनीं मोहित होऊन जेव्हां एखादा गुरु शिष्यास असल्या कामीं छळतो तेव्हां तो गुरूच नव्हे, असें आम्हीं समजतों, इतकेंच नव्हे तर शिष्यानें अशा वेळीं गुरूची आज्ञा मोडली तर तो आज्ञाभंगहि होत नाहीं. डिसिप्लिनच्या छत्राखालीं हा जुलूम चाललेला आहे; आणि हा जितका कमी होईल तितका करणें हें देशांतील प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. सेल्बी-साहेबांनीं आपल्या पत्राच्या अखेरीस म्हटल्याप्रमाणें असले गुरु म्हणजे 'टास्क मास्तर' होत. त्यांचें काम चालू आहे तोंपर्यंत त्यांच्या कह्यांत विद्यार्थ्यांनीं राहावें, पण ज्या गोष्टी त्यांचें अधिकारांत पडत नाहींत किंवा ज्या करण्यास ते नालायक आहेत तेथें त्यांच्या आज्ञेस गुरु म्हणून मान देणें पढतमूर्खाचें लक्षण होय. वामनपंडितांनीं प्रल्हादाच्या मुखांतून वदविल्याप्रमाणें हे गुरु पोटभरू किंवा पापतरू समजले पाहिजेत; व राष्ट्रकार्याचा जेथें संबंध येईल तेथें त्यांच्या अनुज्ञेची अपेक्षा न धरतां विद्यार्थ्यांनींच आपला मार्ग आपण शोधून काढला पाहिजे. बुद्धिभ्रंशात्मक ज्ञानापासून जर आपली सुटका व्हावयास पाहिजे असेल तर या खेरीज दुसरा मार्ग नाहीं. गुरुशिष्यसंबंधांत असा तेढा उत्पन्न व्हावा, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. पण सध्याची परिस्थिति अशी आहे कीं, या दुष्परिहार्य दुःखाची वर सांगितल्याप्रमाणें कांहीं तरी वाट लावल्याखेरीज गत्यंतर नाहीं.

## हे आमचे गुरूच नव्हेत ! क्रमांक २

[ ७ नोव्हेंबर १९०५ ]

**अयं चापि विशुद्धात्मन् पुराणे श्रूयते विभो ।**
**मरुत्तेन महाबुद्धे गीतः श्लोको महात्मना ॥ १ ॥**

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ।। २ ।।
स त्वं गुरुरिति प्रेम्णा मया संमानितो भृशम् ।
गुरुवृत्ति न जानीषे तस्मात् योत्स्यामि वै त्वया ।। ३ ।।

– महाभारत

या विषयावर दोनच लेख लिहून हा विषय संपवावयाचा आमचा विचार होता. पण आमच्या लेखांवर कांहीं परप्रकाशक मंडळीकडून ज्या अविचारमूलक टीका आल्या आहेत त्यांच्या निरसनार्थ आणि स्वदेशी चळवळीमध्यें पडणाऱ्या विद्यार्थ्यांस सरकारी किंवा ग्रँटस्–इन–एड मिळणाऱ्या शाळांच्या अधिकाऱ्यांनीं शाळेंतून घालवून लावावें किंवा दुसरें कोणतें तरी शासन करावें, नाहींपेक्षां या शाळा बंद केल्या जातील, असें बंगाल सरकारनें जिल्ह्यांतील कलेक्टर व डिस्ट्रिक्ट म्याजिस्ट्रेट यांच्याद्वारें नुकतेंच जें एक सर्क्युलर प्रसिद्ध केलें आहे तें न्याय्य आहे कीं अन्याय्य आहे याचा विचार करण्याकरितां मथळचांत निर्दिष्ट केलेल्या विषयावरच आजचा लेख लिहिणें भाग पडलें आहे. बंगालसरकारच्या सर्क्युलरांत जो प्रसंग निर्दिष्ट केला आहे तो केव्हांना केव्हां तरी आमच्यावर येणार हें भाकीत आम्ही १८९८ सालींच केलें होतें. पंचवीस वर्षांपूर्वीं म्हणजे लॉर्ड रिपनच्या कारकीर्दींत एज्युकेशन कमिशन बसवून खाजगी शाळांस जेव्हां उत्तेजन मिळालें तेव्हां सरकारची अशी समजूत होती कीं, हिंदुस्थानांत जितका शिक्षणाचा प्रसार करण्याचें सरकारनें योजिलें आहे तितका प्रसार खाजगी शाळांच्या मदतीखेरीज व्हावयाचा नाहीं. खाजगी शाळा म्हणजे सरकारी शाळांचें प्रत्येक बाबतींत अनुकरण करणाऱ्या शाळा नव्हेत, तर सरकारी शिक्षणांत जी कांहीं उणीव आहे अथवा ज्या गोष्टी सरकारी शाळांत शिकवितां येत नाहींत किंवा शिकवीत नाहींत त्या गोष्टी विद्यार्थ्यांस शिकविण्याकरतां देशांतील कांहीं सुशिक्षित वर्गांनीं स्वार्थत्याग करून खासगी शाळा काढलेल्या असतात, हीहि गोष्ट सरकारास त्यावेळीं पूर्णपणें माहीत होती. परंतु असें असूनहि जाणूनबुजून खाजगी शाळांस उत्तेजन देण्याचा क्रम सरकारनें सुरू ठेवला; इतकेंच नव्हे तर खाजगी शाळेच्या शिक्षणक्रमांत सरकारी शाळेच्या शिक्षण-क्रमापेक्षां अधिक स्वातंत्र्य असलें पाहिजे, हीहि गोष्ट सरकारनें प्रांजलपणें कबूल केली. याचा परिणाम असा झाला कीं, मद्रास, मुंबई, बंगाल, पंजाब वगैरे इलाख्यांतून नव्या नव्या खासगी शाळा व कॉलेजें निघून ती भरभराटीस आलीं, व या प्रत्येक संस्थेस सरकारी शाळेपेक्षां कांही विशिष्ट स्वरूप आण-ण्याची सदर संस्थेच्या प्रवर्तकांनीं खटपट केली. येथील फर्ग्युसन कॉलेज, मद्रासचें

पछापा कॉलेज, काशीचें सेंट्रल हिंदु कॉलेज, पंजाबचें दयानंद अँग्लो-वेदिक कॉलेज आणि बंगाल्यांतील रिपन कॉलेज आदिकरून पुष्कळ कॉलेजें याच सुमारास निघालीं आहेत. सरकारी कॉलेजांतून ज्या प्रकारचें शिक्षण मिळतें तेवढेंच देऊन स्वस्थ बसणें हा या कॉलेजांचा उद्देश नव्हता, आणि याकरितां स्वार्थत्याग करून नव्या संस्था काढण्याचा त्यांनीं खटाटोपहि केला नव्हता. सरकारी शाळांतून किंवा कॉलेजांतून जें राजकीय, धार्मिक किंवा सामाजिक धोरण शिक्षणक्रमांत राखलें जातें त्याहून एक किंवा अनेक बाबतींत निराळें वळण विद्यार्थ्यांस लागलें पाहिजे, हें तत्त्व लक्षांत ठेवूनच, किंबहुना या कटाक्षानेंच या नवीन खाजगी संस्था निघालेल्या होत्या. आणि सरकारासहि, अशा प्रकारें विद्यार्थ्यांस निरनिराळ्या प्रकारचें वळण देणाऱ्या शाळा देशांत असणें अवश्य आहे, सरकारी शाळांच्या एकमुखी रुद्राक्षानें सर्व शिक्षणक्रम सुरू ठेवणें बरोबर नाहीं, असें वाटत होतें. सारांश, कोणत्या राजकीय चळवळी बऱ्या आहेत, धर्म कोणता चांगला आणि कोणता वाईट, कोणत्या सामाजिक चळवळींत विद्यार्थ्यांनीं पडावें अगर न पडावें, हें ठरविण्याचा अधिकार सरकार केवळ आपल्याच हातांत घेण्यास त्यावेळीं तयार नव्हतें; आणि त्यांस ही गोष्ट मान्य होती कीं, राष्ट्रांतील लोकांस जर खरें राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचें असेल तर तें स्वतंत्र लोकांनीं स्वतंत्र खाजगी शाळेंतच दिलें पाहिजे व देणें शक्य आहे.

सन १८९७-९८ सालीं राजद्रोहाची देशभर जी भयंकर वावटळ उठली आणि ज्या वावटळीनंतर लगेच लॉर्ड कर्झन यांनीं आमचें वाटोळें करण्याकरितां हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवलें, तेव्हांपासून वर सांगितलेलें सरकारचें धोरण आणि रंग पालटत पालटत जाऊन आतां वर निर्दिष्ट केलेल्या बंगाल सरकारच्या सरक्युलरानें सरकारी धोरणाचा झोंपाळा पूर्वी असलेल्या दिशेच्या अगदीं विरुद्ध वहकत गेलेला आहे. लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दींत सिमल्यास जी शिक्षण-परिषद भरली तिचा हेतु त्यावेळीं प्रचलित असलेल्या खाजगी शाळांसंबंधाच्या सरकारी धोरणांत कांहीं फेर करावा असा होता असें आम्हीं त्यावेळींच लिहिलें होतें. लॉर्ड कर्झन हे शहाणे आहेत, कर्ते आहेत, पण हिंदी लोकांच्या पायांत दास्यत्वाची जड बिडी कायमची राहावी अशा तजवीजी करण्यांत त्यांचें सर्व शहाणपण खर्च झालें आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रो. गोखले यांनीं विलायतेंतील लोकांपुढें लॉर्ड कर्झन यांचा जो दुर्गुण मांडला आहे तो हाच होय. नुसता चोर पुरवतो, पण घरचा चोर पुरवत नाहीं, असें म्हणतात, तद्वत् लॉर्ड कर्झनची स्थिति आहे. हिंदी लोकांस वर डोकें काढूं देणें इष्ट नाहीं असें त्यांचें मत असल्यामुळें लॉर्डसाहेबांची विद्वत्ता

आणि कर्तृत्वशक्ति हीच यांच्या कारकीर्दींत महाभयंकर रीतीनें हानिकारक झालीं आहेत. असो; आपणांस तूर्त आतां शिक्षणक्रमासंबंधानें पहावयाचें आहे. या बाबतींत लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीचें धोरण रिपनसाहेबांच्या कारकीर्दींच्या उदार धोरणाच्या अगदीं उलट झालें आहे. उदार शिक्षणानें लोकांचीं मनें सुसंस्कृत होऊन लोक अधिकाधिक हक्क मागावयास लागले तर सुदिन समजूं, असें या देशांत पाश्चिमात्य शिक्षण ज्यांनीं प्रथम सुरू केलें त्यांचें मत होतें. पण लॉर्ड कर्झन यास तें धोरण कसें आवडणार ? त्यांना आमच्या डोक्यावर सदैव नाचावयाचें आहे; तेव्हां त्यांनीं अशी युक्ति काढली कीं, हिंदुस्थानांतील सर्व शिक्षण एकतंत्री करून खाजगी शाळांस पूर्वीप्रमाणें स्वातंत्र्य न देतां देशांतील सर्व विद्यार्थी एकाच शिस्तींत किंवा कैदेंत तयार करावे. युनिव्हर्सिटीचा नवा कायदा केला त्याचा हेतु तरी हाच. पाश्चिमात्य शिक्षणामुळें हिंदुस्थानांतील विद्यार्थीवर्गाचीं डोकीं भणाणून जाऊन स्वतंत्रतेच्या किंवा राष्ट्रीय हिताच्या अगर चळवळीच्या ज्या अनेक कल्पना त्यांच्या मनांत येतात त्या हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्व्हिसची जुलमी राजसत्ता अबाधित चालण्यास अपायकारक आहेत हें तत्त्व लॉर्ड कर्झन यानीं ओळखून ठेवलें होतें; व पाश्चिमात्य शिक्षण अजीबात बंद करणें जर शक्य असतें तर ती गोष्ट त्यांनीं प्रथम केली असती. परंतु तसें करण्याचे दिवस निघून गेल्यामुळें ती गोष्ट शक्य नव्हती. तेव्हां कर्झन साहेबांनीं अशी युक्ति काढली कीं, शिक्षणाच्या शाळा बंद करूं नयेत, पण सर्व शिक्षणखातें एका मुठींत आणि तेंहि सरकारच्या मुठींत आणून त्यावर अशी देखरेख ठेवावी कीं, विशाद आहे त्यांतून एकहि विद्यार्थी असा बाहेर पडूं नये कीं, ज्याचें डोकें वर सांगितलेल्या स्वतंत्रतेच्या किंवा राष्ट्रीय जागृतीच्या कल्पनेनें भणाणून जाईल. लार्ड कर्झनचें हें धोरण लोकांनीं आधींच ताडल्यामुळें त्यांस त्याप्रमाणें तजवीज करण्यास बराच प्रयास पडला. पण सत्तेच्या जोरावर अखेरीस त्यांनीं ती गोष्ट घडवून आणली; आणि हिरण्यकश्यपूनें ज्या-प्रमाणें प्रल्हादाच्या शिक्षणाचा बंदोबस्त केला होता तसा लॉर्ड कर्झन यांनीं हिंदी प्रजेच्या शिक्षणाचा बंदोबस्त करून टाकला. शिक्षणाच्या कामीं लॉर्ड कर्झन यांनीं आमचें किती नुकसान केलें आहे आणि तें किती सफाईनें केलें आहे याची कल्पनाहि आमच्यापैकीं कित्येकांस आली नाहीं असें दिसतें. लहान मुलानें ज्याप्रमाणें कोणतें अन्न खावें आणि कोणतें खाऊं नये हें आईबाप ठरवितात, तसें आमच्या विद्यार्थ्यांनीं कोणतीं पुस्तकें वाचावीं, त्यांत काय असावें, त्यांच्या राज-कीय कल्पना गोऱ्या सनदी नोकरांस नडणार नाहींत अशा बेताच्या कशा राखाव्या व त्याकरितां खाजगी शाळेंतील शिक्षणक्रम किती रोखावा हें सर्व आधीं ठरवून त्याप्रमाणें कार्यभाग उरकण्याचा मक्ता लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दींत सरकारानें

घेतला आहे. भेद एवढाच कीं, आईबापांच्या मनांत आपला मुलगा केव्हांना केव्हां तरी अज्ञानाचा सज्ञान होऊन आपल्या बरोबरीचा व्हावा अशी इच्छा असते. लॉर्ड कर्झनची किंवा हल्लींच्या सरकारची इच्छा अशी कीं, हिंदी लोकांनीं कधींहि गोऱ्या राज्यकर्त्यांच्या बरोबरीचे हक्क मागूं नयेत. या धोरणाचा परिणाम असा झाला आहे कीं, खाजगी शाळांचें सार्वजनिक किंवा राजकीय बाबतींतील स्वातंत्र्य बिलकुल नाहीसें झालें. आणि त्यांच्या प्रवर्तकांची अशी स्थिति झाली कीं, आपल्या पदरच्या भाकरी अर्धपोट खाऊन, अर्थात् स्वार्थत्याग करून त्यांनीं सरकारचेंच धोरण किंवा वळण विद्यार्थ्यांस लावण्याच्या कामीं लोकांचे पैसे खर्च करावे. सरकारच्या या धोरणास पहिलें बळी पडलेलें कॉलेज फर्ग्युसन कॉलेज हें होय; व याबद्दलची शिष्टाई प्रिन्सिपॉल सेल्बी यांच्यामार्फतच झाली, ही गोष्ट कदाचित् सर्वांस माहीत नसेल. कांहीं वर्षांपूर्वी 'अष्टमूर्ति सासूबाई' या मथळ्याखालीं खाजगी शाळांवर आलेल्या या काहुराचें आम्ही थोडें विवेचन केलें होतें. आज बंगाल सरकारच्या सर्क्युलरानें या काहुराचें पूर्ण स्वरूप सर्वांच्या नजरेस आलें आहे; व अशी समजूत आहे कीं, ही घोरपड अशीच राहूं दिली तर देशांतील स्वतंत्र आणि उदात्त शिक्षणाचा कधींना कधीं तरी जीव घेतल्यावांचून ती कधींहि राहणार नाहीं.

वरील कारणाकरितां आमचें असें म्हणणें आहे कीं, ज्या धोरणानें सरकारी शाळांत इतिहासाचीं, राजनीतीचीं, राष्ट्रहिताचीं किंवा देशभक्तीचीं तत्त्वें हल्लीं (म्हणजे नव्या कर्झनी धोरणाप्रमाणें) शिकविलीं जातात तीं तत्त्वें आमच्या फायद्याचीं नाहींत व विद्यार्थ्यांच्या कोंवळ्या अंतःकरणांत विद्यार्थीदशेंत केवळ त्यांचाच प्रवेश होऊं देणें राष्ट्रास अत्यंत अपायकारक होय. तात्पर्य, सरकारी शाळांत आम्हीं जीं मुलें पाठवितों तीं ज्याप्रमाणें हिंदुधर्माचीं तत्त्वें शिकविण्यास पाठवीत नाहीं त्याप्रमाणेंच स्वदेशी किंवा राजकीय चळवळीचीं तत्त्वें शिकविण्याकरतांहि पाठवीत नाहीं. हिरण्यकश्यपूसारख्या परकी राजांनीं काढलेल्या शाळांतून हीं तत्त्वें विद्यार्थ्यांस शिकविलीं जाणें शक्य नाहीं व तीं शिकवलीं जातील अशी आम्ही अपेक्षा करणें मूर्खपणा होय. ज्या योगानें इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं होणारा व्यापार कमी होईल किंवा हिंदुस्थानांत बादशहाच्या नांवावर जे गोरे लोक अनियंत्रित सत्ता चालवीत आहेत त्यांचा मलिदा कमी होईल, तसें शिक्षण सरकारी शाळांतून कधीं तरी दिलें जाईल काय? नाहीं; इतकेंच नव्हे तर विद्यार्थ्यांस अशा प्रकारचें शिक्षण जेथें मिळेल तिकडे त्यांनीं जाऊं नये अगर त्यांस जाऊं देऊं नयें; कारण त्यांचें काम 'केवळ विद्या शिकून असण्याचें' आहे, सार्वजनिक चळवळींत पडून 'धामधूम' करण्याचें नाहीं; असा सरकारनें सरकारी

व खाजगी शाळांच्या अधिकाऱ्यांस जाणूनबुजून हुकूम दिला आहे. यांतील वर्म काय, अथवा खरें इंगित कोणतें, हें समजण्याची ज्यांस योग्यता नाहीं किंवा समजूनहि उघड प्रतिरोध करण्यास ज्यांस धैर्य होत नाहीं त्यांनीं या प्रसंगीं गप्प बसावें हें चांगलें. सरकारी किंवा सरकारच्या कह्यांत गेलेल्या खाजगी किंवा निमसरकारी शाळांतील मास्तर किंवा प्रिन्सिपॉल हे आमचे गुरूच नव्हेत असें जें आम्ही लिहिलें होतें, त्यांतील बीज काय हें आतां वाचकांच्या पुरें लक्षांत येईल. शेक्सपियर, मिल्टन, किंवा बेकन, वामनपंडितांनीं म्हटल्याप्रमाणें "असुररीतीनें" शिकविण्यापुरते हे आमचे गुरु आहेत, आणि तेवढ्यापुरता त्यांस मान दिला पाहिजे ही गोष्ट आम्हांस कधींहि नाकबूल नव्हती व नाहीं; आणि तेवढ्यापुरता गुरुत्वाचा मानहि त्यांस विद्यार्थ्यांनीं देणें अवश्य आहे. तसेंच विद्यार्थ्यांनीं विद्यार्थीदशेंत अभ्यासाकडे आपलें लक्ष विशेष ठेवावें हेंहि मत आम्हांस पूर्णपणें ग्राह्य आहे; किंबहुना आम्हीहि विद्यार्थ्यांस तसेंच सांगत आलों आहों; परतु विद्यार्थीदशेंत विद्यार्थ्यांनीं ज्या गोष्टी शिकावयाच्या त्यांतच धार्मिक, राजकीय व सामाजिक बाबतींचा समावेश होतो. हें शिक्षण सरकारी किंवा वर सांगितलेल्या निमसरकारी शाळांत त्यांस मिळत नाहीं. या शाळांतील गुरु खाजगी रीतीनें किंवा पडद्याच्या आंत सार्वजनिक चळवळीशीं सहानुभूति दाखविणारे असतील. पण उपयोग काय? हें घरचें सौभाग्य सार्वजनिक रीतीनें प्रसिद्ध करण्याचा त्यांस पारतंत्र्यामुळें अधिकार नाहीं. अर्थात् हे या बाबतींत आमचे गुरु होणें शक्य नाहीं असेंच समजलें पाहिजे आणि असें जर आहे तर विद्यार्थ्यांनीं अमुक सार्वजनिक चळवळींत पडावें, अमुक सार्वजनिक चळवळींत पडूं नये, असें हे कोण म्हणणार? कै. रानडे आणि तेलंग यांचीं नांवें प्रमाण म्हणून प्रि. सेल्बी यांच्या पत्रांत पुढें करण्यांत आलीं आहेत. पण आम्हांस जी प्रत्यक्ष माहिती आहे त्यावरून ही चूक आहे असें म्हणण्यास आम्हांस हरकत वाटत नाहीं. देशांतील हल्लींच्या पुढाऱ्यांनीं ज्या कांहीं राष्ट्रहिताच्या चळवळी सुरू केल्या आहेत, त्यांचें शिक्षण विद्यार्थ्यांस विद्यार्थीदशेंतच मिळालें पाहिजे असें कै. रानडे यांचें उघड मत होतें व म्हणूनच मुंबई पुणें येथें जेव्हां राष्ट्रीय सभा भरली तेव्हां सदर सभेंत विद्यार्थ्यांनीं पडणें इष्ट आहे असें त्यांनीं सांगितलें होतें व त्याप्रमाणें तजवीज झाली होती. उघडच आहे कीं, राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद, औद्योगिक परिषद, प्रदर्शनें, शिवाजी उत्सव, गणपती उत्सव, स्वदेशी चळवळ वगैरे राष्ट्रहितार्थ निरनिराळ्या पुढाऱ्यांनीं काढलेल्या सार्वजनिक चळवळीचें तत्त्व सदर चळवळींत यथारुचि मिसळून विद्यार्थ्यांच्या मनांत विद्यार्थीदशेंतच जर बिंबू द्यावयाचें नाहीं तर हें शिक्षण त्यांस मिळावयाचें तरी केव्हां?

विद्यार्थीदशा संपल्यावर तो नोकर होणार आणि नोकरी संपल्यावर पेन्शनर होणार. आणि अखेरीस मागें आम्ही दिलेल्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें 'न हिंदु; प्रभुरात्मनः' म्हणून मरणार ? यासाठीं आमचें असें ठाम मत आहे कीं, विद्यार्थ्यांस सार्वजनिक चळवळींत पडूं न देण्याचा नियम करणें म्हणजे एक प्रकारें राष्ट्राचें नुकसान— राष्ट्राचा घात— करणें होय. विद्यार्थ्यांनीं आपला सर्व वेळ या कामीं लावावा असें कोणीहि म्हणत नाहीं. त्यांचें कर्तव्य अनेक बाबतींत ज्ञान मिळविण्याचें आहे, पण त्या बाबतींतच सार्वजनिक हिताचा किंवा चळवळीचाहि समावेश होतो. राष्ट्राच्या उन्नतीकरितां ज्या चळवळी चालू आहेत त्यांत पडून व पाहून त्यांच्या शक्याशक्यतेचा किंवा अधिक-उण्या फायद्या-गैरफायद्याचा विचार विद्यार्थ्यांनीं विद्यार्थीदशा संपण्यापूर्वींच आपल्या मनाशीं करून ठेवला पाहिजे. असें करण्यास जे गुरु सरकारचे नोकर म्हणून किंवा अन्य तऱ्हेनें बांधले गेल्यामुळें त्यांस सवड देणार नाहींत ते त्यांचे गुरु नव्हेत, शत्रु होत; आणि प्रल्हादानें म्हटल्याप्रमाणें त्यांस 'पापतरूं'ची किंवा आम्ही म्हटल्याप्रमाणें 'पोटभरू' ची उपमा देण्यास बिलकुल हरकत नाहीं. या उपमेनें ते गुरु अन्य प्रकरणीं ज्या मानास पात्र आहेत तो मान त्यावेळीं त्यांस देऊं नये असें जर कोणी समजत असेल तर ती त्यांची चूक आहे, किंवा आमच्या लेखाचा ते मुद्दाम विपर्यास करीत आहेत. एकानें असें म्हटलें आहे कीं, महाभारताचें सर्व रहस्य गुरूस किंवा वडिलास मान देणें हे असतां— उदाहरणार्थ, युधिष्ठिर व भीम यांचा संबंध घ्या— आम्ही उद्दामपणानें हल्लींच्या विद्यार्थ्यांस महाभारताच्या कानाकोपऱ्यांतील दाखले देऊन उच्छृंखल वृत्ति शिकवीत आहों. दुःखाची गोष्ट ही आहे कीं, या बेटचा आक्षेपकानें महाभारत अद्यापि नीट वाचलें नाहीं. महाभारतच काय, पण सर्व शास्त्रें—प्राचीन व अर्वाचीन—वडिलांचा आणि गुरूंचा मान ठेवावा असेंच कंठरवानें सांगत आहेत, ही गोष्ट आम्हांस मान्य आहे, पण ते वडील निराळें आणि ते गुरुहि निराळे. वयांत आलेल्या मुलास स्वतंत्रता न देतां त्याला वडिलोपार्जित मिळालेल्या इस्टेटीवरहि बाप जर डोळा ठेवूं लागला, अथवा सरकारच्या प्रत्यक्ष किंवा परोक्ष कह्यांत गुंतून एखादा गुरु जर शिष्याच्या मनोवृत्तीस व ज्ञानास आळा घालूं लागला तर त्यासहि पुत्रानें आणि शिष्यानें मान दिलाच पाहिजे असें जगांतील कोणतेंहि शास्त्र प्रतिपादन करीत नाहीं उलट आम्हीं असें म्हणतो कीं,

कामाल्लोभाद्भयाद्वापि मोहाद्वा भ्रष्टबुद्धितः ।
शिष्याय कुमतिं दद्यात् स गुरू राष्ट्रघातकः ।।

म्हणजे हे अशाप्रकारचे गुरू या कामीं आमचे गुरूच नव्हेत असें समजून आम्हीं

चाललें पाहिजे. महाभारतांत ज्येष्ठ आणि कनिष्ठ बंधु यांचें वर्तन कसें असावें असा युधिष्ठिरानें प्रश्न विचारल्यावरून धाकट्या भावानें वडील भावास गुरु समजून आपण शिष्याप्रमाणें वर्तन ठेवावें, असें भीष्मांनीं सांगितलें आहे. पण लागलीच –

न गुरावकृतप्रज्ञे शक्यं शिष्येण वर्तितुम् ।

असा भीष्मांनीं स्वतःच शेरा मारला आहे ! या लेखाच्या अग्रभागीं दिलेले श्लोक भीष्मांचेच आहेत व परशुरामाशीं तंटा झाला तेव्हां त्यांस ते सांगितले आहेत. शिष्याचें सर्व प्रकारें हित पाहाणारा आणि प्रसंगविशेषीं शिष्याकरितां राजाशींहि भांडणारा गुरु कोणीकडे आणि सरकारी नोकर म्हणून हिरण्यकश्यपूनें ठेवलेल्या शिक्षकाप्रमाणें सरकारास आवडतील तेवढींच तत्त्वें शिष्यांस सांगणारा गुरु कोणीकडे ? दोघांसहि 'गुरु' हा शब्द सामान्यपणें लागतो; पण 'कहां इंद्रका ऐरावत और कहाँ शामभटकी तटाणी' इतका त्यांच्यामध्यें भेद आहे. 'आपण कसे मरणार, आपण मेल्याखेरीज आम्हांस जय येत नाहीं' असे विचारावयास युधिष्ठिर गेला असतां युधिष्ठिराच्या कल्याणाकरितां आपल्या मरणाची युक्ति सांगणारा भीष्म आजोबा कोणीकडे आणि नातवानें कोर्टांत फिर्याद करून डिक्री मिळविली तरीं कायदेपंडिताच्या सल्ल्यानें इस्टेटीची छपवाछपव करणारा अलीकडचा धूर्त आजोबा कोणीकडे ? सारांश, वडील किंवा गुरु यांस जो शास्त्रामध्यें मान सांगितला आहे तो सर्व आपणांस मिळावा अशी ज्यांची इच्छा असेल त्यानें पुत्राच्या किंवा शिष्याच्या कल्याणाचाच उपदेश त्यांस करण्यास नेहमीं तयार असलें पाहिजे; इतकेंच नव्हे तर 'अर्थस्य पुरुषो दासः' असें म्हणून आपल्या वर्तनाचें समर्थन करण्याची त्यास कधींहि पाळी येऊं नये. अशा कोटींत गेलेले गुरु "स्पेन्सर साहेबांप्रमाणें" सर्वांस सदैव मान्य होतील. पण ही "गुरुवृत्ति" सुटली म्हणजे बाकीच्या गुरूस जो मान मिळावयाचा तो त्यास त्याजकडून होणाऱ्या कामाच्या किंवा फायद्याच्या तारतम्याप्रमाणेंच मिळणार. म्हटलें आहे कीं, कलियुगांत–

गुरुं प्रयोजनोद्देशादर्चयंति न भक्तितः ।
दुग्धदात्रीति गौर्गेहे पोष्यते न तु धर्मतः ॥

वरील विवेचनावरून गुरुशिष्यसंबंधाचें आमचें वास्तविक मत काय आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. हा प्रश्न कांहीं अंशीं ज्यूरीच्या प्रश्नासारखा आहे. म्हणजे ज्यूरीच्या संस्थेचें महत्त्व ज्याप्रमाणें सामान्य खटल्यांत आढळून येत नाहीं, राजा आणि प्रजा यांच्यामध्यें तंटे उपस्थित झाले असतां ज्यूरीची आवश्यकता भासते, तसाच प्रकार गुरुशिष्यधर्माचा होय. सरकारी अगर खाजगी शाळा किंवा

कॉलेजें नित्य चालू आहेत व चाललीं आहेत; त्यांत गुरुशिष्याच्या धर्माची विशेष मीमांसा करण्याचा प्रसंग येत नाहीं; परंतु काम, क्रोध, भय, लोभ, मोह, किंवा बुद्धिभ्रंश यांच्या तडाख्यांत सांपडून हेच गुरु राजकीय किंवा सार्वजनिक बाबतींत सरकारचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नोकर झाल्यानें विद्यार्थ्यांस सार्वजनिक चळवळीपासून पराङमुख करण्यास प्रवृत्त होतात, तेव्हां खरा गुरुशिष्यधर्म सांगून त्या कामीं 'हे आमचे गुरूच नव्हेत,' व आमचे विद्यार्थी त्यांचे शिष्यहि नव्हेत असें कंठरवानें सांगण्याचा प्रसंग येतो. नाइलाज आहे. ज्याचें कर्तव्य त्यास केलेंच पाहिजे.

---

# ६. राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी क्रमांक १

[ २७ नोव्हेंबर १९०६ ]

स्वदेशी चळवळीस सुरुवात झाल्या दिवसापासून, किंबहुना लॉर्ड कर्झन यांचें युनिव्हर्सिटी बिल पुढें आल्या वेळेपासून राष्ट्रीय शिक्षणाबद्दल पुन्हां चळवळ सुरूं झालेली आहे. "पुन्हां" असें म्हणण्याचें कारण असें कीं, हा प्रश्न कांहीं आजकालचा नाहीं. १८५४ सालच्या ज्या विलायत सरकारच्या खलित्यानें हिंदुस्थानांतील विद्याखात्यास नियमित स्वरूप दिलें त्याच्या पूर्वीपासूनहि खासगी शिक्षणाचें महत्त्व व उपयोग स्थापित झालेला आहे. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय याची व्याख्या करण्याची जरूर नाहीं. प्रत्येक स्वतंत्र देशांतील सरकार आपल्या प्रजेस जें शिक्षण देतें किंवा देऊं इच्छितें तें राष्ट्रीयच असतें. देशांतील तरुण पिढी देशाचें राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल अशाप्रकारें त्यांस शिक्षण देणें हें देशांतील विद्याखात्याचें कर्तव्य आहे; आणि त्यासच राष्ट्रीय शिक्षण असें म्हणतात. हल्लींचा काल चढाओढीचा आहे. अशा कालीं आपल्या आसपासचीं राष्ट्रें काय करीत आहेत, कोणत्या बाबतींत अगर विषयांत त्यांनीं पुढें सरसावण्याचा उद्योग चालविला आहे आणि कोणत्या गोष्टींत तीं आपल्या राष्ट्राचें महत्त्व कमी करण्यांत गुंतलीं आहेत, याचा प्रत्येक देशांतील विद्याखात्यानें नीट विचार केला पाहिजे; व याप्रमाणें आपल्या देशांतील शिक्षणक्रमांत हरवख्त सुधारणा केली पाहिजे. देशांतील सरकार स्वदेशीच असलें म्हणजे या गोष्टी आपोआपच घडून येत असतात, किंवा देशांतील विचारी पुरुष, वर्तमानपत्रकार अगर लेखक त्या आपल्या सरकारपुढें मांडून सदर सरकाराकडून देशांतील शिक्षणक्रमांत उपयुक्त असे फेरफार घडवून आणतात. रशिया, जर्मनी, वगैरे राष्ट्रांतून राजसत्ता जरी इंग्लंडाप्रमाणें पुष्कळशी प्रतिनिधींच्या ताब्यांत नसली तरी या दोन्हीं देशांचा अलीकडचा इतिहास पाहिला असतां असें आढळून येईल कीं, औद्योगिक आणि सांपत्तिक बाबतींत आपला देश इंग्लंड, फ्रान्स, किंवा अमेरिका वगैरे देशांच्या मागें पडूं नये अशा प्रकारचें शिक्षण या देशांतील सरकारांनीं आपल्या प्रजेस देण्याची सुरुवात करून पुष्कळ वर्षें झालीं आहेत. शिक्षण म्हणजे कांहीं नुसतें लिहिणें वाचणें नव्हे. लिहिणें वाचणें हें तर प्रत्येकांस आलेंच पाहिजे; परंतु तेवढ्यानें काम भागत नाहीं. आपल्या देशांत कोणते उद्योगधंदे होण्यासारखे

आहेत हें ठरवून त्याबद्दलचें पुरें ज्ञान (तद्विषयक नवीन शास्त्रीय शोधांसह) आपल्या प्रजेस करून देणें व तद्द्वारां त्यांच्या पोटापाण्याची तरतूद करणें हें प्रत्येक सुधारलेल्या सरकारचें कर्तव्य आहे. ज्या देशांतील सरकार हें कर्तव्य विसरतें तेथील लोक भिकेस लागणार हें निश्चित होय. देशांत शांतता राखल्यानें सरकारचें काम संपत नाहीं, किंवा पुरें होत नाहीं. सर्व राष्ट्र किंवा सर्व प्रजा आहे त्यापेक्षां अधिक सुखी कशानें होईल, त्यांस मिळत आहे त्यापेक्षां अधिक अन्न कशानें मिळेल; ते स्वाभिमानी, निश्चयी, करारी व तेजस्वी कशानें होतील हें सरकारनें पाहिलें पाहिजे, आणि जें सरकार या गोष्टींकडे लक्ष देत नाहीं तें भाडोत्री व अपमतलबी समजलें पाहिजे. तें सरकार लोकांच्या कल्याणाकरितां नव्हे, तें सरकार स्वकर्तव्यनिष्ठ नाहीं, तें सरकार स्वदेशी नव्हे; आणि तें सरकार आपली खरी जबाबदारी ओळखत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. आमच्या दुर्दैवानें आम्हांस अशा प्रकारचें सरकार मिळालेलें आहे. आमच्या डोळ्यादेखत गेल्या तीसचाळीस वर्षांत पहिल्यानें जर्मनी, व मागाहून जपान हीं राष्ट्रें सरसावून पुढें आलीं. या दोन राष्ट्रांतील सरकारापेक्षां इंग्रज सरकार कांहीं कमी सुधारलेलें नाहीं. पण आम्हांस या सुधारलेल्या सरकाराचा वर सांगितलेल्या दोन राष्ट्रांतील सरकाराप्रमाणें उपयोग झालेला नाहीं. रशियांतील बादशहा जुलमी असेल किंवा जर्मनींतील प्रिन्स बिस्मार्क यांची कारकीर्द सोशियालिस्ट लोकांस मोठी करडी गेली असेल. परंतु प्रिन्स बिस्मार्क किंवा रशियाचे बादशहा यांचा नेहमीं असा उद्योग चालू होता व आहे कीं, आपल्या राष्ट्राचें सांपत्तिक किंवा राजकीय वैभव वाढतें राहून इंग्लंड वगैरे पहिल्यानें पुढें सरसावलेल्या राष्ट्रांबरोबर त्यांनीं टक्कर द्यावी. याचा परिणाम काय झाला हें जर्मनीच्या इतिहासावरून स्पष्ट दिसत आहे. पुडीचे रंग, साखर, कांच, कागद वगैरे पुष्कळ बाबतींत धंदेशिक्षणाच्या शाळा काढून इंग्लंडचा व्यापार जर्मनीनें गेल्या तीस चाळीस वर्षांत मागें टाकला आहे. आमच्या इंग्रज बहाद्दरांना ही गोष्ट हिंदुस्थानांत करतां येत नव्हती काय? किंवा असें करणें जरूर आहे हें त्यांना माहीत नव्हतें काय? नाहीं. इंग्रज सरकार इतकें शहाणें आहे कीं, या सर्व गोष्टी त्यांना माहित आहेत. पुऱ्या पुऱ्या माहित आहेत. पण — पण काय? — पण हें आमचें सरकार आमची पोटच्या पोराप्रमाणें काळजी न करितां सावत्र पोराप्रमाणें किंवहुना त्याहूनहि कमी दर्जानें आम्हांस वागवीत असल्यानें आम्ही यांच्या राज्यव्यवस्थेच्या धोरणानें हतभाग्य आणि दुर्दैवी बनलों आहों. धिक्कार असो ह्या सुधारलेल्या सरकाराला कीं, ज्याच्या कारकीर्दींत शंभर वर्षांच्या शिक्षणानें लोकांना आगकाड्या कशा कराव्या हें शिकविलें

गेलें नाहीं, किंवा कोटयवधि रुपयांचा ऊंस या देशांत होत असतां स्वदेशी साखरेचे धंदे बुडून जाऊन मारीशस बेटांतील इंग्लिशांचीच नव्हे तर जर्मनीसारख्या परदेशांतील कोटयवधी रुपयांची साखर या देशांत येऊं लागली! कापडाचा धंदा बुडाला, तेलाचा धंदा बुडाला, चामडयाचा धंदा बुडाला, आणि आम्ही निव्वळ शेतकरी बनलों! सरकारतर्फे कदाचित् असें सांगण्यांत येईल कीं, हा सरकारचा दोप नाहीं. सरकारानें शांतता ठेवल्यानंतर या गोष्टी लोकांनीं आपण होऊन करावयास पाहिजे होत्या. परंतु हें म्हणणें चुकीचें आहे; इतकेंच नव्हे तर ही सबब साफ खोटी आहे असें आम्ही म्हणूं शकतों. जपान, जर्मनी, रशिया किंवा अमेरिका या देशांतील सरकारांनीं असल्या सबबीवर आपली सुटका कधींहि करून घेतली नाहीं. उलट या बाबतींतील आपली जबाबदारी ओळखून आपल्या लोकांस योग्य शिक्षण देण्यास सुरुवात केली. आमच्या देशांतील इंग्रज सरकारांस जर हें तत्त्व मान्य नसेल तर त्यांत त्यांचा दुसरा कांहीं तरी हेतु असला पाहिजे हें उघड आहे; व आजपर्यंतच्या एकंदर वर्तनावरून तसा हेतु आहे असें आम्ही उघड म्हणतों.

हा हेतु काय, हें आतां कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. हिंदुस्थान देश इंग्लंड देशाच्या शेंपटाप्रमाणें कायमचा विलायतेच्या अंकित राहावा, हिंदुस्थानांतील उद्योगधंदे विलायतेंत करतां येतील तितके विलायतेस न्यावे, आणि हिंदुस्थानांतील प्रजा सुशिक्षित झाली तरी तिच्या आंगांत स्वाभिमान, स्वावलंबन, इत्यादि गुण फारसे उत्पन्न होऊं नयेत, कारण ते उत्पन्न झाले तर परकीयांची अनियंत्रित राज्यसत्ता फार दिवस टिकावयाची नाहीं, असें आमच्या सरकारचें धोरण आहे. हिंदुस्थानांतील राज्यकारभार चालविण्यास शिकलेलीं माणसें सरकारास पाहिजे आहेत, पण एका ठराविक इयत्तेपलीकडे यांचें शिक्षण जावें अशी आमच्या सरकारची बिलकुल इच्छा नाहीं. मोठा इंजिनियर, मोठा डॉक्टर, मोठा इतिहासकार, शोधक रसायनज्ञ किंवा पदार्थविज्ञानशास्त्रवेत्ता, मोठा न्यायाधिश अथवा योद्धा अगर पंडित हिंदुस्थानांत निर्माण होण्याची या सरकारास जरूर नाहीं. व तशी त्यांची इच्छाहि नाहीं. हीं सर्व माणसें विलायतेहून इकडे यावयाचीं आहेत; आणि त्यांच्या हाताखालीं काम करण्या-इतकें ज्ञान आम्हांस असलें म्हणजे बस्स आहे. अशी आमच्या सरकारची समजूत आहे; आणि त्या समजुतीप्रमाणें सरकारी, विद्याखात्याचें काम चालूं आहे. कोणत्याहि विषयांत, विद्येंत, शास्त्रांत, उद्योगधंद्यांत, व्यापारांत किंवा कलेंत निष्णांत आणि पारंगत होऊन आपल्या पराक्रमानें किंवा बुद्धिवैभवानें पुढें येणारीं माणसें ज्या शिक्षणक्रमानें तयार होतील तसा शिक्षणक्रम या

देशांत सुरू करण्यास सरकार चाहत नाहीं. त्यांना विलायतेंतून मोठे कामगार येथें आले असतां त्यांच्या हाताखालीं काम करणारे नोकर पाहिजे आहेत; आणि तेवढ्यापुरतें ज्या शाळांतून शिक्षण मिळेल अशा शाळा इकडे काढल्या आहेत. आतां कित्येकदां असें घडतें कीं, या शिक्षणामुळें एखाद्याचे डोळे उघडून त्याची दृष्टि सरकाराला पाहिजे आहे त्यापेक्षां अधिक फांकते, पण ही निरुपायाची गोष्ट आहे. सरकार आमच्या तरुण पिढीस शिक्षणाचें जें दूध पाजीत आहे तें इतक्या बेतानें पाजीत आहे कीं, त्यामुळें फारसें सदृढ कोणी होऊंच नये; पण इतकेंहि करून एखाद्याच्या प्रकृतीस हेंच दूध थोडें अधिक मानवलें, किंवा त्यास दुसरीकडून थोडेसें अधिक दूध मिळून त्याच्या मनाची वाढ सरकारी मर्यादेच्या बाहेर गेली तर निरुपाय म्हणून तेवढ्यापुरतें सरकार कानाडोळा करील. परंतु या देशांतील एकंदर शिक्षणक्रम वर सांगितलेल्या उद्दिष्ट कार्याच्या पलीकडे नेण्याची सरकारास जरूर नाहीं. आणि सरकार परकीय असल्यामुळें इष्टहि नाहीं. या कामीं मागें आम्ही जो एक दृष्टांत दिला होता तो अगदीं समर्पक असल्यामुळें पुन्हां येथें सांगतों. लढाईंत सरकारी स्वारांस उपयोगी पडतील असे घोडे तयार करण्याचें नगरास एक खातें आहे; व या खात्यांतील जे महर्षी आहेत त्यांस तिकडे खानबहादुर वगैरे किताब असल्याचेंहि ऐकिवांत येतें. हें खातें अर्थातच लष्करी युरोपियन लोकांच्या देखरेखीखालीं चालतें. लढाईला जो घोडा लागतो तो शरिरानें मजबूत लागतो; व आकृतीनेंही जितका देखणा असेल तितका चांगलाच. परंतु इंग्रजी सैन्याची कवाइत घोड्यासहि करावी लागत असल्यामुळें गांवठी तट्टाप्रमाणें हे घोडे उच्छृंखल असून चालत नाहींत. सबब सशक्त, देखणा पण नरम घोडा तयार होईल अशी या खात्यांत तजवीज ठेवण्यांत येत असते. सरकारी विद्याखातेंहि याच मासल्याचें होय. लढाईंत ज्याप्रमाणें घोडे लागतात त्याप्रमाणें राज्यकारभार चालविण्यास हुषार माणसांचीहि जरूर आहे. पण लढाईतील घोड्यांप्रमाणें हीं हुषार माणसें स्वावलंबी नसून परकीयांच्या तंत्रानें चालणारीं पाहिजे आहेत; आणि तीं कशीं तयार करावीं याचा खल लॉर्ड कर्झनपासून प्रो. सेल्बीपर्यंत विद्याखात्यांतील सर्व लोक करीत आहेत. या सर्वांची अशी समजूत आहे कीं, शिक्षणानें वाटेल त्या प्रकारचीं माणसें तयार करतां येतात. मात्र अमुक एक प्रकारचीं माणसें तयार होण्यास कोणतें शिक्षण पाहिजे हें काळजीपूर्वक ठरवून त्याप्रमाणें व्यवस्था केली म्हणजे झालें. शिक्षणाचें हें तत्त्व राष्ट्राच्या अभिवृद्धीस घातुक आहे; आणि खरें राष्ट्रीय शिक्षण ज्यास म्हणतात तें असल्या पद्धतींत कोणास कधींहि मिळावयाचें नाहीं, हें उघड आहे. सरकार कांहीं

तुम्हांस नोकरी धरण्यांस सांगत नाहीं, अर्थात् तुम्ही नोकऱ्या धरल्यास त्यांत सरकारचा दोष नाहीं, असें कित्येकांचें म्हणणें आहे; पण असल्या पोरकट सबबींत कांहीं अर्थ नाहीं. डोळझांपणें घालून बैलास राहाटाला जुंपल्यावर मी कांहीं तुला राहाट ओढण्यास सांगत नाहीं अशी जर यजमानाच्या तर्फे कोणी वकिली करूं लागला तर तो आपणास जितका उपहासास्पद करून घेईल तितकाच वरील कोटिक्रम करणारा मनुष्य अजागळ होय. सरकारची तरफदारी करण्यास सरकारच्या पदरीं पुष्कळ कामगार आहेत; तें काम आम्हीं करण्यास नको आहे. उलट सरकारी शिक्षणाचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडून त्यांतील उणिवा किंवा व्यंगें कोणत्या उपायांनीं दूर करावीं हें स्पष्टपणें लोकांना सांगणाऱ्या मंडळींची आतां जरूर आहे; व या कामीं सरकारची किंवा दुसऱ्या कोणाचीहि भीडभाड आतां ठेऊन उपयोगी नाहीं. लोकांना आपलीं व्यंगें कळूं लागलीं हें पाहून सरकारास वाईट वाटणें आतां स्वाभाविक आहे. परंतु उपयोग काय? हीं व्यंगें सध्याच्या शिक्षणक्रमांत सरकारनें जाणुनबुजून ठेविलीं आहेत; चूक झाली असें नाहीं, आणि असें जर आहे तर हीं व्यंगें लोकांना कळून लोक त्याच्या प्रतिकारार्थ खटपट करूं लागले याचें वाईट वाटून काय उपयोग? आणि आम्ही तरी आतां सरकाराला वाईट वाटेल म्हणून विनाकारण गोड शब्द वापरण्यांत काय फायदा? आमचें दुखणें वेशींवर बांधल्याखेरीज आतां इलाज नाहीं. आमच्या राष्ट्रांतील लोक नेभळे व निरुद्योगी राहावे असें सरकारी विद्याखात्याकडून चालत आलेल्या शिक्षणक्रमाचें धोरण आहे; आणि हें धोरण जर असेंच कायम राहिलें तर राष्ट्राचा समूळ नाश होण्याचा समय जवळ येणार हेंहि निश्चित आहे. अशा वेळीं देशांतील उद्योगी आणि विचारी पुरुषांनीं लोकांपुढें खरी स्थिति मांडून तिच्या प्रतिकारार्थ झटावें हें त्यांचें कर्तव्य होय. अलीकडे पंडित मदन मोहन, बाबू सुरेंद्रनाथ, रा. ब. चिंतामणराव वैद्य, प्रो. विजापूरकर, लाला लजपतराय, आणि मि. वाच्छा, यांनीं देशांतील शिक्षणक्रमासंबंधानें जे वेळोवेळीं विचार प्रदर्शित केलेले आहेत व राष्ट्रीय विश्वविद्यालय स्थापन करण्याबद्दल जे अभिप्राय अगर मतें दिलेलीं आहेत त्या सर्वांतील बीज हेंच होय. हल्लींची सरकारी शिक्षणपद्धति सदोष आहे, इतकेंच नव्हे तर खाजगी शाळांच्या द्वारें हा दोष काढून टाकण्याची वीस वर्षांपूर्वी जी उमेद होती ती आतां राहिली नाहीं. लॉर्ड कर्झन यांनीं सरकारी शाळा नव्हे तर खाजगी शाळांच्याहि मुसक्या बांधून सर्वांस एकाच तंत्राबें व मार्गानें जावयास लाविलें आहे या गोष्टी निर्विवाद आहेत. फुल्लर साहेबांच्या राजिनाम्याचें नुकतेंच जें कारण प्रसिद्ध झालें आहे त्यांत हिंदुस्थान

सरकारचे सेक्रेटरी मि. रिसले हे एके ठिकाणीं सहजगत्या असें लिहून गेले आहेत कीं, युनिव्हर्सिटीच्या नवीन कायद्याप्रमाणें जे नियम करावयाचे ते विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत पडू नये अशा हेतूनें त्यांजवर " शाळेंत आणि बाहेर नजर ठेवण्याकरितां करावयाचे आहेत ; आणि ते केले म्हणजे खाजगी शाळासंबंधानें दुसऱ्या तजविजी करण्याची जरूर नाहीं." सरकारचें युनिव्हर्सिटीचा कायदा करण्यांत खरें धोरण काय याची या उप्पर जर कोणास शंका असेल तर " स वै मुक्तोऽथवा पशुः" असें समजलें पाहिजे. सरकाराला जें कांहीं करावयाचें आहे तें आतां निश्चित व ठाम झालेलें आहे. अशा वेळीं खासगी शाळांची जबाबदारी काय याचाहि पुन्हा विचार करणें जरूर आहे. आणि तो करण्याकरितांच आजचा हा लेख प्रस्तावनेदाखल लिहिला आहे. पुढील अंकीं याबद्दल जास्त खुलासा करण्यांत येईल.

## राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी क्रमांक २

[ ४ डिसेंबर १९०६ ]

सध्यां सरकारी शाळांतून आमच्या तरुण पिढीस जें शिक्षण मिळतें तें किती हिणकस असतें याचा विचार गेल्या खेपेस केलाच आहे. इंग्रजी विद्या म्हणजे वाघिणीचें दूध असतां आमच्या शाळेंतील शिक्षणक्रमांक हें दूध पाण्यापेक्षांहि निरुपद्रवी कां व्हावें हा एक मोठाच प्रश्न आहे. ज्या वेळीं हिंदुस्थानांतील लोकांस कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावें या प्रश्नाची वाटाघाट होऊन पाश्चिमात्य पद्धतीनें इंग्रजी भाषेंत त्यांस शिक्षण द्यावें असा ठराव झाला, तेव्हां सदर ठराव करणारांची बुद्धि हल्लींच्या लॉर्ड कर्झनसारख्या अधिकाऱ्यांप्रमाणें कोती व संकुचित नव्हती ही गोष्ट त्यांच्या तत्कालीन लेखांवरून सिद्ध होत आहे. इंग्रजी इतिहास, इंग्रजी वाङ्मय, इंग्रजी शास्त्रें, इंग्रजी हुन्नर वगैरे विद्या कोणाहि विद्यार्थ्याचें मन विकसित करून त्याच्या आंगात व मनांत हुरूप, देशाभिमान वगैरे सद्‌गुण उत्पन्न करण्यास लायक आहेत याबद्दलहि वाद नाहीं. बुद्धीची कुशाग्रता वाढविण्यास हिंदुस्थानांतील न्यायव्याकरणादि प्राचीन शास्त्रें किती जरी उपयोगी असलीं तरी देशाभिमान, राज्यव्यवस्था, राजनीति, देशाची नैतिक आणि सांपत्तिक अभिवृद्धी, राष्ट्राराष्ट्रांचा परस्पर संबंध वगैरे देशाचा उत्कर्ष होण्यास ज्या विषयांचें ज्ञान लागतें त्या विषयांचें शिक्षण या आमच्या जुन्या शाब्दिक शास्त्रांपासून मिळत नाहीं, आणि मिळणेंहि शक्य नाहीं. पाश्चिमात्य राष्ट्रांनीं देशाभिवृद्धीस उपयोगी पडणारीं हीं शास्त्रें व हे विषय नवीन सिद्ध केलेले आहेत,

आणि या पाश्चिमात्य राष्ट्रांचा एकंदर इतिहास पाहिला तर त्यांच्या वाङ्मयांत किंवा शिक्षणक्रमांत याच विषयांत प्राधान्य दिलेलें आढळून येतें; अर्थात् जो जो मनुष्य पाश्चिमात्य किंवा इंग्रजी विद्या अगर शास्त्रें सांगोपांग शिकतो त्याचें मन पाश्चिमात्य देशांत स्वदेशाभिमानाच्या किंवा स्वदेशाभिवृद्धीच्या ज्या कल्पना आहेत त्यांनीं भरून गेलेंच पाहिजे. किंबहुना अशा कल्पनांनीं त्यांचें डोकें जर वेडावून गेलें नाहीं तर पाश्चिमात्य शिक्षणाचा एक तर त्याच्या मनावर संस्कार झाला नाहीं किंवा त्यांस तें पचनीं पडण्याइतकी त्याची योग्यता नाहीं असें म्हणावें लागेल. वाघिणींचें दूध खरें, पण तें पचलें पाहिजे, आणि असे कांहीं लोक असूं शकतील कीं, या दुधानें त्यांस पुष्टी न येतां रेचच होऊं लागतील. परंतु अशा प्रकारचे दुर्बल लोक फार कमी असणार. हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गानें आज हजारों वर्षें अनेक शास्त्रांच्या गूढ तत्वांशीं व प्रमेयांशीं आपलीं डोकीं घांसून आपल्या बुद्धीस तीव्रतेचा इतका दृढ संस्कार दिलेला आहे कीं, हा एक त्यांच्या आंगचा आनुवंशिक गुणच बनलेला आहे. अशा लोकांस पाश्चिमात्य शिक्षण पचनीं पडणार नाहीं हें म्हणणें असंभवनीय होय. वर सांगितल्याप्रमाणें एखादा दुसरा लेचापेचा निपजेल; पण एकंदर हिंदुस्थानांतील लोक पाश्चिमात्य शिक्षणांतील सार व विचार आपल्या आंगीं मुरूं देऊन त्याप्रमाणें आचरण करण्यास समर्थ होणार नाहींत असें मानणें किंवा समजणें हें असमंजसपणाचें लक्षण होय. जपानी लोक आमच्यापेक्षां कांहीं अधिक बुद्धिवान नाहींत, आणि त्यांस जर पाश्चिमात्य विद्या पचनीं पडली तर ती हिंदुस्थानांतील लोकांस पचनीं पडणार नाहीं असें म्हणण्यास आधार कोणता ? ज्या सद्‌गृहस्थांनीं हिंदुस्थानांतील लोकांस पाश्चिमात्य शिक्षण देण्याचा प्रथम ठराव केला त्यांच्या डोक्यांत या कल्पना आल्या नव्हत्या असें नाहीं. हिंदुस्थानांतील बुद्धिमान लोकांस न्याय–व्याकरण–वेदान्तांच्या खटपटींतच ठेवून इंग्रजांनीं राज्य चालवावें, किंवा इंग्रजांना ज्या नवीन विद्या येत आहेत त्या शिकवून प्रजेस हुषार करावें हा त्या वेळच्या मुत्सद्यापुढें एक मोठा प्रश्न होता. कित्येकांनीं तेव्हां असे आक्षेप घेतले होते कीं, इंग्रजी इतिहास, इंग्रजी शास्त्रें, इंग्रजी राज्यपद्धत, इंग्रजी वाङ्मय यांची हिंदुस्थानांतील लोकांस एकदां ओळख झाली म्हणजे माणसाच्या रक्तास चटावलेल्या वाघाप्रमाणें हिंदी लोक स्वातंत्र्याचे, स्वतंत्र संस्थांचे, आणि सांपत्तिक वैभवाचे भोक्ते बनतील, व असें झालें म्हणजे स्वार्थाकरितां हिंदुस्थानांत आलेल्या इंग्रज लोकांच्या साम्राज्यास धक्का बसेल, ही शंका कांहीं खोटी नव्हती. कारण विद्या आणि शिक्षण ह्या दोन शक्तीच अशा आहेत कीं, बुद्धिवान माणसांस त्यांच्यायोगें वाटेल तें सामर्थ्य येऊं शकतें. स्वतंत्रतेकरतां

लढणाऱ्या लोकांचा इतिहास वाचून आपणहि स्वतंत्रतेकरतां धडपड करावी असें ज्यास वाटणार नाहीं तो विद्यार्थी नव्हे, पशू होय. विद्यादेवीची श्रद्धेनें आणि विश्वासानें जो उपासना करील त्यास ती देवी प्रसन्न झालीच पाहिजे, आणि अशा रीतीनें सदर देवीची प्रसन्नता करून घेणें हें प्रत्येक विद्यार्थ्याचें काम आहे. कळणें, आणि उमजणें, पोटांत जाणें आणि मुरणें यांमध्यें जो भेद आहे तो हाच होय. अर्थात् ज्या इंग्रजी मुत्सद्यांनीं पाश्चिमात्य शिक्षण प्रथमत: या देशांत सुरू केलें त्यांना ही भीति होतीच कीं, हें वाघिणीचें दूध पिऊन हिंदुस्थानांतील लोक केव्हांना केव्हां तरी तय्यार होऊन स्वराज्याचे हक्क मागूं लागतील. परंतु या भीतीला न जुमानतां त्या वेळच्या मुत्सद्यांनीं ह्या प्रश्नाचें असें उत्तर दिलें कीं, 'इंग्रजी शिक्षणानें हिंदी लोक स्वातंत्र्याकरितां खटपट करणारे झाले तरी बेहत्तर आहे; पण त्यांना अज्ञानांत ठेऊन राज्य करणें बरोबर नाहीं. यदाकदाचित् यांच्या स्वातंत्र्यप्रियतेनें हिंदुस्थानांतून इंग्रजी राज्य समग्र नष्ट झालें, तरी आपसांत फाटाफूट होऊन मागसलेल्या एका मोठ्या देशास स्वतंत्र देशाच्या योग्यतेस आणल्याचें श्रेय तरी इंग्लंड देशास व इंग्रजी राज्यास मिळेल !" हे विचार खरोखरच उदात्त आणि श्रेष्ठ होते. आरंभीं आरंभीं तर कित्येक मुत्सद्यांनीं असेंहि म्हटलें होतें कीं, "तुम्हांस आम्ही जें इंग्रजी शिक्षण देत आहोंत तें तुमच्या अंगीं राज्य करण्याची योग्यता यावी म्हणून देत आहों आणि ती आली म्हणजे आम्ही येथील आपले चबूगबाळें आटपून स्वदेशास परत जाऊं" ज्या लोकांनीं अशा हेतूनें व बुद्धीनें हिंदुस्थानांतील लोकांस पाश्चिमात्य शिक्षण देण्याची सुरवात केली त्यांच्या सद्धेतूची आम्हीं मोठ्या आनंदानें तारीफ करतों. परंतु दु:खाची गोष्ट ही कीं, हा सद्धेतु, ही सद्‌बुद्धि किंवा वासना शेवटपर्यंत टिकली नाहीं. आतांचा

## मनु पालटला आहे

लोभ हा मनुष्याचा सद्वासनेवर झडप घालणारा महा प्रबल शत्रु आहे. 'लोभमूलानि पापानि' असें जें एक महावाक्य आहे तें किती खरें आहे याची इयत्ता करणें कठीण आहे, व म्हणूनच याची महावाक्यांत गणना झालेली आहे. इंग्रजी शिक्षणाची या देशांत सुरवात होऊन लोकांचे डोळे थोडे थोडे उघडूं लागले हें खरें, पण त्याचबरोबर या देशांतील इंग्रजी राज्यव्यवस्थेची हळूहळू अशा रीतीनें वाढ होऊं लागली कीं, आमच्या देशांतील सर्व व्यापार, संपत्ति आणि कर्तृत्व यांस ऱ्हास होऊं लागला, व कोटयवधी रुपये विनमोबदला या देशांतून विलायतेस जाऊन तेथील व्यापाराची व कर्तृत्ववान पुरुषांची वाढ होऊं लागली. परोपकाराच्या गोष्टी सोप्या आहेत, पण दरसाल होत असणारा कोटयवधी

रुपयांचा फायदा बुडविण्याचा प्रसंग आल्यावर असा कोण मायेचा पूत आहे कीं, तो दुसऱ्यास म्हणेल कीं, "बाबा, हें सर्व तुझेंच आहे. मी आजपर्यंत जो उपभोग घेत होतों तो अन्यायाचा होता, आतां हें सर्व तुझें तूंच घेऊन त्याचें संरक्षण कर." इंग्रजी राज्यकर्ते आणि अधिकारी यांच्यावर सध्यां आलेला प्रसंग अशांतलाच आहे, आणि सामान्य मनुष्यस्वभावाप्रमाणें आपल्या हातचें वैभव व फायदा खुषीनें सोडण्यास ते तयार नाहींत, इतकेंच नव्हे तर जगाच्या राहाटीकडे पाहतां त्यांनीं कां तयार व्हावें, हेंहि आम्हांस समजत नाहीं. याचा परिणाम असा झाला कीं, ज्या पाश्चिमात्य विद्येच्या योगानें ह्या गोष्टी थोडयाबहुत आम्हांस कळूं लागल्या तिची पूर्वसंकल्पाप्रमाणें अधिकाधिक वाढ करण्याचें सोडून देऊन हें वाघिणीचें दूध पानचट कसें बनवितां येईल या उद्योगास लॉर्ड कर्झनसारखे मुत्सद्दी लागलेले आहेत. गेल्या लेखांत वळू घोडयाचा दृष्टांत देऊन ज्या विद्याखात्यांतील सरकारी धोरणावर टीका केली आहे तें धोरण हेंच होय, पूर्व मुत्सद्यांनी संकल्पित केलेलें नव्हे. हिंदुस्थानांतील विद्याखात्याच्या किंवा विद्याप्रसाराच्या इतिहासाकडे नजर दिली तर आमच्या म्हणण्याची सत्यता कोणासहि कळून येणार आहे. शिक्षण हिंदुलोकांस दिल्यानें ते स्वातंत्र्यप्रिय झाले तर इष्टसिद्धीच झाली असें म्हणणारे मुत्सद्दी लवकरच निघून गेले, आणि त्यांच्या मागून ज्यांच्या हातांत राज्यसूत्रें पडलीं त्यांना हिंदी लोकांवर होत असलेले शिक्षणाचे हे परिणाम इष्ट वाटले नाहींत. सर रिचर्ड टेंपल यांनीं एका ठिकाणीं असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, इंग्रजी शिकलेले विद्वान लोक स्वातंत्र्यप्रिय न होतां इंग्रजी राज्यास मदत करणारे बनतात हें एक सुचिन्हच होय. याच धोरणानें विद्याखातें पुढें पुढें चालविण्यांत आलें. ज्या इंग्रजी सरकारास कोटयावधी रुपये सरहद्दीवर किंवा लष्करावर खर्च करतां येतात त्याला हिंदुस्थानांतील प्रजेच्या शिक्षणाकरितां निदान दहा पंधरा कोट रुपये दरसाल काढून देशांतील सर्व लोक गेल्या शंभर वर्षांत सुशिक्षित करतां आले नसते काय? पण नाहीं, पहिली बुद्धि कायम राहिली नाहीं, व त्यामुळें सद्‌बुद्धीनें उपस्थित केलेल्या विद्याखात्याचेंहि मातेरें होऊन या खात्यांतील अधिकारी विद्वान् प्रोफेसरहि कर्झनसारख्या कोत्या बुद्धीच्या व धोरणाच्या मुत्सद्यांच्या जाळयांत सांपडून स्वतः अनुदार बनून गेले आहेत. सुमारें पंचवीसतीस वर्षांपूर्वीं– म्हणजे ज्या वेळीं आमच्या प्रांतांत कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि त्यांचे साथीदार यांनीं खासगी शाळांची स्थापना केली तेव्हां अशी स्थिति नव्हती, निदान उघडपणें तरी सरकार हल्लींप्रमाणें बोलावयास लागलें नव्हतें. ही खासगी शाळा किंवा कॉलेज जेव्हां या प्रांतांत निघालें तेव्हां "शिक्षण राष्ट्रीय होण्यास तें राष्ट्रांतील लोकांच्याच हातांत असलें पाहिजे" हें

तत्व खासगी शाळांच्या तर्फे गव्हर्नरसाहेबांसारख्या मोठ्या अधिकाऱ्यापुढें सार्वजनिक समारंभाचे वेळीं जोरानें प्रतिपादन करण्यांत येत असे, व लॉर्ड रे किंवा सर जेम्स फर्ग्यूसन यासारखे बडे अधिकारीहि या तत्वाचा आमच्या लोकां-समक्ष मोठा गौरव करीत. इतर इलाख्यांतहि याचप्रमाणें स्थिति होती, हें १८८१।८२ सालीं बसलेल्या एज्युकेशन कमिशनच्या रिपोर्टांवरून नजरेस येईल. 'इंग्रज सरकारास आपल्या सर्व प्रजेस शहाणें करून सोडावयाचें आहे, परंतु पैशाच्या अडचणीमुळें त्यांच्या मनाप्रमाणें हें कार्य त्यांच्या हातून होत नाहीं, सबब स्वार्थत्याग करून या कामीं सुशिक्षित लोक जर पुढें येतील तर त्यांचें साहाय्य घेण्यास, किंबहुना शिक्षणाचें काम सर्वस्वी त्यांचे हातीं देण्यास, सरकार तयार होईल. अशा तऱ्हेचे उद्‌गार मुंबईच्या गव्हर्नरासारख्या जबाबदार अधिकाऱ्यांनीं त्यावेळीं काढलेले आहेत. उद्‌गार काढले इतकेंच नव्हे तर त्यावेळीं महाराष्ट्रांतील इंग्रजी शिक्षण देण्याचें जें आदिपीठ, म्हणजे डेक्कन कॉलेज, तें सर्वस्वी येथील डेक्कन एज्युकेशन सोसाय-टीच्या ताब्यांत देण्यास त्या वेळचे डायरेक्टर मि. चाटफील्ड व गव्हर्नर लॉर्ड रे तयार होऊन याबद्दल आपापसांतील करारमदाराचा खर्डाहि तयार झालेला होता. लॉर्ड रे यांस असें वाटत होतें कीं, ठिकठिकाणचीं हायस्कुलें जर सरकारास येत असणाऱ्या खर्चाच्या निम्में खर्चानें खासगी संस्थांनीं चालविलीं तर त्यांस तीं चालवूं देऊन शिल्लक राहिलेल्या पैशांतून मुंबई येथील व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिटयूटसारख्या धंदेशिक्षणाच्या अधिक शाळा काढाव्या. परंतु आमचे पुढारी लोकच सर्व शिक्षण खासगी शाळांच्या ताब्यांत देण्यास त्यावेळीं नाखूप असल्या-मुळें हा बेत सिद्धीस गेला नाहीं. नाहींपेक्षां आज सर्व मुंबई इलाख्यांत इंग्रजी शिक्षणाचें काम आमच्या लोकांच्या हातांत आलें असतें. खाजगी शाळांत सरकारी ग्रँट किंवा मदत घेण्याची या वेळीं जी भीति किंवा शंका वाटली नाहीं त्यांचें कारण तरी हेंच होय. राजद्रोहाचा बागुलबोवा त्या वेळच्या डायरेक्टराच्या किंवा गव्हर्नरसाहेबांच्या डोक्यांत शिरलेला नव्हता, अर्थात् खाजगी शाळांचें स्वातंत्र्य कायम ठेऊन द्रव्यद्वारा त्यांस मदत करण्यास ते तयार होते. परंतु ही स्थिति आतां राहिलेली नाहीं. ज्या लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीत १८८१।८२ मध्यें एज्युकेशन कमिशन बसलें त्या कारकीर्दीची समाप्ति झाल्यावर लवकरच पुन्हा पिछेहाटीचें धोरण सुरू झालें, व त्यांस लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दीत ऊत येऊन खाजगी शाळा व कॉलेजें यांस सरकारी विद्याखात्याचें दास्यत्व पतकरावें लागलें. हिंदुस्थानांतील सुशिक्षित तरुण पिढी अधिकाधिक स्वातंत्र्यप्रिय होणें इष्ट नाहीं आणि ज्या कारणांनीं हा दोष त्यांच्या आंगीं येतो तीं कारणें पाश्चि-

मात्य शिक्षण देण्याचा क्रम हल्लींच्यापेक्षा अधिक मर्यादित केल्याशिवाय दूर होणार नाहींत अशा कल्पना कर्झनसारख्या मुत्सद्यांच्या मनांत येऊन त्याप्रमाणें कायदे वनून त्यांचा अंमलहि सुरू झाला आहे. हें धोरण अखेर यशस्वी होणार नाहीं याबद्दल आम्हांस बिलकुल शंका नाहीं. लॉर्ड कर्झन येवो किंवा त्यांचे वडील येवोत इंग्रजी वाङ्मयाच्या किंवा इतिहासाच्या शिक्षणानें देशांतील तरुण पिढीच्या मनांत जी महत्वाकांक्षा उत्पन्न झालेली आहे व जिच्या सिद्धयर्थ उद्योग करण्यास तरुण पिढी तयार आहे, ती शाळेंतील शिस्तीच्या (डिसिप्लिन) सबबीवर दावून टाकण्याचा प्रयत्न आतां सफल होणें शक्य नाहीं. आजपर्यंत मिळत आलेल्या पाश्चिमात्य शिक्षणानें देशांतील सुशिक्षित वर्गाच्या मनांत जे विचार घोळूं लागले आहेत त्यांचें पूर्वीच्या मुत्सद्यांनीं म्हटल्याप्रमाणें अभिनंदन करून ते हेतु पुरे करण्यास मदत करणें हेंच हल्लींच्या स्थितींत सरकारचें कर्तव्य आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ही पूर्वीची सद्‌बुद्धी कायम न राहतां सत्तेच्या जोरावर या देशांतील शिक्षणाच्या घड्याळाचे कांटे मागें सारण्याचा वेडगळपणाचा प्रयत्न हल्लीं चालू झाला आहे. अशा वेळीं म्हणजे सरकारचें पूर्वीचें धोरण बदललें आहे असें ढळढळीत नजरेस आल्यावर, आमच्या लोकांनीं आमच्या पैशावर स्वार्थत्यागानें शिक्षणाच्या ज्या खासगी संस्था काढलेल्या आहेत त्यांनीं पुढें कोणतें धोरण स्वीकारावें हा एक मोठा महत्वाचा प्रश्न आहे, आणि त्याचा विचार सर्वांनीं शांतपणें केला पाहिजे. लोकांनीं आपल्या पदरचे पैसे देऊन सरकारास जी मदत करावयाची ती सरकारच्या मर्जीप्रमाणें तरुण पिढी दास्यत्वांत ठेवण्याकरितां नव्हे; आणि सरकारचें पूर्वीचें धोरण जर पालटलें आहे तर कुलंग्या कुत्र्याप्रमाणें केवळ सरकारच्या मागें जाणें यांत आतां पुरुषार्थ राहिला नाहीं, हें आम्ही पूर्णपणें लक्षांत ठेवलें पाहिजे. आम्ही जो या प्रश्नाचा विचार करणार आहों तो याच दृष्टीनें होय. खासगी शिक्षणसंस्थांची पंचवीस वर्षांपूर्वी जी स्थिति होती ती आतां राहिली नाहीं, एवढी गोष्ट लक्षांत आली म्हणजे या संस्थांनीं पुढें काय करावें याबद्दल फारसा मतभेद होईल असें आम्हास वाटत नाहीं; व याचसाठीं आजच्या लेखांत गेल्या पंचवीसतीस वर्षांतील सरकारी विद्याखात्यांतील धोरणाच्या स्वरूपाचें दिग्दर्शन केलें आहे. हें लक्षांत ठेविलें म्हणजे पुढें आम्ही जें सांगणार आहों त्याबद्दल गैरसमज होण्याचें कारण उरणार नाहीं.

हा उद्दामपणा जर आम्ही चालूं दिला तर पुढें कोणतीहि चळवळ सिद्धीस जाण्याची आशा नको. अशा वेळीं हा नामर्दपणा होय. इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, “ इच्छा प्रबळ असली म्हणजे ती सिद्धीस नेण्याचा मार्ग सांपडतोच

सापडतो." आमच्या राजकीय उन्नतीची इच्छा अशा प्रकारची प्रबल आहे हें प्रतिपक्षाच्या नजरेस आणून देणें हें सध्या जितकें जरूर झालें आहे, तितकें पूर्वीं कधींच नव्हतें; आम्हांस अशी उमेद आहे कीं, आमचे राजकीय पुढारी ही गोष्ट लवकरच सर्व जगाच्या अनुभवास आणून देतील. "नान्य: पन्था विद्यते अयनाय"

## राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी, क्रमांक ३

[२९ जानेवारी १९०७.]

या विषयावर मागें जे दोन लेख लिहिले त्यांत सरकारी शाळेंतून किंवा कॉलेजांतून हल्लीं चालू असलेलें शिक्षण अपुरें कां व कसें याचें विवेचन केलें आहे. सरकारचे हेतु पहिल्यानें कितीहि चांगले असले तरी हल्लीं हिंदुस्थानांतील लोकांस मिळत असलेलें पाश्चिमात्य शिक्षण शक्य तेवढें शिळपट करण्याची सरकारची प्रवृत्ति झालेली आहे; व त्याप्रमाणें खुद्द सरकारचीच नव्हे, तर त्यांच्या लुबऱ्या रावबहादुरांचीहि खटपट चालू आहे हें निर्विवाद आहे. या सर्व गोष्टींचा खल गेल्या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत व्हावयाचा असल्यामुळें या विषयावर जास्त लिहिण्याचें आम्हीं तहकुब ठेवलें होतें. आम्ही अदमास केल्याप्रमाणें सरकारी शिक्षणांतील व्यंगें राष्ट्रीय सभेस मान्य झालीं, इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय शाळा काढून लोकांनीं आपापल्या मतें योग्य तें शिक्षण पुढील पिढीस देण्याची स्वतंत्र रीतीनें व्यवस्था केली पाहिजे असाहि ठराव राष्ट्रीय सभेंत सर्वानुमतें मंजूर झालेला आहे. हा ठराव आजपर्यंत राष्ट्रीय सभेंत शिक्षणासंबंधानें जे ठराव होत असत त्याहून भिन्न प्रकारचा आहे. आतांपर्यंत प्राथमिक किंवा वरिष्ठ प्रतीच्या शिक्षणासंबंधानें अथवा धंदेशिक्षणासंबंधानें सरकारानें अमुक अमुक गोष्टी केल्या पाहिजेत असें ठराव राष्ट्रीय सभेंत होत असत. व कधीं कधीं त्याप्रमाणें सरकाराकडे या सूचनाहि पाठविण्यांत येत असत. गेल्या डिसेंबर महिन्यांत राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें जो ठराव कॉंग्रेसमध्यें पास झाला आहे, त्यांत आणि वरील ठरावांत पुष्कळ अंतर आहे. सरकारानें अमुक गोष्टी कराव्या असें म्हणण्याऐवजीं लोकांनीं काय करावें हें राष्ट्रीय सभेनें आतां सांगितलें आहे. आणि ज्या अर्थीं राष्ट्रीय सभा ही लोकांचीच संस्था आहे त्या अर्थीं या ठरावाच्या अंमलबजावणीचें काम बऱ्याच अंशीं राष्ट्रीय सभेकडेच येतें हें सांगण्याची जरूर नाहीं. पूर्वींच्या आणि आतांच्या ठरावांत भेद आहे तो हाच; आणि आम्हास अशी उमेद आहे कीं, राष्ट्रीय शिक्षणाचा हा प्रश्न उत्तरोत्तर अधिकाधिक हातीं घेऊन सर्व देशभर स्वतंत्र राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्था स्थापण्याचें श्रेय राष्ट्रीय सभा लवकरच संपादन करील.

असो; राष्ट्रीय सभा काय करील किंवा करणार नाहीं याचा विचार तूर्त आपणांस कर्तव्य नाहीं. सरकारी शाळांतून मिळत असलेलें शिक्षण भावी पिढीचा तेजोभंग व निरुत्साह करण्याकरितां मुद्दाम वेडचावाकडचा रीतीनें दिलें जात आहे एवढी गोष्ट जर निर्विवाद आहे तर लोकांनीं या गोष्टीकडे आणखी किती दिवस दुर्लक्ष करावयाचें हा एक आपल्यापुढें मोठा प्रश्न आहे. मागच्या लेखांत आम्ही सांगितलेंच आहे कीं, पंचवीस वर्षांपूर्वी या प्रांतांत न्यू इंग्लिश स्कूल किंवा फर्ग्युसन कॉलेजसारख्या खाजगी शिक्षणाच्या संस्था निघाल्या तेव्हां सरकारची मनोवृत्ती हल्लींप्रमाणें पालटलेली नव्हती आणि त्यामुळें सरकारच्या मदतीवरोबर हल्लीं ज्याप्रमाणें एक प्रकारचें पारतंत्र्य स्वीकारावें लागतें तसा प्रकार तेव्हां दृष्टोत्पत्तीस येत नव्हता. हा मनु आतां पालटला आहे; आणि सरकारचें धोरण बदलल्यामुळें लहानमोठ्या सर्व सरकारी अधिकाऱ्यांची अशी इच्छा झाली आहे कीं, खाजगी शाळांतील शिक्षण देखील होईल तितक्या रीतीनें सरकारी शिक्षणाच्या शिळपट पद्धतीनें दिलें जाईल अशी व्यवस्था ठेवावी. 'ज्याचा पैसा त्याची सत्ता' हें तत्त्व ग्रॅन्ट इन एड घेणाऱ्या शाळांना लागू करून सरकारी आणि खासगी अशी जीं शिक्षणाचीं दोन द्वारें तीं दोन्हीं पूर्णपणें आपल्या कवजांत घेण्याची सरकारानें व्यवस्था केली आहे. सरकारी विद्याखात्याचा वरवंटा क्रमिक पुस्तकांवर फिरून तींहि पानचट, महाग, आणि विदेशी करून सोडलीं आहेत, आणि जर एखादी खासगी संस्था सरकारी क्रमास सोडून निराळ्या रस्त्यानें जाऊं म्हणेल तर सरकारी मदत तिला मिळावयाची नाहीं, इतकेंच नव्हे तर, नवीन युनिव्हर्सिटी नियमाप्रमाणें या शाळेंतील मुलेंहि युनिव्हर्सिटी परीक्षेस बसूं दिलीं जाणार नाहींत असा बंदोबस्त झालेला आहे. सारांश शिकाल तर आमच्या पद्धतीप्रमाणें शिका, नाहीं पेक्षां तुम्हांस परिक्षेस बसूं दिलें जाणार नाहीं, आणि नोकऱ्याहि देणार नाहीं, अशा प्रकारचा जुलूम सध्यां सरकारनें मांडलेला आहे. जुलूम हा शब्द आम्ही जाणून-बुजून वापरीत आहों; कारण आमची अशी समजूत आहे कीं, शारीरिक जुलमापेक्षां मानसिक जुलूम अतिशय भयंकर असतो! पंचतंत्रांत एके ठिकाणीं असें सांगितलें आहे कीं, कोणीहि शत्रूस जिकावयाचें असल्यास त्याच्याजवळचीं हत्यारें हिसकावून घेण्यापेक्षां साधल्यास त्याची बुद्धि भ्रष्ट करणें अधिक फायदेशीर असतें. इंग्रजसरकार आपलें वर्तन अलीकडे याच तत्त्वावर ठेवूं लागलें आहे. इंग्रजी शिक्षणामुळें नवीन पिढी विघडत चालली – म्हणजे स्वतंत्रता व राजकीय हक्क प्राप्त होण्याकरितां इच्छा बाळगूं लागली किंवा उद्योग करूं लागली – हें कांहीं चांगलें नाहीं असें वाटून मुळांतच या गोष्टीचा

बंदोबस्त केल्यास बरें, अशा समजुतीनें विद्याखात्याचे सरकारी अधिकारी, मग ते गोरे असोत, किंवा काळे असोत, आपापलीं कामें सध्यां करीत आहेत. काळ्यांना या गोष्टी कळत नाहींत असें नाहीं. पण नोकरीच्या पारतंत्र्यामुळें व पोटाची खळी स्वतंत्र रीतीनें भरण्याची उमेद नसल्यामुळें यांपैकीं कांही मंडळी अगदीं निर्लज्ज बनून गोऱ्या कामगारांपुढें गोंडा घोळूं लागलीं आहेत. ही शोचनीय स्थिति बदलण्यास एकच मार्ग आहे; तो हा कीं, सरकारी शाळा सोडून देऊन स्वतंत्र खासगी शाळा काढणें. खासगी शाळा आजपर्यंत बऱ्याच निघालेल्या आहेत, नाहींत असें नाहीं. पुणें, नगर, सातारा, रत्नागिरी, धारवाड, सुरत, अहमदाबाद वगैरे या इलाख्यांतील प्रमुख प्रमुख ठिकाणीं खाजगी शाळा चालू आहेत ; व द्रव्याच्या मानानें त्यांची स्थिति जरी भरभराटीची नसली तरी शिक्षणाच्या मानानें त्यांची योग्यता सरकारी शाळांच्या बरोबरीनें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. किंबहुना पंचवीस वर्षांपूर्वीं सरकार आपण होऊन आपल्या इंग्रजी शाळा या खासगी संस्थांकडे देण्यास तयार झालेलें होतें. अर्थात् या खासगी शाळा देशांतील तरुण पिढीस योग्य शिक्षण देण्यास समर्थ आहेत याबद्दल शंका घेण्याचें आतां कोणासहि कारण उरलेलें नाहीं. प्रश्न काय तो एवढाच आहे कीं, या खासगी शाळा सरकार सांगेल किंवा ठरवील तेंच तुणतुणें गात बसणार किंवा देशांतील लोकांस हल्लींच्या स्थितींत जें आवश्यक आणि उपयुक्त तसें शिक्षण स्वतंत्र रीतीनें देण्यास तयार होणार? आम्ही हा जो प्रश्न विचारतों तो केवळ या इलाख्यापुरताच विचारतों असें कोणी समजूं नये, तर बंगाल, मद्रास, पंजाब, वायव्यप्रांत, मध्यप्रांत या इलाख्यांसहि हीच गोष्ट लागू आहे ; व ठिकठिकाणीं सध्यां हाच प्रश्न उपस्थितहि झालेला आहे. बंगाल्यात स्वदेशी चळवळीमुळें या प्रश्नाचें पाऊल इतर प्रांतांपेक्षां पुढें पडलेलें आहे ; आणि राष्ट्रीय सभेनें ज्या अर्थी आतां शिक्षणाची ही दिशा मंजूर केली आहे त्या अर्थी बंगालचें अनुकरण करण्यास इतर प्रांतांनींहि प्रयत्न केला पाहिजे. नवऱ्याच्या मागें बायकोप्रमाणें सरकारी शाळांच्या मागून खासगी शाळांनीं जाण्याचे दिवस आतां उरले नाहींत. खासगी शाळांस सरकारची मदत मिळते ही गोष्ट खरी आहे ; पण या शाळा लोकांच्या पैशानें किंवा स्वार्थत्यागी पुरुषांच्या उद्योगानें निघाल्या व चाललेल्या आहेत हें तत्त्व विसरतां कामा नये. सरकारनें शिळपट शिक्षणपद्धति स्वीकारली तर खासगी शाळांनींहि ती पद्धत स्वीकारावी एवढ्याकरितां कांहीं खासगी शाळा निघालेल्या नाहींत आणि एवढ्याकरितां त्या काढणारांनीं स्वार्थत्यागहि केलेला नाहीं. सरकार जर आपली पद्धति सुधारीत नसेल तर खाजगी शाळांनीं सरकारापासून आपली

फारकत करून घेतली पाहिजे. सरकारच्या गोटांत शिरून आमच्या लोकांच्या माना मुरगळण्याचे किंवा तेजोभंग करण्याचे दिवस निघून गेले. सरकारी शिक्षण आम्हांस नको आहे. एक तर तें जाणुनबुजून शिळपट करण्यांत आलेलें आहे, आणि दुसरें कारण असें कीं, औद्योगिक किंवा धंदेशिक्षणासंबंधानें सरकारानें जाणुनबुजून मूग गिळलेले आहेत. सरकारी शाळांतून हल्लीं जें शिक्षण मिळतें तें केवळ कारकुनी पेशाचें आणि त्यांतल्या त्यांतहि शिळपटी कारकुनी पेशाचें मिळत असतें. देशांतील सर्व तरुण पिढीस जर हेंच शिक्षण मिळत राहील तर देशाचें डोकें कधींहि वर निघण्याचा संभव नाहीं. यासाठीं हल्लीं ज्या खासगी शाळा ठिकठिकाणीं निघालेल्या आहेत त्यांच्या व्यवस्थापकांनीं या गोष्टीचा विचार करून आपल्या अंगावर जी नवीन जबाबदारी आलेली आहे त्यांतून कसें पार पडावें याचा विचार केला पाहिजे. या शाळांच्या चालकांनीं बराच स्वार्थत्याग करून त्या आजपर्यंत चालविल्या आहेत ही गोष्ट आम्हास मान्य आहे; पण हा त्यांचा स्वार्थत्याग त्यांच्या पालटलेल्या सरकारी धोरणामुळें आमच्याच नाशास आतां कारणीभूत होऊं लागला आहे. सबंध राष्ट्रांत सरकारी धोरणाप्रमाणेंच नवीन पिढींतील माणसें तयार व्हावीं, दुसऱ्या प्रकारचें वळण दाखविणारा कोणीच असूं नये, ही मोठ्या दुर्दैवाची आणि भयंकर गोष्ट होय. हा बंडुनाना किंवा लॉंगमनी अगर मॅकमिलनी कित्ता आतां नको आहे ; व दुसरा कित्ता घालून देण्याचें काम व जबाबदारी सर्वस्वी खासगी शाळांची इतकेंच नव्हे तर खाजगी शाळा याप्रमाणें वागण्यास तयार नसतील तर लोकांनीं या खासगी शाळांस दिलेली मदत काढून घेऊन नव्या खासगी शाळा काढल्या पाहिजेत. नवीन पिढीस बायकी बनविण्याचा क्रम सरकारानें पतकरला आहे तेवढा बस्स आहे. ज्या गृहस्थांस आपलीं मुलें याच क्रमांत वाढलेलीं पाहिजे आहेत त्यांनीं सदर मुलें पाहिजे तर सरकारी शाळेंत खुशाल पाठवावीं, पण ज्यांना आतां या गोष्टीचा वीट आला आहे किंवा येत चालला आहे त्यांनीं नवीन खासगी शाळा काढण्याची खटपट चालू ठेविली पाहिजे. प्रो. विजापूरकर यांच्या ‘ समर्थ विद्यालया’चें आम्ही एवढ्याकरितां अभिनंदन करतों ; व हल्लीं चालू असलेल्या खासगी शाळांच्या चालकांस असें विचारतों कीं, त्यांनीं या नव्या पद्धतीचें कां अनुकरण करूं नये ? सरकाराकडून खासगी शाळांस जी मदत मिळते तितकी मदत लोकांकडून वर्गणीनें मिळणें अशक्य नाहीं. आणि यदाकदाचित् ही मदत सध्यां थोडीशी कमी मिळाली तरी विषयाचें महत्त्व लक्षांत आणून खासगी शाळांच्या चालकांनीं या कामीं थोडी अधिक झीज सोसण्यासहि तयार झालें पाहिजे. सरकारापाशीं फारकत

करून अशा रीतीनें स्वतंत्र शाळा चालविली तर युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस या शाळांतील विद्यार्थी घेणार नाहींत ही गोष्ट खरी आहे; व त्यामुळें नव्या रीतीनें चाललेल्या खासगी शाळांत विद्यार्थ्यांचा मोठा भरणाहि पहिल्यानें व्हावयाचा नाहीं. परंतु बंगालच्या अनुभवावरून पाहतां ही भीति बाळगण्याचें फारसें कारण नाहीं असें स्पष्ट दिसून येतें. बंगाल्यांत ' नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन ' किंवा ' राष्ट्रीय शिक्षण परिषद ' या नांवाची संस्था गुदस्ता एक निघून तिचे मार्फत एक स्वतंत्र कॉलेज, आणि कलकत्ता, डाका, रंगपूर, मेमनसिंग, कोमिला, दिनाजपूर, किशोरगंज व चांदपूर या आठ ठिकाणीं हायस्कुलें निघालेलीं आहेत; आणखी तीन ठिकाणीं लवकरच निघणार आहेत. या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे सरकारी युनिव्हर्सिटीप्रमाणेंच अध्यक्ष, उपाध्यक्ष, कौन्सिल, सेक्रेटरी वगैरे कामगार नेमलेले असून एक वर्षांत दहा बारा लक्ष रुपयांचा फंड त्यांनीं गोळा केलेला आहे. गुदस्त सालीं सर गुरुदास बानर्जी हे अध्यक्ष होते व यंदा डॉ. राशबिहारी घोस हे अध्यक्ष झालेले आहेत. राष्ट्रीय कॉलेजचे मि. अरविंद घोस हे प्रिन्सिपाल असून त्यांच्या हाताखालीं कलकत्ता युनिव्हर्सिटीची नामांकित तरुण ग्राज्युएट मंडळी थोड्या पगारावर प्रोफेसरीचें काम करण्यास पुढें आलेली आहेत. या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचा सरकारच्या युनिव्हर्सिटीशीं कांहीं एक संबंध नाहीं. यांचा अभ्यासक्रम आणि परीक्षा स्वतंत्र आहेत. गुदस्त सालीं यांच्या परीक्षेस ७२० उमेदवार बसले होते; आणि यंदाहि जून महिन्यांत या परीक्षा व्हावयाच्या आहेत. वर सांगितलेले राष्ट्रीय कॉलेज आणि आठ हायस्कुलांत मिळून एकंदर सुमारें दोन हजार विद्यार्थी या नवीन आणि स्वतंत्र शिक्षणक्रमाप्रमाणें अभ्यास करीत आहेत, आणि ते सर्व सरकारच्या परीक्षा किंवा सरकारची नोकरी याबद्दल पर्वा न करणारे आहेत. या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचें वार्षिक उत्पन्न पन्नास हजार रुपये झालें असून या उत्पन्नांतून कलकत्ता येथें एक कॉलेज व हायस्कुल चालवून रंगपूर वगैरे इतर ठिकाणच्या राष्ट्रीय हायस्कुलांस मदत करण्यांत येते. कलकत्त्यांतील राष्ट्रीय कॉलेज व हायस्कूल यांस जोडून एक धंदेशिक्षणाचीहि शाळा काढलेली आहे; व लवकरच व्यापारी शिक्षणाची सोय करण्याचा कमिटीचा विचार आहे. लायब्ररी व लॅबोरेटरी किंवा प्रयोगशाळा उभारण्याचें काम सुरू असून थोड्या वेळांत ती पूर्णावस्थेस येईल असा अदमास आहे. या सर्व खटाटोपींत पश्चिम बंगाल्यापेक्षां पूर्व बंगाल्यानें म्हणजे फुल्लरखानाच्या प्रांतानें अधिक पुढाकार घेतलेला आहे; व सर गुरुदास बानर्जीसारख्या विद्वान व अनुभवी गृहस्थाच्या प्रोत्साहनानें व सल्ल्यानें हें काम मोठ्या झपाट्यानें चालू आहे. कलकत्त्यामध्यें या कामाबद्दल कांहीं लोकांस

इतकी कळकळ आहे कीं, बाबू हिरेंद्रनाथ दत्त किंवा चौधरी यांच्यासारखे सॉलिसीटर किंवा बॅरिस्टर हे आपल्या उत्पन्नांतून दरमहा दोन तीनशें रुपये या संस्थेकडे देत असतात. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं आपलें कॉलेज या संस्थेस जोडतों म्हणून कबूल केलें आहे; पण अद्याप तसें केलें नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. अलाहाबादचे पंडित मदन मोहन मालवीय यांनीं हिंदु विश्वविद्यालय स्थापण्याची १९०५ सालच्या डिसेंबरांत मोठी गडबड केली होती. 'पण गर्जेल तो पडेल काय' या न्यायानें त्यांच्या हातून त्या संबंधानें अद्याप कांहीं झालें नाहीं. कलकत्त्याच्या किंवा पूर्व बंगालच्या लोकांनीं मात्र या कामीं आघाडी मारून खऱ्या राष्ट्रीय शिक्षणास प्रत्यक्ष सुरुवात करून दाखविली आहे. सरकारी युनिव्हर्सिटीच्या परिक्षेकरितां मुलें तयार करण्याचें काम सोडून दिलें तर राष्ट्रीय शाळेंत विद्यार्थी येणार नाहींत अशी भीति आतां राहिली नाहीं, किंवा अशा शाळांस लोकांकडून उत्तेजन मिळणार नाहीं हाहि प्रश्न शिल्लक उरला नाहीं. पूर्व बंगाल्यांतील लोकांनीं या दोन्हीं प्रश्नांचा समाधानकारक निकाल लावला आहे. सरकारी शिक्षणाचे दोन दोष : (१) शिळपटपणा, आणि (२) उपयुक्त शिक्षणाचा अभाव; हे दोन्ही दोष काढून टाकून सरकारवर अवलंबून न राहातां स्वतंत्र शाळा व स्वतंत्र परीक्षा पूर्व बंगाल्यांतील विद्वान लोकांनीं सुरू केल्या आहेत, व एक वर्षाच्या मानानें पाहिलें तर त्यांस पुष्कळ यशहि आलेलें आहे. अशा तऱ्हेचा अनुभव डोळ्यापुढें असतां आमच्या प्रांतांतील लोकांनीं सरकारी वेसण नाकांत बाळगून केवळ अंध परंपरेनें खासगी शाळांचा अभ्यासक्रम आजपर्यंत चालत आला तसाच ठेवावयाचा कीं सुधारावयाचा हा अत्यंत महत्त्वाचा व जबाबदारीचा प्रश्न आज उपस्थित झाला आहे. राष्ट्रामध्यें एक प्रकारची जागृति उत्पन्न झालेली आहे; आणि या जागृतीला खासगी शाळा व कॉलेजें जर मदत करणार नाहींत, किंबहुना ह्या जागृतीच्या अभिवृद्धीस साधनीभूत किंवा कारणीभूत होणार नाहींत तर लोकाश्रयास त्या इतउत्तर पात्र होणार नाहींत अशी वेळ आलेली आहे. या स्थितीचा विचार व्हावा या हेतूनेंच आम्ही या विषयावरील तीन लेख लिहिले आहेत; व आम्हांस यासंबंधानें, विशेषेंकरून महाराष्ट्रांतील संस्थांसंबंधानें, ज्या सूचना करावयाच्या आहेत त्या पुढील लेखांत करून आम्ही हा विषय पुरा करणार आहों.

## ७. चतकोर भाकरीची गुलामगिरी !

[ ३० जुलै १९०७ ]

मागें ' राष्ट्रीय शिक्षण व खासगी शाळांची जबाबदारी " या विषयावर आम्ही जे लेख लिहिले होते ते वाचकांस माहीत असतीलच. हे लेख गेल्या कॉंग्रेस सभेच्या पूर्वीं लिहिलेले होते. कॉंग्रेस सभेंत राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा-संबंधानें ठराव मंजूर झाल्यावर त्याची आमच्या इलाख्यांतील प्रांतिक सभेंत कशी काय व्यवस्था लागते हें पाहून नंतर आम्ही या विषयावरील शेवटचा लेख लिहिणार होतों ; परंतु सुरतच्या प्रांतिक सभेंत हा विषय कमिटींत घालण्यांत आल्यामुळें इतके दिवस वाट पाहावी लागली. प्रांतिक सभेंत नेमलेली ही कमिटी गेल्या शुक्रवारीं सर फेरोजशहा मेथा यांच्या खोलींत जमून तिनें असा ठराव केला कीं, ' लोकशिक्षणाचें काम राष्ट्राच्या दृष्टीनें लोकांच्याच ताब्यांत असणें जरूर आहे म्हणून, आणि सरकार खासगी व सरकारी शाळांवर अधिक करडी नजर ठेवूं लागले आहे म्हणून, लोकांनीं राष्ट्रीय शाळा काढणें जरूर आहे. ' हा ठराव प्रांतिक सभेंतच मंजूर होण्यास कांहीं हरकत नव्हती. पण मेथासाहेबांची तब्येत नीट नसल्यामुळें मुंबई इलाख्यांत असा ठराव होण्यास इतके दिवस गोते खावे लागले ! असो; आतां तरी या बाबतींत आमच्या इलाख्यांतील प्रांतिक सभेचें आणि राष्ट्रीय सभेचें एकमत झालें हें सुदैवच समजलें पाहिजे. आतां या विषयावरील शेवटचा लेख लिहिण्यास हरकत नाहीं; पण प्रसंगानें उपस्थित झालेल्या कांहीं गोष्टींमुळें या विषयाचा दुसऱ्या एका बाजूनें सध्यां विचार करणें जरूर आहे ; व तोच आज करण्याचा आमचा विचार आहे.

हा प्रसंग म्हटला म्हणजे हिंदुस्थान सरकारनें काढलेलें विद्यार्थ्यांसंबंधीचें सर्क्युलर आणि त्याची पोलिस खात्यांतील अधिकारी यांच्यामार्फत होत असलेली कडक अंमलबजावणी हा होय. बंगाल्यांत पुष्कळ विद्यार्थ्यांनीं हें सर्क्युलर धाब्या-वर बसविलें आहे. आणि खाजगी शाळांच्या चालकांनीं त्याविरुद्ध सरकारास अर्ज केले आहेत. मद्रास इलाख्यांतील राजमहेंद्री प्रकरणांत जे विद्यार्थी सांपडले त्यांस शिक्षा करण्याकरितां सरकारांतून युनिव्हर्सिटीस लिहून गेल्यावर युनि-व्हर्सिटीस या बाबतींत नवा अधिकार, नवीन नियम करून देण्याचा विचार घाटत आहे. परंतु आमच्याकडची म्हणजे मुंबई इलाख्यांतली स्थिति याहून

विचित्र आहे. टिळकांच्या जुबिलीसंबंधानें पोलिसांनीं उठविलेली खोटी बातमी आणि त्या बाबतींत शाळाखात्यानें येथील सरकारी व निमसरकारी शाळांस दिलेली इशारत मागें प्रसिद्ध झालीच आहे. आतां असें समजतें कीं, ठाणें जिल्ह्यांत उंबरगांव येथें गेल्या मे महिन्यांत जो शिवाजी उत्सव झाला, त्यांत त्यावेळीं सुट्टीमुळें घरीं गेलेल्या कांहीं विद्यार्थ्यांनीं आपल्या पालकांच्या संमतीनें ' उषः-काल ' कादंबरींतील कांहीं उतारे वाचून दाखविले, आणि एकदोन पदें म्हटलीं. ही गोष्ट तेथील पोलीस अधिकाऱ्यांनीं आपल्या रिपोर्टांत दाखल करून वर पाठविली. आणि ती अखेर डायरेक्टरकडे येऊन यांपैकीं एक विद्यार्थी मुंबईच्या हायस्कुलांत होता त्यास " सरकारास अप्रिय असलेल्या सभेंत पुढाकार घेतला " ह्या गुन्ह्याबद्दल खो मिळाला, आणि येथील नूतन मराठी विद्यालयांत आणि न्यू इंग्लिश स्कुलांत असलेल्या विद्यार्थ्यांस सदरप्रमाणेंच शिक्षा करण्या-करितां या शाळांच्या व्यवस्थापकांस शाळाखात्याकडून लिहून आलें ! येथील न्यू इंग्लिश स्कूलनें याबाबतींत आपलें मत विरुद्ध असल्याबद्दल सरकारास कळविल्याचें समजतें. पण त्याचा निकाल काय होतो हें अद्याप पाहणें आहे. सारांश, विद्यार्थ्यांसंबंधानें सरकारचें जें धोरण आहे– व ज्याचा निषेध आज कित्येक दिवस आम्ही करीत आलों आहों – तेंच धोरण सरकारची ग्रॅन्ट घेणाऱ्या खासगी शाळांवर लादण्यास मुंबई सरकारनें सुरुवात केली आहे ; आणि सेल्बीसारखे विद्वान डायरेक्टर व त्यांच्या हाताखालील मंडळी सरकारास या कामीं पूर्ण साहाय्य करीत आहे. असाच क्रम पुढें चालू राहिला आणि आम्ही खासगी शाळांच्या द्वारें हें उंटाचें पिलूं घरांत घेतलें तर आमच्या पोराबाळांस विकून त्यांस गुलाम केल्याचें अपयश लवकरच आम्हांस आपल्या माथीं घ्यावें लागेल !

यासंबंधानें पहिला प्रश्न असा उपस्थित होतो कीं, सरकारनें जी ही दांडगाई व जुलूम मांडला आहे हा आम्हीं मुकाट्यानें कां सहन करावा ? मुलांवर खरी सत्ता म्हटली म्हणजे आईबापांची किंवा पालकांची होय. आई-बापांनीं किंवा पालकांनीं आपलीं मुलें फी भरून– अर्थात् मोबदला देऊन – पांच तास इंग्रजी शिकण्याकरितां सरकारी शाळांत पाठविलीं म्हणजे त्यांनीं कांहीं गुन्हा केला काय ? पांच तास मुलें शाळेंत पाठविलीं म्हणजे पालकाची किंवा आईबापांची त्यांजवर असलेली चोवीस तासांची सत्ता सरकारच्या हातांत कशी जाते हें आम्हांस बिलकुल समजत नाहीं. सरकारी शाळेवर जे पैसे खर्च होतात ते आम्ही दिलेल्या करांपैकींच आहेत, हें लक्षांत आणिलें म्हणजे सरकारी सर्क्युलर निव्वळ जुलमाचें आणि अन्यायाचें आहे असें कोणाच्याहि ध्यानांत

येईल. आम्हीं आपलीं मुलें शिकण्याकरितां सरकारी शाळांत पाठविलीं म्हणजे तीं कांहीं सरकारास विकलीं नाहींत, किंवा शाळेबाहेर मुलांच्या वर्तनावर देखरेख करण्याचा हक्क सरकाराकडे सोंपविला नाहीं, हें सरकारनें लक्षांत ठेवलें पाहिजे. आईबापांनीं आपल्या मुलीस देवास वाहून मुरळी केली तरी तिजवरील पालकत्वाचे आईबापांचे हक्क कमी होत नाहींत अथवा काढतां येत नाहींत, असें जें सरकार म्हणतें तेंच सरकार शाळेबाहेर विद्यार्थ्यांचे वर्तनावर देखरेख ठेवण्याचा अधिकार –विद्यार्थी सरकारी किंवा बिनसरकारी शाळांत शिकतात म्हणून – त्यांच्या आईबापांस किंवा पालकांस नाहीं म्हणून ठरवितें हें आश्चर्य नाहीं काय? सरकारास एखादी गोष्ट अप्रिय असली म्हणजे ती बेकायदेशीर, राजद्रोही अथवा अनीतीची असलीच पाहिजे असें कांहीं नाहीं. अर्थात् सरकारास प्रिय असतील तेवढ्याच गोष्टी आमच्या मुलांनीं ऐकाव्या किंवा पाहाव्या असा आग्रह धरणें मूर्खपणा होय; आणि आम्हीं आपलीं मुलें ज्या अर्थी सरकारास विकलीं नाहींत त्या अर्थी सरकारनें अशा प्रकारचा निर्बंध करणें म्हणजे पालकांचे व आईबापांचे हक्क अन्यायानें व जुलमानें बुडविण्यासारखे आहेत. सरकाराकडून पोटास मिळवीत असलेले त्यांचे नोकर – मग ते सेल्बीसाहेब असोत अथवा पांडु शिपाई असो – पाहिजे तर सरकारचा हा हुकूम शिरसावंद्य मानोत; परंतु विद्यार्थ्यांच्या आईबापांनीं, पालकांनीं किंवा सरकारावर सर्वस्वी अवलंबून नसलेल्या शाळेच्या व्यवस्थापकांनीं सरकारचे असले हुकूम मानणें म्हणजे सत्याचा, न्यायाचा, स्वातंत्र्याचा आणि स्वाभिमानाचा उपमर्द करणें होय. शिस्त कोणास नको आहेसें नाहीं. आणि आपलीं मुलें विद्वान होऊं नयेत असेंहि कोणास वाटत नाहीं. पण शिस्तीच्या नांवावर सरकार जेव्हां आपले कांहीं अंतस्थ हेतु साधण्याकरितां आमच्या मुलांवर निष्कारण सक्ती करण्यास तयार होतें, तेव्हां मात्र सरकारच्या या चोंबडेपणाबद्दल चीड आल्याखेरीज राहात नाहीं. 'शिस्त' म्हणजे काय? लहान मुलांनीं शाळेंत असतां गुरूच्या व शाळेच्या बाहेर असतां आईबापांच्या किंवा पालकांच्या आज्ञेनें चालणें हेंच कीं नाहीं? मग शाळेबाहेर एखादा मुलगा आपल्या पालकाच्या आज्ञेनें किंवा संमतीनें एखाद्या सभेस गेला तर त्यांत शिस्त कोठें बिघडली, हें आम्हांस समजत नाहीं. आज सरकारास शिवाजी उत्सव अप्रिय, तर उद्यां गणेशोत्सव किंवा रामनवमीचा उत्सव देखील अप्रिय होऊं शकेल, आणि परवां धर्मविषयक व्याख्यानेंहि सरकारास नकोशीं होतील. मग याकरितां आम्हीं आपलीं मुलें सदर उत्सवास, व्याख्यानास किंवा कीर्तनास पाठवावयाचीं नाहींत काय? आणि तीं पाठवूं नयेत म्हणून

म्हणणारें सरकार कोण? आणि त्यांत चोंबडे पोलीस हवें तरी कशाला? सरकारास पाहिजे तर कायदा करून या सर्व चळवळी त्यांनीं बेकायदेशीर आणि गुन्हेगारीच्या ठरवाव्या; पण तसें उघड रीतीनें करतां येत नाहीं म्हणून विद्याखात्यामार्फत मुलांवरील अगर विद्यार्थ्यांवरील आईबापांचे हक्क बुडविणें अगदीं अन्यायाचें व नामर्दपणाचें लक्षण होय. अशा प्रकारच्या कार-स्थानांत सरकारचा काय हेतु आहे याचा परिस्फोट मागेंच आम्हीं केला आहे. सरकारला अलीकडील राजकीय चळवळ अत्यंत अप्रिय झालेली आहे; परंतु ही सर्व चळवळ बेकायदेशीर आहे असें ठरविण्याचें त्यांस धैर्य नाहीं आणि धैर्य असलें तरी इंग्रजी राज्यनीतीनें शक्य नाहीं. मग जी गोष्ट प्रत्यक्ष करतां येत नाहीं ती परोक्ष अथवा चोरटया रीतीनें करण्याचा सरकारनें डाव मांडला आहे. पोरांनीं विद्यार्थी म्हणून राजकीय चळवळींत पडूं नये, मोठ्यांनीं नोकर म्हणून पडूं नये व म्हाताऱ्यांनीं पेन्शनर म्हणून पडूं नये, अशी शाळेच्या व नोकरीच्या शिस्तीच्या मिषानें सरकार हुकमत चालवूं पाहात आहे! विलायतेंत जर असा प्रकार कोणी केला तर आमचे सेल्वीसाहेबच अशा हुकुमाविरुद्ध आकाशपाताळ एक केल्याखेरीज राहाणार नाहींत. परंतु तेच साहेब आज सरकारचें आज्ञाधारक नोकर म्हणून बनून खासगी शाळांच्या व्यवस्थापकांचीहि तोंडें बांधण्यास तयार झाले आहेत. 'हे आमचे गुरूच नव्हत' म्हणून जेव्हां आम्हीं यांच्या स्वरूपाचें मागें आविष्करण केलें होतें तेव्हां कित्येकांची आमच्या-वर गैरमर्जी झाली होती, पण आज ज्या गोष्टी घडून येत आहेत त्यांवरून आम्हीं केलेलें भाकीतच खरें होतें असें आतां कोणाच्याहि प्रत्ययास आल्याखेरीज राहाणार नाहीं. हल्लींच्या या सर्क्युलरानें तर असें झालें आहे कीं, कोणी गृहस्थ आपल्या सरकारी शाळेंत शिकणाऱ्या मुलास जर आपल्याबरोबर एखाद्या सभेंत घेऊन गेला तरी देखील शाळेचे मास्तर त्यास शाळेंतून काढून टाकणार! जणों काय सरकारानेंच हा मुलगा त्या गृहस्थांस दान देऊन सदर मुलास जेऊं खाऊं घालणें, अन्नवस्त्र देणें, आणि वाढविणें एवढ्या खर्चाच्या कामाकरितांच त्याच्या हवालीं केला आहे! तात्पर्य, आम्हीं आपल्या मुलांस आपल्या पदरचें जेऊंखाऊं घालून व वाढवून त्यास शिक्षणाकरितां पांच तास सरकारी शाळेंत पाठवितों यामुळें त्याच्या वर्तनावर देखरेख ठेवण्याचे सर्व हक्क आम्हीं सरकारास गहाण लावून दिले असें होत नाहीं. तरुण पिढीच्या वर्तनास कोणती दिशा लावावी हें ठरविण्याचें काम व हक्क आईबापांचा आहे आणि त्यांत जोंपर्यंत कांहीं बेकायदेशीरपणा उत्पन्न होत नाहीं तोंपर्यंत सरकारास त्यांत हात घालण्याचा काडीइतका देखील हक्क पोहोंचत नाहीं. सगळे विद्यार्थी सरकार

आपल्या घरच्या पैशानें पोशीत असतें, किंवा पालक या नात्याचे आपले सर्व हक्क आम्हीं सरकाराकडे सोंपविले असते तर गोष्ट निराळी. तसें जोंपर्यंत झालें नाहीं तोंपर्यंत रिस्ले सर्क्युलरसारख्या हुकुमानें पालकांच्या हक्कांची पायमल्ली करणें अत्यंत जुलमाचें आणि अन्यायाचें होय.

सरकारच्या या जुलमाचा व अन्यायाचा प्रतिकार करणें व आपल्या मुलावाळांस या कचाटींतून सोडविणें हें प्रत्येक देशाभिमानी पुरुषाचें व देशी संस्थेचें कर्तव्य होय. सरकार म्हणजे नेहमींच न्यायानें वागतें असें नाहीं. त्यास किंवा सरकारी अधिकाऱ्यांस जुलूम करण्याची पुष्कळदां हुक्की येत असते; परंतु अशा वेळीं त्याचा योग्य निषेध करून प्रतिकार करणें —किंवहुना अडथळा करणें हें आमचें काम आहे. सगळचा भाकरीकरितां सरकारचे गुलाम झालेले सरकारी नोकर सोडून द्या. पण ज्या संस्था पुष्कळ अंशीं लोकाश्रयावर अवलंबून आहेत त्यांनीं अशा बावतींत सरकारची री ओढणें म्हणजे चतकोर भाकरीकरितां आपलें स्वातंत्र्य गमावणें आणि आपणांस मिळत असलेल्या लोकाश्रयाचा दुरुपयोग करणें होय. सरकारी शाळा ज्या रीतीनें — मग ती रीत न्यायाची असो वा अन्यायाची असो, सोयीची असो वा गैरसोयीची असो — चालतात त्याच धर्तीवर जर खाजगी शाळा चालावयाच्या असतील तर या खासगी शाळा आम्हांस नको आहेत व त्यांस लोकांनीं मदत करण्याची जरूर नाहीं, असेंहि आम्हीं स्पष्ट म्हणतों. किंवहुना अशा संस्थांस मदत करणें म्हणजे लोकांच्या पैशाचा दुरुपयोग करणें होय. सरकारी शाळांत मिळत असलेलें शिक्षण, तेथें शिकविले जाणारे विषय व पुस्तकें, त्यांतील शिस्त अथवा विद्यार्थ्यांस नेभळें बनविण्याची तऱ्हा या गोष्टी लोकांस संमत नाहींत, म्हणून खाजगी शाळा निघाल्या आहेत व निघणें अवश्य आहे. अर्थात् या खाजगी शाळांत जें शिक्षण दिलें जातें, जी नीति किंवा धर्म शिकविला जातो, अथवा जी शिस्त ठेविली जाते, ती सरकारी शाळांच्या कित्त्यावरहुकूम असणें शक्य नाहीं आणि इष्टहि नाहीं. खाजगी शाळा—निदान आमच्या इलाख्यातील खासगी शाळा — शिकलेल्या लोकांनी स्वार्थत्याग करून लोकाश्रयावर चालविलेल्या आहेत. हा आत्मत्याग व लोकाश्रय सरकारचे गुप्त हेतु पर्यायानें सिद्धीस नेण्यास जर उपयोगी पडला तर आत्मत्यागाचे ऐवजीं आत्महत्येचें नांव त्यांस द्यावें लागेल ! प्रजेस निःसत्त्व करण्याचे सरकारचे हेतु सफल व्हावेत एवढ्याकरितां कांहीं खासगी शाळा निघाल्या नाहींत. खासगी शाळेच्या व्यवस्थापकांनीं एवढें लक्षांत ठेवावें कीं, त्यांस लोकांकडून जी आज मदत मिळत आहे किंवा कांहीं विद्वान् लोकांस अशा शाळांतून थोड्या पगारावर संतुष्ट राहून काम

करण्याचें जें आज भूषण वाटत आहे तें कांहीं सरकार सांगेल तितकें–घोटभर तर घोटभर–प्राणी पिण्याकरितां नाहीं, किंवा पोलीस अधिकारी किंवा विद्या-खात्यांतील अधिकारी कान धरून सांगतील त्याप्रमाणें वागण्याकरितां नव्हे. शाळेला शिस्त पाहिजे ही गोष्ट कोणी नाकबूल करीत नाहीं. पण विलायतेंत किंवा इतर सुधारलेल्या राष्ट्रांतील शाळांत जी सामान्य शिस्त आहे त्यापेक्षां खोटचानाटचा सबवीवर अधिक जारीची शिस्त इकडील खासगी शाळांवर जेव्हां सरकार लादूं पाहतें, तेव्हां चतकोर भाकरीची अपेक्षा न धरतां आपल्या व पालकांच्या हक्काकरितां धैर्यानें व नेटानें भांडणें हें खासगी शाळांचें कर्तव्य होय. राष्ट्रीय शिक्षणाचीं पांचसहा हायस्कुलें व एक कॉलेज बंगाल्यांत निघून तेथें आजमितीस २००० विद्यार्थी सरकारी परीक्षेचीहि अपेक्षा न धरतां शिकत आहेत यांतील बीज हेंच होय. देशांतील तरुण पिढीवर शिस्तीच्या निमित्तानें झडप घालून त्यांस राजकीय दृष्टचा निरुपद्रवी प्राणी बनविण्याची सरकारास अन्यायाची बुद्धी झालेली आहे व या दुष्ट हेतूनें शिक्षणाचा झराच गढूळ करून लोकाश्रयावर चालणाऱ्या खासगी शाळांवरहि जुलूम करण्यास सरकार तयार झालें आहे. अशा वेळीं आमच्याकडील खासगी शाळा व कॉलेजें यांनीं एकजुटीनें सरकाराशीं लढण्यास तयार झालें पाहिजे. विलायतेंत सिनियर रँगलरची पदवी मिळविलेले विद्वान गृहस्थ आज आमच्या खासगी शाळांतून आहेत व त्यांनीं जर सरकारापाशीं असा आग्रह धरिला कीं, ग्रँटच्या चतकोर भाकरी-करितां तुम्ही सांगाल त्याप्रमाणें किंवा तुम्हाला वाटेल तसें नाचण्यास आम्ही तयार नाहीं, तर त्यांचें सरकारांत कांहींच वजन पडणार नाहीं असें नाहीं. आणि यदा-कदाचित् वजन न पडलें तर स्वतंत्र रीतीनें आपल्या हिंमतीवर यांनीं आपलें लोकशिक्षणाचें काम चालविलें पाहिजे. सरकारानें आपल्यास हुकुमी नोकर मिळावे म्हणून ज्या शाळा अथवा नोकरखाने काढलेले आहेत त्यांचें अनुकरण करण्याकरितां स्वार्थत्याग करणारे रँगलरसारखे विद्वान आम्हांस नको आहेत, किंवा खाजगी शाळांस जो लोकाश्रय मिळत आहे तोहि एवढ्याकरितां नाहीं हें आम्ही वर सांगितलेंच आहे. सरकारची गुलामगिरीच करावयाची तर मग चतकोर भाकरी घेऊन तरी. कां? सगळी तरी घ्या! आणि गुलामगिरी किंवा गुलामगिरीसारखें अनुकरण करावयाचें नसलें तर ज्यांनीं तीन चतकोर भाकरी दिली ते एक चतकोर देण्यास नाकबूल किंवा असमर्थ आहेत असेंहि नाहीं. सरकारची बुद्धी नीट नाहीं ही गोष्ट खरी आहे व सरकार रागावल्यास केवळ ग्रँटच बंद करील इतकेंच नव्हे तर खाजगी शाळेंतील मुलें युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला येऊं देणार नाहीं असा संभव आहे. पण याकरितां आतां भिऊन

काय उपयोग? बंगाल इलाख्यानें या कामीं जो धडा घालून दिला आहे त्याचेंच अनुकरण या इलाख्यांतहि झालें पाहिजे, आणि खासगी शाळेंत यथार्थ पुढारी मानलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थेकडून जर ही गोष्ट होणार नाहीं तर लोकाश्रयावर वाढलेली ही संस्था असून नसून सारखीच असें म्हणावें लागेल. राष्ट्रीय दृष्टचा शिक्षणाची दिशा किती पालटली पाहिजे हा एक मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. पण तो जरी सध्यां बाजूला ठेवला तरी चतकोर भाकरीकरितां खासगी शाळांनीं सरकारची किती गुलामगिरी पत्करावी हें होईल तितकें लवकर सध्यां ठरवून घेतलें पाहिजे, आणि तसें न होईल तर खासगी शाळांतील व्यवस्थापक लोकांचे तीन चतकोर खाऊन एका चतकोरा-करिता सरकारची श्ववृत्ती पत्करण्याचें पाप आपल्या माथीं आपण ओढून घेतील यांत शंका नाहीं. या प्रकरणाचा पुढें काय निकाल होतो हें पाहून आणखी लिहिणें जरूर असल्यास लिहूं. सध्यां एवढें बस्स आहे.

# खंड सातवा

## संकीर्ण

(अ) शिवाजी उत्सव, गणेशोत्सव व राष्ट्रीय उत्सवाची आवश्यकता.
(ब) धर्म व तत्त्वज्ञान.
(क) कै. महादेव गोविंद रानडे, स्वामी विवेकानंद, आगरकर व गोखले.

### १. श्रीशिवाजीमहाराज यांच्या स्मारकाबद्दल सूचना

[२ जुलै १८९५]

...... ज्यास म्हणून इतिहासाची यत्किंचित् ओळख आहे; स्वराज्य, स्वधर्म म्हणजे काय व तीं शेकडों वर्षे नष्ट झालीं असतां त्यांची पुनः संस्थापना करण्यास कोणत्या प्रकारचें धैर्य, वीर्य, उत्साह आणि विचार वगैरे अलौकिक गुण संस्थापकांच्या अंगीं असावे लागतात, हें जो जाणतो; अथवा एखादें राष्ट्र नामशेष होऊन रसातळास जाण्याचा प्रसंग आला असतां वराहरूपी महाविष्णूनें प्रलय-कालीं ज्याप्रमाणें पृथ्वीस दंताग्रावर धरून तिचें रक्षण केलें त्याप्रमाणें वर सांगितलेल्या प्रसंगीं आपल्या राष्ट्रीयत्वाचें रक्षण करण्यास अवतारी पुरुषांची कोणत्याहि देशांत किती गरज असते हें ज्यांस अवगत आहे त्यांस शिवाजीमहाराजांचें स्मारक करण्याबद्दल कोणीहि सुचविलें पाहिजे असें नाहीं. राष्ट्रामध्यें आपलेपणाची जागरूकता राहण्यास त्या त्या राष्ट्रांतील पूर्वीं झालेल्या पराक्रमी पुरुषांचें लोकांस नेहमीं स्मरण असलें पाहिजे किंवा दिलें पाहिजे हें तत्त्व सगळ्या जिवंत राष्ट्रांस हल्लीं पूर्णपणें मान्य झालेलें आहे. आम्हीच जर तें विसरलों असलों तर तें आमच्या निद्रावस्थेचें अगर दुर्दैवाचें लक्षण होय! परंतु श्रीशिवाजीमहाराजांचें स्मारक आम्हीं मोठ्या कळकळीनें व भक्तीनें कां करावें याबद्दल याहिपेक्षां बलवत्तर कारण म्हटलें म्हणजे आमची, आमच्या राष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घालणाऱ्या गृहस्थाबद्दलची कृतज्ञताबुद्धि ही होय. ज्याच्या अंगांत माणुसकी वास करीत आहे त्यास श्रीशिवाजीमहाराजांच्या स्मारकाबद्दल आस्था वाटेलच; पण ज्याचा महाराष्ट्रकुलांत जन्म झाला आहे त्यास तर असल्या कृत्याबद्दल विशेष अभिमान, आस्था, कळकळ किंवा भक्ति असणें हें त्याचें कुलव्रतच होय.

---

## २. यंदाचा गणपत्युत्सव

[ ३ सप्टेंबर १८९५ ]

...... कोणत्याहि लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास जीं अनेक साधनें असतात त्यांपैकींच एक उपास्यदैवत असणें हें एक कारण आहे. राणीसरकारच्या राज्यछत्राखालीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील लोक एकवटले जाऊन त्यांस एकराष्ट्रीयत्व येत आहे. याचा जर आम्हांस प्रत्यक्ष अनुभव आहे, तर एका प्रांतांतच कां होईना, पण वर्षांतून दहा दिवस तरी एकाच देवतेच्या भजनपूजनांत लोक निमग्न झाल्यानें त्यांच्यांत ऐक्याची वृद्धि होणार नाहीं असें कोण म्हणेल ? एक धर्म, एक राजा, एक भाषा हीं राष्ट्रीयत्वाचीं प्रधान अंगें आहेत. पैकीं इंग्रजसरकारच्या राज्यसत्तेखालीं शेवटचीं दोन साधनें आपणांस चांगल्या तऱ्हेनें प्राप्त झालीं आहेत, राजकीय उपास्यदैवत एक असल्यामुळें जितका फायदा व्हावयाचा तितका हल्लीं होत आहे, व आमच्यामतें धार्मिक उपास्यदैवत एक असल्यानें तोच फायदा दुप्पट होण्याचा संभव आहे. हिंदुधर्मांत सण कमी आहेत असें नाहीं. पण त्यांपैकीं एक दोन सण खेरीजकरून बाकी सण प्रत्येकानें आपापल्या घरीं करण्याचे आहेत त्यामुळें त्यांपासून जितका सार्वजनिक फायदा व्हावयाचा तितका होत नाहीं. पंढरीच्या विठोबाच्या उत्सवासारखा एखाददुसरा उत्सव सर्व लोकांस प्रिय होण्यासारखा आहे. पण हे उत्सव अथवा यात्रा पुरातन असल्यानें त्यांचें स्वरूप आपणांस पाहिजे तशा रीतीचें करणें अशक्य नसलें तरी बहुतेक असाध्यच आहे असें म्हटलें तरी चालेल. त्यांतून जो सार्वजनिक उत्सव असावयाचा तो ठिकठिकाणच्या लोकांस आपापल्या गांवीं करतां येण्यासारखा पाहिजे तसा विठोबाच्या यात्रेचा प्रकार नाहीं. ही उणीव गणपतीच्या उत्सवानें नाहीशीं होईल अशी आमची समजूत आहे. वर्षांतून दहा दिवसच कां होईना, पण एका प्रांतांतील सर्व हिंदुलोकांनीं एका देवतेच्या उपासनेंत गढून गेलेलें असावें ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे, व ही जर साध्य झाली तर आपल्या भावी अभ्युदयाचा आपण पाया घातल्यासारखें होईल. ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांत सार्वजनिक प्रार्थनेची जी पद्धत आहे त्यापासून त्या धर्मांतील लोकांस जो फायदा होतो तशाच प्रकारचा फायदा दहा दिवसांचा गणपत्युत्सव सार्वजनिक झाल्यानें हिंदु लोकांस होईल अशी आमची खात्री आहे; व म्हणूनच या उत्सवाचें लोकांनीं इतर ठिकाणीं जास्त जास्त अनुकरण करावें अशी आमची त्यांस आग्रहपूर्वक सूचना आहे.

यंदा मुंबई, कोल्हापूर, सातारा, नगर, धुळें वगैरे ठिकाणीं थोड्याबहुत अंशानें हा उत्सव झाला होता, पण यापेक्षां असले उत्सव सर्व ठिकाणीं सुरू झाल्या-खेरीज त्यांचा खरा फायदा आपणांस व्हावयाचा नाहीं. उपासनेपासून चित्त-शुद्धि होते असें जें आपल्या जुन्या ग्रंथकारांचें म्हणणें आहे तें अगदीं यथार्थ आहे. कोणत्याहि देवतेचें सर्वांनीं एकनिष्ठपणें आराधन करणें यानेंच उपासकांच्या मनांस एक प्रकारचें वळण लागून त्यांच्यामध्यें उपासक बंधुत्वाची बुद्धि जागृत होते. मन व बुद्धि अशा रीतीनें संस्कृत झाल्यावर त्यांचा उपयोग तशाच रीतीनें अन्य ठिकाणीं ठेवण्यासहि अडचण पडत नाहीं. स्वधर्माच्या श्रेष्ठत्वाचा ज्यांस अभिमान वाटत नाहीं त्यांस स्वराष्ट्राच्या श्रेष्ठत्वाचा तरी अभिमान कोठून वाटणार ? विषय निराळे असले तरी ते ग्रहण करण्यास मनाची आणि बुद्धीची स्थिति एकाच प्रकारची असावी लागते हें उघड आहे; व एका प्रसंगीं जर ती त्या प्रकारची झाली तर दुसऱ्या प्रसंगींहि ती तशी होण्यास विशेष अडचण पडत नाहीं. धर्मोन्नतीचा व धर्माभिमानाचा जर राष्ट्रीय अभ्युन्नतीशीं कांहीं संबंध असला तर तो याच प्रकारचा होय. करितां ज्यांस आपल्या समाजाचें आणि लोकांचें हितकर्तव्य आहे, त्यानें असल्या उत्सवांस मदत केली पाहिजे.... ...

# ३. शिवजयंतीचा राष्ट्रीय उत्सव

[ २८ एप्रिल १८९६ ]

....... ज्या शूर पुरुषांनीं आपल्या देशाचें नांव इतिहासांत अजरामर केलें, किंवा ज्यांनीं आपल्या कर्तबगारीनें आमच्यांत अद्याप कांहीं पाणी आहे असें जगास दाखविलें त्यांच्या कृत्यांचें कितीहि अभिनंदन केलें तरी त्यांच्या ऋणांतून सर्वस्वीं मुक्त होणें कठीण आहे. श्रीशिवछत्रपतीमहाराजांचा उत्सव करण्यांत त्यांज-बद्दलची वर सांगितलेल्या प्रकारची आपल्या अंगीं वसत असलेली कृतज्ञतावुद्धि हेंच मुख्य कारण होय. ज्याप्रमाणें आम्हीं आपल्या वाडवडिलांचें स्मरण कायम ठेवून त्याच्या योगें आपल्या घराण्याचा पूर्वापार चालत आलेला लौकिक राखण्याचें एक साधन करून ठेवितो. तद्वतच राष्ट्रांतील महापुरुषांचें स्मरण हें राष्ट्रीयत्व कायम राहण्यास एक चांगलें साधन आहे. एकराष्ट्रीयत्व म्हणजे कांहीं दृश्य पदार्थ नव्हे. ही एक प्रकारची कल्पना असून ती सतत जागृत ठेविली तरच ती टिकण्या-सारखी आहे; व ज्या ज्या राष्ट्रांनीं ती कायम राखिली आहे त्यांनीं आपल्या ऐति-हासिक थोर पुरुषांच्या इतिहासाची या कामीं योग्य मदत घेतली असें थोडचा विचारांतीं कोणाच्याहि लक्षांत येईल. सर्व लोकांच्या आदरास पात्र झालेल्या जितक्या अधिकाधिक वस्तु असतात त्या मानानें एकराष्ट्रीयत्वाची कल्पना अधिका-धिक दृढ होत जाते हें तत्त्व निर्विवाद आहे; व राष्ट्राचे जे खरे हितकर्ते आहेत ते अशीच कांहीं रचना करितात कीं, त्यामुळें सर्वांचीं अंतःकरणें एका गोष्टीकडे लागून लोकांस आपण एक राष्ट्रांतील व्यक्ति आहों असें वाटूं लागावें. श्रीरामदासस्वामींनीं 'मराठा तेवढा मेळवावा' असा जो उपदेश केला आहे त्यांतील बीज हेंच होय. कोणत्याहि लोकांचें राष्ट्र बनण्यास त्या सर्व लोकांस पूज्य अशा कांहीं वस्तु असाव्या लागतात; व देशकालानुसारें अशा कांहीं गोष्टी लोकांपुढें मांडणें हेंच प्रत्येक देशाभिमान्याचें कर्तव्य आहे. अशा गोष्टी जितक्या पुष्कळ मिळतील तितक्या चांगल्या हें उघडच आहे; पण आमच्या दुर्दैवानें अद्याप त्या आम्हांस हव्या तितक्या लाधल्या नाहींत. गाई आणि ब्राह्मण यांचा प्रतिपाल करणें या दोन गोष्टी एक काळीं अशा प्रकारच्या होत्या; त्यांपैकीं निदान पहिली तरी अद्याप अशा प्रकारची आहे असें एका प्रसिद्ध अर्वाचीन गोरक्षकाचें म्हणणें होतें; पण याहिपेक्षां हल्लींच्या काळांत सर्वांस विशेष प्रिय होणारी गोष्ट म्हटली म्हणजे आपल्या ऐतिहासिक महापुरुषांचें स्मरण हीच होय. त्यांतूनहि ज्या शूर पुरुषांनीं मराठे, ब्राह्मण,

परभू, शेणवी वगैरे कोणताहि भेद मनांत न आणितां "गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः" या न्यायानें ज्याचा जो गुण आढळण्यांत आला त्याचा सार्वजनिक कामीं उपयोग करून घेऊन सर्वांस एकराष्ट्रीयत्वाच्या जाळ्यांत आणिलें त्याचें स्मरण सर्वांस विशेष श्रेयस्कर होईल याबद्दल कोणत्याहि प्रकारची शंका नाहीं. श्री शिवछत्रपतीमहाराजांचें चरित्र अशाच प्रकारचें होय. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींचें प्रेम एकाच ठिकाणीं वसण्यासारखें जर कोणतेंहि स्थल असेल तर तें शिवछत्रपतींचें चरित्र हेंच होय, हें शिवछत्रपतींचा उत्सव करणाऱ्या सर्व लोकांनीं नेहमीं ध्यानांत बाळगावयास पाहिजे. या उत्सवांत मराठे आणि ब्राह्मण, अगर ब्राह्मण अगर परभू अशा प्रकारचा कोणताहि भेद ठेवणें अगदीं गैरशिस्त आहे. ........

## ४. हा विघ्नसंतोषीपणा नव्हे काय ?

[ १९ मे १८९६ ]

...... सुधारकांच्या मानभावीपणाचें, अविचाराचें, अर्ध्या कच्च्या ज्ञानाचें आणि अपक्व व असमंजस बुद्धीचें दुसरें एक उदाहरण नुकतेंच घडून आलें आहे त्याचा विचार करूं. आज महाराष्ट्रांत श्रीशिवछत्रपतीबद्दल जी चळवळ सुरू आहे व या थोर पुरुषाच्या स्मरणार्थ जे उत्सव होण्यास सुरुवात झाली आहे त्यांबद्दल कोणाहि चांगल्या, समंजस व विचारी मनुष्यास अभिमान व आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं; पण या उत्सवाबद्दल देखील आमच्या कित्येक सुधारकांस वाईट वाटत आहे हें पाहून आम्हांस अत्यंत खेद होतो. शिवछत्रपतीचे हे उत्सव कोणत्या उद्देशानें व कशाकरितां करण्यांत आले, याचा जो खुलासा आम्हीं मागें केला होता तो एका सुधारक तिस्मारखानास न रुचून त्यानें आम्हांस उपदेशाच्या दोन गोष्टी सांगण्याचा येथील एका पत्राचा आश्रय करून उद्योग केला आहे. या लेखास उत्तर देणें म्हणजे असल्या माथेफिरू व मूर्ख लोकांचे एक प्रकारें देव्हारे माजविण्यासारखेंच आहे; परंतु ज्या विषयासंबंधानें हा लेख आलेला आहे त्याचें महत्त्व लक्षांत आणून त्यासंबंधानें दोन शब्द लिहिण्याचें आम्हीं आज योजलें आहे. .......

श्री शिवाजीमहाराजांस अवतारी पुरुष समजल्यानें शिवजयंतीचे उत्सव रामनवमीचे थाटावर जाऊन त्यांपासून आम्हांस पाहिजे तो परिणाम लोकांवर होणार नाहीं असें या आक्षेपकाराचें म्हणणें आहे. ही भीति निराधार आहे असें आम्हीं पूर्वीच लिहिलें आहे; व अद्यापहि आमची तीच समजूत कायम आहे. अवतारी पुरुष कोणास म्हणावें ? व एखादा पुरुष अवतारी मानला असतां त्याच्या वर्तनाचें अनुकरण करण्यास लोकांस उत्तेजन मिळत नाहीं कीं काय ? हे दोन मुद्याचे प्रश्न आहेत ; व यासंबंधानें सुधारकांतील लेखकाचा कोटिक्रम अगदीं वाष्कळ व अप्रयोजक आहे. शिवाजीमहाराज हे "थोर" अथवा "अलौकिक" पुरुष होते येवढीच जर गोष्ट कबूल केली तर त्यांस अवतारी पुरुष म्हणण्यास आमच्या मतें कोणतीच हरकत दिसत नाहीं. आधीं विशाल बुद्धीचा, धैर्याचा, कल्पनेचा किंवा बलाचा पुरुष देशांत निर्माण होणें ही गोष्ट मनुष्याच्या स्वाधीनची नाहीं हें कोणासहि कबूल करावें लागेल. नेपोलियनासारखे किंवा अलेक्झांडरासारखे शूर पुरुष दर पिढीस निपजतात असें नाहीं, व ते केव्हां व कसे निपजतात

हें जर आपणास सांगतां येत नाहीं, तर ही गोष्ट आमच्या प्रयत्नांपलीकडची आहे, एवढें तरी निर्विवाद सिद्ध होतें, वरें, एवढ्यानेंच कार्यभाग संपला असें नाहीं. थोर पुरुषांच्या चरित्राचें ज्यानें ज्यानें योग्य मनन केलें आहे त्यास असें आढळून येईल कीं, त्यांचीं सर्व कृत्यें केवळ त्यांच्याच हिमतीनें व कर्तबगारीनें झालीं आहेत असें नाहीं. ड्यूक ऑफ् वेलिंग्टन हा वाटरलूच्या लढाईच्या वेळीं आपल्या शिपायांस धीर देत सैन्यांतून हिंडत होता, परंतु त्याच्या आजूबाजूचे शेंकडो शिपाई पडले तरी त्यास गोळी न लागतां विजयश्री संपादन करण्यास तो बचला गेला, हें त्याच्या शौर्याचें फल होतें असें कोणी तरी म्हणेल काय? नेपोलियन बोनापार्ट, वॉशिंग्टन्, नेल्सन्, ज्युलियस सीझर वगैरे थोर पुरुषांची स्थिति याचप्रमाणें होय. अफझुलखान श्रीशिवाजीमहाराजांपेक्षां शरीरानें किती तरी पट मजबूत होता. या राक्षसास एक बकरें न्याहारीस लागत असे अशी दंतकथा आहे. याच्याशीं झगडा करण्यांत श्रीशिवाजीमहाराजांस जो जय मिळाला अथवा अवरंगजेबाच्या तडाख्यांतून सुटून ते दिल्लीहून दक्षिणेंत पुनः सुरक्षित माघारे आले या गोष्टी केवळ त्यांच्या शौर्यानेंच व समयसूचकतेनेंच झाल्या असें आपणास निश्चयानें म्हणतां येईल काय? पण याहि गोष्टी एकीकडेच राहूं द्या. ज्या वेळेस समरांगणांत एकसारखा गोळ्यांचा पाऊस पडत असतो व कोणास गोळी लागेल व कोणास न लागेल याचा कांहींच नेम नसतो, तेव्हां त्यांतूनहि जो असल्या थोर पुरुषांचा बचाव होतो तो कशामुळें? आमचे सुधारक असल्या गोष्टींस "अज्ञेयाच्या" अगर "अदृष्टाच्या" कोटींत घालून सदर दोन शब्दांतील पहिला 'अ' कार मोठ्या अक्षरानें लिहून आपलें समाधान करून घेतील हें आम्हांस माहीत आहे. पण आम्ही त्यांस असें विचारतों कीं, असल्या समाधानांत आणि या गोष्टी ईश्वरकृपेनें होतात असें म्हणण्यांत अंतर तें कोणतें? ईश्वरच जर अज्ञेय आहे असें वेदांत शास्त्र म्हणतें, तर वरील सर्व गोष्टी ईश्वरी कृपेनें घडतात हें म्हणणें केवळ लौकिक नव्हे, तर साधार व शास्त्रोक्त आहे असें थोड्या विचारांतीं सुधारकांखेरीज कोणाच्याहि लक्षांत येईल. सारांश, एखाद्या मनुष्याचे अंगीं अलौकिक गुण असणें ही पहिली ईश्वरी देणगी होय; व असे अलौकिक गुण असतांहि त्याचा सर्वसंकटांतून बचाव होऊन त्याचे हातून मोठमोठीं कार्यें निर्विघ्नपणें तडीस जाणें यासहि कांहीं 'अज्ञेय' अथवा 'अदृश्य' गोष्टींचें साह्य लागतें. मग या गोष्टींस कोणी कालाची सद्दी म्हणोत, कोणी पुण्याई म्हणोत, कोणी ईश्वरी कृपा म्हणोत, वा कोणी नास्तिक मोठा 'अ' काढून अज्ञेय किंवा अतर्क्य प्रकार म्हणोत, सर्वांचा अर्थ एकच आहे. प्रत्येक थोर पुरुषाच्या चरित्रांत असे कांहीं प्रसंग असतात कीं,

तेथें केवळ तो आपल्या शौर्यानें अगर बुद्धीनें जय पावला असें म्हणतां येत नाहीं. त्याची कर्तृत्वशक्ती कमी असते असें नाहीं पण त्या कर्तृत्वशक्तीचा तेथें कांहीं एक उपयोग नसून हातांत घेतलेल्या कामाची सिद्धि त्याच्या प्रयत्नाबाहेरील साधनांवर अवलंबून असते. असल्या प्रसंगीं जय मिळून जे पुढें येतात त्यांसच आपण थोर पुरुष समजतों. नाहीं पेक्षां ग्रे कवीनें म्हटल्याप्रमाणें मुके मिलटन किंवा न करते हॅमडन थोडे झाले असतील असें नाहीं; शिवाजीमहाराजांसारख्या गुणांचे पुरुष त्यांच्या पूर्वी झाले नसतील असें नाहीं. पण शिवाजीमहाराजांस जें यश आलें अथवा जीं बाह्य साधनें अनुकूल झालीं तीं त्यांस प्राप्त न झाल्यामुळें त्यांचीं नांवें देखील आतां कोणास माहीत असण्याचा संभव नाहीं. काल अनुकूल असावा लागतो अशी जी आमच्यामध्यें म्हण आहे त्याचा अर्थहि हाच होय. कोणाचीहि थोर पुरुषांत गणना होण्यास त्यांचे कृत्यास यश आलेलें असलें पाहिजे; आणि हें यश कांहीं ठिकाणीं त्याच्या करामतीनें व कांहीं ठिकाणीं अज्ञेय साधनांनीं ऊर्फ ईश्वरी कृपेनें प्राप्त होतें. इतिहासाच्या साधनानें हा सिद्धांत ज्याचे मनावर ठसला नाहीं त्याची गणना पढतमूर्खांतच केली पाहिजे.

अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे श्रीशिवाजीमहाराज हे अवतारी पुरुष होते असें कबूल करावें लागतें. अवतारी पुरुप अथवा ईश्वराचा अंश म्हणजे ईश्वराच्या शरीराचे रक्तमांसादि घटकावयवाचे भाग ज्याच्या अंगांत अवतीर्ण झाले आहेत अशी व्याख्या आमचे शास्त्रांत तरी केलेली आमच्या आढळण्यांत नाहीं. ज्या अगाध व अज्ञेय शक्तीनें सर्व सृष्टीचे व्यवहार अबाधित चाललेले आहेत, त्या शक्तीचा थोडासा भाग प्रत्येक पुरुषांत अगर व्यक्तींत असतोच; पण प्रत्येक व्यक्तींत असणाऱ्या भागापेक्षां जास्त भाग जेव्हां आपणास एखाद्या व्यक्तींत आढळून येतो तेव्हां सदर व्यक्तीस ईश्वरी अंश म्हणण्याचा आमचा प्रघात आहे.

**यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ।**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवं ।।**

असें जें भगवद्गीतेंत म्हटलें आहे तेंच अवतारी पुरुप ओळखण्याचें खरें लक्षण होय; व हें लक्षण शिवाजीमहाराजांस पूर्णपणें लागू पडतें. म्हणूनच त्यांस अवतारी पुरुप म्हणण्यास हरकत नाहीं असें आम्हीं लिहिलें होतें. एखादा पुरुप अशा अर्थानें अवतारी असला म्हणजे त्यांचें उदाहरण आम्हीं आपल्या डोळ्यांपुढें ठेऊन त्याचें अनुकरण करण्यास प्रवृत्त होणार नाहीं ही कल्पना सुधारकांच्या डोक्यांत कोठून आली असेल ती असो; या कल्पनेस हिंदुधर्मशास्त्रांत काडीइतका देखील

आधार नाहीं. उलट थोर पुरुष ईश्वरी अंश म्हणून त्यांच्या कृत्यांचें आम्हीं नेहमीं मनन करीत असावें असेंच सर्व ग्रंथांत प्रतिपादन केलेलें आहे, इतकेंच नव्हे तर खुद्द ईश्वराच्या गुणाचेंहि मनन केल्यानें मनुष्य सन्मार्गास लागून सद्गुणसंपन्न होतो असें आमच्या शास्त्रकारांचें मत आहे. खुद्द ईश्वराबद्दल जर अशी समजूत तर ईश्वराच्या अंशाबद्दल निराळ्या प्रकारची समजूत असणें शक्य नाहीं. ईश्वरी अंश एकदांच निपजतो असा कांहीं नियम नाहीं. ' धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ' हें तत्त्व लहानपणापासून आमच्या हृदयांत खिळलेलें आहे. करितां श्रीशिवाजीमहाराजांस ईश्वरी अंश मानल्यानें पुन: तसा पुरुष निर्माण होणार नाहीं अशी कोणाचीहि समजूत व्हावयाची नाहीं. किंबहुना आज तसे पुरुष नसतील अगर पांच पंचवीस अगर पन्नास वर्षांत तसे होणार नाहींत असें तरी कोण म्हणेल? वर सांगितलेंच आहे कीं, असे पुरुष असले तरी त्यांचे हातून मोठीं कृत्यें झाल्याखेरीज त्यांचा थोरपणा आपल्या प्रत्ययास येत नाहीं; व याचकरितां प्रत्येक मनुष्यानें थोर पुरुषांच्या चरित्रांचें मनन केलें पाहिजे. कोणतेंहि मोठें कृत्य होण्यास मनुष्याची कर्तबगारी आणि ईश्वरी कृपा अथवा अज्ञेय साधनाची अनुकूलता दोन्ही गोष्टी असाव्या लागतात; पैकीं एक गोष्ट जरी आपल्या ताब्यांतली नसली तरी दुसरी थोडीबहुत तरी प्रयत्न-साध्य आहे. व तेवढ्याच पुरता मनुष्यानें नेहमीं प्रयत्न केला पाहिजे. प्रयत्नवाद व दैववाद यांचा ज्यांनीं ज्यांनीं म्हणून मिलाफ घातला आहे त्यांनीं त्यांनीं तो अशाच प्रकारें घातलेला आहे. नुसत्या प्रयत्नानें कांहीं होत नाहीं व नुसत्या दैवानेंहि कांहीं होत नाहीं व विशेषेंकरून मोठमोठ्या गोष्टी घडून येण्यास दोहोंचीहि सारखीच अनुकूलता लागते. हा सिद्धांत आमच्या सुधारक बंधूंस जर मान्य नसेल तर त्यांस अद्याप जगाचा अनुभव नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. . . . . . .

## ५. आपला धर्म

[ २३ फेब्रुवारी १८९२ ]

हल्लींचा कालच असा विचित्र आला आहे कीं, सुबंधूनें म्हटल्याप्रमाणें आपल्या डोळयांचें महत्त्व लक्षांत येण्यास आर्शाची जरूर लागते. आमचें राज्य गेलें, आमची संपत्ति गेली, आमचें स्वातंत्र्य गेलें यामुळें आतां आम्हांस असें वाटूं लागलें आहे कीं, आंम्हीचसे काय पण आमचे पूर्वजहि मूर्ख व अज्ञानी होते. राज्यव्यवस्था कशी ठेवावी, लष्करी खातें कसें वाढवावें, प्रजेस गोड अभिवचनें देऊन त्यांच्या जीवित्वाची सर्व किल्ली आपण आपल्या हातांत कशी राखावी इत्यादि गोष्टी आमच्या पूर्वजांस ठाऊक नव्हत्याच; पण त्याचबरोबर धर्माची व ईश्वराचीहि त्यांस पुरी ओळख झाली नव्हती. परराज्याच्या चक्रामुळें ज्यांच्या आशा हत झाल्या आहेत त्यांच्या मुखांतून असे उद्‌गार निघणें साहजिकच आहे. "कालो वा कारणं प्राज्ञः। राजा वा काल कारणम्। इति ते संशयो माभूत्। राजा कालस्य कारणम्॥" असा एक जुना श्लोक आहे तो पुष्कळ अंशीं यथार्थ आहे. ज्यांच्या हातांत सत्ता असते, जे जगामध्यें मान्यतेस व अधिकारास चढलेले असतात त्यांचेच आचारविचार लोकांस ग्राह्य वाटतात व तसे आपले आचारविचार झाल्याखेरीज आपणांस त्यांची पदवी प्राप्त होणार नाहीं असा स्वभावतःच समज होतो. धर्मासंबधानें स्थितिहि अशाच प्रकारची आहे. पाश्चिमात्य विद्येची ज्या वेळेस आमच्याकडे पहिल्यानें सुरवात झाली त्या वेळेस पाश्चिमात्यांचें शास्त्रीय ज्ञान व पद्धति पाहून कांहीं मंडळी इतकी दिपून गेली होती कीं, घटपटादिकांची व्यर्थ खटपट अगर द्वैताद्वैतादि काथ्याकूट त्यांस नीरस वाटून त्यांनीं एकदम पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाकडे धांव घेतली. आमचा खरा धर्म कोणता आहे, जीवेश्वराचा काय संबंध आहे, ह्या विषयावर आपणामध्यें कोणते ग्रंथ आहेत, त्यांत कसा काय विचार केला आहे, या विचाराचा व बाह्य आचाराचा कितपत संबंध अगर कार्यकारण भाव आहे इत्यादि गोष्टींचा विचार न करितां निरीश्वर देवाच्या आधुनिक प्रार्थनेस भुलून या मंडळींनीं नाना पंथ काढले व त्यांचा यथाशक्ति प्रसार करण्याचाहि प्रयत्न केला; परंतु ही प्रवृत्ति लवकरच कुंठित झाली. ज्ञान, कर्म व भक्ति यांचा आमच्या ग्रंथकारांनीं केलेला ऊहापोह जरी या मंडळीस पसंत नव्हता तरी सदर ग्रंथांचें अध्ययन केलेल्या युरोपियन लोकांचे लेख आमच्या मंडळींच्या डोळयांत अंजन घालण्यास कारणीभूत झाले. म्याक्समुलरादि-

करून संस्कृतज्ञ इंग्रजांचे लेख व थिआसॉफिकल सोसायटीसारख्या संस्था यांनीं हिंदुधर्माच्या उज्वल तत्त्वांस पुनरपि तेजी आणली. आपल्या ऋषींचे आत्मानात्म विचार व योग्यांचीं प्राणायामादि साधनें हीं अगदीं शुष्क व वायफळ आहेत असा जो समज होता तो पालटूं लागला. तत्त्वविचाराचे कांहीं सिद्धांत दृश्य शास्त्राच्या आटोक्यावाहेरचे आहेत असें कळून आलें आणि एकंदर सर्व धर्मग्रंथांची तुलना करतां तत्त्वविचाराच्या संबंधानें हिंदुस्थानाचाच नंबर वर येईल अशी हळू हळू खातरी होत चालली. सारांश, आमच्या घरांत काय आहे त्याचें दिग्दर्शन जेव्हां परकीयांनीं केलें तेव्हांच आम्हांस त्याची योग्यता कळं लागली ! व आम्ही गेल्या पांचपंचवीस वर्षांत जो फुकट उपद्व्याप केला त्याची निरर्थकता आम्हांस भासूं लागली. आमच्या धर्मविचारास हल्लीं जें हें वळण लागत आहे तेंच चालू राहून कायम झाल्यास त्यापासून एकंदर राष्ट्राचें पुष्कळ हित होणार आहे.

वरील विचार आज सुचण्याचें कारण असें कीं, इंग्लंडांतील प्रसिद्ध संस्कृतज्ञ प्रोफे. म्याक्समुलर यांनीं धर्मावर इंग्लंडांत व्याख्यानें देण्यास सुरवात केली आहे व त्या व्याख्यानामुळें तिकडे बरीच चळवळ उपस्थित होऊन तीं पुस्तकरूपानें लवकरच छापून प्रसिद्ध होतील असा संभव आहे. हिंदुलोकांच्या तत्त्वविचार ग्रंथांकडे पाश्चिमात्य लोकांचें जितकें लक्ष जावयास पाहिजे होतें तितकें अद्याप गेलें नाहीं व दुसऱ्याचा जीव कसा घ्यावा याचा अभ्यास न केल्यामुळें हिंदुलोक आज परचक्रांत सांपडले आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे असें माक्समुलर साहेबांनीं एका व्याख्यानांत बोलून दाखविलें. अशा रीतीनें हिंदुस्थानाबद्दल खऱ्या कळवळ्याचे उद्गार काढणारे थोडेच युरोपियन सांपडतील. हिंदुस्थानावर आज हजारों वर्षे जो परकीय राजांचा अम्मल गाजत आहे त्यास म्याक्समुलर म्हणतात तेवढेंच कारण आहे किंवा दुसरीं कांहीं कारणें झालीं आहेत याचा आज आपणांस विचार कर्तव्य नाहीं. आमची आजची दुर्बलावस्था कशाहि रीतीनें आलेली असो. किंवहुना आमचे तत्त्वविचारक ग्रंथहि त्यांस थोडेवहुत कारणीभूत झाले असतील असें मानलें तरी त्यामुळें सदर ग्रंथाची योग्यता कमी होत नाहीं. ज्या वेळेस जगांतील वहुतेक देश अज्ञानांत बुडाले होते व धर्म म्हणजे काय याचीहि त्यास पुरी ओळख झाली नव्हती. त्यावेळीं या देशांत धर्माचें खरें स्वरूप लोकांस अवगत झालें होतें इतकेंच नव्हे, तर जीं तत्त्वें अलीकडे लोकांस समजलीं आहेत असें आपणांस वाटतें त्या तत्त्वांचा पूर्ण ऊहापोह करून आमच्या ऋषींनीं मागेंच निर्णय केला आहे. जीवाचे धर्म ईश्वरांत कोणते आहेत अगर असणें शक्य आहे. सच्चिदानंद स्वरूपी ईश्वरांत ब्रह्मज्ञानाचा आचाराशीं कितपत संबंध आहे, धर्मांचें

खरें स्वरूप बाह्याचार होय का तत्त्वज्ञान होय इत्यादि प्रश्नांचा उलगडा आमच्या वेदांतग्रंथांतून फार चांगल्या रीतीनें केलेला आहे. आम्ही कितीहि मूर्त्युपासक असलों, जातीच्या संबंधानें भेदाभेद आमच्या आचारांत कितीहि दिसून येत असला, नीतीचें व धर्माचें ऐक्य आहे असें जरी आम्ही पदोपदीं प्रतिपादन केलें, कर्म मार्गावर किती जरी आमची श्रद्धा असली अगर भक्तिमार्गानेंच परमेश्वर सामान्य जनांस, किंबहुना सर्वत्रांस ज्ञेय आहे असें जरी आम्ही अनेकवार सांगितलें तरी वेदांतविचार हें सर्व धर्माचें मूल आहे अशी प्रत्येकाची समजूत आहे. आमच्यामध्यें कितीहि वरेवाईट पंथ असले तरी सर्व नद्या सागरांत ज्याप्रमाणें एकवट होतात त्याप्रमाणें हे सर्व पंथ ईश्वराकडेच नेणारे आहेत अशी आमची समजूत आहे. जगांतील दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत इतकी उदारता अगर समंजसपणा दृष्टीस पडावयाचा नाहीं. कोणी ईश्वराचा जगांमध्यें एकच अवतार झाला आहे असें मानतात; व कोणी मूर्तिपूजा सोडून देऊन निर्गुण परमेश्वराचें ध्यान करण्याचा आव घालतात परंतु आपल्या आचरणानें मूर्त्युपासक जितके आग्रही असतात तितकेंच निर्गुणोपासक असतांहि आपण आहों असें लोकांस दाखवितात. कोणताहि धर्म घ्या, त्यांतील धर्मग्रंथांत नीति-तत्त्वांची सरमिसळ असावयाचीच, मग ती कोठें जास्ती असेल, कोठें कमी असेल. तात्पर्य, या निव्वळ धर्म तत्त्वांचें इतर असारभूत गोष्टीपासून पृथक्करण करून सदर तत्त्वांचा केवळ सत्य दृष्टीनें ज्यांत विचार केला आहे असा आर्यधर्माखेरीज इतर धर्म क्वचितच सांपडेल. हीं तत्त्वें कोणतीं, त्याचा आपल्या जुन्या ग्रंथांतून कसा विचार केला आहे, ऐतिहासिक रीत्या त्यांची उत्पत्ति व अभिवृद्धि कशी झाली इत्यादिक गोष्टींचा विचार वास्तविक पाहतां आमचा आम्हीच करावयास पाहिजे होता. परंतु वर लिहिल्याप्रमाणें आमचे सर्व विचार आधिभौतिक विद्यांकडे वळल्यामुळें अध्यात्मविद्येचा हल्लीं आम्हांस कंटाळा आला आहे. प्रोफे. म्याक्स-मुलर यांनीं या विषयाचा आज कित्येक वर्षें व्यासंग केला असून त्यांचे विचार अर्थातच परिणत झाले आहेत तेव्हां त्यांच्या व्याख्यानांतून आमच्या अध्यात्मिक ग्रंथासंबंधानें जे उद्‌गार निघतील ते अर्थातच प्रगल्भ असून विशेषत: आमच्या आधुनिक मंडळीस मान्य होतील अशी आशा आहे. आमच्यामध्यें अशा रीतीनें उद्योग करणारे लोक निघूं नयेत, हें आमचें मोठें दुर्दैव आहे. तथापि दु:खांत सुख एवढेंच कीं, सदर तत्त्वविचारांचा अजिबात लोप न होतां त्यांस पाश्चिमात्यांच्या हातून कां होईना, पण उत्तेजन मिळून त्यांचा एका रीतीनें जीर्णोद्धार होत आहे. अशा रीतीनें तरी आमच्या जुन्या अध्यात्म ग्रंथांचें महत्व आमच्या लक्षांत येवो म्हणजे झालें.

---

## ६. अज्ञेयवाद

[ ११ ऑगस्ट १८९६ ]

आमचे मित्र रा. रा. नारायण लक्ष्मण फडके, बी. ए. यांनीं स्पेन्सर-साहेवांच्या ग्रंथाच्या आधारें मराठींत 'अज्ञेय मीमांसा' या नांवाचा तयार केलेला ग्रंथ सदर ग्रंथाचे प्रकाशक रा. रा. दाभोळकर यांचेमार्फत आमचेकडे येऊन दोन तीन महिने झाले. परंतु दुसऱ्या विषयांच्या गर्दीमुळें त्या ग्रंथाकडे वळण्यास आम्हांस आतांपर्यंत फुरसद झाली नाहीं. ग्रंथाचें बाह्यस्वरूप रा. रा. दाभोळकर यांच्या उपयुक्त ग्रंथमालेंतील इतर ग्रंथांप्रमाणेंच सुबक झालेलें आहे; व एकंदरींत त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथमालेस हल्लींचा ग्रंथ पूर्णपणें समजण्यासारखा झाला आहे. रा. रा. फडके यांनीं ग्रंथाच्या अखेरीस हर्बर्ट स्पेन्सर यांचें स्वल्प चरित्र जोडलें असल्यामुळें हा ग्रंथ अधिक उपयुक्त झालेला आहे. ग्रंथाची भाषा विषयानुरोधानें कठीण असावयाचीच; परंतु त्यांतले त्यांत ती सुगम होण्याचा जितका करवेल तितका प्रयत्न रा. रा. फडके यांनीं केलेला आहे. जगांत ज्या ज्या वस्तु आपणांस इंद्रियगोचर होतात त्यांचें यथार्थज्ञान होणें आपणास अशक्य आहे, हें अलीकडील पदार्थविज्ञानादि शास्त्रांच्या आधारानें सिद्ध केलेलें ज्यांस पहावयाचें असेल त्यास हा ग्रंथ वाचून पुष्कळच फायदा होईल हें सांगावयास नकोच. आपणास जगाचें जें ज्ञान होत आहे तें कोणत्या प्रकारचें आहे याचा स्पेन्सरसाहेबांनीं जसा अलीकडील शास्त्रास धरून सूक्ष्म रीतीनें विचार केला आहे तसा आमच्या जुन्या ग्रंथांत नाहीं, हें आम्हांस मान्य आहे. पण दिक्कालादि पदार्थांच्या अज्ञेयत्वाची उदात्त कल्पना आमच्या मनावर ठसवून देण्यास स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथांचीच आमच्या लोकांस जरूर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. यासंबंधानें रा. रा. फडक्यांचा आमच्याबद्दल थोडासा गैरसमज झाला आहे तोहि येथें दूर केला पाहिजे. रा. रा. फडके यांनीं या ग्रंथाच्या शेवटीं जोडलेल्या हर्बर्ट स्पेन्सर यांच्या चरित्राचा उपोद्घात केसरीकार घ्या, सुधारककार घ्या, किंवा मलबारी शेट घ्या, त्या सर्वांस स्पेन्सर साहेबांचीं मतें सारखींच मान्य आहेत. "**नामदार टिळक** यांचा या बाबतींत कै. आगरकरांशीं कांहीं मतभेद होता अगर असेल तर तो स्पेन्सरसाहेबांच्या विचारांच्या याथार्थ्याबद्दल किंवा अयाथार्थ्याबद्दल नव्हे; तर प्रस्तुतकालीं व प्रस्तुतस्थितींत ते आपणास किती व किती प्रमाणानें लागूं करितां येतील याबद्दलच होता किंवा

असेल." रा. रा. फडके यांनीं आमच्याबद्दल हा जो अभिप्राय दिलेला आहे तो चुकीचा आहे असें त्यांस कळविणें भाग आहे, यांपैकीं पहिल्या भागांत स्पेन्सर-साहेबांचीं मतें आम्हां दोघांसहि यथार्थ वाटतात असें लिहिलें आहे तें अगदीं बरोबर आहे; परंतु पुढें जो भेद दाखविला आहे तो मात्र वास्तविक नाहीं. आमचे मित्र कै. आगरकर अथवा सुधारकाचे प्रस्तुतचे एडिटर यांच्या व आमच्यामध्यें जर कांहीं मतभेद असला तर तो रा. रा. फडके समजतात त्यापेक्षां निराळ्या तऱ्हेचा आहे. आमचें असें म्हणणें आहे कीं, स्पेन्सरसाहेबांच्या अज्ञेयसिद्धांताचें आमच्या बंधूस जितकें महत्त्व वाटतें तितकें हिंदुस्थानांत जन्मून आम्हांस वाटण्याची जरूर नाहीं. "**यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह**" अशा रीतीनें आत्म्याची व्याख्या ज्या लोकांच्या ग्रंथांतून केलेली आहे त्यांस जगाच्या मुळाशीं कांहीं अज्ञेय आहे त्याचें स्वरूप कळलें नाहीं तरी त्याचें अस्तित्व कबूल करावें लागतें; अर्थात् तें सत् आहे, व शास्त्र व धर्म यांची या बाबतींत एकवाक्यता होण्याचा संभव आहे, हीं तत्त्वें सांगण्यांस स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथाची अवश्यकताच आहे असें आम्हांस वाटत नाहीं. इंद्रियार्थ सन्निकर्षापासून झालेलें ज्ञान प्रत्यक्ष असतें व तसें प्रत्यक्ष ज्ञान "**इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः । मनसस्तु पराबुद्धिर्यद्बुद्धेः परतस्तु सः ।**" असल्या विषयाबद्दल होणें शक्य नाहीं हें तत्त्व आमच्या पूर्वीच्या वेदांत्यास दर्शनानुशासन, पदार्थविज्ञानशास्त्र अथवा जीवनशास्त्र यांच्या साहाय्यानें जरी सिद्ध करतां आलें नसलें तरी त्या तत्त्वाची त्यास इतकी पुरी ओळख पटली होती कीं, त्याबद्दल जास्त पुराव्याची त्यांस यत्किंचितहि जरूर नव्हती, किंबहुना स्पेन्सरसाहेबांनीं या अज्ञेयवादास जें स्वरूप आणिलें आहे त्यापेक्षांहि परिणत स्वरूप आमच्या ग्रंथांतून या तत्त्वांस प्राप्त झालें आहे. अशी स्थिति असतां दिक्कालादिकांनींसुद्धां अनवच्छिन्न अतएव त्यांच्या मुळांशीं असूनहि स्वरूपतः अज्ञात अशा तत्त्वाचा केवळ स्पेन्सरच्या आधारावर आम्हांस उपदेश करूं पाहणें म्हणजे एक प्रकारें घरचें सोनें विसरून जाऊन लोकांच्या रुप्याकरितां धांव घेण्यासारखें आहे. यावरून स्पेन्सरसाहेबांची योग्यता आमच्या बंधूपेक्षां आम्हीं कमी मानतों असें कोणीहि समजूं नये. उत्क्रमण तत्त्वाचा ( उत्क्रमण हा शब्द इव्होल्यूशनचा अर्थ जितक्या चांगल्या रीतीनें दाखविला गेला पाहिजे तितक्या चांगल्या रीतीनें दाखवीत नाहीं) पूर्ण विकास करून हें तत्त्व चोहों-कडे लावण्याचा ज्या तत्त्ववेत्त्यानें प्रयत्न केला त्याचें महत्व आम्ही वर्णावें तितकें थोडेंच. किंबहुना सर्व पाश्चात्य तत्त्वविचारास या महातत्त्ववेत्त्यानें एक प्रकारचें निराळेंच वळण लावून दिलें आहे असें म्हटलें तरी चालेल. आमच्या व आमच्या बंधूंचा जो मतभेद आहे तो स्पेन्सरसाहेबांच्या यथार्थतेबद्दल नव्हे अथवा त्यांच्या

योग्यतेबद्दलहि नव्हे. हे आधुनिक काळचे ऋषिवर्य आम्हांसहि पूज्य व वंद्य आहेत. पण त्यामुळें आम्ही आपल्या पूर्वीच्या ऋषिवर्यांस विसरून जाऊन केवळ स्पेन्सर-साहेबांचेच पोवाडे गात बसावें हें आम्हांस बरें वाटत नाहीं. सुधारकांत अथवा रा. रा. फडके यांच्या प्रस्तुतच्या पुस्तकांत जो दोष आहे तो हाच होय. केवळ स्पेन्सरच्या ग्रंथाचेंच भाषांतर अथवा गोषवारा वाचकांपुढें मांडिल्यानें हें एक कांहीं नवेंच तत्त्व ग्रंथकार आपणापुढें मांडीत आहे असा कांही भास होतो; व त्यामुळें त्यांचा गैरसमज होऊन त्यांच्या विचारासहि अनिष्ट वळण लागतें तशी स्थिति होणें इष्ट नाहीं. करितां ज्यांस स्पेन्सरसाहेबासारख्यांचे तत्त्वविचार आमच्या लोकांपुढें मांडावयाचे असतील त्यांनीं ते इकडील पूर्वीच्या विचारांशीं ताडून पाहून परस्परांचें साम्य अगर भेद लक्षांत आणून मग लोकांपुढें मांडिलें पाहिजे. कारण हिंदुस्थानची जर कशाबद्दलची ख्याति असली तर ती धर्मविचाराबद्दल होय. हे विचार हल्लींच्या शास्त्रीय पद्धतीनें आम्हांस सुचले नसतील अगर आम्हीं त्यांचें प्रतिपादन केलें नसेल, परंतु त्यामुळें त्यांची कांहीं किंमत कमी होते असें नाहीं. यासाठीं केवळ स्पेन्सरसाहेबांचा ग्रंथ आपल्या हातांत नव्यानें पडला अथवा उदात्त विचारांची त्यांच्या वाचनानेंच प्रथमतः आपणास ओळख झाली येवढ्यावरून आमच्या देशांतील वाचकांपुढें हें तत्त्व त्यांस नवें भासेल अशा रीतीनें मांडण्यास आम्ही उद्युक्त होऊं नये. निदान हें विवेचन करितेवेळीं आमच्या जुन्या ग्रंथांतील विचारांचें याच्याशीं होईल तितकें साम्य दाखविण्याचा तरी आपणांस उद्योग केला पाहिजे. हें काम जरा जोखमीचें व विचाराचें आहे खरें, परंतु तत्त्वविचारांचे ग्रंथ ज्या अर्थी नेहमींच प्रसिद्ध होतात असें नाहीं त्या अर्थी या असल्या ग्रंथांतून, पहिल्यानेंच आम्हीं वर सांगितल्याप्रमाणें, प्राच्य व पाश्चात्य विचारांचें साम्य दाखविण्यांत आलें पाहिजे. सारांश रा. रा. फडके यांनीं आमच्या सुधारकांचा जो मतभेद दाखविला आहे तो बरोबर नसून खरा भेद निराळ्या प्रकारचाच आहे. स्पेन्सर-साहेबांचीं मतें प्रस्तुत स्थितींत व प्रस्तुत काळीं आपणांस किती व किती प्रमाणानें लागू करतां येतील याबद्दल मतभेद असल्यामुळें आम्ही तीं विस्तारें सांगत बसत नाहीं असें नाहीं, तर आमचें असें मत आहे कीं, हें तत्त्वच आम्हांस नवीन नाहीं, व यद्यपि त्याची मीमांसा आम्हीं स्पेन्सरसाहेबासारखी केली नसली तरी विश्वाच्या बुडाशीं जें कांहीं आहे तें केवळ सत् आहे, इतकेंच नव्हे तर, चिदानंदात्मकहि आहे, येथपर्यंत आमची मजल गेलेली आहे. या मजलेची ज्यांस ओळख झालेली नाहीं त्यांस स्पेन्सरसाहेबांची विचारसरणी जितकी मोहक व प्रगल्भ वाटेल तितकी ती केसरीकारांस न वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. अज्ञेयमीमांसेचीं तत्त्वें आम्हांस किती लागू करावयाचीं हा प्रश्न आमच्या मतें उपस्थित होत नाहीं. हीं तत्त्वें

आमच्या देशांत ज्या कोणास थोडाबहुत विचार करण्याची शक्ति आहे. मग तो जुना असो वा नवा असो– सर्वांसहि एकसारखीं लागूं आहेत. त्यांत मतभेदास कांहीं जागा नाहीं. परंतु आम्ही जर तीं सांगूं लागलों तर आमच्या मित्रापेक्षां तीं कांहीं तरी निराळ्या रीतीनें सांगूं; व रा. रा. फडके यांसहि आमची अशी विनंती आहे कीं, या ग्रंथाची पुनरावृत्ति काढण्याचा त्यांस प्रसंग आल्यास त्यांनीं आम्ही वर सुचविल्याप्रमाणें अवश्य व्यवस्था करावी. यापेक्षां ह्यांत तत्त्वज्ञानाबद्दल दुसरा कोणताहि मतभेद आमच्यामध्यें व आमच्या बंधूमध्यें आहे असें आम्हांस वाटत नाहीं. स्पेन्सरच्या ग्रंथाचें नुसतें भाषांतर झालें तरीहि कांहीं लहान काम झालें असें नाहीं. कारण खुद्द इंग्रजींतहि जर असले ग्रंथ खपण्याची मारामार पडली होती तर आमच्याकडची कथा काय ? रा. रा. दाभोळकर यांचे जे आभार मानावयाचे ते ह्याचसाठीं होत. स्पेन्सरच्या बऱ्याच ग्रंथांचा महाराष्ट्र वाचकांस त्यांनीं परिचय करून दिला आहे, व असाच उद्योग कायम ठेवून या ऋषिवर्याचे ग्रंथ आम्हांस जितके अधिक वाचावयास मिळतील तितका उद्योग करावा अशी त्यांस आमची शिफारस आहे. स्पेन्सरसाहेबांच्या मतांचा यथार्थतेबद्दल वादविवाद करण्याचें हें स्थळ नव्हे, करितां ग्रंथकाराचे व प्रकाशकाचे पुनः एकवार आभार मानून हा लेख संपवितो.

## ७. ज्ञेयाज्ञेयमीमांसा

[ ७ मे १९०१ ]

विलायतेंतील प्रसिद्ध तत्त्वज्ञ हर्बर्ट स्पेन्सर यांच्या 'आदितत्त्वें' या ग्रंथावरून रा. रा. नारायण लक्ष्मण फडके यांनीं केलेल्या अज्ञेयमीमांसेचें मागें केसरींत एकदां परीक्षण आलेलेंच आहे. याच प्रसिद्ध इंग्रज ग्रंथकाराच्या सदर ग्रंथाचा उत्तरार्ध म्हणजे ज्ञेयमीमांसा यांचें मराठींत भाषांतर किंवा सार दोन पुस्तकांच्या रूपानें रा. रा. दाभोळकर यांनीं प्रकाशित केलेल्या ग्रंथमालेंत प्रसिद्ध झालें असून तें आमच्याकडे येऊन बरेच दिवस झाले. असल्या तऱ्हेचे तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ मराठींत उतरण्याचे फारसे प्रयत्न अद्याप झाले नसल्यामुळें रा. रा. फडके यांस स्पेन्सरसाहेबांचे विचार मराठींत व्यक्त करण्यास बराच त्रास पडला असेल यांत शंका नाहीं. तथापि विषयाचें गांभीर्य लक्षांत आणतां रा. रा. फडके यांचा प्रयत्न बराच सिद्धीस गेला असून त्यांचा ग्रंथ वाचण्यासारखा झाला आहे असें म्हणण्यास आम्हांस कांहींएक हरकत दिसत नाहीं. कांहीं ठिकाणीं विषयाच्या अपरिचितपणामुळें सामान्य वाचकांस किंवा अर्वाचीन युरोपियन शास्त्राची ज्यांस विशेष ओळख नाहीं अशा गृहस्थांस ग्रंथ कठीण वाटेल; पण असले ग्रंथ केवळ मनोरंजनार्थ नसतात हें लक्षांत ठेवून पुनः वाचण्याची तसदी घेतल्यास ही त्यांची अडचण दूर होणार आहे. "**नियमबद्धतेची सार्वत्रिकता**" (Uniformity of law) वगैरे प्रकारचे कांहीं शब्द निराळ्या तऱ्हेनें रचतां आले असते. तथापि अशा प्रकारचे शब्द फारच थोडे आहेत व तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयाची ज्यास ओळख करून घ्यावयाची असेल—मग ती संस्कृतांतून असो वा मराठींतून असो—त्यानें असल्या शब्दास भिऊन उपयोगी नाहीं. शब्दातीत अज्ञेयाची कल्पना शब्दांनीं व्यक्त करणें किती अवघड आहे हें '**नेति, नेति,**' या श्रुतीवरून सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. तसेंच विश्वांत ज्या अनेक घडामोडी चालल्या आहेत त्या ज्या सामान्य नियमांच्या अनुरोधानें होतात त्या सामान्य नियमांचें आकलन होऊन तें शब्दांनीं बरोबर व्यक्त करणें इतकें दुष्कर आहे कीं, इंग्रजीसारखी सुधारलेली भाषा व स्पेन्सरसारखे तत्त्वज्ञानी यांची गांठ पडली असतांहि स्पेन्सरसाहेबांस कांहीं ठिकाणीं आपल्या मनांतील विचार बरोबर रीतीनें व्यक्त करण्याकरतां नव्या कृत्रिम शब्दांची योजना करावी लागली आहे. अशा विषयांवरील ग्रंथाचें मराठी भाषांतर किंवा सारांश थोडाबहुत कठिण

होणारच, पण ज्यास जुन्या वेदांतापलीकडे जाऊन त्याचे सिद्धांत व पाश्चिमात्य आधुनिक शास्त्रांचे तद्विषयक सिद्धांत यांची तुलना करावयाची असेल त्यानें स्पेन्सरच्या ग्रंथाचें अध्ययन केलें पाहिजे. तसें अध्ययन करण्यास मराठी वाचकांस रा. रा. फडके यांच्या ग्रंथांनीं चांगली सोय झाली आहे व ही करून दिल्याबद्दल रा. रा. फडके यांचें आम्ही अभिनंदन करतों. आपल्या फुरसतीच्या वेळीं अशाच प्रकारची स्वभाषेची सेवा करण्याचें जर इंग्रजी शिकलेल्या दुसऱ्या विद्वानांनीं मनांत आणिलें तर त्यापासून त्यांचा व लोकांचा पुष्कळ फायदा होण्याचा संभव आहे.

अलीकडे दोन तीन शतकें ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, विद्युच्छास्त्र वगैरे आधिभौतिक शास्त्रांची पुष्कळ अभिवृद्धि होऊन जगांतील नैसर्गिक शक्तींनें एकंदर पदार्थांचीं जीं स्थित्यंतरें किंवा रूपांतरें होतात त्याचे नियम आपणास अधिकाधिक कळत जाऊन त्यापासून मनुष्यजातीचा अत्यंत फायदा झालेला आहे, ही गोष्ट सर्वांस निर्विवाद कबूल आहे. जडसृष्टींतील पदार्थांचें सूक्ष्म अवलोकन, तदंतर्गत गुणधर्मांचें व्यवस्थित व सखोल विवेचन, आणि परस्परविभिन्न दिसणाऱ्या पदार्थांचें किंवा गुणधर्मांचें एकमेकांशीं सदृशत्व किंवा विसदृशत्व समजणें हीं आतां जशीं सुगम झालीं आहेत तशीं पूर्वीं कधींहि झालेलीं नव्हतीं. ज्या पाण्यास आमच्या पूर्वींच्या शास्त्रांतून आदितत्व मानलेलें आहे तेंच पाणी वायुरूप दोन तत्त्वांपासून बनलेलें आहे असें आतां सिद्ध झालेलें आहे. जडद्रव्यासंबंधानें हा दृष्टांत झाला. पदार्थांच्या अवस्थेसंबंधानें पाहिलें तर कोणताहि पदार्थ प्रवाही, घन किंवा वायुरूपी असणें हे त्याचे भिन्नभिन्न गुणधर्म नसून कमजास्त ऊष्णतेनें हीं तीन स्वरूपें त्यास प्राप्त होतात असेंहि आतां सिद्ध झालेलें आहे. त्याचप्रमाणें सर्व पदार्थांस सामान्यतः व्यापून असणारे दिक्कालादि पदार्थ अनादि व अनंत असले तरी त्यांचा इतर पदार्थांशीं कोणत्या प्रकारचा संबंध असतो याचें अर्वाचीन शास्त्रांतून जितकें चांगलें विवेचन आहे तितकें जुन्या ग्रंथांतून नाहीं; व त्याचें कारणहि उघड आहे. गेल्या दोनशें तीनशें वर्षांत आधिभौतिक शास्त्राची जी अभिवृद्धि झाली तिच्या योगानें हें ज्ञान आपणांस प्राप्त झालेलें आहे; व प्रथमदर्शनीं हें इतकें रमणीय आहे कीं, या ज्ञानाच्या विचारांत गुंतलेले गृहस्थ येथेंच आपल्या ज्ञानाची परमावधि झाली असें म्हणून त्या ज्ञानाच्या पलीकडे जाण्यास किंवा पाहाण्यास आपणांस असमर्थ करून घेतात; इतकेंच नव्हे तर त्यांतच आपणांस कृतकृत्य मानून घेतात; तत्त्वज्ञानाची व त्याच्या सिद्धांताची जर कोणास विशेष जरूर असेल तर ती असल्याच गृहस्थांस होय. यांची स्थिति आणि वडिलांच्या वेळची विहीर म्हणून त्यांतील खारें पाणी पिणाऱ्या मनुष्याची स्थिती एकसारखीच असते.

अनेक आधिभौतिक शास्त्रांच्या सिद्धांताचें परीक्षण करून व त्यांत सारखेपणा कोठें आहे आणि विसदृशत्व कोठें आहे हें पाहून निरनिराळ्या शास्त्रांतील सिद्धांत एकाच सामान्य सिद्धांताचीं निरनिराळीं स्वरूपें असतील कीं नाहीं हें ठरविणें हें तत्त्वज्ञाचें काम होय. एखाद्या आधिभौतिक शास्त्राच्या अभ्यासांत जन्म घालून त्या शास्त्राच्या ज्ञानाची मर्यादा वाढविणारे गृहस्थच आधीं विरळा सांपडतात, परंतु याहीपेक्षां सर्व शास्त्रांचे सिद्धांत एके ठिकाणीं करून त्यांतून कांहीं तरी सामान्य सिद्धांत काढून सर्व ज्ञानाचें एकीकरण करणारे पुरुप तर क्वचितच निर्माण होतात. हर्बर्ट स्पेन्सर यांची गणना या दुसऱ्या वर्गांत आहे, व ज्ञेय-मीमांसेंत त्यांनीं जें कांहीं सिद्ध केलें आहे तेंहि हेंच होय. हल्लींच्या शतकांत प्रचलित असलेल्या अनेक शास्त्रांचे अनेक सिद्धांत एकत्र करून ते द्रव्य व गति यांच्या कांहीं सामान्य नियमांचे प्रकार आहेत असें दाखविणें, व सर्व शास्त्रांतून निरनिराळ्या सिद्धांतांचा जो पसारा पसरला असतो तो सर्व समानमूलक आहे असें ठरवून तीं मूलतत्त्वें कोणतीं हें व्यवस्थित रीतीनें मांडणें हें कांहीं लहानसहान परिश्रमाचें किंवा बुद्धीचें काम नव्हे. हर्बर्ट स्पेन्सरसाहेबांनीं हें अवघड काम कित्येक वर्षें परिश्रम करून आपल्या समजुतीप्रमाणें तडीस नेलेलें आहे; व एकोणिसाव्या शतकाच्या अखेर व विसाव्या शतकाच्या आरंभीं प्रचलित असलेल्या सर्व शास्त्रीय सिद्धांतांचें हें एकीकरण प्रत्येक तत्त्वजिज्ञासूनें समजून घेण्यासारखें आहे. अशा तऱ्हेनें विष्कलित ज्ञानाचें संकलन करणें याचेंच नांव तत्त्वज्ञान होय. व हल्लीं प्रचलित असलेल्या अनेक शास्त्रांच्या सिद्धांतांचें संकलन कसें करावें व केलें आहे हें ज्यांस पाहणें असेल त्यांनीं स्पेन्सरसाहेबांचे ग्रंथ वाचले पाहिजेत. परंतु स्पेन्सर-साहेब एवढाच उद्योग करून राहिले आहेत असें नाहीं. अनक शास्त्रांतील सिद्धांतांच्या परीक्षणानें जे सामान्य सिद्धांत निघाले ते परस्पर निरपेक्ष असून स्वतंत्र आहेत किंवा त्यांतहि एकप्रकारचें सादृश्य असून ते दुसऱ्या कोणत्या तरी एका सामान्य सिद्धांताचे किंवा तत्त्वाचे किंवा स्वरूपभेद आहेत, असें म्हणतां येईल कीं नाहीं याचा त्यांनीं बारकाईनें विचार केला आहे. '**अज्ञेयमीमांसा**' असें हल्लींच्या ग्रंथांत ज्यास म्हटलें आहे ती हीच होय. सृष्टीमध्यें ज्या कांहीं गोष्टी आपण पाहतों, ऐकतों व अनुभवितों त्या सर्वांचे वस्तुरूप, गुणधर्म, क्रिया वगैरे संबंधानें पुरा विचार करून निरनिराळ्या वस्तूंबद्दल किंवा गोष्टींबद्दल निरनिराळ्या शास्त्रांतून जे सिद्धांत ठरविले आहेत त्या सर्वांचें एकीकरण करून ह्यापासून सर्वांस लागणारे दहापांच सिद्धांत काढणें व ते सर्व कसकसे लागतात याचें विवरण करणें हें ज्ञेयमीमांसेचें काम झालें; पण हें एकीकरणाचें चक्र एकदां सुरू झालें म्हणजे तें केवळ या सामान्य सिद्धांतांशींच येऊन थांबत नाहीं. निरनिराळ्या शास्त्रांचे निरनिराळ्या

शोधक पुरुषांनीं काढलेले सिद्धांत जर सामान्य दहापांच सिद्धांतांत वसवितां येतात तर हे दहापांच सिद्धांत तरी आणखी एखाद्या सामान्य गोष्टीचीं, तत्त्वाचीं किंवा सिद्धांताचीं स्वरूपें नसतील कशावरून, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो व याचें उत्तर अज्ञेयमीमांसेंत दिलें आहे. प्रत्येक शास्त्राच्या बुडाशीं पाहूं गेलें असतां मनुष्याच्या बुद्धीस व तर्कास अगम्य असें कांहीं तरी तत्त्व आहे अशी मनाची खात्री होते, मग त्या तत्वाचें पूर्ण स्वरूप समजो, वा न समजो असें स्पेन्सरसाहेबांनीं अनेक उदाहरणें देऊन सिद्ध केलें आहे. अनेक शास्त्रांच्या बुडाशीं असणारीं अशीं जीं गम्य तत्त्वें त्यांच्या एकीकरणानें एका अगम्याचें अस्तित्व सिद्ध होऊन शास्त्राच्या निरनिराळ्या सिद्धांताच्या परीक्षणानें जें सामान्य सिद्धांत सिद्ध होतात ते या अगम्य तत्वाच्याच भासमान विकृती किंवा स्वरूपें आहेत असें स्पेन्सरसाहेबांनीं सिद्ध केलें आहे. सारांश, सर्व ज्ञेयशास्त्रांतील सिद्धांतांचें पर्यवसान एका अगम्य तत्त्वांत असून या अगम्य तत्त्वांचींच ज्ञेयशास्त्रांतील सिद्धांत हीं चिन्हें किंवा गम्य स्वरूपें आहेत असा स्पेन्सरसाहेबांच्या आदितत्त्वें या ग्रंथाचा अखेर सिद्धांत आहे. तत्त्वज्ञानाच्या किंवा वेदांताच्या दृष्टीनें हा सिद्धांत किती महत्त्वाचा आहे हें आम्हीं सांगावयास नकोच. शिवाय तो ज्या रीतीनें सिद्ध केलेला आहे ती रीति एकोणिसाव्या शतकांतील शास्त्रीय पद्धतीस पूर्णपणें अनुसरून असल्यामुळें नव्या पद्धतीनें विचार करणाऱ्या लोकांस ती सर्वांशीं पटण्यासारखी आहे.

परंतु स्पेन्सरसाहेबांच्या वरील सिद्धांतांचें व ते ज्या सरणीनें सिद्ध केले आहेत त्या सरणीचें महत्त्व आमच्या इकडील लोकांच्या पूर्णपणें लक्षांत आणून देण्यास आमच्याकडील जुन्या तत्त्वज्ञानाच्या सिद्धांतांची याच ग्रंथांत रा. रा. फडके यांनीं थोडी माहिती द्यावयास पाहिजे होती. तत्त्वज्ञानासंबंधानें जुन्या संस्कृत ग्रंथांतून इतके विचार झालेले आहेत कीं, सिद्धांत प्रतिपादन करण्याच्या सरणींत जरी कांहीं भेद झाला असला तरी स्पेन्सरसाहेबांचे वरील सिद्धांत आमच्या जुन्या तत्त्वज्ञानाशीं पुष्कळ अंशीं मिळते आहेत. पूर्वेकडील व पश्चिमेकडील तत्त्वज्ञान सिद्धांतामध्यें अशा रीतीनें असलेलें साम्य दाखवून त्यांत विसदृशपणा कोणता हाहि जर रा. रा. फडके यांनीं प्रस्तावना किंवा परिशिष्ट या रूपानें याच ग्रंथांत सांगितला असता किंवा स्वतंत्र ग्रंथद्वारें सांगतील तर '**ज्ञानाचें एकीकरण हेंच खरें तत्त्वज्ञान**' अशी जी स्पेन्सरसाहेबांनीं तत्त्वज्ञानाची व्याख्या केली आहे तिचें यथार्थ स्वरूप वाचकांच्या अधिक नजरेस आलें असतें किंवा येईल. ज्ञेय किंवा अज्ञेय, गम्य किंवा अगम्य, चित किंवा जड, सचेतन किंवा अचेतन हे सृष्टिज्ञानाचे विभाग आम्हांस अपरिचित आहेत असें नाहीं. हिंदुतत्त्वज्ञ

याची आज हजारों वर्षें चर्चा करीत आले आहेत; व त्यांनीं या बाबतींत काय प्रयत्न केले होते याचा उल्लेख हल्लींच्या ठिकठिकाणीं येणें जरूर होतें. मागें अज्ञेयमीमांसेचें परीक्षण करतांना सदर ग्रंथांत हीच उणीव आहे असें आम्ही म्हटलें होतें. व प्रस्तुत ग्रंथासहि तोच शेरा लागू पडतो. आमच्या जुन्या ग्रंथांत स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथांतील विचारसरणीचें अनुकरण केलेलें नसलें तरी ज्ञेय किंवा अज्ञेय विषयाबद्दल त्यांचे सिद्धांत बऱ्याच बाबतींत हल्लींच्या सिद्धांतांपेक्षांहि पुढें गेलेले आहेत. आजचा लेख बराच लांबल्यामुळें त्यासंबंधानें जास्त विवेचन येथें करतां येत नाहीं. आज फक्त स्पेन्सरसाहेबांच्या सिद्धांतांचें सामान्य स्वरूप सांगितलें आहे. आतां ते जुन्या सिद्धांतांशीं कितपत जुळतात व जुन्या ग्रंथांत हेच सिद्धांत कोणत्या पद्धतीनें, कसे व कितपत सिद्ध केले आहेत याचा विचार पुढील खेपेस करूं.

## ज्ञेयाज्ञेयमीमांसा ( उत्तरार्ध )

[ १४ मे १९०१ ]

गेल्या खेपेस ज्ञेय आणि अज्ञेय अथवा जड आणि चित् सृष्टीसंबंधीं स्पेन्सर-साहेबांचे काय सिद्धांत आहेत हें थोडक्यांत सांगितलें. हरएक शास्त्रांतील मूलतत्त्वें कोणतीं हें ठरविणें ज्ञानाच्या एकीकरणाचा पहिला हप्ता होय; परंतु भिन्नभिन्न शास्त्रांतील मूलतत्त्वें अशा रीतीनें ठरल्यावर तीं पुनः एकत्र करून त्यांतून सामान्य सिद्धांत काढणें व सर्वत्र एकाच अज्ञेय तत्त्वाची व्याप्ति आहे असें सिद्ध करणें हें तत्त्वज्ञाचें काम स्पेन्सरसाहेबांनीं ज्या पद्धतीचा अंगिकार करून तडीस नेलें आहे त्याहून आमच्या जुन्या तत्वज्ञांची पद्धत भिन्न आहे; परंतु सिद्धांत बहुतेक एकसारखेच आहेत, या गोष्टीचा उल्लेख मागील खेपेस केला होता. आज त्याचाच थोडासा जास्त विचार करून रा. रा. फडके यांच्या पुस्तकाचें हें परीक्षण आम्ही संपविणार आहों. विषयाचें महत्त्व लक्षांत आणलें असतां दोनचार लेखांतहि तो आटपणें अशक्य आहे, पण तितक्या विस्तारानें लेख लिहिण्याची तूर्त सवड नसल्यामुळें गेल्या अंकीं ज्याप्रमाणें स्पेन्सरसाहेबांच्या सिद्धांतांचा थोडक्यांत सारांश दिला त्याचप्रमाणें या अंकीं तत्सदृश आमच्याकडील तत्वज्ञांच्या सिद्धांताचा थोडक्यांत उल्लेख करण्याचा आमचा विचार आहे.

ज्ञेय आणि अज्ञेय असे जे तत्वज्ञानाच्या विषयाचे दोन भाग स्पेन्सरसाहेबांनीं केलेले आहेत त्यासारखेंच आमच्याकडे एकपक्षीं न्याय आणि सांख्य आणि दुसऱ्या पक्षीं वेदांत हीं शास्त्रें होत. उत्क्रांति, शक्तीचें समतोलन, गतीचें सातत्य वगैरे

आधिभौतिक शास्त्राच्या अनुभवावरून जसे कांहीं सामान्य सिद्धांत स्पेन्सरसाहेबांनीं काढलेले आहेत तसेंच सृष्टीच्या अवलोकनानें "**द्रव्यगुणकर्मसामान्यविशेषसमवायाभावाः सप्तपदार्थाः**" असे आमच्या नैयायिकांनीं सृष्टींतील सर्व पदार्थांचे व त्यांच्या गुणधर्मांचे सात सामान्य विभाग कल्पून व त्यांस "**पदार्थ**" असें पारिभाषिक नांव देऊन त्यांत सर्व वस्तूंचा संग्रह करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सात पदार्थांपैकीं कर्म किंवा क्रिया यास गुण म्हणतां येईल किंवा नाहीं, अभाव हा स्वतंत्र पदार्थ आहे कीं नाहीं, सामान्य म्हणजे साधारणत्व हा एक पदार्थ मानल्यानंतर त्यापासून विशिष्टत्व उत्पन्न होण्यास '**विशेष**' या दुसऱ्या पदार्थाची जरूर आहे कीं नाहीं, इ. न्यायशास्त्रामध्यें पुष्कळ विचार आहेत. कणादाचें वैशेषिक दर्शन तर "**विशेष**" हा स्वतंत्र पदार्थ मानल्यामुळेंच उत्पन्न झालेलें आहे असेंहि एक मत आहे. सृष्टींतील वस्तुमात्राचें अवलोकन करून त्यांचा व त्यांच्या गुणधर्मांचा दहापांच ठळक ठळक वर्गांत समावेश करण्याचा प्रयत्न जर कोणीं केला असेल, तर तो आमच्याकडे सांख्यन्यायदर्शनकारांनींच केलेला आहे. द्रव्य म्हणजे ज्यांस इंग्रजींत मूलतत्त्वें म्हणतात तीं एकदां पृथक मानल्यावर मग त्यांचे गुण त्यांच्याहून भिन्न किंवा अभिन्न किंवा क्रिया हा त्यांचा गुण अथवा पृथक पदार्थ इत्यादि प्रश्नांचें विवेचन येथें करूं गेल्यास फारच विस्तार होईल. प्रस्तुत लेखाचा उद्देश एवढेंच सांगण्याचा आहे कीं, नैयायिकांनीं '**पदार्थ**' म्हणून जे जगांतील वस्तुमात्राचे वर्ग कल्पिलेले आहेत त्यांचे आणि स्पेन्सरसाहेबांनीं दाखविलेल्या निरनिराळ्या शास्त्रांतील सामान्य सिद्धांताचें बऱ्याच अंशीं सादृश्य आहे. नैयायिक हे कांहीं एकटेच अशा रीतीनें पदार्थमात्राचें वर्गीकरण करणारे आहेत असें नाहीं. "**गुणा गुणेषु वर्तन्ते**" म्हणजे एका गुणापासून दुसरा गुण, त्यापासून तिसरा अशी त्याच्यापासून परंपरा उत्पन्न करितां येते. या तत्वावर नैय्यायिकाचे सप्त पदार्थ टाकून देऊन त्याऐवजीं सांख्यशास्त्रांत प्रकृति आणि पुरुष हीं दोनच तत्त्वें अनादि मानिलेलीं आहेत; आणि त्यांचें इंग्रजी तत्त्ववेत्यांनीं मानिलेल्या '**मॅटर**' आणि '**स्पिरिट**' या दोन वर्गांशीं, बरेंच सादृश्य आहे, पुरुष उदासीन राहून सर्व गुणांचें अधिष्ठान जी प्रकृति तिच्या सान्निध्यानें अनेकविध भासतो, परंतु खरीं तत्त्वें प्रकृति आणि पुरुप हीं दोनच आहेत असें सांख्याचें म्हणणें आहे. यामध्यें आणि नैयायिकांच्या सप्तपदार्थांमध्यें पुष्कळ भेद आहे हें सहज लक्षांत येईल. तो भेद येथें सांगत बसण्यास अवकाश नाहीं. तथापि, सामान्य दृष्टीनें पाहतां ज्ञेय गोष्टींचे नैयायिकांनीं सात, तर सांख्यांनीं दोनच वर्ग केले असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु या दोन्ही शास्त्रांत ज्ञानाचें अद्याप पुरें एकीकरण झालेलें नाहीं; व तशा प्रकारचें एकीकरण आमच्या

पूर्वीच्या तत्त्वज्ञांनीं केलेलें ज्यांस पाहावयाचें असेल, त्यानें वेदान्तशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे. परिमाणु, सप्तपदार्थ किंवा प्रकृति आणि पुरुष हीं न्यायाचीं व सांख्यांचीं तत्त्वें अनित्य असून खऱ्या जिज्ञासूनें यांच्याहि बुडाशीं जाऊन ज्या एका महाशक्तीचे हे विकार आहेत तिचें ज्ञान किंवा ओळख करून घेतली पाहिजे असें वेदांतशास्त्र सांगतें. शंकराचार्यांच्या भाष्यांत न्याय आणि वेदांत यांचें ठिकठिकाणीं जें खंडण आलेलें आहे त्यांतील किरकोळ मुद्दे सोडून दिले तर बाकीचा भाग पदार्थांचें सप्तत्व किंवा प्रकृति आणि पुरुष हें द्वंद्व खरें नाहीं, '**एकमेवाद्वितीयम्**' ब्रह्मच काय तें नित्य व सर्वांचें आदिकरण आहे असें सिद्ध करून दाखविण्यांत गेलेला आहे. एकपक्षीं न्याय आणि सांख्य आणि दुसऱ्या पक्षीं वेदांत यांच्यामधील विरोध बऱ्याच अंशीं स्पेन्सरसाहेबांनीं सांगितलेले अनेक शास्त्रांचे सिद्धांत आणि सर्वांच्या बुडाशीं असलेलें आशेयतत्त्व यांच्यामधील विरोधासारखाच आहे. परंतु सर्वांच्या बुडाशीं असलेल्या अज्ञेय तत्वासंबंधानें पाहिलें तर स्पेन्सरसाहेबापेक्षांहि आमचे तत्वज्ञ बरेच पुढें गेलेले आहेत. ब्रह्मासंबंधानें बोलतांना जुन्या संस्कृत ग्रंथांतून चार शब्द मुख्यतः ब्रह्माचें स्वरूपाचे वाचक म्हणून वापरलेले आढळतात. ते शब्द सत्, चित्, ज्ञान आणि आनंद हे होत. सर्व सृष्टीच्या किंवा सर्व आधिभौतिक शास्त्राच्या बुडाशीं जी शक्ति आहे ती शब्दांनीं जरी अवर्णनीय असली किंवा तिच्या स्वरूपाचें आम्हांस यथार्थ ज्ञान होणें शक्य नसलें, अर्थात् ती जरी एकप्रकारें अज्ञेय असली, तरी तशा प्रकारची शक्ति विद्यमान आहे एवढें निर्विवाद सिद्ध होतें असें स्पेन्सरसाहेबांनीं सप्रमाण सिद्ध करून दाखविलें आहे; व आमच्या तत्वज्ञांनीं हीच गोष्ट लक्षांत आणून या शक्तीस 'सत्' हा शब्द पहिल्यानें लाविला आहे. ब्रह्म सत् आहे अथवा तें आहे याबद्दल शंका नाहीं, त्याचें अस्तित्व निर्विवाद आहे किंवा त्याचें स्वरूपच अस्तित्वरूप आहे, अथवा जें आहे तें तेंच आहे, दुसरें कांहीं नाहीं ही गोष्ट वेदांतील सर्व ग्रंथांस कबूल आहे. व स्पेन्सरसाहेबांनीं निरनिराळ्या शास्त्रांच्या अवलोकनानें नव्या पद्धतीनें कोणती गोष्ट सिद्ध केली तर ती हीच होय कीं, आदिशक्ति अज्ञेय किंवा जाणण्यास अशक्य असली तरी ती सत् म्हणजे विद्यमान् आहे (The unknowable) येथवर वेदांतशास्त्राची व स्पेन्सरसाहेबांची पुरी एकवाक्यता आहे. ही शक्ति चिद्रूप आहे असा आमचेकडील वेदांतशास्त्राचा दुसरा सिद्धांत आहे व तो पहिल्याइतका स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथांत स्पष्ट आला नसला तरी ज्याअर्थी जगांतील वस्तुमात्र आणि त्यांचे गुणधर्म हे या शक्तीचींच स्वरूपांतरें आहेत असें त्यांचें मत आहे त्याअर्थीं ही शक्ति चिन्मय असावी ही गोष्ट त्यांस मान्य आहे असें स्पष्ट होतें. पण चित् किंवा चैतन्य याचा आमच्या वेदांत-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



शास्त्रांतून जो अर्थ घरलेला आहे तितका स्पेन्सरसाहेबांस अभिप्रेत आहे किंवा नाहीं, हें खात्रीनें सांगतां यावयाचें नाहीं. ब्रह्म आणि ज्ञान यांचें तादात्म्यसंबंधानेंहि स्पेन्सरसाहेबांचें मत असावें तितकें स्पष्ट नाहीं. ज्ञेय असो कीं अज्ञेय असो, पण ज्ञानविषय आहे, ज्ञाता व ज्ञान तद्भिन्न आहे येथपर्यंतच त्यांची मजल गेलेली दिसते. **‘यत्र हि एकमेव भवति तत्केन कं पश्येत्’** ही पूर्णाद्वैताची कल्पना अंतःकरणांत ठसल्याशिवाय ब्रह्म ज्ञानस्वरूपच आहे ही कल्पनाहि सुचावयाची नाहीं. ब्रह्मा संबंधानें चवथा शब्द वापरला तो ‘आनंद’ हा होय पण त्याबद्दल स्पेन्सरसाहेबांच्या तत्त्वज्ञानांत मुळींच विचार केलेला दिसत नाहीं. आमचेकडेहि ब्रह्म आनंदमय आहे किंवा आनंदस्वरूप आहे याबद्दल बरीच चर्चा व वादविवाद झालेले आहेत; व कित्येकांच्या मतें सत् आणि चित् हीं दोनच पदें काय तीं जगाच्या आदिशक्तीस यथार्थत्वानें लागू आहेत. हे वाद इतके गहन आहेत कीं, त्यांचा या ठिकाणीं नुसता निर्देश करण्यापलीकडे जास्त कांहीं लिहितां यावयाचें नाहीं. स्पेन्सरसाहेबांच्या ज्ञेयमीमांसेस न्याय आणि सांख्य व अज्ञेयमीमांसेस वेदांत हीं आमच्याकडील तोडीचीं शास्त्रें आहेत एवढेंच प्रधानत्वेंकरून सांगण्याचा आमचा उद्देश आहे. वेदांतामध्यें जीव, परब्रह्म आणि जडसृष्टि यांचे अन्योन्य संबंध कोणत्या प्रकारचे आहेत याचा विचार करून या तिहींचें ब्रह्मस्वरूपांत एकीकरण होण्याचें शक्य आहे कीं नाहीं व असल्यास तें कोणत्या प्रकारे होतें याचे जे सूक्ष्म विचार सिद्धांत आहेत ते कांहीं सर्व स्पेन्सरसाहेबांच्या तत्त्वज्ञानाच्या पुस्तकांत उपलब्ध नाहींत. तथापि सर्वांचा मूलभूत सिद्धांत दोहोंतहि सारखाच आहे. तो हा कीं, ब्रह्म हें सत् व त्रिकालाबाधित असून त्याच्या स्वरूपाचें यथार्थ ज्ञान होणें दुर्घट आहे. हाच सिद्धांत सर्व वेदांताचें मूल होय, व तो आमच्या जुन्या पद्धतीनें सिद्ध केलेला ज्यास आवडत नसेल त्यांनीं स्पेन्सरसाहेबांचे ग्रंथ वाचले असतां त्यांस हेंच तत्त्व नव्या युक्तींनीं, प्रमाणांनीं आणि पद्धतीनें सिद्ध केलेलें सांपडेल. सारांश, या एका सिद्धांतासंबंधानें जरी पूर्वेकडील व पश्चिमेकडील तत्त्वज्ञांच्या सिद्ध करण्याच्या पद्धती भिन्न असल्या तरी मुख्य विषयासंबंधानें पुरा मेळ आहे. ज्ञेयशास्त्रास हेंच विधान पूर्णपणें लागू करतां यावयाचें नाहीं. कारण, अलीकडे दोन तीनशें वर्षांत या शास्त्रासंबंधानें जे शोध झालेले आहेत ते इतके विस्तृत व व्यापक आहेत कीं, पदार्थमात्राचे आमच्या नैयायिकांनीं मानलेले सात वर्ग किंवा त्यांचे पोटवर्ग आतां पूर्वीप्रमाणेंच राहतील असा निश्चय सांगतां येत नाहीं. सांख्यकारांनीं प्रकृति आणि पुरुष अशीं दोनच तत्त्वें मानलीं असल्यामुळें अर्वाचीन शोधानें त्यांच्या वर्गीकरणास फारसा धक्का येणें शक्य नाहीं; पण नैयायिकाची गोष्ट निराळी आहे. कसेंहि असो, ज्ञानाच्या एकीकरणाची शेवटची पायरी जी

वेदांत तिच्यासंबंधानें हा न्याय लागू नाहीं. हें शेवटचें एकीकरण स्पेन्सर-साहेबांच्या मताप्रमाणें अज्ञाततत्त्वांत किंवा आमच्याकडील लोकांच्या मताप्रमाणें ब्रह्मस्वरूप सच्चिदानंद शक्तींतच झालें पाहिजे. म्हणजे आमच्याकडील आणि पश्चिमेकडील तत्त्वज्ञानाचे अखेरचे सिद्धांत एकच आहेत आणि सर्वांचें पर्यवसानहि एकच आहे. विचारसरणींत किंवा सिद्धांत सिद्ध करण्याच्या पद्धतींत मात्र पुष्कळ फरक झालेला आहे. परंतु हा फरक एका अंशानें इष्टसिद्धिकारक आहे. कारण हजारों वर्षांच्या अंतरानें निघालेल्या विचारसरणीच्या दोन्ही पद्धतीनें जेव्हां एकच सिद्धांत सिद्ध होतो तेव्हां त्या सिद्धांताची सत्यता अधिकच दृढ होते हें निर्विवाद आहे. अर्वाचीन विचारसरणीनें सिद्ध होणाऱ्या या सिद्धांताचें ज्ञान प्राचीनकाळच्या तत्त्वज्ञांस कोणत्या तऱ्हेनें झालें हा एक मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे, व त्याचें उत्तर देण्यास योगशास्त्राचींहि थोडीशी मदत घ्यावी लागेल. पण इतकें खोल शिरण्याचा आमचा इरादा नाहीं. सामान्यरीत्या ज्ञेय आणि अज्ञेय मीमांसेंत स्पेन्सरसाहेबांनीं जे सिद्धांत ग्रंथित केले आहेत तत्सदृश आमच्यामधील शास्त्रें कोणतीं एवढेंच सांगण्याचा आमचा हेतु होता व त्याप्रमाणें सदर विषयाचें वर थोडें दिग्दर्शन केलें आहे. एवढ्यानें या विषयाकडे कोणाचें लक्ष जाऊन जर अशा प्रकारची अर्वाचीन व प्राचीन तत्त्वज्ञानावरील ग्रंथाची तुलना करून हा विषय तो महाराष्ट्र जनतेपुढें मांडील तर आमच्या श्रमाचें सार्थक झालें असें आम्हीं समजूं. विषय इतका महत्त्वाचा व गहन आहे कीं, त्याची वर्तमानपत्रांतून यापेक्षां जास्त चर्चा करणें शक्य नाहीं.

# ८. हर्बर्ट स्पेन्सर

[ १५ डिसेंबर १९०३ ]

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**

—भगवद्गीता.

हर्बर्ट स्पेन्सर यांचें नांव महाराष्ट्रांतच काय पण सर्व जगभर प्रसिद्ध झालेलें असून एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जे कांहीं प्रसिद्ध तत्ववेत्ते झाले त्यांच्यामध्यें हर्बर्ट स्पेन्सर यांस सर्वानुमतें अग्रपूजेचा मान मिळालेला आहे. हे तत्त्वज्ञानी पुरुष आपल्या वयाच्या चौऱ्यांशाव्या वर्षी इहलोक सोडून गेल्याचें वर्तमान गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालें आहे. अशा वेळीं त्यांनीं तत्त्वज्ञानांत जी कांहीं भर घातली आहे त्याचें थोडेसें विवेचन करून तत्त्वज्ञ या दृष्टीनें या पुरुषाची योग्यता किती होती याचा महाराष्ट्र वाचकांस आणखी थोडासा परिचय करून देण्याचा आज आमचा विचार आहे. रा. रा. दाभोळकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्रंथमालेंत स्पेन्सरचे ज्ञेयमीमांसा व अज्ञेयमीमांसा हे ग्रंथ प्रसिद्ध झाले असून खेरीज नीतिशास्त्र, न्यायतत्त्वें, परोपकार वगैरे विषयांवरील स्पेन्सरसाहेबांचे विचार त्यांत आले आहेत. आणि अज्ञेयमीमांसा या ग्रंथाच्या अखेरीस स्पेन्सरसाहेबांचें चरित्रहि जोडण्यांत आलें आहे. तेव्हां त्यासंबंधानें येथें जास्त लिहिण्याचें कारण नाहीं. शिवाय तत्त्वज्ञाचें चरित्र म्हणजे सतत अध्ययन, विचार आणि ग्रंथलेखन याखेरीज त्यांत दुसरें काय सांपडणार? तशांत जे गृहस्थ आमरणांत ब्रह्मचारी होते व पैशाकरितां, इतर संसारसुखाकरितां अथवा सामाजिक अगर राजकीय सन्मानाकरितां ज्यांनीं तहाह्यात तिळमात्रदेखील काळजी केली नाहीं त्या स्पेन्सरसाहेबांसारख्यांच्या चरित्रांत सांसारिक लोकांस मनोरंजक अशी माहिती मिळणें बहुधा अशक्यच आहे. त्यांनीं ज्या तत्त्वज्ञानाचा आमरणांत अभ्यास केला व आपल्या विचारानें तत्संबंधीं जे नवीन सिद्धांत जगापुढें मांडले तेंच त्यांचें खरें चरित्र होय, व तशाच प्रकारचें थोडें चरित्र आज आम्हीं खालीं देत आहों. शरीरप्रकृती नाजूक असूनहि तिची सबब न सांगतां आजन्म विद्याव्यासंग आणि तत्त्वविचार यांत आपला सर्व वेळ घालविणारे व स्वभावतःच वैराग्यशील आणि विगततृष्ण असे महापुरुष आपल्या देशांत प्राचीनकाळीं बरेच होत असत परंतु ती प्रवृत्ती नाहींशी होऊन पुष्कळ दिवस झाले आहेत; व इंग्रजी शिकलेल्या विद्वानांतहि वैराग्य, तत्त्वज्ञान, सतत विद्याव्यासंग हे गुण अद्याप दृष्टीस पडूं लागले नाहींत. अशा स्थितींत स्पेन्सरसाहेबांचें चरित्र प्रत्येक विचारी

पुरुषानें मनन करून अनुकरण करण्यासारखें आहे. असे पुरुष आमच्या देशांत हल्लीं उत्पन्न होत नाहींत हें आमचें दुर्दैव होय. तथापि मोठे कवि किंवा महान् तत्त्वज्ञ हे कोणत्याहि देशांत जन्मले असले तरी ते सर्व जगाचे उपकारकर्ते या नात्यानें पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांतील लोकांस ते आपलेचसे वाटत असतात ही गोष्ट सर्वमान्य आहे. आणि अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे हर्बर्ट स्पेन्सर हे आमच्यापैकींच एक तत्त्वज्ञानी होते असें म्हणण्यास आम्हांस कांहींच शंका वाटत नाहीं. शिवाय, अलीकडील आमच्या इंग्रजी युनिव्हर्सिटींतून निघालेल्या विद्वानांस तत्त्वज्ञानाची ओळख करून देणारे जे मिल्ल आदिकरून प्रसिद्ध ग्रंथकार त्यांतील स्पेन्सरसाहेब हे अग्रगण्य होत; व यांच्या विचारांची छाप इंग्लंड, अमेरिका किंवा इतर पाश्चात्य देश यांतील विद्वानांवर जितकी बसलेली आहे तितकी किंवा त्याहून थोडी अधिकहि आमच्याकडील विद्वान मंडळीवर बसलेली आढळून येते. इतकेंच नव्हे तर, कोणीहि आधुनिक विद्वान एखाद्या विषयाचा विचार करूं लागला तर तो बहुतेक स्पेन्सरसाहेबांनीं घालून दिलेल्या उत्क्रांतीतत्त्वाच्या दिशेनेंच करीत असतो. सारांश, आपल्या खोल व प्रगल्भ विचारांनीं जगांतील लोकांच्या विचारपद्धतीस कायमचें नाहीं तरी बरींच वर्षें टिकेल असें वळण लावून देणारे जे विशाल बुद्धीचे पुरुष कधीं कधीं जगांत निर्माण होतात त्यांच्या यादींतच स्पेन्सरसाहेबाचें नांव घातलें पाहिजे. आणि त्यांच्या चरित्राचा जो विचार करावयाचा तोहि याच दृष्टीनें केला पाहिजे.

तत्त्वज्ञान हा विषय हिंदुस्थान देशांतल्या भूमिकेस किंवा लोकांस अपरिचित आहे असें नाहीं, किंबहुना या विषयाचें आदिस्थान हाच देश होय असें म्हटलें तरी चालेल. पृथ्वीवरील कोणतेंहि राष्ट्र सुधारलेल्या अवस्थेंत येण्यापूर्वी आमचा देश सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेला होता. समाजाची व्यवस्थित रचना होऊन मनुष्याच्या ऐहिक सुखास जीं कांहीं साधनें लागतात तीं सर्व हिंदुस्थानांतील लोकांस फार प्राचीन काळींच उपलब्ध झालेलीं होतीं; आणि उत्तरेस हिमालय पर्वत, पश्चिमेस सिंधुनद, पूर्वेस ब्रह्मपुत्रा आणि सभोंवार समुद्र अशा स्वाभाविक मर्यादेनेंच इतर रानटी लोकांच्या उपद्रवापासून बचाव झाल्यामुळें या देशांतील लोकांचें लक्ष जगाच्या बुडाशीं जीं गूढ तत्त्वें आहेत त्यांचा विचार करण्याकडे लागलेलें होतें. उपनिषदादि ग्रंथ किंवा सांख्य, न्याय, योग, इत्यादि तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या पद्धती याच वेळीं या देशांत निर्माण झालेल्या आहेत; आणि त्यांतील विचार इतके कांहीं प्रगल्भ आहेत कीं, आज विसाव्या शतकांतील तर्कशास्त्राच्या कसोटीवरहि त्यांची बावनकसी रेघा अद्याप जशीच्या तशी उमटत आहे. या देशांत इंग्रजी राज्य होईपर्यंत याच

तत्त्वविचारांचें प्राबल्य होतें व तत्कालीन विद्वान लोकांच्या जिज्ञासेची त्यानें तृप्ती होत असे. परंतु इंग्रजी राज्य झाल्यानंतर हा पूर्वीच्या विद्येचा व विचारांचा मनु पालटला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत आधिभौतिकशास्त्राची जी विलक्षण वाढ झाली तिची ओळख इंग्रजी शिक्षणाच्याद्वारें आमच्या नव्या मंडळीस होऊं लागली; आणि पूर्वीच्या तत्त्वज्ञानावरील संस्कृत ग्रंथाचें अध्ययन प्रायः लुप्त झाल्यामुळें आमचें जुनें तत्त्वज्ञान जुन्या परिस्थितींत कितीहि योग्य व उत्तम असलें तरी बैलगाडीच्या ठिकाणीं आगगाडी, किंवा नावेच्या ठिकाणीं आगबोट आल्यावर तें ज्ञान या नव्या परिस्थितीस शोभण्यासारखें असेल अशी कल्पनादेखील नव्या मंडळींच्या डोक्यांत शिरेनासी झाली. रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, ज्योतिषशास्त्र, जीवनशास्त्र यांतील नवे नवे अपूर्व शोध कानावर पडून एक प्रकारची नवीन सृष्टि किंवा जग आमच्या विद्वान् मंडळींच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें, आणि त्यानें त्यांचे डोळे दिपावून जाऊन पूर्वीचें तत्त्वज्ञान यापुढें काय टिकतें, असें त्यास साहजिकरीत्याच वाटूं लागलें. ही परिस्थिती लक्षांत आणली म्हणजे मग स्पेन्सर साहेबांच्या तत्त्वज्ञानाचा आमच्या आधुनिक विद्वानांच्या मनावर पहिल्यानें इतका परिणाम कां झाला याचें बीज वाचकांच्या सहज लक्षांत येईल. स्पेन्सरसाहेब हे खुद्द या नव्या परिस्थितींतच जन्मलेले होते, आणि वर सांगितलेली एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील शास्त्रीय शोधाची वाढ त्यांच्या देखत झाली होती, इतकेंच नव्हे तर ते शोध ज्या पुरुषांनीं केले ते डार्विन, हक्स्ले वगैरे विद्वान लोक स्पेन्सरसाहेबांचे समकालीन असून मित्र होते. अर्थात् ज्या नवीन शास्त्रीय शोधांनीं पूर्वीची परिस्थिती बदलली ते शास्त्रीय शोध स्पेन्सर साहेबांस अवगत होते इतकेंच नव्हे, तर त्या शास्त्रीय शोधाच्या ओघांतच स्पेन्सरसाहेबांचें सर्व आयुष्य गेलेलें होतें. येथें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, स्पेन्सरसाहेब हे शास्त्रज्ञ नव्हे तर तत्त्वज्ञ होते. म्हणजे भूगर्भशास्त्र, जीवनशास्त्र, किंवा विद्युत्शास्त्र अशा एखाद्या विशिष्ट शास्त्राचा अभ्यास करून त्यांत डार्विन, हक्स्ले, किंवा टिंडाल यांजप्रमाणें नवे शोध करण्याकडे त्यांच्या बुद्धीची प्रवृत्ति नव्हती. त्यांनीं जें काम हातीं घेतलें होतें तें याहीपेक्षा अधिक व्यापक व अधिक योग्यतेचें होतें. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील शास्त्रीय शोध व कल्पना आमच्याकडील विद्वानांस इंग्रजी शिक्षणानें कळल्यावरोबर त्यांच्या डोळ्यांपुढें जी नवी सृष्टी उभी राहिली तीच स्पेन्सरसाहेबांच्या डोळ्यांपुढें हळू हळू वाढत होती, आणि या नव्या शास्त्रीय विचारांच्या व कल्पनेच्या साहाय्यानें किंवा एकवाक्यतेनें जगाच्या मुळाशीं जे कांहीं गूढ प्रश्न आहेत ते सोडवितां येतील कीं नाहींत, अथवा त्यासंबंधानें कांहीं सामान्य

सिद्धांत बांधतां येतील कीं नाहींत, या विषयांत स्पेन्सरसाहेबांचें सर्व लक्ष गुंतलें होतें. डोळ्यांसमोर दिसणारें जग हें काय आहे व कोठून आलें, यास कोणी कर्ता आहे कीं नाहीं, याच्या मुळाशीं कोणतीं तत्त्वें आहेत, एक तत्त्व असेल तर त्याचे आपल्या दृष्टीस पडणारे निरनिराळे विकार कसे होतात, हे विकार कांहीं अबाधित नियमांनीं होत असतात कीं काय, आणि असल्यास ते नियम कोणते या विचारांत स्पेन्सरसाहेब गुंतलेले होते. तत्त्वज्ञान म्हणतात तें यासच होय. आणि कपिल, गौतम, कणाद, व्यास, शंकराचार्य, बुद्ध वगैरे हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या तत्त्ववेत्त्यांनीं पूर्वी जे कांहीं सिद्धांत केले आहेत ते याच संबंधाचे आहेत. परंतु वर सांगितलेंच आहे कीं, या प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या वेळीं आधिभौतिक शास्त्रांची जी स्थिति होती ती एकोणिसाव्या शतकांतील शोधांनीं पालटून गेल्यामुळें या नव्या शोधांचा पूर्वीच्या तत्त्वविचारांवर काय परिणाम होतो, हें पाहण्याचें आमचें काम असतांहि आम्ही नव्या पद्धतीनें इतके भांबावून गेलों होतों कीं, हा उद्योग हातीं घेण्याइतका समर्थ पुरुष आमच्या देशांत निघाला नाहीं. परंतु ज्या देशांत विद्येचा जिवंत झरा कायम होता, आणि त्यामुळें आधिभौतिक शास्त्रांतील नवीन नवीन शोध झपाट्यानें निघत होते त्या देशांतच या तत्त्वज्ञानाच्या विषयांकडे हर्बर्ट स्पेन्सर यांचें लक्ष लागून त्यांच्या अपूर्व बुद्धिप्रभावानें नवीन शास्त्रीय शोधांनीं उपस्थित केलेल्या परिस्थितीचा तत्त्वविचारावर काय परिणाम होण्यासारखा आहे हें आपणास पहावयास मिळालें; आणि एकोणिसाव्या शतकांतील शास्त्रीय शोधांनीं भांबावून गेलेल्या आमच्या आधुनिक विद्वानांस स्वाभाविकरीत्याच स्पेन्सरसाहेबांचे विचार व तत्त्वज्ञान मोहक आणि रमणीय वाटून त्यांचें सत्यत्व निर्विवाद आहे अशी त्यांची खात्री झाली. स्पेन्सरसाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा आमच्या युनिव्हर्सिटींतून निघालेल्या विद्वान लोकांच्या मनांवर एवढा मोठा परिणाम कां झाला हें यावरून लक्षांत येईल. पण स्पेन्सरीय तत्त्वज्ञानाचा जास्त प्रसार होण्यास याखेरीज दुसरें असेंहि कारण झालें कीं, त्यांच्या नव्या विचारसरणीनें त्यांनीं जे सिद्धांत काढले त्यांपैकीं कांहीं प्रमुख सिद्धांत आमच्या जुन्या तत्त्ववेत्त्यांनीं काढलेल्या प्रमेयांशी बहुतेक अंशीं मिळतात असें आढळून आलें; आणि ही गोष्ट आढळून आल्यावर हिंदुस्थानांतील प्राचीन तत्त्वज्ञानाबद्दलची जी आदरबुद्धि नष्ट झाली होती तीहि पुन्हा प्रादुर्भूत झाली. या जागृतीचा परिणाम काय होतो हें आजच सांगता येत नाहीं. तथापि एवढी गोष्ट खरी आहे कीं, स्पेन्सरसाहेबांचे तत्त्वज्ञानाबद्दलचे सिद्धांत पहिल्यानें आमची विद्वान् मंडळी ज्या भावनेनें शिरसावंद्य मानीत असत ती भावना शेवटपर्यंत तशीच राहणें शक्य नाहीं. यावरून स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथांचें महत्त्व किंवा त्यांच्या तत्त्वविचारांची योग्यता कमी होईल असें

आम्हीं म्हणतों असें कोणीं समजूं नये. त्यांच्या ग्रंथांची व विचारसरणीची जी छाप विद्वान् लोकांवर बसली आहे ती बऱ्याच अंशीं कायमची आहे असें म्हटलें तरी चालेल. पण जुन्या तत्त्ववेत्त्यांच्या ग्रंथांच्या परिशीलनानें आणि दरवर्षी होत असलेल्या नव्या नव्या शास्त्रीय शोधांच्या योगानें स्पेन्सरसाहेबांच्या कांहीं सिद्धांतास पुरवणी जोडण्याचा किंवा त्यांत कांहीं दुरुस्ती करण्याची आवश्यकता वाटण्याचा प्रसंग मागेंपुढें आल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं एवढेंच आमचें म्हणणें आहे.

आपण ज्या सृष्टींत राहात आहों ती सृष्टी निर्माण कशी झाली, निर्माणकर्ता या सृष्टीहून कोणी निराळा आहे कीं नाहीं, सृष्टीस पाहणारा आपल्या शरीरांत जो जीव आहे त्याचें स्वरूप काय, तो नित्य आहे कीं अनित्य आहे, सृष्टीच्या मुळाशीं जीं आदितत्त्वें आहेत त्यांचा आणि या जीवांचा कांहीं परस्पर संबंध आहे कीं नाहीं इत्यादि गूढ प्रश्न आमच्या लोकांस फार प्राचीन काळापासून परिचित झालेले आहेत. परमेश्वरानें सात दिवसांत सृष्टि निर्माण केली, आणि प्राण्यांची उत्पत्ति करतांना पशु, पक्षी, कीटक, मनुष्य वगैरे निरनिराळ्या जाती आपल्या शक्तीनें पृथक् निर्माण केल्या इत्यादि बायबलांत गोंविलेल्या वेडगळ कल्पना बायबल रचिलें जाण्यापूर्वीच आमच्या तत्त्ववेत्त्यांनीं झुगारून दिल्या होत्या. जीवकोटींतील पशुपक्ष्यादि निरनिराळ्या जातींतील उपजाति एका सामान्य जातींतून उत्क्रांतितत्त्वानें निघाल्या आहेत. असें जें मत डार्विनसाहेबांनीं प्रस्थापित केलें व जें उत्क्रांति तत्त्व स्पेन्सरसाहेबांनीं व्यवस्थित रीतीनें सर्व सजीव-निर्जीव सृष्टीस लावून दाखविलें, तें तत्त्व आमच्याकडे सांख्यांनीं फार प्राचीन काळीं शोधून काढलेलें होतें. सर्व सृष्टीचे जड व चित् असे दोन मोठे वर्ग करून हे दोन्हीहि भाग अनादि व नित्य आहेत असें सांख्यतत्त्ववेत्त्यांनीं ठरविलें होतें. चित् सृष्टीस पुरुष आणि जड सृष्टीस प्रकृति अशीं नांवें त्यांनीं दिलीं होतीं. पुरुष हाच जीव; परंतु तो प्रकृतीहून अगदीं भिन्न व प्रकृतीच्या गुणांनीं अलिप्त आहे असें सांख्यांचें मत आहे. प्रकृति ही त्रिगुणात्मक म्हणजे सत्व-रज-तमो गुणात्मक आहे; आणि अगदीं सृष्टीच्या आरंभीं हे तिन्ही गुण अगदीं साम्यावस्थेंत असतात, आणि त्यांची ती साम्यावस्था बिघडली म्हणजे तिन्ही गुणांच्या कमजास्त मिश्रणानें प्रथमतः महत् तत्त्व, अहंकार आणि पंचमहाभूतांचीं तन्मात्रें निर्माण होऊन नंतर पुढें सृष्टींतील निरनिराळे पदार्थ प्रादुर्भूत होतात असा सांख्यांचा सिद्धांत आहे. पुरुष किंवा जीव हा, प्रकृतीपासून वर सांगितल्याप्रमाणें उद्‌भूत झालेल्या हस्तपादादिक स्थूल, किंवा बुद्धि आणि मन आदिकरून सूक्ष्म इंद्रियांनीं वेष्टित असून त्यांच्या सान्निध्यानेंच सभोंवारच्या संघातांत संज्ञा किंवा संवेदनशक्ति दृश्य होते, आणि हा जो प्रकृतीपासून निघालेल्या विकारांचा जीवावर परिणाम तो नाहींसा झाला म्हणजे जीवास मुक्ति मिळते

असें सांख्यांचें म्हणणें आहे. हा सिद्धांत अर्थातच स्थूलमानानें आम्हीं दिला आहे. कारण यापेक्षां विस्तारानें आजच्या लेखांत त्यांचीं मतें सांगणें शक्य नाहीं. तथापि, वर दिलेल्या स्थूल सिद्धांतावरूनहि एवढें लक्षांत येण्यासारखें आहे कीं, त्रिगुणात्मक प्रकृतीची साम्यावस्था जिला अव्यक्त अशी संज्ञा आहे ती व्यक्त रूपानें दृग्गोचर होण्यास त्रिगुणांमध्यें वैपम्य उत्पन्न व्हावें लागतें हें मत फार प्राचीनकाळीं या देशांत उपस्थित झालें आहे. भगवद्गीतेंतहि 'गुणागुणेशु वर्तन्ते' अशा रीतीनें जें वाढीचें किंवा उत्क्रांतीचें तत्त्व सांगितलें आहे तेंहि हेंच होय. या सांख्य मतांत वेदांत्यांच्या दृष्टीनें जो फरक करावयास पाहिजे तो एवढाच कीं, प्रकृति आणि पुरुष हे दोन्ही भिन्न न मानतां या दोन्हींचेंहि अगम्य असें कांहींतरी मूल आहे, आणि तें एक, अविभाज्य व चिद्रूप असून नित्य असल्या-मुळें जड प्रकृतीहि त्याचाच अनित्य आभास असून जीव हा स्वतः अज्ञेय स्वरूप मानला पाहिजे. जीव आणि अज्ञेय यांचा हा संबंध कांहीं निराळ्या प्रकारचा आहे असें द्वैत व विशिष्टाद्वैतवादी म्हणतात. पण त्याचा विचार करण्याची सध्यां जरूर नाहीं. चित् आणि जड सृष्टीच्या मुळांशीं काय आहे एवढ्याचाच आपणास विचार करावयाचा आहे; आणि त्याचा बोध वर जे सांख्यांचे आणि वेदांत्यांचे सिद्धांत दिले आहेत त्यावरून होण्यासारखा आहे. सांख्य आणि वेदांताखेरीज सृष्टीच्या उत्पत्तीबद्दल न्याय आणि वैशेषिक अशींहि दुसरीं दोन मतें आहेत. त्याच्या दृष्टीनें जगांतील सर्व पदार्थ द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय आणि अभाव या सात कोटींत पडतात, आणि सर्व द्रव्यांची उत्पत्ति परमाणूपासून झालेली असून द्रव्यामधील पृथ्वी, आप, तेज, वायु, आदिकरून मूलभेद होण्यास परमाणूमधील भेदच कारण होतात असें वैशेषिकांचें म्हणणें आहे. तात्पर्य, त्रिगुणाच्या साम्यावस्थेपासूनच पुढें विपमावस्था होऊन पदार्थांचे भेद होतात असें जें सांख्यांचें मत आहे तें वैशेषिकांस कबूल नसून भेदाची उत्पत्ति भेदापासूनच झाली पाहिजे, व त्याकरितां विशेष हें तत्त्व निराळें मानलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. त्याचप्रमाणें प्रकृती आणि पुरुष हीं दोनच तत्त्वें न मानतां त्यापेक्षां आदितत्त्वांची संख्या न्याय व वैशेषिक मतांत जास्त धरलेली आहे, या दोन्ही मतांचे तत्त्ववेत्ते ईश्वराकडे जगाचें कर्तृत्व देतात, पण तें मत वेदांत्याच्या ईश्वरविषयक मतांपेक्षां बरेंच निराळें आहे. सांख्यांचे सेश्वर सांख्य आणि निरीश्वर सांख्य असे भेद आहेत. पण विस्तारभयास्तव ते येथें सांगतां येत नाहींत. स्पेन्सरसाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा प्राचीन तत्त्वज्ञानाशीं कितपत मेळ आहे एवढेंच थोडक्यांत आम्हांस सांगावयाचें आहे, व वर केलेला प्राचीन मतांचा उल्लेख तेवढ्यापुरता बस्स आहे. याखेरीज प्रस्तुत विपयास दुसरें उपयुक्त मत म्हटलें म्हणजे चार्वाकाचें होय. वरील सर्व

मतांत जीव किंवा चैतन्य हें जडाहून निराळें व नित्य मानलेलें आहे. चार्वाकाच्या दृष्टीनें हें मत बरोबर नाहीं. जडाचेंच देहाकार जें दृश्य स्वरूप झालेलें आहे त्यांतील द्रव्यसंघाताचाच चैतन्य हा एक धर्म आहे. आणि देहाचा नाश झाला म्हणजे त्याबरोबर तो धर्महि नाहींसा होतो; कारण ‘न हि प्रेत्य संज्ञाऽस्ति’ असें चार्वाकांचें म्हणणें आहे. या मताप्रमाणे अर्थातच परलोक वगैरे कल्पना चुकीच्या होतात. तथापि जगांतील मनुष्याचें वर्तन नीतीचें व परोपकाराचें असावें असें सिद्ध करण्यास या मताची कांहीं हरकत येत नाहीं. पण तीहि गोष्ट चार्वाक-मतवाद्यांनीं कबूल केलेली दिसत नाहीं.

असो; या प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या मतांशीं आधुनिक शास्त्रपद्धतीनें स्पेन्सर-साहेबांनीं ठरविलेल्या मूलतत्त्वांचा कितपत मेळ आहे याचा आतां विचार करूं. स्पेन्सरसाहेबांस अलीकडील रसायनशास्त्र, जीवनशास्त्र, मानसशास्त्र, पदार्थ-विज्ञानशास्त्र वगैरे सर्व आधिभौतिक व आध्यात्मिक शास्त्रें व त्यांतील सर्व नवे शोध पूर्णपणें अवगत होते इतकेंच नव्हे तर या शास्त्राची प्रगति पुढें कोणत्या दिशेनें झाली पाहिजे यासंबंधीं त्यांचे विचार त्या त्या विशिष्ट शास्त्रां-तील वाकब्गार विद्वान् लोकांपेक्षांहि पुढें गेलेले होते हें येथें वाचकांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. उदाहरणार्थ, डार्विनसाहेबांनीं जीवकोटींतील उपजातीसंबंधानें उत्क्रांतीमताचें निरूपण करण्यापूर्वींच तें मत स्पेन्सरसाहेबांनीं काढलेलें होतें ही गोष्ट आतां सर्वांस मान्य आहे. तत्त्वज्ञान म्हणजे सर्व शास्त्रांतील सिद्धांताचें एकीकरण करून तद्वारां सृष्टीच्या मुळाशीं असलेल्या आदितत्त्वाचें निदान करणें आणि त्या तत्त्वांची विकृती कशी होते तें ठरविणें हें होय; असें स्पेन्सर-साहेबांनींच त्याचें लक्षण केलेलें आहे. या लक्षणाप्रमाणें तत्त्वज्ञ होण्यास जगांतील सर्व शास्त्रांची करतलामलकवत् माहिती असणें जरूर आहे. आणि तसें ज्ञान स्पेन्सरसाहेबांच्या अंगांत वसत होतें ही गोष्ट त्यांच्या सिद्धांताचा विचार करतांना विसरतां कामा नये. अशा रीतीनें जें ज्ञान प्राप्त झालें त्याच्या साहाय्यानें स्पेन्सरसाहेबांनीं प्रथमतः असें ठरविलें आहे कीं, जगांत द्रव्य ( Matter ) आणि गति किंवा शक्ति ( Force ) अशीं दोनच आदितत्त्वें आहेत. या दोन तत्त्वांत आणि सांख्यांच्या प्रकृति आणि पुरुषांत थोडासा मतभेद आहे तो पुढें सांगू. गति किंवा शक्ति आणि द्रव्य हीं दोन्हीहि तत्त्वें परस्परांशीं संलग्न असून त्यांच्या वियोगाचें ज्ञान मनुष्यास होणें शक्य नाहीं, करितां त्यांचा संयोग अविनाशीच कल्पिला पाहिजे, असें स्पेन्सरसाहेबांचें मत आहे. तथापि, ज्याअर्थीं द्रव्याचें ज्ञान होण्यास त्याचा इंद्रियावर आघात व्हावा लागतो त्याअर्थीं द्रव्य व शक्ति या दोन्ही परस्परसंलग्न तत्त्वांस गति किंवा शक्तीलाच स्पेन्सरसाहेब अधिक प्रामाण्य देतात.

द्रव्य आणि गति यांची साम्यावस्था असते तेव्हां जें जगाचें स्वरूप तें मूल स्वरूप होय. परंतु ही साम्यावस्था चिरस्थायी नसल्यामुळें तिचा समतोलपणा आपोआपच नाहींसा होतो, आणि तो नाहींसा झाल्यावर ह्यांच्या विपम संयोगानें सृष्टींतील नानाप्रकारचे भेद उत्पन्न होतात. उत्क्रांति ज्यास म्हणतात ती हीच होय. साम्यावस्थेची विषमावस्था होणें किंवा अभेदापासून भेदोत्पत्ती होणें हें उत्क्रांतीचें मुख्य लक्षण होय. आणि या तत्त्वाप्रमाणें उत्क्रांती होऊं लागली म्हणजे द्रव्याचीं भिन्न भिन्न स्वरूपें होऊन त्यांपैकीं प्रत्येक स्वरूप पूर्णतेस पोंहोचतें. या पूर्णतेस द्रव्य व गती याचें 'तत्कालीन समतोलन' असें स्पेन्सरसाहेबांनीं म्हटलें आहे. पण हें समतोलनहि कायमचें टिकत नाहीं आणि तें बिघडलें म्हणजे तें पुन्हा अपक्रांतीस सुरवात होते, आणि पुन्हां द्रव्य आणि शक्ति हीं साम्यावस्थेस येऊन पोहोंचतात. द्रव्य व गति यांच्यामध्यें हा जो व्यापार चालू आहे तोच जगाच्या प्रवृत्तीचें कारण होय. आणि हें त्यांचें आंदोलन (खेळ) जोंपर्यंत चालू आहे, तोंपर्यंत जगामध्यें कांहीं ठिकाठीं अपक्रांति चालू राहावयाचीच असें स्पेन्सरसाहेबांचें मत आहे. यावरून गतिसंयुक्त जड द्रव्यच स्पेन्सरसाहेबांच्या मताप्रमाणें सृष्टीचें मूलकारण होय असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे; पण खरा प्रकार तसा नाहीं. द्रव्य म्हणजे काय, शक्ति म्हणजे काय, हीं दोन्हीं ज्या पदार्थांत अधिष्ठित झालेलीं आहेत त्याचें स्वरूप कोणतें, आणि काल व दिशा इत्यादि ज्या द्रव्याच्या नित्य संयुक्त उपाधि आहेत, त्या स्वतंत्र आहेत किंवा द्रव्याश्रित आहेत, अनादि आहेत किंवा सादि आहेत इत्यादि गूढ प्रश्नांचा सूक्ष्म विचार करून अखेरीस ज्योतिष, जीवनशास्त्र, मानसशास्त्र वगैरे शास्त्रांतील अनेक दृष्टांत देऊन तद्वारा स्पेन्सरसाहेबांनीं असें ठरविलें आहे कीं, द्रव्य व गती हीं ज्या ठिकाणीं आविर्भूत होतात अशी कांहीं तरी वस्तु त्यांच्या मुळाशीं आहे; परंतु तिच्या सद्भावनेखेरीज तिचें दुसऱ्या प्रकारचें ज्ञान आपणास होऊं शकत नाहीं. जगामध्यें जें जें कांहीं दृश्यमान होतें तें, आणि त्याची मूल अवस्था अर्थात् द्रव्य आणि गती यांचा संघात हीं या अज्ञेयाचींच अविभक्त स्वरूपें होत असें स्पेन्सरसाहेब म्हणतात. पण आपले सर्व विचार दिक्कालादिकांनीं मर्यादित असल्यामुळें दिक्कालादिकांच्या उपाधींनीं विरहित असें जें आदितत्त्व त्यासंबंधानें आपणांस अधिक ज्ञान होणें अशक्य आहे असें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें आहे. वेदांतांतील परब्रह्महि अशाच प्रकारचें अज्ञेय असून तें सत्, चित् आणि आनंदरूप आहे, यापेक्षां जास्त कांहीं सांगवत नाहीं असें जें वेदांत्यांचें तत्त्व आहे त्याचा आणि स्पेन्सरसाहेबांनीं सिद्ध केलेल्या सत्तारूप अज्ञेयाचा बहुतेक अंशीं पूर्ण मेळ आहे असें यावरून ध्यानांत येईल. सारांश जगाच्या बुडाशीं जें तत्त्व आहे तें जरी अज्ञेय असलें तरी तें

चिद्रूप आहे एवढें तरी त्याबद्दलचें ज्ञान आपणांस होतें असें स्पेन्सरसाहेबांनीं सर्व आधुनिक शास्त्राचा विचार करून सप्रमाण व व्यवस्थित रीतीनें सिद्ध केलेलें आहे. आणि या बाबतींत सांख्यापेक्षां एक पाऊल ते पुढें गेले असून वेदांतांतील ब्रह्मवाद्यांच्या मतांशीं त्यांची एकवाक्यता आहे. जगाच्या मुळाशीं जें हें अज्ञेयतत्त्व त्याचेंच दृश्य जग हें आविर्भूत किंवा विकृत स्वरूप आहे असें मानल्यावर सदर स्वरूपास एक प्रकारें सापेक्ष अनित्यता प्राप्त होते हें सांगावयास नकोच. स्पेन्सरीय तत्त्वज्ञानापासून वेदांतमताचें जरी अशा प्रकारें पुष्टीकरण झालें तरी दुसऱ्या एका बाबतींत स्पेन्सरसाहेबांचें मत बहुतेक प्राचीन तत्त्ववेत्त्यांच्या मतांशीं अगदीं विरुद्ध आहे. हें मत चैतन्य किंवा जीव यासंबंधाचें होय. चैतन्यरूप जीव नित्य आहे, अविनाशी आहे, देहाव्यतिरिक्त तो राहूं शकतो असें सांख्य, वेदांत, न्याय किंवा वैशेषिक या सर्वांचें म्हणणें आहे. पण स्पेन्सरसाहेब असें म्हणतात कीं, ज्याप्रमाणें गति नेहमीं द्रव्याश्रित असते त्याप्रमाणें चैतन्यहि देहामधील विशिष्ट रीतीनें परिणत झालेल्या मेंदूखेरीज अन्यत्र दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. संज्ञा किंवा संवेदनशक्ति मेंदूतच असते इतकेंच नव्हे, तर या दोहोंचा संयोग नित्य असल्यामुळें मेंदूव्यतिरिक्त संवेदनशक्ति राहते असें मानण्यास कांहीं पुरावा नाहीं. सारांश, संज्ञा किंवा संवेदनशक्ति (Consciousness) ही देहाच्या नाशाबरोबरच नाहींशी होते असें स्पेन्सरसाहेब मानतात. म्हणजे या बाबतींत 'नहि प्रेत्य संज्ञाऽस्ति' हें चार्वाकाचें मत त्यांस ग्राह्य आहे. देहाव्यतिरिक्त संज्ञाशक्ति किंवा आत्मा राहणेंच जर अशक्य तर पुनर्जन्मादि कल्पना किंवा देहाच्या मरणानंतर जीवाची अमुक एक प्रकारची स्थिति होते इत्यादिक मतें 'मूले कुठारः' या न्यायानें उध्वस्त होतात. अर्थात् परलोक आदिकरून धर्मकल्पनांचें मूळ कुंठित होतें हें सांगावयास नकोच. देहामध्यें उत्क्रांतीतत्त्वाप्रमाणें एका विशिष्ट प्रकारच्या पूर्णतेस पोहोचलेली जीवरूप जी शक्ति तिचा देहास मरण आलें असतां एकदम नाश व्हावा आणि अपक्रांतीच्या नियमास अनुसरून तिचा अनादि अज्ञेयशक्तींत एकदम लय व्हावा असें मानणें चमत्कारिक आहे, व हें तत्त्व मान्य करण्यास आपली बुद्धि जरा कचरते असेंहि स्पेन्सरसाहेब म्हणतात; पण मेंदू आणि संज्ञाशक्ति निरनिराळी मानण्यास पुरावा नसल्यामुळें हाच सिद्धांत कबूल केल्याखेरीज गती नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. आत्म्यास किंवा जीवास देहाव्यतिरिक्त जर राहातां येत नाहीं तर धर्मकल्पना मनुष्याच्या मनांत कोठून आली असा प्रश्न सहज उद्भवतो. यास स्पेन्सरसाहेबांचें असें उत्तर आहे कीं, स्वप्नामधील अवास्तिक अनुभवावरून आणि भूत किंवा पिशाच्च इत्यादिकांच्या गोष्टींवरून जीव हा शरीरास सोडून राहूं शकतो अशी खोटी कल्पना प्रथमतः रानटी मनुष्याच्या मनांत आली, आणि त्याच कल्पनेची

वाढ होऊन त्यावर धर्माची इमारत उभी करण्यांत आली. स्पेन्सरसाहेबांचें हें मत म्याक्समूलरादिकरून विद्वानांस मान्य नव्हतें. व त्यांनीं तें खोडण्याचाहि प्रयत्न केलेला आहे. शिवाय जीव आणि मेंदू यांचा संबंध स्पेन्सरसाहेब म्हणतात त्याप्रमाणें नित्य नसून देहास सोडूनहि जीव राहूं शकतो अशाबद्दल 'सोसायटी फॉर सायकीकल रिसर्च' इनें अलीकडे कांहीं पुरावाहि गोळा केला आहे. तेव्हां जीवासंबंधानें स्पेन्सरसाहेबांचें मत केव्हांहि सर्वमान्य होईल असें वाटत नाहीं. कसेंहि असो; जीव किंवा आत्मा यांसंबंधानें स्पेन्सरसाहेबांचें मत चार्वाकाप्रमाणें, आणि जगाच्या बुडाशीं जें अज्ञेय तत्त्व आहे त्याबाबतींत त्यांचें मत वेदांत्याप्रमाणें आहे असें यावरून दिसून येईल. जगांमध्यें दृष्टोपत्तीस येणाऱ्या निरनिराळ्या भेदांची उत्पत्ती द्रव्य आणि शक्ति यांच्या साम्यावस्थेपासूनच उत्पन्न होते असें जें त्यांचें मत तें वैशेषिक मतास जरी विरुद्ध आहे तरी सांख्याच्या मताशीं मिळतें. तेव्हां एकंदर विचार करतां परमेश्वर, जीव आणि जड सृष्टी यासंबंधाचीं स्पेन्सरसाहेबांचीं मतें अनुक्रमें वेदांत, चार्वाक आणि सांख्य यांच्या मतांच्या मिश्रणानें झालीं आहेत असें म्हणावें लागतें. परंतु यांत जें चार्वाकमताचें मिश्रण आहे तें जुन्या चार्वाकमताहून अत्यंत भिन्न आहे हें पूर्णपणें लक्षांत ठेविलें पाहिजे. देहाबरोबर जीवाचाहि नाश होतो असें जरी स्पेन्सरसाहेब मानतात तरी चार्वाकाप्रमाणें 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' या चैनी तत्त्वाचा त्यांनीं कोठेंहि अंगीकार केलेला नाहीं. इतकेंच नव्हे तर उत्क्रांतीचें तत्त्व समाजास व नीतिशास्त्रास लावून सर्व समाजाचें किंबहुना मानव जातीचें हित साधून परोपकार करणें हीच जगामध्यें जीवाच्या कर्तव्याची सीमा आहे असें त्यांनीं सोपपत्तिक व आपल्या नेहमींच्या पद्धतीनें अनेक शास्त्रांतील दृष्टांत देऊन प्रतिपादन केलें आहे. वेदांतमताप्रमाणें ते सृष्टीस केवळ आभास मानीत नाहींत, आणि सांख्याप्रमाणें प्रकृति पुरुषाच्या पलीकडे कांहीं नाहीं असेंहि म्हणत नाहींत. हा त्यांच्या आणि वेदांत आणि सांख्य यांच्या मतांत मोठा फरक आहे. जीवासंबंधीं त्यांचें मत धर्मप्रवृत्तीस प्रतिकूल आहे खरें, व त्यामुळें केवळ ख्रिस्ती मिशनरी लोकांचेंच नव्हे तर कांहीं तत्त्वज्ञ मंडळींचेंहि आघात त्यांस सहन करावे लागले; व काहींकांनीं तर त्यांची नास्तिक शिरोमणींतहि गणना केली होती. पण आमच्या मतें असें करणें अगदीं गैर आहे. तत्त्वज्ञ मनुष्यानें जगाची पर्वा ठेवून कांहीं उपयोगी नाहीं, किंबहुना तशी पर्वा न ठेवितां आपणांस सूक्ष्म विचारांतीं जें खरें दिसेल तेंच जगापुढें मांडणें हें त्यांचें कर्तव्य होय. आणि हें कर्तव्य जर स्पेन्सरसाहेबांनीं पूर्णपणें बजावलें तर त्याबद्दल त्यांस नांवें ठेवणें मूर्खपणाचें आहे. जीव देहाव्यतिरिक्त असूं शकतो. यास स्पेन्सरसाहेबास जर पुरावा मिळत नाहीं अथवा मिळालेला पुरेसा वाटत नाहीं, तर तो पुढें कधींहि मिळणार नाहीं अथवा

पुरेसा होणार नाहीं असें समजणें चुकीचें होय. शिवाय या संबंधानें स्पेन्सरसाहेबांनीं आपलें मत देतांना आपली बुद्धि याबाबतींत कशी कुंठित होते हें जर स्पष्ट सांगितलें आहे, तर "दंतभंगोहि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे" ह्या न्यायानें त्यांचें आम्ही अभिनंदनच केलें पाहिजे. आयुष्याचीं ६० वर्षे सतत अभ्यासांत घालवून ज्यांचा मेंदु जगाच्या गूढतत्त्वाशीं टक्कर देण्यांत गुंतला होता अशा तत्त्वज्ञपुंगवास त्याची बुद्धि एखाद्या ठिकाणीं कुंठित झाली म्हणून नांवें ठेवणें यासारखा दुसरा असमंजसपणा नाहीं असें स्पष्ट म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय हीहि गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, नीति तत्त्वाचें उदात्त स्वरूप उत्क्रांति तत्त्वाच्या साहाय्यानें सिद्ध करण्याचें श्रेय स्पेन्सरसाहेबांनींच संपादिलें आहे, इतकेंच नव्हे तर वेदांती लोकांप्रमाणें आत्म्यास अमुक एक प्रकारची शुद्धावस्था प्राप्त झाली असतां तो मुक्त होतो, इतर गोष्टींची आम्हांस जरूर नाहीं असें म्हणणाऱ्यांपैकी स्पेन्सर-साहेब नव्हते. तसेंच जीवाच्या कर्तव्याची सीमा परोपकार आहे असें सांगून ते स्वस्थ बसले नाहींत. अगदीं रानटी स्थितीपासून मनुष्याची सामाजिक स्थिति सुधारतां सुधारतां उत्क्रांति तत्त्वानें हल्लीचा समाज कसा बनला गेला यांचेंहि त्यांनीं एक स्वतंत्र शास्त्र बनविलें आहे; व प्रत्येक मनुष्याचें, समाजाचें, राजाचें आणि प्रजेचें कर्तव्य काय, आणि त्याच्या अभिवृद्धीची दिशा कोणती, अथवा या प्रश्नांचा विचार कोणत्या दिशेनें केला पाहिजे, याबाबतींत शास्त्रीय ग्रंथ लिहून त्यांनीं अशा प्रकारच्या प्रश्नांचा विचार करणाऱ्या लोकांस एक प्रकारचा कायमचा मार्ग दाख-विला आहे. फार लांब कशाला ? शिक्षणावर जो त्यांचा निबंध व ज्याचें आज दहापंधरा भाषांत भाषांतर झालें आहे तोच घेतला तरी व्यावहारिक गोष्टीस तत्त्वज्ञानाच्या हातांत किती उदात्त स्वरूप प्राप्त होतें व त्यापासून समाजास किती फायदा होतो याची वाचकांस कल्पना येईल. वेदांतांतील किंवा सांख्यांचें तत्त्वज्ञान अशा रीतीनें व्यवहारोपयोगी करण्याचा आमच्यामध्यें पूर्वीं कधींच प्रयत्न झालेला नव्हता. नाहीं म्हणावयास भगवद्गीता हाच काय तो अपवाद आहे; पण वेदांत्यांच्या हातांत या अपूर्व व्यवहारोपयोगी तत्त्वज्ञानात्मक ग्रंथाची बरीच दुर्दशा झालेली आहे. स्पेन्सरसाहेबांच्या ग्रंथापासून जर कांहीं नवें वळण आपणांस घ्यावयाचें असेल तर तें हेंच होय कीं, सृष्टीच्या बुडाशीं जीं कांहीं अगम्य तत्त्वें आहेत त्यांचा विचार करून तत्त्ववेत्त्यांनीं आपणांस मुक्ति मिळाली म्हणून उगीच बसावयाचें नाहीं. या गूढ तत्त्वांचा विचार करणें तत्त्वज्ञाचें जितकें कर्तव्य आहे तितकेंच ही तत्त्वें व्यवहारास कशीं लावावीं हें जगाच्या नजरेस आणून देऊन मानवजातीची पूर्णावस्था कशी संपादावी ह्याचा त्यांस बोध करणें हेंहि त्यांचें काम होय. हीं दोन्हीहि कामें स्पेन्सरसाहेबांनीं आपल्या ८४ वर्षांच्या आयुष्यांत उत्तम रीतीनें बजाविलीं आहेत;

व यामुळें कपिल, गौतम, कणाद, बुद्ध वगैरे प्राचीनकाळीं जे मोठेमोठे तत्त्ववेत्ते होऊन गेले त्यांच्याप्रमाणें तत्त्वज्ञ या दृष्टीनें यांचें नांवहि चिरकाल राहील. शास्त्राच्या प्रगतीमुळें यांनीं सिद्ध केलेल्या तत्त्वांत पुढेंमागें कांहीं फेरफार करावे लागले तर ती गोष्ट त्यांनीं सिद्ध केलेल्या उत्क्रांतितत्त्वास अनुरूपच आहे किंवा होईल असें म्हटलें असतां त्यांत कांहीं गैर होणार नाहीं. परंतु तेवढ्यामुळें त्यांनीं समग्र आधुनिक शास्त्राचें सर्व आयुष्यभर आलोडन करून संसारसुखाची अपेक्षा न धरतां परोपकार बुद्धीनें जगाच्या बुडाशीं असलेलीं जीं तत्त्वें शास्त्रीय पद्धतीनें सप्रमाण सिद्ध केलेलीं आहेत त्यांची योग्यता कमी होत नाहीं. अगर ज्ञानी या नात्यानें स्पेन्सरसाहेबांस जो मान आम्हीं द्यावयास पाहिजे त्यांतहि कमतरता येत नाहीं. अशा प्रकारचे ज्ञानी पुरुष फारच विरला. शेंकडों वर्षांत एखादा दुसरा उत्पन्न होत असतो; व ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या कोत्या समजुतीप्रमाणें जरी हे नास्तिक ठरले, तरी श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें आर्त जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी यांपैकीं–

**प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ।**
**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ॥**

ज्ञानी हेच अखेरीस ईश्वरास प्रिय होतात व त्याच्या पदाप्रद पावतात हें निश्चित आहे. असे पुरुष देशांत उत्पन्न होणें हेंच देशाच्या सजीवतेचें लक्षण होय. व असलेच पुरुष जगाच्या गूढ तत्त्वांशीं झुंजून तीं मानव जातीस अधिकाधिक सुगम करून देऊन मनुष्यमात्राची आध्यात्मिक व आधिभौतिक उन्नति करून देतात व आपल्यास व आपल्या बांधवांस कृतार्थ करून घेतात. स्पेन्सरसाहेबांनीं लग्न केलें नव्हतें, द्रव्याचीहि तृष्णा धरली नव्हती, किंवा पार्लमेंटमध्यें, लोकलबोर्डांत अगर म्युनिसिपालटीमध्यें सभासद होण्याची हाव धरली नव्हती; तर वैराग्यानें आणि एकनिष्ठपणानें एकोणिसाव्या शतकांतील आधिभौतिक विचारानें ग्रस्त झालेल्या उत्तरार्धांतहि आध्यात्मिक प्रश्नांचा विचार करण्यांत जन्म घालविला, आणि आपल्या अलौकिक बुद्धिसामर्थ्यानें या बाबतींत पुढील पिढीच्या विचारांस नवीन वळण घालून दिलें. असले पुरुषच जगाचे खरे हितकर्ते होत आणि वर सांगितल्याप्रमाणें ते कोणत्याहि देशांत उत्पन्न झाले असले तरी ‘ विद्वान् सर्वत्र पूज्यते’ या न्यायानें सर्व देशांतल्या व सर्व ठिकाणच्या लोकांस ते एकसारखे पूज्य असतात. स्पेन्सरसाहेबांचें वय मरणसमयीं ८४ वर्षांचें असल्यामुळें व शास्त्रीय विचारांची तत्त्वज्ञानदृष्ट्या एकवाक्यता करण्याचें जें काम त्यांनीं हातीं घेतलें होतें तें बहुतेक पुरें झालें असल्यामुळें त्यांचे मृत्यूबद्दल हळहळ वाटावयाचें कांहीं कारण राहिलें नाहीं; तथापि, विशाल बुद्धिमत्तेचें पुरुष क्वचित् निर्माण होतात हें लक्षांत आणलें आणि आमच्या देशांतील बुद्धिवान् लोकांची सद्यःप्रवृत्ति मनांत आणली म्हणजे दुःख वाटल्याखेरीज राहत नाहीं.

---

## ९. डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील पांचवा मृत्यु !—

### प्रि. गोपाळ गणेश आगरकर

[ १८ जून १८९५ ]

**सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥**

प्रो. वासुदेवराव केळकर यांचा मृत्युलेख लिहून पुरे पांच आठवडेहि झाले नाहींत तोंच प्रि. गोपाळ गणेश आगरकर यांच्या मृत्यूची वातमी आमच्या वाचकांस कळविण्याचें आमच्या कपाळीं आलें आहे याचें आम्हांस अत्यंत दुःख वाटतें ! हल्लीं चतुःश्रृंगीच्या मैदानावर जी भव्य इमारत उभारली आहे; व ज्या इमारतीच्या आवारांतच त्यांच्या फार दिवसांच्या इच्छेनुरूप गोपाळरावजींचे देहावसान झालें, ती इमारत आपल्या आयुष्यांत केव्हां तरी उभी करण्याच्या उद्योगास लागावें व त्याकरितां आपलें सर्व आयुष्य खर्च करावें असा ज्या थोड्या गृहस्थांनीं सन १८७९ सालीं पुष्कळ विचाराअंतीं निश्चय केला होता त्यांपैकींच प्रि. आगरकर हे एक होते; व तेव्हांपासून त्यांचा व प्रस्तुतच्या केसरीच्या एडिटराचा जो निकट संबंध जडला होता त्यामुळें त्यांचा मृत्युलेख लिहिण्याचें दुर्घट काम आपल्या हातून कसें काय निभावेल याची केसरीस बरीच शंका वाटत आहे. गेल्या पांचसहा वर्षांत यांच्या व आमच्या दरम्यान असलेला मतभेद बराच लोकांपुढें आलेला आहे; पण मृत्यूचें स्वरूप इतकें उग्र व भयंकर आहे कीं, त्यामुळें बारिकसारिक गोष्टी विसरून जाऊन प्रथमतः दृढनिश्चयानें त्यांनीं व आम्हीं कांहीं विशिष्ट लोकोपयोगी कार्यें करण्याचें मनांत आणलें व त्यानंतर तीं कार्यें सिद्धीस नेण्याकरितां एकदिलानें घरीं, दारीं, किंबहुना कारागृहीं जे बेत व उद्योग केले त्यांचें तीव्र स्मरण पुनःपुन्हा जागृत होऊन आमची बुद्धि व लेखणी गोंधळून जाते. एका विद्यालयांत एका प्रकारच्या विशिष्ट शिक्षणाचा संस्कार झाल्यामुळें पुढें आयुष्य कोणत्या तऱ्हेनें घालवावें याचा विचार करतां करतां एक विशिष्ट उद्योग करण्याचें व त्यांत आपलें सर्व आयुष्य घालण्याचें ठरवून ज्यांनीं आपल्या आयुष्यांतील उमेदीचीं पहिलीं दहा बारा वर्षें आपले इष्ट हेतु तडीस नेण्याकरितां केवळ आपण आरंभिलेले कार्यापासून होणारे परिणामावर नजर देऊन दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींकडे व संकटांकडे लक्ष न देतां खर्च केलीं, त्यापैकीं एकास अकालीं मृत्यूनें ओढून नेल्यामुळें दुसऱ्याचें मन विषाद आणि दुःख यांनीं भरून अगदीं वेडावून

जाणें हें स्वाभाविक आहे. पण त्याहून विशेष दुःखकारक गोष्ट ही होय कीं, ज्या महाराष्ट्रांतील लोकांची सेवा करण्याचा प्रि. आगरकर व आम्हीं निश्चय केला होता त्यांच्यापुढें ही दुःखाची काहाणी सांगण्याचा आमच्यावर अकल्पित प्रसंग यावा ! 'स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते' असें जें कालिदासानें एके ठिकाणीं म्हटलें आहे त्याचा हल्लींच्या प्रसंगीं आम्हांस तर पूर्ण प्रत्यय येत आहे. असो; रा. गोपाळराव आगरकर यांच्या वियोगानें आम्हांस जो शोक होत आहे तो आंवरून त्यांच्यासंबंधानें शेवटच्या कर्तव्यांपैकीं आजचा लेख हें एक दुःखकारक कर्तव्य आहे असें समजून तें केलें पाहिजे.

संस्कृत न्यायशास्त्रांत कांहीं पदार्थांचें लक्षण, त्यांच्या अभावीं काय स्थिति होते किंवा असते याजवरून सांगितलेलें असतें; व पुष्कळदा अशा रीतीनें एखाद्या गोष्टीचें स्वरूप जितकें चांगलें कळून येतें तितकें ती वस्तु दृष्टिगोचर असतांना येत नाहीं. कोणताहि मनुष्य सर्वथैव निर्दोषी सांपडणें कठीण आहे; पण मनुष्याची किंमत करणें ती त्याच्या अंगीं जे चांगले गुण असतात त्यावरूनच होत असते. प्रि. आगरकर यांच्या अंगीं असे कोणते गुण होते हें चांगलें लक्षांत येण्यास डेक्कन एज्युकेशन सोसायटीस यांच्यासारखा मनुष्य पुनः मिळण्यास किती दिवस लागतील याचा वाचकांनीं विचार करावा म्हणजे झालें. रा. रा. आगरकर हे कांहीं मूळचे संपन्न अगर सुखी नव्हते; आपला विद्याभ्यास यांस बहुतेक गरीब स्थितींतच करावा लागला; व विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर यांच्या आप्तवर्गाची व जगरूढी-प्रमाणें यांची स्वतःचीहि इच्छा आपली स्थिति जेणेंकरून सुधारेल तो उद्योग हातीं घेण्याविषयींची असावी असें कोणासहि सहज वाटेल. विद्याभ्यास परिपूर्ण होऊन कॉलेजांतून आपल्या गुरूचा निरोप घेऊन विद्यार्थी जेव्हां बाहेर पडतात तो काल त्यांच्या आयुष्यांत मोठ्या महत्त्वाचा, उत्साहाचा आणि उमेदीचा असतो. अशा वेळीं बहुतेक 'महाजनो येन गतः स पंथाः' या न्यायानें एखाद्या नवीन मार्गास लागण्यास सहसा धजावत नाहींत हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं. सरकारी नोकरींत शिरून शंभराचे दोनशें, दोनशांचे चारशें आणि चारशांचे हजार रुपये होण्याची ज्यांनीं हांव धरिली, आणि ती हांव परिपूर्ण झाल्यावर खाविंदचरणीं खर्ची घालून जी कांहीं थोडीशी शक्ति अगर उमेद अवशिष्ट राहिली असेल ती पेन्शन घेऊन 'हरि हरि' म्हणण्याचे कामीं खर्च करण्याचा संकल्प केलेले व हा स्वतःचा आयुष्यक्रम आटोपून स्वस्थ बसण्याचा प्रसंग आपणावर येतो न येतो तोंच आपल्या चिरंजीवांसहि त्याच मार्गांत ढकलून देऊन दोन पिढ्यांची काळजी दूर झाली म्हणून आपणास कृत्यकृत्य मानणारे युनिव्हर्सिटीचे पदवीधर किंवा सुशिक्षित गैरपदवीधर असे आजपर्यंत बरेच लोक निर्माण झाले आहेत व

होतील; किंबहुना भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें अशा किंवा ह्यासारख्याच दुसऱ्या रीतीनें स्वार्थसाधन करीत असतां त्यांतलेत्यांत सार्वजनिक उपयोगांचीं कामें करणारे गृहस्थहि कांहीं सांपडतील, नाहीं असें नाहीं. पण विद्येनें आणि अंगच्या हुषारीनें आपण इतर लोकांचाच क्रम स्वीकारल्यास चांगलें यश संपादन करूं अशी बहुतेक खात्री वाटत असतां केवळ एक लोकोपयोगी हेतु मनांत धरून त्याकरितां आजन्म दारिद्र्य, विपत्ति, उपेक्षा अगर निंदा सहन करण्यास तयार होण्याचें ज्यांनीं धैर्य दाखविलें आहे असे महाराष्ट्रांत किंबहुना आमच्या विपन्न देशांत सध्यां तरी थोडेच पुरुष निपजतात. न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्यूसन कॉलेज या दोन संस्था इतक्या लोकप्रिय कां झाल्या आहेत याचा लक्षपूर्वक जो कोणी विचार करील त्यास आम्ही काय म्हणतों तें नीट कळून येईल. डेक्कन आणि एल्फिन्स्टन कॉलेजांतून बी. ए. अगर एम. ए. थोडे झाले आहेत असें नाहीं, पण गरिबीस न भितां अथवा सुखाची अगर संपत्तीची आशा न धरितां ज्या लोकांच्या पैशानें -सरकार विद्याखात्यावर जो पैसा खर्च करितें तो लोकांचाच आहे- आपणास पाश्चिमात्यविद्येचा संस्कार घडला आहे त्यांचें आपण हल्लींच्या देशकालानुरूप कोणत्या रीतीनें उतराई व्हावें याचा कोणकोणी विचार केला व कोण करताहेत हें पाहिलें म्हणजे रा. आगरकर यांची योग्यता सहज कळून येईल. ज्या कोणत्याहि राष्ट्रांत आपल्या विद्येचा, अकलेचा, हुषारीचा आणि कर्तबगारीचा म्हातारपणीं नव्हे तर भर उमेदींत लोकोपयोगी कामाकडे इमानानें आणि नेकीनें उपयोग करणारे शेंकडा नाहीं तरी हजारीं तरी कांहीं गृहस्थ निघत नाहींत तें राष्ट्र जिवंत असून मेल्यासारखेंच आहे असें आम्हीं समजतों. आमचे हे विचार पुष्कळांस एककल्ली व कांहीं अंशीं चमत्कारिक वाटतील, पण ज्या कारणांनीं सन १८७९ सालीं रा. रा. गोपाळ गणेश आगरकर यांनीं स्वतंत्र शाळा व कॉलेज काढण्याचें काम हातीं घेण्याचें ठरविलें, त्यापैकींच वरच्या तऱ्हेचे विचार हे मुख्य होत. व याचकरितां गोपाळरावजींच्या बरोबरीच्या किंवा मागील पुढील ग्रॅज्युएटांपेक्षा त्यांची योग्यता आमच्यामतें अधिक आहे. न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्यूसन कॉलेज काढण्याचा ज्यांनीं संकल्प केला होता, त्यांपैकीं कांहीं गृहस्थांचा लवकरच कसा मतिभ्रंश झाला हें ज्यांस माहित आहे, त्यांस वर लिहिल्याप्रमाणें आयुष्य घालविण्याचा निश्चय करतेवेळी मन किती घट्ट करावें लागतें याची कल्पना येईल. परीक्षा पास होऊन कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्यांस दोन मार्ग असतात. दोन्हींहि मार्ग प्रथमारंभीं जरा सारखेच विकट असतात पण आपल्या अंगीं कर्तबगारी असल्यास एका मार्गाचें अवलंबन केल्यानें लवकरच आपणास व आपल्या कुटुंबास सुखसाधनें प्राप्त होतील असें एकीकडे दिसत असतें, आणि इकडे दुसरा मार्ग स्वीकारला तर आमरण

गरिबी आणि शारीरिक हाल हे निश्चित असतात. अशा वेळीं जाणून बुजून दुसऱ्या मार्गानें जाण्यास फारच थोडे विवाहित व कुटुंबवत्सल गृहस्थ तयार होतात याचा आम्हांस पूर्ण अनुभव आहे; व एवढ्याकरितांच रा. रा. गोपाळराव आगरकर यांचा आयुष्यक्रम महत्त्वाचा व सुशिक्षित लोकांनीं कित्ता घेण्याजोगा आहे असें आम्हीं म्हणतों. सर्वच मनुष्यांचीं सर्व मतें नेहमीं जुळतात असें नाहीं. पण कोणत्याहि लोकोपयोगी कार्याकरितां आपली सर्व विद्वत्ता केवळ किंबहुना सगळें आयुष्य खर्च करण्याचा ज्यांनीं निश्चय केला आहे इतकेंच नव्हे तर ज्यांच्या हातून याप्रमाणें प्रत्यक्ष कृति झाली आहे त्यांच्या मृत्यूबद्दल देशांतील प्रत्येक मनुष्यास वाईट वाटेल यात शंका नाहीं. पण आमची स्थिति यांहून फारच भिन्न आहे. पहिल्यापासून एक उद्देश मनांत ठेवून तो सिद्धीस नेण्याच्या साधनांचा विचार करण्यांत व ती प्राप्त करून घेण्यांत कित्येक वर्षे एकमेकांस जीं सुखदुःखें अनुभवावीं लागलीं त्यांच्या पुनःपुन्हा स्मरणानें आमचें चित्त अगदीं उदास व अस्वस्थ होऊन आयुष्याची अशाश्वतता आमच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभी राहात आहे !

रा. रा. गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म स. न. १८५६ सालीं झाला व पुढें यांची गृहस्थिति अगदीं गरिबीची असल्यामुळें आपल्यां आप्तांच्या आश्रयानेंच रत्नागिरीस व वऱ्हाडांत विद्याभ्यास करून सन १८७५ सालीं मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास होऊन हे डेक्कन कॉलेजांत आले. तेथें त्यांच्या पुढील परीक्षा एकसारख्या उतरत गेल्या व सन १८७९ सालीं यांस दक्षिणाफेलोची जागा मिळाली. या सालच्या सप्टेंबर महिन्यांतच स्वतंत्र शाळा आणि कॉलेज काढण्याचा वर सांगितलेला विचार ठरविण्यांत आला. पण या सालीं यांची एम. ए. ची परीक्षा न उतरल्यामुळें आणखी एक वर्ष कॉलेजांत राहून सन १८८० सालीं एम. ए. ची परीक्षा पास झाल्यावर हे न्यू इंग्लिश स्कूलच्या मंडळींत येऊन काम करूं लागले. शाळेंत व कॉलेजांत असतांच यांस मराठी लिहिण्याचा नाद असे; व डेक्कन कॉलेज ग्यादरिंगकडून एका मराठी निबंधाबद्दल यांस बक्षीसहि मिळालें होतें. यांच्या मनाची प्रवृत्ति कशी काय होती हें वर सांगितलेंच आहे, व त्या प्रवृत्तींस अनुकूल असें इतर समवृत्तीच्या स्नेह्यांचें प्रोत्साहन मिळाल्यावर त्यांनीं मोठ्या हौसेनें व आनंदानें विद्याप्रसाराच्या कामीं आपलें आयुष्य खर्च करण्याचा निश्चय केला; व तो त्यांचा निश्चय शेवटपर्यंत ढळला नाहीं. कॉलेजांत असतां यांचा आवडीचा विषय इतिहास हा होता, व त्याच्या अध्ययनानें ह्यांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति उत्तरोत्तर दृढ होत गेली. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें आल्यानंतर त्याच सालीं केसरी व मराठा दोन पत्रें काढण्याचें ठरून त्यांपैकीं केसरीच्या एडिटराचें काम यांजकडे देण्यांत आलें. हें काम त्यांनीं कसें बजाविलें, तें

करीत असतांना काय काय संकटें आलीं व त्यांतून पार पडण्यास काय काय करावें लागलें इत्यादि गोष्टी सर्वश्रुत आहेत. त्यांचा उल्लेख येथें करण्याची जरूर नाहीं. गोपाळरावजींचा व त्यांच्या मित्रांचा मुख्य उद्दिष्ट कार्याखेरीज इतर बावतींत पहिल्यापासूनच थोडा मतभेद होता. परंतु सन १८८८ सालापर्यंत तो विशेष रीतीनें व्यक्त करण्याची कोणासहि आवश्यकता दिसली नाहीं. या सालच्या सुमारास डेक्कन एज्युकेशन सोसायटींत व अन्यत्र ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या त्यामुळें केसरी आणि सुधारक अशीं दोन पत्रें करावीं लागलीं. कोणताहि हातीं घेतलेला विषय मार्मिक आणि जोरदार रीतीनें प्रतिपादन करण्याची गोपाळरावजींची शैली केसरीच्या वाचकांस पूर्णपणें माहीत आहेच. किंबहुना केसरीस सध्यांची स्थिति येण्यास गोपाळराव हे पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले होते इतकेंच नव्हे तर, केसरीचे एडिटर याच नात्यानें त्यांचा व महाराष्ट्रांतील लोकांचा कांहीं वर्षें परिचय होऊन तो संबंध कोल्हापूर प्रकरणानें अधिक दृढ झालेला होता. अशा प्रकारचा संबंध तोडण्याचा कोणासहि प्रसंग येणें ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. असो; देशी वर्तमानपत्रांस हल्लीं जर कांहीं महत्त्व आलें असेल तर तें बऱ्याच अंशीं रा. रा. आगरकर यांच्या बुद्धिमत्तेचें व मार्मिक लेखांचें फल होय असें कोणीहि कबूल करील. शाळा व कॉलेज यांचें काम करून राहिलेला वेळ आज १५ वर्षें त्यापासून म्हणण्यासारखी कांहीं किफायत नसतां त्यांनीं वर्तमानपत्रें चालविण्यांत घालविला. यावरून मराठी भाषेच्या द्वारें आपले विचार लोकांपुढें मांडून त्यांस एक प्रकारें शिक्षण देण्याची गोपाळरावजींची उत्कट इच्छा व हौस पूर्णपणें व्यक्त होते हें कोणासहि मान्य होईल. गोपाळरावजींस दम्याची विकृति पहिल्यापासूनच होती, त्यामुळें त्यांच्या शरीराची काठी मजबूत असतांहि आज सतत १०–१२ वर्षें ते थोडेबहुत आजारी होते. त्यांनीं औषधोपचार पुष्कळ करून पाहिले, किंबहुना अतिशय केले असें म्हटलें तरीहि चालेल. पण त्यांपासून कांहीं गुण आला नाहीं व गेलीं १–२ वर्षें तर त्यांची प्रकृती पुष्कळच थकली होती. शेवटीं शेवटीं त्यांच्या प्रकृतींसहि विकार होऊन त्यामुळें पायास सूज आली व अखेरीस उदर होऊन त्यांस काल सकाळीं देवाज्ञा झाली ! त्यांच्या मृत्यूमुळें एकंदर महाराष्ट्राचें, मराठी भाषेचें व विशेषतः डेक्कन एज्युकेशन सोसायटीचें केवढें नुकसान झालें आहे हें सांगावयास नकोच. कै. चिपळूणकर, आपटे, केळकर, धारप आणि आगरकर हे पांचजण न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झाल्यापासून आज १५ वर्षांत नाहींसे व्हावेत ही कोणत्याहि संस्थेस लहानसहान आपत्ती नव्हे. त्यांतून ज्या संस्थेंत शिरण्यास स्वार्थत्याग करणें अवश्य असल्यामुळें जेथें चांगले व विद्वान शिक्षक थोडेच असावयाचे अशा संस्थेस

तर ही खरोखरच अपरिहार्य व दुर्धर आपत्ती आहे. तथापि अशा वेळीं न डगमगतां कॉलेजच्या चालकांनीं आपला उद्योग पूर्वीप्रमाणेंच धैर्यानें चालू ठेविल्यास या संस्थेचे उद्देश लक्षांत आणून त्याकरितां स्वार्थत्याग करून या संस्थेंत शिरणारे विद्वान गृहस्थ त्यांस कालांतरानें मिळणार नाहींत असें आम्हांस वाटत नाहीं. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, आपटे, आगरकर, इत्यादिकांच्या चरित्रांचा व लेखांचा जर कांहीं महाराष्ट्रांवर परिणाम घडला असला, तर तो आम्ही म्हणतों अशाच रीतीचा असला पाहिजे, व तो तसा आहे अशी आम्हांस उमेद आहे. गोपाळरावजींच्या मृत्यूनें त्यांच्या कुटुंबावर व अल्पवयी मुलांवर तर मोठाच प्रसंग गुदरला आहे. तथापि कालाकडे नजर देऊन आणि महाराष्ट्रांतील सर्व लोक त्यांच्या दुःखाचे वांटेकरी आहेत हें लक्षांत आणून त्यांनीं आपलें समाधान करून घेतलें पाहिजे. ईश्वर ठेवील त्या स्थितींत राहाणें भाग आहे !

# १०. प्रो. मॅक्सम्यूलर यांचा मृत्यु

[ ६ नोव्हेंबर १९०० ]

**स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।**

श्रीऋग्वेदभाष्याचे प्रकाशक प्रसिद्ध प्रो. मॅक्सम्यूलर अथवा त्यांच्या संस्कृत ग्रंथांत लिहिल्याप्रमाणें भट्ट मोक्षमूलर यांच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून हिंदुस्थानांतील नव्याजुन्या सर्व विद्वान् मंडळीस वाईट वाटल्याखेरीज राहावयाचें नाहीं. यांचा जन्म सन १८२३ सालीं डिसेंबर महिन्याच्या ६ वे तारखेस झाला होता. तेव्हांपासून तो आतांपर्यंत सतत ७७ वर्षें यांचा सर्व काळ अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन यांत गेला, व यांच्या मृत्यूनें जगामधील एक अमूल्य विद्वद्रत्न हरपलें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते' असें जें आम्हीं या लेखाच्या आरंभीं लिहिलें आहे त्याची सत्यता नजरेस येण्यास प्रो. मॅक्सम्यूलर यांचें चरित्र हें एक उत्तम साधन होय. हे जात्या जर्मन असून यांचा जन्म व पूर्वाभ्यास जर्मनींत झाला व पुढें कांहीं दिवस प्रसिद्ध विद्वान् बर्नाफ यांच्या हाताखालीं अभ्यास करण्याकरितां हे पारीस शहरांत गेले. हे ज्या वेळीं पारीस शहरांत अभ्यासाकरितां गेले तो काल असा कांहीं चमत्कारिक होता कीं, तेव्हां युरोपांतील विद्यापीठांतून आशिया खंडातील व विशेषेंकरून संस्कृत, झेंड, पाली वगैरे भाषांतून जो धर्मग्रंथांचा संग्रह आहे त्याचा नव्या पद्धतीनें आस्थापूर्वक अभ्यास करण्याइतका तो महत्त्वाचा आहे, व त्याकामीं कांहीं बुद्धिवान् पुरुषांनीं आजन्म परिश्रम केले असतां त्यापासून पाश्चात्य राष्ट्रांचें पुष्कळ हित होण्याचा संभव आहे अशी तिकडील विद्वानांची खात्री होत चालली होती. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड वगैरे देशांतील युनिव्हर्सिटींतून या कालापूर्वीं जें शिक्षण मिळत असे ते प्रायः ग्रीक व रोमन लोकांतील प्रसिद्ध विद्वान्, तत्त्वज्ञानी किंवा मुत्सद्दी यांच्या ग्रंथांच्या अभ्यासानेंच प्राप्त होई. सारांश, संस्कृत आणि इतर प्राच्य भाषा यांतील ग्रंथभांडाराची अथवा तत्त्वविचारांची किल्ली जेव्हां पहिल्यानें पाश्चात्य विद्वानांस सांपडली तेव्हां तिचा परिणाम पुष्कळ अंशीं ग्रीक व रोमन लोकांचें विद्याभांडार जेव्हां पहिल्यानें लुटलें गेलें त्या वेळच्या-प्रमाणेंच झाला, ही गोष्ट आतां निर्विवाद सिद्ध झालेली आहे. प्राच्य भाषांत, प्राच्य धर्मांत अथवा प्राच्य ग्रंथसमूहांत पाश्चात्य विद्वानांच्या तीव्र बुद्धीस योग्य असे विचार, माहिती किंवा तत्त्वज्ञान सांपडणें अशक्य अशी पुष्कळांची पहिल्यानें समजूत होती, व पहिल्या पहिल्यानें कित्येक पंडितांनीं तर ग्रीक व रोमन लोकांचे ग्रंथ

चोरून नेऊन हिंदुस्थानांतील पंडितांनीं आपल्या स्वतःच्या नांवावर खोटेच वनावट ग्रंथ रचलेले आहेत व त्यांत जर कांहीं ग्राह्यांश असला तर तो ग्रीक लोकांपासून चोरलेला आहे असा आक्षेप घेऊन प्राच्य भाषेचा अभ्यास करणारांची थट्टाहि करण्यास मागेंपुढें पाहिलें नव्हतें. आलेक्झांड्रिया येथील लायब्ररी खलिपानें जाळली, तेव्हां त्यानें अशाच प्रकारचे उद्‌गार काढल्याचें प्रसिद्ध आहे. लायब्ररींतील ग्रंथांत जर कांहीं ज्ञान असेल तर ते मुसलमानी धर्मांतून घेतलेलें आहे, सबब द्विरुक्त म्हणून निरूपयोगी आहे, आणि ज्ञान नसेल तर ते ग्रंथच ठेवण्यालायक नाहींत, अशी कोटी लढवून खलिपानें हा मोठा ग्रंथसमूह जाळण्यास परवानगी दिली अशी गोष्ट इतिहासांत नमूद आहे. ही गोष्ट खरी असो वा खोटी असो, प्राच्य भाषेंतील ग्रंथसमूहास हा न्याय लावण्याचा कित्येक पाश्चात्य पंडितांनीं प्रयत्न केला असतांहि त्यांस यश न येतां शेवटीं पुष्कळ विद्वान्, बुद्धिवान, शोधक आणि विद्याव्यासंगी फ्रेंच व जर्मन पंडितांच्या लेखांनीं, शोधांनीं आणि उद्योगानें प्राच्य ग्रंथांची योग्यता व महत्त्व युरोपांतील सर्व विद्यापीठांतल्या विद्वानांस कबूल होऊन अखेरीस आजमितीस जर्मनी व फ्रान्स यांतील मोठमोठ्या युनिव्हर्सिटींतून प्राच्यभाषांचे अध्यापकांच्या कायमच्या जागा स्थापन झालेल्या आहेत. प्राच्य भाषांतील ग्रंथसमूहापैकीं युरोपांतील विद्वानांवर ज्यांचा विशेष परिणाम झाला ते ग्रंथ भाषाविषयक आणि धर्मविषयक होत; व भाषाविषयक ग्रंथांतहि पाणिनीचें व्याकरण हा पहिला किंवा श्रेष्ठ ग्रंथ होय. सर्व जगाच्या प्राचीन किंवा अर्वाचीन इतिहासांतील पांच मोठ्या विद्वानांचीं नावें घ्यावयास सांगितलीं तर त्यांत पाणिनीच्या नांवाचा समावेश करावा लागेल असें पांचसहा वर्षांपूर्वी अमेरिकेंतील एका विद्वान गृहस्थानें उद्‌गार काढलेले आहेत. संस्कृत भाषेचें प्राचीनत्व व विशेषेंकरून प्रकृति, प्रत्यय वगैरे मूळ शब्दांपासून किंवा धातूपासून भिन्न करून त्यांच्यापासून साधित शब्द कसे बनवावे याबद्दल भाषेंतील सर्व शब्दांस लागू पडणारे व्यापक नियम व अपवाद यांचा पाणिनीच्या अपूर्व ग्रंथांत जो समावेश केलेला आहे त्यानें तर पाश्चात्य भाषा-विद्वानांच्या उद्योगास एक प्रकारचें नवें वळण लागलें आणि गेल्या ३०–४० वर्षांत निरनिराळ्या भाषांचें तुलनादर्शक भाषाशास्त्र म्हणून जर्मन पंडितांनीं एक नवीनच शास्त्र निर्माण केलें आहे. हें शास्त्र पूर्णतेस आणण्यास बॉप वगैरे पंडितांनीं पुष्कळ परिश्रम केले आहेत ही गोष्ट खरी आहे; पण पाणिनीचा ग्रंथ याचें मूळ आहे हें विसरतां कामा नये. भाषाशास्त्रावर प्राच्य ग्रंथसमूहाचा व प्राच्य भाषांच्या अभ्यासाचा हा परिणाम झाला. प्राच्य भाषांच्या अध्ययनाचा दुसरा परिणाम धर्मविषयक होय. बर्नाफ, बॉप, कोलरिज, जोन्स वगैरे प्राच्य भाषाभिज्ञ पाश्चात्य विद्वान निपजण्या-

पूर्वी युरोपांतील लोकांस आशिया खंडांतील पॅलेस्टाईन प्रांतांत निघालेला एकच काय तो धर्म माहीत होता. मुसलमानी धर्मग्रंथांची ओळख त्यांस झालेली होती खरी, पण मुसलमानी धर्महि वायवलांतूनच निघाला असल्यामुळें ख्रिस्तीधर्माहून भिन्न तऱ्हेच्या धर्मकल्पना, धर्मविचार, धर्मतत्त्वें किंवा धर्मग्रंथ त्यांच्या अवलोकनांत येत नसत. रोमन आणि ग्रीकलोक यांचे पूर्वीचे धर्म किंवा इजिप्तमधील पूर्वीच्या लोकांचा धर्म यांचीच काय ती ख्रिस्ती धर्माशीं तुलना होत असे व कित्येक विद्वानांनीं तर ख्रिस्त धर्माचींच तत्त्वे रोमन लोकांच्या जुन्या धर्मांत आहेत असें प्रतिपादन केलेलें होतें. पाश्चात्य पंडितांच्या विचाराचा हा ओघ वेद, झेंदावेस्ता, बौद्धधर्माचीं धर्मसूत्रें किंवा त्रिपिटिका यांच्या अध्ययनानें पालटला आणि त्या योगानें त्यांच्या विचारसरणींतहि पुष्कळ फेर पडून अखेरीस निरनिराळ्या धर्मांचें तुलनात्मक नवीन शास्त्र निघालें. त्याचप्रमाणें रोमन आणि ग्रीक लोकांच्या जुन्या धर्मांतून देवतांच्या वगैरे ज्या कथा आहेत त्यांची आणि ऋग्वेदांतील कथांची, व ग्रीक, रोमन, संस्कृत वगैरे भाषांची तुलना करण्यात आली. तेव्हा देवता-विषयक या सर्व कथांचे वीज प्राच्य ग्रंथांत आहे व युरोपांतील नव्याजुन्या भाषा व जुन्या धर्मांतील कथा यांचें सादृश्य मनांत आणलें असतां युरोप आणि आशिया या दोन खंडांत सुधारलेले म्हणून जे लोक आहेत किंवा होते ते सर्व मूळ एका मानवी शाखेचे व एक भाषा वोलणारे असावे असा विचार जागृत होऊन तो उत्तरोत्तर दृढावत गेला, आणि अखेरीस आर्यधर्माचीं व आर्यभाषेचीं मूलतत्त्वें प्राच्य ग्रंथांत आणि प्राच्य भाषांत आहेत ही गोष्ट सर्व मान्य झाली. किंवहुना आर्यलोकांचा प्राचीन धर्म, रीतिभाति, आचारविचार किंवा कल्पना यांचे प्राच्य भाषांतील ग्रंथ हें एक भांडारच आहे, व युरोप आणि आशिया खंडांत ज्या आर्य शाखेच्या लोकांनीं आपलें वर्चस्व स्थापित केलें होतें किंवा आहे ते मूळचे एके ठिकाणीं राहणारे होते ही कल्पना प्राच्य भाषेच्या अभ्यासानेंच उदयास येऊन दृढ झाली आहे. प्रो. मॅक्सम्यूलर यांच्या उद्योगाचें आणि विद्वत्तेचें आणि ग्रंथांचें खरें महत्त्व लक्षांत येण्यास वर सांगितलेली हकीकत पूर्णपणें ध्यानांत ठेवली पाहिजे. प्रो. मॅक्समूलर यांचा जन्म १८२३ सालीं झाला व आपल्या वयाच्या २२ व्या वर्षी म्हणजे सन १८४५ सालीं ते वर्नाफ़नामक प्रसिद्ध व वुद्धिमान् गुरूंचीं व्याख्यानें ऐकण्यास पॅरीसमध्यें गेले. एखाद्या ठिकाणीं एखादा प्रसिद्ध विद्वान् गुरु असल्यास वुद्धिवान् विद्यार्थ्यांची तिकडे कशी ओढ लागते याचा परिचय दुर्दैवानें अलिकडे आपणास मिळत नाहींसा झाला आहे. पण युरोपांतील युनिव्हर्सिटींतून अशीं उदाहरणें पुष्कळ पाहण्यांत येतात, प्राच्य भाषा व प्राच्य ग्रंथ यांचा त्या वेळीं नुकतांच युरोपांत प्रवेश होत होता. अर्थात् तेव्हांपासून १९ व्या

शतकाच्या अखेरपर्यंत प्राच्य भाषेच्या व प्राच्य धर्माच्या ज्ञानाचा युरोपांत जो प्रसार झाला, जी महती वाढली ती सर्व प्रो. मॅक्सम्यूलर यांच्या डोळ्यादेखत वाढली, इतकेंच नव्हे तर ती वाढविण्याच्या कामीं ज्यांनीं अश्रांत मेहनत घेतली त्यांपैकीं प्रो. मॅक्सम्यूलर हे एक प्रमुख विद्वान होते एवढें म्हटलें म्हणजे यांच्या उद्योगाचें आणि विद्याव्यासंगाचें खरें स्वरूप वाचकांच्या नजरेस येईल. मॅक्सम्यूलर-साहेबांनीं युरोपांतील विद्यापीठांतल्या विद्वानांच्या विचारसरणींत झालेला हा फरक आपल्या डोळ्यांनीं पाहिलेला आहे, किंबहुना त्यांच्या हयातींत तो झालेला आहे, आणि या विचारक्रांतीचा इतिहास जेव्हां लिहिण्यांत येईल, तेव्हां त्याच-बरोबर प्रो. मॅक्सम्यूलर यांचें नांवहि नेहमीं जोडलेलें राहील यांत शंका नाहीं.

परंतु प्रो. मॅक्सम्यूलरसाहेबांची आज जी सर्वत्र प्रसिद्धि झाली आहे व त्यांच्याबद्दल पृथ्वींतील सर्व देशांतील विद्यापीठांतून जी पूज्यबुद्धि आहे तिचें वर सांगितलेल्या हकीकतीपेक्षांहि दुसरें एक कारण आहे. प्राच्य भाषा, प्राच्य ग्रंथ, प्राच्य धर्मतत्त्वें, प्राच्य विचार यांची जी लाट युरोपांत उसळली, व त्यामुळें जी विचारक्रांति झाली तिचें शोधकबुद्धीनें व मार्मिकपणानें परीक्षण करणारे विद्वान् जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांतून पुष्कळ झाले व अद्यापहि हयात आहेत. रॉथ, बोर्थलिंग, बॉप, बॅर्नाफ्, डार्मेस्टेटर, वेबर, बुल्हर व अगदीं अलिकडील लडविग, ग्रासमन, व्हिटने वगैरे विद्वानांची परंपरा जर्मनी व फ्रान्स या देशांमध्यें बरीच झालेली आहे व त्यांनीं प्राच्य भाषा, प्राच्य धर्म, सर्व धर्मांची व भाषांची तुलना वगैरे विषयांवर अनेक ग्रंथ लिहून ठेविलेले आहेत, इतके कीं प्राच्य भाषांचा किंवा धर्मग्रंथांचा इतउत्तर जर कोणास सूक्ष्म व नव्या पद्धतीनें अभ्यास करावयाचा असेल तर या पाश्चात्य विद्वानांचे ग्रंथ वाचल्याखेरीज त्याच्या अध्ययनाची परिपूर्ति कधींहि व्हावयाची नाहीं. पण हे ग्रंथ प्रायः जर्मन आणि फ्रेंच या भाषेंतच असल्यामुळें पृथ्वींतील नाना देशांतून त्यांचा जितका प्रसार किंवा प्रसिद्धि व्हावयास पाहिजे तितकी झालेली नाहीं. मॅक्सम्यूलर यांनीं आपल्या ग्रंथांतून घातलेले विचार सर्वच त्यांचे आहेत असें नाहीं. जर्मन व फ्रेंच पंडितांच्या विचारसरणीचेंच प्रायः त्यांनीं अवलंबन केलेलें असून सदर पंडितांचेच विचार आपल्या मोहक व गोड भाषेंत त्यांनीं व्यक्त करून दाखविले आहेत. पण मॅक्सम्यूलरसाहेबांची विशेष प्रसिद्धि होण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे ते इंग्लंडांत येऊन राहिले व इंग्रजी भाषेचा पुरा अभ्यास करून तद्द्वारा त्यांनीं आपले विचार जगापुढें मांडले हें होय. इंग्रजांचें राज्य व इंग्रजी भाषा हल्लीं जगावर चोहोंकडे पसर-लेली आहे. करितां जर्मन किंवा फ्रेंच भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांपेक्षां इंग्रजी भाषेंत लिहिलेल्या ग्रंथांचा स्वभावतःच अधिक प्रसार होतो व कोणतीहि नवी गोष्ट

किंवा तत्त्व या भाषेच्या द्वारें जगांत अधिक प्रसिद्धीस येतें, त्यांतूनहि प्रो. मॅक्सम्यूलरसारखा मोहक आणि गोड भाषा लिहिणारा जर्मन कवीचाच मुलगा लेखक मिळाल्यावर मग तर विचारावयासच नको. बॅर्नाफ्, बॉप वगैरे फ्रेंच किंवा जर्मन महापंडितांच्या नवीन विचारांचीं सणगें त्यावर इंग्रजी 'पॉलिश' चढवून मॅक्सम्यूलरसाहेबांनीं जगापुढें जेव्हां पहिल्यानें विक्रीस मांडलीं तेव्हां या वस्त्रांच्या सौंदर्यानें ग्राहकांचे डोळे दिपून जाऊन भाषासौदागारांत प्रो. मॅक्सम्यूलर यांस त्यांनीं अग्रस्थान दिलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. विचारांची अपूर्वता, भाषेचें सौंदर्य, मार्मिक आणि सप्रमाण नवीन शोध आणि इंग्रजी भाषेचा सार्वत्रिक असलेला प्रचार या गोष्टी एकत्र झाल्यावर कोणती विचारक्रांति व्हावयाची नाहीं? जर्मन किंवा फ्रेंच पंडितांनीं प्राच्य भाषा, प्राच्य ग्रंथ आणि प्राच्य विचार यांस तावून सुलाखून व पूर्ण कसोटीस लावून तयार केल्यावर त्या विचारांची योग्यता व महत्त्व सोप्या, मोहक आणि सर्वत्र प्रचलित असलेल्या भाषेंत लोकांपुढें मांडण्याचें काम भट्ट मोक्षमूलर यांनीं सतत पंचावन्न वर्षे केलेलें आहे व त्यांनीं ही जी मोठी कामगिरी बजाविली आहे त्याबद्दल प्राच्य देशांतील लोकांनीं त्यांचें किती ऋणी असलें पाहिजे याची कल्पना त्यांचे ग्रंथ वाचल्याखेरीज कोणासहि यावयाची नाहीं. संस्कृतांत हे प्रविण होते हे तर सांगावयास नकोच, पण त्याखेरीज, झेंद, पेहलवी, पार्शी, पाली किंबहुना जगांतील बहुतेक प्रमुख भाषा यांचा त्यांनीं थोडाबहुत अभ्यास केलेला होता व आपल्या आयुष्याची ५०–६० वर्षें सतत या अभ्यासांत घालविलीं होतीं. विद्यादेवीची इतक्या एकनिष्ठपणें सेवा करणारे पंडित आमच्या देशांत प्राचीनकाळीं पुष्कळ होत असत व सायणाचार्यासारखे तेराव्या शतकापर्यंत झालेले आहेत. पण मध्यंतरी ही परंपरा जी कमी झाली ती अद्यापहि पूर्ववत जिवंत झाली नाहीं ही मोठ्या दुखाःची गोष्ट आहे. जर्मनींत जन्मून, पारिस येथें अभ्यास करून, व इंग्लंडांत राहून आपल्या अपूर्व बुद्धिवैभवानें, उद्योगानें, शोधानें आणि ग्रंथलेखनानें सर्व जगास चकित करण्याची प्रो. मॅक्सम्युलर यांस जी सवलत मिळाली ती दुसऱ्या कोणा विद्वानास मिळाली नसती असें नाहीं. पण यांच्यासारखा विद्याभिरुचि असणारा व एकनिष्ठपणानें विद्याव्यासंग करणारा आमच्यामध्यें हल्लींच्या काळांत तरी कोणी नजरेस येत नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. हिंदुस्थांनातील आधुनिक विद्वानांनीं प्रो. मॅक्सम्युलरांच्या चरित्रापासून जर कांहीं बोध घ्यावयाचा असेल तर हाच होय. राजकीय बाबतींत आम्हांस आमच्या अंगीं कितीहि गुण असले तरी पुढाकार घेण्यास या राज्यांत संधि सांपडणें कठिण आहे; पण सर रिचर्ड टेंपल यांनीं सांगितल्याप्रमाणें विद्याव्यासंग, तत्त्वज्ञान, धर्मविचार किंवा शास्त्रीय शोध याबाबतींत आमच्या बुद्धीचा बराच उपयोग आम्हांस अद्याप करून घेतां येण्यासारखा आहे व तेवढा

जरी आमच्या विद्वानांनीं करून घेतला तरी त्यापासून देशाचें पुष्कळ कल्याण झाल्याखेरीज राहावयाचें नाहीं.

असो, प्रो. मॅक्सम्युलर यांची सर्वत्र प्रसिद्धि होण्यास वर जीं कारणें दिलीं आहेत, त्याखेरीज त्यांचा सात्त्विक स्वभाव आणि विचारौदार्य हेंहि एक आणखी कारण होय. नाना देश, नाना भाषा, नाना धर्म, यांच्या इतिहासाचें सतत परिशीलन केल्यामुळें मॅक्सम्यूलरसाहेबांच्या स्वभावतः उदात्त बुद्धीचें 'वसुधैव कुटंबकम्' ह्या सिद्धांतात पर्यवसान झालेलें होतें. परधर्माची महती किंवा परभाषेचें सौंदर्य पूर्णपणें समजल्यानें स्वधर्मावरील किंवा स्वभाषेवरील श्रद्धा कमी होते असें नाहीं, हें प्रो. मॅक्सम्यूलर यांच्या चरित्रावरून विशेष शिकण्यासारखें आहे. प्रो. मॅक्सम्यूलर हे शेवटपर्यंत ख्रिस्तीच होते. पण त्यांचा ख्रिस्ती धर्म अथवा विचार मिशनरी डबक्यांतील विचाराप्रमाणें स्तिमित झालेला नसून नाना भाषा व धर्म यांच्या परिशीलनाचा जो कांहीं त्यांच्यावर योग्य परिणाम व्हावयास पाहिजे होता तो झालेला होता. हे त्यांचे धर्मविचार विलायतेंतील कोत्या धर्मसमजुतीच्या मिशनरी लोकांस अप्रिय झालेले असून एकदां त्यांनीं ऑक्सफोर्ड विद्यालयांतील संस्कृत प्रोफेसरची जागाहि मॅक्सम्यूलरसाहेबांस मिळूं दिली नाहीं ! पण दीर्घोद्योग व सत्यनिष्ठा यांचा अखेरीस जय होऊन मॅक्सम्यूलरसाहेबांचे विचारच सर्वमान्य ठरले. असो, सांगावयाची गोष्ट एवढीच कीं, 'वसुधैव कुटंबकम्' या न्यायानें पृथ्वीवरील सर्व देशांतील लोकांबद्दल, त्यांच्या धर्मविचाराबद्दल अथवा आचाराबद्दल समताबुद्धि कायम ठेवून त्यांचें कल्याण व्हावें अगर त्यांनीं ऊर्जित दशेस यावें अशी मनापासून इच्छा बाळगून त्याकरितां आपल्या हातून होईल तेवढा उद्योग करणें सत्वशील विद्वानांचें लक्षण होय व तें लक्षण प्रो. मॅक्सम्यूलर यांच्या अंगीं पूर्णपणें आढळून येत असल्यानें पत्रव्यवहारानें, समक्ष भेटीनें किंवा त्यांच्या ग्रंथांच्या परिशीलनानें त्यांच्याशीं ज्यांचा प्रत्यक्ष किंवा परोक्ष संबंध झालेला होता त्या लोकांची मग ते कोणत्याहि धर्माचे असोत त्यांच्याबद्दल पूज्यबुद्धि झालेली होती. 'शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः' असें जें भगवद्गीतेतील वाक्य आहे तें बऱ्याच अंशीं मॅक्सम्यूलरसाहेबांस लागूं पडत होतें, याची त्यांच्या ग्रंथांतून, विचारसरणींतून व किरकोळ लेखांतूनहि जागोजाग प्रतीति येते. जगांतील निरनिराळ्या धर्मांचीं पुस्तकें इंग्रजींत भाषांतर होऊन 'सेक्रेड बुक्स् ऑफ धी ईस्ट' या नांवाची जी एक ग्रंथमाला प्रसिद्ध झाली आहे, तिचें पुरस्कर्तृत्व मॅक्सम्यूलरसाहेबांनींच घेतलें होतें व याखेरीज याच विषयावर त्यांनीं ग्रंथ लिहिलेले आहेत. त्या सर्वांवरून त्यांची विद्वत्ता, समताबुद्धि व विचारौदार्य चांगल्या रीतीनें व्यक्त होतात.

परंतु आमच्या हिंदुस्तान देशाच्या दृष्टीनें विचार करतां संस्कृत भाषा, संस्कृत धर्मग्रंथ वगैरे विषयांसंबंधानें पाश्चात्य देशांतून पूज्य बुद्धि उत्पन्न करून आर्य लोकांचे प्राचीन ग्रंथ, धर्मविचार किंवा बुद्धिवैभव यांस युरोपांतील राष्ट्रांत आपल्या ग्रंथलेखनानें यांनीं जें अग्रस्थान मिळवून दिलें आहे, त्याबद्दल आम्हीं उपकार मानावे तितके थोडेच आहेत. वेद किंवा इतर संस्कृत धर्मग्रंथ यांच्या सतत अभ्यासानें हे अंतःकरणानें व विचारानें हिंदूच बनून गेले होते; व तारुण्यांत असतां हिंदुस्थानांत जाऊन गंगेच्या पवित्र उदकांत मी एकदां केव्हां स्नान करीन असें यांस झालेलें होतें. पण दैवगति अशी कांहीं विचित्र आहे कीं, हा त्यांचा हेतु आमरणांत त्यांस कांहींना कांहीं तरी कारणानें तडीस नेतां आला नाहीं. शांकर अद्वैतसिद्धांताचें मर्म कळून त्यांचें मंडण करणारे जर्मन प्रोफेसर डयूसन जेव्हां इकडे आले होते तेव्हां ते पूर्वजन्मीं मी हिंदू होतों असें म्हणत असत. प्रो. मॅक्सम्यूलर यांची हिंदुस्थानाबद्दलची कळकळ मनांत आणतां तेहि पूर्वजन्मीं हिंदूच होते कीं काय असा विचार सहज मनांत येतो. प्रो. मॅक्सम्यूलरसाहेब हे हिंदुस्थानांत आले नाहींत ही एक चांगलीच गोष्ट झाली; कारण ते इकडे आले असते तर हल्लींची हिंदुस्थानची स्थिति पाहून प्राचीन ग्रंथाध्ययनानें हिंदू लोकांबद्दल जो त्यांचा अनुकूल ग्रह झालेला होता तो फिरला असता असें मुंबईच्या टाईम्सकारांचें म्हणणें आहे. पण हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. हिंदुस्थानावर किंवा हिंदु लोकांवर राज्य करण्याकरितां किंवा येथें पैसे मिळविण्याकरितां आलेल्या अंमलदारांस किंवा व्यापाऱ्यांस हिंदूंची हल्लींची स्थिति पाहून त्यांच्याबद्दल कळकळ न वाळगण्यास ही एक नवीन सबब होते किंवा होईल हें खरें आहे; कारण उदार बुद्धीचा यांच्या हृदयांत बहुतेक नष्टांशच झालेला असतो. पण जुन्या संस्कृत ग्रंथांच्या अध्ययनानें या देशांतील लोकांच्या बुद्धिमत्तेचे खरें स्वरूप ज्यानें ओळखलें आहे, त्यास आज सतत हजार एकराशें वर्षें परराज्याखालीं राहिल्यानें ज्यांच्या अंगच्या शौर्यादि गुणांचा थोडाबहुत ऱ्हास झालेला आहे त्यांची सद्यःस्थिति पाहून कींवच येईल यांत शंका नाहीं. सारांश, प्रो. मॅक्सम्यूलर हिंदुस्थानांत आले असते तर हल्लींच्या निकृष्ट स्थितीबद्दल सर्व दोष आमच्या माथीं न मारतां त्यांनीं तो बऱ्याच दिवस चालत आलेल्या आमच्या परवशतेचें फल आहे असें मत दिलें असतें, असें म्हणण्यास त्यांच्या ग्रंथाचा पूर्ण आधार आहे. जगांतील राजकीय घडामोडी कशा चालल्या आहेत हें त्यांस अवगत नव्हतें असें नाहीं, तसेंच मनुष्याचा स्वभाव व धर्म यांचेंहि त्यांस पूर्ण ज्ञान होतें. तेव्हां हल्लींची हिंदु लोकांची स्थिति निकृष्ट असल्यास प्राचीन ग्रंथाध्ययनानें हिंदु लोकांबद्दल उत्पन्न झालेली त्यांची आस्था व कळकळ गेली असती असें म्हणणें अगदीं असमंजस होय. सारांश, त्यांच्या

अंतःकरणाचा ओढा जात्याच हिंदू लोकांकडे होता. तशाच प्रकारची हिंदूलोकांबद्दल आस्था व कळकळ येथें राज्य करण्याकरितां येणाऱ्या लोकांनीं ठेविली पाहिजे असें सिव्हिल सर्व्हिसच्या विद्यार्थ्यांस त्यांनीं जीं व्याख्यानें दिलीं त्यांत स्पष्ट म्हटलेलें आहे. हिंदुस्थानाबद्दलची त्यांची कळकळ खऱ्या निष्काम बुद्धीची होती आणि असला सहजस्नेह ‘ मनो हि जन्मांतर संगतिज्ञम् ’ किंवा ‘ व्यतिपजति पदार्थान्नान्तरः कोऽपि हेतुः ’ या न्यायानेंच उत्पन्न होत असतो. त्यांची कळकळ आणि येथें आमच्यावर राज्य करण्याकरितां येणाऱ्या व आमच्या पैशानें श्रीमंत होऊन पुन्हा स्वदेशी जाऊन आम्हांस हलके समजणाऱ्या किंवा शिव्या देणाऱ्या लोकांची वेगडी कळकळ यांच्यामध्यें पुष्कळ अंतर आहे. एक खरें बावन्नकशी सोनें होय, आणि दुसरी नुसती पितळ होय, व यांपैकीं पहिल्यास दुसऱ्याचे मापानें मोजण्याचा किंवा पारखण्याचा प्रयत्न करणें वेडेपणाचें लक्षण होय. असो. हिंदुस्थान देशासंबंधानें खरी निष्काम कळकळ बाळगणारा व ज्या आर्यावर्ताच्या प्राचीन विद्वानांच्या ग्रंथांचें अध्ययन करण्यांत आपलें आयुष्य सुखानें गेलें त्यांतील हल्लींच्या पिढीचें मनापासून कल्याण व्हावें असें इच्छिणारा एक विद्वान व आजन्म विद्याव्यासंगी गृहस्थ जगांतून नाहींसा झाला याबद्दल सर्व हिंदुस्थानवासीयांस वाईट वाटल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. केसरीकारांस तर हा न्याय विशेषेंकरून लागू पडतो हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

अशा तऱ्हेच्या समदृष्टीच्या विद्वानास सर्व देशांतील राजांनीं, राजपुरुषांनीं आणि विद्यापीठांनीं सन्मान देण्यास नेहमीं उत्सुक असावें हें साहजिकच आहे. ‘ विद्वान् सर्वत्र पूज्यते ’ असें आम्हीं वर म्हटलेंच आहे व त्याप्रमाणें ग्रीस, रोम, टर्की, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, स्वीडन, इंग्लंड वगैरे सर्व राष्ट्रांतील लोकांनीं मॅक्सम्यूलरसाहेबांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता व जबर विद्याव्यासंग आणि सात्त्विक स्वभाव ओळखून त्यांस डॉक्टर, नाईट, प्रिव्ही कौन्सिलर इ. अनेक सन्मानाच्या पदव्या दिल्या होत्या व निरनिराळ्या देशांत विद्यावृद्ध्यर्थ किंवा शास्त्रीय शोध करण्याकरितां ज्या मंडळ्या निघाल्या आहेत त्या सर्वांनीं आपलें सदस्यपद यांस प्रेमानें अर्पण केलें होतें. तथापि हा सर्व मान विद्यामूलकच असल्यानें प्रो. मॅक्सम्यूलर या विद्यामूलक उपपदानेंच त्यांचें आम्हीं वर्णन केलें आहे. या सर्व मानांस ते पात्र होते हें त्यांच्या आचरणावरून व लेखावरून आज सर्वत्र जाहिर झालेलें आहे, त्याबद्दल सविस्तर माहिती देत बसल्यास पुष्कळ विस्तार होईल. सबब त्यांच्या सत्कर्माप्रमाणें त्यांस सद्गति मिळो व अशीं विद्वद्रत्नें पुष्कळ निपजोत अशी ईश्वराची प्रार्थना करून आम्ही हा लेख संपवितों.

# ११. कै. न्या. महादेव गोविंद रानडे

[ २२ जानेवारी १९०१ ]

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांच्या मृत्यूची वार्ता ऐकून हिंदुस्थानांतील, महाराष्ट्रांतील व विशेषतः पुण्यांतील लोकांस आपल्या घरचाच एक कार्यकर्ता पुरुष गेल्याइतकें दुःसह दुःख होईल व निदान कांहीं कालपर्यंत तरी या दुःखदायक वातमीनें त्यांचें भान नाहींसें होईल यांत शंका नाहीं. मनुष्याचें जीवित नश्वर आहे वगैरे तत्त्वज्ञानाचे विचार कितीहि डोक्यांत घोळत असले तरी, वैभवानें, बुद्धीनें, कर्तृत्वानें किंवा विद्वत्तेनें ज्या थोर गृहस्थांनीं राष्ट्राचा कारभार उचलून पुढाकार घेतलेला असतो त्यांच्या मृत्यूनें कांहीं कालपर्यंत तरी जग शून्यवत् भासणें अगदीं स्वाभाविक आहे. माधवरावजींचे चरित्र दुसरीकडे सविस्तर दिलें आहे त्यावरून कॉलेजांत असतांना त्यांच्या विद्वत्तेचा लौकिक कसा वाढला होता, पुढें नोकरींत त्यांचा प्रवेश कसा झाला, तेथें त्यांस कोणकोणते मान मिळाले व अखेरीस हायकोर्ट जज्जाच्या जागेपर्यंत त्यांची मजल कशी पोहोंचली वगैरे गोष्टी वाचकांस कळून येतील. अलौकिक वुद्धिमत्ता, दीर्घ व सतत व्यासंग, देशावद्दलची खरी कळकळ, विद्यार्जनाचें स्वाभाविक जडलेलें व्यसन, अचूक कल्पकपणा वगैरे अनेक गुणांनीं माधवरावजींचें चरित्र वोधप्रद असून, महत्त्वाचें झालें आहे. याखेरीज राजदरवारीं व लोकांत त्यांस जो वेळोवेळीं मान मिळत गेला व लोकांची आणि सरकारची जी कामगिरी त्यांनीं वजाविली तीहि कांहीं साधारण नाहीं. दुसऱ्या कोणा पुरुपाच्या हातून एवढीच कामगिरी झाली असती तरी देखील त्यांची थोर पुरुषांत गणना करावी लागली असती. पण रावसाहेवांकरितां (न्यायमूर्ति हें कृत्रिम नांव सोडून देऊन आम्हा पुणेकर लोकांच्या तोंडीं वसलेल्या त्यांच्या नेहमींच्या नांवानेंच येथें उल्लेख करणें आम्हांस अधिक प्रशस्त वाटतें.) आज महाराष्ट्रांतील प्रत्येक समजूतदार मनुष्य जो हळहळत आहे तो ते कांहीं हायकोर्टाचे जज्ज होते, प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष होते, किंवा सामाजिक सुधारणेचे अध्वर्यु होते म्हणून नव्हे. या गोष्टी थोरपणा प्राप्त होण्यास साधनीभूत नाहींत असें नाहीं. पण तेवढ्यानें माधवरावजींच्या थोरपणाची उपपत्ति लागत नाहीं अशी आमची समजूत आहे. कै. कृष्णशास्त्री चिपळुणकरांसारखे वुद्धीनें वृहस्पतितुल्य विद्वान् आमच्यांत झाले नाहींत असें नाहीं. प्रार्थनासमाज किंवा समाजसुधारणा यांचे निःसीम भक्तहि

माधवरावजींच्या बरोबरीचे किंवा कांकणभर जास्तहि असूं शकतील. व हायकोर्टात एक नेटिव्ह जज्ज असावयाचा असा सरकारचा जोंपर्यंत विचार आहे तोंपर्यंत नेटिव्ह हायकोर्ट जज्जाचीहि परंपरा कायम राहील. माधवरावजींकरितां महाराष्ट्र-देश जो आज हळहळत आहे व आपलें अपरिमित नुकसान झालें असें आज जें प्रत्येकास वाटत आहे तें कांहीं असल्या बाह्य गुणांकरितां नव्हे. न्यायमूर्ति हे मार्मिक लेखक, चांगले वक्ते, उत्तम विद्वान्, अलौकिक बुद्धिमान्, जबर विद्याव्यासंगी, असाधारण कल्पक आणि सरळ मनाचे व शांत स्वभावाचे होते हें सर्वांस महशूर आहे. पण कमलाची खरी योग्यता ज्याप्रमाणें पाकळयांच्या आकारांत, रंगांत किंवा मार्दवांत नसतां त्याच्या सुगंधीपणांत असते, तद्वत् माधवरावजींच्या खऱ्या लोकप्रियतेचें व मोठेपणाचें बीज ज्यांस पाहणें आहे त्यानें वरील गुणांखेरीज दुसऱ्या कांहीं गोष्टींचा विचार केला पाहिजे.

हा विचार कोणता हें सांगण्यापूर्वी माधवरावजी पुण्यास पहिल्यानें जेव्हां आले तेव्हां पुणें किंवा महाराष्ट्र याची काय स्थिति होती याचें थोडक्यांत निदर्शन केलें पाहिजे. एक राज्य जाऊन दुसरें राज्य होईपर्यंत मध्यंतरी जो काल जातो तो राष्ट्राच्या अभिवृद्धीस पुष्कळ प्रकारें प्रतिबंधक असतो, हें ऐतिहासिक तत्त्व सुप्रसिद्ध आहे. सन १८२० पासून सन १८७० पर्यंत महारष्ट्र देशाची स्थिति अशाच प्रकारची होती. ज्या पुणें शहरांत नाना फडणीसासारख्या मुत्सद्यांनीं कांहीं वर्षे वास्तव्य करून मराठी राज्याचा गाडा हाकला, व जेथें पेशवाईची अखेर होईपर्यंत मुत्सदी व शूर पुरुषांची परंपरा कायम होती तेथें एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत सर्व बाबतींत सर्वत्र प्रेतकळा आली होती असें म्हटलें असतां त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. ज्या सरदार घराण्यांतील पुरुषांनीं पेशवाईंत मोठमोठीं कामें केलीं होतीं त्यांच्या वंशजास इंग्रजसरकारनें पेन्शन घेऊन स्वस्थ बसण्यास सांगितलें असल्यामुळें नवीन राज्यव्यवस्थेच्या बरेवाईटपणाबद्दल विचार करण्याचें त्यांचें कुलव्रत त्यांनीं सोडून दिलें होतें. देशाचे पुढारीच असे कर्तव्यपराङ्मुख झाल्यावर गरीब रयतेची स्थिति कशी झाली असेल हें सांगावयास नकोच. टोपीवाल्याची राज्य करण्याची शिस्तवार रीत, चोहोंकडे त्यानें घालून दिलेलीं कायद्याचीं बंधनें, जमीनपाहणी, आगगाड्या, तारायंत्रें, शाळा, पोस्ट ऑफीसें, वगैरे राज्यवस्थेच्या अपूर्व थाटानें लोक दिपावून गेल्यासारखे झाले होते. त्यांतून बंडवाल्यांचा पराभव झाल्यानंतर तर इंग्रजी राज्याची अधिकच छाप बसली गेली. जुन्या सरदार घराण्यांतील पुरुषांस राजकारणांत पडण्याची जरूर नसल्यामुळें त्यांच्या अंगचे गुण लुप्तप्राय झाले, व पुणें पाठशाळेंतून तयार झालेले नवीन विद्वान् सरकारी नोकरींत आणि त्यामुळें प्राप्त झालेल्या मानांतच दंग होऊन राहिले. जी पुण्याची

तीच सगळ्या महाराष्ट्राची स्थिति होती. माधवरावजी पुण्यास येण्यापूर्वी येथील विश्रामबाग कॉलेज किंवा पूना कॉलेजमधून बुद्धिवान् व विद्वान् मंडळी तयार होऊन बाहेर पडली नव्हती असें नाहीं, पण वर निर्दिष्ट केलेल्या अनेक कारणांमुळें राष्ट्रामधील चळवळ अगदीं बंद पडून गेली होती व कोणास आपण पुढें काय करावें हें सूचत नसून आपली हल्लींची स्थिति बरी किंवा वाईट हेंहि कळत नव्हतें. ज्या प्रांतांतील लोकांनीं एकदां मराठी राज्याचा गाडा हाकला होता त्यांतील पुढाऱ्यांच्या वंशजांची दोन पिढ्यांत अशी स्थिति होऊन जावी ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट होय. पण माधवरावजींनीं पुण्यांत जेव्हां पाऊल ठेवलें तेव्हां या महाराष्ट्राच्या जुन्या राजधानीची स्थिति वरच्याप्रमाणें झाली होती, यांत बिलकुल संदेह नाहीं. कोणत्याहि प्रकारची चळवळ करण्याविषयीं पराङ्मुखता आणि केवळ स्वहित परायणतेमुळें अथवा पूर्वीच्या अमदानींत ज्या गुणांची चहा होत होती तेच गुण नेटिवांच्या अंगीं तरी असण्याची आवश्यकता न राहिल्यामुळें एक प्रकारचें लोकांच्या पुढाऱ्यांच्या अंगीं आलेलें शैथिल्य हेंच काय तें सर्व देशभर नजरेस येत होतें. लोकांच्या आंगचें तेज अगदींच नाहींसें झालेलें होते असें नाहीं, पण वर लिहिलेल्या कारणांमुळें महाराष्ट्र देश म्हणजे त्यावेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड्या गोळ्यास कोणत्या रीतीनें ऊब दिली असतां तो पुनः सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुनः सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे; व आमच्यामतें हेंच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय. मुंबईच्या कॉलेजांत विद्याभ्यास करीत असतां इंग्रजी विद्येनें माधवरावजींच्या मनावर जे परिणाम झाले असतील अथवा त्यांच्या अंतःकरणांत जो प्रकाश पडला असेल त्याखेरीज त्यांच्या मनाची सार्वजनिक चळवळीकडे प्रवृत्ति होण्यास डॉ. भाऊ दाजी, दादाभाई नौरोजी, वगैरे थोर गृहस्थांचीं प्रत्यक्ष उदाहरणें बरींच कारणीभूत झालीं असावीं. एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, माधवराव, मुंबई सोडून कायमचे पुण्याच्या प्रिन्सिपॉल सदर अमिनच्या जागेवर आले, तेव्हां दादाभाई नौरोजीसारख्या पुढारी गृहस्थांच्या उदाहरणानें व कृतीनें त्यांच्या मनावर बराच परिणाम झाला होता. माधवरावजी मुंबईसच राहाते, तर आपल्या असाधारण बुद्धिसामर्थ्यानें त्यांनीं तेथेंहि उत्तम लौकिक संपादन केला असता, यांत बिलकुल शंका नाहीं. तथापि महाराष्ट्राची राजधानी जें पुणें शहर तेथें येऊन त्यांस जी कामगिरी करावयास सांपडली, त्यामुळें माधवरावजींच्या आंगचे अलौकिक गुण लोकांच्या पूर्णपणें नजरेस आले असें

म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. सरकारी नोकरीचें काम चांगल्या रीतीनें संभाळून देशाच्या उत्कर्षाकरितां कोणकोणत्या दिशेनें काय काय प्रयत्न केले पाहिजेत हें ठरविणें व ते अमलांत आणण्याकरितां सतत परिश्रम करून जागरूकता ठेवणें हें कांहीं सामान्य बुद्धिमान पुरुषाचें काम नव्हे. कित्येकांस नित्य व्यवसायापुढें सार्वजनिक कामें सुचत नाहींत; सुचलीं तर करण्याची उमेद नसते; आणि यदाकदाचित् करण्यास प्रवृत्त झाले तर त्यास मनुष्यबळ किंवा इतर जी सामुग्री लागते ती ज्या उपायांनीं प्राप्त करून घ्यावयाची ते उपाय योजण्यास ते असमर्थ असतात. कित्येक विद्वानांची तर या व्यापक प्रश्नानें बुद्धिच गुंग होऊन जाते, व कित्येक एकदेशीय असून कोणास अमुक एक दिशेनें राष्ट्राची उन्नति होईल असें वाटत असल्यास दुसरीच दिशा पसंत पडते. माधवरावजींच्या आंगचा पाहिला गुण हा होय कीं, सर्व बाजूंनीं राष्ट्राची उन्नति झाली पाहिजे असें त्यांस वाटत होतें. व या सर्व दिशांचें व बाजूंचें सांगोपांग परीक्षण करून त्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वरानें त्यांस प्रगल्भ व व्यापक बुद्धि दिली होती. धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण, राजकीय व्यवस्था वगैरे सर्व बाबतींत आम्ही मागें आहों व या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखेरीज इतर सुधारलेल्या राष्ट्रांची आपणांस बरोबरी करतां यावयाची नाहीं असा त्यांचा पक्का ग्रह झालेला होता. यांपैकीं कांहीं बाबतींत त्यांचीं मतें पुढें ज्या नवीन चळवळी निघाल्या त्यामुळें सर्व लोकांस पसंत पडेनाशीं झालीं होतीं. पण तेवढ्यानें त्यांची योग्यता कमी होते असे नाहीं. घाटांतून एकदां कुशल इंजिनीयरानें आगगाडीची लाइन मारल्यानंतर त्यांत सुधारणा करणारे जरी पुष्कळ लोक निघाले तरी ज्याप्रमाणें मूळ इंजिनीयरच्या कल्पकपणास कमीपणा येत नाहीं, तद्वतच रावसाहेब रानडे यांची स्थिति होय. वर सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारें थंड झालेल्या देशाच्या प्रत्येक गात्रास कसें सजीव करतां येईल याचा रात्रंदिवस विचार करणारा तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत एकच पुरुष झाला. सन १८०० सालीं निवर्तलेल्या नाना फडणिसास मोडकळीस आलेली पेशवाई कशी सुरक्षित ठेवावी याची ज्याप्रमाणें रात्रंदिवस काळजी वाटत असे, तद्वतच एकोणिसाव्या शतकाच्या शेवटलीं पंचवीस तीस वर्षें माधवरावजींनीं राज्यक्रांतीनें कांहीं वेळ स्तब्ध झालेल्या महाराष्ट्रास कसें सजीव करतां येईल या काळजींत घालविलीं. आणि केवळ महाराष्ट्राकरितांच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाबद्दल अशाच तऱ्हेचे विचार त्यांच्यामध्यें सदैव घोळत असत. पाश्चिमात्य शिक्षणाबरोबरच एक प्रकारची सार्वजनिक जबाबदारी आपणावर येऊन पडते ही गोष्ट माधवरावजींनीं पुरी ओळखली होती व आपल्या पंचवीस तीस वर्षांच्या वर्तनक्रमानें लोकांस ती जबाबदारी कशी बजवावी याचें

उत्कृष्ट उदाहरण घालून देऊन त्यांनीं महाराष्ट्राचाच नव्हे तर हिंदुस्थान देशाचा लौकिक राखला असें म्हणणें भाग आहे.

हिंदुस्थानची किंवा महाराष्ट्रदेशाची जागृति आमुक उपायानें होईल आणि अमुक उपायानें होणार नाहीं, हें ठरविण्यास असामान्य व व्यापक बुद्धि लागते हें वर सांगितलेंच आहे. पण अशा प्रकारची व्यापक बुद्धि असूनहि जर दुसरे गुण पुढाऱ्यांच्या अंगीं नसतील, तर त्यांच्या हातून मोठीशीं कामगिरी कधींहि व्हावयाची नाहीं. राष्ट्राची उन्नति होण्यास ज्या हजारों गोष्टी कराव्या लागतात, त्या एकट्याच्या हातून होत नाहींत, त्यांस योग्य माणसांची निवड करून त्याचें साह्य घ्यावें लागते. किंबहुना अशा प्रकारचीं माणसें तयार करावीं लागतात असें म्हटलें तरी चालेल. माणसें तयार करण्याचें हें काम किती कठीण आहे हें अनुभवावांचून समजणें अशक्य आहे. मनुष्याची पारख, त्यांच्या हातून चुक्या घडल्या असतां त्यांस शांतपणें संभाळून घेऊन पुन्हां उत्तेजन देण्यास अवश्य लागणारे उत्साह, शांति वगैरे गुण पुढाऱ्यांचे आंगीं जरूर असावे लागतात. माधवरावजींच्या आंगीं हे गुण पूर्णपणें वसत होते व म्हणूनच त्यांच्या हातून इतकीं कामें येथें सिद्धीस गेलीं. सार्वजनिक सभा, वक्तृत्वसभा, लवादकोर्ट प्रार्थनासमाज, फीमेलहायस्कूल, औद्योगिक चळवळ वगैरे ज्या अनेक संस्था पुणें शहरांत झाल्या किंवा आहेत ह्या सर्वांशीं माधवरावजींचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें संबंध होता असें आढळून येईल. या सर्व चळवळी सुरू ठेवण्याबद्दल लोकमत जागृत करून कायम ठेवणें, निरनिराळ्या संस्थांकरितां निरनिराळीं मनुष्यें पाहून त्यांच्या हातून तीं तीं कामें करून घेणें, स्वदेशांतल्या किंवा परदेशांतल्या सर्व प्रकारच्या हालचालींवर नजर ठेवून त्याचा देशाच्या उत्कर्षाशीं कसा संबंध पोहोचतो यांचे अहोरात्र मनन करणें हें माधवरावजींचें व्यसनच होऊन राहिलें होतें. त्यांच्या घरीं केव्हांहि जा, तेथें कांहीं नाहीं कांहीं तरी सार्वजनिक विषयाची चर्चा चालू असावयाचीच. बारा आणि बारा चोवीस तास अशा रीतीनें सार्वजनिक कामांत एकसारखें मन घालून तीं सुयंत्रित रीतीनें चालविण्याइतकें बुद्धिसामर्थ्यच आधीं फार थोड्या लोकांत असतें, आणि ज्या थोड्या लोकांच्या अंगीं अशा प्रकारचें सामर्थ्य असतें त्यांस आलस्यानें, स्वहितपरतेनें किंवा उत्साहभंगानें पछाडलें असल्यामुळें युनिव्हर्सिटींतून दरसाल शेंकडों ग्रॅज्युएट बाहेर पडताहेत, तरी रात्रंदिवस देशहितार्थ तनमनधन अर्पणारा '**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः**" या न्यायानें एकदांच माधवरावजीसारखा पुरुष निर्माण होतो. असा पुरुष आपल्यामधून गेला असतां एकाएकीं सूर्यास्त झाल्याप्रमाणें सर्व लोक दिङ्मूढ झाले यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

माधवरावजीनीं जीं हीं सर्व कामें केलीं तीं त्यांस सुखानें करतां आलीं अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. मुंबईपेक्षां पुणें किंवा महाराष्ट्रदेश यांतील अधिक एकरूप असल्यामुळें सार्वजनिक चळवळीचें माधवरावजींनीं मुंबईहून आणलेलें बीं येथें लवकरच उदयास आलें हें गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासावरून कोणासहि सहज समजण्यासारखें आहे. हें बीं रुजत घालून त्यास पाणि घालणें व पुढें तज्जन्य वृक्षाचें पालन पोषण करणें हें सर्व काम माधवरावजीच करीत होते. त्यांच्या हाताखालीं कै. सार्वजनिक काका, कै. सीतारामपंत चिपळोणकर, रा. रा. शिवराम हरी साठे वगैरे वरीच मंडळी असून पुढें पुढें कै. रा. ब. नूलकर, कै. कुंटे यांच्या सारख्यांचेंहि साहाय्य त्यांस मिळालें होतें. पण या सर्व गृहस्थांची व त्यांनीं चालविलेल्या कामाची मदार काय ती माधवरावजींवरच असे. ही गोष्ट लवकरच सरकारच्या नजरेस आली. मल्हारराव गायकवाड यांस पदच्युत केल्यानंतर त्यांची कमिशनमार्फत जी चौकशी झाली तेव्हां पुणें शहरांत झालेली चळवळ आणि सन १८७९ सालीं बुधवारचा वाडा जळाला असतां गांवांत झालेली धामधूम ज्यांस आठवत असेल ते रावसाहेबांनीं अंगीकारलेला क्रम विनधोक्याचा होता असें कधींहि म्हणणार नाहींत. महाराष्ट्रांतील लोकांस सार्वजनिक बाबतींत चळवळ करण्याचें जर कोणी शिक्षण देत असेल तर ते माधवरावजीच होत ही गोष्ट सरकारास कळून चुकली होती, व माधवरावजींची पुण्याहून नाशकास व नाशिकाहून धुळयास जी उचलबांगडी झाली ती कांहीं केवळ एक जागीं मनुष्य पुष्कळ वेळ ठेवणें योग्य नाहीं एवढयाचकरितां नव्हे, हें सर्वांस माहीत आहेच. फार लांब कशाला, माधवरावजींनी स्थापिलेली सार्वजनिक सभा ही राजद्रोही आहे असा सर रिचर्ड टेंपलच्या कारकीर्दीत बूट निघाला होता; पण या सर्व अडचणींतून आणि संकटांतून माधवरावजींनीं हातांत धरलेलीं सर्व कार्यें तडीस नेलीं. यांच्यापेक्षां कमी उत्साहाचा पुरुष प्रसंगीं डगमगून गेला असता. पण रावसाहेबांच्या बुद्धीचें व्यापकत्व जितकें अलौकिक होतें तितकाच शांति हा गुण अलौकिक व असामान्य असल्यामुळें त्यांच्या दीर्घोद्योगास अखेरीस यश येऊन मुंबई इलाख्याच्या मध्यभागांत एकप्रकारची विशेष जागृति प्राप्त झाली. माधवरावजींसारखे पुरुष जेथें निपजले नाहींत तेथल्या आणि महाराष्ट्राच्या स्थितीची तुलना केली असतां आमच्या म्हणण्याची सत्यता कळून येईल. सारांश, महाराष्ट्रांत जर कांहीं आजमित्तीस जोम आढळून येत असला, त्यांतील वक्ते व लेखक जर निर्भयपणें सार्वजनिक गोष्टींची चर्चा करीत असले तर ते माधवरावजींच्या २५ वर्षांच्या दीर्घोद्योगाचें फल होय असें म्हणण्यास कोणतीहि हरकत नाहीं.

अशा तऱ्हेचा पुरुष देशांत निर्माण होणें हें देशाचें एक भाग्यच आहे. विद्वत्ता, मुत्सद्दीपणा, काम करण्याची हौस सार्वजनिक हित कोणत्या उपायांनी करतां यईल याबद्दल एकसारखा निदिध्यास, आणि लोकांनीं नेहमीं आपल्या उन्नतीच्या चळवळींत व्यग्र असावें अशी अनिवार इच्छा, इतके गुण आंगीं वसत असलेले थोर पुरुष राष्ट्रांत वांरवार निपजत नसतात. महाराष्ट्रदेशांत अठराव्या शतकांत नाना फडणीस अशा प्रकारचे मुत्सद्दी होऊन गेले खरे, पण विद्वत्तेचें मान लक्षांत आणतां त्यांची आणि माधवरावजींची तुलना करण्यापेक्षां महाराष्ट्राच्या किंवा दक्षिणेच्या प्राचीन इतिहासांत प्रसिद्धीस आलेले हेमाद्री किंवा माधवाचार्य यांची उपमा आमच्या मते माधवरावजींस अधिक साजण्यासारखी आहे. माधवाचार्यांची बुद्धि चोहोकडे अकुंठित असल्यामुळें त्यांस '**सर्वज्ञः स हि माधवः**' असें म्हणत असत. माधवरावजींचें बुद्धिवैभवहि अशाच प्रकारचें विस्तृत व व्यापक होतें; व या इंग्रजी राज्यांत जर हायकोर्टाच्या जज्जांच्या कामापलीकडे त्यांच्या विशालबुद्धीचा उपयोग झाला नाहीं तर तो दोष माधवरावजींचा नव्हे, हल्लीच्या राज्यपद्धतीचा आहे हें लक्षांत ठेवले पाहिजे. माधवरावजी जर आणखी कांहीं दिवस जगते तर त्यांनीं सुरू केलेल्या चळवळी उघड रीतीनें हातीं घेऊन दादाभाई किंवा ह्यूम यांजप्रमाणें त्या शेवटास नेण्याचा उद्योग निकरानें होण्याचा संभव होता. त्यांच्या हातून आम्हां लोकांचें अशा प्रकारें कल्याण व्हावें असा ईश्वरी संकेत नव्हता असेंच म्हटलें पाहिजे. एरव्हीं त्यास ६० वें वर्ष लागलें म्हणून त्यांची ज्युबिली करण्या ऐवजीं त्यांचा मृत्युलेख लिहिण्याचा दुःखकारक प्रसंग आमच्यावर आला आहे तो आला नसता.

माधवरावजींचा महाराष्ट्राकडे आणि महाराष्ट्रीयांचा माधवरावजींकडे विशेष ओढा कां होता याचा यावरून विशेष खुलासा होईल. कायदेपंडीत, लेखक, वगैरे बाबतींत माधवरावजींची योग्यता इतर कोणत्याहि राष्ट्रीय पुढाऱ्यापेक्षां कमी नव्हती. किंबहुना सर्व विषय अवगत करून घेण्याची हौस आणि कोणताहि विषय हातीं घेतला असतां त्यासंबंधीं कांहीं तरी नवी शक्कल काढून त्यांस मनोहर रूप देण्याची त्यांची अपूर्व हातोटी दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रीय पुढाऱ्यांत सांपडेल असें आम्हांस वाटत नाहीं. पण याहीपेक्षां त्यांच्या आंगचा लोकोत्तर गुण म्हटला म्हणजे आपल्या राष्ट्राचा अभ्युदय केव्हां ना केव्हां तरी खास झाला पाहिजे; किंबहुना ही गोष्ट परमेश्वरानेंच संकल्पित आहे अशी जी त्यांच्या ठायीं उमेद होती ती होय. भावी सुपरिणामाबद्दल अशा तऱ्हेची निःसंशय मनोवृत्ति फारच थोडया पुढाऱ्यांचे ठायीं आढळून येते. सरकारचा ताबेदारपणा, योग्य माणसांची कमतरता, समाजामध्यें रूढ असलेल्या समजुती इ. अनेक कारणांनीं माधव-

रावजींस आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी करतां आल्या नाहींत. तथापि दूरवर नजर देऊन धिमेपणानें अंगीकृत कार्यें त्यांनीं अव्याहत रीतीनें चालू ठेविलीं होतीं. प्राचीन व अर्वाचीन सुधारणेच्या झगडयांत मनुष्यास पदोपदीं कसें बुचकळल्यासारखें होतें याचें एके प्रसंगीं त्यांनीं मोठया मार्मिक रीतीनें वर्णन केलें आहे. या सर्व अडचणी सोसून बिनतक्रार देशोन्नतीच्या कार्याकरितां उत्साहानें भगवा झेंडा हातीं घेऊन सदैव पुढें राहणें हें कांहीं लहानसहान मुत्सद्दीपणाचें काम नव्हे. पण माधवरावजींची लोकसेवा एवढयावरच थांबली नाहीं. त्यांनीं आपल्या हयातींत, आपल्या जन्मभूमींतील लोकांस शहाणे करून सोडण्याचा क्रम अबाधित चालू ठेविला होता. राष्ट्रामध्यें लिहणारे व बोलणारे पुढारी जरी पुष्कळ असले तरी अशा रीतीनें समाजामध्यें जागृति उत्पन्न करण्याचें गुरुत्व ज्यांकडे देतां येईल असे लोक फारच विरळा आहेत. माधवरावजी हे अशा विभूतींपैकींच एक होते व म्हणूनच त्यांजकरितां आज सर्व लोक आम्हां सर्वांचा एक अप्रतिम हितकर्ता गेला म्हणून हळहळत आहेत. अशा तऱ्हेचा पुरुष इंग्रजी राज्य झाल्यापासून तरी महाराष्ट्रांत निघाला नाहीं व पुढेंहि माधवरावजींची जागा लवकर भरून येईल असें वाटत नाहीं.

अशा तऱ्हेचा पुरुष काळानें आमच्यामधून ओढून न्यावा हें आमचें मोठें दुर्दैव होय. माधवरावजींच्या कुटुंबाची त्यांच्या मृत्यूनें जी हानि झाली आहे ती तर खरोखरीच दुष्परिहार्य होय. त्यांच्यावर हा दुःखाचा डोंगर कोसळला आहे खरा व आम्हीं कितीहि शांतवन केलें तरी तें दुःख कमी होणें कठीण आहे. तथापि महाराष्ट्रांतील प्रत्येकजण त्यांच्या दुःखाचा वाटेकरी आहे या गोष्टीकडे लक्ष देऊन त्या आपलें मन विवेकानें आवरतील, आणि महाराष्ट्रांतील लोक ज्या महापुरुषाच्या मृत्यूकरितां आज सर्वजण दुःख करीत आहों त्यांचेंच उदाहरण आपणांपुढें ठेवून यथाशक्ति पण खऱ्या कळकळीनें त्यांनीं घालून दिलेला कित्ता गिरवून त्यांच्या ऋणांतून अंशतः तरी मुक्त होतील अशी आम्हांस आशा आहे. माधवरावजी तर गेलेच पण त्यांनीं घालून दिलेलें उदाहरण डोळयांपुढें ठेवून सर्वजण जर यथाशक्ति देशकार्याकरितां झटण्याचा प्रयत्न करतील तर आपल्या सर्वांस जी गोष्ट हवी आहे ती प्राप्त झाल्याखेरीज कधींहि राहणार नाहीं. माधवरावजींच्या गुणाबद्दल जितकें जास्त लिहावें तितकें थोडेंच आहे; करितां आजचा लेख आम्हांस जरी अपुरा वाटत आहे, तरी माधवरावजींस त्यांच्या सत्कर्मांप्रमाणें गति मिळो एवढीं अखेरीस प्रार्थना करून हा दुखवटयाचा लेख येथेंच संपवितो.

## १२. श्रीस्वामी विवेकानंद हे समाधिस्थ झाले !

[ ८ जुलै १९०२ ]

श्रीमत् स्वामी विवेकानंद हे कलकत्त्यास गेल्या शुक्रवारी आपल्या बेलूर मठांत समाधिस्त झाल्याची वातमी ऐकून हिंदूधर्माविपयीं कळकळ वाळगणाऱ्या हजारों हिंदूस वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं. श्रीमत् विवेकानंद स्वामी यांचें नांव ज्यास माहीत नाहीं असा हिंदू क्वचितच सांपडेल. एकोणीसावें शतक म्हणजे आधिभौतिक शास्त्रांच्या उत्कर्षाचें उच्च स्थान मानलें आहे. अशा प्रकारच्या शतकाच्या उत्तरार्धांत हजारों वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत प्रचलित असलेले आध्यात्मिक शास्त्र पश्चिमेकडील राष्ट्रांतील विद्वानांस समजून सांगून त्यांच्याकडून सदर शास्त्राच्या अपूर्वतेवद्दल मान्यता मिळविणें आणि ज्या राष्ट्रांत अशा प्रकारचें शास्त्र निर्माण झालें, त्यांतील लोकांवद्दल सहानुभूति उत्पन्न करणें, हें कांहीं लहानसहान काम नव्हे. पाश्चिमात्य आधिभौतिक शास्त्राचा ओघ इंग्रजी विद्येवरोबर इतक्या झपाट्यानें होत होता कीं, तो परतून लावण्यास असामान्य धैर्याचा व बुद्धीचा पुरुष उत्पन्न होणें जरूर होतें. थिऑसॉफिकल सोसायटीनें हें काम स्वामी विवेकानंदांच्या पूर्वीं सुरू केलें होतें, पण त्यांच्या उद्योगास अस्सल हिंदुत्वाचें स्वरूप स्वामी विवेकानंद यांनींच प्रथम आणिलें, ही गोष्ट निर्विवाद आहे. अलीकडे आमच्या देशांतील शाळांतून जें शिक्षण मिळतें तें निव्वळ तार्कीक असल्यामुळें धर्मविचारांची विद्यार्थ्यांच्या मनांत जागृति न होतां उलट स्वधर्माचीच नव्हे तर, धर्ममात्राचीहि टवाळी करण्यास ते प्रवृत्त होतात. स्वामी विवेकानंद यांची लहानपणची वृत्ति अशाच प्रकारची होती. हे मूळचे वंगालचे राहणारे असून हल्लीं यांचें वय सुमारें ३५–४० वर्षांचें असावें. म्हणजे त्यास जें शिक्षण मिळालें तें सुमारें २० वर्षांच्या पूर्वीचें होतें व एवढ्यावरून तें कसें होत यांची वाचकांस सहज कल्पना करतां येईल. कारण, कलकत्याच्या इंग्रजी शाळा आणि मुंबई–पुण्याच्या इंग्रजी शाळा बहुतेक सारख्याच प्रकारच्या आहेत, असें म्हटलें तरी चालेल. स्वामींचें पूर्वाश्रमीचें नांव नरेंद्र सेन असून हे जातीनें क्षत्रिय होते, व अशी गोष्ट सांगतात कीं, लहानपणींच एका जोशानें यांची पत्रिका पाहून "**हा मुलगा कधीं गृहस्थाश्रम घेणार नाहीं,**" असें त्यांच्या आईस कळविलें होतें. असो; आपल्या वयाच्या **१८–१९** व्या वर्षी हे कलकत्ता युनिव्हर्सिटीची बी. ए. ची परीक्षा पास झाले. व तेव्हांपासूनच त्यांस तत्त्वज्ञानाचा नाद होता. पहिल्या

पहिल्यानें यांची प्रवृत्ति नास्तिक मताकडे असे व पुष्कळ धर्मगुरुंशीं वादविवाद करतांना "**तुम्ही आपला देव तरी प्रत्यक्ष पाहिला आहे काय**"? असा प्रश्न विचारून हे त्यास कुंठीत करीत असत. पण श्रीमत् रामकृष्ण परमहंस यांची गाठ पडल्या दिवसापासून यांच्या बुद्धींत फरक झाला. आणि ते सदर स्वामीचे अखेर पट्टशिष्य होऊन संन्यासी बनले. श्रीमत् रामकृष्ण परमहंस यांचें चरित्र सुप्रसिद्ध असून इंग्रजींत प्रो. मॅक्समुलर यांनीं ते लिहून काढलें आहे. श्रीमत् रामकृष्ण हे १८८६ सालीं समाधिस्थ झाले. तेव्हां त्यांचे पश्चात् त्यांच्या अद्वैत मतांचा प्रसार करण्याचें काम त्यांच्या शिष्यशाखेनें पत्करलें, व त्यांत विवेकानंदहि सामील होऊन त्यांनीं अमेरिकेंतील लोकांसहि अद्वैत सिद्धांताची ओळख करून दिली. स्वामी विवेकानंद यांनीं प्रथमतः कांहीं वर्षें कोणास न कळत म्हणजे आपलें स्वरूप प्रगट न करितां हिमालय पर्वतांत सिद्ध लोकांस भेटण्यांस व हिंदुस्थानांतून प्रवास करण्यांस घालविलीं. या अज्ञात प्रवासांतच ते पुणें मुक्कामीं सन १८९१। ९२ सालीं आलें होतें; व येथून महाबळेश्वरांस जाऊन तेथून पुढें बेळगांव धारवाडहून मद्रास रामेश्वराकडे गेले. यांस अमेरिकेंस पाठविण्याची कल्पना प्रथमतः मद्रासेंत निघून तेथील लोकांनीं त्यांस साह्य केलें; व सन १८९३ सालीं शिकागो प्रदर्शनाचे वेळीं तेथें जी मोठी राष्ट्रीय धर्मपरिषद झाली त्यांत हिंदुधर्माच्या अद्वैत ज्ञानाची पताका अग्रस्थानीं नेऊन लावण्याचें सर्व श्रेय स्वामी विवेकानंद यांजकडे आहे. धर्मपरिषद संपल्यानंतर अमेरिकेंत एकदोन वर्षें राहून तेथें त्यांनीं अद्वैत मताचा प्रसार केला व त्याचे मठ स्थापन करून तेथें शिष्यसंप्रदायहि सुरु केला. अमेरिका खंड म्हणजे आज सर्व शास्त्रांचें माहेरघर होय. अशा देशांत ख्रिस्ती धर्मगुरुच्या समक्ष अद्वैत सिद्धांताचे प्रतिपादन करून अद्वैत मत प्रचलित करणें हें काम सामान्य पुरुषाच्या हातून निभावणें शक्य नाहीं. स्वामी विवेकानंद यांचें असें मत आहे कीं, हिंदुस्थानांतील हिंदु लोकांस हिंदुत्व किंवा हिंदूधर्म हेंच काय तें सामान्य बंधन आहे व या धर्मांतील तत्त्वें इतकीं श्रेष्ठ आहेत कीं, हिंदुस्थानांतच काय पण दुसऱ्या कोणत्याहि धर्माच्या लोकांत किंवा देशांत १९ व्या शतकाच्या अखेरीसहि त्याचा प्रसार करणें शक्य आहे; इतकेंच नव्हे तर असा प्रसार करणें हिंदुलोकांचें कर्तव्य होय. हिंदु लोकांजवळ जर आतां कांहीं अमोल वस्तू राहिली असली तर तो त्यांचा धर्म होय. तो जर ते सोडतील तर ते आपणांस जगाच्या निंदेस व उपहास्यतेस पात्र करून घेतील. हिंदुधर्म काय आहे तो पुरा ओळखा, त्याचीं तत्त्वें काय आहेत याचा अभ्यास करा, तीं शास्त्रांच्या कसोटीस लावा आणि जगभर त्याचा प्रसार करून आपले व आपल्या देशाचें नांव चिरस्मरणीय करा, असे उद्गार

त्यांच्या मुखांतून अनेक वेळां निघाले आहेत. भक्ति हें धर्माचें मुख्य लक्षण खरें, पण अद्वैत ज्ञानाची त्यास जोड असल्या खेरीज धर्माचें स्वरूप लंगडे पडतें, असें त्यांचें म्हणणें होते. परधर्मांविषयीं ते जेव्हां बोलत तेव्हां याच तत्त्वावर कटाक्ष ठेऊन बोलत असत. ख्रिस्ती लोकांस तुम्हीं ख्रिस्ती धर्म सोडून द्या, असा त्यांनीं कधींहि उपदेश केला नाहीं. तुम्ही ख्रिस्तास भजा, परंतु तुमच्या धर्मांत तत्त्वज्ञान नसल्यामुळें आमच्या हिंदूधर्मातील अद्वैत सिद्धांताची त्यास जोड देणें अवश्य आहे. किंबहुना तुमच्या धर्मगुरूंनींहि तींच तत्त्वें स्पष्टपणें नाहीं तरी अस्पष्टपणें लक्षांत ठेवून आपापल्या धर्माची रचना केली आहे तसेंच ते सांगत असत. सारांश, ज्ञानयोग, कर्मयोग किंवा राजयोग हे खऱ्या धर्माचे सार्वत्रिक मार्ग असल्यामुळें कोणत्याहि धर्मांशीं त्यांचा विरोध नाहीं, इतकेंच नव्हे तर, सर्वांनीं ते घेण्यासारखें असून हें ज्ञान पिढीजाद ज्यांस प्राप्त झालें आहे त्यांनीं याचा प्रसार करणें हें त्यांचें कर्तव्य आहे, असा ते उपदेश करीत असत. हिंदुस्थानांतील लोकांची धर्माबद्दल हयगय पाहून त्यांचें अंतःकरण तिळतिळ तुटत असे, व धर्माची उन्नती झाल्याखेरीज राष्ट्र वर यावयाचें नाहीं, असा त्यांच्या मनाचा ग्रह झालेला होता; व त्याकरितां त्यांची जिवापाड मेहनत चालू असे. अमेरिकेंत शिष्यपरंपरा स्थापून व अद्वैत मताचा प्रसार करून ते इकडे आल्यावर प्रथमतः सिलोनमधून मद्रासेंत आले; व तेथून कलकत्त्यांत व हिमालयांत त्यांचा अलमोरा येथें मठ आहे तेथें गेले. या सफरींत त्यांचा सर्वत्र जयजयकार होऊन त्यांनीं दिलेलीं व्याख्यानेंहि कळकळीची आहेत. अमेरिकन लोकांच्या सहाय्यानेंच त्यांनीं कलकत्त्यास हुगळीच्या कांठीं बेलूरमठ स्थापन करून तेथें आपल्या मताप्रमाणें धर्मोपदेशक तयार करण्याची सोय केली आहे, व मठास जोडून रामकृष्ण परमहंस यांचें समाधी मंदीर बांधले आहे. अलमोरा येथें '**प्रबुद्धभारत**' पत्र निघत असे तें त्यांच्याच मित्रमंडळीकडून निघत असे, व ९६-९७ सालच्या दुष्काळांत राजपुतान्यांत रामकृष्ण परमहंस मिशनची मंडळी जाऊन ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या हातांत बरीच अनाथ मंडळी पडण्याचें यांनीं बंद केलें. धर्मोपदेशकांचा जितका भरणा असावा तितका शिष्यसंप्रदाय वाढला नसल्यामुळें हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं आपले उपदेशक ठेवावे, अशी त्यांची जी इच्छा होती, ती सफल झाली नाहीं. तथापि कलकत्ता, अलमोरा, अजमीर, मद्रास वगैरे ठिकाणीं त्यांचे उपदेशक असत. व अमेरिकेंतहि एक दोन शिष्य राहत असत. १९०० सालीं जें पॅरिस येथें प्रदर्शन झालें त्यावेळीं सहा महिन्यांत फ्रेंच भाषेचा अभ्यास करून स्वामी विवेकानंद यांनीं वेदांत विषायावर तेथें व्याख्यान दिलें होतें व त्याबद्दल त्यांची तिकडच्या पत्रांतून पुष्कळ प्रशंसा झाली होती. हल्लीं वर्षभर हें

छातीच्या दुखण्यानें अस्वस्थ होते, त्यामुळें जपानांतून यांस निमंत्रण आलें असतांहि तिकडे जाण्यास त्यांस फावलें नाहीं. गेल्या शुक्रवारीं नित्याप्रमाणें हे संध्याकाळीं फिरून आले व अस्वस्थता वाटल्यावरून शिष्यांस हांक मारून आपण आतां हा लोक सोडून जाणार, असें सांगून त्रिवार दीर्घोश्वास करून समाधिस्थ झाले, असें आम्हांस आलेल्या तारेवरून समजतें. भर तारुण्यांत स्वामी समाधिस्थ होण्याची वेळ यावी हें आमच्या देशाचें मोठें दुर्दैव होय. श्रीरामकृष्ण परमहंस हे आमच्या-इकडील अक्कलकोटच्या स्वामीप्रमाणें पुरे ब्रह्मनिष्ठ होते खरे; पण सर्व जगांतील देशांत अद्वैत मतांची पताका फडकत लावून हिंदुधर्माची अर्थात् हिंदुलोकांची महती सर्व जगभर करून धर्म संस्थापना करण्याचें काम श्री. विवेकानंदांनींच हातीं घेतलें होतें व आपल्या विद्वत्तेनें, वक्तृत्वानें उत्साहानें, व कळकळीनें त्या कामाचा पाया त्यांनीं भक्कम घातला होता. या पायावर इमारत उभी होऊन तिच्यावरील कळस स्वामी विवेकानंद यांच्याच हस्तानें बसविण्यांत येईल अशी सर्वांस आशा व उमेद होती. पण ती स्वामी समाधिस्थ झाल्यानें आतां नाहींशीं होण्याचा प्रसंग आला आहे. हिंदुधर्माचें उज्वल स्वरूप कोणतें, अशा प्रकारचा धर्म आमच्या देशांत झाला हेंच आमचें अमूल्य धन व बळ आणि त्याचा सर्व जगभर प्रसार करणें हेंच आमचें खरें कर्तव्य असें बोलणारे नव्हे तर जगास सिद्ध करून दाखविणारे सत्पुरुष हजारबाराशें वर्षांपूर्वीं एक शंकराचार्य होऊन गेले व १९ व्या शतकाच्या अखेरीस दुसरे स्वामी विवेकानंद झाले. परंतु स्वामी विवेकानंदांचें काम अद्याप परिपूर्ण व्हावयाचें आहे. व ते त्यांच्या शिष्यवर्गापैकीं अगर दुसऱ्या कोणीतरी हातीं घेऊन परिपूर्ण करावें, अशी आमची त्यांस विनंति आहे. आमच्या-जवळ जर कांहीं महत्त्वाचा ठेवा असेल तर तो आमचा धर्मच होय. आमचें वैभव, आमचें स्वातंत्र्य सर्व कांहीं लुप्त झालें आहे. परंतु आमचा धर्म आमचेपाशीं शिल्लक आहे; व तो असा नव्हे तर सुधारलेल्या राष्ट्रांत उघड रीतीनें कसोटीस लावला असतांहि त्याचा कस शुद्ध व उत्कृष्ट येतो, हें आतां अनुभवास आलेलें आहे. अशा स्थितींत जर आम्हीं त्यास सोडून देऊं तर इसावनितींतील कोंबड्याप्रमाणें आम्हीं रत्नपारखी आहों अशी आमची सर्व जगभर नालस्ती होईल, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हल्लींचा कालच असा आहे कीं, आपल्याजवळ कोणतीहि उत्तम वस्तू असली तर जगाच्या चढाओढीच्या बाजारांत ती मांडून तिची योग्यता स्थापन केली पाहिजे. स्वामी विवेकानंद यांनीं हें काम केलें होतें. आणि आमच्या सुदैवानें आणखी कांहीं दिवस ते वांचते तर राष्ट्राला राष्ट्रीयत्व येण्यास जें कांहीं तेज लागतें तें थोडेंबहुत तरी त्यांच्यापासून आम्हांस प्राप्त झालें असतें, असो; त्यांच्या कर्माप्रमाणें त्यांस उत्तम गती प्राप्त होईल यांत शंकाच

नाहीं; पण त्यांनीं जें आम्हावर उपकार करून ठेवले आहेत त्याची उतराई होण्यास त्यांनीं घालून दिलेलाच धडा आम्हांस गिरविला पाहिजे, हें उघड आहे. करितां त्यांच्या चरित्रावरून अशा तऱ्हेची उत्तरोत्तर लोकांची प्रवृत्ति होवो आणि सर्व धर्माचे अद्वैत मतांत एकीकरण करण्याचें श्रेय आमच्या ऋषींच्या अर्वाचीन वंशजास प्राप्त होवो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून स्वामी विवेकानंद यांचें हें स्वल्प चरित्र येथें समाप्त करतों. अमेरिकेंतून परत आल्यावर पुण्यास येण्याबद्दल स्वामींना दोन तीन आमंत्रणें केलीं होतीं. पण एकदां स्वामी आजारी असल्यामुळें व दुसऱ्या वेळीं कांहीं अन्य कारणांमुळें स्वामींचीं व्याख्यानें प्रत्यक्ष ऐकण्याचा योग पुणेकरांस आला नाहीं हें मोठें दुर्दैव होय.

# १३. कै. गोपाळराव गोखले

[ २३ फेब्रुवारी १९१५ ]

मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरं।

ना. गोपाळ कृष्ण गोखले यांना गेल्या शुक्रवारीं रात्रीं सुमारें ११ वाजण्याचे सुमारास देवाज्ञा झाल्याचें वर्तमान ऐकून विस्मय, खेद, निराशा आणि इहलोकीच्या वस्तीचा अशाश्वतपणा यांचा प्रत्यय येऊन, कोणाचेंहि मन उद्विग्न झाल्याखेरीज राहणार नाहीं. नामदार गोखले सुमारें तीन महिन्यांपूर्वी विलायतेहून येथें परत आले, तेव्हां त्यांची प्रकृति फारशी वरी नव्हती हें लोकांस कळलें होतें. पण प्रकृतीचें हें अस्वास्थ्य कोणत्या प्रकारचें होतें, याची तेव्हां लोकांस माहिती नव्हती व करून देणेंहि इष्ट नव्हतें. आज सुमारें पंधरा वर्षांच्या मधुमेहानें यांचें शरीर, दिसण्यांस चांगलें दिसत होतें तरी, आंतून बरेंच पोखरलेलें होतें; आणि विशेषतः या रोगाचा त्यांच्या काळजावर जो परिणाम झाला होता, तो तर भयंकरच होता. केव्हां केव्हां मधून मधून त्यांच्या नाडीचे ठोके बंद पडत, किंवा रात्रीं निजलें असतां एकाएकी श्वास कोंडून घाबरून जाण्यापर्यंतहि मजल येत असे! रोग कोणताहि असला तरी हीं लक्षणें कांहीं वरीं नव्हत, हें कोणासहि सांगावयास नकोच. किंबहुना विलायतेंतील डॉक्टरांनीं हीं दुश्चिन्हेंच ठरवून यांतच गोपाळरावजींचा अंत होईल असें भाकीतहि केलें होतें. पण पथ्य-पाण्याच्या बंदोबस्तानें औषधसेवनानें आणि 'माझें अमुक काम पुरें व्हावयाचें आहे व त्यासाठीं मला कांहीं दिवस तरीं जगलेंच पाहिजे' अशी उद्योगी पुरुषाची स्वसामर्थ्यावर जीं एक प्रकारची दृढ निष्ठा असते तीमुळें गोपाळरावजींस इतके दिवस तरी कंठतां आले, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें वय मरणसमयीं अवघें ४९ वर्षांचें होतें; व जगाच्या राहाटीप्रमाणें पाहिलें तर अद्याप त्यांचे हातून बरींच मोठीं कृत्यें घडण्यासारखीं होतीं, पण '**संसारांतील उत्तम उत्तम फुलें वेंचण्यांत गुंतलेल्यासच मृत्यु घेऊन जातो!**' असें धम्मपदांत म्हटलें आहे, तेंच या ठिकाणीं अक्षरशः खरें झालें. गोपाळरावजींच्या मनांतून पब्लिक सर्व्हिस कमिशनचा रिपोर्ट पुरा करावयाचा होता, आपण काढलेल्या सर्वंटस् ऑफ इंडिया संस्थेची कांहीं स्थिरस्थावर करावयाची होती, वरिष्ठ कायदे कौन्सिलच्या येत्या बैठकीस हजर राहून तेथील आपलें काम करावयाचें होतें,—

इत्यादी एक ना दोन अनेक प्रकारच्या गोष्टी त्यांच्या मनांत घोळत होत्या; व त्यांस अशी उमेद होती कीं, निदान पब्लिक सर्व्हिस कमिशनचा रिपोर्ट तयार होऊन प्रसिद्ध होईपर्यंत तरी आपल्या आयुष्याची दोरी कायम राहील. पण हे सर्व विचार जागच्या जागींच कायम राहून व्हाइसरायापेक्षांहि श्रेष्ठ पुरुषाचे आमंत्रण आल्यामुळें आपले सर्व व्यवसाय बाजूस ठेवून या लोकींची यात्रा त्यांस संपवावी लागली ! असो; हे खेदकारक प्रसंग आज ना उद्यां सर्वांवरच यावयाचे आहेत. गोपाळराव ज्या संघांत वाढले, त्यांपैकीं आतां किती शिल्लक आहेत हे मोजूं गेलें असतां गोपाळरावांच्या मृत्यूबद्दल खेद कांहीं तरी कमी होऊन, त्यांच्या हातून जी कामागिरी झाली ती घडण्यापुरतें तरी त्यांस परमेश्वरानें आयुष्य दिलें, यांतच समाधान मानून घ्यावे लागेल. आपण कांहीं तरी करणें ही आपल्या हातांतील गोष्ट आहे खरी; पण आपण केलेलें काम सिद्धीस नेणें, आपण लावलेलें रोप आपल्या डोळ्यांदेखत मोठें झाड होऊन त्यास पुष्पें व फळें आलेलीं पाहणें, या गोष्टीं आपल्या हाताच्या नाहींत. हीं कामें होण्यास सर्वांचीच पुण्याई लागत असते; आणि ती जेथें कमी पडली तेथें एकट्यानेंच शोक करून काय उपयोग ? तथापि शोकाच्या प्रसंगीं उपयोग आणि अनुपयोग यांचें भान न राहतां मनुष्यानें शोकाला वश होणें अगदीं स्वाभाविक आहे; आणि तशी हल्लींच्या प्रसंगीं पुष्कळांची अवस्था होईल यांत कांहीं संशय नाहीं, आणि झाली तर त्यांत कांहीं दोषहि नाहीं.

गोपाळरावजींनीं जी कामगिरी केली ती बहुतेक सर्व लोकांस पूर्ण माहीत असून आजच्या दुःखकारक प्रसंगीं तिचें कोणासहि स्मरण झाल्याखेरीज राहणार नाहीं. एका गरीब ब्राह्मणाच्या मुलानें शाळेंत अभ्यास करून परीक्षा पास झाल्यानंतर कांहीं थोड्या वर्षांतच हत्ती, घोडे, संपत्ति सत्ता किंवा अशाच प्रकारची दुसरी बाह्य साधनें जवळ नसतां वयाच्या पन्नासाव्या वर्षापूर्वीच सर्व देशांत आपलें नांव आबालवृद्धांचे तोंडी ठेवून जावें, हें कांहीं लहानसहान काम नव्हे; आणि हें काम कोणासहि आपल्या बुद्धिमत्तेनें, दीर्घोद्योगानें, सतत उच्च ध्येय मनांपुढें ठेवून, केवळ आपल्या कर्तबगारीनें करतां येतें हें गोपाळरावजींच्या चरित्रांतील मुख्य मर्म होय. यांनीं प्रथम न्यूस्कुलांत व फर्ग्युसन कॉलेजांत अध्यापकाचें काम करून नंतर सार्वजनिक सभेंत वेल्बी कमिशनपुढें, मुंबईच्या व पुढें हिंदुस्थानच्या कायदेकौन्सिलांत, प्रांतिकसभेंत किंवा राष्ट्रीय सभेंत, अनेक प्रकारचीं कामें केलेलीं आहेत, असें यांच्या चरित्राचें वर्णन करीत असतात; कित्येक त्यांच्या बुद्धिमत्तेची प्रशंसा करितात, तर कित्येक त्यांच्या दीर्घोद्योगाची महती गातात. कित्येक त्यांचा सौम्यपणा वर्णन करतात; तर कित्येक त्यांचा निगर्वीपणा

गातात. परंतु आमच्या मतें हे बाह्यगुण झाले, आणि या संबंधानें कांहीं बाबतींत कित्येकांचा नामदार गोखले यांशीं मतभेदहि असूं शकेल. पण हे गुण व हीं कामगिरी ज्या एका अन्तर्गुणामुळें उदयास येते त्या गुणाबद्दल मतभेद असणेंच शक्य नाहीं, असें आमचें कायमचें मत आहे. तो गुण म्हटला म्हणजे निर्लोभ अंतःकरणानें वेळींच आपणांस देशकार्यास वाहून घेणें हा होय. बालपणीं अभ्यास व तरुणपणीं संसार यथास्थित करून मंदावलेल्या कायिक व मानसिक शक्ति इतर कर्तव्याभावीं लोकोपयोगास वाहाणारे पुरुष कोठें आढळून आल्यास त्याबद्दल विशेषशी आदरबुद्धि मनांत उत्पन्न होत नाहीं. पण इंद्रियशक्ति शाबूत आहेत, शरीर स्वार्थासाठीं उद्योग करण्यास समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर राहिलें आहे, आणि संसारांतील सुखाचें स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ति होणें साहजिक आहे; अशा वेळीं आणि विशेषें-करून या दिशेनें गेलें असतां आपणांस यश मिळण्याचा इतरांपेक्षां कांकणभर अधिक संभव आहे, अशी मनास खात्री वाटत असतांहि आपण या सर्व मनोहर देखाव्यावरून दृष्टि मागें ओढून यथाशक्ति आपल्यास देशकार्यास वाहून घेणें, त्यांत आलेलीं संकटें सोसण्यास कबूल असणें किंबहुना त्यांतच आनंद मानून त्यासाठीं सतत परिश्रम करण्यास तयार होणें, याला एकप्रकारचा बळकट मनो-निग्रह लागत असतो आणि तो मनोनिग्रह ज्यानें दाखविला, दाखविलाच नव्हे तर आमरणान्त कायम ठेवला, तोच पुरुप धन्य होय. गोपाळराव गोखले यांचेबरोबर पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्यें सरकारचे पुष्कळ काळे व गोरे कामगार आहेत; व गोपाळरावजी जें काम करितात तेंच ते करीत आहेत. पण त्यांची या कामा-बद्दल स्तुति न करितां गोपाळरावजींचीच आम्ही जी प्रशंसा करितों, यांतील बीज हेंच होय. एकाचा उद्योग व परिश्रम हें नोकरीच्या कर्तव्याचें फळ आहे, आणि दुसऱ्याचा उद्योग त्यानें आपणा स्वतःस स्वदेशकार्यास वाहून घेतलेल्या स्वार्थत्यागाचें फळ आहे. फळ एकच पण कोणत्या बुद्धीनें मनुष्य त्यासाठीं उद्योग करण्यास प्रवृत्त होतो, हें लक्षांत ठेवून तदर्थ झटणाऱ्या प्रत्येक पुरुषाची किंमत करावी लागते, आणि या दृष्टीनें पाहूं गेलें असतां गोपाळरावजींचे उद्योग व त्यांनीं केलेली कामगिरी नीतिदृष्ट्या, देशहितदृष्ट्या आणि पुरुषार्थ दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची होती, असें कोणासहि वाटल्यावांचून राहाणार नाहीं. यांचा स्वभाव सौम्य असल्यामुळें आपल्या ध्येयाप्रमाणें हातीं घेतलेलें काम सौम्य उपायांनींच पार पाडण्याकडे यांची प्रवृत्ति असे; आणि आमच्यासारख्या कित्येक लोकांस हे सौम्योपचार अनाठायीं आहेत असें वाटे; पण पथ्य आणि उपचार यांच्या तीव्रातीव्रतेसंबंधानें दोन वैद्यांमध्यें जरी मतभेद झाला, तरी वैद्य या

नात्यानें गोपाळरावजींची जी योग्यता होती ती आम्हासहि पूर्णपणें मान्य आहे. आपला देश हल्लीं ज्या स्थितींत आहे ती स्थिति अत्यंत निकृष्ट असून सर्व बाजूंनीं देश वर येण्यास लोकांच्या ठायीं अनेक सद्गुणांचा प्रादुर्भाव झाला पाहिजे, असें जें गोपाळरावजींनीं देशाच्या रोगाचें निदान केलें होतें, तें अगदीं अक्षरशः खरें आहे; हें निदानच आधीं कित्येकांच्या लक्षांत येत नाहीं; आणि लक्षांत येणाऱ्या हजारों लोकांपैकीं एखादाच त्यासाठीं आपला वेळ मोडून उपचार करण्यास तयार होत असतो. गोपाळरावजी याच्याहि पुढें गेलेले होते, आणि अशा तऱ्हेचे पुरुष या देशांत सध्या फारच थोडे आहेत, हें लक्षांत आणलें, म्हणजे गोपाळरावांच्या कामगिरीचें महत्त्व पूर्ण लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. किंबहुना हल्लींच्या काळांतील ब्राह्मणांचें जर कांहीं कर्तव्य असेल तर तें हेंच होय, असें आम्हीं म्हणूं शकतो. डामडौलास न भुलतां, आपण एकटेंच निर्धन जन्मलों तसेंच एकटें जाणार हें लक्षांत आणून ऐहिक सुखाचा त्याग करणें आणि केवळ देशहितकारक धर्म आचरणें यांतच खरें ब्राह्मणत्व आहे; आणि हा धर्म ज्यानें पाळला तो दुसरें कांहीं करो वा न करो, त्यानें योजलेलें उपाय सौम्य असोत वा कडक असोत, केवळ वरील धर्म पाळल्यामुळेंच तो देशकर्त्या पुरुषांचे वर्गांत पडून सद्गति पावतो, असें आम्हांस वाटतें. या सिद्धांतास नांवें ठेविलीं तरी त्याची महति कमी समजणारे कांहीं लोक आहेत, नाहीं असें नाहीं, पण अशा लोकांच्या मतांमुळें वरील सिद्धांताचें महत्त्व कमी न होतां, अपवादानें सामान्य सिद्धांतास जी बळकटी येते तीच या आक्षेपामुळें वरील सिद्धांतासहि येते असें आमचें मत आहे.

असो; विद्यार्थीदशेंत असल्यापासूनच मनापुढें उच्च ध्येय ठेवल्यानें बुद्धिमान् पुरुषास काय करितां येणें शक्य आहे, याचा धडा गोपाळरावजींच्या चरित्रावरून पुढल्या पिढीनें घ्यावा, असें त्यांस आमचें सांगणें आहे व तो ते घेतील अशी आम्हांस उमेद आहे. या जगांत कोणीहि झाला तरी तो आपल्यासाठींच जन्मला आहे असें नाहीं. देश भरभराटींत असतां ही गोष्ट पुष्कळांच्या डोळ्यांपुढें असते. पण त्याला विपन्नावस्था आली म्हणजे विद्वान् पुरुषहि या सिद्धांताकडे दुर्लक्ष करीत असतात; किंवा अशा दुर्लक्षामुळेंच विपन्नावस्था येते, असें म्हटलें तरी साजण्यासारखें आहे. म्हणून ना. गोखले यांच्या चरित्रावरून जो बोध घ्यावयाचा तो तरुणांनीं होईल तितक्या लवकर घेण्यास मागें सरूं नये, असें त्यांस आमचें सांगणें आहे. देशासाठीं जें काम करावयाचें आहे, तें अत्यंत महत्त्वाचेंच नव्हे तर अत्यंत कठीणहि आहे. एकाच प्रयत्नानें एकाच वेळीं किंवा एकाच पुरुषाचे हातून तें सिद्ध होण्यासारखें नाहीं. त्यासाठीं या सर्व गोष्टींची परंपरा कायम राखली

पाहिजे; आणि ती राखणें सर्वस्वी पुढील पिढीच्या हातीं आहे. गोपाळराव गोखले यांना जें कांहीं कर्तव्य वाटलें तें ते करून गेले. आणि त्यांच्या कृत्यामुळें त्यांस परलोकीं सद्गति मिळेल, यावद्दल धर्मदृष्टचा कांहीं शंका नाहीं. पण त्यांनीं आपलें कर्तव्य केलें किंवा त्यांना सद्गति मिळाली, येवढें म्हणूनच मागें राहिलेल्या लोकांचें कर्तव्य संपत नाहीं. त्यांच्या मृत्यूनें जें नुकसान झालें आहे, तें सर्व देशाचें असून विशेषतः त्यांच्या आप्तइष्ट वर्गावर व त्यांच्या शिष्यांवर हा एक मोठा कठीण प्रसंगच गुदरला आहे, असें म्हटलें पाहिजे. पण ह्या अशा स्थितींतहि शांतता आणि समाधान राखून –

**येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः ॥**
**तेन यायात्सतां मार्गं तेन गच्छन्न दुष्यति ॥**

ज्या मार्गानें गुरू किंवा त्यांचेहि गुरू गेले तोच लोककल्याणाचा मार्ग पुढें चालवावा, त्यांतच आपलें क्षेम आहे, हें मनूवचन लक्षांत आणून व शोक विसरून पूर्वाचार्यांनीं देशाच्या अभ्युदयार्थ जो मार्ग आखून दिला आहे तोच पुढें उत्साहानें, उमेदीनें, धैर्यानें, आणि नेटानें चालविण्यास सर्वांनीं प्रवृत्त व्हावें, एवढेंच अखेर या दुःखदायक प्रसंगीं आमचें सर्वांस दुखवटयाचें सांगणें आहे. पुढचें पडलें तर मागच्यांनीं आपलें कर्तव्य बजावणें यांतच खरें समाधान आहे, रडण्यांत नाहीं.

## १४. आगरकरांची श्राद्धतिथि

[ ४ जुलै १९१६ ]

क्षुद्राः संति सहस्रशः स्वभरणव्यापारमात्रोद्यताः ।
स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमानेकः सतामग्रणीः ।।

भर्तृहरि

कै. गोपाळ गणेश आगरकर यांस ता. १६ जून १८९५ रोजीं देवाज्ञा झाली. तेव्हांपासून २१ वर्षांनीं त्यांचें निधन–दुःख वयांत येऊन गेलया रविवारी मुंबईकरांनीं त्यांच्या स्मरणार्थ मोठा उत्सव, राष्ट्रीय जेवणाची त्याला पुरवणी देऊन, साजरा केला. ही कालांतरानें घडून येणाऱ्या अपूर्व गोष्टींपैकींच एक गोष्ट आहे. हा उत्सव करण्याची कल्पना रा. रा. नाईक व अळतेकर यांच्या मनांत प्रथम येऊन मुंबईच्या सुधारकसंघाची मदत मिळाल्यावर परवा तिला व्यक्त स्वरूप देण्यांत आलें, व तत्पूर्वी मनोरंजनानें मुद्दाम 'आगरकर अंक' काढून या महात्म्याची सर्वांस ओळख करून दिली, याबद्दल आगरकरांच्या सर्व मित्रांस व भक्तांस आनंदच वाटेल यात शंका नाहीं. प्रि. परांजपे हे आगरकरांच्याच जागीं आलेले असल्यामुळें त्यांनीं आगरकरांच्या स्मरणार्थ भरविलेल्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावें यांत कांहीं नवल नाहीं. पण माजी न्या. सर चंदावरकर यांनीं " **आगरकर हे आमच्यापैकीं मोठे थोर पुरुष होते, त्यांचे श्राद्ध करणें आम्हास अत्यंत आवश्यक आहे, तसें न केल्यास राष्ट्राची हानी होईल.**" इ. उद्‌गार सभा सुरूं होण्यापूर्वी काढलेले ऐकून पुष्कळांस चमत्कार वाटला असेल यांत शंका नाहीं. कॉलेजांतील अभ्यासक्रम संपल्यानंतर आजन्म दारिद्र्याची शपथ वाहून न्यूइंग्लिश स्कुलास मिळणारे आगरकर कोणीकडे ! आणि बी. ए. झाल्यानंतर एल्एल्. बी., एलएल्. बी. पास झाल्यावर वकिली, वकिली झाल्यानंतर जज्जशिप आणि जज्जशिप झाल्यावर दिवाणगिरी करणारे सर चंदावरकर कोणीकडे ! परंतु सत्याचा, करारीपणाचा, एकनिष्ठतेचा, आणि स्वार्थत्यागाचा महिमा इतका विलक्षण आहे कीं, "**निःस्वोवष्टिशतं शती दशशतं लक्षं सहस्राधिपः**" याप्रमाणें व्यावहारिकदृष्ट्या भरभराटीच्या पाठीस लागलेल्या मनुष्यासहि दारिद्र्यांत राहून पूर्ण एकनिष्ठेनें देशसेवेस लागणाऱ्या मनुष्याचा महिमा अखेर गावा लागतो. यावरून गोपाळराव आगरकर यांचा मृत्युलेख लिहितांना, १८९५ सालीं आम्हीं जे उद्‌गार काढले होते ते किती समर्पक होते हें वाचकांच्या लक्षांत येईल.

आगरकरांच्या अंगच्या विशिष्ट गुणांचें वर्णन करीत असतां आम्हीं तेव्हां असें लिहिलें होतें कीं, कॉलेजांतील अभ्यासक्रम पुरा करून सरकारी नोकरींत शिरणारे आणि शंभराचे हजार रुपये होण्याची हाव बाळगून ती पुरी झाल्यावर पेन्शन घेऊन घरीं स्वस्थ बसण्याचा प्रसंग येतो न येतो तोंच आपल्या चिरंजीवासहि त्याच मार्गांत ढकलून देऊन दोन पिढ्यांची काळजी दूर झाली म्हणून आपणांस कृतकृत्य मानणारे युनिव्हर्सिटीचे पदवीधर कांहीं कमी असतात असें नाहीं. पण आपल्या कर्तबगारीनें अशा प्रकारची व्यावहारिक उन्नतीहि आपण प्राप्त करून घेऊं असा निश्चित भरंवसा असतां आगरकरांप्रमाणें मनोदेवतेस साक्ष ठेवून संकटें, विपत्ति, हालअपेष्टा, सोसूनहि मी आपलें देशकार्याचें मनोगत पूर्ण करीन असे म्हणणारे पुरुषच खरे धीरपुरुष होत. सन १८९५ सालीं वरील आशयाचे जे उद्गार आम्हीं काढले तेच अद्यापहि आम्हांस खरे वाटतात. व तेच पुन: त्याच रूपानें येथें नमूद करण्यास आम्हांस कांहीं दिक्कत वाटत नाहीं. मनुष्याचा मोठेपणा त्याच्या मनावर आहे, केवळ कृतीवर नव्हे, हें तत्त्व केसरींत आलेल्या कांहीं महात्म्यांच्या निधनलेखनांत आम्हीं वेळोवेळीं व्यक्त केलेंच आहे. मनुष्याची योग्यता ठरवावयाची असल्यास ती त्यानें किती ग्रंथ वाचले किंवा त्यानें किती पैसा संपादन केला एवढ्यावरूनच ठरत नाहीं. आगरकरांनीं जितके ग्रंथ वाचले असतील त्यापेक्षां अधिक ग्रंथ वाचलेले एम. ए. सध्यांच्या कालीं डझनांनीं सांपडण्यास हरकत नाहीं. आगरकरांची योग्यता एम. ए. होण्यांत नाहीं. ग्रंथवाचनांत नाहीं, महाराष्ट्रलेखनपटुत्वांत नाहीं, आणि आमच्या मतें त्यांनीं 'सुधारक' पत्र काढलें व चालवलें यांतहि नाहीं. विचारा सुधारक त्यांच्यामागेहि कसाबसा चालला होता, आणि सुधारणेचें प्रतिपादन करणारेच नव्हेत तर आचरण करणारेहि सध्यां पुष्कळ आहेत किंवा होतील. तथापि आगरकरांसारखा पुरुष त्यांच्यांत क्वचितच सांपडेल असें म्हणण्यास आम्हांस कांहींएक हरकत दिसत नाहीं. कै. माधवराव रानडे यांच्यामागून हायकोर्टाचे जज्ज पुष्कळ झाले व होतील. पण माधवरावजींचा मोठेपणा ज्याप्रमाणें न्यायमूर्तित्वांत नव्हता, त्याचप्रमाणें आगरकरांचीहि गोष्ट होय. सुधारणेचीं मतें त्यांनीं निर्भीडपणें व कित्येकदां उच्छृंखलपणेंहि प्रतिपादन केलीं; पण हें कांहीं त्यांच्या मोठेपणाचें लक्षण नव्हे. परिस्थितीचा गुलाम न बनतां परिस्थितीला यथासंभव यथाशक्ति व यावच्छक्य आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागतें तें ज्याच्या अंगांत आहे; आणि दु:खाची अथवा संकटाची भीति अगर पर्वा न बाळगतां जो आपल्याठायीं असणाऱ्या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे या कोटींतले होते, व म्हणूनच १८९५ सालीं

त्यांचा मृत्युलेख लिहितांना त्यांच्या अंगच्या वरील सद्गुणांसच आम्ही प्रमुखस्थान दिलें होतें. मनुष्य जें कांहीं कर्म करतो तें नेहमींच सफल होत असतें असें नाहीं, अगर त्यानें प्रतिपादन केलेलीं मतें नेहमीच अक्षय्य असतात असेंहि नाहीं. विचार आणि मतें हीं मनाचीं पांघरुणें होत असें जें एका पाश्चात्य ग्रंथकारानें म्हटलें आहे तेंच खरें. देशकालानुसार मनुष्याचे विचार आज एक तर उद्यां दुसरें होतील; आणि त्याच्या हातून घडणाऱ्या क्रियेसहि तोच न्याय लागू आहे. पण सत्पुरुषाचा मोठेपणा त्याच्या स्वतःसिद्ध किंवा कमावलेल्या मनांत आहे; आणि हेंच तत्त्व शिरोभागीं दिलेल्या भर्तृहरीच्या श्लोकांत ग्रथित केलेलें आहे.

मनुष्याला मोठें केव्हां व कशासाठीं म्हणावें याचें तत्त्व लक्षांत न वाळगल्यामुळें गोपाळराव आगरकरांचीं "**मनोरंजना**" च्या खास अंकांत जीं चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत तीं वहुतेक एकांगी आणि कांहीं ठिकाणीं तर निव्वळ चुकीचीं आहेत. अलीकडे या चरित्रकारांची अशी एक पद्धत पडून गेली आहे कीं, आपल्या चरित्रनायकांशीं ज्यांचा विरोध येतो, त्यांना कांहींतरी दूषण ठेवून त्यांतच आपल्या चरित्र-नायकाचा मोठेपणा आहे असें सिद्ध करावयाचें. आमच्या मतें चरित्रलेखनाची ही पद्धत अप्रशंसनीय होय. जगामध्यें मतवैचित्र्य असणें ही गोष्ट इतकी स्वाभाविक आहे कीं, स्वयंवरांत अनेक चांगले राजे आले असतां त्यांना सोडून अजालाच इंदुमतीनें कां वरावें याचें कारण देतांना कालीदासास "**नासौ न काम्यो न च वेद सम्यक्। द्रष्टुं हि सा भिन्नरुचिर्हि लोकः**" या तत्त्वावर निर्वाह करून घ्यावा लागला आहे. पण गोपाळरावांच्या वहुतेक चरित्रकारांच्या मनांत ही वुद्धि वसत होती असें दिसत नाहीं. गोपाळरावांचे हे चरित्रकार प्रायः सुधारणेची री ओढणारे आहेत; आणि केवळ सुधारणेसाठी गोपाळरावांस सत्पुरुषांच्या मालिकेंत गोंवण्यास तयार झालेले हे लोक आमच्या मतें कोत्या वुद्धीचे आणि एककल्ली होत. गोपाळरावांच्या अंगीं असामान्य गुण कोणता याचें सन १८९५ सालीं व आजच्या लेखांत आम्ही पूर्ण निदर्शन केलें आहे. गोपाळरावजींचा आणि टिळकांचा कांहीं वावतींत कितीहि जरी मतभेद असला तरी गोपाळरावजींची योग्यता टिळकांना पूर्ण अवगत होती हें दोघांच्याहि मित्रांस पूर्ण माहीत आहे. पण तेवढ्यामुळें गोपाळरावजींच्या विरुद्ध जो पक्ष उपस्थित झाला तो केवळ '**स्वंग लोकप्रियतेच्या लालुचीनें झाला, अगर सुधारक सत्यासाठीं तर केसरी व्यापारा-साठीं**' इत्यादि अजागळ विधानें गोपाळरावजींच्या मृत्यूनंतर आज एकवीस वर्षांनीं करणें म्हणजे लेखकानें आपल्या वुद्धीचें मांद्य प्रकट करण्यासारखें आहे. वाद चालू असता असल्या प्रकारचीं वाक्शस्त्रें नेहमीं वापरण्यांत येतात, आणि तेव्हां तीं वऱ्याच अंशीं वादाला पोषक आणि अवश्यहि असतात. पण वाद संपून गेल्या-

नंतर असल्या शस्त्रांचा वादांतील नायकांच्या प्रतिपक्षांवर उपयोग करणें म्हणजे वायकोच्या नथींतून तीर मारण्यासारखें असमंजस होय. शिवाय दुसरी अशी गोष्ट लक्षांत आणली पाहिजे कीं, हल्लीं प्रसिद्ध झालेलीं आगरकरांचीं चरित्रें प्रायः सुधारणेच्या एकाच गोष्टीला महत्त्व देऊन लिहिलेलीं आहेत. जणुं काय सुधारणे-खेरीज आगरकरांनीं कांहींच कामगिरी केली नाहीं किंवा दुसऱ्या विषयावर लिहिलेंहि नाहीं. अर्थात् हल्लींच्या चरित्रकारांनीं आगरकरांच्या गुणांचें जें वर्णन केलें आहे तें आंधळ्यानें हत्ती खांबासारखा आहे, अगर सुपासारखा आहे असें ठरविण्याच्या मासल्याचें झालें आहे. या सर्वांस आम्हीं असें विचारतों कीं, त्यांनीं आगरकरांचीं राजकीय मतें काय होतीं याची कधीं चौकशी केली आहे काय ? १८८८ सालापर्यंत केसरींत जे राजकीय विषयावर लेख आले ते बहुतेक आगरकरांचे आहेत; आणि त्यानंतर सुधारकांतहि अशा प्रकारचे बरेच निबंध आले आहेत; या सर्वांचे सूक्ष्म निरीक्षण केलें असतां असें दिसून येईल कीं, आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते, व कै. विष्णुशास्त्री चिपळुणकरांप्रमाणें देशांतील दारिद्र्य, परावलंबिता, चांगल्या पुरुषांचा तेजोभंग, गोऱ्या अधिकाऱ्यांची चरणी, व वरणी, व्यापारनाश वगैरे राजकीय व औद्योगिक अवनति पाहून त्यांचें चित्त केशवपनादि चालीच्या निरीक्षणापेक्षांहि अधिक संतप्त व दुःखित होत असे; व याला मिल्ल आणि स्पेन्सर यांनीं प्रतिपादन केलेल्या स्वराज्याच्या तत्त्वाखेरीज दुसरा उपाय नाहीं अशी त्यांची पक्की खात्री झालेली होती. मिल्लनें ज्याप्रमाणें आपली लेखणी केवळ स्त्रीस्वातंत्र्यावरच चालविली नाहीं तद्वतच आगरकरांचीहि गोष्ट आहे, आणि जो तार्किकपणा समाजसुधारणेसंबंधानें ह्यांच्या अंगीं वसत होता तोच तार्किकपणा ह्यांनीं राजकीय बाबीवरील आपल्या लेखांतहि पूर्णपणें उपयोगांत आणला आहे. टिळक आणि आगरकर यांचा जो मतभेद झाला तो राजकीय बाबतींत नाहीं आणि शिक्षणाच्या बाबतींतहि नाहीं. मनुष्य स्वभावतः कितीहि चांगला असला तरी शिक्षणानें त्याच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय उन्नति होत नाहीं हें तत्त्व दोघांसहि पूर्ण मान्य होतें; आणि त्याचा प्रसार करून देशोन्नतीसाठीं आपल्या हातून होईल तितकी खटपट करावी एवढ्याकरितां दोघेहि आपल्या आयुष्यक्रमारंभीं स्वतंत्र शिक्षणसंस्था काढण्याच्या उद्योगास लागले. मग एवढें जर दोघांमध्यें ऐक्य होतें तर मग पुढें मतभेद कसा झाला ? याचें उत्तर कित्येकांस वाटतें तितकें कठीण नाहीं. मतभेद धार्मिक आणि सामाजिक बाबतींत उत्पन्न झालेला होता. धर्मदृष्ट्या आगरकर केवळ बौद्धिकवादी होते आणि तोच पंथ सामाजिक बाबतींतहि निदानपक्षीं आपल्या लेखांत त्यांनीं स्वीकारलेला होता. आगरकरांची ही पद्धत टिळकांसच नव्हे तर त्यांचे जे दुसरे मित्र

केसरीच्या चालकवर्गांत होते त्यांसहि पसंत नव्हती; व त्यामुळेंच अखेर केसरींतून निघून गोपाळरावजींस सुधारक काढावा लागला. सुधारणा नको असें केसरीचें म्हणणें केव्हांहि नव्हतें; पण केवळ बौद्धिकदृष्टचा किंवा तर्कदृष्टचा सुधारणेचा विचार करण्यास **केसरी** तयार नव्हता. अर्थात् हीच पद्धत स्वीकारणें असल्यास आगरकरांस दुसरें वर्तमानपत्र काढणें जरूर होतें; व तें त्यांनीं काढलेंहि; सुधारणांचा केवळ तर्कदृष्टचा विचार करणें योग्य नाहीं हें मत आतां सुधारलेल्या राष्ट्रांतहि ग्राह्य झालेलें आहे. राजकीय बाबतींत राजसत्तेच्या अस्तित्वामुळें केवळ तर्कवश होऊन लिहितां येत नाहीं असा आगरकरांसहि अनुभव आलेला होता; पण हिंदु-समाज अधिकारहीन आणि पंगू असल्यामुळें तशा प्रकारचा अनुभव सामाजिक बाबतींत सध्यां आमच्याकडे येत नाहीं. तथापि तेवढ्यामुळें प्राचीन परंपरा, देशकाल किंवा सद्यःकालीन सामाजिक परिस्थिति यांस सोडून केवळ तार्किकरीत्या सामाजिक सुधारणेचा विचार करणें युक्त आहे असें सिद्ध होत नाहीं. समाजावर तार्किक हल्लें करणें म्हणजे केवळ पाडापाडीचें काम करणें होय. त्यानें समाजाचीं बंधनें शिथिल होतात, पण नवीं मात्र उत्पन्न होत नाहींत. मिल्लसारख्या तत्त्ववेत्यांसहि ही गोष्ट कबूल करावी लागली आहे. आणि कॉंट या फ्रेंच ग्रंथकारानें जेव्हां निव्वळ आधिभौतिक पायावर समाजरचना कशी करावी याचें विवेचन केलें, तेव्हां त्यास चातुर्वर्ण्यासारखीच एक पद्धत पसंत पडून ती अंमलांत कशी आणावी याचा त्यानें आपल्या ग्रंथांत सांगोपांग विचार केला आहे. मिल्लला ही पद्धत पसंत पडली नाहीं; पण अशी पद्धत पाहिजे ही गोष्ट त्यानें प्रांजलपणें कबूल केली आहे. व या पद्धतीचें विवेचन केल्याबद्दल त्यानें कांटचें अभिनंदन केलें आहे. असो; या विषयाचें समग्र विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे. सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, '**केसरी**' आणि '**सुधारक**' यांचा जो मतभेद होता तो तत्त्वाचा होता; आणि '**तर्कटी,**' '**माथेफिरू**' '**गांवाबाहेरचा**' किंवा '**सर्वंग-लोकप्रियतेच्छू**' इ. वाक्शस्त्रें या वादांत मौजेसाठीं जरी उपयोगांत आलेलीं असलीं तरी मुख्य भेद तत्त्वाचा आहे ही गोष्ट खुद्द आगरकरांच्याहि पूर्ण लक्षांत आलेली होती. पण सुधारणेचीच ज्यास री ओढावयाची त्यास या गोष्टी कशा कळणार? आगरकरांचें तर्कचक्र राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक बाबतींत ज्याप्रमाणें एकसारखेंच अप्रतिहत चालत होतें, तसें त्यांच्या सन्मानार्थ जमलेल्या परवांच्या सभेंतील फारच थोडचा लोकांचें चालत असेल. कोणी स्त्रीसुधारणेच्छु तर कोणी प्रार्थनासमाजिस्ट, कोणी विधवाविवाहेच्छु तर कोणी एकेश्वरी, आणि कोणी सरकारी नोकरींत आयुष्य घालवून थकलेले तर कोणी राष्ट्रीय जेवण करूण जातिभेद मोडण्याच्या

उद्योगास प्रवृत्त झालेले, अशा सरमिसळ समाजांत आगरकरांच्या केवळ सुधारणा-तत्त्वाचा जयजयकार करण्यांत यावा यांत कांहीं नवल नाही. ज्यांना बाकीच्या बाबती पाहावयाच्याच नव्हत्या त्यांस सगळा आगरकर नको होता, किंबहुना तो त्यांच्या पचनींहि पडला नसता. म्हणून गोपाळरावजींच्या चरित्रांपैकीं आपणांस पचेल तेवढाच भाग घेऊन त्यांनीं गोपाळरावांची श्राद्धतिथि त्यांच्या एकविसाव्या वर्षीं साजरी करून घेतली. असो, यांत एकांगीपणा आहे हें खरें, पण गोपाळ-रावजींच्या अंगच्या गुणांचा एकवीस वर्षांनीं का होईना अशा रीतीनें मुंबईसारख्या शहरांत आदरपूर्वक सन्मान व्हावा, ही अत्यंत समाधानाची व आनंदाची गोष्ट होय, आणि त्याबद्दल या समारंभाच्या पुरस्कर्त्यांचें आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करितों. आज नाहीं तर उद्यां हाच उत्सव अधिक व्यापक होऊन सर्वांगसुंदर होवो व त्यामुळें पुढील पिढीस स्वार्थत्यागाचें, मानसिक धैर्याचें व चारित्र्याचें इष्ट वळण लागून तद्वारा हा उत्सव देशोन्नतीस कारण होवो, अशी आमची मनापासून इच्छा आहे.

## कै. सौ. अवंतिकाबाई गोखलेकृत

# म. गांधींच्या चरित्राची प्रस्तावना

गेल्या सालीं म्हणजे १९१७ च्या डिसेंबर महिन्यांत कलकत्त्यास कॉंग्रेस सभेस गेलों असतांना तेथें सौ. अवंतिकाबाई गोखले ह्यांनीं आपण महात्मा गांधींचें चरित्र लिहीत असल्याचें मला कळविलें व त्यास प्रस्तावना लिहिण्यास मला विनंति केली. ही विनंति अर्थातच मला अमान्य करवेना. पण त्या वेळीं हें पुस्तक इतक्या लवकर तयार होईल अशी मला कल्पना नव्हती. विशेषतः मी विलायतेस जाण्यास निघालों असतां या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचें काम घाईघाईनें उरकावें लागेल असें तर त्या वेळेस मला मुळींच वाटलें नव्हतें. पण आतां तशी स्थिति आल्यामुळें ही प्रस्तावना कशी बशी तरी पुरी करावी लागत आहे. महात्मा गांधींच्या चरित्रास प्रस्तावना लिहिण्यास अधिक चांगली वेळ व फुरसत पाहिजे होती. ती मिळाली नाहीं त्याबद्दल मला वाईट वाटतें. तथापि "अकरणान्मंदकरणं श्रेयः" ह्या न्यायानें मी तें काम करीत आहें. आणि या ग्रंथाचे वाचक वरील हकीकत लक्षांत आणून त्याबद्दल मला माफी करतील अशी आशा आहे.

महात्मा गांधी यांचें नांव हिंदुस्तानांत कोणास माहिती नाहीं असें नाहीं. अर्थात् त्यांच्याबद्दल थोडीबहुत माहिती करून घेण्याची इच्छाहि सर्व लोकांस झालेली आहे असें म्हटलें तरी चालेल. परंतु ही इच्छा पूर्ण होण्यास मराठी भाषेंत आजपर्यंत कोणताच ग्रंथ झालेला नव्हता. ती उणीव सौ. अवंतिकाबाई यांनीं प्रस्तुतचा सोपा ग्रंथ लिहून भरून काढली याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करितों. सौ. अवंतिकाबाई म्हणतात त्याप्रमाणें महात्मा गांधी यांचें चरित्र अद्याप वाढतें आहे. आणि ह्याच विषयावर नवा ग्रंथ लिहिणारास दर वर्षीं नवीन माहिती मिळण्यासारखी आहे. म्हणून हल्लींच्या ग्रंथानें पुढील लेखकांस कोणत्याहि प्रकारचा अडथळा न येतां उलट त्या कार्याची प्रस्तावना करून ह्या कट्टया देशभक्ताच्या चरित्राची महाराष्ट्र वाचकांस ओळख करून देण्याची कामगिरी बजावल्याचें श्रेय मात्र सौ. अवंतिकाबाईस मिळणार आहे. सौ. अवंतिकाबाई ह्या हल्लीं चंपारण्यांत महात्मा गांधी ह्यांस मदत करण्यासाठीं व त्यांच्या हाताखालीं राहून काम करण्यासाठीं गेलेल्या आहेत. तेव्हां केवळ पुस्तकावरूनच नव्हे, तर प्रत्यक्ष अवलोकनानेंहि त्यांच्या चरित्रनायकाचे विचार, आचार, स्वभाव, राहणी, अनेक विषयांवरील त्यांचीं मतें, त्यांच्या कुटुंबांतील माणसांशीं किंवा इतरांशीं त्यांचें वर्तन,

यांचा त्यांना पुरा परिचय झालेला आहे. ग्रंथ लिहिण्याच्या कामीं ह्या प्रत्यक्ष अवलोकनाचा पुष्कळ उपयोग झालेला आहे असें वाचकांस सहज दिसून येईल.

महात्मा गांधीं यांचें चरित्र बोधप्रद आणि अनुकरणीय कां व्हावें याचीं कारणें शोधून काढण्यास माझ्या मतें फारसे परिश्रम नको आहेत. गांधी हे ज्याप्रमाणें विलायतेहून बॅरिस्टरची परीक्षा पास होऊन आलेले आहेत त्याप्रमाणें बॅरिस्टर झालेले पुष्कळ लोक आहेत. त्यांचे वडील दिवाणगिरीच्या कामावर होते तसेहि पुष्कळांचे असतील. किंवा ह्यांचा स्वभाव जसा साधा व सरळ आहे तसा इतरांचाहि असेल. त्यांत कांहीं विशेष नाहीं. इंग्रजी विद्येचा ह्या देशांत प्रचार झाल्यापासून निष्णात झालेले पुष्कळ लोक हिंदुस्तानांतील विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेले आहेत. जगाचा इतिहास किंवा भूगोल सांगोपांग माहित असणें, अथवा एकाद्या शास्त्रीय विषयावरील माहिती बिनचुक सांगणें, हीं कामें केवळ बुद्धिगम्य असल्यामुळें तीं आमच्यापैकीं पुष्कळ बुद्धिवान लोकांनीं गेल्या शेंदीडशें वर्षांत उत्तम रीतीनें करून दाखविलीं आहेत. तसेंच पाश्चात्य विचार, पाश्चात्य सामाजिक पद्धति, पाश्चात्य समजुती, किंवा समाजरचना इत्यादि गोष्टींबद्दलहि बौद्धिक किंवा तार्किक विचार करण्यांत आमच्या सुशिक्षित वर्गानें आपली बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारें व्यक्त केली आहे. परंतु शील किंवा चारित्र्य—ज्यामुळें या कर्ममय भूमींत मनुष्याची सभोंवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालूं शकते, आणि ज्यामुळें निरनिराळया गोष्टींबद्दल केलेल्या प्रयत्नास सिद्धि प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न होतो तें शील व चारित्र्य ज्या उदाहरणावरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनाला येईल अशीं चरित्रें आमच्याकडे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात. गांधींच्या चरित्राचें जें कांहीं वैशिष्टय आहे तें हेंच होय. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय किंवा इतर मतांपैकीं कांहीं मतें कित्येकांस कदाचित् पसंत होणार नाहींत. विद्वत्तेनें त्यांना मागें टाकणारे दुसरे पुष्कळ गृहस्थ असतील, पण शीलचारित्र्याची जी महती वर सांगितली 'त्या दृष्टीनें विचार केला असतां महात्मा गांधीं यांचें चरित्र खरोखरच सामान्य मनुष्यास आदर्शभूत होण्यासारखें आहे, ह्याबद्दल कांहीं मतभेद असेल किंवा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. आणि म्हणूनच मराठी भाषेंत झालेल्या ह्यांच्या प्रस्तुतच्या चरित्राचा महाराष्ट्रांतील लोकांनीं नीट अभ्यास करावा अशी आमची त्यांस शिफारस आहे.

हिंदुस्तानांतील लोक, मग ते हिंदुस्तानांत रहाणारे असोत किंवा इंग्रजी साम्राज्याच्या इतर भागांत राहणारे असोत, चोहोंकडे विपन्न स्थितींत आहेत याबद्दल कांहीं शंका नाहीं. तसेंच, ही विपन्नावस्था कां आली, पूर्वींच्या स्थितींत कोणतें अंतर पडलें, हें अंतर न पडण्यास काय केलें पाहिजे इत्यादि गोष्टींची पुष्कळ चर्चा झाली असल्यामुळें त्याबद्दल या लहानशा प्रस्तावनेंत आम्हीं कांहीं

लिहूं इच्छित नाहीं. किंबहुना महात्मा गांधी यांच्या चरित्रापासून जो बोध घ्यावयाचा त्याचा हा महत्त्वाचा भाग नाहीं अशी आमची समजूत आहे. व्यक्तीच्या संसारांत काय, किंवा देशाच्या संसारांत काय, परिस्थिति ही प्रायः पूर्वपिढीच्या किंवा पूर्वकालीन कर्माच्या परिपाकानें निर्माण झालेली असते. ही स्थिति वाईट असल्यास त्याचा दोष त्या स्थितींत राहणाऱ्या मनुष्याकडे देतां येत नाहीं, हें खरें आहे. पण ती जर वाईट असेल तर तिच्या कारणांचा योग्य ऊहापोह करून व तीं दूर करण्यास कोणते उपाय केले पाहिजेत, ह्याचा शक्य तितका खोल विचाराअंतीं निर्णय करून तो निर्णय अमलांत आणण्याचें काम म्हणजे अर्थात् ती स्थिति सुधारण्याचें काम, जर सदर स्थितींत सांपडलेला पुरुष–विशेषत: देशांतील कर्ता पुरुष– करणार नाहीं तर मात्र तो आपल्या कर्तव्यास जागला नाहीं असें म्हणावें लागेल. कारण परिस्थिति उत्पन्न होण्यास जरी आपण कारणीभूत नसलों तरी ती सुधारण्यास आपल्या हातून शक्य तेवढे प्रयत्न करणें हें प्रत्येक मनुष्याचें व्यक्तिदृष्ट्या आणि सार्वजनिक दृष्ट्या कर्तव्य आहे, पवित्र कर्तव्य आहे, असा शास्त्राचा आणि धर्माचाहि सिद्धांत आहे. ज्या योगानें जगाचें धारण पोषण होतें त्याला धर्म असें म्हणतात आणि जगाचे धारणपोषण म्हटलें म्हणजे त्यांत सद्यः-कालीन परिस्थिति वरच्या वरच्या पायरीला जाऊन अखेर पूर्णावस्थेला पोचेल त्या त्या सर्व गोष्टी करणें, करविणें, स्वत: करणें आणि लोकांकडून करविणें याचा प्राधान्येंकरून समावेश होतो. आपला जन्म कोणत्याहि देशांत झालेला असो, तो केवळ आपण त्या देशांतील अन्न खाऊन आमरणांत आपल्या बायका मुलांसह चैनींत राहण्यासाठीं नाहीं, या पेक्षां कांहीं तरी उच्चतर ध्येय सिद्ध करण्याकरितां आहे, ही गोष्ट शास्त्रकार आणि धर्मकार या दोहोंसहि पूर्णपणें मान्य आहे. या उच्चतर ध्येयाची मर्यादा इतकी श्रेष्ठ आहे कीं, मनुष्य या मार्गानें जातां जातां अखेर त्याला ह्या जगाचें पालन पोषण करणाऱ्या परमेश्वराचें तादात्म्य प्राप्त होतें. म्हणजे तो देवपणा पावतो, असें शास्त्रांतून वर्णन आहे. परंतु शास्त्र आणि धर्म या दोहोंच्याहि आज्ञा जरी अशा प्रकारच्या आहेत तरी ह्या ध्येयाकडे आमच्या देशांतील लोकांचें जितकें जितकें लक्ष्य लागावें तितकें लागलें नव्हतें असें मोठ्या दु:खानें म्हणावें लागतें. एरवीं सध्याची परिस्थितिच उत्पन्न झाली नसती. पण पूर्वकालीं ह्या गोष्टीकडे देशांतील कर्त्या पुरुषांचें जावें तितकें लक्ष्य गेलें नाहीं म्हणून प्रस्तुत कालीं आम्हींहि तो मार्ग स्वीकारू नये असें होत नाहीं. देशाच्या उन्नतीसाठीं जे कांहीं प्रयत्न करावयाचे त्याला कालाची कांहीं विशिष्ट मर्यादा असते असें नाहीं. पूर्वीच्यांनीं असे प्रयत्न केले नसले तर पुढच्या लोकांनीं करूं नयेत असें नाहीं. आज केले नाहींत तर उद्यां करूं नयेत असें नाहीं. आणि उद्यां केले

नाहींत तर परवां करूं नयेत असेंहि होत नाहीं. अशा तऱ्हेचे प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे. आणि ही कर्तव्यजागृति ज्याच्या मनांत ज्या ज्या क्षणीं होईल त्या त्या क्षणीं त्यानें हें आपलें कर्तव्य बजावण्यास निरलसपणानें स्वार्थत्याग करून आणि आपणावर किंवा आपल्या कुटुंबावर संकटें येणार किंवा येतील याची पर्वा न करितां परमेश्वरावर भरंवसा ठेवून निष्काम बुद्धीनें लागलें पाहिजे हा ह्यांतील सारभूत सिद्धांत आहे. म. गांधींच्या चरित्रावरून जो कांहीं बोध घ्यावयाचा त्यांपैकीं मुख्य बोध हा होय.

अलीकडे दुसरी एक अशी समजूत होत चालली आहे कीं हिंदुस्थान देशाची स्थिति सुधारण्यास प्रथमतः हिंदी समाजाची स्थिति सुधारली पाहिजे आणि ही सुधारेल तेव्हां मग पुढें राजकीय गोष्टींचा विचार करण्याची वेळ येईल. महात्मा गांधी यांच्या चरित्रावरून वरील मत किती अयथार्थ आहे हें वाचकांस सहज कळून येणार आहे. देशांतील सर्व कांहीं सुधारणा घडवून आणण्यास "सर्वारंभास्तण्डुलाः प्रस्थमूलाः" या न्यायानें त्या देशांतील सत्ता पूर्ण नाहीं तरी बऱ्याच अंशानें देशांतील कर्त्या आणि विचारी पुरुषांच्या हातांत असावी लागते. सत्तेशिवाय शहाणपण फुकट जातें इतकेंच नव्हे तर कर्तृत्वहि निर्माल्यवत् होतें. म्हणून देशाची स्थिति सुधारण्याचे जे प्रयत्न करावयाचे ते विशेषेंकरून प्रथमतः ह्या सर्व सुधारणांना अवश्य लागणाऱ्या मूलभूत बाबतींतच झाले पाहिजेत. महात्मा गांधींचें असें मत नसतें तर ते राजकीय सुधारणेंत बिलकुल पडले नसते. आफ्रिकेंतील वसाहतींत गेलेल्या हिंदी मजुरांच्या कल्याणार्थ त्यांनीं जे प्रयत्न केले ते केवळ सामाजिकच होते असें नाहीं, आफ्रिकेंतील राज्यव्यवस्थेशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध होता. किंबहुना आफ्रिकेंतील जुलमी राज्यव्यवस्थेमुळेंच तेथील हिंदी मजुरांवर हा प्रसंग ओढवलेला होता असें म्हटलें तरी चालेल. ह्याचा गांधी यांच्या मनावर स्वभावतःच असा परिणाम झाला कीं राज्यव्यवस्थेंत सुधारणा झाल्याखेरीज आफ्रिकेंतील हिंदी लोकांची स्थिति सुधारावयाची नाहीं. इंग्रजी साम्राज्याचे जर आम्ही भागीदार आहों तर ह्या साम्राज्यांत गोऱ्या प्रजेस जे हक्क आहेत तेच हिंदी प्रजेसहि असले पाहिजेत हे न्यायदृष्ट्या अगदीं उघड आहे. पण गोऱ्या लोकांच्या आज ज्या वसाहती झालेल्या आहेत त्या वसाहतवाल्यांनी केवळ आपल्याच फायद्याकरितां केल्या अशी स्वार्थमूलक समजूत असल्यामुळें साम्राज्याच्या इतर भागांतील लोकांस समबुद्धीनें वागवण्यास ते तयार नाहींत. तथापि बाहेरच्या देशांतील लोक त्यांस अगदींच नको आहेत असेंहि नाहीं. कारण वसाहतींत जमीन किंवा खनिज द्रव्यें मुबलक असून ह्या संपत्तीचा पूर्ण उपयोग करण्यास वसाहतवाल्यांजवळ पुरेसें मनुष्यबळ नाहीं. हजार पांचशे किंवा दोन चार हजार गोरे

वसाहतवाले दोहोंच्या ऐवजीं चार चार हातांनीं जरी काम करूं लागले किंवा सहस्र वाहूंच्या शक्तीचीं कितीहि यंत्रें त्यांनीं उपयोगांत आणिलीं तरी वसाहतींतल्या मुलुखापासून द्रव्यदृष्टचा जितका फायदा होणें शक्य होते किंवा आहे त्याच्या शतांश देखील फायदा ह्या वसाहतवाल्यांस होणार नाहीं. तेव्हां आफ्रिकेंत मागें नीग्रो लोकांस ज्या प्रमाणें ते वागवीत होते त्याच प्रमाणें हिंदुस्तानांतील काळ्या लोकांस मजूर म्हणून तेथें नेऊन केवळ पशूंप्रमाणें त्यास वागविणेची आणि त्यांच्या उद्योगावर आपण समृद्ध होण्याची वसाहतवाल्यांनीं कल्पना काढली. आणि आमच्या हिंदुस्तानांतील नोकरशाही, वसाहतवाल्यांच्या वांधवांचीच असल्यामुळें वसाहतींतील हिंदी मजुरांच्या शोचनीय स्थितीकडे हिंदुस्थान सरकारचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं. ही शोचनीय स्थिति हिंदुस्तानांतील पुढारी लोकांच्या लक्षांत येऊन गेल्यास पुष्कळ वर्षें झालीं. पण गांधी सारखे पुरुष पुढें येईपर्यंत तिचें अल्प देखील निवारण झालें नाहीं. समजलें होतें पण उमजलें नव्हतें. आणि उमजलें तरी करवत नव्हतें असा प्रकार होता. या कुचंव्यांतून लोकांना वाहेर काढून गांधींनीं आपल्या उदाहरणानें सुधारणेचा मार्ग दाखविला, असें पुढील चरित्रावरून कोणासहि कळून येईल. आफ्रिकेंतील हिंदी लोकांस त्यांच्या विपन्नावस्थेंतून सोडविण्यास गांधी यांनीं काय केलें याचेंहि जरा सूक्ष्म रीत्या अवलोकन केलें पाहिजे. एकाद्या ठिकाणची राज्यव्यवस्था अन्यायाची असली तर ती सुधारण्याचा प्रयत्न करणें हा कांहीं न्यायदृष्टचा राजद्रोह होऊं शकत नाहीं. ह्याला राजद्रोह म्हणणें हें राज्यकर्त्यास न्याय नको, नीति नको, अन्यायाचा प्रतिकार करावयास नको, आपल्या प्रजेस समतेचे हक्क द्यावयास नकोत, असें म्हणण्यासारखें आहे. आम्ही असें समजतों कीं प्रजेचें कल्याण हेंच राजसत्तेचें खरें ध्येय व सामर्थ्य आहे. हा सिद्धांत एकदां पतकरला म्हणजे मग ज्या ठिकाणीं अन्याय आहे तेथें त्याचा प्रतिकार करून तो दूर करणें म्हणजे एक प्रकारें राज्यसत्तेच्या ध्येयाची अम्मलवजावणी करण्यास मदत करणें होय असा त्यापासून सहजच दुसरा सिद्धांत निघतो. पण पूर्वसंचितामुळें आलेले दुराग्रह अगर स्वार्थवुद्धी यांमुळें प्रजाजनांपैकीं कांहीं विशिष्ट व्यक्ति, जाति किंवा वर्ग कधीं कधीं इतके पछाडले जातात कीं त्यांना हीं न्यायाचीं तत्त्वें दिसेनाशीं होतात; अर्थात् अशा वर्गाचा इतर लोकांवर एक प्रकारें जुलूम होऊं लागतो. अशा वेळीं राज्यकर्त्यांनीं त्यांत एकदम हात घालून अन्यायाच्या गोष्टी वंद केल्यास ह्या दुराग्रही व स्वार्थी पण परंपरागत वजनानें प्रतिष्ठित वनलेल्या वर्गास दुखवावे लागते व त्यामुळें शांततेची चालत आलेली घडी विस्कळीत होते, यास्तव अशा प्रकारच्या स्थितींत ज्यांच्यावर जुलूम होतो त्यांच्याकडून निकराचे प्रयत्न झाल्याखेरीज

राज्यकर्ते प्राय: त्यांत मन घालित नाहींत. सारांश, चालतें मूल ज्याप्रमाणें कोणीहि कडेवर घेत नाहीत, ठेच लागून पडेल तर गोष्ट निराळी, अशांतलाच प्रकार राजकीय बाबतींतहि घडून येतो. जोंपर्यंत राज्यकारभार चालण्यांत कांहीं अडथळा येत नाहीं तोंपर्यंत राज्यांचीं सूत्रें चालवणाऱ्या लोकांनीं तरी तिकडे काय म्हणून लक्ष्य द्यावें? मनुष्यस्वभावच असा आहे कीं, चालत्या गोष्टींत विनाकारण कोणीं ढवळाढवळ करूं इच्छित नाहीं. त्यापासून दुष्परिणाम होतात असें प्रत्यक्ष अनुभवाला येईल इतकेंच नाहीं तर त्यामुळें अडेल तेव्हांच कोणीहि मुत्सद्दी मनुष्य त्यांत सुधारणा करण्यास प्रवृत्त होत असतो. एरवीं नाहीं. अर्थात प्रजेच्या दुःखाची किंवा गाऱ्हाण्यांची किंवा त्यांवर होणाऱ्या जुलमाची स्थिति अशा मजलेपर्यंत आणून ठेवणें आणि शेवटीं राज्यकर्त्यांकडूनच ती सुधारणा घडवून आणणें हें प्रत्येक देशभक्ताचें हरएक प्रसंगीं कर्तव्य आहे आणि हें कर्तव्य गांधी यांनीं उत्तम प्रकारें बजावलें यामुळेंच ते सर्व लोकांच्या स्तुतीस व आदरास पात्र झालेले आहेत.

परंतु गांधींच्या ह्या अडवणुकीच्या मार्गाचें खरें रहस्य सांगण्यास आणखीहि दोन शब्द सांगितले पाहिजेत. देशांत शांतता राखण्यासाठीं जे कायदे केलेले असतात त्यांत राज्यकर्त्या अमलदारांशीं दांडगाई करणें अगर त्यांचा हुकूम तोडून बंड करणें ह्या गोष्टी कितीहि सद्बुद्धीनें केलेल्या असल्या तरी स्वभावतःच बेकायदेशीर मानल्या जातात. अशा वेळीं ज्या देशभक्तास आपली इच्छित सुधारणा कायदेशीर रीतीनें अमलांत आणावयाची असेल त्याच्या मार्गांत अनेक अडचणी उत्पन्न होतात, मन जळत असतें, सुधारणा करण्याची उत्कट इच्छा असते. कायद्याच्या मर्यादेचें उल्लंघन करणें गैरशिस्त होय अशी खात्री असते पण उपाय सुचत नाहीं. गांधी यांनीं स्वीकारलेला निःशस्त्र प्रतिकाराचा, अडवणुकीचा किंवा त्यांच्या भाषेंत बोलावयाचें तर सत्याग्रहाचा मार्ग अशा प्रकारच्या अडचणीतच त्यांस सुचलेला असून त्यांनीं अनेक अडचणी सोसून त्या मार्गाचा अवलंब केल्यामुळें तो आतां शास्त्रपूत झाला आहे. हा मार्ग सर्व प्रसंगीं, सर्व कालीं अवलंबिण्यासारखा असला तरी तो हरएक प्रसंगीं उपयोगांत आणावा किंवा नाहीं अगर सर्व प्रसंगीं तितकाच फलद्रूप होईल किंवा नाहीं हें निश्चयानें सांगणें कठीण आहे. तथापि त्या मार्गाची योग्यता मोठी आहे, हें सर्वांस कबूल करावें लागेल. राजानें केलेल्या कायद्याप्रमाणें सर्व प्रजेनें वागावें म्हणूनच प्रत्येक कायद्याच्या मागें तो उल्लंघन करणारांस शासन सांगितलेलें असतें. हें शासन प्राय: अशा प्रकारचें असतें कीं त्यामुळें मनुष्यमात्राची प्रवृत्ति नीतीनें वागण्याकडे व्हावी. नीतीचा मार्ग सुखाचा, समाधानाचा, आणि शांततेचा असतो. आणि त्या मार्गानें जाण्याच्या

१६३०४

नैसर्गिक प्रवृत्तींत जर स्वार्थामुळें थोडी चलबिचल होण्याचा संभव असला तर हें कायद्याचें शासन ती चलविचल काढून टाकून मनुष्याची सन्मार्गाकडे असलेली स्वाभाविक निष्ठा दृढ करण्यास कारणीभूत होतें. पण त्याच्या उलट स्थितींत म्हणजे जेव्हां कायद्यानें ठरविलेली मर्यादा धर्ममूलक अगर न्यायमूलक नसून केवळ कायद्यांत सांगितलेल्या शासनामुळेंच ती अमलांत यावी असा प्रचलित कायद्यांचा परिणाम होऊं लागतो तेव्हां कायद्यानें दिलेलें शासन भोगून धर्मतत्त्वावरची किंवा न्यायतत्त्वावरची आपली सत्यनिष्ठा कसोटीला लावावी अथवा कृत्रिम कायद्यांतील शासनाच्या भीतीनें ईश्वरनिर्मित न्यायतत्त्वाचा अव्हेर करण्यास प्रवृत्त व्हावें असा शहाण्यासुरत्या मनुष्याच्या डोळ्यापुढेंहि एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. सत्यनिष्ठ आणि न्यायनिष्ठ माणसें कायद्याचा कृत्रिम निर्वंध अशा वेळीं पाळणें युक्त नाहीं असें सांगतात. पण हें सांगणें अमलांत येण्यास सत्यावरील व न्यायावरील निष्ठा इतकी तीव्र असावी लागते कीं स्वतःच्या किंवा आपल्या बायका मुलांच्या सुखासुखाचा, वलावलतेचा विचारहि मनांत न आणतां मनुष्य आपलें कर्तव्य करण्यास झटदिशीं प्रवृत्त होईल. ज्याला मानसिक धैर्य, खरी सत्यनिष्ठा किंवा सात्विक शील आणि दानत म्हणतात तें हेंच होय. हा गुण केवळ विद्वत्तेनें येत नाहीं. केवळ चांगल्या कुलांत उत्पन्न झाल्यानें येत नाहीं. आणि केवळ बुद्धिमत्तेनेंहि येत नाहीं. खरें आत्मबल हेंच होय. आणि उपनिषदांतील "नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन" हें तत्त्व नीट लक्षांत ठेविलें पाहिजे.

पण अशा प्रकारचें आत्मबल नुसत्या विद्वत्तेनें अगर बुद्धिमत्तेनें प्राप्त होण्यासारखें नसून तें नैसर्गिकच पाहिजे हा सिद्धांत जरी खरा असला तरी निश्चयी मनुष्यास हा गुण गीतेंत म्हटल्याप्रमाणें अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगानें क्रमाक्रमानें नेहमींच प्राप्त होण्यासारखा असतो, हेंहि विसरतां कामा नये. थोर व उदार पुरुषांचीं चरित्रें शीलचारित्र्यवर्धनास उपयोगी पडतात यांतील बीज हेंच होय. ज्याचा स्वभाव निसर्गतःच सात्विक असतो त्याला आपल्या नैसर्गिक स्वभावाची पूर्ण ओळख पटण्यास, किंवा त्यांची पूर्ण वाढ करण्यास थोर पुरुषांच्या चरित्राचें वाचन हें एक उत्तम साधन होतें; इतकेंच नव्हे तर ज्यांचा स्वभाव किंवा प्रकृति जन्मतःच अपरिपक्व असेल त्यांस ही सदर प्रकृति परिपक्व दशेस आणण्यास थोर विभूतींच्या चरित्रांचा चांगला उपयोग होत असतो. म्हणून महात्मा गांधी यांचें चरित्र ह्या व्यापक दृष्टीनें सर्वांनींच वाचावें अशी त्यांस आमची शिफारस आहे.

पुणें शहर
२६ मार्च १९१८

बाळ गंगाधर टिळक

राजा ग्रंथ पत्रालय. ठाणे. स्वकीय
अनुक्रम.. ७५७८५

REFBK-0017305